॥ श्रीः ॥

राठी भाषांतरासह महा॰

सभापर्व.

काशीनाथ वामन लेले वांईकर

यांनीं

ई येथें मोदवृत्त छापखान्यांत आर्यधर्मदर्पणमासिकपुस्तकद्वारा छापून

प्रसिद्ध केलें.

शके १८१८.

॥ श्रीः ॥

महर्षिव्यासप्रणीतं

महाभारतम् ।

सभापर्व ।

ॐम् ॥ नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् । देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् १ वैशम्पायन उवाच ॥ ततोब्रवीन्मयः पार्थं वासुदेवस्य संनिधौ । प्राञ्जलिः श्लक्ष्णया वाचा पूजयित्वा पुनः पुनः २ अस्मात्कृष्णात्सुसंरब्धात्पावकाच्च दिधक्षतः । त्वया त्रातोस्मि कौन्तेय ब्रूहि किं करवाणि ते ३ अर्जुन उवाच ॥ कृतमेव त्वया सर्वं स्वस्ति गच्छ महासुर । प्रीतिमान्भव मे नित्यं प्रीतिमन्तो वयं च ते ४ मय उवाच ॥ युक्तमेतत्त्वयि विभो यथात्थ पुरुषर्षभ । प्रीतिपूर्वमहं किंचित्कर्तुमिच्छामि भारत ५ अहं हि विश्वकर्मा वै दानवानां महाकविः । सोहं वै त्वत्कृते किंचित्कर्तुमिच्छामि पाण्डव ६ अर्जुन उवाच ॥ प्राणकृच्छ्राद्विमुक्तं

ॐम्॥ नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् १ वैशंपायन सांगतातः—(हे जनमेजया) नंतर श्रीकृष्णाचे संनिध मयासुरानें अर्जुनाची वारंवार प्रशंसा केली आणि हात जोडून मधुर वाणीनें तो त्याला ह्मणाला २. " हे अर्जुना, अतिशय खवळून जाऊन चक्रानें वध करण्यास तयार झालेल्या ह्या श्रीकृष्णापासून आणि दग्ध करण्यास उद्युक्त झालेल्या अग्नीपासून तूं माझें रक्षण केलें आहेस. ह्याकरितां, मी तुझें काय काम करूं तें सांग ३. अर्जुन ह्मणतोः—हे श्रेष्ठा असुरा, तूं सर्व कांहीं केलेंच आहेस. तेव्हां आतां तूं खुशाल आपल्या वाटेनें जा कसा. माझे ठिकाणीं सर्वदां तुझी प्रीति असू[illegible] आह्मी तुझ्यावर प्रीति करीत आहोंत ४. मयासुर ह्मणतोः—हे प्रभो पुरुषश्रेष्ठा, [illegible]ला असें ह्मणणें योग्यच आहे. परंतु, हे भारता, प्रीतिपूर्वक आपलें [illegible] अशी माझी इच्छा आहे ५. सामर्थ्यानें दुसरें विश्व निर्माण [illegible]वांतील शिल्पपंडित आहें आणि तो मी, हे पांडुपुत्रा, तुझ्या[illegible]ण्याचें इच्छीत आहें ६. अर्जुन ह्मणतोः—माझ्यामुळें तूं स्वतःला

न्यसे मया । एवं गते न शक्ष्यामि किंचित्कारयितुं त्वया ॥ ।
संकल्पं मोघमिच्छामि दानव । कृष्णस्य क्रियतां श्रा॰ष्टो
तं मयि ८ चोदितो वासुदेवस्तु मयेन भरतर्षभ । मुहूर्तमि ।-
कमयं चोद्यतामिति ९ ततो विचिन्त्य मनसा लोकनाथः प्रज्ञे ॥
चोदयामास तं कृष्णः सभा वै क्रियतामिति १० यदि त्वं क॰चि-
कामोसि प्रियं शिल्पवतां वर । धर्मराजस्य दैतेय यादृशीमिह मन्यसे ११ यथ
यां कृतां नानुकुर्युर्हि मानवाः प्रेक्ष्य धिष्ठिताः। मनुष्यलोके सकले तादृशीं
कुरु वै सभाम् १२ यत्र दिव्यानभिप्रायान्पश्येम हि कृतांस्त्वया। आसु-
रान्मानुषांश्चैव सभां तां कुरु वै मय १३ वैशम्पायन उवाच॥ प्रतिगृह्य
तु तद्वाक्यं संप्रहृष्टो मय स्तदा । विमानप्रतिमां चक्रे पाण्डवस्य शुभां
सभाम् १४ ततः कृष्णश्च पार्थश्च धर्मराजे युधिष्ठिरे सर्वमेतत्समावेद्य
दर्शयामासतुर्मयम् १५ तस्मै युधिष्ठिरः पूजां यथार्हामकरोत्तदा। स तु तां

प्राणांतिक संकटांतून मुक्त झाल्याचें समजत आहेस. तेव्हां आज्ञा प्रत्युपकार कर-ण्यास तयार झालेल्या तुजकडून कांहीं करून घ्यावें असें मला वाटत नाहीं ७.तथापि, हे असुरा, तुझा मनोरथ निष्फल करण्याचीही माझी इच्छा नाहीं. करितां, श्रीकृष्णाचें तूं कांहींतरी काम कर; ह्मणजे मजवर प्रत्युपकार केल्यासारखें होईल ८. तदनंतर हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, आज्ञा करण्याकरितां मयासुरानें विनंति केली असतां ह्याला काय काम सांगावें " ह्याविषयीं श्रीकृष्णांनीं क्षणभर विचार केला ९ आणि मनामध्यें विचार केल्यानंतर जगदीश्वर प्रजाधिपति श्रीकृष्णांनीं " सभा तयार कर" ह्मणून त्या मयासुराला सांगितलें १०. (श्रीकृष्ण ह्मणतातः—) हे शिल्पिश्रेष्ठ असुरा, कांहीं प्रिय करण्याचें जर तुझ्या मनांत असेल तर तूं आपल्या इच्छेप्रमाणें ह्या ठिकाणीं धर्मराजाला एक सभा करून दे ११.परंतु, (ती अशीतशी न करितां) अवलोकन करितांक्षणीं मानव थक्क होऊन जावेत आणि सर्व मनुष्य लोकामध्यें तिच्यासारखी दुसरी सभा कोणालाही करितां येऊं नये अशी सभा तू कर ११,१२. हे मयासुरा, ज्या सभेंतील (देवादिकांच्या चित्रांचे ठिकाणीं देव, असुर आणि मनुष्य ह्यांच्या स्वभावांचा ठसा उमटलेला आमच्या दृष्टीस पडेल अशी सभा तूं निर्माण कर १३. वैशंपायन सां॰ श्रीकृष्णांची ती आज्ञा मयासुरानें मोठ्या आनंदानें शिरसामान्य ॰ धर्मराजाकरितां एक विमानासारखी (चल) सभा करण्याचा त्य॰ तदनंतर कृष्णार्जुनांनीं धर्मराज युधिष्ठिराला हें सर्व निवेद॰ भेटविलें १५. तेव्हां युधिष्ठिरानें योग्यतेनुरूप त्याचें अ॰

आह मयः सत्कृत्य भारत १६ स पूर्वदेवचरितं तदा तत्र विशांपते।
दैतेयः पाण्डुपुत्रेषु भारत १७ स कालं कंचिदाश्वस्य विश्व-
विचिन्त्य तु । सभां प्रचक्रमे कर्तुं पाण्डवानां महात्मनाम् १८ अभि-
पार्थानां कृष्णस्य च महात्मनः । पुण्येहनि महातेजाः कृतकौतुक-
ः १९ तर्पयित्वा द्विजश्रेष्ठान्पायसेन सहस्रशः। धनं बहुविधं दत्त्वा तेभ्य एव
र्यवान् २० सर्वर्तुगुणसंपन्नां दिव्यरूपां मनोरमाम् । दशकिष्कुसहस्रान्तां
पयामास सर्वतः २१ इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैया-
सिक्यां सभापर्वणि सभाक्रियापर्वणि सभास्थाननिर्णये प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥
वैशम्पायन उवाच ॥ उषित्वा खाण्डवप्रस्थे सुखवासं जनार्दनः । पार्थैः
प्रीतिसमायुक्तैः पूजनार्होभिपूजितः १ गमनाय मतिं चक्रे पितुर्दर्शनला-
लसः । धर्मराजमथामन्त्र्य पृथां च पृथुलोचनः २ ववन्दे चरणौ मूर्ध्ना
जगद्वन्द्यः पितृष्वसुः । स तया मूर्ध्न्युपाघ्रातः परिष्वक्तश्च केशवः ३
ददर्शानन्तरं कृष्णो भगिनीं स्वां महायशाः । तामुपेत्य हृषीकेशः प्रीत्या

भरतकुलोत्पन्ना जनमेजया, मयासुरानेंही आदरपूर्वक त्याचा स्वीकार केला १६. हे भरतवंशजा जनमेजय राजा, मयासुरानें प्रथम त्या ठिकाणीं पांडवांना वृषपर्वसंज्ञक दैत्याचें चरित्र कथन केलें १७ आणि नंतर कांहींवेळ स्वस्थपणानें विचार केल्यावर प्रतिसृष्टि निर्माण करणारा तो मयासुर महात्म्या पांडवांकरितां सभा करण्याच्या तया-रीस लागला १८. प्रथमतः श्रीकृष्ण व पांडव ह्यांच्या अनुमतीनें चांगल्या दिवसावर त्या महातेजस्वी मयासुरानें पुण्याहवाचन वगैरे केलें १९ आणि हजारों द्विजश्रेष्ठांना पायसाचें भोजन घालून त्यांना नानाप्रकारचें द्रव्यही त्या वीर्यवान् मयासुरानें अर्पण केलें २० व तदनंतर सर्व ऋतूंतील गुणांनीं संपन्न, आकारानें दिव्य आणि मनोहर अशी भूमि त्यानें सर्व बाजूंनीं दहा दहा हजार हात लांबीची मोजून आखली २१. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील सभाक्रिया-पर्वापैकीं सभास्थान निश्चित करण्याविषयीं पहिला अध्याय समाप्त झाला ॥ १ ॥

वैशंपायन सांगतातः—आनंदित झालेले कुंतीपुत्र मानमान्यता ठेवीत असतांना पूज्य श्रीकृष्ण खांडवप्रस्थामध्यें कांहीं दिवस सुखानें राहिले १ व नंतर पित्याच्या भेटीकरितां उत्सुक होऊन त्यांनीं तेथून जाण्याचें मनांत आणिलें. प्रथम त्या विशाल-नयन श्रीकृष्णांनीं धर्मराज व कुंती ह्यांची अनुज्ञा घेतली २ आणि जातांना त्या जग-द्वंद्य श्रीकृष्णांनीं आपल्या पितृभगिनीच्या चरणावर मस्तक ठेवून प्रणाम केला. तेव्हां त्या पितृभगिनीनेंही त्यांच्या मस्तकीं अवघ्राण करून त्यांना प्रेमानें पोटाशीं

बाष्पसमन्वितः ४ अर्थ्यं तथ्यं हितं वाक्यं लघु युक्तमनुत्तरम् । उ
भगवान्भद्रां सुभद्रां भद्रभाषिणीम् ५ तया स्वजनगामीनि
वचनानि सः । संपूजितश्चाप्यसकृच्छिरसा चाभिवादितः ६ तामनुज्ञा
वार्ष्णेयः प्रतिनन्द्य च भामिनीम् । ददर्शानन्तरं कृष्णां धौम्यं
जनार्दनः ७ ववन्दे च यथान्यायं धौम्यं पुरुषसत्तमः । द्रौपदीं सा
यित्वा च आमन्त्र्य च जनार्दनः ८ भ्रातॄनभ्यगमद्विद्वान्पार्थेन सा
बली । भ्रातृभिः पञ्चभिः कृष्णो वृतः शक्र इवामरैः ९ यात्राकालरू
योग्यानि कर्माणि गरुडध्वजः । कर्तुकामः शुचिर्भूत्वा स्नातवान्समलं-
कृतः १० अर्चयामास देवांश्च द्विजांश्च यदुपुङ्गवः । माल्यजाप्यनमस्का-
रैर्गन्धैरुच्चावचैरपि ११ स कृत्वा सर्वकार्याणि प्रतस्थे तस्थुषां वरः । उपेत्य
स यदुश्रेष्ठो बाह्यकक्षां विनिर्गतः १२ स्वस्तिवाच्यार्हतो विप्रान्दधिपात्र-
फलाक्षतैः । वसु प्रदाय च ततः प्रदक्षिणमथाकरोत् १३ काञ्चनं रथमा-
स्थाय तार्क्ष्यकेतनमाशुगम् । गदाचक्रासिशार्ङ्गाद्यैरायुधैरावृतं शुभम् १४

धरिलें ३. तदनंतर त्या महायशस्वी श्रीकृष्णांनीं आपल्या भगिनीची भेट घेतली. डोळ्यांत आसवें आणून प्रीतीनें श्रीकृष्ण तिच्याजवळ गेले ४ आणि शुभ भाषण करणाऱ्या त्या यशस्विनी सुभद्रेशीं भगवानांनीं—अर्थांनीं भरलेलें, तथ्य, हितावह, योग्य आणि निरुत्तर असें थोडक्यांत—भाषण केलें ५. तेव्हां त्यांचेपाशीं तिनें माहेरच्या माणसांना निरोप सांगितले आणि वारंवार प्रशंसापूर्वक तिनें त्यांना मस्तकानें प्रणामही केला ६. त्या तेजस्विनी भगिनीचा निरोप घेतल्यानंतर द्रौपदी आणि धौम्य ह्यांच्या भेटीला श्रीकृष्ण गेले ७ आणि धौम्यमुनींना यथान्याय वंदन करून त्या पुरुषश्रेष्ठ श्रीकृष्णांनीं सांत्वनपूर्वक द्रौपदीचा निरोप घेतला ८. तदनंतर ते बलाढ्य श्रीकृष्ण अर्जुनाला बरोबर घेऊन आपल्या आतेभावांकडे (ह्मणजे पांडवांकडे) गेले आणि देवांनीं परिवेष्टित झालेल्या इंद्राप्रमाणें त्या पांच भ्रात्यांनीं परिवेष्टित होऊन ९ त्या गरुडध्वज श्रीकृष्णांनीं प्रयाणकालीं उचित असलेलीं कृत्यें करण्याच्या उद्देशानें स्नान करून व शुचिर्भूत होऊन अलंकार धारण केले १० प्रथमतः पुष्पें, जाप्य मंत्र, नमस्कार आणि अनेक प्रकारचे सुगंध ह्यांच्या योगानें देवब्राह्मणांचें पूजन करून व प्रयाणकालचीं सर्व कृत्यें आटोपून यदुवंशजश्रेष्ठ सनातन श्रीकृष्ण प्रयाण करण्यास उद्युक्त झाले. तदनंतर बाहेरल्या कोटाशीं आल्यावर दधिपात्र, फळें व अक्षता घेऊन स्थित असलेल्या पूज्य ब्राह्मणां समीप ते गेले आणि दक्षिणा दिल्यानंतर त्यांनीं त्या ब्राह्मणांना प्रदक्षिणा केली ११,१२,१३. तिथि, नक्षत्र व मुहूर्त हीं प्रयाणाला अवश्यक असलेल्या गुणांनीं

शावप्यथ नक्षत्रे मुहूर्ते च गुणान्विते । प्रययौ पुण्डरीकाक्षः शैब्यसुग्री-
हनः १५ अन्वारुरोह चाप्येनं प्रेम्णा राजा युधिष्ठिरः । अपास्य
स्य यन्तारं दारुकं यन्तृसत्तमम् १६ अभीषून्संप्रजग्राह स्वयं कुरुपतिस्तदा ।
ह्यार्जुनश्चापि चामरव्यजनं सितम् १७ रुक्मदण्डं बृहद्बाहुर्विदुधाव
क्षिणम् । तथैव भीमसेनोपि यमाभ्यां सहितो बली १८ पृष्ठतोनुययौ
गमृत्विक्पौरजनैः सह । स तथा भ्रातृभिः सर्वैः केशवः परवीरहा १९
न्वीयमानः शुशुभे शिष्यैरिव गुरुः प्रियैः । पार्थमामन्त्र्य गोविन्दः
परिष्वज्य सुपीडितम् २० युधिष्ठिरं पूजयित्वा भीमसेनं यमौ तथा ।
परिष्वक्तो भृशं तैस्तु यथाभ्यामभिवादितः २१ योजनार्धमथो गत्वा कृष्णः
परपुरंजयः । युधिष्ठिरं समामन्त्र्य निवर्तस्वेति भारत २२ ततोभिवाद्य
गोविन्दः पादौ जग्राह धर्मवित् । उत्थाप्य धर्मराजस्तु मूर्ध्न्युपाघ्राय
केशवम् २३ पाण्डवो यादवश्रेष्ठं कृष्णं कमललोचनम् । गम्यतामित्यनु-

---

युक्त असतांना गदा, चक्र, खड्ग, शार्ङ्ग चाप इत्यादि आयुधें, गरुडचिन्हांकित ध्वज, सत्वर गति आणि शैब्य व सुग्रीव जातीचे अश्व ह्यांनीं संपन्न असलेल्या सुवर्णमय शुभ रथावर आरूढ होऊन कमलनयन श्रीकृष्ण निघाले असतां १४,१५ त्यांच्या मागो-माग युधिष्ठिर राजाही प्रेमानें त्या रथावर आरूढ झाला. आरूढ झाल्यानंतर कुरु-वंशजश्रेष्ठ धर्मराजानें सर्व सारथ्यांमध्यें श्रेष्ठ असलेल्या श्रीकृष्णांच्या दारुक सारथ्याला ीकडे सारून अश्वांच्या रश्मि स्वतः आपल्या हातांत घेतल्या. महापराक्रमी अर्जु-नही रथावर आरूढ झाला आणि शुभ्रवर्ण व सुवर्णदंड ह्यांनीं युक्त असलेली चवरी तो श्रीकृ-ष्णावर प्रदक्षिणिक वारूं लागला. त्याचप्रमाणें बलाढ्य भीमसेन नकुलसहदेवांसह-वर्तमान १६,१७,१८ आणि ऋत्विज व नगरवासी जन ह्यांसहवर्तमान श्रीकृ-ष्णाच्या मागोमाग चालला. असो. प्रिय शिष्यांसहवर्तमान गुरुच चालला आहे कीं काय ह्याप्रकारें ते सर्व भ्राते मागून येत असतांना शत्रूकडील वीरांचा निष्पात करणारे श्रीकृष्ण शोभूं लागले. नंतर श्रीकृष्णांनीं अर्जुनाला कडकडून भेटून त्याचा निरोप घे १९,२०; युधिष्ठिर व भीमसेन ह्यांना त्यांनीं प्रणाम केला आणि अर्जुनाप्र-माणेंच नकुलसहदेवांना त्यांनीं कडकडून भेट दिली. तेव्हां ते कुंतीपुत्रही त्यांना कडक-डून भेटले व नकुलसहदेवांनीं त्यांना अभिवंदन केलें २१. हे भरतकुलोत्पन्ना जनमे-जया, पांडवांबरोबर दोन कोस गेल्यानंतर शत्रुसेना पराजित करणाऱ्या धर्मवेत्त्या श्रीकृष्णांनीं "आतां परत फिरावें" ह्मणून युधिष्ठिराला सांगून अभिवंदनपूर्वक त्याचे पाय धरिले. तेव्हां पांडुपुत्र धर्मराजानें श्रीकृष्णांना उठवून त्यांचें मस्तक हुंगलें २२,२३

ज्ञाप्य धर्मराजो युधिष्ठिरः २४ ततस्तैः संविदं कृत्वा यथावन्मधुसूदनः
निवर्त्य च तथा कृच्छ्रात्पाण्डवान्सपदानुगान् २५ स्वां पुरीं प्रययौ हृ
यथा शक्रोमरावतीम् । लोचनैरनुजग्मुस्ते तमादृष्टिपथात्तदा २६ मनो
भिरनुजग्मुस्ते कृष्णं प्रीतिसमन्वयात् । अतृप्तमनसामेव तेषां केशवदर्श
क्षिप्रमन्तर्दधे शौरिश्चक्षुषां प्रियदर्शनः २७ अकामा एव पार्थास्ते गो
न्दगतमानसाः । निवृत्योपययुस्तूर्णं स्वपुरं पुरुषर्षभाः २८ स्यन्दनेन
कृष्णोपि त्वरितं द्वारकामगात् । सात्वतेन च वीरेण पृष्ठतो यायिना तदा २९
दारुकेण च सूतेन सहितो देवकीसुतः । स गतो द्वारकां विष्णुर्गरुत्मानिव
वेगवान् ३० वैशम्पायन उवाच ॥ निवृत्य धर्मराजस्तु सह भ्रातृभिर-
च्युतः । सुहृत्परिवृतो राजा प्रविवेश पुरोत्तमम् ३१ विसृज्य सुहृदः सर्वा-
भ्रातॄन्पुत्रांश्च धर्मराट् । मुमोद पुरुषव्याघ्रो द्रौपद्या सहितो नृप ३२
वैशम्पायन उवाच ॥ केशवोपि मुदा युक्तः प्रविवेश पुरोत्तमम् । पूज्य-
मानो यदुश्रेष्ठैरुग्रसेनमुखैस्तथा ३३ आहुकं पितरं वृद्धं मातरं च यशस्विनीम् ।

आणि नंतर यदुवंशजश्रेष्ठ कमलनयन श्रीकृष्णांना धर्मराजानें " जा " ह्मणून अनुज्ञा दिली २४. तेव्हां " मी पुनः येईन " अशी त्यांच्याशीं खरीखरी कबुली करून मधुसूदनांनीं मोठ्या कष्टानें पादचारी अनुयायांसहवर्तमान पांडवांना परत पाठविले २५. आणि अमरावती नगरीस जाणाऱ्या इंद्राप्रमाणें ते आनंदानें आपल्या नगरीस चालते झाले. कृष्ण चालते झाल्यावर जोंपर्यंत नजर पोंहोचत होती तोंपर्यंत त्या पांडवां आपले डोळे एकसारखे तिकडे लाविले २६ आणि नंतर प्रेमामुळें ते मनांनीं श्रीकृष्णांबरोबर जाऊं लागले. असो. श्रीकृष्णांच्या दर्शनाविषयीं पांडवांचें मन अतृप्त असतांनाच ज्यांचें दर्शन प्रियकर आहे असे ते श्रीकृष्ण लवकरच दिसेनासे झाले २७ तदनंतर श्रीकृष्णांकडे ज्यांचें अंतःकरण लागून राहिलेलें आहे असे ते पुरुषश्रे पांडव (कृष्णदर्शनाविषयीं) मनोरथ पूर्ण झाला नसतांनाच परत फिरून सत्वर आपल नगराला गेले २८. इकडे मागोमाग येणाऱ्या वीरबलरामासहवर्तमान श्रीकृष्ण सत्व द्वारकेकडे गेले आणि वेगवान् गरुडाप्रमाणें ते विष्णुस्वरूप देवकीपुत्र श्रीकृष्ण दार सारथ्यासहवर्तमान द्वारकेंत प्रविष्ट झाले २९, ३०. वैशंपायन सांगतातः—इकडे भ्रात सहवर्तमान परत फिरल्यावर धर्मापासून च्युत न होणारा धर्मराज युधिष्ठिर भूप सुहृदांनीं परिवेष्टित असतांना आपल्या श्रेष्ठ नगरामध्यें प्रविष्ट झाला ३१. नंतर ह जनमेजय राजा, सर्व सुहृद, भ्राते आणि पुत्र ह्यांना निरोप देऊन तो पुरुषश्रेष्ठ धर्मराज द्रौपदीसहवर्तमान आनंदानें राहूं लागला ३२. इकडे उग्रसेनप्रभृति श्रेष्ठ यादव

अभिवाद्य बलं चैव स्थितः कमललोचनः ३४ प्रद्युम्नसाम्बनिशठांश्चारु-
देष्णं गदं तथा । अनिरुद्धं च भानुं च परिष्वज्य जनार्दनः ३५ स वृद्धैर-
भ्यनुज्ञातो रुक्मिण्या भवनं ययौ ३६ मयोऽपि स महाभागः सर्वरत्नवि-
भूषिताम् । विधिवत्कल्पयामास सभां धर्मसुताय वै ३७[५८]इति श्रीम-
हाभारते० सभापर्वणि सभाक्रियापर्वणि भगवद्याने द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

वैशम्पायन उवाच ॥ अथाब्रवीन्मयः पार्थमर्जुनं जयतां वरम् । आपृच्छे
त्वां गमिष्यामि पुनरेष्यामि चाप्यहम् १ उत्तरेण तु कैलासं मैनाकं पर्वतं
प्रति । यियक्षमाणेषु पुरा दानवेषु मया कृतम् २ चित्रं मणिमयं भाण्डं रम्यं
बिन्दुसरः प्रति । सभायां सत्यसन्धस्य यदासीद्वृषपर्वणः ३ आगमिष्यामि
तद्गृह्य यदि तिष्ठति भारत । ततः सभां करिष्यामि पाण्डवस्य यशस्वि-
नीम् ४ मनःप्रह्लादिनीं चित्रां सर्वरत्नविभूषिताम् । अस्ति बिन्दुसरस्युग्रा
गदा च कुरुनन्दन ५ निहिता भावयाम्येवं राज्ञा हत्वा रणे रिपून् । सुव-
र्णबिन्दुभिश्चित्रा गुर्वी भारसहा दृढा ६ सा वै शतसहस्रस्य संमिता शत्रु-

---

स्तुति करीत असतांना श्रीकृष्णही आपल्या उत्कृष्ट नगरीमध्यें प्रविष्ट झाले ३३ आणि पितामह आहुक, वृद्ध पितर, यशस्विनी माता आणि बलराम ह्यांना अभिवंदन करून ते कमलनयन श्रीकृष्ण उभे राहिले ३४. नंतर प्रद्युम्न, सांब, निशठ, चारुदेष्ण, गद, अनिरुद्ध आणि भानु ह्यांना श्रीकृष्णांनीं आलिंगन दिलें ३५ आणि वडील माणसांनीं जाण्याची अनुज्ञा दिल्यानंतर ते रुक्मिणीच्या घरीं गेले ३६. तदनंतर इकडे तो महाभाग्यवान् मयासुरही धर्मपुत्र युधिष्ठिराकरितां सर्वरत्नांनीं भूषित अशी सभा यथाशास्त्र करण्याचा विचार करूं लागला ३७. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील सभाक्रिया-पर्वापैकीं भगवान् श्रीकृष्णांच्या प्रयाणाविषयीं दुसरा अध्याय समाप्त झाला ॥ २ ॥

वैशंपायन सांगतातः—नंतर विजयिश्रेष्ठ कुंतीपुत्र अर्जुनाला मयासुर ह्मणाला "मी तुला विचारून आतां जातों; फिरून मी परत येईन १. कैलासपर्वताच्या उत्तरेस मैनाकपर्वतावर पूर्वी दानवांच्या मनांतून यज्ञ करण्याचें आलें असतांना रम्य अशा बिंदुसरोवराच्या तीरीं सत्यवचनी वृषपर्व्याच्या सभेमध्यें मीं रत्नमय अद्भुत सामान तयार केलेलें आहे २,३. तेव्हां हे भरतकुलोत्पन्ना अर्जुना, तें जर अद्याप तेथें असेल तर मी घेऊन येईन आणि नंतर पांडुपुत्र धर्मराजाकरितां यशस्कारक, अंतःकरणाला आनंद देणारी आणि सर्व रत्नांनीं भूषित अशी सभा बनवीन. हे कुरुनंदना अर्जुना, राजा वृषपर्व्यानें संग्रामामध्यें शत्रूंचा वध करून त्या बिंदुसरोवरावर एक भयंकर गदा ठेवली आहे असें मला स्मरतें. ती गदा सुवर्ण बिंदूंनीं चित्रित केलेली

घातिनी। अनुरूपा च भीमस्य गाण्डीवं भवतो यथा ७ वारुणश्च महाशङ्खो देवदत्तः सुघोषवान्। सर्वमेतत्प्रदास्यामि भवते नात्र संशयः ८ इत्युक्त्वा सोऽसुरः पार्थं प्रागुदीचीं दिशं गतः। अथोत्तरेण कैलासान्मैनाकं पर्वतं प्रति ९ हिरण्यशृङ्गः सुमहान्महामणिमयो गिरिः। रम्यं बिन्दुसरो नाम यत्र राजा भगीरथः १० द्रष्टुं भागीरथीं गङ्गामुवास बहुलाः समाः। यत्रेष्टं सर्वभूतानामीश्वरेण महात्मना ११ आहृताः क्रतवो मुख्याः शतं भरतसत्तम। यत्र यूपा मणिमयाश्चैत्याश्चापि हिरण्मयाः १२ शोभार्थं विहितास्तत्र न तु दृष्टान्ततः कृताः। यत्रेष्ट्वा स गतः सिद्धिं सहस्राक्षः शचीपतिः १३ यत्र भूतपतिः सृष्ट्वा सर्वाँल्लोकान्सनातनः। उपास्यते तिग्मतेजाः स्थितो भूतैः सहस्रशः १४ नरनारायणौ ब्रह्मा यमः स्थाणुश्च पञ्चमः। उपासते यत्र सत्रं सहस्रयुगपर्यये १५ यत्रेष्टं वासुदेवेन सत्रैर्वर्षगणान्बहून्। श्रद्दधानेन सततं धर्मसंप्रतिपत्तये १६ सुवर्णमालिनो यूपां-

---

असून जड, भार सहन करणारी, बळकट ४,५,६, एकलक्ष गदांची बरोबरी करणारी व शत्रूंना निष्पात करणारी असल्यामुळें तुला जसें गांडीव धनुष्य योग्य आहे तशी ती भीमसेनाला योग्य होईल ७. त्याचप्रमाणें उत्कृष्ट नादानें युक्त असलेला वरुणाचा एक देवदत्तनामक प्रचंड शंखही त्या ठिकाणीं आहे. असो. हें सर्व मी तुला आणून देणार आहें ह्यांत संशय नाहीं" ८. असें कुंतीपुत्र अर्जुनाला सांगून तो मयासुर ईशान्य दिशेस गेला आणि नंतर तो कैलासपर्वताच्या उत्तरेस मैनाकपर्वतावर चालता आला ९. तो प्रचंड पर्वत मोठमोठ्या रत्नांनीं भरलेला असून सुवर्णवर्ण शिखरांनीं युक्त आहे व तेथेंच बिंदुसरोवर आहे. त्या ठिकाणीं भगीरथ राजा १० आपल्या गंगेचें दर्शन घेण्याकरितां पुष्कळ वर्षें राहिला होता. महात्म्या सर्वभूताधिपति ब्रह्मदेवानें त्या ठिकाणीं यजन केलें ११ ह्मणजे हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, शंभर अश्वमेध त्या ठिकाणीं त्यानें केले. रत्नमय यज्ञस्तंभ व सुवर्णमय यज्ञशाला त्या ठिकाणीं आहेत १२; त्या शोभेकरितां केलेल्या असून शास्त्रोक्तविधि ह्या नात्यानें केलेल्या नाहींत. तेथें यजन करून शचीपति इंद्राला सिद्धि प्राप्त झाली १३. त्या ठिकाणीं सर्व लोकांना उत्पन्न करून स्थित असलेल्या प्रचंड तेजस्वी भूताधिपति सनातन शंकराची हजारों भूतगण सेवा करीत असतात १४. नरनारायण, ब्रह्मदेव, यम व पांचवा रुद्र असे त्या ठिकाणीं सहस्रयुगांचें पर्यावर्तन झालें असतां सत्र करीत असतात १५. धर्मप्रवृत्ति होण्याकरितां त्या ठिकाणीं भगवान् वासुदेवानें अनेक संवत्सरसमूह होईपर्यंत श्रद्धापूर्वक एकसारखीं सत्रें चालविलीं होतीं १६ व सुवर्णमालांनीं युक्त असलेले यज्ञिय स्तंभ

श्चैत्यांश्चाप्यतिभास्वरान् । ददौ यत्र सहस्राणि प्रयुतानि च केशवः1
तत्र गत्वा स जग्राह गदां शङ्खं च भारत। स्फाटिकं च सभाद्रव्यं यदासी-
द्वृषपर्वणः१८ किंकराः सह रक्षोभिर्यदरक्षन्महद्धनम । तदगृह्णान्मयस्तत्र
गत्वा सर्वं महासुरः १९ तदाहृत्य च तां चक्रे सोऽसुरोऽप्रतिमां सभाम् ।
विश्रुतां त्रिषु लोकेषु दिव्यां मणिमयीं शुभाम् २० गदां च भीमसेनाय
प्रददौ प्रवरां तदा । देवदत्तं चार्जुनाय शङ्खप्रवरमुत्तमम् ॥ यस्य शङ्खस्य
नादेन भूतानि प्रचकम्पिरे २१ सभा च सा महाराज शातकुम्भमयद्रुमा ।
दशकिष्कुसहस्राणि समन्तादायताभवत् २२ यथा वह्नेर्यथार्कस्य सोमस्य
च यथा सभा । भ्राजमाना तथात्यर्थं दधार परमं वपुः २३ अभिघ्नतीव
प्रभयां प्रभामर्कस्य भास्वराम् । प्रबभौ ज्वलमानेव दिव्या दिव्येन वर्चसा २४
नवमेघप्रतीकाशा दिवमावृत्य विष्ठिता । आयता विपुला रम्या विपाप्मा
विगतक्लमा २५ उत्तमद्रव्यसंपन्ना रत्नप्राकारतोरणा । बहुचित्रा बहुधना

आणि अत्यंत चकाकत असलेल्या यज्ञशाला त्या केशवानेंच हजारों लाखों त्या ठिकाणीं तयार करून ठेविल्या होत्या १७. हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, त्या ठिकाणीं जाऊन मयासुरानें गदा, शंख व स्फटिकाचें वगैरे जें वृषपर्व्याच्या सभेचें सामान त्या स्थलीं (अवशिष्ट राहिलेलें) होतें तें घेतलें १८. तात्पर्य, किंकरांसहवर्तमान राक्षसांनीं जें अगणित द्रव्य संरक्षण करून ठेविलें होतें तें सर्व त्या महादैत्यानें तेथें जाऊन घेतलें १९ आणि तें आणून दिव्य, रत्नखचित, त्रैलोक्यामध्यें प्रख्यात आणि शुभावह अशी अप्रतिम सभा त्या असुरानें तयार केली २०. तेथून आल्यावर मयासुरानें ती श्रेष्ठ गदा भीमसेनाला दिली आणि ज्याच्या नादानें प्राणिमात्र कंपित होत असा तो सर्वोत्कृष्ट अनुपम देवदत्त शंख त्यानें अर्जुनाला अर्पण केला २१. हे महाराज जनमेजया, सुवर्णमय वृक्षांनीं युक्त असलेली ती सभा सर्व बाजूंनीं दहा-दहा हजार हात लांब होती २२. अग्नि, सूर्य आणि चंद्र ह्यांच्या सभांप्रमाणें झळकत असलेल्या त्या सभेची आकृति फारच प्रेक्षणीय होती २३. आपल्या प्रभेच्या योगानें सूर्याच्या प्रभेला मागेंच टाकीत आहे कीं काय अशी ती दिव्य सभा दिव्य तेजानें उज्ज्वल असल्यासारखी दिसत होती २४. नूतन मेघांसारखी अंतरिक्ष व्यापून राहिलेली ती सभा लांबरुंद, रमणीय, पापनाशक आणि श्रमपरिहारक होती २५. उत्कृष्ट उत्कृष्ट वस्तूंनीं आणि रत्नखचित प्राकारांनीं व तोरणांनीं युक्त असलेली ती

---

1 प्रयुत ह्मणजे दशलक्ष. परंतु, भाषेच्या सरणीकरितां ह्या शब्दाचें भाषांतर "लाखों" ह्या शब्दानें येथें केलें आहे. २ किंकर ह्मणून एक राक्षसांची जात आहे.

निर्मिता विश्वकर्मणा २६ न दाशार्ही सुधर्मा वा ब्रह्मणो वाथ तादृशी । सभा रूपेण संपन्ना यां चक्रे मतिमान्मयः २७ तां स्म तत्र मयेनोक्ता रक्षन्ति च वहन्ति च । सभामष्टौ सहस्राणि किंकरा नाम राक्षसाः २८ अन्तरिक्षचरा घोरा महाकाया महाबलाः । रक्ताक्षाः पिङ्गलाक्षाश्च शुक्तिकर्णाः प्रहारिणः २९ तस्यां सभायां नलिनीं चकाराप्रतिमां मयः । वैदूर्यपत्रविततां मणिनालमयाम्बुजाम् ३० पद्मसौगन्धिकवतीं नानाद्विजगणायुताम् । पुष्पितैः पङ्कजैश्चित्रां कूर्मैर्मत्स्यैश्च काञ्चनैः ३१ चित्रस्फटिकसोपानां निष्पङ्कसलिलां शुभाम् ३२ मन्दानिलसमुद्धूतां मुक्ताबिन्दुभिराचिताम् । महामणिशिलापट्टबद्धपर्यन्तवेदिकाम् ३३ मणिरत्नचितां तां तु केचिदभ्येत्य पार्थिवाः । दृष्ट्वापि नाभ्यजानन्त तेऽज्ञानात्प्रपतन्त्युत ३४ तां सभामभितो नित्यं पुष्पवन्तो महाद्रुमाः । आसन्नानाविधा नीलाः

अति अद्भुत सभा बहुमूल्यवान् असून प्रतिसृष्टि निर्माण करण्याचें सामर्थ्य असलेल्या मयासुरानें उत्तम प्रकारें केली होती २६. सारांश, जी सभा बुद्धिमान् मयासुरानें निर्माण केली त्या सभेप्रमाणें आकारानें मनोहर सभा विष्णूची नाहीं, ब्रह्मदेवाची नाहीं अथवा देवसभा जी सुधर्मा तीही नाहीं २७. त्या ठिकाणीं मयासुरानें आज्ञा केलेले असे आठ हजार किंकरनामक राक्षस त्या सभेचें रक्षण करीत असत अथवा प्रसंग पडल्यास तिला दुसऱ्या ठिकाणीं नेऊनही ठेवीत असत २८. ते किंकरनामक राक्षस आकृतीनें भयंकर, धिप्पाड, महाबलाढ्य, आरक्तवर्ण अथवा पिंगटवर्ण नेत्रांनीं आणि शिंपेसारख्या कानांनीं युक्त, प्रहार करण्यामध्यें पटाईत व अंतरिक्षामध्यें संचार करणारे होते २९. त्या सभेमध्यें मयासुरानें एक अप्रतिम सरोवर तयार केलेलें होतें. तें इंद्रनील मण्यांच्या पानांनीं व्याप्त असून रत्नमय देठांनीं संपन्न असलेल्या सुवर्णकमलांनीं युक्त होतें ३०. त्याचप्रमाणें पद्मरागाच्या कमलांनीं व नानाप्रकारच्या पक्षिगणांनीं तें युक्त असून सुवर्णमय विकसित कमळें, मत्स्य व कूर्म ह्यांमळें तें मोठें आश्चर्यकारक बनविलेलें होतें ३१. चित्रविचित्र स्फटिकांच्या पायऱ्या त्या सरोवराला केलेल्या असून त्या उत्कृष्ट सरोवरांतील जलही पंकरहित बनविलेलें होतें ३२. मंदमंद वायूनें त्या सरोवरांतील तुषार उडत असल्यामुळें तें चोहोंकडून मोत्यांसारख्या जलबिंदूंनीं व्याप्त झालें होतें आणि महामूल्यवान् रत्नाच्या पाथऱ्यांचे चौरंग त्याच्या चारी बाजूंस ठेविलेले होते ३३. कित्येक राजे त्या रत्नखचित सरोवरापाशीं येत आणि त्याच्याकडे पहात; परंतु, तें सरोवर आहे असें समजत नसत आणि (भूमीवरच कमळें वगैरे काढिलेलीं आहेत) अशा गैरसमजुतीमुळें ते त्या सरोवरांत

शीतच्छाया मनोरमाः ३५ काननानि सुगन्धीनि पुष्करिण्यश्च सर्वशः। हंसकारण्डवोपेताश्चक्रवाकोपशोभिताः ३६ जलजानां च पद्मानां स्थलजानां च सर्वशः। मारुतो गन्धमादाय पाण्डवान्स्म निषेवते ३७ ईदृशीं तां सभां कृत्वा मासैः परिचतुर्दशैः। निष्ठितां धर्मराजाय मयो राजन्न्यवेदयत् ३८ [९६] इति० सभाक्रियापर्वणि सभानिर्माणे तृतीयोध्यायः॥३॥

वैशम्पायन उवाच ॥ ततः प्रवेशनं तस्यां चक्रे राजा युधिष्ठिरः। अयुतं भोजयित्वा तु ब्राह्मणानां नराधिपः १ साज्येन पायसेनैव मधुना मिश्रितेन च। भक्ष्यैर्मूलैः फलैश्चैव मांसैर्वाराहहारिणैः २ कृसरेणाथ जीवन्त्या हविष्येण च सर्वशः। मांसप्रकारैर्विविधैः खाद्यैश्चापि तथा नृप ३ चोष्यैश्च विविधै राजन्पेयैश्च बहुविस्तरैः। अहतैश्चैव वासोभिर्माल्यैरुच्चावचैरपि ४ तर्पयामास विप्रेन्द्रान्नानादिग्भ्यः समागतान्। ददौ तेभ्यः सहस्राणि गवां प्रत्येकशः पुनः ५ पुण्याहघोषस्तत्रासीद्दिवस्पृगिव भारत। वादित्रैर्विविधैर्दिव्यैर्गन्धैरुच्चावचैरपि ६ पूजयित्वा कुरुश्रेष्ठो दैव-

---

पडत ३४. त्या सभेच्या सभोंवतीं सर्वदां प्रफुल्लित, शीतल छायेनें युक्त आणि मनोहर असे नानाप्रकारचे मोठमोठे अंजिराचे वृक्ष होते ३५. तशींच सुगंधीं वनें आणि हंस व कारंडव पक्ष्यांनीं युक्त असून चक्रवाकपक्ष्यांनीं सुशोभित असलेल्या पुष्करिणी त्याच्या सर्व बाजूंनीं होत्या ३६ व जलांतील आणि स्थलावरील कमलांचा सुगंध आणून वायु सर्व बाजूंनीं पांडवांची त्या सभेमध्यें सेवा करीत होता ३७. हे जनमेजय राजा, पूर्ण चवदा महिन्यांनीं अशा प्रकारची ती सभा तयार करून मयासुरानें ती संपूर्ण झाल्याबद्दल धर्मराजाला कळविलें ३८. ह्याप्रमाणें श्रीमहाभारतांतर्गत० सभापर्वांतील सभाक्रियापर्वांपैकीं सभा निर्माण करण्याविषयीं तिसरा अध्याय समाप्त झाला ॥ ३ ॥

वैशंपायन सांगतातः—तदनंतर प्रजाधिपति युधिष्ठिर राजानें दहा हजार ब्राह्मणांना भोजन घालून त्या सभेमध्यें प्रवेश केला १. घृत व मधु ह्यांनीं मिश्रित केलेलें पायस, खाण्यासारखीं फळें मुळें, वराह व हरिण ह्यांचीं मांसें २, तिलमिश्र ओदन, हरणवेल, सर्वप्रकारचें हविष्य, इतरही नानाप्रकारचीं मांसें, त्याचप्रमाणें हे राजा खाण्याचे ३, चोखण्याचे व पिण्याचे विपुल पदार्थ ह्यांच्या योगानें आणि नूतन वस्त्रें व नानाप्रकारचीं पुष्पें ह्यांच्या योगानें ४ अनेक ठिकाणांहून तेथें आलेल्या विप्रश्रेष्ठांना त्या युधिष्ठिरानें तृप्त केले आणि प्रत्येकाला पुनरपि त्यानें हजारों गाई दिल्या ५. हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, स्वर्गाला जाऊन पोंहोचण्यासारखा पुण्याहवाचनाचा घोष त्या ठिकाणीं झाला. नंतर नानाप्रकारचीं दिव्य वाद्यें व अनेक प्रकारचीं सुगंधीं द्रव्यें ह्यांच्या योगानें

तानि निवेश्य च । तत्र मल्ला नटा झल्लाः सूता वैतालिकास्तथा ॥ उप-
तस्थुर्महात्मानं धर्मपुत्रं युधिष्ठिरम् ७ तथा स कृत्वा पूजां तां भ्रातृभिः
सह पाण्डवः । तस्यां सभायां रम्यायां रेमे शक्रो यथा दिवि ८ सभा-
यामृषयस्तस्यां पाण्डवैः सह आसते । आसांचक्रुर्नरेन्द्राश्च नानादेशस-
मागताः ९ असितो देवलः सत्यः सर्पिर्माली महाशिराः । अर्वावसुः सुमि-
त्रश्च मैत्रेयः शुनको बलिः १० बको दाल्भ्यः स्थूलशिराः कृष्णद्वैपायनः
शुकः । सुमन्तुर्जैमिनिः पैलो व्यासशिष्यास्तथा वयम् ११ तित्तिरिर्या-
ज्ञवल्क्यश्च ससुतो लोमहर्षणः । अप्सुहोम्यश्च धौम्यश्च अणीमाण्डव्य-
कौशिकौ १२ दामोष्णीषस्त्रैबलिश्च पर्णादो घटजानुकः । मौञ्जायनो
वायुभक्षः पाराशर्यश्च सारिकः १३ बलीवाकः सिलीवाकः सत्यपालः
कृतश्रमः । जातूकर्णः शिखावांश्च आलम्बः पारिजातकः १४ पर्वतश्च
महाभागो मार्कण्डेयो महामुनिः । पवित्रपाणिः सावर्णो भालुकिर्गालव-
स्तथा १५ जङ्घाबन्धुश्च रैभ्यश्च कोपवेगस्तथा भृगुः । हरिबभ्रुश्च कौण्डिन्यो
बभ्रुमाली सनातनः १६ काक्षीवानौशिजश्चैव नाचिकेतोथ गौतमः ।
पैङ्ग्यो वराहः शुनकः शाण्डिल्यश्च महातपाः १७ कुक्कुरो वेणुजङ्घोथ

कुरुवंशजश्रेष्ठ युधिष्ठिरानें देवतांचें पूजन करून सभेंतील द्वारादि स्थानांचे ठिकाणीं त्यांची स्थापना केली ६. त्या ठिकाणीं मल्ल, नट, दांडपट्टेवाले, सूत आणि भाट हे महात्म्या धर्मपुत्र युधिष्ठिराची सेवा करूं लागले ७. असो. त्याप्रमाणें देवतांचें पूजन केल्यावर तो पांडुपुत्र युधिष्ठिर स्वर्गांत रममाण होणाऱ्या इंद्राप्रमाणें त्या रमणीय सभेमध्यें भ्रात्यांसहवर्तमान आपलें चित्तरंजन करूं लागला ८. त्या सभेमध्यें पांडवांसहवर्तमान ऋषि व अनेक देशांहून आलेले राजे बसले होते ९. असित देवल, सत्य, सर्पिमाली, महाशिर, अर्वावसु, सुमित्र, मैत्रेय, शुनक, बलि १०, बक दाल्भ्य, स्थूलशिर, कृष्णद्वैपायन, शुक, सुमंतु, जैमिनि, पैल, त्याचप्रमाणें व्यासशिष्य आह्मी (ह्मणजे वैशंपायन) ११, तित्तिरि, याज्ञवल्क्य, पुत्रांसहवर्तमान लोमहर्षण, अप्सुहोम्य, धौम्य, अणीमांडव्य, कौशिक १२, दामोष्णीष, त्रैबलि, पर्णाद, घटजानुक, वायुभक्ष, मौंजायन, पाराशर्य सारिक १३, बलीवाक, सिलिवाक, सत्यपाल, कृतश्रम, जातूकर्ण, शिखावान्, आलंब, पारिजातक १४, महाप्रभावी पर्वत, महामुनि मार्कंडेय, पवित्रपाणि, सावर्ण, भालुकि, गालव १५, जंघाबंधु, रैभ्य, कोपवेग, भृगु, हरिबभ्रु, कौडिन्य, बभ्रुमाली, सनातन १६, औशिज कक्षीवान्, नाचिकेत गौतम, पैंग्य, वराह, शुनक, महातपस्वी शांडिल्य १७, कुक्कुर, वेणुजंघ, कालाप आणि कठ हे व धर्मवेत्ते,

कालापः कठ एव च । मुनयो धर्मविद्वांसो धृतात्मानो जितेन्द्रियाः १८
एते चान्ये च बहवो वेदवेदाङ्गपारगाः । उपासते महात्मानं सभायामृषि-
सत्तमाः १९ कथयन्तः कथाः पुण्या धर्मज्ञाः शुचयोमलाः । तथैव क्षत्रियश्रेष्ठा
धर्मराजमुपासते २० श्रीमान्महात्मा धर्मात्मा मुञ्जकेतुर्विवर्धनः । संग्राम-
जिद्दुर्मुखश्च उग्रसेनश्च वीर्यवान् २१ कक्षसेनः क्षितिपतिः क्षेमकश्चापरा-
जितः । काम्बोजराजः कमठः कम्पनश्च महाबलः २२ सततं कम्पयामास
यवनानेक एव यः २३ बलपौरुषसंपन्नान्कृतास्त्रानामितौजसः । यथासुरान्का-
लकेयान्देवो वज्रधरस्तथा २४ जटासुरो मद्रकाणां च राजा कुन्तिः पुलिन्दश्च
किरातराजः । तथाङ्गवङ्गौ सह पुण्ड्रकेण पाण्ड्योड्रराजौ च सहान्ध्रकेण २५
अङ्गो वङ्गः सुमित्रश्च शैब्यश्चामित्रकर्शनः । किरातराजः सुमना यवनाधि-
पतिस्तथा २६ चाणूरो देवरातश्च भोजो भीमरथश्च यः । श्रुतायुधश्च कालिङ्गो
जयसेनश्च मागधः २७ सुकर्मा चेकितानश्च पुरुश्चामित्रकर्शनः । केतुमा-
न्वसुदानश्च वैदेहोथ कृतक्षणः २८ सुधर्मा चानिरुद्धश्च श्रुतायुश्च
महाबलः । अनूपराजो दुर्धर्षः क्रमजिच्च सुदर्शनः २९ शिशुपालः
सहसुतः करूषाधिपतिस्तथा । वृष्णीनां चैव दुर्धर्षाः कुमारा देवरू-

---

मनः संयमन केलेले, जितेंद्रिय व वेदवेदांगपारंगत असे इतरही पुष्कळ ब्रह्मचिंतनाविषयीं तत्पर असलेले ऋषिश्रेष्ठ त्या सभेमध्यें महात्म्या युधिष्ठिरासमीप बसलेले होते १८,१९. ते ऋषिश्रेष्ठ, धर्मज्ञ, शुचि आणि निर्मल असून पुण्यप्रद कथा तेथें कथन करीत होते. असो. त्याचप्रमाणें क्षत्रियश्रेष्ठही त्या सभेमध्यें धर्मराजासमीप बसलेले होते २०. (उदाहरणार्थः—) महात्मा वैभवशाली मुंजकेतु, धर्मात्मा विवर्धन, संग्राम जिंकणारा दुर्मुख, वीर्यवान् उग्रसेन २१, भूपति कक्षसेन, अजिंक्य क्षेमक, कांबोजराज कमठ, कालकेय असुरांना कंपित करणाऱ्या वज्रपाणि इंद्राप्रमाणें बल व पौरुष ह्यांनीं संपन्न असून अस्त्रविद्येमध्यें निपुण असलेल्या अत्यंत पराक्रमी यवनांना जो नेहमीं एकटाच कम्पित करी असा महाबलाढ्य कम्पन २२,२३,२४, मद्रदेशचा राजा जटासुर, कुंति, किरातराज पुलिंद, त्याचप्रमाणें पुंड्रकासहवर्तमान अंग व वंग ह्या देशांचे राजे, आंध्रकासहवर्तमान पांड्य व उड्र ह्या देशांचे अधिपति २५, अंग, वंग, सुमित्र, शत्रुनाशक शैब्य, किराताधिपति व यवनाधिपति सुमन २६, चाणूर, देवरात, भोजदेशाधिपति भीमरथ, कलिंगदेशाधिपति श्रुतायुध, मगधदेशाधिपति जयसेन २७, सुकर्मा, चेकितान, शत्रुघातक पुरु, केतुमान्, वसुदान, विदेहदेशाधिपति कृतक्षण २८, सुधर्म, अनिरुद्ध, महाबलाढ्य श्रुतायु, अनूपदेशाधिपति दुर्धर्ष, क्रमजित सुदर्शन २९, पुत्रांसहवर्तमान

पिणः ३० आहुको विपृथुश्चैव गदः सारण एव च । अक्रूरः कृतवर्मा च सत्यकश्च शिनेः सुतः ३१ भीष्मकोथाकृतिश्चैव द्युमत्सेनश्च वीर्यवान् । केकयाश्च महेष्वासा यज्ञसेनश्च सौमकिः ॥ केतुमान्वसुमांश्चैव कृतास्त्रश्च महाबलः ३२ एते चान्ये च बहवः क्षत्रिया मुख्यसंमताः । उपासते सभायां स्म कुन्तीपुत्रं युधिष्ठिरम् ३३ अर्जुनं ये च संश्रित्य राजपुत्रा महाबलाः । अशिक्षन्त धनुर्वेदं रौरवाजिनवाससः ३४ तत्रैव शिक्षिता राजन्कुमारा वृष्णिनन्दनाः । रौक्मिणेयश्च साम्बश्च युयुधानश्च सात्यकिः ३५ सुधर्मा चानिरुद्धश्च शैब्यश्च नरपुङ्गवः । एते चान्ये च बहवो राजानः पृथिवीपते ३६ धनञ्जयसखा चात्र नित्यमास्ते स्म तुम्बुरुः । उपासते महात्मानमासीनं सप्तविंशतिः ३७ चित्रसेनः सहामात्यो गन्धर्वाप्सरसस्तथा । गीतवादित्रकुशलाः शम्पातालविशारदाः ३८ प्रमाणेथ लये स्थाने किंनराः कृतनिश्रमाः । संचोदितास्तुम्बुरुणा गन्धर्वसहितास्तदा ३९

शिशुपाल, त्याचप्रमाणें करूषदेशाधिपति, अजिंक्य व रूपानें देवांसारिखे असलेले वृष्णिकुमार ३०, आहुक, विपृथु, गद, सारण, अक्रूर, कृतवर्मा, शिनिपुत्र सत्यक ३१, भीष्मक, आकृति, वीर्यवान् द्युमत्सेन, महाधनुर्धारी केकय, सौमकि यज्ञसेन ३२ आणि अस्त्रविद्येमध्यें निपुण व महाबलाढ्य असे केतुमान व वसुमान् हे व इतरही पुष्कळ सर्वमान्य श्रेष्ठ क्षत्रिय सभेमध्यें कुंतीपुत्र युधिष्ठिरासमीप होते ३३. त्याचप्रमाणें अर्जुनाचा आश्रय करून धनुर्वेद शिकलेले आणि मृगचर्म परिधान केलेले असे महाबलाढ्य राजपुत्र त्या ठिकाणीं असून ३४ हे राजा, वृष्णिनंदन सुशिक्षित कुमारही त्या ठिकाणीं होते. रौक्मिणेय, सांब, युयुधान, सात्यकि ३५, सुधर्मा, अनिरुद्ध आणि पुरुषश्रेष्ठ शैब्य हे व, हे पृथ्वीपते जनमेजया, इतरही पुष्कळ राजे ३६ आणि अर्जुनाचा सखा तुंबुरु असे त्या ठिकाणीं नित्य असत आणि त्याचप्रमाणें त्या सभेमध्यें बसलेल्या महात्म्या युधिष्ठिराची सत्तावीस गंधर्वगण सेवा करीत असत ३७. अमात्यांसहवर्तमान चित्रसेन गंधर्व, इतरही गंधर्व आणि अप्सरा, गायन, वादन आणि शंपा[1] व ताल ह्यांमध्यें निपुण असून ३८ प्रमाण, लय व स्थान[2] ह्यांमध्यें परिश्रम केलेले किंनर तेथें होते. तुंबुरूच्या आज्ञेवरून सेवेविषयीं दक्ष असलेले ते किंनर गंधर्वांसहवर्तमान दिव्य तानांनीं यथाशास्त्र गायन करीत होते आणि चित्तरंजनपूर्वक

---

१ शंपा दक्षिणपातस्तु वामे ताल इति स्मृतः “ ह्या संगीतशास्त्रोक्त वचनावरून शंपा व ताल ह्या अनुक्रमें उजव्या व डाव्या हातानें धरलेल्या तालांच्या संज्ञा असाव्या असें वाटतें. २ प्रमाण, लय व स्थान ह्या संगीतांतील संज्ञा आहेत.

गायन्ति स्म महात्मानस्ते यथान्यायं मनस्विनः । पाण्डुपुत्रानृषींश्चैव रमयन्त उपासते ४० तस्यां सभायामासीनाः सुव्रताः सत्यसंगराः । दिवीव देवा ब्रह्माणं युधिष्ठिरमुपासते ४१ [१३७] इति० सभापर्वाणि सभाक्रियापर्वाणि सभाप्रवेशो नाम चतुर्थोऽध्यायः ॥४॥ समाप्तं च सभाक्रियापर्व ॥

अथलोकपालसभाख्यानपर्व ॥ वैशम्पायन उवाच ॥ अथ तत्रोपविष्टेषु पाण्डवेषु महात्मसु । महत्सु चोपविष्टेषु गन्धर्वेषु च भारत १ वेदोपनिषदां वेत्ता ऋषिः सुरगणार्चितः । इतिहासपुराणज्ञः पुराकल्पविशेषवित् २ न्यायविद्धर्मतत्त्वज्ञः षडङ्गविदनुत्तमः । ऐक्यसंयोगनानात्वसमवायविशारदः ३ वक्ता प्रगल्भो मेधावी स्मृतिमान्नयवित्कविः । परावरविभागज्ञः प्रमाणकृतनिश्चयः ४ पञ्चावयवयुक्तस्य वाक्यस्य गुणदोषवित् । उत्तरोत्तर-

---

पांडवांची व ऋषींची सेवा करीत होते ३९,४०. सारांश, ज्याप्रमाणें स्वर्गामध्यें देव ब्रह्मदेवाची सेवा करीत असतात त्याप्रमाणें त्या सभेमध्यें असलेले सदाचरणी व सत्यवचनी गंधर्वप्रभृति युधिष्ठिराची सेवा करीत होते ४१. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील सभाक्रियापर्वांपैकीं सभाप्रवेशनामक चवथा अध्याय समाप्त झाला ॥ ४ ॥ ह्या ठिकाणीं सभाक्रियापर्वही संपूर्ण झालें ॥

येथून लोकपालसभाख्यानपर्वाला आरंभ झाला. वैशंपायन सांगतातः—हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, महात्मे पांडव त्या ठिकाणीं बसले असतांना आणि मोठमोठ्या आसनावरून गंधर्व बसले असतांना १ कर्मकांड व ज्ञानकांड जाणणारे आणि ह्मणूनच वेदोक्त संपूर्ण फल प्राप्त झालेले, देवगणांनीं पूजित, इतिहास, पुराण, पुराकल्प व विशेष ह्यांचे ज्ञाते २, (विषय, संशय, पूर्वपक्ष सिद्धांत आणि संगति हा पंचांगाधिकरणरूप) न्याय जाणणारे, धर्मतत्त्वज्ञ (शिक्षा, सूत्र, व्याकरण, छंद, निरुक्त आणि ज्योतिष हीं) सहा वेदांगें जाणणारे, अत्युत्कृष्ट, एकवाक्यता, संयोगपृथक्त्व आणि समवाय ह्यांमध्यें निपुण ३, वक्ते, प्रगल्भ, ऊहापोह करण्याविषयीं कुशल, विस्मृति न पडणारे, व्यवहारज्ञ, भविष्य जाणणारे, ज्ञानकांड व कर्मकांड ह्यांची व्यवस्था जाणणारे, प्रमाणपूर्वक निश्चय करणारे ४, (प्रतिज्ञा, हेतु, दृष्टांत, उपनय आणि निगमन

---

१ पुराकल्प = वेदामध्यें भूतकालचें सांगितलेलें अनेककर्तृक आख्यान. २ विशेष = एककर्तृक पुराकल्प. ३ संयोगपृथक्त्व हा एक न्याय आहे. ह्या न्यायानें दोन उद्देश एकदम सिद्ध होतात. उदाहरणार्थः—" दध्ना जुहोति " ह्या वाक्यानें होमाला नित्यच दधि प्राप्त झालें आहे आणि " दध्नेन्द्रियकामस्य " ह्या वाक्यानें इंन्द्रियार्थही दह्याचें विधान वेगळें केलेलें आहे. तेव्हां नित्य व काम्य ह्या दोन्ही गोष्टी दह्यानें साध्य होतात. ४ एकाच कर्मामध्यें जो अनेक धर्मांचा समावेश होत असतो त्याला समवाय असें ह्मणतात.

वक्ता च वदतोपि बृहस्पतेः ५ धर्मकामार्थमोक्षेषु यथावत्कृतनिश्चयः । तथा भुवनकोशस्य सर्वस्यास्य महामतिः ६ प्रत्यक्षदर्शी लोकस्य तिर्यगूर्ध्वमधस्तथा । सांख्ययोगविभागज्ञो निर्विवित्सुः सुरासुरान् ७ सन्धिविग्रहतत्त्वज्ञस्त्वनुमानविभागवित् । षाड्गुण्यविधियुक्तश्च सर्वशास्त्रविशारदः ८ युद्धगान्धर्वसेवी च सर्वत्राप्रतिघस्तथा । एतैश्चान्यैश्च बहुभिर्युक्तो गुणगणैर्मुनिः ९ लोकाननुचरन्सर्वानागमत्तां सभां नृप । नारदः सुमहातेजा ऋषिभिः सहितस्तदा १० पारिजातेन राजेन्द्र पर्वतेन च धीमता । सुमुखेन च सौम्येन देवर्षिरमितद्युतिः ११ सभास्थान्पाण्डवान्द्रष्टुं प्रीयमाणो मनोजवः । जयाशीर्भिस्तु तं विप्रो धर्मराजानमार्चयत् १२ तमागतमृषिं दृष्ट्वा नारदं सर्वधर्मवित् । सहसा पाण्डवश्रेष्ठः प्रत्युत्थायानुजैः सह १३

ह्या) पांच अवयवांनीं युक्त असलेल्या वाक्याचे गुणदोष जाणणारे, बृहस्पति जरी बोलूं लागला तरी त्याच्यावर कडी करणारे ५, धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ह्यांविषयीं यथाशास्त्र निश्चय झालेले, हें संपूर्ण ब्रह्मांड जाणणारे, महाविचारी ६, ह्या लोकाच्या उर्ध्वभागीं, पृष्ठभागीं आणि अधोभागीं जें कांहीं आहे तें सर्व प्रत्यक्ष अवलोकन करणारे, कर्मसंन्यास आणि कर्मानुष्ठान ह्यांची व्यवस्था जाणणारे, देवदैत्यांतील कलह नाहींसा होण्याची इच्छा करणारे ७, संधि आणि विग्रह ह्यांचें तत्त्व जाणणारे, अनुमानविभाग जाणणारे, (संधि, विग्रह, यान, आसन, द्वैधीभाव आणि समाश्रय ह्या) सहा गुणांचा विजयेच्छु पुरुषांना नित्य उपदेश करणारे, सर्व शास्त्रांमध्यें प्रवीण ८, युद्धशास्त्र आणि गायनवादनादिविषयक गांधर्वशास्त्र हीं दोन्हीं प्रिय असलेले व सर्व ठिकाणीं अप्रतिहत संचार करणारे ह्या व इतरही पुष्कळ गुणसमुदायांनीं युक्त असलेले अत्यंत महातेजस्वी नारदमुनि, हे जनमेजय राजा, सर्व लोक हिंडत हिंडत ऋषींसहवर्तमान त्या सभेमध्यें आले ९, १०. हे राजाधिराज जनमेजया, पारिजात, विचारी पर्वत आणि सौम्य समुख ह्यांसहवर्तमान मनोवेगानें व आनंदानें सभेमध्यें स्थित असलेल्या पांडवांना अवलोकन करण्याकरितां आलेल्या त्या अत्यंत तेजस्वी विप्रश्रेष्ठ नारददेवर्षींनीं जयसूचक आशीर्वादांच्या योगानें धर्मराजाचें पूजन केलें ११, १२. तेव्हां, ते नारदमुनि आल्याचें अवलोकन करितांक्षणींच सर्वधर्मवेत्ता पांडवश्रेष्ठ युधिष्ठिर कनिष्ठ भ्रात्यांसहवर्तमान लगबगीनें उठला १३ आणि विनयानें नम्र होऊन

१ संधि ह्मणजे साम व विग्रह ह्मणजे दंड. अनुमानानें आपल्या व रिपूच्या बलाबलाचा निश्चय करून रिपुपक्षीयांना द्रव्य देणें त्याला अनुमानविभाग ह्मणतात. तेव्हां आठव्या श्लोकांतील पूर्वार्धाचा एकंदर अर्थ " साम, दान, भेद व दंड हे नीतिशास्त्रांतील चार उपाय जाणणारा " असा नीलकंठांनीं केला आहे. २ कामंदकीय नीतिशास्त्रामध्यें संधिप्रभृति गुणांचें स्पष्टीकरण केलेलें आहे.

अभ्यवादयत प्रीत्या विनयावनतस्तदा । तदर्हमासनं तस्मै संप्रदाय यथाविधि १४ गां चैव मधुपर्कं च संप्रदायार्घ्यमेव च । अर्चयामास रत्नैश्च सर्वकामैश्च धर्मवित् १५ तुतोष च यथावच्च पूजां प्राप्य युधिष्ठिरात् । सोऽर्चितः पाण्डवैः सर्वैर्महर्षिर्वेदपारगः १६ धर्मकामार्थसंयुक्तं पप्रच्छेदं युधिष्ठिरम् १७ नारद उवाच ॥ कच्चिदर्थाश्च कल्पन्ते धर्मे च रमते मनः । सुखानि चानुभूयन्ते मनश्च न विहन्यते १८ कच्चिदाचरितां पूर्वैर्नरदेव पितामहैः । वर्तसे वृत्तिमक्षुद्रां धर्मार्थसहितां त्रिषु १९ कच्चिदर्थेन वा धर्मं धर्मेणार्थमथापि वा । उभौ वा प्रीतिसारेण न कामेन प्रबाधसे २० कच्चिदर्थं च धर्मं च कामं च जयतां वर । विभज्य काले कालज्ञः समं वरद सेवसे २१ कच्चिद्राजगुणैः षड्भिः सप्तोपायांस्तथानघ । बलाबलं

प्रेमपूर्वक त्यानें त्यांना अभिवंदन केलें व नंतर त्यांना योग्य असें आसन, गाय, मधुपर्क आणि अर्घ्य देऊन रत्नें आणि इतरही सर्व प्रकारच्या इष्ट वस्तु ह्यांच्या योगानें त्या धर्मज्ञ युधिष्ठिरानें त्यांचें यथाविधि पूजन केलें १४,१५. युधिष्ठिरापासून नारदमुनींना यथाविधि पूजा प्राप्त झाल्यानंतर इतरही सर्व पांडुपुत्रांनीं त्या वेदपारंगत महर्षींचें पूजन केलें असतां नारदमुनि संतुष्ट होऊन धर्म, अर्थ व काम ह्यांसंबंधानें युधिष्ठिराला प्रश्न करूं लागले १६,१७. नारद प्रश्न करितातः—(याग, दान, कुटुंबपोषण इत्यादि कृत्यें करण्यास) तुला द्रव्याची बळकटी आहे नां? धर्मामध्यें तुझें मन रमत आहे नां? सुखाचा उपभोग होत आहे नां? आणि (अंतरात्म्याचे ठिकाणीं संलग्न होत असलेल्या) मनाला कांहीं अडथळा येत नाहीं नां? (सारांश, धर्म, अर्थ, काम व मोक्ष ह्या चतुष्टयाला तुला कांहीं अडचण येत नाहीं नां? १८ हे राजा, प्राचीन पूर्वजांप्रमाणें तूं तिन्ही ठिकाणीं धर्मार्थसहित उदारवृत्तीनें वागत आहेस नां? (ह्मणजे, ऋत्विज्, पुरोहित इत्यादिकांचे ठिकाणीं धर्मवृत्ति; दंडास योग्य, द्वेषकरण्यास पात्र इत्यादिकांचे ठिकाणीं अर्थवृत्ति आणि पालन व षष्ठांशग्रहण ह्यांच्या योगानें प्रजाजनांचे ठिकाणीं धर्मार्थसहित वृत्ति प्राचीन पूर्वजांप्रमाणें तूं ठेवीत आहेस नां?). १९. अरे, (नीचाप्रमाणें लोभ धरून) द्रव्याच्या योगानें धर्माला बाध आणीत नाहींस नां? अथवा (अगदींच विरक्त होऊन) धर्मा (च्या अतिरेका) मुळें अर्थाच्या आड येत नाहींस नां? किंवा (कामुकवृत्ति झाल्यामुळें तात्कालिक सुखाभास दर्शविण्यानें) मोह पाडणाऱ्या कामाच्या योगानें तूं धर्म आणि अर्थ ह्या दोहोंचाही विघात करीत नाहींस नां? २०. हे परानुग्रह करणाऱ्या विजयिश्रेष्ठा, तूं कालज्ञ आहेस. तेव्हां धर्म, अर्थ आणि काम हे व्यवस्थेशीर रीतीनें तूं सर्वदां सेवन करीत

तथा सम्यक्कुदेश परीक्षसे २२ कच्चिदात्मानमन्वीक्ष्य परांश्च जयतां वर।
तथा संधाय कर्माणि अष्टौ भारत सेवसे २३ कच्चित्प्रकृतयः सप्त न लुप्ता
भरतर्षभ । आढ्यास्तथाव्यसनिनः स्वनुरक्ताश्च सर्वशः २४ कच्चिन्न

असतोस नां ? (तात्पर्य, " पूर्वाण्हे चाचरेद्धर्मं मध्यान्हेर्थमुपार्जयेत् । सायान्हे चाचरेत्काममित्येषा वैदिकी श्रुतिः " ह्या दक्षस्मृतींत सांगितलेल्या कालविभागाचें अवलंबन करून तूं धर्म, अर्थ व काम ह्या त्रिवर्गाचें सर्वदा सेवन करीत असतोस नां ?) २१. हे निष्पापा युधिष्ठिरा, (हेर, अमात्य इत्यादिकांना यथायोग्य काम सांगणें, शत्रुदमन वगैरे करण्याविषयीं उत्साह दाखविणें, तर्क करण्यांत प्रावीण्य असणें, झालेल्या गोष्टीची विस्मृति न पडणें, पुढें घडणारी गोष्ट अनुमानानें जाणणें आणि नीतिशास्त्रांत निपुण असणें ह्या) सहा राजगुणांच्या योगानें (साम, दान, भेद, दंड, मंत्र, औषध व इंद्रजाल हे) सात उपाय; (आपलें व आपल्या शत्रूचें) बलाबल (ह्मणजे शत्रूचें व आपलें साम्य आहे कीं काय, शत्रूपेक्षां आपला कमीपणा आहे कीं काय अथवा शत्रूपेक्षां बलामध्यें आपली सरशी आहे कीं काय अशाप्रकारचें उभयतांतील तीन प्रकारचें बलाबल) आणि (प्रदेश, किल्ले, रथ, गज, अश्व, सैनिक, कामगार, अंतःपुर, अन्न, अश्वांची वगैरे मोजदाद, शस्त्रें, जमाखर्च, खजिना व प्रच्छन्न शत्रु ह्यांसंबंधाच्या कामावर असलेले) चवदा अधिकारी ह्या तिहींकडे तुझें उत्तम प्रकारें लक्ष्य आहे नां ? २२. त्याचप्रमाणें आपल्याकडे व शत्रूंकडे लक्ष्य ठेवून तूं राज्य चालवीत आहेस नां ? आणि (कदाचित् सैन्यांत वगैरे शत्रूची सरशी आहे असें समजून आल्याबरोबर जयप्राप्तीचें एक मुख्य कारण जो खजिना तो वृद्धिंगत करण्याकरितां तूर्तातूर्त शत्रूंशीं) तह करून (शेतकी, व्यापार, किल्ले, सरहद्द, कुंजरबंधन [ह्मणजे गांवाचें सामर्थ्य पाहून पोषणाकरितां कांहीं विवक्षित हत्ती त्या त्या गांवाच्या माथीं मारणें] ,रत्नादिक व सुवर्णादिक ह्यांच्या खाणी, कर घेणें आणि शून्यनिवेशन ह्मणजे उणीव भरून काढणें ह्या) आठ कृत्यांकडे, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, तूं लक्ष्य देत असतोस नां ? २३. हे भरतवंशजश्रेष्ठा, (दुर्गाध्यक्ष, सेनापति, धर्माधिकारी, सेनानायक, पुरोहित, वैद्य आणि ज्योतिषी ह्या) तुझ्या सात प्रकृति (शत्रूंनीं द्रव्य वगैरे दिल्यामुळें) मोहित झालेल्या नाहींत नां ? अथवा (" समृद्धीनें हृष्ट झालेला पुरुष गर्विष्ठ होतो, गर्विष्ठ झाल्यावर धर्माचें उल्लंघन करूं लागतो आणि धर्माचें उल्लंघन होऊं लागलें असतां अर्थातच त्याच्या हातून पातक होऊं लागतें " असें " हृष्टो दृप्यति दृप्तो धर्ममतिक्रामति धर्मातिक्रमात्पापं करोति " ह्या स्मृतींत सांगितलें असल्यामुळें समृद्ध पुरुषांना व्यसन वगैरे लागण्याचा संभव आहे. तेव्हां) त्याच तुझ्या सात प्रकृति आढ्य

कृतकैर्दूतैर्ये चाप्यपरिशङ्किताः । त्वत्तो वा तव चामात्यैर्भिद्यते मन्त्रितं
तथा २५ मित्रोदासीनशत्रूणां कच्चिद्वेत्सि चिकीर्षितम् । कच्चित्संधिं
यथाकालं विग्रहं चोपसेवसे २६ कच्चिद्वृत्तिमुदासीने मध्यमे चानुमन्यसे ।
कच्चिदात्मसमा वृद्धाः शुद्धाः संबोधनक्षमाः २७ कुलीनाश्चानुरक्ताश्च
कृतास्ते वीर मन्त्रिणः । विजयो मन्त्रमूलो हि राज्ञो भवति भारत २८
कच्चित्संवृतमन्त्रैस्ते अमात्यैः शास्त्रकोविदैः । राष्ट्रं सुरक्षितं तात शत्रुभिर्न
विलुप्यते २९ कच्चिन्निद्रावशं नैषि कच्चित्काले विबुध्यसे । कच्चिच्चाप-

---

असून निर्व्यसनी व सर्व प्रकारें स्वामिकार्याविषयीं प्रीतियुक्त आहेत नां ? २४ (बाह्य आचरणावरून पाहूं गेलें असतां) ज्यांच्याबद्दल शंका घेतां येत नाहीं अशा कपटी दूतांमुळें, तशाच प्रकारच्या अमात्यांमुळें अथवा (स्वभाव न ओळखून एकाद्या कपटी मित्रापाशीं तूं सांगितल्या कारणानें) तुझ्यामुळेंच गुप्त बेत बाहेर फुटत नाहीं ना ? (कारण, आपल्याकडला आणि शत्रूकडला पगार खाऊन कांहीं कपटी दूत आपली मसलत बाहेर फोडीत असतात. त्याचप्रमाणें शत्रूंचा लाच मिळत असल्यामुळें कृत्रिमपणानें वागणाऱ्या अमात्याकडूनही कधीं कधीं आपल्या गुप्त गोष्टीची परिस्फुटता होत असते अथवा आपल्या तोंडावर मोठी कळकळ दाखवून वस्तुतः शत्रूला फितूर झालेल्या अशा एकाद्या ढोंगी मित्राचें स्वरूप आपण ओळखिलें नसल्यामुळें " हा आपल्या अंतरंगांतीलच आहे " अशा समजुतीवर आपण त्याच्याशीं कांहीं गुह्य गोष्ट बोलतों आणि ह्यामुळें ती आपणांकडूनच कधीं कधीं बाहेर फुटत असते) २५. मित्र, उदासीन आणि शत्रु ह्यांचा उद्देश जाणून तूं योग्य कालीं संधि व युद्ध ह्यांचें अवलंबन करीत असतोस नां ? २६ आणि त्याचप्रमाणें उदासीन व मध्यस्थ ह्यांच्याशीं तशीच वर्तणूक ठेवीत आहेस नां ? (तात्पर्य, मित्राची प्रथम चांगली परीक्षा करावी आणि नंतर त्याच्या विचारानें मसलत करून प्रबल शत्रूशीं तह करावा, दुर्बल शत्रूशीं युद्ध करावें आणि दोहोंकडला पगार खात असलेल्या मध्यस्थाशीं अथवा मित्रत्वानें अगर शत्रुत्वानें न वागतां उदासीन वृत्तीनें वागणाऱ्या राजाशीं उदासीन वृत्तीनेंच वागत असावें) हे वीरा, सदाचरणी, कुलीन, स्वामिकार्याविषयीं दक्ष आणि उपदेश करण्यास समर्थ अशा वृद्ध मंत्र्यांना तूं आपल्या सारिखेच करून ठेविले आहेस नां? (ह्मणजे आपल्या प्रमाणेंच त्यांची इतरांकडून मानमान्यता राहण्याची तजवीज केली आहेस नां ?) कारण, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, राजाला येणारा जय मुख्यतः (मंत्री लोकांच्या) सल्ला मसलतीवर अवलंबून असतो २७,२८. बा युधिष्ठिरा, शास्त्रनिपुण आणि मसलत गुप्त ठेवणाऱ्या अशा अमात्यांनीं सुरक्षित असलेल्या तुझ्या राष्ट्राला शत्रूंच्या योगानें

ररात्रेषु चिन्तयस्यर्थमर्थवित् ३० कच्चिन्मन्त्रयसे नैकः कच्चिन्न बहुभिः सह । कच्चित्ते मन्त्रितो मन्त्रो न राष्ट्रं परिधावति ३१ कच्चिदर्थान्विनिश्चित्य लघुमूलान्महोदयान् । क्षिप्रमारभसे कर्तुं न विघ्नयसि तादृशान् ३२ कच्चिन्न सर्वे कर्मान्ताः परोक्षास्ते विशङ्किताः । सर्वे वा पुनरुत्सृष्टाः संसृष्टं चात्र कारणम् ३३ आप्तैरलुब्धैः क्रमिकैस्ते च कच्चिदनुष्ठिताः । कच्चिद्राजन्कृतान्येव कृतप्रायाणि वा पुनः ॥ विदुस्ते वीर कर्माणि नानवा-

---

अपाय होत नाहीं नां ? २९. तूं अर्थ वेत्ता आहेस. तेव्हां निद्राधीन न होतां वेळेवर उठून अपररात्रीं (ह्मणजे पहाटेस) अर्थविचार करीत असतोस नां? (ह्मणजे आपला उद्देश कोणत्या रीतीनें सिद्धीस जाईल ह्याचा विचार करीत असतोस नां ? कारण, " ब्राह्मे मुहूर्ते चोत्थाय चिन्तयेदात्मनो हितम् " अशी स्मृति आहे. तेव्हां वेळेवर जागें होऊन ब्राह्म मुहूर्तावर ह्मणजे सुमारे पहाटेची चार घटिका रात्र राहिल्यावर पूर्व दिवशीं अमात्यांसहवर्तमान केलेल्या मसलतीचा शांतपणें विचार करावा. कारण, अशावेळीं शांतपणें विचार करून ठरलेली गोष्ट अंमलांत आणिली असतां प्रायः फसत नाहीं) ३०. (एकट्यानेंच मसलत ठरविली असतां कदाचित् बुद्धिदोषामुळें ती अयोग्य होण्याचा संभव असतो आणि गुह्य गोष्ट षट्कर्णी झाली असतां गुप्त रहात नाहीं. ह्याकारितां, कांहीं गुह्य मसलत करावयाची असल्यास ती दोघांनींच करावी. तस्मात्,) तूं एकटा अथवा पुष्कळांबरोबर कधीं गुप्त मसलत करीत नाहींस नां ? आणि त्याचप्रमाणें तुमचा झालेला गुप्त बेत राष्ट्रामध्यें पसरत नाहीं नां ? ३१. अल्प खर्चानें साध्य होणारे व परिणामीं मोठें फल देणारे असे द्रव्यप्राप्तीचे उपाय निश्चित करून तूं ते सत्वर योजीत आहेस नां ? आणि त्याचप्रमाणें तशाप्रकारें द्रव्यार्जन करणाऱ्यांना तूं नवीन (कायदे वगैरे करून) कांहीं विघ्न आणीत नाहींस नां ? (कारण, अल्प खर्चानें पुष्कळ द्रव्य मिळविण्याचें उद्योग जर लोकांनीं सुरू केले तर व्यापारवृद्धीच्या मानानें कर ही जास्त जमा होत असल्यामुळें आपला त्यांत फायदाच असतो) ३२. (कामगार लोक सर्व आपल्या माहितीचे, विश्वासु आणि आपणांवर प्रीति करणारे असे असावेत. करितां,) तुझे सर्व कामगार लोक तुझ्या गैरमाहितींतले, अविश्वासु अथवा फिरून फिरून काढून कामावर ठेविलेले असे नाहींत नां ? कारण, पुष्कळ दिवस जवळ राहिल्यामुळें पारख झालेले, विश्वासु आणि प्रीति करणारे असे कामगार लोक अभ्युदयाचें कारण आहेत ३३. आप्त, निर्लोभी आणि परंपरागत आलेल्या अशा लोकांकडून तुझे व्यवहार होत असतात नां ? हे वीरा, कामें पुरीं झालीं कोणतीं व झाल्यासारखीं कोणतीं हें त्यांच्या नेहमीं लक्ष्यांत असतें नां ? व त्याचप्रमाणें अवश्य असलेलीं

मानि कानिचित् ३४ कच्चित्कारणिका धर्मे सर्वशास्त्रेषु कोविदाः। कारयन्ति कुमारांश्च योधमुख्यांश्च सर्वशः ३५ कच्चित्सहस्रैर्मूर्खाणामेकं क्रीणासि पण्डितम्। पण्डितो ह्यर्थकृच्छ्रेषु कुर्यान्निःश्रेयसं परम् ३६ कच्चिद्दुर्गाणि सर्वाणि धनधान्यायुधोदकैः। यन्त्रैश्च परिपूर्णानि तथा शिल्पिधनुर्धरैः ३७ एकोऽप्यमात्यो मेधावी शूरो दान्तो विचक्षणः। राजानं राजपुत्रं वा प्रापयेन्महतीं श्रियम् ३८ कच्चिदष्टादशान्येषु स्वपक्षे दश पञ्च च। त्रिभिस्त्रिभिरविज्ञातैर्वेत्सि तीर्थानि चारकैः ३९ कच्चिद्द्विषाम-

---

कृत्यें अजून सुरूंच झाली नाहींत असें त्यांना ठाऊक नसतें नां? (ह्मणजे अवश्यक कृत्यें सुरूं न करितां ते कधीं स्वस्थ बसत नाहींत नां?) ३४. शिष्यांना विद्या सांगणारे असे धर्मज्ञ व सर्वशास्त्रपारंगत आचार्य तुमच्या कुमारांना धर्म व सर्वप्रकारचीं शास्त्रें शिकवून विशेषतः त्यांना सर्व प्रकारें मोठेमोठे योद्धे तयार करीत आहेत नां? ३५. हजारों मूर्ख खर्ची घालून एका पंडिताचा संग्रह करीत आहेस नां? (ह्मणजे मूर्ख पुरुष हजारों जरी असले तरीं त्यांची पर्वा न करितां तूं एका पंडिताला जवळ करीत आहेस नां?) कारण, बिकट प्रसंग प्राप्त झाले असतां पंडित पराकाष्ठेचें कल्याण करितो ३६. तुझे सर्व किल्ले—द्रव्य, धान्य, आयुधें, उदक, यंत्रें, कारागीर आणि धनुर्धर ह्यांनीं—भरलेले आहेत नां? ३७. (हे राजा,) बुद्धिमान्, शूर, जितेंद्रिय व विचक्षण असा अमात्य एकटा असला तरी राजाला अथवा राजकुमाराला मोठ्या वैभवास चढवितो ३८. (" मन्त्री पुरोहितश्चैव युवराजश्चमूपतिः। पञ्चमो द्वारपालश्च षष्ठोन्तर्वेशिकस्तथा॥ कारागाराधिकारी च द्रव्यसंचयकृत्तथा। कृत्याकृत्येषु चार्थानां नवमो विनियोजकः॥ प्रदेष्टा नगराध्यक्षः कार्यनिर्माणकृत्तथा। धर्माध्यक्षः सभाध्यक्षो दण्डपालस्त्रिपञ्चमः॥ षोडशो दुर्गपालश्च तथा राष्ट्रान्तपालकः। अटवीपालकान्तानि तीर्थान्यष्टादशैव तु॥ चारान्विचारयेत्तीर्थेष्वात्मनश्च परस्य च। पाखण्डादीनविज्ञातानन्योन्यमितरेष्वपि॥ मन्त्रिणं युवराजं च हित्वा स्वेषु पुरोहितम्॥ " ह्या नीतिशास्त्रविषयक वचनांत " मंत्री, पुरोहित, युवराज, सेनापति, द्वारपाल, अंतःपुराधिकारी, कारागृहाधिकारी, जमाबंदी करणारा, बऱ्यावाईट कृत्यांचे ठिकाणीं द्रव्याचा विनियोग करणारा, उपदेशक, नगराध्यक्ष, कार्यनिर्माणकर्ता, धर्माध्यक्ष, सभाध्यक्ष, पाहरेकरी, किल्लेदार, सरहद्द संरक्षण करणारा व वनपाल ह्या शत्रूकडील अठरा अधिकाऱ्यांच्या मागें आणि मंत्री, युवराज व पुरोहित हे तीन वर्ज करून आपणांकडील इतर पंधरा अधिकाऱ्यांच्या मागें हेर ठेवावेत. ते हेर इतरांना ओळखूं न येण्याकरितां पाखंडी वगैरे लोकांचा वेष धारण करणारे असावेत आणि त्यांच्या त्यांच्यांतही ते एकमेकाला ओळखूं येऊं नयेत " असें सांगितलें आहे. तेव्हां)

विदितः प्रतिपन्नश्च सर्वदा । नित्ययुक्तो रिपून्सर्वान्वीक्षसे रिपुसूदन ४० कच्चिद्विनयसंपन्नः कुलपुत्रो बहुश्रुतः । अनसूयुरसंकीर्णः सत्कृतस्ते पुरोहितः ४१ कच्चिदग्निषु ते युक्तो विधिज्ञो मतिमानृजुः । हुतं च होष्यमाणं च काले वेदयते सदा ४२ कच्चिदङ्गेषु निष्णातो ज्योतिषः प्रतिपादकः । उत्पातेषु हि सर्वेषु दैवज्ञः कुशलस्तव ४३ कच्चिन्मुख्या महत्स्वेव मध्यमेषु च मध्यमाः । जघन्याश्च जघन्येषु भृत्याः कर्मसु योजिताः ४४ अमात्यानुपधातीतान्पितृपैतामहाञ्शुचीन् । श्रेष्ठाञ्श्रेष्ठेषु कच्चित्त्वं नियोजयसि कर्मसु ४५ कच्चिन्नोग्रेण दण्डेन भृशमुद्विजसे प्रजाः । राष्ट्रं तवानुशासन्ति मन्त्रिणो भरतर्षभ ४६ कच्चित्त्वां नावजानन्ति याजकाः पतितं

शत्रूंकडील अठरा आणि आपणाकडील पंधरा अधिकाऱ्यांची टेहळणी प्रत्येकाच्या मागें तीन तीन गुप्त हेर ठेवून तूं करीत असतोस नां ? ३९. हे शत्रुनाशका, नेहमीं उद्योगशील आणि सावध राहून शत्रूंना न कळत (प्रसंग पडल्यास) तूं स्वतः सर्व शत्रूंवर देखरेख ठेवीत असतोस नां ? ४०. विनयसंपन्न, कुलीन, बहुश्रुत, निर्मत्सर आणि सदसद्विवेकी अशा पुरोहिताचा तूं सत्कार करीत असतोस नां ? ४१. अग्नीकडे नेमलेला तुझा याजक शास्त्रज्ञ, विवेकी आणि निष्कपट असून होम झाल्याचें आणि होत असल्याचें तुला वेळेवर कळवीत असतो नां ? ४२. (सामुद्रिक शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें) अवयवांवरून पुढें येणाऱ्या बऱ्यावाईट स्थितीची परीक्षा करण्यामध्यें निष्णात, ज्योतिःशास्त्र प्रतिपादन करणारा आणि सर्वप्रकारचे उत्पात जाणण्याविषयीं कुशल असा तुझा दैवज्ञ (म्हणजे जोशी आहे नां ? ४३. महत्वाच्या कामांचे ठिकाणीं मुख्य, मध्यम कृत्यांचे ठिकाणीं साधारण आणि क्षुद्र कृत्यांचे ठिकाणीं कनिष्ठ सेवक तूं योजिले आहेस नां ? ४४. वाडवडिलांपासून चालत आलेल्या, आचरणानें शुद्ध आणि निष्कपट अशा श्रेष्ठ अमात्यांना सल्लामसलतीसारख्या श्रेष्ठ कृत्यांचे ठिकाणीं तूं योजीत आहेस नां ? ४५. हे भरतवंशजश्रेष्ठा, जबर दंड करून तूं वारंवार प्रजाजनांना क्षुब्ध करीत नाहींस नां ? आणि तुझे मंत्री चांगल्या प्रकारें राज्याचा कारभार पहात आहेत नां ४६. (" प्रजापीडनसंतापात्समुद्भूतो महानलः । राज्ञः प्राणान्बलं कोशं नादग्ध्वा विनिवर्तते " ह्या स्मृतींत " राजाच्या छळणुकीनें प्रजेच्या झालेल्या संतापापासून उत्पन्न झालेला अग्नि राजाचे प्राण, सैन्य व खजिना हीं दग्ध केल्यावांचून शांत होत नाहीं " असें सांगितलें आहे. करितां,) स्वच्छंदपणानें (जार कर्म करीत) हिंडणाऱ्या पुरुषाचा ज्याप्रमाणें स्त्रिया अवमान करितात त्याप्रमाणें " तूं दारुण कर्मानें प्रजेपासून पैसे काढणारा आहेस " असें समजून याजक पतितासारखा तुझा अवमान करीत नाहींत नां ? (सारांश, प्रजेला पीडा दिल्यानें

यथा । उग्रप्रतिग्रहीतारं कामयानमिव स्त्रियः ४७ कच्चिद्धृष्टश्च शूरश्च मतिमान्धृतिमाञ्शुचिः । कुलीनश्चानुरक्तश्च दक्षः सेनापतिस्तव ४८ कच्चिद्बलस्य ते मुख्याः सर्वयुद्धविशारदाः । धृष्टावदाता विक्रान्तास्त्वया सत्कृत्य मानिताः ४९ कच्चिद्बलस्य भक्तं च वेतनं च यथोचितम् । संप्राप्तकाले दातव्यं ददासि न विकर्षसि ५० कालातिक्रमणादेते भक्तवेतनयोर्भृताः । भर्तुः कुर्वन्ति दौर्गत्यात्सोनर्थः सुमहान्स्मृतः ५१ कच्चित्सर्वेनुरक्तास्त्वां कुलपुत्राः प्रधानतः । कच्चित्प्राणांस्तवार्थेषु संत्यजन्ति सदा युधि ५२ कच्चिन्नैको बहूनर्थान्सर्वशः सांपरायिकान् । अनुशास्ति यथाकामं कामात्मा शासनातिगः ५३ कच्चित्पुरुषकारेण पुरुषः कर्म शोभ-

---

द्रव्यलाभ जरी सकृद्दर्शनीं होत असला तरी परिणामीं तें कृत्य राजाच्या नाशालाच कारणीभूत होतें. तस्मात्, स्वतःच्या नाशाला कारणीभूत होणारें कर्म जो करितो त्याची अवज्ञा हाणेंच उचित आहे. तेव्हां, तें तूं करीत नाहींस नां ?) ४७ तुझा सेनापति संतुष्ट, शूर, विचारी, धैर्यवान्, आचरणानें शुद्ध, कुलीन, अनुरक्त आणि स्वकार्याविषयीं दक्ष आहे नां? ४८. सर्व प्रकारच्या युद्धामध्यें निपुण, प्रगल्भ, निष्कपट आणि पराक्रम गाजविलेले असे जे तुझ्या सैन्यांतील मुख्य मुख्य अधिकारी त्यांचा तूं सत्कार करून मान ठेवीत असतोस नां ? ४९. जें अवश्य दिलेंच पाहिजे असें वेतन व शिधापाणी तूं आपल्या सैन्याला ओढून न धरितां योग्य रीतीनें वेळच्यावेळीं देत असतोस नां ? ५०. कारण, रोजचें शिधापाणी आणि महिन्याचा तनखा ह्यांच्यावर उपजीविका करीत असलेल्या सैनिकांना जर वेळेवर तीं मिळूं लागलीं नाहींत तर दारिद्र्यामुळें ते आपल्या धन्यालाच (अपकार) करितात आणि तो अनर्थ तर फारच मोठा ह्मणून ह्मटलेला आहे ५१. मंत्रिप्रभृति तुझ्या पदरचे सर्व लोक कुलीन असून तुजविषयीं मनामध्यें प्रेमभाव बाळगणारे आहेत नां ? आणि तुझ्याकरितां युद्धामध्यें प्राणत्याग करण्यास ते सर्वदां तयार असतात नां ? ५२. संग्रामामध्यें शौर्य गाजविणाऱ्या तुझ्या योध्यांना विषयासक्त आणि मालकाच्या आज्ञेची परवा न करणारा असा एकच पुरुष सर्व हुकूम करीत नाहीं नां ? (सारांश, सैन्याची सर्व व्यवस्था एकाच्याच हातांत कधीं उपयोगी नाहीं. कारण, तो फितुर झाला असतां एकदम सर्व राज्याचा नाश होण्याची पाळी येईल. करितां, सैन्याची सर्व सत्ता एकाच्याच हातांत देऊं नये आणि सैन्यावरील अधिकारी मालकाच्या आज्ञेविषयीं बेफिकीर अथवा विषयासक्त असेल तर सैन्याचा मोड हालोहाल होईल ह्मणून तसा अधिकारीही सैन्यावर नेमूं नये) ५३. पराक्रमानें एकादें महत्कृत्य करणाऱ्या पुरुषाला अधिक मान अथवा जास्त तनखा

यन्न । लभते मानमधिकं भूयो वा भक्तवेतनम् ५४ कच्चिद्विद्याविनीतांश्च नराञ्ज्ञानविशारदान् । यथार्हं गुणतश्चैव दानेनाभ्युपपद्यसे ५५ कच्चिद्दारान्मनुष्याणां तवार्थे मृत्युमीयुषाम् । व्यसनं चाभ्युपेतानां विभर्षि भरतर्षभ ५६ कच्चिद्भयादुपगतं क्षीणं वा रिपुमागतम् । युद्धे वा विजितं पार्थ पुत्रवत्परिरक्षसि ५७ कच्चित्त्वमेव सर्वस्याः पृथिव्याः पृथिवीपते । समश्चानभिशङ्क्यश्च यथा माता यथा पिता ५८ कच्चिद्व्यसनिनं शत्रुं निशम्य भरतर्षभ । अभियासि जवेनैव समीक्ष्य त्रिविधं बलम् ५९ यात्रामारभसे दिष्ट्या प्राप्तकालमरिंदम । पार्ष्णिमूलं च विज्ञाय व्यवसायं पराजयम् ६०

व शिधापाणी मिळत आहे नां ? ५४. विद्येनें नम्र आणि ज्ञानामुळें उत्कृष्ट अशा लोकांचा गुणांच्या मानानें योग्यतेनुरूप दान देऊन तूं परामर्श घेत आहेस नां? ५५. तुझ्याकरितां मृत्युमुखीं पडलेल्या अथवा संकटांत सांपडलेल्या लोकांच्या स्त्रियांचें हे भरतश्रेष्ठा, तूं पोषण करीत असतोस नां? ५६. हे पार्था, भीतीनें आश्रयास आलेल्या, निर्बल होऊन शरण आलेल्या व युद्धांत जिंकिलेल्या शत्रूचें तूं पुत्रवत् पालन करीत असतोस नां? ५७. हे भूपते, पृथ्वींतील सर्वांशीं तूं सारखा वागत असून आईबापांप्रमाणें सर्व लोक तुझ्यावर संरक्षणाविषयीं विश्वास ठेवीत आहेत नां? ५८. हे भरतश्रेष्ठा, शत्रु व्यसनांत सांपडल्याचें समजतांक्षणीं आपल्या (प्रभाव, उत्साह व मसलत ह्या) तिन्हीप्रकारच्या शक्तीकडे लक्ष्य देऊन तूं त्यावर स्वारी करीत असतोस नां? ५९. हे शत्रुदमना, पार्ष्णिमूल

१ पार्ष्णिमूल, पराजय वगैरे शब्दांचें स्पष्टीकरण नीलकंठांनीं केलें आहे तें येणेंप्रमाणें:—पार्ष्णिमूलं पार्ष्णिग्राहक आदिर्यस्य तद्द्वादशविधं मण्डलं तच्चोक्तं कामन्दकीये ॥ अमात्यराष्ट्रदुर्गाणि कोशो दण्डश्च पंचमः । एताः प्रकृतयस्तज्ज्ञैर्विजिगीषोरुदाहृताः ॥ संपन्नस्तु प्रकृतिभिर्महोत्साहः कृतश्रमः । जेतुमेषणशीलश्च विजिगीषुरिति स्मृतः ॥ अरिर्मित्रमरेर्मित्रं मित्रमित्रमतः परम् । अथारिमित्रमित्रं च विजिगीषोः पुरस्कृताः ॥ पार्ष्णिग्राहस्ततः पश्चादाक्रन्दस्तदनन्तरम् । आसारावनयोश्चैव विजिगीषोस्तु पृष्ठतः ॥ अरेश्च विजगीषोश्च मध्यमो भूम्यनन्तरः । अनुग्रहे संहतयोर्व्यस्तयोर्निग्रहे प्रभुः ॥ मण्डलाद्बहिरेतेषामुदासीनो बलाधिकः । अनुग्रहे संहतानां व्यस्तानां च वधे प्रभुरिति ॥ विजिगीषुशत्रू तयोर्मित्रे तन्मित्रे चेति त्रीणि द्वन्द्वानि क्रमेण पुरतः । विजिगीषोः पृष्ठतः पार्ष्णिग्राहाक्रन्दौ । पार्ष्णिग्राहः पृष्ठरक्षकः । आक्रन्दः प्रोत्साहकः । एतयोरनुग्राहकावासारौ तत्तत्पृष्ठगतौ पार्ष्णिग्राहासार आक्रन्दासारश्चेति दश पुरुषाः । विजिगीषुशत्र्वोः पार्श्वे मध्यमः सर्वेषां पार्श्वे उदासीनः । इति मण्डलं पार्ष्णिमूलमित्युच्यते। व्यवसायं कृत्यानिश्चयं कृत्यं च। अलब्धवेतनो लुब्धो मानी चाप्यवमानितः। क्रुद्धश्च कोपितोऽकस्मात्तथा भीतश्च भीषितः ॥ यथाभिलषितैः कामैर्भिन्द्यादेतांश्चतुर्विधान् । परकीयान्स्वकीयांस्तु रक्षेद्विजयकामुक इति नीतिशास्त्रोक्तम् ॥ पराजयं पराजयमूलानां व्यसनानां परपक्षे सद्भावं स्वपक्षे चाभावं विज्ञाय दिष्ट्या विशेषतो दैवज्ञादिद्वारा ज्ञात्वा। तत्र दैवं व्यसनं पंचविधम् । यथोक्तं कामन्दकीये हुताशनो जलं व्याधिर्दुर्भिक्षं मरकस्तथा । इति पंचविधं दैवं व्यसनं मानुषं परम् ॥ आयुक्तेभ्यश्च चोरेभ्यः परेभ्यो राजवल्लभात् । पृथिवीपतिलोभाच्च प्रजानां पंचधा भयमिति॥

जयम् ६० बलस्य च महाराज दत्त्वा वेतनमग्रतः ६१ कच्चिच्च बलमुख्येभ्यः परराष्ट्रे परंतप । उपच्छन्नानि रत्नानि प्रयच्छसि यथार्हतः ६२ कच्चिदात्मानमेवाग्रे विजित्य विजितेन्द्रियः । पराञ्जिगीषसे पार्थ प्रमत्तानजितेन्द्रियान् ६३ कच्चित्ते यास्यतः शत्रून्पूर्वं यान्ति स्वनुष्ठिताः । साम दानं च भेदश्च दण्डश्च विधिवद्गुणाः ६४ कच्चिन्मूलं दृढं कृत्वा परान्यासि विशांपते । तांश्च विक्रमसे जेतुं जित्वा च परिरक्षसि ६५ कच्चिदष्टाङ्गसंयुक्ता चतुर्विधबला चमूः । बलमुख्यैः सुनीता ते द्विषतां प्रतिबर्धिनी ६६ कच्चिल्लवं च मुष्टिं च परराष्ट्रे परंतप । अविहाय महाराज निहंसि समरे रिपून् ६७ कच्चित्स्वपरराष्ट्रेषु बहवोऽधिकृतास्तव । अर्थान्समधितिष्ठन्ति रक्षन्ति च परस्परम् ६८ कच्चिदभ्यवहार्याणि गात्रसंस्पर्शनानि च । घ्रेयाणि च

(ह्मणजे पृष्ठरक्षक ज्यामध्यें प्रथम आहे असें मंडळ), कृत्यनिश्चय आणि पराजयमूलक व्यसनें ह्यांचा विचार करून व योग्य कालीं दैवज्ञाचें मत घेऊन तूं सुदैवानें स्वारी करण्यास प्रवृत्त होत असतोस नां ? ६०. हे शत्रुतापना महाराजा, आपल्या सैन्याला प्रथम पगार देऊन नंतर परराष्ट्रसंबंधीं सेनापतींना तूं योग्यतेनुरूप उत्कृष्ट उत्कृष्ट वस्तु (फितुर होण्याकरितां) देत असतोस नां ? ६१, ६२. हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, प्रथम आपल्या मनाचा निग्रह करून व इंद्रियें जिंकून नंतर बेफिकीर आणि इंद्रियाधीन असलेल्या शत्रूंना जिंकण्याची इच्छा करीत असतोस नां ? ६३. शत्रूंवर स्वारी करण्याकरितां निघण्याचा निश्चय करण्यापूर्वीं साम, दान, भेद आणि दंड हे चारी उपाय योग्य रीतीनें तूं शत्रूंशीं व्यवहार करण्यामध्यें उपयोगांत आणीत असतोस नां ? ६४. हे प्रजाधिपते, प्रथम आपल्या मूळच्या स्वराज्याचा चांगला बंदोबस्त करून मग तूं शत्रूवर मोहीम करीत असतोस नां ? आणि त्या शत्रूंना जिंकण्याकरितां पराकाष्ठेचा पराक्रम करीत असतोस नां ? त्याचप्रमाणें जिंकल्यानंतर तूं त्या शत्रूंचें परिपालन करीत असतोस नां ? ६५. (रथ, गज, अश्व, योद्धे, पायदळ, मजूर, हेर आणि वाटाडे ह्या) आठ अंगांनीं युक्त असलेलें तुझें चारी प्रकारचें सैन्य सेनापतींनीं उत्तमप्रकारें तरबेज केलेलें असून शत्रूंच्या धुडक्या उडविणारें आहे नां ? ६६. हे शत्रुनाशका महाराजा, परराष्ट्रांतील हंगाम आणि दुर्भिक्ष हीं न सोडितां तूं समरांगणामध्यें शत्रूंचा वध करीत असतोस नां ? (सारांश, शत्रूच्या राष्ट्रांतील हंगामाची व दुर्भिक्षाची संधि साधून तूं शत्रूवर हल्ला करण्यास चुकत नाहींस नां ?) ६७. स्वराष्ट्राप्रमाणेंच परराष्ट्रामध्यें तुझे पुष्कळ अधिकारी असून ते आपआपली उत्तमप्रकारें बजावीत आहेत नां ? आणि तसेंच ते शत्रूपासून परस्परांचें संरक्षण

महाराज रक्षन्त्यनुमतास्तव ६९ कच्चित्कोशश्च कोष्ठश्च वाहनं द्वारमायुधम्। आयश्च कृतकल्याणैस्तव भक्तैरनुष्ठितः ७० कच्चिदाभ्यन्तरेभ्यश्च बाह्येभ्यश्च विशांपते। रक्षस्यात्मानमेवाग्रे तांश्च स्वेभ्यो मिथश्च तान् ७१ कच्चिन्न पाने द्यूते वा क्रीडासु प्रमदासु च। प्रतिजानन्ति पूर्वाह्णे व्ययं व्यसनजं तव ७२ कच्चिदायस्य चार्धेन चतुर्भागेन वा पुनः। पादभागैस्त्रिभिर्वापि व्ययः संशोध्यते तव ७३ कच्चिज्ज्ञातीन्गुरून्वृद्धान्वणिजः शिल्पिनः श्रितान्। अभीक्ष्णमनुगृह्णासि धनधान्येन दुर्गतान् ७४ कच्चिच्चायव्यये युक्ताः सर्वे गणकलेखकाः। अनुतिष्ठन्ति पूर्वाह्णे नित्यमायव्ययं तव ७५ कच्चिदर्थेषु संप्रौढान्हितकामाननुप्रियान्। नापकर्षसि कर्मभ्यः पूर्वमप्राप्य किल्बिषम् ७६ कच्चिद्विदित्वा पुरुषानुत्तमाधममध्यमान्। त्वं

करीत आहेत नां ? ६८. हे महाराजा, तुझे खाण्याचे पदार्थ, वस्त्रें आणि सुगंधी द्रव्यें ह्यांचें रक्षण तुझे विश्वासू लोक करीत असतात नां ? ६९. खजिना, धान्याचें कोठार, वाहनें, द्वारें, आयुधें आणि जमाबंदी ह्यांची व्यवस्था तूं कल्याणकेलेले तुझे विश्वासू नोकर पहात असतात नां ७०. हे प्रजाधिपते (आचारी वगैरे) घरांतील नोकरांपासून आणि (सेनापतिप्रभृति) बाहेरच्या नोकरांपासून तूं प्रथम स्वतःचें रक्षण करीत असतोस नां ? आणि नंतर (पुत्र, अमात्य वगैरे) स्वकीय जनांपासून त्यांचें व त्यांच्यांमध्येंही परस्परांपासून परस्परांचें तूं रक्षण करीत असतोस नां ? ७१. मद्यपान, द्यूत, क्रीडा व स्त्रिया ह्यांसंबंधानें म्हणजे अर्थात् व्यसनासंबंधानें झालेला खर्च तुला तुझे नोकर लोक प्रातःकाळींच येऊन कळवीत नाहींत नां? (कारण, प्रातःकाळीं पुरोहितप्रभृति संभावित लोक राजाकडे आलेले असतात. तेव्हां अशा वेळीं वरील कृत्यांकडे झालेला खर्च सांगण्याकरितां कोणी आल्यास राजा दुर्व्यसनी आहे असें लक्ष्यांत आल्यामुळें त्या संभावित लोकांचें मन कलुषित होऊन ते राजाचा त्यागही कदाचित् करतील)७२.(सुबत्ता असतांना) जमेच्या चवथ्या हिश्शांत, (धारणेनें मान साधारण असतांना)उत्पन्नाच्या अर्ध्या रकमेंत आणि (दुर्भिक्ष असतांना) आयाच्या तीन चतुर्थांशांमध्यें तुझा खर्च भागत असतो नां? ७३. आपल्या आश्रयाला असलेले नातेवाईक, गुरु, वृद्ध, व्यापारी व कारागीर दारिद्र्यग्रस्त झाल्यास धनधान्य देऊन तूं त्यांचा नेहमीं परामर्श घेत असतोस नां ? ७४. जमाखर्चाकडे नेमिलेले सर्व हिशेबनीस पूर्वाण्हकालीं तुला नित्य जमा व खर्च कळवीत असतात नां ? ७५. हे कामकाजामध्यें तरबेज असून आपलें हित इच्छिणारे आहेत असें समजून आल्यानंतर आपणांला प्रिय झालेल्या सेवकांना प्रथम त्यांचा अपराध दृष्टोत्पत्तीस आल्यावांचून तूं कामावरून काढून टाकीत नाहींस नां ? ७६.

कर्मस्वनुरूपेषु नियोजयसि भारत ७७ कच्चिन्न लुब्धाश्चौरा वा वैरिणो वा विशांपते । अप्राप्तव्यवहारा वा तव कर्मस्वनुष्ठिताः ७८ कच्चिन्न चौरैर्लुब्धैर्वा कुमारैः स्त्रीबलेन वा । त्वया वा पीड्यते राष्ट्रं कच्चित्तुष्टाः कृषीवलाः ७९ कच्चिद्राष्ट्रे तडागानि पूर्णानि च बृहन्ति च । भागशो विनिविष्टानि न कृषिर्देवमातृका ८० कच्चिन्न भक्तं बीजं च कर्षकस्यावसीदति । प्रत्येकं च शतं वृद्ध्या ददास्यृणमनुग्रहम् ८१ कच्चित्स्वनुष्ठिता तात वार्ता ते साधुभिर्जनैः । वार्तायां संश्रितस्तात लोकोयं सुखमेधते ८२ कच्चिच्छूराः कृतप्रज्ञाः पञ्च पञ्चस्वनुष्ठिताः । क्षेमं कुर्वन्ति संहत्य राजञ्जनपदे तव ८३ कच्चिन्नगरगुप्त्यर्थं ग्रामा नगरवत्कृताः । ग्रामवच्च कृताः प्रान्तास्ते च सर्वे त्वदर्पणाः ८४ कच्चिद्बलेनानुगताः समानि विषमाणि

हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, तूं उत्तम, मध्यम व कनिष्ठ लोक कोणते ह्याची परीक्षा करून नंतर यथायोग्य कामावर त्यांची योजना करीत असतोस नां ? ७७. हे प्रजाधिपते, लोभी, चोर, वैरी अथवा अप्रौढ लोक तूं कामावर ठेविले नाहींस नां ? ७८. चोर, लोभी, पोरेंसोरें अथवा स्त्रिया ह्यांमुळें अथवा तुझ्यामुळें राष्ट्राला पीडा होत नसून त्यांतील शेतकरी लोक संतुष्ट आहेत नां ? ७९. राष्ट्रामध्यें पाण्यानें भरलेले मोठेमोठे तलाव जमिनीच्या विभागाप्रमाणें बांधलेले असून शेतकी नुसत्या पर्जन्यावरच अवलंबून नाहीं नां ? ८०. शेतकऱ्यांना (निर्वाहापुरतें) अन्न आणि (पेरण्यापुरतें) बीं कधीं कमी येत नसून तूं त्यांना दरमहा दरशेंकडा एक ह्या व्याजानें दयाळूपणें कर्ज देत असतोस नां ? ८१. (शेतकी, दुकानदारी, पशुपालन आणि व्याजबट्टा ह्या रीतीप्रकारचा) धंदा तुझ्या राष्ट्रांतील चांगल्या लोकांचा बरा चालला आहे नां ? कारण, बा युधिष्ठिरा, धंद्याला धरून असलेल्या ह्या लोकांना सुख होत असतें ८२. हे राजा, तुझ्या राष्ट्रांतील प्रत्येक ग्रामामध्यें पांच पांच बुद्धिमान् व शूर लोक असून ते एकमतानें तुझें कल्याण करीत असतात नां ? ८३. नगरसंरक्षणाकरितां ग्रामांची व्यवस्था नगराप्रमाणें केलेली असून सरहद्दीवरील खेड्यापाड्यांचा बंदोबस्त तूं ग्रामांप्रमाणें केलेला आहेस नां ? व नगरें, ग्राम आणि प्रांत हीं सर्व तुझ्या हुकमतींत आहेत नां ? (सारांश, प्रांत, ग्राम, नगरें व पुर असे चार लोकवस्तीचे भाग राष्ट्रामध्यें असतात. पैकीं सरहद्दीवरील रानटी लोकांच्या निवासस्थानांना प्रांत असें ह्मणतात; प्रायः शूद्र लोकांचीच ज्यामध्यें वस्ति असते त्याला ग्राम ह्मणतात; बाजार वगैरे ज्या ठिकाणीं भरतो त्याला नगर ह्मणतात आणि देशाधिपति राजा ज्या ठिकाणीं असतो त्याला पुर अथवा राजधानी असें ह्मणतात. संरक्षणाकरितां ग्रामामध्यें पुष्कळ शूर लोक ठेविलेले असतात

च । पुराणि चोरा निघ्नन्तश्चरन्ति विषये तव ८५ कच्चित्स्त्रियः सान्त्व-
यसि कच्चित्ताश्च सुरक्षिताः । कच्चिन्न श्रद्दधास्यासां कच्चिद्गुह्यं न भाषसे ८६
कच्चिदात्ययिकं श्रुत्वा तदर्थमनुचिन्त्य च । प्रियाण्यनुभवञ्शेषे न त्वमन्तः-
पुरे नृप ८७ कच्चिद्द्वौ प्रथमौ यामौ रात्रेः सुप्त्वा विशांपते । संचिन्तयसि
धर्मार्थौ याम उत्थाय पश्चिमे ८८ कच्चिदर्थयसे नित्यं मनुष्यान्समलं-
कृतः । उत्थाय काले कालज्ञैः सह पाण्डव मन्त्रिभिः ८९ कच्चिद्रक्ता-
म्बरधराः खड्गहस्ताः स्वलंकृताः । उपासते त्वामभितो रक्षणार्थमरि-
न्दम ९० कच्चिद्दण्ड्येषु यमवत्पूज्येषु च विशांपते । परीक्ष्य वर्तसे सम्य-
गप्रियेषु प्रियेषु च ९१ कच्चिच्छारीरमाबाधमौषधैर्नियमेन वा । मानसं

नगरामध्यें त्याहूनही जास्त असतात आणि राजधानीमध्यें तर सर्वांपेक्षां अधिक असतात. तेव्हां ह्या सर्वांची व्यवस्था नीट असून तें जमिनींचें वगैरे उत्पन्न तुला आणून देत असतात नां? ह्मणजे तें उत्पन्न प्रांताधिपति ग्रामाधिपतींचे हवालीं करीत असून ग्रामाधिपति नगराध्यक्षांच्या स्वाधीन करीत असतात नां? व ते नगराधिपति देशाधिपतीकडे वसूल वगैरे रवाना करीत असून तो देशाधिपति तें सर्व कांहीं तुला अर्पण करीत असतो नां?)८४. साधारण व बंदोबस्ताच्या शहरांवर हल्ला करीत करीत फिरत असलेल्या चोरांच्या पाळतीवर तुझ्या राष्ट्रामध्यें नेहमीं सैन्य असतें नां? ८५. स्त्रिया सुरक्षित असून तूं त्यांचें सांत्वन करींत असतोस नां? व त्याचप्रमाणें त्यांचा विश्वास बाळगीत नसून तूं कधीं गुप्त गोष्टही त्यांच्याशीं बोलत नाहींस नां? ८६ हे राजा, कांहीं जरूरीच्या कामाची खबर लागल्यावर त्याकरितां मनामध्यें विचार करूनही तूं कधीं अंतःपुरामध्यें विषयसुखांचा अनुभव घेत पडत नाहींस नां? ८७. हे प्रजाधिपते, (पहिल्या प्रहरांत भोजन वगैरे आटोपल्यानंतर) प्रथम दोन प्रहर निद्रा घेऊन शेवटच्या (चवथ्या) प्रहरामध्यें तूं उठून धर्म व अर्थ ह्यांचा विचार करीत असतोस नां? ८८. हे पांडुपुत्रा, कालवेत्त्या मंत्र्यांसहवर्तमान वेळेवर उठून पोषाख वगैरे नीटनेटका केल्यानंतर तूं नित्य लोकां(च्या भेटी)ची अपेक्षा करीत असतोस नां? ८९. हे शत्रुदमना, उत्तम प्रकारचें अलंकार धारण करून हातामध्यें खड्ग घेतलेले व रक्त वस्त्र परिधान केलेले लोक संरक्षणाकरितां चोहोंबाजूंनीं तुझ्या संनिध असतात नां? ९०. हे प्रजाधिपते, तूं प्रिय आणि अप्रिय गोष्टींची चांगली परीक्षा करून पूज्य लोकांचे ठिकाणीं (नम्रपणानें) व अपराध्यांचे ठिकाणीं (क्रूरपणानें) यमधर्मासारखा वागत असतोस नां? ९१. हे कुंतीपुत्रा, औषधांनीं अथवा खाण्यापिण्याचा नियम ठेवून तूं शारीरिक दुःख नाहींसें करीत असून वृद्धांच्या सेवेनें मानसिक

वृद्धसेवाभिः सदा पार्थापकर्षसि ९२ कच्चिद्वैद्याश्चिकित्सायामष्टाङ्गायां विशारदाः । सुहृदश्चानुरक्ताश्च शरीरे ते हिताः सदा ९३ कच्चिन्न लोभान्मोहाद्वा मानाद्वापि विशांपते । अर्थिप्रत्यर्थिनः प्राप्तान्न पश्यसि कथंचन ९४ कच्चिन्न लोभान्मोहाद्वा विश्रम्भात्प्रणयेन वा । आश्रितानां मनुष्याणां वृत्तिं त्वं संरुणत्सि वै ९५ कच्चित्पौरा न सहिता ये च ते राष्ट्रवासिनः । त्वया सह विरुध्यन्ते परैः क्रीताः कथंचन ९६ कच्चिन्न दुर्बलः शत्रुर्बलेन परिपीडितः । मन्त्रेण बलवान्कश्चिदुभाभ्यां च कथंचन ९७ कच्चित्सर्वेनुरक्तास्त्वां भूमिपालाः प्रधानतः । कच्चित्प्राणांस्त्वदर्थेषु संत्यजन्ति त्वया हृताः ९८ कच्चित्ते सर्वविद्यासु गुणतोर्चा प्रवर्तते । ब्राह्मणानांच साधूनां तव नैःश्रेयसी शुभा॥ दक्षिणास्त्वं ददास्येषां नित्यं

दुःखाचा परिहार करीत असतोस नां ? ९२. आठही प्रकारच्या चिकित्सेमध्यें निपुण, सुस्वभावी आणि राजनिष्ठ असे वैद्य तुझ्या शरीराविषयीं सदा दक्ष असतात नां ? ९३. हे प्रजाधिपते, वादीप्रतिवादी आले असतांना लोभानें, मोहानें अथवा गर्वानें तूं त्यांची दाद घेत नाहींस असें कधीं होत नाहीं नां ?९४. आश्रयाला असलेल्या मनुष्यांची उपजीविका लोभानें, मोहानें, एकाद्यावर (उगीच) विश्वास ठेवून अथवा थट्टेनें तूं कधीं बंद करीत नाहींस नां ?९५. शत्रूंनीं लाच देऊन आपलेसे करून घेतल्यामुळें तुझ्या राजधानींतील व इतरही तुझ्या राष्ट्रांतील लोक एकत्र होऊन तुझ्याशीं कधींही विरोधभावानें वागत नाहींत नां ? ९६. (वध न करितां) दुखवून मात्र ठेविलेला असा एकादा पूर्वीचा दुर्बल शत्रु मसलतीनें, बलानें अथवा मसलत आणि बल ह्या उभयतांच्या योगानें सध्यां कोणत्याही प्रकारें समर्थ झालेला नाहीं नां ?९७. मुख्यतः (मानपानांनीं) तूं वश करून घेतलेले असे सर्व मांडलिक राजे तुझ्याशीं राजनिष्ठ असून तुझ्याकरितां प्राण देण्यास तयार असतात नां ? ९८. सर्व विद्यांमध्यें प्रवीण असलेल्या ब्राह्मणांचें गुणाच्या मानानें तूं परिणामीं कल्याणकारक व शुभावह होणारें असें पूजन करीत असतोस नां ? व त्याचप्रमाणें स्वर्गप्रद आणि मोक्षदायक दक्षिणा तूं ह्यांना नित्य देत असतोस नां ?९९. प्राचीन लोकांनीं आचरिलेल्या वेदमूलक

---

१ " चिकित्सायामष्टांगायां " ह्या पदाचें स्पष्टीकरण नीलकंठांनीं " अष्टांगायां चिकित्सायां निदानं पूर्वलिंगानि रूपाण्युपशयस्तथा । संप्राप्तिरौषधी रोगी परिचारक एव चेत्यष्टावंगानि । अथवा रोगो रोगहेतुरारोग्यमारोग्यहेतुस्तेषां लक्षणानि च " असें केलें आहे. परंतु, " कायबालग्रहोर्ध्वांगशल्यदंष्ट्राजरावृषान् । अष्टावंगानि तस्याहुश्चिकित्सा येषु संश्रिता " ह्या अष्टांगहृदयांतील श्लोकाप्रमाणें काय, बाल, ग्रह, ऊर्ध्वांग, शल्य, दंष्ट्रा, जरा व वाजीकरण हींच चिकित्सेचीं आठ अंगें असावींत असें वाटतें.

स्वर्गापवर्गदाः ९९ कच्चिद्धर्मे त्रयीमूले पूर्वैराचरिते जनैः । यतमान-
स्तथा कर्तुं तस्मिन्कर्मणि वर्तसे १०० कच्चित्तव गृहेऽन्नानि स्वादून्यश्नन्ति
वै द्विजाः । गुणवन्ति गुणोपेतास्तवाध्यक्षं सदक्षिणम् १०१ कच्चि-
त्क्रतूनेकचित्तो वाजपेयांश्च सर्वशः । पुण्डरीकांश्च कार्त्स्न्येन यतसे
कर्तुमात्मवान् १०२ कच्चिज्ज्ञातीन्गुरून्वृद्धान्दैवतांस्तापसानपि । चैत्यांश्च
वृक्षान्कल्याणान्ब्राह्मणांश्च नमस्यसि १०३ कच्चिच्छोको न मन्युर्वा त्वया
प्रोत्पाद्यतेऽनघ । अपि मङ्गलहस्तश्च जनः पार्श्वेऽनुतिष्ठति १०४ कच्चिदेषा
च ते बुद्धिर्वृत्तिरेषा च ते नघ । आयुष्या च यशस्या च धर्मकामार्थद-
र्शिनी १०५ एतया वर्तमानस्य बुद्ध्या राष्ट्रं न सीदति । विजित्य च महीं
राजा सोऽत्यन्तं सुखमेधते १०६ कच्चिदार्यो विशुद्धात्मा क्षारितश्चौरक-
र्मणि । अदृष्टः शास्त्रकुशलैर्न लोभाद्वध्यते शुचिः १०७ दुष्टो गृहीतस्त-
त्कारी तज्ज्ञैर्दृष्टः सकारणः । कच्चिन्न मुच्यते स्तेनो द्रव्यलोभान्नरर्षभ १०८
उत्पन्नान्कच्चिदाढ्यस्य दरिद्रस्य च भारत । अर्थान्न मिथ्या पश्यन्ति तवा-

---

धर्माविषयीं तूं त्यांच्याप्रमाणेंच वागण्याचा यत्न करीत असून वैदिककर्मामध्यें तुझी प्रवृत्ति असते नां? १००. तुझ्या घरीं उत्तम उत्तम स्वादिष्ट अन्न गुणी ब्राह्मण तुझ्यासमक्ष दक्षिणे-सहवर्तमान सेवन करीत असतात नां? १. तूं जितेंद्रिय राहून एकचित्तानें वाजपेय, पुंडरीक इत्यादि क्रतु करण्याचा प्रयत्न करीत असतोस नां ? २. ज्ञातींतील वृद्ध, गुरु, तापस, देवता, पारबांधलेले कल्याणकारक वृक्ष आणि ब्राह्मण ह्यांना तूं वंदन करीत असतोस नां ? ३. हे निष्पापा, (दुर्बलांना) शोक व (समर्थांना,) क्रोध तूं कधीं उत्पन्न करीत नसतोस नां ? व मंगलदायक (पुरोहितप्रभृति) लोक तुझे जवळ राहून स्वस्तिवाचन वगैरे करीत असतात नां ? ४. हे निष्पापा, आयुर्वर्धक, यशस्कारक आणि धर्म, अर्थ व काम ह्यांकडे लक्ष्य पुरविणारी अशी ज्याप्रमाणें सांप्रत ही तुझी बुद्धि व वृत्ति दिसत आहे तशीच नेहमीं असते नां ? ५. ह्या बुद्धीनें वागणाऱ्या राजाचें राष्ट्र कधीं क्षीण होत नाहीं व पृथ्वी प्राप्त होऊन त्याला अत्यंत सुख होतें६. मनानें शुद्ध व (आचरणानेंही) पवित्र अशा एकाद्या मनुष्यावर चोरीचा आळ येऊन व्यवहारशास्त्रप्रवीण अधिकारी लोकांच्या दृष्टोत्पत्तीस न आल्याकारणानें राजसेवकांच्या लोभामुळें त्याचा वध होत नाहीं नां ? ७. त्याचप्रमाणें हे पुरुषश्रेष्ठा, मुद्यापत्त्यासहवर्तमान एकाद्या चौर्यकर्म करणाऱ्या दुष्ट चोराला चोर हुडकणाऱ्या लोकांनीं पकडला असतांही (अधिकाऱ्याच्या) द्रव्यलोभामुळें तो (शिक्षेवांचून) सुटून जात नाहीं ना ? ८. एकाद्या दरिद्र्याला अथवा धनाढ्याला (अल्पकाळामध्यें पुष्कळ) द्रव्य (सन्मार्गानें) प्राप्त

मात्या हृता धनैः १०९ नास्तिक्यमनृतं क्रोधं प्रमादं दीर्घसूत्रताम् । अदर्शनं ज्ञानवतामालस्यं पञ्चवृत्तिताम् ११० एकचिन्तनमर्थानामनर्थज्ञैश्च चिन्तनम् । निश्चितानामनारम्भं मन्त्रस्यापरिरक्षणम् १११ मङ्गलाद्यप्रयोगं च प्रत्युत्थानं च सर्वतः । कच्चित्त्वं वर्जयस्येतान्राजदोषांश्चतुर्दश । प्रायशो यैर्विनश्यन्ति कृतमूलापि पार्थिवाः ११२ कच्चित्ते सफला वेदाः कच्चित्ते सफलं धनम् । कच्चित्ते सफला दाराः कच्चित्ते सफलं श्रुतम् ११३ युधिष्ठिर उवाच ॥ कथं वै सफला वेदाः कथं वै सफलं धनम् । कथं वै सफला दाराः कथं वै सफलं श्रुतम् ११४ नारद उवाच ॥ अग्निहोत्रफला वेदा दत्तभुक्तफलं धनम् । रतिपुत्रफला दाराः शीलवृत्तफलं श्रुतम् ११५ वैशम्पायन उवाच ॥ एतदाख्याय स मुनिर्नारदो वै महातपाः । पप्रच्छानन्तरमिदं धर्मात्मानं युधिष्ठिरम् ११६ नारद उवाच ॥ कच्चिदभ्यागता दूराद्वणिजो लाभकारणात् । यथोक्तमवहार्यन्ते शुल्कं शुल्कोपजीविभिः ११७ कच्चित्ते पुरुषा राजन्पुरे राष्ट्रे च मानिताः ।

झाले असतांना तुझे अमात्य दुष्ट लोकांनीं भारून टाकिल्यामुळें तें द्रव्य अन्यायानें प्राप्त झालें आहे असें समजत नाहींत नां ? ९. नास्तिक्य, अनृत, क्रोध, हलगरजीपणा, चेंगटपणा, ज्ञानी जनांची भेट न घेणें, आळस, विषयाधीनता, ११०, एकट्यानेंच (राज्यसंबंधीं) गोष्टींचा विचार करणें, राजव्यवहार माहीत नसलेल्या लोकांशीं सल्लामसलत करणें, कर्तव्य ह्मणून निश्चित झालेल्या गोष्टींना आरंभ न करणें, मसलत गुप्त न ठेवणें ११, उत्सव वगैरे न करणें व एकदम चोहोंकडे स्वारी करणें हे चवदा राजदोष तूं टाळीत असतोस नां ? कारण, राजांचा अंमल जरी पृथ्वीवर दृढ झाला असला तरी ह्या दोषांनीं प्रायः त्यांचा नाश होतो १२. वेद, धन, पत्नी व श्रवण हीं तुझीं सफळ आहेत नां ? १३. युधिष्ठिर प्रश्न करितो:— (हे मुने) वेद, धन, पत्नी व श्रवण हीं सफळ कशीं होतात ? १४. नारद सांगतात:—अग्निहोत्र हें वेदांचें फळ असून दुसऱ्याला देणें व स्वतः उपभोग घेणें हें द्रव्याचें फळ होय. त्याचप्रमाणें रतिसुख आणि पुत्रप्राप्ति हें पत्नीचें फळ असून सुशीलपणा व सदाचरण हें श्रवणाचें फळ होय १५. वैशंपायन सांगतात:—(ह्याप्रमाणें प्रश्नमिषानें हें (राजनीतिशास्त्र) कथन केल्यानंतर महातपस्वी नारद मुनींनीं धर्मात्म्या युधिष्ठिराला पुनरपि असा प्रश्न केला १६. नारद प्रश्न करितात:—दूरदूरच्या प्रदेशांहून द्रव्यसंपादनाकरितां आलेल्या उदम्यांपासून कराकडील नोकर ठरल्याप्रमाणें कर घेत असतात नां ? १७. हे राजा, राजधानीमध्यें व राष्ट्रामध्यें मान्य

उपानयन्ति पण्यानि उपधाभिरवञ्चिताः ११८ कच्चिच्छृणोषि वृद्धानां धर्मार्थसहिता गिरः । नित्यमर्थविदां तात तथा धर्मार्थदर्शिनाम् ११९ कच्चित्ते कृषितन्त्रेषु गोषु पुष्पफलेषु च । धर्मार्थं च द्विजातिभ्यो दीयेते मधुसर्पिषी १२० द्रव्योपकरणं किंचित्सर्वदा सर्वशिल्पिनाम् । चातुर्मास्यावरं सम्यङ्नियतं संप्रयच्छसि १२१ कच्चित्कृतं विजानीषे कर्तारं च प्रशंससि । सतां मध्ये महाराज सत्करोषि च पूजयन् १२२ कच्चित्सूत्राणि सर्वाणि गृह्णासि भरतर्षभ । हस्तिसूत्राश्वसूत्राणि रथसूत्राणि वा विभो १२३ कच्चिदभ्यस्यते सम्यग्गृहे ते भरतर्षभ । धनुर्वेदस्य सूत्रं वै यन्त्रसूत्रं च नागरम् १२४ कच्चिदस्त्राणि सर्वाणि ब्रह्मदण्डश्च तेनघ । विषयोगास्तथा सर्वे विदिताः शत्रुनाशनाः १२५ कच्चिदग्निभयाच्चैव सर्वं व्यालभयात्तथा । रोगरक्षोभयाच्चैव राष्ट्रं स्वं परिरक्षसि १२६ कच्चिदन्धांश्च मूकांश्च पङ्गून्व्यङ्गानबान्धवान् । पितेव पासि धर्मज्ञ तथा प्रव्रजितानपि १२७ षडनर्था महाराज कच्चित्ते पृष्ठतः कृताः । निद्रालस्यं

असलेले तज्ञ (खरेदीदार) लोक कपटानें फसून न जातां माल खरेदी करून आणीत असतात नां ? १८. बा युधिष्ठिरा, कार्यज्ञ असून धर्मार्थांकडे लक्ष्य पुरविणाऱ्या वृद्ध लोकांची धर्म व अर्थ ह्यांना धरून असलेलीं भाषणें तूं श्रवण करीत असतोस नां ? १९. कृषिकर्मानें उत्पन्न होणारीं धान्यें आणि गाईपासून उत्पन्न होणारें दूध, तूप वगैरे ह्यापैकीं धान्यादिक अन्न व घृत ब्राह्मणांना धर्मार्थ दिलें जात असतें नां ? २०. सर्व शिल्पी लोकांना पगार व आपल्या कामाला लागणारें सामान तूं नेहमीं उत्तमप्रकारें चार महिन्याला पुरेसें नियमितपणानें देत असतोस नां ? २१. एकाद्यानें केलेलें कृत्य लक्ष्यांत ठेवून तूं त्या करणाऱ्याची प्रशंसा करीत असतोस नां ? आणि त्याचप्रमाणें हे महाराजा, सज्जनांमध्यें मानमान्यतापूर्वक तूं त्यांचा सत्कार करीत असतोस नां ? २२. हे प्रभो, गज, अश्व, रथ इत्यादिविषयक सर्व प्रकारचें तात्पुरतें ज्ञान तूं करून घेत असतोस नां ? २३. हे भरतवंशजश्रेष्ठा, नगराला हितावह असें धनुर्वेदसंबंधीं सूचक शास्त्र व युद्धसंबंधीं यंत्रशास्त्र ह्यांचा उत्तमप्रकारें तुझ्या घरीं अभ्यास चाललेला असतो नां ? २४. हे निष्पापा, सर्व प्रकारचीं अस्त्रें, जारणमारणविद्या आणि त्याचप्रमाणें शत्रुनाशक असे सर्व विषप्रयोग तुला विदित आहेत नां ? २५. अग्नि, सर्पवगैरे विषारी प्राणी, रोग आणि राक्षस ह्यांच्या भयापासून तूं आपलें राष्ट्र रक्षण करीत आहेस नां ? २६. हे धर्मवेत्त्या, अंधळे, मुके, पांगळे, व्यंग, अनाथ आणि विरक्त होऊन अरण्यांत गेलेले लोक ह्यांचें तूं पित्याप्रमाणें रक्षण करीत असतोस नां ? २७.

भयं क्रोधो मार्दवं दीर्घसूत्रता १२८ वैशम्पायन उवाच ॥ ततः कुरूणा-
मृषभो महात्मा श्रुत्वा गिरो ब्राह्मणसत्तमस्य । प्रणम्य पादावभिवाद्य
तुष्टो राजाब्रवीन्नारदं देवरूपम् १२९ युधिष्ठिर उवाच ॥ एवं करिष्यामि
यथा त्वयोक्तं प्रज्ञा हि मे भूय एवाभिवृद्धा । उक्त्वा तथा चैव चकार
राजा लेभे महीं सागरमेखलां च १३० नारद उवाच ॥ एवं यो वर्तते राजा
चातुर्वर्ण्यस्य रक्षणे । स विहृत्येह सुसुखी शक्रस्यैति सलोकताम् १३१
[२६८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां० सभापर्वणि लोकपाल-
सभाख्यानपर्वणि नारदप्रश्नमुखेन राजधर्मानुशासने पञ्चमोऽध्यायः ॥ ५ ॥

वैशम्पायन उवाच ॥ संपूज्याथाभ्यनुज्ञातो महर्षेर्वचनात्परम् । प्रत्युवा-
चानुपूर्व्येण धर्मराजो युधिष्ठिरः १ भगवन्न्याय्यमाहैतं यथावद्धर्मनिश्च-
यम् । यथाशक्ति यथान्यायं क्रियतेऽयं विधिर्मया २ राजभिर्यद्यथा कार्यं
पुरा वै तन्न संशयः । यथान्यायोपनीतार्थं कृतं हेतुमदर्थवत् ३ वयं तु
सत्पथं तेषां यातुमिच्छामहे प्रभो । न तु शक्यं तथा गन्तुं यथा तैर्निय-

हे महाराजा, निद्रा, आळस, भय, क्रोध, मार्दव आणि चेंगटपणा ह्या सहा अनर्थांकडे तूं अगदीं पाठ केली आहेस नां ? २८. वैशंपायन सांगतातः—कुरुवंशजश्रेष्ठ महात्मा युधिष्ठिर राजा त्या श्रेष्ठ ब्रह्मनिष्ठाचे शब्द ऐकून संतुष्ट झाला आणि त्या देवस्वरूप नारदमुनींना प्रणाम करून पादाभिवंदनपूर्वक " आपली आज्ञा झाल्याप्रमाणें मी वागत जाईन; आपल्या उपदेशामुळें माझी बुद्धि अधिकच वृद्धिंगत झाली आहे " असें ह्मणाला. इतकेंच नव्हे परंतु, त्यांच्याशीं बोलल्यानंतर तो तसेंच वागला आणि त्यामुळें त्याला समुद्रवलयांकित पृथ्वी प्राप्त झाली २९,३०. नारद सांगतातः—(ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ह्या) चारी वर्णांच्या रक्षणाकरितां जो राजा ह्याप्रमाणें वागतो तो इह लोकीं उत्तम सुखी राहून विहार करितो आणि शेवटीं इंद्रलोका-प्रत जातो १३१. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील लोकपालसभाख्यानपर्वा-पैकीं नारदप्रश्नद्वारा राजधर्म कथन करण्याविषयीं पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें महर्षि नारदांचें अनुक्रमानें भाषण झाल्यानंतर धर्मराज युधिष्ठिरानें त्याची प्रशंसा केली आणि नारदमुनींची अनुज्ञा घेऊन तो ह्मणाला १ " हे भगवन्, आपण हा धर्मनिर्णय अगदीं पूर्णपणें यथान्याय कथन केला असून मीही यथाशक्ति व यथान्याय ह्याप्रमाणें वागत असतों २. हेतु आणि फल ह्यांना अनुसरून यथान्याय प्राप्त झालेलें कृत्य जसें करावयाचें तसें पूर्वीं होऊन गेलेल्या राजांनीं निःसंशय केलें आहे ३. हे प्रभो, आह्मी त्यांच्या सन्मार्गानें जाण्याची इच्छा

तात्मभिः ४ वैशम्पायन उवाच ॥ तं तु विश्रान्तमालक्ष्य देवर्षिममितद्युतिम् । एवमुक्त्वा स धर्मात्मा वाक्यं तदभिपूज्य च ५ मुहूर्तात्प्राप्तकालं च दृष्ट्वा लोकचरं मुनिम् । नारदं सुस्थमासीनमुपासीनो युधिष्ठिरः ६ अपृच्छत्पाण्डवस्तत्र राजमध्ये महाद्युतिः ७ युधिष्ठिर उवाच ॥ भवान्संचरते लोकान्सदा नानाविधान्बहून् । ब्रह्मणा निर्मितान्पूर्वं प्रेक्षमाणो मनोजवः ८ ईदृशी भविता काचिद्दृष्टपूर्वा सभा क्वचित् । इतो वा श्रेयसी ब्रह्मंस्तन्ममाचक्ष्व पृच्छतः ९ वैशम्पायन उवाच ॥ तच्छ्रुत्वा नारदस्तस्य धर्मराजस्य भाषितम् । पाण्डवं प्रत्युवाचेदं स्मयन्मधुरया गिरा १० नारद उवाच ॥ मानुषेषु न मे तात दृष्टपूर्वा न च श्रुता । सभा मणिमयी राजन्यथेयं तव भारत ११ सभां तु पितृराजस्य वरुणस्य च धीमतः । कथयिष्ये तथेन्द्रस्य कैलासनिलयस्य च १२ ब्रह्मणश्च सभां दिव्यां कथयिष्ये गतक्लमाम् । दिव्यादिव्यैरभिप्रायैरुपेतां विश्वरूपिणीम् १३ देवैः

करीत आहों. परंतु, वस्तुतः ते जितेंद्रिय राजे ज्याप्रमाणें सन्मार्गानें वागले त्याप्रमाणें वागणें आह्मांला शक्य नाहीं ४. वैशंपायन सांगतात—ते अत्यंत तेजस्वी देवर्षि विश्रांति घेऊन स्वस्थ झाल्याचें अवलोकन करून व ह्याप्रमाणें नारदमुनींच्या त्या भाषणाची प्रशंसा करून धर्मात्मा युधिष्ठिर बोलला असतां क्षणमात्र काल लोटल्यानंतर "अनेक लोकांमध्यें संचार करणारे नारद मुनि बरे वेळेवर आपणांकडे आले आहेत" असें मनांत येऊन सुखानें बसलेल्या नारदमुनिसंनिध राजांमध्यें बसलेला महातेजस्वी पांडुपुत्र युधिष्ठिर त्यांना प्रश्न करूं लागला ५,६,७. युधिष्ठिर प्रश्न करितोः—ब्रह्मदेवानें पूर्वी निर्माण केलेले अनेक प्रकारचे अनेक लोक अवलोकन करण्याकरितां मनोवेगानें युक्त असलेले आपण सर्वदां संचार करीत असतां ८. तेव्हां हे ब्रह्मन्, अशी (माझ्या सभेसारखी) अथवा हिच्यापेक्षां वरचढ सभा आपण आजपर्यंत कोठें अवलोकन केली आहे काय ? अथवा ह्यापुढें तरी कोठें अशी सभा दृष्टीं पडण्याचा संभव आहे काय ? हें मी आपणांला विचारीत आहें तर तें आपण कथन करा ९. वैशंपायन सांगतातः—तें धर्मराजाचें भाषण श्रवण करून नारदमुनींनीं हंसत हंसत मधुर वाणीनें त्या पांडुपुत्राला असें उत्तर केलें १०. नारद ह्मणतातः—बा भरतवंशजा युधिष्ठिरा, ह्या तुझ्या सभेप्रमाणें रत्नमय सभा मीं आजपर्यंत मनुष्यांमध्यें कोठें पाहिली नाहीं अथवा ऐकिलीही नाहीं ११. परंतु, हे भरतवंशजश्रेष्ठा, तुझ्या मनांतून जर ऐकावयाचें असेल तर यम, वरुण व कुबेर ह्यांच्या सभा मी तुला कथन करणार असून दिव्य, श्रमरहित, दिव्य व मानुष अशा दोन्हीप्रकारच्या

पितृगणैः साध्यैर्यज्वभिर्नियतात्मभिः । जुष्टां मुनिगणैः शान्तैर्वेदयज्ञैः सद्क्षिणैः ॥ यदि ते श्रवणे बुद्धिर्वर्तते भरतर्षभ १४ नारदेनैवमुक्तस्तु धर्मराजो युधिष्ठिरः । प्राञ्जलिर्भ्रातृभिः सार्धं तैश्च सर्वैर्द्विजोत्तमैः १५ नारदं प्रत्युवाचेदं धर्मराजो महामनाः । सभाः कथय ताः सर्वाः श्रोतुमिच्छामहे वयम् १६ किंद्रव्यास्ताः सभा ब्रह्मन्किंविस्ताराः किमायताः । पितामहं च के तस्यां सभायां पर्युपासते १७ वासवं देवराजं च यमं वैवस्वतं च के । वरुणं च कुबेरं च सभायां पर्युपासते १८ एतत्सर्वं यथान्यायं ब्रह्मर्षे वदतस्तव । श्रोतुमिच्छाम सहिताः परं कौतूहलं हि नः १९ एवमुक्तः पाण्डवेन नारदः प्रत्यभाषत । क्रमेण राजन्दिव्यास्ताः श्रूयन्तामिह नः सभाः २० [२८८] इति श्रीमहाभारते० वैयासिक्यां सभापर्वणि लोकपालसभाख्यानपर्वणि युधिष्ठिरसभाजिज्ञासायां षष्ठोध्यायः ॥ ६ ॥

नारद उवाच ॥ शक्रस्य तु सभा दिव्या भास्वरा कर्मनिर्मिता । स्वयं शक्रेण कौरव्य निर्जितार्कसमप्रभा १ विस्तीर्णा योजनशतं शतमध्यर्धमा-

---

चमत्कारांनीं युक्त, मनसोक्त रूप धारण करणारी, देव, पितृगण आणि साध्य ह्यांनीं आणि शांत व जितेंद्रिय असून विधीनें हवन करणाऱ्या मुनिगणांनीं युक्त असल्यामुळें वेदविहित सदक्षिण यज्ञ जिच्यामध्यें चालले आहेत अशी ब्रह्मदेवाचीही सभा मी तुला सांगेन १२, १३, १४. ह्याप्रमाणें धर्मराज युधिष्ठिराला नारदांनीं सांगितलें असतां भ्रात्यांसहवर्तमान व त्या सर्व द्विजश्रेष्ठांसहवर्तमान हात जोडून तो महाबुद्धिमान् धर्मराजा नारदमुनींना पुनरपि असें ह्मणाला " त्या सर्व सभा आपण कथन करा; आमची श्रवण करण्याची इच्छा आहे १५, १६. हे ब्रह्मन्, त्या सभा कोणत्या पदार्थांच्या केल्या आहेत? त्यांची लांबी व रुंदी हीं काय काय आहेत? व तसेच त्या प्रत्येक सभेमध्यें ब्रह्मदेव १७, देवराज इंद्र, सूर्यपुत्र यम, वरुण व कुबेर ह्यांच्या भोंवतीं कोण कोण बसलेले असतात? १८ हें सर्व, हे ब्रह्मर्षे, आपल्या मुखांतून एकदम आह्मा सर्वांना यथान्याय श्रवण करण्याची इच्छा असून आह्मांला त्याविषयीं पराकाष्ठेची उत्कंठाही प्राप्त झाली आहे " १९. ह्याप्रमाणें पांडुपुत्र युधिष्ठिरानें प्रार्थना केली असतां, " हे राजा, त्या दिव्य सभा आह्मांपासून तूं क्रमानें येथें ऐकून ठेव " असें नारदमुनींनीं त्याला प्रत्युत्तर दिलें २०. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील लोकपालसभाख्यानपर्वांपैकीं लोकपालांच्या सभांसंबंधानें युधिष्ठिराचे ठिकाणीं जिज्ञासा उत्पन्न झाल्याविषयीं सहावा अध्याय समाप्त झाला ॥ ६ ॥

नारद सांगतातः—हे कुरुकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, इंद्राची विश्वकर्म्यानें निर्माण केलेली सभा दिव्य, उज्ज्वल व प्रभेनें सूर्यासारखी असून स्वतः इंद्रानें ती जिंकिलेली

यता । वैहायसी कामगमा पञ्चयोजनमुच्छ्रिता २ जराशोकक्लमापेता निरातङ्का शिवा शुभा । वेश्मासनवती रम्या दिव्यपादपशोभिता ३ तस्यां देवेश्वरः पार्थ सभार्यां परमासने । आस्ते शच्या महेन्द्राण्या श्रिया लक्ष्म्या च भारत ४ बिभ्रद्वपुरनिर्देश्यं किरीटी लोहिताङ्गदः । विरजोम्बरश्चित्रमाल्यो ह्रीकीर्तिद्युतिभिः सह ५ तस्यामुपासते नित्यं महात्मानं शतक्रतुम् । मरुतः सर्वशो राजन्सर्वे च गृहमेधिनः ६ सिद्धा देवर्षयश्चैव साध्या देवगणास्तथा । मरुत्वन्तश्च सहिता भास्वन्तो हेममालिनः ७ एते सानुचराः सर्वे दिव्यरूपाः स्वलंकृताः । उपासते महात्मानं देवराजमरिंदमम् ८ तथा देवर्षयः सर्वे पार्थ शक्रमुपासते । अमला धूतपाप्मानो दीप्यमाना इवाग्नयः ९ तेजस्विनः सोमसुतो विशोका विगतज्वराः । पराशरः पर्वतश्च तथा सावर्णिगालवौ १० शङ्खश्च लिखितश्चैव तथा गौरशिरा मुनिः । दुर्वासाः क्रोधनः श्येनस्तथा दीर्घतमा मुनिः ११

आहे १. ती शंभर योजनें रुंद असून दीडशें योजनें लांब व पांच योजनें उंच आहे आणि त्याचप्रमाणें ती आकाशमार्गानें संचार करणारी असून (आरूढ होणाऱ्यांच्या) मनास वाटेल तिकडे गमन करणारी आहे २. जरा, शोक, ग्लानि व रोग ह्यांचा तिचे ठिकाणीं अभाव असून शांत, कल्याणप्रद व रम्य असलेली ती सभा गृहें, आसनें आणि दिव्य वृक्ष ह्यांनीं युक्त आहे ३. हे भरतवंशजा कुंतीपुत्रा, त्या सभेमध्यें उत्कृष्ट आसनावर कांति व वैभव ह्यांसह असलेल्या आपल्या शचीनामक पत्नीसहवर्तमान देवाधिपति महेंद्र बसलेला असतो ४ आणि विनय, कीर्ति व कांति ह्यांसहवर्तमान असलेल्या त्या महेंद्रानें किरीट, आरक्त वर्ण बाहुभूषणें, निर्मल वस्त्रें, चमत्कारिक पुष्पांच्या माला आणि अवर्णनीय स्वरूप धारण केलेलें असतें ५. हे राजा, शंभर अश्वमेध केलेल्या त्या महात्म्या इंद्रासभोंवतीं त्या सभेमध्यें सर्व बाजूंनीं सर्व गृहस्थाश्रमी मरुद्गण बसलेले असतात ६ व त्याचप्रमाणें सिद्ध, देवर्षि, साध्य, देवगण व उज्ज्वल आणि सुवर्णमाला धारण करून एकत्र बसलेले मेघ त्या ठिकाणीं असतात ७ व हे सर्व दिव्य रूपें व उत्तम अलंकार धारण करून आपल्या अनुयायांसहवर्तमान महात्म्या शत्रुनाशक देवराज इंद्राचे संनिध बसलेले असतात ८. त्याचप्रमाणें हे कुंतीपुत्रा, पापक्षालन झालें असल्यामुळें निर्मल व अग्निप्रमाणें देदीप्यमान असलेले सर्व देवर्षि इंद्रासंनिध बसलेले असतात ९. शोक व चिंता हीं ज्यांचे ठिकाणीं नाहींत असे तेजस्वी सोमयाजी मुनि, पराशर, पर्वत, सावर्णि व गालव १०, शंख, लिखित, गौरशिर मुनि, दुर्वास, क्रोधन, श्येन, दीर्घतम ऋषि ११, पवित्रपाणि,

पवित्रपाणिः सावर्णिर्याज्ञवल्क्योथ भालुकिः। उद्दालकः श्वेतकेतुस्ताण्ड्यो भाण्डायनिस्तथा १२ हविष्मांश्च गरिष्ठश्च हरिश्चन्द्रश्च पार्थिवः। हृद्यश्चोदरशाण्डिल्यः पाराशर्यः कृषीबलः १३ वातस्कन्धो विशाखश्च विधाता काल एव च। करालदन्तस्त्वष्टा च विश्वकर्मा च तुम्बुरुः १४ अयोनिजा योनिजाश्च वायुभक्षा हुताशिनः। ईशानं सर्वलोकस्य वज्रिणं समुपासते १५ सहदेवः सुनीथश्च वाल्मीकिश्च महातपाः। शमीकः सत्यवाक्चैव प्रचेताः सत्यसंगरः १६ मेधातिथिर्वामदेवः पुलस्त्यः पुलहः क्रतुः। मरुत्तश्च मरीचिश्च स्थाणुश्चात्र महातपाः १७ कक्षीवान्गौतमस्तार्क्ष्यस्तथा वैश्वानरो मुनिः। मुनिः कालकवृक्षीय आश्राव्योथ हिरण्मयः १८ संवर्तो देवहव्यश्च विष्वक्सेनश्च वीर्यवान्। कण्वः कात्यायनो राजन्गार्ग्यः कौशिक एव च १९ दिव्या आपस्तथौषध्यः श्रद्धा मेधा सरस्वती २० अर्थो धर्मश्च कामश्च विद्युतश्चैव पाण्डव। जलवाहास्तथा मेघा वायवः स्तनयित्नवः २१ प्राची दिग्यज्ञवाहाश्च पावकाः सप्तविंशतिः। अग्नीषोमौ तथेन्द्राग्नी मित्रश्च सवितार्यमा २२ भगो विश्वे च साध्याश्च गुरुः शुक्रस्तथैव च। विश्वावसुश्चित्रसेनः सुमनस्तरुणस्तथा २३ यज्ञाश्च दाक्षि-

---

सावर्णि, याज्ञवल्क्य, भालुकि, उद्दालक, श्वेतकेतु, तांड्य, भांडायनि १२, हविष्मान्, गरिष्ठ, राजा हरिश्चंद्र, हृद्य, उदरशांडिल्य, पाराशर्य, कृषीबल १३, वातस्कंध, विशाख, विधाता, काल, करालदंत, त्वष्टा, विश्वकर्मा, तुंबुरु, १४ आणि वायुभक्षण व हुतशेषभक्षण करणारे अयोनिसंभव व योनिसंभव लोक सर्व लोकाधिपति इंद्राचे सांनिध्य असतात १५. सहदेव, सुनीथ, महातपस्वी वाल्मिकि, सत्यवचनी शमीक, सत्यप्रतिज्ञ प्रचेतस् १६, मेधातिथि, वामदेव, पुलस्त्य, पुलह, क्रतु, मरुत्त, मरीचि, महातपस्वी स्थाणु १७, लक्ष्मीवान्, गौतम, तार्क्ष्य, वैश्वानर मुनि, कालकवृक्षीय मुनि, आश्राव्य, हिरण्मय १८, संवर्त, देवहव्य, वीर्यवान विष्वक्सेन, हे युधिष्ठिर राजा, कण्व मुनि, कात्यायन महर्षि, गार्ग्य ऋषि, कौशिक मुनि १९ दिव्य उदकें, ओषधि, श्रद्धा, मेधा, सरस्वती २०, हे पांडुपुत्रा, धर्म, अर्थ व काम ह्यांच्या अभिमानिनी देवता, विद्युल्लता, जलवाहक मेघ, वायु, स्तनयित्नु २१, पूर्व दिशा, (अंगिरा, दक्षिणाग्नि, गार्हपत्य, आहवनीय, निर्मथ्य, वैद्युत, शूर, संवर्त, लौकिक, जाठर, विषग, क्रव्यात्, क्षेमवान्, वैष्णव, दस्युमान्, बलद, शांत, पुष्ट, विभावसु, ज्योतिष्मान्, भरत, भद्र, स्विष्टकृत्, वसुमान्, क्रतु, सोम व पितृमान् असे) यज्ञनिर्वाहक सत्तावीस अग्नि, अग्नीषोम, इंद्राग्नी, मित्र, सविता, अर्यमा २२, भग, विश्वेदेव, साध्य, गुरु, शुक्र,

णाश्चैव ग्रहास्ताराश्च भारत । यज्ञवाहाश्च ये मन्त्राः सर्वे तत्र समासते २४ तथैवाप्सरसो राजन्गन्धर्वाश्च मनोरमाः । नृत्यवादित्रगीतैश्च हास्यैश्च विविधैरपि २५ रमयन्ति स्म नृपते देवराजं शतक्रतुम् । स्तुतिभिर्मङ्गलैश्चैव स्तुवन्तः कर्मभिस्तथा २६ विक्रमैश्च महात्मानं बलवृत्रनिषूदनम्। ब्रह्मराजर्षयश्चैव सर्वे देवर्षयस्तथा २७ विमानैर्विविधैर्दिव्यैर्दीप्यमाना इवाग्नयः । स्रग्विणो भूषिताः सर्वे यान्ति चायान्ति चापरे २८ बृहस्पतिश्च शुक्रश्च नित्यमास्तां हि तत्र वै । एते चान्ये च बहवो महात्मानो यतव्रताः २९ विमानैश्चन्द्रसङ्काशैः सोमवत्प्रियदर्शनाः । ब्रह्मणः सदृशा राजन्भृगुः सप्तर्षयस्तथा ३० एषा सभा मया राजन्दृष्टा पुष्करमालिनी । शतक्रतोर्महाबाहो याम्यामपि सभां शृणु ३१ [३१९] इति श्रीमहाभारते० सभापर्वणि लोकपालसभाख्यानपर्वणि शक्रसभावर्णनं नाम सप्तमोध्यायः ॥७॥

नारद उवाच ॥ कथयिष्ये सभां याम्यां युधिष्ठिर निबोध ताम् ।वैवस्वतस्य यां पार्थ विश्वकर्मा चकार ह १ तैजसी सा सभा राजन्बभूव

विश्वावसु, चित्रसेन, सुमन, तरुण, २३, हे भरतवंशजा युधिष्ठिरा, यज्ञ, दक्षिणा, ग्रह, स्तोम् व यज्ञनिर्वाहक मंत्र हे सर्व त्या ठिकाणीं एकत्र बसलेले असतात २४. त्याचप्रमाणें, हे नराधिपते युधिष्ठिर राजा, चित्तरंजन करणाऱ्या अप्सरा व गंधर्व अनेक प्रकारचीं नृत्यें, वाद्यें, गीतें व हास्यें ह्यांच्या योगानें २५ देवराज इंद्राचें चित्तरंजन करीत असून बल व वृत्र ह्या असुरांचा वध करणाऱ्या महात्म्या इंद्राचीं मोठमोठीं कर्में व पराक्रम ह्यांचा उल्लेख करून मंगलकारक शब्दांनीं व स्तुतींनीं ते स्तवन करीत असतात. तसेच माला व भूषणें धारण करून अग्नीप्रमाणें देदीप्यमान असलेले सर्व ब्रह्मर्षि, राजर्षि व देवर्षि आणि इतरही सर्व तसे लोक नानाप्रकारच्या दिव्य विमानांत आरुढ होऊन तेथें येतजात असतात २६, २७, २८ आणि बृहस्पति व शुक्र हेही तेथें एकसारखे बसलेले असतात. इतकेंच नव्हे परंतु, हे व इतरही अनेक जितेंद्रिय महात्मे तेथें असून २९ हे राजा, चंद्रासारख्या स्पृहणीय मुद्रेनें युक्त असलेले साक्षात् ब्रह्मदेवासमान सप्तर्षि व भृगु हेही चंद्राप्रमाणें उज्ज्वल विमानांत बसून तेथें येत असतात ३०. असो. हे महापराक्रमी युधिष्ठिर राजा, ह्याप्रमाणें पुष्करमालिनीनामक इंद्रसभा मीं अवलोकन केली आहे. आतां यमाचीही सभा तूं श्रवण कर ३१. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील लोकपालसभाख्यानपर्वांपैकीं इंद्रसभावर्णननामक सातवा अध्याय समाप्त झाला॥७॥

नारद सांगतात:—हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, वैवस्वत यमाची जी सभा विश्वकर्म्यानें निर्माण केली ती मी आतां तुला कथन करितों १. हे पांडुपुत्रा युधिष्ठिर राजा, ती

शतयोजना । विस्तारायामसंपन्ना भूयसी चापि पाण्डव २ अर्कप्रकाशा भ्राजिष्णुः सर्वतः कामरूपिणी । नातिशीता न चात्युष्णा मनसश्च प्रहर्षिणी ३ न शोको न जरा तस्यां क्षुत्पिपासे न चाप्रियम् । न च दैन्यं क्लमो वापि प्रतिकूलं न चाप्युत ४ सर्वे कामाः स्थितास्तस्यां ये दिव्या ये च मानुषाः । रसवच्च प्रभूतं च भक्ष्यं भोज्यमरिन्दम ५ लेह्यं चोष्यं च पेयं च हृद्यं स्वादु मनोहरम् । पुण्यगन्धाः स्रजस्तस्यां नित्यं कामफला द्रुमाः ६ रसवन्ति च तोयानि शीतान्युष्णानि चैव ह । तस्यां राजर्षयः पुण्यास्तथा ब्रह्मर्षयोमलाः ७ यमं वैवस्वतं तात प्रहृष्टाः पर्युपासते । ययातिर्नहुषः पूरुर्मांधाता सोमको नृगः ८ त्रसदस्युश्च राजर्षिः कृतवीर्यः श्रुतश्रवाः । अरिष्टनेमिः सिद्धश्च कृतवेगः कृतिर्निमिः ९ प्रतर्दनः शिबिर्मत्स्यः पृथुलाक्षो बृहद्रथः । वार्तो मरुत्तः कुशिकः सांकाश्यः सांकृतिर्ध्रुवः १० चतुरश्वः सदश्वोर्मिः कार्तवीर्यश्च पार्थिवः । भारतः सुरथश्चैव सुनीथो निशठोनलः ११ दिवोदासश्च सुमना अम्बरीषो भगीरथः । व्यश्वः सदश्वो वध्यश्वः पृथुवेगः पृथुश्रवाः १२ पृषदश्वो वसुमनाः

प्रकाशमय सभा पूर्वीच्या इंद्रसभेपेक्षांही उत्कृष्ट असून तिची लांबीरुंदी शंभर योजनें आहे २. सूर्याप्रमाणें तिचा प्रकाश असल्यामुळें यथेष्ट रूप धारण करणारी ती सभा सर्व बाजूंनीं लकलक करीत असते. मनाला आनंद देणारी ती सभा अति शीत अथवा अति उष्ण नसून ३ शोक, जरा, क्षुधा, तृषा, अप्रिय, दैन्य, ग्लानि आणि प्रतिकूल गोष्ट ह्या सर्वांचा तिचे ठिकाणीं अभाव आहे ४. हे शत्रुदमना, दिव्य व मानुष असे सर्व प्रकारचे विषय त्या सभेमध्यें असून हृद्य, मनोहर, स्वादिष्ट व सरस अशा भक्ष्य, भोज्य, लेह्य, चोष्य व पेय पदार्थांची तेथें समृद्धि आहे आणि उत्कृष्ट प्रकारचे सुगंध व पुष्पें तेथें आहेत. त्याचप्रमाणें सर्वकालीं इच्छेनुरूप फळें येणारे वृक्षही त्याठिकाणीं असून ५, ६ मधुर अशीं शीत व उष्ण उदकें त्या ठिकाणीं आहेत. बा युधिष्ठिरा, पुण्यवान् राजर्षि व (आचरणानें) निर्मल असलेले ब्रह्मर्षि सूर्यपुत्र यमधर्मासभोंवतीं मोठ्या आनंदानें बसलेले असतात. ययाति, नहुष, पूरु, मांधाता, सोमक, नृग, ७, ८, राजर्षि त्रसदस्यु, कृतवीर्य, श्रुतश्रवा, अरिष्टनेमि, सिद्ध, कृतवेग, कृति, निमि ९, प्रतर्दन, शिबि, मत्स्य, पृथुलाक्ष, बृहद्रथ, वार्त, मरुत्त, कुशिक, सांकाश्य, सांकृति, ध्रुव १०, चतुरश्व, सदश्व ऊर्मि, राजा कार्तवीर्य, भारत, सुरथ, सुनीथ, निशठ, अनल ११, दिवोदास, सुमना, अंबरीष, भगीरथ, व्यश्व, सदश्व, वध्यश्व, पृथुवेग, पृथुश्रवा १२, पृषदश्व, वसुमना, अत्यंत महाबलाढ्य क्षुप, रुषद्गु,

क्षुपश्च सुमहाबलः । रुषद्रुर्वृषसेनश्च पुरुकुत्सो ध्वजी रथी १३ आर्ष्टि-षेणो दिलीपश्च महात्मा चाप्युशीनरः । औशीनरिः पुण्डरीकः शर्यातिः शरभः शुचिः १४ अङ्गोरिष्टश्च वेनश्च दुष्यन्तः सृञ्जयो जयः । भाङ्गा-सुरिः सुनीथश्च निषधोथ वहीनरः १५ करन्धमो बाह्लिकश्च सुद्युम्नो बलवान्मधुः । ऐलो मरुत्तश्च तथा बलवान्पृथिवीपतिः १६ कपोतरोमा तृणकः सहदेवार्जुनौ तथा । व्यश्वः साश्वः कृशाश्वश्च शशबिन्दुश्च पार्थिवः १७ रामो दाशरथिश्चैव लक्ष्मणोथ प्रतर्दनः । अलर्कः कक्षसेनश्च गयो गौराश्व एव च १८ जामदग्न्योथ रामश्च नाभागसगरौ तथा । भूरिद्युम्नो महा-श्वश्च पृथाश्वो जनकस्तथा १९ राजा वैन्यो वारिषेणः पुरुजिज्जनमेजयः । ब्रह्मदत्तस्त्रिगर्तश्च राजोपरिचरस्तथा २० इन्द्रद्युम्नो भीमजानुर्गौरपृष्ठो-नघो लयः । पद्मोथ मुचुकुन्दश्च भूरिद्युम्नः प्रसेनजित् २१ अरिष्टनेमिः सुद्युम्नः पृथुलाश्वोष्टकस्तथा । शतं मत्स्या नृपतयः शतं नीपाः शतं हयाः २२ धृतराष्ट्राश्चैकशतमशीतिर्जनमेजयाः । शतं च ब्रह्मदत्तानामीरिणां च शतं तथा २३ भीष्माणां द्वे शते साग्रे भीमानां तु तथा शतम् । शतं च प्रतिविन्ध्यानां शतं नागाः शतं हयाः २४ पलाशानां शतं ज्ञेयं शतं काशकुशादयः । शान्तनुश्चैव राजेन्द्र पाण्डुश्चैव पिता तव २५ उशंगवः शतरथो देवराजो जयद्रथः । वृषदर्भश्च राजर्षिर्बुद्धिमान्सह

वृषसेन, पुरुकुत्स, ध्वजी, रथी १३, आर्ष्टिषेण, दिलीप, महात्मा उशीनर, औशीनरि, पुंडरीक, शर्याति, शरभ, शुचि १४, अंग, अरिष्ट, वेन, दुष्यंत, सृंजय, जय, भांगासुरि, सुनीथ, निषध, वहीनर १५, करंधम, बाल्हिक, सुद्युम्न, बलाढ्य मधु, ऐल, पृथ्वीपति बलाढ्य मरुत्त १६, कपोतरोमा, तृणक, सहदेव व अर्जुन, व्यश्व, साश्व, कृशाश्व, राजा शशबिंदु १७, दाशरथि राम, लक्ष्मण, प्रतर्दन, अलर्क, कक्षसेन, गय, गौराश्व १८, जमदग्निपुत्र परशुराम, नाभाग व सगर, भूरिद्युम्न, महाश्व, पृथाश्व, जनक १९, राजा वैन्य, वारिषेण, पुरुजित्, जनमेजय, ब्रह्मदत्त, त्रिगर्त, राजा उपरिचर २०, इंद्रद्युम्न, भीमजानु, गौरपृष्ठ, अनघ, लय, पद्म, मुचुकुंद, भूरिद्युम्न, प्रसेनजित् २१, अरिष्टनेमि, सुद्युम्न, पृथुलाश्व, अष्टक, मत्स्य, नीप व हय हे शंभर शंभर राजे २२, एकशें एक धृतराष्ट्र, ऐंशीं जनमेजय, शंभर ब्रह्मदत्त, शंभर वीरि, शंभर ईरि २३, दोनशें भीष्म, शंभर भीमसेन, शंभर प्रतिविंध्य, शंभर गज, शंभर अश्व २४. हे राजश्रेष्ठा, पलाश, काश, कुश इत्यादि यज्ञिय द्रव्यांसंबंधीं शंभर शंभर अभिमानी देवता, शांतनु, तुझा पिता पांडु २५, उशंगव, शतरथ, देवराज, जयद्रथ,

मन्त्रिभिः २६ अथापरे सहस्राणि ये गताः शशबिन्दवः । इष्ट्वाश्वमेधै-र्बहुभिर्महद्भिर्भूरिदक्षिणैः २७ एते राजर्षयः पुण्याः कीर्तिमन्तो बहुश्रुताः। तस्यां सभायां राजेन्द्र वैवस्वतमुपासते २८ अगस्त्योथ मतङ्गश्च कालो मृत्युस्तथैव च । यज्वानश्चैव सिद्धाश्च ये च योगशरीरिणः २९ अग्नि-ष्वात्ताश्च पितरः फेनपाश्चोष्मपाश्च ये । स्वधावन्तो बर्हिषदो मूर्तिमन्त-स्तथा परे ३० कालचक्रं च साक्षाच्च भगवान्हव्यवाहनः । नरा दुष्कृत कर्माणो दक्षिणायनमृत्यवः ३१ कालस्य नयने युक्ता यमस्य पुरुषाश्च ये । तस्यां शिंशपपालाशास्तथा काशकुशादयः ॥ उपासते धर्मराजं मूर्तिमन्तो जनाधिप ३२ एते चान्ये च बहवः पितृराजसभासदः । न शक्याः परिसंख्यातुं नामभिः कर्मभिस्तथा ३३ असंबाधा हि सा पार्थ रम्या कामगमा सभा । दीर्घकालं तपस्तप्त्वा निर्मिता विश्वकर्मणा ३४ ज्वलन्ती भासमाना च तेजसा स्वेन भारत । तामुग्रतपसो यान्ति सुव्रताः सत्यवादिनः ३५ शान्ताः संन्यासिनः शुद्धाः पूताः पुण्येन कर्मणा ।

मंत्र्यांसहवर्तमान बुद्धिमान् वृषदर्भ राजर्षि २६ आणि विपुल दक्षिणांनीं युक्त असे पुष्कळ मोठमोठे अश्वमेध क्रतु करून पूर्वी होऊन गेलेले दुसरे हजारों शशबिंदु २७ असे हे पुण्यवान्, कीर्तिमान् व बहुश्रुत राजर्षि, हे नृपश्रेष्ठा युधिष्ठिरा, त्या सभेमध्ये सूर्यपुत्र यमधर्माचे सांनिध बसलेले असतात २८. त्याचप्रमाणें अगस्त्य, मतंग, काल, मृत्यु, विधिपूर्वक यज्ञयाग केलेले पुरुष, योगसामर्थ्यानें यथेष्ट रूप धारण करणारे सिद्ध २९, अग्निष्वात्त, फेनप, ऊष्मप, सुधावान् , बर्हिषद व इतरही मूर्तिमंत पितर ३०, साक्षात् कालचक्र (ह्मणजे संवत्सरादिकांच्या अभिमानिनी देवता). भगवान अग्नि, दक्षिणायनामध्यें मृत्यु पावणारे दुष्कर्म केलेले पुरुष ३१, मृत्यूकडे लोक नेण्याकडे नेमिलेले यमधर्माचे सेवक आणि शिंशप, पालाश, काश, कुश इत्यादि (यज्ञिय द्रव्यांच्या अभिमानिनी देवता) हे जनाधिपते युधिष्ठिरा, धर्मराजाचे सांनिध त्या सभेमध्यें मूर्तिमंत असतात ३२. इतकेंच नव्हे परंतु, हे व इतरही पुष्कळ पितृराज यमधर्माचे सभासद आहेत; त्यांचें परिगणन नामांनीं आणि त्याचप्रमाणें कर्मांनीं होणें शक्य नाहीं ३३. हे कुंतीपुत्रा, जिच्यांतील सर्व गोष्टी अगदीं व्यवस्थेशीर आहेत ती सभासदांच्या इच्छेप्रमाणें हवे त्या ठिकाणीं गमन करणारी रमणीय सभा दीर्घकाल तपश्चर्या केल्यानंतर विश्वकर्म्यानें निर्माण केली आहे ३४ व हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, स्वतःच्या तेजानें ती उज्ज्वल असून प्रकाशणारी आहे.

---

१ जेथें प्रत्यक्ष असण्याचा असंभव आहे तेथें तदभिमानिनी देवता असें समजावें.

सर्वे भास्वरदेहाश्च सर्वे च विरजोम्बराः ३६ चित्राङ्गदाश्चित्रमाल्याः सर्वे ज्वलितकुण्डलाः । सुकृतैः कर्मभिः पुण्यैः पारिबर्हैश्च भूषिताः ३७ गन्धर्वाश्च महात्मानः संघशश्चाप्सरोगणाः । वादित्रं नृत्यगीतं च हास्यं लास्यं च सर्वशः ३८ पुण्याश्च गन्धाः शब्दाश्च तस्यां पार्थ समन्ततः । दिव्यानि चैव माल्यानि उपतिष्ठन्ति नित्यशः ३९ शतं शतसहस्राणि धर्मिणां तं प्रजेश्वरम् । उपासते महात्मानं रूपयुक्ता मनस्विनः ४० ईदृशी सा सभा राजन्पितृराज्ञो महात्मनः । वरुणस्यापि वक्ष्यामि सभां पुष्करमालिनीम् ४१ [३६०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां० सभापर्वणि लोकपालसभाख्यानपर्वणि यमसभावर्णनं नामाष्टमोऽध्यायः ॥८॥

नारद उवाच ॥ युधिष्ठिर सभा दिव्या वरुणस्यामितप्रभा । प्रमाणेन यथा याम्या शुभप्राकारतोरणा १ अन्तःसलिलमास्थाय विहिता विश्वकर्मणा । दिव्यै रत्नमयैर्वृक्षैः फलपुष्पप्रदैर्युता २ नीलपीतासितश्यामैः सितै-

---

उग्र तप केलेले, सदाचरणी, सत्यवादी ३५, शांत, शुद्ध व पुण्यकर्मांनीं पवित्र झालेले संन्यासी त्या सभेमध्यें गमन करीत असतात. त्या सभेंतील सर्व लोक तेजस्वी देहानें युक्त असून सर्वांनीं निर्मळ वस्त्रें परिधान केलेलीं असतात ३६ आणि उज्ज्वल कुंडलें आणि चमत्कारिक बाहुभूषणें व पुष्पें त्यांनीं धारण केलेलीं असून उत्तमप्रकारें आचरिलेलीं पुण्यदायक कर्में व राजचिन्हें ह्यांच्या योगानें ते सर्व भूषित झालेले असतात ३७. महात्म्या गंधर्वांचे समुदाय आणि अप्सरांचे गण वाद्य, नृत्य, गीत, हास्य व लास्यनामक नृत्य ह्यांच्या योगानें सर्वप्रकारें यमधर्माची सेवा त्या ठिकाणीं करीत असून ३८, हे कुंतीपुत्रा युधिष्ठिरा, पवित्र सुगंध, ध्वनि आणि दिव्य पुष्पें ह्यांची त्या सभेमध्यें सर्व ठिकाणीं नेहमीं अगदीं समृद्धि असते ३९. तात्पर्य, रूपवान् आणि विवेकी असे शेंकडों लाखों धर्मिष्ठ लोक त्या सभेमध्यें महात्म्या प्रजाधिपति यमधर्माचें सांनिध्य बसलेले असतात ४०. असो. हे राजा, महात्म्या पितृराज यमधर्माची ती सभा अशा प्रकारची आहे. आतां पुष्करसंज्ञक मूर्तिमंत तीर्थांनीं शोभा पावणारी वरुणाचीही सभा मी तुला कथन करितों ४१. ह्याप्रमाणें सभापर्वांतील लोकपालसभाख्यानपर्वांपैकीं यमधर्मसभावर्णननामक आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥

नारद सांगतातः—हे युधिष्ठिरा, अपरिमित प्रभेनें युक्त असलेली वरुणाची दिव्य सभा शुभावह प्राकारांनीं व तोरणांनीं संपन्न असून लांबीरुंदीच्या मानानें यमधर्माच्या सभेसारखी आहे १. उदकाचा आश्रय करून त्यामध्यें ती विश्वकर्म्यानें निर्माण केलेली आहे आणि फळें व पुष्पें देणाऱ्या दिव्य व रत्नमय वृक्षांनीं ती युक्त आहे २.

लोहितकैरपि । अवतानैस्तथा गुल्मैर्मञ्जरीजालधारिभिः ३ तथा शकुनयस्तस्यां विचित्रा मधुरस्वराः । अनिर्देश्या वपुष्मन्तः शतशोथ सहस्रशः ४ सा सभा सुखसंस्पर्शा न शीता न च घर्मदा । वेश्मासनवती रम्या सिता वरुणपालिता ५ यस्यामास्ते स वरुणो वारुण्या च समन्वितः । दिव्यरत्नाम्बरधरो दिव्याभरणभूषितः ६ स्रग्विणो दिव्यगन्धाश्च दिव्यगन्धानुलेपनाः । आदित्यास्तत्र वरुणं जलेश्वरमुपासते ७ वासुकिस्तक्षकश्चैव नागश्चैरावणस्तथा । कृष्णश्च लोहितश्चैव पद्मश्चित्रश्च वीर्यवान् ८ कम्बलाश्वतरौ नागौ धृतराष्ट्रबलाहकौ । मणिमान्कुण्डकश्चैव कर्कोटकधनञ्जयौ ९ पाणिमान्कुण्डधारश्च बलवान्पृथिवीपते । प्रह्लादो मूषिकादश्च तथैव जनमेजयः १० पताकिनो मण्डलिनः फणवन्तश्च सर्वशः ११ एते चान्ये च बहवः सर्पास्तस्यां युधिष्ठिर । उपासते महात्मानं वरुणं विगतक्लमाः १२ बलिर्वैरोचनो राजा नरकः पृथिवींजयः । संह्रादो विप्रचित्तिश्च कालखञ्जाश्च दानवाः १३ सुहनुर्दुर्मुखः शङ्खः सुमनाः सुमतिस्ततः । घटोदरो महापार्श्वः क्रथनः पिठरस्तथा १४ विश्वरूपः स्वरूपश्च विरूपोथ महाशिराः । दशग्रीवश्च वाली च मेघ-

---

मंजिऱ्यांचे गुच्छ धारण करणाऱ्या (कृत्रिम) झुडपांनीं व त्याचप्रमाणें नील, पीत, श्याम, शुक्ल व रक्तवर्ण (कृत्रिम) लतावेलींनीं त्या सभेंतील प्रदेश बांधिलेले आहेत ३. तसेच उत्कृष्ट देह व मधुर शब्द ह्यांनीं युक्त आणि ह्मणूनच अवर्णनीय असे चमत्कारिक पक्षी त्या सभेमध्यें शेंकडों हजारों असून ४ स्पर्श झाला असतां आनंद देणारी व अति शैत्य आणि अति ऊष्मा न करणारी ती वरुणरक्षित सभा गृहें व आसनें ह्यांनीं युक्त आहे ५. त्या सभेमध्यें दिव्य रत्नें व वस्त्रें धारण करून दिव्य अलंकारांनीं भूषित असलेला वरुण आपल्या पत्नीसहवर्तमान बसलेला असतो ६. त्या ठिकाणीं माला, दिव्य गंध व दिव्य गंधानें युक्त असलेले अंगोद्वर्तन सेवन करून द्वादशादित्य जलाधिपति वरुणाचे संनिध बसलेले असतात ७. वासुकि, तक्षक, ऐरावत, नाग, कृष्ण, लोहित, वीर्यवान् पद्मचित्र ८, कंबल व अश्वतर, धृतराष्ट्र व बलाहक, मणिमान्, कुंडक, कर्कोटक व धनंजय ९, पाणिमान्, हे पृथ्वीपते युधिष्ठिरा, बलाढ्य कुंडधार, प्रऱ्हाद, मूषिकाद व जनमेजय आणि पताकी, मंडली व फणावान् ह्या तिन्ही जातींचे सर्प व इतरही अनेक सर्प ग्लानिरहित असून सर्व बाजूंनीं हे युधिष्ठिरा, महात्म्या वरुणाचे संनिध त्या सभेमध्यें बसलेले असतात १०, ११, १२. विरोचनपुत्र बलि राजा, पृथ्वी जिंकणारा नरकासुर, संऱ्हाद, विप्रचित्ति, कालखंज नामक असुर १३ सुहनु,

आसा दशावरः १५ टिट्टिभो विटभूतश्च संह्रादश्चेन्द्रतापनः । दैत्यदानवसंघाश्च सर्वे रुचिरकुण्डलाः १६ स्रग्विणो मौलिनश्चैव तथा दिव्यपरिच्छदाः । सर्वे लब्धवराः शूराः सर्वे विगतमृत्यवः १७ ते तस्यां वरुणं देवं धर्मपाशधरं सदा । उपासते महात्मानं सर्वे सुचरितव्रताः १८ तथा समुद्राश्चत्वारो नदी भागीरथी च सा । कालिन्दी विदिशा वेणा नर्मदा वेगवाहिनी १९ विपाशा च शतद्रुश्च चन्द्रभागा सरस्वती । इरावती वितस्ता च सिन्धुर्देवनदी तथा २० गोदावरी कृष्णवेणा कावेरी च सरिद्वरा । किंपुना च विशल्या च तथा वैतरणी नदी २१ तृतीया ज्येष्ठिला चैव शोणश्चापि महानदः । चर्मण्वती तथा चैव पर्णाशा च महानदी २२ सरयूर्वारवत्या च लाङ्गली च सरिद्वरा । करतोया तथात्रेयी लौहित्यश्च महानदः २३ लङ्घती गोमती चैव सन्ध्या त्रिःस्रोतसी तथा । एताश्चान्याश्च राजेन्द्र सुतीर्था लोकविश्रुताः २४ सरितः सर्वतश्चान्यास्तीर्थानि च सरांसि च । कूपाश्च सप्रस्रवणा देहवन्तो युधिष्ठिर २५ पल्वलानि तडागानि देहवन्त्यथ भारत । दिशस्तथा मही चैव तथा सर्वे महीधराः २६ उपासते महात्मानं सर्वे जलचरास्तथा ।

...मुख, शंख, सुमना, सुमति, घटोदर, महापार्श्व, क्रथन, पिठर १४, विश्वरूप, स्वरूप, विरूप, महाशिर, दशग्रीव, वाली, मेघवास, दशावर १५, टिट्टिभ, विटभूत, संह्राद व इंद्रतापन असे असुर त्या ठिकाणीं होते. सारांश, मनोहर कुंडलें, माला, मुकुट व दिव्य सामान ह्यांनीं युक्त असलेले सर्व दैत्यदानवांचे समुदाय धर्मपाश धारण करणाऱ्या महात्म्या वरुणदेवाचे संनिध त्या सभेमध्यें बसलेले असतात आणि ते सर्वही उत्तम प्रकारें स्वकर्म केलेले असून वर प्राप्त झाल्यामुळें मृत्युरहित झालेले आहेत १६,१७,१८. त्याचप्रमाणें चार समुद्र, प्रसिद्ध भागीरथी नदी, कालिंदी, विदिशा, वेणा, वेगवाहिनी नर्मदा १९, विपाशा, शतद्रु, चंद्रभागा, सरस्वती, इरावती, वितस्ता, सिंधु, देवनदी २०, गोदावरी, कृष्णवेणा, श्रेष्ठ नदी कावेरी, किंपुना, विशल्या, वैतरणी नदी २१, तृतीया ज्येष्ठिला, महानद शोण, चर्मण्वती, महानदी पर्णाशा २२, सरयू, वारवत्या, श्रेष्ठ नदी लांगली, करतोया, आत्रेया, महानद लौहित्य २३, लंघती, गोमती, संध्या व त्रिस्रोतसी ह्या व इतरही पवित्र उदकानें युक्त असलेल्या जगत्प्रसिद्ध नद्या, इतरही साधारण नद्या आणि तीर्थें, सरोवरें, कूप, झरे, तळीं, तडाग, दिशा, पृथ्वी आणि पर्वत हे सर्व, हे भरतकुलोत्पन्ना नृपश्रेष्ठा युधिष्ठिरा, त्या ठिकाणीं मूर्तिमंत आहेत २४,२५,२६. त्याचप्रमाणें सर्व जलचर प्राणी महात्म्या वरुणाचे संनिध तेथें असून गायन व वादन ह्यांसहवर्तमान

गीतवादित्रवन्तश्च गन्धर्वाप्सरसां गणाः २७ स्तुवन्तो वरुणं तस्यां सर्व एव समासते । महीधरा रत्नवन्तो रसा ये च प्रतिष्ठिताः २८ कथयन्तं सुमधुराः कथास्तत्र समासते। वारुणश्च तथा मन्त्री सुनाभः पर्युपासते२९ पुत्रपौत्रैः परिवृतो गोनाम्ना पुष्करेण च । सर्वे विग्रहवन्तस्ते तमीश्वर-मुपासते ३० एषा मया संपतता वारुणी भरतर्षभ । दृष्टपूर्वा सभा रम्या कुबेरस्य सभां शृणु ३१ [३९१]इति श्रीमहाभारते०वैयासिक्यां सभापर्वणि लोकपालसभाख्यानपर्वणि वरुणसभावर्णनं नाम नवमोऽध्यायः॥९॥

नारद उवाच ॥ सभा वैश्रवणी राजञ्छतयोजनमायता । विस्तीर्णा सप्ततिश्चैव योजनानि सितप्रभा १ तपसा निर्जिता राजन्स्वयं वैश्रवणेन सा । शशिप्रभाप्रावरणा कैलासशिखरोपमा २ गुह्यकैरुह्यमाना सा खे विषक्तेव शोभते । दिव्या हेममयैरुच्चैः प्रासादैरुपशोभिता ३ महारत्नवती चित्रा दिव्यगन्धा मनोरमा । सिताभ्रशिखराकारा प्लवमानेव दृश्यते ॥ दिव्यैर्हेममयै रङ्गैर्विद्युद्भिरिव चित्रिता ४ तस्यां वैश्रवणो राजा विचित्रा-

---

गंधर्व आणि अप्सरा ह्यांचे समुदाय २७ वरुणाची स्तुति करीत त्या सभेमध्यें बसलेले असतात. तसेच रत्नांनीं युक्त असलेले पर्वत व प्रसिद्ध रस २८ त्या ठिकाणीं अतिशय मधुर कथा कथन करीत बसलेले असून पुत्रपौत्रांनीं व गोसंज्ञक पुष्करजातीय नागानें परिवेष्टित असलेला वरुणमंत्री सुनाभही त्या सभेमध्यें वरुणाचें सांनिध्य असतो व ते सर्व मूर्तिमंत असून त्या ईश्वर वरुणाची उपासना करीत असतात२९,३०. असो. हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, वरुणाची ही रम्य सभा पूर्वी मीं जातां जातां अवलोकन केली होती. आतां तूं कुबेराची सभा श्रवण कर३१. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील लोकपालसभाख्यानपर्वांपैकीं वरुणसभावर्णनाविषयीं नववा अध्याय समाप्त झाला ॥ ९ ॥

नारद सांगतातः—हे राजा, कुबेरसभा शंभर योजनें लांब व सत्तर योजनें रुंद असून शुभ्र कांतीनें युक्त आहे१. हे राजा, कैलासपर्वताच्या शिखराप्रमाणें शुभ्र असल्यामुळें चंद्राच्या कांतीनें परिवेष्टित दिसत असलेली ती सभा स्वतः कुबेरानें तपश्चर्या करून मिळविलेली आहे२. सुवर्णमय उन्नत प्रासादांनीं सुशोभित झालेली ती दिव्य सभा गुह्यक वाहून नेऊं लागले असतां आकाशाला लगटून राहिल्यासारखी दिसत असते ३. तशीच मोठमोठीं रत्नें व दिव्य गंध ह्यांनीं युक्त असलेली ती आश्चर्यजनक मनोहर दिव्य सभा आकारानें शुभ्रवर्ण मेघाच्या शिखरासारखी असल्यामुळें,आकाशांत तरंगत असल्यासारखी भासत असून सोनेरी रंगांनीं रंगविलेली असल्यामुळें विद्युल्लतांनीं चित्रित केल्यासारखी दिसत असते४. त्या सभेमध्यें सूर्यासमान तेजस्वी व उत्कृष्ट पादोपधान (ह्मणजे पाय

भरणाम्बरः । स्त्रीसहस्रैर्वृतः श्रीमानास्ते ज्वलितकुण्डलः ५ दिवाकर-
निभे पुण्ये दिव्यास्तरणसंवृते । दिव्यपादोपधाने च निषण्णः परमासने६
मन्दाराणामुदाराणां वनानि परिलोडयन् । सौगन्धिकवनानां च गन्धं
गन्धवहो वहन् ७ नलिन्याश्चालकाख्याया नन्दनस्य वनस्य च । शीतो
हृदयसंह्लादी वायुस्तमुपसेवते ८ तत्र देवाः सगन्धर्वा गणैरप्सरसां वृताः ।
दिव्यतानैर्महाराज गायन्ति स्म सभागताः ९ मिश्रकेशी च रम्भा च
चित्रसेना शुचिस्मिता । चारुनेत्रा घृताची च मेनका पुञ्जिकस्थला १०
विश्वाची सहजन्या च प्रम्लोचा उर्वशी इरा ११ वर्गा च सौरभेयी च
समीची बुद्बुदा लता । एताः सहस्रशश्चान्या नृत्यगीतविशारदाः १२ उप-
तिष्ठन्ति धनदं गन्धर्वाप्सरसां गणाः । अनिशं दिव्यवादित्रैर्नृत्यगीतैश्च
सा सभा १३ अशून्या रुचिरा भाति गन्धर्वाप्सरसां गणैः । किंनरा
नाम गन्धर्वा नरा नाम तथा परे १४ मणिभद्रोथ धनदः श्वेतभद्रश्च
गुह्यकः । कशेरको गण्डकण्डूः प्रद्योतश्च महाबलः १५ कुस्तुम्बुरुः पिशा-
चश्च गजकर्णो विशालकः । वराहकर्णस्ताम्रोष्ठः फलकक्षः फलोदकः १६

सोडण्याकरितां केलेली चौकी) ह्यानें युक्त असून दिव्य आस्तरणानें आच्छादित असलेल्या सर्वोत्कृष्ट पवित्र सिंहासनावर हजारों स्त्रियांनीं परिवेष्टित असलेला वैभवशाली राजा कुबेर उज्ज्वल कुंडलें व विचित्र अलंकार धारण करून बसलेला असतो ५, ६. उत्कृष्ट मंदारवृक्षांचीं वनें हालवून सोडून सुगंधयुक्त वृक्षसमुदाय, अलकानामक कमलयुक्त सरोवर आणि नंदन वन ह्यांतील सुगंध वाहून नेत असलेला शीत व हृदयाल्हादक गंधवाहक वायु त्या कुबेराची सेवा करीत असतो ७, ८. अप्सरांच्या गणांनीं परिवेष्टित असे त्या सभेमध्यें असलेले देव, हे महाराजा, गंधर्वांसहवर्तमान उत्कृष्ट ताना घेऊन गायन करीत असतात ९. मिश्रकेशी, रंभा, उत्तम प्रकारचें हास्य करीत असलेली चित्रसेना, सुंदर नेत्रांनीं युक्त असलेली घृताची, मेनका, पुंजिकस्थला १०, विश्वाची, सहजन्या, प्रम्लोचा, उर्वशी, इरा ११, वर्गा, सौरभेयी, समीची, बुद्बुदा, लता ह्या व इतरही नृत्यगायनांमध्यें प्रवीण असलेल्या हजारों अप्सरा त्या ठिकाणीं असतात १२. सारांश, गंधर्व आणि अप्सरा ह्यांचे समुदाय, दिव्य वाद्यें, नृत्य व गायन ह्यांच्या योगानें सर्वदा कुबेराची सेवा करीत असतात आणि ती सभा १३ गंधर्व व अप्सरा ह्यांच्या समुदायांनीं भरलेली असल्यामुळें मनोहर दिसत असते. किंनरनामक व दुसरे नरसंज्ञक गंधर्व तेथें असून १४ मणिभद्र, धनद, श्वेतभद्र, गुह्यक, कशेरक, गंडकंडू, महाबलाढ्य प्रद्योत १५, कुस्तुंबुरु, पिशाच,

हेमचूडः शिखावर्तो हेमनेत्रो बिभीषणः । पुष्पाननः पिङ्गलकः शोणितोदः प्रवालकः १७ वृक्षबाष्पनिकेतश्च चीरवासाश्च भारत । एते चान्ये च बहवो यक्षाः शतसहस्रशः १८ सदा भगवती लक्ष्मीस्तत्रैव नलकूबरः। अहं च बहुशस्तस्यां भवन्त्यन्ये च मद्विधाः १९ ब्रह्मर्षयो भवन्त्यत्र तथा देवर्षयोपरे। क्रव्यादाश्च तथैवान्ये गन्धर्वाश्च महाबलाः २० उपासते महात्मानं तस्यां धनदमीश्वरम्। भगवान्भूतसंघैश्च वृतः शतसहस्रशः २१ उमापतिः पशुपतिः शूलभृद्भगनेत्रहा । त्र्यम्बको राजशार्दूल देवी च विगतक्लमा २२ वामनैर्विकटैः कुब्जैः क्षतजाक्षैर्महारवैः। मेदोमांसाशनैरुग्रैरुग्रधन्वा महाबलः २३ नानाप्रहरणैरुग्रैर्वातैरिव महाजवैः । वृतः सखायमन्वास्ते सदैव धनदं नृप २४ प्रहृष्टाः शतशश्चान्ये बहुशः सपरिच्छदाः । गन्धर्वाणां च पतयो विश्वावसुर्हाहा हूहूः २५ तुम्बुरुः पर्वतश्चैव शैलूषश्च तथापरः । चित्रसेनश्च गीतज्ञस्तथा चित्ररथोपि च २६ एते चान्ये च गन्धर्वा धनेश्वरमुपासते । विद्याधराधिपश्चैव चक्रधर्मा सहानुजैः २७ उपाचरति तत्र स्म धनानामीश्वरं प्रभुम् । किंनराः शतशस्तत्र धना-

---

गजकर्ण, विशालक , वराहकर्ण, ताम्रोष्ठ, फलकक्ष, फलोदक १६, हंसचूड, शिखावर्त, हेमनेत्र, बिभीषण, पुष्पानन, पिंगलक, शोणितोद, प्रवालक १७, वृक्षबाष्पनिकेत आणि, हे भरतकुलोत्पन्ना, चीरवास हे व इतरही पुष्कळ ह्मणजे शेंकडों हजारों यक्ष तेथें असतात १८. भगवती लक्ष्मी सर्वदा तेथेंच असून कुबेरपुत्र नलकूबरही तेथेंच असतो आणि बहुशः मी सुद्धां त्या सभेंतच असून माझ्यासारखे इतरही तेथेंच असतात १९. सारांश, ब्रह्मर्षि, देवर्षि, मांसभक्षक असुर व महाबलाढ्य गंधर्व हे सर्व २० त्या सभेमध्यें महात्म्या प्रभु कुबेराचे संनिध बसलेले असतात. हे नृपश्रेष्ठा युधिष्ठिर राजा, मेदोमांसभक्षक, उग्र, भयंकर, अनेक प्रकारचीं प्रहरणें (ह्मणजे प्रहार करण्यास उपयोगीं पडणारीं शस्त्रें) , आरक्तवर्ण नेत्र व प्रचंड ध्वनि ह्यांनीं युक्त आणि वायूप्रमाणें महावेगवान् असलेल्या शेंकडों हजारों ऱ्हस्व, उन्नत व कुब्ज भूतगणांनीं परिवेष्टित असलेला असा जो शूल व प्रचंड धनुष्य धारण करून भगदेवतेचे नेत्र हरण करणारा जीवाधिपति उमाकांत भगवान् त्र्यंबक तो सर्वदा आपल्या ग्लानिरहित पत्नीसहवर्तमान सख्या कुबेरा समीप बसलेला असतो २१,२२,२३,२४. त्याचप्रमाणें इतरही पुष्कळ ह्मणजे शेंकडों गंधर्वाधिपति आनंदित होऊन बाडबिछाइतीसहवर्तमान तेथें असतात. तसेच विश्वावसु, हाहा, हूहू २५, तुंबुरु, पर्वत, शैलूष, गीतज्ञ चित्रसेन व चित्ररथ २६ हे व इतरही गंधर्व धनाध्यक्ष कुबेराची उपासना करीत असतात. त्याचप्रमाणें चक्रधर्मसंज्ञक विद्याधराधिपति

नामीश्वरं प्रभुम् २८ आसते चापि राजानो भगदत्तपुरोगमाः । द्रुमः किंपुरुषेशश्च उपास्ते धनदेश्वरम् २९ राक्षसाधिपतिश्चैव महेन्द्रो गन्धमादनः । सह यक्षैः सगन्धर्वैः सह सर्वैर्निशाचरैः ३० बिभीषणश्च धर्मिष्ठ उपास्ते भ्रातरं प्रभुम् । हिमवान्पारियात्रश्च विन्ध्यकैलासमन्दराः ३१ मलयो दर्दुरश्चैव महेन्द्रो गन्धमादनः । इन्द्रकीलः सुनाभश्च तथा दिव्यौ च पर्वतौ ३२ एते चान्ये च बहवः सर्वे मेरुपुरोगमाः । उपासते महात्मानं धनानामीश्वरं प्रभुम् ३३ नन्दीश्वरश्च भगवान्महाकालस्तथैव च । शङ्कुकर्णमुखाः सर्वे दिव्याः पारिषदास्तथा ३४ काष्ठः कुटीमुखो दन्ती विजयश्च तपोधिकः । श्वेतश्च वृषभस्तत्र नर्दन्नास्ते महाबलः ३५ धनदं राक्षसाश्चान्ये पिशाचाश्च उपासते । पारिषदैः परिवृतमुपायान्तं महेश्वरम् ३६ सदा हि देवदेवेशं शिवं त्रैलोक्यभावनम् । प्रणम्य मूर्ध्ना पौलस्त्यो बहुरूपमुमापतिम् ३७ ततोऽभ्यनुज्ञां संप्राप्य महादेवाद्धनेश्वरः । आस्ते कदाचिद्भगवान्भवो धनपतेः सखा ३८ निधिप्रवरमुख्यौ च शङ्खपद्मौ धनेश्वरौ । सर्वान्निधीन्प्रगृह्याथ उपास्तां वै धनेश्वरम् ३९

आपल्या कनिष्ठ भ्रात्यांसहवर्तमान २७ त्या ठिकाणीं धनाधिपति प्रभु कुबेराची उपासना करीत असतो. तसेच शेंकडों किंनर धनाध्यक्ष प्रभु कुबेराची सेवा करीत असून २८ भगदत्तप्रभृति राजेही त्या ठिकाणीं बसलेले असतात. त्याचप्रमाणें किंनराधिपति द्रुम आणि राक्षसाधिपति महेंद्र व गंधमादन कुबेराची उपासना करीत असून यक्ष, गंधर्व आणि इतरही निशाचर ह्यांसहवर्तमान २९, ३० धर्मनिष्ठ बिभीषणही आपल्या प्रभु भ्रात्याची सेवा करीत असतो. हिमवान्, पारियात्र, विंध्य, कैलास, मंदर ३१, मलय, दर्दुर, महेंद्र, गंधमादन आणि दिव्य पर्वत इंद्रकील व सुनाभ ३२ हे व इतरही अनेक मेरुप्रभृति सर्व पर्वत महात्म्या प्रभु कुबेराची उपासना करीत असतात ३३. भगवान् नंदीश्वर, महाकाल व शंकुकर्णप्रभृति सर्व दिव्य सभासद त्या ठिकाणीं असून ३४ काष्ठ, कुटीमुख, दंती व अत्यंत तपस्वी विजय हे त्या ठिकाणीं असतात व श्वेतवर्ण महाबलाढ्य वृषभही तेथें डुरकया फोडीत पडलेला असतो ३५. त्याचप्रमाणें सभासदांनीं परिवेष्टित असलेल्या महेश्वरासमीप जाणाऱ्या कुबेराची इतरही राक्षस व पिशाच उपासना करीत असतात ३६. तसाच महादेवाची अनुज्ञा घेऊन धनाध्यक्ष कुबेरही त्या देवदेवाधिपति, त्रैलोक्यपालक व बहुत रूपें धारण करणाऱ्या उमाकांत शंकराला मस्तकानें प्रणाम करून त्या सभेमध्यें त्याचे संनिध बसलेला असतो व कुबेरमित्र भगवान् रुद्रही कधीं कधीं त्या कुबेरासमीप असतात ३७, ३८. त्याचप्रमाणें मुख्य मुख्य निधींमध्यें श्रेष्ठ असलेले शंख व पद्म हे दोन निधि (महापद्म, मकर, कच्छप, मुकुंद, कुंद, नील, खर्व इत्यादि) सर्व निधींना घेऊन कुबेराची सेवा करीत असतात ३९.

सा सभा तादृशी रम्या मया दृष्टान्तरिक्षगा। पितामहसभां राजन्कीर्तयिष्ये निबोध ताम् ४० [४३१] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां० सभापर्वणि लोकपालसभाख्यानपर्वणि वैश्रवणसभावर्णनं नाम दशमोऽध्यायः ॥१०॥

नारद उवाच ॥ पितामहसभां तात कथ्यमानां निबोध मे । शक्यते या न निर्देष्टुमेवंरूपेति भारत १ पुरा देवयुगे राजन्नादित्यो भगवान्दिवः। आगच्छन्मानुषं लोकं दिदृक्षुर्विगतक्लमः २ चरन्मानुषरूपेण सभां दृष्ट्वा स्वयंभुवः। स तामकथयन्मह्यं दृष्ट्वा तत्त्वेन पाण्डव ३ अप्रमेयां सभां दिव्यां मानसीं भरतर्षभ । अनिर्देश्यां प्रभावेण सर्वभूतमनोरमाम् ४ श्रुत्वा गुणानहं तस्याः सभायाः पाण्डवर्षभ । दर्शनेप्सुस्तथा राजन्नादित्यमिदमब्रुवम् ५ भगवन्द्रष्टुमिच्छामि पितामहसभां शुभाम् । येन वा तपसा शक्या कर्मणा वापि गोपते ६ औषधैर्वा तथा युक्तैरुत्तमा पापनाशिनी । तन्ममाचक्ष्व भगवन्पश्येयं तां सभां यथा ७ स तन्मम वचः श्रुत्वा सहस्रांशुर्दिवाकरः । प्रोवाच भरतश्रेष्ठ व्रतं वर्षसहस्रकम् ८ ब्रह्म-

---

असो. हे राजा, अंतरिक्षामध्यें संचार करणारी तशाप्रकारची सभा मीं अवलोकन केली. आतां तुला ब्रह्मदेवाची सभा मी कथन करितों; ती तूं श्रवण कर ४०. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील लोकपालसभाख्यानपर्वांपैकीं कुबेरसभावर्णनाविषयीं दहावा अध्याय समाप्त झाला ॥ १० ॥

नारद सांगतातः—बा भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, मी ब्रह्मदेवाची सभा कथन करीत आहें ती तूं श्रवण कर. ती सभा अमुकप्रकारची आहे ह्मणून सांगतां येणें शक्य नाहीं १. हे राजा, पूर्वी कृतयुगामध्यें ग्लानिरहित असा भगवान् सूर्य स्वर्गाहून मनुष्यलोक पहाण्याकरितां आला २ व हे पांडुपुत्रा युधिष्ठिरा, मनुष्यरूपानें संचार करणाऱ्या त्या सूर्यानें ब्रह्मदेवाची सभा अवलोकन केली आणि प्रभावानें सर्वभूतांचें चित्तरंजन करणारी, अतर्क्य, अनिर्वचनीय व मनोहर अशी ती दिव्य सभा तत्त्वतः अवलोकन केल्यावर मला त्या सूर्यानें तिची हकीकत सांगितली ३, ४. हे श्रेष्ठ पांडुपुत्रा युधिष्ठिर राजा, त्यासभेचें गुण श्रवण करून ती अवलोकन करण्याच्या इच्छेनें मी सूर्याला ह्मणालों ५ " हे भगवन्, ब्रह्मदेवाची पवित्र सभा अवलोकन करण्याची माझी इच्छा आहे. तर हे गोपते, कोणत्या तपानें, कर्मानें अथवा कोणत्या योग्य औषधांनीं ती उत्कृष्ट व पापनाशक सभा दृष्टीं पडणें शक्य आहे तें आपण मला सांगा ह्मणजे हे भगवन्, मी ती अवलोकन करीन ६,७. हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, माझें तें भाषण श्रवण करून हजारों किरणांनीं युक्त असलेला सूर्य " शुद्ध मनानें सहस्र संवत्सर-

व्रतमुपास्व त्वं प्रयतेनान्तरात्मना । ततोऽहं हिमवत्पृष्ठे समारब्धो महाव्र-
तम् ९ ततः स भगवान्सूर्यो मामुपादाय वीर्यवान् । अगच्छत्तां सभां ब्राह्मीं
विपाप्मा विगतक्लमः १० एवंरूपेति सा शक्या न निर्देष्टुं नराधिप। क्षणेन
हि बिभर्त्यन्यदनिर्देश्यं वपुस्तथा ११ न वेद परिमाणं वा संस्थानं चापि
भारत । न च रूपं मया तादृग्दृष्टपूर्वं कदाचन १२ सुसुखा सा सदा
राजन्न शीता न च घर्मदा। न क्षुत्पिपासे न ग्लानिं प्राप्य तां प्राप्नुवन्त्युत १३
नानारूपैरिव कृता मणिभिः सा सुभास्वरैः । स्तम्भैर्न च धृता सा तु
शाश्वती न च सा क्षरा १४ दिव्यैर्नानाविधैर्भावैर्भासद्भिरमितप्रभैः ।
अति चन्द्रं च सूर्यं च शिखिनं च स्वयंप्रभा १५ दीप्यते नाकपृष्ठस्था भर्त्सयन्तीव
भास्करम् । तस्यां स भगवानास्ते विदधद्देवमायया १६ स्वयमेकोऽनिशं
राजन्सर्वलोकपितामहः । उपतिष्ठन्ति चाप्येनं प्रजानां पतयः प्रभुम् १७
दक्षः प्रचेताः पुलहो मरीचिः कश्यपः प्रभुः । भृगुरत्रिर्वसिष्ठश्च गौतमोऽथ
तथाङ्गिराः १८ पुलस्त्यश्च क्रतुश्चैव प्रह्लादः कर्दमस्तथा । अथर्वाङ्गि-

पर्यंत तूं ब्रह्मव्रत कर" असें मला ह्मणाला; तेव्हां हिमालयावर जाऊन मींही त्या महा-
व्रताला आरंभ केला ८,९. तदनंतर (तें महाव्रत पूर्ण झाल्यावर) पाप व ग्लानि ह्यांनीं
रहित आणि वीर्यवान् असा तो भगवान् सूर्य, मला घेऊन त्या ब्रह्मसभेमध्यें गेला १०.
हे नराधिपते युधिष्ठिरा, प्रतिक्षणीं ती सभा वेगळें वेगळें अनिर्वचनीय रूप धारण करीत
असल्यामुळें अशा प्रकारची आहे ह्मणून तिच्याविषयीं निर्देश करणें शक्य नाहीं ११. हे
भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, तिचें प्रमाण आणि तिचा आकार ह्यांचा मला थांग लागला नसून
तशाप्रकारचें रूपही कधीं माझ्या अवलोकनांत आलेलें नव्हतें १२. हे राजा, ती सभा शैत्य-
कारक अथवा तापदायक नसून सर्वदां अतिशय सुखावह असते आणि तिच्यामध्यें
प्रवेश केला असतां प्राण्यांना क्षुधा, तृषा व ग्लानि हीं प्राप्त होत नाहींत १३. अत्यंत
उज्ज्वल अशा नानाप्रकारच्या रत्नांनीं निर्माण केलेली ती सभा स्तंभांच्या आधारा-
वर नसून क्षयरहित असल्यामुळें नित्य आहे १४. अपरिमित प्रभेनें युक्त अशा
अनेकप्रकारच्या दिव्य व प्रकाशयुक्त वस्तूंच्या योगानें सूर्य, चंद्र व अग्नि ह्यांना मागें
सारीत असलेली ती स्वयंप्रकाश सभा सूर्याचा पराजय करीत आहे अशारीतीनें
स्वर्गामध्यें देदीप्यमान होऊन राहिलेली असते १५,१६. हे राजा, त्या सभेमध्यें
देवमायेच्या योगानें स्वतः एकटा सृष्टि उत्पन्न करणारा भगवान् ब्रह्मदेव सारखा
बसलेला असतो आणि दुसरेही प्रजाधिपति त्या प्रभूची उपासना करीत अस-
तात १७. दक्ष, प्रचेता, पुलह, मरीचि, समर्थ कश्यप, भृगु, अत्रि, वसिष्ठ, गौतम,

रसश्चैव वालखिल्या मरीचिपाः १९ मनोन्तारिक्षं विद्याश्च वायुस्तेजो
जलं मही । शब्दस्पर्शौ तथा रूपं रसो गन्धश्च भारत २० प्रकृतिश्च
विकारश्च यच्चान्यत्कारणं भुवः । अगस्त्यश्च महातेजा मार्कण्डेयश्च वीर्य-
वान् २१ जमदग्निर्भरद्वाजः संवर्तश्च्यवनस्तथा। दुर्वासाश्च महाभाग ऋष्य-
शृङ्गश्च धार्मिकः २२ सनत्कुमारो भगवान्योगाचार्यो महातपाः ।
असितो देवलश्चैव जैगीषव्यश्च तत्त्ववित् २३ ऋषभो जितशत्रुश्च महा-
वीर्यस्तथा मणिः । आयुर्वेदस्तथाष्टाङ्गो देहवांस्तत्र भारत २४ चंद्रमाः
सह नक्षत्रैरादित्यश्च गभस्तिमान् । वायवः क्रतवश्चैव संकल्पः प्राण एव
च २५ मूर्तिमन्तो महात्मानो महाव्रतपरायणाः। एते चान्ये च बहवो
ब्रह्माणं समुपस्थिताः २६ अर्थो धर्मश्च कामश्च हर्षो द्वेषस्तपो दमः।
आयान्ति तस्यां सहिता गन्धर्वाप्सरसां गणाः २७ विंशतिः सप्त चैवान्ये
लोकपालाश्च सर्वशः । शुक्रो बृहस्पतिश्चैव बुधोऽङ्गारक एव च २८ शनैश्च-
रश्च राहुश्च ग्रहाः सर्वे तथैव च। मन्त्रो रथन्तरं चैव हरिमान्वसुमानपि २९
आदित्याः साधिराजानो नामद्वन्द्वैरुदाहृताः। मरुतो विश्वकर्मा च वस-
वश्चैव भारत ३० तथा पितृगणाः सर्वे सर्वाणि च हवींष्यथ । ऋग्वेदः

अंगिरा १८, पुलस्त्य, क्रतु, प्रल्हाद व कर्दम हे प्रजाधिपति होत. त्याचप्रमाणें अथर्वांगिरस मुनि, वालखिल्य, मरीचिप १९, मन, अंतरिक्ष, विद्या, वायु, तेज, जल, पृथ्वी, तसेंच हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध २०, प्रकृति, विकार, इतरही काल वगैरे भूमीसंबंधीं कारण, महातेजस्वी अगस्त्य, वीर्यवान् मार्कंडेय २१, जमदग्नि, भरद्वाज, संवर्त, च्यवन, महाभाग्यवान् दुर्वास, धर्मनिष्ठ ऋष्यशृंग २२, योगाचार्य व महातपस्वी भगवान् सनत्कुमार, असित, देवल, तत्त्ववेत्ता जैगीषव्य २३, जितशत्रु ऋषभ, महावीर्यवान् मणि, हे भरतकुलोत्पन्ना, मूर्तिमान् अष्टांग आयुर्वेद २४, नक्षत्रांसह चंद्रमा, किरणसंपन्न सूर्य, आणि वायु, क्रतु, संकल्प व प्राण २५ हे सर्व महात्मे मूर्तिमंत असून महाव्रतस्थ होते आणि हे व इतरही पुष्कळजण ब्रह्मदेवाची उपासना करीत होते २६. धर्म, अर्थ, काम, हर्ष, द्वेष, तप व दम हे तेथें असून गंधर्व आणि अप्सरा ह्यांचे वीस गणही तेथें जमून येत असतात व (हंस, हाहा, हूहू, विश्वावसु, वररुचि, वृषण व तुंबुरु हे) सात गंधर्व तेथें असून सर्व लोकपालही तेथें असतात. तसेंच शुक्र, बृहस्पति, बुध, मंगळ २७, २८, शनि, राहु वगैरे सर्व ग्रह, मंत्र, रथंतर साम, हरिमान् व वसुमान् इंद्र २९, अग्नीषोम, इंद्राग्नी इत्यादि दोन दोन नांवांनीं निर्दिष्ट असलेले इंद्रासहवर्तमान अदितिपुत्र, हे भरतकुलोत्पन्ना,

सामवेदश्च यजुर्वेदश्च पाण्डव ३१ अथर्ववेदश्च तथा सर्वशास्त्राणि चैव ह। इतिहासोपवेदाश्च वेदाङ्गानि च सर्वशः ३२ ग्रहा यज्ञाश्च सोमश्च देवताश्चापि सर्वशः। सावित्री दुर्गतरणी वाणी सप्तविधा तथा ३३ मेधा धृतिः श्रुतिश्चैव प्रज्ञा बुद्धिर्यशः क्षमा। सामानि स्तुतिशास्त्राणि गाथाश्च विविधास्तथा ३४ भाष्याणि तर्कयुक्तानि देहवन्ति विशांपते। नाटका विविधाः काव्याः कथाख्यायिककारिकाः ३५ तत्र तिष्ठन्ति ते पुण्या ये चान्ये गुरुपूजकाः। क्षणा लवा मुहूर्ताश्च दिवा रात्रिस्तथैव च ३६ अर्धमासाश्च मासाश्च ऋतवः षट् च भारत। संवत्सराः पञ्चयुगमहोरात्रश्चतुर्विधः ३७ कालचक्रं च तद्दिव्यं नित्यमक्षयमव्ययम्। धर्मचक्रं तथा चापि नित्यमास्ते युधिष्ठिर ३८ अदितिर्दितिर्दनुश्चैव सुरसा विनता इरा। कालिका सुरभी देवी सरमा चाथ गौतमी ३९ प्रभा कद्रूश्च वै देव्यौ देवतानां च मातरः। रुद्राणी श्रीश्च लक्ष्मीश्च भद्रा षष्ठी तथापरा ४० पृथिवी गाङ्गता देवी ह्रीः स्वाहा कीर्तिरेव च। सुरा देवी शची चैव तथा पुष्टिररुन्धती ४१ संवृत्तिराशा नियतिः सृष्टिर्देवी रतिस्तथा। एताश्चान्याश्च वै देव्य उपतस्थुः प्रजापतिम् ४२ आदित्या वसवो रुद्रा मरुतश्चा-

---

मरुद्गण, विश्वकर्मा, अष्ट वसु ३०, तसेच सर्व पितृगण, सर्व हवि, हे पाडुपुत्रा, ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद ३१ व अथर्ववेद, तशींच सर्व शास्त्रें, इतिहास, (आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्ववेद आणि अर्थशास्त्र हे) उपवेद, सर्व वेदांगें ३२ ग्रह, यज्ञ, सोम, सर्वदेवता संकटांतून तारणारी सावित्री, तशीच सात प्रकारची वाणी[1] ३३, मेधा, धृति, श्रुति, प्रज्ञा, बुद्धि, यश, क्षमा, सामें, स्तुतिविषयक शास्त्रें, नानाप्रकारच्या गाथा ३४, हे प्रजाधिपते, तर्कयुक्त मूर्तिमंत भाष्यें, कथा व आख्यानें कथन करणारे असे काव्यनाटकांत प्रवीण असलेले अनेक प्रकारचे लोक ३५ व इतरही गुरुपूजक असे पवित्र लोक त्याठिकाणीं असतात. त्याचप्रमाणें हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, क्षण, लव, मुहूर्त, दिवस, रात्रि, पक्ष, मास, सहा ऋतु, संवत्सर, पांच युगें, (दैव, पैत्र, ब्राह्म व मानुष्य असें) चार प्रकारचें अहोरात्र ३६, ३७, दिव्य, नित्य, अक्षय व अव्यय असें द्वादशराश्यात्मक कालचक्र आणि तसेंच धर्मचक्र, हे युधिष्ठिरा, तेथें नित्य असतें ३८. तशाच अदिति, दिति, दनु, सुरसा, विनता, इरा, कालिका, देवी सुरभी, सरमा, गौतमी ३९, प्रभा व कद्रू ह्या देवता, देवमाता, रुद्राणी, श्री, लक्ष्मी, भद्रा, षष्ठी, अपरा ४० पृथिवी, देवी गांगता, ऱ्ही, स्वाहा, कीर्ति, सुरा, देवी शची, पुष्टि, अरुंधती ४१, संवृत्ति, आशा,

---

१ संस्कृत, प्राकृत, पैशाची, अपभ्रंश, ललित, मागध व गद्य ही सातप्रकारची वाणी होय.

श्विनावपि । विश्वेदेवाश्च साध्याश्च पितरश्च मनोजवाः ४३ पितॄणां च गणान्विद्धि सप्त वै पुरुषर्षभ । मूर्तिमन्तो वै चत्वारस्त्रयश्चापि शरीरिणः ४४ वैराजाश्च महाभागा अग्निष्वात्ताश्च भारत । गार्हपत्या नाकचराः पितरो लोकविश्रुताः ४५ सोमपा एकशृङ्गाश्च चतुर्वेदाः कलास्तथा । एते चतुर्षु वर्णेषु पूज्यन्ते पितरो नृप ४६ एतैराप्यायितैः पूर्वं सोमश्चाप्यायते पुनः ४७ त एते पितरः सर्वे प्रजापतिमुपस्थिताः । उपासते च संहृष्टा ब्रह्माणममितौजसम् ४८ राक्षसाश्च पिशाचाश्च दानवा गुह्यकास्तथा । नागाः सुपर्णाः पशवः पितामहमुपासते ४९ स्थावरा जङ्गमाश्चैव महाभूतास्तथापरे । पुरन्दरश्च देवेन्द्रो वरुणो धनदो यमः ५० महादेवः सहोमोऽत्र सदा गच्छति सर्वशः । महासेनश्च राजेन्द्र सदोपास्ते पितामहम् ५१ देवो नारायणस्तस्यां तथा देवर्षयश्च ये । ऋषयो वालखिल्याश्च योनिजायोनिजास्तथा ५२ यच्च किंचित्त्रिलोकेऽस्मिन्दृश्यते स्थाणुजङ्गमम् । सर्वं तस्यां मया दृष्टमिति विद्धि नराधिप ५३ अष्टाशीतिसहस्राणि ऋषीणामूर्ध्वरेतसाम् । प्रजावतां च पञ्चाशदृषीणामपि पाण्डव ५४ ते स्म तत्र यथाकामं दृष्ट्वा

नियता, सृष्टि व देवी रति ह्या आणि इतरही देवता प्रजाधिपति ब्रह्मदेवासमीप होत्या ४२. तसेच आदित्य, वसु, रुद्र, मरुद्गण, अश्विनीकुमार, विश्वेदेव, साध्य मनोवेगानें युक्त असलेले पितर ४३ आणि चार व तीन मिळून सातही पितृगण, हे पुरुषश्रेष्ठा युधिष्ठिरा, तेथें होते असें तूं समज ४४. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिर राजा, महाभाग्यवान् वैराज, अग्निष्वात्त गार्हपत्य व नाकचर हे जगत्प्रसिद्ध पितर असून ४५ सोमप, एकशृंग, चतुर्वेद व कल, हे पितर, हे राजा, चारी वर्णांना पूज्य आहेत ४६. ह्या पितरांना तृप्त केले असतां चंद्र पुनरपि वृद्धिंगत होतो ४७. असो. ते हे सर्व पितर प्रजाधिपति ब्रह्मदेवासमीप असून आनंदानें त्या अपरिमितसामर्थ्यवान् ब्रह्मदेवाची उपासना करीत असतात ४८. तसेच राक्षस, पिशाच, दानव, गुह्यक, नाग, पक्षी आणि पशु ब्रह्मदेवाची सेवा करीत असून ४९ स्थावर आणि जंगम असे श्रेष्ठ श्रेष्ठ प्राणी, देवराज इंद्र, वरुण, कुबेर, यम आणि सांब हे त्या ठिकाणीं नेहमीं येतात व हे नृपश्रेष्ठा, (देवसेनाधिपति) षडाननही सर्वदां ब्रह्मदेवाची उपासना करीत असतो ५०,५१. देव नारायण, देवर्षि, वालखिल्य ऋषि व अयोनिसंभव आणि योनिसंभव असे इतरही मुनि तेथें असतात ५२. सारांश, हे नराधिपते, स्थावर अथवा जंगम ह्मणून जो कांहीं प्राणी ह्या ब्रह्मांडामध्यें दृष्टीं पडतो तो सर्व त्या ठिकाणीं माझ्या अवलोकनांत आला असें तूं समज ५३. हे पांडुपुत्रा, ऐंशी हजार नैष्ठिक ब्रह्मचर्य पाळणारे आणि पंनास

सर्वे दिवौकसः। प्रणम्य शिरसा तस्मै सर्वे यान्ति यथागतम् ५५ अतिथी-
नागतान्देवान्दैत्यान्नागांस्तथा द्विजान्। यक्षान्सुपर्णान्कालेयान्गन्धर्वाप्स-
रसस्तथा ५६ महाभागानमितधीर्ब्रह्मा लोकपितामहः। दयावान्सर्वभूतेषु
यथार्हं प्रतिपद्यते ५७ प्रतिगृह्य तु विश्वात्मा स्वयंभूरमितद्युतिः। सान्त्व-
मानार्थसंभोगैर्युनक्ति मनुजाधिप ५८ तथा तैरुपयातैश्च प्रतियद्भिश्च
भारत। आकुला सा सभा तात भवति स्म सुखप्रदा ५९ सर्वतेजोमयी
दिव्या ब्रह्मर्षिगणसेविता। ब्राह्मया श्रिया दीप्यमाना शुशुभे विगतक्लमा ६०
सा सभा तादृशी दृष्टा मया लोकेषु दुर्लभा। सभेयं राजशार्दूल मनुष्येषु
यथा तव ६१ एता मया दृष्टपूर्वाः सभा देवेषु भारत। सभेयं मानुषे लोके
सर्वश्रेष्ठतमा तव ६२ [४९३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां० सभापर्वणि
लोकपालसभाख्यानपर्वणि ब्रह्मसभावर्णनं नामैकादशोऽध्यायः ॥ ११ ॥
युधिष्ठिर उवाच ॥ प्रायशो राजलोकस्ते कथितो वदतां वर। वैवस्व-

हजार कुटुंबी ऋषि तेथें जात असतात ५४ आणि ते सर्व स्वर्गवासी मुनि त्या सभेमध्यें ब्रह्मदेवाचें यथेष्ट दर्शन घेऊन व मस्तकानें त्याला प्रणाम करून आल्यामार्गानें परत जात असतात ५५. देव, दैत्य, नाग, द्विज, यक्ष, पक्षी, कालेय, गंधर्व आणि अप्सरा असे महाभाग्यवान् अतिथि तेथें आले असतां प्राणिमात्रावर दया करणारा अत्यंत बुद्धिमान् लोकाधिपति ब्रह्मदेव सर्वांशीं आपली वागणूक ज्याच्या त्याच्या योग्यतेनुरूप ठेवीत असतो ५६, ५७ आणि अपरिमित तेजानें युक्त असलेला तो जगदात्मा ब्रह्मदेव सर्वांचें स्वागत करून सौम्य भाषण, मानमान्यता, द्रव्य आणि भोग्य पदार्थ ह्यांच्या योगानें, हे नराधिपा युधिष्ठिरा, सर्वांचें आतिथ्य करीत असतो ५८. बा भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, ह्याप्रमाणें ते देवगण वगैरे एकसारखें येत जात असल्यामुळें ती सुखदायक सभा सर्वदां गजबजून राहिलेली होती ५९ आणि ब्रह्मर्षींच्या समुदायांनीं व सर्व प्रकारच्या तेजांनीं भरलेली ती क्लमरहित दिव्य सभा ब्रह्मदेवाच्या वैभवानें देदीप्यमान असल्यामुळें (उत्तमप्रकारें)शोभत होती ६०. सारांश, हे नृपश्रेष्ठा, मनुष्यामध्यें ज्याप्रमाणें ही तुझी सभा दुर्लभ आहे त्याचप्रमाणें सर्व लोकांमध्यें इतरत्र दुर्लभ अशी ती सभा मीं अवलोकन केली ६१. असो. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, ह्या सभा मीं देवांमध्यें पूर्वी अवलोकन केलेल्या आहेत व ही तुझी सभा मनुष्यलोकांत सर्व सभेमध्यें श्रेष्ठ आहे ६२. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील लोकपालसभाख्यानपर्वांपैकीं ब्रह्मसभावर्णननामक अकरावा अध्याय समाप्त झाला॥ ११ ॥

युधिष्ठिर ह्मणतो:—हे वक्त्यांमध्यें श्रेष्ठ प्रभो, आपण सांगत आहां त्यावरून तर

तसभायां तु यथा वदसि मे प्रभो १ वरुणस्य सभायां तु नागास्ते कथिता विभो । दैत्येन्द्राश्चापि भूयिष्ठाः सरितः सागरास्तथा २ तथा धनपतेर्यक्षा गुह्यका राक्षसास्तथा । गन्धर्वाप्सरसश्चैव भगवांश्च वृषध्वजः ३ पितामहसभायां तु कथितास्ते महर्षयः । सर्वे देवनिकायाश्च सर्वशास्त्राणि चैव ह ४ शक्रस्य तु सभायां तु देवाः संकीर्तिता मुने । उद्देशतश्च गन्धर्वा विविधाश्च महर्षयः ५ एक एव तु राजर्षिर्हरिश्चन्द्रो महामुने । कथितस्ते सभायां वै देवेन्द्रस्य महात्मनः ६ किं कर्म तेनाचरितं तपो वा नियतव्रत । येनासौ सह शक्रेण स्पर्धते सुमहायशाः ७ पितृलोकगतश्चैव त्वया विप्र पिता मम । दृष्टः पाण्डुर्महाभागः कथं वापि समागतः ८ किमुक्तवांश्च भगवंस्तन्ममाचक्ष्व सुव्रत । त्वत्तः श्रोतुं सर्वमिदं परं कौतूहलं हि मे ९ नारद उवाच ॥ यन्मां पृच्छसि राजेन्द्र हरिश्चन्द्रं प्रति प्रभो । तत्तेहं संप्रवक्ष्यामि माहात्म्यं तस्य धीमतः १० स राजा बलवानासीत्सम्राट् सर्वमहीक्षिताम् । तस्य सर्वे महीपालाः शासनावनताः स्थिताः ११

यमधर्माच्या सभेमध्यें प्रायः नृपसमुदाय असल्याचेंच आपण कथन केलें आहेत असें दिसतें १. त्याचप्रमाणें, हे प्रभो, वरुणसभेमध्यें मुख्यतः नाग, श्रेष्ठ दैत्य, नद्या व सागर आपण कथन केले असून २ कुबेराच्या सभेमध्यें यक्ष, गुह्यक, राक्षस, गंधर्व, अप्सरा व भगवान् वृषध्वज महादेव असल्याचें आपण कथन केलें ३. त्याचप्रमाणें ब्रह्मदेवाच्या सभेमध्यें सर्व महर्षि, सर्व देवगण व सर्व शास्त्रें असल्याचें आपल्या सांगण्यांत आलें असून ४, हे मुने, इंद्रसभेमध्यें आपण देव कथन केले आणि उदाहरणार्थ नानाप्रकारचे गंधर्व व महर्षिही आपल्या सांगण्यांत आले ५. परंतु, हे महामुने, राजेलोकांपैकीं नव्हीं ह्मणावयाला काय तो फक्त एक हरिश्चंद्र राजर्षिच महात्म्या देवाधिपति इंद्राच्या सभेमध्यें असल्याचें आपण सांगितलें आहे ६. तस्मात्, हे नियतव्रत नारदमुने, ज्याच्या योगानें हा हरिश्चंद्र राजा देवराज इंद्राशीं बरोबरी करीत आहे असें कर्म अथवा तप तरी त्यानें काय केलें आहे? ७. त्याचप्रमाणें हे विप्र, माझा पिता महाभाग्यवान् पांडु पितृलोकीं गेला असतांना आपण त्याला अवलोकन कसा केला व आपली आणि त्याची भेट तरी कशी झाली ?८ आणि हे सदाचरणसंपन्न भगवन्, आपलें बोलणें तरी त्याच्याशीं काय झालें? तें आपण मला कथन करा; आपणांपासून हें सर्व ऐकण्याविषयीं मला कांहीं पराकाष्ठेची उत्सुकता उत्पन्न झाली आहे९. नारद ह्मणतात:—हे नृपश्रेष्ठा युधिष्ठिरा, ज्याअर्थी हरिश्चंद्राविषयीं तूं मला विचारीत आहेस त्याअर्थी त्या विवेकी राजाचें श्रेष्ठत्व मी तुला कथन करितों १०. तो हरिश्चंद्रराजा बलाढ्य असून पृथ्वींतील

तेनैकं रथमास्थाय जैत्रं हेमविभूषितम् । शस्त्रप्रतापेन जिता द्वीपाः सप्त जनेश्वर १२ स निर्जित्य महीं कृत्स्नां सशैलवनकाननाम् । आजहार महाराज राजसूयं महाक्रतुम् १३ तस्य सर्वे महीपाला धनान्याजह्रु राज्ञया । द्विजानां परिवेष्टारस्तस्मिन्यज्ञे च तेभवन् १४ प्रादाच्च द्रविणं प्रीत्या याचकानां नरेश्वरः । यथोक्तवन्तस्ते तस्मिंस्ततः पञ्चगुणाधिकम् १५ अतर्पयच्च विविधैर्वसुभिर्ब्राह्मणांस्तदा । प्रसर्पकाले संप्राप्ते नानादिग्भ्यः समागतान् १६ भक्ष्यभोज्यैश्च विविधैर्यथाकामपुरस्कृतैः । रत्नौघतर्पितैस्तुष्टैर्द्विजैश्च समुदाहृतम् १७ तेजस्वी च यशस्वी च नृपेभ्योप्यधिकोभवत् । एतस्मात्कारणाद्राजन्हरिश्चन्द्रो विराजते ॥ तेभ्यो राजसहस्रेभ्यस्तद्विद्धि भरतर्षभ १८ समाप्य च हरिश्चन्द्रो महायज्ञं प्रतापवान्। अभिषिक्तश्च शुशुभे साम्राज्येन नराधिप १९ ये चान्ये च महीपाला राजसूयं महाक्रतुम् । यजन्ते ते सहेन्द्रेण मोदन्ते भरतर्षभ २० ये चापि

इतर सर्व राजांना आज्ञा करणारा होता व सर्व भूपालही त्याच्या आज्ञेला नमून राहिलेले होते ११. हे जनाधिपते, सुवर्णाच्या अलंकारांनीं भूषित अशा एका जयशाली रथावर आरूढ होऊन शस्त्रांच्या प्रतापानें त्यानें सप्त द्वीपें जिंकिलीं १२ आणि हे महाराजा, ह्याप्रमाणें पर्वत, वनें व अरण्यें ह्यांसहवर्तमान संपूर्ण पृथ्वी जिंकून त्या हरिश्चंद्रानें राजसूयनामक महाक्रतु केला १३. त्या यज्ञसमयीं सर्व भूपालांनीं त्याच्या आज्ञेनें त्याला द्रव्य आणून दिलें व त्या यज्ञामध्यें द्विजांना वाढणारेही ते भूपालच झाले १४. तो नराधिपति हरिश्चंद्र याचकांना (अपेक्षित) द्रव्य आनंदानें देत असें इतकेंच नव्हे परंतु, ते जितकें द्रव्य त्याच्या जवळ मागत त्यापेक्षां पांचपट अधिक तो त्यांना देई १५. प्रयाणकाल प्राप्त झाल्यावर चोहोंकडून आलेल्या ब्राह्मणांना नानाप्रकारच्या द्रव्यांनीं त्यानें तृप्त केलें असतां १६ यथेष्ट अर्पण केलेले अनेकप्रकारचे भक्ष्यभोज्यपदार्थ आणि रत्नसमुदाय ह्यांच्या योगानें संतुष्ट झालेले द्विज " तेजस्वी व यशस्वी असा हरिश्चंद्र राजा इतर राजांपेक्षां श्रेष्ठ झाला " असें ह्मणाले १७. ह्या कारणास्तव, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिर राजा, त्या हजारों राजांपेक्षां हरिश्चंद्रराजा श्रेष्ठ आहे हें तूं समज १८. हे नराधिपते, तो राजसूय महाक्रतु समाप्त झाल्यावर प्रतापी हरिश्चंद्रराजाला सार्वभौमराज्याचा अभिषेक झाला असतां तो (अधिकच) शोभूं लागला १९. हे भरतवंशजश्रेष्ठा ह्याप्रमाणें इतरही जे राजे राजसूयमहाक्रतु करीत असतात तेही इंद्रासहवर्तमान आनंदानें रहातात २०. हे भरतोत्तमा, संग्रामामध्यें पलायन न करितां जे मृत्यु पावतात

निधनं प्राप्ताः संग्रामेष्वपलायिनः । ते तत्सदनमासाद्य मोदन्ते भरतर्षभ २१
तपसा ये च तीव्रेण त्यजन्तीह कलेवरम् । ते तत्स्थानं समासाद्य श्रीमन्तो
भान्ति नित्यशः २२ पिता च त्वाह कौन्तेय पाण्डुः कौरवनन्दन । हरि-
श्चन्द्रे श्रियं दृष्ट्वा नृपतौ जातविस्मयः २३ विज्ञाय मानुषं लोकमायान्तं मां
नराधिप । प्रोवाच प्रणतो भूत्वा वदेथास्त्वं युधिष्ठिरम् २४ समर्थोसि
महीं जेतुं भ्रातरस्ते स्थिता वशे । राजसूयं क्रतुश्रेष्ठमाहरस्वेति भारत २५
त्वयीष्टवति पुत्रेहं हरिश्चन्द्रवदाशु वै । मोदिष्ये बहुलाः शश्वत्समाः शक्रस्य
संसदि २६ एवं भवतु वक्ष्येहं तव पुत्रं नराधिपम् । भूर्लोकं यदि गच्छे-
यमिति पाण्डुमथाब्रुवम् २७ तस्य त्वं पुरुषव्याघ्र संकल्पं कुरु पाण्डव ।
गन्तासि त्वं महेन्द्रस्य पूर्वैः सह सलोकताम् २८ बहुविघ्नश्च नृपते क्रतु-
रेष स्मृतो महान् । छिद्राण्यस्य तु वाञ्छन्ति यज्ञघ्ना ब्रह्मराक्षसाः २९ युद्धं
च क्षत्रशमनं पृथिवीक्षयकारणम् । किंचिदेव निमित्तं च भवत्यत्र क्षयाव-
हम् ३० एतत्संचिन्त्य राजेन्द्र यत्क्षेमं तत्समाचर । अप्रमत्तोत्थितो नित्यं

तेही त्या स्थानीं जाऊन आनंदांत रहात असतात २१ व त्याचप्रमाणें तीव्र तपश्चर्येच्या योगानें जे ह्या ठिकाणीं देहाचा त्याग करितात तेही वैभवसंपन्न लोक त्या इंद्राच्या स्थानाप्रत जाऊन सर्वदां झळकत असतात २२. हे कुंतीपुत्रा कौरवकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, हरिश्चंद्र राजाचें वैभव पाहून आश्चर्यचकित झालेला तुझा पिता पांडु मनुष्यलोकीं जाण्याकरितां मी निघालों आहें असें जाणून प्रणामपूर्वक मला ह्मणाला " आपण युधिष्ठिराला माझा असा निरोप सांगा कीं—हे भरतवंशजा, तुझे भ्राते तुझ्या आज्ञेंत आहेत आणि ह्मणूनच तूं पृथ्वी जिंकण्यास समर्थ आहेस. ह्यास्तव (ती जिंकून) तूं राजसूयनामक श्रेष्ठ क्रतु कर २३,२४,२५. ह्मणजे तूं पुत्रानें तो क्रतु केल्यावर मी सत्वरच हरिश्चंद्राप्रमाणें इंद्रसभेंत जाऊन अनंत संवत्सरपर्यंत एकसारखा आनंदांत राहीन—"२६. ह्याप्रमाणें त्यानें सांगितलें असतां " ठीक आहे. भूलोकीं मी जर गेलों तर तुझ्या नराधिपति पुत्राला मी (तुझा निरोप) सांगेन" असें पांडूला मी सांगितलें २७. करितां, हे पुरुषश्रेष्ठा पांडुपुत्रा, तूं त्याचा मनोरथ सिद्धीस ने ह्मणजे पूर्वजांसहवर्तमान तुला इंद्रलोक प्राप्त होईल २८. परंतु, हे नृपते, ह्या महाक्रतूमध्यें पुष्कळ विघ्नें येत असतात; यज्ञघातक ब्रह्मराक्षस ह्यांत वैगुण्य होण्याची इच्छा करीत असतात २९ आणि ह्या यज्ञाकरितां क्षत्रियनाशक व पृथ्वीच्या क्षयाला कारणीभूत असें युद्ध होत असतें. सारांश, कांहीं तरी निमित्त उद्भवून ह्या महाक्रतूमुळें (पृथ्वीचा) क्षय होतो ३०. तेव्हां हे नृपश्रेष्ठा, ह्याचा विचार करून मग जें तुला कल्याण-

चातुर्वर्ण्यस्य रक्षणे ३१ भव एधस्व मोदस्व धनैस्तर्पय च द्विजान् ३२ एतत्ते विस्तरेणोक्तं यन्मां त्वं परिपृच्छसि । आपृच्छे त्वां गमिष्यामि दाशार्हनगरीं प्रति ३३ वैशम्पायन उवाच ॥ एवमाख्याय पार्थेभ्यो नारदो जनमेजय । जगाम तैर्वृतो राजन्नृषिभिर्यैः समागतः ३४ गते तु नारदे पार्थो भ्रातृभिः सह कौरव । राजसूयं क्रतुश्रेष्ठं चिन्तयामास पार्थिवः ३५.
[५२८] इति० सभापर्वणि लोकपालसभाख्यानपर्वणि पाण्डुसंदेशकथने द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥ समाप्तं च लोकपालसभाख्यानपर्व ॥ १२ ॥

अथ राजसूयारम्भपर्व ॥ वैशम्पायन उवाच ॥ ऋषेस्तद्वचनं श्रुत्वा निशश्वास युधिष्ठिरः । चिन्तयन्राजसूयेष्टिं न लेभे शर्म भारत १ राजर्षीणां च तं श्रुत्वा महिमानं महात्मनाम् । यज्वनां कर्मभिः पुण्यैर्लोकप्राप्तिं समीक्ष्य च २ हरिश्चन्द्रं च राजर्षिं रोचमानं विशेषतः । यज्वानं यज्ञमाहर्तुं राजसूयाभियेष सः ३ युधिष्ठिरस्ततः सर्वानर्चयित्वा सभासदः । प्रत्यर्चितश्च तैः सर्वैर्यज्ञायैव मनो दधे ४ स राजसूयं राजेन्द्र कुरूणामृ-

---

कारक वाटेल तें तूं कर आणि वर्णचतुष्टयाचें रक्षणाविषयीं सर्वदा सावधपणानें तत्पर असत जा ३१. सारांश, अभ्युदय, वृद्धि आणि आनंद प्राप्त करून घेऊन तूं धनांच्या योगानें द्विज संतुष्ट कर ३२. असो. तूं जें मला विचारिलें होतेस तें हें मी तुला सविस्तर कथन केलें आहे. आतां मी तुझा निरोप घेऊन द्वारवतीनगरीस जातों ३३. वैशंपायन सांगतातः—हे जनमेजयराजा, ह्याप्रमाणें कुंतीपुत्रांना सांगितल्यानंतर नारदमुनि ज्या ऋषींसहवर्तमान आले होते त्या ऋषींनीं परिवेष्टित होऊन परत गेले ३४ व ते नारदमुनि परत गेल्यावर कुरुकुलोत्पन्न कुंतीपुत्र युधिष्ठिरराजा भ्रात्यांसहवर्तमान राजसूयसंज्ञक श्रेष्ठ क्रतूविषयीं विचार करूं लागला ३५. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील लोकपालसभाख्यानपर्वांपैकीं पांडूचा निरोप कळविण्याविषयीं बारावा अध्याय समाप्त झाला ॥ १२ ॥ ह्या ठिकाणीं लोकपालसभाख्यानपर्वही संपूर्ण झालें ॥

येथून राजसूयारंभपर्वाला आरंभ झाला. वैशंपायन सांगतातः—हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, नारदमुनींचें तें भाषण श्रवण करून युधिष्ठिर सुस्कारे टाकूं लागला आणि राजसूयक्रतु मनांत घोळूं लागल्यामुळें त्याला चैन पडेनासें झालें १. महात्म्या राजर्षींचा तो महिमा श्रवण करून, यज्ञयाग केलेल्यांना पुण्य कर्मांच्या योगानें उत्तमलोकप्राप्ति होत असल्याचें पाहून २ आणि विधिपूर्वक क्रतु केलेला हरिश्चंद्रराजर्षि इंद्रसभेमध्यें विशेषेंकरून विराजमान होत असल्याचें अवलोकन करून त्यानें राजसूय यज्ञ करण्याचें मनांत आणिलें ३. तदनंतर युधिष्ठिरानें सर्व सभासदांचें पूजन केलें व

षभस्तदा । आहर्तुं प्रवणं चक्रे मनः संचिन्त्य चासकृत् ५ भूयश्चाद्भुतवीर्यौजा धर्ममेवानुचिन्तयन् । किं हितं सर्वलोकानां भवेदिति मनो दधे ६ अनुगृह्णन्प्रजाः सर्वाः सर्वधर्मभृतां वरः । अविशेषेण सर्वेषां हितं चक्रे युधिष्ठिरः ७ सर्वेषां दीयतां देयं मुष्णन्कोपमदावुभौ । साधुधर्मेति धर्मेति नान्यच्छ्रूयेत भाषितम् ८ एवं गते ततस्तस्मिन्पितरीवाश्वसञ्जनाः । न तस्य विद्यते द्वेष्टा ततोऽस्याजातशत्रुता ९ परिग्रहान्नरेन्द्रस्य भीमस्य परिपालनात् । शत्रूणां क्षपणाच्चैव बीभत्सोः सव्यसाचिनः १० धीमतः सहदेवस्य धर्माणामनुशासनात् । वैनत्यात्सर्वतश्चैव नकुलस्य स्वभावतः ११ अविग्रहा वीतभयाः स्वकर्मनिरताः सदा । निकामवर्षाः स्फीताश्च आसञ्जनपदास्तथा १२ वार्द्धुषी यज्ञसत्त्वानि गोरक्षं कर्षणं वणिक् । विशेषात्सर्वमेवैतत्संजज्ञे राजकर्मणा १३ अनुकर्षं च निष्कर्षं व्याधिपावकमूर्च्छनम् । सर्वमेव न तत्रासीद्धर्मनित्ये युधिष्ठिरे १४ दस्युभ्यो वञ्चके-

---

त्या सर्वांनींही उलट त्याचें पूजन केलें असतां यज्ञच त्याच्या मनामध्यें घोळूं लागला ४. हे नृपश्रेष्ठा, त्या कुरुवंशजश्रेष्ठ युधिष्ठिरानें अनेक वेळां विचार करून राजसूय करण्याचेंच मनामध्यें आणिलें ५ आणि अद्भुतवीर्य व सामर्थ्य ह्यांनीं युक्त असून धर्माकडेच लक्ष्य असलेला तो युधिष्ठिर सर्व लोकांना हितकारक काय होईल ह्याचाही पुनः विचार करूं लागला ६. कारण, सर्व धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ असा तो युधिष्ठिर सर्व प्रजेवर अनुग्रह करीत असून निष्पक्षपातीपणानें सर्वांचेंच हित करीत असे ७ आणि " कोप व मद ह्या उभयतांचा निग्रह करून देण्यास योग्य असेल तें सर्वांना द्या " असें ह्मणत असे. सारांश, त्याच्या कारकीर्दीमध्यें धर्म, उत्कृष्ट धर्म ह्या वांचून इतर कांहीं भाषणच ऐकूं येईनासें झालें ८. असो. ह्याप्रकारें तो वागूं लागला असतां सर्व लोक पित्याप्रमाणें त्याचे ठिकाणीं विश्वास ठेवूं लागले व त्यामुळें त्याचा कोणीच द्वेष्टा उरला नाहीं. ह्मणून अजातशत्रु ही पदवी त्याला प्राप्त झाली ९. नराधिपति युधिष्ठिराचें आदरातिथ्य, भीमसेनाचें परिपालन, सव्यसाची अर्जुनाचें शत्रनाशन १०, विवेकी सहदेवाचें धर्मानुशासन आणि नकुलाचा स्वाभाविक सर्वत्र विनय ह्यांच्या योगानें ११ सर्व देश—कलह व भय—ह्यांनीं रहित असून यथेष्ट पर्जन्यवृष्टीनें युक्त असल्यामुळें धान्यानें समृद्ध होते व त्यांतील लोक स्वकर्मनिष्ठ होते १२. व्याजबट्टयावर उपजीविका, यज्ञांचे प्रभाव, गोरक्षण, शेतकी व व्यापार ह्या सर्वांचीं राजाच्या (उत्कृष्ट) वर्तनामुळें त्यावेळीं विशेषेंकरून चलती होती १३. त्याचप्रमाणें नित्य धर्मानें वागत असलेला युधिष्ठिर राज्य करीत असतांना वसूल थकणें,

ग्यश्च राज्ञः प्रति परस्परम् । राजवल्लभतश्चैव नाश्रूयत मृषाकृतम् १५
प्रियं कर्तुमुपस्थातुं बलिकर्म स्वकर्मजम् । अभिहर्तुं नृपाः षट्सु पृथ-
ग्जात्यैश्च नैगमैः १६ ववृधे विषयस्तत्र धर्मनित्ये युधिष्ठिरे । कामतो-
प्युपयुञ्जानै राजसैर्लोभजैर्जनैः १७ सर्वव्यापी सर्वगुणी सर्वसाहः स
सर्वराट् । यस्मिन्नधिकृतः सम्राट् भ्राजमानो महायशाः १८ यत्र राज-
न्दश दिशः पितृतो मातृतस्तथा । अनुरक्ताः प्रजा आसन्नागोपाला द्विजा-
तयः १९ स मन्त्रिणः समानाय्य भ्रातॄंश्च वदतां वरः । राजसूयं प्रति तदा
पुनः पुनरपृच्छत २० ते पृच्छ्यमानाः सहिता वचोर्थ्यं मन्त्रिणस्तदा ।
युधिष्ठिरं महाप्राज्ञं यियक्षुमिदमब्रुवन् २१ येनाभिषिक्तो नृपतिर्वारुणं
गुणमृच्छति। तेन राजापि तं कृत्स्नं सम्राड्गुणमभीप्सति २२ तस्य सम्रा-
ड्गुणार्हस्य भवतः कुरुनन्दन । राजसूयस्य समयं मन्यन्ते सुहृदस्तव २३

कराच्या योगानें प्रजेला पिडणें, व्याधि व अग्नि ह्यांची वृद्धि होणें वगैरे एकही प्रजेला हानिकारक गोष्ट त्या देशामध्यें नव्हती १४. चोर व लुच्चे लोक ह्यांपासून प्रजेला पीडा होईनाशी झाली; मांडलिक राजांनीं परस्परांना त्रास देण्याचें सोडिलें आणि राजाच्या मर्जींतील लोकांनींही अनान्वित कृत्य केल्याचें ऐकूं येईनासें झालें १५. (संधि विग्रह, यान वगैरे) साही गुणामध्यें निष्णात असलेले मांडलिक राजे त्याचें प्रिय करण्याकरितां, त्याची सेवा करण्याकरितां आणि आपण राजधर्मानें प्रजेपासून वसूल केलेला कर त्याला देण्याकरितां जातींच्या व्यापारी लोकांसहवर्तमान पृथक् अथवा एकेकटे त्याच्याकडे येत असत १६. इतकेंच नव्हे परंतु, सर्वदां धर्मानें वागणारा तो युधिष्ठिर राज्य करीत असतांना अन्नवस्त्रादिकांचा यथेष्ट उपभोग घेणाऱ्या रजोगुणी लोभी जनांनींही तो प्रदेश भरून गेला १७. असो. सर्वज्ञ, सर्वगुणी, अत्यंत क्षमाशील व सर्वाधिपति असा तो महाकीर्तिमान् व (वैभवानें) प्रकाशत असलेला राजा ज्या प्रदेशावर अंमल चालवीत असे व ज्या ठिकाणीं वास्तव्य करीत असे त्या ठिकाणचे—ब्राह्मणांपासून तों गुराख्यापर्यंतचे—सर्व लोक पित्याप्रमाणें आणि मातेप्रमाणें त्याचे ठिकाणीं प्रेम करीत असत १८,१९. वैशंपायन सांगतात:— वक्त्यांमध्यें श्रेष्ठ असलेला तो युधिष्ठिर मंत्री आणि भ्राते ह्यांना समीप आणवून राजसूयाविषयीं प्रश्न करूं लागला असतां २० याग करण्यास उद्युक्त झालेल्या महाज्ञानी युधिष्ठिराला अर्थानें परिपूर्ण असें उत्तर त्या मंत्र्यांनीं दिलें २१ " ज्याअर्थीं अभिषिक्त राजाला जलाधिपति वरुणाचीही योग्यता प्राप्त होते त्याअर्थीं सार्वभौम योग्यता त्याला प्राप्त होण्याचीही इच्छा होणारच २२. तस्मात्, हे

तस्य यज्ञस्य समयः स्वाधीनः क्षत्रसंपदा । साम्ना षडग्नयो यस्मिंश्चीयन्ते संशितव्रतैः २४ दर्वीहोमानुपादाय सर्वान्यः प्राप्नुते क्रतून् । अभिषेकं च यस्यान्ते सर्वजित्तेन चोच्यते २५ समर्थोसि महाबाहो सर्वे ते वशगा वयम् । अचिरात्त्वं महाराज राजसूयमवाप्स्यसि २६ अविचार्य महाराज राजसूये मनः कुरु । इत्येवं सुहृदः सर्वे पृथक्च सह चाब्रुवन् २७ स धर्म्यं पाण्डवस्तेषां वचः श्रुत्वा विशांपते । धृष्टमिष्टं वरिष्ठं च जग्राह मनसारिहा २८ श्रुत्वा सुहृद्वचस्तच्च जानंश्चाप्यात्मनः क्षमम् । पुनः पुनर्मनो दध्रे राजसूयाय भारत २९ स भ्रातृभिः पुनर्धीमानृत्विग्भिश्च महात्मभिः। मन्त्रिभिश्चापि सहितो धर्मराजो युधिष्ठिरः ३० धौम्यद्वैपायनाद्यैश्च मन्त्रयामास मन्त्रवित् ३१ युधिष्ठिर उवाच ॥ इयं या राजसूयस्य सम्राडर्हस्य सुक्रतोः। श्रद्दधानस्य वदत स्पृहा मे सा कथं भवेत् ३२ वैशम्पायन उवाच ॥

कुरुनंदना युधिष्ठिरा, सार्वभौमपदाला तूं योग्य असल्यामुळें राजसूय याग करण्याचा आज तुझा काल असल्याचें तुझ्या सुहृदांना वाटत आहे २३. कारण, ज्यामध्यें सामवेदविहित मंत्रांनीं सदाचरणसंपन्न ऋत्विज सहा अग्निचयन (ह्मणजे अग्निस्थापनेकरितां स्थंडिलें) करीत असतात त्या राजसूयाचा समय (शौर्यप्रभृति) क्षात्रगुणांची समृद्धि असली ह्मणजे आपल्या स्वाधीन असतो २४. ह्या राजसूय क्रतूमध्यें दर्वीहोमांपासून सर्व क्रतूंचा समावेश होतो, त्याच्या अंतीं यजमानाला अभिषेक कर्तव्य असतो आणि हा क्रतु केल्यानें राजाला सर्वजित् असें ह्मणतात २५. सारांश, हे महापराक्रमी महाराज, तूं सर्व पृथ्वी जिंकण्यास समर्थ आहेस. कारण, आह्मी सर्व तुझ्या आज्ञेंत आहोंत. करितां, राजसूय याग करण्याचा तुझा मनोरथ लवकरच सिद्धीस जाईल २६. ह्यास्तव, हे महाराजा, तूं आतां विचार करीत न बसतां राजसूय याग करण्याचा निश्चय कर ". ह्याप्रमाणें पृथक् पृथक् व एकत्र मिळून सर्व सुहृदांनीं त्याला सांगितलें असतां २७, हे प्रजाधिपते जनमेजया, धर्माला अनुसरून असलेलें आणि ह्मणूनच श्रेष्ठ व इष्ट असलेलें त्यांचें तें धैर्याचें भाषण श्रवण करून शत्रुनाशक युधिष्ठिरानें त्याचा विचार केला २८ आणि, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, ह्याप्रकारें सुहृदांचें तें भाषण श्रवण करून व त्याप्रमाणें करणें आपणांला योग्य आहे असें जाणून पुनः पुनः राजसूय यागच त्याच्या मनामध्यें घोळूं लागला २९. तदनंतर विवेकी व मंत्रज्ञ धर्मराज युधिष्ठिरानें ऋत्विज, धौम्यद्वैपायनप्रभृति मंत्री आणि भ्राते ह्यांसहवर्तमान पुनरपि राजसूय यागाविषयीं वाटाघाट केली ३०,३१. युधिष्ठिर प्रश्न करितो:—सार्वभौमराजाला योग्य अशी जी श्रेष्ठ राजसूय याग

एवमुक्तास्तु ते तेन राज्ञा राजीवलोचन । इदमूचुर्वचः काले धर्मराजं युधिष्ठिरम् ३३ अर्हस्त्वमसि धर्मज्ञ राजसूयं महाक्रतुम् । अथैवमुक्ते नृपतावृत्विग्भिर्ऋषिभिस्तथा ॥ मन्त्रिणो भ्रातरश्चास्य तद्वचः प्रत्यपूजयन् ३४ स तु राजा महाप्राज्ञः पुनरेवात्मनात्मवान् । भूयो विममृशे पार्थो लोकानां हितकाम्यया ३५ सामर्थ्ययोगं संप्रेक्ष्य देशकालौ व्ययागमौ । विमृश्य सम्यक्‌ धिया कुर्वन्प्राज्ञो न सीदति ३६ न हि यज्ञसमारम्भः केवलात्मविनिश्चयात् । भवतीति समाज्ञाय यत्नतः कार्यमुद्वहन् ३७ स निश्चयार्थं कार्यस्य कृष्णमेव जनार्दनम् । सर्वलोकात्परं मत्वा जगाम मनसा हरिम् ३८ अप्रमेयं महाबाहुं कामाज्जातमजं नृषु । पाण्डवस्तर्कयामास कर्मभिर्देवसंमितैः ३९ नास्य किंचिदविज्ञातं नास्य किंचिदकर्मजम् । न स किंचिन्न विषहेदिति कृष्णममन्यत ४० स तु तां नैष्ठिकीं बुद्धिं कृत्वा पार्थो युधिष्ठिरः । गुरुवद्भूतगुरवे प्राहिणोद्दूतमञ्जसा ४१ शीघ्रगेण रथेनाशु स दूतः प्राप्य यादवान् । द्वारकावासिनं कृष्णं द्वार-

---

करण्याविषयीं मला इच्छा झाली ती कां व्हावी हें श्रद्धापूर्वक श्रवण करण्यास उद्युक्त असलेल्या मला आपण कथन करा ३२. वैशंपायन सांगतात:—हे कमलनयना जनमेजया, ह्याप्रमाणें त्या राजानें योग्य कालीं त्यांना प्रश्न केला असतां धर्मराज युधिष्ठिराला ते असें ह्मणाले ३३ " हे धर्मवेत्त्या, राजसूय महाक्रतु करण्याला तूं योग्य आहेस. ह्याप्रमाणें ऋत्विजांनीं व ऋषींनीं धर्मराजाला सांगितलें असतां त्याच्या मंत्र्यांनीं व भ्रात्यांनीं त्याच्या ह्मणण्याला मान डोलविली ३४. तथापि, त्या महाज्ञानवान् व जितेंद्रिय कुंतीपुत्र धर्मराजानें लोकहितबुद्धीनें पुनरपि त्या गोष्टीचा आपणाशीं विचार केला ३५. कारण, सामर्थ्य, देश, काल आणि द्रव्यसंबंधीं जमा व खर्च ह्यांचा चांगल्या शांत बुद्धीनें विचार करून कार्याला आरंभ करणारा ज्ञानी पुरुष तोंडघशीं पडत नाहीं ३६. असो. केवळ आपल्यापाशींच निश्चय केल्यानें यज्ञाला आरंभ होणार नाहीं असें समजून प्रयत्नानें तें इष्ट कार्य पार पडावें ह्मणून पूर्ण निश्चय करण्याकरितां सर्व लोकांमध्यें—जनदुःख नाहींसें करणारा—श्रीहरिकृष्णच श्रेष्ठ आहे असें समजून त्यानें त्याचें ध्यान केलें ३७,३८. श्रीकृष्णाच्या देवतुल्य कर्मांवरून पांडुपुत्र धर्मराजानें " हा अप्रमेय व महापराक्रमी श्रीकृष्ण वास्तविक जन्ममरणरहित असून इच्छेनें मनुष्यामध्यें अवतीर्ण झाला आहे " असें तर्कानें जाणिलें असून ३९ " ह्याला अज्ञात, करण्यास अशक्य व असह्य अशी कोणतीही गोष्ट नाहीं" ह्मणून कृष्णाविषयीं त्याची मति झाली होती ४०. इतकेंच

वत्यां समासदत् ४२ दर्शनाकाङ्क्षिणं पार्थं दर्शनाकाङ्क्षयाच्युतः । इन्द्रसे-
नेन सहित इन्द्रप्रस्थमगात्तदा ४३ व्यतीत्य विविधान्देशांस्त्वरावान्क्षिप्रवा-
हनः । इन्द्रप्रस्थगतं पार्थमभ्यगच्छज्जनार्दनः ४४ स गृहे पितृवद्भ्रात्रा धर्मरा-
जेन पूजितः । भीमेन च ततोपश्यत्स्वसारं प्रीतिमान्पितुः ४५ प्रीतः प्रीतेन सुहृदा
रेमे स सहितस्तदा । अर्जुनेन यमाभ्यां च गुरुवत्पर्युपासितः ४६ तं विश्रान्तं
शुभे देशे क्षणिनं कल्पमच्युतम् । धर्मराजः समागम्य ज्ञापयत्स्वप्रयोज-
नम् ४७ युधिष्ठिर उवाच॥ प्रार्थितो राजसूयो मे न चासौ केवलेप्सया।
प्राप्यते येन तत्ते हि विदितं कृष्ण सर्वशः ४८ यस्मिन्सर्वं संभवति यश्च
सर्वत्र पूज्यते । यश्च सर्वेश्वरो राजा राजसूयं स विन्दति ४९ तं राजसूयं
सुहृदः कार्यमाहुः समेत्य मे । तत्र मे निश्चिततमं तव कृष्ण गिरा भवेत् ५०
केचिद्धि सौहृदादेव न दोषं परिचक्षते । स्वार्थहेतोस्तथैवान्ये प्रियमेव

नव्हे परंतु, तीच बुद्धि कायम ठेवून व त्याला गुरूप्रमाणें मान्य समजून कुंतीपुत्र युधिष्ठिरानें त्या भूताधिपति श्रीकृष्णाकडे लगेच दूत पाठविला ४१. तो दूत शीघ्रगामी रथांत बसून सत्वर यादवांकडे गेला आणि द्वारकावासी श्रीकृष्णालाही द्वारकेंतच त्यानें गांठिलें ४२. तेव्हां आपल्या भेटीची इच्छा करणाऱ्या कुंतीपुत्र धर्मराजाचीही भेट घेण्याच्या उद्देशानें भगवान् अच्युतानेंही इंद्रसेनासहवर्तमान इंद्रप्रस्थामध्यें धर्मराजाकडे जाण्याचा निश्चय केला ४३ आणि शीघ्रगामी वाहनावर आरूढ होऊन तो जनार्दन सत्वर नानाप्रकारचे देश ओलांडून इंद्रप्रस्थामध्यें कुंतीपुत्र धर्मराजाकडे आला ४४. श्रीकृष्ण इंद्रप्रस्थाला आल्यानंतर भ्रात्या धर्मराजानें व भीमसेनानें पित्याप्रमाणें त्यांचें पूजन केलें आणि तदनंतर श्रीकृष्णांनीं घरांत जाऊन आपल्या आतेची आनंदानें भेट घेतली ४५. नंतर सुप्रसन्न अंतःकरणानें युक्त झालेल्या सख्या अर्जुनासहवर्तमान श्रीकृष्णांनींही सुप्रसन्न होऊन करमणूक केली व तदनंतर नकुलसहदेव वडिलाप्रमाणें श्रीकृष्णांची सेवा करूं लागले ४६. पुढें विश्रांति घेऊन समर्थ अच्युत आनंदानें शुभ स्थानीं बसले असतांना धर्मराजानें येऊन आपला उद्देश त्यांना कळविला ४७. युधिष्ठिर ह्मणतो :— हे कृष्णा, राजसूय करण्याचें मीं मनांत आणिलें आहे; परंतु, केवल इच्छेनें कोणतीही गोष्ट घडत नाहीं हेंही तुला सर्वस्वीं ठाऊकच आहे ४८. ज्याचे ठिकाणीं सर्व संभवतें, ज्याला सर्वत्र मान मिळतो आणि जो सार्वभौम राजा असेल त्याच्या हातून राजसूय यज्ञ होतो ४९. अशा प्रकारचा तो राजसूय करावा ह्मणून सुहृज्जन मला येऊन सांगत आहेत; परंतु, हे कृष्णा, त्याविषयीं माझा काय तो पक्का निश्चय तुझ्या सांगण्यानें होणार आहे ५०. कारण, कांहीं

वदन्त्युत ५१ प्रियमेव परीप्सन्ते केचिदात्मनि वाञ्छितम् । एवंप्रायाश्च दृश्यन्ते जनवादाः प्रयोजने ५२ त्वं तु हेतूनतीत्यैतान्काममक्रोधौ व्युदस्य च । परमं यत्क्षमं लोके यथावद्वक्तुमर्हसि ५३ [५८१] इति श्रीमहाभारते० सभापर्वणि राजसूयारम्भपर्वणि वासुदेवागमने त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥

श्रीकृष्ण उवाच ॥ सर्वैर्गुणैर्महाराज राजसूयं त्वमर्हसि । जानतस्त्वेव ते सर्वं किंचिद्वक्ष्यामि भारत १ जामदग्न्येन रामेण क्षत्रं यदवशेषितम् । तस्मादवरजं लोके यदिदं क्षत्रसंज्ञितम् २ कृतोयं कुलसंकल्पः क्षत्रियैर्वसुधाधिप । निदेशभाग्भिस्तत्ते हि विदितं भरतर्षभ ३ ऐलस्येक्ष्वाकुवंशस्य प्रकृतिं परिचक्षते । राजानः श्रेणिबद्धाश्च तथान्ये क्षत्रिया भुवि ४ ऐलवंश्याश्च ये राजंस्तथैवेक्ष्वाकवो नृपाः । तानि चैकशतं विद्धि कुलानि भरतर्षभ ५ ययातिस्त्वेव भोजानां विस्तरो गुणतो महान् । भजतेद्य

जण अंतःकरणाचेच निर्मळ असल्यामुळें दोष सांगत नाहींत; कांहीं कांहीं लोक स्वार्थ साधण्याकरितां प्रियच बोलत असतात ५१ आणि कांहीं तर स्वतःचें जिच्यापासून हित होईल तीच गोष्ट बोलणें चांगली असें समजतात. सारांश, कोणत्याही गोष्टीविषयीं अशाप्रकारचीं लोकांचीं भाषणें दृष्टोत्पत्तीस येतात ५२. करितां, ह्या हेतूंची परवा न करितां कामक्रोध दूर ठेवून जगतामध्यें सर्वांत योग्य असें जें असेल तें अगदीं यथावत् तूं मला सांग ५३. ह्याप्रमाणें ०लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील राजसूयारंभपर्वांपैकीं श्रीकृष्णगमनाविषयीं तेरावा अध्याय समाप्त झाला ॥ १३ ॥

श्रीकृष्ण ह्मणतातः—हे भरतकुलोत्पन्ना महाराजा, सर्व गुणांनीं (तूं संपन्न असल्यामुळें) राजसूय याग (करणें) तुला योग्य आहे. आतां ह्यासंबंधानें तूं सर्व जाणीतच आहेस; तथापि (ज्याअर्थी मला विचारिलेंच आहेस त्याअर्थी) मी तुला कांहीं सांगतों १. जमदग्निपुत्र परशुरामाच्या हातून जे कांहीं क्षत्रिय अवशिष्ट राहिले होते ते (पलायन वगैरे करून अवशिष्ट राहिले असल्यामुळें) गौणप्रतीचे क्षत्रिय असून त्यांपासून जगतामध्यें उत्पन्न झालेले हे क्षत्रिय आपले नांवाचे क्षत्रिय आहेत २. हे भरतोत्तमा पृथ्वीपते, (संम्राट् ह्या पदवीला कोण योग्य ह्याविषयीं) त्या परतंत्र क्षत्रियांनीं आपल्या सर्व समाजामध्यें केलेला हा ठरावही तुला माहित आहे ३. दावणींत बांधिलेल्या बैलाप्रमाणें आज्ञेनें बद्ध झालेले राजे आणि इतरही भूमीवरील क्षत्रिय हे सर्व पुरूरवा व इक्ष्वाकु ह्यांच्या वंशांची प्रजा (ह्मणजे ह्या दोन वंशांतील राजांना प्रजेप्रमाणें कर देणारे) आहेत असें ह्मणतात ४. हे भरतोत्तमा युधिष्ठिर राजा, पुरूरव्याच्या वंशांत आणि इक्ष्वाकुवंशांत जे राजे आजपर्यंत होऊन गेले ते त्या उभय वंशांची

महाराज विस्तरं स चतुर्दिशम् ६ तेषां तथैव तां लक्ष्मीं सर्वक्षत्रमुपासते ७ इदानीमेव वै राजञ्जरासन्धो महीपतिः । अभिभूय श्रियं तेषां कुलानामभिषेचितः ८ स्थितो मूर्ध्नि नरेन्द्राणामोजसाक्रम्य सर्वशः । सोवनिं मध्यमां भुक्त्वा मिथो भेदममन्यत ९ प्रभुर्यस्तु परो राजा यस्मिन्नेकवशे जगत् । स साम्राज्यं महाराज प्राप्तो भवति योगतः १० तं स राजा जरासन्धं संश्रित्य किल सर्वशः । राजन्सेनापतिर्जातः शिशुपालः प्रतापवान् ११ तमेव च महाराज शिष्यवत्समुपस्थितः । वक्रः करूषाधिपतिर्मायायोधी महाबलः १२ अपरौ च महावीर्यौ महात्मानौ समाश्रितौ । जरासन्धं महावीर्यं तौ हंसडिम्भकावुभौ १३ दन्तवक्रः करूषश्च करभो मेघवाहनः । मूर्ध्ना दिव्यमणिं बिभ्रद्यमद्भुतमणिं विदुः १४ मुरुं च नरकं चैव शास्ति यो यवनाधिपः । अपर्यन्तबलो राजा प्रतीच्यां वरुणो यथा १५ भगदत्तो महाराज वृद्धस्तव पितुः सखा । स वाचा

शंभर शंभर सार्वभौम कुलें असें तूं समज ५. हे महाराजा, ययातीच्या वंशांतील गुणदृष्ट्याही मोठा असलेला विस्तर आज मितीस चारी दिशा व्यापून राहिला आहे ६. त्याचप्रमाणें त्यांची ती राज्यलक्ष्मी प्राप्त होण्याची प्रत्येक क्षत्रिय इच्छा करीत असतो ७. सध्यांच, हे राजा, त्यांच्या कुलांतील राज्यलक्ष्मी जरासंध राजानें जिंकिल्यामुळें इतर राजांनीं त्यालाच अभिषेक केला आहे ८. त्यानें स्वपराक्रमानें सर्वांना पादाक्रांत केल्यामुळें राजांना तो डोईजड होऊन बसला आहे आणि मध्य भूप्रदेशाचा उपभोग घेऊन आपआपसांत कलह माजविण्याचें त्यानें मनांत आणिलें आहे ९. हे महाराजा, जो नृप पराकाष्ठेचा समर्थ असतो ह्मणजे सर्व जगत् ज्याच्या अधीन असतें त्याला योग्यतेनेंच साम्राज्य प्राप्त होतें १०. हे युधिष्ठिरराजा, प्रसिद्ध महाप्रतापी शिशुपाल राजा सर्वप्रकारें त्या जरासंधाचा आश्रय करून त्याचा सेनापति झाला आहे ११. हे महाराजा, मायावि युद्ध करण्यामध्यें निपुण आणि महाबलाढ्य असा करूषदेशाधिपति वक्र शिष्याप्रमाणें त्याची सेवा करीत असतो १२. दुसरे दोन महावीर्यवान् महात्मे हंस व डिंभक महासामर्थ्यवान् जरासंधाच्या आश्रयाला होते १३. वक्रदंत, करूष, करभ व ज्याला अद्भुतमणि ह्मणतात तें दिव्यरत्न मस्तकीं धारण करणारा मेघवाहन हेही त्या जरासंधाचाच आश्रय करून राहिले आहेत १४. लोकपालवरुणाप्रमाणें पश्चिमदिशेस असून मुरु व नरक ह्यांच्यावर अधिकार चालविणारा यवनाधिपति अपर्यंतबल राजाही त्याच्याच आश्रयाला आहे १५. हे महाराजा, तुझ्या पित्याचा सखा जो वयोवृद्ध भगदत्त तो वाणीनें व विशेषतः कृतीनेंही

प्रणतस्तस्य कर्मणा च विशेषतः १६ स्नेहबद्धश्च मनसा पितृवद्भक्तिमां-
स्त्वयि । प्रतीच्यां दक्षिणं चान्तं पृथिव्याः प्रति यो नृपः १७ मातुलो
भवतः शूरः पुरुजित्कुन्तिवर्धनः । स ते सन्नतिमानेकः स्नेहतः शत्रुसू-
दनः १८ जरासन्धं गतस्त्वेव पुरा यो न मया हतः । पुरुषोत्तमविज्ञातो
योसौ चेदिषु दुर्मतिः १९ आत्मानं प्रति जानाति लोकेऽस्मिन्पुरुषोत्तमम्।
आदत्ते सततं मोहाद्यः स चिह्नं च मामकम् २० वङ्गपुण्ड्रकिरातेषु राजा
बलसमन्वितः । पौण्ड्रको वासुदेवेति योसौ लोकेभिविश्रुतः २१ चतुर्थ-
भाङ्महाराज भोज इन्द्रसखो बली । विद्याबलाद्यो व्यजयत्स पाण्ड्यक्र-
थकैशिकान् २२ भ्राता यस्याकृतिः शूरो जामदग्न्यसमोभवत् । स भक्तो
मागधं राजा भीष्मकः परवीरहा २३ प्रियाण्याचरतः प्रह्वान्सदा संबन्धि-
नस्ततः । भजतो न भजत्यस्मानप्रियेषु व्यवस्थितः २४ न कुलं न बलं
राजन्नभ्यजानात्तथात्मनः । पश्यमानो यशो दीप्तं जरासन्धमुपास्थितः २५
उदीच्याश्च तथा भोजाः कुलान्यष्टादश प्रभो । जरासन्धभयादेव प्रतीचीं

त्या जरासंधाला नमून असून १६ तुझ्या पित्याप्रमाणें तो तुझे ठिकाणीं प्रेम व भक्ति करणारा आहे. भरतभूमीचे पश्चिमेस व दक्षिणेस जो नृप आहे १७ तो पुरुजित्संज्ञक शूर कुंतिभोजराजा तुझा मातुलच आहे व तो शत्रुनाशक पुरुजित् मात्र एकटाच प्रेमपूर्वक तुझ्याशीं नमून आहे १८. ज्याचा मीं वध केला नाहीं, जो दुर्मति चेदिदेशामध्यें पुरुषोत्तम ह्मणून प्रसिद्ध आहे, ह्या जगतामध्यें आपणा स्वतःलाच पुरुषोत्तम समजून जो माझें चिन्हही धारण करीत आहे, वंग, पुंड्र व किरात ह्या देशांमध्यें जो बलाढ्य राजा आहे आणि वासुदेव ह्मणून जो पृथ्वींत प्रसिद्ध आहे तो पौंड्रकही पूर्वींच जरासंधाकडे गेलेला आहे १९, २०, २१. हे महाराजा, विद्याप्रभावानें पांड्य, क्रथ व कैशिक हे देश ज्यानें जिंकले, जो स्वतः बलाढ्य असून इंद्रसखा आहे, ज्याचा भ्राता आकृति जमदग्निपुत्र परशुरामाप्रमाणें शूर असून जो स्वतः चतुर्थांश पृथ्वीचा मालक आहे आणि शत्रूकडील वीरांचा घात करण्यास जो समर्थ आहे तो भोजदेशाधिपति (आमचा) श्वशुर भीष्मकराजाही मगधदेशाधिपति जरासंधाचाच भक्त बनलेला आहे २२, २३. त्याला आवडेल तीच गोष्ट करणारे, सर्वदां नम्र व सेवेमध्यें तत्पर असे आह्मी त्या भीष्मक राजाचे संबंधी असतांना तो आमची परवा न करितां आह्मांला अप्रिय असलेल्या गोष्टी करण्यास उद्युक्त झालेला आहे २४. सारांश, हे राजा, स्वतःचें कुल, बल व उज्ज्वल कीर्ति अवलोकन करीत असूनही त्यांचा विचार न करितां तो जरासंधाच्या सेवेमध्यें तत्पर होऊन राहिलेला आहे २५. हे प्रभो धर्मराजा, उत्तरेकडचे

दिशमास्थिताः २६ शूरसेना भद्रकारा बोधाः शाल्वाः पटच्चराः। सुस्थ-
लाश्च सुकुट्टाश्च कुलिन्दाः कुन्तिभिः सह २७ शाल्वायनाश्च राजानः
सोदर्यानुचरैः सह। दक्षिणा ये च पञ्चालाः पूर्वाः कुन्तिषु कोसलाः २८
तथोत्तरां दिशं चापि परित्यज्य भयार्दिताः। मत्स्याः संन्यस्तपादाश्च
दक्षिणां दिशमाश्रिताः २९ तथैव सर्वपञ्चाला जरासन्धभयार्दिताः। स्वराज्यं
संपरित्यज्य विद्रुताः सर्वतो दिशम् ३० कस्यचित्त्वथ कालस्य कंसो
निर्मथ्य यादवान्। बार्हद्रथसुते देव्यावुपागच्छद्वृथामतिः ३१ अस्तिः
प्राप्तिश्च नाम्ना ते सहदेवानुजेबले। बलेन तेन स ज्ञातीनभिभूय वृथा-
मतिः ३२ श्रैष्ठ्यं प्राप्तः स तस्यासीदतीवापनयो महान्। भोजराजन्यवृ-
द्धैश्च पीड्यमानैर्दुरात्मना ३३ ज्ञातित्राणमभीप्सद्भिरस्मत्संभावना कृता।
दत्त्वाक्रूराय सुतनुं तामाहुकसुतां तदा ३४ संकर्षणद्वितीयेन ज्ञातिकार्यं
मया कृतम्। हतौ कंससुनामानौ मया रामेण चाप्युत ३५ भये तु सम-
तिक्रान्ते जरासन्धे समुद्यते। मन्त्रोऽयं मन्त्रितो राजन्कुलैरष्टादशावरैः ३६

अठरा कुळांतले भोजराजे जरासंधाच्याच भीतीनें पश्चिमदिशा धरून राहिले आहेत २६. शूरसेन, भद्रकार, बोध, शाल्व, पटच्चर, सुस्थल, सुकुट्ट, कुलिंद, कुंति २७, सोदर्य व अनुयायी ह्यांसहवर्तमान शाल्वायन, दक्षिण पंचाल, पूर्व कुंति, मत्स्य व संन्यस्तपाद हे राजेही भयभीत झाल्यामुळें उत्तरदिशा सोडून देऊन दक्षिणदिशेस राहिले आहेत २८, २९. त्याचप्रमाणें जरासंधाच्या भीतीनें घाबरून गेलेले सर्व पंचाल स्वराज्य सोडून वाट फुटेल तिकडे पळून गेले आहेत ३०. एकदां यादवांचा पराभव करून दुर्मतिकंसानें जरासंधाच्या कन्या प्राप्त करून घेतल्या ३१. त्या राजकन्यांचीं नांवें अस्ति व प्राप्ति अशीं असून त्या स्त्रिया सहदेवाच्या कनिष्ठ भगिनी होत्या. बळाच्या योगानें आपल्या आप्तांचा पराभव करून ३२ तो दुर्मति कंस स्वतःच श्रेष्ठ बनला. तो तर त्याचा अतिमोठा अपराध आहे. त्याचप्रमाणें इकडे भोजदेशांतील वृद्ध राजांना जेव्हां त्या दुरात्म्यापासून पीडा होऊं लागली ३३ तेव्हां ज्ञातिरक्षणाची इच्छा करणाऱ्या त्या राजांनीं आमचा आश्रय केला व तदनंतर ती सौंदर्यसंपन्न आहुककन्या अक्रूराला दिली ३४. असो. बलरामाच्या साहाय्यानें मी आपल्या आप्तवर्गाचें एक (मोठें) कार्य केलें; ह्मणजे मी व बलराम ह्या दोघांनीं कंस व सुनाम ह्यांचा वध केला ३५. परंतु, तें भय नाहींसें होऊन जरासंध जेव्हां उठला तेव्हां "यत्किंचितूही विसावा न घेतां मोठमोठ्या शत्रुघातक अस्त्रांनीं आह्मी एकसारखे तीनशें वर्षेंपर्यंत जरी वध करीत सुटलों तरी ह्या जरासंधाचें सैन्य नाहींसें करण्यास समर्थ होणार नाहीं" असा विचार मनांत आणून त्या सुमारें अठरा राजकुलांनीं

अनारमन्तो निघ्नन्तो महास्त्रैः शत्रुघातिभिः । न हन्यामो वयं तस्य त्रिभिर्वर्षशतैर्बलम् ३७ तस्य ह्यमरसंकाशो बलेन बलिनां वरौ । नामभ्यां हंसडिम्भकावशस्त्रनिधनावुभौ ३८ तावुभौ सहितौ वीरौ जरासन्धश्च वीर्यवान् । त्रयस्त्रयाणां लोकानां पर्याप्ता इति मे मतिः ३९ न हि केवलमस्माकं यावन्तोन्ये च पार्थिवाः । तथैव तेषामासीच्च बुद्धिर्बुद्धिमतां वर ४० अथ हंस इति ख्यातः कश्चिदासीन्महान्नृपः । रामेण स हतस्तत्र संग्रामेष्टादशावरे ४१ हतो हंस इति प्रोक्तमथ केनापि भारत । तच्छ्रुत्वा डिम्भको राजन्यमुनाम्भस्यमज्जत ४२ विना हंसेन लोकेस्मिन्नाहं जीवितुमुत्सहे । इत्येतां मतिमास्थाय डिम्भको निधनं गतः ४३ तथा तु डिम्भकं श्रुत्वा हंसः परपुरंजयः । प्रपेदे यमुनामेव सोपि तस्यां न्यमज्जत ४४ तौ स राजा जरासन्धः श्रुत्वा च निधनं गतौ । पुरं शून्येन मनसा प्रययौ भरतर्षभ ४५ ततो वयममित्रघ्न तस्मिन्प्रतिगते नृपे । पुनरानन्दिनः सर्वे मथुरायां वसामहे ४६ यदा त्वभ्येत्य पितरं सा वै राजीवलोचना । कंस-

---

हा (पूर्वी सांगितल्याप्रमाणें पश्चिमदिशेस निघून जाण्याचा) बेत केला ३६, ३७. कारण, सामर्थ्यानें देवांसमान असून बलवानांमध्यें श्रेष्ठ असलेले आणि शस्त्रांपासून मरण न येणारे असे हंस व डिंभक ह्या नांवांचे दोन वीर त्या जरासंधाकडे होते ३८. ते उभयतां वीर आणि सामर्थ्यवान् जरासंध हे तिघे तीन लोकांना (ह्मणजे त्रैलोक्याला) भारी होते असें मला वाटतें ३९. हे बुद्धिमानांमध्यें श्रेष्ठ युधिष्ठिरा, असें केवळ आमचेंच मत नसून इतर जितके ह्मणून राजे आहेत त्यांचेंही मत असेंच आहे. असो ४०. हंस ह्मणून प्रख्यात असलेला एक मोठा राजा होऊन गेला. त्याला बलरामानें अष्टादशराजकुलसंबंधीं संग्रामामध्यें मूर्छित केला असल्यामुळें ४१ "हंस मारला गेला" असें कोणीं सांगितलें. तेव्हां, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरराजा, तें ऐकून डिंभक यमुनेच्या उदकामध्यें मग्न झाला ४२. सारांश, "हंसावांचून ह्या जगतामध्यें जिवंत राहण्याची आपली इच्छा नाहीं" असा विचार करून डिंभक मरण पावला ४३ आणि डिंभकाची त्याप्रमाणें अवस्था झाल्याचें ऐकून शत्रुसमुदाय जिंकणारा हंसही यमुनेवरच गेला आणि त्यानेंही आपल्याला तिच्या (उदका) मध्यें बुडवून घेतलें ४४. तेव्हां ते हंसडिंभक मरण पावल्याचें श्रवण करून, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, तो जरासंध राजा खिन्न मनानें नगरांत चालता झाला ४५ व हे शत्रुनाशका धर्मराजा, तो जरासंध राजा आपल्या नगराला परत गेल्यापासून आह्मी सर्वजण आनंदित होऊन मथुरेमध्यें राहूं लागलों ४६. परंतु, हे नृपश्रेष्ठा शत्रुनाशका युधिष्ठिरा, पतिमरणानें दुःखित झालेली कमलाक्षी कंसभार्या

भार्या जरासन्धं दुहिता मागधं नृपम् ४७ चोदयत्येव राजेन्द्र पतिव्यसनदुःखिता । पतिघ्नं मे जहीत्येवं पुनः पुनररिन्दम ४८ ततो वयं महाराज तं मन्त्रं पूर्वमन्त्रितम् । संस्मरन्तो विमनसो व्यपयाता नराधिप ४९ पृथक्त्वेन महाराज संक्षिप्य महतीं श्रियम् । पलायामो भयात्तस्य ससुतज्ञातिबान्धवाः ५० इति संचिन्त्य सर्वे स्म प्रतीचीं दिशमाश्रिताः । कुशस्थलीं पुरीं रम्यां रैवतेनोपशोभिताम् ५१ ततो निवेशं तस्यां च कृतवन्तो वयं नृप । तथैव दुर्गसंस्कारं देवैरपि दुरासदम् ५२ स्त्रियोपि यस्यां युध्येयुः किमु वृष्णिमहारथाः । तस्यां वयममित्रघ्न निवसामोकुतोभयाः ५३ आलोच्य गिरिमुख्यं तं मागधं तीर्णमेव च । माधवाः कुरुशार्दूल परां मुदमवाप्नुवन् ५४ एवं वयं जरासन्धादभितः कृतकिल्बिषाः । सामर्थ्यवन्तः संबन्धाद्गोमन्तं समुपाश्रिताः ५५ त्रियोजनायतं सद्म त्रिस्कन्धं योजनावधि । योजनान्ते शतद्वारं वीरविक्रमतोरणम् ५६ अष्टादशावरैर्नद्धं

म्हणजे जरासंधाची कन्या जेव्हां आपल्या त्या मगधदेशाधिपति पित्या जरासंधाकडे जाऊन ४७ " माझ्या पतिघातक्याचा वध कर " म्हणून फिरून फिरून त्याला सांगूं लागली ४८ तेव्हां, हे महाराज युधिष्ठिरराजा, पूर्वी केलेल्या त्या बेताचें आम्हांला स्मरण होऊन आम्हीं खिन्न मनानें मथुरेंतून बाहेर पडलों ४९ आणि हे महाराजा, त्या जरासंधाच्या भीतीनें " आपली एकत्र असल्यामुळें प्रचंड असलेली संपत्ति पृथक् पृथक् विभागांनीं कमी करून पुत्र, ज्ञाति व बांधव ह्यांसहवर्तमान पळून जावें " ५० असा आम्हीं विचार केला आणि सर्वजण पश्चिम दिशेला जाऊन रैवतपर्वतानें सुशोभित आणि रम्य अशा द्वारवती नगरीमध्यें गेलों ५१. तदनंतर हे धर्मराजा, त्या नगरीमध्यें आम्ही वास्तव्य करूं लागून देवांनाही सर करण्यास अशक्य असा एक कोट त्या ठिकाणीं तयार केला ५२. हे शत्रुनाशका युधिष्ठिरा, वृष्णिकुलोत्पन्न महारथ्यांची तर गोष्टच नको; परंतु, स्त्रिया देखील (कोट असल्यामुळें) ज्या ठिकाणीं युद्ध करतील अशा त्या नगरीमध्यें आम्ही निर्भयपणें रहात असतों ५३. हे कुरुवंशजश्रेष्ठा, मगधदेश पार पडल्याचें पाहून आणि तो श्रेष्ठ रैवतकपर्वत अवलोकन करून माधवसंज्ञक यादवांना पराकाष्ठेचा आनंद झाला ५४. ह्याप्रमाणें जरासंधापासून सर्वस्वीं दुःखित झालेले आम्ही त्याचें निराकरण करण्यास समर्थ असूनही त्याच्याशीं आप्तसंबंध असल्यामुळें तो प्रदेश सोडून देऊन गाईंनीं भरलेल्या ह्या रैवतक पर्वताचा आश्रय करून राहिलों ५५. त्या पर्वताच्या आश्रयानें असलेलें आमचें वसतिस्थान तीन योजनें लांब, तीन भागांनीं युक्त व एक योजन रुंद असें आहे आणि एक एक योजनाच्या अंतरावर त्या

क्षत्रियैर्युद्धदुर्मदैः । अष्टादशसहस्राणि भ्रातॄणां सन्ति नः कुले ५७ आहुकस्य शतं पुत्रा एकैकस्त्रिदशावरः । चारुदेष्णः सह भ्रात्रा चक्रदेवोथ सात्यकिः ५८ अहं च रौहिणेयश्च साम्बः प्रद्युम्न एव च । एवमेते रथाः सप्त राजन्नन्यान्निबोध मे ५९ कृतवर्मा ह्यनाधृष्टिः समीकः समितिंजयः । कङ्कः शङ्कुश्च कुन्तिश्च सप्तैते वै महारथाः ॥ पुत्रौ चान्धकभोजस्य वृद्धो राजा च ते दश ६० वज्रसंहनना वीरा वीर्यवन्तो महारथाः । स्मरन्तो मध्यमं देशं वृष्णिमध्ये व्यवस्थिताः ६१ स त्वं सम्राड्गुणैर्युक्तः सदा भरतसत्तम । क्षत्रे सम्राजमात्मानं कर्तुमर्हसि भारत ६२ न तु शक्यं जरासन्धे जीवमाने महाबले । राजसूयस्त्वयावाप्तुमेषा राजन्मतिर्मम ६३ तेन रुद्धा हि राजानः सर्वे जित्वा गिरिव्रजे । कन्दरे पर्वतेन्द्रस्य सिंहेनेव महाद्विपाः ६४ स हि राजा जरासन्धो यियक्षुर्वसुधाधिपैः । महादेवं महात्मानमुमापतिमरिन्दम ६५ आराध्य तपसोग्रेण निर्जितास्तेन पार्थिवाः ।

स्थानाला शंभर शंभर द्वारें असून वीरपराक्रमरूप तोरणांनीं तें युक्त आहे ५६. सारांश, युद्धामध्यें अजिंक्य असे निदान अठरा क्षत्रिय वीरांचें समुदाय त्या स्थानीं तयार असतात. असो. आमच्या कुळामध्यें अठरा हजार भाउबंद आहेत ५७. आहुकाचे शंभर पुत्र असून प्रत्येक पुत्र देवतुल्य आहे. भ्रात्यासहवर्तमान चारुदेष्ण, चक्रदेव, सात्यकि ५८, मी, बलराम, सांब व प्रद्युम्न असे सात रथी आहेत. आतां हे राजा दुसरे मी सांगतों ते ऐक ५९. कृतवर्मा, अनाधृष्टि, समीक, सामितिंजय, कंक, शंकु व कुंति हे सात महारथी असून अंधकभोजाचे दोन पुत्र व तो वृद्ध राजा हेही तीन आणखी असल्यामुळें एकंदर महारथी दहा आहेत ६०. वज्रासारख्या दृढ शरीरानें युक्त असलेले ते वीर्यवान् महारथी वीर (वयोवृद्ध अंधकभोज व त्याचे उभयतां पुत्र) वारंवार मध्यदेश (ह्मणजे मथुरानगरी ज्या प्रदेशांत आहे तो प्रदेश) मनामध्यें आणीत असून वृष्णींमध्यें राहिले आहेत ६१. असो. हे भरतोत्तमा, सार्वभौम राजाला अवश्यक असलेल्या गुणांनीं तूं संपन्न आहेस. करितां क्षत्रियांमध्यें स्वतःला सार्वभौम करून घेणें तुला योग्य आहे ६२. परंतु, हे राजा, महाबलाढ्य जरासंध जिवंत असतांना तुझ्या हातून राजसूय सिद्धीस जाणें शक्य नाही असें माझें मत आहे ६३. हिमालयपर्वताच्या गुहेमध्यें सिंहानें ठेविलेले गजच कीं काय अशाप्रकारें त्यानें सर्व राजे जिंकून गिरिव्रजसंज्ञकनगरामध्यें अडकावून ठेविले आहेत ६४. हे शत्रुदमना युधिष्ठिरा, त्या जरासंधराजानें महात्म्या उमापति महादेवाप्रीत्यर्थ भूपतींचा याग करण्याचें मनांत आणिलें आहे ६५. इतकेंच नव्हे परंतु, उग्र तपश्चर्येच्या योगानें महादेवाची आराधना करून

प्रतिज्ञायाश्च पारं स गतः पार्थिवसत्तम ६६ स हि निर्जित्य निर्जित्य पार्थिवान्पृतनागतान् । पुरमानीय बद्ध्वा च चकार पुरुषव्रजम् ६७ वयं चैव महाराज जरासन्धभयात्तदा । मथुरां संपरित्यज्य गता द्वारवतीं पुरीम् ६८ यदि त्वेनं महाराज यज्ञं प्राप्तुमभीप्ससि । यतस्व तेषां मोक्षाय जरासन्धवधाय च ६९ समारम्भो न शक्योयमन्यथा कुरुनन्दन । राजसूयस्य कार्त्स्न्येन कर्तुं मतिमतां वर ७० इत्येषा मे मती राजन्यथा वा मन्यसेऽनघ । एवं गते ममाचक्ष्व स्वयं निश्चित्य हेतुभिः ७१ [६५२] इति श्रीमहाभा० सभापर्वणि राजसूयारम्भपर्वणि कृष्णवाक्ये चतुर्दशोऽध्यायः ॥१४॥

युधिष्ठिर उवाच ॥ उक्तं त्वया बुद्धिमतां यन्नान्यो वक्तुमर्हति । संशयानां हि निर्मोक्ता त्वन्नान्यो विद्यते भुवि १ गृहे गृहे हि राजानः स्वस्य स्वस्य प्रियंकराः । न च साम्राज्यमाप्तास्ते सम्राट्शब्दो हि कृच्छ्रभाक् २ कथं परानुभावज्ञः स्वं प्रशंसितुमर्हति । परेण समवेतस्तु यः प्रशस्यः स पूज्यते ३

त्यानें सर्व राजे जिंकिले आणि हे नृपश्रेष्ठा त्यानें आपली प्रतिज्ञा सिद्धीस ने(ण्याच्या बेतात आणि)ली ६६. सैन्यासहवर्तमान असलेल्या राजांना जिंकून वारंवार त्यानें आपल्या नगरामध्यें आणिले आणि बांधून ठेवून त्यानें एक मनुष्यांची दावणच लावून तेथें ठेविली ६७. तेव्हां हे महाराजा, जरासंधाच्या भीतीनें आम्हीं आपले मथुरानगरी सोडून द्वारवतीनामक नगरीला गेलों ६८. तस्मात्, हे महाराजा, जर हा राजसूययज्ञ सिद्धीस नेण्याची तुझी इच्छा असेल तर त्या राजांची सुटका व जरासंधाचा वध करण्याविषयीं तूं प्रयत्न कर ६९. कारण, हे विवेकिश्रेष्ठ कुरुनंदना युधिष्ठिरा, नाहींतर हा राजसूयाचा समारंभ पूर्णपणें पार पडणें शक्य नाहीं ७०. असो. हे निष्पापा राजा, तुला काय वाटत असेल तें वेगळें; परंतु, माझें मत हें असें आहे. करितां, असा प्रकार असल्यामुळें तूं स्वतः सप्रमाण विचार करून मला काय तें सांग ७१. ह्याप्रमाणें ० सभापर्वांतील राजसूयारंभपर्वांपैकीं श्रीकृष्णांच्या भाषणाविषयीं चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ १४॥

युधिष्ठिर ह्मणतोः—(हे राजा) दुसऱ्या कोणालाही जें सांगतां येणार नाहीं तें तूं बुद्धिमानानें मला सांगितलें आहेस. खरोखर संशयनिरसन करणारा तुझ्यावांचून ह्या पृथ्वीवर दुसरा कोणीही नाहीं १. आपआपणांला प्रिय असलेली गोष्ट करणारे राजे घरोघर आहेत (आणि सार्वभौमपद प्राप्त होण्याची त्यांना इच्छाही असणार हें उघड आहे). परंतु, त्यांना सार्वभौमपद प्राप्त झालें नाहीं. सारांश, सम्राट् हा शब्द मोठा कठीण आहे २. शत्रूचें सामर्थ्य जाणणारा पुरुष स्वतःची प्रशंसा करण्यास योग्य होणार कसा ? शत्रूशीं गांठ पडली असतां जो प्रशंसनीय ठरतो त्यालाच

विशाला बहुला भूमिर्बहुरत्नसमाचिता । दूरं गत्वा विजानाति श्रेयो वृष्णिकुलोद्वह ४ शममेव परं मन्ये शमात्क्षेमं भवेन्मम । आरम्भे पारमेष्ठ्यंतु न प्राप्यमिति मे मतिः ५ एवमेते हि जानन्ति कुले जाता मनस्विनः । कश्चित्कदाचिदेतेषां भवेच्छ्रेष्ठो जनार्दन ६ वयं चैव महाभाग जरासन्धभयात्तदा । शङ्किताः स्म महाभाग दौरात्म्यात्तस्य चानघ ७ अहं हि तव दुर्धर्ष भुजवीर्याश्रयः प्रभो । नात्मानं बलिनं मन्ये त्वयि तस्माद्विशङ्किते ८ त्वत्सकाशाच्च रामाच्च भीमसेनाच्च माधव । अर्जुनाद्वा महाबाहो हन्तुं शक्यो न वेति वै ९ एवं जानन्हि वार्ष्णेय विमृशामि पुनः पुनः । त्वं मे प्रमाणभूतोसि सर्वकार्येषु केशव १० तच्छ्रुत्वा चाब्रवीद्भीमो वाक्यं वाक्यविशारदः ११ भीम उवाच ॥ अनारम्भपरो राजा वल्मीक इव सीदति । दुर्बलश्चानुपायेन बलिनं योधितिष्ठति १२ अत-

---

मान मिळत असतो ३. हे वृष्णिकुलश्रेष्ठा श्रीकृष्णा, ही प्रचंड पृथ्वी विस्तीर्ण असून बहुरत्नांनीं भरलेली आहे. करितां, आपल्याला हितावह काय आहे हें (आपल्या भोंवतालचीच परिस्थिति अवलोकन करून समजत नाहीं) जरा दूर गेलें ह्मणजे समजतें ४. खरोखर शमापासूनच माझें कल्याण होणार असून शमच मला श्रेष्ठ वाटत आहे. यज्ञाला आरंभ केला असतां पारमेष्ठ्य(ह्मणजे सार्वभौमपद) प्राप्त होईल असें मला वाटत नाहीं ५. शमच कल्याणकारक होईल ही गोष्ट माझ्याप्रमाणें ह्या कुलीन व विवेकी (भीमसेनप्रभृति) पुरुषांनाही समजत असून ह्यांच्यापैकीं कधीं काळीं तरी कोणी सर्वांना जिंकण्यास समर्थ होईल कीं काय हेंही, हे जनार्दना, ते जाणीत आहेत ६. सारांश, हे महाभाग्यवान् श्रीकृष्णा व हे महाभाग्यवान् निष्पापा, जरासंधाच्या भयामुळें व त्याच्या दुष्ट स्वभावामुळें आमचें तर मन साशंक झालें आहे ७.तात्पर्य, हे अजिंक्य प्रभो, तुला जर त्याची भीति वाटत आहे तर तुझ्या बाहुवीर्याचे आश्रयाला असलेल्या आपल्या स्वतःला मी अर्थातच बलवान् समजत नाहीं ८. तथापि, हे वृष्णिकुलोत्पन्ना महापराक्रमी माधवा, तुह्मी अपार सामर्थ्यानें युक्त असल्याचें मी जाणीत असल्यामुळें तुह्मा चौघांच्या योगानें तरी—ह्मणजे तूं , बलराम भीमसेन आणि अर्जुन ह्यांच्या योगानें तरी—त्या जरासंधाचा वध होणें शक्य आहे किंवा नाहीं ह्याचा मी पुनः पुनः विचार करीत आहें. असो. हे केशवा, कोणतीही गोष्ट करण्याविषयीं तुझें सांगणें मला प्रमाणभूत आहे९,१०. हें युधिष्ठिराचें भाषण श्रवण करून संभाषण करण्यामध्यें निपुण असलेला भीमसेन ह्मणाला ११ “ कांहीं एक न करितां स्वस्थ बसणारा राजा वारुळाप्रमाणें आपोआप नाश पावतो व बलिष्ठावर अवलंबून असलेल्या दुर्बलाचीही

न्द्रिनस्तु प्रायेण दुर्बलो बलिनं रिपुम् । जयेत्सम्यक्प्रयोगेण नित्यार्थानात्मनो हितान् १३ कृष्णे नयो मयि बलं जयः पार्थे धनंजये । मागधं साधयिष्याम इष्टिं त्रय इवाग्नयः १४ कृष्ण उवाच ॥ अर्थानारभते बालो नानुबन्धमवेक्षते । तस्मादरिं न मृष्यन्ति बालमर्थपरायणम् १५ जित्वा जय्यान्यौवनाश्विः पालनाच्च भगीरथः । कार्तवीर्यस्तपोवीर्याद्बलात्तु भरतो विभुः १६ ऋद्ध्या मरुत्तस्तान्पञ्च सम्राजस्त्वनुशुश्रुम । साम्राज्यमिच्छतस्ते तु सर्वाकारं युधिष्ठिर १७ निग्राह्यलक्षणं प्राप्तिर्धर्मार्थनयलक्षणैः । मन्त्रान्वश्याननुमृशन्नेवमेव सतां युगे १८ निग्राह्यलक्षणं प्राप्तो धर्मार्थनयलक्षणैः । बार्हद्रथो जरासन्धस्तद्विद्धि भरतर्षभ १९ न चैनमनुरुध्यन्ते कुलान्येकशतं नृपाः । तस्मादिह बलादेव साम्राज्यं

अवस्था (स्वतंत्र होण्याचा कांहीं) उपाय न योजिल्यामुळें तशीच होत असते १२. प्रायः दुर्लक्ष्य करीत नसलेला पुरुष दुर्बल जरी असला तरी चांगल्या उपायानें तो बलिष्ठ शत्रूला जिंकून राजनीतीनें प्राप्त होणाऱ्या स्वहितकारक गोष्टीही प्राप्त करून घेतो १३. कृष्णाजवळ नीति, माझ्यापाशीं बल आणि अर्जुनाचे ठिकाणीं जय आहे. तस्मात्, तीन अग्नि ज्याप्रमाणें इष्टि पार पाडतात त्याचप्रमाणें आह्मींही तिघे मगधदेशाधिपति जरासंधाचा समाचार घेऊं १४. श्रीकृष्ण ह्मणतातः—बालिश पुरुष एकाएकीं कामाला हात घालतो; परंतु, परिणाम मुळींच लक्ष्यांत आणीत नाहीं. ह्मणून लोक देखील उद्देश सिद्धीस नेण्याला उतावीळ झालेल्या बालिश शत्रूची खिजगणती करीत नाहींत १५. जिंकण्यास योग्य अशा शत्रूंना जिंकून मांधाता, पालनामुळें भगीरथ तपःप्रभावानें कार्तवीर्य , बलामुळें भरत १६ आणि वृद्धीच्या योगानें मरुत्त असे पांच पुरुष एकेक गुणानें साम्राज्यपदाला प्राप्त झाल्याचें आह्मीं ऐकिलें आहे. साम्राज्य पदाचीं पांच लक्षणें आहेत. निग्रह करण्यास योग्य असलेल्या शत्रूंना जिंकणें, परिपालन करणें, अप्राप्त असेल तें प्राप्त करून घेणें, प्राप्त झालेल्याची वृद्धि करणें आणि नीतीचें बल असणें. स्वकृतीनें साध्य होणाऱ्या मसलतींना आमच्याच प्रमाणें चांगल्या मंत्रिसमुदायामध्यें विचार करून शत्रुपराजयरूप साम्राज्यपद जरासंधानें प्राप्त करून घेतलें असून अप्राप्तप्राप्ति, लब्धपरिपालन व राजनीति ह्या साम्राज्यलक्षणांनींही तो युक्त आहे असें तूं समज. सारांश, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, सर्व लक्षणांनीं युक्त अशा साम्राज्याची इच्छा करणाऱ्या तुला बृहद्रथपुत्र जरासंध प्रतिकूल आहे १७,१८,१९. (आतां " जरासंध जर सम्राट् आहेच तर तो असेना कां ? आपल्याला होऊन काय कर्तव्य आहे ? " असें ह्मणशील तर हे युधिष्ठिरा, त्यानें

कुरुते हि मः २० रत्नभाजो हि राजानो जरासन्धमुपासते । न च तुष्यति तेनापि बाल्यादनयमास्थितः २१ मूर्धाभिषिक्तं नृपतिं प्रधानपुरुषो बलात् । आदत्ते न च नो दृष्टोभागः पुरुषतः क्वचित् २२ एवं सर्वान्वशे चक्रे जरासंधः शतावरान् । तं दुर्बलतरो राजा कथं पार्थ उपैष्यति २३ प्रोक्षितानां प्रमृष्टानां राज्ञां पशुपतेर्गृहे । पशूनामिव का प्रीतिर्जीविते भरतर्षभ २४ क्षत्रियः शस्त्रमरणो यदा भवति सत्कृतः । ततः स्म मागधं संख्ये प्रतिबाधेम यद्वयम् २५ षडशीतिः समानीताः शेषा राजंश्चतुर्दश । जरासन्धेन राजानस्ततः क्रूरं प्रवर्त्स्यते २६ प्राप्नुयात्स यशो दीप्तं तत्र यो विघ्नमाचरेत् । जयेद्यश्च जरासन्धं स सम्राण्नियतं भवेत् २७ [६७९]
इति० सभापर्वणि राजसूयारम्भपर्वणि कृष्णवाक्ये पञ्चदशोऽध्यायः ॥१५॥
युधिष्ठिर उवाच ॥ सम्राड्गुणमभीप्सन्वै युष्मान्स्वार्थपरायणः । कथं

जिंकून आणिलेले) सुमारे शंभर राजे त्याची आज्ञा पाळण्याची मनापासून इच्छा करीत नाहींत. ह्मणून तो बलात्कारानेंच ह्या पृथ्वीवर साम्राज्याचा अधिकार चालवीत आहे २०. रत्नसंपन्न राजे जरासंधाची सेवा करीत असतात; तथापि, बालिशपणामुळें नीतीला सोडून वागणाऱ्या त्या जरासंधाला संतोष होत नाहीं २१. जरासंधाचा प्रधानपुरुष मूर्धाभिषिक्त राजाला खेचून आणितो (आणि जरासंध त्याच्या द्रव्याचा अपहार करितो). मूर्धाभिषिक्त पुरुषांच्या द्रव्याचा स्वीकार बलात्कारानें जरासंधानें केला नाहीं असें कधीं आमच्या दृष्टोत्पत्तीसच आलें नाहीं २२. सारांश, ह्याप्रमाणें जवळ जवळ शंभर राजे जरासंधानें पादाक्रान्त केले आहेत. तेव्हां अतिशय दुर्बळ असलेल्या तुज कुंतीपुत्रासारख्या राजानें त्याच्याशीं सामना कसा करावा? २३. हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, प्रोक्षण करून पशुपति रुद्राच्या नांवानें बलि देण्याकरितां पशुप्रमाणें घरांत ठेविलेल्या राजांना अशाच अवस्थेंत जीवंत रहाण्याची तरी अपेक्षा कोठून असणार? २४ असो. शस्त्रापासून मरण येणाऱ्या क्षत्रियांचा परलोकामध्यें सत्कार होत असतो. तस्मात्, संग्रामामध्यें मगधाधिपति जरासंधाशीं आह्मीं दोन हात करून मरावें हें बरें २५. हे युधिष्ठिर राजा, शंभरांपैकीं जरासंधानें शहांयशी राजे तर आणून ठेविले आहेत व चवदा अद्यापि कमी आहेत. तेव्हां त्यांची भरती झाली ह्मणजे पशुपतीला बलि देण्याचें क्रूर कर्म तो जरासंध सुरू करील २६. तस्मात्, त्या कृत्याला जो विघ्न आणील त्याला उज्वल कीर्ति प्राप्त होईल आणि जो जरासंधाला जिंकील तो निश्चयेंकरून सम्राट् होईल २७. ह्याप्रमाणें ०श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील राजसूयारंभपर्वांपैकीं श्रीकृष्णाच्या भाषणाविषयीं पंधरावा अध्याय समाप्त झाला ॥१५॥

प्रहिणुयां कृष्ण सोऽहं केवलसाहसात् १ भीमार्जुनावुभौ नेत्रे मनो मन्ये जनार्दनम् । मनश्चक्षुर्विहीनस्य कीदृशं जीवितं भवेत् २ जरासन्धबलं प्राप्य दुष्पारं भीमविक्रमम् । यमो हि न विजेताजौ तत्र वः किं विचेष्टितम् ३ अस्मिंस्त्वर्थान्तरे युक्तमनर्थः प्रतिपद्यते । तस्मान्न प्रतिपत्तिस्तु कार्या युक्ता मता मम ४ यथाहं विमृशाम्येकस्तत्तावच्छ्रूयतां मम । संन्यासं रोचये साधु कार्यस्यास्य जनार्दन ५ प्रतिहन्ति मनो मेद्य राजसूयो दुराहरः ६ वैशम्पायन उवाच ॥ पार्थः प्राप्य धनुः श्रेष्ठमक्षय्ये च महेषुधी । रथं ध्वजं सभां चैव युधिष्ठिरमभाषत ७ अर्जुन उवाच ॥ धनुः शस्त्रं शरा वीर्यं पक्षो भूमिर्यशो बलम् । प्राप्तमेतन्मया राजन्दुष्प्रापं यदभीप्सितम् ८ कुले जन्म प्रशंसन्ति वैद्याः साधु सुनिष्ठिताः । बलेन सदृशं नास्ति वीर्यं तु मम रोचते ९ कृतवीर्यकुले जातो निर्वीर्यः किं करिष्यति । निर्वीर्ये तु कुले जातो वीर्यवांस्तु विशिष्यते १० क्षत्रियः सर्वशो राजन्यस्य वृत्तिर्द्विष-

---

युधिष्ठिर ह्मणतोः—हे कृष्णा, साम्राज्यपदाची इच्छा धरून व स्वार्थपरायण बनून केवल साहसानें मी तुह्मांला जरासंधाकडे कसें बरें पाठवीन? १. भीमसेन आणि अर्जुन हे उभयतां माझे नेत्र असून तुज जनार्दनाला मी मन समजत आहें. तर मन आणि नेत्र ह्यांनीं हीन झाल्यावर माझें जीवन तरी कसें होणार ? २. भयंकर पराक्रमानें युक्त व अपार अशा जरासंधबलाशीं गांठ पडल्यावर साक्षात् यमालाही संग्राममध्यें जय येणार नाहीं; तेव्हां तेथें तुमचा पाड काय ? ३. असलें भलतेंच कार्य करण्याला प्रवृत्त झालेल्या पुरुषावर अनर्थ गुदरत असतो. तस्मात् , राजसूय यागाचा बेत करणें मला योग्य वाटत नाहीं व तो याग होणें शक्यही दिसत नाहीं ४. हे जनार्दना, मला एकट्याला जो विचार सुचत आहे तो तुह्मी ऐका. मला ह्या सर्व कर्मांचा संन्यास करावासा वाटतो. कारण, राजसूयाविषयीं माझ्या मनाला उगीच रुखरुख मात्र लागून राहिली असून तो याग आपल्या हातून होणें दुर्घट आहे ५,६. वैशंपायन सांगतातः—(ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें भाषण केलें असतां) श्रेष्ठ धनुष्य गांडीव, मोठमोठे अक्षय्य भाते, रथ, ध्वज आणि सभा हीं लक्ष्यांत आणून अर्जुन युधिष्ठिराला ह्मणाला ७ " हे राजा, धनुष्य, शस्त्र, बाण, वीर्य, पक्षपाति वासुदेव, भूमि, यश व बल ह्या गोष्टी दुष्प्राप असतांनाही मला प्राप्त झाल्या आहेत ८. शास्त्रामध्यें चांगले निपुण असलेले विद्वान् लोक सत्कुलामध्यें जन्म होणें उत्तम ह्मणून ह्मणत असतात; परंतु, माझ्या मतानें वीर्यासारखी कोणतीही वस्तु चांगली नाहीं ह्मणून वीर्यच मला पसंत आहे ९. निर्वीर्य पुरुष कृतवीर्याच्या कुलामध्यें जरी उत्पन्न झाला तरी करणार काय ?

ज्जये । सर्वैर्गुणैर्विहीनोऽपि वीर्यवान्हि तरेद्रिपून् ११ सर्वैरपि गुणैर्युक्तो निर्वीर्यः किं करिष्यति । गुणीभूता गुणाः सर्वे तिष्ठन्ति हि पराक्रमे १२ जयस्य हेतुः सिद्धिर्हि कर्म दैवं च संश्रितम् । संयुक्तो हि बलैः कश्चित्प्रमादान्नोपयुज्यते ॥ तेन द्वारेण शत्रुभ्यः क्षीयते सबलो रिपुः १३ दैन्यं यथा बलवति तथा मोहो बलान्विते । तावुभौ नाशकौ हेतू राज्ञा त्याज्यौ जयार्थिना १४ जरासन्धविनाशं च राज्ञां च परिरक्षणम् । यदि कुर्याम यज्ञार्थं किं ततः परमं भवेत् १५ अनारम्भे हि नियतो भवेदगुणनिश्चयः । गुणान्निःसंशयाद्राजन्नैर्गुण्यं मन्यसे कथम् १६ कषायं सुलभं पश्चान्मुनीनां शममिच्छताम् । साम्राज्यं तु भवेच्छक्यं वयं योत्स्यामहे परान् १७

निर्वीर्य कुलामध्येंही उत्पन्न झालेला वीर्यवान् पुरुषच (वीरकुलामध्यें जन्मास आलेल्या वीर्यहीन पुरुषापेक्षां खरोखर) श्रेष्ठ आहे १०. हे राजा, शत्रूंचा पराभव करण्याकडेच ज्याची सर्वस्वीं प्रवृत्ति असते तोच खरा खरा क्षत्रिय होय. सारांश, वीर्यवान् पुरुष (कुलप्रभृति इतर) सर्व गुणांनीं जरी हीन असला तरी तो शत्रूंना जिंकील ११. परंतु, (कुल, सौंदर्य इत्यादि) सर्व गुणांनीं संपन्न असलेलाही पुरुष जर वीर्यहीन असेल तर करणार काय ? पराक्रमाचे ठिकाणीं सर्व गुण अनेक पटींनीं वृद्धिंगत होऊन रहात असतात १२. उत्कट इच्छा हेंच जयाचें कारण असून ती इच्छा सफल होणें पौरुषप्रयत्न व दैव ह्यांवर अवलंबून आहे. तथापि, ह्या बलांनीं युक्त असलेलाही एखादा पुरुष हलगरजीपणामुळें मनांतील कार्य करण्यास समर्थ होत नाहीं व त्या प्रमादरूपद्वाराच्याच योगानें शत्रूंपासून बलाढ्य अशा प्रतिशत्रूचा सैन्यासह नाश होतो १३. बलाढ्य पुरुषाचे ठिकाणीं दैन्य व मोह असल्यास तीं दोन्ही नाशाला कारणीभूत होतात. ह्याकरितां, त्या दोहोंचाही विजयेच्छु राजानें त्याग करावा १४. जरासंधाचा वध आणि राजांचें रक्षण हीं जर आम्हीं यज्ञाकरितां केलीं तर त्यापेक्षां उत्कृष्ट कृत्य तें काय असणार आहे ? १५ कार्याला आरंभच जर न केला तर पुरुषाचे ठिकाणीं त्या कार्याला अवश्यक असलेल्या गुणांचा अभाव आहे हें अर्थातच निश्चित होतें. (आतां " कार्याला आरंभ करूनही जर त्यांत जय आला नाहीं तर काय उपयोग ? " म्हणून विचारशील तर) हे राजा, (गांडीव धनुष्य, वानरचिन्हांकित ध्वज, अग्नीनें दिलेला दिव्य रथ वगैरे) गुणसंपत्ति आपणापाशीं निःसंशय असतांना तूं (जरासंधाचा वध करण्यास) असमर्थता आहे असें मानतोस तरी कां म्हणून ? १६. अरे, शम इच्छिणाऱ्या मुनींना योग्य असलेल्या छाटया मिळण्यास कांहीं आपल्याला पंचाईत पडणार नाहीं. (सारांश, जरासंधाला

[६९६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां सभापर्वणि राजसूयारम्भपर्वणि जरासन्धवधमन्त्रणे षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

वासुदेव उवाच ॥ जातस्य भारते वंशे तथा कुन्त्याः सुतस्य च ।
या वै युक्ता मतिः सेयमर्जुनेन प्रदर्शिता १ न स्म मृत्युं वयं विद्म रात्रौ
वा यदि वा दिवा । न चापि कंचिदमरमयुद्धेनानुशुश्रुम २ एताव-
देव पुरुषः कार्यं हृदयतोषणम् । नयेन विधिदृष्टेन यदुपक्रमते परान् ३
सुनयस्यानपायस्य संयोगे परमः क्रमः । संगत्या जायतेसाम्यं साम्यं च
न भवेद्द्वयोः ४ अनयस्यानुपायस्य संयुगे परमः क्षयः । संशयो जायते
साम्याज्जयश्च न भवेद्द्वयोः ५ ते वयं नयमास्थाय शत्रुदेहसमीपगाः । कथ-

---

जिंकण्याचें आपणांला सामर्थ्य नाहीं अशी कल्पना करून बापडा संन्यास केव्हांही घेता येईल. परंतु, तूर्त) साम्राज्य पद प्राप्त होणें शक्य आहे. ह्या करितां, आह्मी शत्रूंशीं युद्ध करूं १७. ह्याप्रमाणें० लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील राजसूयारंभपर्वांपैकीं जरासंधवधाची वाटाघाट करण्याविषयीं सोळावा अध्याय समाप्त झाला ॥ १६ ॥

श्रीवासुदेव ह्मणतातः—भरताच्या वंशांत उत्पन्न होऊन कुंतीचे उदरीं आलेल्या पुत्राची जी मति असणें योग्य आहे ती ही अर्जुनानें (आपल्या ह्या आतांच्या भाषणांत) दर्शविली १. अरे, मृत्यु रात्रीं येणार किंवा दिवसा येणार हें सुद्धां (जर) आह्मी जाणीत नाहीं आणि युद्ध न करण्यामुळें कोणी अमर झाल्याचेंही (जर) आमच्या ऐकण्यांत नाहीं (तर मरणाच्या भीतीनें युद्धाला तयार न होण्यांत अर्थ काय ?) २. नीतिशास्त्रांत सांगितलेल्या नीतीनें शत्रूंना जिंकणें यांतच पुरुषांनीं आपल्या मनाला संतोष मानून घ्यावा ३. चांगला सल्ला मिळून दैव वगैरे गोष्टी जर मध्यें आड आल्या नाहींत तर उत्कृष्ट प्रकारचा उपक्रम सिद्धीस जातो. ह्यामुळें शत्रूंची परस्पर गांठ पडल्यास त्यांच्यामध्यें साम्य नसल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें (ह्मणजे दोघां शत्रूंची गांठ पडल्यास कोणाचा तरी एकाचा उत्कर्ष होत असल्याचें दिसतें); दोहोंचें साम्य कधीं होत नाहीं. (तस्मात् , युद्धावांचून अशक्तपणाचा निश्चय होणें संभवनीय नसल्यामुळें " आपणच अशक्त आहोंत " अशी शंका घेऊन स्वस्थ बसणें हें आपला पराभव होण्याचें ठरीव कारण आहे) ४. चांगल्या मसलतीचा अभाव आणि उपायहीनता ह्यांचा संयोग झाला असतां पराकाष्ठेचा नाश होतो. (आतां " आपल्या प्रमाणें आपला प्रतिपक्षीही जर नीतिप्रभृति गुणांनीं संपन्न असेल तर आपला जय कसा होणार ? " अशी शंका घेशील तर हे धर्मराजा) दोघांचेही जयप्राप्तीविषयींचे उपाय वगैरे जर सारखेच असतील तर जय अथवा पराजय दोघांचाही होणार नाहीं

मन्तं न गच्छेम वृक्षस्येव नदीरयाः ६ पररन्ध्रे समाक्रान्ताः स्वरन्ध्रावरणे स्थिताः ७ व्यूढानीकैरतिबलैर्न युध्येदरिभिः सह । इति बुद्धिमतां नीतिस्तन्ममापीह रोचते ८ अनवद्या ह्यसंबुद्धाः प्रविष्टाः शत्रुसद्म तत् । शत्रुदेहमुपाक्रम्य तं कामं प्राप्नुयामहे ९ एको ह्येव श्रियं नित्यं बिभर्ति पुरुषर्षभः । अन्तरात्मेव भूतानां तत्क्षयं नैव लक्षये १० अथ वैनं निहत्याजौ शेषेणापि समाहताः । प्राप्नुयाम ततः स्वर्गं ज्ञातित्राणपरायणाः ११ युधिष्ठिर उवाच॥ कृष्ण कोयं जरासन्धः किंवीर्यः किंपराक्रमः । यस्त्वां स्पृष्ट्वाग्निसदृशं न दग्धः शलभो यथा १२ कृष्ण उवाच ॥ शृणु राजञ्जरासन्धो यद्वीर्यो यत्पराक्रमः । यथा चोपेक्षितोस्माभिर्बहुशः कृतविप्रियः १३ अक्षौहिणीनां तिसृणां पतिः समरदर्पितः । राजा बृहद्रथो नाम मगधाधिपतिर्बली १४ रूपवान्वीर्यसंपन्नः श्रीमानतुलविक्रमः । नित्यं

(होत्रेही तटस्थ वृत्तीनें स्वस्थ बसतील) ५. तात्पर्य, शत्रूचें छिद्र पाहून पराक्रम गाजविणारे आणि आपलें छिद्र झांकण्याविषयीं तत्पर असलेले आह्मी—ज्याप्रमाणें नदीवेग समीप जाऊन वृक्षाचा नाश करितात त्याप्रमाणें—चांगल्या नीतीचें अवलंबन करून शत्रूंच्या देहासमीप गेलों असतां त्यांचा नाश करण्यास कसें बरें समर्थ होणार नाहीं ? ६,७. व्यवस्थित रीतीनें सैन्य लावून तयार असलेल्या प्रबल शत्रूंशीं युद्ध करूं नये अशी जी बुद्धिमान् पुरुषांची नीति आहे ती मलाही ह्या प्रसंगीं पसंत आहे ८. कोणत्याही प्रकारचा दोष लावून न घेतां आणि कोणाच्याही समजण्यांत न येतां आह्मी त्या शत्रूच्या गृहामध्यें प्रविष्ट होऊं आणि त्याच्या देहासमीप जाऊन तो आपला मनोरथ सिद्धीस नेऊं ९. प्राण्यांच्या अंतरात्म्याप्रमाणें तो पुरुषश्रेष्ठ जरासंध एकटाच साम्राज्यलक्ष्मीचा सर्वदा उपभोग घेत आहे; यास्तव, (अशा प्रकारची युक्ति योजल्यावांचून) त्या जरासंधाचा नाश होईल असें वाटत नाहीं १०. अथवा युद्धामध्यें आह्मी त्याचा वध केल्यावर त्याच्या अवशिष्ट सैन्यानें आमचा जर वध केला तर ज्ञातिबांधवांचें रक्षण करण्याविषयीं तत्पर असलेल्या आह्मांला स्वर्गप्राप्ति होईल ११. युधिष्ठिर प्रश्न करितो:—हे कृष्णा, अग्नितुल्य असलेल्या तुला स्पर्श करून जो पतंगाप्रमाणें दग्ध झाला नाहीं असा तो जरासंध आहे तरी कोण ? आणि त्याचें सामर्थ्य व पराक्रम हीं तरी कशीं आहेत ? १२. श्रीकृष्ण ह्मणतात:—हे राजा, जरासंधाचें वीर्य किती, त्याचा पराक्रम काय आणि पुष्कळ वेळां त्यानें आमचें अप्रिय केलें असूनही त्याची आह्मीं उपेक्षा कां केली हें आतां तूं श्रवण कर १३. तीन अक्षौहिणींचा अधिपति असल्यामुळें युद्धाविषयीं अभिमान आलेला बृहद्रथ ह्मणून एक बलाढ्य

दीक्षाङ्किततनुः शतक्रतुरिवापरः १५ तेजसा सूर्यसंकाशः क्षमया पृथिवीसमः । यमान्तकसमः क्रोधे श्रिया वैश्रवणोपमः १६ तस्याभिजनसंयुक्तैर्गुणैर्भरतसत्तम । व्याप्तेयं पृथिवी सर्वा सूर्यस्येव गभस्तिभिः १७ स काशिराजस्य सुते यमजे भरतर्षभ । उपयेमे महावीर्यो रूपद्रविणसंयुते १८ तयोश्चकार समयं मिथः स पुरुषर्षभः । नातिवर्तिष्य इत्येवं पत्नीभ्यां संनिधौ तदा १९ स ताभ्यां शुशुभे राजा पत्नीभ्यां वसुधाधिपः। प्रियाभ्यामनुरूपाभ्यां करेणुभ्यामिव द्विपः २० तयोर्मध्यगतश्चापि रराज वसुधाधिपः । गङ्गायमुनयोर्मध्ये मूर्तिमानिव सागरः २१ विषयेषु निमग्नस्य तस्य यौवनमभ्यगात् ।न च वंशकरः पुत्रस्तस्याजायत कश्चन२२ मङ्गलैर्बहुभिर्होमैः पुत्रकामाभिरिष्टिभिः । नाससाद नृपश्रेष्ठः पुत्रं कुलविवर्धनम् २३ अथ काक्षीवतः पुत्रं गौतमस्य महात्मनः । शुश्राव तपसि श्रान्तमुदारं चण्डकौशिकम् २४ यदृच्छयागतं तं तु वृक्षमूलमुपाश्रितम् ।

मगधदेशाधिपति राजा होऊन गेला १४. सौंदर्य, वीर्य, व वैभव यांनीं संपन्न असून अतुलपराक्रमी असलेल्या त्या बृहद्रथ राजाचें शरीर दुसरा शतक्रतु इंद्रच कीं काय अशा प्रकारें दीक्षासूचक चिन्हांनीं अंकित झालेलें होतें १५. तो तेजानें सूर्यासारखा असून क्षमेनें पृथ्वीसारखा होता व त्याचप्रमाणें क्रोधामध्यें तो यमधर्म व मृत्यु यांसारखा असून वैभवानें कुबेरासारखा होता १६. हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, सूर्याच्या किरणांप्रमाणें त्याच्या प्रख्यात गुणांच्या योगानें ही संपूर्ण पृथ्वी व्याप्त झाली होती (सारांश, सर्व जगतांत त्याच्या गुणांची कीर्ति पसरली होती १७. हे भरतकुलोत्तमा, त्या महावीर्यवान् बृहद्रथानें जुळया व सौंदर्यसंपन्न अशा दोन काशिराजाच्या कन्यकांशीं विवाह केला १८ आणि एकांतामध्यें त्या पुरुषश्रेष्ठ बृहद्रथानें त्या भार्यांचे संनिध "तुमच्याशीं वैषम्यभावानें वागणार नाहीं" अशी प्रतिज्ञा केली १९. हत्तिणींच्या योगानें शोभणारा हत्तीच कीं काय असा तो पृथ्वीपति बृहद्रथ राजा त्या प्रिय व अनुरूप अशा भार्यांच्या योगानें शोभत असे २० आणि गंगा व यमुना यांच्यामध्यें असलेला मूर्तिमान् सागरच कीं काय असाही तो पृथ्वीपति राजा त्या उभयतां स्त्रियांमध्यें बसला असतांना दिसत असे २१. विषयांमध्यें मग्न असतांना त्याचें सर्व तारुण्य निघून गेलें; तथापि, वंश चालविणारा त्याला एकही पुत्र झाला नाहीं २२. तेव्हां त्यानें पुष्कळ मंगलदायक होम व अनेक पुत्रकामेष्टि केल्या; तथापि, त्या नृपश्रेष्ठ बृहद्रथराजाला पुढें आपलें कुल वृद्धिंगत करणारा पुत्र प्राप्त झाला नाहीं २३. नंतर तपोनिष्ठ व उदार असा चंडकौशिक ह्मणून महात्म्या काक्षीवान् गौतमाचा पुत्र

पत्नीभ्यां सहितो राजा सर्वरत्नैरतोषयत् २५ तमब्रवीत्सत्यधृतिः सत्यवा-
गृषिसत्तमः । परितुष्टोऽस्मि राजेन्द्र वरं वरय सुव्रत २६ ततः सभार्यः
प्रणतस्तमुवाच बृहद्रथः । पुत्रदर्शननैराश्याद्बाष्पसंदिग्धया गिरा २७
राजोवाच॥ भगवन्राज्यमुत्सृज्य प्रस्थितोऽहं तपोवनम् । किं वरेणाल्पभा-
ग्यस्य किं राज्येनाप्रजस्य मे २८ कृष्ण उवाच ॥ एतच्छ्रुत्वा मुनिर्ध्या-
नमगमत्क्षुभितेन्द्रियः । तस्यैव चाम्रवृक्षस्य च्छायायां समुपाविशत् २९
तस्योपविष्टस्य मुनेरुत्सङ्गे निपपात ह । अवातमशुकादष्टमेकमाम्रफलं
किल ३० तत्प्रगृह्य मुनिश्रेष्ठो हृदयेनाभिमन्त्र्य च । राज्ञे ददावप्रतिमं
पुत्रसंप्राप्तिकारणम् ३१ उवाच च महाप्राज्ञस्तं राजानं महामुनिः । गच्छ
राजन्कृतार्थोऽसि निवर्तस्व नराधिप ३२ एतच्छ्रुत्वा मुनेर्वाक्यं शिरसा प्रणि-
पत्य च । मुनेः पादौ महाप्राज्ञः स नृपः स्वगृहं गतः ३३ यथा समयमा-
ज्ञाय तदा स नृपसत्तमः । द्वाभ्यामेकं फलं प्रादात्पत्नीभ्यां भरतर्षभ ३४

असल्याचें त्यानें ऐकिलें २४ आणि तो स्वेच्छेनें येऊन एका वृक्षमूलाच्या आश्रयाला बसला असतांना उभयतां भार्यासहवर्तमान बृहद्रथ राजानें त्याला सर्व प्रकारच्या उत्कृष्ट वस्तु अर्पण करून संतुष्ट केलें २५. तेव्हां तो अत्यंत सत्यनिष्ठ व सत्यवचनी ऋषिश्रेष्ठ " हे सदाचरणसंपन्न राजेंद्रा, वर माग; मी संतुष्ट झालों आहें " असें त्याला ह्मणाला असतां २६ " हे भगवन् , राज्याचा त्याग करून मी तपोवनामध्यें निघालों आहें. करितां, मज भाग्यहीनाला व निपुत्रिकाला वरापासून काय कर्तव्य आहे आणि राज्याची तरी काय जरूर आहे ? " ह्मणून पुत्रप्राप्तिविषयीं निराशा झाल्याकारणानें अश्रूंनीं कंठ दाटून आल्यामुळें अस्पष्ट वाणीनें तो नम्र झालेला बृहद्रथ राजा भार्यासहवर्तमान त्याला ह्मणाला २७,२८. श्रीकृष्ण सांगतातः—हें त्या राजाचें भाषण श्रवण करून त्या चंडकौशिकमुनींचें मन क्षुब्ध झालें असतां त्याच आम्रवृक्षाच्या छायेखालीं ते चिंतन करीत बसले २९ व ते तसे बसले असतांना राघूनें कोठेंही चोंची न मारिलेलें असें एक सरस आम्रफल त्यांच्या मांडीवर पडलें ३० व त्या श्रेष्ठ मुनींनीं पुत्रप्राप्तीला कारणीभूत होणारें असें तें अप्रतिम फल उचलून घेऊन व हृदयानें अभिमंत्रण करून बृहद्रथ राजाला दिलें ३१ आणि " हे राजा, जा; तूं कृतार्थ झाला आहेस. हे नराधिपा, तूं आतां परत फीर " असें त्या महाज्ञानवान् महर्षींनीं त्या राजाला सांगितलें ३२. हें मुनींचें भाषण श्रवण केल्याबरोबर तो महाज्ञानी राजा मुनिचरणीं मस्तकानें प्रणाम करून आपल्या घरीं परत गेला ३३ आणि हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, प्रतिज्ञेला अनुसरून त्या नृपश्रेष्ठ बृहद्रथानें आपल्या दोन्ही स्त्रियांना मिळून तें एक फल अर्पण केलें ३४.

ते तदाम्रं द्विधा कृत्वा भक्षयामासतुः शुभे । भावित्वादपि चार्थस्य सत्यवाक्यतया मुनेः ३५ तयोः समभवद्गर्भः फलप्राशनसंभवः । ते च दृष्ट्वा स नृपतिः परां मुदमवापह ३६ अथ काले महाप्राज्ञ यथासमयमागते । प्राजायेतां शुभे राजञ्छरीरशकले तदा ३७ एकाक्षिबाहुचरणे अर्धोदरमुखस्फिचे । दृष्ट्वा शरीरशकले प्रवेपतुरुभे भृशम् ३८ उद्विग्ने सह संमन्त्र्य ते भगिन्यौ तदाबले । सजीवे प्राणिशकले तत्यजाते सुदुःखिते ३९ तयोर्धात्र्यौ सुसंवीते कृत्वा ते गर्भसंप्लवे । निर्गम्यान्तःपुरद्वारात्समुत्सृज्याभिजग्मतुः ४० ते चतुष्पथनिक्षिप्ते जरा नामाथ राक्षसी । जग्राह मनुजव्याघ्र मांसशोणितभोजना ४१ कर्तुकामा सुखवहे शकले सा तु राक्षसी । संयोजयामास तदा विधानबलचोदिता ४२ ते समानीतमात्रे तु शकले पुरुषर्षभ । एकमूर्तिधरो वीरः कुमारः समपद्यत ४३ ततः सा राक्षसी राजन्विस्मयोत्फुल्ललोचना । न शशाक समुद्वोढुं वज्रसारमयं शिशुम् ४४ बालस्ताम्रतलं मुष्टिं कृत्वा चास्ये निधाय

तेव्हां त्या आम्रफलाचे दोन भाग करून त्या उभयतां शुभ स्त्रियांनीं भक्षण केले असतां भावी प्रकार चुकणार नसल्यामुळें आणि ते चंडकौशिक मुनि सत्यवचनी असल्यामुळें ३५ फलप्राशनाच्या योगानें त्या दोघींच्याही उदरामध्यें गर्भ राहिला व आपल्या त्या गर्भिणी स्त्रियांना अवलोकन करून त्या बृहद्रथ राजाला पराकाष्ठेचा आनंद झाला ३६. नंतर हे महाज्ञानवान् धर्मराजा, नियमाप्रमाणें प्रसूतिकाल प्राप्त झाल्यावर त्या उभयतांही स्त्रियांना शरीराचें एकेक शकल झालें ३७. तेव्हां एक डोळा, एक हात, एक पाय, अर्धे उदर, अर्धे मुख व अर्धी कंबर अशा अवयवांनीं युक्त असलेलीं तीं शरीरशकलें अवलोकन करून त्या दोघी स्त्रिया लटलट कांपूं लागल्या ३८ आणि बहिणी बहिणी असलेल्या त्या उभयतां उद्विग्न व दुःखित झालेल्या स्त्रियांनीं एकमेकींशीं विचार ठरवून तीं प्राण्याचीं शकलें सजीवच टाकून दिलीं ३९. तेव्हां त्यांच्या दायांनीं तीं शकलें गर्भपातवत् चांगलीं गुंडाळून घेतलीं आणि अंतःपुराच्या द्वारांतून बाहेर जाऊन टाकून दिल्यावर त्या दाया परत आल्या ४०. पुढें, हे पुरुषश्रेष्ठा युधिष्ठिरा, भर चौकामध्यें टाकिलेलीं तीं शकलें रक्तमांस भक्षण करणाऱ्या जरानामक राक्षसीनें घेतलीं ४१. नंतर दैवबलानें प्रेरित झालेल्या त्या राक्षसीला तीं शकलें सुखानें नेतां यावीं अशी इच्छा झाल्यामुळें तिनें तीं एकेठिकाणीं केलीं ४२ व हे पुरुषश्रेष्ठा, तीं शकलें एकत्र जुळवितांक्षणीं त्यांचा एकच शरीर धारण करणारा असा अद्वितीय वीर पुत्र बनला ४३. तेव्हां, हे राजा, त्या राक्षसीचे नेत्र विस्मयानें प्रफुल्लित झाले आणि वज्रगर्भाप्रमाणें कठीण बनलेल्या त्या पुत्राला ओढून नेण्यास

सः। प्राक्रोशदतिसंरब्धः सतोय इव तोयदः ४५ तेन शब्देन संभ्रान्तः सहसान्तःपुरे जनः। निर्जगाम नरव्याघ्र राज्ञा सह परंतप ४६ ते चाबले परिम्लाने पयःपूर्णपयोधरे। निराशे पुत्रलाभाय सहसैवाभ्यगच्छताम् ४७ तेथ दृष्ट्वा तथाभूते राजानं चेष्टसंततिम्। तं च बालं सुबलिनं चिन्तयामास राक्षसी ४८ नार्हामि विषये राज्ञो वसन्ती पुत्रगृद्धिनः। बालं पुत्रमिमं हन्तुं धार्मिकस्य महात्मनः ४९ सा तं बालमुपादाय मेघलेखेव भास्करम्। कृत्वा च मानुषं रूपमुवाच वसुधाधिपम् ५० राक्षस्युवाच ॥ बृहद्रथ सुतस्तेयं मया दत्तः प्रगृह्यताम्। तव पत्नीद्वये जातो द्विजातिवरशासनात् ॥ धात्रीजनपरित्यक्तो मयायं परिरक्षितः ५१ कृष्ण उवाच ॥ ततस्ते भरतश्रेष्ठ काशिराजसुते शुभे। तं बालमभिपद्याशु प्रस्रवैरभ्यषिञ्चताम् ५२ ततः स राजा संहृष्टः सर्वं तदुपलभ्य च। अपृच्छद्धेमगर्भाभां राक्षसीं तामराक्षसीम् ५३ राजोवाच ॥ का त्वं कम-

---

ती समर्थ होईना ४४. इतक्यांत तो बालक आरक्तवर्ण तलानें युक्त असलेल्या आपल्या हाताची मूठ वळून तोंडांत घालूं लागला आणि फारच क्षुब्ध होऊन सजल मेघाप्रमाणें गर्जना करूं लागला ४५. त्या शब्दानें, हे शत्रुतापना पुरुषश्रेष्ठा, राजाच्या अंतःपुरांतील माणसें अगदीं घाबरून गेलीं आणि राजासहवर्तमान बाहेर निघालीं ४६. त्याचप्रमाणें दुग्धपूर्ण स्तन व म्लानवदन ह्यांनीं युक्त होऊन निराश झालेल्या त्या उभयतां राजस्त्रियाही पुत्रलाभाकरितां एकदमच त्यांच्या बरोबर गेल्या ४७. तेव्हां तशाप्रकारच्या त्या स्त्रिया, पुत्रेच्छु राजा आणि तो अति बलाढ्य बालक ह्यांना अवलोकन करून त्या जरा राक्षसीनें "पुत्रेच्छु, धार्मिक व महात्म्या अशा राजाच्या प्रदेशामध्यें राहत असलेल्या आपणाला ह्या बाल पुत्राचा घात करणें योग्य नाहीं" असा विचार मनामध्यें आणिला ४८, ४९ व सूर्याला मेघपंक्तिच घेत आहे कीं काय अशाप्रकारें त्या बालकाला तिनें घेतला आणि मनुष्यरूप धारण करून ती बृहद्रथ राजाला म्हणाली ५० "हे बृहद्रथा, हा मीं दिलेला आपला पुत्र घे. द्विजश्रेष्ठ चंडकौशिक मुनींच्या आशीर्वादामुळें हा तुझ्या दोन भार्यांना मिळून झाला होता तो दायांनीं टाकून दिला असतां मीं रक्षण करून ठेविला आहे" ५१. श्रीकृष्ण सांगतातः—हे भरतवंशजश्रेष्ठा, नंतर त्या काशीराजाच्या उभयतां कन्यांनीं सत्वर तो बालक घेतला आणि पयःस्रावांनीं त्याला अगदीं भिजवून काढिला ५२. तदनंतर पुत्रासंबंधीं तो सर्व वृत्तांत समजून आल्यावर आनंदित झालेल्या त्या बृहद्रथ राजानें सुवर्णासारख्या कांतीनें युक्त असलेल्या त्या राक्षसीला प्रश्न केला कीं ५३ "हे कमलगर्भसमानकांतियुक्त स्त्रिये, मला पुत्र

लगर्भाभे मम पुत्रप्रदायिनी । कामया ब्रूहि कल्याणि देवता प्रतिभासि मे ५४ [७५०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां सभापर्वणि राजसूयारम्भपर्वणि जरासन्धोत्पत्तौ सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥

राक्षस्युवाच ॥ जरा नामास्मि भद्रं ते राक्षसी कामरूपिणी । तव वेश्मनि राजेन्द्र पूजिता न्यवसं सुखम् १ गृहे गृहे मनुष्याणां नित्यं तिष्ठामि राक्षसी । गृहदेवीति नाम्ना वै पुरा सृष्टा स्वयंभुवा २ दानवानां विनाशाय स्थापिता दिव्यरूपिणी । यो मां भक्त्या लिखेत्कुड्ये सपुत्रां यौवनान्विताम् ३ गृहे तस्य भवेद्वृद्धिरन्यथा क्षयमाप्नुयात् । त्वद्गृहे तिष्ठमाना तु पूजिताहं सदा विभो ४ लिखिता चैव कुड्येहं पुत्रैर्बहुभिरावृता । गन्धपुष्पैस्तथा धूपैर्भक्ष्यैर्भोज्यैः सुपूजिता ५ साहं प्रत्युपकारार्थं चिन्तयाम्यनिशं तव । तवेमे पुत्रशकले दृष्टवत्यस्मि धार्मिक ६ संश्लेषिते मया दैवात्कुमारः समपद्यत । तव भाग्यान्महाराज हेतुमात्रमहं त्विह ७ मेरुं वा खादितुं शक्ता किं पुनस्तव बालकम् । गृहसंपूजनात्तुष्ट्या मया

देणारी व स्वेच्छेनें संचार करणारी अशी तूं कोण आहेस हें मला सांग. हे कल्याणि, मला तर तूं कोणी देवता असावीस असें वाटत आहे ५४. ह्याप्रमाणें॰ सभापर्वांतील राजसूयारंभपर्वापैकीं जरासंधाच्या उत्पत्तीविषयीं सतरावा अध्याय समाप्त झाला॥ १७॥

राक्षसी ह्मणतेः—हे राजेंद्रा, तुझें कल्याण असो. मी इच्छेस येईल तें रूप धारण करणारी जरानामक राक्षसी आहें आणि तुझें घरीं माझें पूजन होत असल्यामुळें मी आजपर्यंत सुखानें राहिलें आहें १. असो. मी राक्षसी नेहमीं मनुष्यांच्या घरोघर रहात असतें. कारण, गृहदेवीनांवानें मला पूर्वी ब्रह्मदेवानें उत्पन्न केली असून २ दानवांचा नाश करण्याकरितां मज दिव्यरूपिणी राक्षसीला त्यानें स्थापिलेली आहे. ह्यास्तव, यौवनानें युक्त असलेल्या मला जो भक्तीनें भिंतीवर काढितो ३ त्याचा भाग्योदय होतो व असें जो करीत नाहीं त्याचा नाश होतो. हे प्रभो, तुझ्या घरीं असतांना माझा सर्वदां सत्कार होत असतो ४; अनेक पुत्रांनीं परिवेष्टित असें माझें चित्र भिंतींवर काढिलेलें असतें आणि गंध, पुष्पें, धूप व भक्ष्य आणि भोज्य पदार्थ ह्यांच्या योगानें माझें उत्तमप्रकारें पूजन होत असतें ५. हे धार्मिक राजा, ह्याबद्दल तुझ्यावर कांहीं तरी प्रत्युपकार करण्याच्या विचारांत मी एकसारखी असतांना तुझ्या पुत्राचीं हीं शकलें माझ्या दृष्टीस पडलीं ६ आणि मी तीं एकत्र करितांक्षणी दैवयोगानें त्यांचा एक पुत्र बनला. हे महाराजा, मी फक्त निमित्ताला मात्र कारणीभूत झालें असून हा प्रकार तुझ्याच भाग्यानें झालेला आहे ७. अरे, मेरुपर्वत देखील भक्षण करण्यास मी समर्थ आहें; तेव्हां, तुझ्या बाळकाची कथा काय?

प्रत्यर्पितस्तव ८ कृष्ण उवाच ॥ एवमुक्त्वा तु सा राजंस्तत्रैवान्तरधीयत । स संगृह्य कुमारं तं प्रविवेश गृहं नृपः ९ तस्य बालस्य यत्कार्यं तच्चकार नृपस्तदा । आज्ञापयच्च राक्षस्या मगधेषु महोत्सवम् १० तस्य नामाकरोच्चैव पितामहसमः पिता । जरया संधितो यस्माज्जरासंधो भवत्वयम् ११ सोवर्धत महातेजा मागधाधिपते सुतः। प्रमाणबलसंपन्नो हुताहुतिरिवानलः ॥ मातापित्रोर्नन्दिकरः शुक्लपक्षे यथा शशी १२[७६२] इति० सभापर्वणि राजसूयारम्भपर्वणि जरासन्धोत्पत्तावष्टादशोध्यायः ॥ १८ ॥

कृष्ण उवाच ॥ कस्यचित्त्वथ कालस्य पुनरेव महातपाः । मागधेषूपचक्राम भगवांश्चण्डकौशिकः १ तस्यागमनसंहृष्टः सामात्यः सपुरःसरः । सभार्यः सह पुत्रेण निर्जगाम बृहद्रथः २ पाद्यार्घ्याचमनीयैस्तमर्चयामास भारत । स नृपो राज्यसहितं पुत्रं तस्मै न्यवेदयत् ३ प्रतिगृह्य तु तां पूजां पार्थिवाद्भगवानृषिः । उवाच मागधं राजन्प्रहृष्टेनान्तरात्मना ४ सर्वमेतन्मया ज्ञातं राजन्दिव्येन चक्षुषा । पुत्रस्तु शृणु राजेन्द्र

परंतु, तुझ्या घरीं माझें पूजन होत असल्यामुळें मी आनंदानें तुला हा पुत्र पुनरपि अर्पण केला आहे ८. श्रीकृष्ण सांगतातः—ह्याप्रमाणें सांगून ती राक्षसी तेथेंच अंतर्धान पावली व इकडे तो बृहद्रथ राजाही त्या पुत्राला घेऊन आपल्या घरीं गेला ९. घरीं गेल्यावर राजानें त्या बालकाचें जातकर्म वगैरे जें करावयाचें तें करून मगधदेशामध्यें त्या राक्षसीचा महोत्सव करण्याविषयीं आज्ञा दिली १०. नंतर योग्यतेनें ब्रह्मदेवाप्रमाणें असलेल्या पित्या बृहद्रथराजानें "ज्याअर्थीं जरानामक राक्षसीनें ह्याला सांधलेला आहे त्याअर्थीं हा जरासंधच होवो" ह्मणून त्याचें नांव ठेविलें ११. पुढें मगधदेशाधिपति बृहद्रथ राजाचा तो महातेजस्वी आणि भव्य आकार व बल ह्यांनीं संपन्न असलेला पुत्र हवनीय द्रव्यांनीं युक्त झालेल्या अग्नीप्रमाणें वृद्धिंगत झाला आणि शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें तो मातापितरांना आनंद देऊं लागला १२. ह्याप्रमाणें०सभापर्वांतील राजसूयारंभपर्वापैकीं जरासंधाच्या उत्पत्तीविषयीं अठरावा अध्याय समाप्त झाला॥१८॥

श्रीकृष्ण सांगतातः—कांहीं काळ लोटल्यानंतर पुनरपि महातपस्वी भगवान् चंडकौशिक मुनि मगधदेशामध्यें आले असतां १ त्यांच्या आगमनानें आनंदित झालेला बृहद्रथ राजा अमात्य, भार्या, पुत्र व पुढें चालणारे लोक ह्यांसहवर्तमान निघून त्यांना सामोरा गेला २ आणि हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, पाद्य, अर्घ्य, आचमनीय वगैरे पूजाद्रव्यांनीं त्यांचें पूजन केल्यावर त्या राजानें राज्यासहवर्तमान आपला पुत्र त्यांना अर्पण केला ३. तेव्हां हे राजा, राजापासून त्या पूजेचा स्वीकार करून भगवान् चंडकौशिक

यादृशोयं भविष्यति ५ अस्य रूपं च सत्त्वं च बलमूर्जितमेव च । एष श्रिया समुदितः पुत्रस्तव न संशयः ६ प्रापयिष्यति तत्सर्वं विक्रमेण समन्वितः । अस्य वीर्यवतो वीर्यं नानुयास्यन्ति पार्थिवाः ७ पततो वैनतेयस्य गतिमन्ये यथा खगाः । विनाशमुपयास्यन्ति ये चास्य परिपन्थिनः ८ देवैरपि विसृष्टानि शस्त्राण्यस्य महीपते । न रुजं जनयिष्यन्ति गिरेरिव नदीरयाः ९ सर्वमूर्धाभिषिक्तानामेष मूर्ध्नि ज्वलिष्यति । प्रभाहरोयं सर्वेषां ज्योतिषामिव भास्करः १० एनमासाद्य राजानः समृद्धबलवाहनाः । विनाशमुपयास्यन्ति शलभा इव पावकम् ११ एषश्रियः समुदिताः सर्वराज्ञां ग्रहीष्यति । वर्षास्विवोदीर्णजला नदीर्नदनदीपतिः १२ एष धारयिता सम्यक्चातुर्वर्ण्यं महाबलः । शुभाशुभमिव स्फीतां सर्वशस्यधरा धरा १३ अस्याज्ञावशगाः सर्वे भविष्यन्ति नराधिपाः । सर्वभूतात्मभूतस्य वायोरिव शरीरिणः १४ एष रुद्रं महादेवं त्रिपुरान्तकरं हरम्।

ऋषि मगधाधिपति बृहद्रथाला सुप्रसन्न अंतःकरणानें ह्मणाले ४ " हे राजा, दिव्य दृष्टीनें हें सर्व कांहीं मीं जाणिलें आहे. आतां हे नृपश्रेष्ठा, हा तुझा पुत्र कसा होईल तें ऐक ५. ह्याचें रूप, धैर्य व बल हीं उत्तम होतील आणि हा तुझा पुत्र निःसंशय वैभवसंपन्न होऊन व पराक्रमानें युक्त होऊन ६ सर्व कांहीं प्राप्त करून घेईल. ज्याप्रमाणें गरुडाबरोबर इतर पक्षी गमन करण्यास समर्थ होत नाहींत त्याचप्रमाणें ह्या वीर्यवान् पुत्राची बरोबरी वीर्यामध्यें करण्यास इतर राजे समर्थ होणार नाहींत आणि ह्याचे जे शत्रु असतील ते सर्व नाश पावतील७,८. हे भूपते, नदीप्रवाह ज्याप्रमाणें पर्वताला पीडा करण्यास समर्थ होत नाहींत त्याचप्रमाणें देवांनीं सोडलेलींही शस्त्रें ह्याला पीडा करण्यास समर्थ होणार नाहींत ९. आकाशस्थ ज्योतींचें तेज हरण करणाऱ्या सूर्याप्रमाणें हा सर्वांचें तेज हरण करणारा होऊन सर्व मूर्धाभिषिक्त राजांचे मस्तकीं अगदीं जळत राहील १०. अग्निसंनिध आलेले पतंग ज्याप्रमाणें नाश पावतात त्याचप्रमाणें प्रचंड सैन्य व अगणित वाहनें ह्यांसहवर्तमान सर्व राजे ह्याच्याशीं गांठ पडली असतां नाश पावतील ११. वर्षाऋतूमध्यें अपरंपार पाण्यानें भरून चाललेल्या नद्या ज्याप्रमाणें समुद्र ग्रहण करितो त्याचप्रमाणें हा सर्व राजांच्या भव्य संपत्ति ग्रहण करील १२. सर्व धान्यांना आधारभूत असलेली प्रचंड भूमि ज्याप्रमाणें सर्व प्रकारच्या शुभाशुभ वस्तु धारण करिते त्याचप्रमाणें हा महाबलाढ्य पुत्र उत्तम रीतीनें चारी वर्णांचें रक्षण करील १३. सर्व जीव जसे प्राणिमात्रांना आत्मभूत असलेल्या वायूचे अधीन असतात तसेच सर्व भूपति ह्याचे आज्ञांकित होऊन राहतील १४

सर्वलोकेष्वतिबलः साक्षाद्द्रक्ष्यति मागधः १५ एवं ब्रुवन्नेव मुनिः स्वकार्यमिव चिन्तयन् । विसर्जयामास नृपं बृहद्रथमथारिहन् १६ प्रविश्य नगरीं चापि ज्ञातिसंबन्धिभिर्वृतः । अभिषिच्य जरासन्धं मगधाधिपतिस्तदा १७ बृहद्रथो नरपतिः परां निर्वृतिमाययौ । अभिषिक्ते जरासंधे तदा राजा बृहद्रथः १८ पत्नीद्वयेनानुगतस्तपोवनचरोभवत् १९ ततो वनस्थे पितरि मात्रोश्चैव विशांपते । जरासंधः स्ववीर्येण पार्थिवानकरोद्वशे २० वैशम्पायन उवाच ॥ अथ दीर्घस्य कालस्य तपोवनचरोनृपः । सभार्यः स्वर्गमगमत्तपस्तप्त्वा बृहद्रथः २१ जरासंधोपि नृपतिर्यथोक्तं कौशिकेन तत् । वरप्रदानमखिलं प्राप्य राज्यमपालयत् २२ निहते वासुदेवेन तदा कंसे महीपतौ । जातो वै वैरनिर्बन्धः कृष्णेन सह तस्य वै २३ भ्रामयित्वा शतगुणमेकोनं येन भारत । गदा क्षिप्ता बलवता मागधेन गिरिव्रजात् २४ तिष्ठतो मथुरायां वै कृष्णस्याद्भुतकर्मणः । एकोनयोजनशते सा पपात गदा शुभा २५ दृष्ट्वा पौरैस्तदा सम्यग्गदा चैव निवेदिता । गदावसानं

व सर्व लोकांमध्यें अतिशय बलाढ्य होणारा हा मगध राजा त्रिपुरासुरनाशक व दुःखनिवारक अशा देवाधिदेव रुद्राला साक्षात् अवलोकन करील १५. हे शत्रुघ्ना युधिष्ठिरा, कार्याचें चिंतन करीत असल्याप्रमाणें दिसत असलेल्या चंडकौशिक मुनींनीं ह्याप्रमाणें बोलतां बोलतांच बृहद्रथ राजाला निरोप दिला १६. (मुनींनीं निरोप दिल्यानंतर) आप्त व संबंधी ह्यांनीं परिवेष्टित असलेला बृहद्रथ राजा आपल्या राजधानींत परत आला, जरासंधास राज्याभिषेक करून त्या मगधदेशाधिपति बृहद्रथ नृपतीनें पराकाष्ठेचा आनंद प्राप्त करून घेतला १७, १८ आणि ह्याप्रमाणें जरासंधाला अभिषेक केल्यावर तो बृहद्रथ राजा उभयतां भार्यांसहवर्तमान तपोवनामध्यें गेला १९. तेव्हां, हे प्रजाधिपते, पिता (बृहद्रथ राजा) व उभयतां माता (काशीराजाच्या कन्या) वनांत गेल्यावर जरासंधानें स्वपराक्रमानें सर्व राजे वश केले २०. वैशंपायन सांगतातः—पुढें बराच काळ लोटल्यानंतर तपोवनामध्यें संचार करीत असलेला तो बृहद्रथ राजा तपश्चर्या करून भार्यांसहवर्तमान स्वर्गाला गेला २१ व इकडे चंडकौशिक मुनींनीं सांगितल्याप्रमाणें वरप्रदानसंबंधीं सर्व कांहीं गोष्टी जरासंधराजाला प्राप्त झाल्यावर तो राज्य करूं लागला २२. तदनंतर श्रीकृष्णांनीं कंस भूपतीचा वध केला असतां श्रीकृष्णासहवर्तमान जरासंधाचें वैर पडलें २३. तेव्हां, हे भरतवंशजा जनमेजया, त्या बलाढ्य मगधदेशाधिपति जरासंधानें आपली गदा नव्याण्णव वेळा गरगर फिरवून गिरिव्रज नगरापासून अद्भुत कर्म करणाऱ्या मथुरानिवासी श्रीकृष्णाकडे नव्याण्णव योजनें फेंकून

तत्ख्यातं मथुरायाः समीपतः २६ तस्यास्तां हंसडिम्भकावशस्त्रनिधना-
वुभौ। मन्त्रे मतिमतां श्रेष्ठौ नीतिशास्त्रविशारदौ २७ यौ तौ मया ते कथितौ
पूर्वमेव महाबलौ। त्रयस्त्रयाणां लोकानां पर्याप्ता इति मे मतिः२८ एवमेष
तदा वीर बलिभिः कुकुरान्धकैः। वृष्णिभिश्च महाराज नीतिहेतोरुपे-
क्षितः २९ [७९१] इति०सभापर्वाणि राजसूयारम्भपर्वणि जरासन्धप्र-
शंसायामेकोनविंशतितमोऽध्यायः ॥ १९ ॥ समाप्तं च राजसूयारम्भपर्व ॥

अथ जरासन्धवधपर्व ॥ वासुदेव उवाच ॥ पतितौ हंसडिम्भकौ कंसश्च
सगणो हतः। जरासंधस्य निधने कालोयं समुपागतः १ न शक्योसौ
रणे जेतुं सर्वैरपि सुरासुरैः। प्राणयुद्धेन जेतव्यः स इत्युपलभामहे २ मयि
नीतिर्बलं भीमे रक्षिता चावयोर्जयः। मागधं साधयिष्याम इष्टिं त्रय
इवाग्नयः ३ त्रिभिरासादितोस्माभिर्विजने स नराधिपः। न संदेहो यथा
युद्धमेकेनाप्युपयास्यति ४ अवमानाच्च लोभाच्च बाहुवीर्याच्च दर्पितः।

दिली व त्याप्रमाणें ती उत्कृष्ट गदा तेथें येऊन पडली २४, २५. तेव्हां पौरजनांनीं ती गदा जरासंधाची आहे असें नीट अवलोकन केल्याबरोबर बाहेर बातमी कळवून गिरिव्रजनगरापासून मथुरेसमीप ती गदा येऊन पडल्याचें प्रसिद्ध केलें २६. बुद्धिमानांमध्यें श्रेष्ठ, नीतिशास्त्रामध्यें पारंगत आणि शस्त्रापासून मृत्यु न पावणारे असे हंस व डिंभक ह्मणून त्या जरासंधाचे दोन मंत्री होते २७. असो. ते मीं पूर्वी सांगितलेले महाबलाढ्य मंत्री आणि स्वतः जरासंध हे तिघे त्रैलोक्याला पुरेसे होते असें माझें मत आहे २८. सारांश, हे वीर महाराजा, ह्याप्रमाणें कुकुर, अंधक व वृष्णि ह्या बलाढ्य राजांनीं (बलवानांशीं स्पर्धा करूं नये ह्या) नीतीकरितां जरासंधाची उपेक्षा केली २९. ह्याप्रमाणें०सभापर्वांतील राजसूयारंभपर्वापैकीं जरासंधाच्या प्रशंसेविषयीं एकोणिसावा अध्याय समाप्त झाला॥ १९॥ह्या ठिकाणीं राजसूयारंभपर्वही संपूर्ण झालें॥

येथून जरासंधवधपर्वाला आरंभ झाला॥श्रीकृष्ण सांगतातः—सांप्रत हंस व डिंभक मृत झाले असून कंसाचाही सपरिवार वध झाला आहे. तेव्हां, जरासंधाच्या मृत्यूचा हा काल प्राप्त झालाच आहे १. रणामध्यें त्याला जिंकणें संपूर्ण देवदैत्यांनाही अशक्य आहे. तस्मात्, शक्तियुद्धानें त्याला जिंकावें असें आह्मांला वाटतें २. माझे ठिकाणीं नीति असून भीमसेनाचे ठिकाणीं शक्ति आहे आणि अर्जुन आह्मां उभयतांचें रक्षण करणारा आहे. तेव्हां, इष्टि पार पाडणाऱ्या तीन अग्नींप्रमाणें आह्मी मगधदेशाधिपति जरासंधाचा समाचार घेऊं ३. आह्मीं तिघांनीं एकांतामध्यें त्या नृपतीची गांठ घतली असतां एका बरोबरही तो युद्ध करण्यास तयार होईल यांत संशय नाहीं ४. त्यांतून

भीमसेनेन युद्धाय ध्रुवमभ्युपयास्यति ५ अलं तस्य महाबाहुर्भीमसेनो महाबलः । लोकस्य समुदीर्णस्य निधनायान्तको यथा ६ यदि मे हृदयं वेत्सि यदि ते प्रत्ययो मयि । भीमसेनार्जुनौ शीघ्रं न्यासभूतौ प्रयच्छ मे ७ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्तो भगवता प्रत्युवाच युधिष्ठिरः । भीमार्जुनौ समालोक्य संप्रहृष्टमुखौ स्थितौ ८ युधिष्ठिर उवाच ॥ अच्युताच्युत मा मैवं व्याहरामित्रकर्शन । पाण्डवानां भवान्नाथो भवन्तं चाश्रिता वयम् ९ यथा वदसि गोविन्द सर्वं तदुपपद्यते । न हि त्वमग्रतस्तेषां येषां लक्ष्मीः पराङ्मुखी १० निहतश्च जरासंधो मोक्षिताश्च महीक्षितः । राजसूयश्च मे लब्धो निदेशे तव तिष्ठतः ११ क्षिप्रमेव यथा त्वेतत्कार्यं समुपपद्यते । अप्रमत्तो जगन्नाथ तथा कुरु नरोत्तम १२ त्रिभिर्भवद्भिर्हि विना नाहं जीवितुमुत्सहे । धर्मार्थकामरहितो रोगार्त इव दुःखितः १३ न शौरिणा विना पार्थो न शौरिः पाण्डवं विना । नाजेयोऽस्त्यनयोर्लोके कृष्णयोरिति मे मतिः १४ अयं च बलिनां श्रेष्ठः श्रीमानपि वृकोदरः । युवाभ्यां सहितो वीरः

अवमान, लोभ आणि बाहुवीर्य ह्यांनीं चढून गेलेला तो जरासंध भीमासहवर्तमान निःसंशय युद्धाला येईल ५. प्रचंड जगताच्या नाशाला समर्थ असलेल्या मृत्यूप्रमाणें हा महाबलाढ्य व महापराक्रमी भीमसेन त्या जरासंधाला खबरदार आहे ६. करितां, जर माझें अंतःकरण तूं जाणीत असशील आणि माझ्यावर जर तुझा विश्वास असेल तर ह्या भीमार्जुनांना तूं ठेव ह्मणून माझे स्वाधीन कर ७. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें भगवान् श्रीकृष्णांनीं सांगितलें असतां सुप्रसन्न मुखांनीं युक्त होऊन स्थित असलेल्या भीमार्जुनांकडे पाहून युधिष्ठिरानें श्रीकृष्णांना प्रत्युत्तर दिलें कीं ८ "हे अच्युता, हे शत्रुनाशका अच्युता, छे ! छे ! असे शब्द तोंडाबाहेर काढूं नकोस. तूं आह्मा पांडवांचा नाथ असून आह्मी तुझ्या आश्रयानें आहोंत ९. हे गोविंदा, तूं ह्मणतोस तें सर्व अगदीं बरोबर आहे. कारण, लक्ष्मी ज्यांच्यापासून पराङ्मुख झाली त्यांच्या अग्रभागीं तूं कधीं नसावयाचाच १०. ह्यास्तव, जरासंधाचा वध होऊन भूपतींची सुटका झाली आणि राजसूय यागही सिद्धीस गेलाच असें तुझ्या आज्ञेंत राहणाऱ्या मला वाटत आहे ११. करितां, हें कार्य सत्वर सिद्धीस जाईल अशा रीतीनें, हे पुरुषोत्तमा जगन्नाथा, तूं सावधपणानें वाग १२. धर्म, अर्थ आणि काम ह्यांनीं रहित असलेल्या रोगपीडित दुःखी मनुष्याप्रमाणें तुह्मां तिघांवांचून जीवंत राहण्याची मला अपेक्षा नाहीं १३. कृष्णावांचून अर्जुन राहणार नाहीं अर्जुनावांचून कृष्णही राहणार नाहीं आणि या उभयतां कृष्णार्जुनांना अजिंक्य ह्मणून जगतांत कांहींही

किं न कुर्यान्महायशाः १५ सुप्रणीतो बलौघो हि कुरुते कार्यमुत्तमम् । अन्धं बलं जडं प्राहुः प्रणेतव्यं विचक्षणैः १६ यतो हि निम्नं भवति नयन्ति हि ततो जलम् । यतश्छिद्रं ततश्चापि नयन्ते धीवरा जलम् १७ तस्मान्नयविधानज्ञं पुरुषं लोकविश्रुतम् । वयमाश्रित्य गोविन्दं यतामः कार्यसिद्धये १८ एवं प्रज्ञानयबलं क्रियोपायसमन्वितम् । पुरस्कुर्वीत कार्येषु कृष्णं कार्यार्थसिद्धये १९ एवमेव यदुश्रेष्ठ यावत्कार्यार्थसिद्धये । अर्जुनः कृष्णमन्वेतु भीमोन्वेतु धनंजयम् ॥ नयो जयो बलं चैव विक्रमे सिद्धिमेष्यति २० वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्तास्ततः सर्वे भ्रातरो विपुलौजसः । वार्ष्णेयः पाण्डवेयौ च प्रतस्थुर्मागधं प्रति २१ वर्चस्विनां ब्राह्मणानां स्नातकानां परिच्छदम् । आच्छाद्य सुहृदां वाक्यैर्मनोज्ञैरभिनन्दिताः २२ अमर्षाद्-

---

नाहीं असें मला वाटतें १४. बलवानांमध्यें श्रेष्ठ असलेला हा महाकीर्तिमान् व वैभवशाली वीर भीमसेन तुह्मा उभयतांच्या साह्यानें कोणती गोष्ट करणार नाहीं? १५. बलाचा प्रवाह चांगल्या रीतीनें नेला असतां उत्तम कार्य करितो. तस्मात् अंध व अज्ञानी असलेलें हें बल विचारी लोकांनीं नीट मार्गानें न्यावें असें ह्मणतात १६. ज्या ठिकाणीं सखल प्रदेश असतो तिकडून उदक नेत असतात आणि जिकडून पाटवण पडलेलें असतें त्याच मार्गांतून नदीच्या उदकावर उपजीविका करणारे लोक(शेताला वगैरे) उदक पोंचवितात. (सारांश, ज्याठिकाणाहून सहज जातां येण्याजोगें असेल त्या निरुपद्रव प्रदेशावरून सैन्य नेत असतात. आपलें अज्ञानी सैन्य एकाएकीं मोठ्या वीराच्या अग्रभागीं नेऊन कोणी तें मृत्युमुखांत ढकलून देत नाहींत) १७. तस्मात्, नीतीचा उपयोग जाणणाऱ्या जगद्विख्यात गोविंदाचा आश्रय करून कार्यसिद्धीकरितां आह्मी यत्न करितों १८.कारण, ह्याप्रमाणें बुद्धि, नीति, बल व क्रियानिष्पत्तीचे उपाय ह्यांनीं युक्त असलेल्या कृष्णाला कार्यसिद्ध्यर्थ सर्व कामांमध्यें पुढाकार द्यावा १९. करितां, हे यदुश्रेष्ठा, कार्यसिद्धि होण्याकरितां अर्जुनानें तुज कृष्णाला अनुसरून वागावें आणि भीमसेनानें अर्जुनाच्या अनुमतीनें चालावें. ह्मणजे यत्न केला असतां (तुज श्रीकृष्णाचे ठिकाणीं असलेली) नीति, (अर्जुनाचे ठिकाणीं असलेला) विजय आणि (भीमसेनाचे ठिकाणीं असलेलें) बल हीं सफल होतील २०. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें सांगितलें असतां तें सर्वही महासामर्थ्यवान् तिन्ही भ्राते ह्मणजे पांडुपुत्र भीमार्जुन आणि वृष्णिकुलोत्पन्न श्रीकृष्ण मगध देशाला चालते झाले २१. जातांना सुहृदांच्या चित्ताल्हादकारक भाषणांनीं ते अभिनंदित झाले असून त्या तिघांनीं तेजस्वी स्नातक ब्राह्मणांच्या कृष्णाजिनप्रभृतिवेषसामग्रीचा स्वीकार

भितप्तानां ज्ञात्यर्थे मुख्यतेजसाम् । रविसोमाग्निवपुषां दीप्तमासीत्तदा
वपुः २३ हतं मेने जरासन्धं दृष्ट्वा भीमपुरोगमौ । एककार्यसमुद्यन्तौ
कृष्णौ युद्धेपराजितौ २४ ईशौ हि तौ महात्मानौ सर्वकार्यप्रवर्तिनौ ।
धर्मकामार्थकार्याणां लोकानां च प्रवर्तकौ २५ कुरुभ्यः प्रस्थितास्ते तु
मध्येन कुरुजाङ्गलम् । रम्यं पद्मसरो गत्वा कालकूटमतीत्य च २६
गण्डकीं च महाशोणं सदानीरां तथैव च । एकपर्वतके नद्यः क्रमेणै-
त्याव्रजन्त ते २७ उत्तीर्य सरयूं रम्यां दृष्ट्वा पूर्वांश्च कोसलान् । अतीत्य
जग्मुर्मिथिलां मालां चर्मण्वतीं नदीम् २८ अतीत्य गङ्गां शोणं च त्रयस्ते
प्राङ्मुखास्तदा । कुशचीरच्छदा जग्मुर्मागधं क्षेत्रमच्युताः २९ ते शश्वद्गो-
धनाकीर्णमम्बुमन्तं शुभद्रुमम् । गोरथं गिरिमासाद्य ददृशुर्मागधं पुरम् ३०
[८११] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां सभाप-
र्वणि जरासंधवधपर्वणि कृष्णपाण्डवमागधयात्रायां विंशोऽध्यायः ॥ २० ॥
श्रीवासुदेव उवाच ॥ एष पार्थ महान्भाति पशुमान्नित्यमम्बुमान् ।

केला होता २२. ते त्रिवर्ग स्वाभाविकच अत्यंत तेजस्वी असून ज्ञातीकरितां क्रोधानें संतप्त झाले असल्यामुळें त्यांचें शरीर सूर्य, चंद्र व अग्नि ह्यांच्या शरीराप्रमाणें देदीप्यमान होतें २३. असो. युद्धामध्यें अजिंक्य, जगतांतील सर्व हालचालींचे नियंते आणि धर्म, अर्थ व काम ह्या त्रिवर्गसंबंधीं कार्यांचे व लोकांचे प्रवर्तक असे जे नरनारायणरूप कृष्णार्जुन ते भीमसेनाला पुढें करून एकच कार्य करण्याविषयीं उभयतां उद्युक्त झाल्याचें पाहिल्यावर जरासंधाचा वध झालाच असें धर्मराज युधिष्ठिरानें मानिलें २४,२५. कुरुदेशांतून निघाल्यावर कुरुजांगल देशामधून रम्य अशा पद्म सरोवरावर ते गेले आणि कालकूटपर्वत ओलांडिल्यावर २६ गंडकी, महाशोण, सदानीरा वगैरे एक पर्वतावर असलेल्या नद्या क्रमाक्रमानें ओलांडून ते चालते झाले २७. तदनंतर रमणीय सरयू नदी आणि पूर्व कोसलदेश अवलोकन करून आणि मिथिला व माला ह्यांना मागें टाकून ते चर्मण्वती नदीला गेले २८. नंतर गंगा व शोणनद ओलांडिल्यावर ते तिघे प्राङ्मुख झाले, दर्भ व वल्कलें ह्यांनीं आच्छादित होऊन च्युतिरहित असलेले ते तिघेजण मगधदेशासंबंधीं प्रदेशावर आले २९ आणि सर्वकाळ गाई, उदक व शुभ वृक्ष ह्यांनीं व्याप्त असलेल्या गोरथपर्वताला गेल्यानंतर मगधदेशाच्या राजधानीचें (गिरिव्रजसंज्ञक) नगर त्यांनीं अवलोकन केलें ३०. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील जरासंधवधपर्वांपैकीं कृष्ण व पांडुपुत्र भीमार्जुन मगधदेशाला गेल्याविषयीं विसावा अध्याय समाप्त झाला ॥२०॥

श्रीकृष्ण ह्मणतातः—हे अर्जुना, हा मगधदेशसंबंधीं भव्य भूप्रदेश पशु व उदक

निरामयः सुवेश्माढ्यो निवेशो मागधः शुभः १ वैहारो विपुलः शैलो वराहो वृषभस्तथा । तथा ऋषिगिरिस्तात शुभाश्चैत्यकपञ्चमाः २ एते पञ्च महाशृङ्गाः पर्वताःशीतलद्रुमाः । रक्षन्तीवाभिसंहत्य संहताङ्गा गिरिव्रजम् ३ पुष्पवेष्टितशाखाग्रैर्गन्धवद्भिर्मनोरमैः । निगूढा इव लोध्राणां वनैः कामिजनप्रियैः ४ शूद्रायां गौतमो यत्र महात्मा संशितव्रतः । औशीनर्यामजनयत्काक्षीवाद्यान्सुतान्मुनिः ५ गौतमस्य क्षयात्तस्माद्यथासौ तत्र सद्मनि । भजते मानवं वंशं स नृपाणामनुग्रहः ६ अङ्गवङ्गादयश्चैव राजानः सुमहाबलाः । गौतमक्षयमभ्येत्य रमन्ते स्म पुरार्जुन ७ वनराजीस्तु पश्येमाः पिप्पलानां मनोरमाः । लोध्राणां च शुभाः पार्थ गौतमौकःसमीपजाः ८ अर्बुदः शक्रवापी च पन्नगौ शत्रुतापनौ । स्वस्तिकस्यालयश्चात्र मणिनागस्य चोत्तमः ९ अपरिहार्या मेघानां मागधा मनुना कृताः । कौशिको मणिमांश्चैव चक्राते चाप्यनुग्रहम् १० एवं प्राप्य पुरं रम्यं दुराधर्षं सम-

---

ह्यांनीं सर्वदा युक्त, रोगरहित, शुभ व चांगल्या चांगल्या गृहांनीं भरलेला असावा असें दिसतें १. बा अर्जुना, विस्तीर्ण वैहार पर्वत, वराह, वृषभ, ऋषिगिरि आणि पांचवा चैत्यक २ हे मोठमोठ्या शिखरांनीं, शीतल उदकांनीं व दृढ प्रदेशांनीं युक्त असलेले पांच पर्वत एकत्र जमून गिरिव्रज नगराचें रक्षणच करीत आहेत कीं काय असें दिसतात ३. ज्यांतील वृक्षांचीं शाखाग्रें पुष्पांनीं भरलेलीं आहेत आणि ह्मणूनच कामी जनांना जीं (विशेषेंकरून) प्रिय आहेत अशा सुगंध व मनोहर लोध्रवृक्षांच्या वनांनीं हे पर्वत आच्छादित झाल्यासारखे दिसत आहेत ४. येथें निर्मल आचरणानें युक्त असलेल्या महात्म्या गौतममुनींनीं शूद्रजातीय औशीनरीचे ठिकाणीं काक्षीवत्प्रभृति पुत्र उत्पन्न केले ५. हा काक्षीवत्प्रभृतींचा वंश प्रथम त्या शूद्रजातीय स्त्रीचे ठिकाणीं उत्पन्न झाला असूनही गौतममुनींच्या सामर्थ्यानें मनुवंशाच्या आश्रयाला आहे हा त्या राजांवर गौतममुनींचा अनुग्रह होय ६. हे अर्जुना, अत्यंत महाबलाढ्य असे अंगवंगप्रभृति राजे पूर्वीं गौतममुनींचे घरीं येऊन क्रीडा करीत असत ७. हे कुंतीपुत्रा अर्जुना, मनोहर आणि शुभ अशा ह्या पिप्पल व लोध्रवृक्षांच्या वनपंक्ति गौतममुनींच्या गृहासमीप असलेल्या तूं अवलोकन कर ८. शत्रूंना ताप देणारे उभयतां नाग अर्बुद व शक्रवापी ह्या ठिकाणीं असून स्वस्तिक व मणिनाग ह्यांचींही उत्कृष्ट घरें ह्या ठिकाणीं आहेत ९. हा मगधदेश मनूनें तर मेघांना अपरिहार्य (ह्मणजे अवर्षणरहित) केला असून कौशिक व मणिमान् ह्या उभयतांनींही ह्या प्रदेशावर अनुग्रह केलेला आहे १०. ह्याप्रमाणें कोणत्याही बाजूनें हल्ला होण्यास अशक्य

ततः । अर्थसिद्धिं त्वनुपमां जरासंधोऽभिमन्यते ११ वयमासादने तस्य
दर्पमद्य हरेम हि । वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वा ततः सर्वे भ्रातरो विपु-
लौजसः १२ वार्ष्णेयः पाण्डवौ चैव प्रतस्थुर्मागधं पुरम् । हृष्टपुष्टजनोपेतं
चातुर्वर्ण्यसमाकुलम् १३ स्फीतोत्सवमनाधृष्यमासेदुश्च गिरिव्रजम् । ततो
द्वारं समासाद्य पुरस्य गिरिमुच्छ्रितम् १४ बार्हद्रथैः पूज्यमानं तथा नग-
रवासिभिः । मागधानां तु रुचिरं चैत्यकान्तरमाद्रवन् १५ यत्र मांसाद-
मृषभमाससाद बृहद्रथः । तं हत्वा मासतालाभिस्तिस्रो भेरीरकारयत् १६
स्वपुरे स्थापयामास तेन चानह्य चर्मणा । यत्र ताः प्राणदन्भेर्यो दिव्य-
पुष्पावचूर्णिताः १७ भङ्क्त्वा भेरीत्रयं तेपि चैत्यप्राकारमाद्रवन् । द्वार-
तोऽभिमुखाः सर्वे ययुर्नानायुधास्तदा १८ मागधानां सुरुचिरं चैत्यकं तं
समाद्रवन् । शिरसीव समाघ्नन्तो जरासन्धं जिघांसवः १९ स्थिरं सुवि-
पुलं शृङ्गं सुमहत्तत्पुरातनम् । अर्चितं गन्धमाल्यैश्च सततं सुप्रतिष्ठि-

---

असलेलें हें रम्य नगर प्राप्त झाल्यामुळें अनुपम मनोरथ सिद्धीस गेल्याचें जो जरासंध मानीत आहे ११ त्याचा गर्व आज आह्मी गांठ पडल्यावर हरण करूं. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें बोलणें झाल्यावर ते सर्व भ्राते १२ ह्मणजे वृष्णिकुलोत्पन्न श्रीकृष्ण आणि पांडुपुत्र भीमार्जुन मगधदेशाच्या राजधानीचे शहराकडे निघाले आणि निघाल्यानंतर ते गिरिव्रजनगरासमीप जाऊन पोंहोचले. तें नगर आनंदित व पुष्ट जनांनीं आणि मोठमोठ्या उत्सवांनीं युक्त असून चारी वर्णांच्या लोकांनीं गजबजून गेलेलें होतें व त्याजवर हल्ला होणें मुळींच शक्य नव्हतें. असो. गिरिव्रजनगरासमीप गेल्यानंतर नगराच्या द्वाराशीं न जातां बृहद्रथवंशजांना व नगरवासी लोकांना पूज्य असा जो मगधदेशाधिपतींचा मनोहर व उच्च चैत्यक पर्वत त्याच्याकडे ते धांवले १३,१४,१५. त्या पर्वतावर मांसभक्षक ऋषभासुराकडे बृहद्रथ राजा गेला होता. तेव्हां त्या असुराचा वध करून त्यानें तीन नौबदी त्याच्याच कातड्याच्या तयार केलेल्या आहेत. त्या एकदां वाजविल्या असतां महिना महिनापर्यंत शब्द करीत राहतात १६. त्या नौबदी त्या असुराच्याच चर्मानें अवळून बृहद्रथानें आपल्या राजधानीच्या शहरांत ठेविल्या आहेत आणि सर्वदां दिव्य पुष्पें वर घालून ठेविलेल्या त्या नौबदी तेथेंच वाजत असतात १७. असो. ते वीर त्या तिन्ही नौबदी फोडून नगरदर्शक प्राकाराकडे गेले असतां अनेक प्रकारचीं आयुधें घेऊन रक्षकही प्राकाराच्या द्वाराकडे तोंड करून जाऊं लागले १८. तों इतक्यांत जरासंधाचा वध इच्छिणारे ते तिघेही त्याच्या मस्तकावर लत्ताप्रहारच करीत आहेत कीं काय अशा प्रकारानें मगधाधिपतींच्या त्या अत्यंत रम्य चैत्यक

तम् २० विपुलैर्बाहुभिर्वीरास्तेभिहत्याभ्यपातयन् । ततस्ते मागधं हृष्टाः पुरं प्रविविशुस्तदा २१ एतस्मिन्नेव काले तु ब्राह्मणा वेदपारगाः । दृष्ट्वा तु दुर्निमित्तानि जरासंधमदर्शयन् २२ पर्यग्न्यकुर्वंश्च नृपं द्विरदस्थं पुरोहिताः । ततस्तच्छान्तये राजा जरासंधः प्रतापवान् २३ दीक्षितो नियमस्थोसावुपवासपरोभवत् । स्नातकव्रतिनस्ते तु बाहुशस्त्रा निरायुधाः २४ युयुत्सवः प्रविविशुर्जरासंधेन भारत । भक्ष्यमाल्यापणानां च ददृशुः श्रियमुत्तमाम् २५ स्फीतां सर्वगुणोपेतां सर्वकामसमृद्धिनीम् । तां तु दृष्ट्वा समृद्धिं ते वीथ्यां तस्यां नरोत्तमः २६ राजमार्गेण गच्छन्तः कृष्णभीमधनंजयाः । बलाद्गृहीत्वा माल्यानि मालाकारान्महाबलाः २७ विरागवसनाः सर्वे स्रग्विणो मृष्टकुण्डलाः । निवेशनमथाजग्मुर्जरासंधस्य धीमतः २८ गोवासमिव वीक्षन्तः सिंहा हैमवतो यथा २९ शालस्तम्भनिभास्तेषां चन्दनागुरुरूषिताः । अशोभन्त महाराज बाहवो युद्धशालि-

---

पर्वतावर चढले १९. तें प्रचंड पर्वतशिखर फारच विस्तीर्ण, दृढ आणि सर्वदा सुरक्षित असून गंधपुष्पांनीं सर्वदा पूजा केलेलें असें २०. त्या तिघा वीरांनीं आपल्या मोठमोठ्या बाहूंच्या योगानें प्रहार करून तें खालीं पाडिलें आणि नंतर आनंदित होऊन ते मगधदेशांतील गिरिव्रजसंज्ञक राजधानीच्या शहरांत गेले २१. ह्याचवेळीं वेदपारंगत ब्राह्मणांच्या अवलोकनांत दुश्चिन्हें आलीं व तीं त्यांनीं जरासंधाला दर्शविलीं २२. तेव्हां गजारूढ झालेल्या राजा जरासंधाच्या भोंवतीं पुरोहितांनीं अग्नि फिरविला (ह्मणजे पर्यग्निकरण केलें, तदनंतर त्या उत्पातांच्या शांतीकरितां प्रतापी जरासंध २३ (उत्पातशामक) अनुष्ठानाची दीक्षा घेऊन व (ब्रह्मचर्यादि) नियम पाळून उपवास करूं लागला. असो. इकडे, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, हातामध्यें कांहींएक आयुध न घेतां बाहुरूप शस्त्रांनीं युक्त असलेले ते तिघे स्नातकव्रताचा स्वीकार करून जरासंधाशीं युद्ध करण्याच्या इच्छेनें गिरिव्रज नगरामध्यें प्रविष्ट झाले असतां भव्य, सर्वगुणसंपन्न व सर्वप्रकारच्या इष्ट वस्तूंनीं परिपूर्ण अशी भक्ष्य पदार्थांच्या व पुष्पांच्या बाजारांची उत्कृष्ट शोभा त्यांनीं अवलोकन केली आणि ती भक्ष्य पदार्थांची व पुष्पांची समृद्धि त्या रस्त्यामध्यें अवलोकन करून २४,२५,२६,२७. भीमार्जुन व कृष्ण राजमार्गानें जाऊं लागले व जातां जातां त्या महाबलाढ्य वीरांनीं बलात्कारानें एका माळ्या पासून फुलें घेतलीं तदनंतर साधीं वस्त्रें, उज्ज्वल कुंडलें व माला धारण करून ते सर्व, गोठा पहात जाणाऱ्या हिमालय पर्वतावरील सिंहांप्रमाणें, बुद्धिमान् जरासंधाच्या घरीं गेले २८,२९. हे महाराज जनमेजया, त्या युद्धशाली त्रिवर्गांचे बाहु शाल-

नाम् ३० तान्दृष्ट्वा द्विरदप्रख्याञ्छालस्कन्धानिवोद्गतान् ॥ व्यूढोरस्का-
न्मागधानां विस्मयः समपद्यत ३१ तेत्वतीत्य जनाकीर्णाः कक्षास्तिस्रो
नरर्षभाः । अहंकारेण राजानमुपतस्थुर्गतव्यथाः ३२ तान्पाद्यमधुपर्का-
र्हान्गवार्हान्सत्कृतिं गतान् । प्रत्युत्थाय जरासंध उपतस्थे यथाविधि ३३
उवाच चैतान्राजासौ स्वागतं वोऽस्त्विति प्रभुः । मौनमासीत्तदा पार्थ-
भीमयोर्जनमेजय ३४ तेषां मध्ये महाबुद्धिः कृष्णो वचनमब्रवीत् ॥ वक्तुं
नायाति राजेन्द्र एतयोर्नियमस्थयोः ३५ अर्वाङ्निशीथात्परतस्त्वया सार्धं
वदिष्यतः । यज्ञागारे स्थापयित्वा राजा राजगृहं गतः ३६ ततोऽर्धरात्रे
संप्राप्ते यातो यत्र स्थिता द्विजाः । तस्य ह्येतद्व्रतं राजन्बभूव भुवि विश्रु-
तम् ३७ स्नातकान्ब्राह्मणान्प्राप्ताञ्श्रुत्वा स समितिंजयः । अप्यर्धरात्रे नृपतिः
प्रत्युद्गच्छति भारत ३८ तांस्त्वपूर्वेण वेषेण दृष्ट्वा स नृपसत्तमः । उपतस्थे
जरासंधो विस्मितश्चाभवत्तदा ३९ ते तु दृष्ट्वैव राजानं जरासंधं नरर्षभाः ।

स्तंभासारखे मोठे असून चंदन व अगुरु ह्यांनीं चर्चित केले असल्यामुळें चांगले शोभत होते ३०. विपुल वक्षःस्थलानें युक्त असून (आंगलोटानें) गजासारखे असलेले व भूमींतून निघालेल्या शालस्कंधाप्रमाणें दिसत असलेले ते तीन वीर अवलोकन करून मगधदेशांतील लोकांना विस्मय वाटला ३१. तदनंतर मनुष्यांनीं गजबजून गेलेले तीन चौक ओलांडून ते पुरुषश्रेष्ठ मनांत यत्किंचित्‌ही भीति न बाळगतां तोऱ्या तोऱ्यानेंच राजाकडे गेले ३२. तेव्हां, पाद्य, मधुपर्क, गोप्रदान व सत्कार ह्यांना योग्य असलेल्या त्या त्रिवर्गाचें अभ्युत्थानपूर्वक जरासंधानें यथाविधि पूजन केलें ३३ आणि " तुमचें स्वागत असो " ह्मणून प्रभु जरासंध त्यांना ह्मणाला. हे जनमेजया, त्यावेळीं भीमसेन व अर्जुन ह्या उभयतांनीं मौन धारण केलें असून ३४ त्यांच्यापैकीं महाबुद्धिमान् श्रीकृष्ण मात्र जरासंधाला ह्मणाले " हे नृपश्रेष्ठा, अनुष्ठान करीत असलेल्या ह्या उभयतांना मध्यरात्रीचे पूर्वीं बोलतां येत नाहीं; नंतर ते तुझ्या सहवर्तमान भाषण करतील ?" ह्याप्रमाणें श्रीकृष्णांनीं सांगितलें असतां त्या त्रिवर्गांना यज्ञशालेमध्यें ठेवून जरासंधराजा स्वगृहीं गेला ३५, ३६ आणि मध्यरात्र झाल्यावर ज्या ठिकाणीं ते द्विज (—वेषधारी त्रिवर्ग) होते त्या ठिकाणीं आला. कारण, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, " स्नातक ब्राह्मण प्राप्त झाल्याचें ऐकिल्यावर तो संग्रामविजयी जरासंध राजा मध्यरात्रीं उठून देखील त्यांना सामोरा जातो " अशी त्याच्या ह्या (स्वागत-) व्रताची पृथ्वीमध्यें प्रसिद्धिच होऊन राहिलेली होती ३७, ३८. असो. अपूर्व वेषानें युक्त असलेल्या त्या त्रिवर्गांना अवलोकन केल्यावर नृपश्रेष्ठ जरासंध विस्मित होऊन

इदमूचुरमित्रघ्नाः सर्वे भरतसत्तम ४० स्वस्त्यस्तु कुशलं राजन्निति तत्र व्यवस्थिताः । तं नृपं नृपशार्दूल प्रेक्षमाणाः परस्परम् ४१ तानब्रवीज्जरासन्धस्तथा पाण्डवयादवान् । आस्यतामिति राजेन्द्र ब्राह्मणच्छद्मसंवृतान्४२ अथोपविविशुः सर्वे त्रयस्ते पुरुषर्षभाः । संप्रदीप्तास्त्रयो लक्ष्म्या महाध्वर इवाग्नयः ४३ तानुवाच जरासंधः सत्यसंधो नराधिपः । विगर्हमाणः कौरव्य वेषग्रहणवैकृतान् ४४ न स्नातकव्रता विप्रा बहिर्माल्यानुलेपनाः । भवन्तीति नृलोकेस्मिन्विदितं मम सर्वशः ४५ के यूयं पुष्पवन्तश्च भुजैर्ज्याकृतलक्षणैः।बिभ्रतः क्षात्रमोजश्च ब्राह्मण्यंप्रतिजानथ ४६ एवं विरागवसना बहिर्माल्यानुलेपनाः । सत्यं वदत के यूयं सत्यं राजसु शोभते ४७ चैत्यकस्य गिरेः शृङ्गं भित्त्वा किमिह च्छद्मना । अद्वारेण प्रविष्टाः स्थ निर्भया राजकिल्बिषात् ४८वदध्वं वाचि वीर्यं च ब्राह्मणस्य विशेषतः । कर्म चैतद्विलिङ्गस्थं किं वोद्य प्रसमीक्षितम् ४९एवंच मामुपा-

---

त्यांचे समीप उभा राहिला ३९. हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, जरासंध राजाला अवलोकन करितांक्षणीं यज्ञशालेमध्यें असलेले ते सर्व शत्रुनाशक पुरुषश्रेष्ठ ४० " हे राजा, तुझें कल्याण असो " असें ह्मणून उभे राहिले. तेव्हां, हे नृपश्रेष्ठा जनमेजया, एकमेकाकडे पाहून ते त्या जरासंधराजाकडे पाहूं लागले ४१. तदनंतर हे जनमेजय राजेंद्रा, ब्राह्मणवेषानें आपलें स्वरूप गुप्त ठेवून आलेल्या त्या पांडवयादवांना (ह्मणजे पांडुपुत्र भीमार्जुन व यदुनंदन श्रीकृष्ण ह्यांना) जरासंधानें " बसावें " ह्मणून सांगितल्यानंतर ४२ महाक्रतूंतील अग्नीप्रमाणें कांतीनें देदीप्यमान असलेले ते सर्व तिघेही पुरुषश्रेष्ठ बसले४३. तेव्हां हे कुरुकुलोत्पन्ना जनमेजया, परकीय वेषानें स्वरूपांत बदल केलेल्या त्या त्रिवर्गांना दूषण देण्याच्या बुद्धीनें सत्यवचनी जरासंध नृपति ह्मणाला ४४ " स्नातकव्रतानें वागणारे विप्र ह्या मनुष्यलोकामध्यें (समावर्तनादि निमित्तावांचून) बाह्यतः पुष्पें व उटी सेवन करीत नाहींत हें मला पूर्णपणें माहीत आहे४५. तस्मात्, ज्यांच्यावर प्रत्यंचेच्या खुणा झालेल्या आहेत अशा बाहूंमुळें धडधडीत क्षत्रियतेज धारण करीत (असल्याचें दिसत) असतांना पुष्पें धारण करून ब्राह्मण्याविषयीं प्रतिज्ञेवर सांगत असलेले तुह्मी कोण रे ? ४६. अरे, ह्याप्रमाणें वैराग्यसूचक वस्त्रें धारण करून बाह्यतः पुष्पें व उटी सेवन करणारे तुह्मी कोण तें सत्य सांगा. राजांमध्यें सत्यच शोभत असतें ४७. अरे, चैत्यक पर्वताचें शिखर फोडून राजाचा गुन्हा होईल ह्याची मुळींच भीति मनांत न आणितां तुह्मी कपट करून आडमार्गानें येथें कां प्रविष्ट झालां रे? ४८. अरे, ब्राह्मणाचें वीर्य विशेषेंकरून वाणीमध्यें असतांना ब्राह्मणलक्षणाला विरुद्ध असें हें

स्थाय कस्माच्च विधिनार्हणाम् । प्रणीतां नानुगृह्णीत कार्यं किं वास्मदा-
गमे ५० एवमुक्ते ततः कृष्णः प्रत्युवाच महामनाः । स्निग्धगम्भीरया वाचा
वाक्यं वाक्यविशारदः ५१ कृष्ण उवाच ॥ स्नातकान्ब्राह्मणान्राजन्वि-
द्ध्यस्मांस्त्वं नराधिप । स्नातकव्रतिनो राजन्ब्राह्मणाःक्षत्रिया विशः ५२
विशेषनियमाश्चैषामविशेषाश्च सन्त्युत । विशेषवांश्च सततं क्षत्रियश्रिय-
मृच्छति ॥ पुष्पवत्सु ध्रुवा श्रीश्च पुष्पवन्तस्ततो वयम् ५३ क्षत्रियो बाहु-
वीर्यस्तु न तथा वाक्यवीर्यवान् । अप्रगल्भं वचस्तस्य तस्माद्बार्हद्रथेरि-
तम् ५४ स्ववीर्यं क्षत्रियाणां तु बाह्वोर्धाता न्यवेशयत् । तद्दिदृक्षसि
चेद्राजन्द्रष्टास्यद्य न संशयः ५५ अद्वारेण रिपोर्गेहं द्वारेण सुहृदो गृहान् ।
प्रविशन्ति नरा धीरा द्वाराण्येतानि धर्मतः ५६ कार्यवन्तो गृहानेत्य शत्रुतो
नार्हणां वयम् । प्रतिगृह्णीम तद्विद्धि एतन्नः शाश्वतं व्रतम् ५७ [८७८] इति०

कर्म तुमचें आज दृष्टोत्पत्तीस कसें आलें तें सांगा ४९. त्याचप्रमाणें माझ्या समीप आला असून मी पूजासाहित्य यथाविधि अर्पण केलें असतांना तुह्मी त्याचा स्वीकार कां करीत नाहीं अथवा आह्मांकडे येण्यांत तुमचा उद्देश तरी काय आहे हें कळवा" ५०. ह्याप्रमाणें जरासंध बोलला असतां संभाषण करण्यामध्यें निपुण असलेले महाबुद्धिमान् श्रीकृष्ण सौम्य व गंभीरवाणीनें त्याला ह्मणाले ५१ "हे नराधिपते जरासंधराजा, आह्मी स्नातक ब्राह्मण आहोंत असें तूं समज. हे राजा, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे तिघेही स्नातकव्रतानें वागणारे असतात ५२. पैकीं कांहींचें विशेष नियम असतात आणि कांहीं सामान्य नियमांनींच वागत असतात. विशेष नियमांनीं सर्वदा युक्त असलेल्या पुरुषाला क्षत्रियाचें वैभव प्राप्त होत असतें. शिवाय पुष्पें धारण करणाऱ्यांपाशीं लक्ष्मी अक्षय्य असते. ह्मणून आह्मी पुष्पयुक्त आहोंत ५३. क्षत्रिय ज्याप्रमाणें बाहुवीर्यानें युक्त असतो त्याप्रमाणें वचनसामर्थ्य त्याच्यापाशीं नसतें. तस्मात्, हे बृहद्रथपुत्रा जरासंधा, त्यानें केलेल्या भाषणांत प्रगल्भता नसतें असें ह्मटलें आहे ५४. क्षत्रियांचें स्वतःचें वीर्य ब्रह्मदेवानें त्यांच्या बाहूमध्यें ठेविलें आहे. तेव्हां तें स्वतःचें बाहुवीर्य (कितपत आहे हें) पाहण्याची जर तुझी इच्छा असेल तर आज निःसंशय तें तुझ्या दृष्टोत्पत्तीस येईल ५५. अरे, ज्ञानी पुरुष आडमार्गानें शत्रुगृहीं प्रवेश करीत असून योग्य द्वारानें सुहृदाच्या घरीं जात असतात. तस्मात्, (आह्मी ज्या मार्गांनीं आलों तीं) हीं धर्मदृष्ट्या द्वारेंच आहेत ५६. अरे, कांहीं कार्याच्या उद्देशानें शत्रुगृहीं आलों असतांना त्याच्यापासून आह्मी आदरातिथ्याचा स्वीकार करीत नसतों. तस्मात्, हें आमचें नेहमींचें व्रत आहे असें तूं समज ५७.

सभापर्वणि जरासंधवधपर्वणि कृष्णजरासंधसंवादे एकाविंशोऽध्यायः ॥ २१॥

जरासंध उवाच ॥ न स्मरामि कदा वैरं कृतं युष्माभिरित्युत । चिन्तयंश्च न पश्यामि भवतां प्रति वैकृतम् १ वैकृते वासति कथं मन्यध्वं मामनागमम् । अरिं वै ब्रूत हे विप्राः सतां समय एष हि २ अथ धर्मोपघाताद्धि मनः समुपतप्यते । योनागसि प्रसजति क्षत्रियो हि न संशयः ३ अतोऽन्यथा चरल्लोके धर्मज्ञः सन्महारथः । वृजिनां गतिमाप्नोति श्रेयसोप्युपहन्ति च ४ त्रैलोक्ये क्षत्रधर्मो हि श्रेयान्वै साधुचारिणाम् । नान्यं धर्मं प्रशंसन्ति ये च धर्मविदो जनाः ५ तस्य मेद्य स्थितस्येह स्वधर्मे नियतात्मनः । अनागसः प्रजानां च प्रमादादिव जल्पथ ६ कृष्ण उवाच ॥ कुलकार्यं महाबाहो कश्चिदेकः कुलोद्वहः । वहते यस्तन्नियोगाद्वयमभ्युद्यतास्त्वयि ७ त्वया चोपहृता राजन्क्षत्रिया लोकवासिनः । तदागः क्रूरमुत्पाद्य मन्यसे किमनागसम् ८ राजा राज्ञः कथं साधून्हिं-

ह्याप्रमाणें श्रीमहामुनिव्यासप्रणीत० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील जरासंधवधपर्वांपैकीं श्रीकृष्ण आणि जरासंध ह्यांच्या संवादाविषयीं एकविसावा अध्याय समाप्त झाला॥२१॥

जरासंध ह्मणतोः— मीं तुमच्याशीं कधीं वैर केलें आहे हें मला स्मरत नाहीं; इतकेंच नव्हें परंतु विचार करून पहात असतांनाही तुह्मांला कांहीं अपकार केल्याचें माझ्या लक्ष्यांत येत नाहीं १. करितां, अपकार केला नसतांना मज निरपराध्याला तुह्मी शत्रु कसें समजतां ? तस्मात्, हे विप्रहो, हा सज्जनांचा मार्ग आहे कीं काय तें सांगा २. खरोखर जो क्षत्रिय निरपराध्यावर आरोप लादितो त्याच्या मनाला (दुसऱ्यावर व्यर्थ आरोप लादल्यानें) धर्मोपघात झाल्यामुळें पश्चात्ताप होतो ३. तस्मात् , धर्मज्ञ असूनही एकादा महारथी क्षत्रिय जर लोकांमध्यें अधर्मानें वागूं लागला तर (परिणामीं) त्याला दुर्गति प्राप्त होत असून कल्याणालाही तो मुकतो ४. त्रैलोक्यामध्यें क्षत्रियधर्मच सदाचरणी लोकांना चांगला होतो. ह्यास्तव, जे लोक धर्मवेत्ते आहेत ते इतर धर्मांची प्रशंसा करीत नाहींत ५. सारांश, मनोनिग्रह करून मी स्वधर्मानें वागत असतांना व प्रजाजनांचाही कांहीं अपराध करीत नसतांना तुह्मी हें प्रमादानें बोलल्यासारखें भलतेंच काय बोलत आहां ? ६. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे महापराक्रमी जरासंधा, जो कोणी एकाद्या कुळांतील मुख्य पुरुष कुळकार्य करीत आहे त्याच्या आज्ञेनें आह्मी तुझ्यावर उठलों आहोंत ७. हे राजा, ह्या लोकामध्यें राहणाऱ्या क्षत्रियांना बळि देण्याकरितां ह्मणून तूं आणून ठेविले आहेस आणि हें घोर पाप करूनहीं तूं आपणाला निष्पाप समजत आहेस हें कसें ? ८. हे नृपश्रेष्ठा, निरुपद्रवी राजांची हिंसा

स्यान्नृपतिसत्तम । तद्राज्ञः संनिगृह्य त्वं रुद्रायोपजिहीर्षसि ९ अस्मांस्त-देनोपगच्छेत्कृतं बार्हद्रथ त्वया । वयं हि शक्ता धर्मस्य रक्षणे धर्मचा-रिणः १० मनुष्याणां समालम्भो न च दृष्टः कदाचन । स कथं मानु-षैर्देवं यष्टुमिच्छसि शंकरम् ११ सवर्णो हि सवर्णानां पशुसंज्ञां करि-ष्यसि । कोन्य एवं यथा हि त्वं जरासंध वृथामतिः १२ यस्यां यस्या-मवस्थायां यद्यत्कर्म करोति यः । तस्यां तस्यामवस्थायां तत्फलं सम-वाप्नुयात् १३ ते त्वां ज्ञातिक्षयकरं वयमार्तानुसारिणः । ज्ञातिवृद्धि-निमित्तार्थं विनिहन्तुमिहागताः १४ नास्ति लोके पुमानन्यः क्षत्रिये-ष्विति चैव यत् । मन्यसे स च ते राजन्सुमहान्बुद्धिविप्लवः १५ को हि जानन्नभिजनमात्मवान्क्षत्रियो नृप । नाविशेत्स्वर्गमतुलं रणानन्तरमव्य-यम् १६ स्वर्गं ह्येव समास्थाय रणयज्ञेषु दीक्षिताः । जयन्ति क्षत्रिया लोकांस्तद्विद्धि मनुजर्षभ १७ स्वर्गयोनिर्महद्ब्रह्म स्वर्गयोनिर्महद्यशः । स्वर्गयोनिस्तपो युद्धे मृत्युः सोऽव्यभिचारवान् १८ एष ह्यैन्द्रो वैजयन्तो

करण्यास राजा उद्युक्त होईल कसा ? परंतु, तूं तर राजांना जिंकून रुद्राला बळि देण्याची इच्छा करीत आहेस ९. करितां, हे बृहद्रथपुत्रा जरासंधा, तुझ्या हातून होणारें हें पातक आह्मांलाही लागेल. कारण, आह्मी धर्मानें वागणारे असून धर्मरक्षण करण्यासही समर्थ आहोंत १०. अरे, देवतेच्या उद्देशानें मनुष्यांचा वध कोठेंही पाहण्यांत नाहीं. तेव्हां तूं मनुष्यांच्या योगानें देवाधिदेवशंकरप्रीत्यर्थ याग करण्याची कशी इच्छा करीत आहेस ? ११. हे जरासंधा, तूं क्षत्रिय असून आपल्या सजातीयांना पशुसंज्ञा देत आहेस. तेव्हां तुझ्याप्रमाणें व्यर्थमतीचा दुसरा कोणी तरी आहे कां रे ? १२. ज्या ज्या अवस्थेमध्यें जो जें जें कर्म करितो त्याला त्या त्या अवस्थे-मध्यें त्या त्या कर्माचें फल प्राप्त होतें १३. ह्मणून दुःखिताच्या पक्षाला अनुसरणारे आह्मी स्वजातीची वृद्धि होण्याकरितां तुझा वध करण्याच्या उद्देशानें येथें आलों आहोंत १४. क्षत्रियामध्यें तुझ्यावांचून दुसरा कोणी (वीर) पुरुषच नाहीं असें जें तुला वाटत आहे ती तुझी फारच मोठी चूक आहे १५. हे राजा, सजातीयांचें पालन करणें आपलें कर्तव्य आहे असें समजणारा कोण बरें विचारी क्षत्रिय संग्रामानंतर अक्षय्य व अतुल अशा स्वर्गलोकाप्रत जाणार नाहीं ? १६. अरे, हे पुरुषश्रेष्ठा, स्वर्गाच्याच उद्देशानें संग्रामयज्ञाची दीक्षा घेतलेले क्षत्रिय लोकांना जिंकीत असतात हें तूं समजून ठेव १७. श्रेष्ठ वेद, मोठी कीर्ति व तप (ह्मणजे वैदिक कर्म) हीं सुखाला हेतुभूत आहेत आणि युद्धामध्यें आलेला मृत्यु तर अगदीं बिनचूक सुखाला

गुणैर्नित्यं समाहितः । येनासुरान्पराजित्य जगत्पाति शतक्रतुः १९ स्वर्ग-
मार्गाय कस्य स्याद्विग्रहो वै यथा तव । मागधैर्वि[illegible]ः सैन्यैर्बाहुल्यब-
लदर्पितः २० मावमंस्थाः परान्राजन्नास्ति वीर्यं नरे नरे । समं तेजस्त्वया
चैव विशिष्टं वा नरेश्वर २१ यावदेतदसंबुद्धं तावदेव भवेत्तव । विषह्य-
मेतदस्माकमतो राजन्ब्रवीमि ते २२ जहि त्वं सदृशेष्वेव मानं दर्पं च
मागध । मागमः ससुतामात्यः सबलश्च यमक्षयम् २३ दम्भोद्भवः कार्त-
वीर्य उत्तरश्च बृहद्रथः । श्रेयसो ह्यवमन्येह विनेशुः सबला नृपाः २४
युयुक्षमाणास्त्वत्तो हि न वयं ब्राह्मणा ध्रुवम् २५ शौरिरस्मि हृषीकेशो
नृवीरौ पाण्डवाविमौ । अनयोर्मातुलेयं च कृष्णं मां विद्धि ते रिपुम् २६
त्वामाह्वयामहे राजन्स्थिरो युध्यस्व मागध । मुञ्च वा नृपतीन्सर्वान्गच्छ वा त्वं
यमक्षयम् २७ जरासन्ध उवाच ॥ नाजितान्वै नरपतीनहमादद्मि कांश्चन ।

कारणीभूत होतच असतो १८. हा युद्धांतील मृत्यु सर्वदां गुणांनीं परिपूर्ण असलेला इंद्राचा वैजयंत प्रासाद प्राप्त होण्याला कारणीभूत होत असून तो प्राप्त झाल्यामुळेंच शतक्रतु इंद्र असुरांचा पराभव करून जगताचें रक्षण करीत आहे १९. असो. तुझ्या-प्रमाणें सुखप्राप्तीकारितां दुसरा कोणीही आमच्याशीं वैर करीत नाहीं. हे जरासंध राजा, केवळ मगधदेशांतील विपुल सैन्यांनीं ह्मणजे निवळ संख्येच्या जोरावर तूं चढून जाऊन २० दुसऱ्यांचा अवमान करीत जाऊं नकोस. कारण, प्रत्येक पुरुषाचे ठिकाणीं कांहीं वीर्य नसतें. हे नराधिपा, (आह्मासारख्यांचे ठिकाणीं) तुझ्या बरोबरीचें सामर्थ्य आहे किंवा अधिक आहे २१ हें जोंपर्यंत तुला समजून आलेलें नाहीं तोंपर्यंतच तुझें हें चालणार आहे. परंतु, हे राजा, तुझें हें सामर्थ्य आह्मांला सहन कर-ण्यास अशक्य नाहीं (ह्मणजे सामर्थ्यामध्यें आह्मी तुझ्या बरोबरीचे आहोंत). ह्मणून हे राजा, तुला सांगतों कीं २२. बरोबरीच्या लोकांविषयीं तूं अभिमान आणि गर्व सोडून दे आणि हे मगधदेशाधिपते, पुत्र, अमात्य व सेना ह्यांसहवर्तमान व्यर्थ यमसदनीं जाऊं नकोस २३. अरे, दंभोद्भव, कार्तवीर्य, उत्तर व बृहद्रथ हे राजे श्रेष्ठांचा अवमान करून इहलोकीं सैन्यासहवर्तमान नाश पावले आहेत २४. असो. आह्मी ब्राह्मण नसून खरोखर कांहीं कारस्थानानें तुझा वध करण्याचें इच्छीत आहोंत २५. मी शूर-कुलोत्पन्न हृषीकेश असून हे उभयतां वीर पुरुष पांडुपुत्र (भीमार्जुन) आहेत. अरे, मी ह्यांचा मातुलबंधु कृष्ण तुझा शत्रु आहें असें तूं समज २६. हे मगधदेशाधि-पते जरासंधराजा, तुला आह्मी युद्धार्थ आव्हान करीत आहोंत. करितां, तूं सावधपणानें युद्ध कर. सारांश, तूं आपला सर्व राजांना तरी सोडून दे किंवा यमसदनीं जाण्यास तरी

अजितः पर्यवस्थाता कोऽत्र यो न मया जितः २८ क्षत्रियस्यैतदेवाहुर्धर्म्यं कृष्णोपजीवनम् । विक्रम्य वशमानीय कामतो यत्समाचरेत् २९ देवतार्थमुपाहृत्य राज्ञः कृष्ण कथं भयात् । अहमद्य विमुच्येयं क्षात्रं व्रतमनुस्मरन् ३० सैन्यं सैन्येन व्यूढेन एक एकेन वा पुनः । द्वाभ्यां त्रिभिर्वा योत्स्येऽहं युगपत्पृथगेन वा ३१ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वा जरासंधः सहदेवाभिषेचनम् । आज्ञापयत्तदा राजा युयुत्सुर्भीमकर्मभिः ३२ स तु सेनापती राजा सस्मार भरतर्षभ । कौशिकं चित्रसेनं च तस्मिन्युद्ध उपस्थिते ३३ ययोस्ते नामनी राजन्हंसेति डिम्भकेति च । पूर्वं संकथिते पुम्भिर्नृलोके लोकसत्कृते ३४ तं तु राजन्विभुः शौरी राजानं बलिनां वरम् । स्मृत्वा पुरुषशार्दूलः शार्दूलसमविक्रमम् ३५ सत्यसंधो जरासंधं भुवि भीमपराक्रमम् । भागमन्यस्य निर्दिष्टमवध्यं मधुभिर्मृधे ३६ नात्म-

---

तयार हो २७. जरासंध ह्मणतोः—मी कोणतेही राजे जिंकल्यावांचून आणिले नाहींत. इतरांनीं जरी अजित असला तरी मीं न जिंकिलेला असा कोणीही शत्रु ह्या राजांमध्यें नाहीं २८. हे कृष्णा, पराक्रमानें इतरांना वश करून इच्छेस येईल त्याप्रमाणें करणें हेंच क्षत्रियाचें धर्म्य जीवन होय २९. तस्मात् , हे कृष्णा, देवतेच्या उद्देशानें राजे आणिले असतांना आणि मी क्षात्रधर्माला स्मरून वागत असतांना आज ते भीतीनें कसें बरें सोडून देऊं ? ३०. करितां, हे कृष्णा, व्यूहरचनेनें स्थित असलेल्या सैन्यानें सैन्याशीं अथवा एकटा एका योध्याशीं मी लढण्यास तयार आहें. त्याचप्रमाणें मी एकटा दोघांबरोबर अथवा तिघांबरोबर युद्ध करण्यास तयार असून त्यांतही पाळीपाळीनें अथवा एकदमही युद्ध करण्याची माझी तयारी आहे ३१. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें श्रीकृष्णाला उत्तर दिल्यानंतर भयंकर कर्म करणाऱ्या त्या त्रिवर्गाशीं युद्ध करण्यास उद्युक्त झालेल्या जरासंधानें आपल्या सहदेवनामक पुत्रास राज्याभिषेक करण्याची आज्ञा दिली ३२. हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, तें युद्ध उपस्थित झालें असतां त्या जरासंध राजाला कौशिक व चित्रसेन ह्या सेनापतींचें स्मरण झालें ३३. हे जनमेजय राजा, ह्या नरलोकामध्यें सर्व लोकांना अभिमत अशीं त्यांचीं नांवें हंस व डिंभक असल्याचें लोकांनीं पूर्वीं कथन करून ठेविलें आहे ३४. बलवानांमध्यें श्रेष्ठ, व्याघ्रासारखा पराक्रमी व सर्व पृथ्वीमध्यें भयंकर पराक्रम करणारा असा तो जरासंध मधुवंशजांना संग्रामामध्यें अवध्य असून ब्रह्मदेवाच्या आज्ञेनें इतराचा भाग ठरलेला असल्याचें स्मरण झाल्यामुळें जितेंद्रियामध्यें मुख्य , पुरुषांमध्यें श्रेष्ठ, सत्यवचनी व समर्थ असा जो शूरकुलोत्पन्न बलरामानुज मधुसूदन त्यानें स्वतः त्या जरासंधाशीं युद्ध करण्याचें

नात्मवतां मुख्य इयेष मधुसूदनः । ब्राह्मीमाज्ञां पुरस्कृत्य हन्तुं हलधरानुजः ३७ [९१५] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां सभापर्वणि जरासंधवधपर्वणि जरासंधयुद्धोद्योगे द्वाविंशोऽध्यायः ॥ २२ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततस्तं निश्चितात्मानं युद्धाय यदुनन्दनः । उवाच वाग्मी राजानं जरासन्धमधोक्षजः १ कृष्ण उवाच ॥ त्रयाणां केन ते राजन्योद्धुमुत्सहते मनः । अस्मदन्यतमेनेह सज्जीभवतु को युधि २ एवमुक्तः स नृपतिर्युद्धं वव्रे महाद्युतिः । जरासंधस्ततो राजा भीमसेनेन मागधः ३ आदाय रोचनां माल्यं मङ्गल्यान्यपराणि च । धारयन्नगदान्मुख्यान्निर्वृतीर्वेदनानि च ॥ उपतस्थे जरासंधं युयुत्सुं वै पुरोहितः ४ कृतस्वस्त्ययनो राजा ब्राह्मणेन यशस्विना । समनह्यज्जरासंधः क्षात्रं धर्ममनुस्मरन् ५ अवमुच्य किरीटं स केशान्समनुगृह्य च । उदतिष्ठज्जरासंधो वेलातिग इवार्णवः ६ उवाच मतिमान्राजा भीमं भीमपराक्रमः । भीम योत्स्ये त्वया सार्धं श्रेयसा निर्जितं वरम् ७ एवमुक्त्वा जरासंधो भीमसेनमरिंदमः । प्रत्युद्ययौ महातेजाः शक्रं बल इवासुरः ८ ततः संमन्त्र्य

मनांत आणिलें नाहीं ३५, ३६, ३७. ह्याप्रमाणें श्रीमहाभारतांतर्गत० सभापर्वांतील जरासंधवधपर्वांपैकीं जरासंधयुद्धोद्योगाविषयीं बाविसावा अध्याय समाप्त झाला ॥२२॥

वैशंपायन सांगतातः—तदनंतर युद्धाचा निश्चय केलेल्या त्या जरासंधाला अतींद्रिय व वक्तृत्वनिपुण असे यदुनंदन श्रीकृष्ण ह्मणाले १ "हे राजा, आह्मा तिघांपैकीं कोणाशीं युद्ध करण्याचें तुझ्या मनांत आहे ? आह्मांपैकीं ह्या ठिकाणीं युद्धाला कोणी सज्ज व्हावें ?" २. ह्याप्रमाणें श्रीकृष्णांनीं विचारिल्यावर त्या महातेजस्वी मगधदेशाधिपति जरासंधानें भीमसेनाशीं युद्ध करण्याचें पसंत केलें ३. तेव्हां रोचना, पुष्पें, इतरही मंगलकारक द्रव्यें, उत्तम औषधें व दुःख आणि मूर्च्छा येण्याचा प्रसंग आला असतां सुख देणारीं व सावध करणारीं औषधें हातांत घेऊन पुरोहित—युद्धाला उद्युक्त झालेल्या—जरासंधाकडे आला ४. तेव्हां त्या यशस्वी ब्राह्मणानें पुण्याहवाचन वगैरे केलेला तो जरासंध क्षात्र धर्माला स्मरून युद्धाला तयार झाला ५. प्रथमतः किरीट काढून ठेवून त्यानें आपले केंस बांधून टाकिले आणि मर्यादेचें अतिक्रमण करणारा सागरच कीं काय अशा रीतीनें तो जरासंध उभा राहिला ६. तदनंतर तो भयंकर पराक्रमी विचारी राजा भीमाला ह्मणाला "हे भीमा, तुझ्या बरोबर मी युद्ध करीन. कारण, बलाढ्य पुरुषापासून पराजित होणें बरें" ७. ह्याप्रमाणें शत्रूला दमविणारा महातेजस्वी जरासंध भीमसेनाशीं बोलून इंद्रावर चालून जाणाऱ्या बलनामक

कृष्णेन कृतस्वस्त्ययनो बली । भीमसेनो जरासंधमाससाद युयुत्सया ९
ततस्तौ नरशार्दूलौ बाहुशस्त्रौ समीयतुः । वीरौ परमसंहृष्टावन्योन्यजय-
काङ्क्षिणौ १० करग्रहणपूर्वं तु कृत्वा पादाभिवन्दनम् । कक्षैः कक्षां विधु-
न्वानावास्फोटं तत्र चक्रतुः ११ स्कन्धे दोर्भ्यां समाहत्य निहत्य च मुहुर्मुहुः ।
अङ्गमङ्गैः समाश्लिष्य पुनरास्फालनं विभो १२ चित्रहस्तादिकं कृत्वा
कक्षाबन्धं च चक्रतुः । गलगण्डाभिघातेन सस्फुलिङ्गेन चाशनिम् १३
बाहुपाशादिकं कृत्वा पादाहतशिरावुभौ । उरोहस्तं ततश्चक्रे पूर्णकुम्भौ
प्रयुज्य तौ १४ करसंपीडनं कृत्वा गर्जन्तौ वारणाविव । नर्दन्तौ मेघसं-
काशौ बाहुप्रहरणावुभौ १५ तलेनाहन्यमानौ तु अन्योन्यं कृतवीक्षणौ ।
सिंहाविव सुसंक्रुद्धावाकृष्याकृष्य युध्यताम् १६ अङ्गेनाङ्गं समापीड्य

दैत्याप्रमाणें भीमसेनावर चालून गेला ८. तदनंतर स्वस्त्ययन केलेला बलाढ्य भीमसेनही कृष्णांशीं कानगोष्ट करून युद्ध करण्याकरितां जरासंधासमीप आला ९. नंतर बाहुरूप शस्त्रांनीं युक्त असलेले ते उभयतां वीर पुरुषश्रेष्ठ अत्यंत आनंदित होऊन एकमेकांना जिंकण्याच्या इच्छेनें एकमेकांशीं येऊन भिडले १०. प्रथमतः एकमेकांचे हात धरून व पादाभिवंदन करून त्या जरासंधभीमसेनांनीं दंड ठोकले तेव्हां त्याच्या योगानें बाहुभूषणाच्या बंधांचीं शिलक राहिलेलीं टोकें कंपित झालीं ११. नंतर हे प्रभो जनमेजया, एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून त्यांनीं वारंवार प्रहार केले आणि आपलें मस्तक इतराच्या अवयवांसंनिध आणून त्यांनीं पुनःपुनः तें एकमेकांच्या अवयवांना घासटलें १२. तदनंतर हातांनीं व पायांनीं होणारे नानाप्रकारचे चमत्कारिक पेच त्यांनीं केले आणि कक्षाबंध करून (ह्मणजे एकमेकांच्या खाकेमध्यें हात घालण्यानें होत असलेला पेच योजून) एकमेकांच्या गालावर ललाटप्रदेशाचे ते प्रहार करूं लागले व त्याच्या योगानें ठिणग्या निघूं लागल्यामुळें ते उभयतां वीजच उत्पन्न करीत असल्यासारखे भासले १३. नंतर बाहुपाश वगैरे पेच करून त्यांनीं एकमेकांच्या स्नायूंवर पायांनीं आघात केले व पूर्णकुंभाचा प्रयोग करून (ह्मणजे दोन हातांचीं बोटें परस्परांत घातल्यावर होणाऱ्या मिठीनें एकमेकांचीं मस्तकें चेपून) त्यांनीं परस्परांच्या वक्षःस्थलावर तळहाताचे प्रहार केले १४. नंतर केवळ बाहुरूप आयुधांनीं युक्त असून गजांप्रमाणें गर्जना करीत असलेले व मेघाप्रमाणें शरीरानें धिप्पाड असलेले ते वीर एकमेकांचे हात मुरगळूं लागले १५; परस्परांकडे पाहून परस्परांना चापट्या मारूं लागले व अत्यंत क्रुद्ध झालेल्या सिंहांप्रमाणें एकमेकांना ओढून ओढून युद्ध करूं लागले १६. तदनंतर अंगाला अंग घासून व हातांनीं एकमेकांना

बाहुभ्यामुभयोरपि । आवृत्य बाहुभिश्चापि उदरं च प्रचक्रतुः १७ उभौ कट्यां सुपार्श्वे तु तक्षवन्तौ च शिक्षितौ । अधोहस्तं स्वकण्ठे तूदरस्योरसि चाक्षिपत् १८ सर्वातिक्रान्तमर्यादं पृष्ठभङ्गं च चक्रतुः । संपूर्णमूर्छां बाहुभ्यां पूर्णकुम्भं प्रचक्रतुः १९ तृणपीडं यथाकामं पूर्णयोगं समुष्टिकम् । एवमादीनि युद्धानि प्रकुर्वन्तौ परस्परम् २० तयोर्युद्धं ततो द्रष्टुं समेताः पुरवासिनः । ब्राह्मणा वणिजश्चैव क्षत्रियाश्च सहस्रशः २१ शूद्राश्च नरशार्दूल स्त्रियो वृद्धाश्च सर्वशः । निरन्तरमभूत्तत्र जनौघैरभिसंवृतम् २२ तयोरथ भुजाघातान्निग्रहप्रग्रहात्तथा । आसीत्सुभीमसंपातो वज्रपर्वतयोरिव २३ उभौ परमसंहृष्टौ बलेन बलिनांवरौ । अन्योन्यस्यान्तरं प्रेप्सू

आवळून धरून ते एकमेकांच्या उदरावर प्रहार करूं लागले १७ व ह्याचप्रमाणें कटीवर व बरगड्यांवरही त्यांनीं परस्पर प्रहार केले. तदनंतर मल्लयुद्धामध्यें चांगले सुशिक्षित असलेले ते उभयतां प्रहार चुकविण्यासाठीं आंग चोरूं लागले आणि एकमेकांच्या पोटाला हातांनीं वेळखा घालून एकमेकांना आपल्या उराइतकें अगर गळ्या इतकें उचलून ते एकदम खालीं टाकून देऊं लागले १८. तदनंतर मल्लयुद्धामध्यें कोणतीही मर्यादा न ठेवितां एकमेकांची पाठ भुईला लावून ते एकमेकांना जिंकूं लागले आणि बाहूंनीं उदरादिप्रदेश आवळून संपूर्णमूर्छासंज्ञक व (दोन हातांच्या मिठीनें मस्तक आवळून) पूर्णकुंभसंज्ञक पेच ते एकमेकांवर करूं लागले १९. नंतर (दोरी वळीत असतांना ज्याप्रमाणें पेडांतील तृण वगैरे मुरगळून जातें त्याचप्रमाणें ज्यामध्यें बाहूंची वगैरे अवस्था होत असते तें) तृणपीडसंज्ञक युद्ध व (एकेठिकाणीं प्रहार करीत असल्याचें अवसान दाखवून भलत्याच ठिकाणीं प्रहार करणें अशा प्रकारचें) पूर्णयोगसंज्ञक युद्ध ते मुष्टिप्रहारांनीं वगैरे करूं लागले आणि असल्याच जातीचे युद्धप्रयोग पुढें त्यांनीं एकमेकांशीं केले २०. त्यांचें युद्ध अवलोकन करण्याकरितां नगरवासी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, स्त्रिया व वृद्ध जन हे सर्व, हे पुरुषश्रेष्ठा जनमेजया, त्या ठिकाणीं हजारों जुळले होते. सारांश, जनसमुदायांच्या योगानें सर्व बाजूंनीं व्याप्त होऊन गेलेल्या त्या स्थानामध्यें वाव कशी ती मुळींच (मुंगी शिरण्यासही) राहिलेली नव्हती २१, २२. असो. त्यांचें दंड ठोकणें, निग्रह (ह्मणजे मानेला हातांची मिठी घालून भिडस्त्याला खालीं वाकविणें) आणि प्रग्रह (ह्मणजे जोडीदाराला उताणा पाडण्याकरितां त्याचे पाय ओढणें) ह्यांच्या योगानें तर वज्र व पर्वत हेच एकमेकांवर आपटत आहेत कीं काय अशी अति भयंकर धडपड होऊं लागली २३. कारण, ते उभयतांही बलवानांमध्यें श्रेष्ठ असून पराकाष्ठेचे आनंदित झाले होते आणि एकमेकांचें छिद्र

परस्परजयैषिणौ २४ तद्भीममुत्सार्यजनं युद्धमासीदुपप्लवे । बलिनोः संयुगे राजन्वृत्रवासवयोरिव २५ प्रकर्षणाकर्षणाभ्यामनुकर्षविकर्षणैः । आचकर्षतुरन्योन्यं जानुभिश्चावजघ्नतुः २६ ततः शब्देन महता भर्त्स-यन्तौ परस्परम् । पाषाणसंघातनिभैः प्रहारैरभिजघ्नतुः २७ व्यूढोरस्कौ दीर्घभुजौ नियुद्धकुशलावुभौ । बाहुभिः समसज्जेतामायसैः परिघैरिव २८ कार्तिकस्य तु मासस्य प्रवृत्तं प्रथमेहनि । अनाहारं दिवारात्रमविश्रान्त-मवर्तत २९ तद्वृत्तं तु त्रयोदश्यां समवेतं महात्मनोः । चतुर्दश्यां निशायां तु निवृत्तो मागधः क्लमात् ३० तं राजानं तथा क्लान्तं दृष्ट्वा राजजनार्दनः । उवाच भीमकर्माणं भीमं संबोधयन्निव ३१ क्लान्तः शत्रुर्न कौन्तेय लभ्यः पीडयितुं रणे । पीड्यमानो हि कार्त्स्न्येन जह्याज्जीवितमात्मनः ३२ तस्मात्ते नैव कौन्तेय पीडनीयो जनाधिपः । सममेतेन युध्यस्व बाहुभ्यां

पाहण्याविषयीं उत्सुक असून बलाच्या योगानें एकमेकाला जिंकण्याची इच्छा करीत होते २४. संग्रामामध्यें वृत्रासुर आणि इंद्र ह्यांचेंच युद्ध चाललें आहे कीं काय अशाप्रकारें युद्धभूमीमध्यें त्या बलाढ्य वीरांचें युद्ध भयंकर होत होतें आणि एकमेकांना ते रेटीत नेत असल्यामुळें सभोंवतीं उभे असलेले तेथील प्रेक्षक जन पाहिल्या ठिकाणाहून मागें मागें सरत होते २५. प्रकर्षण (ह्मणजे मागून ढकलणें), आकर्षण (ह्मणजे आपल्याकडे ओढणें), अनुकर्षण (ह्मणजे दुसरा तोंडघशीं पडेल अशा बेतानें त्याला ओढणें) आणि विकर्षण (ह्मणजे भूमीवरून ओढीत नेणें) ह्यांच्या योगानें त्यांनीं एकमेकांचें आंग अगदीं ओरखडून टाकिलें व गुडघ्यांनींही त्यांनीं एकमेकांवर प्रहार केले २६. तदनंतर उच्चस्वरानें ओरडून एकमेकांची निर्भर्त्सना करीत करीत पाषाणसमुदायाप्रमाणें ते एकमेकावर प्रहार करूं लागले २७. विशाल वक्षःस्थल व दीर्घ बाहु ह्यांनीं युक्त असलेले ते उभयतांही युद्धामध्यें निपुण असून लोखंडी अडसराप्रमाणें असलेल्या आपल्या बाहूंच्या योगानें एकमेकांना आडवीत होते २८. असो. कार्तिकशुद्धप्रतिपदेला जें त्या महात्म्यांचें युद्ध सुरू झालें तें मध्यंतरीं आहार न करितां आणि विश्रांति देखील न घेतां २९ एकसारखें त्रयोदशीपर्यंत अहोरात्र चाललें होतें. पुढें चतुर्दशीचे रात्रीं मगधदेशाधिपति जरासंध थकवा आल्यामुळें निवृत्त होण्याच्या बेतांत आला असतां ३० तशाप्रकारें श्रांत झालेल्या त्या राजाला अवलोकन करून भयंकर पराक्रम करणाऱ्या भीमाला सुचविण्याकरितांच कीं काय, हे जनमेजय राजा, श्रीकृष्ण त्याला ह्मणाले ३१ "हे कुंतीपुत्रा भीमसेना, श्रांत झालेला शत्रु संग्रामामध्यें तावडींत सांपडणें दुर्लभ आहे. अशा शत्रूला संपूर्णपणें पीडा होऊं लागली असतां तो

भरतर्षभ ३३ एवमुक्तः स कृष्णेन पाण्डवःपरवीरहा । जरासंधस्य तद्रूपं ज्ञात्वा चक्रे मतिं वधे ३४ ततस्तमजितं जेतुं जरासंधं वृकोदरः । संरम्भं बलिनां श्रेष्ठो जग्राह कुरुनन्दनः ३५ [९५०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां० सभापर्वणि जरासंधवधपर्वणि जरासंधक्लान्तौ त्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥

वैशम्पायन उवाच ॥ भीमसेनस्ततः कृष्णमुवाच यदुनन्दनम् । बुद्धिमास्थाय विपुलां जरासंधवधेऽप्सया १ नायं पापो मया कृष्ण युक्तः स्यादनुरोधितुम् । प्राणेन यदुशार्दूल बद्धकक्षेण वाससा २ एवमुक्तस्ततः कृष्णः प्रत्युवाच वृकोदरम् । त्वरयन्पुरुषव्याघ्रो जरासंधवधेप्सया ३ यत्ते दैवं परं सत्त्वं यच्च ते मातरिश्वनः । बलं भीम जरासंधे दर्शयाशु तदद्य वै ४ एवमुक्तस्तदा भीमो जरासंधमरिंदमः । उत्क्षिप्य भ्रामयामास बलवन्तं महाबलः ५ भ्रामयित्वा शतगुणं जानुभ्यां भरतर्षभ । बभञ्ज पृष्ठं संक्षिप्य निष्पिष्य विननाद च ६ करे गृहीत्वा चरणं द्वेधा चक्रे महा-

---

आपल्या जीविताचा त्याग करितो ३२. करितां, हे भरतवंशजश्रेष्ठा भीमसेना, तूं जरासंधराजाला (तसें मनांत आणून) मुळींच पीडा देऊं नकोस हो. ह्याच्याशीं आपलें सरळ बाहुयुद्ध चालूं दे "३३. ह्याप्रमाणें श्रीकृष्ण बोलले असतां शत्रुपक्षीय वीरांचा वध करणाऱ्या पांडुपुत्र भीमसेनानें जरासंधाची तशी अवस्था झाल्याचें जाणून त्याचा वध करण्याचें मनांत आणिलें ३४ आणि नंतर बलवानांमध्यें श्रेष्ठ असलेला कुरुनंदन भीमसेन त्या अजित जरासंधाला जिंकण्याकरितां क्रुद्ध झाला ३५. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील जरासंधवधपर्वांपैकीं जरासंधाला ग्लानि येऊं लागल्याविषयीं तेविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २३ ॥

वैशंपायन सांगतात:—तदनंतर विचारपरिपूर्ण बुद्धीचा अवलंब करून भीमसेन जरासंधाचा वध करण्याच्या इच्छेनें यदुनंदन श्रीकृष्णांना ह्मणाला १ " हे कृष्णा, हे यदुकुलश्रेष्ठा, वस्त्रानें बद्धकक्ष असलेल्या मला बलाच्या योगानें हा पापी जरासंध आवरणें शक्य नाहीं "२. ह्याप्रमाणें भीमसेनानें सांगितलें असतां पुरुषश्रेष्ठ श्रीकृष्ण जरासंधाच्या वधाकरितां त्या भीमसेनाला त्वरा करीत करीत पुनरपि ह्मणाले ३ " हे भीमसेना, तुझें जें पराकाष्ठेचें दैविक सामर्थ्य आणि तुझें जें वायूपासूनचें बल तें सर्व तूं आज जरासंधाचे ठिकाणीं सत्वर प्रकट कर "४. ह्याप्रमाणें श्रीकृष्णांनीं सांगितलें असतां शत्रूंना दमविणाऱ्या महाबलाढ्य भीमसेनानें जरासंधाला उचलून गरगर फिरविण्यास आरंभ केला ५ आणि, हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, शंभरवेळां फिरविल्यावर जानूंच्या प्रहारांनीं भीमसेनानें त्याची पाठ मोडिली आणि तसाच त्याला वांकवून व

बलः ७ तस्य निष्पिष्यमाणस्य पाण्डवस्य च गर्जतः । अभवत्तुमुलो नादः सर्वप्राणिभयंकरः ८ वित्रेसुर्मागधाः सर्वे स्त्रीणां गर्भाश्च सुस्रवुः । भीमसेनस्य नादेन जरासंधस्य चैव ह ९ किं नु स्याद्धिमवान्भिन्नः किं नु स्विद्दीर्यते मही । इति वै मागधा जज्ञुर्भीमसेनस्य निःस्वनात् १० ततो राजकुलद्वारि प्रसुप्तमिव तं नृपम् । रात्रौ गतासुमुत्सृज्य निश्चक्रमुररिंदमाः ११ जरासंधरथं कृष्णो योजयित्वा पताकिनम् । आरोप्य भ्रातरौ चैव मोक्षयामास बान्धवान् १२ ते वै रत्नभुजं कृष्णं रत्नार्हाः पृथिवीश्वराः । राजानश्चक्रु रासाद्य मोक्षिता महतो भयात् १३ अक्षतः शस्त्रसंपन्नो जितारिः सह राजभिः । रथमास्थाय तं दिव्यं निर्जगाम गिरिव्रजात् १४ यः स सोदर्यवान्नाम द्वियोधी कृष्णसारथिः । अभ्यासघाती संदृश्यो दुर्जयः सर्वराजभिः १५ भीमार्जुनाभ्यां योधाभ्यामास्थितः कृष्णसारथिः । शुशुभे रथवर्योसौ दुर्जयः सर्वधन्विभिः १६ शक्रविष्णू हि संग्रामे चेरतुस्तार-

---

भूमीवर घासून उच्चस्वरानें त्यानें गर्जनाही केली ६ व नंतर तर महाबलाढ्य भीमसेनानें जरासंधाची तंगडी धरून दोन त्याच्या चिरफळ्याच करून टाकिल्या ७. त्यावेळीं त्या जरासंधाचा [illegible] पडत असतांना व पांडुपुत्र भीमसेनाची गर्जना चालली असतांना प्राणिमात्रांना भयंकर असा प्रचंड ध्वनि होऊं लागला ८. सारांश, भीम व जरासंध ह्यांच्या नादानें मगधदेशांतील सर्व लोक त्रस्त झाले व स्त्रियांचे गर्भपात होऊं लागले ९ आणि " हिमालयपर्वत भिन्न झाला कीं काय किंवा पृथ्वी विदीर्ण होत आहे कीं काय असें भीमसेनाच्या गर्जनेमुळें मगधदेशांतील लोकांना वाटूं लागलें १०. तदनंतर राजवाड्याच्या दरवाजामध्यें त्या गतप्राण झालेल्या जरासंध राजाला निद्रिस्थ असल्यासारखा ठेवून देऊन ते शत्रुनाशक त्रिवर्ग तेथून निसटले ११. नंतर जरासंधाचा ध्वजयुक्त रथ जोडून व त्यामध्यें भ्रात्या भीमार्जुनांनाही बसवून श्रीकृष्णांनी आपल्या ज्ञातिबांधवांची मुक्तता केली १२ असतां रत्नांचा उपभोग घेण्यास पात्र असलेल्या त्या पृथ्वीपति राजांनीं आपली मोठ्या भयापासून सुटका झाल्यामुळें श्रीकृष्णांना रत्नें अर्पण केलीं १३. तेव्हां, स्वतःला कोठेंही जखम न लागतां शत्रुजिंकिलेले ते शस्त्रसंपन्न श्रीकृष्ण त्या दिव्य रथावर आरूढ होऊन राजांसहवर्तमान गिरिव्रज नगराच्या बाहेर पडले १४. श्रीकृष्णरूप सारथ्यानें व भीमसेननामक सोदर भ्रात्यानें युक्त, धनुर्विद्येसंबंधीं शत्रूचा उत्कर्ष हाणून पाडणारा, सर्व राजांना अजिंक्य आणि दोन्ही हातांनीं बाण मारणारा जो अर्जुन तोही त्या रथावर झळकत होता १५. सर्व धनुर्धाऱ्यांना जिंकण्यास दुर्घट असलेल्या त्या रथामध्यें भीम व अर्जुन हे योद्धे आरूढ

कामये । रथेन तेन वै कृष्ण उपारुह्य ययौ तदा १७ तप्तचामीकराभेण किङ्किणीजालमालिना । मेघनिर्घोषनादेन जैत्रेणामित्रघातिना १८ येन शक्रो दानवानां जघान नवतीर्नव । तं प्राप्य समहृष्यन्त रथं ते पुरुषर्षभाः १९ ततः कृष्णं महाबाहुं भ्रातृभ्यां सहितं तदा । रथस्थं मागधा दृष्ट्वा समपद्यन्त विस्मिताः २० हयैर्दिव्यैः समायुक्तो रथो वायुसमो जवे । अधिष्ठितः स शुशुभे कृष्णेनातीव भारत २१ असङ्गो देवविहितस्तस्मिन्रथवरे ध्वजः । योजनाद्ददृशे श्रीमानिन्द्रायुधसमप्रभः २२ चिन्तयामास कृष्णोथ गरुत्मन्तं स चाभ्ययात् । क्षणे तस्मिन्स तेनासीच्चैत्यवृक्ष इवोत्थितः २३ व्यादितास्यैर्महानादैः सह भूतैर्ध्वजालयैः । तस्मिन्रथवरे तस्थौ गरुत्मान्पन्नगाशनः २४ दुर्निरीक्ष्यो हि भूतानां तेजसाभ्यधिकं बभौ । आदित्य इव मध्याह्ने सहस्रकिरणावृतः २५ न स सज्जति वृक्षेषु

झाले असून श्रीकृष्ण सारथि झाले असल्यामुळें तो शोभूं लागला १६. (हे जनमेजय राजा) बृहस्पतिभार्या तारा ही ज्यामध्यें रोगाप्रमाणें नाशाला कारणीभूत होती त्या संग्रामांत इंद्र व विष्णु ज्या रथानें संचार करीत होते त्या रथावर आरूढ होऊन श्रीकृष्ण त्या वेळीं गेले १७. त्या रथाची कांति तप्त सुवर्णासारखी उज्ज्वल असून लहान लहान घंटांचीं जाळीं त्याला बांधिलेलीं होतीं व त्याचप्रमाणें तो रथ विजयी आणि शत्रुनाशक असून त्याचा ध्वनि मेघगर्जनेप्रमाणें होत होता १८. असो. ज्या रथाच्या योगानें नव्यांणव राक्षसांचा इंद्रानें वध केला तो रथ प्राप्त झाल्यामुळें त्या तिघा पुरुषश्रेष्ठांना आनंद झाला १९. तदनंतर भ्रात्या भीमार्जुनांसहवर्तमान श्रीकृष्ण रथावर असल्याचें पाहून मगधदेशांतील लोक विस्मित झाले २०. हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, दिव्य अश्व ज्याला जोडिलेले आहेत व वेगामध्यें जो वायूची बरोबरी करणारा आहे तो रथ श्रीकृष्ण आरूढ झाल्यामुळें अतिशयच शोभूं लागला २१. त्या श्रेष्ठ रथावर असलेला देवनिर्मित व वैभवशाली असा अधांतरी ध्वज इंद्रधनुष्यासारख्या कांतीनें युक्त असून चार कोसावरून दिसत असे २२. गिरिव्रजनगरांतून बाहेर पडल्यानंतर श्रीकृष्णांनीं गरुडाचें स्मरण केलें तेव्हां तत्क्षणीं तो गरुड आला व त्याच्या योगानें तो रथ ग्रामादिकांना चिन्हभूत असलेल्या वृक्षाप्रमाणें उन्नत दिसूं लागला २३. प्रसृत मुखानें व प्रचंड ध्वनीनें युक्त असून ध्वजावर रहात असलेल्या भूतगणांसहवर्तमान सर्पभक्षक गरुड त्या श्रेष्ठ रथावर बसला २४. हजारों किरणांनीं व्याप्त अशा मध्यान्ह काळच्या सूर्याप्रमाणें असलेला तो रथ आपल्या तेजाच्या योगानें प्राणिमात्रांना अवलोकन करण्यास फारच दुःसह झाला २५. हे राजा, तो श्रेष्ठ रथ

शस्त्रैश्चापि न रिष्यते । दिव्यो ध्वजवरो राजन्दृश्यते चेह मानुषैः २६
तमास्थाय रथं दिव्यं पर्जन्यसमनिःस्वनम् । निर्ययौ पुरुषव्याघ्रः पाण्ड-
वाभ्यां महाच्युतः २७ यं लेभे वासवाद्राजा वसुस्तस्माबृहद्रथः । बृह-
द्रथात्क्रमेणैव प्राप्तो बार्हद्रथं नृपम् २८ स निर्याय महाबाहुः पुण्डरीके-
क्षणस्ततः । गिरिव्रजाद्बहिस्तस्थौ समे देशे महायशाः २९ तत्रैनं नागराः
सर्वे सत्कारेणाभ्ययुस्तदा । ब्राह्मणप्रमुखा राजन्विधिदृष्टेन कर्मणा ३०
बन्धनाद्विप्रमुक्ताश्च राजानो मधुसूदनम् । पूजयामासुरूचुश्च स्तुतिपूर्व-
मिदं वचः ३१ नैतच्चित्रं महाबाहो त्वयि देवकिनन्दने । भीमार्जुनबलो-
पेते धर्मस्य प्रतिपालनम् ३२ जरासन्धह्रदे घोरे दुःखपङ्के निमज्जताम् ।
राज्ञां समभ्युद्धरणं यदिदं कृतमद्य वै ३३ विष्णो समवसन्नानां गिरिदुर्गे
सुदारुणे । दिष्ट्या मोक्षाद्यशो दीप्तमाप्तं ते यदुनन्दन ३४ किं कुर्मः पुरु-
षव्याघ्र शाधि नः प्रणतिस्थितान् । कृतमित्येव तद्विद्धि नृपैर्यद्यपि दुष्क-

---

वृक्षांचे ठिकाणीं अडून रहात नाहीं अथवा शस्त्रांच्या योगानें मोडलाही जात नाहीं आणि वस्तुतः तो दिव्य असतांना इहलोकीं मनुष्यांच्या दृष्टोत्पत्तीस येत असतो २६. मेघासारख्या गंभीर नादानें युक्त असलेल्या त्या दिव्य रथावर आरूढ होऊन पुरुष-श्रेष्ठ अच्युत पांडुपुत्र भीमार्जुनांसहवर्तमान गिरिव्रजनगरापासून जाऊं लागले २७. हे राजा, तो रथ इंद्रापासून वसुराजाला प्राप्त झाला, त्या वसूपासून बृहद्रथाला प्राप्त झाला आणि बृहद्रथराजापासून क्रमानेंच त्याच्या जरासंधनामक पुत्राला तो मिळाला २८. असो. महायशस्वी व महापराक्रमी असे कमलनयन श्रीकृष्ण गिरिव्रजनगरांतून निघून बाहेर सपाट प्रदेशावर उभे राहिले असतां २९ त्या ठिकाणीं, हे राजा, ब्राह्मणप्रभृति सर्व नागरिक जन यथाविधि कर्मानें त्यांचा सत्कार करण्याकरितां गेले ३० तदनंतर बंधनापासून मुक्त झालेल्या राजांनीं मधुसूदन श्रीकृष्णाचें पूजन केलें आणि प्रशंसा-पूर्वक ते त्यांना ह्मणाले ३१ "हे महापराक्रमी श्रीकृष्णा, भीमसेन आणि अर्जुन ह्यांच्या बलांनीं युक्त असलेल्या तुज देवकीनंदनाला हें धर्मपरिपालन कांहीं मोठें आश्चर्यकारक नाहीं ३२. दुःखरूप चिखलानें युक्त अशा जरासंधरूप भयंकर व अगाध तळ्यामध्यें बुडत असलेल्या राजांचा जो आज तूं उद्धार केलास तो कांहीं तुझे ठिकाणीं आश्चर्याचा प्रकार नव्हे ३३. तथापि, हे सर्वव्यापी यदुनंदना, अतिभयंकर गिरिदुर्गामध्यें अडकून राहिलेल्या राजांची मुक्तता केल्यामुळें आज तुला उज्ज्वल कीर्ति प्राप्त झाली आहे ३४. आतां हे पुरुषोत्तमा, काय करावें ह्याची नम्र होऊन स्थित असलेल्या आह्मांला तूं आज्ञा कर आणि जें तूं सांगशील तें जरी दुर्घट असलें

रम् ३५ तानुवाच हृषीकेशः समाश्वास्य महामनाः । युधिष्ठिरो राजसूयं क्रतुमाहर्तुमिच्छति ३६ तस्य धर्मप्रवृत्तस्य पार्थिवत्वं चिकीर्षतः । सर्वैर्भवद्भिर्विज्ञाय साहाय्यं क्रियतामिति ३७ ततः सुप्रीतमनसस्ते नृपा नृपसत्तम । तथेत्येवाब्रुवन्सर्वे प्रतिगृह्यास्य तां गिरम् ३८ रत्नभाजं च दाशार्हं चक्रुस्ते पृथिवीश्वराः । कृच्छ्राज्जग्राह गोविन्दस्तेषां तदनुकम्पया ३९ जरासन्धात्मजश्चैव सहदेवो महामनाः । निर्ययौ सजनामात्यः पुरस्कृत्य पुरोहितम् ४० स नीचैः प्रणतो भूत्वा बहुरत्नपुरोगमः । सहदेवो नृणां देवं वासुदेवमुपस्थितः ४१ भयार्ताय ततस्तस्मै कृष्णो दत्त्वाभयं तदा । आददेऽस्य महार्हाणि रत्नानि पुरुषोत्तमः ४२ अभ्यषिञ्चत तत्रैव जरासंधात्मजं मुदा । गत्वैकत्वं च कृष्णेन पार्थाभ्यां चैव सत्कृतः ४३ विवेश राजा द्युतिमान्बार्हद्रथपुरं नृप । अभिषिक्तो महाबाहुर्जारासंधिर्महात्मभिः ४४ कृष्णस्तु सह पार्थाभ्यां श्रिया परमया युतः । रत्नान्यादाय भूरीणि प्रययौ पुरुषर्षभः ४५ इन्द्रप्रस्थमुपागम्य पाण्डवाभ्यां सहाच्युतः ।

तरी आम्हीं राजांनीं तें केलेंच असें तूं समज ३५. ह्यावर महाबुद्धिमान् इंद्रियाधिपति श्रीकृष्ण आश्वासनपूर्वक त्यांना ह्मणाले " युधिष्ठिर राजानें राजसूय याग करण्याचें मनांत आणिलें आहे ३६. करितां, साम्राज्यप्राप्तीची इच्छा करणाऱ्या त्या धर्मनिष्ठ युधिष्ठिराला तुम्हीं सर्वांनीं बुद्धिपूर्वक साहाय्य करावें " ३७. तदनंतर हे नृपश्रेष्ठा, जनमेजया, ते राजे सुप्रसन्न अंतःकरणानें " ठीक आहे " एवढेंच बोलले. ह्याप्रमाणें श्रीकृष्णांचें तें वचन शिरसा मान्य करून ३८ त्या भूपतींनीं श्रीकृष्णांना रत्नें अर्पण केलीं आणि श्रीकृष्णांनींही मोठ्या कष्टानेंच त्यांची दया येऊन तीं स्विकारलीं ३९. नंतर जरासंधाचा पुत्र महाविचारी सहदेव पुरोहिताला पुढें घालून स्वजन आणि अमात्य ह्यांसहवर्तमान गिरिव्रजनगरापासून बाहेर निघाला ४० आणि अत्यंत नम्र होऊन व विपुल रत्नें पुढें करून तो नराधिपति वसुदेवपुत्र श्रीकृष्णांच्या संनिध उभा राहिला ४१. तेव्हां भयानें व्याकुळ झालेल्या त्या सहदेवाला अभय देऊन पुरुषोत्तम श्रीकृष्णांनीं त्याचीं महामूल्यवान् रत्नें स्वीकारिलीं ४२ आणि जरासंधाच्या पुत्राला त्यांनीं आनंदानें राज्याभिषेक केला. पुढें श्रीकृष्णांशीं ऐक्य होऊन कुंतीपुत्र भीमार्जुनांनींही सत्कार केल्यानंतर ४३ तो तेजस्वी राजा आपल्या पित्याच्या राजधानींत गेला. हे जनमेजय भूपते, ह्याप्रमाणें महात्म्या कृष्णपांडवांनीं महापराक्रमी जरासंधपुत्राला अभिषेक केला ४४ आणि नंतर सर्वोत्कृष्ट वैभवानें युक्त असलेले ते पुरुषश्रेष्ठ श्रीकृष्ण पुष्कळ रत्नें बरोबर घेऊन कुंतीपुत्र भीमार्जुन ह्यांसहवर्तमान तेथून

समेत्य धर्मराजानं प्रीयमाणोऽभ्यभाषत ४६ दिष्ट्या भीमेन बलवाञ्जरा-
संधो निपातितः । राजानो मोक्षिताश्चैव बन्धनान्नृपसत्तम ४७ दिष्ट्या
कुशलिनौ चेमौ भीमसेनधनंजयौ । पुनः स्वनगरं प्राप्तावक्षताविति भारत ४८
ततो युधिष्ठिरः कृष्णं पूजयित्वा यथार्हतः । भीमसेनार्जुनौ चैव प्रहृष्टः
परिषस्वजे ४९ ततः क्षीणे जरासंधे भ्रातृभ्यां विहितं जयम् । अजातश-
त्रुरासाद्य मुमुदे भ्रातृभिः सह ५० यथावयः समागम्य भ्रातृभिः सह
पाण्डव । सत्कृत्य पूजयित्वा च विससर्ज नराधिपान् ५१ युधिष्ठिराभ्यनु-
ज्ञातास्ते नृपा हृष्टमानसाः । जग्मुः स्वदेशांस्त्वरिता यानैरुच्चावचैस्ततः ५२
एवं पुरुषशार्दूलो महाबुद्धिर्जनार्दनः । पाण्डवैर्घातयामास जरासंधमरिं
तदा ५३ घातयित्वा जरासंधं बुद्धिपूर्वमरिंदमः । धर्मराजमनुज्ञाप्य पृथां
कृष्णां च भारत ५४ सुभद्रां भीमसेनं च फाल्गुनं यमजौ तथा । धौम्य-
मामन्त्रयित्वा च प्रययौ स्वां पुरीं प्रति ५५ तेनैव रथमुख्येन मनसस्तु-
ल्यगामिना । धर्मराजविसृष्टेन दिव्येनानादयन्दिशः ५६ ततो युधिष्ठिर-

निघाले ४५ व त्या पांडुपुत्रांसहवर्तमान इंद्रप्रस्थाला जाऊन धर्मराजाला भेटल्यावर आनंदानें त्याला ह्मणाले ४६ " हे नृपश्रेष्ठा, सुदैवानें बलाढ्य जरासंधाचा वध भीमसेनानें केला आणि बंधनापासून राजे सोडविले ४७. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, हे भीमार्जुन धक्का न लागतां पुनरपि आपल्या नगरामध्यें सुखरूप आले हेंही मोठें भाग्यच समजलें पाहिजे ४८. तदनंतर युधिष्ठिरानें योग्यतेनुरूप श्रीकृष्णाचें पूजन करून मोठ्या आनंदानें भीमार्जुनांना कवटाळून धरिलें ४९. असो. ह्याप्रमाणें जरासंधाचा वध होऊन उभयतां भ्रात्यांनीं मिळविलेला जय प्राप्त झाल्यानंतर अजातशत्रु युधिष्ठिर सर्व भ्रात्यांसहवर्तमान आनंदित झाला ५० आणि वयाच्या योग्यतेप्रमाणें भ्रात्यांसहवर्तमान राजांच्या भेटी घेऊन सत्कारपूर्वक त्यांचें पूजन केल्यानंतर युधिष्ठिरानें त्यांना निरोप दिला ५१. तेव्हां युधिष्ठिराची अनुज्ञा झाल्यावर आनंदित अंतःकरणानें युक्त झालेले ते राजे उच्चनीच वहानांच्या योगानें सत्वर आपआपल्या देशांना गेले ५२. सारांश, ह्याप्रमाणें पुरुषश्रेष्ठ महाबुद्धिमान् श्रीकृष्णांनीं पांडवांकडून आपल्या जरासंधनामक शत्रूचा वध करविला ५३ आणि ह्याप्रकारें बुद्धिपूर्वक जरासंधाचा वध करविल्यानंतर, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, धर्मराज, कुंती, द्रौपदी, सुभद्रा, भीमसेन, अर्जुन, नकुलसहदेव आणि धौम्य मुनि ह्यांचा निरोप घेऊन ते शत्रुनाशक श्रीकृष्ण मनाप्रमाणें शीघ्र गमन करणाऱ्या व त्या धर्मराजानें दिलेल्या दिव्य आणि श्रेष्ठ रथाच्या योगानें दशदिशा नादित करीत करीत आपल्या नगरीप्रत जाऊं

मुखाः पाण्डवा भरतर्षभ । प्रदक्षिणमकुर्वन्त कृष्णमक्लिष्टकारिणम् ५७ ततो गते भगवति कृष्णे देवकिनन्दने । जयं लब्ध्वा सुविपुलं राज्ञां दत्त्वाभयं तदा ५८ संवर्धितं यशो भूयः कर्मणा तेन भारत । द्रौपद्याः पाण्डवा राजन्परां प्रीतिमवर्धयन् ५९ तस्मिन्काले तु यद्युक्तं धर्मकामार्थसंहितम् । तद्राजा धर्मतश्चक्रे प्रजापालनकीर्तनम् ६० [१००५]इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां सभापर्वणि जरासंधवधपर्वणि जरासंधवधे चतुर्विंशोऽध्यायः ॥२४॥ समाप्तं चेदं जरासंधवधपर्व ॥

अथ दिग्विजयपर्व ॥ वैशम्पायन उवाच ॥ पार्थः प्राप्य धनुःश्रेष्ठमक्षय्यौ च महेषुधी । रथं ध्वजं सभां चैव युधिष्ठिरमभाषत १ अर्जुन उवाच॥ धनुरस्त्रं महावीर्यं पक्षो भूमिर्यशो बलम् । प्राप्तमेतन्मया राजन्दुष्प्रापं यदभीप्सितम् २ तत्र कृत्यमहं मन्ये कोशस्य परिवर्धनम् । करमाहारयिष्यामि राज्ञः सर्वान्नृपोत्तम ३ विजयाय प्रयास्यामि दिशं धनदपालिताम् । तिथावथ मुहूर्ते च नक्षत्रे चाभिपूजिते ४ वैशम्पायन उवाच ॥ धनंजयवचः श्रुत्वा धर्मराजो युधिष्ठिरः । स्निग्धगम्भीरनादिन्या तं गिरा प्रत्य-

लागले ५४, ५५, ५६ असतां हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, युधिष्ठिरप्रभृति पांडवांनीं क्लेशहरण करणाऱ्या श्रीकृष्णांना प्रदक्षिणा केली ५७. पुढें देवकीनंदन भगवान् श्रीकृष्ण गेल्यावर अतिशयच मोठा जय मिळवून व राजांना अभय देऊन ५८ पांडवांनीं आपली कीर्ति अधिकच वृद्धिंगत केली आणि ह्या त्यांच्या कृत्यामुळें, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, द्रौपदीला पराकाष्ठेचा आनंद झाला ५९. त्यावेळीं धर्म, अर्थ आणि काम यांना अविरुद्ध असें जें करणें योग्य होतें तें युधिष्ठिरानें धर्मबुद्धीनें करून प्रजापालन केलें ६०. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील जरासंधवधपर्वापैकीं जरासंधाच्या वधाविषयीं चोविसावा अध्याय समाप्त झाला॥२४॥ ह्या ठिकाणीं जरासंधवधपर्वही संपूर्ण झालें॥

येथून दिग्विजयपर्वाला आरंभ झाला ॥ वैशंपायन सांगतातः—श्रेष्ठ धनुष्य, मोठे मोठे अक्षय्य भाते, रथ, ध्वज आणि सभा हीं प्राप्त झाल्याचें पाहून अर्जुन युधिष्ठिराला ह्मणाला १ " हे राजा, धनुष्य, अस्त्र, बाण, वीर्य, पक्षपाती वासुदेव, पृथ्वी, कीर्ति आणि बल हें जें इच्छिलें होतें व जें प्राप्त होणें दुर्घट होतें तें देखील प्राप्त झालें आहे २. आतां, हे नृपश्रेष्ठा, त्या राजसूय यागाकरितां द्रव्यभांडार वृद्धिंगत केलें पाहिजे असें मला वाटतें. ह्यास्तव, सर्व राजांपासून मी कर घेऊन येतों ३ व प्रथमतः विजयाकरितां कुबेररक्षित उत्तर दिशेला तिथि, मुहूर्त व नक्षत्र योग्य असतांना मी जातों " ४. वैशंपायन सांगतातः—अर्जुनाचें भाषण श्रवण करून धर्मराज युधिष्ठिर सौम्य व गंभीर

भाषत ५ स्वस्तिवाच्यार्हतो विप्रान्प्रयाहि भरतर्षभ। दुर्हृदामप्रहर्षाय सुहृदां नन्दनाय च ६ विजयस्ते ध्रुवं पार्थ प्रियं काममवाप्स्यसि । इत्युक्तः प्रययौ पार्थः सैन्येन महता वृतः ७ अग्निदत्तेन दिव्येन रथेनाद्भुतकर्मणा। तथैव भीमसेनोपि यमौ च पुरुषर्षभौ ८ ससैन्याः प्रययुः सर्वे धर्मराजेन पूजिताः। दिशं धनपतेरिष्टामजयत्पाकशासनिः ९ भीमसेनस्तथा प्राचीं सहदेवस्तु दक्षिणाम् । प्रतीचीं नकुलो राजन्दिशं व्यजयतास्त्रवित् १० खाण्डवप्रस्थमध्यस्थो धर्मराजो युधिष्ठिरः । आसीत्परमया लक्ष्म्या सुहृद्गणवृतः प्रभुः ११ [१०१६]इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां सभापर्वणि दिग्विजयपर्वणि दिग्विजयसंक्षेपकथने पञ्चविंशोऽध्यायः ॥२५॥

जनमेजय उवाच ॥ दिशामभिजयं ब्रह्मन्विस्तरेणानुकीर्तय । न हि तृप्यामि पूर्वेषां शृण्वानश्चरितं महत् १ वैशम्पायन उवाच ॥ धनंजयस्य वक्ष्यामि विजयं पूर्वमेव ते । योगपद्येन पार्थैर्हि निर्जितेयं वसुंधरा २ पूर्वं कलिन्दविषये वशे चक्रे महीपतीन् ।धनंजयो महाबाहुर्नातितीव्रेण कर्मणा ३

ध्वनीनें युक्त अशा वाणीनें त्याला ह्मणाला ५ " हे भरतवंशजश्रेष्ठा, योग्य ब्राह्मणांकडून स्वस्तिवाचन करवून नंतर दुष्टांना दुःख व सुहृदांना आनंद देण्याकरितां तूं जा ६. हे अर्जुना, तुला जय निःसंशय येईल आणि तुझा प्रिय मनोरथ सिद्धीस जाईल". ह्याप्रमाणें धर्मराज युधिष्ठिरानें सांगितलें असतां मोठ्या सैन्यानें परिवेष्टित असलेला अर्जुन ७ आपल्या हातून अद्भुत कर्मे होण्यास कारणीभूत होणाऱ्या अग्निदत्त दिव्य रथासहवर्तमान चालता झाला. त्याचप्रमाणें भीमसेन आणि पुरुषश्रेष्ठ नकुलसहदेव ८ हे सर्व धर्मराजानें मान दिल्यावर सैन्यासहवर्तमान गेले. पैकीं कुबेराला इष्ट असलेली उत्तरदिशा इंद्रदत्त पांडुपुत्र अर्जुनानें जिंकिली ९. त्याचप्रमाणें भीमसेनानें पूर्व, सहदेवानें दक्षिण आणि अस्त्रवेत्त्या नकुलानें पश्चिम दिशा जिंकिली १० असतां खांडवप्रस्थामध्यें सुहृद्गणांनीं परिवेष्टित असलेला समर्थ धर्मराज युधिष्ठिर उत्कृष्ट वैभवानें युक्त झाला ११. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील दिग्विजयपर्वांपैकीं संक्षेपतः दिग्विजय कथन करण्याविषयीं पंचविसावा अध्याय समाप्त झाला॥ २५॥

जनमेजय ह्मणतोः—हे ब्रह्मन्, पुनरपि आपण मला दिग्विजयाची हकीकत सविस्तर कथन करा. कारण, पूर्वजांचें उत्कृष्ट चरित्र श्रवण करतांना माझी तृप्ति होत नाहीं १. वैशंपायन सांगतातः—पांडवांनीं ही पृथ्वी एकदम जिंकिली. परंतु, प्रथमतः अर्जुनाच्या दिग्विजयाची हकीकत मी तुला कथन करितों २. त्या महापराक्रमी अर्जुनानें आधीं कुलिंददेशांतील राजे जिंकिले व त्याकरितां त्याला मोठा पराक्रमही करावा लागला नाहीं ३.

आनर्तान्कालकूटांश्च कुलिन्दांश्च विजित्य सः । सुमण्डलं चावजितं कृत-वान्सहसैनिकम् ४ स तेन सहितो राजन्सव्यसाची परंतपः । विजिग्ये शाकलं द्वीपं प्रतिविन्ध्यं च पार्थिवम् ५ शाकलद्वीपवासाश्च सप्तद्वीपेषु ये नृपाः । अर्जुनस्य च सैन्यैस्तैर्विग्रहस्तुमुलोऽभवत् ६ स तानपि महेष्वासा-न्विजिग्ये भरतर्षभ । तैरेव सहितः सर्वैः प्राग्ज्योतिषमुपाद्रवत् ७ तत्र राजा महानासीद्भगदत्तो विशां पते । तेनासीत्सुमहद्युद्धं पाण्डवस्य महा-त्मनः ८ स किरातैश्च चीनैश्च वृतः प्राग्ज्योतिषोऽभवत् । अन्यैश्च बहुभि-र्योधैः सागरानूपवासिभिः ९ ततः स दिवसानष्टौ योधयित्वा धनंजयम् । प्रहसन्नब्रवीद्राजा संग्रामे विगतक्लमम् १० उपपन्नं महाबाहो त्वयि कौर-वनन्दन । पाकशासनदायादे वीर्यमाहवशोभिनि ११ अहं सखा महेन्द्रस्य शक्रादनवरो रणे । न शक्ष्यामि च ते तात स्थातुं प्रमुखतो युधि १२ त्वमीप्सितं पाण्डवेय ब्रूहि किं करवाणि ते । यद्वक्ष्यसि महाबाहो तत्करिष्यामि पुत्रक १३ अर्जुन उवाच ॥ कुरूणामृषभो राजा धर्मपुत्रो

आनर्त, कालकूट आणि कुलिंद हे देश जिंकून त्या अर्जुनानें सैन्यासहवर्तमान सुमंडल राजाला पराजित केला ४ व हे जनमेजयराजा, त्यासहवर्तमान त्या शत्रुतापक अर्जुनानें शाकलद्वीप आणि प्रतिविंध्य भूपति ह्यांचा पराभव केला ५. त्यावेळीं शाकल-द्वीपामध्यें आणि सप्तद्वीपांमध्यें जे राजे होते त्यांच्याबरोबर अर्जुनाच्या सैन्यांचें तुमुल युद्ध झालें ६. परंतु, हे भरतवंशजश्रेष्ठा, त्याही महाधनुर्धाऱ्यांना जिंकून त्या सर्वांसहवर्तमान अर्जुनानें प्राग्ज्योतिषदेशावर स्वारी केली ७ आणि हे प्रजाधिपते जन-मेजया, त्या ठिकाणीं जो भगदत्त ह्मणून मोठा बलाढ्य राजा होता त्याच्याशींही महात्म्या पांडुपुत्र अर्जुनाचें फारच घोर युद्ध झालें ८. असो. तो प्राग्ज्योतिषदेश—किरात, चिनी आणि इतरही समुद्रतीरनिवासी व पाणथळ प्रदेशांत रहाणारे अनेक योद्धे—ह्यांनीं भरलेला होता ९. युद्ध सुरू झाल्यापासून त्या भगदत्त राजानें आठ दिवस पर्यंत अर्जुनाबरोबर टिकाव धरिला आणि संग्रामानें अर्जुन यत्किंचित्ही श्रमला नाहीं असें अवलोकन करून तो राजा हंसत हंसत त्याला ह्मणाला १० " हे महापराक्रमी कुरु-वंशजनंदना, युद्धामध्यें शोभा पावणाऱ्या तुज इंद्रदत्त पांडुपुत्राचे ठिकाणीं वीर्य असणें योग्यच आहे ११. मी महेंद्राचा सखा असून संग्रामामध्यें त्याच्यापेक्षां कमी नाहीं; परंतु, बा अर्जुना, युद्धामध्यें तुझ्यासंमुख उभा राहण्यास मी शक्य नाहीं १२. करितां, हे पांडुपुत्रा, तुझा कोणता मनोरथ मी पूर्ण करूं तें सांग. हे महापराक्रमी वत्सा, तूं जें सांगशील तें मी करीन " १३. अर्जुन ह्मणतो:—धर्मवेत्ता, सत्यवादी, यज्ञयाग

युधिष्ठिरः । धर्मज्ञः सत्यसन्धश्च यज्वा विपुलदक्षिणः । तस्य पार्थिवता-
मीप्से करस्तस्मै प्रदीयताम् १४ भवान्पितृसखा चैव प्रीयमाणो मयापि
च । ततो नाज्ञापयामि त्वां प्रीतिपूर्वं प्रदीयताम् १५ भगदत्त उवाच ॥
कुन्तीमातर्यथा मे त्वं तथा राजा युधिष्ठिरः । सर्वमेतत्करिष्यामि किं
चान्यत्करवाणि ते १६[१०३२]इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां०
सभापर्वणि दिग्विजयपर्वण्यर्जुनदिग्विजये भगदत्तजये षड्विंशोऽध्यायः॥२६॥
वैशम्पायन उवाच॥ एवमुक्तः प्रत्युवाच भगदत्तं धनंजयः । अनेनैव
कृतं सर्वं भविष्यत्यनुजानता १ तं विजित्य महाबाहुः कुन्तीपुत्रो धनंजयः।
प्रययावुत्तरां तस्माद्दिशं धनदपालिताम् २ अन्तर्गिरिं च कौन्तेयस्तथैव च
बहिर्गिरिम् । तथैवोपगिरिं चैव विजिग्ये पुरुषर्षभः ३ विजित्य पर्वतान्स-
र्वान्ये च तत्र नराधिपाः । तान्वशे स्थापयित्वा स धनान्यादाय सर्वशः ४
तैरेव सहितः सर्वैरनुरज्य च तान्नृपान् । उलूकवासिनं राजन्बृहन्तमुपज-
ग्मिवान् ५ मृदङ्गवरनादेन रथनेमिस्वनेन च । हस्तिनां च निनादेन कम्प-

---

करणारा आणि द्विजांना विपुल दक्षिणा देणारा असा जो कुरुश्रेष्ठ धर्मपुत्र युधिष्ठिर त्याला सार्वभौमत्व प्राप्त होण्याची माझी इच्छा आहे. करितां, त्याला आपण (मांडलिक या नात्यानें) कर देत जावा १४. आपण माझ्या पित्याचे मित्र असून माझ्या योगानेंही आनंदित होत आहांत. ह्यास्तव, मी आपणाला आज्ञा करीत नाहीं; आपण प्रेमपूर्वकच खंडणी द्यावी म्हणजे झालें १५. भगदत्त म्हणतोः—हे कुंतीपुत्रा, तूं व राजा युधिष्ठिर हे उभयतांही मला सारखेच आहांत. करितां, तुझ्या म्हणण्याप्रमाणें हें सर्व कांहीं मी करीन. आणखीही मीं काय करावें तें सांग १६. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील दिग्विजयपर्वांतर्गत अर्जुनदिग्विजयसंबंधीं भगदत्तजयाविषयीं सविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २६ ॥

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें भगदत्तानें म्हटलें असतां "हें कर देण्याचें आपण कबूल केलें एवढ्यानें सर्व कांहीं आपण केल्यासारखें होणारच आहे (करितां, ह्याशिवाय आपणांस मला कांहीं सांगावयाचें नाहीं)" म्हणून अर्जुनानें त्याला उत्तर दिलें १. ह्याप्रकारें त्या भगदत्ताला जिंकून तो महापराक्रमी कुंतीपुत्र धनंजय त्या प्राग्ज्योतिषदेशापासून कुबेर-रक्षित उत्तर दिशेकडे निघाला २. नंतर त्या पुरुषश्रेष्ठ कुंतीपुत्रानें अंतर्गिरि, बहिर्गिरि व उपगिरि हे जिंकिले ३ आणि त्याचप्रमाणें त्यानें तिकडील इतरही सर्व पर्वत जिंकून, तेथें जे भूपति वास करीत होते त्यांना पादाक्रांत करून आणि त्या सर्वांपासून (कर ह्या नात्यानें धन घेऊन पुनरपि (ज्याचें त्याचें राज्य ज्याला त्याला उपभोग घेण्यास देण्याच्या द्वारानें) त्यांना संतुष्ट केले आणि हे जनमेजय राजा त्यांच्यासहवर्तमान तो अर्जुन उत्कृष्ट

यन्वसुधामिमाम् ६ ततो बृहन्तस्त्वरितो बलेन चतुरङ्गिणा । निष्क्रम्य नगरात्तस्माद्योधयामास फाल्गुनम् ७ सुमहान्संनिपातो भूद्धनंजयबृहन्तयोः । न शशाक बृहन्तस्तु सोढुं पाण्डवविक्रमम् ८ सोविषह्यतमं मत्वा कौन्तेयं पर्वतेश्वरः । उपावर्तत दुर्धर्षो रत्नान्यादाय सर्वशः ९ स तद्राज्यमवस्थाप्य उलूकसहितो ययौ । सेनाबिन्दुमथो राजन्राज्यादाशु समाक्षिपत् १० मोदापुरं वामदेवं सुदामानं सुसंकुलम् । उलूकानुत्तरांश्चैव तांश्च राज्ञः समानयत् ११ तत्रस्थः पुरुषैरेव धर्मराजस्य शासनात् । किरीटी जितवान्राजन्देशान्पञ्चगणांस्ततः १२ स देवप्रस्थमासाद्य सेनाबिन्दोः पुरं प्रति । बलेन चतुरङ्गेण निवेशमकरोत्प्रभुः १३ स तैः परिवृतः सर्वैर्विष्वगश्वं नराधिपम् । अभ्यगच्छन्महातेजाः पौरवं पुरुषर्षभम् १४ विजित्य चाहवे शूरान्पार्वतीयान्महारथान् । जिगाय सेनया राजन्पुरं पौरवरक्षितम् १५ पौरवं युधि निर्जित्य दस्यून्पर्वतवासिनः । गणानु-

---

मृदंग, रथनेमि आणि गज ह्यांच्या नादानें ही पृथ्वी कंपित करीत करीत उलूकदेशनिवासी बृहंतराजाकडे गेला ४, ५, ६ असतां तो बृहंत राजा चतुरंग सैन्यासहवर्तमान आपल्या नगरांतून सत्वर बाहेर निघाला आणि अर्जुनाबरोबर त्यानें युद्धाला आरंभ केला ७. त्यावेळीं अर्जुन आणि बृहंत ह्यांचा फारच मोठा कडाक्याचा सामना झाला. परंतु, शेवटीं पांडुपुत्र अर्जुनाचा पराक्रम सहन करण्यास बृहंत जेव्हां समर्थ होईना ८ तेव्हां कुंतीपुत्राशीं सामना करणें आपणांला अत्यंत दुर्घट आहे असें जाणून इतरांना अजिंक्य असलेला तो पर्वताधिपति बृहंत राजा सर्व प्रकारचीं रत्नें (कर ह्मणून) बरोबर घेऊन अर्जुनाकडे आला ९. तदनंतर उलूकदेशाधिपतीचें राज्य त्याचेच ठिकाणीं ठेवून अर्जुन त्यासहवर्तमान सेनाबिंदूकडे गेला आणि, हे जनमेजयराजा, त्याला त्यानें राज्यापासून तेव्हांच पदच्युत केला १०. नंतर प्रजाजनांनीं भरलेला सुदामा देश, मोदापुर, वामदेव, व उत्तर उलूक देश जिंकून त्या देशांतील राजे त्यानें जमविले ११ आणि हे जनमेजय राजा, स्वतः तेथेंच राहून धर्मराजाच्या आज्ञेनें अर्जुनानें अपल्या सेवक पुरुषांच्या योगानेंच पंचगण देशांतील राजांचा पराजय केला १२. तदनंतर सेनाबिंदुराजाच्या देवप्रस्थनामक नगराला जाऊन चतुरंगसैन्यासहवर्तमान समर्थ अर्जुनानें तेथें वास्तव्य केलें १३ आणि नंतर त्या सर्व राजांनीं परिवेष्टित असलेला तो महातेजस्वी अर्जुन, हे पुरुषश्रेष्ठा जनमेजया, पुरुकुलोत्पन्न विष्वगश्व राजाकडे गेला १४ व तेथील सर्व पर्वतनिवासी महारथ्यांचा समरांगणामध्यें पराजय करून, हे जनमेजय राजा, पुरुकुलोत्पन्न विष्वगश्व राजानें रक्षण केलेलें नगरही सैन्याच्या योगानें

त्सवसङ्केतानजयत्सम पाण्डवः १६ ततः काश्मीरकान्वीरान्क्षत्रियान्क्षत्रि-
यर्षभः । व्यजयल्लोहितं चैव मण्डलैर्दशभिः सह १७ ततस्त्रिगर्तान्
कौन्तेयं दार्वाः कोकनदास्तथा । क्षत्रिया बहवो राजन्नुपावर्तन्त सर्वशः १८
अभिसारीं ततो रम्यां विजिग्ये कुरुनन्दनः । उरगावासिनं चैव रोचमानं
रणेजयत् १९ ततः सिंहपुरं रम्यं चित्रायुधसुरक्षितम् । प्राधमद्बलमास्थाय
पाकशासनिराहवे २० ततः सुह्मांश्च चोलांश्च किरीटी पाण्डवर्षभः। सहितः
सर्वसैन्येन प्रामथत्कुरुनन्दनः २१ ततः परमविक्रान्तो बाह्लीकान्पाक-
शासनिः । महता परिमर्देन वशे चक्रे दुरासदान् २२ गृहीत्वा तु बलं सारं
फाल्गुनः पाण्डुनन्दनः। दरदान्सह काम्बोजैरजयत्पाकशासनिः २३ प्रागु-
त्तरां दिशं ये च वसन्त्याश्रित्य दस्यवः । निवसन्ति वने ये च तान्सर्वा-
नजयत्प्रभुः २४ लोहान्परमकाम्बोजानृषिकानुत्तरानपि । सहितांस्तान्म-
हाराज व्यजयत्पाकशासनिः २५ ऋषिकेष्वपि संग्रामो बभूवातिभयंकरः ।

अर्जुनानें जिंकिलें १५. ह्याप्रमाणें युद्धामध्यें त्या पुरुकुलोत्पन्न राजाला जिंकून दस्यु-
संज्ञक पर्वतनिवासी सात प्रकारच्या लोकांचा त्यानें पराभव केला. ते अर्जुनानें जिंकि-
लेले दस्युसंज्ञक लोक टोळयाटोळयांनीं रहात असतात आणि (शास्त्रविहित दांपत्य-
व्यवस्था त्यांच्यामध्यें नसून) मनांत इच्छा उत्पन्न झाल्यावर स्त्रीपुरुषांनीं एकत्र जुळ-
ण्याचा संकेत करून रतिसुखाचा उपभोग घेणें अशीच त्या लोकांमध्यें पद्धति आहे १६.
असो. तदनंतर त्या क्षत्रियश्रेष्ठ अर्जुनानें काश्मीराकडील क्षत्रिय वीर आणि दहा मांडलिक
राज्यांसहवर्तमान लोहितराजा ह्यांचा पराजय केल्यावर १७ त्रिगर्त, दार्व, कोकनद
वगैरे ठिकाणचे पुष्कळ क्षत्रिय, हे जनमेजयराजा, सर्व बाजूंनीं करभार घेऊन अर्जु-
नाकडे आले १८. नंतर त्या कुरुनंदनानें रमणीय अशी अभिसारनामक नगरी पादा-
क्रांत करून उरगावासी रोचमानाचाही संग्रामामध्यें पराजय केला १९. तदनंतर चित्रा-
युधानें संरक्षण केलेलें रमणीय सिंहपुर इंद्रपुत्र अर्जुनानें समरांगणामध्यें सामर्थ्य गाज-
वून उडवून दिलें २०. नंतर पांडुपुत्रांमध्यें श्रेष्ठ असलेल्या कुरुनंदन अर्जुनानें सर्व सैन्या-
सहवर्तमान जाऊन सुह्म व चोल हे देश जिंकिले २१. तदनंतर महापराक्रमी इंद्रपुत्र
अर्जुनानें मोठी नासाडी करून जिंकण्यास दुर्घट असलेल्या बाल्हीक देशांतील राजांना
पादाक्रांत केले २२ आणि नंतर निवडक सैन्य बरोबर घेऊन इंद्रदत्त पांडुनंदन अर्जु-
नानें कांबोजांसहवर्तमान दरदांचाही पराभव केला २३ व त्याचप्रमाणें ईशान्यदिशेचा
आश्रय करून जे दस्युजातीय लोक रहात होते व तसेच जे वनामध्यें वास्तव्य करीत
होते त्या सर्वांना प्रभु अर्जुनानें जिंकिलें २४. हे महाराज जनमेजया, लोह, परमकांबोज

तारकामयसंकाशः परस्त्वृषिकपार्थयोः २६ स विजित्य ततो राजन्नृषिकान्रणमूर्धनि । शुकोदरसमांस्तत्र हयानष्टौ समानयत् २७ मयूरसदृशानन्यानुत्तरानपरानपि । जवनानाशुगांश्चैव करार्थं समुपानयत् २८ स विनिर्जित्य सङ्ग्रामे हिमवन्तं सनिष्कुटम् । श्वेतपर्वतमासाद्य न्यविशत्पुरुषर्षभः२९[१०६१]इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां ० सभापर्वणि दिग्विजयपर्वणि फाल्गुनदिग्विजये नानादेशजये सप्तविंशोऽध्यायः ॥२७॥

वैशम्पायन उवाच ॥ स श्वेतपर्वतं वीरः समतिक्रम्य वीर्यवान् । देशं किंपुरुषावासं द्रुमपुत्रेण रक्षितम् १ महता संनिपातेन क्षत्रियान्तकरेण ह । अजयत्पाण्डवश्रेष्ठः करे चैनं न्यवेशयत् २ तं जित्वा हाटकं नाम देशं गुह्यकरक्षितम् । पाकशासनिरव्यग्रः सहसैन्यः समासदत् ३ तांस्तु सान्त्वेन निर्जित्य मानसं सर उत्तमम् । ऋषिकुल्यास्तथा सर्वा ददर्श कुरुनन्दनः ४ सरो मानसमासाद्य हाटकानभितः प्रभुः । गन्धर्वरक्षितं देशमजयत्पाण्डवस्ततः ५ तत्र तित्तिरिकुल्माषान्मण्डूकाख्यान्हयोत्तमान् । लेभे स कर-

---

व उत्तर ऋषिक ह्या एकत्र जमलेल्या सर्वांचा इंद्रपुत्र अर्जुनानें पराभव केल्यावर २९ ऋषिक देशामध्यें तेथील ऋषिकराजा आणि अर्जुन ह्या उभयतांत अतिच भयंकर असा तारकासुराच्या संग्रामासारखा (?) पराकाष्ठेचा संग्राम झाला २६. हे राजा, तदनंतर संग्रामामध्यें ऋषिकांचा पराभव करून शुकोदरसमान वर्णानें युक्त असलेले आठ अश्व त्यानें कराकरितां तेथून घेतले २७. नंतर इतरही आणखी उत्तर ऋषिक देशांतील राजांना पादाक्रांत करून त्यानें मयूरवर्णी व शीघ्रगामी अश्व कराकरितां बरोबर घेतले २८. तदनंतर निष्कुट आणि हिमालय ह्या पर्वतांवर राहणाऱ्या लोकांचा रणामध्यें पराभव करून तो पुरुषश्रेष्ठ अर्जुन श्वेतपर्वतावर जाऊन (कांहीं दिवस) राहिला २९. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत ० सभापर्वांतील दिग्विजयपर्वांपैकीं अर्जुनदिग्विजयसंबंधीं नानाप्रकारचे देश जिंकण्याविषयीं सत्तविसावा अध्याय समाप्त झाला॥२७॥

वैशंपायन सांगतातः—धवलगिरीचें उल्लंघन केल्यावर त्या पांडवश्रेष्ठ वीर अर्जुनानें क्षत्रियनाशक असें मोठें युद्ध करून द्रुमपुत्रानें रक्षिलेला किंपुरुषावासनामक देश जिंकिला आणि त्या द्रुमपुत्राला कर देणारा करून टाकिला १, २. ह्याप्रमाणें तो किंपुरुषावासनामक देश जिंकून सत्कर्मतत्पर इंद्रपुत्र अर्जुन सैन्यासहवर्तमान गुह्यकांनीं रक्षिलेल्या हाटकनामक देशाला गेला ३. तेथील अधिपतींना तर सामोपचारानेंच वश करून घेऊन त्या कुरुनंदनानें मानससरोवर आणि तेथें मुनींनीं काढिलेले कालवे हीं अवलोकन केलीं ४. हाटकदेशासमीप असलेल्या मानससरोवराला

मत्यन्तं गन्धर्वनगरात्तदा ६ उत्तरं हरिवर्षं तु स समासाद्य पाण्डवः। इयेष
जेतुं तं देशं पाकशासननन्दनः ७ तत एनं महावीर्या महाकाया महाबलाः।
द्वारपालाः समासाद्य हृष्टा वचनमब्रुवन् ८ पार्थ नेदं त्वया शक्यं पुरं
जेतुं कथंचन। उपावर्तस्व कल्याण पर्याप्तमिदमच्युत ९ इदं पुरं यः
प्रविशेद्ध्रुवं न स भवेन्नरः। प्रीयामहे त्वया वीर पर्याप्तो विजयस्तव १०
न चात्र किंचिज्जेतव्यमर्जुनात्र प्रदृश्यते। उत्तराः कुरवो ह्येते नात्र युद्धं
प्रवर्तते ११ प्रविष्टोपि हि कौन्तेय नेह द्रक्ष्यसि किंचन। न हि मानुष-
देहेन शक्यमत्राभिवीक्षितुम् १२ अथेह पुरुषव्याघ्र किंचिदन्यच्चिकीर्षसि।
तत्प्रब्रूहि करिष्यामो वचनात्तव भारत १३ ततस्तानब्रवीद्राजन्नर्जुनः
प्रहसन्निव। पार्थिवत्वं चिकीर्षामि धर्मराजस्य धीमतः १४ न प्रवेक्ष्यामि
वो देशं विरुद्धं यदि मानुषैः। युधिष्ठिराय यत्किंचित्करपण्यं प्रदी-

गेल्यानंतर तेथील गंधर्वरक्षित प्रदेशही पांडुपुत्रानें जिंकिला ५ आणि त्या गंधर्व-नगरांतून त्याला तित्तिरिकल्माष व मंडूक एतत्संज्ञक अश्वांच्या रूपानें अतिशयच कर मिळाला ६. पुढें उत्तर हरिवर्षाला गेल्यावर तोही देश जिंकण्याचें इंद्रदत्त पांडुपुत्र अर्जुनाच्या मनांत आलें ७. परंतु, त्या देशाच्या राजधानीसमीप पोंचल्याबरोबर धिप्पाड आणि महाबलाढ्य असे तेथील द्वारपाल आनंदित होऊन आले आणि त्या महावीर्यवान् अर्जुनाला ह्मणाले ८ " हे कुंतीपुत्रा, हें नगर जिंकणें तुला कोणत्याही प्रकारें शक्य नाहीं. तर हे कल्याणा, तूं आपला येथून परत फीर कसा. हे अच्युता, तु (झा पराभव करण्या) ला हें नगर समर्थ आहे ९. ह्या नगरामध्यें जो मनुष्य प्रविष्ट होईल तो निःसंशय नाहींसा होईल. हे वीरा, तुझ्यामुळें आह्मांला आनंद होत आहे. ह्यास्तव, (स्वतःचा घात करून न घेतां तूं आपला परत फीर) तुझा उत्तर दिग्विजय आतां पुरे १०. हे अर्जुना, ह्या ठिकाणीं जिंकण्यासारखें कांहीं दिसत नाहीं. हा उत्तर कुरुदेश आहे व ह्या प्रदेशांत युद्ध होत नाहीं ११. शिवाय, येथें तूं जरी प्रविष्ट झालास तरी तुला ह्या ठिकाणीं कांहींएक आढळण्यांत येणार नाहीं. कारण, मनुष्यदेहानें येथें कांहींच दृष्टीस पडणें शक्य नाहीं १२. आतां, हे पुरुषश्रेष्ठा, ह्या प्रदेशांत प्रविष्ट होण्यावांचून दुसरें जर तुझें कांहीं कार्य असेल तर आह्मांला सांग. ह्मणजे हे भरतकुलोत्पन्ना, तुझ्या सांगण्यावरून आह्मी तें करूं " १३. ह्यावर, हे जनमेजयराजा, अर्जुन हंसत हंसत त्यांना ह्मणाला " विवेकी धर्मराजाला सार्वभौमत्व प्राप्त व्हावें अशी माझी इच्छा आहे १४. तेव्हां मनुष्यांना विरुद्ध असलेल्या तुमच्या देशांत जर मला प्रवेश करितां येणें शक्य

थताम् १५ ततो दिव्यानि वस्त्राणि दिव्यान्याभरणानि च । क्षौमाजिनानि दिव्यानि तस्य ते प्रददुः करम् १६ एवं स पुरुषव्याघ्रो विजित्य दिशमुत्तराम् । संग्रामान्सुबहून्कृत्वा क्षत्रियैर्दस्युभिस्तथा १७ स विनिर्जित्य राज्ञस्तान्करे च विनिवेश्य तु । धनान्यादाय सर्वेभ्यो रत्नानि विविधानि च १८ हयांस्तित्तिरिकल्माषाञ्शुकपत्रनिभानपि । मयूरसदृशानन्यान्सर्वाननिलरंहसः १९ वृतः सुमहता राजन्बलेन चतुरङ्गिणा । आजगाम पुनर्वीरः शक्रप्रस्थं पुरोत्तमम् २० धर्मराजाय तत्पार्थो धनं सर्वं सवाहनम् । न्यवेदयदनुज्ञातस्तेन राज्ञा गृहान्ययौ २१ [१०८२]

इति० सभापर्वणि दिग्विजयपर्वण्यर्जुनोत्तरदिग्विजयेऽष्टाविंशोऽध्यायः॥ २८ ॥

वैशम्पायन उवाच ॥ एतस्मिन्नेव काले तु भीमसेनोऽपि वीर्यवान् । धर्मराजमनुज्ञाप्य ययौ प्राचीं दिशं प्रति १ महता बलचक्रेण परराष्ट्रावमर्दिना । हस्त्यश्वरथपूर्णेन दंशितेन प्रतापवान् २ वृतो भरतशार्दूलो द्विषच्छोकविवर्धनः । स गत्वा नरशार्दूलः पञ्चालानां पुरं महत् ३ पञ्चालान्विविधोपायैः सान्त्वयामास पाण्डवः । ततः स गण्डकाञ्शूरो विदे-

---

नसेल तर कराकरितां कांहीं तरी माल तुह्मीं द्यावा " १५. अर्जुनानें असें सांगितल्यानंतर दिव्य वस्त्रें, दिव्य भूषणें, दिव्य अजिनें व इतरही दिव्य अशीं रेशमी वस्त्रें त्यांनीं कर ह्मणून त्याला दिलीं १६. ह्याप्रमाणें पुरुषश्रेष्ठ अर्जुनानें क्षत्रिय व दस्यु ह्यांबरोबर पुष्कळच संग्राम करून उत्तर दिशा जिंकिली १७. त्या दिशेंतील राजांना जिंकून त्यांना त्यानें करभार देणारे करून ठेविले आणि त्या सर्वांपासून नानाप्रकारचीं रत्नें व धनें घेऊन १८ शुकपक्षाप्रमाणें कांतिमान् असलेले असे तित्तिरिकल्माषसंज्ञक आणि मयूरपक्ष्यासारखे कांतिमान् असलेले इतरही अश्व त्यानें घेतले. ते सर्वही अश्व वायूप्रमाणें वेगवान् होते १९. हे जनमेजयराजा, नंतर फारच प्रचंड असलेल्या चतुरंग सैन्यानें परिवेष्टित होऊन तो वीर अर्जुन पुनरपि आपल्या इंद्रप्रस्थनामक श्रेष्ठ नगराप्रत परत आला २० आणि वाहनांसहवर्तमान तें सर्व धन धर्मराजाला अर्पण करून त्यानें अनुज्ञा दिल्यावर तो कुंतीपुत्र अर्जुन आपल्या वसतिगृहीं गेला २१. ह्याप्रमाणें ० सभापर्वांतील दिग्विजयपर्वांपैकीं अर्जुनाच्या उत्तरदिग्विजयाविषयीं अठ्ठाविसावा अध्याय समाप्त झाला ॥२८॥

वैशंपायन सांगतात:— ह्याचवेळीं वीर्यवान् भीमसेनही धर्मराजाची अनुज्ञा घेऊन पूर्वदिशेस गेला होता १. गज, अश्व व रथ ह्यांनीं परिपूर्ण असून कवचयुक्त असलेल्या अशा परराष्ट्रनाशक प्रचंड सेनासमूहानें परिवेष्टित होऊन शत्रुशोक वृद्धिंगत करणारा तो भरतवंशजोत्तम पुरुषश्रेष्ठ प्रतापी भीमसेन प्रथम पंचालांच्या विस्तीर्ण नगरा-

हान्भरतर्षभः ४ विजित्याल्पेन कालेन दाशार्णानजयत्प्रभुः ५ तत्र दाशार्णको राजा सुधर्मा लोमहर्षणम् । कृतवान्भीमसेनेन महद्युद्धं निरायुधम् ६ भीमसेनस्तु तद्दृष्ट्वा तस्य कर्म महात्मनः । अधिसेनापतिं चक्रे सुधर्माणं महाबलम् ७ ततः प्राचीं दिशं भीमो ययौ भीमपराक्रमः । सैन्येन महता राजन्कम्पयन्निव मेदिनीम् ८ सोऽश्वमेधेश्वरं राजन्रोचमानं सहानुगम् । जिगाय समरे वीरो बलेन बलिनां वरः ९ स तं निर्जित्य कौन्तेयो नातितीव्रेण कर्मणा । पूर्वदेशं महावीर्यो विजिग्ये कुरुनन्दनः १० ततो दक्षिणमागम्य पुलिन्दनगरं महत् । सुकुमारं वशे चक्रे सुमित्रं च नराधिपम् ११ ततस्तु धर्मराजस्य शासनाद्भरतर्षभः । शिशुपालं महावीर्यमभ्यगाज्जनमेजय १२ चेदिराजोऽपि तच्छ्रुत्वा पाण्डवस्य चिकीर्षितम् । उपनिष्क्रम्य नगरात्प्रत्यगृह्णात्परंतपः १३ तौ समेत्य महाराज कुरुचेदिवृषौ तदा । उभयोरात्मकुलयोः कौशल्यं पर्यपृच्छताम् १४ ततो निवेद्य तद्राष्ट्रं

मध्यें गेला २, ३ आणि नानाप्रकारचे उपाय योजून सौम्य मार्गानेंच त्यांना वश केल्यावर त्या भरतवंशजश्रेष्ठ शूर व समर्थ पांडुपुत्र भीमसेनानें थोडक्याच वेळामध्यें गंडक व विदेह ह्यांना जिंकून दशार्ण देश पादाक्रांत केला ४,५. त्या दशार्ण देशांतील सुधर्मसंज्ञक राजानें आयुधावांचून भीमसेनाबरोबर अंगावर कांटा येण्यासारखें मोठें (बाहु–) युद्ध केलें ६. तेव्हां त्या महात्म्याचें तें कर्म भीमसेनाच्या अवलोकनांत आलें असल्यामुळें (त्याचा पराभव केल्यानंतर) भीमसेनानें त्या महाबलाढ्य सुधर्म्याला आपला सेनाधिपति केला ७. तदनंतर, हे जनमेजयराजा, असंख्य सैन्याच्या योगानें भूमि कंपित करीत करीत तो भयंकर पराक्रम करणारा भीमसेन थेट पूर्वदिशेकडे गेला ८ आणि हे भूपते, बलवानांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या भीमसेनानें अनुयायांसहवर्तमान अश्वमेधाधिपति रोचमानराजाचा समरांगणामध्यें स्वसामर्थ्यानें पराभव केला ९ व ह्याप्रमाणें त्याला जिंकिल्यानंतर ह्मणण्यासारखा पराक्रम केल्यावांचूनच त्या महावीर्यवान् कुरुनंदन कुंतीपुत्रानें पूर्वदेश पादाक्रांत केला १०. तदनंतर दक्षिणेस वळून तो विस्तीर्ण असलेल्या पुलिंदनगराप्रत गेला आणि तेथील सुमित्रनामक सुकुमार राजाला आज्ञांकित केल्यावर ११ धर्मराजाच्या आज्ञेवरून, हे जनमेजया, तो भरतवंशजश्रेष्ठ भीमसेन महावीर्यवान् शिशुपालाकडे चालता झाला १२. तेव्हां हे शत्रुतापना, पांडुपुत्र भीमसेनाचा मनोदय जाणून चेदिदेशाधिपति शिशुपालानें आपल्या नगराबाहेर येऊन त्याचें स्वागत केलें १३. तदनंतर हे महाराजा, कुरुश्रेष्ठ भीमसेन आणि चेदिश्रेष्ठ शिशुपाल ह्यांनीं आपआपल्या कुळांतील लोकांविषयीं कुशलप्रश्न केले १४. तदनंतर,

चेदिराजो विशांपते । उवाच भीमं प्रहसन्किमिदं कुरुषेनघ १५ तस्य भीमस्तदाचख्यौ धर्मराजचिकीर्षितम् । स च तं प्रतिगृह्यैव तथा चक्रे नराधिपः १६ ततो भीमस्तत्र राजन्नुषित्वा त्रिदश क्षपाः । सत्कृतः शिशुपालेन ययौ सबलवाहनः १७ [१०९९] इति श्रीमहाभारते० वैयासिक्यां सभापर्वणि दिग्विजयपर्वणि भीमदिग्विजय ऊनत्रिंशोध्यायः ॥ २९ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततः कुमारविषये श्रेणिमन्तमथाजयत् । कोसलाधिपतिं चैव बृहद्बलमरिंदमः १ अयोध्यायां तु धर्मज्ञं दीर्घयज्ञं महाबलम् । अजयत्पाण्डवश्रेष्ठो नातितीव्रेण कर्मणा २ ततो गोपालकक्षं च सोत्तरानपि कोसलान् । मल्लानामधिपं चैव पार्थिवं चाजयत्प्रभुः ३ ततो हिमवतः पार्श्वं समभ्येत्य जलोद्भवम् । सर्वमल्पेन कालेन देशं चक्रे वशं बली ४ एवं बहुविधान्देशान्विजिग्ये भरतर्षभः । भल्लाटमभितो जिग्ये शुक्तिमन्तं च पर्वतम् ५ पाण्डवः सुमहावीर्यो बलेन बलिनां वरः । स

हे प्रजाधिपते जनमेजया, चेदिराज शिशुपालानें " हें राज्य तुझेंच आहे " असें भीमसेनाला सांगितल्यावर " हे निष्पापा, तूं हें काय करीत आहेस? " ह्मणून त्याला त्यानें हंसत हंसत विचारिलें १५. तेव्हां भीमसेनानें त्याला धर्मराजाचा मनोरथ कथन करितांक्षणीं तो शिरसा मान्य करून त्या चेदिदेशाधिपति शिशुपालानें त्याप्रमाणें केलें (ह्मणजे धर्मराजाला कर दिला) १६. असो. हे राजा, (त्यानें कर दिल्या) नंतर भीमसेन त्या ठिकाणीं एक मासपर्यंत राहिला आणि शिशुपालानें सत्कार केल्यावर सैन्य व वाहनें ह्यांसहवर्तमान तो तेथून चालता झाला १७. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील दिग्विजयपर्वांपैकीं भीमसेनाच्या दिग्विजयाविषयीं एकोणतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २९ ॥

वैशंपायन सांगतातः—नंतर शत्रूंना जेरीस आणणाऱ्या भीमसेनानें कुमारदेशामध्यें जाऊन श्रेणिमान् राजाचा पराजय केला आणि त्याचप्रमाणें कोसलदेशाधिपति बृहद्बलराजालाही त्यानें जिंकिला १. तदनंतर त्या पांडवश्रेष्ठ भीमसेनानें विशेष मोठा पराक्रम केल्यावांचूनच अयोध्येमध्यें जाऊन तेथील धर्मज्ञ व महाबलाढ्य अशा दीर्घयज्ञनामक राजाचा पराभव केला २ नंतर गोपालकक्ष, उत्तर कोसल आणि मल्ल या देशांचे अधिपति असलेल्या राजांचा पराजय करून तो समर्थ भीमसेन ३ हिमालयासमीप असलेल्या जलोद्भव देशामध्यें गेला आणि थोड्याच वेळांत त्या बलाढ्य भीमसेनानें तो सर्व देश आपल्या स्वाधीन केला४. ह्याप्रमाणें नानाप्रकारचे देश त्या भरतवंशजश्रेष्ठ भीमसेनानें जिंकून भल्लाट आणि शुक्तिमान् पर्वत हेही सर्व बाजूंनीं त्यानें जिंकिले ५. नंतर त्या अत्यंत वीर्यवान, बलवानांमध्यें श्रेष्ठ, महाबाहु आणि भयंकर

काशिराजं समरे सुबाहुमनिवर्तिनम् ६ वशे चक्रे महाबाहुर्भीमो भीमपराक्रमः । ततः सुपार्श्वमभितस्तथा राजपतिं क्रथम् ७ युध्यमानं बलात्संख्ये विजिग्ये पाण्डवर्षभः । ततो मत्स्यान्महातेजा मलदांश्च महाबलान् ८ अनघानभयांश्चैव पशुभूमिं च सर्वशः । निवृत्य च महाबाहुर्मदुधारं महीधरम् ९ सोमधेयांश्च निर्जित्य प्रययावुत्तरामुखः । वत्सभूमिं च कौन्तेयो विजिग्ये बलवान्बलात् १० भर्गाणामधिपं चैव निषादाधिपतिं तथा । विजिग्ये भूमिपालांश्च मणिमत्प्रमुखान्बहून् ११ ततो दक्षिणमल्लांश्च भोगवन्तं च पर्वतम् । तरसैवाजयद्भीमो नातितीव्रेण कर्मणा १२ शर्मकान्वर्मकांश्चैव व्यजयत्सान्त्वपूर्वकम् । वैदेहकं च राजानं जनकं जगतीपतिम् १३ विजिग्ये पुरुषव्याघ्रो नातितीव्रेण कर्मणा । शकांश्च बर्बरांश्चैव अजयच्छद्मपूर्वकम् १४ वैदेहस्थस्तु कौन्तेय इन्द्रपर्वतमन्तिकात् । किरातानामधिपतीनजयत्सप्त पाण्डवः १५ ततः सुह्मान्प्रसुह्मांश्च स्वपक्षानपि वीर्यवान् । विजित्य युधि कौन्तेयो मागधानभ्यधाद्बली १६ दण्डं च दण्डधारं च

पराक्रम करणाऱ्या पांडुपुत्र भीमसेनानें युद्धापासून कधींही परावृत्त न होणाऱ्या महापराक्रमी काशिराजाला समरांगणामध्यें स्वतःच्या सामर्थ्यानें जिंकिला व नंतर सुपार्श्वप्रदेश सर्व बाजूंनीं पादाक्रांत करून युद्धास आलेल्या राजाधिराज क्रथाचाही त्या पांडवश्रेष्ठ भीमसेनानें समरांगणामध्यें पराभव केला. तदनंतर महाबलाढ्य मत्स्य, मलद, अनघ, अभय आणि पशुभूमि यांचा सर्वस्वीं पराभव करून तो महातेजस्वी व महापराक्रमी भीमसेन मदधार पर्वताकडे परत येऊन ६,७,८,९ व सोमधेय पराभूत करून उत्तरेकडे चालता झाला आणि त्या बलाढ्य कुंतीपुत्र भीमसेनानें स्वसामर्थ्यानें वत्सभूमिही जिंकिली १०. त्याचप्रमाणें भर्गाधिपति, निषादाधिपति आणि मणिमान् वगैरे इतरही पुष्कळ भूपाल पराजित करून ११ त्या भीमसेनानें सामान्य पराक्रमाच्याच योगानें केवळ स्वसामर्थ्याच्याच जोरावर दक्षिण मल्लदेश आणि भोगवान् पर्वत हे जिंकिले १२. नंतर शर्मक आणि वर्मक ह्यांना तर सामोपचारानेंच हस्तगत करून घेऊन जगत्पति विदेहदेशाधीश जनकराजाचाही १३ त्या पुरुषश्रेष्ठ भीमसेनानें सहज पराभव केला आणि नंतर शक व बर्बर ह्यांना त्यानें कपटानें जिंकिले १४. नंतर कुंतीचे ठिकाणीं झालेल्या त्या पांडुपुत्र भीमसेनानें विदेहदेशामध्यें असतांनाच (सैन्य पाठवून) इंद्रपर्वतासमीप असलेल्या सातही किराताधिपतींचा पराभव केला १५. तदनंतर अनुयायांसहवर्तमान सुह्म व प्रसुह्म ह्या देशांतील अधिपतींना युद्धामध्यें जिंकून त्या बलाढ्य भीमसेनानें मागधराजाकडे करांचें मागणें केलें १६. नंतर दंड, दंडधार व तिकडील

विजित्य पृथिवीपतीन् । तैरेव सहितः सर्वैर्गिरिव्रजमुपाद्रवत् १७
जारासन्धिं सान्त्वयित्वा करे च विनिवेश्य ह । तैरेव सहितैः सर्वैःकर्ण-
मभ्यद्रवद्बली १८ स कम्पयन्निव महीं बलेन चतुरङ्गिणा । युयुधे पाण्ड-
वश्रेष्ठः कर्णेनामित्रघातिना १९ स कर्णं युधि निर्जित्य वशे कृत्वा च
भारत । ततो विजिग्ये बलवान्राज्ञः पर्वतवासिनः २० अथ मोदागिरौ
चैव राजानं बलवत्तरम् । पाण्डवो बाहुवीर्येण निजघान महामृधे २१
ततः पुण्ड्राधिपं वीरं वासुदेवं महाबलम् । कौशिकीकच्छनिलयं राजानं च
महौजसम् २२ उभौ बलभृतौ वीरावुभौ तीव्रपराक्रमौ । निर्जित्याजौ
महाराज वङ्गराजमुपाद्रवत् २३ समुद्रसेनं निर्जित्य चन्द्रसेनं च पार्थि-
वम् । ताम्रलिप्तं च राजानं कर्वटाधिपतिं तथा २४ सुह्मानामधिपं चैव
ये च सागरवासिनः । सर्वान्म्लेच्छगणांश्चैव विजिग्ये भरतर्षभ २५ एवं
बहुविधान्देशान्विजित्य पवनात्मजः । वसु तेभ्य उपादाय लौहित्यमग-
मद्बली २६ स सर्वान्म्लेच्छनृपतीन्सागरानूपवासिनः । करमाहारयामास

इतरही भूपति ह्यांना जिंकून त्यांच्यासहवर्तमान तो गिरिव्रजसंज्ञक नगराकडे गेला १७ आणि तेथें असलेल्या जरासंधाच्या पुत्राचें सांत्वन करून व त्याला खंडणी देणारा करून एकत्र जमलेल्या सर्व राजांसहवर्तमान तो बलाढ्य भीमसेन कर्णाकडे चालता झाला १८. पृथ्वी कंपितच करीत आहे कीं काय अशारीतीनें आपल्या चतुरंगसेनेसहवर्तमान त्या पांडवश्रेष्ठ भीमसेनानें शत्रुघातक कर्णाशीं युद्ध केलें १९ व शेवटीं, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, कर्णाला युद्धामध्यें जिंकून त्याला आपल्या अगदीं मुठींत आणून ठेविल्यानंतर त्या बलाढ्य भीमसेनानें तिकडील पर्वतनिवासी राजे जिंकिले २०. तदनंतर मोदागिरीवर असलेल्या महाबलाढ्य राजाचा मोठ्या संग्रामामध्यें पांडुपुत्र भीमसेनानें आपल्या बाहुवीर्यानें वध केला २१. नंतर महाबलाढ्य व वीर असा वासुदेवनामक पुंड्रदेशाधिपति आणि कौशिकी नदीचे तीरीं वास्तव्य करीत असलेला महासामर्थ्यवान् भूपति २२ हे उभयतां बलाढ्य व वीर असून उभयतां प्रचंड पराक्रमी असतांनाही त्यांचा समरांगणामध्यें पराजय करून, हे महाराज जनमेजया, त्या भीमसेनाने वंगदेशच्या राजावर स्वारी केली २३. नंतर राजा समुद्रसेन, चंद्रसेन व ताम्रलिप्त आणि कर्वटदेशाधिपति ह्यांचा पराभव करून २४ आणि त्याचप्रमाणें सुह्मदेशाधिपतीलाही जिंकून त्या भरतवंशजश्रेष्ठ भीमसेनानें समुद्रनिवासी सर्व म्लेच्छगणांचा पराभव केला २५. ह्याप्रमाणें नानाप्रकारचे देश जिंकून व त्यांच्यापासून द्रव्य घेऊन तो बलाढ्य वायुपुत्र लौहित्यदेशाला गेला २६ आणि समुद्रसंनिध

रत्नानि विविधानि च २७ चन्दनागुरुवस्त्राणि मणिमौक्तिककम्बलम् । काञ्चनं रजतं चैव विद्रुमं च महाधनम् २८ ते कोटिशतसङ्ख्येन कौन्तेयं महता तदा । अभ्यवर्षन्महात्मानं धनवर्षेण पाण्डवम् २९ इन्द्रप्रस्थमुपागम्य भीमो भीमपराक्रमः । निवेदयामास तदा धर्मराजाय तद्धनम् ३० [११२९]
इति०सभापर्वणि दिग्विजयपर्वणि भीमदिग्विजये त्रिंशोध्यायः ॥ ३० ॥

वैशम्पायन उवाच ॥ तथैव सहदेवोपि धर्मराजेन पूजितः । महत्या सेनया राजन्प्रययौ दक्षिणां दिशम् १ स शूरसेनान्कार्त्स्न्येन पूर्वमेवाजयत्प्रभुः । मत्स्यराजं च कौरव्यो वशे चक्रे बलाद्बली २ अधिराजाधिपं चैव दन्तवक्त्रं महाबलम् । जिगाय करदं चैव कृत्वा राज्ये न्यवेशयत् ३ सुकुमारं वशे चक्रे सुमित्रं च नराधिपम् । तथैवापरमत्स्यांश्च व्यजयत्स पटच्चरान् ४ निषादभूमिं गोशृङ्गं पर्वतप्रवरं तथा । तरसैवाजयद्धीमाञ्छ्रेणिमन्तं च पार्थिवम् ५ नरराष्ट्रं च निर्जित्य कुन्तीभोजमुपाद्रवत् । प्रीतिपूर्वं च तस्यासौ प्रतिजग्राह शासनम् ६ ततश्चर्मण्वतीकूले जम्भकस्या-

---

असलेल्या अनूपप्रदेशावर वास्तव्य करणाऱ्या सर्व म्लेच्छ राजांपासून त्यानें चंदन, अगुरु, वस्त्रें, हिरे, मोत्यें, लोंकरीचीं वस्त्रें, सुवर्ण, रौप्य व मोठमोठीं मूल्यवान् पोंवळीं अशीं नानाप्रकारचीं रत्नें करादाखल घेतलीं २७,२८. सारांश, त्या म्लेच्छ राजांनीं शेंकडों कोट धनाचा महात्म्या कुंतीनंदन पांडुपुत्र भीमसेनावर मोठा पाऊसच पाडिला २९. असो. (ह्याप्रमाणें पूर्वदिशा जिंकिल्यानंतर तो) भयंकर पराक्रम करणारा भीमसेन इंद्रप्रस्थनगराप्रत परत आला आणि बरोबर आणिलेलें तें सर्व धन त्यानें धर्मराजाला अर्पण केलें ३०. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील दिग्विजयपर्वांपैकीं भीमसेनाच्या दिग्विजयाविषयीं तिसावा अध्याय समाप्त झाला॥३०॥

वैशंपायन सांगतातः—हे जनमेजय राजा, त्याचप्रमाणें धर्मराजानें प्रशंसा केल्यावर सहदेवही मोठ्या सेनेसहवर्तमान दक्षिणदिशेकडे गेला १. त्या समर्थ व बलाढ्य कुरुवंशजानें प्रथमतःच पूर्णपणें शूरसेन देश जिंकून मत्स्यराजाचा पराभव केला २. नंतर राजाधिराज महाबलाढ्य दंतवक्त्राचा पराभव करून त्याला कर देणारा करून सोडिल्यावर पुनरपि सहदेवानें त्याला राज्यावर बसविला ३. नंतर सुकुमार सुमित्रराजा, पश्चिम मत्स्यदेश, चोरप्रदेश ४, निषादभूमि, गोशृंगनामक श्रेष्ठ पर्वत आणि श्रेणिमान् राजा ह्या सर्वांचा स्वसामर्थ्यानेंच पराभव करून आणि नरराष्ट्र जिंकून तो बुद्धिमान् सहदेव कुंतीभोजराजाकडे गेला असतां त्या राजानें त्या सहदेवाची आज्ञा प्रेमपूर्वक मान्यच केली. ५, ६. नंतर चर्मण्वतीनदीचे तीरीं पूर्ववैरी वासुदेवानें अवशिष्ट

त्मजं नृपम् । ददर्श वासुदेवेन शेषितं पूर्ववैरिणा ७ चक्रे तेन स सङ्ग्रामं सहदेवेन भारत । स तमाजौ विनिर्जित्य दक्षिणाभिमुखो ययौ ८ सेकापरसेकांश्च व्यजयत्सुमहाबलः । करं तेभ्य उपादाय रत्नानि विविधानि च ॥ ततस्तेनैव सहितो नर्मदामभितो ययौ ९ विन्दानुविन्दावावन्त्यौ सैन्येन महता वृतौ । जिगाय समरे वीरावाश्विनेयः प्रतापवान् १० ततो रत्नान्युपादाय पुरं भोजकटं ययौ । तत्र युद्धमभूद्राजन्दिवसद्वयमच्युतम् ११ स विजित्य दुराधर्षं भीष्मकं माद्रिनन्दनः । कोसलाधिपतिं चैव तथा वेण्यातटाधिपम् १२ कान्तारकांश्च समरे तथा प्राकोशलान्नृपान् । नाटकेयांश्च समरे तथा हेरम्बकान्युधि १३ मारुधं च विनिर्जित्य रम्यग्राममथो बलात् । नीचानानर्बुकांश्चैव राज्ञश्चैव महाबलः १४ तांस्तानाटविकान्सर्वानजयत्पाण्डुनन्दनः । वाताधिपं च नृपतिं वशे चक्रे महाबलः १५ पुलिन्दांश्च रणे जित्वा ययौ दक्षिणतः पुनः । युयुधे पाण्ड्यराजेन दिवसं नकुलानुजः १६ तं जित्वा स महाबाहुः प्रययौ दक्षिणापथम् ।

ठेविलेला जो जंभकपुत्र राजा होता त्याची गांठ पडल्यावर ७, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, त्या राजानें सहदेवाशीं संग्राम केला. परंतु, त्याला समरांगणामध्यें जिंकून तो सहदेव दक्षिणेकडे चालता झाला ८. नंतर त्या अत्यंत बलाढ्य सहदेवानें सेक व पश्चिम सेक ह्यांचा पराजय करून व त्यांच्यापासून करादाखल नानाप्रकारचीं रत्नें घेऊन त्यांच्यासहवर्तमान नर्मदेकडे प्रयाण केलें ९. पुढें प्रचंड सैन्यानें युक्त असलेले जे अवंतीदेशाधिपति वीर विंद आणि अनुविंद ह्यांचा समरांगणामध्यें पराजय करून तो प्रतापी अश्विनीकुमारपुत्र १० त्यांच्यापासून रत्नें घेऊन भोजकटनामक नगरामध्यें गेला असतां, हे जनमेजय राजा, त्या ठिकाणीं त्याचें एकसारखें दोन दिवस युद्ध झालें ११. असो. त्या माद्रीपुत्र सहदेवानें जिंकण्यास अशक्य असलेल्या भीष्मक राजाचा पराजय करून कोशलदेशाधिपति आणि वेण्यातटाधिपति हे राजेही जिंकिले १२. त्याचप्रमाणें समरांगणामध्यें कांतारक व पूर्वकोसल ह्या देशांतील राजांचा पराभव करून नाटकेय आणि हेरंबक हेही त्यानें युद्धामध्यें पादाक्रांत केले १३. ह्यावर त्या महाबलाढ्य सहदेवानें मारुध व रम्यग्राम आणि नीच व आनर्बुक ह्या देशांतील राजे ह्यांचा स्वसामर्थ्यानें पराजय करून १४ ठिकठिकाणच्या सर्व वनाधिपतींचाही त्या पांडुपुत्रानें पराभव केला आणि त्या महाबलाढ्य सहदेवानें वाताधिपराजालाही आपल्या मुठींत आणून ठेविला १५. नंतर संग्रामामध्यें पुलिंदांचा पराभव करून तो पुनरपि दक्षिणेकडे गेला असतां पांड्यराजाशीं त्या सहदेवाचें

गुहामासादयामास किष्किन्धां लोकविश्रुताम् १७ तत्र वानरराजाभ्यां मैन्देन द्विविदेन च । युयुधे दिवसान्सप्त न च तौ विकृतिं गतौ १८ ततस्तुष्टौ महात्मानौ सहदेवाय वानरौ । ऊचतुश्चैव संहृष्टौ प्रीतिपूर्वमिदं वचः १९ गच्छ पाण्डवशार्दूल रत्नान्यादाय सर्वशः । अविघ्नमस्तु कार्याय धर्मराजाय धीमते २० ततो रत्नान्युपादाय पुरीं माहिष्मतीं ययौ । तत्र नीलेन राज्ञा स चक्रे युद्धं नरर्षभः २१ पाण्डवः परवीरघ्नः सहदेवः प्रतापवान् । ततोऽस्य सुमहद्युद्धमासीद्भीरुभयंकरम् २२ सैन्यक्षयकरं चैव प्राणानां संशयावहम् । चक्रे तस्य हि साहाय्यं भगवान्हव्यवाहनः २३ ततो रथा हया नागाः पुरुषाः कवचानि च । प्रदीप्तानि व्यदृश्यन्त सहदेवबले तदा २४ ततः सुसंभ्रान्तमना बभूव कुरुनन्दनः । नोत्तरं प्रतिवक्तुं च शक्तोऽभूज्जनमेजय २५ जनमेजय उवाच ॥ किमर्थं भगवान्वह्निः प्रत्यमित्रोऽभवद्युधि । सहदेवस्य यज्ञार्थं घटमानस्य वै द्विज २६ वैशम्पायन उवाच ॥ तत्र माहिष्मतीवासी भगवान्हव्यवाहनः । श्रूयते हि गृहीतो वै पुरस्तात्पारदा-

---

एक दिवसपर्यंत युद्ध झालें १६. शेवटीं तो महापराक्रमी सहदेव त्याचा पराभव करून दक्षिण देशाकडे चालता झाला आणि जगद्विख्यात किष्किंधानामक गुहेसमीप आला १७. तेव्हां मैंद आणि द्विविद ह्या वानराधिपतींशीं त्याचें सात दिवस युद्ध झालें; तथापि त्यांना कांहींएक विकार झाला नाहीं १८. शेवटीं ते महात्मे वानर संतुष्ट झाले आणि आनंदित होऊन सहदेवाला प्रेमपूर्वक असें ह्मणाले कीं १९ " हे पांडवश्रेष्ठा, सर्व रत्नें घेऊन तूं जा. विवेकी धर्मराजाला ह्मणजे अर्थात, त्यानें आरंभिलेल्या कार्याला विघ्न न येवो " २०. तदनंतर तो सहदेव मैंद व द्विविद ह्यांच्यापासून तीं रत्नें घेऊन माहिष्मती नगरीला गेला आणि त्या ठिकाणीं परपक्षाकडील वीरांचा वध करणाऱ्या प्रतापी पांडुपुत्र पुरुषश्रेष्ठ सहदेवानें नीलराजाशीं युद्ध केलें. तें सैन्यक्षयकारक व प्राणनाशक युद्ध फारच मोठें असून भीरु पुरुषांना अतिशयच भय उत्पन्न करणारें होतें. असो. त्या नीलराजाला भगवान् अग्नीचें साहाय्य होतें २१,२२,२३. ह्यामुळें सहदेवाच्या सैन्यांतील रथ, अश्व, गज, योद्धे व कवचें हीं सर्व अग्नीनें प्रदीप्त दिसूं लागलीं असतां २४ कुरुनंदन सहदेव मनामध्यें फारच गोंधळून गेला आणि हे जनमेजया, चकारशब्दही मुखावाटें काढण्यास तो असमर्थ झाला २५. जनमेजय प्रश्न करितोः—हे द्विज, सहदेव यज्ञाकरितांच प्रयत्न करीत असतांना (नीलराजाशीं चाललेल्या) युद्धामध्यें भगवान् अग्नि त्याचा प्रतिपक्षी कशाकरितां झाला? २६. वैशंपायन उत्तर देतातः—माहिष्मती नगरीमध्यें पूर्वीं भगवान्

रिकः २७ नीलस्य राज्ञो दुहिता बभूवातीव शोभना । साग्निहोत्रमुपातिष्ठद्बोधनाय पितुः सदा २८ व्यजनैर्धूयमानोपि तावत्प्रज्वलते न सः । यावच्चारुपुटोष्ठेन वायुना न विधूयते २९ ततः स भगवानग्निश्चकमे तां सुदर्शनाम् । नीलस्य राज्ञः सर्वेषामुपनीतश्च सोभवत् ३० ततो ब्राह्मणरूपेण रममाणो यदृच्छया । चकमे तां वरारोहां कन्यामुत्पललोचनाम् ३१ तं तु राजा यथाशास्त्रमशासद्धार्मिकस्तदा । प्रजज्वाल ततः कोपाद्भगवान्हव्यवाहनः ३२ तं दृष्ट्वा विस्मितो राजा जगाम शिरसावनिम् ३३ ततः कालेन तां कन्यां तथैव हि तदा नृपः । प्रददौ विप्ररूपाय वह्नये शिरसा नतः ३४ प्रतिगृह्य च तां सुभ्रूं नीलराज्ञः सुतां तदा । चक्रे प्रसादं भगवांस्तस्य राज्ञो विभावसुः ३५ वरेण च्छन्दयामास तं नृपं स्विष्टकृत्तमः । अभयं च स जग्राह स्वसैन्ये वै महीपतिः ३६ ततः प्रभृति ये केचिदज्ञानात्तां

अग्नि अगदीं विवश होऊन परकन्यासक्त झाला असल्याचें ऐकण्यांत आहे २७. (त्याची हकीकत येणेंप्रमाणें:—) नीलराजाला एक फारच सुस्वरूप कन्या होती. ती अग्निहोत्रसमयीं (ह्मणजे अग्नीमध्यें होम करण्याची वेळ झाली असतांना) ज्वाला करण्याकरितां पित्याचे समीप बसत असे २८. (ह्यामुळें नीलराजाच्या होमशाळेंतील) तो अग्नि त्या कन्येनें आपल्या सुंदर ओष्ठसंपुटानें जो पर्यंत वारा घातला नाहीं तोंपर्यंत विंझोण्यांनीं देखील वारा घातला असतांना प्रज्वलित होईनासा झाला २९. असें होतां होतां भगवान् अग्नीला त्या रूपवती कन्येचा उपभोग घेण्याची इच्छा झाली व त्या कन्येनेंही त्याचा स्वीकार केला. परंतु, ही गोष्ट नील राजाला व त्याचप्रमाणें इतर सर्वांनाहीं विदित झाली नव्हती ३०. ह्याप्रमाणें ब्राह्मणरूपानें यथेष्ट रममाण होण्याची इच्छा करणारा तो अग्नि कमलासारख्या नेत्रांनीं युक्त असलेल्या त्या सुंदरीचा उपभोग घेऊं लागला असतां ३१ धर्मनिष्ठ नीलराजानें त्याला यथाशास्त्र शिक्षा केली. परंतु, शिक्षा होतांक्षणीं (ब्राह्मणवेषधारी) भगवान् अग्नि क्रुद्ध होऊन प्रज्वलित झाला असतां त्याला अवलोकन केल्याबरोबर नीलराजानें विस्मयचकित होऊन त्याला शिरसाष्टांग नमस्कार घातला ३२, ३३. पुढें कांहीं काळ लोटल्यावर नीलराजानें ती कन्या विप्ररूप अग्नीला पूर्ववत्च साष्टांगप्रणिपातपूर्वक अर्पण केली ३४. तेव्हां नीलराजाच्या त्या उत्कृष्ट भ्रुकुटींनीं युक्त असलेल्या कन्येचा स्वीकार करून भगवान् अग्नि त्या राजावर प्रसंन झाला झाला ३५; इतकेंच नव्हें परंतु, अत्यंत प्रिय करण्यास उद्युक्त झालेला तो अग्नि " वर माग " ह्मणून त्या राजाला ह्मणाला व (तें एकून) आपल्या सैन्याविषयीं त्या भूपालानें अभय मागून घेतलें ३६. हे जनमेजयराजा, तेव्हांपासून (ह्या गोष्टीच्या) अज्ञानामुळें जे कोणी भूपति पराक्रमानें

पुरीं नृपाः । जिगीषन्ति बलाद्राजंस्ते दह्यन्ते स्म वह्निना ३७ तस्यां पुर्यां तदा चैव माहिष्मत्यां कुरूद्वह । बभूवुरनतिग्राह्या योषितश्छन्दतः किल ३८ एवमग्निर्वरं प्रादात्स्त्रीणामप्रतिवारणे । स्वैरिण्यस्तत्र नार्यो हि यथेष्टं विचरन्त्युत ३९ वर्जयन्ति च राजानस्तत्पुरं भरतर्षभ । भयादग्नेर्महाराज तदाप्रभृति सर्वदा ४० सहदेवस्तु धर्मात्मा सैन्यं दृष्ट्वा भयार्दितम् । परीतमग्निना राजन्नाकम्पत यथाचलः ॥ उपस्पृश्य शुचिर्भूत्वा सोऽब्रवीत्पावकं ततः ४१ सहदेव उवाच ॥ त्वदर्थोऽयं समारम्भः कृष्णवर्त्मन्नमोऽस्तु ते । मुखं त्वमसि देवानां यज्ञस्त्वमसि पावक ४२ पावनात्पावकश्चासि वहनाद्धव्यवाहनः । वेदास्त्वदर्थं जाता वै जातवेदास्ततो ह्यसि ४३ चित्रभानुः सुरेशश्च अनलस्त्वं विभावसो । स्वर्गद्वारस्पृशश्चासि हुताशो ज्वलनः शिखी ४४ वैश्वानरस्त्वं पिङ्गेशः प्लवङ्गो भूरितेजसः । कुमारसूस्त्वं भग-

---

ती माहिष्मती नगरी जिंकण्याची इच्छा करितात ते अग्नीनें दग्ध होऊन जातात ३७. असो. हे कुरुवंशजश्रेष्ठा जनमेजया, त्या माहिष्मतीनगरीमध्यें त्या वेळीं स्त्रिया स्वच्छंदामुळें अगदीं अनावर झालेल्या असत ३८. कारण, (विरुद्ध होऊन स्त्रियांचें निवारण करण्यास कोणीही पुरुष समर्थ होणार नाहीं) ह्याप्रमाणें अग्नीनें निवारण न होण्याविषयीं स्त्रियांना (जसा कांहीं) वरच दिला होता. सारांश, (अग्नि फारच कामासक्त झालेला आहे, तेव्हां कोणत्याही पुरुषाच्या रूपानें तोच आमचा उपभोग घेणार ह्या समजुतीवर) त्या ठिकाणीं स्त्रिया स्वैरिणी होऊन यथेष्ट संचार करूं लागल्या ३९. असो. हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजय महाराजा, तेव्हां पासून राजे लोक अग्नीच्या भयामुळें तें नगर (जिंकण्याचें) सर्वदा वर्ज्य करीत असतात ४०. हे जनमेजय राजा, अग्नीनें वेढल्यामुळें भयाकुल झालेलें आपलें सैन्य अवलोकन करूनही धर्मात्मा सहदेव पर्वताप्रमाणें यत्किंचित्ही कंपित न होतां उदकस्पर्श करून शुचिर्भूत होऊन अग्नीची स्तुति करूं लागला ४१. सहदेव स्तुति करितोः—हे कृष्णवर्त्म्या, तुला नमस्कार असो. हे पावका, तुझ्याकरितांच हें कर्म आरंभिलें आहे. कारण, देवांचें मुख तूंच असून यज्ञस्वरूपही तूंच आहेस ४२. (यजमानांना) पावन करीत असल्यामुळें तुला पावक ही संज्ञा प्राप्त झाली असून (देवांकडे हव्य) नेत असल्यामुळें तुला हव्यवाहन असें ह्मणत असतात. तुझ्याकरितां वेद झाले असल्यामुळें तुला जातवेदस् हें नांव प्राप्त झालें आहे ४३. हे विभावसो, स्वर्गद्वारीं तुझा संचार असून चित्रभानु, सुरेश, अनल, हुताश, ज्वलन, शिखी ४४, वैश्वानर, पिंगेश, प्लवंग व भूरितेजस् ह्या संज्ञा तुलाच (त्या त्या गुणामुळें) प्राप्त झाल्या आहेत. षडाननाचा

वान्रुद्रगर्भो हिरण्यकृत् ४५ अग्निर्ददातु मे तेजो वायुः प्राणं ददातु मे । पृथिवी बलमादध्याच्छिवं चापो दिशन्तु मे ४६ अपांगर्भ महासत्त्व जातवेदः सुरेश्वर । देवानां मुखमग्ने त्वं सत्येन विपुनीहि माम् ४७ ऋषिभिर्ब्राह्मणैश्चैव दैवतैरसुरैरपि । नित्यं सुहुत यज्ञेषु सत्येन विपुनीहि माम् ४८ धूमकेतुः शिखी च त्वं पापहानिलसंभवः । सर्वप्राणिषु नित्यस्थः सत्येन विपुनीहि माम् ४९ एवं स्तुतोसि भगवन्प्रीतेन शुचिना मया । तुष्टिं पुष्टिं श्रुतं चैव प्रीतिं चाग्ने प्रयच्छ मे ५० वैशम्पायन उवाच ॥ इत्येवं मन्त्रमाग्नेयं पठन्यो जुहुयाद्विभुम् । ऋद्धिमान्सततं दान्तः सर्वपापैः प्रमुच्यते ५१ सहदेव उवाच ॥ यज्ञविघ्नमिमं कर्तुं नार्हस्त्वं हव्यवाहन ५२ एवमुक्त्वा तु माद्रेयः कुशैरास्तीर्य मेदिनीम् । विधिवत्पुरुषव्याघ्रः पावकं प्रत्युपाविशत् ५३ प्रमुखे तस्य सैन्यस्य भीतोद्विग्नस्य भारत । न चैनमत्यगाद्वह्निर्वेलामिव महोदधिः ५४ तमुपेत्य शनैर्वह्निरुवाच कुरुनन्दनम् । सहदेवं नृणां देवं सान्त्वपूर्वमिदं वचः ५५

उत्पादक तूंच असून भगवान् ही संज्ञा तुलाच आहे आणि त्याचप्रमाणें रुद्रगर्भ तूंच असून (रेतोद्वारानें) सुवर्ण उत्पन्न करणाराही तूंच आहेस ४५. अग्निरूपानें माझे ठिकाणीं तेज उत्पन्न करून वायुरूपानें तूंच मला प्राणदान दे आणि तसेंच पृथ्वीरूपानें माझे ठिकाणीं बल उत्पन्न करून जलरूपानें तूंच मला कल्याणप्रद हो ४६. हे जलगर्भा, हे महात्म्या, हे जातवेदा, हे सुरेश्वरा, हे अग्ने, तूं देवांचें मुख आहेस हें जर खरें असेल तर मला पावन कर ४७. देव, असुर, ऋषि व ब्राह्मण हे यज्ञांमध्यें तुझे ठिकाणीं नित्य उत्तम प्रकारें हवन करीत असतात हें जर सत्य आहे तर तूं मला पवित्र कर ४८. धूमकेतु, शिखी, वायुसंभव, पापनाशक आणि सर्व प्राण्यांचे ठिकाणीं सर्वदां वास करणारा जर तूं आहेस तर खरोखर मला पापनिर्मुक्त कर ४९. आणि हे भगवन्, शुचि होऊन आनंदानें ह्याप्रमाणे मीं तुझी स्तुति केली आहे. करितां, संतोष, पुष्टि, ज्ञान व सुख हीं, हे अग्ने, तूं मला दे ५०. वैशंपायन सांगतातः— ह्याप्रमाणें मंत्र (ाष्टक) पठन करून जो पुरुष सर्वव्यापी अग्नीमध्यें सतत हवन करितो तो समृद्ध व जितेंद्रिय होऊन सर्व पापांपासून मुक्त होतो ५१. सहदेव ह्मणतोः— हे हव्यवाहना, असें हें यज्ञाला विघ्न आणणें तुला योग्य नाहीं ५२. ह्याप्रमाणें बोलून माद्रीपुत्र सहदेवानें भूमीवर दर्भ पसरले आणि हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, तो पुरुषश्रेष्ठ अग्नीसमोर व भयभीत होऊन उद्विग्न झालेल्या त्या सैन्याच्या पुढें यथाविधि आसन घालून बसला. तेव्हां महासागर ज्याप्रमाणें मर्यादेचें अतिक्रमण करीत नाहीं त्याप्रमाणें ओलांडून न जातां ५३,५४ अग्नि त्या कुरुनंदन सहदेवाचें समीप

उत्तिष्ठोत्तिष्ठ कौरव्य जिज्ञासेयं कृता मया । वेद्मि सर्वमभिप्रायं तव धर्मसुतस्य च ५६ मया तु रक्षितव्येयं पुरी भरतसत्तम । यावद्राज्ञो हि नीलस्य कुले वंशधरा इति ५७ ईप्सितं तु करिष्यामि मनसस्तव पाण्डव । तत उत्थाय हृष्टात्मा प्राञ्जलिः शिरसा नतः ५८ पूजयामास माद्रेयः पावकं भरतर्षभ । पावके विनिवृत्ते तु नीलो राजाभ्यगात्तदा ५९ पावकस्याज्ञया चैनमर्चयामास पार्थिवः । सत्कारेण नरव्याघ्रं सहदेवं युधां पतिम् ६० प्रतिगृह्य च तां पूजां करे च विनिवेश्य च । माद्रीसुतस्ततः प्रायाद्विजयी दक्षिणां दिशम् ६१ त्रैपुरं स्ववशे कृत्वा राजानममितौजसम् । निजग्राह महाबाहुस्तरसा पौरवेश्वरम् ६२ आकृतिं कौशिकाचार्यं यत्नेन महता ततः । वशे चक्रे महाबाहुः सुराष्ट्राधिपतिं तदा ६३ सुराष्ट्रविषयस्थश्च प्रेषयामास रुक्मिणे । राज्ञे भोजकटस्थाय महामात्राय धीमते ६४ भीष्मकाय स धर्मात्मा साक्षादिन्द्रसखाय वै । स चास्य प्रतिजग्राह ससुतः शासनं तदा ६५ प्रीतिपूर्वं

हळू हळू आला आणि त्या नराधिपति सहदेवाशीं सांत्वनपूर्वक असें भाषण करूं लागला ५५ " हे कुरुवंशजश्रेष्ठा, ऊठ ऊठ; मीं ही तुझी परीक्षा पाहिली. वास्तविक तुझें व यमधर्मपुत्र युधिष्ठिराचें सर्व हृद्गत मी जाणीत आहें ५६. हे भरतवंशजश्रेष्ठा, जोंपर्यंत नीलराजाच्या कुळामध्यें वारस आहेत तोंपर्यंत मला ह्या नगरीचें रक्षण कर्तव्य आहे ५७. तथापि, हे पांडुपुत्रा, तुझा मनोरथही मी सिद्धीस नेईन. " ह्याप्रमाणें अग्नीनें सांगितल्यानंतर सहदेवाचें अंतःकरण आनंदित झालें आणि, हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, करसंपुट जोडून तो माद्रीपुत्र उभा राहिला व प्रणिपातपूर्वक ५८ त्यानें अग्नीचें पूजन केलें. सहदेवानें पूजन केल्यानंतर अग्नि परत फिरला असतां नीलराजा सहदेवासमीप आला ५९ आणि अग्नीच्या आज्ञेनें त्या राजानें सत्कारपूर्वक त्या पुरुषश्रेष्ठ वीरनायक सहदेवाचें पूजन केलें ६०. नंतर ती पूजा स्वीकारून व त्या नीळ राजाला कर देणारा करून तो विजयी माद्रीपुत्र तेथून दक्षिण दिशेस चालता झाला ६१. तदनंतर अपरिमित सामर्थ्यवान् त्रैपुराजाला पादाक्रांत करून त्या महापराक्रमी सहदेवानें स्वसामर्थ्यानें पौरवाधिपतीलाही जेरीस आणिलें ६२. तदनंतर सौराष्ट्राधिपति जो कौशिकाचार्य आकृति त्याला मोठ्या प्रयत्नानें वश केल्यावर त्या महापराक्रमी व धर्मात्म्या सहदेवानें ६३ स्वतः सौराष्ट्र देशामध्यें राहूनच बुद्धिमान् आणि अत्यंत उत्कृष्ट अशा भोजकट देशांतील रुक्मी राजाकडे ह्मणजे साक्षात इंद्राचा सखा जो भीष्मक राजा त्याच्याकडे खंडणीकरितां दूत पाठविले असतां हे महाराजा, श्रीकृष्ण पांडवांकडे आहेत हें लक्ष्यांत आणून त्या भीष्मकराजानें त्याची आज्ञा पुत्रां-

महाराज वासुदेवमवेक्ष्य च । ततः स रत्नान्यादाय पुनः प्रायाद्युधां पतिः ६६
ततः शूर्पारकं चैव तालाकटमथापि च । वशे चक्रे महातेजा दण्डकांश्च
महाबलः ६७ सागरद्वीपवासांश्च नृपतीन्म्लेच्छयोनिजान् । निषादान्पु-
रुषादांश्च कर्णप्रावरणानपि ६८ ये च कालमुखा नाम नरराक्षसयोनयः ।
कृत्स्नं कोल्लगिरिं चैव सुरभीपट्टनं तथा ६९ द्वीपं ताम्राह्वयं चैव पर्वतं
रामकं तथा । तिमिङ्गिलं च स नृपं वशे कृत्वा महामतिः ७० एकपा-
दांश्च पुरुषान्केरलान्वनवासिनः । नगरीं संजयन्तीं च पाषण्डं करहा-
टकम् ७१ दूतैरेव वशे चक्रे करं चैनानदापयत् । पाण्ड्यांश्च द्रविडां-
श्चैव सहितांश्चोण्ड्रकेरलैः ७२ अन्ध्रांस्तालवनांश्चैव कलिङ्गानुष्ट्रकर्णिकान् ।
आटवीं च पुरीं रम्यां यवनानां पुरं तथा ७३ दूतैरेव वशे चक्रे करं चैना-
नदापयत् । ततः कच्छगतो धीमान्दूतान्माद्रवतीसुतः ७४ प्रेषयामास
राजेन्द्र पौलस्त्याय महात्मने । बिभीषणाय धर्मात्मा प्रीतिपूर्वमरिंदमः ७५
स चास्य प्रतिजग्राह शासनं प्रीतिपूर्वकम् । तच्च कालकृतं धीमानभ्यम-
न्यत स प्रभुः ७६ ततः संप्रेषयामास रत्नानि विविधानि च । चन्दनागुरुका-

सहवर्तमान प्रेमपूर्वकच मान्य केली. नंतर भीष्मकराजापासून करादाखल कांहीं उत्कृष्ट वस्तु घेऊन तो वीरनायक सहदेव पुनरपि प्रयाण करूं लागला ६४,६५,६६. तदनंतर त्या महातेजस्वी व महाबलाढ्य सहदेवानें शूर्पारक, तालाकट, दंडक, समुद्रद्वीपनिवासी म्लेच्छजातीय राजे, निषाद, पुरुषाद आणि कर्णप्रावरण ह्यांना पादाक्रांत करून ६७,६८ मनुष्य आणि राक्षस ह्या दोन्हीं जातींपासून झालेले जे कालमुख तेही त्यानें जिंकिले आणि संपूर्ण कोल्लगिरि, सुरभीपट्टन, ६९ ताम्रद्वीप, रामक पर्वत आणि तिमिंगिल राजा ह्यांनाही त्या महामति सहदेवानें पादाक्रांत केले ७०. तदनंतर एकपाद पुरुष, वनवासी केरल, संजयंती नगरी, पाषंड व करहाटक ७१, ह्यांना दूतांच्याच योगानें वश करून घेऊन सहदेवानें त्यांच्यापासून कर घेतला. नंतर पांड्य, द्रविड, उंड्रकेरल ७२, अंध्र, तालवन, कलिंग, उष्ट्रकर्णिक, रमणीय आटवी पुरी आणि त्याचप्रमाणें यवनांचें नगर ७३ हींही दूतांच्या योगानें मुठींत आणून सहदेवानें करप्रद करून सोडिलीं. तदनंतर तो शत्रूंना जेरीस आणणारा धर्मात्मा व विवेकी माद्रीपुत्र सहदेव दक्षिणसमुद्राचे तीरीं गेला आणि हे नृपश्रेष्ठा जनमेजया, महात्म्या पुलस्त्यपुत्र बिभीषणाकडे खंडणीकारितां त्यानें सामोपचारानेंच दूत रवाना केले ७४,७५ व कालचक्रामुळें हा प्रसंग आला आहे असें समजून त्या विचारी व समर्थ बिभीषणानेंही त्याची आज्ञा आनंदानेंच मान्य केली ७६. नानाप्रकारचीं रत्नें, चंदन,

ष्ठानि दिव्यान्याभरणानि च ७७ वासांसि च महार्हाणि मणींश्चैव महाधनान्।
न्यवर्तत ततो धीमान्सहदेवःप्रतापवान् ७८एवं निर्जित्य तरसा सान्त्वेन विजयेन
च। करदान्पार्थिवान्कृत्वा प्रत्यागच्छदरिंदमः ७९ धर्मराजाय तत्सर्वं निवेद्य
भरतर्षभः। कृतकर्मा सुखं राजन्नुवास जनमेजय ८० [१२०९] इति•सभा-
पर्वणि दिग्विजयपर्वणि सहदेवदक्षिणदिग्विजय एकत्रिंशोऽध्यायः ॥ ३१ ॥

वैशम्पायन उवाच ॥ नकुलस्य तु वक्ष्यामि कर्माणि विजयं तथा।
वासुदेवजितामाशां यथासावजयत्प्रभुः १ निर्याय खाण्डवप्रस्थात्प्रतीची-
मभितो दिशम् । उद्दिश्य मतिमान्प्रायान्महत्या सेनया सह २ सिंहनादेन
महता योधानां गर्जितेन च । रथनेमिनिनादैश्च कम्पयन्वसुधामिमाम् ३
ततो बहुधनं रम्यं गवाढ्यं धनधान्यवत् । कार्तिकेयस्य दयितं रोहीतक-
मुपाद्रवत् ४ तत्र युद्धं महच्चासीच्छूरैर्मत्तमयूरकैः । मरुभूमिं स कार्त्स्न्येन
तथैव बहुधान्यकम् ५ शैरीषकं महेत्थं च वशे चक्रे महाद्युतिः । आक्रोशं

अगुरु, दिव्य भूषणें, मूल्यवान् वस्त्रें व मोठे मूल्यवान् हिरे त्यानें सहदेवाकडे पाठवून दिल्यावर तो प्रतापी व विचारी सहदेव तेथून परत फिरला ७७,७८. ह्याप्रमाणें कोणाला सामोपचारानें आणि कोणाला स्वसामर्थ्यानें जिंकून व ह्याप्रकारें दक्षिण-कडील सर्व राजे आपले मांडलिक करून तो शत्रूंना जेरीस आणणारा सहदेव विजयी होऊन परत आला ७९ आणि, हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजयराजा, तें सर्व धन धर्मराजाला अर्पण करून कृतकृत्य झालेला तो सहदेव (इंद्रप्रस्थनगरामध्यें) सुखानें राहूं लागला ८० ह्याप्रमाणेंमहामुनिव्यासप्रणीत० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील दिग्विजयपर्वांपैकीं सहदेवाच्या दक्षिणदिग्विजयाविषयीं एकतिसावा अध्याय समाप्त झाला॥३१॥

वैशंपायन सांगतातः—मी आतां नकुलाचे पराक्रम आणि विजय कथन करितों; म्हणजे श्रीकृष्णांनीं जिंकिलेली पश्चिम दिशा समर्थ नकुलानें कशी जिंकिली तें कथन करितों १. मोठी सेना बरोबर घेऊन खांडवप्रस्थांतून बाहेर पडल्यानंतर सर्व बाजूंनीं पश्चिम दिशा जिंकण्याचा उद्देश मनांत धरून बुद्धिमान् नकुल वीरांची गर्जना, प्रचंड सिंहनाद आणि रथचक्रांच्या धांवांचा ध्वनि ह्यांच्या योगानें ही पृथ्वी कंपित करीत करीत चालता झाला २,३. प्रथमतः तो नकुल रोहीतक पर्वताकडे गेला. तो रम्य पर्वत विपुल संपत्ति, गाई व धन आणि धान्य ह्यांनीं संपन्न असून कार्तिकस्वामीला मोठा प्रिय आहे ४. त्या पर्वतावर मत्तमयूरसंज्ञक शूर क्षत्रियांशीं त्याचें मोठें युद्ध झाल्यानंतर तो सर्व डोंगराळ प्रदेश त्यानें जिंकिला आणि त्याचप्रमाणें बहुधान्यक, शैरीषक व महेत्थ हे प्रदेश जिंकिल्यानंतर त्या महातेजस्वी नकुलानें ५ आक्रोशनामक राजर्षीलाही

चैव राजर्षि तेन युद्धमभून्महत् ६ तान्दशार्णान्स जित्वा च प्रतस्थे पाण्डुनन्दनः । शिबींस्त्रिगर्तानम्बष्ठान्मालवान्पञ्चकर्पटान् ७ तथा मध्यमकेयांश्च वाटधानान्द्विजानथ । पुनश्च परिवृत्याथ पुष्करारण्यवासिनः ८ गणानुत्सवसङ्केतान्व्यजयत्पुरुषर्षभः । सिन्धुकूलाश्रिता ये च ग्रामणीया महाबलाः ९ शूद्राभीरगणाश्चैव ये चाश्रित्य सरस्वतीम् । वर्तयन्ति च ये मत्स्यैर्ये च पर्वतवासिनः १० कृत्स्नं पञ्चनदं चैव तथैवामरपर्वतम् । उत्तरज्योतिषं चैव तथा दिव्यकटं पुरम् ११ द्वारपालं च तरसा वशे चक्रे महाद्युतिः । रामठान्हारहूणांश्च प्रतीच्याश्चैव ये नृपाः १२ तान्सर्वान्स वशे चक्रे शासनादेव पाण्डवः । तत्रस्थः प्रेषयामास वासुदेवाय भारत १३ स चास्य यादवैः सार्धं प्रतिजग्राह शासनम् । ततः शाकलमभ्येत्य मद्राणां पुटभेदनम् १४ मातुलं प्रीतिपूर्वेण शल्यं चक्रे वशे बली । स तेन सत्कृतो राज्ञा सत्कारार्हो विशांपते १५ रत्नानि भूरीण्यादाय संप्रतस्थे युधां पतिः ।

पादाक्रांत केला. परंतु, त्या राजाबरोबर त्याला मोठेंच युद्ध करावें लागलें. असो. पुढें दशार्णदेश जिंकून तो पांडुपुत्र नकुल चालता झाला ६ आणि शिबि, त्रिगर्त, अंबष्ठ, मालव, पंचकर्पट, मध्यमकेय, वाटधान व द्विज ह्यांना जिंकून ७ तो पुरुषश्रेष्ठ नकुल पुनरपि परत फिरला आणि पुष्करारण्यामध्यें वास्तव्य करणाऱ्या उत्सवसंकेत (ह्मणजे विवाहविधीची गरज न बाळगतां परस्परप्रीतीमुळेंच विषयोपभोग करून संतान उत्पन्न करणाऱ्या) जाति त्यानें जिंकिल्या ८. सिंधुनदाच्या तीरीं वास्तव्य करणारे महाबलाढ्य ग्रामणीय, सरस्वतीचे तीरीं मत्स्यांवर उपजीविका करून राहिलेल्या शूद्रांच्या व धनगरांच्या जाति, इतरही तिकडील पर्वतनिवासी जाति, संपूर्ण पंचनद (ह्मणजे पंजाप) प्रदेश, अमरपर्वत ९, १०, उत्तरज्योतिष, दिव्यकट नगर आणि द्वारपाल ह्यांना त्या महातेजस्वी नकुलानें स्वसामर्थ्यानें पादाक्रांत केले ११ आणि त्याचप्रमाणें धर्मराजाच्याच आज्ञेवरून त्या पांडुपुत्र नकुलानें रामठ, हारहूण आणि पश्चिमेकडील राजे ह्या सर्वांना जिंकिलें १२. नंतर त्याच प्रदेशांत राहून, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, वासुदेवाकडेही त्यानें खंडणीकरितां खलिता धाडिला व त्यानेंही, हे राजा, यादवांसहवर्तमान सहदेवाच्या ह्मणण्याला मान दिला १३. तदनंतर मद्रदेशाच्या शाकलसंज्ञक नगराला जाऊन त्या बलाढ्य नकुलानें आपल्या शल्यनामक मातुलाला प्रेमपूर्वकच वश करून घेतला १४. हे प्रजाधिपते जनमेजया, सत्कारास योग्य असलेल्या नकुलाचा त्या शल्य राजानें सत्कार केल्यानंतर तो वीरनायक नकुल पुष्कळ रत्नें घेऊन तेथून चालता झाला १५.

ततः सागरकुक्षिस्थान्म्लेच्छान्परमदारुणान् १६ पह्लवान्बर्बरांश्चैव किरातान्यवनाञ्छकान् । ततो रत्नान्युपादाय वशे कृत्वा च पार्थिवान् ॥ न्यवर्तत कुरुश्रेष्ठो नकुलश्चित्रमार्गवित् १७ करभाणां सहस्राणि कोशं तस्य महात्मनः । ऊहुर्दश महाराज कृच्छ्रादिव महाधनम् १८ इन्द्रप्रस्थगतं वीरमभ्येत्य स युधिष्ठिरम् । ततो माद्रीसुतः श्रीमान्धनं तस्मै न्यवेदयत् १९ एवं विजित्य नकुलो दिशं वरुणपालिताम् । प्रतीचीं वासुदेवेन निर्जितां भरतर्षभः २० [१२२९] इति श्रीमहाभारते० सभापर्वणि दिग्विजयपर्वणि नकुलप्रतीचीजये द्वात्रिंशोऽध्यायः ॥ ३२ ॥ समाप्तं च दिग्विजयपर्व ॥

अथ राजसूयपर्व ॥ वैशम्पायन उवाच ॥ रक्षणाद्धर्मराजस्य सत्यस्य परिपालनात् । शत्रूणां क्षपणाच्चैव स्वकर्मनिरताः प्रजाः १ बलीनां सम्यगादानाद्धर्मतश्चानुशासनात् । निकामवर्षी पर्जन्यः स्फीतो जनपदो भवत् २ सर्वारम्भाः सुप्रवृत्ता गोरक्षा कर्षणं वणिक् । विशेषात्सर्वमेवैतत्संजज्ञे राजकर्मणः ३ दस्युभ्यो वञ्चकेभ्यो वा राजन्प्रति परस्परम् । राजवल्ल-

---

नंतर अत्यंत भयंकर असे जे समुद्रतीरनिवासी पल्हव, बर्बर, किरात, यवन, शक वगैरे म्लेच्छ राजे त्यांना जिंकून व त्यांच्यापासून करादाखल रत्नें घेऊन तो चित्रमार्गवेत्ता कुरुवंशजश्रेष्ठ नकुल परत फिरला १६, १७. तेव्हां, हे महाराज जनमेजया, अपार संपत्तीनें भरलेला त्या महात्म्या नकुळाचा खजिना दहा हजार उंटांनाही वाहून नेण्यास मोठी पंचाईतच पडली १८. असो. परत फिरल्यानंतर तो वैभवशाली माद्रीपुत्र नकुल इंद्रप्रस्थामध्यें असलेल्या वीर युधिष्ठिराकडे आला आणि तें बरोबर आणिलेलें धन त्यानें त्याला अर्पण केलें १९. ह्याप्रकारें, हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, वासुदेवानें जिंकिलेली वरुणरक्षित पश्चिम दिशा जिंकून नकुल परत आला २०. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील दिग्विजयपर्वापैकीं नकुलाच्या पश्चिमदिग्विजयाविषयीं बत्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३२ ॥ ह्या ठिकाणीं दिग्विजयपर्वही संपूर्ण झालें ॥

येथून पुढें राजसूयपर्व सुरू झालें. वैशंपायन सांगतातः—धर्मराजा रक्षण करीत असल्यामुळें, सत्याचें परिपालन होत असल्यामुळें आणि शत्रूंचा नाश झाला असल्यामुळें भरतवर्षांतील सर्व प्रजाजन स्वकर्मनिष्ठ झाले १. त्याचप्रमाणें कर यथाशास्त्रच घेऊन धर्मानेंच राज्य चालल्यामुळें पर्जन्य हवा तसा पडून सर्व प्रदेश सुपीक झाला २. गोरक्षण, शेतकी, व्यापार वगैरे सर्व धंदे उत्तम रीतीनें चालूं लागले आणि विशेषतः हें सर्व फल राजाच्याच चांगल्या कर्मामुळें प्राप्त झालें ३. हे राजा, चोर, वंचक व राजवल्लभ हे स्वभावतः दुष्ट असूनही त्यांच्यापासून सुद्धां परस्परांना आणि इतरांना

भतश्चैव नाश्रूयन्त मृषा गिरः ४ अवर्षं चातिवर्षं च व्याधिपावकमूर्च्छ-
नम् । सर्वमेतत्तदा नासीद्धर्मनित्ये युधिष्ठिरे ५ प्रियं कर्तुमुपस्थातुं बलि-
कर्म स्वभावजम् । अभिहर्तुं नृपा जग्मुर्नान्यैः कार्यैः कथंचन ६ धर्म्यै-
र्धनागमैस्तस्य ववृधे निचयो महान् । कर्तुं यस्य न शक्येत क्षयो वर्षश-
तैरपि ७ स्वकोष्ठस्य परीमाणं कोशस्य च महीपतिः । विज्ञाय राजा
कौन्तेयो यज्ञायैव मनो दधे ८ सुहृदश्चैव ये सर्वे पृथक्च सहिताब्रुवन् ।
यज्ञकालस्तव विभो क्रियतामत्र सांप्रतम् ९ अथैवं ब्रुवतामेवं तेषामभ्या-
ययौ हरिः । ऋषिः पुराणो वेदात्मा दृश्यश्चैवविजानताम् १० जगतस्त-
स्थुषां श्रेष्ठः प्रभवश्चाप्ययश्च ह । भूतभव्यभवन्नाथः केशवः केशिसूदनः ११
प्राकारः सर्ववृष्णीनामापत्स्वभयदोऽरिहा । बलाधिकारे निक्षिप्य सम्य-
गानकदुन्दुभिम् १२ उच्चावचमुपादाय धर्मराजाय माधवः । धनौघं
पुरुषव्याघ्रो बलेन महता वृतः १३ तं धनौघमपर्यन्तं रत्नसागरमक्षयम् ।

असत्य शब्द ऐकूं येईनासे झाले ४. त्याचप्रमाणें सर्वदा धर्मनिष्ठ असलेला तो युधिष्ठिर राज्य करूं लागला असतां अवर्षण, अतिवृष्टि, शारीरिक व्याधि आणि अग्निभय हें सर्व नाहींसेंच झालें ५. तसेंच पृथ्वींतील राजेही एकमेकांच्या भेटी घेण्याकरितां आणि स्वाभाविक करभार देण्याकरितांच मात्र बाहेर जाऊं लागले, परदेशहरणप्रभृति इतर कार्यांच्या उद्देशानें ते कधींही बाहेर पडेनासे झाले ६. धर्माला अनुसरून असलेल्या धनलाभांच्या योगानें त्या युधिष्ठिरराजाचें द्रव्यभांडार इतकें वृद्धिंगत झालें कीं (नुसत्या राज्यकार्याकरितां) जर त्याचा खर्च केला असतां तर शेंकडों वर्षांतही तें संपणें शक्य नव्हतें ७. ह्याप्रमाणें द्रव्यभांडार आणि वस्त्र-धान्य वगैरेंचें कोठार ह्यांचें वृद्धिंगत झालेलें मान जाणून कुंतीपुत्र धर्मराजानें यज्ञाकडेच त्याचा विनियोग करण्याचें मनामध्यें आणिलें ८ आणि " हे प्रभो, आतां तुला राजसूय यज्ञ करण्याचा समय प्राप्त झाला आहे; तेव्हां ह्याप्रसंगीं जें योग्य असेल तें कर " ह्मणून सर्व मित्रही वेगवेगळे व एकत्र जमून त्याला सांगूं लागले ९. ह्याप्रमाणें त्यांचें संभाषण चाललें असतांना अनादि ऋषि, वेदात्मा, तत्ववेत्त्यांना समजणारा, स्थावरजंगमात्मक प्राण्यांमध्यें श्रेष्ठ, जगताच्या उत्पत्तीला व प्रलयाला कारणीभूत, भूत—भविष्य आणि वर्तमान ह्यांचा अधिपति, केशिदैत्यनाशक, सर्व वृष्णींचें किल्ल्याप्रमाणें संरक्षण करणारा, आपत्काल प्राप्त झाला असतां भक्तांच्या शत्रूंचा नाश करून त्यांना अभय देणारा आणि शरणागतांचें दुःख हरण करणारा असा जो भगवान् केशव तो सेनाधिपत्यावर वसुदेवाची विचारानें नेमणूक करून व लहानमोठा द्रव्य-

नादयन्रथघोषेण प्रविवेश पुरोत्तमम् १४ पूर्णमापूरयंस्तेषां द्विषच्छोकावहोभवत् १५ असूर्यमिव सूर्येण निवातमिव वायुना । कृष्णेन समुपेतेन जहृषे भारतं पुरम् १६ तं मुदाभिसमागम्य सत्कृत्य च यथाविधि । स पृष्ट्वा कुशलं चैव सुखासीनं युधिष्ठिरः १७ धौम्यद्वैपायनमुखैर्ऋत्विग्भिः पुरुषर्षभः । भीमार्जुनयमैश्चैव सहितः कृष्णमब्रवीत् १८ युधिष्ठिर उवाच ॥ त्वत्कृते पृथिवी सर्वा मद्वशे कृष्ण वर्तते । धनं च बहु वार्ष्णेय त्वत्प्रसादादुपार्जितम् १९ सोहमिच्छामि तत्सर्वं विधिवद्देवकीसुत । उपयोक्तुं द्विजाग्र्येभ्यो हव्यवाहे च माधव २० तदहं यष्टुमिच्छामि दाशार्ह सहितस्त्वया । अनुजैश्च महाबाहो तन्माज्ञातुमिहार्हसि २१ तद्दीक्षापय गोविन्द त्वमात्मानं महाभुज । त्वयीष्टवति दाशार्ह विपाप्मा भविता ह्यहम् २२ मां वाप्यभ्यनुजानीहि सहैभिरनुजैर्विभो । अनुज्ञातस्त्वया कृष्ण

संचय आणि प्रचंड सेना बरोबर घेऊन त्या ठिकाणीं आला १०,११,१२,१३. असो. संपण्यास अशक्य असा एक रत्नांचा सागरच की काय अशा प्रकारें असलेला तो द्रव्यसंचय बरोबर घेऊन आधींच सर्व संपत्तींनीं भरलेल्या त्या श्रेष्ठ इंद्रप्रस्थ नगराला पूर्ण करीत करीत व रथध्वनीनें तें नगर नादित करीत करीत भगवान् श्रीकृष्ण प्रविष्ट झाले व त्यामुळें (पांडवांच्या) शत्रूंना फारच दुःख झालें १४,१५. भगवान् कृष्ण आल्या कारणानें (चविशेषें करून प्रकाशित व आल्हादित झालेलें) तें भरतवंशज पांडवांचें नगर सूर्य असूनही सूर्यरहित व वायु असूनही तद्विरहित असल्यासारखें होऊन आनंदित झालें १६. समीप आल्यानंतर युधिष्ठिरानें सामोरें जाऊन श्रीकृष्णांचा रीतीप्रमाणें सत्कार केला आणि कुशलप्रश्न होऊन श्रीकृष्ण स्वस्थपणानें बसल्यावर, हे पुरुषश्रेष्ठा जनमेजय राजा, धौम्यद्वैपायनप्रभृति ऋत्विज आणि भीमार्जुन व नकुलसहदेव ह्यांसहवर्तमान असलेल्या युधिष्ठिरानें त्यांना आपला हेतु कळविण्याचा उपक्रम केला १७, १८. युधिष्ठिर ह्मणतोः—हे कृष्णा, तुझ्यामुळें सर्व पृथ्वी माझ्या हुकमतींत आहे आणि, हे वृष्णिकुलोत्पन्ना, तुझ्याच प्रसादामुळें विपुल द्रव्य मीं संपादन केलें आहे १९. तस्मात्, हे देवकीनंदना रमाकांता, ब्राह्मण व अग्नि ह्यांचे ठिकाणीं त्या सर्व द्रव्याचा यथाविधि विनियोग करण्याचें माझ्या मनांतून आहे २०. सारांश, हे दाशार्हा, तुझ्या व कनिष्ठ भ्रात्यांच्या साहाय्यानें राजसूय याग करण्याचा माझा हेतु आहे. करितां, हे महापराक्रमी कृष्णा, तसें करण्यास तूं मला अनुज्ञा दे २१ अथवा हे आजानुबाहो गोविंदा, तूं स्वतःच यज्ञदीक्षा घे. कारण, हे दाशार्हा, तुझ्या हातून यज्ञ झाला असतां मीं निष्पाप होईन २२.

प्राप्नुयां क्रतुमुत्तमम् २३ वैशम्पायन उवाच ॥ तं कृष्णः प्रत्युवाचेदं बहूक्त्वा गुणविस्तरम् । त्वमेव राजशार्दूल सम्राडर्हो महाक्रतुम् ॥ संप्राप्नुहि त्वया प्राप्ते कृतकृत्यास्ततो वयम् २४ यजस्वाभीप्सितं यज्ञं मयि श्रेयस्यवस्थिते । नियुङ्क्ष्व त्वं च मां कृत्ये सर्वं कर्तास्मि ते वचः २५ युधिष्ठिर उवाच ॥ सफलः कृष्ण संकल्पः सिद्धिश्च नियता मम । यस्य मे त्वं हृषीकेश यथेप्सितमुपस्थितः २६ वैशम्पायन उवाच ॥ अनुज्ञातस्तु कृष्णेन पाण्डवो भ्रातृभिः सह । ईजितुं राजसूयेन साधनान्युपचक्रमे २७ ततस्त्वाज्ञापयामास पाण्डवोरिनिबर्हणः । सहदेवं युधां श्रेष्ठं मन्त्रिणश्चैव सर्वशः २८ अस्मिन्क्रतौ यथोक्तानि यज्ञाङ्गानि द्विजातिभिः । तथोपकरणं सर्वं मङ्गलानि च सर्वशः २९ अधियज्ञांश्च संभारान्धौम्योक्तान्क्षिप्रमेव हि । समानयन्तु पुरुषा यथायोगं यथाक्रमम् ३० इन्द्रसेनो विशोकश्च पूरुश्चार्जुनसारथिः । अन्नाद्याहरणे युक्ताः सन्तु मत्प्रियकाम्यया ३१ सर्वकामाश्च कार्यन्तां

किंवा, हे प्रभो; ह्या कनिष्ठ भ्रात्यांसहवर्तमान तूं मला याग करण्याची अनुज्ञा दे. हे कृष्णा, तुझें अनुमोदन मिळालें ह्मणजे तो उत्कृष्ट क्रतु माझ्या हातून शेवटास जाईल २३. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें प्रार्थना केली असतां श्रीकृष्ण त्याच्या गुणांची पुष्कळ प्रशंसा करून ह्मणाले " हे नृपश्रेष्ठा, तूंच सार्वभौम आहेस; करितां, राजसूय महाक्रतुही तुलाच करणें योग्य आहे आणि तुझ्या हातून क्रतु झाला ह्मणजेच आह्मी कृतकृत्य होणार आहोंत २४. ह्यास्तव, मी तुझें कल्याण करणारा उभा असतांना तूं मनांत इच्छिल्याप्रमाणें यज्ञ कर आणि तूंच मला कांहीं काम सांग; तूं जें सांगशील तें मी सर्व करीन २५. युधिष्ठिर ह्मणतोः—हे कृष्णा, हे हृषीकेशा, ज्या अर्थी मी सांगेन तें करण्यास तूं तयार झाला आहेस त्याअर्थी माझा मनोरथ सफल होऊन यज्ञ शेवटास जाण्याचें निश्चितच झालें आहे २६. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें श्रीकृष्णांनीं अनुज्ञा दिल्यावर पांडुपुत्र युधिष्ठिर राजसूय याग करण्याकरितां भ्रात्यांसहवर्तमान साधनें जुळवूं लागला २७. प्रथमतः त्या शत्रुनाशक पांडुपुत्र युधिष्ठिरानें वीरनायक सहदेव आणि सर्व मंत्री ह्यांना अशी आज्ञा केली कीं २८ क्रतुसंबंधानें जीं अंगें, जीं साधनें व ज्या मंगलकारक गोष्टी ब्राह्मणांनीं सांगितल्या असतील त्या सर्वांची सिद्धता ठेवा २९ आणि धौम्य मुनींनीं यज्ञसंबंधानें जें कांहीं साहित्य जुळविण्यास सांगितलें असेल तेंही योग्य रितीनें व अनुक्रमानें सेवक लोकांना येथें आणून द्या ३०. माझ्या मताप्रमाणें जर कर्तव्य असेल तर इंद्रसेन, विशोक आणि अर्जुनसारथि पूरु ह्यांची अन्न वगैरे आणण्याकडे योजना होऊं द्या ३१

रसगन्धसमन्विताः। मनोरथप्रीतिकरा द्विजानां कुरुसत्तम ३२ तद्वाक्यसमकालं च कृतं सर्वं न्यवेदयत्। सहदेवो युधां श्रेष्ठो धर्मराजे युधिष्ठिरे ३३ ततो द्वैपायनो राजन्नृत्विजः समुपानयत् । वेदानिव महाभागान्साक्षान्मूर्तिमतो द्विजान् ३४ स्वयं ब्रह्मत्वमकरोत्तस्य सत्यवतीसुतः । धनंजयानामृषभः सुसामा सामगोभवत् ३५ याज्ञवल्क्यो बभूवाथ ब्रह्मिष्ठोध्वर्युसत्तमः। पैलो होता वसोः पुत्रो धौम्येन सहितोभवत् ३६ एतेषां शिष्यवर्गाश्च पुत्राश्च भरतर्षभ । बभूवुर्होत्रगाः सर्वे वेदवेदाङ्गपारगाः ३७ ते वाचयित्वा पुण्याहमूहयित्वा च तं विधिम् । शास्त्रोक्तं पूजयामासुस्तद्देवयजनं महत् ३८ तत्र चक्रुरनुज्ञाताः शरणान्युत शिल्पिनः। गन्धवन्ति विशालानि वेश्मानीव दिवौकसाम् ३९ तत आज्ञापयामास स राजा राजसत्तमः । सहदेवं तदा सद्यो मन्त्रिणं पुरुषर्षभः ४० आमन्त्रणार्थं दूतांस्त्वं प्रेषयस्वाशुगान्द्रुतम् । उपश्रुत्य वचो राज्ञः स दूतान्प्राहिणोत्तदा ४१ आमन्त्रयध्वं राष्ट्रेषु ब्राह्मणान्भूमिपानथ। विशश्च मान्याञ्शूद्रांश्च सर्वानानयतेति च ४२ वैशम्पायन उवाच॥

आणि, हे कुरुवंशजश्रेष्ठा सहदेवा, ब्राह्मणांच्या मनाला आनंदकारक आणि रस व स्वाद ह्यांनीं युक्त असे सर्व भक्ष्य व भोज्य पदार्थ तयार ठेवा " ३२. ह्याप्रमाणें धर्मराज युधिष्ठिर तोंडांतून हे शब्द काढीत आहे तोंच " सर्व तयार आहे " ह्मणून वीरनायक सहदेवानें कळविलें ३३. तदनंतर हे जनमेजयराजा, साक्षात् मूर्तिमंत वेदच कीं काय अशा महात्म्या ब्राह्मणांची द्वैपायन मुनींनीं ऋत्विजांचे ठिकाणीं योजना केली ३४. स्वतः वेदव्यासांनीं त्या यज्ञांत ब्रह्मत्व स्वीकारिलें असून धनंजयगोत्रजांमध्यें श्रेष्ठ असलेले सुसामसंज्ञक मुनि उद्गाते होते ३५. त्याचप्रमाणें वेदवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ असे याज्ञवल्क्य मुनि मुख्य अध्वर्यु झाले असून धौम्यांसहवतमान वसुपुत्र पैलमुनींनीं हौत्र स्वीकारिलें होतें ३६. हे भरतवंशजश्रेष्ठा, ह्या मुनींचे शिष्यवर्ग आणि पुत्र होत्रग झाले असून ते सर्व वेदवेदांगपारंगत होते ३७. त्या मुनींनीं पुण्याहवाचन करून व त्या यज्ञकर्माचा संकल्प करून त्या उत्कृष्ट यज्ञस्थानाचें (ठिकाणीं भूमिपूजन) केलें ३८ शिल्पी लोकांनीं आज्ञा झाल्यानंतर देवालयांप्रमाणें भव्य व सुगंधयुक्त अशीं पत्नीशालाप्रभृति स्थानें बनविलीं ३९. ह्याप्रमाणें यज्ञाची तयारी झाल्यानंतर त्या नृपश्रेष्ठ व पुरुषश्रेष्ठ धर्मराजानें मंत्री सहदेवास " निमंत्रणाकरितां तूं शीघ्र गमन करणारे दूत आतां विलंब न करितां पाठीव " ह्मणून सत्वर आज्ञा केली व तें राजाचें भाषण श्रवण केल्याबरोबर " राष्ट्रांतील मान्य असे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ह्या सर्वांना आमंत्रण करून घेऊन या " असें सांगून त्यानें दूत रवाना

समाज्ञप्तास्ततो दूताः पाण्डवेयस्य शासनात्। आमन्त्रयाम्बभूवुश्च आनयं-
श्चापरान्द्रुतम् ४३ तथा परानपि नरानात्मनः शीघ्रगामिनः ४४ ततस्ते तु
यथाकालं कुन्तीपुत्रं युधिष्ठिरम्। दीक्षयाञ्चक्रिरे विप्रा राजसूयाय भारत ४५
दीक्षितः स तु धर्मात्मा धर्मराजो युधिष्ठिरः । जगाम यज्ञायतनं वृतो
विप्रैः सहस्रशः ४६ भ्रातृभिर्ज्ञातिभिश्चैव सुहृद्भिः सचिवैः सह। क्षत्रियैश्च
मनुष्येन्द्रैर्नानादेशसमागतैः ४७ अमात्यैश्च नरश्रेष्ठो धर्मो विग्रहवानिव ।
आजग्मुर्ब्राह्मणास्तत्र विषयेभ्यस्ततस्ततः ४८ सर्वविद्यासु निष्णाता वेद-
वेदाङ्गपारगाः । तेषामावसथांचक्रुर्धर्मराजस्य शासनात् ४९ बह्वन्नाच्छा-
दनैर्युक्तान्सगणानां पृथक्पृथक्। सर्वर्तुगुणसंपन्नाञ्शिल्पिनोथ सहस्रशः ५०
तेषु तेन्यवसन्राजन्ब्राह्मणा नृपसत्कृताः । कथयन्तः कथा बह्वीः पश्यन्तो
नटनर्तकान् ५१ भुञ्जतां चैव विप्राणां वदतां च महास्वनः । अनिशं
श्रूयते तत्र मुदितानां महात्मनाम् ५२ दीयतां दीयतामेषां भुज्यतां भुज्य-
तामिति । एवंप्रकाराः संजल्पाः श्रूयन्ते स्मात्र नित्यशः ५३ गवां शत-

---

केले ४०,४१,४२. वैशंपायन सांगतातः--ह्याप्रमाणें आज्ञा झाल्यानंतर पांडुपुत्र सहदेवाच्या हुकुमावरून दूत सत्वर गेले ते निमंत्रण करून दुसऱ्यांना घेऊन आले व त्याचप्रमाणें आपणांपेक्षां सत्वर गमन करणाऱ्या अशाही दुसऱ्या पुरुषांना त्यांनीं बरोबर आणिले ४३, ४४. तदनंतर, हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, त्या विप्रांनीं कुंतीपुत्र युधिष्ठिराला योग्य वेळीं राजसूय यज्ञाची दीक्षा दिली ४५. तेव्हां तो दीक्षा घेतलेला व मूर्तिमान् धर्माप्रमाणें असलेला पुरुषश्रेष्ठ धर्मात्मा धर्मराज युधिष्ठिर हजारों ब्राह्मण, भ्राते, ज्ञातिबांधव, सुहृद, मंत्री, अनेक देशांहून आलेले क्षत्रिय राजे आणि अमात्य ह्यांनीं परिवेष्टित होऊन यज्ञभूमीमध्यें गेला. त्या ठिकाणीं सर्व विद्यांमध्यें निष्णात आणि वेदवेदांगपारंगत असे ब्राह्मण अनेक देशांहून आले होते व धर्मराजाच्या आज्ञेवरून विपुल अन्नाच्छादनांनीं युक्त आणि सर्वऋतूंतील गुणांनीं संपन्न अशीं हजारों वेग वेगळीं घरें पुढच्यापुढच्यांनीं आलेल्या त्या ब्राह्मणांकरितां शिल्पी लोकांनीं तयार केलेलीं होतीं ४६,४७,४८,४९,५० व हे जनमेजयराजा, नटनर्तकांना अवलोकन करीत करीत आणि नानाप्रकारच्या कथा कथन करीत करीत ते ब्राह्मण त्या ठिकाणीं राहिले असतांना पांडवांनीं त्यांचा अतिशय सत्कार केला ५१. तेथें आनंदित होऊन भोजन व संभाषण करीत असलेल्या त्या महात्म्या ब्राह्मणांची एकसारखी मोठी गडबड ऐकूं येत होती ५२ आणि "द्या द्या भोजन करूंद्या भोजन करूंद्या" अशा-प्रकारचे शब्द नित्य त्या स्थलीं ऐकण्यांत येत होते ५३. हे भरतकुलोत्पन्ना जन-

महस्राणि शयनानां च भारत । रुक्मस्य योषितां चैव धर्मराजः पृथग्ददौ ५४
प्रावर्ततैवं यज्ञः स पाण्डवस्य महात्मनः । पृथिव्यामेकवीरस्य शक्रस्येव
त्रिविष्टपे ५५ ततो युधिष्ठिरो राजा प्रेषयामास पाण्डवम् । नकुलं हास्ति-
नपुरं भीष्माय पुरुषर्षभः ५६ द्रोणाय धृतराष्ट्राय विदुराय कृपाय च ।
भ्रातॄणां चैव सर्वेषां येनुरक्ता युधिष्ठिरे ५७ [१२८६] इति श्रीमहाभारते०
सभापर्वणि राजसूयपर्वणि राजनिमन्त्रणं नाम त्रयस्त्रिंशोध्यायः ॥ ३३ ॥

वैशम्पायन उवाच ॥ स गत्वा हास्तिनपुरं नकुलः समितिंजयः । भीष्म-
मामन्त्रयाञ्चक्रे धृतराष्ट्रं च पाण्डवः १ सत्कृत्यामन्त्रितास्तेन आचार्यप्र-
मुखास्ततः । प्रययुः प्रीतमनसो यज्ञं ब्रह्मपुरःसराः २ संश्रुत्य धर्मराजस्य
यज्ञं यज्ञविदस्तदा । अन्ये च शतशस्तुष्टैर्मनोभिर्भरतर्षभ ३ द्रष्टुकामाः
सभां चैव धर्मराजं च पाण्डवम् । दिग्भ्यः सर्वे समापेतुः क्षत्रियास्तत्र
भारत ॥ समुपादाय रत्नानि विविधानि महान्ति च ४ धृतराष्ट्रश्च भीष्मश्च
विदुरश्च महामतिः । दुर्योधनपुरोगाश्च भ्रातरः सर्व एव ते ५ गान्धार-
राजः सुबलः शकुनिश्च महाबलः । अचलो वृषकश्चैव कर्णश्च रथिनां

मेजया, शेंकडों हजारों गायी, सुवर्णशय्या आणि दासी धर्मराजानें त्या ब्राह्मणांना वेगवेगळ्या दिल्या ५४. सारांश, स्वर्गामध्यें चाललेला इंद्राचा यागच कीं काय अशा रीतीनें पृथ्वीतील मुख्य वीर जो महात्मा पांडुपुत्र युधिष्ठिर त्याच्या यज्ञाला आरंभ झाला ५५. तेव्हां, त्या पुरुषश्रेष्ठ युधिष्ठिर राजानें पांडुपुत्र नकुलाला हास्तिनपुरामध्यें— भीष्म, द्रोण, धृतराष्ट्र, विदुर, कृप, सर्व भ्राते आणि इतरही जे कोणी युधिष्ठिरावर प्रेम करीत होते ते अशा सर्वांकडे—पाठवून दिला ५६, ५७. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील राजसूयपर्वांपैकीं राजनिमंत्रणनामक तेहेतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३३ ॥

वैशंपायन सांगतातः—त्या रणशूर पांडुपुत्र नकुलानें हास्तिनपुरास जाऊन भीष्म आणि धृतराष्ट्र ह्यांना निमंत्रण केलें १. तेव्हां त्या नकुलानें त्याप्रमाणें सत्कारपूर्वक निमंत्रण केल्यावर ते द्रोणाचार्यप्रभृति, ब्राह्मणांना पुढें घालून, आनंदानें यज्ञाला आले २. हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, धर्मराज यज्ञ करीत आहे अशी वार्ता समजल्यावर इतरही शेंकडों यज्ञवेत्ते मोठ्या आनंदानें तेथें आले ३ आणि, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, ती सभा व पांडुपुत्र धर्मराज ह्यांना अवलोकन करण्याकरितां सर्व क्षत्रिय नानाप्रकारचीं मूल्यवान् रत्नें बरोबर घेऊन सर्व ठिकाणांहून तेथें लोटले ४. त्याचप्रमाणें धृतराष्ट्र, भीष्म, महाविचारी विदुर, ते दुर्योधनप्रभृति सर्व भ्राते ५, गांधारदेशाधिपति सुबल, महाबलाढ्य शकुनि, अचल, वृषक, रथ्यांमध्यें श्रेष्ठ असा

वरः ६ तथा शल्यश्च बलवान्बाह्लिकश्च महाबलः । सोमदत्तोथ कौरव्यो भूरिर्भूरिश्रवाः शलः ७ अश्वत्थामा कृपो द्रोणः सैन्धवश्च जयद्रथः । यज्ञसेनः सपुत्रश्च शाल्वश्च वसुधाधिपः ८ प्राग्ज्योतिषश्च नृपतिर्भगदत्तो महारथः । स तु सर्वैः सह म्लेच्छैः सागरानूपवासिभिः ९ पार्वतीयाश्च राजानो राजा चैव बृहद्बलः । पौण्ड्रको वासुदेवश्च वङ्गः कालिङ्गकस्तथा १० आकर्षः कुन्तलश्चैव मालवाश्चान्ध्रकास्तथा । द्राविडाः सिंहलाश्चैव राजा काश्मीरकस्तथा ११ कुन्तिभोजो महातेजाः पार्थिवो गौरवाहनः । बाह्लिकाश्चापरे शूरा राजानः सर्व एव ते १२ विराटः सह पुत्राभ्यां मावेल्लश्च महाबलः । राजानो राजपुत्राश्च नानाजनपदेश्वराः १३ शिशुपालो महावीर्यः सह पुत्रेण भारत । आगच्छत्पाण्डवेयस्य यज्ञं समरदुर्मदः १४ रामश्चैवानिरुद्धश्च कङ्कश्च सहसारणः । गदप्रद्युम्नसाम्बाश्च चारुदेष्णश्च वीर्यवान् १५ उल्मुको निशठश्चैव वीरश्चाङ्गावहस्तथा । वृष्णयो निखिलाश्चान्ये समाजग्मुर्महारथाः १६ एते चान्ये च बहवो राजानो मध्यदेशजाः । आजग्मुः पाण्डुपुत्रस्य राजसूयं महाक्रतुम् १७ ददुस्तेषामावसथान्धर्मराजस्य शासनात् । बहुभक्ष्यान्वितान्रा-

---

कर्ण ६, बलवान् शल्य, महाबलाढ्य बाल्हिक, कुरुकुलोत्पन्न सोमदत्त, भूरि, भूरिश्रवा, शल ७, अश्वत्थामा, कृपाचार्य, द्रोणाचार्य, सिंधुदेशाधिपति जयद्रथ, पुत्रांसहवर्तमान द्रुपदराजा, शाल्वराजा ८ व प्राग्ज्योतिषदेशाधिपति महारथी भगदत्त हे त्या ठिकाणीं आले. पैकीं भगदत्त हा समुद्रतीरीं आणि सजल प्रदेशांत वास्तव्य करणाऱ्या सर्व म्लेच्छांसहवर्तमान आला ९. त्याचप्रमाणें पर्वतप्रदेशावरील राजे, राजा बृहद्बल, पौंड्रदेशाधिपति वासुदेव, वंग, कलिंग १०, आकर्ष, कुंतल, मालव, आंध्र, द्रविड व सिंहल ह्या देशांतील राजे आले असून काश्मीरदेशाधिपति ११, महातेजस्वी कुंतिभोज, राजा गौरवाहन, बाल्हिक, इतरही तिकडील सर्व शूर राजे १२, पुत्रांसहवर्तमान विराट, महाबलाढ्य मावेल्ल आणि इतरही तिकडील नानादेशाचे राजे व राजपुत्र त्या ठिकाणीं आले होते १३. हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, समरांगणामध्यें जिंकण्यास अशक्य असा जो महावीर्यवान् शिशुपाल तो पुत्रांसहवर्तमान पांडुपुत्र युधिष्ठिराच्या यज्ञाला आला होता १४. तसेंच बलराम, अनिरुद्ध, सारणासहवर्तमान कंक, गद, प्रद्युम्न, सांब, वीर्यवान् चारुदेष्ण १५, उल्मुक निशठ, वीर अंगावह व इतरही वृष्णिकुलांतील सर्व महारथी हे त्या ठिकाणीं आले होते १६. सारांश, हे आणि इतरही मध्यदेशांतील पुष्कळ राजे पांडुपुत्र युधिष्ठिराचा राजसूयनामक महाक्रतु

जन्दीर्घिकावृक्षशोभितान् १८ तथा धर्मात्मजः पूजां चक्रे तेषां महात्मनाम् । सत्कृताश्च यथोद्दिष्टाञ्जग्मुरावसथान्नृपाः १९ कैलासशिखरप्रख्यान्मनोज्ञान्द्रव्यभूषितान् । सर्वतः संवृतानुच्चैः प्राकारैः सुकृतैः सितैः २० सुवर्णजालसंवीतान्मणिकुट्टिमभूषितान् । सुखारोहणसोपानान्महासनपरिच्छदान् २१ स्रग्दामसमवच्छन्नानुत्तमागुरुगन्धिनः । हंसेन्दुवर्णसदृशानायोजनसुदर्शनान् २२ असंबाधान्समद्वारान्युतानुच्चावचैर्गुणैः । बहुधातुनिबद्धाङ्गान्हिमवच्छिखरानिव २३ विश्रान्तास्ते ततोऽपश्यन्भूमिपा भूरिदक्षिणम् । वृतं सदस्यैर्बहुभिर्धर्मराजं युधिष्ठिरम् २४ तत्सदः पार्थिवैः कीर्णं ब्राह्मणैश्च महर्षिभिः । भ्राजते स्म तदा राजन्नाकपृष्ठं यथामरैः २५ [१३११] इति० सभापर्वणि राजसूयपर्वणि निमन्त्रितराजागमने चतुस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३४ ॥

पाहुण्याकरितां तेथें जमले होते १७. हे जनमेजयराजा, विपुल अशा भक्ष्य व भोज्य पदार्थांनीं युक्त आणि वापी व वृक्ष ह्यांनीं सुशोभित अशीं गृहें धर्मराजाच्या आज्ञेवरून शिल्पी लोकांनीं त्या भूपतींना दिलीं १८. असो. प्रथमतः त्या महात्म्यांचें धर्मपुत्र युधिष्ठिरानें आदरातिथ्य केलें आणि ह्याप्रमाणें त्यांचा सत्कार झाल्यानंतर ते नृप नेमून दिलेल्या गृहांमध्यें उतरण्याकरितां गेले १९. तीं गृहें मनोहर असून नानाप्रकारच्या वस्तूंनीं भूषित आणि कैलासशिखरांप्रमाणें उंच होतीं, उत्तम प्रकारें बांधिलेल्या श्वेतवर्ण उच्च प्राकारांनीं तीं सर्व बाजूंनीं परिवेष्टित होतीं २०, सुवर्णाच्या जाळ्यांनीं तीं वेष्टिलेलीं होतीं, रत्नजडित फरसबंदीनें तीं भूषित केलेलीं होतीं, अनायासें चढून जाण्यासारखे जिने त्यांमध्यें होते, महामूल्यवान् आस्तरणें व पडदे तेथें असून २१ पुष्पमालांनीं तीं अगदीं व्याप्त केलेलीं होतीं, उत्कृष्ट अगुरूनें तीं सुवासित केलेलीं होतीं, हंसाप्रमाणें अथवा चंद्राप्रमाणें त्यांचा शुभ्रवर्ण असून चारचार कोसांवरून तीं स्पष्टपणें दिसत होतीं २२, असंकुचित प्रदेश व एकसारखीं द्वारें ह्यांनीं तीं युक्त असून बारीक सारीक सोयी देखील त्यांमध्यें केलेल्या होत्या आणि हिमालय पर्वताच्या शिखरांप्रमाणें त्यांच्या भिंती वगैरे अनेक धातूंनीं बांधिलेल्या होत्या २३. असो. अशाप्रकारच्या त्या गृहांमध्यें जाऊन उतरलेल्या त्या भूपालांनीं विपुल दक्षिणा देणाऱ्या धर्मराज युधिष्ठिराला असंख्य सदस्यांनीं परिवेष्टिलेला तेथून अवलोकन केला २४. हे जनमेजयराजा, त्यावेळीं महर्षि, ब्राह्मण आणि राजे ह्यांनीं भरून गेलेला तो यज्ञमंडप देवांच्या योगानें गजबजलेल्या स्वर्गाप्रमाणें शोभूं लागला २५.

ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील राजसूयपर्वापैकीं निमंत्रित राजांच्या आगमनाविषयीं चौतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३४ ॥

वैशम्पायन उवाच॥ पितामहं गुरुं चैव प्रत्युद्गम्य युधिष्ठिरः । अभिवाद्य ततो राजन्निदं वचनमब्रवीत् १ भीष्मं द्रोणं कृपं द्रौणिं दुर्योधनविविंशती । अस्मिन्यज्ञे भवन्तो मामनुगृह्णन्तु सर्वशः २ इदं वः सुमहच्चैव यदिहास्ति धनं मम । प्रणयन्तु भवन्तो मां यथेष्टमभिमन्त्रिताः ३ एवमुक्त्वा स तान्सर्वान्दीक्षितः पाण्डवाग्रजः । युयोज स यथायोगमधिकारेष्वनन्तरम् ४ भक्ष्यभोज्याधिकारेषु दुःशासनमयोजयत् । परिग्रहे ब्राह्मणानामश्वत्थामानमुक्तवान् ५ राज्ञां तु प्रतिपूजार्थं संजयं संन्ययोजयत् । कृताकृतपरिज्ञाने भीष्मद्रोणौ महामती ६ हिरण्यस्य सुवर्णस्य रत्नानां चान्ववेक्षणे । दक्षिणानां च वै दाने कृपं राजा न्ययोजयत् ७ तथान्यान्पुरुषव्याघ्रांस्तस्मिंस्तस्मिन्न्ययोजयत् ८ बाह्लिको धृतराष्ट्रश्च सोमदत्तो जयद्रथः । नकुलेन समानीताः स्वामिवत्तत्र रेमिरे ९ क्षत्ता व्ययकरस्त्वासीद्विदुरः सर्वधर्मवित् । दुर्योधनस्त्वर्हणानि प्रतिजग्राह सर्वशः १० चरणक्षालने कृष्णो ब्राह्मणानां स्वयं ह्यभूत् । सर्वलोकसमावृत्तः

वैशंपायन सांगतातः—हे जनमेजयराजा, भीष्म आणि द्रोणाचार्य ह्यांना सामोरें जाऊन अभिवंदन केल्यावर भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य, द्रोणपुत्र अश्वत्थामा, दुर्योधन व विविंशति ह्यांना युधिष्ठिर ह्मणाला " ह्या यज्ञामध्यें आपण सर्वप्रकारें माझ्यावर अनुग्रह करा १, २. ही जी ह्या ठिकाणीं माझी अपार संपत्ति आहे ती आपलीच आहे. करितां, आपण इच्छेस येईल त्याप्रमाणें मला आज्ञा करा अशी माझी आपणांस प्रार्थना आहे ३. ह्याप्रमाणें भाषण केल्यानंतर त्या यज्ञदीक्षा घेतलेल्या ज्येष्ठ पांडुपुत्रानें त्या सर्वांना योग्यतेप्रमाणें अधिकार दिले ४. भक्ष्य व भोज्य ह्यांविषयींचे अधिकारावर दुःशासनाची योजना करून ब्राह्मणांचें स्वागत करण्यास त्यानें अश्वत्थाम्याला सांगितलें ५. त्याचप्रमाणें राजांचें आदरातिथ्य करण्याकरितां संजयाला अधिकार देऊन झालें काय आणि राहिलें काय ह्यांकडे लक्ष्य पुरविण्याविषयीं त्या युधिष्ठिरानें महामति भीष्मद्रोणांची प्रार्थना केली ६. तद्वत् उत्कृष्ट कांतीनें युक्त असलेलें सुवर्ण व रत्नें ह्यांचा बंदोबस्त ठेवण्याविषयीं आणि दक्षिणा देण्याविषयीं धर्मराजानें कृपाचार्यांना विनंति केली ७ आणि त्याचप्रमाणें इतरही पुरुषांना त्या त्या कृत्याविषयीं अधिकार दिले ८. बाल्हिक, धृतराष्ट्र, सोमदत्त, जयद्रथ वगैरे नकुलानें आणिलेली मंडळी त्या यज्ञामध्यें यजमानांप्रमाणेंच वागत होती ९. सर्वधर्मवेत्ता क्षत्ता विदुर खर्च करणारा असून आहेर घेण्याचें काम सर्वस्वीं दुर्योधनाकडे होतें १०. उत्कृष्ट फळ प्राप्त करून घेऊन ब्राह्मणांना संतुष्ट करण्याची इच्छा करणारे असे जे सर्व

पिप्रीषुः फलमुत्तमम् ११ द्रष्टुकामः सभां चैव धर्मराजं युधिष्ठिरम् । न कश्चिदाहरत्तत्र सहस्रावरमर्हणम् ॥ रत्नैश्च बहुभिस्तत्र धर्मराजमवर्धयत् १२ कथं तु मम कौरव्यो रत्नदानैः समाप्नुयात् । यज्ञमित्येव राजानः स्पर्धमाना ददुर्धनम् १३ भवनैः सविमानाग्रैः सोदर्कैर्बलसंवृतैः । लोकराजविमानैश्च ब्राह्मणावसथैः सह १४ कृतैरावसथैर्दिव्यैर्विमानप्रतिमैस्तथा । विचित्रै रत्नवद्भिश्च ऋद्ध्या परमया युतैः १५ राजभिश्च समावृत्तैरतीव श्रीसमृद्धिभिः । अशोभत सदो राजन्कौन्तेयस्य महात्मनः १६ ऋद्ध्या च वरुणं देवं स्पर्धमानो युधिष्ठिरः । षडग्निनाथ यज्ञेन सोऽयजद्दक्षिणावता १७ सर्वाञ्जनान्सर्वकामैः समृद्धैः समतर्पयत् १८ अन्नवान्बहुभक्ष्यश्च भुक्तवज्जनसंवृतः । रत्नोपहारसंपन्नो बभूव स समागमः १९ इडाज्यसोमाहुतिभिर्मन्त्राशिक्षाविशारदैः । तस्मिन्हि ततृपुर्देवास्तते यज्ञे महर्षिभिः २० यथा देवास्तथा विप्रा

प्रकारच्या लोकांनीं परिवेष्टित असलेले भगवान् श्रीकृष्ण त्यांनीं विप्रपादप्रक्षालनाचें काम स्वतःकडे घेतलें होतें ११. असो. धर्मराज युधिष्ठिर आणि ती सभा ह्यांना अवलोकन करण्याकरितां आलेल्या कोणत्याही राजानें एक हजारापेक्षां कमी किंमतीचा आहेर आणिला नव्हता. सारांश, जो तो विपुल रत्नें देऊन धर्मराजा (च्या संपत्ती) ची वृद्धि करीत होता १२. तात्पर्य, " कसें तरी करून माझ्याच रत्नदानांमुळें ह्या कुरुवंशीय भूपतीचा यज्ञ शेवटास जावो " हा उद्देश मनांत धरून राजांनीं परस्परांच्या ईर्ष्येनें त्याला द्रव्य दिलें १३. उच्च असल्याकारणानें अग्रांच्या योगानें अंतरिक्षस्थ देवविमानांशीं संलग्न झालेल्या आणि सैन्यानें सुरक्षित असून मनोऱ्यांनीं युक्त असलेल्या राजवाड्यांमुळें; लोकपालांचीं विमानें, ब्राह्मणांना उतरण्याकरितां बांधिलेलीं गृहें, रत्नांनीं परिपूर्ण आणि पराकाष्ठेच्या समृद्धीनें संपन्न अशा विमानांप्रमाणें तयार केलेल्याही इतर अद्भुत दिव्यसदनांमुळें आणि तेथें आलेल्या अत्यंतधनसमृद्ध राजांमुळें, हे जनमेजयराजा, त्या महात्म्या कुंतीपुत्र युधिष्ठिरराजाच्या यज्ञमंडपाला फारच शोभा आली होती १४,१५,१६. वैभवानें लोकपाल वरुणाशींहि स्पर्धा करणाऱ्या युधिष्ठिरानें सहा अग्नि आणि विपुल दक्षिणा ह्यांनीं युक्त असलेला राजसूययाग करून १७ सर्व इच्छा पूर्णपणें शेवटास नेण्यानें तेथें जमलेलें सर्व लोक संतुष्ट केले १८. अन्न, विपुल भक्ष्य पदार्थ, क्षुधाशमन झालेले लोक आणि रत्नांचे नजराणे ह्यांनीं तो यज्ञसमारंभ युक्त झाला होता १९. मंत्रशिक्षा व प्रत्यक्ष अनुष्ठान ह्यांमध्यें निपुण असलेल्या ऋत्विज महर्षींनीं केलेल्या त्या राजसूय यज्ञांत इडा आणि सोम व घृत ह्यांच्या आहुति ह्यांच्या योगानें देव तृप्त झाले. २०. इडा व सोम आणि आज्य

दक्षिणान्नमहाधनैः । ततृपुः सर्ववर्णाश्च तस्मिन्यज्ञे मुदान्विताः २१ [१३३२]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां सभापर्वणि राजसूयपर्वणि यज्ञकरणे पञ्चत्रिंशोऽध्यायः ॥ ३५ ॥ समाप्तं च राजसूयपर्व ॥

अथार्घाहरणपर्व ॥ वैशम्पायन उवाच ॥ ततोऽभिषेचनीयेऽह्नि ब्राह्मणा राजभिः सह । अन्तर्वेदीं प्रविविशुः सत्कारार्हा महर्षयः १ नारदप्रमुखास्तस्यामन्तर्वेद्यां महात्मनः । समासीनाः शुशुभिरे सह राजर्षिभिस्तदा २ समेता ब्रह्मभवने देवा देवर्षयस्तथा । कर्मान्तरमुपासन्तो जजल्पुरमितौजसः ३ इदमेवं न चाप्येवमेवमेवं न चान्यथा । प्रत्यूचुर्बहवस्तत्र वितण्डावादिनो द्विजाः ४ कृशानर्थांस्ततः केचिदकृशांस्तत्र कुर्वते । अकृशांश्च कृशांश्चक्रुर्हेतुभिः शास्त्रनिश्चयैः ५ अर्थं मेधाविनः केचिदनुमानैः प्रपूरितम् । विचिक्षिपुर्यथा श्येना नभोगतमिवामिषम् ६ केचिद्धर्मार्थकुशलाः केचित्तत्र महाव्रताः । रेमिरे कथयन्तश्च सर्वभाष्यविदां वराः ७ सा

ह्यांच्या आहुतींनीं जसे देव तृप्त झाले तसे ब्राह्मण व इतरही सर्व वर्ण दक्षिणा, अन्नदान व विपुल द्रव्य ह्यांच्या योगानें त्या यज्ञामध्यें तृप्त होऊन आनंदित झाले २१. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील राजसूयपर्वांपैकीं यज्ञ करण्याविषयीं पस्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३५ ॥ ह्या ठिकाणीं राजसूयपर्वही संपूर्ण झालें ॥

येथून अर्घाहरण पर्वाला आरंभ झाला. वैशंपायन सांगतातः—राजसूयांगभूत सोमयागाचे दिवशीं सत्काराला योग्य असे महर्षि ब्राह्मण क्षत्रियांसहवर्तमान अंतर्वेदीमध्यें प्रविष्ट झाले १. त्या अंतर्वेदीमध्यें राजर्षींसहवर्तमान बसलेले महात्मे नारदप्रभृति मुनि देवर्षींसहवर्तमान ब्रह्मलोकीं जुळलेल्या देवांसारिखे शोभूं लागले आणि यज्ञानुष्ठानामध्यें सांपडणाऱ्या वेळांत ते महाप्रभावी मुनि अनेक विषयांसंबंधानें संभाषण करूं लागले २,३. कांहीं ह्मणत असत "हें असेंच आहे, तुह्मी ह्मणतां ह्याप्रमाणें नव्हे". परंतु, ह्यावर "हें अगदीं असेंच आहे; अन्यप्रकारानें असण्याचा संभवच नाहीं" ह्मणून दुसरे त्यांना उत्तर देत असत. सारांश, ह्याप्रमाणें पुष्कळच द्विज त्या ठिकाणीं परस्परांशीं वितंडवाद घालूं लागले ४. कांहीं शास्त्रानुकूल तर्कांच्या योगानें दुर्बल गोष्टीही प्रबल करून दाखवूं लागले आणि कांहींच्या सामर्थ्यहीनतेमुळें साधार गोष्टीही निराधार होऊं लागल्या ५. आकाशस्थ आमिषावर ज्याप्रमाणें श्येन पक्षी झडप घालितात त्याचप्रमाणें अनुमानांनीं प्रपूरित असलेलीही गोष्ट कांहीं बुद्धिमान् लोक उडवून देऊं लागले ६. त्या ठिकाणीं धर्म आणि अर्थ ह्यांविषयीं कांहीं निपुण असून कांहीं मोठे व्रतस्थ होते आणि कांहीं सर्वशास्त्रविषयकग्रंथवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ असून संभाषणांतच

वेदविद्वेदसंपन्नैर्देवद्विजमहर्षिभिः । आबभासे समाकीर्णा नक्षत्रैर्द्यौरिवायता ८
न तस्यां संनिधौ शूद्रः कश्चिदासीन्न चाव्रती । अन्तर्वेद्यां तदा राजन्यु-
धिष्ठिरनिवेशने ९ तां तु लक्ष्मीवतो लक्ष्मीं तदा यज्ञविधानताम् । तुतोष
नारदः पश्यन्धर्मराजस्य धीमतः १० अथ चिन्तां समापेदे स मुनिर्मनु-
जाधिप । नारदस्तु तदा पश्यन्सर्वक्षत्रसमागमम् ११ सस्मार च पुरावृत्तां
कथां तां पुरुषर्षभ । अंशावतरणे यासौ ब्रह्मणो भवनेभवत् १२ देवानां
संगमं तं तु विज्ञाय कुरुनन्दन । नारदः पुण्डरीकाक्षं सस्मार मनसा
हरिम् १३ साक्षात्स विबुधारिघ्नः क्षत्रे नारायणो विभुः । प्रतिज्ञां पाल-
यंश्चेमां जातः परपुरंजयः १४ संदिदेश पुरा योसौ विबुधान्भूतकृत्स्वयम् ।
अन्योन्यमभिनिघ्नन्तः पुनर्लोकानवाप्स्यथ १५ इति नारायणः शम्भुर्भग-
वाञ्जगतः प्रभुः । आदिश्य विबुधान्सर्वानजायत यदुक्षये १६ क्षितावन्ध-
कवृष्णीनां वंशे वंशभृतां वरः । परया शुशुभे लक्ष्म्या नक्षत्राणामिवो-
डुराट् १७ यस्य बाहुबलं सेन्द्राः सुराः सर्व उपासते । सोयं मानुषवन्नाम

दंग झाले होते ७. सारांश, वेदवेत्ते देव, द्विज आणि महर्षि ह्यांच्या योगानें भरून गेलेली ती यज्ञवेदि नक्षत्रांनीं व्याप्त झालेल्या नभोमंडलाप्रमाणें शोभूं लागली ८. हे जनमेजयराजा, युधिष्ठिराचें बसण्याचें स्थान जी अंतर्वेदि तिचे समीप कोणीही शूद्र अथवा कोणीही व्रतरहित द्विज नव्हता ९. असो. त्या वैभवशाली व विवेकी धर्मराजाची ती संपत्ति आणि यज्ञानुष्ठान अवलोकन करून नारदमुनि संतुष्ट झाले १०. परंतु, हे जनमेजयराजा, तेथें जमलेला सर्व क्षत्रियसमुदाय अवलोकन करून ते नारदमुनि चिंताक्रांतही झाले ११ आणि हे पुरुषश्रेष्ठा, श्रीकृष्णांचा अवतार होण्यापूर्वीं ब्रह्मसभेमध्यें जो प्रकार घडला होता त्याचें त्यांना स्मरण झालें १२. सारांश, हे कुरुनंदना, ब्रह्मसभेंत ठरल्याप्रमाणें तो (राजसूय यज्ञामध्यें जमलेला) देवांचा समुदाय आहे असें जाणून नारदमुनींना कमलनयन श्रीहरीचें स्मरण झालें १३. " अहो ! ही आपली (भूभार हरण करण्याची) प्रतिज्ञा शेवटास नेण्याकरितां शत्रुसमूह आणि दैत्य ह्यांचा नाश करणारा हा साक्षात् सर्वव्यापी नारायण क्षत्रियजातीमध्यें अवतीर्ण झाला आहे १४. ह्या भूतोत्पादक ईश्वरानें–तुह्मी परस्परांचा वध करून पुनरपि आप आपल्या लोकांप्रत प्राप्त व्हाल--ह्मणून पूर्वी स्वतः देवांना सांगितलें होतें १५. शंकर आणि जगत्प्रभु ब्रह्मदेव ह्या रूपांनींही असणारा हा नारायणच सर्व देवांना ह्याप्रमाणें आज्ञा करून आपण यादवगृहीं अवतीर्ण झाला आहे १६. वंशधारकांमध्यें श्रेष्ठ असलेला हा भगवान् नक्षत्रांच्या कांतीनें शोभणाऱ्या ताराधिपति चंद्राप्रमाणें पृथ्वीवर

हरिरास्तेरिमर्दनः १८ अहो बत महद्भूतं स्वयंभूर्यदिदं स्वयम् । आदास्यति पुनः क्षत्रमेवं बलसमन्वितम् १९ इत्येतां नारदश्चिन्तां चिन्तयामास धर्मवित् । हरिं नारायणं ज्ञात्वा यज्ञैरिज्यं तमीश्वरम् २० तस्मिन्धर्मविदां श्रेष्ठो धर्मराजस्य धीमतः । महाध्वरे महाबुद्धिस्तस्थौ स बहुमानतः २१ ततो भीष्मोऽब्रवीद्राजन्धर्मराजं युधिष्ठिरम् । क्रियतामर्हणं राज्ञां यथार्हमिति भारत २२ आचार्यमृत्विजं चैव संयुजं च युधिष्ठिर । स्नातकं च प्रियं प्राहुः षडर्घ्यार्हान्नृपं तथा २३ एतानर्घ्यानभिगतानाहुः संवत्सरोषितान् । त इमे कालपूगस्य महतोऽस्मानुपागतः २४ एषामेकैकशो राजन्नर्घ आनीयतामिति । अथ चैषां वरिष्ठाय समर्थायोपनीयताम् २५ युधिष्ठिर उवाच ॥ कस्मै भवान्मन्यतेऽर्घमेकस्मै कुरुनन्दन । उपनीयमानं युक्तं च तन्मे ब्रूहि पितामह २६ वैशम्पायन उवाच ॥ ततो भीष्मः शान्तनवो बुद्ध्या निश्चित्य वीर्यवान् । वार्ष्णेयं मन्यते कृष्णं पूजनीयतमं भुवि २७

अंधक आणि वृष्णि ह्यांच्या वंशामध्यें पराकाष्ठेचा शोभत आहे १७. ज्याच्या बाहुबलावर इंद्रासहवर्तमान सर्व देव अवलंबून असतात तो हा शत्रुनाशक श्रीहरि मनुष्याप्रमाणें ह्या ठिकाणीं वागत आहे १८. अहो, हे खरोखर स्वयंभु परब्रह्मच स्वतः अवतीर्ण झालें असून ह्याप्रमाणें ह्या बलाढ्य क्षत्रियसमुदायाचा तें आतां संहार करणार आहे" १९. यागांच्या योगानें पूज्य जो ईश्वर तो हाच नारायण श्रीहरि असें समजून धर्मवेत्ते नारदमुनि ह्याप्रमाणें चिंतन करूं लागले २०. विवेकी धर्मराजाच्या त्या महाक्रतूंत धर्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ असलेले ते महाबुद्धिमान् नारदमुनि मोठ्या बहुमानानें होते २१. असो. (यज्ञसमारंभ झाल्या) नंतर, हे जनमेजय राजा, धर्मराज युधिष्ठिराला ह्मणाले " हे भरतकुलोत्पन्ना राजा, योग्यतेप्रमाणें राजाचें पूजन कर २२. हे युधिष्ठिरा, आचार्य, ऋत्विज, संबंधी, स्नातक, मित्र, आणि नृप हे सहा पूज्य असून २३ प्रति संवत्सराला आले असतांही ह्यांची पूजा करणें अवश्य आहे असें ह्मणतात. परंतु, हे तर मोठे मोठे राजे संवत्सरसमूह लोटल्यानंतर आपणांकडे आलेले आहेत २४. ह्यास्तव, हे राजा, ह्यांपैकीं प्रत्येकाचें पूजन झालेंच पाहिजे आणि विशेषें करून ह्या सर्वांमध्यें जो समर्थ व श्रेष्ठ असेल त्याचें पूजन तर प्रथम झालें पाहिजे"२५. युधिष्ठिर प्रश्न करितोः—हे कुरुनंदन पितामह, ह्यांपैकीं कोणत्या एकाचें प्रथम पूजन करणें आपणांला योग्य वाटत आहे तें आपण मला सांगा २६. वैशंपायन सांगतातः—(ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें विचारिल्या)नंतर वीर्यवान् शांतनव भीष्मांनीं वृष्णिकुलोत्पन्न कृष्णच पृथ्वीमध्यें सर्वांपेक्षां पूज्य आहे असा विचारपूर्वक निश्चय करून आपलें मत

एष ह्येषां समस्तानां तेजोबलपराक्रमैः । मध्ये तपन्निवाभाति ज्योतिषामिव भास्करः २८ असूर्यमिव सूर्येण निर्वातमिव वायुना । भासितं ह्लादितं चैव कृष्णेनेदं सदो हि नः २९ तस्मै भीष्माभ्यनुज्ञातः सहदेवः प्रतापवान्। उपजह्रेऽथ विधिवद्वार्ष्णेयायार्घमुत्तमम् ३० प्रतिजग्राह तत्कृष्णः शास्त्रदृष्टेन कर्मणा । शिशुपालस्तु तां पूजां वासुदेवे न चक्षमे ३१ स उपालभ्य भीष्मं च धर्मराजं च संसदि । अथाक्षिपद्वासुदेवं चेदिराजो महाबलः ३२ [१३६४]
इति० सभापर्वण्यर्घाहरणपर्वणि कृष्णार्घदाने षट्त्रिंशोध्यायः ॥ ३६ ॥

शिशुपाल उवाच ॥ नायमर्हति वार्ष्णेयस्तिष्ठत्स्विह महात्मसु । महीपतिषु कौरव्य राजवत्पार्थिवार्हणाम् १ नायं युक्तः समाचारः पाण्डवेषु महात्मसु । यत्कामात्पुण्डरीकाक्षं पाण्डवार्चितवानसि २ बाला यूयं न जानीध्वं धर्मः सूक्ष्मो हि पाण्डवाः । अयं च स्मृत्यतिक्रान्तो ह्यापगेयोल्पदर्शनः ३ त्वादृशोधर्मयुक्तो हि कुर्वाणः प्रियकाम्यया । भवत्यभ्यधिकं

धर्मराजाला सांगितलें २७. कारण (ते ह्मणाले) ज्योतिर्गणांतील सूर्याप्रमाणें हा तेज, बल आणि पराक्रम ह्यांच्या योगानें ह्या सर्वलोकांमध्यें झळकत आहेसा भासतो २८ आणि हा आमचा यज्ञमंडप श्रीकृष्णामुळेंच प्रकाशित व आल्हादित झाला असल्यामुळें सूर्य असूनही येथें तो नसल्यासारखा झाला असून आल्हादकारक वायु विद्यमान असतांही तो अविद्यमान् असल्या सारिखा झाला आहे २९. असो. ह्याप्रमाणें श्रीकृष्णांची अग्रपूजा करण्याला भीष्मांनीं अनुज्ञा दिल्यानंतर प्रतापी सहदेवानें त्या वृष्णिकुलोत्पन्न श्रीकृष्णांचीच यथाविधि उत्कृष्ट पूजा केली ३० आणि श्रीकृष्णांनींही शास्त्रविहित विधीनें तिचा स्वीकार केला. परंतु, वासुदेवाचे ठिकाणीं झालेली ती अग्रपूजा शिशुपालाला सहन झाली नाहीं ३१. तेव्हां त्या महाबलाढ्य चेदिराज शिशुपालानें भीष्म आणि धर्मराज ह्यांचा भर सभेमध्यें उपहास करून श्रीकृष्णांचीहि निंदा केली ३२. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील अर्घाहरण पर्वापैकीं श्रीकृष्णांच्या अग्रपूजेविषयीं छत्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३६ ॥

शिशुपाल ह्मणतोः—हे कुरुवंशजा युधिष्ठिरराजा, हे मोठेमोठे भूपति ह्या ठिकाणीं असतांना हा वृष्णिकुलोत्पन्न कृष्ण राजाप्रमाणें पूजेस पात्र नाहीं १. हे पांडुपुत्रा, तूं आपलें स्वेच्छेनें कृष्णाचें पूजन केलेंस खरें; परंतु, महात्म्या पांडुपुत्रांच्या हातून असें (निंद्य) आचरण होणें योग्य नाहीं २. हे पांडुपुत्र हो, तुह्मी अजून बालक आहांत; तुह्मांला कांहीं समजत नाहीं. बाबांनो, धर्म फार सूक्ष्म आहे आणि हा अल्पमति भीष्म ह्मणाल तर भ्रांतिग्रस्त झालेला आहे ३. अरे, हा भीष्मही तुझ्यासारिखाच अधर्माचरणी असून

भीष्मो लोकेष्ववमतः सताम् । ४ कथं ह्यराजा दाशार्हो मध्ये सर्वमही-
क्षिताम् । अर्हणामर्हति तथा यथा युष्माभिरर्चितः ५ अथ वा मन्यसे
कृष्णं स्थविरं कुरुपुङ्गव । वसुदेवे स्थिते वृद्धे कथमर्हति तत्सुतः ६ अथ
वा वासुदेवोपि प्रियकामोनुवृत्तवान् । द्रुपदे तिष्ठति कथं माधवोर्हति पूज-
नम् ७ आचार्यं मन्यसे कृष्णमथ वा कुरुनन्दन । द्रोणे तिष्ठति वार्ष्णेयं
कस्मादर्चितवानसि ८ ऋत्विजं मन्यसे कृष्णमथ वा कुरुनन्दन । द्वैपा-
यने स्थिते वृद्धे कथं कृष्णोर्चितस्त्वया ९ भीष्मे शान्तनवे राजन्स्थिते
पुरुषसत्तमे । स्वच्छन्दमृत्युके राजन्कथं कृष्णोर्चितस्त्वया १० अश्वत्थाम्नि
स्थिते वीरे सर्वशास्त्रविशारदे । कथं कृष्णस्त्वया राजन्नर्चितः कुरुन-
न्दन ११ दुर्योधने च राजेन्द्रे स्थिते पुरुषसत्तमे । कृपे च भारताचार्ये
कथं कृष्णस्त्वयार्चितः १२ द्रुमं किंपुरुषाचार्यमतिक्रम्य त्वयार्चितः ।
भीष्मके चैव दुर्धर्षे पाण्डुवत्कृतलक्षणे १३ नृपे च रुक्मिणि श्रेष्ठ एक-

---

कृष्णाचें प्रिय करण्याच्या इच्छेनें भलतेंच करण्यास प्रवृत्त झाला आहे; परंतु, असल्या कृतीनें ह्याचा लोकांमध्यें सज्जन अधिकअधिकच अवमान करूं लागतील ४. अरे, तुह्मीं ज्याप्रमाणें ह्यातें पूजन केलेंत त्याप्रमाणें हा राजा नसलेला दाशार्ह सर्व भूपतीं-मध्यें तशा पूजेस पात्र आहे काय? ५. हे कुरुवंशजश्रेष्ठा, कृष्णाला जर तूं वृद्ध समजत असशील तर वृद्ध वसुदेव प्रत्यक्ष असतांना त्याचा पुत्र वृद्ध ह्मणून कसा रे पूजेस पात्र होईल? ६. हा कृष्णही तुमचें प्रिय करण्याची इच्छा करीत असून मागून चालत आलेला शिष्टाचारही ह्याला माहीत आहे; तेव्हां, तुह्मांला पूज्य जो द्रुपद तो प्रत्यक्ष येथें असतांना हा तुमची अग्रपूजा स्वीकारण्यास पात्र कसा? ७. हे कुरुनंदना, तूं जर कृष्णाला गुरु समजत असशील तर धडधडीत द्रोणाचार्य येथें असतांना तूं त्याचें पूजन कशाकरितां केलेंस? ८. हे कुरुनंदना, तूं ह्याला ऋत्विज समजत असशील तर प्रत्यक्ष वृद्ध द्वैपायनमुनि येथें असतांना तुला कृष्णाची अग्र-पूजा करण्याचें कारण काय? ९. हे भूपाला, इच्छामरणी असा पुरुषश्रेष्ठ शांतनव भीष्म येथें असतांना तूं कृष्णाचें पूजन केलेंस ह्याला, हे राजा, काय ह्मणावें? १०. हे कुरुनंदना राजा, सर्वशास्त्रपारंगत वीर अश्वत्थामा असतांना कृष्णाची तूं पूजा केलीस ह्याचा अर्थ काय? ११. सर्व राजे आणि इतर लोक ह्यांमध्यें श्रेष्ठ असा दुर्योधन येथें असतांना अथवा भरतवंशजाचार्य कृप प्रत्यक्ष विद्यमान असतांना तुला कृष्णाचीच अग्रपूजा करण्याचें प्रयोजन काय? १२. अरे, किंनरांचा आचार्य जो द्रुम त्याचेंही अतिक्रमण करून तूं कृष्णाची पूजा केलीस काय? अरे, जिंकण्यास अशक्य आणि

लव्ये तथैवच । शल्ये मद्राधिपे चैव कथं कृष्णस्त्वयार्चितः १४ अयं च सर्वराज्ञां वै बलश्लाघी महाबलः । जामदग्न्यस्य दयितः शिष्यो विप्रस्य भारत १५ येनात्मबलमाश्रित्य राजानो युधि निर्जिताः । तं च कर्णमतिक्रम्य कथं कृष्णस्त्वयार्चितः १६ नैवर्त्विङ्नैव चाचार्यो न राजा मधुसूदनः । अर्चितश्च कुरुश्रेष्ठ किमन्यत्प्रियकाम्यया १७ अथ वाभ्यर्चनीयोयं युष्माकं मधुसूदनः । किं राजभिरिहानीतैरवमानाय भारत १८ वयं तु न भयादस्य कौन्तेयस्य महात्मनः । प्रयच्छाम करान्सर्वे न लोभान्न च सान्त्वनात् १९ अस्य धर्मे प्रवृत्तस्य पार्थिवत्वं चिकीर्षतः । करानस्मै प्रयच्छामः सोयमस्मान्न मन्यते २० किमन्यदवमानाद्धि यदेनं राजसंसदि । अप्राप्तलक्षणं कृष्णमर्घेणार्चितवानसि २१ अकस्माद्धर्मपुत्रस्य धर्मात्मेति यशो गतम् । को हि धर्मच्युते पूजामेवं युक्तां नियोजयेत् २२ योयं वृष्णि-

---

प्रत्यक्ष पांडूप्रमाणें राजचिन्हांनीं युक्त असा भीष्मक १३, श्रेष्ठ राजा रुक्मी, एकलव्य आणि मद्रदेशाधिपति शल्य हे धडधडीत सभेमध्यें असतांना तूं कृष्णाची अग्रपूजा कशी केलीस? १४. हे भरतवंशजा युधिष्ठिरा, जो विप्रश्रेष्ठ परशुरामाचा प्रिय शिष्य आहे, ज्या महाबलाढ्याची सर्व राजे बलाविषयीं प्रशंसा करीत असतात; इतकेंच नव्हे परंतु, ज्यानें केवल स्वसामर्थ्याचाच अवलंब करून युद्धामध्यें राजांचा पराजय केला त्या कर्णाचीही पर्वा न करितां तूं कृष्णाची पूजा कशी केलीस? १५,१६. हे कुरुश्रेष्ठा, जो ऋत्विज नव्हे, जो आचार्य नव्हे आणि यःकश्चित् राजा देखील जो नव्हे त्या कृष्णाची तूं केवल मर्जी संपादन करण्याकरितां अग्रपूजा केलीस ह्यापेक्षां दुसरें (निंद्य) कृत्य तें काय असणार? १७. अरे, ह्या कृष्णाचीच जर तुह्मांला पूजा कर्तव्य होती तर, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, केवल अवमान करण्याकरितां येथें ह्या राजांना बुद्ध्या आणण्याचें तुला काय रे कारण पडलें होतें? १८. अहो, कांहीं प्राप्त होण्याच्या लोभानें अथवा सांत्वन करण्याच्या उद्देशानें किंवा विरुद्ध वागलों तर (आमचें कांहीं वांकडें होईल) ह्या भयानें आह्मी सर्व ह्या महात्म्या कुंतीपुत्राला कर देत नसून १९. सार्वभौमत्व संपादन करण्याची इच्छा करणारा हा युधिष्ठिर धर्ममार्गानें वागत आहे एवढीच गोष्ट मनांत आणून आह्मी त्याला कर देत असतों. परंतु, तोच आतां आह्मांला जुमानीत नाहीं २०. अरे, ज्याला छत्रचामरादि राजचिन्हें देखील नाहींत त्या ह्या कृष्णाची तूं राजसभेमध्यें अग्रपूजा केलीस ह्या अवमानापेक्षां आणखी अपमानकारक तें काय असणार बरें? २१. छे! छे! "धर्मात्मा! धर्मात्मा!" ह्मणून धर्मपुत्र युधिष्ठिराची खरोखर व्यर्थ कीर्ति झालेली आहे.

कुले जातो राजानं हतवान्पुरा। जरासन्धं महात्मानमन्यायेन दुरात्मवान् २३
अद्य धर्मात्मता चैव व्यपकृष्टा युधिष्ठिरात् । दर्शितं कृपणत्वं च कृष्णे-
र्घस्य निवेदनात् २४ यदि भीताश्च कौन्तेयाः कृपणाश्च तपस्विनः । ननु
त्वयापि बोद्धव्यं यां पूजां माधवार्हसि २५ अथ वा कृपणैरेतामुपनीतां
जनार्दन । पूजामनर्हः कस्मात्त्वमभ्यनुज्ञातवानसि २६ अयुक्तामात्मनः
पूजां त्वं पुनर्बहु मन्यसे । हविषः प्राप्य निःस्यन्दं प्राशिता श्वेव निर्जने २७
न त्वयं पार्थिवेन्द्राणामपमानः प्रयुज्यते । त्वामेव कुरवो व्यक्तं प्रलम्भन्ते
जनार्दन २८ क्लीबे दारक्रिया यादृगन्धे वा रूपदर्शनम् । अराज्ञो राजव-
त्पूजा तथा ते मधुसूदन २९ दृष्टो युधिष्ठिरो राजा दृष्टो भीष्मश्च यादृशः ।

अरे ! कोणी तरी धर्मनिष्ठ पुरुष ह्याप्रमाणें धर्मभ्रष्टाची अग्रपूजा करण्यास (कधीं तरी) प्रवृत्त होईल काय ? २२. अहो ! (निष्कलंक अशा) वृष्णिकुलामध्यें हा उत्पन्न झाला असूनही ह्या दुरात्म्यानें पूर्वी महात्म्या जरासंधराजाचा धडधडीत अन्यायानें कीं हो वध केला (तेव्हां आतां ह्यापेक्षां धर्मभ्रष्टता ती कोणती उरली बरें !) २३. कृष्णाचे ठिकाणीं अग्रपूजा केल्यामुळें आज युधिष्ठिरापासून धर्मनिष्ठता दूर झाल्याचें आणि नीचपणा मात्र ह्याचे अंगीं असल्याचें व्यक्त होत आहे २४. बरें, हे बिचारे अनाथ कुंतीपुत्र जरी भयभीत झालेले असले (आणि भीतीमुळेंच जरी त्यांनीं असा प्रकार केलेला असला) तरी, हे कृष्णा, आपण कोणत्या पूजेस पात्र आहांत ह्याचा खरोखर तूं तरी कांहीं विचार करावयाचा होतास ? २५. ह्या दीनांनीं पूजासामग्री तुझ्यासमीप आणिली असेल; परंतु, तूं वास्तविक पूजेस पात्र नसतांना त्या पूजेला आपलें अनुमोदन कां दिलेंस ? २६. (खरोखर) निर्जन प्रदेशामध्यें सांडलेल्या हवीचे बिंदु प्राप्त झाल्याबरोबर (आपल्या योग्यतेचा विचार न करितां) ते प्राशन करणाऱ्या श्वानाप्रमाणें आपण ज्या पूजेला पात्र नाहीं ती अयोग्य पूजा प्राप्त झाल्यानेंच तूं आपल्याला मोठा समजत आहेस २७. हे कृष्णा, वास्तविक पाहूं गेलें असतां हा येथें जमलेल्या नृपश्रेष्ठांचा अपमान होत नसून हे कुरुवंशज पांडुपुत्र ह्यांत धडधडीत तुझाच उपहास करीत असल्याचें स्पष्ट होत आहे २८. कारण, वीर्यवान् पुरुषांमध्यें नपुंसकाचाच विवाह होणें किंवा डोळस पुरुषांमध्यें अंधालाच तसबीर दाखविणें ह्यांत त्या वीर्यवान् पुरुषांचा अथवा डोळस पुरुषांचा अपमान होत नसून ज्याप्रमाणें ती गोष्ट नपुंसकाला अथवा अंधालाच उपहासास्पद आहे त्याचप्रमाणें श्रेष्ठ श्रेष्ठ राजे येथें असतांना तुज राजचिन्हांनींही रहित असलेल्याची पूजा होणें ह्यांत वस्तुतः त्या श्रेष्ठ राजांचा अपमान कांहीं एक होत नसून, हे कृष्णा, तुझा

वासुदेवोऽप्ययं दृष्टः सर्वमेतद्यथातथम् ३० इत्युक्त्वा शिशुपालस्तानुत्थाय परमासनात्। निर्ययौ सदसस्तस्मात्सहितो राजभिस्तदा ३१ [१३९५] इति० सभापर्वण्यर्घाभिहरणपर्वणि शिशुपालक्रोधो नाम सप्तत्रिंशोऽध्यायः ॥ ३७॥

वैशम्पायन उवाच ॥ ततो युधिष्ठिरो राजा शिशुपालमुपाद्रवत् । उवाच चैनं मधुरं सान्त्वपूर्वमिदं वचः १ नेदं युक्तं महीपाल यादृशं वै त्वमुक्तवान् । अधर्मश्च परो राजन्पारुष्यं च निरर्थकम् २ न हि धर्मं परं जातु नावबुध्येत पार्थिवः । भीष्मः शान्तनवस्त्वेनं मावमंस्थास्त्वमन्यथा ३ पश्य चैतान्महीपालांस्त्वत्तो वृद्धतरान्बहून् । मृष्यन्ते चार्हणं कृष्णे तद्वत्त्वं क्षन्तुमर्हसि ४ वेद तत्त्वेन कृष्णं हि भीष्मश्चेदिपते भृशम् । न ह्येनं त्वं तथा वेत्थ यथैनं वेद कौरवः ५ भीष्म उवाच ॥ नास्मै देयो ह्यनुनयो नायमर्हति सान्त्वनम् । लोकवृद्धतमे कृष्णे योऽर्हणां नाभिमन्यते ६

मात्र उपहास होत आहे २९. असो. ह्यावरून युधिष्ठिरराजाचें स्वरूप समजून आलें, भीष्मही कशाप्रकारचा आहे तें व्यक्त झालें आणि हा वासुदेव तरी कोणत्या किंमतीचा आहे ह्याचीही एकदा परीक्षा झाली ! तेव्हां ह्याचा विचार केला म्हणजे हा झालेला सर्व प्रकार योग्यच झाला ! ३०. ह्याप्रमाणें त्यांची निंदा करून शिशुपाल आपल्या उत्तम आसनावरून उठला आणि कांहीं राजांसहवर्तमान त्या यज्ञमंडपांतून बाहेर जाऊं लागला ३१. ह्याप्रमाणें महामुनि व्यासप्रणीत० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील अर्घाभिहरणपर्वापैकीं शिशुपालाच्या क्रोधाविषयीं सदतिसावा अध्याय समाप्त झाला॥ ३७॥

वैशंपायन सांगतातः—शिशुपाल सभेंतून उठून चालला असें दृष्टीं पडल्यांनतर युधिष्ठिर राजा सत्वर त्याचे समीप गेला आणि सांत्वनपूर्वक त्याच्याशीं असें मधुर भाषण करूं लागला कीं १ "हे भूपाला, तुला असें भाषण करणें योग्य नव्हे. हे राजा, एकाद्याला विनाकारण निष्ठुर शब्द बोलणें हा मोठा अधर्म आहे २. अरे ! राजा शांतनव भीष्म श्रेष्ठ धर्म कोणता हें जाणीत नाहीं असें कधींही होणार नाहीं. करितां, तूं ह्याचा व्यर्थ अवमान करूं नकोस ३. अरे, तुझ्याहून पुष्कळच वृद्ध अशा ह्या शेंकडों राजांकडे तरी तूं पहा. हे ज्याप्रमाणें कृष्णाचे ठिकाणीं झालेली अग्रपूजा सहन करीत आहेत त्याप्रमाणें तुलाही ती सहन करणें योग्य आहे ४. हे चेदिराजा, भीष्म कृष्णाला अगदीं पूर्णपणें तत्त्व दृष्टीनें जाणीत आहेत. परंतु, तूं मात्र ह्या कुरुवंशजाधिपति भीष्मांप्रमाणें ह्याला यथार्थ रीतीनें जाणीत नाहींस ५. भीष्म ह्मणतातः— ह्या शिशुपालाचें तूं सांत्वन करीत बसूं नकोस. कारण, त्रैलोक्यामध्यें श्रेष्ठ असलेल्या कृष्णाची अग्रपूजा ज्याला सहन होत नाहीं तो सांत्वन करून घेण्याला पात्र नाहीं ६.

क्षत्रियः क्षत्रियं जित्वा रणे रणकृतां वरः । यो मुञ्चति वशे कृत्वा गुरुर्भवति तस्य सः ७ अस्यां हि समितौ राज्ञामेकमप्यजितं युधि । न पश्यामि महीपालं सात्वतीपुत्रतेजसा ८ न हि केवलमस्माकमयमर्च्यतमोऽच्युतः । त्रयाणामपि लोकानामर्चनीयो महाभुजः ९ कृष्णेन हि जिता युद्धे बहवः क्षत्रियर्षभाः । जगत्सर्वं च वार्ष्णेये निखिलेन प्रतिष्ठितम् १० तस्मात्सत्स्वपि वृद्धेषु कृष्णमर्चामि नेतरान् । एवं वक्तुं न चार्हस्त्वं मा ते भूद्बुद्धिरीदृशी ११ ज्ञानवृद्धा मया राजन्बहवः पर्युपासिताः । तेषां कथयतां शौरेरहं गुणवतो गुणान् १२ समागतानामश्रौषं बहून्बहुमतान्सताम् । कर्माण्यपि च यान्यस्य जन्मप्रभृति धीमतः १३ बहुशः कथ्यमानानि नरैर्भूयः श्रुतानि मे । न केवलं वयं कामाच्चेदिराज जनार्दनम् १४ न संबन्धं पुरस्कृत्य कृतार्थं वा कथंचन । अर्चामहेऽर्चितं सद्भिर्भुवि भूतसुखावहम् १५ यशः शौर्यं जयं चास्य विज्ञायार्चां प्रयुञ्ज्महे । न च कश्चिदिहास्माभिः सुबालो-

---

संग्राम करणाऱ्यांमध्यें उत्कृष्ट असा जो क्षत्रिय ज्या दुसऱ्या क्षत्रियाला रणामध्यें जिंकून आणि आज्ञांकित करून सोडून देतो तो त्याचा गुरु होतो ७. ह्या राजांच्या समुदायामध्यें श्रीकृष्णाच्या तेजानें युद्धामध्यें पराजित न झालेला असा कोणी एकही भूपति मला दिसत नाहीं (तेव्हां अर्थातच हा सर्वांचा गुरु असल्याचें सिद्ध आहे) ८. अरे, हा अच्युत केवल आह्मांलाच अत्यंत पूज्य आहे असें नसून हा महापराक्रमी तिन्ही लोकांना पूज्य आहे ९. कृष्णानें युद्धामध्यें असंख्य क्षत्रियश्रेष्ठ जिंकिले असून सर्व जगत् त्या वृष्णिकुलोत्पन्न कृष्णावरच सर्वस्वीं अवलंबून आहे १०. तस्मात् , कितीही जरी वृद्ध येथें असले तरी मी कृष्णाचीच पूजा करीत आहें; इतरांची करीत नाहीं. सारांश, ह्याप्रमाणें बोलणें तुला योग्य नसून तूं आपली बुद्धिही अशी (विपरीत) होऊं देऊं नकोस ११. हे शिशुपालराजा, मी पुष्कळ ज्ञानवृद्ध लोकांबरोबर समागम केलेला आहे. परंतु, ते ज्ञानवृद्ध एकत्र बसून संभाषण करूं लागले असतांना ह्या गुणसंपन्न शूरवंशज श्रीकृष्णाचेच सज्जनांना अत्यंत मान्य असे असंख्य गुण मीं त्यांच्या मुखांतून श्रवण केले आहेत आणि त्याचप्रमाणें ह्या बुद्धिमान् श्रीकृष्णानें जन्मापासून जीं कृत्यें केलीं तीं १२,१३ लोक वारंवार कथन करीत असल्याचें पुष्कळ वेळां मीं ऐकिलें आहे. हे चेदिराजा शिशुपाला, केवळ कांहीं उद्देश मनांत धरून अगर आप्तसंबंध लक्ष्यांत आणून किंवा आपणांवर कांहीं उपकार झाला आहे तो स्मरून आह्मी—साधुजनांनीं पूजित आणि सर्व पृथ्वीवरील प्राण्यांना सुखावह अशा—ह्या जनार्दनाची अग्रपूजा करितों असें नाहीं; परंतु, १४,१५

प्यपरीक्षितः १६ गुणैर्वृद्धानतिक्रम्य हरिरर्च्यतमो मतः। ज्ञानवृद्धो द्विजा-
तीनां क्षत्रियाणां बलाधिकः १७ वैश्यानां धान्यधनवाञ्शूद्राणामेव जन्मतः।
पूज्यतायां च गोविन्दे हेतू द्वावपि संस्थितौ १८ वेदवेदाङ्गविज्ञानं बलं
चाप्यधिकं तथा । नृणां लोके हि कोन्योस्ति विशिष्टः केशवादृते १९
दानं दाक्ष्यं श्रुतं शौर्यं ह्रीः कीर्तिर्बुद्धिरुत्तमा । संनतिः श्रीर्धृतिस्तुष्टिः
पुष्टिश्च नियताच्युते २० तमिमं लोकसंपन्नमाचार्यं पितरं गुरुम् । अर्घ्य-
मर्चितमर्चार्हं सर्वे संक्षन्तुमर्हथ २१ ऋत्विग्गुरुर्विवाह्यश्च स्नातको नृपतिः
प्रियः । सर्वमेतद्धृषीकेशस्तस्मादभ्यर्चितोच्युतः २२ कृष्ण एव हि लोका-
नामुत्पत्तिरपि चाप्ययः । कृष्णस्य हि कृते विश्वमिमं भूतं चराचरम् २३
एष प्रकृतिरव्यक्ता कर्ता चैव सनातनः । परश्च सर्वभूतेभ्यस्तस्मात्पूज्य-

---

ह्याची कीर्ति, शौर्य आणि जय हीं लक्ष्यांत येऊन आह्मीं ह्याचेंच प्रथम पूजन केलें आहे. अरे, आह्मीं परीक्षा केल्यावांचून ह्या सभेमध्यें एकादें अतिलहान बालकही अवशिष्ट राहिलेलें नाहीं १६. गुणांच्या योगानें वृद्धांचें अतिक्रमण करून हा श्रीहरिच अत्यंत पूज्य ह्मणून संमत आहे (ह्मणजे ह्याचे ठिकाणीं असलेल्या गुणांचा विचार केला असतां केवळ वयानें वगैरे वृद्ध असलेल्या लोकांची पर्वा न करितां ह्याचीच अग्रपूजा करावी असें आह्मांला वाटतें). कारण, ब्राह्मणांमध्यें जो ज्ञानानें वृद्ध तोच वृद्ध असून जो बलानें वृद्ध तोच क्षत्रियांमध्यें वृद्ध समजला जातो १७ आणि त्याचप्रमाणें वैश्यांमध्यें धनधान्यसंपन्न पुरुष वृद्ध गणिला जात असून शूद्रांमध्यें मात्र केवळ वयानें मोठा असेल त्याचीच श्रेष्ठ ह्मणून गणना होत असते. सर्वांपेक्षां अधिक असें वेदवेदांगज्ञान व बल हीं जीं पूज्यता येण्याचीं कारणें तीं दोन्हींही श्रीकृष्णाचे ठिकाणीं उत्तम प्रकारें आहेत. तेव्हां मनुष्यलोकामध्यें केशवाहून दुसरा कोण बरें श्रेष्ठ आहे ? १८,१९. दातृत्व, दक्षता, श्रुत, शौर्य, ऱ्ही, कीर्ति, उत्कृष्ट बुद्धि, विनय, वैभव, धैर्य, तुष्टि व पुष्टि हीं अच्युताचे ठिकाणीं अक्षय आहेत २०. ह्मणून, आचार्य, पिता, गुरु, मधुपर्काला योग्य आणि पूज्य अशा ज्ञानसंपन्न श्रीकृष्णाचेंच आह्मीं पूजन केलें ह्याबद्दल सर्वांनीं क्षमा करणें योग्य आहे २१. कारण, ऋत्विज, गुरु, विवाहास उद्युक्त झालेला पुरुष, स्नातक, नृप आणि मित्र हे जे मधुपर्कार्ह पुरुष त्या सर्वांची योग्यता ह्या इंद्रियाधिपति अच्युताचे ठिकाणीं असल्यामुळें आह्मीं ह्याचेंच पूजन केलें आहे २२. लोकांचा उत्पादक व संहारक श्रीकृष्णच असून हें स्थावरजंगमात्मक विश्व श्रीकृष्णामुळेंच उत्पन्न झालें आहे २३. (स्पष्ट दिसत नसलेली रज्जु ज्याप्रमाणें सर्पाची उत्पादक व सर्परूप बनते ह्मणजे सर्पाला उत्पन्न करणारी आणि ज्या

तमोऽच्युतः २४ बुद्धिर्मनो महद्वायुस्तेजोम्भः खं मही च या। चतुर्विधं च यद्भूतं सर्वं कृष्णे प्रतिष्ठितम् २५ आदित्यश्चन्द्रमाश्चैव नक्षत्राणि ग्रहाश्च ये । दिशश्च विदिशश्चैव सर्वं कृष्णे प्रतिष्ठितम् २६ अग्निहोत्रमुखा वेदा गायत्री छन्दसां मुखम्। राजा मुखं मनुष्याणां नदीनां सागरो मुखम् २७ नक्षत्राणां मुखं चन्द्र आदित्यस्तेजसां मुखम् । पर्वतानां मुखं मेरुर्गरुडः पततां मुखम् २८ ऊर्ध्वं तिर्यगधश्चैव यावती जगतो गतिः । सदेवकेषु लोकेषु भगवान्केशवो मुखम् २९ अयं तु पुरुषो बालः शिशुपालो न बुध्यते । सर्वत्र सर्वदा कृष्णं तस्मादेवं प्रभाषते ३० यो हि धर्मं विचिनुयादुत्कृष्टं मतिमान्नरः । स वै पश्येद्यथा धर्मं न तथा चेदिराडयम् ३१ सवृद्धबालेष्वथवा पार्थिवेषु महात्मसु । को नार्हं मन्यते कृष्णं को वाप्येनं न पूजयेत् ३२

पदार्थांचा सर्ग होतो तो पदार्थही स्वतःच होते त्याचप्रमाणें) हाच सनातन अच्युत जगताचा उत्पादक असून अव्यक्त असें जगत्कारणही हाच असल्यामुळें लोकांपेक्षां हा श्रेष्ठ आहे. तस्मात् , हाच अच्युत सर्वांपेक्षां पूज्य ह्मणून आह्मांला अभिमत आहे २४. अहंकार, (ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें ह्यांसहवर्तमान) मन, महत्तत्व, पृथ्वी, उदक, तेज, वायु व आकाश आणि (जरायुज, अंडज स्वेदज, व उद्भिज असे) चारीप्रकारचे प्राणी हीं सर्व कृष्णावरच अवलंबून आहेत २५. त्याचप्रमाणें सूर्य, चंद्र, नक्षत्रें, ग्रह, दिशा व विदिशा हींही सर्व कृष्णाच्याच आधारावर आहेत २६. कर्मकांडांत जसें अग्निहोत्रप्रकरण मुख्य असून छंदांमध्यें जसा गायत्री-छंद मुख्य आहे, मनुष्यांमध्यें जसा राजा मुख्य असून नदीप्रभृतिजलाशयांमध्यें जसा सागर मुख्य आहे २७, नक्षत्रांमध्यें जसा चंद्र श्रेष्ठ असून तेजांमध्यें जसा सूर्य अधिक आहे आणि पर्वतांमध्यें जसा मेरु पर्वत सरस असून पक्ष्यांमध्यें जसा गरुड वरचढ आहे २८ तसाच हा भगवान् केशव—ऊर्ध्वप्रदेश, अधःप्रदेश आणि तिर्यक्प्रदेश ह्यांमध्यें जितकी जगताची गति आहे त्या गतीचे टप्प्यांतील—सर्व प्राण्यांमध्यें आणि त्याचप्रमाणें देवांसहवर्तमान सर्वलोकांमध्यें श्रेष्ठ आहे २९. अहो, हा श्रीकृष्ण सर्व कालीं सर्वत्र असतो हें जाणीत नसल्यामुळें हा मूर्ख पुरुष शिशुपाल ह्याप्रमाणें बडबड करीत आहे ३०. अहो, उत्तम धर्म कोणता ह्याचा जो पुरुष विचार करून पाहील त्याला आह्मीं वासुदेवाची अग्रपूजा केली हें धर्माला अनुसरून झालें असें समजून येईल. परंतु, हा चेदिराज शिशुपाल त्याप्रमाणें विचारच करीत नाहीं (आणि ह्मणूनच ह्याला समजतही नाहीं)३१. फार कशाला ! बालांपासून तों वृद्धांपर्यंत ह्या महात्म्या राजांमध्यें (एका शिशुपालावांचून) अग्रपूजेला केशव अपात्र असें कोणालाही वाटत

अथैनां दुष्कृतां पूजां शिशुपालो व्यवस्यति । दुष्कृतायां यथान्यायं तथायं कर्तुमर्हति ३३[१४२८]इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां सभापर्वण्यर्घाभिहरणपर्वणि भीष्मवाक्यंनामाष्टत्रिंशोध्यायः॥३८॥

वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वा ततो भीष्मो विरराम महाबलः । व्याजहारोत्तरं तत्र सहदेवोर्थवद्वचः १ केशवं केशिहन्तारमप्रमेयपराक्रमम् । पूज्यमानं मया यो वः कृष्णं न सहते नृपः २ सर्वेषां बलिनां मूर्ध्नि मयेदं निहितं पदम् । एवमुक्ते मया सम्यगुत्तरं प्रब्रवीतु सः ३ स एव हि मया वध्यो भविष्यति न संशयः । मतिमन्तश्च ये केचिदाचार्यं पितरं गुरुम् ४ अर्च्यमर्चितमर्घ्यार्हमनुजानन्तु ते नृपाः । ततो न व्याजहारैषां कश्चिद्बुद्धिमतां सताम् ५ मानिनां बलिनां राज्ञां मध्ये वै दर्शिते पदे । ततोपतत्पुष्पवृष्टिः सहदेवस्य मूर्धनि ६ अदृश्यरूपा वाचश्चाप्यब्रुवन्साधु साध्विति । आविध्यदजिनं कृष्णं भविष्यद्भूतजल्पकः ७ सर्वसंशयनि-

---

नाहीं आणि ह्याची पूजा करण्याला कोणीही मागें घेणारा नाहीं ३२. आतां, ही मधुसूदनाची अग्रपूजा झाली ती अयोग्य झाली असें जर शिशुपालाला निःसंशय वाटत आहे तर ती पूजा अयोग्य झाल्याबद्दल न्यायाला अनुसरून जें कांहीं कर्तव्य असेल तें ह्यानें खुशाल करावें ३३. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील अर्घाभिहरणपर्वापैकीं भीष्मांच्या संभाषणाविषयीं अडतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३८ ॥

वैशंपायनसांगतात:—ह्याप्रमाणें बोलून महाबलाढ्य भीष्म स्वस्थ राहिल्यानंतर शिशुपालपक्षीयांना उत्तर ह्मणून सहदेवही अर्थानें परिपूर्ण असें भाषण करूं लागला १. (तो ह्मणाला) असंख्य पराक्रम करणाऱ्या केशिदैत्यनाशक वासुदेवाची मीं केलेली अग्रपूजा तुह्मांपैकीं ज्या राजाला सहन होत नसेल त्यानें २ " हा मी सर्वांच्या मस्तकावर पाय देऊन येथें उभा राहिलों आहें" असें मीं ह्मटल्यावर तरी योग्य तें उत्तर देण्यास तयार व्हावें ३. (वासुदेवाच्या अग्रपूजेविरुद्ध जो कोणी उत्तर देण्यास पुढें येईल) त्याचा निःसंशय माझ्या हातून वधच होईल. असो. आचार्य, पिता, गुरु आणि ह्मणूनच सर्वांत मधुपर्काला प्रथम योग्य व पूज्य अशा ह्या पुरुषोत्तमाचें मीं पूजन केलें आहे त्याला तुह्मांमध्यें जे कोणी विचारी असतील त्यांनीं अनुमोदन द्यावें ". ह्याप्रमाणें भाषण करून भर सभेमध्यें सहदेवानें आपला पाय पुढें केला असतां मानी, बलाढ्य, सज्जन आणि विचारी ह्या राजांपैकीं एकानेंही जेव्हां उत्तर केलें नाहीं तेव्हां सहदेवाच्या मस्तकीं वरून पुष्पवृष्टि होऊन ४, ५, ६ " वाहवा ! वाहवा ! " ह्मणून आकाशवाणीही झाली. तदनंतर भूतभविष्य सांगणारे,

प्रोक्ता नारदः सर्वलोकवित् । उवाचाखिलभूतानां मध्ये स्पष्टतरं वचः८ कृष्णं कमलपत्राक्षं नार्चयिष्यन्ति ये नराः । जीवन्मृतास्तु ते ज्ञेया न संभाष्याः कदाचन ९ वैशम्पायन उवाच ॥ पूजयित्वा च पूजार्हान्ब्रह्मक्षत्रविशेषवित् । सहदेवो नृणां देवः समापयत कर्म तत् १० तस्मिन्नभ्यर्चिते कृष्णे सुनीथः शत्रुकर्षणः । अतिताम्रेक्षणः कोपादुवाच मनुजाधिपान् ११ स्थितः सेनापतिर्योऽहं मन्यध्वं किं तु सांप्रतम् । युधि तिष्ठाम संनह्य समेतान्वृष्णिपाण्डवान् १२ इति सर्वान्समुत्साह्य राज्ञस्तांश्चेदिपुङ्गवः । यज्ञोपघाताय ततः सोमन्त्रयत राजभिः १३ तत्राहूता गताः सर्वे सुनीथप्रमुखा गणाः । समदृश्यन्त संक्रुद्धा विवर्णवदनास्तथा १४ युधिष्ठिराभिषेकं च वासुदेवस्य चार्हणम् । न स्याद्यथा तथा कार्यमेवं सर्वे तदाब्रुवन् १५ निष्कर्षान्निश्चयात्सर्वे राजानः क्रोधमूर्च्छिताः । अब्रुवंस्तत्र राजानो निर्वेदादात्मनिश्चयात् १६ सुहृद्भिर्वार्यमाणानां तेषां हि वपु-

---

सर्व संशयांचें निरसन करणारे आणि सर्व लोक जाणणारे असे जे नारदमुनि त्यांनीं संभाषण करून अजित अशा केशवाला उत्तेजन दिलें. (कारण,) " कमलनयन श्रीकृष्णाचें जे पुरुष पूजन करीत नाहींत ते जीवन्मृत समजावे आणि त्यांच्याशीं संभाषण कधींही करूं नये " असें सर्व लोकांमध्यें त्यांनीं अगदीं स्पष्टरीतीनें सांगितलें ७,८,९. वैशंपायन सांगतातः—नंतर, ब्राह्मण आणि क्षत्रिय ह्यांच्यांतील विशिष्ट पुरुष कोणते ह्याचें ज्ञान असलेल्या पुरुषश्रेष्ठ सहदेवानें पूज्य लोकांचें पूजन करून तें कर्म समाप्त केलें १०. ह्याप्रमाणें त्या वासुदेवाची अग्रपूजा झाल्यावर, अत्यंत आरक्तवर्ण नेत्रांनीं युक्त झालेला शत्रुनाशक शिशुपाल रागारागानें तेथील राजांना ह्मणाला ११ " अरे, चेदिदेशाधिपति जो शिशुपाल तो मी सेनापति ह्या नात्यानें ह्या ठिकाणीं उभा राहिलों असतांना तुह्मीं आतां विचार करीत कसले बसलां आहांत? उठा, आपण सज्ज होऊन ह्या एकत्र जमलेल्या वृष्णिपांडवांशीं संग्राम करूं " १२. ह्याप्रमाणें सर्व राजांना चेतवून देऊन त्या चेदिराज शिशुपालानें कांहीं राजांसहवर्तमान यज्ञविध्वंस करण्याची मसलत चालविली १३. तेव्हां त्या ठिकाणीं निमंत्रित केलेले ते शिशुपालप्रभृति सर्व राजगण, क्रुद्ध झाले आणि त्यांच्या चेहऱ्यावरील कांतिही फिरून जाऊन ते मसलत करण्याकरितां निघून गेले १४ युधिष्ठिराला सार्वभौमत्वाचा अभिषेक आणि वासुदेवाची अग्रपूजा हीं शेवटास न जातील अशी तजवीज करावी " ह्मणून सर्व राजांनीं त्यावेळीं मसलत केली १५. सारांश, क्रोधानें खवळून गेलेले ते राजे जिवावर उदार होऊन व आपल्या बलाची खात्री समजून त्या

रावभौ । आमिषादपकृष्टानां सिंहानामिव गर्जताम् १७ तं बलौघमपर्यन्तं राजसागरमक्षयम् । कुर्वाणं समयं कृष्णो युद्धाय बुबुधे तदा १८ [१४४६]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां सभापर्वण्यर्घाहरणपर्वणि राजमन्त्रणे ऊनचत्वारिंशोऽध्यायः ॥३९॥ समाप्तं चेदमर्घाहरणपर्व ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततः सागरसंकाशं दृष्ट्वा नृपतिमण्डलम् । संवर्तवाताभिहतं भीमं क्षुब्धमिवार्णवम् ॥ रोषात्प्रचलितं सर्वमिदमाह युधिष्ठिरः १ भीष्मं मतिमतां मुख्यं वृद्धं कुरुपितामहम् । बृहस्पतिं बृहत्तेजाः पुरुहूत इवारिहा २ असौ रोषात्प्रचलितो महान्नृपतिसागरः । अत्र यत्प्रतिपत्तव्यं तन्मे ब्रूहि पितामह ३ यज्ञस्य च न विघ्नः स्यात्प्रजानां च हितं भवेत् । यथा सर्वत्र तत्सर्वं ब्रूहि मेद्य पितामह ४ इत्युक्तवति धर्मज्ञे धर्मराजे युधिष्ठिरे । उवाचेदं वचो भीष्मस्ततः कुरुपितामहः ५ मा भैस्त्वं कुरुशार्दूल श्वा सिंहं हन्तुमर्हति । शिवः पन्थाः सुनीतोऽत्र मया पूर्वतरं

ठिकाणीं सर्वच विरुद्ध बोलूं लागले १६ आणि आमिषापासून हुकविल्यामुळें गर्जना करणाऱ्या सिंहाप्रमाणें सुहृज्जन निवारण करीत असतांना त्या राजांचें रूप क्रोधानें प्रदीप्त झालें १७. तेव्हां, अक्षय राजसागरचकीं काय असा तो अपार सेनासमूह युद्धाची मसलत करीत असल्याचें केशवाला समजलें १८. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत ० महाभारतांतर्गत सभापर्वांतील अर्घाभिहरणपर्वापैकीं राजांच्या मसलतीविषयीं एकुणचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३९ ॥ ह्या ठिकाणी हें अर्घाभिहरणपर्वही संपूर्ण झालें ॥

आतां येथून शिशुपालवधविषयक पर्वाला आरंभ झाला. वैशंपायन सांगतातः—तदनंतर, प्रलयकालच्या वाऱ्याचा तडाखा बसल्यामुळें क्षुब्ध झालेला भयंकर सागरच कीं काय असें तें समुद्रासारिखें अपार राजमंडल रोषानें अगदीं सर्व क्षुब्ध झाल्याचें अवलोकन करून बृहस्पतीशीं संभाषण करणाऱ्या शत्रुनाशक इंद्राप्रमाणें युधिष्ठिर —विचारवानांमध्यें श्रेष्ठ, वृद्ध आणि त्या वेळच्या सर्व कुरुवंशजांचा पितामह अशा— भीष्माला ह्मणाला १, २ "हे पितामह, हा प्रचंड नृपसागर क्रोधानें खवळून गेलेला आहे. तेव्हां ह्या प्रसंगीं कसें वागावें तें आपण मला सांगा ३. सारांश, हे पितामह ज्याच्या योगानें यज्ञाला विघ्न न येतां प्रजाजनांचेंही सर्वस्वीं हित होईल तें सर्व आपण मला ह्या प्रसंगीं सांगा ४." ह्याप्रमाणें धर्मवेत्त्या धर्मराज युधिष्ठिरानें प्रार्थना केली असतां कुरुपितामह भीष्म त्याला ह्मणाले ५ "हे कुरुवंशजश्रेष्ठा, तूं भिऊं नकोस. श्वान सिंहाचा वध करील असें कधीं झालें आहे कीं काय? अरे, पूर्वीं ज्यामार्गाचें मीं अवलंबन केलें तोच मार्ग ह्या ठिकाणीं कल्याणकारक असून उत्तम प्रकारच्या नीतीनेंही

वृतः ६ प्रसुप्ते हि यथा सिंहे श्वानस्तस्मिन्समागताः । भषेयुः सहिताः सर्वे तथेमे वसुधाधिपाः ७ वृष्णिसिंहस्य सुप्तस्य तथामी प्रमुखे स्थिताः। भषन्ते तात संक्रुद्धाः श्वानः सिंहस्य संनिधौ ८ न हि संबुध्यते यावत्सुप्तः सिंह इवाच्युतः । तेन सिंहीकरोत्येतान्नृसिंहश्चेदिपुङ्गवः ९ पार्थिवान्पार्थिवश्रेष्ठः शिशुपालोप्यचेतनः । सर्वान्सर्वात्मना तात नेतुकामो यमक्षयम् १० नूनमेतत्समादातुं पुनरिच्छत्यधोक्षजः । यदस्य शिशुपालस्य तेजस्तिष्ठति भारत ११ विप्लुता चास्य भद्रं ते बुद्धिर्बुद्धिमतां वर । चेदिराजस्य कौन्तेय सर्वेषां च महीक्षिताम् १२ आदातुं च नरव्याघ्रो यं यमिच्छत्ययं तदा । तस्य विप्लवते बुद्धिरेवं चेदिपतेर्यथा १३ चतुर्विधानां भूतानां त्रिषु लोकेषु माधवः । प्रभवश्चैव सर्वेषां निधनं च युधिष्ठिर १४ वैशम्पायन उवाच ॥ इति तस्य वचः श्रुत्वा ततश्चेदिपतिर्नृपः । भीष्मं रूक्षा-

---

तोच युक्त आहे ६. सिंह निद्रिस्थ झाला असतां सर्व श्वानांनीं ज्याप्रमाणें त्याचे समीप जुळून येऊन भोंकत सुटावें त्याप्रमाणें ह्या राजांची अवस्था झाली आहे ७. ह्मणजे, बा युधिष्ठिरा, सिंह निद्रिस्थ असतांना श्वान ज्याप्रमाणें त्याचे समीप येऊन भुंकत असतात त्याचप्रमाणें हा वृष्णिसिंह श्रीकृष्ण (ह्यांची परवा न करितां खुशाल) घोरत पडला असतांना हे भूपाते त्याचे संमुख उभे राहून भोंकत आहेत ८ आणि सिंहाप्रमाणें निद्रिस्थ असलेला अच्युत जोंपर्यंत जागा झाला नाहीं तोंपर्यंतच हा पुरुषश्रेष्ठ चेदिराज ह्या राजांना (उत्तेजन देऊन) सिंह बनवीत आहे (ह्मणजे वृष्णिसिंहाशीं युद्ध करण्याकरितां प्रतिसिंहांचा हुरूप त्यांचे ठिकाणीं आणण्याचा यत्न करीत आहे) ९. तात्पर्य, बा युधिष्ठिरा, हा नृपश्रेष्ठ मूढ शिशुपाल सर्व राजांना अगदीं मनापासून यमसदनीं नेण्याची इच्छा करीत आहे १०. (पूर्वी हिरण्यकशिपुप्रभृतींच्या रूपानें असलेल्या ह्या चेदिराजाचें तेज ज्याप्रमाणें पूर्वावतारीं श्रीकृष्णानें हरण केलें त्याचप्रमाणें ह्या अवतारामध्येंही) हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, ह्या शिशुपालाचे ठिकाणीं जें तेज आहे त्याचा खरोखर संहार करण्याची ह्या अधोक्षजाला इच्छा झाली आहे ११. हे बुद्धिमानांमध्यें श्रेष्ठ कुंतीपुत्रा, ह्या चेदिदेशाधिपति शिशुपालाची व त्याचप्रमाणें (ह्याच्या बाजूला असलेल्या) सर्व राजांची बुद्धि फारच वाहवत चालली आहे १२. हा पुरुषोत्तम श्रीकृष्ण ज्याचा संहार करण्याची इच्छा करीत असतो त्याच्या बुद्धीला ह्या चेदिराजाच्या बुद्धीप्रमाणेंच विपर्यास होत असतो १३. असो. हे युधिष्ठिरा, त्रैलोक्यामध्यें (जरायुज, अंडज, स्वेदज आणि उद्भिज्ज असे) चारी प्रकारचे जे प्राणी आहेत त्या सर्वांची उत्पत्ति ह्या माधवापासूनच होत असून

क्षरा वाचः श्रावयामास भारत १५ [१४६१] इति श्रीमहाभारते० सभापर्वणि शिशुपालवधपर्वणि युधिष्ठिराश्वासने चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४० ॥

शिशुपाल उवाच ॥ बिभीषिकाभिर्बह्वीभिर्भीषयन्सर्वपार्थिवान्। न व्यपत्रपसे कस्माद्वृद्धः सन्कुलपांसनः १ युक्तमेतत्तृतीयायां प्रकृतौ वर्तता त्वया। वक्तुं धर्मादपेतार्थं त्वं हि सर्वकुरूत्तमः २ नावि नौरिव संबद्धा यथान्धो वान्धमन्वियात्। तथाभूता हि कौरव्या येषां भीष्म त्वमग्रणीः ३ पूतनाघातपूर्वाणि कर्माण्यस्य विशेषतः। त्वया कीर्तयतास्माकं भूयः प्रव्यथितं मनः ४ अवलिप्तस्य मूर्खस्य केशवं स्तोतुमिच्छतः। कथं भीष्म न ते जिह्वा शतधेयं विदीर्यते ५ यत्र कुत्सा प्रयोक्तव्या भीष्म बालतरैर्नरैः। तमिमं ज्ञानवृद्धः सन्गोपं संस्तोतुमिच्छसि ६ यद्यनेन हता बाल्ये

सर्वांचा लयही ह्याचेच ठिकाणीं होत असतो" १४. वैशंपायन सांगतात:—हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, भीष्मांचें तें भाषण श्रवण केल्यानंतर चेदिदेशाधिपति शिशुपालराजा त्यांनाही मर्मभेदक भाषणें करूं लागला १५. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील शिशुपालवधपर्वांपैकीं भीष्मांनीं युधिष्ठिराला धीर दिल्याविषयीं चाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥४०॥

शिशुपाल ह्मणतोः— वृद्ध असून ही सर्व राजांना अनेक प्रकारच्या बुजगावण्यांनीं भीति बाळण्याची तुज कुळकलंकाला लाज कशी वाटत नाहीं ? १. अथवा, असलें धर्मविरुद्ध भाषण करणें तुला षंढाला योग्यच आहे आणि अशा प्रकारचा जो तूं तो सर्व कुरुवंशजांमध्यें श्रेष्ठ आहेस ! २. नांवेला ज्याप्रमाणें दुसरी एक नांव अडकवलेली असावी किंवा अंधाच्या मागोमाग ज्याप्रमाणें दुसऱ्या एका अंधानें जावें त्याप्रमाणें हे भीष्मा, तूं ज्यांचा पुढारी आहेस त्या कुरुवंशजांची स्थिति झालेली आहे (ह्मणजे पुढली नांव फुटून बुडूं लागल्याबरोबर तिला बांधिलेली दुसरी जशी आपोआप बुडणार, किंवा पुढला अंध खड्ड्यांत पडला ह्मणजे मागला ज्याप्रमाणें अवश्य पडणार त्याचप्रमाणें तुज अविचारी पुरुषाच्या मार्गानें जाणारे कुरुवंशज तूं पडशील तेथें हापटणार हें उघड आहे) ३. अरे, विशेषेंकरून तूं ह्याच्या पूतनावधप्रभृति कर्मांची प्रशंसा करूं लागलास ह्मणजे आ(ह्मांला आश्चर्य मुळींच न वाटतां उलट स्त्रीहत्येसारख्या पातकांबद्दल आ)मच्या मनाला फारच वाईट वाटतें ४. तेव्हां, हे भीष्मा, (असला जो महापातकी त्या) केशवाची स्तुति करीत असतांना तुझ्या मूर्ख गर्विष्ठाच्या जिव्हेचे शेंकडों तुकडे कसे होत नाहींत ? ५. हे भीष्मा, (स्त्रीवधासारखीं घोर पातकें केल्याबद्दल) लहान पोरांनीं देखील ज्याची निंदाच करणें योग्य आहे त्या ह्या गुराख्याची तूं ज्ञानवृद्ध असून प्रशंसा करण्याची इच्छा करीत आहेस ! ६. बाल असतांना

शकुनिश्चित्रमत्र किम् । तौ वाश्ववृषभौ भीष्म यौ न युद्धविशारदौ ७ चेतनारहितं काष्ठं यद्यनेन निपातितम् । पादेन शकटं भीष्म तत्र किं कृतमद्भुतम् ८ वल्मीकमात्रः सप्ताहं यद्यनेन धृतोचलः । तदा गोवर्धनो भीष्म न तच्चित्रं मतं मम ९ भुक्तमेतेन बह्वन्नं क्रीडता नगमूर्धनि । इति ते भीष्म शृण्वानाः परे विस्मयमागताः १० यस्य चानेन धर्मज्ञ भुक्तमन्नं बलीयसः । स चानेन हतः कंस इत्येतन्न महाद्भुतम् ११ न ते श्रुतमिमं भीष्म नूनं कथयतां सताम् । यद्वक्ष्ये त्वामधर्मज्ञं वाक्यं कुरुकुलाधम १२ स्त्रीषु गोषु न शस्त्राणि पातयेद्ब्राह्मणेषु च । यस्य चान्नानि भुञ्जीत यत्र च स्यात्प्रतिश्रयः १३ इति सन्तोनुशासन्ति सज्जनं धर्मिणः सदा । भीष्म लोके हि तत्सर्वं वितथं त्वयि दृश्यते १४ ज्ञानवृद्धं च वृद्धं च भूयांसं केशवं मम । अजानत इवाख्यासि संस्तुवन्कौरवाधम १५ गोघ्नः स्त्रीघ्नश्च सन्भीष्म त्वद्वाक्याद्यदि पूज्यते । एवंभूतश्च यो भीष्म कथं संस्तवमर्हति १६ असौ

ह्यानें पक्षी किंवा युद्धामध्यें निपुण नसलेले अश्ववृषभ मारिले ह्यांत, हे भीष्मा, आश्चर्य तें काय आहे? ७. त्याचप्रमाणें हे भीष्मा, ह्यानें आपल्या पायानें एक गाडा उलथून दिला ह्मणजे एक निर्जीव काष्ठ खालीं पाडिलें ह्यांत त्यानें आश्चर्य तें काय केलें? ८. तसाच नुस्ता वारुळांनीं भरलेला (पोकळ) गोवर्धन पर्वत ह्यानें सात दिवस वर उचलून धरिला हेंही, हे भीष्मा, मला कांहीं आश्चर्य वाटत नाहीं ९. त्याचप्रमाणें पर्वताच्या माथ्यावर क्रीडा करीत असतांना ह्यानें पुष्कळ अन्न भक्षण केलें असें तुझ्या तोंडून ऐकणाऱ्या इतरांना, हे भीष्मा, विस्मय वाटत असतो; परंतु, मला तर ह्यांत कांहींच वाटत नाहीं १०. अहो धर्मवेत्ते! भीष्म, ज्या बलाढ्याचें ह्यानें अन्न खाल्लें त्या कंसाचा ह्यानेंच वध केला हें (कृतघ्नपणाचें कृत्य) ही मोठेंसें आश्चर्यकारक नाहीं ११. हे कुरुकुलाधमा भीष्मा, धर्माचें ज्ञान नसलेल्या तुला जें वचन मी आतां सांगणार आहें तें तूं खरोखर सज्जनांच्या तोंडून कधीं ऐकिलेंच नाहींस (असें मला वाटतें. कारण, ऐकिलें असतेंस तर पूतनेचा वगैरे वध केल्याबद्दल तूं ह्याची प्रशंसा केली नसतीस) १२. (अरे,) स्त्रिया, गाई, ब्राह्मण, अन्नदाता आणि आश्रय देणारा ह्यांच्यावर शस्त्र चालवूं नये १३ ह्मणून धर्मनिष्ठ संत लोक सज्जनाला उपदेश करीत असतात. परंतु, हे भीष्मा, तें सर्व तुझ्या ठिकाणीं व्यर्थ असल्याचें दृष्टोत्पत्तीस येत आहे १४. हे कौरवाधमा, तूं ह्या केशवाची स्तुति करून तो फारच ज्ञानवृद्ध व श्रेष्ठ असल्याचें--मला ह्याचें स्वरूप जसें कांहीं माहितच नाहीं असें समजून--सांगत आहेस (ह्याला काय ह्मणावें?) १५. हे भीष्मा, हा गोघातकी व स्त्रीघातकी

मतिमतां श्रेष्ठो य एष जगतः प्रभुः । संभावयति चाप्येवं त्वद्वाक्याच्च जनार्दनः १७ एवमेतत्सर्वमिति तत्सर्वं वितथं ध्रुवम् १८ न गाथा गाथिनं शास्ति बहु चेदपि गायति । प्रकृतिं यान्ति भूतानि भूलिङ्गशकुनिर्यथा १९ नूनं प्रकृतिरेषा ते जघन्या नात्र संशयः । अतः पापीयसी चैषां पाण्डवानामपीष्यते २० येषामर्च्यतमः कृष्णस्त्वं च येषां प्रदर्शकः । धर्मवांस्त्वमधर्मज्ञः सतां मार्गादवप्लुतः २१ को हि धर्मिणमात्मानं जानञ्ज्ञानविदां वरः । कुर्याद्यथा त्वया भीष्म कृतं धर्ममवेक्षता २२ चेत्त्वं धर्मं विजानासि यदि प्राज्ञा मतिस्तव । अन्यकामा हि धर्मज्ञा कन्यका प्राज्ञमानिना ॥ अम्बा नामेति भद्रं ते कथं सापहृता त्वया २३ तां त्वयापहृतां भीष्म कन्यां नैषितवान्यतः । भ्राता विचित्रवीर्यस्ते सतां मार्गमनुष्ठितः २४

असूनही तुझ्या सांगण्यावरूनच जर ह्याची पूजा कर्तव्य असेल तर गोष्ट वेगळी आहे. परंतु, हे भीष्मा, अशा प्रकारें घोरपातकी असणारा पुरुष (वास्तविक पाहूं गेलें असतां) स्तुतीस कसा पात्र होणार ? १६. हा बुद्धिमानांमध्यें श्रेष्ठ आहे, जगताचा प्रभु ह्मणून जो कोणी आहे तो हाच आहे इत्यादि प्रकारच्या तुझ्या भाषणावरून हा जनार्दनही " ह्याप्रमाणें चाललेलें हें माझ्या संबंधाचें सर्व खरेंच आहे " ह्मणून समजत असतो. परंतु, निःसंशय तें तुझें ह्मणणें व्यर्थ आहे १७,१८. अरे, ब्रह्मज्ञानाच्या पोकळ गोष्टी एकाद्यानें किति जरी सांगितल्या तरी (अंगीं कांहीं स्वभावसिद्ध खरेपणा असल्यावांचून) सांगणाऱ्याचे ठिकाणीं त्यांचा कांहींएक उपयोग होत नाहीं. कारण, ("साहस करूं नका साहस करूं नका " ह्मणून तोंडानें उपदेश करीत असून स्वतः सिंहाच्या दाढेंतील मांस काढणाऱ्या) भूलिंग पक्ष्याप्रमाणें प्राणी हे आपल्या जातीवर जायचेच १९. खरोखर तुझा हा स्वभावच मुळीं नीच आहे ह्यांत संशय नाहीं. तेव्हां ह्याहीपेक्षां ह्या पांडुपुत्रांचा नीच असला पाहिजे हें उघड आहे २०. हे धर्मज्ञानशून्य भीष्मा, कृष्ण ज्यांचें मुख्य दैवत आणि सन्मार्गापासून भ्रष्ट असलेला तूं धर्मनिष्ठ ! ज्यांचा मार्ग प्रदर्शक त्या पांडवांचा स्वभाव काय विचारावा ? २१. हे भीष्मा, तूं धर्मवेत्त्यानें ज्याप्रमाणें वर्तन केलेस त्याप्रमाणें स्वतःला धर्मनिष्ठ समजत असून कोण खरा खरा पुरुष वर्तन करील बरें ? २२. हे भीष्मा, तुझें कल्याण असो. तूं जर धर्म जाणीत असशील आणि तुझी मति जर धर्मज्ञानानें युक्त असेल तर तूं ज्ञानी ह्मणवीत असून दुसऱ्याची इच्छा करणाऱ्या अंबानामक धर्मज्ञ कन्येचा स्वतः अपहार कसा केलास ? २३. हे भीष्मा, तुझा भ्राता विचित्रवीर्य सन्मार्गानें वागणारा असल्यामुळें तूं हरण करून आणिलेल्या त्या कन्येची अपेक्षा त्यानेंही धरिली नाहीं २४.

दारयोर्यस्य चान्येन मिषतः प्राज्ञमानिनः । तव जातान्यपत्यानि सज्जनाचरिते पथि २५ को हि धर्मोस्ति ते भीष्म ब्रह्मचर्यमिदं वृथा । यद्धारयसि मोहाद्वा क्लीबत्वाद्वा न संशयः २६ न त्वहं तव धर्मज्ञ पश्याम्युपचर्यं क्वचित् । न हि ते सेविता वृद्धा य एवं धर्ममब्रवीः २७ इष्टं दत्तमधीतं च यज्ञाश्च बहुदक्षिणाः । सर्वमेतदपत्यस्य कलां नार्हति षोडशीम् २८ व्रतोपवासैर्बहुभिः कृतं भवति भीष्म यत् । सर्वं तदनपत्यस्य मोघं भवति निश्चयात् २९ सोनपत्यश्च वृद्धश्च मिथ्याधर्मानुसारकः । हंसवत्त्वमपीदानीं ज्ञातिभ्यः प्राप्नुया वधम् ३० एवं हि कथयन्त्यन्ये नरा ज्ञानविदः पुरा । भीष्म यत्तदहं सम्यग्वक्ष्यामि तव शृण्वतः ३१ वृद्धः किल समुद्रान्ते कश्चिद्धंसोभवत्पुरा । धर्मवागन्यथावृत्तः पक्षिणः सोनुशास्ति च ३२ धर्मं चरत माधर्ममिति तस्य वचः किल । पक्षिणः शुश्रुवुर्भीष्म सततं सत्यवादिनः ३३ अथास्य भक्ष्यमाजह्रुः समुद्रजलचारिणः । अण्डजा

अरे, (ज्येष्ठ भ्रात्यानें आपत्कालीं कनिष्ठ भ्रात्याच्या स्त्रीचे ठिकाणीं संतति उत्पन्न करणें) ह्या मार्गाचें सज्जनांनीं अवलंबन केलें असतांनाही ज्ञानी ह्मणविणाऱ्या तुझ्या समक्ष त्या विचित्रवीर्याच्या स्त्रियांचे ठिकाणीं दुसऱ्यानें अपत्यें उत्पन्न केलीं ! २५. तेव्हां, हे भीष्मा, तुझा हा धर्म आहे तरी कोणता ? खरोखर अज्ञानामुळें अथवा नपुंसकत्वामुळें जें हें ब्रह्मचर्य तूं पाळीत आहेस तें निःसंशय व्यर्थ आहे २६. हे धर्मवेत्त्या, ह्या तुझ्या ब्रह्मचर्यव्रतामुळें तुला फलप्राप्ति होण्याचें माझ्या तर कांहीं आढळण्यांत येत नाहीं. अरे, असल्याप्रकारच्या भलत्याच कृत्याला तूं धर्म ह्मणत आहेस ह्यावरून तूं वृद्धांचा समागम न केल्याचें स्पष्ट होत आहे २७. पूजन, दान, अध्ययन आणि विपुल दक्षिणांनीं युक्त असलेले याग ह्या सर्वांची मिळून योग्यता अपत्याच्या एका षोडशांशाइतकीही नाहीं २८. हे भीष्मा, पुष्कळ व्रतें व उपवास ह्यांच्या योगानें संपादन केलेले निपुत्रिक पुरुषाचें पुण्य निःसंशय सर्व निष्फल होतें २९. करितां, निपुत्रिक, वृद्ध आणि मिथ्या धर्माचें आचरण करणाऱ्या तुझाही सांप्रत त्या हंसाप्रमाणें स्वजातीयांकडून वध होणें योग्य आहे ३०. हे भीष्मा, इतर ज्ञानवेत्ते पुरुष ह्याप्रमाणें जी एक पूर्वीची गोष्ट सांगत असतात ती मी तुला इत्थंभूत कथन करितों; तूं ऐकून ठेव ३१. पूर्वी कोणी एक वृद्ध हंस समुद्रतीरीं राहत असे. त्याचें आचरण धर्मविरूद्ध असून बोलणें मात्र धर्माला अनुसरून असे; तथापि इतर पक्ष्यांना तो धर्माचा उपदेश करीच ३२. "बाबांनो, धर्मानें वागा, धर्मविरुद्ध वर्तन करूं नका" असा त्या वृद्ध हंसाचा उपदेश, हे भीष्मा, इतर सत्यवादी पक्षी सतत ऐकत असत ३३ आणि समुद्रजलामध्यें संचार

भीष्म तस्यान्ये धर्मार्थमिति शुश्रुम ३४ ते च तस्य समभ्याशे निक्षिप्याण्डानि सर्वशः । समुद्राम्भस्यमज्जन्त चरन्तो भीष्म पक्षिणः ३५ तेषामण्डानि सर्वेषां भक्षयामास पापकृत् । स हंसः संप्रमत्तानामप्रमत्तः स्वकर्मणि ३६ ततः प्रक्षीयमाणेषु तेषु तेष्वण्डजोपरः । अशङ्कत महाप्राज्ञः स कदाचिद्ददर्श ह ३७ ततः स कथयामास दृष्ट्वा हंसस्य किल्बिषम् । तेषां परमदुःखार्तः स पक्षी सर्वपक्षिणाम् ३८ ततः प्रत्यक्षतो दृष्ट्वा पक्षिणस्ते समीपगाः । निजघ्नुस्तं तदा हंसं मिथ्यावृत्तं कुरूत्तम ३९ ते त्वां हंससधर्माणमपीमे वसुधाधिपाः । निहन्युर्भीष्म संक्रुद्धाः पक्षिणस्तमिवाण्डजम् ४० गाथामप्यत्र गायन्ति ये पुराणविदो जनाः । भीष्म यां तां च ते सम्यक्कथयिष्यामि भारत ४१ अन्तरात्मन्यभिहते रौषि पत्ररथाशुचि । अण्डभक्षणकर्मैतत्तव वाचमतीयते ४२[१५०२]इति श्रीमहाभारते० सभापर्वणि शिशुपालवधपर्वणि शिशुपालवाक्य एकचत्वारिंशोध्यायः॥ ४१ ॥

करणारे दुसरे कांहीं पक्षी धर्मार्थ ह्मणून त्याला भक्ष्यही आणून देत असत असें आमच्या ऐकण्यांत आहे ३४. हे भीष्मा, भक्ष्य आणून देणारे ते समुद्रजलसंचारी पक्षी (विश्वासानें) आपलीं सर्व अंडीं त्या वृद्ध हंसाचे समीप ठेवून समुद्रजलामध्यें बुड्या मारण्याकरितां जात ३५ आणि ह्याप्रमाणें ते आपल्या अंड्यांविषयीं निष्काळजी असतांना स्वकर्माचे ठिकाणीं दक्ष असलेला तो दुष्ट हंस त्या सर्व पक्ष्यांचीं अंडीं प्रत्यहीं थोडीं थोडीं भक्षण करी ३६. असें होतां होतां तीं अंडीं जेव्हां कमी होऊं लागलीं तेव्हां त्या पक्ष्यांपैकीं एका महाबुद्धिमान् पक्ष्याला ह्या वृद्ध हंसाची शंका आली व ह्याचें कर्म एकदां त्याच्या दृष्टोत्पत्तीसही आलें ३७. तेव्हां, हंसाचें तें पापकर्म अवलोकन करून त्या पक्ष्याला फारच दुःख झालें आणि त्यानें त्या इतर सर्व पक्ष्यांना तें वृत्त कथन केलें ३८. हे कुरुश्रेष्ठा भीष्मा, त्या एका पक्ष्यानें सांगितल्यानंतर समीप असलेल्या इतर पक्ष्यांच्याही प्रत्ययाला ती गोष्ट आली आणि त्या पक्ष्यांनीं त्या अनन्वित वर्तन करणाऱ्या हंसाचा वध केला ३९. तस्मात् , हे भीष्मा, ज्याप्रमाणें इतर पक्ष्यांनीं त्या हंसपक्ष्याचा वध केला त्याचप्रमाणें हंसवत् वागत असलेल्या तुझाही (आजपर्यंत फसलेले) ते हे सर्व राजे क्रुद्ध होऊन वध करितील ४०. ह्या हंसाच्या गोष्टीविषयीं पुराणवेत्ते लोक जो एक श्लोक ह्मणत असतात तो, हे भरतकुलोत्पन्ना भीष्मा, मी तुला आहे तसा कथन करितों ४१. (तो श्लोक येणेंप्रमाणें.) हे हंसपक्ष्या, कामादिकांनीं मन व्याप्त झालें असतांना तूं वाणीनें मात्र धर्म सांगत आहेस; परंतु, हें तुझें अशुद्ध अंडभक्षणकर्म तुझ्या वाणीशीं विरुद्ध आहे ४२. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील शिशु-

शिशुपाल उवाच ॥ स मे बहुमतो राजा जरासन्धो महाबलः । योनेन युद्धं नेयष दासोयमिति संयुगे १ केशवेन कृतं कर्म जरासन्धवधे तदा । भीमसेनार्जुनाभ्यां च कस्तत्साध्विति मन्यते २ अद्वारेण प्रविष्टेन च्छद्मना ब्रह्मवादिना । दृष्टः प्रभावः कृष्णेन जरासन्धस्य भूपतेः ३ येन धर्मात्मनात्मानं ब्रह्मण्यमविजानता । नेषितं पाद्यमस्मै तद्दातुमग्रे दुरात्मने ४ भुज्यतामिति तेनोक्ताः कृष्णभीमधनंजयाः । जरासन्धेन कौरव्य कृष्णेन विकृतं कृतम् ५ यद्ययं जगतः कर्ता यथैनं मूर्ख मन्यसे । कस्मान्न ब्राह्मणं सम्यगात्मानमवगच्छति ६ इदं त्वाश्चर्यभूतं मे यदीमे पाण्डवास्त्वया । अपकृष्टाः सतां मार्गान्मन्यन्ते तच्च साध्विति ७ अथ वा नैतदाश्चर्यं येषां त्वमसि भारत । स्त्रीसधर्मा च वृद्धश्च सर्वार्थानां प्रदर्शकः ८ वैशम्पायन उवाच ॥ तस्य तद्वचनं श्रुत्वा रूक्षं रूक्षाक्षरं बहु । चुकोप बलिनां श्रेष्ठो भीमसेनः प्रतापवान् ९ तथा पद्मप्रतीकाशे स्वभावायतवि-

---

पालवधपर्वांपैकीं शिशुपालाच्या भाषणाविषयीं एकेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥४१॥

शिशुपाल भाषण करितोः—खरोखर ज्यानें दास ह्मणून कृष्णाशीं संग्राम करण्याचें नाकारिलें तो महाबलाढ्य जरासंध राजा मला फारच मान्य आहे १. अरे, जरासंधाचा वध करण्याविषयीं ह्या केशवानें आणि भीमार्जुनांनीं जें कर्म केलें तें कोणाला तरी चांगलें वाटत आहे काय? २. ब्राह्मण ह्मणून सांगून कपटपूर्वक भलत्याच मार्गानें प्रविष्ट झालेल्या ह्या कृष्णाला जरासंध राजाचा प्रभाव (पूर्वीं चांगलाच) आढळून आलेला आहे ३. अरे, धर्मात्म्या जरासंधानें पूर्वीं ह्या दुरात्म्याला ब्राह्मण ह्मणून पाद्य अर्पण केलें असतां आपल्या ब्राह्मण्याबद्दल खात्री नसलेल्या ह्या कृष्णानें तें स्वीकारिलें नाहीं ४. हे कुरुकुलोत्पन्ना भीष्मा, कृष्ण, भीम आणि अर्जुन ह्यांची त्या जरासंधानें " भोजन करा " ह्मणून प्रार्थना केली असतांना कृष्णानें त्याच्यावरच शस्त्र उपसलें ५. हे मूर्खा, तूं मानीत असल्याप्रमाणें जर हा जगताचा कर्ता असेल तर ह्याला स्वतःच्या ब्राह्मणत्वाबद्दल शंका कां आली? ६. अरे, पांडवांना तूं सन्मार्गापासून भ्रष्ट केले असूनही हे त्या तुझ्या कृतीला उत्तम ह्मणून मानितात ह्याचें मला आश्चर्य वाटतें ७. अथवा, हे भरतकुलोत्पन्ना, स्त्रियांप्रमाणें वागणारा असा तूं ज्यांचा प्रत्येक गोष्टीविषयीं मार्गप्रदर्शक आहेस त्यांच्या संबंधानें पाहूं गेलें असतां हें आश्चर्यही नव्हे ८. वैशंपायन सांगतातः—मर्मभेदक शब्द व अर्थ ह्यांनीं भरलेलें तें शिशुपालाचें भाषण श्रवण करून बलवानांमध्यें श्रेष्ठ असा प्रतापी भीमसेन क्रुद्ध झाला ९ असतां स्वभावतांच लांबरुंद, आरक्तवर्ण व कमलपत्राप्रमाणें असलेले त्याचे

स्मृते । भूयः क्रोधाभिताम्राक्षे रक्ते नेत्रे बभूवतुः १० त्रिशिखां भ्रुकुटीं चास्य ददृशुः सर्वपार्थिवाः । ललाटस्थां त्रिकूटस्थां गङ्गां त्रिपथगामिव ११ दन्तान्संदंशतस्तस्य कोपाद्ददृशुराननम् । युगान्ते सर्वभूतानि कालस्येव जिघत्सतः १२ उत्पतन्तं तु वेगेन जग्राहैनं मनस्विनम् । भीष्म एव महाबाहुर्महासेनमिवेश्वरः १३ तस्य भीमस्य भीष्मेण वार्यमाणस्य भारत । गुरुणा विविधैर्वाक्यैः क्रोधः प्रशममागतः १४ नातिचक्राम भीष्मस्य स हि वाक्यमरिंदमः । समुद्धतो घनापाये वेलामिव महोदधिः १५ शिशुपालस्तु संक्रुद्धे भीमसेने जनाधिप । नाकम्पत तदा वीरः पौरुषे स्वे व्यवस्थितः १६ उत्पतन्तं तु वेगेन पुनः पुनररिन्दम । न स तं चिन्तयामास सिंहः क्रुद्धो मृगं यथा १७ प्रहसंश्चाब्रवीद्वाक्यं चेदिराजः प्रतापवान् । भीमसेनमतिक्रुद्धं दृष्ट्वा भीमपराक्रमम् १८ मुञ्चैनं भीष्म पश्यन्तु यावदेनं नराधिपाः । मत्प्रभावविनिर्दग्धं पतङ्गमिव वह्निना १९ ततश्चे-

---

नेत्र क्रोधानें आणखी फारच आरक्तवर्ण झाले १० आणि त्रिकूटाचलावर तीन प्रवाहांनीं वहात असलेल्या गंगेप्रमाणें त्याच्या ललाटाचे ठिकाणीं तीन शिखांनीं (ह्मणजे आठ्यांनीं) युक्त असलेली उन्नत भ्रुकुटी सर्व राजांनीं अवलोकन केली ११. इतकेंच नव्हे परंतु, प्रलयकालीं सर्व भूतें भक्षण करण्याची इच्छा करणाऱ्या कालाप्रमाणें क्रोधानें दांत ओंठ खात असलेल्या त्या भीमसेनाचें मुख त्यांनीं अवलोकन केलें १२. अशाप्रकारें क्रुद्ध झालेला तो विचारी भीमसेन वेगानें शिशुपालावर धांवून जात असतांना स्कंदाला आवरून धरणारा शंकरच कीं काय अशा महापराक्रमी भीष्मांनींच ह्मणून त्याला आवरून धरिला १३. हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, पितामह भीष्मांनीं भीमसेनाचें निवारण करून नानाप्रकारच्या वाक्यांनीं उपदेश केल्यामुळें त्याचा क्रोध शांत झाला १४. सारांश, वर्षाकाल संपल्यानंतर उचंबळूं लागलेला महासागर ज्याप्रमाणें मर्यादेचें उल्लंघन करीत नाहीं त्याचप्रमाणें भीष्मांच्या वचनाचें त्या शत्रुनाशक भीमसेनानें उल्लंघन केलें नाहीं १५. हे जनमेजयराजा, ह्याप्रमाणें भीमसेन जरी अतिशय क्रुद्ध झाला होता तरी स्वतःच्या सामर्थ्यावरच अवलंबून असलेला वीर शिशुपाल मुळींच भ्यायला नाहीं १६. तात्पर्य, हे शत्रुनाशका जनमेजया, क्रुद्ध झालेला सिंह ज्याप्रमाणें मृगाकडे लक्ष्य देत नाहीं त्याचप्रमाणें पुनः पुनः वेगानें उसळत असलेल्या त्या भीमसेनाबद्दल ह्या शिशुपालाच्या मनांत कांहींदेखील भीति वाटली नाहीं १७. इतकेंच नव्हे परंतु, भयंकर पराक्रम करणारा भीमसेन अगदीं क्रुद्ध झाल्याचें अवलोकन करून तो प्रतापी चेदिराज हंसत हंसत ह्मणाला १८ "हे भीष्मा, तूं ह्याला सोड.

दिपतेर्वाक्यं श्रुत्वा तत्कुरुसत्तमः । भीमसेनमुवाचेदं भीष्मो मतिमतां वरः २०[१५२२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां० वैयासिक्यां सभापर्वणि शिशुपालवधपर्वणि भीमक्रोधे द्विचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४२ ॥

भीष्म उवाच ॥ चेदिराजकुले जातस्त्र्यक्ष एष चतुर्भुजः । रासभारावसदृशं ररास च ननाद च १ तेनास्य मातापितरौ त्रेसतुस्तौ सबान्धवौ । वैकृतं तस्य तौ दृष्ट्वा त्यागाय कुरुतां मतिम् २ ततः सभार्यं नृपतिं सामात्यं सपुरोहितम् । चिन्तासंमूढहृदयं वागुवाचाशरीरिणी ३ एष ते नृपते पुत्रः श्रीमाञ्जातो बलाधिकः । तस्मादस्मान्न भेतव्यमव्यग्रः पाहि वै शिशुम् ४ न चैव तस्य मृत्युर्वै न कालः प्रत्युपस्थितः । मृत्युर्हन्तास्य शस्त्रेण स चोत्पन्नो नराधिप ५ संश्रुत्योदाहृतं वाक्यं भूतमन्तर्हितं ततः । पुत्रस्नेहाभिसंतप्ता जननी वाक्यमब्रवीत् ६ येनेदमीरितं वाक्यं ममैतं तनयं प्रति । प्राञ्जलिस्तं नमस्यामि ब्रवीतु स पुनर्वचः ७ याथातथ्येन

अरे, अग्नीच्या योगानें नष्ट होणाऱ्या पतंगाप्रमाणें माझ्या प्रभावानें ह्याला दग्धझालेला एकदां ह्या राजांना अवलोकन करूं देच" १९. असो. भीमसेनाला आवरून धरिल्यानंतर चेदिदेशाधिपति शिशुपालाचें तें वाक्य श्रवण करून विचारी लोकांमध्यें मुख्य असलेले ते कुरुवंशजश्रेष्ठ भीष्म भीमसेनाला (शिशुपालाची हकीकत) सांगूं लागले २०. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील शिशुपालवधपर्वांपैकीं भीमसेनाच्या क्रोधाविषयीं बेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४२ ॥

भीष्म ह्मणतात:—(हे भीमसेना) चेदिराजाच्या कुळामध्यें हा शिशुपाल तीन नेत्रांनीं व चार बाहूंनीं युक्त असा उत्पन्न होऊन गर्दभाप्रमाणें किंचाळ्या फोडून ओरडूं लागला असतां १ बांधवांसहवर्तमान ह्याचे ते मातापितर त्रस्त झाले आणि तें विद्रूप अवलोकन करून त्यांनीं त्याचा त्याग करण्याचें मनांत आणिलें २. इतक्यांत भार्या, अमात्य व पुरोहित ह्यांसहवर्तमान मनामध्यें अगदीं कांहीं सुचेनासें झालेल्या त्या चेदिराजाला अशी आकाशवाणी झाली ३ कीं, "हे राजा, हा तुझा महाबलाढ्य व वैभवशाली पुत्र झाला आहे. तस्मात्, तूं ह्याची भीति न बाळगितां दक्ष राहून ह्याचें परिपालन कर ४. (अरे तूं ह्याचा आतांच त्याग करण्यास प्रवृत्त झाला आहेस खरा; परंतु,) ह्याचा मृत्यु अथवा काल अद्याप समीप आलेला नाहीं. शस्त्रानें ह्याला (पुढें) मृत्यु येणारा आहे व हे राजा, तो ह्याचा वध करणारा (आधींच) उत्पन्न झाला आहे"५. ह्याप्रमाणें झालेली आकाशवाणी श्रवण केल्यानंतर पुत्रवात्सल्यानें व्याकुळ झालेली ह्याची माता त्या अदृश्य भूताला उद्देशून ह्मणाली ६ "माझ्या ह्या पुत्रासंबंधानें

भगवान्देवो वा यदि वेतरः । श्रोतुमिच्छामि पुत्रस्य कोऽस्य मृत्युर्भवि-
ष्यति ८ अन्तर्भूतं ततो भूतमुवाचेदं पुनर्वचः । यस्योत्सङ्गे गृहीतस्य
भुजावभ्यधिकावुभौ ९ पतिष्यतः क्षितितले पञ्चशीर्षाविवोरगौ । तृतीयमे-
तद्बालस्य ललाटस्थं तु लोचनम् १० निमज्जिष्यति यं दृष्ट्वा सोऽस्यमृत्युर्भवि-
ष्यति । त्र्यक्षं चतुर्भुजं श्रुत्वा तथा च समुदाहृतम् ११ पृथिव्यां पार्थिवाः
सर्वे अभ्यागच्छद्दिदृक्षवः । तान्पूजयित्वा संप्राप्तान्यथार्हं स महीपतिः १२
एकैकस्य नृपस्याङ्के पुत्रमारोपयत्तदा । एवं राजसहस्राणां पृथक्त्वेन यथा-
क्रमम् १३ शिशुरङ्के समारूढो न तत्प्राप निदर्शनम् । एतदेव तु संश्रुत्य
द्वारवत्यां महाबलौ १४ ततश्चेदिपुरीं प्राप्तौ संकर्षणजनार्दनौ । यादवौ
यादवीं द्रष्टुं स्वसारं तौ पितुस्तदा १५ अभिवाद्य यथान्यायं यथाश्रेष्ठं
नृपं च ताम् । कुशलानामयं पृष्ट्वा निषण्णौ रामकेशवौ १६ साभ्यर्च्य तौ
तदा वीरौ प्रीत्या चाभ्यधिकं ततः । पुत्रं दामोदरोत्सङ्गे देवी संन्यदधा-

ज्यानें हें भाषण केलें त्याला मी हात जोडून नमस्कार करितें. त्या भगवानानें पुनरपि मला काय तें खरें सांगावें. देव अथवा कोणी दुसरा ह्यांपैकीं माझ्या ह्या पुत्राला कोणाच्या हातून मृत्यु येणार आहे हें श्रवण करण्याची माझी इच्छा आहे" ७,८. ह्याप्रमाणें ह्याच्या मातेनें प्रार्थना केल्यावर पुनरपि अशी आकाशवाणी झाली कीं ज्यानें मांडीवर घेतल्याबरोबर ह्याचे हे पंचमुखी नागांप्रमाणें असलेले दोन अधिक बाहु भूतलावर पडतील आणि ललाटाचे ठिकाणीं असलेला ह्या बालकाचा हा तिसरा नेत्र ज्याला अवलोकन करण्याबरोबर जागच्या जागीं जिरून जाईल तो ह्याचा मृत्यु होईल." असो. गर्दभाप्रमाणें शब्द करणारा असा त्रिलोचन व चतुर्भुज पुत्र चेदिराजाला झाल्याचें ऐकिल्यावर९,१०,११ पृथ्वींतील सर्व राजे त्याला पहाण्याकरितां तेथें येऊं लागले व त्या आलेल्या राजांचा योग्यतेप्रमाणें सत्कार केल्यावर तो चेदिराजा १२ प्रत्येकाचे अंकावर आपला पुत्र ठेऊं लागला. ह्याप्रमाणें क्रमानें पृथक् पृथक् हजारों राजाच्या १३ अंकावर तो पुत्र आरूढ झाला. तथापि (चोहोंपैकीं दोन हात व तिहींपैकीं एक नेत्र कमी होण्याची) ती गोष्ट निदर्शनाला आली नाहीं. हेंच (अद्भुत वृत्त) द्वारकेमध्यें श्रवण करून महाबलाढ्य बलराम व कृष्ण हे उभयतः यादव आपल्या यदुकुलोत्पन्न पितृभगिनीला भेटण्याकरितां चेदिदेशाच्या राजधानीमध्यें आले १४, १५. नंतर रीतीप्रमाणें चेदिराजाला व त्या आपल्या आतेला अभिवंदन करून आणि क्षेम व आरोग्य ह्यांविषयीं प्रश्न करून ते उभयतां रामकृष्ण तेथें बसले १६. तेव्हां इतरांपेक्षां त्या वीरांचें आदरातिथ्य प्रेमपूर्वक अधिक करून राजपत्नीनें

स्त्वयम् १७ न्यस्तमात्रस्य तस्याङ्के भुजावभ्यधिकावुभौ। पेततुस्तच्च नयनं न्यमज्जत ललाटजम् १८ तद्दृष्ट्वा व्यथिता त्रस्ता वरं कृष्णमयाचत। ददस्व मे वरं कृष्ण भयार्ताया महाभुज १९ त्वं ह्यार्तानां समाश्वासो भीतानामभयप्रदः। एवमुक्तस्ततः कृष्णः सोब्रवीद्यदुनन्दनः २० मा भैस्त्वं देवि धर्मज्ञे न मत्तोस्ति भयं तव। ददामि कं वरं किं च करवाणि पितृ-ष्वसः २१ शक्यं वा यदि वाशक्यं करिष्यामि वचस्तव। एवमुक्ता ततः कृष्णमब्रवीद्यदुनन्दनम् २२ शिशुपालस्यापराधान्क्षमेथास्त्वं महाबल। मत्कृते यदुशार्दूल विद्ध्येनं मे वरं प्रभो २३ कृष्ण उवाच ॥ अपराधशतं क्षाम्यं मया ह्यस्य पितृष्वसः। पुत्रस्य ते वधार्हस्य मा त्वं शोके मनः कृथाः २४ भीष्म उवाच ॥ एवमेष नृपः पापः शिशुपालः सुमन्दधीः। त्वां समाह्वयते वीर गोविन्दवरदर्पितः २५ [१५४७] इति०सभापर्वणि शिशुपालवधपर्वणि शिशुपालवृत्तान्तकथने त्रिचत्वारिंशोध्यायः ॥ ४३ ॥

श्रीकृष्णांच्या मांडीवर आपला पुत्र स्वतः नेऊन ठेविला १७. परंतु, त्यांच्या अंकावर त्या पुत्राला ठेवितांक्षणीं त्याचे ते दोन अधिक असलेले बाहु पृथ्वीवर गळून पडून ललाटस्थ तृतीय नेत्रही जागच्या जागीं जिरून गेला १८. तेव्हां तें अवलोकन करून व्याकुळ व त्रस्त झालेल्या ह्याच्या मातेनें श्रीकृष्णांपाशीं असा वर मागितला कीं " हे महापराक्रमी कृष्णा, मी अगदीं भयानें व्याकुळ झालें आहें. करितां, तूं मला एक वर दे १९. कारण, आर्त जनांना आश्वासन देणारा तूंच असून भयग्रस्तांना अभय देणाराही तूंच आहेस ". ह्याप्रमाणें आतेनें प्रार्थना केल्यावर ते यदुनंदन श्रीकृष्ण ह्मणाले २० " हे धर्मवेत्त्ये राजभार्ये, भिऊं नकोस. माझ्यापासून तुला भय नाहीं. हे पितृभगिनि, मी तुला कोणता वर देऊं आणि तुझें काय कार्य करूं? २१. शक्य असो अथवा नसो तुझें सांगणें मी शेंवटास नेईन. " ह्याप्रमाणें यदुनंदन श्रीकृष्णांनीं वचन दिल्यावर ती त्यांना ह्मणाली २२ "हे महाबलाढ्य, माझ्या करितां तूं शिशुपालाचे अपराध क्षमा कर व हे प्रभो यदुश्रेष्ठा, हाच माझा वर आहे असें तूं समज" २३. श्रीकृष्ण ह्मणतातः—हे पितृभगिनि, वधालाच योग्य असलेल्या ह्या तुझ्या पुत्राचे मी शंभर अपराध सहन करीन. तूं आतां आपल्या मनाला वाईट वाटून देऊं नको २४. भीष्म सांगतातः—हे वीरा भीमसेना, अशाप्रकारचा असलेला हा अत्यंत मूढमति व दुष्ट शिशुपाल राजा श्रीकृष्णाच्या वरामुळें गर्विष्ठ होऊन तुला आव्हान करीत आहे २५. ह्याप्रमाणें०श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील शिशुपालवधपर्वांपैकीं शिशुपालाचा वृत्तांत कथन करण्याविषयीं त्रेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥४३॥

भीष्म उवाच ॥ नैषा चेदिपतेर्बुद्धिर्यया त्वाह्वयतेऽच्युतम् । नूनमेष जगद्भर्तुः कृष्णस्यैव विनिश्चयः १ को हि मां भीमसेनाद्य क्षितावर्हति पार्थिवः । क्षेप्तुं कालपरीतात्मा यथैष कुलपांसनः २ एष ह्यस्य महाबाहुस्तेजोंऽशश्च हरेर्ध्रुवम् । तमेव पुनरादातुमिच्छत्युत तथा विभुः ३ येनैष कुरुशार्दूल शार्दूल इव चेदिराट् । गर्जत्यतीव दुर्बुद्धिः सर्वानस्मानचिन्तयन् ४ वैशम्पायन उवाच ॥ ततो न ममृषे चैद्यस्तद्भीष्मवचनं तदा । उवाच चैनं संक्रुद्धः पुनर्भीष्ममथोत्तरम् ५ शिशुपाल उवाच ॥ द्विषतां नोऽस्तु भीष्मैष प्रभावः केशवस्य यः । यस्य संस्तववक्ता त्वं बन्दिवत्सततोत्थितः ६ संस्तवे च मनो भीष्म परेषां रमते यदि । तदा संस्तौषि राज्ञस्त्वमिमं हित्वा जनार्दनम् ७ दरदं स्तुहि बाह्लीकमिमं पार्थिवसत्तमम् । जायमानेन येनेयमभवद्दारिता मही ८ वङ्गाङ्गविषयाध्यक्षं सहस्राक्षसमं बले । स्तुहि कर्णमिमं भीष्म महाचापविकर्षणम् ९ यस्येमे कुण्डले दिव्ये

भीष्म ह्मणतातः—चेदिराज शिशुपाल श्रीकृष्णाला युद्धार्थ आव्हान करीत आहे ही कांहीं त्याची स्वतःची बुद्धि नव्हे; परंतु, जगताचा संहार करणाऱ्या श्रीकृष्णाचाच खरोखर हा (शिशुपालाचा संहार करण्याविषयीं) निश्चय झालेला आहे १. नाहींतर, हे भीमसेना, कालानें ग्रासलेल्या ह्या कुलकलंक शिशुपालाप्रमाणें माझी निंदा करण्याचें आज पृथ्वीमध्यें कोणत्या राजाचें सामर्थ्यआहे? २. करितां, हा महापराक्रमी शिशुपाल निःसंशय ह्या श्रीहरीच्याच तेजाचा अंश आहे व त्या अंशाचा पुनरपि आपल्या-ठिकाणीं संहार करण्याची हा सर्वव्यापी श्रीहरिच इच्छा करीत आहे ३. ह्मणून, हे कुरुवंशजश्रेष्ठा भीमसेना, आह्मा सर्वांचीही परवा न करितां हा दुर्बुद्धि चेदिराजा व्याघ्राप्रमाणें अतिशयच गर्जना करीत आहे ४. वैशंपायन सांगतातः— (ह्याप्रमाणें भीष्मांनीं भाषण केलें असतांही) तो चेदिराज शिशुपाल त्या भीष्मांच्या वचनाचा मुळींच विचार न करितां क्रुद्ध होऊन पुनरपि त्यांनाच उलट उत्तर करूं लागला ५. शिशुपाल ह्मणतोः—हे भीष्मा, भाटाप्रमाणें ज्याचा स्तुतिपाठ करण्यास तूं सर्वदा तयार असतोस त्या केशवाचा जो काय प्रभाव असेल तो एकदां त्याचा द्वेष करणाऱ्या आमच्या अनुभवास येऊं देच ६. हे भीष्मा, दुसऱ्यांची स्तुति करणेंच जर तुझ्या मनाला बरें वाटत असेल तर ह्या जनार्दनाला सोडून तूं राजांची तरी स्तुति करीत जा ७. अरे जो उत्पन्न होऊं लागला असतां ही पृथ्वी विदीर्ण झाली त्या नृपश्रेष्ठ बाल्हीकराज दरदाची स्तुति कर ८. अथवा, हे पराक्रमी भीष्मा, ज्याला हीं देवनिर्मित कुंडलें स्वाभाविकच प्राप्त झालीं असून बालसूर्यासारिखें तेजस्वी कवचही ज्याला

सहजे देवनिर्मिते । कवचं च महाबाहो बालार्कसदृशप्रभम् १० वासवप्रतिमो येन जरासन्धोतिदुर्जयः । विजितो बाहुयुद्धेन देहभेदं च लम्भितः ११ द्रोणं द्रौणिं च साधु त्वं पितापुत्रौ महारथौ । स्तुहि स्तुत्यावुभौ भीष्म सततं द्विजसत्तमौ १२ ययोरन्यतरो भीष्म संक्रुद्धः सचराचरम् । इमां वसुमतीं कुर्यान्निःशेषामिति मे मतिः १३ द्रोणस्य हि समं युद्धे न पश्यामि नराधिपम् । नाश्वत्थाम्नः समं भीष्म न च तौ स्तोतुमिच्छसि १४ पृथिव्यां सागरान्तायां यो वै प्रतिसमो भवेत् । दुर्योधनं तं राजेन्द्रमतिक्रम्य महाभुजम् १५ जयद्रथं च राजानं कृतास्त्रं दृढविक्रमम् । द्रुमं किंपुरुषाचार्यं लोके प्रथितविक्रमम् १६ अतिक्रम्य महावीर्यं किं प्रशंससि केशवम् । वृद्धं च भारताचार्यं तथा शारद्वतं कृपम् १७ धनुर्धराणां प्रवरं रुक्मिणां पुरुषोत्तमम् । अतिक्रम्य महावीर्यं किं प्रशंससि केशवम् १८ भीष्मकं च महावीर्यं दन्तवक्त्रं च भूमिपम् । भगदत्तं यूपकेतुं जय-

---

जन्मतः आंगचेंच प्राप्त झालेलें आहे आणि जिंकण्यास अत्यंत दुर्घट असा इंद्रासमान पराक्रमी जरासंध देहभंगपूर्वक ज्यानें बाहुयुद्धांत पराजित केला आहे त्या ह्या सामर्थ्यानें इंद्राची बरोबरी करणाऱ्या अंगवंगदेशाधिपति महाधनुर्धारी कर्णाची तूं स्तुति कर ९,१०,११. हे भीष्मा, उभयतांही स्तुतीस पात्र असे हे महारथी पितापुत्र द्विजश्रेष्ठ द्रोण व अश्वत्थामा ह्यांची तूं खुशाल सतत स्तुति करीत जा १२. कारण, हे भीष्मा, ह्या उभयतांपैकीं एक जर क्रुद्ध झाला तर स्थावरजंगमात्मक प्राण्यांसहवर्तमान ही पृथ्वी निःशेष करून टाकील अशी माझी ह्यांच्याबद्दल खातरी (तरी) आहे १३. अरे, युद्धामध्यें द्रोणाची अथवा अश्वत्थाम्याची बरोबरी करणारा मला कोणीही राजा दिसत नाहीं; परंतु, हे भीष्मा, त्यांची स्तुति करण्याची तुला इच्छा होत नाहीं ! १४. समुद्रमर्यादित पृथ्वीमध्यें ज्याची बरोबरी करणारा कोणी नाहीं तो नृपश्रेष्ठ महापराक्रमी दुर्योधन १५, अस्त्रनिपुण व अमोघपराक्रमी जयद्रथ राजा आणि त्याचप्रमाणें पराक्रमाविषयीं जगतामध्यें ज्याची ख्याति आहे तो महावीर्यवान् किंनराधिपति द्रुम ह्यांचें १६ अतिक्रमण करून तूं केशवाची कशाकरितां प्रशंसा करीत असतोस ? अरे, सर्वभरतवंशजांचा आचार्य आणि वृद्ध असा जो शरद्वान् गौतममुनींचा पुत्र कृप त्याला सोडून तूं केशवाची स्तुति करीत असतोस ह्याचा अर्थ काय ? १७. त्याचप्रमाणें धनुर्धरांमध्यें उत्कृष्ट आणि पुरुषांमध्यें श्रेष्ठ अशा ह्या महावीर्यवान् रुक्मीची परवा न करितां तूं आपला केशवाची स्तुति करीत सुटलोस झाला काय ह्मणावें ? १८. महावीर्यवान् भीष्मक, दंतवक्त्र राजा, यूपकेतु भगदत्त, मगध-

त्सेनं च मागधम् १९ विराटद्रुपदौ चोभौ शकुनिं च बृहद्बलम् । विन्दानुविन्दावावन्त्यौ पाण्ड्यं श्वेतमथोत्तमम् २० शङ्खं च सुमहाभागं वृषसेनं च मानिनम् । एकलव्यं च विक्रान्तं कालिङ्गं च महारथम् ॥ अतिक्रम्य महावीर्यं किं प्रशंससि केशवम् २१ शल्यादीनपि कस्मात्त्वं न स्तौषि वसुधाधिपान् । स्तवाय यदि ते बुद्धिर्वर्तते भीष्म सर्वदा २२ किं हि शक्यं मया कर्तुं यद्वृद्धानां त्वया नृप । पुरा कथयतां नूनं न श्रुतं धर्मवादिनाम् २३ आत्मनिन्दात्मपूजा च परनिन्दा परस्तवः । अनाचरितमार्याणामिति ते भीष्म न श्रुतम् २४ यदस्तव्यमिमं शश्वन्मोहात्संस्तौषि भक्तितः । केशवंतच्च ते भीष्म न कश्चिदनुमन्यते २५ कथं भोजस्य पुरुषे वर्गपाले दुरात्मनि । समावेशयसे सर्वं जगत्केवलकाम्यया २६ अथ चैषा न ते बुद्धिः प्रकृतिं याति भारत । मयैव कथितं पूर्वं भूलिङ्गशकुनिर्यथा २७ भूलिङ्गशकुनिर्नाम पार्श्वे हिमवतः परे । भीष्म तस्याः सदा वाचः श्रूयन्ते-

---

देशाधिपति जयत्सेन १९, उभयतां विराट व द्रुपद, महाबलाढ्य शकुनि, अवंतीदेशाधिपति विंद व अनुविंद सर्वोत्कृष्ट पांड्यदेशाधिपति श्वेतराजा २०, महाभाग्यवान् शंख, मानी वृषसेन, पराक्रमी एकलव्य आणि महारथी व महावीर्यवान् कलिंग देशाचा अधिपति ह्यांना सोडून तूं केशवाची स्तुति कां करीत असतोस ? २१. हे भीष्मा, लोकांची स्तुति करण्याकडेच जर सर्वदां तुझ्या बुद्धीचा कल असेल तर शल्यप्रभृति भूपतींची तरी तूं स्तुति कां करीत नाहींस ? २२. (तूं मलाच दोष देत आहेस. परंतु) हे नृपा, ह्यापूर्वी धर्मवेत्त्या वृद्धांच्या तोंडून तूं कांहीं ऐकिलेंच नाहींस ह्याला मीं काय करावें ? २३. हे भीष्मा, आत्मस्तुति व आत्मनिंदा आणि त्याचप्रमाणें परस्तुति व परनिंदा हीं चारी सभ्य लोक करीत नसतात हें तूं कधीं श्रवण केलेलेंच नाहींस २४. अरे, स्तुतीस अपात्र अशा केशवाची तूं अज्ञानामुळें नेहमीं भक्तिपूर्वक स्तुति करीत असतोस. परंतु, हे भीष्मा, तुझ्या त्या करण्याला कोणीही अनुमोदन देत नाहीं २५. अरे, केवळ आपलीं कांहीं हेतु साधण्याकरितां तूं भोजदेशाधिपति कंसाचा जो यःकश्चित् गुरें राखणारा दास त्या दुरात्म्याचे ठिकाणीं तूं आपला सर्व जगताचा समावेश कसा करीत आहेस (ह्मणजे सर्व जगताला तोच कारण असल्याचें कसें ह्मणत आहेस) ? २६. तेव्हां (ह्या गोष्टींचा विचार केला असतां) तुझी ही बुद्धि जातीवर जात नाहीं कां ? अरे, भूलिंगनामक पक्ष्याप्रमाणें प्राणी आपल्या जातीवर जायचेच हें मीं तुला पूर्वीच सांगितलें आहे २७. हे भीष्मा, हिमालयपर्वताच्या पश्चिम बाजूस भूलिंग ह्मणून एक पक्षी असतो व ज्यांतील अर्थ कृतीशीं विरुद्ध असल्यामुळें अप्रशस्त

र्थविगर्हिता: २८ मा साहसमितीदं सा सततं वाशते किल । साहसं चात्मनातीव चरन्ती नावबुध्यते २९ सा हि मांसार्गलं भीष्म मुखात्सिंहस्य खादतः । दन्तान्तरविलग्नं यत्तदादत्तेल्पचेतना ३० इच्छतः सा हि सिंहस्य भीष्म जीवत्यसंशयम् । तद्वत्त्वमप्यधर्मिष्ठ सदा वाचः प्रभाषसे ३१ इच्छतां भूमिपालानां भीष्म जीवस्यसंशयम् । लोकविद्विष्टकर्मा हि नान्योस्ति भवता समः ३२ वैशम्पायन उवाच ॥ ततश्चेदिपतेः श्रुत्वा भीष्मः स कटुकं वचः । उवाचेदं वचो राजंश्चेदिराजस्य शृण्वतः ३३ इच्छतां किल नामाहं जीवाम्येषां महीक्षिताम् । सोहं न गणयाम्येतांस्तृणेनापि नराधिपान् ३४ एवमुक्ते तु भीष्मेण ततः संचुक्रुशुर्नृपाः । केचिज्जहृषिरे तत्र केचिद्भीष्मं जगर्हिरे ३५ केचिदूचुर्महेष्वासाः श्रुत्वा भीष्मस्य तद्वचः । पापोवलिप्तो वृद्धश्च नायं भीष्मोर्हति क्षमाम् ३६ हन्यतां दुर्मतिर्भीष्मः पशुवत्साध्वयं नृपाः । सर्वैः समेत्य संरब्धो दह्यतां वा कटाग्निना ३७ इति तेषां वचः श्रुत्वा ततः कुरुपितामहः । उवाच मति-

---

आहे अशी त्या पक्ष्याचीं भाषणें सर्वदां ऐकण्यांत येत असतात २८. "साहस करूं नका; साहस करूं नका" असे हे शब्द तो पक्षी खरोखर नेहमीं उच्चारीत असतो आणि स्वतः पराकाष्ठेचें साहस करीत असतांना तें त्याच्या लक्ष्यांतही येत नाहीं २९. कारण, हे भीष्मा, खातां खातां अडकून राहिलेला मांसाचा तुकडा सिंहाच्या दाढेंतून तो अविचारी पक्षी नेहमीं घेऊन जात असतो ३०. तात्पर्य, हे भीष्मा, ज्याप्रमाणें त्या पक्ष्याचें जीवन निःसंशय सिंहाच्या इच्छेवरच अवलंबून आहे त्याचप्रमाणें हे अधर्मिष्ठा, सर्वदां (स्वकृतीच्या विरुद्ध) भाषा बोलत असलेल्या ३१ तुझेंही जीवित निःसंशय भूपालांच्याच इच्छेवर अवलंबून आहे. खरोखर, तुझ्यासारिखा लोकनिंद्य कर्म करणारा कोणीही नाहीं ३२. वैशंपायन सांगतातः—हे जनमेजय राजा, ह्याप्रमाणें चेदिराजानें केलेलें तें मर्मभेदक भाषण श्रवण करून तो चेदिराज ऐकत असतांनाच भीष्म ह्मणाले ३३ "होय. मी खरोखर ह्या राजांच्या इच्छेमुळेंच जिवंत राहिलों आहें. परंतु, तो मी ह्या राजांना एका कसपटासमान देखील मानीत नाहीं" ३४. ह्याप्रमाणें भीष्मांनीं भाषण केलें असतां कांहीं राजे फारच क्रुद्ध झाले, कांहीं आनंदित झाले आणि कांहीं भीष्मांची निंदा करूं लागले ३५. भीष्मांचें तें भाषण श्रवण करून कांहीं महाधनुर्धारी भूपति ह्मणाले "अरे, गर्वानें चढून गेलेला हा पापी वृद्ध भीष्म क्षमेस पात्र नाहीं ३६. नृप हो, ह्या दुर्मति भीष्माला पशूप्रमाणें खुशाल मारून टाका अथवा सर्वांनीं मिळून ह्या मस्त झालेल्याला तृणाग्नीनें दग्ध करून टाका" ३७. ह्याप्रमाणें

मान्भीष्मस्तानेव वसुधाधिपान् ३८ उक्तस्योक्तस्य नेहान्तमहं समुपलक्षये । यत्तु वक्ष्यामि तत्सर्वं शृणुध्वं वसुधाधिपाः ३९ पशुवद्धातनं वा मे दहनं वा कटाग्निना । क्रियतां मूर्ध्नि वो न्यस्तं मयेदं सकलं पदम् ४० एष तिष्ठति गोविन्दः पूजितोस्माभिरच्युतः । यस्य वा त्वरते बुद्धिर्मरणाय स माधवम् ४१ कृष्णमाह्वयतामद्य युद्धे चक्रगदाधरम् । यावदस्यैव देवस्य देहं विशतु पातितः ४२ [१५८९] इतिश्रीमहाभारते० वैयासिक्यां सभापर्वणि शिशुपालवधपर्वणि भीष्मवाक्ये चतुश्चत्वारिंशोध्यायः ॥ ४४ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततः श्रुत्वैव भीष्मस्य चेदिराडुरुविक्रमः । युयुत्सुर्वासुदेवेन वासुदेवमुवाच ह १ आह्वये त्वां रणं गच्छ मया सार्धं जनार्दन । यावदद्य निहन्मि त्वां सहितं सर्वपाण्डवैः २ सह त्वया हि मे वध्याः सर्वथा कृष्ण पाण्डवाः । नृपतीन्समतिक्रम्य यैरराजा त्वमर्चितः ३ ये त्वां दासमराजानं बाल्यादर्चन्ति दुर्मतिम् । अनर्हमर्हवत्कृष्ण वध्यास्त

त्यांचें भाषण श्रवण केल्यावर कुरुपितामह विचारी भीष्म त्याच राजांना उद्देशून ह्मणाले ३८ " (उत्तरास प्रत्युत्तर ह्याप्रमाणें) फिरून फिरून बोलणें चालविलें असतां तें ह्मणजे ह्या ठिकाणीं संपेल असें मला वाटत नाहीं. तेव्हां, हे नृपहो, मी जें आतां (एकदांच) सांगतों तें सर्व, तुह्मी श्रवण करा ३९. माझा पशूप्रमाणें वध होवो किंवा तृणाग्नीच्या योगानें माझें दहन होवो; मी हा आपला पाय पूर्णपणें तुमच्या मस्तकावर ठेवून येथें उभा राहिलों आहे ४० आणि आह्मीं अग्रपूजा केलेला हा गोविंदही ह्या ठिकाणीं उभा आहे. तेव्हां, ज्याचें मन मृत्यूकडे धांव घेत असेल त्यानें ह्या चक्रपाणि व गदापाणि लक्ष्मीपति श्रीकृष्णाला आज युद्धार्थ आव्हान करावें आणि ह्या कृष्णाच्या हातून वध पावून ह्या देवाच्याच देहामध्यें त्यानें प्रविष्ट व्हावें ४१, ४२. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील शिशुपालवधपर्वांपैकीं भीष्मांच्या भाषणाविषयीं चवेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४४ ॥

वैशंपायन सांगतातः—भीष्मांचें भाषण श्रवण केल्याबरोबर महापराक्रमी चेदिराज शिशुपाल श्रीकृष्णांशीं युद्ध करण्याच्या उद्देशानें त्यांना ह्मणाला १ " हे जनार्दना, मी तुला आव्हान करितों. माझ्यासहवर्तमान तूं संग्राम कर. ह्मणजे आज एकदां सर्व पांडुपुत्रांसहवर्तमान तुझा वध तर करून टाकितों २. हे कृष्णा, भूपतींचा अपमान करून तूं राजा नसतांनाही ज्यांनीं तुझी अग्रपूजा केली त्या पांडवांचाही मला तुझ्यासहवर्तमान वध करणें सर्वथा अवश्यच आहे ३. हे कृष्णा, राजा नव्हेस इतकेंच नव्हे परंतु, दास आणि ह्मणूनच पूजनास अपात्र असलेल्या तुज दुर्मतीचें जे

इति मे मतिः ४ इत्युक्त्वा राजशार्दूलस्तथौ गर्जन्नमर्षणः ५ एवमुक्ते ततः कृष्णो मृदुपूर्वमिदं वचः । उवाच पार्थिवान्सर्वान्स समक्षं च वीर्यवान् ६ एष नः शत्रुरत्यन्तं पार्थिवाः सात्वतीसुतः । सात्वतानां नृशंसात्मा न हितोनपकारिणाम् ७ प्राग्ज्योतिषपुरं यातानस्माञ्ज्ञात्वा नृशंसकृत् । अदहद्द्वारकामेष स्वस्रीयः सन्नराधिपाः ८ क्रीडतो भोजराजस्य एष रैवतके गिरौ । हत्वा बद्ध्वा च तान्सर्वानुपायात्स्वपुरं पुरा ९ अश्वमेधे हयं मेध्यमुत्सृष्टं रक्षिभिर्वृतम् । पितुर्मे यज्ञविघ्नार्थमहरत्पापनिश्चयः १० सौवीरान्प्रतियातां च बभ्रोरेष तपस्विनः । भार्यामभ्यहरन्मोहादकामां तामितोगताम् ११ एष मायाप्रतिच्छन्नः करूषार्थे तपस्विनीम् । जहार भद्रां वैशालीं मातुलस्य नृशंसकृत् १२ पितृष्वसुः कृते दुःखं सुमहन्मर्षयाम्यहम् । दिष्ट्या हीदं सर्वराज्ञां संनिधावद्य वर्तते १३ पश्यन्ति हि भवन्तोद्य मय्यतीव व्यतिक्रमम् । कृतानि तु परोक्षं मे यानि तानि निबोधत १४

पूज्य समजून मूर्खपणामुळें पूजन करीत असतात त्यांचा वध केलाच पाहिजे असा माझा निश्चयच झाला आहे ” ४. असें बोलून तो क्रुद्ध नृपश्रेष्ठ गर्जना करीतच उभा राहिला ५. तेव्हां ह्याप्रमाणें तो बोलल्यानंतर वीर्यवान् श्रीकृष्ण मृदु वाणीनें त्या शिशुपालासमक्ष सर्व राजांना ह्मणाले ६ “ हे नृपहो, यादवकुळांतीलच स्त्रीचे ठिकाणीं उत्पन्न झालेला आणि निरुपद्रवी यादवांच्याच अहितावर असलेला हा दुष्ट आमचा अत्यंत शत्रु आहे ७. आह्मी प्राग्ज्योतिषनगराला गेलों आहोंत असें समजून हे नराधिप हो, यादवांचा प्रत्यक्ष भाचा असतांना ह्या दुष्टानें द्वारका दग्ध केली ८. रैवतक पर्वतावर भोजराजा क्रीडा करीत असतांना हा त्या सर्वांचा वध करून आपल्या नगराप्रत परत गेला ९. अश्वमेध यागाकरितां रक्षक बरोबर देऊन सोडिलेला पवित्र अश्व माझ्या पित्याच्या यज्ञाला विघ्न आणण्याकरितां ह्या दुर्मति शिशुपालानें बुद्ध्या हरण केला १०. बिचाऱ्या बभ्रुनामक यादवाची भार्या (विवाहसमयीं) येथून निघून सौवीर देशाला चालली असतांना ह्यानें मूर्खपणा करून ती निरिच्छ असतांही हरण केली ११ व त्याचप्रमाणें प्रत्यक्ष आपल्या मातुलाशीं दुष्टपणा करणाऱ्या ह्या शिशुपालानें विशालानामक राजाची भद्रानामक कन्या करूषदेशाच्या राजाला दिली असतांना कपटानें त्या करूषराजाचा वेष धारण करून त्या बिचारीला हरण करून नेली १२. परंतु, हें अत्यंत दुःसह दुःख मी आपल्या पितृभगिनीकरितां आजपर्यंत सहन करीत आहें. असो. आजचें हें ह्याचें माझ्या विरुद्ध चाललेलें वर्तन सर्व राजांच्या समक्षच चाललें आहे हें खरोखर फार चांगलें झालें १३. सारांश, माझ्यासंबंधानें चाललेलें हें ह्याचें

इमं त्वस्य न शक्ष्यामि क्षन्तुमद्य व्यतिक्रमम् । अवलेपाद्वधार्हस्य समग्रे
राजमण्डले १५ रुक्मिण्यामस्य मूढस्य प्रार्थनासीन्मुमूर्षतः । न च तां
प्राप्तवान्मूढः शूद्रो वेदश्रुतीमिव १६ वैशम्पायन उवाच ॥ एवमादि ततः
सर्वे सहितास्ते नराधिपाः । वासुदेववचः श्रुत्वा चेदिराजं व्यगर्हयन् १७
तस्य तद्वचनं श्रुत्वा शिशुपालः प्रतापवान् । जहास स्वनवद्धासं वाक्यं
चेदमुवाच ह १८ मत्पूर्वां रुक्मिणीं कृष्ण संसत्सु परिकीर्तयन् । विशेषतः
पार्थिवेषु व्रीडां न कुरुषे कथम् १९ मन्यमानो हि कः सत्सु पुरुषः
परिकीर्तयेत् । अन्यपूर्वां स्त्रियं जातु त्वदन्यो मधुसूदन २० क्षम वा
यदि ते श्रद्धा मा वा कृष्ण मम क्षम । क्रुद्धाद्वापि प्रसन्नाद्वा किं मे
त्वत्तो भविष्यति २१ तथा ब्रुवत एवास्य भगवान्मधुसूदनः । मनसाचि-
न्तयच्चक्रं दैत्यगर्वनिषूदनम् २२ एतस्मिन्नेव काले तु चक्रे हस्तगते सति।
उवाच भगवानुच्चैर्वाक्यं वाक्यविशारदः २३ शृण्वन्तु मे महीपाला येनै-

---

अत्यंत उद्दामपणाचें वर्तन तुह्मीं पहातच आहांत. असो. तुमच्या परोक्ष ह्यानें जीं कांहीं माझ्याविरुद्ध कृत्यें केलीं तीं मीं तुह्मांला सांगितलीं १४. परंतु, माझ्या हातून वध होण्यासच योग्य असलेल्या ह्या शिशुपालानें आज जो संपूर्ण राजमंडलामध्यें गर्वानें हा माझा अपमान केला तो मात्र माझ्यानें सहन करवतच नाहीं १५. अहो, मृत्यूकडे धांव घेणाऱ्या ह्या मूढाची रुक्मिणीला वरण्याविषयीं इच्छा होती, परंतु, वेदाचें श्रवण देखील ज्याप्रमाणें शूद्राला प्राप्त होत नाहीं त्याप्रमाणें ह्या (अनधिकारी) मूढाला ती प्राप्त झाली नाहीं १६. वैशंपायन सांगतातः— हें व अशाप्रकारचें श्रीकृष्णांचें भाषण श्रवण करून ते सर्व राजे एकदम चेदिराज शिशुपालाची निंदा करूं लागले १७. परंतु, (तिकडे लक्ष्य न देतां) प्रतापी शिशुपाल त्या श्रीकृष्णांचें तें भाषण श्रवण केल्याबरोबर उच्चस्वरानें हंसला आणि ह्मणाला १८ "हे कृष्णा, रुक्मिणी पूर्वी माझी होती हें भर राजसभेमध्यें सांगतांना आणि विशेषतः राजांमध्यें सांगतांना तुला लाज कशी वाटत नाहीं ? १९. अरे, मधुसूदना, आपण वरिलेली स्त्री पूर्वी दुसऱ्यानें वरिली होती असें तुझ्यावांचून कोणता तरी दुसरा अब्रूची चहाड असलेला पुरुष कधीं तरी लोकांना सांगत बसेल काय? २०. हे कृष्णा, तुला वाटत असल्यास माझी क्षमा कर किंवा करूं नको. (मला त्याची मुळींच परवा नाहीं) कारण, तूं क्रुद्ध झालास किंवा प्रसन्न झालास तरी तुझ्या हातून माझें होणार आहे काय? २१. ह्याप्रमाणें हा शिशुपाल बोलत असतांनाच भगवान् श्रीकृष्णांनीं दैत्यसमूहनाशक सुदर्शनचक्राचें स्मरण केलें २२ आणि तत्क्षणींच तें चक्र हस्तगत झालें असतां संभाषण करण्यामध्यें निपुण असलेले ते भगवान् श्रीकृष्ण

तत्क्षमितं मया । अपराधशतं क्षाम्यं मातुरस्यैव याचने २४ द्
याचितं च तद्धै पूर्णं हि पार्थिवाः । अधुना वधयिष्यामि पश्य
महीक्षिताम् २५ एवमुक्त्वा यदुश्रेष्ठश्चेदिराजस्य तत्क्षणात् । व्य
च्छिरः क्रुद्धश्चक्रेणामित्रकर्षणः ॥ स पपात महाबाहुर्वज्राहत इवाचल
ततश्चेदिपतेर्देहात्तेजोऽग्र्यं ददृशुर्नृपाः । उत्पतन्तं महाराज गगनादिव
रम् २७ ततः कमलपत्राक्षं कृष्णं लोकनमस्कृतम् । ववन्दे तत्तदा
विवेश च नराधिप २८ तदद्भुतममन्यन्त दृष्ट्वा सर्वे महीक्षितः । य
महाबाहुं तत्तेजः पुरुषोत्तमम् २९ अनभ्रे प्रववर्ष द्यौः पप
शनिः । कृष्णेन निहते चैद्ये चचाल च वसुन्धरा ३० ततः के
नाब्रुवंस्तत्र किंचन । अतीतवाक्पथे काले प्रेक्षमाणा जनार्दन
हस्ताग्रमपरे प्रत्यपिंषन्नमर्षिताः।अपरे दशनैरोष्ठानदशन्क्रोध
रहश्च केचिद्वार्ष्णेयं प्रशशंसुर्नराधिपाः । केचिदेव सुसंरब्धा

म्हणाले २३ " मी काय म्हणत आहें हें सर्व भूपालांनीं श्रवण करावें.
प्रार्थना केल्यावरून मला ह्याचे शंभर अपराध सहन करावयाचे होते
केले. २४ हे नृपहो, ह्याच्या मातेला जो मीं (ह्याचे शंभर अपराध क्ष
वर दिला होता तो पूर्ण होऊन गेला. तेव्हां आतां, तुमच्या समक्ष
करितों " २५. ह्याप्रमाणें राजांना सांगितल्यानंतर क्रुद्ध झालेल्या शत्रु
श्रेष्ठ श्रीकृष्णांनीं तत्क्षणीं सुदर्शन चक्राच्या योगानें चेदिराजाचें
तेव्हां वज्राचा आघात झालेल्या पर्वताप्रमाणें तो महापराक्रमी शिशुपा
पडला २६. हे जनमेजय महाराजा, खालीं पडल्यानंतर आकाशांतून
कीं काय अशारीतीनें त्या चेदिराज शिशुपालाच्या देहांतून एक
बाहेर येतांना भूपतींनीं पाहिलें २७. देहांतून बाहेर निघाल्यानंतर, हे
जगद्वंद्य कमलनयन श्रीकृष्णाला वंदन करून तें तेज तत्क्षणींच
ठिकाणीं प्रविष्ट झालें २८. महापराक्रमी श्रीकृष्णाचे ठिकाणीं तें
हें पाहून सर्व राजांना ती एक अद्भुत गोष्ट वाटली २९. असो. ह्याप्र
चेदिराज शिशुपालाचा वध केला असतां मेघावांचून पर्जन्य वृष्टि झाली;
पडूं लागल्या आणि पृथ्वी कंपित झाली ३०. तेव्हां त्या अनिर्वचनीय
भूपति चकारशब्दही न उच्चारितां श्रीकृष्णाला अवलोकन करीत स्त
कांहीं राजे क्रोधानें अगदीं व्याप्त होऊन हात चोळूं लागले; कांहीं
लागले ३२; कांहीं भूपाल मनामध्यें वृष्णिकुलोत्पन्न श्रीकृष्णांची प्रशं

३३ प्रहृष्टाः केशवं जग्मुः संस्तुवन्तो महर्षयः । ब्राह्मणाश्च
नः पार्थिवाश्च महाबलाः ३४ शशंसुर्निर्वृताः सर्वे दृष्ट्वा कृष्णस्य
म् । पाण्डवस्त्वब्रवीद्भ्रातॄन्सत्कारेण महीपतिम् ३५ दमघोषात्मजं
संस्कारयत मा चिरम् । तथा च कृतवन्तस्ते भ्रातुर्वै शासनं तदा ३६
मााधिपत्ये च पुत्रमस्य महीपतेः । अभ्यषिञ्चत्तदा पार्थः सह तैर्वसु-
ः ३७ ततः स कुरुराजस्य क्रतुः सर्वसमृद्धिमान् । यूनां प्रीतिकरो
बभौ विपुलौजसः ३८ शान्तविघ्नः सुखारम्भः प्रभूतधनधान्य-
ान्बहुभक्षश्च केशवेन सुरक्षितः ३९ समापयामास च तं राज-
म् ४० तं तु यज्ञं महाबाहुरासमाप्तेर्जनार्दनः । ररक्ष भगवा-
चक्रगदाधरः ४१ ततस्त्ववभृथस्नातं धर्मात्मानं युधिष्ठिरम् ।
र्वं क्षत्रमुपागम्येदमब्रवीत् ४२ दिष्ट्या वर्धसि धर्मज्ञ साम्राज्यं
आजमीढाजमीढानां यशः संवर्धितं त्वया ४३ कर्मणैतेन

ांतल्या आंतच जळफळूं लागले आणि कांहीं नृपति उदासीन
नंतर महर्षि स्तुति करीत करीत केशवासमीप गेले आणि महात्मे
महाबलाढ्य भूपति ह्यांनींही तोच मार्ग स्वीकारिला ३४. सारांश,
रूप पराक्रम अवलोकन करून प्रायः सर्वजन सुखी झाले आणि
ंसा करूं लागले. हे जनमेजयराजा, तदनंतर " दमघोषपुत्र वीर शिशु-
कारपूर्वक और्ध्वदेहिक संस्कार करा; विलंब लावूं नका " असें पांडुपुत्र
यांना सांगितलें असतां त्यांनींही आपल्या ज्येष्ठ भ्रात्यांच्या आज्ञेप्र-
५,३६ त्याप्रमाणें झाल्यानंतर कुंतीपुत्र युधिष्ठिरानें त्या तेथें जमलेल्या सर्व
न शिशुपालाच्या पुत्राला चेदिदेशविषयक राज्याचा अभिषेक केला ३७.
नमेजयराजा, विपुल धनधान्य–समृद्ध भक्ष्यपदार्थ आणि अन्न ह्यांनीं
सर्वप्रकारच्या समृद्धींनीं संपन्न, सुखानें सुरू झालेला आणि श्रीकृष्णांनीं
ामुळें आलेलें विघ्नही टळलेला अशा त्या महाप्रभावी युधिष्ठिररा-
क्रतु तरुण पुरुषांनाही आनंदकारक झाला ३८,३९ व युधिष्ठिरानें
हाक्रतूची समाप्तिही केली ४०. (हे जनमेजयराजा) शार्ङ्ग धनुष्य,
व कौमोदकी गदा धारण करणारा असा जो शूरकुलामध्यें अवतीर्ण
क्रमी भगवान् जनार्दन त्यानें समाप्तीपर्यंत त्या यज्ञाचें संरक्षण केलें ४१.
ठलेले सर्व भूपति क्षत्रिय अवभृथस्नान केलेल्या धर्मात्म्या युधिष्ठिरा-
णाले ४२ " हे धर्मवेत्त्या, तुला सार्वभौमत्व प्राप्त झालें असून तुझा

राजेन्द्र धर्मश्च सुमहान्कृतः । आपृच्छामो नरव्याघ्र सर्वकामैः सुपूजिताः ४४ स्वराष्ट्राणि गमिष्यामस्तदनुज्ञातुमर्हसि । श्रुत्वा तु वचनं राज्ञां धर्मराजो युधिष्ठिरः ४५ यथार्हं पूज्य नृपतीन्भ्रातॄन्सर्वानुवाच ह । राजानः सर्व एवैते प्रीत्यास्मान्समुपागताः ४६ प्रस्थिताः स्वानि राष्ट्राणि मामापृच्छ्य परंतपाः । तेनव्रजत भद्रं वो विषयान्तं नृपोत्तमान् ४७ भ्रातुर्वचनमाज्ञाय पाण्डवा धर्मचारिणः । यथार्हं नृपतीन्सर्वानेकैकं समनुव्रजन् ४८ विराटमन्वयात्तूर्णं धृष्टद्युम्नः प्रतापवान् । धनंजयो यज्ञसेनं महात्मानं महारथम् ४९ भीष्मं च धृतराष्ट्रं च भीमसेनो महाबलः । द्रोणं तु ससुतं वीरं सहदेवो युधां पतिः ५० नकुलः सुबलं राजन्सहपुत्रं समन्वयात् । द्रौपदेयाः ससौभद्राः पार्वतीयान्महारथान् ५१ अन्वगच्छंस्तथैवान्यान्क्षत्रियान्क्षत्रियर्षभाः । एवं सुपूजिताः सर्वे जग्मुर्विप्राः सहस्रशः ५२ गतेषु

अभ्युदय होत आहे ही फार चांगली गोष्ट आहे. हे आजमीढ, अजमीढवंशजांची कीर्ति खरोखर तूं वृद्धिंगत केली असून ४३ हे नृपश्रेष्ठा, ह्या यज्ञकर्मानें, तूं पुण्यही फारच मोठें संपादन केलें आहेस आणि आमच्याही सर्व इच्छा परिपूर्ण करून तूं उत्तम प्रकारें आमचा आदर सत्कार केलेला आहेस. हे पुरुषश्रेष्ठा, आतां तुझी अनुज्ञा घेऊन ४४ आह्मी स्वराष्ट्रांत परत जाणार आहोंत. करितां, तूं आह्मांला जाण्याची अनुज्ञा दे. " हें राजांचें भाषण श्रवण केल्यावर धर्मराज युधिष्ठिरानें ४५ योग्यतेप्रमाणें त्या राजांचें पूजन केलें आणि आपल्या सर्व कनिष्ठ भ्रात्यांना तो ह्मणाला " हे सर्व राजे प्रेमानें आपणांकडे आलेले आहेत ४६ व आतां मला विचारून हे महापराक्रमी आपआपल्या राष्ट्रांना परत जाण्याकरितां निघाले आहेत. करितां, ह्या श्रेष्ठ राजांना देशाच्या सीमेपर्यंत तुह्मी पोंचविण्यास जा. ह्यांत तुमचें कल्याण आहे ४७. ह्याप्रमाणें भ्रात्यानें केलेली आज्ञा समजून घेऊन ते धर्माचरणी पांडुपुत्र योग्यतेप्रमाणें एकेकजण सर्व राजांना पोंचविण्याकरितां गेले ४८. प्रतापी धृष्टद्युम्न सत्वर विराटराजाबरोबर गेला; महात्म्या महारथी द्रुपदाच्या मागोमाग अर्जुन चालता झाला ४९; भीष्म व धृतराष्ट्र ह्यांना पोंचविण्याकरितां महाबलाढ्य भीमसेन गेला; वीरनायक सहदेव पुत्रासह असलेल्या वीर द्रोणाचार्यांसहवर्तमान गेला ५०; हे जनमेजय राजा, नकुलानें पुत्रासहवर्तमान निघालेल्या सुबल राजाला पोंचवून दिलें; सुभद्रेच्या पुत्रासह द्रौपदीचे पुत्र महारथी पर्वतप्रदेशाधिपतींबरोबर गेले ५१ आणि त्याचप्रमाणें इतरही क्षत्रियांना पांडवांकडील मुख्य मुख्य क्षत्रियांनीं पोंचवून दिलें. ह्याचप्रमाणें उत्तमप्रकारें आदरसत्कार झाल्यावर सर्व हजारों विप्रही स्वस्थानीं परत गेले ५२. असो. सर्व

पार्थिवेन्द्रेषु सर्वेषु ब्राह्मणेषु च । युधिष्ठिरमुवाचेदं वासुदेवः प्रतापवान् ५३ आपृच्छे त्वां गमिष्यामि द्वारकां कुरुनन्दन । राजसूयं क्रतुश्रेष्ठं दिष्ट्या त्वं प्राप्तवानसि ५४ तमुवाचैवमुक्तस्तु धर्मराजो जनार्दनम् । तव प्रसादाद्गोविन्द प्राप्तः क्रतुवरो मया ५५ क्षत्रं समग्रमपि च त्वत्प्रसादाद्वशे स्थितम् । उपादाय बलिं मुख्यं मामेव समुपस्थितम् ५६ कथं त्वद्गमनार्थं मे वाणी वितरतेऽनघ । न ह्यहं त्वामृते वीर रतिं प्राप्नोमि कर्हिचित् ५७ अवश्यं चैव गन्तव्या भवता द्वारकापुरी । एवमुक्तः स धर्मात्मा युधिष्ठिरसहायवान् ५८ अभिगम्याब्रवीत्प्रीतः पृथां पृथुयशा हरिः । साम्राज्यं समनुप्राप्ताः पुत्रास्तेऽद्य पितृष्वसः ५९ सिद्धार्था वसुमन्तश्च सा त्वं प्रीतिमवाप्नुहि । अनुज्ञातस्त्वया चाहं द्वारकां गन्तुमुत्सहे ६० सुभद्रां द्रौपदीं चैव सभाजयत केशवः । निष्क्रम्यान्तःपुरात्तस्माद्युधिष्ठिरसहायवान् ६१ स्नातश्च कृतजप्यश्च ब्राह्मणान्स्वस्ति वाच्य च । ततो मेघवपुःप्रख्यं स्यन्दनं च सुकल्पितम् ६२ योजयित्वा महाबाहुर्दारुकः समुपस्थितः ।

मुख्य मुख्य राजे आणि ब्राह्मण परत गेल्यानंतर "हे कुरुनंदना, सुदैवानें एकदा राजसूयनामक श्रेष्ठ क्रतु तुझ्या हातून शेवटास गेला. आतां मी तुझा निरोप घेऊन द्वारकेस जातों" असें प्रतापी श्रीकृष्ण युधिष्ठिराला ह्मणाले ५३, ५४. तेव्हां ह्याप्रमाणें श्रीकृष्णांनीं ह्मटल्यावर धर्मराज त्यांना ह्मणाला "हे गोविंदा, तुझ्या कृपेमुळें माझ्या हातून हा श्रेष्ठ क्रतु शेवटास गेला ५५; तुझ्याच कृपेमुळें संपूर्ण राजे वश झाले आणि मलाच सार्वभौम समजून ते माझ्याकडे करभार घेऊन आले ५६. तस्मात्, हे निष्पापा, तुझ्या गमनाविषयीं माझी जिव्हा वदण्यास समर्थ कशी होईल ? हे वीरा, तुझ्या वांचून मला कांहीं क्षणभरही सुचावयाचें नाहीं ५७. परंतु, तुला तर द्वारका नगरीस जाणें अवश्य आहे." ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें सांगितलें असतां ते महाकीर्तिमान् व धर्मस्वरूप श्रीहरि युधिष्ठिराला बरोबर घेऊन आनंदानें कुंतीकडे आले आणि तिला ह्मणाले "हे पितृभगिनि, तुझ्या पुत्रांना सार्वभौमत्व प्राप्त होऊन ५८, ५९ ते आज कृतकृत्य व वैभवसंपन्न झाले आहेत. तेव्हां तूं आनंद मान. तुझी अनुज्ञा घेऊन आतां माझ्या मनांत द्वारकेस जाण्याचें आहे" ६०. ह्याप्रमाणें कुंतीला भेटल्यानंतर श्रीकृष्णांनीं (विचारपूस करून) सुभद्रा आणि द्रौपदी ह्यांनाही आनंदित केलें आणि युधिष्ठिराबरोबर ते त्या अंतःपुरांतून बाहेर पडले ६१. तदनंतर स्नान व जपजाप्य आटोपून त्यांनीं ब्राह्मणांकडून स्वस्तिवाचन करविलें तों इतक्यांत उत्तम प्रकारच्या साहित्यानें युक्त असलेला मेघसदृश रथ ६२ जोडून महापराक्रमी दारुक सारथि द्वाराशीं घेऊन ठेपला.

उपस्थितं रथं दृष्ट्वा तार्क्ष्यप्रवरकेतनम् ६३ प्रदक्षिणमुपावृत्य समारुह्य महामनाः । प्रययौ पुण्डरीकाक्षस्ततो द्वारवतीं पुरीम् ६४ तं पद्भ्यामनुवव्राज धर्मराजो युधिष्ठिरः । भ्रातृभिः सहितः श्रीमान्वासुदेवं महाबलम् ६५ ततो मुहूर्तं संगृह्य स्यन्दनप्रवरं हरिः । अब्रवीत्पुण्डरीकाक्षः कुन्तीपुत्रं युधिष्ठिरम् ६६ अप्रमत्तः स्थितो नित्यं प्रजाः पाहि विशांपते । पर्जन्यमिव भूतानि महाद्रुममिव द्विजाः ६७ बान्धवास्त्वोपजीवन्तु सहस्राक्षमिवामराः । कृत्वा परस्परेणैवं संविदं कृष्णपाण्डवौ ६८ अन्योन्यं समनुज्ञाप्य जग्मतुः स्वगृहान्प्रति । गते द्वारवतीं कृष्णे सात्वतप्रवरे नृप ६९ एको दुर्योधनो राजा शकुनिश्चापि सौबलः । तस्यां सभायां दिव्यायामूषतुस्तौ नरर्षभौ ७० [१६५९] इति० सभापर्वणि शिशुपालवधपर्वणि शिशुपालवधे पञ्चचत्वारिंशोध्यायः॥४५॥समाप्तं च शिशुपालवधपर्व॥

अथ द्यूतपर्व ॥ वैशम्पायन उवाच ॥ समाप्ते राजसूये तु क्रतुश्रेष्ठे सुदुर्लभे। शिष्यैः परिवृतो व्यासः पुरस्तात्समपद्यत १ सोभ्ययादासनात्तूर्णं भ्रातृभिः

तेव्हां गरुडचिन्हांकित श्रेष्ठ ध्वजानें युक्त असलेला तो रथ तेथें आलेला अवलोकन केल्यावर ६३ महात्मे कमलनयन श्रीकृष्ण प्रदक्षिणापूर्वक त्या रथावर आरुढ होऊन द्वारकेस निघाले ६४. तेव्हां वैभवशाली धर्मराज युधिष्ठिर भ्रात्यांसहवर्तमान महाबलाढ्य वासुदेवांच्या मागोमाग पायांनीं जाऊं लागला असतां ६५ क्षणभर तो उत्कृष्ट रथ उभा करून कमलनयन श्रीहरि कुंतीपुत्र युधिष्ठिराला ह्मणाले ६६ "हे प्रजाधिपते, तूं नित्य दक्ष राहून प्रजांचें परिपालन करीत जा आणि प्राणी ज्याप्रमाणें उपजीविकेकरितां पर्जन्यावर अवलंबून असतात किंवा पक्षी ज्याप्रमाणें महावृक्षाच्या आश्रयाला राहतात ६७ अथवा देव ज्याप्रमाणें स्वर्गाधिपति इंद्राचा आश्रय करून असतात त्याप्रमाणें बांधव तुझ्यावर अवलंबून राहोंत." ह्याप्रमाणें ते उभयतां श्रीकृष्ण व युधिष्ठिर परस्परांशीं संभाषण करून ६८ व परस्परांचा निरोप घेऊन आपआपल्या गृहाप्रत जाण्यास निघाले. असो. हे जनमेजयराजा, यादवश्रेष्ठ श्रीकृष्णही द्वारवती नगरीस परत गेल्यानंतर ६९ एक दुर्योधन राजा आणि दुसरा सुबलपुत्र शकुनि (त्याचा मातुल) हे मात्र ह्मणण्यासारखे (परस्थांपैकीं) दोघेजण त्या दिव्य सभेमध्यें राहिले ७०. ह्याप्रमाणें० महाभारतांतर्गत सभापर्वांतील शिशुपालवधपर्वापैकीं शिशुपालवधाविषयीं पंचेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४५ ॥ ह्या ठिकाणीं शिशुपालवधविषयक पर्वही संपूर्ण झालें॥

येथून द्यूतसंबंधीं पर्वाला आरंभ झाला. वैशंपायन सांगतातः—होण्यास फारच दुर्घट असा राजसूय क्रतु समाप्त झाल्यावर शिष्यगणांनीं परिवेष्टित व्यासमुनि

परिवारितः। पाद्येनासनदानेन पितामहमपूजयत् २ अथोपविश्य भगवान्काञ्चने परमासने। आस्यतामिति चोवाच धर्मराजं युधिष्ठिरम् ३ अथोपविष्टं राजानं भ्रातृभिः परिवारितम्। उवाच भगवान्व्यासस्तत्तद्वाक्यविशारदः ४ दिष्ट्या वर्धसि कौन्तेय साम्राज्यं प्राप्य दुर्लभम्। वर्धिताः कुरवः सर्वे त्वया कुरुकुलोद्वह ५ आपृच्छे त्वां गमिष्यामि पूजितोऽस्मि विशांपते। एवमुक्तः स कृष्णेन धर्मराजो युधिष्ठिरः ६ अभिवाद्योपसंगृह्य पितामहमथाब्रवीत्। युधिष्ठिर उवाच॥ संशयो द्विपदां श्रेष्ठ ममोत्पन्नः सुदुर्लभः ७ तस्य नान्योस्ति वक्ता वै त्वामृते द्विजपुङ्गव। उत्पातांस्त्रिविधान्प्राह नारदो भगवानृषिः ८ दिव्यांश्चैवान्तरीक्षांश्च पार्थिवांश्च पितामह। अपि चैद्यस्य पतनाच्छन्नमौत्पातिकं महत् ९ वैशम्पायन उवाच॥ राज्ञस्तु वचनं श्रुत्वा पराशरसुतः प्रभुः। कृष्णद्वैपायनो व्यास इदं वचनमब्रवीत् १० त्रयोदश समा राजन्नुत्पातानां फलं महत्। सर्वक्षत्रविनाशाय भविष्यति विशांपते ११ त्वामेकं कारणं कृत्वा कालेन भरत-

---

पुढें आले असतां १ भ्रात्यांनीं परिवेष्टित असलेला तो युधिष्ठिर सत्वर आसनावरून उठला आणि पाद्यपूर्वक आसन देऊन त्यानें आपले पितामह जे व्यास मुनि त्यांचा आदरसत्कार केला २. तदनंतर सुवर्णमय उत्कृष्ट आसनावर विराजमान झाल्यानंतर भगवान् व्यासमहर्षींनीं "बैस" ह्मणून धर्मराजाला सांगितलें ३ आणि भ्रात्यांनीं परिवेष्टित असलेला तो धर्मराज युधिष्ठिर बसल्यानंतर संभाषण करण्यांत निपुण असलेले ते भगवान् व्यासमुनि त्याला ह्मणाले ४ "हे कुंतीपुत्रा, दुर्लभ असें साम्राज्य प्राप्त होऊन तुझा अभ्युदय होत आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. हे कुरुवंशजश्रेष्ठा, तूं खरोखर सर्व कुरुवंशजांची कीर्ति वृद्धिंगत केली आहेस ५. हे प्रजाधिपते, माझा सत्कार झाला आहे. करितां, मी आतां तुझी अनुज्ञा घेऊन गमन करितों." ह्याप्रमाणें व्यासमुनींनीं सांगितल्यानंतर धर्मराज युधिष्ठिर ६ अभिवंदनपूर्वक पितामह व्यासमुनींचें चरण धरून त्यांना ह्मणाला "हे पुरुषश्रेष्ठ, निवृत्त होण्यास फारच कठीण असा मला एक संशय उत्पन्न झाला आहे ७ व हे द्विजश्रेष्ठ, त्याचें निरसन करणारा आपणांवांचून दुसरा कोणीही नाहीं. हे पितामह, भगवान् नारदमुनींनीं स्वर्ग, अंतरिक्ष आणि पृथ्वी ह्यासंबंधाचे तीन प्रकारचे उत्पात सांगितले आहेत. तेव्हां चेदिराज शिशुपालाच्या मरणानेंच उत्पातसंबंधीं मोठें अरिष्ट टळलें कीं काय?" ८,९. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें युधिष्ठिरराजाचें भाषण श्रवण करून प्रभु पराशरपुत्र कृष्णद्वैपायन व्यास ह्मणाले १० "हे प्रजाधिपते युधिष्ठिरराजा, तेरा वर्षेंपर्यंत उत्पातांचें

र्षभ । समेतं पार्थिवं क्षत्रं क्षयं यास्यति भारत । दुर्योधनापराधेन भीमार्जुनबलेन च १२ स्वप्ने द्रक्ष्यसि राजेन्द्र क्षपान्ते त्वं वृषध्वजम् । नीलकण्ठं भवं स्थाणुं कपालिं त्रिपुरान्तकम् १३ उग्रं रुद्रं पशुपतिं महादेवमुमापतिम् । हरं शर्वं वृषं शूलं पिनाकिं कृत्तिवाससम् १४ कैलासकूटप्रतिमं वृषभेवस्थितं शिवम् । निरीक्षमाणं सततं पितृराजाश्रितां दिशम् १५ एवमीदृशकं स्वप्नं द्रक्ष्यसि त्वं विशांपते । मा तत्कृते ह्यनुध्याहि कालो हि दुरतिक्रमः १६ स्वस्ति तेस्तु गमिष्यामि कैलासं पर्वतं प्रति । अप्रमत्तः स्थितो दान्तः पृथिवीं परिपालय १७ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वा स भगवान्कैलासं पर्वतं ययौ । कृष्णद्वैपायनो व्यासः सह शिष्यैः श्रुतानुगैः १८ गते पितामहे राजा चिन्ताशोकसमन्वितः । निःश्वसन्नुष्णमसकृत्तमेवार्थं विचिन्तयन् १९ कथं तु दैवं शक्येत पौरुषेण प्रबाधितुम् । अवश्यमेव भविता यदुक्तं परमर्षिणा २० ततोब्रवीन्महातेजाः सर्वान्भ्रातॄन्युधिष्ठिरः । श्रुतं वै पुरुषव्याघ्रा यन्मां द्वैपायनो-

---

मोठें भयंकर फल येईल आणि सर्व क्षत्रिय जातीचा संहार हा त्याचा परिणाम होईल ११. सारांश, हे भरतवंशजश्रेष्ठा भारता, एक तूं कारणीभूत होऊन दुर्योधनाच्या अपराधामुळें व भीमार्जुनांच्या बलामुळें सर्व क्षत्रियसमुदाय एकत्र जुळून नाश पावेल १२. हे नृपश्रेष्ठा, प्रभातकालाच्या सुमारास तुला एक स्वप्न पडेल आणि त्या स्वप्नांत वृषध्वज, नीलकंठ, भव, स्थाणु, कपालि, त्रिपुरांतक १३, उग्र, रुद्र, पशुपति, महादेव, उमापति, हर, शर्व, वृष, शूल, पिनाकी व कृत्तिवास १४ असा जो कैलासपर्वताच्या शिखरासारिख्या शुभ्रवर्णानें युक्त असलेला शिव तो वृषभावर आरूढ होऊन एकसारखा दक्षिणदिशेस निरीक्षण करीत आहे—असें तूं अवलोकन करशील १५. तात्पर्य, हे प्रजाधिपते, हें अथवा अशाप्रकारचें स्वप्न तूं अवलोकन करशील. परंतु, तूं त्याकरितां चिंता करीत बसूं नको. कारण, कालाचें उल्लंघन होणें दुर्घट आहे १६. तुझें कल्याण असो. मी आतां कैलासपर्वताकडे गमन करितों. तूं जितेंद्रिय व दक्ष राहून पृथ्वीचें परिपालन कर " १७. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें युधिष्ठिराला सांगून भगवान् कृष्णद्वैपायनव्यास वेदाभ्यासी शिष्यांसहवर्तमान कैलासपर्वतावर गेले १८. ते पितामह व्यासमुनि गेल्यानंतर तो युधिष्ठिर राजा चिंताग्रस्त व शोकाकुल होऊन दुःखानें सुस्कारे टाकूं लागला आणि " पौरुष प्रयत्नानें दैव हाणून पाडणें शक्य कसें होणार ? तेव्हां महर्षि व्यास मुनींनीं जें सांगितलें तें निःसंशय घडून येणारच " अशाप्रकारें वारंवार त्याच गोष्टीचें मनन करूं लागला १९,२०. असो. ह्याप्रमाणें चिंतन केल्यानंतर तो महातेजस्वी युधिष्ठिर (नकुलसहदेवांसुद्धां) आपल्या सर्व भ्रात्यांना

ब्रवीत् २१ तदा तद्वचनं श्रुत्वा मरणे निश्चिता मतिः । सर्वक्षत्रस्य निधने
यद्यहं हेतुरीप्सितः २२ कालेन निर्मितस्तात को ममार्थोऽस्ति जीवितः ।
एवं ब्रुवन्तं राजानं फाल्गुनः प्रत्यभाषत २३ मा राजन्कश्मलं घोरं
प्राविशो बुद्धिनाशनम् । संप्रधार्य महाराज यत्क्षमं तत्समाचर २४ ततो-
ब्रवीत्सत्यधृतिर्भ्रातॄन्सर्वान्युधिष्ठिरः । द्वैपायनस्य वचनं तत्रैव समचिन्त-
यन् २५ अद्यप्रभृति भद्रं वः प्रतिज्ञां मे निबोधत । त्रयोदश समास्तात
को ममार्थोऽस्ति जीवितः २६ न प्रवक्ष्यामि परुषं भ्रातॄनन्यांश्च पार्थिवान् ।
स्थितो निदेशे ज्ञातीनां योक्ष्ये तत्समुदाहरन् २७ एवं मे वर्तमानस्य स्वसु-
तेष्वितरेषु च । भेदो न भविता लोके भेदमूलो हि विग्रहः २८ विग्रहं
दूरतो रक्षन्प्रियाण्येव समाचरन् । वाच्यतां न गमिष्यामि लोकेषु मनु-
जर्षभाः २९ भ्रातुर्ज्येष्ठस्य वचनं पाण्डवाः संनिशम्य तत् । तमेव सम-
वर्तन्त धर्मराजहिते रताः ३० संसत्सु समयं कृत्वा धर्मराट् भ्रातृभिः

ह्मणाला " हे पुरुषश्रेष्ठहो, द्वैपायन मुनींनीं मला जें सांगितलें तें तुह्मीं श्रवण केलेंच
आहे २१. परंतु, तें त्यांचें भाषण श्रवण केल्यापासून माझा तर मरणाविषयींच
निश्चय झालेला आहे. कारण, बाबांनों, सर्व क्षत्रियांच्या मृत्यूला हेतु ह्मणून काला-
नेंच जर बुद्धिपूर्वक माझी योजना केलेली आहे तर माझा जिवंत राहून तरी काय
उपयोग आहे ? " ह्याप्रमाणें युधिष्ठिर राजा बोलूं लागला असतां अर्जुन त्याला
ह्मणाला २२,२३ " हे राजा, बुद्धीला भ्रंश पाडणाऱ्या घोरमोहामध्यें तूं शिरूं नको.
हे महाराजा, व्यास मुनींनीं सांगितलेलें लक्ष्यांत ठेवून जें करणें उचित असेल तें तूं
कर " २४. ह्यानंतर द्वैपायन मुनींच्या भाषणाचें चिंतन करीत असलेला तो सत्य-
निष्ठ युधिष्ठिर त्या ठिकाणींच सर्व भ्रात्यांना ह्मणाला २५ " तुमचें कल्याण असो.
आजपासून माझी प्रतिज्ञा तुह्मी ऐकून ठेवा. बाबांनों, तेरा वर्षें पर्यंत तरी वाचून मला काय
कर्तव्य आहे? २६. असो. मी आजपासून भ्रात्यांशीं व इतरही भूपालांशीं कठोर भाषण
न करितां ज्ञातिबांधवांच्या आज्ञेंत राहीन आणि काय जें करावयाचें तें त्यांना
सांगून करीत जाईन २७. सारांश, ह्याचप्रकारानें मी आपल्या पुत्रांशीं व इतरांशीं
वागेन ह्मणजे मतभेद मुळीं होणारच (नसून कलहही होणार) नाहीं. कारण,
जगतामध्यें मतभेद हेंच कलहाचें मूळ असतें २८. करितां, अशारीतीनें कलहापासून
दूर राहून लोकांना प्रिय असेल तेंच मी करूं लागलों ह्मणजे हे पुरुषश्रेष्ठहो, मी
लोकांमध्यें कोणाच्या निंदेसही पात्र होणार नाहीं " २९. ह्याप्रमाणें आपल्या ज्येष्ठ
भ्रात्याचें तें ह्मणणें लक्ष्यपूर्वक ऐकून घेऊन धर्मराजाच्या हिताविषयीं तत्पर असलेले

सह । पितॄंस्तर्प्य यथान्यायं देवताश्च विशां पते ३१ कृतमङ्गलकल्याणो भ्रातृभिः परिवारितः । गतेषु क्षत्रियेन्द्रेषु सर्वेषु भरतर्षभ ३२ युधिष्ठिरः सहामात्यः प्रविवेश पुरोत्तमम् ३३ दुर्योधनो महाराज शकुनिश्चापि सौबलः । सभायां रमणीयायां तत्रैवास्ते नराधिप ३४ [१६९३] इति० सभापर्वणि द्यूतपर्वणि युधिष्ठिरसमये षट्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ वसन्दुर्योधनस्तस्यां सभायां पुरुषर्षभ । शनैर्ददर्श तां सर्वां सभां शकुनिना सह १ तस्यां दिव्यानभिप्रायान्ददर्श कुरुनन्दनः । न दृष्टपूर्वा ये तेन नगरे नागसाह्वये २ स कदाचित्सभामध्ये धार्तराष्ट्रो महीपतिः । स्फाटिकं स्थलमासाद्य जलमित्यभिशङ्कया ३ स्ववस्त्रोत्कर्षणं राजा कृतवान्बुद्धिमोहितः । दुर्मना विमुखश्चैव परिचक्राम तां सभाम् ४ ततः स्थले निपतितो दुर्मना व्रीडितो नृपः । निःश्वसन्विमुखश्चापि परिचक्राम तां सभाम् ५ ततः स्फाटिकतोयां वै स्फाटिकाम्बुजशोभिताम् । वापीं मत्वा स्थलमिव सवासाः प्रापतज्जले ६ जले निपतितं

पांडुपुत्र त्याच्याच अनुरोधानें वागूं लागले ३०. हे जनमेजयराजा, भ्रात्यांसहवर्तमान त्या सभेमध्यें अशी प्रतिज्ञा केल्यावरून धर्मराजानें यथाविधि पितर आणि देव ह्यांचें संतर्पण केलें ३१. असो. हे भरतवंशजश्रेष्ठा, सर्व श्रेष्ठ श्रेष्ठ क्षत्रिय परत गेल्यानंतर भ्रात्यांनीं परिवेष्टित असलेला तो युधिष्ठिर मंगलकारक आणि कल्याणप्रद असें पुण्याहवाचन वगैरे करवून अमात्यांसहवर्तमान आपल्या उत्कृष्ट नगरामध्यें प्रविष्ट झाला ३२,३३ आणि, हे प्रजाधिपते जनमेजयमहाराजा, दुर्योधन आणि सुबलपुत्र शकुनि हे तेथें त्या रमणीय सभेमध्येंच (कांहीं कालपर्यंत) राहिले ३४. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील द्यूतपर्वांपैकीं युधिष्ठिराच्या प्रतिज्ञेविषयीं शेहेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४६ ॥

वैशंपायन सांगतातः—हे पुरुषश्रेष्ठा जनमेजया, त्या सभेमध्यें असलेल्या दुर्योधनानें हळूं हळूं ती सर्व सभा शकुनीसहवर्तमान अवलोकन केली १. तेव्हां हास्तिनपुरनामक नगरामध्यें पूर्वीं न पाहिलेले असे कांहीं दिव्य चमत्कार त्या कुरुनंदनानें पाहिले २. एकदां तो धृतराष्ट्रपुत्र भूपति त्या सभेमध्यें स्फटिकमय बनविलेल्या स्थलासमीप गेला असतां त्याला हें जल असावें असें वाटलें ३ व त्यामुळें त्या राजानें फसून जाऊन आपलें वस्त्र वर केलें आणि तो खिन्न व निस्तेज होऊन त्या सभेमध्यें हिंडूं लागला ४. ह्याप्रमाणें फसल्यानंतर स्थलावरच असलेला तो दुर्योधन खिन्न, लज्जित व निस्तेज होऊन दुःखाचे सुस्कारे टाकीत टाकीत तसाच त्या सभेमध्यें हिंडूं लागला असतां ५ स्फटिकासारख्या स्वच्छ जलानें युक्त असून स्फटिकासारख्याच सुवर्ण कमलांनीं

दृष्ट्वा भीमसेनो महाबलः । जहास जहसुश्चैव किंकराश्च सुयोधनम् ॥
वासांसि च शुभान्यस्मै प्रददू राजशासनात् ७ तथागतं तु तं दृष्ट्वा भीम-
सेनो महाबलः । अर्जुनश्च यमौ चोभौ सर्वे ते प्राहसंस्तदा ८ नामर्षय-
त्ततस्तेषामवहासममर्षणः । आकारं रक्षमाणस्तु न स तान्समुदैक्षत ९
पुनर्वसनमुत्क्षिप्य प्रतरिष्यन्निव स्थलम् । आरुरोह ततः सर्वे जहसुश्च
पुनर्जनाः १० द्वारं तु पिहिताकारं स्फाटिकं प्रेक्ष्य भूमिपः । प्रविशन्ना-
हतो मूर्ध्नि व्याघूर्णित इवस्थितः ११ तादृशं च परं द्वारं स्फाटिकोरुकपाट-
कम् । विघट्टयन्कराभ्यां तु निष्क्रम्याग्रे पपात ह १२ द्वारं तु वितता-
कारं समापेदे पुनश्च सः । तद्वृत्तं चेति मन्वानो द्वारस्थानादुपारमत् १३
एवं प्रलम्भान्विविधान्प्राप्य तत्र विशां पते । पाण्डवेयाभ्यनुज्ञातस्ततो

सुशोभित अशी वापी पुढें असतांना तें स्थलच आहे असें समजून तो वस्त्रप्रावरणांसह उदकामध्यें पडला ६. जलामध्यें त्याला पडलेला अवलोकन करून महाबलाढ्य भीमसेनाला हसूं आलें व तेथील सेवकही हसूं लागले. नंतर राजाच्या आज्ञेवरून त्या दुर्योधनाला सेवकांनीं शुभ वस्त्रें आणून दिलीं ७. असो. त्याप्रमाणें उपहासास्पद झालेल्या त्या दुर्योधनाला अवलोकन करून महाबलाढ्य भीमसेन, अर्जुन व उभयतां नकुलसहदेव ह्या सर्वांनाच हंसें कोसळलें ८. तथापि क्रुद्ध दुर्योधनानें त्यांच्या हास्याकडे लक्ष्य दिलें नाहीं इतकेंच नव्हें परंतु, क्रुद्ध झालेली मुद्रा इतरांच्या लक्ष्यांत न यावी ह्मणून त्यानें त्यांच्याकडे वर तोंड करून पाहिलें देखील नाहीं ९. इतक्यांत जातां जातां पुनरपि उदकाचा भास होऊन त्यांतून पलीकडे जाण्याच्या उद्देशानें दुर्योधन राजा आपलें वस्त्र वर सावरून धरून स्थलावरूनच चालूं लागला असतां पुनरपि समीप असलेले सर्व लोक त्याला हंसले १०. तेथून पुढें जातां जातां एक भिंत समोर असतांना आकृति समजण्यांत न येण्यासारखें येथें एक स्फटिकमय द्वारच आहे असें समजून दुर्योधन निःशंकपणें आंत शिरूं लागला तेव्हां भिंतीवर मस्तक हापटून तिरमिरी आल्यामुळें कांहीं वेळ त्याला तेथें थांबावेंच लागलें ११. नंतर पुढें जाऊं लागला तों तशाच प्रकारचें मोठमोठ्या स्फटिकाच्या फळयांनीं युक्त असें एक द्वार बंद केलेलें पुढें आहेसें पाहून हातांनीं तें उघडूं लागला असतां (द्वार वास्तविक बंद केलेलें नसल्यामुळें) तो झोक जाऊन पुढें तोंडघशीं पडला १२. तदनंतर तसाच पुढें जाऊं लागला असतां पुनरपि वास्तविकच उघडलेलें असें एक द्वार लागलें; परंतु, ह्यांतही कांहीं पूर्वीप्रमाणेंच विपरीत असेल ह्मणजे वस्तुतः हें द्वार लावलेलेंच असेल असें समजून सरळ आंत न शिरतां द्वाराशींच तो थबकून राहिला १३. सारांश, हे जनमेजय राजा,

दुर्योधनो नृपः १४ अप्रहृष्टेन मनसा राजसूये महाक्रतौ । प्रेक्ष्य तामद्भुतामृद्धिं जगाम गजसाह्वयम् १५ पाण्डवश्रीप्रतप्तस्य ध्यायमानस्य गच्छतः। दुर्योधनस्य नृपतेः पापा मतिरजायत १६ पार्थान्सुमनसो दृष्ट्वा पार्थिवांश्च वशानुगान् । कृत्स्नं चापि हितं लोकमाकुमारं कुरूद्वह १७ महिमानं परं चापि पाण्डवानां महात्मनाम् । दुर्योधनो धार्तराष्ट्रो विवर्णः समपद्यत १८ स तु गच्छन्ननेकाग्रः सभामेकोऽन्वचिन्तयत् । श्रियं च तामनुपमां धर्मराजस्य धीमतः १९ प्रमत्तो धृतराष्ट्रस्य पुत्रो दुर्योधनस्तदा । नाभ्यभाषत्सुबलजं भाषमाणं पुनः पुनः २० अनेकाग्रं तु तं दृष्ट्वा शकुनिः प्रत्यभाषत । दुर्योधन कुतोमूलं निःश्वसन्निव गच्छसि २१ दुर्योधन उवाच ॥ दृष्ट्वेमां पृथिवीं कृत्स्नां युधिष्ठिरवशानुगाम् । जितामस्त्रप्रतापेन श्वेताश्वस्य महात्मनः २२ तं च यज्ञं तथाभूतं दृष्ट्वा पार्थस्य मातुल। यथा शक्रस्य देवेषु तथाभूतं महाद्युतेः २३ अमर्षेण तु संपूर्णो दह्यमानो

ह्याप्रमाणें नानाप्रकारांनीं उपहासास्पद झाल्यानंतर दुर्योधन राजाला पांडुपुत्रांनीं जाण्याविषयीं अनुज्ञा दिली १४ असो. राजसूयसंज्ञक महाक्रतूंतील पांडवांची ती अद्भुत संपत्ति आनंदरहित मनानेंच अवलोकन करून तो हास्तिनपुराप्रत परत गेला १५. पांडवांचें वैभव पाहून संतप्त झालेला तो दुर्योधन राजा एकसारखा त्याच गोष्टीचें चिंतन करीत करीत जाऊं लागला असतां त्याच्या अंतःकरणामध्यें पाप बुद्धि उत्पन्न झाली १६. हे कुरुकुलोद्धारका जनमेजय राजा, कुंतीपुत्र आनंदित झाले असून (पृथ्वींतील सर्व) राजे त्यांना वश होऊन राहिले आहेत इतकेंच नव्हे परंतु, मुलाबाळांपर्यंत पृथ्वींतील सर्व लोक त्यांच्या हितावर असून १७ महात्म्या पांडवांची कीर्तिही पराकाष्ठेची झाली आहे असें अवलोकन केल्यावर धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन निस्तेज झाला १८ आणि अंतःकरणामध्यें क्षुब्ध होऊन (शकुनि बरोबर आहे किंवा नाहीं ह्याचेंही भान नसल्यामुळें जसा कांहीं) एकटाच हास्तिनपुरास तो परत जाऊं लागला असतां विचारीं धर्मराजाची ती अनुपम संपत्ति आणि सभा ह्यांवाचून त्याच्या मनांत दुसरें कांहीं येईनाच १९ व सुबलपुत्र शकुनि वारंवार बोलत असतांनाही बेफाम होऊन चाललेला तो धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन त्याच्याशींहीं कांहीं भाषण करीना २०. तेव्हां हा अगदीं क्षुब्ध झालेला आहे असें अवलोकन करून " हे दुर्योधना, तूं सुस्कारे टाकीत कां चालला आहेस ? " ह्मणून शकुनीनें त्याला विचारिलें असतां २१ दुर्योधन ह्मणतोः—महात्म्या अर्जुनाच्या प्रतापामुळें जिंकिलेली ही संपूर्ण पृथ्वी युधिष्ठिराच्या आज्ञेंत वागत आहे २२ असें दृष्टोत्पत्तीस आल्यापासून आणि देवांमध्यें झालेल्या इंद्राच्या यज्ञाप्रमाणें

दिवानिशम् । शुचिशुक्रागमे काले शुष्येत्तोयमिवाल्पकम् २४ पश्य सात्वतमुख्येन शिशुपालो निपातितः । न च तत्र पुमानासीत्कश्चित्तस्य पदानुगः २५ दह्यमाना हि राजानः पाण्डवोत्थेन वह्निना । क्षान्तवन्तोपराधं ते को हि तत्क्षन्तुमर्हति २६ वासुदेवेन तत्कर्म यथायुक्तं महत्कृतम् । सिद्धं च पाण्डुपुत्राणां प्रतापेन महात्मनाम् २७ तथा हि रत्नान्यादाय विविधानि नृपा नृपम् । उपातिष्ठन्त कौन्तेयं वैश्या इव करप्रदाः २८ श्रियं तथागतां दृष्ट्वा ज्वलन्तीमिव पाण्डवे । अमर्षवशमापन्नो दह्यामि न तथोचितः २९ एवं स निश्चयं कृत्वा ततो वचनमब्रवीत् । पुनर्गान्धारनृपतिं दह्यमान इवाग्निना ३० वह्निमेव प्रवेक्ष्यामि भक्षयिष्यामि वा विषम् । अपो वापि प्रवेक्ष्यामि न हि शक्ष्यामि जीवितुम् ३१ को हि नाम पुमाँल्लोके मर्षयिष्यति सत्त्ववान् । सपत्नानृध्यतो दृष्ट्वा हीनमात्मानमेव च ३२ सोहं न स्त्री न चाप्यस्त्री न पुमान्नापुमानपि । योहं तां मर्षयाम्यद्य तादृशीं

महातेजस्वी कुंतीपुत्र युधिष्ठिराचा तो यज्ञ झालेला अवलोकन केल्यापासून, हे मातुला २३, क्रोधानें मी अगदीं व्याप्त झालों असल्यामुळें रात्रंदिवस माझ्या अंगाची एकसारखी आग होत आहे आणि ग्रीष्मऋतु समीप आला असतां अल्प तोयानें युक्त असलेला जलाशय ज्याप्रमाणें शुष्क होऊन जातो तशी माझी अवस्था झाली आहे २४ पहा बरें, यादवश्रेष्ठ श्रीकृष्णानें शिशुपालाचा वध केला असून त्याचा प्रतीकार करणारा कोणीही पुरुष त्या सभेमध्यें निघाला नाहीं २५. अरे, पांडवांपासून निघालेल्या अग्नीनें राजांच्या अंगाचा भडका झाला असूनही त्यांनीं त्यांचा अपराध सहन केला. परंतु, वास्तविक पाहिलें असतां तें त्यांचें वर्तन कोणाला तरी सहन होण्यासारखें होतें काय ? २६. तात्पर्य, वासुदेवानें तें मोठेंच अयोग्य कृत्य केलें आणि महात्म्या पांडुपुत्रांच्या प्रतापामुळें तें शेवटासही गेलें २७. (हे मातुला) कर घेऊन येणाऱ्या वैश्यांप्रमाणें नानाप्रकारचीं रत्नें घेऊन प्रत्यक्ष भूपति त्या धर्मराजाकडे त्या यज्ञसमयीं आले! २८. सारांश, पांडुपुत्र युधिष्ठिराचे ठिकाणीं असलेली तशा प्रकारची उज्ज्वल संपत्ति अवलोकन केल्यापासून मी क्रोधवश होऊन आंतल्या आंत जळफळूं लागलों आहें. परंतु, ह्याप्रमाणें नुसतें जळफळत राहणें योग्य नाहीं २९. ह्याप्रकारें मनामध्यें आणून अग्नीनें जसा कांहीं जळतच असलेला तो दुर्योधन पुनरपि गांधारदेशाधिपति शकुनीला ह्मणाला ३०. " करितां, अग्निप्रवेश, विषभक्षण अथवा उदकनिमज्जन ह्यापैकीं कांहीं तरी मी करून घेतों. माझ्यानें आतां जीव ठेववत नाहीं ३१. कारण, शत्रूंचा उत्कर्ष व आपला अपकर्ष होत असलेला अवलोकन करणें जगतामध्यें कोणत्या बरें अभिमानी

श्रियमागताम् ३३ ईश्वरत्वं पृथिव्याश्च वसुमत्तां च तादृशीम् । यज्ञं च तादृशं दृष्ट्वा मादृशः को न संज्वरेत् ३४ अशक्तश्चैक एवाहं तामाहर्तुं नृपश्रियम् । सहायांश्च न पश्यामि तेन मृत्युं विचिन्तये ३५ दैवमेव परं मन्ये पौरुषं च निरर्थकम् । दृष्ट्वा कुन्तीसुते शुद्धां श्रियं तामहतां तथा ३६ कृतो यत्नो मया पूर्वं विनाशे तस्य सौबल । तच्च सर्वमतिक्रम्य संवृद्धोऽप्स्विव पङ्कजम् ३७ तेन दैवं परं मन्ये पौरुषं च निरर्थकम् । धार्तराष्ट्राश्च हीयन्ते पार्था वर्धन्ति नित्यशः ३८ सोहं श्रियं च तां दृष्ट्वा सभां तां च तथाविधाम् । रक्षिभिश्चावहासं तं परितप्ये यथाग्निना ३९ स मामभ्यनुजानीहि मातुलाद्य सुदुःखितम् । अमर्षं च समाविष्टं धृतराष्ट्रे निवे-

---

पुरुषाला सहन होईल ? ३२. खरोखर पांडवांना प्राप्त झालेलें तें वैभव अवलोकन करणाऱ्या माझी स्थिति धड स्त्री नव्हे, पुरुष नव्हें आणि नपुंसकही नव्हें अशा प्रकारची सांप्रत झालेली आहे (स्त्री आहें ह्मणून ह्मणावें तर स्त्रिया ज्याप्रमाणें सवतीचा उत्कर्ष निमूटपणें सहन करितात त्याप्रमाणें पांडवांचा उत्कर्ष माझ्यानें सहन करवत नाहीं; पुरुष आहें ह्मणावें तर मी बलाचें अवलंबन करून पांडवांना जिंकण्यास समर्थ नाहीं आणि नपुंसक आहें ह्मणून ह्मणावें तर अगदींच सामर्थ्यहीन आहें असेंही नाहीं) ३३. अरे, सर्व पृथ्वीचें स्वामित्व, तशाप्रकारचें वैभव आणि तसा यज्ञ अवलोकन करून माझ्यासारख्या कोणत्या बरें (अभिमानी) पुरुषाच्या अंगाचा दाह होणार नाहीं ? ३४. (परंतु, करूं काय ?) ती राजसंपत्ति हरण करून आणण्यास मी एकटा असमर्थ आहें आणि साहाय्य करणारेही मला कोणी दिसत नाहींत. तेव्हां मृत्यूविषयीं मी मनामध्यें आणीत आहें ३५. (अरे! इतका अट्टहास केला असतांही शेवटीं) कुंतीपुत्र युधिष्ठिराला ती शुद्ध व अविच्छिन्न संपत्ति प्राप्त झाल्याचें पाहून "दैवच श्रेष्ठ आहे; पौरुष यत्नांत कांहीं अर्थ नाहीं" असें मला निश्चित वाटूं लागलें आहे ३६. हे, सौबला, मी त्या युधिष्ठिराचा नाश करण्याकरितां पूर्वी यत्नही केला होता. परंतु, त्या सर्वाला न जुमानितां उदकांत वृद्धिंगत होणाऱ्या कमलाप्रमाणें तो वृद्धिंगत झालाच ३७. ह्मणून दैवच बलवत्तर असून पौरुष व्यर्थ आहे असें मला वाटतें. कारण, कुंतीपुत्रांचा नित्य उत्कर्ष होत असून धृतराष्ट्रपुत्रांचें मान उत्तरोत्तर कमी होत चाललें आहे ३८. सारांश, वर सांगितल्याप्रमाणें, धड स्त्री, पुरुष अथवा नपुंसक नसलेल्या माझ्या अंगाचा--ती संपत्ति व तशाप्रकारची ती अद्भुत सभा अवलोकन केल्यापासून आणि सभारक्षकांच्याही उपहासास पात्र झाल्यापासून--जसा कांहीं अग्नीनेंच की काय अगदीं भडका होऊन राहिलेला आहे ३९. तस्मात्, हे मातुला, अत्यंत दुःखित झालेल्या मला तूं

दय ४० [१७३३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां सभापर्वणि द्यूतपर्वणि दुर्योधनसंतापे सप्तचत्वारिंशोध्यायः ॥ ४७ ॥

शकुनिरुवाच ॥ दुर्योधन न तेमर्षः कार्यः प्रति युधिष्ठिरम् । भागधेयानि हि स्वानि पाण्डवा भुञ्जते सदा १ विधानं विविधाकारं परं तेषां विधानतः । अनेकैरभ्युपायैश्च त्वया न शकिताः पुरा २ आरब्धापि महाराज पुनः पुनररिन्दम । विमुक्ताश्च नरव्याघ्रा भागधेयपुरस्कृताः ३ तैर्लब्धा द्रौपदी भार्या द्रुपदश्च सुतैः सह । सहायः पृथिवीलाभे वासुदेवश्च वीर्यवान् ४ लब्धश्चानभिभूतार्थैः पित्र्योंशः पृथिवीपते । विवृद्धस्तेजसा तेषां तत्र का परिदेवना ५ धनंजयेन गाण्डीवमक्षय्यौ च महेषुधी । लब्धान्यस्त्राणि दिव्यानि तोषयित्वा हुताशनम् ६ तेन कार्मुकमुख्येन बाहुवीर्येण चात्मनः । कृता वशे महीपालास्तत्र का परिदेवना ७ अग्निदाहान्मयं चापि मोक्षयित्वा स दानवम् । सभां तां कारयामास सव्यसाची परंतपः ८ तेन चैव मयेनोक्ताः किंकरा नाम राक्षसाः । वहन्ति

आपला आज पूर्वी सांगितल्याप्रमाणें दुःखांतून सुटका करून घेण्याची अनुज्ञा दे आणि मला संताप झाल्याविषयीं धृतराष्ट्राला निवेदन कर ४०. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वांपैकीं दुर्योधनाच्या संतापाविषयीं चाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४० ॥

शकुनि ह्मणतोः—हे दुर्योधना, तुला युधिष्ठिराशीं मत्सर करण्याचें कांहीं कारण नाहीं. अरे, पांडवांना हें सर्वदां त्यांच्या स्वकर्माचेंच फल प्राप्त होत आहे १. त्यांच्या उपायापेक्षां तूं पूर्वी अनेक प्रकारचे उपाय योजून पाहिलेस. परंतु, त्या अनेक उपायांनींही त्यांचा नाश करणें तुला शक्य झालें नाहीं २. हे महाराज शत्रुनाशका, तूं अनेक वेळां त्यांना संकटांत आणिलेंस ; परंतु, दैवाच्या बलावर ते पुरुषश्रेष्ठ पुनः पुनः त्या त्या संकटांतून मुक्त झाले ३. द्रौपदी त्यांना भार्या प्राप्त झाली, पुत्रांसहवर्तमान द्रुपदराजाही त्यांना मिळाला आणि वीर्यवान् वासुदेवही पृथ्वीचा लाभ होण्यास त्यांना साहाय्यभूत झाला ४. सारांश, हे पृथिवीपते, ज्यांचा कोणताही मनोरथ व्यर्थ झाला नाहीं अशा त्या पांडुपुत्रांना राज्यसंबंधीं पैतृक अंश प्राप्त होऊन त्यांच्या तेजानें तो वृद्धिंगत झाला आहे तेव्हां ह्यामध्यें दुःख मानण्याचें कारण काय? ५. अग्नीला संतुष्ट करून अर्जुनानें गांडीव धनुष्य, मोठेमोठे दोन अक्षय्य भाते आणि दिव्य अस्त्रें हीं प्राप्त करून घेतलीं ६ आणि त्या श्रेष्ठ धनुष्यानें व आपल्या बाहुवीर्यानें त्यानें सर्व भूपाल पादाक्रांत केले. परंतु, ह्याविषयीं शोक करीत बसण्याचें प्रयोजन काय? ७. त्याचप्रमाणें अग्नीच्या दाहापासून मयासुराला सोडवून त्या शत्रुविजयी अर्जुनानें

तां सभां भीमास्तत्र का परिदेवना ९ यच्चासहायतां राजन्नुक्तवानसि भारत । तन्मिथ्या भ्रातरो हीमे तव सर्वे वशानुगाः १० द्रोणस्तव महेष्वासः सह पुत्रेण वीर्यवान् । सूतपुत्रश्च राधेयो गौतमश्च महारथः ११ अहं च सह सोदर्यैः सौमदत्तिश्च पार्थिवः । एतैस्त्वं सहितः सर्वैर्जय कृत्स्नां वसुन्धराम् १२ दुर्योधन उवाच ॥ त्वया च सहितो राजन्नेतैश्चान्यैर्महारथैः । एतानेव विजेष्यामि यदि त्वमनुमन्यसे १३ एतेषु विजितेष्वद्य भविष्यति मही मम । सर्वे च पृथिवीपालाः सभा सा च महाधना १४ शकुनिरुवाच ॥ धनंजयो वासुदेवो भीमसेनो युधिष्ठिरः । नकुलः सहदेवश्च द्रुपदश्च सहात्मजैः १५ नैते युधि पराजेतुं शक्या देवगणैरपि । महारथा महेष्वासाः कृतास्त्रा युद्धदुर्मदाः १६ अहं तु तद्विजानामि विजेतुं येन शक्यते । युधिष्ठिरं स्वयं राजंस्तन्निबोध जुषस्व च १७ दुर्योधन उवाच ॥ अप्रमादेन सुहृदामन्येषां च महात्मनाम् । यदि शक्या विजेतुं ते

त्याच्याकडून ती सभा निर्माण करविली ८ व ती सभा मयासुरानें सांगितलें असतां किंकरनामक घोर राक्षस (हवी तिकडे) नेत असतात. तेव्हां ह्याविषयीं खेद करण्यांत काय अर्थ आहे ? ९. परंतु, हे भरतकुलोत्पन्ना दुर्योधनराजा, कोणाचें साहाय्य नाहीं असें जें तूं ह्मणालास तें मात्र मिथ्या आहे. कारण, हे भ्राते सर्व तुझ्या आज्ञेनें वागणारे आहेत १०. महाधनुर्धारी द्रोण पुत्रासहवर्तमान तुझ्या वचनांत असून वीर्यवान् सूतपुत्र कर्ण व महारथी कृपाचार्य हेही तूं सांगशील तसे वागणारे आहेत ११ आणि सहोदर भ्रात्यांसहवर्तमान मी व राजा सौमदत्ति हे आह्मीही त्याचप्रमाणें तुझ्या बाहेर नाहीं. तेव्हां ह्या सर्वांच्या साहाय्यानें तूं संपूर्ण पृथ्वी जिंकून घे १२. दुर्योधन ह्मणतो:— हे राजा, तूं आणि हे दुसरे महारथि ह्यांच्या साहाय्यानें (तूर्त पृथ्वी न जिंकितां) तुझें अनुमोदन असेल तर ह्या पांडवांनाच जिंकण्याची माझी इच्छा आहे १३. कारण, एक ह्यांचा आज पराजय केला ह्मणजे पृथ्वी, सर्व भूपति व ती महामूल्यवान् सभा हें सर्व माझेंच होणार आहे १४. शकुनि ह्मणतो:— अर्जुन, वासुदेव, भीमसेन, युधिष्ठिर, नकुलसहदेव आणि पुत्रांसहवर्तमान द्रुपद १५ ह्या महारथी, महाधनुर्धारी, अस्त्रनिपुण व युद्धामध्यें पराजित होण्यास अशक्य असलेल्या वीरांचा संग्रामामध्यें देवगणांच्या हातूनही पराभव होणें शक्य नाहीं १६. ज्या उपायानें, हे राजा, स्वतः युधिष्ठिराला जिंकणें शक्य आहे तो उपाय मी जाणीत आहें. करितां, तूं एकून घेऊन त्याचा अवलंब कर १७. दुर्योधन ह्मणतो:—सुहृद व इतरही महात्मे ह्यांना धक्का न लागतां जर त्या पांडवांचा पराजय होणें शक्य असेल

तन्ममाचक्ष्व मातुल १८ शकुनिरुवाच ॥ द्यूतप्रियश्च कौन्तेयो न स्म जानाति देवितुम् । समाहूतश्च राजेन्द्रो न शक्ष्यति निवर्तितुम् १९ देवने कुशलश्चाहं न मेऽस्ति सदृशो भुवि । त्रिषु लोकेषु कौरव्य तं त्वं द्यूते समाह्वय २० तस्याक्षकुशलो राजन्नादास्येऽहमसंशयम् । राज्यं श्रियं च तां दीप्तां त्वदर्थं पुरुषर्षभ २१ इदं तु सर्वं त्वं राज्ञे दुर्योधन निवेदय । अनुज्ञातस्तु ते पित्रा विजेष्ये तान्न संशयः २२ दुर्योधन उवाच ॥ त्वमेव कुरुमुख्याय धृतराष्ट्राय सौबल । निवेदय यथान्यायं नाहं शक्ष्ये निवेदितुम् २३ [१७५६]
इति० सभापर्वणि द्यूतपर्वणि दुर्योधनसंतापेऽष्टचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४८ ॥

वैशम्पायन उवाच ॥ अनुभूय च राज्ञस्तं राजसूयं महाक्रतुम् । युधिष्ठिरस्य नृपतेर्गान्धारीपुत्रसंयुतः १ प्रियकृन्मतमादाय पूर्वं दुर्योधनस्य तत् । प्रज्ञाचक्षुषमासीनं शकुनिः सौबलस्तदा २ दुर्योधनवचः श्रुत्वा धृतराष्ट्रं जनाधिपम् । उपगम्य महाप्राज्ञं शकुनिर्वाक्यमब्रवीत् ३ शकुनिरुवाच ॥ दुर्योधनो महाराज विवर्णो हरिणः कृशः । दीनश्चिन्तापरश्चैव तं विद्धि

तर, हे मातुला, तूं मला सांग १८. शकुनि ह्मणतोः—कुंतीपुत्र युधिष्ठिराला द्यूत प्रिय असून तें करण्यांत तो मुळीच प्रवीण नाहीं आणि आव्हान केलें असतां त्या नृपश्रेष्ठाकडून त्याचा स्वीकार न होणेंही शक्य नाहीं १९. शिवाय, मी द्यूत खेळण्यांत प्रवीण आहें इतकेंच नव्हें तर माझ्यासारखा द्यूत खेळणारा पृथ्वींत नव्हें त्रैलोक्यांतही कोणी नाहीं. करितां, हे कुरुकुलोत्पन्ना दुर्योधना, त्या युधिष्ठिराला तूं द्यूताविषयीं आव्हान कर २०. हे पुरुषश्रेष्ठा दुर्योधन राजा, फांशांत प्रवीण असलेला मी तें त्याचें राज्य व ती डोळे दिपविणारी संपत्ति तुझ्याकरितां निःसंशय हरण करीन २१. परंतु, हे राजा, तूं हें सर्व धृतराष्ट्र राजाला निवेदन कर. ह्मणजे तुझ्या पित्याची अनुज्ञा मिळाल्यावर मी त्यांना निःसंशय जिंकून टाकीन २२. दुर्योधन ह्मणतोः—हे सौबला, तूंच कुरुवंशजाधिपति धृतराष्ट्राला हें जसें खुलवून सांगावयाचें असेल तसें सांग. मला तें नीट सांगतां येणार नाहीं २३. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वांपैकीं दुर्योधनाच्या संतापाविषयीं अठ्ठेचाळिसावा अध्याय समाप्त झाला॥ ४८ ॥

वैशंपायन सांगतातः—नृपति युधिष्ठिर राजाचा तो राजसूय महाक्रतु कसा काय झाला ह्याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन, दुर्योधनाचेंही तें मत आपल्याला अनुकूलच आहे असें जाणून आणि (तूंच धृतराष्ट्र राजाला सांग हें) दुर्योधनाचें भाषण श्रवण करून सुबलपुत्र शकुनि दुर्योधनासहवर्तमान महाबुद्धिमान् व अंध असा जो प्रजाधिपति धृतराष्ट्र राजा त्याचे समीप गेला आणि ह्मणाला १,२,३ " हे मनुष्याधिपते

मनुजाधिप ४ न वै परीक्षसे सम्यगसह्यं शत्रुसंभवम् । ज्येष्ठपुत्रस्य हृच्छोकं किमर्थं नावबुध्यसे ५ धृतराष्ट्र उवाच ॥ दुर्योधन कुतोमूलं भृशमार्तोसि पुत्रक । श्रोतव्यश्चेन्मया सोर्थो ब्रूहि मे कुरुनन्दन ६ अयं त्वां शकुनिः प्राह विवर्णं हरिणं कृशम् । चिन्तयंश्च न पश्यामि शोकस्य तव संभवम् ७ ऐश्वर्यं हि महत्पुत्र त्वयि सर्वं प्रतिष्ठितम् । भ्रातरः सुहृदश्चैव नाचरन्ति तवाप्रियम् ८ आच्छादयसि प्रावारानश्नासि पिशितौदनम् । आजानेया वहन्त्यश्वाः केनासि हरिणः कृशः ९ शयनानि महार्हाणि योषितश्च मनोरमाः । गुणवन्ति च वेश्मानि विहाराश्च यथासुखम् १० देवानामिव ते सर्वं वाचि बद्धं न संशयः । स दीन इव दुर्धर्ष कस्माच्छोचसि पुत्रक ११ दुर्योधन उवाच ॥ अश्नाम्याच्छादये चाहं यथा कुपुरुषस्तथा । अमर्षं धारये चोग्रं निनीषुः कालपर्ययम् १२ अमर्षणः स्वाः प्रकृतीरभिभूय परं स्थितः ।

महाराजा, दुर्योधन सांप्रत निस्तेज, पांडुरवर्ण कृश, दीन व चिंताक्रांत झालेला आहे हें आपल्या कानावर असूं द्या ४. आपण नीट चौकशीच करीत नाहीं (असें मला वाटतें) कारण, (जर करीत असाल तर) शत्रूंच्यामुळें आपल्या ज्येष्ठ पुत्राच्या अंतःकरणांत उत्पन्न झालेला असह्य शोक आपणाला कां बरें माहीत नसावा ? " ५. धृतराष्ट्र ह्मणतोः—बाबा दुर्योधना, तूं कोणत्या कारणानें अति दुःखित झाला आहेस? हे कुरुनंदना, तुझ्या दुःखाला कारण असलेली गोष्ट मला समजण्यास जर कांहीं प्रतिबंध नसेल तर तूं ती मला सांग ६. अरे, तूं सांप्रत निस्तेज, पांडुरवर्ण व कृश झाला आहेस ह्मणून हा शकुनि सांगत आहे आणि मी विचार करून पाहूं लागलों असतां तुझ्या शोकाचा संभव मला तर कांहीं दिसत नाहीं ७. कारण, हे पुत्रा, सर्व प्रकारचें मोठें ऐश्वर्य तुला असून भ्राते व सुहृद् हेही तुला अप्रिय असलेली गोष्ट करीत नाहींत ८. (बरें, अन्नवस्त्रादिकांसंबंधानें तूं चिंताक्रांत झाला असशील ह्मणावें तर) प्रावरणें (चांगलीं चांगलीं) अंगावर घेत आहेस; अन्नही (सामान्य नसून चांगलें) मांसमय भक्षण करीत आहेस; तुझ्या रथाचे वगैरे अश्वही (असे तसे नसून उत्तम) जातिवंत आहेत. तेव्हां तूं पांडुरवर्ण व कृश होत चालल्याचें कारण काय ? ९. अरे, मोठ्या मोठ्या मूल्यवान् शय्या, मनोहर स्त्रिया, (सर्वप्रकारच्या) समृद्धीनें युक्त असलेलीं निवासस्थानें आणि देवांच्याप्रमाणें यथेष्ट क्रीडास्थानें हें सर्व फक्त मुखांतून निघतांक्षणीं तुझ्यापुढें निःसंशय येणारें असतांना, हे दुर्जिक्य पुत्रा, तूं दीनासारखा शोक कां करीत आहेस ? १०,११. दुर्योधन ह्मणतोः—एकाद्या दुर्बल पुरुषाप्रमाणें मी अन्नाच्छादनांचा उपभोग घेत आहें आणि दुःसह असहिष्णुता धारण

क्लेशान्मुमुक्षुः परजात्स वै पुरुष उच्यते १३ संतोषो वै श्रियं हन्ति ह्यभि-
मानं च भारत । अनुक्रोशभये चोभे यैर्वृतो नाश्नुते महत् १४ न मां
प्रीणाति मद्भुक्तं श्रियं दृष्ट्वा युधिष्ठिरे । अतिज्वलन्तीं कौन्तेये विवर्णक-
रणीं मम १५ सपत्नानृध्यतोऽऽत्मानं हीयमानं निशम्य च । अदृश्यामपि
कौन्तेयश्रियं पश्यन्निवोद्यताम् १६ तस्मादहं विवर्णश्च दीनश्च हरिणः
कृशः १७ अष्टाशीतिसहस्राणि स्नातका गृहमेधिनः । त्रिंशद्दासीक एकैको
यान्बिभर्ति युधिष्ठिरः १८ दशान्यानि सहस्राणि नित्यं तत्रान्नमुत्तमम् ।
भुञ्जते रुक्मपात्रीभिर्युधिष्ठिरनिवेशने १९ कदलीमृगमोकानि कृष्णश्यामारु-
णानि च । काम्बोजः प्राहिणोत्तस्मै परार्ध्यानपि कम्बलान् २० गजयो-
षिद्गवाश्वस्य शतशोऽथ सहस्रशः । त्रिंशतं चोष्ट्रवामीनां शतानि विचर-
न्त्युत ॥ राजन्या बलिमादाय समेता हि नृपक्षये २१ पृथग्विधानि रत्नानि

करीत असून कसा तरी काळ काढण्याची इच्छा करीत आहें १२. शत्रूपासून उत्पन्न झालेल्या क्लेशांतून जो आपल्या प्रजेला सोडविण्याची इच्छा करितो तोच "पुरुष" ह्या संज्ञेला पात्र होत असतो. परंतु, मी आपला स्वतःच्या प्रजेची परवा न करितां नुसता पराकाष्ठेचा असहिष्णमात्र होऊन राहिलों आहें १३. हे भरतकुलोत्पन्ना धृतराष्ट्रराजा, अभिमान आणि विद्यमान असलेलेंही वैभव ह्यांचा संतोषाच्या योगानें नाश होत असून दया व भय ह्यांच्या योगानेंही तसेंच होतें. सारांश, संतोष, दया व भय ह्यांनीं युक्त असलेल्या पुरुषाला महापदाची प्राप्ति होत नाहीं १४. माझ्या तेजोहीनतेला कारणीभूत असलेली जी कुंतीपुत्र युधिष्ठिराची अति उज्ज्वल संपत्ति ती अवलोकन केल्यापासून मला अन्नही गोड लागेनासें झालें आहे १५. (वस्तुतः पाहूं गेलें असतां ह्या हास्तिनपुरापासून युधिष्ठिर जरी दूर आहे तरी) शत्रूचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत असून आपल्याला निकृष्टावस्था येत चालली आहे असें ऐकून अदृश्य असलेलीही कुंतीपुत्राची संपत्ति माझ्या मनांत उभी राहत असून माझ्या निस्तेजस्त्वाला कारणीभूत होत असते १६. तात्पर्य, ह्यामुळें मी निस्तेज, दीन, पांडुरवर्ण आणि कृश झालों आहें १७. (अहो काय सांगावें ?) प्रत्येकाला तीस तीस दासी ह्याप्रमाणें ऐंशी हजार कुटुंबी गृहस्थाश्रमी द्विजांचें युधिष्ठिर पोषण करीत आहे १८ आणि ह्यांशिवाय त्या युधिष्ठिराच्या घरीं सुवर्णपात्रांतून इतरही दहा हजार ब्राह्मण नित्य उत्कृष्ट अन्न भक्षण करीत आहेत १९. कांबोजदेशाधिपतीनें त्या युधिष्ठिराकडे कदलीसंज्ञक मृगांचीं कृष्णवर्ण, श्यामवर्ण व आरक्तवर्ण अजिनें आणि सर्वोत्कृष्ट ऊर्णावस्त्रेंही पाठवून दिलीं आहेत २०. हत्तिणी, गाई व अश्व हीं त्या ठिकाणीं शेंकडों हजारों असून शंभरांचीं

पार्थिवाः पृथिवीपते । आहरन्क्रतुमुख्येस्मिन्कुन्तीपुत्राय भूरिशः २२ न
कचिद्धि मया तादृग्दृष्टपूर्वो न च श्रुतः । यादृग्धनागमो यज्ञे पाण्डुपुत्रस्य
धीमतः २३ अपर्यन्तं धनौघं तं दृष्ट्वा शत्रोरहं नृप । शर्म नैवाभिगच्छामि
चिन्तयानो विशां पते २४ ब्राह्मणा वाटधानाश्च गोमन्तः शतसंघशः ।
त्रिखर्वं बलिमादाय द्वारि तिष्ठन्ति वारिताः २५ कमण्डलूनुपादाय जात-
रूपमयाञ्छुभान् । एतद्धनं समादाय प्रवेशं लेभिरे न च २६ यत्रैव मधु
शक्राय धारयन्त्यमरस्त्रियः । तदस्मै कांस्यमाहार्षीद्वारुणं कलशोदधिः २७
शङ्खप्रवरमादाय वासुदेवोभिषिक्तवान् । शैक्यं रुक्मसहस्रस्य बहुरत्नविभूषि-
तम् २८ दृष्ट्वा च मम तत्सर्वं ज्वररूपमिवाभवत् । गृहीत्वा तत्तु गच्छन्ति
समुद्रौ पूर्वदक्षिणौ २९ तथैव पश्चिमं यान्ति गृहीत्वा भरतर्षभ । उत्तरं तु
न गच्छन्ति विना तात पतत्रिणः ३० तत्र गत्वार्जुनो दण्डमाजहारामितं

एकेक ह्याप्रमाणें उंट व घोडचा ह्यांच्या तीनशें पागा तेथें आहेत आणि त्या युधि-ष्ठिरराजाच्या घरीं करभार घेऊन आलेले राजे एकेठिकाणीं रहात आहेत २१. हे भूपते, भिन्न भिन्न प्रकारचीं असंख्य रत्नें कुंतीपुत्र युधिष्ठिराला त्या श्रेष्ठ क्रतूमध्यें राजांनीं आणून दिलीं २२. सारांश, बुद्धिमान् पांडुपुत्राच्या यज्ञामध्यें जी संपत्ति मीं अवलोकन केली तशी संपत्ति (जन्मापासून) त्यापूर्वीं कधीं पाहिली नव्हती इतकेंच नव्हें परंतु, तशी संपत्ति कोठें आहे ह्मणून माझ्या ऐकण्यांत देखील नव्हतें २३. हे प्रजाधिपते राजा, शत्रूचा तो अपार धनप्रवाह अवलोकन केल्यापासून एकसारखी तीच गोष्ट माझ्या मनांत घोळत आहे व त्यामुळें मला चैन मुळींच पडत नाहीं २४. गाई बाळगून असलेल्या वाटधानसंज्ञक (जातिभ्रष्ट) ब्राह्मणांचे शेंकडों समुदाय तीन खर्व करभार घेऊन, आंत जाण्याचा द्वारपालांनीं प्रतिबंध केल्यामुळें, द्वाराशींच उभे राहिले २५ आणि सुवर्णाचे शुद्ध कमंडलु घेऊन आलेल्यांचीही तशीच अवस्था झाली. सारांश, (अशा प्रकारचें) हें (उत्कृष्ट) धन घेऊन आलेल्यांचाही आंत प्रवेश झाला नाहीं २६. देवांगनांनाही जो मधुपर्क इंद्राकरितां आणितां येणें शक्य नाहीं अशा प्रकारचा वरुणानें पाठविलेला मधुपर्क कांस्यपात्रांत घालून प्रत्यक्ष समुद्रच युधिष्ठिराकडे घेऊन आला २७ व सर्वोत्कृष्ट शंख घेऊन प्रत्यक्ष वासुदेवानें त्या युधिष्ठिराला अभिषेक केला. तेव्हां तें अवलोकन करून मला तर सर्व संतापरूपच असल्यासारिखें झालें. कारण, हे भरतश्रेष्ठा, अनेक रत्नांनीं भूषित अशा हजारों तोळे सुवर्णाच्या केलेल्या कावडी घेऊन युधिष्ठिराच्या अभिषेकाला उदक आणण्याकरितां लोक त्या यज्ञसमयीं (प्रथम) पूर्व, दक्षिण व पश्चिम समुद्राला गेले होते आणि, हे तात, उत्तर समुद्राकडे पक्ष्यांवांचून इतरांची गति

धनम्। इदं चाद्भुतमत्रासीत्तन्मे निगदतः शृणु ३१ पूर्णे शतसहस्रे तु विप्राणां परिविष्यताम्। स्थापिता तत्र संज्ञाभूच्छङ्खो ध्मायति नित्यशः ३२ मुहुर्मुहुः प्रणदतस्तस्य शङ्खस्य भारत। अनिशं शब्दमश्रौषं ततो रोमाणि मेहृषन् ३३ पार्थिवैर्बहुभिः कीर्णमुपस्थानं दिदृक्षुभिः। अशोभत महाराज नक्षत्रैर्द्यौरिवामला ३४ सर्वरत्नान्युपादाय पार्थिवा वै जनेश्वर। यज्ञे तस्य महाराज पाण्डुपुत्रस्य धीमतः ३५ वैश्या इव महीपाल द्विजातिपरिवेषकाः ३६ न सा श्रीर्देवराजस्य यमस्य वरुणस्य च। गुह्यकाधिपतेर्वापि या श्री राजन्युधिष्ठिरे ३७ तां दृष्ट्वा पाण्डुपुत्रस्य श्रियं परमिकामहम्। शान्तिं न परिगच्छामि दह्यमानेन चेतसा ३८ शकुनिरुवाच॥ यामेतामतुलां लक्ष्मीं दृष्टवानसि पाण्डवे। तस्याः प्राप्तावुपायं मे शृणु सत्यपराक्रम ३९ अहमक्षेष्वभिज्ञातः पृथिव्यामपि भारत। हृदयज्ञः पणज्ञश्च विशेषज्ञश्च देवने ४०

नाहीं (ह्मणून पक्षीच त्या समुद्राचें उदक घेऊन तेथें आले होते) २८, २९ ,३०. (हे राजा, उत्तरसमुद्राकडे पक्ष्यांवांचून इतरांची गति नसतांनाही) अर्जुनानें तेथें जाऊन अपरिमित द्रव्य आणिलें होतें. शिवाय हा आणखीही एक अद्भुत प्रकार ह्या यज्ञामध्यें झाला तो मी निवेदन करितों आपण श्रवण करा ३१. एक लक्ष ब्राह्मणभोजन झालें ह्मणजे तें समजण्याकरितां एक खूण ह्मणून ठेविलेला शंख नित्य वाजतअसे ३२ आणि हे भरतकुलोत्पन्ना राजा, वारंवार वाजत असलेल्या त्या शंखाचा एकसारखा ध्वनि श्रवण करून माझ्या अंगावर तर कांटाच येई ३३. हे महाराजा, नक्षत्रांनीं व्याप्त झालेलें निर्मल गगनमंडल ज्याप्रमाणें शोभतें त्याचप्रमाणें अवलोकन करण्याची इच्छा करणाऱ्या अनेक राजांनीं भरून गेलेलें तें सभास्थान शोभत होतें ३४. हे प्रजाधिपते महाराजा भूपाला, त्या बुद्धिमान् पांडुपुत्राच्या यज्ञामध्यें वैश्याप्रमाणें कर देण्याकरितां सर्व प्रकारचीं रत्नें घेऊन आलेले भूपति द्विजांना वाढण्याचें काम करीत होते ३५,३६. सारांश, हे राजा, युधिष्ठिराच्या संपत्तीप्रमाणें इंद्र, यम, वरुण अथवा कुबेर ह्यांचीही संपत्ति नाहीं ३७. ती पांडुपुत्राची पराकाष्ठेची संपत्ति अवलोकन केल्यापासून माझ्या अंतःकरणाचा भडका झाल्यामुळें मला स्वस्थता मुळींच वाटत नाहीं ३८. शकुनि ह्मणतोः—हे अमोघपराक्रमी दुर्योधना, पांडुपुत्र युधिष्ठिराचे ठिकाणीं जें हें वैभव तूं अवलोकन केलेस तें प्राप्त होण्याविषयीं मी उपाय सांगतों तो तूं श्रवण कर ३९. हे भरतकुलोत्पन्ना दुर्योधना, फांसे कसे टाकावे ह्यांत मी सर्व पृथ्वीमध्यें प्रवीण असून ते पडूं लागले असतां जय अथवा पराजय कोणाचा आहे हें मर्मही जाणण्यांत मी कुशल आहें व त्याचप्रमाणें पणाला अनुसरून द्रव्याची योजना

द्यूतप्रियश्च कौन्तेयो न च जानाति देवितुम् । आहूतश्चैष्यति व्यक्तं द्यूतादपि रणादपि ४१ नियतं तं विजेष्यामि कृत्वा तु कपटं विभो । आनयामि समृद्धिं तां दिव्यां चोपाह्वयस्व तम् ४२ वैशम्पायन उवाच॥ एवमुक्तः शकुनिना राजा दुर्योधनस्ततः । धृतराष्ट्रमिदं वाक्यमपदान्तरमब्रवीत् ४३ अयमुत्सहते राजञ्छ्रियमाहर्तुमक्षवित् । द्यूतेन पाण्डुपुत्रस्य तदनुज्ञातुमर्हसि ४४ धृतराष्ट्र उवाच ॥ क्षत्ता मन्त्री महाप्राज्ञः स्थितो यस्यास्मि शासने । तेन संगम्य वेत्स्यामि कार्यस्यास्य विनिश्चयम् ४५ स हि धर्मं पुरस्कृत्य दीर्घदर्शी परं हितम् । उभयोः पक्षयोर्युक्तं वक्ष्यत्यर्थविनिश्चयम् ४६ दुर्योधन उवाच ॥ निवर्तयिष्यति त्वासौ यदि क्षत्ता समेष्यति । निवृत्ते त्वयि राजेन्द्र मरिष्येहमसंशयम् ४७ स त्वं मयि मृते राजन्विदुरेण सुखी भव । भोक्ष्यसे पृथिवीं कृत्स्नां किं मया त्वं करिष्यसि ४८ वैशम्पायन उवाच ॥ आर्तवाक्यं तु तत्तस्य प्रणयोक्तं निशम्य

कशी करावयाची हेंही मला उत्तमप्रकारें समजत असून द्यूत खेळण्याची वेळा, ठिकाण वगैरे विशेष गोष्टी जाणण्यांतही मी निपुण आहें ४०. कुंतीपुत्र युधिष्ठिराला द्यूत प्रिय आहे आणि ते खेळावें कसें हें तर त्याला समजत नाहीं. शिवाय, द्यूताला अथवा युद्धाला आव्हान केलें असतां तो निःसंशय येणारच ४१. तेव्हां हे प्रभो दुर्योधना, मी कपट करून त्याला निःसंशय जिंकीन आणि ती दिव्य संपत्ति येथें आणीन. करितां, तूं त्याला आव्हान कर ४२. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें शकुनीनें भाषण केलें असतां दुर्योधन राजा विलंब मुळींच न करितां धृतराष्ट्राला ह्मणाला ४३ " हे राजा, हा अक्षविद्या जाणणारा शकुनि द्यूताच्या योगानें पांडुपुत्र युधिष्ठिराची संपत्ति हरण करण्याचा हुरूप धरीत आहे. तस्मात्, आपण त्याला द्यूताची अनुज्ञा द्यावी "४४. धृतराष्ट्र ह्मणतोः—महाविचारी विदुर माझा मंत्री आहे व मी त्याच्या आज्ञेंत आहें. तेव्हां त्याची भेट झाल्यानंतर मी ह्या कृत्याचा काय तो निश्चय करण्याचें पाहीन ४५. कारण, तो दूरदर्शी विदुर धर्माला अनुसरून उभयपक्षांचें उत्कृष्ट हित कशांत आहे ह्याचा विचार केल्यानंतर ह्या गोष्टीचा काय तो योग्य निर्णय सांगेल ४६. दुर्योधन ह्मणतोः—तुमची भेट झाल्यावर विदुर ह्या कृत्यापासून तुह्मांला परावृत्त करील आणि तुह्मी जर परावृत्त झाला तर, हे नृपश्रेष्ठ, मी निःसंशय प्राण देईन ४७. मग हे राजा, तूं आपला मी मेल्यानंतर विदुराबरोबर सुखानें रहा. कारण, (तसें झालें असतां) तुला सर्व पृथ्वीचा उपभोग घेण्यास तरी सांपडेल. खरोखर माझ्याशीं तुला काय कर्तव्य आहे बरें ? ४८. वैशंपायन सांगतातः—ते त्याचें लाडिवाळपणानें तोंडांतून निघालेले

सः । धृतराष्ट्रोऽब्रवीत्प्रेष्यान्दुर्योधनमते स्थितः ४९ स्थूणासहस्रैर्बृहतीं शतद्वारां सभां मम । मनोरमां दर्शनीयामाशु कुर्वन्तु शिल्पिनः ५० ततः संस्तीर्य रत्नैस्तां तक्ष्ण आनाय्य सर्वशः । सुकृतां सुप्रवेशां च निवेदयत मे शनैः ५१ दुर्योधनस्य शान्त्यर्थमिति निश्चित्य भूमिपः । धृतराष्ट्रो महाराज प्राहिणोद्विदुराय वै ५२ अपृष्ट्वा विदुरं स्वस्य नासीत्कश्चिद्विनिश्चयः । द्यूते दोषांश्च जानन्स पुत्रस्नेहादकृष्यत ५३ तच्छ्रुत्वा विदुरो धीमान्कलिद्वारमुपस्थितम् । विनाशमुखमुत्पन्नं धृतराष्ट्रमुपाद्रवत् ५४ सोऽभिगम्य महात्मानं भ्राता भ्रातरमग्रजम् । मूर्ध्ना प्रणम्य चरणाविदं वचनमब्रवीत् ५५ विदुर उवाच ॥ नाभिनन्दामि ते राजन्व्यवसायमिमं प्रभो । पुत्रैर्भेदो यथा न स्याद्द्यूतहेतोस्तथा कुरु ५६ धृतराष्ट्र उवाच ॥ क्षत्तः पुत्रेषु पुत्रैर्मे कलहो न भविष्यति । यदि देवाः प्रसादं नः करिष्यन्ति न संशयः ५७ अशुभं वा शुभं वापि हितं वा यदि वाहितम् । प्रवर्ततां सुहृद्द्यूतं दिष्टमेतन्न

दुःखोद्गार श्रवण करून दुर्योधनाच्या मताप्रमाणें वागणाऱ्या त्या धृतराष्ट्रानें सेवकांना आज्ञा केली कीं ४९ " हजारों स्तंभ व शेंकडों द्वारें ह्यांनीं युक्त, मनोहर व सुंदर असें एक भव्य सभास्थान मजकरितां शिल्पी लोकांना सत्वर तयार करून द्या ५० आणि तदनंतर आस्तरणें घालून व सुतार आणून तिचा आकार व प्रवेशद्वारें अगदीं उत्तम प्रकारचीं झालीं ह्मणजे मला बेतानें निवेदन करा " ५१. ह्याप्रमाणें दुर्योधन शांत होण्याकरितां (द्यूतस्थान करण्याचा) निश्चय करून, हे महाराज जनमेजया, धृतराष्ट्राजानें विदुराकडे दूत पाठविले ५२. कारण, विदुराला विचारिल्यावांचून स्वतः कसलाच निश्चय तो करीत नसे. परंतु, द्यूतसंबंधीं दोष जाणीत असूनही पुत्रप्रेमामुळें त्याचें मन त्याला तिकडे ओढूं लागलें होतें ५३. ह्याप्रमाणें तें कलहाचें मूळ ह्मणजे अर्थात् नाशाचें द्वार उपस्थित झाल्याचें श्रवण करून विवेकी विदुर धृतराष्ट्राकडे निघाला ५४ आणि महात्म्या ज्येष्ठ भ्रात्याचे समीप गेल्यावर त्याच्या चरणीं मस्तक ठेवून तो भ्राता विदुर त्याला ह्मणाला ५५ " हे राजा, हा बेत मला नीट दिसत नाहीं. हे प्रभो, द्यूतामुळें पुत्रां(समान असलेल्या पांडवां)शीं कलह न होईल अशा रीतीनें काय कर्तव्य असेल तें तूं कर " ५६. धृतराष्ट्र ह्मणतोः—हे विदुरा, देव जर आमच्यावर कृपा करितील तर निःसंशय पांडुपुत्रांशीं माझ्या पुत्रांचा कलह होणार नाहीं ५७. करितां, अशुभ असो अथवा शुभ असो व त्याचप्रमाणें हितकारक असो वा अहितकारक असो मित्रभावानें द्यूत प्रवृत्त होऊं द्या. कारण, (ज्याअर्थीं दुर्योधन प्राणत्याग करण्यास उद्युक्त झाला आहे त्याअर्थीं) द्यूत होणार हें दैवविहितच ठरलेलें आहे ह्यांत

संशयः ५८ मयि संनिहिते द्रोणे भीष्मे त्वयि च भारत । अनयो दैवविहितो न कथंचिद्भविष्यति ५९ गच्छ त्वं रथमास्थाय हयैर्वातसमैर्जवे। खाण्डवप्रस्थमद्यैव समानय युधिष्ठिरम् ६० न वाच्यो व्यवसायो मे विदुरैतद्ब्रवीमि ते । दैवमेव परं मन्ये येनैतदुपपद्यते ६१ इत्युक्तो विदुरो धीमान्नेदमस्तीति चिन्तयन्। आपगेयं महाप्राज्ञमभ्यगच्छत्सुदुःखितः ६२ [१८१८]

इति॰ सभापर्वणि द्यूतपर्वणि दुर्योधनसंताप एकोनपञ्चाशत्तमोऽध्यायः ॥४९॥

जनमेजय उवाच ॥ कथं समभवद्द्यूतं भ्रातॄणां तन्महात्ययम् । यत्र तद्व्यसनं प्राप्तं पाण्डवैर्मे पितामहैः १ के च तत्र सभास्तारा राजानो ब्रह्मवित्तम । के चैनमन्वमोदन्त के चैनं प्रत्यषेधयन् २ विस्तरेणैतदिच्छामि कथ्यमानं त्वया द्विज । मूलं ह्येतद्विनाशस्य पृथिव्या द्विजसत्तम ३ सौतिरुवाच ॥ एवमुक्तस्ततो राज्ञा व्यासशिष्यः प्रतापवान् । आचचक्षेथ यद्वृत्तं तत्सर्वं वेदतत्त्ववित् ४ वैशम्पायन उवाच ॥ शृणु मे विस्तरेणेमां कथां भारतसत्तम । भूय

संशय नाहीं ५८. परंतु, हे भरतकुलोत्पन्ना विदुरा, मी, द्रोण, भीष्म व तूं असे समीप असतांना दुर्दैवानें त्यांत अन्याय कदापि होणार नाहीं ५९. तेव्हां, वायुसदृश वेगवान् अश्व जोडिलेल्या रथांत बसून तूं आजच्या आज खांडवप्रस्थाला जा आणि युधिष्ठिराला घेऊन ये ६०. हे विदुरा, ह्या माझ्या निश्चयाला तूं दोष देऊं नको; हें मी तुला सांगून ठेवितों. अरे, ज्याअर्थी असा प्रसंग येत आहे त्याअर्थी दैवच बलवत्तर आहे असें मला वाटतें ६१. ह्याप्रमाणें विवेकी विदुराला धृतराष्ट्रानें सांगितलें असतां तो विदुर अत्यंत दुःखित झाला आणि "हें नीट नव्हें ; हें नीट नव्हें" असें मनांत ह्मणत ह्मणत महाज्ञानी भीष्मांकडे गेला ६२. ह्याप्रमाणें॰ श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वांपैकीं दुर्योधनाच्या संतापाविषयीं एकुणपंनासावा अध्याय समाप्त झाला ॥ ४९ ॥

जनमेजय प्रश्न करितोः—ज्यामुळें माझ्या पितामह पांडवांना तें (वनवासाचें) संकट भोगावें लागलें तें मोठी हानि करण्यास कारणीभूत झालेलें द्यूत त्या उभयतां भ्रात्यांमध्यें कसें झालें ? १. त्या द्यूतसभेमध्यें कोणते राजे सभासद होते ? ह्या दुर्योधनाला द्यूताविषयीं अनुमोदन कोणीं कोणीं दिलें व त्याचप्रमाणें ह्याला निषेध कोणीं कोणीं केला हें सर्व, हे महाब्रह्मनिष्ठ २ द्विज, आपल्या मुखांतून सविस्तर श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. कारण, हे द्विजश्रेष्ठ, हेंच पृथ्वीच्या नाशाचें मूळ आहे ३. सौति सांगतोः—ह्याप्रमाणें जनमेजयराजानें प्रश्न केला असतां वेदतत्त्ववेत्त्या प्रतापी व्यासशिष्य वैशंपायन मुनींनीं जें जें घडलें तें सर्व कथन केलें ४. वैशंपायन सांगतातः—हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजय महाराजा, आणखीही श्रवण करण्याचें जर तुझ्या मनांत असेल

एव महाराज यदि ते श्रवणे मतिः५विदुरस्य मतं ज्ञात्वा धृतराष्ट्रोऽम्बिकासुतः।
दुर्योधनमिदं वाक्यमुवाच विजने पुनः ६ अलं द्यूतेन गान्धारे विदुरो न
प्रशंसति। न ह्यसौ सुमहाबुद्धिरहितं नो वदिष्यति७हितं हि परमं मन्ये विदुरो
यत्प्रभाषते । क्रियतां पुत्र तत्सर्वमेतन्मन्ये हितं तव ८ देवर्षिर्वासवगुरुर्दे-
वराजाय धीमते। यत्प्राह शास्त्रं भगवान्बृहस्पतिरुदारधीः ९ तद्वेद विदुरः
सर्वं सरहस्यं महाकविः । स्थितस्तु वचने तस्य सदाहमपि पुत्रक १०
विदुरो वापि मेधावी कुरूणां प्रवरो मतः । उद्धवो वा महाबुद्धिर्वृष्णीना-
मर्चितो नृप ११ तदलं पुत्र द्यूतेन द्यूते भेदो हि दृश्यते । भेदे विनाशो
राज्यस्य तत्पुत्र परिवर्जय १२ पित्रा मात्रा च पुत्रस्य यद्वै कार्यं परं स्मृतम् ।
प्राप्तस्त्वमसि तन्नाम पितृपैतामहं पदम् १३ अधीतवान्कृती शास्त्रे
लालितः सततं गृहे । भ्रातृज्येष्ठः स्थितो राज्ये विन्दसे किं न शोभनम् १४

तर ही सविस्तर कथा माझ्यापासून तूं श्रवण कर ५. प्रथमतः विदुराचें मत काय पडतें तें पाहून अंबिकापुत्र धृतराष्ट्र एकांत स्थलीं पुनरपि दुर्योधनाला ह्मणाला ६ " हे गांधारीपुत्रा, द्यूत पुरे. कारण, विदुर तें प्रशस्त ह्मणत नाहीं आणि हा अत्यंत महाविवेकी विदुर आपणांला कधींही अहिताची गोष्ट सांगणार नाहीं ७. तेव्हां, विदुर जें सांगत आहे तेंच पराकाष्ठेचें हितावह आहे असें मला वाटतें. करितां, हे पुत्रा, विदुराच्या ह्मणण्याप्रमाणें तूं सर्व कांहीं कर; ह्मणजे ह्यांत तुझें हित आहे असें मी समजतों ८. अरें, इंद्रगुरु महाबुद्धिमान् देवर्षि भगवान् बृहस्पतींनीं बुद्धिमान् देवराजाला जें शास्त्र सांगितलें ९ तें सर्व त्यांतील रहस्यासहवर्तमान महाज्ञानी विदुर जाणीत आहे आणि हे पुत्रा, मी सर्वदां त्या विदुराच्या आज्ञेंत वागणारा आहें १०. कारण, हे दुर्योधन राजा, (खरे विचारी पुरुष काय ते दोन आहेत) कुरुवंशजांमध्यें श्रेष्ठ ह्मणून अभिमत असलेला विवेकी विदुर किंवा वृष्णिवंशजांना मान्य असलेला महाबुद्धिमान् उद्धव ११. ह्यास्तव, हे पुत्रा, द्यूत नको. अरे, द्यूतापासून कलह होत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें आणि कलहामुळें राज्याचा नाश होत असल्याचें दिसतें. ह्मणून, हे पुत्रा, तें तूं वर्ज कर १२. (अरे, संपत्तीकरितां द्यूताकडे आज तुझ्या मनाचा कल कां असावा ? तुला कांहीं कमी कां आहे ?) अरे, पुत्राकरितां मातापितरांचें जें काय मुख्यतः कर्तव्य ह्मणून ह्मटलें आहे तें पितृपितामहापासून चालत आलेलें राज्यपद तर तुला (कधींच) प्राप्त झालें आहे १३. तुझें अध्ययन झालें आहे, शास्त्रांत तूं निपुण आहेस, घरीं तुझे लाड एकसारखे पुरविले जातात आणि सर्व भ्रात्यांमध्यें तूं ज्येष्ठ असल्यामुळें राज्यावरही तूंच आहेस. तेव्हां कोणती चांगली गोष्ट तुला प्राप्त होण्याची राहिली आहे बरें ? १४.

पृथग्जनैरलभ्यं यद्भोजनाच्छादनं परम्। तत्प्राप्तोसि महाबाहो कस्माच्छो-
चसि पुत्रक १५ स्फीतं राष्ट्रं महाबाहो पितृपैतामहं महत् । नित्यमाज्ञा-
पयन्भासि दिवि देवेश्वरो यथा १६ तस्य ते विदितप्रज्ञ शोकमूलमिदं
कथम् । समुत्थितं दुःखकरं तन्मे शंसितुमर्हसि १७ दुर्योधन उवाच ॥
अश्नाम्याच्छादयामीति प्रपश्यन्पापपूरुषः । नामर्षं कुरुते यस्तु पुरुषः
सोऽधमः स्मृतः १८ न मां प्रीणाति राजेन्द्र लक्ष्मीः साधारणी विभो ।
ज्वलितामेव कौन्तेये श्रियं दृष्ट्वा च विव्यथे १९ सर्वां च पृथिवीं चैव
युधिष्ठिरवशानुगाम् । स्थिरोस्मि योहं जीवामि दुःखादेतद्ब्रवीमि ते २०
आवर्जिता इवाभान्ति नीपाश्चित्रककौकुराः । कारस्कारा लोहजङ्घा
युधिष्ठिरनिवेशने २१ हिमवत्सागरानूपाः सर्वे रत्नाकरास्तथा । अन्त्याः
सर्वे पर्युदस्ता युधिष्ठिरनिवेशने २२ ज्येष्ठोयमिति मां मत्वा श्रेष्ठश्चेति
विशांपते । युधिष्ठिरेण सत्कृत्य युक्तो रत्नपरिग्रहे २३ उपस्थितानां

अरे, साधारण लोकांना कधींही प्राप्त न होणारें जें सर्वोत्कृष्ट अन्नाच्छादन तें तुला प्राप्त झालें आहे. तस्मात्, हे महापराक्रमी पुत्रा, तूं दुःख कशाकरितां करीत आहेस? १५. हे महासामर्थ्यवान् पुत्रा, वंशपरंपरेनें चालत आलेल्या ह्या समृद्ध महाराष्ट्राला नित्य आज्ञा करीत असलेला तूं स्वर्गांतील इंद्राप्रमाणें भासत आहेस १६. तस्मात्, हे प्रख्यातबुद्धिमान् दुर्योधना, हें दुःखकारक शोकमूल सर्वसमृद्धींनीं युक्त असलेल्या त्या तुझे ठिकाणीं कसें उपस्थित झालें हें मला सांग १७. दुर्योधन ह्मणतोः—अन्नाच्छादनांचा उपभोग मिळत आहे एवढेंच पहात बसणारा पुरुष पापी समजावा. कारण, (फक्त अन्नाच्छादनांवरच संतुष्ट होऊन परोत्कर्षविषयीं) असहिष्णुता धारण न करणारा पुरुष अधम होय असें ह्मटलें आहे १८. हे प्रभो, ह्या सामान्य राज्यलक्ष्मीनें माझा संतोष होत नाहीं. कुंतीपुत्र युधिष्ठिराचे ठिकाणीं असलेली उज्ज्वल संपत्ति अवलोकन केल्यापासून माझ्या अंतःकरणाला दुःख होत आहे १९. त्याचप्रमाणें ही सर्व पृथ्वी युधिष्ठिराची आज्ञांकित होऊन राहिली आहे हें अवलोकन करून मला फारच व्यथा होत आहे आणि इतकें दुःसह दुःख होत असूनही जिवंत राहणारा मी पाषाणाचा निर्माण झालों आहें हेंही तुला दुःखानें मी सांगत आहें २०. अरे, नीप, चित्रक, कौकुर, कारस्कर व लोहजंघ हे युधिष्ठिराच्या घरीं दास होऊन पडल्यासारखे दिसतात २१. हिमालयपर्वत व समुद्र ह्यांचे समीप असलेल्या अनूपप्रदेशांवर अंमल करणारे राजे, समुद्रतीरनिवासी सर्व नृप आणि देशाच्या सीमेवरील अधिपति ह्या सर्वांची युधिष्ठिराच्या घरीं दादही लागत नाहीं २२. हे प्रजाधिपते,

रत्नानां श्रेष्ठानामर्घहारिणाम् । नादृश्यत परः पारो नापरस्तत्र भारत २४
न मे हस्तः समभवद्वसु तत्प्रतिगृह्णतः । अतिष्ठन्त मयि श्रान्ते गृह्य दूरा-
हृतं वसु २५ कृतां बिन्दुसरोरत्नैर्मयेन स्फाटिकच्छदाम् । अपश्यन्नलिनीं
पूर्णामुदकस्येव भारत २६ वस्त्रमुत्कर्षति मयि प्राहसत्स वृकोदरः । शत्रो-
र्ऋद्धिविशेषेण विमूढं रत्नवर्जितम् २७ तत्र स्म यदि शक्तः स्यां पात-
येहं वृकोदरम् । यदि कुर्यां समारम्भं भीमं हन्तुं नराधिप २८ शिशुपाल
इवास्माकं गतिः स्यान्नात्र संशयः । सपत्नेनावहासो मे स मां दहति
भारत २९ पुनश्च तादृशीमेव वापीं जलजशालिनीम् । मत्वा शिलासमां
तोये पतितोस्मि नराधिप ३० तत्र मां प्राहसत्कृष्णः पार्थेन सह सुस्वरम् ।
द्रौपदी च सह स्त्रीभिर्व्यथयन्ती मनो मम ३१ क्लिन्नवस्त्रस्य तु जले

" हा ज्येष्ठ असून श्रेष्ठही आहे " असा माझ्या संबंधानें मनामध्यें विचार आणून युधिष्ठिरानें सत्कारपूर्वक (कराकरितां राजांकडून येत असलेल्या) उत्कृष्ट वस्तूंचा स्वीकार करण्याकडे माझी योजना केली होती२३. हे भरतवंशजा, मूल्यवान् असलेल्या उत्कृष्ट वस्तु ज्या माझ्या समोर येऊन पडल्या होत्या त्या कोठपासून कोठपर्यंत पडल्या आहेत ह्याचा त्या ठिकाणीं मला पत्ताही लागला नाहीं२४. खंडणीकरितां राजांनीं वगैरे आणिलेलें तें द्रव्य घेतां घेतां माझ्या हाताचें सामर्थ्य नाहींसें होत असें आणि मी थकून जाऊन विश्रांति घेत बसलों असतांना कर देण्याकरितां दूरदूरच्या प्रदेशांतून आणिलेलें तें द्रव्य घेऊन राजांना तिष्ठत राहवें लागत असें २५. हे भरतकुलोत्पन्ना, बिंदुसरोवरापासून आणिलेल्या रत्नांचें एक पारदर्शक कृत्रिम सरोवर उदकानें परिपूर्ण भरल्यासारखें भासणारें मयासुरानें निर्माण केलें होतें २६. त्याचे समीप आल्यावर (तें वास्तविकच सरोवर आहे असें समजून) मी आपलें वस्त्र आवरून घेऊं लागलों असतां शत्रूच्या असाधारण संपत्तीमुळें गांगरून गेलेल्या व रत्नरहित असलेल्या मला तो भीमसेन हंसला२७. मी जर समर्थ असतों तर त्या भीमसेनाला तेथेंच उलथून टाकिला असता. परंतु, (करूं काय?) हे राजा, भीमसेनाच्या वधाचें मीं जर कांहीं नांव काढिलें असतें २८ तर शिशुपालाप्रमाणेंच आमची गति झाली असती ह्यांत संशय नाहीं. हे भारता, तो शत्रूनें केलेला उपहास माझ्या अंगाचा दाह करीत आहे २९. हे नराधिपा, पुनरपिही तसल्याच प्रकारचीं एक कमलांनीं परिपूर्ण असलेली वापी लागली असतां तीही वास्तविक वापी नसून पूर्वीप्रमाणें पाषाणमय भूमिच असेल असें समजून मी उदकामध्यें पडलों ३०; पडल्याबरोबर अर्जुनासहवर्तमान कृष्ण तर चांगला तालसुरावर मला हंसला आणि माझ्या मनाला आणखी दुःख देण्याकरितां स्त्रियांसहवर्तमान

किंकरा राजनोदिताः। ददुर्वासांसि मेन्यानि तच्च दुःखं परं मम ॥ प्रलम्भं च शृणुत्वान्यद्वदतो मे नराधिप ३२ अद्वारेण विनिर्गच्छन्द्वारसंस्थानरूपिणा। अभिहत्य शिलां भूयो ललाटेनास्मि विक्षतः ३३ तत्र मां यमजौ दूरादालोक्याभिहतं तदा। बाहुभिः परिगृह्णीतां शोचन्तौ सहितावुभौ ३४ उवाच सहदेवस्तु तत्र मां विस्मयन्निव। इदं द्वारमितो गच्छ राजन्निति पुनः पुनः ३५ भीमसेनेन तत्रोक्तो धृतराष्ट्रात्मजेति च। संबोध्य प्रहसित्वा च इतो द्वारं नराधिप ३६ नामधेयानि रत्नानां पुरस्तान्न श्रुतानि मे। यानि दृष्टानि मे तस्यां मनस्तपति तच्च मे ३७ [१८५५]
इति० सभापर्वणि द्यूतपर्वणि दुर्योधनसंतापे पञ्चाशत्तमोध्यायः ॥ ५० ॥

दुर्योधन उवाच ॥ यन्मया पाण्डवेयानां दृष्टं तच्छृणु भारत। आहृतं भूमिपालैर्हि वसु मुख्यं ततस्ततः १ नाविदं मूढमात्मानं दृष्ट्वाहं तदरेर्धनम्। फलतो भूमितो वापि प्रतिपद्यस्व भारत २ और्णान्बैलान्वार्षदंशा-

---

द्रौपदीनेंही तसेंच केलें ३१. असो. (उदकांत पडल्यामुळें) माझीं वस्त्रप्रावरणें भिजून गेलीं असतां राजाच्या आज्ञेवरून त्याच्या सेवकांनीं जीं दुसरीं वस्त्रें आणून दिलीं तें तर मला पराकाष्ठेचेंच दुःख झालें आहे. हे राजा, आणखीही एक स्वतःचा उपहास मी सांगतों तो तूं श्रवण कर ३२. द्वार नसतांना द्वाराची आकृति असलेल्या ठिकाणांतून मी द्वार समजून बाहेर जाऊं लागलों असतां धोंड्याचा सपाटा बसून माझ्या कपाळाला खोक पडली ३३. तेव्हां त्या ठिकाणीं मला लागल्याचें लांबून पहातांक्षणीं उभयतां नकुलसहदेव जवळ आले, नंतर "अरेरे! अरेरे!" असें ह्मणत ह्मणत त्या उभयतांनीं मला हातांनीं उचलून धरिला ३४ व तदनंतर "हे राजा, इकडून चल; हें द्वार; हे राजा, इकडून चल; हें द्वार;" असें वारंवार हंसल्यासारिखें करून सहदेव मला ह्मणाला ३५ आणि "हे धृतराष्ट्रपुत्रा (ह्मणजे अर्थात् हे अंधपुत्रा)" असें संबोधून "अरे द्वार इकडे आहे" असें भीमसेनानें, हे राजा, त्याचठिकाणीं उपहासपूर्वक मला सांगितलें ३६. असो. त्या सभेमध्यें जीं रत्नें मीं प्रत्यक्ष अवलोकन केलीं त्यांचीं नांवेंही पूर्वीं मीं कधीं ऐकिलेलीं नव्हतीं आणि त्यामुळें तर माझ्या मनाचा (फारच) संताप झाला आहे ३७. ह्याप्रमाणें ० सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं दुर्योधनाच्या संतापाविषयीं पंनासावा अध्याय समाप्त झाला ॥ ५० ॥

दुर्योधन ह्मणतोः—हे भरतकुलोत्पन्ना, ठिकठिकाणाहून राजांनीं पांडुपुत्रांकडे जें उत्तम उत्तम द्रव्य आणिलेलें माझ्या दृष्टीं पडलें तें तूं श्रवण कर १. शत्रूचें तें धन पाहून थक्क झाल्यानें माझें देहभान सुटलें होतें. त्यामुळें तें किति होतें आणि कोणकोणत्या प्रदेशांतून आलेलें होतें हेंही माझ्या लक्ष्यांत नाहीं. तथापि, हे भारता, कांहीं

जातरूपपरिष्कृतान् । प्रावाराजिनमुख्यांश्च काम्बोजः प्रददौ बहून् ३ अश्वांस्तित्तिरिकल्माषांस्त्रिशतं शुकनासिकान् । उष्ट्रवामीस्त्रिशतं च पुष्टाः पीलुशमीङ्गुदैः ४ गोवासना ब्राह्मणाश्च दासनीयाश्च सर्वशः । प्रीत्यर्थं ते महाराज धर्मराज्ञो महात्मनः ५ त्रिखर्वं बलिमादाय द्वारि तिष्ठन्ति वारिताः ६ ब्राह्मणा वाटधानाश्च गोमन्तः शतसङ्घशः । कमण्डलूनुपादाय जातरूपमयाञ्छुभान् ७ एवं बलिं समादाय प्रवेशं लेभिरे न च । शतं दासीसहस्राणां कार्पासिकनिवासिनाम् ८ श्यामास्तन्व्यो दीर्घकेश्यो हेमाभरणभूषिताः । शूद्रा विप्रोत्तमार्हाणि राङ्कवाण्यजिनानि च ९ बलिं च कृत्स्नमादाय भरुकच्छनिवासिनः । उपनिन्युर्महाराज हयान्गान्धारदेशजान् १० इन्द्रकृष्टैर्वर्तयन्ति धान्यैर्ये च नदीमुखैः । समुद्रनिष्कुटे जाताः पारेसिन्धु च मानवाः ११ ते वैरामाः पारदाश्च आभीराः कितवैः सह । विविधं

ठीक ठीक द्रव्य लक्ष्यांत असलेलें मी तुला सांगत आहें तें तूं श्रवण कर २. कांबोज राजानें मेंढे, मूषकादि बिळनिवासी प्राणी व मार्जार ह्यांच्या लोकरीचीं कलाबतू घालून तयार केलेलीं वस्त्रें व इतरही उत्तम उत्तम ऊर्णावस्त्रें आणि अजिनें युधिष्ठिराला विपुल दिलीं ३ आणि तित्तिरि पक्ष्याप्रमाणें चित्रविचित्र वर्णानें व शुकचंचूसारख्या वर्णानें युक्त असलेले तीनशें अश्व आणि—अक्रोडें, शमी व हिंगणबेटें खाऊन पुष्ट झालेले—तीनशें उंट व घोड्या असेंही धन त्यानें युधिष्ठिराला दिलें ४. हे महाराजा, बैल बाळगून शेतकीचा वगैरे धंदा करणारे आणि सर्वस्वीं दास्यकर्माला योग्य असलेले (हीनजातीय) ब्राह्मण महात्म्या धर्मराजाची प्रीति संपादन करण्याकरितां तीन खर्व करभार घेऊन आले असतांनाही आंत जाण्याला प्रतिबंध होऊन द्वाराशीं उभे राहिले होते ५,६ आणि गोधनसंपन्न असलेले वाटधानसंज्ञक (जातिभ्रष्ट) ब्राह्मणही सुवर्णमय शुद्ध कमंडलु घेऊन आले असतांना त्यांचाही प्रवेश झाला नाहीं ७. ह्याचप्रमाणें शालू नेसलेल्या एक लक्ष दासी करभार ह्मणून घेऊन आलेल्यांचाही आंत प्रवेश झाला नाहीं ८. तारुण्य, सौंदर्य व दीर्घकेश ह्यांनीं युक्त असून सुवर्णालंकारांनीं भूषित अशा शूद्रजातीय दासी आणि विप्रश्रेष्ठांना योग्य असलेलीं रंकुसंज्ञकमृगरोमाजिनें कर ह्मणून बरोबर घेऊन आलेल्या राजांचीही तशीच स्थिति झाली ९. हे महाराजा, समुद्रतीरीं वास्तव्य करणाऱ्या राजांनीं सर्व करभार देऊन गांधारदेशीय अश्वही युधिष्ठिराला अर्पण केले १०. नांगरटी वगैरे केल्यावांचून फक्त पर्जन्यानें अथवा नदीच्या उदकानें येणाऱ्या धान्यावर निर्वाह करणारे असे समुद्रसांनिध क्षेत्रांत जन्मलेले व समुद्राच्या पलीकडे असणारे ११, वैराम, पारद, आभीर व कितव हे

बलिमादाय रत्नानि विविधानि च १२ अजाविकं गोहिरण्यं खरोष्ट्रं फलजं मधु । कम्बलान्विविधांश्चैव द्वारि तिष्ठन्ति वारिताः १३ प्राग्ज्योतिषाधिपः शूरो म्लेच्छानामधिपो बली । यवनैः सहितो राजा भगदत्तो महारथः १४ आजानेयान्हयाञ्छीघ्रानादायानिलरंहसः । बलिं च कृत्स्नमादाय द्वारि तिष्ठति वारितः १५ अश्मसारमयं भाण्डं शुद्धदन्तत्सरूनसीन् । प्राग्ज्योतिषाधिपो दत्त्वा भगदत्तोव्रजत्तदा १६ द्व्यक्षांस्त्र्यक्षाल्ँलाटाक्षान्नानादिग्भ्यः समागतान् । औष्णीकानन्तवासांश्च रोमकान्पुरुषादकान् १७ एकपादांश्च तत्राहमपश्यं द्वारि वारितान् । राजानो बलिमादाय नानावर्णाननेकशः १८ कृष्णग्रीवान्महाकायान्रासभान्दूरपातिनः । आजह्रुर्दशसाहस्रान्विनीतान्दिक्षु विश्रुतान् १९ प्रमाणरागसंपन्नान्वङ्क्षुतीरसमुद्भवान् । बल्यर्थं ददतस्तस्मै हिरण्यं रजतं बहु ॥ दत्त्वा प्रवेशं प्राप्तास्ते युधिष्ठिरनिवेशने २० इन्द्रगोपकवर्णाभाञ्छुकवर्णान्मनोजवान् । तथैवेन्द्रायुधनिभान्संध्याभ्रसदृशानपि २१ अनेकवर्णानारण्यान्गृहीत्वाश्वा-

---

लोक नानाप्रकारचा कर ह्मणजे शेळ्या, मेंढ्या, गाई, सुवर्ण, गर्दभ, उष्ट्र, फलसंबंधीं मद्य व अनेकजातीचीं ऊर्णावस्त्रें वगैरे नानाप्रकारच्या उत्कृष्ट वस्तु घेऊन आले असून आंत प्रवेश होण्यास प्रतिबंध झाल्यामुळें द्वारासमीप उभे राहिले होते १२,१३. अरे, प्राग्ज्योतिषदेशाधिपति व म्लेच्छांचा स्वामी जो बलाढ्य महारथी शूर भगदत्तराजा तो यवनांसहवर्तमान १४ वायूसारखे वेगवान् असलेले शीघ्रगामी जातिवंत अश्व व संपूर्ण कर घेऊन आला असतां द्वारपालांनीं जाण्यास प्रतिबंध केल्यामुळें द्वाराशींच उभा राहिला १५ आणि नंतर रत्नमय भूषणें व शुद्धहस्तिदंताच्या मुठी घसविलेले खड्ग देऊन तो प्राग्ज्योतिषदेशाधिपति भगदत्त परत गेला १६. द्व्यक्ष, त्र्यक्ष, ललाटाक्ष, औष्णीक, अंतवास, रोमक, पुरुषादक, एकपाद इत्यादि अनेक ठिकाणांहून आलेले (पूर्वदेशाकडील वगैरे) राजे द्वाराशीं प्रतिबंधझालेले मीं त्या ठिकाणीं अवलोकन केले. कांहीं राजांनीं करभार आणून अनेकवर्णांचे अनेक रासभही बरोबर आणिलेले होते १७,१८. ते रासभ संख्येनें दहा हजार असून मोठे धिप्पाड, लांब लांब पाऊल टाकणारे, सुती चालणारे, (शीघ्रगामित्वादि गुणांबद्दल) सर्वत्र प्रसिद्ध आणि कृष्णवर्ण कंठानें युक्त असे होते १९. उंच व रम्य वर्णानें युक्त असे गंगातीरचे लोक कराकरितां विपुल सुवर्ण व रौप्य युधिष्ठिराला देत असतांना मीं अवलोकन केले. सारांश, ह्याप्रमाणें करभार दिल्यानंतर युधिष्ठिराच्या घरीं त्यांचा प्रवेश झाला २०. इंद्रगोप, शुक, इंद्रधनुष्य, संधिकालीन अभ्र इत्यादिकांप्रमाणें अनेक वर्णांनीं युक्त व मनाप्रमाणें प्रचंड वेग धारण करणारे

न्महाजवान् । जातरूपमनर्घ्यं च ददुस्तस्यैकपादकाः २२ चीनाञ्छकांस्तथा ओड्रान्बर्बरान्वनवासिनः । वार्ष्णेयान्हारहूणांश्च कृष्णान्हैमवतांस्तथा २३ नीपानूपानधिगतान्विविधान्द्वारवारितान् । बल्यर्थं ददतस्तस्य नानारूपाननेकशः २४ कृष्णग्रीवान्महाकायान्रासभाञ्छतपातिनः । अहार्षुर्दशसाहस्रान्विनीतान्दिक्षु विश्रुतान् २५ प्रमाणरागस्पर्शाढ्यं बाह्लीचीनसमुद्भवम् । और्णं च राङ्कवं चैव कीटजं पट्टजं तथा २६ कुटीकृतं तथैवात्र कमलाभं सहस्रशः । श्लक्ष्णं वस्त्रमकार्पासमाविकं मृदु चाजिनम् २७ निशितांश्चैव दीर्घासीनृष्टिशक्तिपरश्वधान् । अपरान्तसमुद्भूतांस्तथैव परशूञ्छितान् २८ रसान्गन्धांश्च विविधान्रत्नानि च सहस्रशः । बलिं च कृत्स्नमादाय द्वारि तिष्ठन्ति वारिताः २९ शकास्तुषाराः कङ्काश्च रोमशाः शृङ्गिणो नराः । महागजान्दूरगमान्गणितानर्बुदान्हयान् ३० शतशश्चैव बहुशः सुवर्णं पद्मसंमितम् । बलिमादाय विविधं द्वारि तिष्ठन्ति

असे रानटी अश्व घेऊन आलेल्या एकपाददेशांतील राजांनीं त्या युधिष्ठिराला अगणित सुवर्ण दिलें २१,२२. तसेंच चीन, शक, ओड्र, अरण्यनिवासी बर्बर, वार्ष्णेय, हारहूण, कृष्ण, हिमालयनिवासी २३, पर्वताच्या पायथ्याशीं व जलमय प्रदेशांत वास्तव्य करणारे वगैरे अनेक प्रकारचे तेथें आलेले लोक द्वारांत प्रवेश होण्याला प्रतिबंध झाला असतां त्या युधिष्ठिराला—कृष्णकंठ व प्रचंड शरीर ह्यांनीं युक्त असलेले व शेंकडो पावलें लांब उडी मारणारे असे—अनेक प्रकारचे अनेक रासभ कराकरितां देत असतांना मीं पाहिले. तात्पर्य, ह्याही लोकांनीं (गुणांबद्दल) सर्वत्र प्रसिद्ध असून चालण्यांत सुती असे दहा हजार रासभ कर ह्मणून युधिष्ठिराला अर्पण केले २४,२५. प्रशस्त लांबी रुंदी, मनोहर वर्ण व मार्दव ह्या गुणांनीं युक्त असलेलीं बाल्हीक देशांतील व चीन देशांतील लोकरीचीं, रंकुसंज्ञक मृगांच्या केंसांचीं, रेशमीं, पट्टज २६, चित्रगुच्छाकार आणि कमलाप्रमाणें बनविलेलीं वगैरे हाताला गुदगुल्या होण्याजोगीं कार्पासविरहित हजारों वस्त्रें, इतरही मृदु अशीं ऊर्णावस्त्रें व अजिनें २७, तीक्ष्ण धारेचे पट्टे, तलवारी, सैत्या, कुऱ्हाडी, त्याचप्रमाणें पश्चिमदेशांत होणारे तीक्ष्ण धारेचे परशु २८, अनेकप्रकारचीं रसभरित फळें, नानाप्रकारचीं सुगंधी द्रव्यें, हजारों रत्नें आणि सर्व करभार हीं घेऊन आलेले लोक आंत प्रविष्ट होण्याला प्रतिबंध झाल्यामुळें द्वाराशींच उभे राहिले होते २९. त्याचप्रमाणें प्रत्यहीं अनेक योजनें चालणारे असे कोडोगणती मोठेमोठे गज, नानाप्रकारचे शेंकडों अश्व, पद्मपरिमित सुवर्ण वगैरे अनेकप्रकारचा करभार घेऊन आलेल्या शक, कंक, तुषार, रोमश, शृंगी वगैरे लोकांनाहीं आंत जाण्यास द्वारपाळांनीं प्रतिबंध

धारिताः ३१ आसनानि महार्हाणि यानानि शयनानि च । मणिकाञ्च-
नचित्राणि गजदन्तमयानि च ३२ कवचानि विचित्राणि शस्त्राणि विवि-
धानि च । रथांश्च विविधाकाराञ्जातरूपपरिष्कृतान् ३३ हयैर्विनीतैः संप-
न्नान्वैयाघ्रपरिवारितान् । विचित्रांश्च परिस्तोमान्रत्नानि विविधानि च ३४
नाराचानर्धनाराचाञ्छस्त्राणि विविधानि च ३५ एतद्दत्त्वा महद्द्रव्यं पूर्वदे-
शाधिपा नृपाः । प्रविष्टा यज्ञसदनं पाण्डवस्य महात्मनः ३६ [१८९१]
इति०सभापर्वणि द्यूतपर्वणि दुर्योधनसंताप एकपञ्चाशत्तमोध्यायः ॥५१॥

दुर्योधन उवाच ॥ दायं तु विविधं तस्मै शृणु मे गदतोनघ । यज्ञार्थं
राजभिर्दत्तं महान्तं धनसंचयम् १ मेरुमन्दरयोर्मध्ये शैलोदामभितो
नदीम् । ये ते कीचकवेणूनां छायां रम्यामुपासते २ खसा एकासना
ह्यर्हाः प्रदरा दीर्घवेणवः । पारदाश्च कुलिन्दाश्च तङ्गणाः परतङ्गणाः ३ तद्वै
पिपीलिकं नाम उद्धृतं यत्पिपीलिकैः । जातरूपं द्रोणमेयमहार्षुः पुञ्जशो
नृपाः ४ कृष्णाल्ललामांश्चमराञ्छुक्लांश्चान्याञ्छशिप्रभान् । हिमवत्पुष्पजं
चैव स्वादु क्षौद्रं तथा बहु ५ उत्तरेभ्यः कुरुभ्यश्चाप्यपोढं माल्यमम्बुभिः ।

केल्यामुळें द्वाराशींच रहावें लागलें ३०,३१ आणि मोठीं मूल्यवान् आसनें, यानें, शय्या, रत्नें व सुवर्ण ह्यांनीं युक्त असल्यामुळें चित्रविचित्र अशीं हस्तिदंती ३२ अद्भुत कवचें, नानाप्रकारचीं शस्त्रें, सुती चालणारे घोडे ज्यांना आहेत असे व्याघ्रचर्मानें आच्छादित व सुवर्णानें भूषित असलेले अनेक आकारांचे रथ ३३,३४, चित्रविचित्र अशा हत्तींच्या झुली, नानाप्रकारचीं रत्नें, नाराच व अर्धनाराच बाण आणि अनेक प्रकारचीं इतरही आयुधें असें ३५ हें प्रचंड द्रव्य घेऊन पूर्वदेशाधिपति राजे महात्म्या पांडु-पुत्र युधिष्ठिराच्या यज्ञमंडपामध्यें प्रविष्ट झाले ३६. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं दुर्योधनाच्या संतापाविषयीं एकावनावा अध्याय समाप्त झाला ॥५१॥

दुर्योधन ह्मणतो:—हे निष्पापा, यज्ञाकरितां त्या युधिष्ठिराला राजांनीं जी नानाप्रकारची खंडणी मोठ्या द्रव्यसंचयाच्या द्वारानें दिली ती मी आतां सांगतों; तूं श्रवण कर १. मेरु व मंदर ह्या पर्वतांच्या मध्यें शैलोदा नदीचे भोंवतीं कीचकसंज्ञक वेणुवृक्षांच्या छायेचा आश्रय करून राहिलेले २, खस, एकासन, अर्ह, प्रदर, दीर्घवेणु, पारद, कुलिंद, तंगण व परतंगण ३ हे राजे मुंग्यांनीं भूमींतून काढिल्यामुळें पिपीलिक ह्या नांवानें प्रसिद्ध असलेल्या मणोगणती सुवर्णाच्या राशि घेऊन युधिष्ठिराकडे आले ४. मनोहर अशा कृष्णवर्ण व इतरही चंद्रासारख्या शुभ्रवर्ण चवऱ्या, हिमालयपर्वतावरील पुष्पांपासून तयार झालेला विपुल स्वादिष्ठ मध ५, उत्तर कुरु-

उत्तरादपि कैलासादोषधीः सुमहाबलाः ६ पार्वतीया बलिं चान्यमाहृत्य प्रणताः स्थिताः । अजातशत्रोर्नृपतेर्द्वारि तिष्ठन्ति वारिताः ७ ये परार्धे हिमवतः सूर्योदयगिरौ नृपाः । कारूषे च समुद्रान्ते लौहित्यमभितश्च ये ८ फलमूलाशना ये च किराताश्चर्मवाससः । क्रूरशस्त्राः क्रूरकृतस्तांश्च पश्याम्यहं प्रभो ९ चन्दनागुरुकाष्ठानां भारान्कालीयकस्य च । चर्मरत्नसुवर्णानां गन्धानां चैव राशयः १० कैरातकीनामयुतं दासीनां च विशांपते । आहृत्य रमणीयार्थान्दूरजान्मृगपक्षिणः ११ निचितं पर्वतेभ्यश्च हिरण्यं भूरिवर्चसम् । बलिं च कृत्स्नमादाय द्वारि तिष्ठन्ति वारिताः १२ कैराता दरदा दर्वाः शूरा वै यमकास्तथा । औदुम्बरा दुर्विभागाः पारदा बाह्लिकैः सह १३ काश्मीराश्च कुमाराश्च घोरका हंसकायनाः । शिबित्रिगर्तयौधेया राजन्या भद्रकेकयाः १४ अम्बष्ठाः कौकुरास्ताक्ष्र्या वस्त्रपाः पह्लवैः सह । वशातलाश्च मौलेयाः सह क्षुद्रकमालवैः १५ पौण्ड्रिकाः कुक्कुराश्चैव शकाश्चैव विशांपते । अङ्गा वङ्गाश्च पुण्ड्राश्च शाणवत्या गयास्तथा १६ सुजातयः श्रेणिमन्तः श्रेयांसः शस्त्रधारिणः । अहार्षुः

देशांतून जलप्रवाहांनीं वाहून आणिलेलीं पुष्पें व कैलासपर्वताच्या उत्तर भागांतील अतिशयमहाप्रभावी ओषधि ६ हीं आणि इतरही कर घेऊन प्रणामपूर्वक स्थित असलेल्या पर्वतनिवासी राजांना अजातशत्रु युधिष्ठिर नृपाच्या द्वारीं आंत जाण्याचा प्रतिबंध झाल्यामुळें तिष्ठत रहावें लागलें ७. हिमालयपर्वताच्या उत्तर प्रदेशावर, उदयाचलपर्वताचे ठिकाणीं, कारूषदेशामध्यें, समुद्रसंनिध आणि ब्रह्मपुत्रा नदीचे तीरीं वास्तव्य करणारे राजे ८ व फलमूलांवर उपजीविका करून, चर्मवस्त्रें परिधान करून आणि क्रूर शस्त्रें धारण करून राहणारे किरात हेही, हे प्रभो, मीं तेथें पाहिले ९. हे राजा, चंदन, अगुरु व कृष्णागुरु ह्या काष्ठांचे भारे, चर्में, रत्नें, सुवर्ण व सुगंधीं द्रव्यें ह्यांच्या राशि, दहा हजार किरातजातीय दासी, इतरही मनोहर भोग्यवस्तु, दूरच्या प्रदेशांत होणारे मृग व पक्षी १०,११, अतिशयच उज्ज्वल असे पर्वतावरून जमा केलेलें सुवर्ण आणि संपूर्ण करभार असें घेऊन ते आले असतां आंत जाण्याचा प्रतिबंध झाल्यामुळें द्वारांशीं उभे राहिले होते १२. कैरात, दरद, दर्व, शूर यमक, औदुंबर, दुर्विभाग, पारद, बाल्हीक १३, काश्मीर, कुमार, घोरक व हंसकायन येथील अधिपति, शिबि व त्रिगर्त ह्या देशांतील वीर, भद्रकेकय देशांतील राजे १४, अंबष्ठ, कौकुर, ताक्ष्‍र्य, वस्त्रप, पल्हव, वशातल, मौलेय, क्षुद्रकमालव १५, पौंड्रिक, कुक्कुर, शक, अंग, वंग, पुंड्र, शाणवत्य व गय ह्या देशांतील शेंकडों कुलीन, शस्त्रधर व सेनासंपन्न असे श्रेष्ठ

क्षत्रिया वित्तं शतशोजातशत्रवे १७ वङ्गाः कलिङ्गा मगधास्ताम्रलिप्ताः सुपुण्ड्रकाः । दौवालिकाः सागरकाः पत्रोर्णाः शैशवास्तथा १८ कर्णप्रावरणाश्चैव बहवस्तत्र भारत । तत्रस्था द्वारपालैस्ते प्रोच्यन्ते राजशासनात् १९ कृतकालाः सुबलयस्ततो द्वारमवाप्स्यथ २० ईषादन्तान्हेमकक्षान्पद्मवर्णान्कुथावृतान् । शैलाभान्नित्यमत्तांश्चाप्यभितः काम्यकं सरः २१ दत्त्वैकैको दशशतान्कुञ्जरान्कवचावृतान् । क्षमावन्तः कुलीनाश्च द्वारेण प्राविशंस्तथा २२ एते चान्ये च बहवो गणा दिग्भ्यः समागताः । अन्यैश्चोपाहृतान्यत्र रत्नानीह महात्मभिः २३ राजा चित्ररथो नाम गन्धर्वो वासवानुगः । शतानि चत्वार्यददद्धयानां वातरंहसाम् २४ तुम्बुरुस्तु प्रमुदितो गन्धर्वो वाजिनां शतम् । आम्रपत्रसवर्णानामददद्धेममालिनाम् २५ कृती राजा च कौरव्य शूकराणां विशांपते । अददद्गजरत्नानां शतानि सुबहून्यथ २६ विराटेन तु मत्स्येन बल्यर्थं हेममालिनाम् । कुञ्जराणां सहस्रे द्वे मत्तानां समुपाहृते २७ पांशुराष्ट्राद्वसुदानो राजा षड्विंशतिं गजान् ।

क्षत्रिय अजातशत्रु युधिष्ठिराकडे करांचें द्रव्य घेऊन आले होते १६,१७. वंग, कलिंग, मगध, ताम्रलिप्त, सुपुंड्रक, दौवालिक, सागरक, पत्रोर्ण, शैशव १८, कर्णप्रावरण, इत्यादि अनेक प्रदेशांतील राजे त्या ठिकाणीं आले असतांना, हे भरत कुलोत्पन्ना १९, " कांहीं वेळ वाट पाहून चांगला करभार दिल्यानंतर तुमचा आंत प्रवेश होईल " असें तेथील द्वारपाल राजाच्या आज्ञेवरून त्यांना सांगत असत २०. काम्यक सरोवरासमीप असलेल्या क्षमाशील व कुलीन राजांचा—प्रत्येकानें एकेक हजार गज दिल्यानंतर—आंत प्रवेश झाला. त्या गजांचे दांत नांगराच्या दांड्यासारखे मोठे असून सुवर्णाच्या साखळदंडांनीं ते गज बांधिलेले होते व त्याचप्रमाणें पर्वतासारिखे धिप्पाड असून सर्वदां मत्त असलेले व झुली घातलेले ते गज कमळासारख्या वर्णानें युक्त होते २१,२२. हे व इतरही पुष्कळ नृपगण अनेक देशांहून आलेले होते व इतर महात्म्यांनींही ह्या राजसूय यज्ञामध्यें रत्नें आणिलेलीं होतीं २३. इंद्राबरोबर असणाऱ्या राजा चित्ररथनामक गंधर्वानें वायूसारखे वेगवान् असलेले चारशे अश्व युधिष्ठिराला दिले २४. तुंबुरुसंज्ञक गंधर्वानें आनंदित होऊन आम्रपत्रासारिख्या वर्णानें युक्त व सुवर्णमालांनीं भूषित असे शंभर अश्व अर्पण केले २५. हे कुरुकुलोत्पन्ना प्रजाधिपते, कृती राजानें शंभर शंभरांची एकेक अशा पुष्कळच उत्कृष्ट हत्तींच्या पागा दिल्या २६. मत्स्यदेशाच्या विराटराजानें स्वर्णालंकारभूषित असे दोन हजार मत्त गज कराकरितां दिले २७. हे नराधिपते राजा, पांशुनामक राष्ट्रांतून आलेल्या वसुदान राजानें संपूर्ण करभार

अश्वानां च सहस्रे द्वे राजन्काञ्चनमालिनाम् २८ जवसत्त्वोपपन्नानां वयः- स्थानां नराधिप । बलिं च कृत्स्नमादाय पाण्डवेभ्यो न्यवेदयत् २९ यज्ञसेनेन दासीनां सहस्राणि चतुर्दश । दासानामयुतं चैव सदाराणां विशांपते ३० अदद्गजरत्नानां शतानि च बहूनि च । गजयुक्ता महा- राज रथाः षड्विंशतिस्तथा ॥ राज्यं च कृत्स्नं पार्थेभ्यो यज्ञार्थं वै निवेदि- तम् ३१ वासुदेवोपि वार्ष्णेयो मानं कुर्वन्किरीटिनः । अददद्गजमुख्यानां सहस्राणि चतुर्दश ३२ आत्मा हि कृष्णः पार्थस्य कृष्णस्यात्मा धनंजयः। यद्ब्रूयादर्जुनः कृष्णं सर्वं कुर्यादसंशयम् ३३ कृष्णो धनञ्जयस्यार्थे स्वर्ग- लोकमपि त्यजेत् । तथैव पार्थः कृष्णार्थे प्राणानपि परित्यजेत् ३४ सुर- भींश्चन्दनरसान्हेमकुम्भसमास्थितान् । मलयाद्दर्दुराच्चैव चन्दनागुरुसंच- यान् ३५ मणिरत्नानि भास्वन्ति काञ्चनं सूक्ष्मवस्त्रकम् । चोलपाण्ड्या- वपि द्वारं न लेभाते ह्युपस्थितौ ३६ समुद्रसारं वैदूर्यं मुक्तासंघांस्तथैव च। शतशश्च कुथांस्तत्र सिंहलाः समुपाहरन् ३७ संवृता मणिचीरैस्तु श्यामा- स्ताम्रान्तलोचनाः । ता गृहीत्वा नरास्तत्र द्वारि तिष्ठन्ति वारिताः ३८

आणून शिवाय सवीस गज आणि वेगवान्, धैर्यवान्, तरुण व सुवर्णभूषणांनी युक्त असे दोन हजार अश्व पांडवांना दिले २८,२९. हे प्रजाधिपते महाराजा, चवदा हजार दासी, भार्यांसहवर्तमान दहा हजार दास ३०, पुष्कळ शेंकडे उत्कृष्ट गज आणि गजांनीं युक्त असलेले सवीस रथ द्रुपद राजानें दिले. इतकेंच नव्हे परंतु, कुरुवंशजश्रेष्ठ पांडवांना आपलें संपूर्ण राज्यही त्या द्रुपदानें यज्ञ करितां अर्पण केलें ३१. वृष्णिकुलोत्पन्न वासुदेवानेंही अर्जुनाचा मान राखण्याकरितां चवदा हजार उत्कृष्ट गज अर्पण केले ३२. कृष्ण हा अर्जुनाचा आत्मा असून अर्जुन हा कृष्णाचा आत्मा आहे. सारांश, अर्जुन जें कृष्णाला सांगेल तें तो करील ह्यांत संशय नाहीं ३३. फारतर काय परंतु, अर्जुनाकरितां कृष्ण स्वर्गलोकाचाही त्याग करील व त्याचप्रमाणें कृष्णाकरितां अर्जुन आपले प्राण सुद्धां देईल ३४. सुवर्णकुंभांत ठेविलेले सुगंधी चंदनरस, मलय व दर्दुर ह्या पर्वतांवरून आणि- लेले चंदनाचे व अगुरूचे ढीग ३५, उज्ज्वल अशीं उत्तम उत्तम रत्नें, सुवर्ण आणि सूक्ष्म वस्त्रें हीं बरोबर घेऊन प्राप्त झालेल्या चोल व पांड्य ह्या देशांतील राजांचा आंत प्रवेश झाला नाहीं ३६. समुद्रांतील उत्कृष्ट उत्कृष्ट रत्नें, वैदूर्यमणि, मोत्यांच्या राशि आणि हत्तींच्या शेंकडों झुली सिंहलदेशच्या राजांनीं अर्पण केल्या ३७. ज्यांचे नेत्र- प्रांत आरक्तवर्ण आहेत आणि रत्नजडित वस्त्रें ज्यांनीं परिधान केलेलीं आहेत अशा तरुण दासी घेऊन आलेल्याही पुरुषांना आंत प्रवेश करण्याचा प्रतिबंध झाल्यामुळें

प्रीत्यर्थं ब्राह्मणाश्चैव क्षत्रियाश्च विनिर्जिताः । उपाजह्रुर्विशश्चैव शूद्राः शुश्रूषवस्तथा ३९ प्रीत्या च बहुमानाच्चाप्युपागच्छन्युधिष्ठिरम् । सर्वे म्लेच्छाः सर्ववर्णा आदिमध्यान्तजास्तथा ४० नानादेशसमुत्थैश्च नानाजातिभिरेव च । पर्यस्त इव लोकोयं युधिष्ठिरनिवेशने ४१ उच्चावचानुपग्राहान्राजभिः प्रापितान्बहून् । शत्रूणां पश्यतो दुःखान्मुमूर्षा मे व्यजायत ४२ भृत्यास्तु ये पाण्डवानां तांस्ते वक्ष्यामि पार्थिव । येषामामं च पक्वं च संविधत्ते युधिष्ठिरः ४३ अयुतं त्रीणि पद्मानि गजारोहाः समादिनः । रथानामर्बुदं चापि पादाता बहवस्तथा ४४ प्रमीयमाणमामं च पच्यमानं तथैव च । विसृज्यमानं चान्यत्र पुण्याहस्वन एव च ४५ नाभुक्तवन्तं नापीतं नालंकृतमसत्कृतम् । अपश्यं सर्ववर्णानां युधिष्ठिरनिवेशने ४६ अष्टाशीतिसहस्राणि स्नातका गृहमेधिनः । त्रिंशद्दासीक एकैको यान्बिभर्ति युधिष्ठिरः ४७ सुप्रीताः परितुष्टाश्च ते ह्याशंसन्त्यरिक्षयम् ४८ दशान्यानि सहस्राणि यतीनामूर्ध्वरेतसाम् । भुञ्जते रुक्मपात्रीभिर्युधिष्ठि-

---

द्वाराशीं तिष्ठत रहावें लागले ३८. ब्राह्मण, जिंकिलेले क्षत्रिय, वैश्य आणि शुश्रूषा करणारे शूद्र हे सर्व युधिष्ठिराची प्रीति संपादन करण्याकरितां त्याच्याकडे द्रव्य घेऊन आले होते ३९. सारांश, भरतवर्षाच्या आलीकडील बाजूस, मध्यदेशांत आणि पलीकडल्या अंगास राहणारे सर्व वर्णांचे व सर्व म्लेच्छजातींचे लोक प्रीति संपादन करण्याकरितां आणि बहुमान देण्याकरितां युधिष्ठिराकडे आले होते ४०. तात्पर्य, नानादेशांतील नानाप्रकारच्या जातींसहवर्तमान हें सर्व जगत् युधिष्ठिराच्या घरी जसें कांहीं पसरलेलें होतें ४१. असो. राजांनीं शत्रूंना अर्पण केलेल्या लहान मोठ्या असंख्य देणग्या अवलोकन करून मला तर खरोखर मरणप्रायच दुःख झालें आहे ४२. आतां, हे राजा, ज्यांना कच्चा शिधा अथवा पक्व अन्न युधिष्ठिर देत असतो असे पांडवांचे सेवक मी तुला कथन करितों ४३. दहा हजार माहूत, तीन पद्म घोडे स्वार, एक कोटि रथ आणि असंख्य पदाति त्यांचेपाशीं आहेत ४४. कोठें पहावें तों अपक्व अन्नाचें माप चाललेलें असतें; कोठें अन्न शिजविण्याचा कारखाना सुरू असतो; कोठें तें देण्याचा धडाका चाललेला असतो आणि कोठें मंगलकारक ध्वनि कानावर पडत असतो ४५. सर्ववर्णांच्या लोकांपैकीं युधिष्ठिराच्या घरीं अन्नपाणी न घेतलेला, अलंकार न घातलेला अथवा सत्कार होत नसलेला असा एकही पुरुष माझ्या अवलोकनांत आला नाहीं ४६. प्रत्येकाला तीस तीस दासी ह्याप्रमाणें ऐंशी हजार कुटुंबी ब्राह्मणांचें युधिष्ठिर पोषण करीत आहे ४७ व ते सुप्रसन्न आणि संतुष्ट होऊन शत्रुनाश होण्याविषयीं त्याला नित्य आशीर्वाद देत आहेत ४८. तसेच

रनिवेशने ४९ अभुक्तं भुक्तवद्वापि सर्वमाकुब्जवामनम् । अभुञ्जाना याज्ञसेनी प्रत्यवैक्षद्विशांपते ५० द्वौ करौ न प्रयच्छेतां कुन्तीपुत्राय भारत । सांबन्धिकेन पाञ्चालाः सख्येनान्धकवृष्णयः ५१ [१९४२] इति श्रीमहा० भारते सभापर्वणि द्यूतपर्वणि दुर्योधनसंतापे द्विपञ्चाशत्तमोऽध्यायः ॥ ५२ ॥

दुर्योधन उवाच ॥ आर्यास्तु ये वै राजानः सत्यसन्धा महाव्रताः । पर्याप्तविद्या वक्तारो वेदान्तावभृथप्लुताः १ धृतिमन्तो ह्रीनिषेवा धर्मात्मानो यशस्विनः । मूर्धाभिषिक्तास्ते चैनं राजानः पर्युपासते २ दक्षिणार्थं समानीता राजभिः कांस्यदोहनाः । आरण्या बहुसाहस्रा अपश्यंस्तत्र तत्र गाः ३ आजह्रुस्तत्र सत्कृत्य स्वयमुद्यम्य भारत । अभिषेकार्थमव्यग्रा भाण्डमुच्चावचं नृपाः ४ बाह्लीको रथमाहार्षीज्जाम्बूनदविभूषितम् । सुदक्षिणस्तु युयुजे श्वेतैः काम्बोजजैर्हयैः ५ सुनीथः प्रीतिमांश्चैव ह्यनुकर्षं महाबलः । ध्वजं चेदिपतिश्चैवमाहार्षीत्स्वयमुद्यतम् ६ दाक्षिणात्यः संनहनं स्रगुष्णीषे च मागधः । वसुदानो महेष्वासो गजेन्द्रं षष्टिहायनम् ७

आणखी दहा हजार ऊर्ध्वरेते यति युधिष्ठिराच्या घरीं सुवर्णपात्रांत भोजन करीत पडले आहेत ४९ आणि भोजन कोणीं केलें व कोणी न केलें ह्याची अगदी कुबड्या व ऱ्हस्व लोकांपर्यंत सर्व लोकांची स्वतः चौकशी केल्यावांचून, हे प्रजाधिपते, द्रौपदी अन्न ग्रहण करीत नाहीं ५०. असो. हे भरतकुलोत्पन्ना, संबंधी ह्मणून पांचाल आणि मित्र ह्मणून अंधकवृष्णि ह्या दोघांनीं मात्र कुंतीपुत्र युधिष्ठिराला कर ह्मणून दिला नाहीं ५१. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं दुर्योधनाच्या संतापाविषयीं बावनावा अध्याय समाप्त झाला ॥ ५२ ॥

दुर्योधन ह्मणतोः—सभ्य, सत्यनिष्ठ, महाव्रतस्थ, विद्यासंपन्न, वक्ते, वेदांतविषयकज्ञानसंपादनरूप अवभृथस्नान करून पवित्र झालेले १, धैर्यवान्, भिडस्त, धर्मनिष्ठ व कीर्तिमान् असे जे मूर्धाभिषिक्त राजे ते ह्या युधिष्ठिराची शुश्रूषा करीत होते २. कांस्यपात्रामध्यें ज्यांचें दोहन करीत असतात अशा अनेक सहस्र वनगाई दक्षिणेकरितां राजांनीं तेथें आणिलेल्या मीं अवलोकन केल्या ३. हे भरतवंशजा, त्या ठिकाणीं अभिषेकाकरितां लागणारें सर्व बारीक सारीक साहित्य भूपालांनीं मोठ्या दक्षतेनें आदरपूर्वक आणिलेलें होतें ४. बाल्हीकराजा सुवर्णभूषित रथ घेऊन आला; सुदक्षिणानें कांबोजदेशांतील श्वेतवर्ण अश्व त्याला जोडिले ५; महाबलाढ्य सुनीथ राजानें सुप्रसंन होऊन (रथाच्या तळाशीं असलेलें) अनुकर्ष (संज्ञक) काष्ठ आणिलें; उभारिलेला ध्वज चेदिदेशाधिपति शिशुपालपुत्र स्वतः घेऊन आला ६; दक्षिणदेशाधिपतीनें कवच आणिलें, मगधदेशाच्या राजानें माला व उष्णीष हीं आणिलीं; महाधनुर्धारी

मत्स्यः स्त्वक्षान्हेमनद्धानेकलव्य उपानहौ । आवन्त्यस्त्वभिषेकार्थमपो
बहुविधास्तथा ८ चेकितान उपासङ्गं धनुः काश्य उपाहरत् । असिं च
सुत्सरुं शल्यः शैक्यं काञ्चनभूषणम् ९ अभ्यषिञ्चत्ततो धौम्यो व्यासश्च
सुमहातपाः । नारदं च पुरस्कृत्य देवलं चासितं मुनिम् १० प्रीतिमन्त
उपातिष्ठन्नभिषेकं महर्षयः । जामदग्न्येन सहितास्तथान्ये वेदपारगाः ११
अभिजग्मुर्महात्मानो मन्त्रवद्भूरिदक्षिणम् । महेन्द्रमिव देवेन्द्रं दिवि
सप्तर्षयो यथा १२ अधारयच्छत्रमस्य सात्यकिः सत्यविक्रमः । धनञ्जयश्च
व्यजने भीमसेनश्च पाण्डवः १३ चामरे चापि शुद्धे द्वे यमौ जगृहतुस्तदा ।
उपागृह्णाद्यमिन्द्राय पुराकल्पे प्रजापतिः १४ तमस्मै शङ्खमाहार्षीद्वारुणं
कलशोदधिः । शैक्यं निष्कसहस्रेण सुकृतं विश्वकर्मणा १५ तेनाभिषिक्तः
कृष्णेन तत्र मे कश्मलोभवत् । गच्छन्ति पूर्वादपरं समुद्रं चापि दक्षिणम् १६
उत्तरं तु न गच्छन्ति विना तात पतत्रिभिः । तत्र स्म दध्मुः शतशः

वसुदान राजानें साठ वर्षें वयाचा एक श्रेष्ठ गज आणिला ७; सुवर्ण रज्जूंनीं जखडलेले शकट मत्स्यराजा घेऊन आला; एकलव्यानें पादुका आणिल्या; अवंतीदेशाधिपतीनें अभिषेकाकरितां अनेक प्रकारचीं उदकें आणिलीं ८; चेकितान बाणांचा भाता घेऊन आला; काश्य राजानें धनुष्य आणिलें व तीक्ष्ण अग्र, उत्कृष्ट मुष्टि आणि सुवर्णभूषणें ह्यांनीं युक्त असलेला खड्ग शल्य घेऊन आला ९. तदनंतर अत्यंत महातपस्वी व्यास व धौम्य मुनि ह्यांनीं युधिष्ठिराला अभिषेक केला व त्या अभिषेकसमारंभाचे ठिकाणीं नारद, असित व देवल ह्या मुनींना पुढें करून अनेक महर्षि मोठ्या आनंदानें स्थित झाले आणि स्वर्गामध्यें देवराज महेंद्राकडे जाणाऱ्या सप्तऋषींप्रमाणें इतरही महात्मे वेदपारंगत महर्षि जमदग्निपुत्र परशुरामासहवर्तमान समंत्रक व विपुल दक्षिणेनें युक्त अशा त्या अभिषेकसमारंभाला गेले १०,११,१२. अमोघपराक्रमी सात्यकीनें त्या युधिष्ठिरावर छत्र धरिलें होतें; पांडुपुत्र भीमसेन व अर्जुन हे विंझोण्यांनीं वारा घालीत होते १३ आणि नकुल सहदेव युधिष्ठिरावर चवऱ्या वारीत होते. चारहजार भार सुवर्णाच्या योगानें उत्तम प्रकारें विश्वकर्म्यानें मढविलेला जो अणकुचीदार शंख पूर्वकल्पामध्यें प्रत्यक्ष प्रजाधिपति ब्रह्मदेवानें इंद्राकडे नेला होता तो वरुणदत्त शंख घेऊन सागरच युधिष्ठिराकडे आला होता १४,१५ आणि त्याच शंखानें युधिष्ठिराला कृष्णानें अभिषेक केला; तेव्हांतर मी मूर्च्छित झालों, (अहो !) पूर्व, पश्चिम व दक्षिण ह्या समुद्रांकडे लोक जातात १६; परंतु, उत्तरसमुद्राकडे पक्ष्यांवाचून इतरांची गति (नसतांनाही अर्जुनानें तेथून द्रव्य आणण्याचें ठेविलें) नाहीं असो. त्या

शङ्खान्मङ्गलकारकान् १७ प्राणदन्त समाध्मातास्ततो रोमाणि मेहृषन् ।
प्रापतन्भूमिपालाश्च ये तु हीनाः स्वतेजसा १८ धृष्टद्युम्नः पाण्डवाश्च सात्यकिः
केशवोष्टमः । सत्त्वस्था वीर्यसंपन्ना ह्यन्योन्यप्रियदर्शनाः १९ विसंज्ञान्भू-
मिपान्दृष्ट्वा मां च ते प्राहसंस्तदा । ततः प्रहृष्टो बीभत्सुः प्रादाद्धेमविषा-
णिनाम् २० शतान्यनडुहां पञ्च द्विजमुख्येषु भारत । न रन्तिदेवो नाभागो
यौवनाश्वो मनुर्न च २१ न च राजा पृथुर्वैन्यो न चाप्यासीद्भगीरथः ।
ययातिर्नहुषो वापि यथा राजा युधिष्ठिरः २२ यथातिमात्रं कौन्तेयः श्रिया
परमया युतः । राजसूयमवाप्यैवं हरिश्चन्द्र इव प्रभुः २३ एतां दृष्ट्वा श्रियं
पार्थे हरिश्चन्द्रे यथा विभो । कथं तु जीवितं श्रेयो मम पश्यसि भारत २४
अन्धेनेव युगं नद्धं विपर्यस्तं नराधिप । कनीयांसो विवर्धन्ते ज्येष्ठा हीयन्त
एव च २५ एवं दृष्ट्वा नाभिविन्दामि शर्म समीक्षमाणोपि कुरुप्रवीर ।
तेनाहमेवं कृशतां गतश्च विवर्णतां चैव सशोकतां च २६ [१९६८] इति०

अभिषेकसमारंभाचे ठिकाणीं शेंकडों लोकांनीं मंगलकारक शंख वाजविले १७ आणि वायूनें प्रपूरित झाल्यावर त्या शंखांची गर्जना होऊं लागली असतां माझ्या अंगावर कांटा आला व तसेच स्वसामर्थ्यहीन जे भूपाल तेथें होते ते ही मूर्च्छा येऊन पडले १८. परस्परांचे दर्शनही ज्यांना प्रिय असे धैर्यवान् व वीर्यवान् पांडव, धृष्टद्युम्न, सात्यकि व कृष्ण हे १९ शंखाच्या नादानें मूर्छित झालेल्या राजांना व त्याचप्रमाणें मूर्छित झालेल्या मला पाहून त्यावेळीं उच्चस्वरानें हंसले. ह्याप्रमाणें अभिषेकाचा समारंभ समाप्त झाल्यानंतर आनंदित झालेल्या अर्जुनानें सुवर्णशृंगी पांचशें वृषभ, हे भरतकुलोत्पन्ना, द्विजश्रेष्ठांना दिले. खरोखर प्रभु हरिश्चंद्राप्रमाणें ह्याप्रकारें राजसूयक्रतु करून कुंती-पुत्र युधिष्ठिरराजा जसा अत्यंत पराकाष्ठेच्या वैभवानें युक्त झाला आहे तसा रंतिदेव, नाभाग, यौवनाश्व, मनु, वेनपुत्र पृथु, भगीरथ, ययाति, नहुष इत्यादिकांपैकीं कोणताही राजा वैभवसंपन्न झालेला नाहीं २०,२१,२२,२३. हे भरतवंशजा प्रभो, हरिश्चंद्रासारखें कुंतीपुत्र युधिष्ठिराचे ठिकाणीं हें वैभव अवलोकन केल्यावर मी (तसें वैभव नसतांना) जिवंत राहणें तूं चांगलें कसें समजत आहेस? २४. अरे, (कलियुगाप्रमाणें) विपरीत प्रकारानें युक्त असलेलें हें द्वापरयुग अस्तित्वांत आणणारा विधाता अंध होता असें मला वाटतें. कारण, कनिष्ठांचा अभ्युदय होत असून ज्येष्ठांचा ऱ्हासच ह्या युगामध्यें होत आहे २५. तात्पर्य, हे कुरुवंशजश्रेष्ठा, ह्याप्रमाणें (युधिष्ठिराचें अनुपम वैभव) अवलोकन केल्यापासून विचार करून पाहूं लागलों असतांही मला सुख होत नाहीं आणि ह्मणूनच मी असा कृश, निस्तेज व शोकाकुल झालों आहें २६. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत

सभापर्वणि द्यूतपर्वणि दुर्योधनसंतापे त्रिपञ्चाशत्तमोऽध्यायः ॥ ५३ ॥

धृतराष्ट्र उवाच ॥ त्वं वै ज्येष्ठो ज्यैष्ठिनेयः पुत्र मा पाण्डवान्द्विषः । द्वेष्टा ह्यसुखमादत्ते यथैव निधनं तथा १ अव्युत्पन्नं समानार्थं तुल्यमित्रं युधिष्ठिरम् । अद्विषन्तं कथं द्विष्यात्त्वादृशो भरतर्षभ २ तुल्याभिजनवीर्यश्च कथं भ्रातुः श्रियं नृप । पुत्र कामयसे मोहान्मैवं भूः शाम्य मा शुचः ३ अथ यज्ञविभूतिं तां काङ्क्षसे भरतर्षभ । ऋत्विजस्तव तन्वन्तु सप्ततन्तुं महाध्वरम् ४ आहरिष्यन्ति राजानस्तवापि विपुलं धनम् । प्रीत्या च बहुमानाच्च रत्नान्याभरणानि च ५ अनार्याचरितं तात परस्वस्पृहणं भृशम् । स्वसंतुष्टः स्वधर्मस्थो यः स वै सुखमेधते ६ अव्यापारः परार्थेषु नित्योद्योगः स्वकर्मसु । रक्षणं समुपात्तानामेतद्वैभवलक्षणम् ७ विपत्तिष्वव्यथो दक्षो नित्यमुत्थानवान्नरः । अप्रमत्तो विनीतात्मा नित्यं भद्राणि पश्यति ८ बाहूनिवैतान्मा च्छेत्सीः पाण्डुपुत्रास्तथैव ते । भ्रातॄणां

सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं दुर्योधनसंतापाविषयीं त्रेपनावा अध्याय समाप्त झाला ॥ ५३ ॥

धृतराष्ट्र ह्मणतोः—हे पुत्रा, तूं ज्येष्ठ भार्येचा ज्येष्ठ पत्र आहेस. करितां, पांडवांशीं द्वेष न करितां शमाचें अवलंबन कर. कारण, द्वेष करणाऱ्या पुरुषाला मरणप्राय दुःख होत असतें १. हे भरतवंशजश्रेष्ठा दुर्योधना, परंपरागत चालत आलेल्या राज्याचा भाग तुझ्या इतकाच युधिष्ठिराला प्राप्त झाला असून तो स्वतः निष्कपटी, तुझा द्वेष न करणारा व तुझ्या मित्रांशींही मैत्री करणारा आहे. तेव्हां त्याच्याशीं तुझ्यासारख्यानें द्वेष करणें कसें बरें योग्य होईल? २. हे राजा, तूंही युधिष्ठिराप्रमाणें कुलवान् व वीर्यवान् असतांना मोहामुळें आपल्या भ्रात्यांच्या वैभवाचा कां बरें अभिलाष करीत आहेस? हे पुत्रा, असें करूं नको. तूं दुःख न मानितां शमाचें अवलंबन कर ३. अथवा, हे भरतवंशजश्रेष्ठा, तुला जर तें यज्ञवैभव प्राप्त होण्याची इच्छा असेल तर सप्तच्छंदरूप तंतूंनीं युक्त असलेल्या महाक्रतूचें अनुष्ठान तूंही ऋत्विजांकडून करीव ४ ह्मणजे प्रेमानें व बहुमानानें तुझ्याकडेही विपुल द्रव्य, भूषणें व रत्नें घेऊन राजे येतील ५. बा दुर्योधना, एकसारखा परधनाचा अभिलाष करणें हें संभावित पुरुषाचें कृत्य नव्हे. आपल्यापाशीं असेल त्यांत संतोष मानून जो पुरुष स्वधर्मानें वागतो त्याला सुख प्राप्त होतें ६. परधनसंपादन करण्याविषयीं कधींही उद्युक्त न होतां स्वकर्माविषयीं नित्य तत्पर राहून संपादित द्रव्याचें रक्षण करणें हेंच वैभवाचें लक्षण होय ७. दीर्घोद्योगी, निष्काळजीपणानें वर्तन न करणारा, नम्र आणि विपत्ति आली असतां दुःख न मानणारा असा जो पुरुष असतो त्याचे नेहमीं कल्याण

तद्धनार्थं वै मित्रद्रोहं च मा कुरु ९ पाण्डोः पुत्रान्मा द्विषस्वेह राजं-स्तथैव ते भ्रातृधनं समग्रम् । मित्रद्रोहे तात महानधर्मः पितामहा ये तव तेपि तेषाम् १० अन्तर्वेद्यां ददद्वित्तं कामाननुभवन्प्रियान् । क्रीडन्स्त्रीभि-र्निरातङ्कः प्रशाम्य भरतर्षभ ११ [१९७९]इति श्रीमहाभारते०वैयासिक्यां सभापर्वणि द्यूतपर्वणि दुर्योधनसंतापे चतुःपञ्चाशत्तमोध्यायः ॥ ५४ ॥

दुर्योधन उवाच ॥ यस्य नास्ति निजा प्रज्ञा केवलं तु बहुश्रुतः । न स जानाति शास्त्रार्थं दर्वी सूपरसानिव १ जानन्वै मोहयसि मां नावि नौरिव संयता । स्वार्थे किं नावधानं ते उताहो द्वेष्टि मां भवान् २ न सन्तीमे धार्तराष्ट्रा येषां त्वमनुशासिता । भविष्यमर्थमाख्यासि सर्वदा कृत्यमा-त्मनः ३ परनेयोग्रणीर्यस्य स मार्गान्प्रति मुह्यति । पन्थानमनुगच्छेयुः कथं तस्य पदानुगाः ४ राजन्परिणतप्रज्ञो वृद्धसेवी जितेन्द्रियः । प्रतिपन्ना-

---

होत असतें ८. अरे, स्वतःच्या हातांप्रमाणें तूं ह्या पांडवांना तोडून टाकूं नकोस. ते पांडुपुत्र त्याप्रमाणें (अनुपम वैभवाचा उपभोग घेण्यास पात्र) च आहेत. ह्यास्तव, धनाचा अपहार करण्याकरितां, तूं भ्रात्यांचा व मित्रांचा द्रोह करूं नकोस ९. हे राजा, पांडुपु-त्रांचा द्वेष सोडून दे. मित्रद्रोहामध्यें मोठें पातक आहे. बा दुर्योधना ते पांडव तसेच पराक्रमी असून त्यांची जी संपत्ति तें सर्व भ्रातृधनच आहे. कारण, तुझे जे पितामह ते त्यांचेही आहेतच १०. तस्मात्, हे भरतवंशजश्रेष्ठा, यज्ञामध्यें तूं द्रव्याचा विनियोग कर, प्रिय अशा विषयांचा उपभोग घे, निरोगी राहून स्त्रियांसहवर्तमान क्रीडा कर आणि ह्यांच्या योगानें संतापापासून शांत हो ११. ह्याप्रमाणें ०श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं दुर्योधनाच्या संतापाविषयीं चोपनावा अध्याय समाप्त झाला ॥ ५४ ॥

दुर्योधन ह्मणतोः—ढवळण्याकरितां पदार्थांत घातलेल्या पळीला ज्याप्रमाणें पदा-र्थाची रुचि समजत नाहीं त्याचप्रमाणें केवळ बहुश्रुत असून स्वतःची बुद्धि नसलेल्या पुरुषाला शास्त्राचें रहस्य समजत नाहीं १. तूं स्वतः ज्ञाता असूनही नावेशीं बांधिलेल्या नावेप्रमाणें (परतंत्र होऊन) मला मोहांत पाडीत आहेस. अरे, स्वार्थाकडे तुझें लक्ष्यच नाहीं कीं काय ? किंवा (असेल तर) तूं माझा द्वेष करीत आहेस कीं काय ? २. ज्यांचा तूं उपदेशक आहेस ते आह्मी धृतराष्ट्रपुत्र असून नसल्यासारिखेच आहोंत. कारण, वैभव प्राप्त करून घेणें हें जें आपलें अवश्य कर्तव्य द्यूतानें सत्वर होणार आहे तें तूं यज्ञाच्या योगानें वगैरें लांबणीवर टाकण्याचें सांगत आहेस ३. (तुझ्यासारखा) दुसऱ्याच्या मताप्रमाणें वागणारा पुरुष ज्याचा पुढारी आहे तो मार्ग सोडून भलती-कडे जाणारच. कारण, दुसऱ्याच्या मतानें वागणाऱ्या त्या पुढारी पुरुषाला अनुसरून

न्स्वकार्येषु संमोहयसि नो भृशम् ५ लोकवृत्ताद्राजवृत्तमन्यदाह बृहस्पतिः।
तस्माद्राज्ञाप्रमत्तेन स्वार्थश्चिन्त्यः सदैव हि ६ क्षत्रियस्य महाराज जये
वृत्तिः समाहिता । स वै धर्मस्त्वधर्मो वा स्ववृत्तौ का परीक्षणा ७ प्रका-
लयेद्दिशः सर्वाः प्रतोदेनेव सारथिः । प्रत्यमित्रश्रियं दीप्तां जिघृक्षुर्भरत-
र्षभ ८ प्रच्छन्नो वा प्रकाशो वा योगो योऽरिं प्रबाधते । तद्वै शस्त्रं शस्त्र-
विदां न शस्त्रं छेदनं स्मृतम् ९ शत्रुश्चैव हि मित्रं च न लेख्यं न च मातृका।
यो वै संतापयति यं स शत्रुः प्रोच्यते नृप १० असंतोषः श्रियो मूलं
तस्मात्तं कामयाम्यहम् । समुच्छ्रये यो यतते स राजन्परमो नयः ११
ममत्वं हि न कर्तव्यमैश्वर्ये वा धनेपि वा । पूर्वावाप्तं हरन्त्यन्ये राजधर्मं
हि तं विदुः १२ अद्रोहे समयं कृत्वा चिच्छेद नमुचेः शिरः । शक्रः

त्याच्या अनुयायानीं वागावें कसें ? ४. हे राजा, तुझी बुद्धि चांगली परिपक्व असून तूं जितेंद्रिय व वृद्धांचा समागम करणारा असतांना स्वकार्यांचे ठिकाणीं प्रवृत्त असलेल्या आह्मांला अत्यंत मोहांत कां पाडीत आहेस ? ५. बृहस्पतीनें लोकवर्तनाहून राजवर्तन भिन्न सांगितलें आहे. तस्मात्, राजानें दक्ष राहून नित्य स्वार्थाचेंच चिंतन करीत असावें ६. हे महाराजा, जयाविषयीं क्षत्रियाची प्रवृत्ति उचित आहे. तेव्हां तशी प्रवृत्ति असणें (इतरांच्या दृष्टीनें) जरी धर्म अथवा अधर्म असला तरी जी स्वतःची वृत्तिच पडली तिच्याबद्दल चिकित्सा करीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं ७. हे भरतवंशजश्रेष्ठा, ज्याप्रमाणें सारथी प्रतोदाच्या योगानें अश्व स्वाधीन ठेवितो त्याचप्रमाणें शत्रूचें उज्ज्वल वैभव संपादन करण्याची इच्छा करणाऱ्यानें सर्व मार्ग आपल्या स्वाधीन ठेविले पाहिजेत ८. अरे, गुप्त असो अथवा उघड असो ज्या उपायाच्या योगानें शत्रूचा नाश होत असेल तेच शस्त्रवेत्त्या लोकांचें (वास्तविक) शस्त्र आहे. अवयवादिकांचा छेद करणारें असेल तेंच शस्त्र असें ह्मटलें नाहीं ९. अरे, अमुक अमुक प्रकार ज्याच्या अंगीं असतील तो शत्रु व अमुक अमुक गोष्टी ज्याचे ठिकाणीं वसत असतील तो मित्र अशाविषयीं कोठें लेख अथवा अक्षरें लिहून ठेविलेलीं नाहींत. परंतु, हे राजा, ज्याच्या योगानें ज्याला संताप होतो त्याला त्याचा शत्रु ह्मणतात १०. असंतोष हाच वैभवाचें मूळ आहे. तस्मात्, मी त्याचीच इच्छा करीत आहें. कारण, हे राजा, भाग्योदय करून देण्याकडे जिची प्रवृत्ति असते तीच नीति सर्वोत्कृष्ट होय ११. ऐश्वर्याचे ठिकाणीं अथवा धनाचे ठिकाणीं कधींही ममत्वबुद्धि ठेवूं नयें (ह्मणजे हें ऐश्वर्य अथवा धन आपलेंच आहे असें कोणीं कधीं मानूं नयें आणि ह्मणूनच युधिष्ठिराचे ठिकाणीं असलेलें वैभव "माझेंच आहे" असें युधिष्ठिरालाही मानण्याचें

साभिमता तस्य रिपौ वृत्तिः सनातनी १३ द्वावेतौ ग्रसते भूमिः सर्पो बिलशयानिव । राजानं चाविरोद्धारं ब्राह्मणं चाप्रवासिनम् १४ नास्ति वै जातितः शत्रुः पुरुषस्य विशांपते । येन साधारणी वृत्तिः स शत्रुर्नेतरो जनः १५ शत्रुपक्षं समृध्यन्तं यो मोहात्समुपेक्षते । व्याधिराप्यायित इव तस्य मूलं छिनत्ति सः १६ अल्पोपि ह्यरिरत्यर्थं वर्धमानः पराक्रमैः। वल्मीको मूलज इव ग्रसते वृक्षमन्तिकात् १७ आजमीढ रिपोर्लक्ष्मीर्मा ते रोचिष्ट भारत । एष भारः सत्त्ववतां नयः शिरसि धिष्ठितः १८ जन्मवृद्धिमिवार्थानां यो वृद्धिमभिकाङ्क्षते । एधते ज्ञातिषु स वै सद्यो वृद्धिर्हि विक्रमः १९ नाप्राप्य पाण्डवैश्वर्यं संशयो मे भविष्यति । अवाप्स्ये वा

प्रयोजन नाहीं.) कारण, पूर्वी (एकाद्यानें) संपादन केलेलें ऐश्वर्य अथवा धन इतर हरण करून नेत असतात व त्यालाही राजधर्मच ह्मणत असतात १२. द्रोहरहित बुद्धीनें वर्तन करण्याचा संकेत करून इंद्रानें नमुचिदैत्याचा शिरच्छेद केला व त्या इंद्राचें शत्रूचे ठिकाणीं झालेलें तें वर्तन सनातन ह्मणून (नीतिमान्) लोकांना अभिमत झालें आहे १३. बिळांत राहणाऱ्या प्राण्यांना ज्याप्रमाणें सर्प ग्रासून टाकितो त्याचप्रमाणें दुसऱ्याशीं विरोध न करणारा राजा आणि प्रवास न करणारा संन्यासी ह्या उभयतांना भूमिच ग्रासून टाकिते १४. हे प्रजाधिपते, पुरुषाला जातिदृष्ट्याच कोणी शत्रु असतो असें नाहीं. आपल्या सारखीच ज्याची उपजीविका असते (ह्मणजे ज्या आमिषावर उपजीविकेकरितां आपण टपून बसलों असून त्याच्यावरच जो दुसरा टपलेला असतो) तो आपला शत्रु होय. इतर शत्रु नव्हे (करितां, एका वैभवरूप आमिषावरच टपून बसलेले आह्मी उभयतां ह्मणजे पांडुपुत्र व धृतराष्ट्रपुत्र हे परस्परांचे शत्रु होत) १५. वृद्धिंगत होत असलेल्या शत्रुपक्षाची जो मोहामुळें उपेक्षा करितो त्याचीं मुळेंपाळें तो शत्रु—वृद्धिंगत झालेल्या व्याधीप्रमाणें—तोडून टाकितो १६. मुळापाशीं उत्पन्न झालेलें अल्पही वारूळ ज्याप्रमाणें शेवटीं सर्व वृक्षाचा फडशा पाडितें त्याचप्रमाणें अगदीं क्षुद्र जरी शत्रु असला तरी यत्नांनीं वृद्धिंगत होऊन तो आपल्या प्रतिपक्ष्याचा नाश करून टाकितो १७. करितां, हे अजमीढकुलोत्पन्ना, शत्रूच्या वैभवानें तुला आनंद होणें योग्य नाहीं. हे भरतवंशजा, मी सांगत असलेली ही नीति बुद्धिमान् लोकांनीं शिरसामान्य करण्यासारखी आहे १८. जन्मापासून स्वाभाविक वृद्धिंगत होणाऱ्या देहादिकांप्रमाणें जो द्रव्यवृद्धीची इच्छा धरितो तोच आपल्या ज्ञातीमध्यें मोठा होतो. तस्मात् , ज्याच्या योगानें द्रव्यवृद्धि सत्वर होईल तोच (खरा) पराक्रम होय १९. पांडवांचें ऐश्वर्य मीं जर अवलोकन केलेंच नसतें तर " तें प्राप्त तरी करून घेईन किंवा

श्रियं तां हि शिष्ये वा निहतो युधि २० एतादृशस्य किं मेद्य जीवितेन विशांपते। वर्धन्ते पाण्डवा नित्यं वयं त्वस्थिरवृद्धयः २१ [२०००] इति० सभापर्वणि द्यूतपर्वणि दुर्योधनसंतापे पञ्चपञ्चाशत्तमोध्यायः ॥ ५५ ॥

शकुनिरुवाच ॥ यां त्वमेतां श्रियं दृष्ट्वा पाण्डुपुत्रे युधिष्ठिरे। तप्यसे तां हरिष्यामि द्यूतेन जयतांवर ॥ आहूयतां परं राजन्कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः १ अगत्वा संशयमहमयुद्धा च चमूमुखे। अक्षान्क्षिपन्नक्षतः सन्विद्वानविदुषो जये २ ग्लहान्धनूंषि मे विद्धि शरानक्षांश्च भारत। अक्षाणां हृदयं मे ज्यां रथं विद्धि ममास्फुरम् ३ दुर्योधन उवाच ॥ अयमुत्सहते राजञ्छ्रियमाहर्तुमक्षवित्। द्यूतेन पाण्डुपुत्रेभ्यस्तदनुज्ञातुमर्हसि ४ धृतराष्ट्र उवाच ॥ स्थितोस्मि शासने भ्रातुर्विदुरस्य महात्मनः। तेन संगम्य वेत्स्यामि कार्यस्यास्य विनिश्चयम् ५ दुर्योधन उवाच ॥ व्यपनेष्यति ते बुद्धिं विदुरो मुक्तसंशयः। पाण्डवानां हिते युक्तो न तथा मम कौरव ६ नारभेतान्यसाम-

---

संग्रामामध्यें वध पावून तरी पडेन" असा वितर्कही माझ्या मनामध्यें उत्पन्न झाला नसतां २०. तेव्हां हे प्रजाधिपते, अशा प्रकारची अवस्था झालेल्या मला (पांडवांचें वैभव जर प्राप्त न होईल तर) आज जगून तरी काय कर्तव्य आहे? कारण, पांडवांचा एक सारखा उत्कर्ष होत असून आमच्या संपत्तीची मात्र वृद्धि कधीं होत नाहीं २१. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं दुर्योधनाच्या संतापाविषयीं पंचावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५५ ॥

शकुनि ह्मणतोः—हे विजयिश्रेष्ठा, पांडुपुत्र युधिष्ठिराचे ठिकाणीं असलेलें जें हें वैभव अवलोकन करून तूं संतप्त होत आहेस तें वैभव मी द्यूताच्या योगानें हरण करीन. परंतु, हे राजा, तूं कुंतीपुत्र युधिष्ठिराला सत्वर आव्हान कर १. अरे, मी अक्षविद्या जाणणारा आहें. तेव्हां धोक्यांत न येतां, सैन्याच्या अग्रभागीं युद्ध न करितां आणि जखमही न करून घेतां स्वतः त्या विद्येंत निपुण नसलेल्या पांडवांना नुसते फांसे टाकूनच मी जिंकीन २. हे भरतवंशजा दुर्योधना, पण हींच माझीं धनुष्यें, फांसे हेच माझे बाण, फासे फेंकण्याचें चातुर्य हीच माझी प्रत्यंचा आणि फांसे टाकण्याचें स्थान हाच माझा रथ असें तूं समज ३. दुर्योधन ह्मणतोः—हे राजा, अक्षविद्येंत निपुण असलेला हा शकुनि द्यूताच्या योगानें पांडुपुत्रांपासून वैभव हरण करण्याचा उत्साह धरीत आहे. तस्मात्, तूं द्यूताची अनुज्ञा दे ४. धृतराष्ट्र ह्मणतोः—मी महात्म्या विदुर भ्रात्याच्या आज्ञेंत वागणारा आहें. करितां, त्याची भेट झाल्यानंतर ह्या कृत्याविषयीं मी काय तो निश्चय करण्याचें पाहीन ५. दुर्योधन ह्मणतोः—कोणत्याही धाडसाच्या कृत्यापासून अलग राहणारा विदुर तुझें मन फिरवील. कारण, हे कुरुकुलोत्पन्ना, तो जसा पांडवांच्या

र्थात्पुरुषः कार्यमात्मनः । मतिसाम्यं द्वयोर्नास्ति कार्येषु कुरुनन्दन ७ भयं परिहरन्मन्द आत्मानं परिपालयन् । वर्षासु क्लिन्नकटवत्तिष्ठन्नेवावसीदति ८ न व्याधयो नापि यमः प्राप्तुं श्रेयः प्रतीक्षते । यावदेव भवेत्कल्पस्तावच्छ्रेयः समाचरेत् ९ धृतराष्ट्र उवाच ॥ सर्वथा पुत्र बलिभिर्विग्रहो मे न रोचते। वैरं विकारं सृजति तद्वै शस्त्रमनायसम् १० अनर्थमर्थं मन्यसे राजपुत्र संग्रन्थनं कलहस्याति याति । तद्वै प्रवृत्तं तु यथाकथंचित्सृजेदसीन्निशितान्सायकांश्च ११ दुर्योधन उवाच ॥ द्यूते पुराणैर्व्यवहारः प्रणीतस्तत्रात्ययो नास्ति न संप्रहारः । तद्रोचतां शकुनेर्वाक्यमद्य सभां क्षिप्रं त्वमिहाज्ञापयस्व १२ स्वर्गद्वारं दीव्यतां नो विशिष्टं तद्वर्तिनां चापि तथैव

हिताविषयीं तत्पर असतो तसा माझ्याहिताविषयीं नसतो ६. हे कुरुनंदना, दुसऱ्याच्या सामर्थ्यावर अवलंबन राहून पुरुषानें आपल्या कार्याला कधींही हात घालूं नये. कारण, कार्याविषयीं दोघांचें मत सारखें नसतें ७. आपलें परिपालन करण्याकरितां साहसापासून अलग राहणाऱ्या पुरुषाचा पर्जन्यकालीं भिजलेल्या शुष्क गवताप्रमाणें जागच्या जागींच नाश होतो ८. अरे, व्याधि अथवा यम हे कधीं श्रेयःप्राप्तीची वाट पहात बसत नाहींत (ह्मणजे ह्या पुरुषाला जन्मास येऊन श्रेयःप्राप्ति झाली आहे किंवा नाहीं; झाली असेल तर ह्याला घेऊन जाण्यास चिंता नाहीं व झाली नसेल तर ती होईपर्यंत वाट पाहिली पाहिजे असा विचार व्याधि अथवा यम हे कधीं करीत बसत नाहींत). करितां, जोंपर्यंत कल्याण करून घेण्यास पुरुष समर्थ असेल तोंपर्यंतच त्यानें तें प्राप्त करून घेतलें पाहिजे ९. धृतराष्ट्र ह्मणतोः—हे पुत्रा, तूं कांहीं ह्मटलेस तरी बलवानांशीं वैर धरणें मला उचित दिसत नाहीं. अरे, वैर हें विकार उत्पन्न करितें. कारण, तें एक लोहविरहित शस्त्रच आहे १०. हे राजपुत्रा, अनर्थाला कारणीभूत जें द्यूत तेंच तूं अनर्थरहित समजत आहेस. परंतु, द्यूताची प्रवृत्ति कलह उत्पन्न करण्याकडे अतिच होत असते. सारांश, द्यूत हें एकदां (मित्रत्वासारख्या) कशाही प्रकारानें जरी सुरू झालें तरी एकदां सुरू झाल्यावर मग तें उभयतांमध्यें तीक्ष्ण खड्ग व बाण उत्पन्न करीलच. (तात्पर्य, एकदां प्रवृत्त झालेलें द्यूत जरी प्रथम मित्रभावानें प्रवृत्त झालें असलें तरी परिणामीं त्यापासून उभयतांमध्यें कलह होऊन शस्त्रांच्या योगानें परस्परांचा नाश करण्यास उभयतां प्रवृत्त होण्याला तें कारणीभूत होणारच) ११. दुर्योधन ह्मणतोः—पुरातन कालीं होऊन गेलेल्या (नलप्रभृति) पुरुषांचीं द्यूतामध्यें प्रवृत्ति झालेली आहे. परंतु, त्यांच्या द्यूतापासून कोणाचा नाश अथवा युद्ध झालेलें नाहीं. तस्मात्, ह्या शकुनीच्या ह्मणण्याला अनुमोदन देऊन तूं

युक्तम् । भवेदेव ह्यात्मना तुल्यमेवं दुरोदरं पाण्डवैस्त्वं कुरुष्व १३ धृतराष्ट्र उवाच ॥ वाक्यं न मे रोचते यत्त्वयोक्तं यत्ते प्रियं तत्क्रियतां नरेन्द्र। पश्चात्तप्स्यसे तदुपाक्रम्य वाक्यं न हीदृशं भावि वचो ह्यधर्म्यम् १४ दृष्टं ह्येतद्विदुरेणैव सर्वं विपश्चिता बुद्धिविद्यानुगेन । तदेवैतदवशस्याभ्युपैति महद्भयं क्षत्रियजीवघाति १५ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वा धृतराष्ट्रो मनीषी दैवं मत्वा परमं दुस्तरं च । शशासोच्चैः पुरुषान्पुत्रवाक्ये स्थितो राजा दैवसंमूढचेताः १६ सहस्रस्तम्भां हेमवैदूर्यचित्रां शतद्वारां तोरणस्फाटिकाख्याम् । सभामग्र्यां क्रोशमात्रायतां मे तद्विस्तारामाशु कुर्वन्तु युक्ताः १७ श्रुत्वा तस्य त्वरिता निर्विशङ्काः प्राज्ञा दक्षास्तां तदा चक्रुराशु । सर्वद्रव्याण्युपजह्रुः सभायां सहस्रशः शिल्पिनश्चैव युक्ताः १८

येथें सभा तयार करण्याची सत्वर आज्ञा कर १२. (शत्रुपराजय व धनलाभ हेंच आह्मा क्षत्रियांना सुख असून तें) सुख सत्वर प्राप्त होण्याचें द्यूत हेंच आह्मा द्यूत खेळणाऱ्यांना श्रेष्ठ द्वार होय आणि पांडव द्यूत खेळूं लागले असतां त्यांनाहीं त्याचप्रमाणें (आमचीही) संपत्ति सत्वर मिळण्याचें साधन हें द्यूत होणें योग्य आहे. तस्मात्, (अमक्याचाच जय होतो हें निश्चित नसून) जय अथवा पराजय होण्याचा संभव आह्मा स्वतःला आणि पांडवांना जर सारखाच आहे तर तूं पांडवांशीं (शकुनीच्या द्वारानें) द्यूत कर १३. धृतराष्ट्र ह्मणतोः—हे राजा, तूं जें भाषण केलें आहेस तें मला रुचत नाहीं. आतां तुला जें प्रिय असेल तें तूं कर. परंतु, पुढें तुला त्या माझ्या भाषणाचें स्मरण होऊन पश्चात्ताप होईल. कारण, ह्या प्रकारचें तुझें हें ह्मणणें धर्माला अनुसरून नाहीं आणि ह्मणूनच तें श्रेयस्करही होणार नाहीं १४. ऊहापोह करण्याचें चातुर्य आणि दिव्य ज्ञान ह्यांनीं संपन्न असलेल्या विवेकी विदुरानें हें सर्व पूर्वीच अवलोकन करून ठेविलें आहे आणि तेंच हें क्षत्रियप्राणघातक महाभय स्वेच्छेनें वागणाऱ्या तुला प्राप्त होण्याचें दिसत आहे १५. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें दुर्योधनाला सांगून दैव अत्यंत दुस्तर आहे असें धृतराष्ट्रानें मनामध्यें आणिलें आणि नंतर दुर्दैवानें बुद्धीला भ्रंश पडून पुत्राच्या ह्मणण्याप्रमाणें वागण्यास तयार झालेल्या त्या धृतराष्ट्रराजानें " सहस्र स्तंभ, शंभर द्वारें, कोसभर लांबी व तितकीच रुंदी ह्यांनीं युक्त असून सुवर्ण व वैदूर्य मणि ह्यांनीं चित्रविचित्र अशी एक तोरणस्फाटिका ह्मणून श्रेष्ठ सभा मोठ्या तत्परतेनें माझ्याकरितां तुह्मी सत्वर तयार करा " अशी आपल्या सेवकास उच्च स्वरानें आज्ञा केली १६,१७. ह्याप्रमाणें धृतराष्ट्रराजाची आज्ञा ऐकिल्यावर मनामध्यें कसलीही शंका न आणितां बुद्धिमान् व दक्ष

कालेनाल्पेनाथ निष्ठां गतां तां सभां रम्यां बहुरत्नां विचित्राम् । चित्रैर्हैमैरासनैरभ्युपेतामाचख्युस्ते तस्य राज्ञः प्रतीताः १९ ततो विद्वान्विदुरं मन्त्रिमुख्यमुवाचेदं धृतराष्ट्रो नरेन्द्रः । युधिष्ठिरं राजपुत्रं च गत्वा मद्वाक्येन क्षिप्रमिहानयस्व २० सभेयं मे बहुरत्ना विचित्रा शय्यासनैरुपपन्ना महार्हैः। सा दृश्यतां भ्रातृभिः सार्धमेत्य सुहृद्द्यूतं वर्ततामत्र चेति २१ [२०२१]
इति० सभापर्वणि द्यूतपर्वणि युधिष्ठिरानयने षट्पञ्चाशत्तमोऽध्यायः ॥ ५६ ॥

वैशम्पायन उवाच॥ मतमाज्ञाय पुत्रस्य धृतराष्ट्रो नराधिपः । मत्वा च दुस्तरं दैवमेतद्राजंश्चकार ह १ अन्यायेन तथोक्तस्तु विदुरो विदुषां वरः । नाभ्यनन्दद्वचो भ्रातुर्वचनं चेदमब्रवीत् २ विदुर उवाच ॥ नाभिनन्दे नृपते प्रैषमेतं मैवं कृथाः कुलनाशाद्बिभेमि । पुत्रैर्भिन्नैः कलहस्ते ध्रुवं स्यादेतच्छङ्के द्यूतकृते नरेन्द्र ३ धृतराष्ट्र उवाच ॥ नेह क्षत्तः कलहस्तप्स्यते मां न चेद्दैवं प्रतिलोमं भविष्यत् । धात्रा तु दिष्टस्य वशे किलेदं

असे ते राजसेवक सत्वर तीं सभा करूं लागले आणि सर्वप्रकारची द्रव्यसामग्री आणून हजारों शिल्पी लोकांची त्यांनीं त्या सभेकडे योजना केली १८ आणि तदनंतर थोडकाच काळ लोटल्यावर विपुल रत्नें आणि चित्रविचित्र सुवर्णनिर्मित आसनें ह्यांनीं युक्त व आश्चर्यकारक अशी ती रम्य सभा तयार झाल्याचें त्या चतुर राजसेवकांनीं धृतराष्ट्रराजाला कळविलें १९. तदनंतर तो बुद्धिमान् धृतराष्ट्रराजा मंत्रिश्रेष्ठ विदुराला ह्मणाला " राजपुत्र युधिष्ठिराकडे जा आणि—मोठ्या मूल्यवान् शय्या व आसनें ह्यांनीं व विपुल रत्नांनीं संपन्न असलेली ही माझी आश्चर्यकारक सभा भ्रात्यांसहवर्तमान तूं एकदां येऊन अवलोकन कर व ह्या सभेमध्यें एकवेळ मित्रभावानें द्यूतक्रीडा कर—असा माझा निरोप सांगून तूं त्याला सत्वर इकडे घेऊन ये " २०,२१. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील द्यूतपर्वांपैकीं युधिष्ठिराला आणण्याविषयीं छप्पनावा अध्याय समाप्त झाला ॥ ५६ ॥

वैशंपायन सांगतातः—हे जनमेजय राजा, पुत्राचें मत जाणून व दैव दुस्तर आहे असें समजून धृतराष्ट्र राजानें असें केलें १. परंतु, त्याप्रमाणें धृतराष्ट्रानें नीतिविरुद्ध आज्ञा केली असतां ज्ञानवानांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या विदुरानें भ्रात्याच्या सांगण्याचें अभिनंदन न करितां त्याला असें सांगितलें २ कीं " हे राजा, तुझी ही आज्ञा मला नीट दिसत नाहीं; तूं असें करूं नको; ह्याच्या योगानें कुलक्षय होईल अशी मला भीति वाटत आहे. कारण, हे राजा, भेदभावानें वागत असलेल्या तुझ्या पुत्राचा पांडवांशीं द्यूतामुळें कलह निःसंशय होईल असा माझा तर्क आहे " ३. धृतराष्ट्र ह्मणतोः—हे विदुरा, दैव जर प्रतिकूळ होणार नसेल तर भावी कलहाची मलाही भीति बाळगण्याचें

सर्वं जगच्चेष्टति न स्वतन्त्रम् ४ तदद्य विदुर प्राप्य राजानं मम शासनात् । क्षिप्रमानय दुर्धर्षं कुन्तीपुत्रं युधिष्ठिरम् ५ [२०२६]इति श्रीमहाभारते०वैयासिक्यां सभापर्वणि द्यूतपर्वणि युधिष्ठिरानयने सप्तपञ्चाशत्तमोध्यायः॥५७॥

वैशम्पायन उवाच ॥ ततः प्रायाद्विदुरोश्वैरुदारैर्महाजवैर्बलिभिः साधु दान्तैः । बलान्नियुक्तो धृतराष्ट्रेण राज्ञा मनीषिणां पाण्डवानां सकाशे १ सोभिपत्य तदध्वानमासाद्य नृपतेः पुरम् । प्रविवेश महाबुद्धिः पूज्यमानो द्विजातिभिः २ स राजगृहमासाद्य कुबेरभवनोपमम् । अभ्यागच्छत धर्मात्मा धर्मपुत्रं युधिष्ठिरम् ३ तं वै राजा सत्यधृतिर्महात्मा अजातशत्रुर्विदुरं यथावत् । पूजापूर्वं प्रतिगृह्याजमीढस्ततोपृच्छद्धृतराष्ट्रं सपुत्रम् ४ युधिष्ठिर उवाच ॥विज्ञायते ते मनसोप्रहर्षः कच्चित्क्षत्तः कुशलेनागतोसि । कच्चित्पुत्राः स्थविरस्यानुलोमा वशानुगाश्चापि विशोथ कच्चित् ५ विदुर उवाच ॥ राजा महात्मा कुशली सपुत्र आस्ते वृतो ज्ञातिभिरिन्द्रकल्पः ।

प्रयोजन नाहीं. कारण, दैवाधीन असलेलें हें सर्व जगत् स्वतंत्र नसून विधात्याच्या इच्छेप्रमाणेंच वर्तन करीत असतें ४. तस्मात्, हे विदुरा, जिंकण्यास दुर्घट अशा त्या कुंतीपुत्र युधिष्ठिर राजाकडे जा आणि त्याला सत्वर इकडे घेऊन ये ५. ह्याप्रमाणें०सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं युधिष्ठिराला आणण्याविषयीं सत्तावनावा अध्याय समाप्त झाला॥५७॥

वैशंपायन सांगतातः—विदुराची इच्छा नसतांनाहीं धृतराष्ट्र राजानें त्याला पांडवांकडे जाण्याची आज्ञा केल्यानंतर महावेगवान्, बलाढ्य व उत्तमप्रकारें शिकविलेल्या अशा भव्य अश्वांवर आरूढ होऊन तो विचारी पांडवांच्या समीप गेला १. तो महाबुद्धिमान् विदुर धृतराष्ट्राच्या आज्ञेनें मार्गाला लागून युधिष्ठिराच्या नगरासमीप गेल्यावर द्विज प्रशंसा करीत असतांना त्या नगरामध्यें प्रविष्ट झाला २ आणि कुबेराच्या निवासस्थानाचीच उपमा ज्याला योग्य आहे अशा राजवाड्यामध्यें गेल्यावर तो धर्मात्मा विदुर धर्मपुत्र युधिष्ठिरासमीप गेला ३ असतां ज्याला शत्रु उत्पन्न झालाच नाहीं अशा त्या सत्यनिष्ठ व महात्म्या अजमीढवंशज युधिष्ठिर राजानें यथाविधि पूजनपूर्वक त्याचा सत्कार केला आणि नंतर पुत्रांसहवर्तमान धृतराष्ट्रासंबंधानें त्यानें त्याला कुशलप्रश्न केला ४. युधिष्ठिर प्रश्न करितोः—हे विदुरा, आपलें मन आनंदित नसल्याचें दिसत आहे. तेव्हां आपण कुशलवर्तमान घेऊन इकडे आलां आहां नां? आणि वृद्ध धृतराष्ट्राचे पुत्र त्याला अनुकूल असून प्रजाजनही त्याच्या अधीन आहेत नां? ५. विदुर ह्मणतोः—हे नृपा, कुटुंबांतील मनुष्यांनीं परिवेष्टित असलेला महात्मा इंद्रतुल्य धृतराष्ट्रराजा पुत्रांसहवर्तमान कुशल आहे आणि तो आपल्या पुत्रांच्या

प्रीतो राजन्पुत्रगुणैर्विनीतो विशोक एवात्मरतिर्दृढात्मा ६ इदं तु त्वां कुरु-
राजोभ्युवाच पूर्वं पृष्ट्वा कुशलं चाव्ययं च । इयं सभा त्वत्सभातुल्यरूपा
भ्रातॄणां ते दृश्यतामेत्य पुत्र ७ समागम्य भ्रातृभिः पार्थ तस्यां सुहृद्द्यूतं
क्रियतां रम्यतां च । प्रीयामहे भवतां संगमेन समागताः कुरवश्चापि
सर्वे ८ दुरोदरा विहिता ये तु तत्र महात्मना धृतराष्ट्रेण राज्ञा । तान्द्र-
क्ष्यसे कितवान्संनिविष्टानित्यागतोहं नृपते तज्जुषस्व ९ युधिष्ठिर उवाच॥
द्यूते क्षत्तः कलहो विद्यते नः को वै द्यूतं रोचते बुध्यमानः । किं वा
भवान्मन्यते युक्तरूपं भवद्वाक्ये सर्व एव स्थिताः स्म १० विदुर उवाच॥
जानाम्यहं द्यूतमनर्थमूलं कृतश्च यत्नोस्य मया निवारणे । राजा च मां
प्राहिणोत्त्वत्सकाशं श्रुत्वा विद्वञ्छ्रेय इहाचरस्व ११ युधिष्ठिर उवाच ॥
के तत्रान्ये कितवा दीव्यमाना विना राज्ञो धृतराष्ट्रस्य पुत्रैः । पृच्छामि

गुणांमुळें विनीत, विशोक, दृढात्मा—आणि आत्मरति होऊन राहिलेला आहे ६. परंतु, त्या कुरुराज धृतराष्ट्रानें संपूर्णकुशलप्रश्नपूर्वक तुला असा निरोप सांगितला आहे कीं " हे पुत्रा, ही तुझ्या भ्रात्यांची सभा तुझ्यासभेसारखी (तयार केलेली) आहे. करितां, एकदां तूं येऊन ती अवलोकन कर ७. हे कुंतीपुत्रा, तुह्मी आपल्या (दुर्योधनप्रभृति) भ्रात्यांना भेटा व ह्या ठिकाणीं मित्रभावानें द्यूत खेळून (दोन दिवस) करमणूक करा. ह्मणजे तुमच्या भेटीनें आह्मांला आनंद होईल आणि एकवार सर्व कुरुवंशजही एकत्र जुळतील " ८. हे नृपा, महात्म्या धृतराष्ट्र राजानें त्या ठिकाणीं जे द्यूत खेळणारे नेमिले आहेत त्या तेथें जुळलेल्या द्यूतकारांनाही तूं अवलोकन करशील. हें कळविण्याकरितां मी येथें आलों आहें. तर तूं त्याप्रमाणें करण्याचें मनांत आण ९. युधिष्ठिर ह्मणतोः—हे विदुरा, आह्मी उभयतां द्यूत खेळूं लागलों असतां त्यांत कलह हा ठरलेलाच आहे. तेव्हां हें समजत असून कोणाला बरें द्यूत चांगलें वाटेल ? आपणांला तरी द्यूत योग्य वाटत आहे काय ? (वाटत असल्यास) आह्मी सर्वही पांडव आपल्या आज्ञेंत आहोंत १०. विदुर ह्मणतोः—द्यूत अनर्थाचें मूळ असल्याचें मी जाणीत असून तें टाळण्याविषयीं मीं यत्नही केला. तथापि, धृतराष्ट्र राजानें मला तुझ्यासमीप पाठविलें आहे. करितां, मीं सांगितलेलें ऐकून घेऊन मग, हे ज्ञानवान् युधिष्ठिरा, ह्या प्रसंगीं जें श्रेयस्कारक दिसेल त्याचें तूं अवलंबन कर ११. युधिष्ठिर

---

१ विनीत, विशोक, आत्मरति आणि दृढात्मा हे चारी शब्द ह्या ठिकाणीं द्व्यर्थीही असण्याचा संभव दिसतो. विनीत = फारच जेरीस आलेला; विनयशील. विशोक = अत्यंतशोकाकुल; शोकरहित. आत्मरति = आपल्याच उत्कर्षाची इच्छा करणारा; ब्रह्मनिष्ठ. दृढात्मा = निर्दय; दृढनिश्चयी.

त्वां विदुर ब्रूहि नस्तान्यैर्दीव्यामः शतशः संनिपत्य १२ विदुर उवाच ॥ गान्धारराजः शकुनिर्विशांपते राजातिदेवी कृतहस्तो मताक्षः । विविंशतिश्चित्रसेनश्च राजा सत्यव्रतः पुरुमित्रो जयश्च १३ युधिष्ठिर उवाच ॥ महाभयाः कितवाः संनिविष्टा मायोपधा देवितारोत्र सन्ति । धात्रा तु दिष्टस्य वशे किलेदं सर्वं जगत्तिष्ठति न स्वतन्त्रम् १४ नाहं राज्ञो धृतराष्ट्रस्य शासनान्न गन्तुमिच्छामि कवे दुरोदरम् । इष्टो हि पुत्रस्य पिता सदैव तदस्मि कर्ता विदुरात्थ मां यथा १५ न चाकामः शकुनिना देविताहं न चेन्मां जिष्णुराह्वयिता सभायाम् । आहूतोहं न निवर्ते कदाचित्तदाहितं शाश्वतं वै व्रतं मे १६ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वा विदुरं धर्मराजः प्रायात्रिकं सर्वमाज्ञाप्य तूर्णम् । प्रायाच्छ्वोभूते सगणः सानुयात्रः सह स्त्रीभिर्द्रौपदीमादि कृत्वा १७ दैवं हि प्रज्ञां मुष्णाति चक्षुस्तेज

प्रश्न करितोः—राजा धृतराष्ट्राच्या पुत्रांवांचून त्या ठिकाणीं आणखी कोण धूर्त लोक द्यूत खेळणारे आहेत हें मी आपणांला विचारितों. ते, हे विदुर, आपण आह्मांला कथन करा. ह्मणजे त्यांच्याशीं संगत होऊन आह्मी असंख्य धनानें द्यूत खेळूं १२. विदुर ह्मणतोः—हे प्रजाधिपते, अक्षविद्येचें रहस्य जाणणारा, फांसे टाकण्यांत हात बसलेला आणि मर्यादा सोडून द्यूत खेळणारा असा गांधारदेशाधिपति राजा शकुनि, विविंशति, राजा चित्रसेन, सत्यव्रत, पुरुमित्र आणि जय हे त्या ठिकाणीं (धृतराष्ट्राच्या पुत्रांवांचून) दुसरे द्यूत खेळणारे आहेत १३. युधिष्ठिर ह्मणतोः—हे ह्या ठिकाणीं जुळलेले द्यूतकार कपटी, मायावी आणि ह्मणूनच महाभयंकर असे आहेत. (परंतु, धृतराष्ट्राच्या आज्ञेपुढें आपला काय इलाज आहे !). असो. हें सर्व जगत स्वतंत्र नसून विधात्यानें दैवाधीन करून ठेविलें आहे १४. धृतराष्ट्राच्या आज्ञेप्रमाणें मी द्यूताकडे जाणार नाहीं असें कधींही होणार नाहीं (सारांश, धृतराष्ट्राच्या सांगण्याप्रमाणें मला द्यूताकरितां तिकडे जाणें भागच आहे). शिवाय, पुत्राला पिता सर्वथा इष्टच आहे. करितां, हे ज्ञानसंपन्न विदुर, आपल्या सांगण्याप्रमाणें मी करीन १५. जिंकण्याची इच्छा धरून जर मला धृतराष्ट्र सभेमध्यें आव्हान करीत नसेल तर शकुनीबरोबरही द्यूत खेळण्याची माझी इच्छा नाहीं असें नाहीं. कारण, कोणी आव्हान केलें असतां त्यापासून कधींही निवृत्त व्हावयाचें नाहीं हें तर माझें सार्वकालिक व्रतच ठरलेलें आहे १६. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें विदुराला सांगून युधिष्ठिरानें प्रयाणासंबंधीं सर्व तयारी सत्वर करण्याची आज्ञा केली आणि दुसरा दिवस उजाडल्यानंतर सर्व भ्रातृगण व सेवक ह्यांसहवर्तमान द्रौपदी आदिकरून

इवापतत् । धातुश्च वशमन्वेति पाशैरिव नरः सितः १८ इत्युक्त्वा प्रययौ राजा सह क्षत्त्रा युधिष्ठिरः । अमृष्यमाणस्तस्याथ समाह्वानमरिन्दमः १९ बाह्लीकेन रथं यत्तमास्थाय परवीरहा । परिच्छन्नो ययौ पार्थो भ्रातृभिः सह पाण्डवः २० राजश्रिया दीप्यमानो ययौ ब्रह्मपुरःसरः । धृतराष्ट्रेण चाहूतः कालस्य समयेन च २१ स हास्तिनपुरं गत्वा धृतराष्ट्रगृहं ययौ । समियाय च धर्मात्मा धृतराष्ट्रेण पाण्डवः २२ तथा भीष्मेण द्रोणेन कर्णेन च कृपेण च । समियाय यथान्यायं द्रौणिना च विभुः सह २३ समेत्य च महाबाहुः सोमदत्तेन चैव ह । दुर्योधनेन शल्येन सौबलेन च वीर्यवान् २४ ये चान्ये तत्र राजानः पूर्वमेव समागताः । दुःशासनेन वीरेण सर्वैर्भ्रातृभिरेव च २५ जयद्रथेन च तथा कुरुभिश्चापि सर्वशः । ततः सर्वैर्महाबाहुर्भ्रातृभिः परिवारितः २६ प्रविवेश गृहं राज्ञो धृतराष्ट्रस्य धीमतः २७ ददर्श तत्र गान्धारीं देवीं पतिमनुव्रताम् । स्नुषाभिः संवृतां शश्वत्ताराभिरिव रोहिणीम् २८ अभिवाद्य स गान्धारीं तया च प्रतिन-

---

सर्व स्त्रियांना बरोबर घेऊन तो निघाला १७. कारण, आकाशांतून एकदम येणाऱ्या विजेच्या लोळानें ज्याप्रमाणें दृष्टि कुंठित होते त्याचप्रमाणें दैवामुळें बुद्धि कुंठित होते आणि पुरुष पाशांनीं बद्ध झाल्याप्रमाणें, दैवाधीन होऊन जातो १८. असो. ह्याप्रमाणें सांगून शत्रूंना जेरीस आणणाऱ्या युधिष्ठिर राजानें त्या धृतराष्ट्राच्या आव्हानाची टाळाटाळ न करितां विदुरासहवर्तमान तिकडे जाण्याचा निश्चय केला १९ आणि बाल्हीकदेशांतील अश्व जोडिलेल्या रथांत बसून भ्रात्यांनीं परिवेष्टित असलेला तो शत्रुवीरघातक पांडुनंदन कुंतीपुत्र त्यांसहवर्तमान निघाला २०. सारांश, राजवैभवानें झळकत असलेला तो युधिष्ठिर धृतराष्ट्राचें व भवितव्यतेचें आव्हान झाल्यामुळें ब्राह्मणांना पुढें करून बाहेर पडला २१. नंतर हास्तिनपुरास गेल्यावर तो धर्मात्मा पांडुपुत्र धृतराष्ट्राच्या गृहीं गेला आणि त्यानें त्याची भेट घेतली २२. तदनंतर भीष्म, द्रोणाचार्य, कर्ण, कृपाचार्य व द्रोणपुत्र अश्वत्थामा ह्यांची त्या प्रभु युधिष्ठिरानें यथायोग्य भेट घेतली २३. त्याचप्रमाणें तो महापराक्रमी वीर्यवान् युधिष्ठिर सोमदत्त, दुर्योधन, शल्य, सुबलपुत्र शकुनि २४, त्या ठिकाणीं पूर्वींच जुळलेले दुसरे आणखी राजे, वीर दुःशासन, इतरही सर्व भ्राते २५, जयद्रथ आणि इतरही सर्व कुरुवंशज ह्यांना भेटला आणि नंतर सर्व भ्रात्यांनीं परिवेष्टित होऊन तो महापराक्रमी युधिष्ठिर २६ बुद्धिमान् धृतराष्ट्र राजाच्या अंतःपुरांत गेल्यानंतर २७ पतीला अनुसरून वागणारी राजपत्नी गांधारी तारांनीं सर्वदां परिवेष्टित असलेल्या रोहिणीप्रमाणें स्नुषांनीं परिवेष्टित असलेली

न्दितः । ददर्श पितरं वृद्धं प्रज्ञाचक्षुषमीश्वरम् २९ राज्ञा मूर्धन्युपाघ्रातास्ते च कौरवनन्दनाः । चत्वारः पाण्डवा राजन्भीमसेनपुरोगमाः ३० ततो हर्षः समभवत्कौरवाणां विशांपते । तान्दृष्ट्वा पुरुषव्याघ्रान्पाण्डवान्प्रियदर्शनान् ३१ विविशुस्तेऽभ्यनुज्ञाता रत्नवन्ति गृहाणि च । ददृशुश्चोपयातांस्तान्द्रौपदीप्रमुखाः स्त्रियः ३२ याज्ञसेन्याः परामृद्धिं दृष्ट्वा प्रज्वलितामिव । स्नुषास्ता धृतराष्ट्रस्य नातिप्रमनसोऽभवन् ३३ ततस्ते पुरुषव्याघ्रा गत्वा स्त्रीभिस्तु संविदम् । कृत्वा व्यायामपूर्वाणि कृत्यानि प्रतिकर्म च ३४ ततः कृताह्निकाः सर्वे दिव्यचन्दनभूषिताः । कल्याणमनसश्चैव ब्राह्मणान्स्वस्ति वाच्य च ॥ मनोज्ञमशनं भुक्त्वा विविशुः शरणान्यथ ३५ उपगीयमाना नारीभिरस्वपन्कुरुपुङ्गवाः । अनन्तरं च तत्प्राप्य प्रीताः परपुरंजयाः ३६ जगाम तेषां सा रात्रिः पुण्या रतिविहारिणाम् । स्तूयमानाश्च विश्रान्ताः काले निद्रामथात्यजन् ३७ सुखोषितास्ते रजनीं प्रातः

त्याच्या दृष्टीं पडली २८. तेव्हां गांधारीला अभिवंदन करून तिचा आशीर्वाद घेतल्यानंतर त्या युधिष्ठिरानें कुरुकुलाधिपति व स्वतःचा पितृव्य जो वृद्ध आणि अंध धृतराष्ट्र त्याचें पुनरपि दर्शन घेतलें २९. तदनंतर, हे जनमेजयराजा, कुरुवंशजांना आनंद देणाऱ्या त्या भीमसेनप्रभृति चार पांडुपुत्रांचे मस्तकीं धृतराष्ट्र राजानें अवघ्राण केलें ३०. तेव्हां ज्यांचें दर्शनही प्रिय आहे अशा त्या पुरुषश्रेष्ठ पांडवांना अवलोकन केल्यावर, हे प्रजाधिपते जनमेजया, कुरुवंशजांना आनंद झाला ३१. नंतर (धृतराष्ट्राची वगैरे) अनुज्ञा झाल्यावर ते रत्नखचित वसतिगृहांमध्यें प्रविष्ट झाले असतां द्रौपदीप्रभृति स्त्रियांनीं त्यांना आलेले अवलोकन केले ३२. परंतु, द्रौपदीचें तें पराकाष्ठेचें उज्ज्वल वैभव अवलोकन करून धृतराष्ट्राच्या त्या स्नुषांना विशेषसा आनंद झाला नाहीं ३३. तदनंतर स्त्रियांसहवर्तमान कांहीं इकडल्यातिकडल्या गोष्टी झाल्यावर त्या पुरुषश्रेष्ठ पांडवांनीं व्यायामप्रभृति नित्य कृत्यें आटोपून केशप्रसाधन वगैरे केलें ३४. नंतर आन्हिक कर्म केल्यावर त्या सर्वांनीं दिव्य चंदन अंगाला लावून मनामध्यें कल्याण चिंतीत असलेल्या ब्राह्मणांचे आशीर्वाद घेतले व सुंदर अन्न भक्षण करून ते विश्रांतिगृहांमध्यें प्रविष्ट झाले ३५. तदनंतर स्त्रिया गाणी ह्मणत असतांना ते कुरुवंशज श्रेष्ठ पांडव शय्येवर आरूढ झाले व नंतर स्त्रियांचें तें गायन श्रवण करून त्या शत्रुसेनाविजयी पांडवांना आनंद झाला ३६. सारांश, रतिक्रीडा करणाऱ्या त्या पांडवांची ती रात्र आनंदांत गेली व ह्याप्रमाणें श्रमपरिहार झाल्यानंतर बंदी जन स्तुति करूं लागले असतां ते जागे झाले ३७. असो. ह्याप्रकारें रात्र सुखानें घालविल्यानंतर प्रातःकाळीं आन्हिक

सर्वे कृताह्निकाः । सभां रम्यां प्रविविशुः कितवैरभिनन्दिताः ३८[२०६४]
इति० सभापर्वणि द्यूतपर्वणि युधिष्ठिरसभागमनेऽष्टपञ्चाशत्तमोऽध्यायः॥ ५८॥

वैशम्पायन उवाच ॥ प्रविश्य तां सभां पार्था युधिष्ठिरपुरोगमाः । समेत्य पार्थिवान्सर्वान्पूजार्हानभिपूज्य च १ यथावयः समेयाना उपविष्टा यथार्हतः । आसनेषु विचित्रेषु स्पर्ध्यास्तरणवत्सु च २ तेषु तत्रोपविष्टेषु सर्वेष्वथ नृपेषु च । शकुनिः सौबलस्तत्र युधिष्ठिरमभाषत ३ शकुनिरुवाच ॥ उपस्तीर्णा सभा राजन्सर्वे त्वयि कृतक्षणाः । अक्षानुप्त्वा देवनस्य समयोऽस्तु युधिष्ठिर ४ युधिष्ठिर उवाच ॥ निकृतिर्देवनं पापं न क्षात्रोऽत्र पराक्रमः । न च नीतिर्ध्रुवा राजन्किं त्वं द्यूतं प्रशंससि ५ न हि मानं प्रशंसन्ति निकृतौ कितवस्य हि । शकुने मैव नो जैषीरमार्गेण नृशंसवत् ६ शकुनिरुवाच ॥ यो वेत्ति संख्यां निकृतौ विधिज्ञश्चेष्टास्वखिन्नः कितवोऽक्षजासु । महामतिर्यश्च जानाति द्यूतं स वै सर्वं सहते प्रक्रि-

---

कर्मे आटोपून ते सर्व त्या रमणीय सभेमध्यें प्रविष्ट झाले असतां द्यूतकारांनीं त्यांचें अभिनंदन केलें ३८. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं युधिष्ठिरसभागमनाविषयीं अठ्ठावंनावा अध्याय समाप्त झाला ॥ ५८ ॥

वैशंपायन सांगतातः—युधिष्ठिराला पुढें करून त्या सभेमध्यें प्रविष्ट झाल्यानंतर त्या कुंतीपुत्रांनीं सर्व राजांच्या भेटी घेतल्या आणि पूजेला योग्य असलेल्यांचें त्यांनीं पूजनही केलें १. सारांश, वयोमानाप्रमाणें (कोणाला प्रणाम, कोणाला आशीर्वाद वगैरे प्रकारानें) तेथील सर्वांच्या त्यांनीं भेटी घेतल्या आणि मनोहर आस्तरणें घातलेल्या चित्रविचित्र आसनांवर ते योग्यतेप्रमाणें बसले २. ह्याप्रमाणें ते पांडव त्या ठिकाणीं बसले असतां व तदनंतर सर्व नृपही त्या सभेंत बसले असतां सुबलपुत्र शकुनि युधिष्ठिराला ह्मणाला ३ " हे राजा, सभेमध्यें पट पसरलेला असून आह्मी सर्व लोक तुझी वाट पहात बसलों आहोंत. करितां, हे युधिष्ठिरा, आतां फासे टाकून द्यूताला आरंभ होऊं द्या " ४. युधिष्ठिर ह्मणतोः—पापाला कारणीभूत असलेलें हें द्यूत ह्मणजे केवळ वंचना आहे; ह्यांत कांहीं क्षात्र पराक्रम नाहीं आणि खरी नीतिही नाहीं. तेव्हां, हे राजा, तूं द्यूताचें नांव कशाला काढीत आहेस ? ५. वंचना करण्याविषयीं लोक कांहीं द्यूत खेळणाऱ्याला मान देत नसतात. ह्यास्तव, हे शकुने, नीचाप्रमाणें दुर्मार्गाचें अवलंबन करून तूं आह्मांला जिंकण्याची इच्छा धरूं नकोस ६. शकुनि ह्मणतोः—कपटसंबंधीं मार्ग माहीत असून द्यूतांतील इतिकर्तव्यतेचें ज्ञान ज्याला असतें तो द्यूतकार फांसा कसाही पडला तरी खेद मानीत नाहीं. सारांश, जो महामति

यासु ७ अक्षग्लहः सोऽभिभवेत्परं नस्तेनैव दोषो भवतीह पार्थ । दीव्यामहे पार्थिव मा विशङ्कां कुरुष्व पाणं च चिरं च मा कृथाः ८ युधिष्ठिर उवाच ॥ एवमाहायमसितो देवलो मुनिसत्तमः । इमानि लोकद्वाराणि यो वै भ्राम्यति सर्वदा ९ इदं वै देवनं पापं निकृत्या कितवैः सह । धर्मेण तु जयो युद्धे तत्परं न तु देवनम् १० नार्या म्लेच्छन्ति भाषाभिर्मायया न चरन्त्युत । अजिह्ममशठं युद्धमेतत्सत्पुरुषव्रतम् ११ शक्तितो ब्राह्मणार्थाय शिक्षितुं प्रयतामहे । तद्वै वित्तं मातिदेवीर्मा जैषीः शकुने परान् १२ निकृत्या कामये नाहं सुखान्युत धनानि वा । कितवस्येह कृतिनो वृत्तमेतन्न पूज्यते १३ शकुनिरुवाच ॥ श्रोत्रियः श्रोत्रियानेति निकृत्यैव युधिष्ठिर । विद्वानविदुषोऽभ्येति नाहुस्तां निकृतिं जनाः १४ अक्षैर्हि शिक्षितो-

---

द्यूत जाणितो तो सर्व प्रकारचें द्यूत करण्यास समर्थ होतो ७. (आतां द्यूत खेळणें पापाला कारणीभूत आहे ह्मणून जें तूं ह्मणालास तें बरोबर नाहीं. कारण,) हे कुंतीपुत्रा, पण जिंकणें अथवा हरणें हें फांशावर अवलंबून आहे आणि तो पण आपणांपैकीं कोणाच्या तरी पराभवास कारणीभूत होणार आहे. तेव्हां वस्तुतः पाहूं गेलें असतां त्या फांशाच्या अधीन असलेल्या पणामुळें ह्या द्यूतामध्यें दोष होत असतो (खेळणाऱ्याकडे दोषाचा कांहीं एक संबंध येत नाहीं). तस्मात्, हे राजा, आपण द्यूत खेळूं. तूं कांहीं मनामध्यें शंका आणूं नकोस. काय जें द्रव्य तुला पणाला लावावयाचें असेल तें लाव. आतां विलंब करूं नको ८. युधिष्ठिर ह्मणतोः—स्वर्गादि लोक प्राप्त होण्याचीं जीं कर्मोपासनादि साधनें त्यांमध्यें सर्वदां संचार करीत असलेले हे मुनिश्रेष्ठ असित देवल असें सांगत आहेत कीं ९ " द्यूतकारांसहवर्तमान कपटानें द्यूत खेळणें हें पापाला कारणीभूत असून संग्रामामध्यें धर्मानें जय मिळविणें श्रेष्ठ कर्म आहे; जयाकरितां द्यूताचें अवलंबन करणें प्रशस्त नाहीं " १०. आर्य जन वाचेनेंही कपट करीत नसून कर्मेंही कपटानें करीत नाहींत. कारण, कपट न करितां सरळ युद्ध करणें हेंच सत्पुरुषाचें व्रत होय ११. ह्यास्तव, हे शकुने, यथाशक्ति ब्राह्मणां (चें रक्षण करण्या) करितां ज्या वित्ताच्या योगानें आपण क्षत्रविद्या संपादन करण्याचा प्रयत्न करीत असतो तें सर्व वित्त पणाला लावून तूं द्यूत करूं नकोस आणि त्याच्या योगानें दुसऱ्यांना जिंकण्याचीही इच्छा धरूं नकोस १२. कपटानें सुख अथवा द्रव्य प्राप्त करून घेण्याची माझी इच्छा नाहीं आणि कृतकृत्य झालेल्या द्यूतकाराचें हें वर्तन लोक प्रशस्तही मानीत नाहींत १३. शकुनि ह्मणतोः—हे युधिष्ठिरा, (विजयेच्छारूप) नीचकर्माच्याच योगानें श्रोत्रिय इतर श्रोत्रियांना जिंकीत असतो आणि विद्वान्ही त्याच नीचकर्मानें अविद्वानांना

भ्येति निकृत्यैव युधिष्ठिर । विद्वानविदुषोऽभ्येति नाहुस्तां निकृतिं जनाः १५
अकृतास्त्रं कृतास्त्रश्च दुर्बलं बलवत्तरः । एवं कर्मसु सर्वेषु निकृत्यैव युधि-
ष्ठिर १६ विद्वानविदुषोऽभ्येति नाहुस्तां निकृतिं जनाः १७ एवं त्वं मामि-
हाभ्येत्य निकृतिं यदि मन्यसे । देवनाद्विनिवर्तस्व यदि ते विद्यते भयम् १८
युधिष्ठिर उवाच ॥ आहूतो न निवर्तेयमिति मे व्रतमाहितम् । विधिश्च
बलवान्राजन्दिष्टस्यास्मि वशे स्थितः १९ अस्मिन्समागमे केन देवनं मे
भविष्यति । प्रतिपाणश्च कोन्योस्ति ततो द्यूतं प्रवर्तताम् २० दुर्योधन
उवाच ॥ अहं दातास्मि रत्नानां धनानां च विशांपते । मदर्थे देविता चायं
शकुनिर्मातुलो मम २१ युधिष्ठिर उवाच ॥ अन्येनान्यस्य वै द्यूतं विषमं
प्रतिभाति मे । एतद्विद्वन्नुपादत्स्व काममेवं प्रवर्तताम् २२ [२०८६] इति०

पराजित करितो. परंतु, (वादामध्यें वगैरे जिंकणें ह्या) त्या (श्रोत्रियाच्या अथवा विद्वानाच्या कृती)ला लोक निकृति (ह्मणजे कपट अथवा नीचकर्म) ह्मणत नाहींत १४. हे युधिष्ठिरा, ज्या कपटाचें अवलंबन करून अक्षविद्यानिपुण पुरुष द्यूता-मध्यें निपुण नसलेल्या पुरुषाला जिंकितो त्याच कपटाचें अवलंबन करून विद्वान् अविद्वानांचा (वादामध्यें वगैरे) पराभव करीत असतो. परंतु, विद्वानाच्या त्या कृतीला लोक कपट ह्मणत नाहींत १५. अस्त्रविद्येंत निपुण असलेला पुरुष अस्त्रांत प्रवीण नसलेल्या पुरुषाचा पराजय करितो आणि बलाढ्य पुरुष दुर्बलाचा पराभव करीत असतो. सारांश, हे युधिष्ठिरा, इतर सर्व प्रकारच्या कर्मांमध्यें त्या त्या कर्मांतील रहस्य जाणणारा पुरुष कपटानेंच रहस्य न जाणणाऱ्यांचा पराभव करीत असतो. परंतु, लोक त्या कृतीला कपट ह्मणत नाहींत १६,१७. करितां, लोकांप्रमाणेंच तूं ह्या ठिकाणीं माझ्याकडे येऊन जर (द्यूत खेळण्याला) कपट समजत असशील व तुला जर (पराजित होण्याची) भीति वाटत असेल तर तूं द्यूतापासून निवृत्त हो १८. युधिष्ठिर ह्मणतोः—हे राजा, आव्हान झालें असतां निवृत्त व्हावयाचें नाहीं असें माझें व्रतच ठरलेलें आहे (आणि तूं तर द्यूताचा आग्रह सोडीत नाहींस). तेव्हां, हे राजा, दैव बलवत्तर असून मी सध्यां दैवाच्याच आधीन झालों आहें ! १९. असो. ह्या समुदाया-मध्यें कोणाशीं माझें द्यूत होणार आहे व माझ्याबरोबर पण लावण्यास दुसरा कोण तयार आहे ? हें कळलें ह्मणजे आपण द्यूताला आरंभ करूं २०. दुर्योधन ह्मणतोः—हे प्रजाधिपते, रत्नें व द्रव्य मी देणारा असून हा माझा मातुल शकुनि माझ्याकरितां खेळणारा आहे २१ युधिष्ठिर ह्मणतोः—हे ज्ञानवान् सुयोधना, एकानें दुसऱ्याकरितां द्यूत खेळणें मला नीट दिसत नाहीं. तस्मात्, ह्याचा तूं विचार कर आणि मग हवें तर

सभापर्वणि द्यूतपर्वणि युधिष्ठिरशकुनिसंवाद एकोनषष्टितमोऽध्यायः ॥५९॥

वैशम्पायन उवाच ॥ उपोह्यमाने द्यूते तु राजानः सर्व एव ते। धृतराष्ट्रं पुरस्कृत्य विविशुस्तां सभां ततः १ भीष्मो द्रोणः कृपश्चैव विदुरश्च महामतिः। नातिप्रीतेन मनसा तेन्ववर्तन्त भारत २ ते द्वन्द्वशः पृथक्चैव सिंहग्रीवा महौजसः। सिंहासनानि भूरीणि विचित्राणि विभेजिरे ३ शुशुभे सा सभा राजन्राजभिस्तैः समागतैः। देवैरिव महाभागैः समवेतैस्त्रिविष्टपम् ४ सर्वे वेदविदः शूराः सर्वे भास्वरमूर्तयः। प्रावर्तत महाराज सुहृद्द्यूतमनन्तरम् ५ युधिष्ठिर उवाच ॥ अयं बहुधनो राजन्सागरावर्तसंभवः। मणिर्हारोत्तरः श्रीमान्कनकोत्तमभूषणः ६ एतद्राजन्मम धनं प्रतिपाणोस्ति कस्तव। येन मां त्वं महाराज धनेन प्रतिदीव्यसे ७ दुर्योधन उवाच ॥ सन्ति मे मणयश्चैव धनानि सुबहूनि च। मत्सरश्च न मेर्थेषु जयस्वैनं दुरोदरम् ८ वैशम्पायन उवाच ॥ ततो जग्राह शकुनि-

---

खुशाल तुझ्याप्रमाणें द्यूत सुरू होऊं दे २२. ह्या प्रमाणें० सभापर्वांतील द्यूतपर्वांपैकीं युधिष्ठिर आणि शकुनि ह्यांच्या संवादाविषयीं एकुणसाठावा अध्याय समाप्त झाला॥५९॥

वैशंपायन सांगतातः—द्यूत सुरू होण्याचा समय झाला असतां ते सर्व राजे धृतराष्ट्राला पुढें घालून त्या सभेमध्यें प्रविष्ट झाले १ व हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, त्यांच्या बरोबर भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य व महाविवेकी विदुर हेही गेले. परंतु, त्यांचें मन चांगलेसें प्रशस्त नव्हतें २. सिंहासारख्या स्थूल कंठानें युक्त असलेले ते महावीर्यवान् राजे कांहीं दोघे दोघे आणि कांहीं वेगळे वेगळे तेथें असलेल्या असंख्य विचित्र सिंहासनांवर आरुढ झाले ३ असतां, हे राजा, एकत्र जुळलेल्या महाभाग्यवान् देवांच्या योगानें ज्याप्रमाणें स्वर्ग शोभूं लागतो त्याप्रमाणें त्या जमलेल्या राजांच्या योगानें ती सभा शोभूं लागली ४. कारण, हे महाराजा, तेथें जुळलेले ते सर्व वेदवेत्ते व शूर असून सर्वही तेजस्वी आकृतीनें युक्त होते. असो. ते बसल्यानंतर (प्रथमतः) मित्रभावानें द्यूताला आरंभ झाला ५. युधिष्ठिर ह्मणतोः—हे राजा, सर्व हारामध्यें उत्कृष्ट, उत्तम सुवर्णानें भूषित आणि कांतीनें युक्त असा हा सागरांतील भोंवऱ्यामध्यें उत्पन्न झालेला महामूल्यवान् मणि आहे६ व हेंच हे राजा, पणाला लावण्याचें माझें द्रव्य आहे. आतां, हे महाराजा, ज्याच्या योगानें तू माझ्याशीं द्यूत खेळणार असें तुझें कोणतें पणाला लावण्याचें द्रव्य ह्या माझ्या द्रव्याच्या तोडीचें आहे तें सांग ७. दुर्योधन ह्मणतोः—माझ्यापाशींही मणि आहेत आणि धनही विपुल आहे. (तूं पणांकरितां मांडिलेल्या) द्रव्याविषयीं माझे ठिकाणीं मत्सरबुद्धि नाहीं ८. वैशंपायन सांगतातः—तदनंतर

स्तानक्षानक्षतत्त्ववित् । जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत ९ [२०९५]
इति श्रीमहाभारते० सभापर्वणि द्यूतपर्वणि द्यूतारम्भे षष्टितमोऽध्यायः ॥ ६० ॥

युधिष्ठिर उवाच ॥ मत्तः कैतवकेनैव यज्जितोऽस्मि दुरोदरे । शकुने हन्त दीव्यामो ग्लहमानाः परस्परम् १ सन्ति निष्कसहस्रस्य भाण्डिन्यो भरिताः शुभाः । कोशो हिरण्यमक्षय्यं जातरूपमनेकशः ॥ एतद्राजन्मम धनं तेन दीव्याम्यहं त्वया २ वैशम्पायन उवाच ॥ कौरवाणां कुलकरं ज्येष्ठं पाण्डवमच्युतम् । इत्युक्तः शकुनिः प्राह जितमित्येव तं नृपम् ३ युधिष्ठिर उवाच ॥ अयं सहस्रसमितो वैयाघ्रः सुप्रतिष्ठितः । सुचक्रोपस्करः श्रीमान्किङ्किणीजालमण्डितः ४ संह्लादनो राजरथो य इहास्मानुपावहत् । जैत्रो रथवरः पुण्यो मेघसागरनिस्वनः ५ अष्टौ यं कुमुदच्छायाः सदश्वा राष्ट्रसंमताः । वहन्ति नैषां मुच्येत पदाद्भूमिमुपस्पृशन् ६ एतद्राजन्धनं मह्यं

अक्षविद्येचें तत्त्व जाणणाऱ्या शकुनीनें ते फांसे घेतले आणि (तुझें द्रव्य) जिंकिलें असें तो युधिष्ठिराला ह्मणालाच ९. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं द्यूतारंभाविषयीं साठावा अध्याय समाप्त झाला ॥ ६० ॥

युधिष्ठिर ह्मणतोः—हे गर्विष्ठा, द्यूतामध्यें कपटामुळेंच ज्याअर्थीं माझा सांप्रत पराजय झालेला आहे त्याअर्थीं, हे शकुने, अरे पुनरपि आतां आपण परस्परांना जिंकण्याच्या इच्छेनें डाव टाकूं १. हजारों भार सुवर्णाच्या अनेक पेट्या माझ्यापाशीं चांगल्यापैकीं भरलेल्या आहेत व त्यांत उत्कृष्टप्रकारच्या अक्षय्य सुवर्णाचा खजिनाच आहे. सारांश, हे राजा, हें धन मी आतां पणाला लाविलें असून त्याच्यासहवर्तमान मी तुझ्याशीं द्यूत खेळण्यास तयार आहें २. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें शकुनीला सांगितलें असतां सत्यापासून च्युत न होणारा जो कौरवकुलवर्धक ज्येष्ठ पांडुपुत्र युधिष्ठिर राजा त्याला शकुनीनें "जिंकिलें" एवढींच अक्षरें सांगितलीं ३. युधिष्ठिर ह्मणतोः—सहस्ररथतुल्य, व्याघ्रचर्मानें आच्छादित, अत्यंत प्रसिद्ध, उत्कृष्ट प्रकारच्या चक्रादि सामानानें युक्त, वैभवशाली, अल्पाकृतिघंटाजालानें भूषित ४ व गर्जनेनें युक्त असा हा राजरथ आहे आणि ह्यावरच आरूढ होऊन आह्मी येथें आलों आहोंत. हा पवित्र श्रेष्ठ रथ (संग्रामामध्यें) विजयी होणारा असून मेघाप्रमाणें अथवा सागराप्रमाणें ह्याचा ध्वनि (गंभीर) आहे ५. पादचारी पुरुष कितिही दूर असला तरी ज्यांच्या पायाखालीं सांपडण्याच्या भीतींतून सुटत नाहीं इतके वेगवान्, कमलासारख्या कांतीनें युक्त आणि सर्व राष्ट्राला स्पृहणीय असे उत्तम अश्व ह्या रथाला ओढून नेत असतात ६. सारांश, हें द्रव्य

तेन दीव्याम्यहं त्वया ७ वैशम्पायन उवाच ॥ एवं श्रुत्वा व्यवसितो निकृतिं समुपाश्रितः । जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत ८ युधिष्ठिर उवाच ॥ शतं दासीसहस्राणि तरुण्यो हेमभद्रिकाः । कम्बुकेयूरधारिण्यो निष्ककण्ठ्यः स्वलंकृताः ९ महार्हमाल्याभरणाः सुवस्त्राश्चन्दनोक्षिताः । मणीन्हेम च बिभ्रत्यश्चतुःषष्टिविशारदाः १० अनुसेवां चरन्तीमाः कुशला नृत्यसामसु । स्नातकानाममात्यानां राज्ञां च मम शासनात् ॥ एतद्राजन्मम धनं तेन दीव्याम्यहं त्वया ११ वैशम्पायन उवाच ॥ एतच्छ्रुत्वा व्यवसितो निकृतिं समुपाश्रितः । जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत १२ युधिष्ठिर उवाच ॥ एतावन्ति च दासानां सहस्राण्युत सन्ति मे । प्रदक्षिणानुलोमाश्च प्रावारवसनाः सदा १३ प्राज्ञा मेधाविनो दान्ता युवानो मृष्टकुण्डलाः । पात्रीहस्ता दिवारात्रमतिथीन्भोजयन्त्युत १४ एतद्राजन्मम धनं तेन दीव्याम्यहं त्वया १५ वैशम्पायन उवाच ॥ एतच्छ्रुत्वा व्यवसितो निकृतिं समुपाश्रितः । जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरम-

---

मीं आतां पणाला लाविलें असून ह्यासहवर्तमान तुझ्याशीं द्यूत खेळण्यास मी सिद्ध आहें ७. वैशंपायन सांगतातः—हें युधिष्ठिराचें ह्मणणें ऐकून घेऊन कपटाचा आश्रय केल्यामुळें जिंकण्याची खात्री असलेला तो शकुनि जितं एवढाच शब्द युधिष्ठिराला बोलला ८. युधिष्ठिर ह्मणतोः—सुवर्णमय पेट्या, उरोभूषणें, बाजूबंद, कंठभूषणें, इतरही उत्कृष्ट अलंकार, मोठमोठीं मूल्यवान् पुष्पभूषणें, रत्नालंकार व सुवर्णभूषणें हीं धारण करणाऱ्या; उत्कृष्ट वस्त्रें परिधान करणाऱ्या; अंगाला चंदनाची उटी लावणाऱ्या; चौसष्ट कलांमध्यें प्रवीण आणि नृत्यगायनांमध्यें कुशल अशा एक लक्ष तरुण दासी माझ्यापाशीं असून माझ्या आज्ञेनें ह्या स्नातक, अमात्य व राजे ह्यांची (पादप्रक्षालनादिरूप) सेवा करीत असतात. तस्मात्, हे राजा, हें माझें द्रव्य असून ह्यासहवर्तमान मी तुझ्याशीं द्यूत करितों ९, १०, ११. वैशंपायन सांगतातः—हें श्रवण केल्यावर ठक बनल्यामुळें जयाविषयीं निश्चित असलेल्या शकुनीनें जितं एवढाच शब्द युधिष्ठिराला सांगितला १२. युधिष्ठिर ह्मणतोः—विनयशील, सुखावह, सर्वदा उत्तरीय वस्त्र धारण करणारे, बुद्धिमान्, सांगितलेलें लक्ष्यांत धरणारे, जितेंद्रिय व उज्ज्वल कुंडलें धारण केलेले असे एक लक्ष दास माझे असून अतिथींना भोजन देण्याकरितां ते रात्रंदिवस हातांत ताटें घेऊन उभे असतात १३, १४. तेव्हां, हे राजा, हें माझें द्रव्य असून ह्याच्या योगानें मी तुझ्याशीं पण लावण्यास तयार आहें १५. वैशंपायन सांगतातः—धूर्ततेचें अवलंबन केल्यामुळें जयाविषयीं खात्री असलेल्या त्या शकुनीनें हें

भाषत १६ युधिष्ठिर उवाच ॥ सहस्रसङ्ख्या नागा मे मत्तास्तिष्ठन्ति सौबल। हेमकक्षाः कृतापीडाः पद्मिनो हेममालिनः १७ सुदान्ता राजवहनाः सर्वशब्दक्षमा युधि । ईषादन्ता महाकायाः सर्वे चाष्टकरेणवः १८ सर्वे च पुरभेत्तारो नवमेघनिभा गजाः । एतद्राजन्मम धनं तेन दीव्याम्यहं त्वया १९ वैशम्पायन उवाच ॥ इत्येवंवादिनं पार्थं प्रहसन्निव सौबलः । जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत २० युधिष्ठिर उवाच ॥ रथास्तावन्त एवेमे हेमदण्डाः पताकिनः । हयैर्विनीतैः संपन्ना रथिभिश्चित्रयोधिभिः २१ एकैको ह्यत्र लभते सहस्रपरमां भृतिम् । युध्यतोऽयुध्यतो वापि वेतनं मासकालिकम् ॥ एतद्राजन्मम धनं तेन दीव्याम्यहं त्वया २२ वैशम्पायन उवाच ॥ इत्येवमुक्ते वचने कृतवैरी दुरात्मवान् । जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत २३ युधिष्ठिर उवाच ॥ अश्वास्तित्तिरिकल्माषान्गान्ध-

---

भाषण श्रवण करून जितं एवढाच शब्द युधिष्ठिराला उद्देशून उच्चारिला १६. युधिष्ठिर ह्मणतोः—सुवर्णाच्या साखळदंडांनीं बांधिलेले, शिरोभूषणांनीं अलंकृत, गंडस्थलादि प्रदेशांचे ठिकाणीं पद्मचिन्हांनीं युक्त, सुवर्णमालांनीं भूषित, उत्तम प्रकारें शिकवून तयार केलेले, राजांनीं आरोहण करण्यास योग्य, संग्रामामध्यें सर्वप्रकारचा ध्वनि सहन करणारे, नांगराच्या दांड्यासारख्या लांब लांब दातांनीं युक्त, शरीरानें धिप्पाड व नूतन मेघाप्रमाणें कांतिमान् असे एक हजार मत्त गज माझ्यापाशीं आहेत व ते सर्वही आठ आठ हस्तिनींनीं युक्त असून शत्रूंचे किल्ले वगैरे पाडणारे सर्व आहेत. तस्मात् , हे राजा, हें माझें धन असून ह्यासहवर्तमान मी तुझ्याशीं पण लावण्यास सिद्ध आहें १७, १८, १९. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें युधिष्ठिर भाषण करीत असतांना त्याला हंसल्यासारिखें करून हातचलाखी साधल्यामुळें जयाविषयीं निर्धास्त असलेल्या त्या शकुनीनें जितं एवढाच शब्द त्या युधिष्ठिराला ऐकविला २०. युधिष्ठिर ह्मणतोः—तितकेच माझे हे (एक हजार) रथ, निशाणें व सौवर्ण ध्वजदंड ह्यांनीं युक्त असून चांगल्या सुशिक्षित अश्वांनीं व अद्भुत युद्ध करणाऱ्या योद्ध्यांनीं संपन्न आहेत २१. ह्यांपैकीं प्रत्येक रथ्याला एकेक हजार पगार मिळत असतो इतकेंच नव्हें परंतु, युद्धाचें काम पडो अगर न पडो प्रत्येक महिन्यास प्रत्येकाला तो पगार मिळतोच मिळतो. तस्मात् , हें माझें धन असून ह्याच्यासहवर्तमान, हे राजा, तुझ्याशीं पण लावण्यास मी सिद्ध आहें २२. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें भाषण केल्यावर वैर धरून राहिलेल्या त्या दुरात्म्या शकुनीनें जितं एवढाच शब्द त्या युधिष्ठिराला उद्देशून तोंडांतून काढिला २३. युधिष्ठिर ह्मणतोः—युद्धामध्यें अजिंक्य

वान्हेममालिनः । ददौ चित्ररथस्तुष्टो यांस्तान्गाण्डीवधन्वने २४ युद्धे-
जितः पराभूतः प्रीतिपूर्वमरिन्दमः । एतद्राजन्मम धनं तेन दीव्याम्यहं
त्वया २५ वैशम्पायन उवाच ॥ एतच्छ्रुत्वा व्यवसितो निकृतिं समुपाश्रितः ।
जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत २६ युधिष्ठिर उवाच ॥ रथानां शक-
टानां च श्रेष्ठानां चायुतानि मे । युक्तान्येव हि तिष्ठन्ति वाहैरुच्चावचै-
स्तथा २७ एवं वर्णस्य वर्णस्य समुच्चीय सहस्रशः । यथा समुदिता वीराः
सर्वे वीरपराक्रमाः २८ क्षीरं पिबन्तस्तिष्ठन्ति भुञ्जानाः शालितण्डुलान् ।
षष्टिस्तानि सहस्राणि सर्वे विपुलवक्षसः २९ एतद्राजन्मम धनं तेन
दीव्याम्यहं त्वया ३० वैशम्पायन उवाच ॥ एतच्छ्रुत्वा व्यवसितो निकृतिं
समुपाश्रितः । जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत ३१ युधिष्ठिर उवाच ॥
ताम्रलोहैः परिवृता निधयो ये चतुःशताः । पञ्चद्रौणिकः एकैकः सुवर्ण-
स्याहतस्य वै ३२ जातरूपस्य मुख्यस्य अनर्घेयस्य भारत । एतद्राजन्मम

असलेल्या शत्रुनाशक चित्ररथ गंधर्वाचा गांडीवधनुर्धारी अर्जुनानें पराभव केल्यानंतर त्यानें संतुष्ट होऊन तित्तिरिपक्ष्यासारख्या चित्रविचित्र वर्णानें युक्त असलेले व सुवर्णालंकारांनीं भूषित असलेले जे गांधर्व अश्व त्याला दिले तें, हे राजा, माझें धन असून त्याच्या योगानें मी तुझ्याशीं पण लावण्यास सिद्ध आहें २४, २५. वैशंपायन सांगतातः—मायेचा अवलंब केल्यामुळें जयाविषयीं निश्चिंत असलेल्या शकुनीनें हें भाषण श्रवण करून जितं एवढाच शब्द युधिष्ठिराच्या कानावर घातला २६. युधिष्ठिर ह्मणतोः—माझ्यापाशीं दहा दहा हजारांचा एकेक ह्याप्रमाणें दुसऱ्या उत्कृष्ट रथांचे व गाड्यांचे अनेक समुदाय लहान मोठीं वाहनें जोडून नेहमीं तयारच ठेविलेले आहेत २७ आणि ह्याचप्रमाणें प्रत्येक जातींतला चांगला चांगला पुरुष निवडून हजारों वीर जसे मिळाले तसे जुळवून ठेविलेले आहेत व ते सर्वही वीराचें कर्म करणारे आहेत २८. तसेच ते सर्व साठ हजार वीर विशाल वक्षःस्थलानें युक्त आहेत व शाल्योदन भक्षण करून दुग्धपान करीत पडलेले आहेत २९. तस्मात्, हें माझें द्रव्य असून ह्याच्या योगानें मी आतां तुझ्याशीं पण लावितों ३०. वैशंपायन सांगतातः— शाठ्यपणा स्वीकारिल्यामुळें जयाविषयीं निर्भय असलेल्या शकुनीनें हें युधिष्ठिराचें भाषण श्रवण केल्यावर त्याला उद्देशून जितं एवढाच शब्द ठेवून दिला ३१. युधिष्ठिर ह्मणतोः—प्रत्येकामध्यें अडीच अडीच मण केवळ सोनें ठेविलेले असे चारशें निधि तोंडावर मोहरा करून लोखंडाच्या पेट्यांतून ठेविलेले आहेत ३२ आणि, हे भारता, मुख्य असें जें महामूल्यवान् शुद्ध सुवर्ण तेंच त्यांतून भरलेलें आहे. करितां, हे राजा, हें माझें द्रव्य

धनं तेन दीव्याम्यहं त्वया ३३ वैशम्पायन उवाच ॥ एतच्छ्रुत्वा व्यवसितो निकृतिं समुपाश्रितः । जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत ३४ [२१२९]
इति श्रीमहाभारते० सभापर्वणि द्यूतपर्वणि देवन एकषष्टितमोध्यायः ॥ ६१ ॥

वैशम्पायन उवाच ॥ एवं प्रवर्तिते द्यूते घोरे सर्वापहारिणि । सर्वसंशयनिर्मोक्ता विदुरो वाक्यमब्रवीत् १ विदुर उवाच ॥ महाराज विजानीहि यत्त्वां वक्ष्यामि भारत । मुमूर्षोरौषधमिव न रोचेतापि ते श्रुतम् २ यद्वै पुरा जातमात्रो रुराव गोमायुवद्विस्वरं पापचेताः । दुर्योधनो भारतानां कुलघ्नः सोयं युक्तो भवतां कालहेतुः ३ गृहे वसन्तं गोमायुं त्वं वै मोहान्न बुध्यसे । दुर्योधनस्य रूपेण शृणु काव्यां गिरं मम ४ मधु वै माध्विको लब्ध्वा प्रपातं नैव बुध्यते । आरुह्य तं मज्जति वा पतनं चाधिगच्छति ५ सोयं मत्तोक्षद्यूतेन मधुवन्न परीक्षते । प्रपातं बुध्यते नैव वैरं कृत्वा महारथैः ६ विदितं मे महाप्राज्ञ भोजेष्वेवासमञ्जसम् । पुत्रं

आहे व त्याच्या योगानें मी तुझ्याशीं पण लावण्यास सिद्ध आहें ३३. वैशंपायन सांगतातः—प्रतारणेचें अवलंबन केल्यामुळें जयाविषयीं गुमान नसलेल्या शकुनीनें हें भाषण श्रवण केल्यावर जितं एवढेंच युधिष्ठिराला कळविलें ३४. ह्याप्रमाणें ०श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं द्यूतक्रीडेविषयीं एकसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६१ ॥

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें पांडवांच्या सर्वस्वाचा अपहार करणारें घोर द्यूत सुरू झालें असतां सर्व संशयांचें निरसन करणाऱ्या विदुरानें भाषणास आरंभ केला १. विदुर ह्मणतोः—हे महाराजा धृतराष्ट्रा, मुमूर्षूला ज्याप्रमाणें औषध रुचत नाहीं त्याचप्रमाणें माझें भाषण जरी तुला रुचणार नसलें तरी, हे भरतकुलोत्पन्ना, मी जें तुला सांगत आहें तें तूं ऐकून ठेव २. अरे, जो दुष्ट उत्पन्न होतांक्षणींच कोल्ह्याप्रमाणें अमंगल स्वर काढून ओरडला तो हा कुलघातकी दुर्योधन तुह्मा भरतवंशजांच्या नाशाला कारणीभूत होण्यास उद्युक्त झाला आहे ३. अरे, दुर्योधनाच्या रूपानें घरांत वास्तव्य करणाऱ्या कोल्ह्याला तूं मोहामुळें जाणीत नाहींस. तस्मात् , शुक्राचार्यांचें हें वचन तरी माझ्या पासून ऐकून ठेव ४. (शुक्राचार्य ह्मणतात) मधाचा व्यापार करणाऱ्या पुरुषाला मध दृष्टीं पडला असतां कडा वगैरे कांहीं एक त्याच्या लक्ष्यांत येत नाहीं. तो त्या कड्यावर चढून मधांतच बुडतो किंवा कड्यावरून खालीं पडतो ५. तसा हा तुझा पुत्र दुर्योधन मद्यपानासारिखा अक्षद्यूतानें भांबवून गेला असल्यामुळें मुळींच मागें पुढें पहात नाहीं आणि महारथी पांडवांशीं वैर करून प्राप्त होणारें पतनही हा जाणीत नाहीं ६. हे महाविचारी धृतराष्ट्रा, पौर जनांचें हित करण्याकरितां

संत्यक्तवान्पूर्वं पौराणां हितकाम्यया ७ अन्धका यादवा भोजाः समेताः कंसमत्यजन् । नियोगात्तु हते तस्मिन्कृष्णेनामित्रघातिना ८ एवं ते ज्ञातयः सर्वे मोदमानाः शतं समाः । त्वन्नियुक्तः सव्यसाची निगृह्णातु सुयोधनम् ॥ निग्रहादस्य पापस्य मोदन्तां कुरवः सुखम् ९ काकेनेमांश्चित्रबर्हाञ्छार्दूलान्क्रोष्टुकेन च । क्रीणीष्व पाण्डवान्राजन्मा मज्जीः शोकसागरे १० त्यजेत्कुलार्थे पुरुषं ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् । ग्रामं जनपदस्यार्थे आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ११ सर्वज्ञः सर्वभावज्ञः सर्वशत्रुभयंकरः । इति स्म भाषते काव्यो जम्भत्यागे महासुरान् १२ हिरण्यष्ठीविनः कांश्चित्पक्षिणो वनगोचरान् । गृहे किल कृतावासाँल्लोभाद्राजा न्यपीडयत् १३ स चोपभोगलोभान्धो हिरण्यार्थी परन्तप । आयतिं च तदात्वं च उभे सद्यो व्यनाशयत् १४ तदर्थकामस्तद्वत्त्वं मा द्रुहः पाण्डवान्नृप । मोहात्मा

पूर्वी एका भोजदेशांतील राजानें आपल्या अयोग्य पुत्राचाच त्याग केल्याचें मला विदित आहे ७. अंधक, यादव आणि भोज ह्या सर्वांनीं मिळून कंसाचा त्याग केला होता आणि दैवयोगानें पुढें शत्रुघातक कृष्णाच्या हातून त्याचा वध झाल्यावर८ त्या कुलांतील सर्व लोक शंभर वर्षें आनंदात राहिले. करितां, सुयोधनाचा बंदोबस्त करण्याविषयीं तूं अर्जुनाला आज्ञा कर; ह्मणजे ह्या दुष्टाचा बंदोबस्त झाल्यानें सर्व कुरुवंशज यथेष्ट आनंदांत राहतील ९. ह्यास्तव, हे राजा. कावळा देऊन अनेक मयूरपक्षी अथवा एक कोल्हें खर्ची घालून अनेक व्याघ्र विकत घेण्याप्रमाणें एका दुर्योधनाला देऊन टाकून तं पांडवांना संपादन करून घे. अरे, शोकसागरामध्यें (व्यर्थ) मग्न होऊन जाऊं नकोस १०. अरे, " कुलां (च्या रक्षणा) करितां पुरुषाचा, ग्रामाकरितां कुलाचा, देशाकरितां ग्रामाचा आणि आत्म्याकरितां पृथ्वीचा त्याग करावा " ११ असें जंभासुराचा त्याग करण्याविषयीं सर्वज्ञ, सर्वशत्रूंना भय उत्पन्न करणाऱ्या आणि सर्व प्राण्यांचें हृद्गत जाणणाऱ्या शुक्राचार्यांनीं मुख्य मुख्य असुरांना सांगितलें होतें १२. सुवर्णमय लाळेनें युक्त असे कांहीं वनांतील पक्षी खरोखर घरांत येऊन राहिले असतां (ह्यांच्या उदरांत सुवर्णाची खाणच सांपडेल आणि आपणांला सर्वदां सुवर्णाचा उपभोग घेतां येईल अशा) लोभानें अंध होऊन, हे शत्रुनाशका धृतराष्ट्रा, एका राजानें सुवर्णाकरितां त्यांचा वध केला (आणि ह्याप्रमाणें उपकारी प्राण्यांचा घात केल्यामुळें) जन्मानंतर परलोक आणि इहलोकीं लब्ध होणारें सुवर्ण ह्या दोहोंनाहीं एकदम तो मुकला १३,१४. तस्मात्, हे राजा, तूं त्याच्याचप्रमाणें द्रव्यलोभ धरून पांडवांशी द्रोह करूं नकोस. अरे, सांप्रत तुझें अंतकरण द्रव्यमोहानें ग्रस्त झाल्यामुळें

तप्स्यसे पश्चात्पक्षिहा पुरुषो यथा १५ जातं जातं पाण्डवेभ्यः पुष्पमादत्स्व भारत । मालाकार इवारामे स्नेहं कुर्वन्पुनः पुनः १६ वृक्षानङ्गारकारीव मैनान्धाक्षीः समूलकान् । मा गमः ससुतामात्यः सबलश्च यमक्षयम् १७ समवेतान्हि कः पार्थान्प्रतियुध्येत भारत । मरुद्भिः सहितो राजन्नपि साक्षान्मरुत्पतिः १८ [२१४७]इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां॰सभापर्वणि द्यूतपर्वणि विदुरहितवाक्ये द्विषष्टितमोऽध्यायः॥६२॥

विदुर उवाच ॥ द्यूतं मूलं कलहस्याभ्युपैति मिथो भेदं महते दारुणाय । तदास्थितोऽयं धृतराष्ट्रस्य पुत्रो दुर्योधनः सृजते वैरमुग्रम् १ प्रातिपेयाः शान्तनवा भीमसेनाः सबाह्लिकाः । दुर्योधनापराधेन कृच्छ्रं प्राप्स्यन्ति सर्वशः २ दुर्योधनो मदेनैष क्षेमं राष्ट्रादपोहति । विषाणं गौरिव मदात्स्वयमारुजतेऽत्मनः ३ यश्चित्तमन्वेति परस्य राजन्वीरः कविः स्वामवमन्य दृष्टिम् । नावं समुद्रे इव बालनेत्रामारुह्य घोरे व्यसने निमज्जेत् ४

तुला हें बरें वाटत आहे; परंतु, पुढें त्या पक्षिघातकी पुरुषाप्रमाणें तूं पश्चात्ताप करीत बसशील १५ करितां, उद्यानावर पुनः पुनः प्रेम करणारा माळी ज्याप्रमाणें जें जें पुष्प वृक्षांना येईल तें तें घेत असतो त्याचप्रमाणें पांडवांचे ठिकाणीं प्रेम करून तूं त्यांच्यापासून (उपहारविषयकद्रव्यरूप) जें जें पुष्प प्राप्त होत जाईल तें तें स्वीकारून असत जा १६. अरे, वृक्षच दग्ध करून टाकणाऱ्या कोळसेविक्या (लोणाऱ्या)प्रमाणें तूं ह्यांचा समूल नाश करूं नको आणि त्याच्या योगानें पुत्र, अमात्य व सैन्य ह्यांसहवर्तमान यमसदनासही जाऊं नको १७. हे भरतकुलोत्पन्ना धृतराष्ट्रराजा, मरुद्गणांसहवर्तमान साक्षात् देवराज इंद्र जरी झाला तरी देखील एकत्र जुळलेल्या कुंतीपुत्रांना जिंकण्यास कोण समर्थ होणार आहे? (करितां, तूं ह्यांना कपटानें जिंकूं नकोस) १८. ह्याप्रमाणें ॰सभापर्वांतील द्यूतपर्वांपैकीं विदुराच्या हितकारक भाषणाविषयीं बासष्टावा अध्याय समाप्त झाला ॥६२॥

विदुर ह्मणतोः—कलहाचें मूळ व परस्परांत भेद पाडणारें असें हें द्यूत परिणामीं मोठें दारुण भय प्राप्त होण्यास कारणीभूत होत असतें. तस्मात्, त्या द्यूताचा अवलंब करून असलेला हा धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन भयंकर वैर उत्पन्न करीत आहे १. ह्या दुर्योधनाच्या अपराधामुळें भयंकर सैन्यानें युक्त असलेले प्रतीपकुळांतील व शांतनुकुळांतील पुरुष बाल्हीकदेशांतील अधिपतींसहवर्तमान सर्वस्वीं संकटांत पडतील २. मदमत्त झालेला बैल ज्याप्रमाणें मदाच्या योगानें आपलें स्वतःचें शिंग मोडून घेतो त्याचप्रमाणें हा दुर्योधन मदाच्या योगानें सर्व राष्ट्राचें कल्याण नाहींसें करून टाकीत आहे ३. जिच्यावरील सुकाणु धरणारा मूढ आहे अशा नौकेंत आरोहण करून जात असलेले

दुर्योधनो ग्लहते पाण्डवेन प्रीयायसे त्वं जयतीति तच्च । अतिनर्माजायते संप्रहारो यतो विनाशः समुपैति पुंसाम् ५ आकर्षस्तेवाक्फलः सुप्रणीतो हृदि प्रौढो मन्त्रपदः समाधिः । युधिष्ठिरेण कलहस्तवायमचिन्तितोभिमतः स्वबन्धुना ६ प्रातिपेयाः शान्तनवाः शृणुध्वं काव्यां वाचं संसदि कौरवाणाम् । वैश्वानरं प्रज्वलितं सुघोरं मा यास्यध्वं मन्दमनुप्रपन्नाः ७ यदा मन्युं पाण्डवोजातशत्रुर्न संयच्छेदक्षमदाभिभूतः । वृकोदरः सव्यसाची यमौ च कोत्र द्वीपः स्यात्तुमुले वस्तदानीम् ८ महाराज प्रभवस्त्वं धनानां पुरा द्यूतान्मनसा यावदिच्छेः । बहुवित्तान्पाण्डवांश्चेज्जयस्त्वं किं ते तत्स्याद्वसु विन्देह पार्थान् ९ जानीमहे देवितं सौबलस्य वेद द्यूते निकृतिं

पुरुष ज्याप्रमाणें सागरामध्यें बुडतात त्याचप्रमाणें स्वतः ज्ञानी असलेला जो वीर पुरुष आपल्या विचार दृष्टीची परवा न करितां दुसऱ्याच्या मनाप्रमाणें वागत असतो तो, हे राजा, घोर संकटामध्यें निमग्न होतो ४. अरे, पांडुपुत्र युधिष्ठिराशीं पण लावून दुर्योधन द्यूत खेळत आहे आणि त्याचा जय होतो ह्मणून तूं अगदीं आनंदसागरांत गटांगळ्या खात आहेस. परंतु, अमर्यादित विनोदच पुढें युद्धरूप बनत असतो आणि त्याच्या पासून पुरुषांचा नाश होतो (हें तूं समजून ठेव) ५. अरे, शकुनीनें उत्तम ह्मणून उपस्थित केलेलें हें द्यूत निंद्य फल देणारें आहे. अरे, हा द्यूतरूप समाधि मंत्रपूर्वक (अथवा मसलत ठरून) तुझ्या अंतःकरणामध्यें दृढ झाला आहे खरा. परंतु, तुझ्या मनांत नसतांनाही युधिष्ठिराशीं कलह ह्या रूपानें हा तुझा द्यूतरूप समाधि रूपांतर पावून केवल तुझ्या स्वतःच्या पुत्राला मात्र तो अभिमत होईल ६. हे प्रतीपकुलोत्पन्न व शांतनुकुलोत्पन्न जनहो, कौरवांच्या सभेमध्यें मीं पूर्वीं सांगितलेलें शुक्राचार्यांचें नीतिविषयक वचन तुह्मीं ऐकून ठेवा. अहो, ह्या मूढ दुर्योधनाच्या अनुरोधानें वागून तुह्मी अत्यंत भयंकर अशा प्रज्वलित अग्नींत जाऊन पडूं नका ७. अहो, द्यूतमदानें ग्रस्त झालेल्या ह्या अजातशत्रु पांडुपुत्र धर्मराजाला व त्याचप्रमाणें भीम, अर्जुन आणि नकुलसहदेव ह्यांना जेव्हां क्रोध असह्य होईल तेव्हां तुमुल युद्ध सुरू झाल्यावर (विपत्तिरूप सागरामध्यें मग्न होऊं लागलेल्या) तुह्मांला बेटाप्रमाणें आश्रय देणारा कोण रे तयार होईल ८. हे महाराज धृतराष्ट्रा, (पांडवांशीं प्रेमानें वागलास तर) तूं धनाची खाण आहेस व ह्यामुळें द्यूतावांचूनच तुला मनांत आणशील एतकें द्रव्य संपादन होणारें आहे. तेव्हां, विपुलसंपत्तीनें युक्त असलेल्या पांडवांना (द्यूतानें) जरी तूं जिंकिलेस तरीं तुला परिणामीं काय बरें चांगलें फल प्राप्त होणार? करितां, तूं ह्या ठिकाणीं (दुर्योधनाला खर्चीं घालून) पांडवरूप द्रव्य संपादन कर ९. हे भरत-

पार्वतीयः। यतः प्राप्तः शकुनिस्तत्र यातु मा यूयुधो भारत पाण्डवेयान् १०
[२१५७]इति० सभापर्वणि द्यूतपर्वणि विदुरवाक्ये त्रिषष्टितमोऽध्यायः॥६३॥

दुर्योधन उवाच॥ परेषामेव यशसा श्लाघसे त्वं सदा क्षत्तः कुत्सयन्धार्तराष्ट्रान्। जानीमहे विदुर यत्प्रियस्त्वं बालानिवास्मानवमन्यसे नित्यमेव १ स विज्ञेयः पुरुषोन्यत्रकामो निन्दाप्रशंसे हि तथा युनक्ति। जिह्वा कथं ते हृदयं व्यनक्ति यो न ज्यायसः कृथा मनसः प्रातिकूल्यम् २ उत्सङ्गे च व्याल इवाहितोसि मार्जारवत्पोषकं चोपहंसि। भर्तृघ्नं त्वां न हि पापीय आहुस्तस्मात्क्षत्तः किं न बिभेषि पापात् ३ जित्वा शत्रून्फलमाप्तं महद्वै मास्मान्क्षत्तः परुषाणीह वोचः। द्विषद्भिस्त्वं संप्रयोगाभिनन्दी मुहुर्द्वेषं यासि नः संप्रयोगात् ४ अमित्रतां याति नरोक्षमं ब्रुवन्निगूहते गुह्यममि-

---

वंशजा धृतराष्ट्रा, सुबलपुत्र शकुनीचें द्यूत आह्मी जाणीत आहोंत. ह्या पर्वतप्रदेशाधिपति शकुनीला अक्षविद्येंतील कपट चांगलें अवगत आहे. करितां, हा शकुनि जेथून आला असेल तेथें ह्याला जाऊं द्या. तूं (ह्याच्या द्वारानें) पांडवांशीं युद्ध करण्याचा प्रसंग आणूं नको १० ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मकश्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं विदुराच्या भाषणाविषयीं त्रेसष्टावा अध्याय समाप्त झाला॥६३॥

दुर्योधन ह्मणतोः—हे विदुरा, तूं सर्वदां धृतराष्ट्रपुत्रांची निंदा करून दुसऱ्यांची मात्र कीर्तीबद्दल स्तुति करीत असतोस. अरे, विदुरा, पोरांप्रमाणें आमचा नित्य अवमान करीत असलेल्या तुला कोण प्रिय आहेत हें आह्मी समजून आहोंत १. पुरुषाला कोण प्रिय आहे हें तो करीत असलेल्या निंदेवरून आणि प्रशंसेवरून ओळखावें. तस्मात्, नात्यानें ज्येष्ठ असलेल्या आह्मा धृतराष्ट्रपुत्रांविषयीं विरुद्ध गोष्ट तूं मनामध्यें आणिली नाहींस (असें जर ह्मणावें) तर ही तुझी जिव्हा आमच्याविषयीं असलेला तुझ्या हृदयांतील द्वेष कसा बरें प्रकट करीत आहे ? २. अरे, मार्जाराप्रमाणें तूं ज्याअर्थी अन्नदात्याच्याच घाताची इच्छा करीत आहेस त्याअर्थी तुला जो धृतराष्ट्रानें मांडीवर घेऊन पोषण केला त्याचें फल (आश्रय देणाऱ्याचा घात करणाऱ्या) सर्पालाच मांडीवर घेतल्याप्रमाणें आलें (ह्मणावयाचें). अरें, तूं स्वामिघातकी असूनही तुला (पांडुपुत्र जरी) अतिपापी ह्मणत नसले तरी, हे विदुरा, तूं त्या स्वामिद्रोहरूप पातकाची भीति बाळगीत नाहींस हें काय ? ३. हे विदुरा, शत्रूंना जिंकून आह्मीं महत् फल प्राप्त करून घेतलेलें आहे. करितां, तूं आह्मांला उद्देशून ह्या ठिकाणीं (हितशत्रुत्वानें) कठोर शब्द बोलूं नकोस. अरे, शत्रूंशीं सख्य करण्यांत आनंद मानणारा तूं आमच्यांत राहून आमच्या द्वेषाला मात्र बारंवार पात्र होत आहेस ४.

त्रमंस्तवे । तद्वाश्रितोऽपत्रप किं नु बाधसे यदिच्छसि त्वं तदिहाभिभाषसे ५ मा नोऽवमंस्था विद्म मनस्तवेदं शिक्षस्व बुद्धिं स्थविराणां सकाशात् । यशो रक्षस्व विदुर संप्रणीतं मा व्यापृतः परकार्येषु भूस्त्वम् ६ अहं कर्तेति विदुर मा च मंस्था मा नो नित्यं परुषाणीह वोचः । न त्वां पृच्छामि विदुर यद्धितं मे स्वस्ति क्षत्तर्मा तितिक्षून्क्षिणु त्वम् ७ एकः शास्ता न द्वितीयोऽस्ति शास्ता गर्भे शयानं पुरुषं शास्ति शास्ता । तेनानुशिष्टः प्रवणादिवाम्भो यथा नियुक्तोऽस्मि तथा भवामि ८ भिनत्ति शिरसा शैलमहिं भोजयते च यः । धीरेव कुरुते तस्य कार्याणामनुशासनम् ९ यो बलादनुशास्तीह सोऽमित्रं तेन विन्दति । मित्रतामनुवृत्तं तु समुपेक्षेत पण्डितः १० प्रदीप्य यः प्रदीप्ताग्निं प्राक्किरं नाभिधावति ।

अरे, असह्य भाषण करणारा पुरुष द्वेषास पात्र होत असतो. ह्याकरितां, एखाद्या समोर त्याच्या शत्रूची प्रशंसा करण्याचा जरी प्रसंग आला तरी आपल्या मनांतील गुह्य कोणीही पुरुष व्यक्त करीत नाहीं. (परंतु, तुला त्याची मुळींच परवा नाहीं). हे निर्लज्जा, त्या धृतराष्ट्रराजाच्या आश्रयाला तूं राहिला असतांना ह्या सभेमध्यें इच्छेस येईल तें भाषण करून त्या राजालाच कां बरें तूं दुःख देत आहेस ? ५. हे विदुरा, तूं आमचा अवमान करीत जाऊं नकोस. तुझें हें अंतःकरण आह्मी जाणून आहोंत. अरे, वृद्ध लोकांपासून तूं कांहीं अक्कल तरी शीक आणि (पूर्वजांनीं संपादन करून ठेविलेला) नांवलौकिक राख. हे विदुरा, तूं (आमचें खाऊन) शत्रूंचें कार्य करण्याविषयीं तत्पर रहात जाऊं नकोस ६. अरे, विदुरा, " मी कर्ता आहें " असें तूं समजून आह्मांला नित्य ह्या ठिकाणीं कठोर शब्द बोलत जाऊं नकोस. हे विदुरा, मला कोणती गोष्ट हितकारक आहे हें मी तुला विचारीत नाहीं. करितां, हे विदुरा, तुझें कल्याण असो. बाबारे, तूं आह्मां क्षमाशीलांना दुःख देऊं नकोस ७. अरे, पुरुषाला शिकविणारा एकच असतो. दुसरा शास्ता संभवतच नाहीं. जो मुख्य शास्ता आहे तो गर्भामध्यें असतांनाच पुरुषाला काय सांगावयाचें तें सांगत असतो. तस्मात् , ज्याप्रमाणें उदक सखल प्रदेशांतून लावून द्यावें तिकडे जात असतें त्याप्रमाणें त्या शास्त्यानें (प्रेरणेच्या द्वारानें) मला (काय तो) उपदेश केला असून त्यानें जसें सांगितलें आहे तसाच मी वागत आहें ८. अरे, ज्याची आज्ञा झाली असतां पुरुष मस्तकानें पर्वत विदारण करण्यास समर्थ होत असतो आणि जो (तुझ्या सारिख्या) सर्पांचें (आमच्या सारख्यांकडून) पोषणही करवितो तोच आपल्या मनानें सर्वप्रकारचीं कृत्यें करण्यास आह्मांला (प्रेरणेच्या द्वारानें) आज्ञा करीत असतो ९. अरे, (विचारिलें नसतांही)

भस्मापि न स विन्देत शिष्टं क्वचन भारत ११ न वासयेत्पारवर्ग्यं द्विषन्तं विशेषतः क्षत्तरहितं मनुष्यम् । स यत्रेच्छसि विदुर तत्र गच्छ सुसान्त्विता ह्यसती स्त्री जहाति १२ विदुर उवाच ॥ एतावता पुरुषं ये त्यजन्ति तेषां सख्यमन्तवद्ब्रूहि राजन् । राज्ञां हि चित्तानि परिप्लुतानि सान्त्वं दत्त्वा मुसलैर्घातयन्ति १३ अबालत्वं मन्यसे राजपुत्र बालोहमित्येव सुमन्दबुद्धे । यः सौहृदे पुरुषं स्थापयित्वा पश्चादेनं दूषयते स बालः १४ न श्रेयसे नीयते मन्दबुद्धिः स्त्री श्रोत्रियस्येव गृहे प्रदुष्टा । ध्रुवं न रोचेद्भरतर्षभस्य पतिः कुमार्या इव षष्टिवर्षः १५ अतः प्रियं

जो अशा प्रसंगीं बुद्धया एकाद्या पुरुषाला उपदेश करीत सुटतो त्याचा तो पुरुष शत्रु होतो. ह्मणून मित्रत्वाचें नातें असलेल्या पुरुषाला उपदेश करण्याचें शहाण्या मनुष्यानें सोडून द्यावें (सारांश, तुझा मी पोषण करणारा असल्यामुळें तूं जरी पितृव्य असलास तरी उपदेश करण्याचें तुझें नातें राहिलें नसून फार तर मित्र ह्या नात्यानें कांहीं सुचविणें तुला योग्य होईल. करितां, तूं आह्मांला शहाणा असशील तर उपदेश अगर आज्ञा करण्याचें सोडून द्यावेंस हें बरें) १०. हे भरतकुलोत्पन्ना विदुरा, कापरासारिखा ज्वालाग्राही पदार्थ प्रथम पेटवून देऊन लवकरच तो विजविण्याकरितां जो तिकडे धांवाधांव करीत नाहीं त्याला त्या पदार्थाची राखही अवशिष्ट राहिलेली मिळत नाहीं ११. हे विदुरा, आपला द्वेष करणाऱ्या शत्रुपक्षीय पुरुषाला आणि विशेषतः आपलें अहित करणाऱ्या पुरुषाला घरांत ठेवूं नये. करितां, तशाप्रकारचा असलेला तूं , हे विदुरा, इच्छेस येईल तिकडे चालता हो. (अरे, तुझी आशा धरून आतां आह्मांला कर्तव्य काय आहे ?) कितीही सांत्वन केलें तरी (जाराबरोबर जाण्यास हुरळलेली) जारिणी स्त्री (आज नाहीं उद्यां तरी) भर्त्याला सोडून उठून जायचीच १२. विदुर ह्मणतोः— हे दुर्योधनराजा, हा इतका प्रकार घडला ह्यावरून आश्रिताचा त्याग करणाऱ्या लोकांचें सख्य नश्वर आहे असें मला वाटतें. तर तूंच ह्याचा काय तो निर्णय सांग. अरे, राजांचीं अंतःकरणें द्वेषानें भरलेलीं असल्यामुळें (आपला कोप गुप्त राखण्याकरितां) ते प्रथम सांत्वन करून नंतर मुसळांनीं द्वेष्य पुरुषाचा घात करीत असतात. (परंतु, तूं आपला कोप उघड करून दर्शवीत असल्यामुळें सामान्य राजनीतिही तुला समजत नाहीं) १३. असो. हे अत्यंतमंदबुद्धि राजपुत्रा, "मी बाल आहें" असें समजून तूं स्वतःचे ठिकाणीं बालत्व नाहीं असें समजत आहेस. परंतु, एकाद्या पुरुषाला प्रथम मित्र समजून नंतर जो त्याला दूषण लावितो तो बाल होय १४. अरे, दूषित झालेली स्त्री ज्याप्रमाणें विद्वान् ब्राह्मणाच्या घरांत घेतां येत नाहीं त्याचप्रमाणें मंदबुद्धि पुरुषाला

चेदनुकाङ्क्षसे त्वं सर्वेषु कार्येषु हिताहितेषु । स्त्रियश्च राजञ्जडपङ्गुकांश्च पृच्छ त्वं वै तादृशांश्चैव सर्वान् १६ लभ्यते खलु पापीयान्नरो नु प्रियवागिह । अप्रियस्य हि पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः १७ यस्तु धर्मपरश्च स्याद्धित्वा भर्तुः प्रियाप्रिये । अप्रियाण्याह पथ्यानि तेन राजा सहायवान् १८ अव्याधिजं कटुजं तीक्ष्णमुष्णं यशोमुषं परुषं पूतिगन्धि । सतां पेयं यन्न पिबन्त्यसन्तो मन्युं महाराज पिब प्रशाम्य १९ वैचित्रवीर्यस्य यशो धनं च वाञ्छाम्यहं सहपुत्रस्य शश्वत् । यथा तथा तेस्तु नमश्च तेस्तु ममापि च स्वस्ति दिशन्तु विप्राः २० आशीविषान्नेत्रविषान्कोपयेन्न च

कल्याणा(च्यामार्गा)कडे नेतां येत नाहीं. तेव्हां कुमारिकेला ज्याप्रमाणें साठ वर्षांचा पति रुचत नाहीं त्याचप्रमाणें भरतवंशजांमध्यें श्रेष्ठ (!) निपजलेल्या तुला (माझ्या सारिखा) हिताचा उपदेश करणारा पुरुष रुचणार नाहीं हें निश्चितच आहे १५. तस्मात् , सर्व प्रकारच्या हिताहितसंबंधीं कृत्यांविषयीं जर तुला प्रिय भाषणाचीच इच्छा असेल तर, हे राजा, तूं स्त्रिया, मंदबुद्धि, पंगु आणि इतरही त्याचप्रकारचे सर्व लोक ह्यांना विचारीत जा (ह्मणजे झालें) १६. अरे, अशाप्रसंगीं (कसें कां असेना) प्रिय भाषण करणारा नीच पुरुष खरोखर (तेव्हांच) सांपडतो. परंतु, अप्रिय जरी असलें तरीं हितकारक असेल तेंच भाषण करणारा वक्ताहीं दुर्लभ असून तें ऐकून घेणारा श्रोताहीं दुर्लभच आहे १७. यजमानाला प्रिय काय आहे आणि अप्रिय काय आहे ह्याची परवा न करितां केवळ धर्माविषयीं तत्पर राहून अप्रिय जरीं असल्या तरी हितकारक असतील त्याच गोष्टी जो सांगत असतो तोच राजाचा खरा साह्यकारी होय १८. हे महाराजा, कुटकी वगैरे कडवट द्रव्यांनीं बनविलेलें, तीक्ष्ण, जाड्यनाशक, कामोद्दीपक, घृतादिस्नेहरहित व दुर्गंधि असें जें व्याधिनाशक औषध असमंजस पुरुष घेत नाहींत तें समंजस लोक घे(ऊन व्याधीपासून मुक्त हो)त असतात. करितां, तूंही व्याधिजन्य नसून दूषणजन्य असलेला, मर्मभेदक शब्दांनीं परिपूर्ण, दुसऱ्याच्या अंगाचा संताप करणारा, नांवलौकिकाला बट्टा लावणारा, कठोर भाषणांनीं भरलेला व दुष्टाप्रमाणें प्रत्ययास येणारा हा आपला नीचपणा गिळून टाक आणि स्वस्थ हो १९. पुत्रांसहवर्तमान धृतराष्ट्राची कीर्ति व धन हीं अक्षय्य रहावींत अशी माझी इच्छा आहे. मग तुझ्या मनांत जें असेल तें असूं दे. (तूं जर मला इच्छेस येईल तिकडे जाण्यास सांगत आहेस तर) तुलाही हा माझा (शेवटला) नमस्कार असो आणि (स्वस्ति ह्मणून तुझ्या आशीर्वादाची मला गरज नसून) ब्राह्मण मला स्वस्ति ह्मणून आशिर्वाद देवोत २०. हे कुरुनंदना, दंश करून वध करणाऱ्या सर्पांना आणि केवळ क्रोधदृष्टीनेंच भस्म

पण्डितः ॥ एवं तेहं वदामीदं प्रयतः कुरुनन्दन २१[२१७८] इति श्रीमहाभारते० सभापर्वणि द्यूतपर्वणि विदुरहितवाक्ये चतुःषष्टितमोध्यायः ॥ ६४ ॥

शकुनिरुवाच ॥ बहु वित्तं पराजैषीः पाण्डवानां युधिष्ठिर । आचक्ष्व वित्तं कौन्तेय यदि तेस्त्यपराजितम् १ युधिष्ठिर उवाच ॥ मम वित्तमसंख्येयं यदहं वेद सौबल । अथ त्वं शकुने कस्माद्वित्तं समनुपृच्छसि २ अयुतं प्रयुतं चैव शङ्कुं पद्मं तथार्बुदम् । खर्वं शङ्खं निखर्वं च महापद्मं च कोटयः ३ मध्यं चैव परार्धं च सपरं चात्र पण्यताम् । एतन्मम धनं राजंस्तेन दीव्याम्यहं त्वया ४ वैशम्पायन उवाच ॥ एतच्छ्रुत्वा व्यवसितो निकृतिं समुपाश्रितः । जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत ५ युधिष्ठिर उवाच ॥ गवाश्वं बहुधेनूकमसंख्येयमजाविकम् । यत्किंचिदनुपर्णाशां प्राक्सिन्धोरपि सौबल ६ एतन्मम धनं सर्वं तेन दीव्याम्यहं त्वया ७ वैशम्पायन उवाच ॥ एतच्छ्रुत्वा व्यवसितो निकृतिं समुपाश्रितः । जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत ८ युधिष्ठिर उवाच ॥ पुरं जनपदो

करून टाकणाऱ्या महात्म्यांना समंजस पुरुषानें कोपवूं नये हें मी तुला मोठ्या कळकळीनें सांगत आहें २१. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं विदुराच्या हितकारक भाषणाविषयीं चौसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥६४॥

शकुनि ह्मणतोः—हे युधिष्ठिरा, पांडवांचें पुष्कळ द्रव्य तूं हरलास. आतां, हे कुंतीपुत्रा, तुझें जर कांहीं द्रव्य पराजित होण्याचें राहिलें असेल तर सांग १. युधिष्ठिर ह्मणतोः—हे सुबलपुत्रा, माझ्यापाशीं असंख्य द्रव्य आहे व तें मला ठाउक आहे. करितां, हे शकुने, वित्ताविषयीं तूं मला प्रश्न कां ह्मणून करीत आहेस? २. अयुत, शंकु, पद्म, अर्बुद, खर्व, शंख, निखर्व, महापद्म, कोटि ३, मध्य, परार्ध आणि परार्धापेक्षांही जास्त असलेलें माझें द्रव्य ह्या ठिकाणीं पणाला लागूं दे. सारांश, हे राजा, हें माझें द्रव्य असून त्याच्यासहवर्तमान मी तुझ्याशीं द्यूत खेळण्यास सिद्ध आहें ४. वैशंपायन सांगतातः—हें श्रवण केल्यानंतर छलाचें अवलंबन केल्यामुळें जयाविषयीं निभ्रांत असलेल्या शकुनीनें जितं येवढेंच भाषण युधिष्ठिराशीं केलें ५. युधिष्ठिर ह्मणतोः—हे सुबलपुत्रा, सिंधुनदीच्या पूर्वेपासून पर्णाशानदीपर्यंत बैल घोडे, शेळ्यामेंढ्या व विपुल धेनु असें जें कांहीं पशुरूप धन आहे ६ तें हें सर्व माझें द्रव्य असून त्याच्यासहवर्तमान मी तुझ्याशीं पण लावण्यास सिद्ध आहें ७. वैशंपायन सांगतातः—छद्माचा आश्रय केल्यामुळें जय येण्याबद्दल फिकीर नसलेल्या शकुनीनें हें भाषण श्रवण केल्यावर जितं एवढेंच युधिष्ठिराला समजाविलें ८. युधिष्ठिर

भूमिरब्राह्मणधनैः सह। अब्राह्मणाश्च पुरुषा राजञ्छिष्टं धनं मम॥ एत-
द्राजन्मम धनं तेन दीव्याम्यहं त्वया ९ वैशम्पायन उवाच॥ एतच्छ्रुत्वा
व्यवसितो निकृतिं समुपाश्रितः। जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत १०
युधिष्ठिर उवाच॥ राजपुत्रा इमे राजञ्छोभन्ते यैर्विभूषिताः। कुण्डलानि
च निष्काश्च सर्वं राजविभूषणम् ११ एतन्मम धनं राजंस्तेन दीव्याम्यहं
त्वया १२ वैशम्पायन उवाच॥ एतच्छ्रुत्वा व्यवासितो निकृतिं समुपा-
श्रितः। जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत १३ युधिष्ठिर उवाच॥
श्यामो युवा लोहिताक्षः सिंहस्कन्धो महाभुजः। नकुलो ग्लह एवैको
विद्ध्येतन्मम तद्धनम् १४ शकुनिरुवाच॥ प्रियस्ते नकुलो राजन्राजपुत्रो
युधिष्ठिर। अस्माकं वशतां प्राप्तो भूयः केनेह दीव्यसे १५ वैशम्पायन
उवाच॥ एवमुक्त्वा तु तानक्षाञ्छकुनिः प्रत्यदीव्यत। जितमित्येव शकु-
निर्युधिष्ठिरमभाषत १६ युधिष्ठिर उवाच॥ अयं धर्मान्सहदेवोनुशास्ति

ह्मणतोः—राजधानी, देश, ब्राह्मणांची मालमत्ता खेरीज करून इतर भूमि आणि ब्राह्मणां-वांचून इतर सर्व पुरुष हें माझें धन अवशिष्ट राहिलेलें आहे. तस्मात्, हे राजा, हें धन माझें आतां पणाला लावावयाचें आहे व त्या धनानें मी तुझ्याशीं द्यूत खेळण्यास सिद्ध आहें ९. वैशंपायन सांगतातः—कैतवाचा स्वीकार केल्यामुळें जयाविषयीं मनामध्यें शंकाही नसलेल्या शकुनीनें हें भाषण श्रवण केल्यावर जितं एवढाच शब्द युधिष्ठिराला विदित केला १०. युधिष्ठिर ह्मणतोः—हे राजा, ज्यांच्या योगानें हे (प्रतिविंध्यप्रभृति) राजकुमार भूषित झाले असतां शोभा पावतात तीं कुंडलें, कंठभूषणें व इतरही सर्व राजालंकार ११ हें माझें धन असून त्याच्या योगानें, हे राजा, तुझ्याशीं पण लावण्यास मी सिद्ध आहें १२. वैशंपायन सांगतातः—व्याजाचा आश्रय केल्या-मुळें जयाची खातर नसलेला शकुनि हें भाषण श्रवण केल्यावर जितं एवढाच शब्द युधिष्ठिराशीं वदला १३. युधिष्ठिर ह्मणतोः—(सुवर्णासारखी) पीतवर्ण कांति, आरक्तवर्ण नेत्र, सिंहासारखें पुष्ट स्कंध आणि आजानु बाहु ह्यांनीं युक्त असलेला हा तरुण नकुल आतांपर्यंत पणाला लाविलेल्या सर्व धनाच्या बरोबरीचा एकटाच आहे. तस्मात्, हेंच माझें सांप्रत पणाला लावण्याचें द्रव्य आहे असें तूं समज १४. शकुनि ह्मणतोः—हे राजा, हा तुला प्रिय असलेला राजपुत्र आमच्या स्वाधीन झालाच (असें तूं समज) आणि, हे युधिष्ठिरा, पुनरपि कोणत्या धनानें ह्या ठिकाणीं तूं पण लाव-णार तें सांग १५. वैशंपायन सांगतातः—असें बोलून शकुनीनें ते फांसे युधिष्ठिरापुढें टाकिले आणि जितं एवढेंच त्यानें युधिष्ठिराला निवेदन केलें १६. युधिष्ठिर ह्मणतोः—

लोके ह्यस्मिन्पण्डिताख्यां गतश्च ॥ अनर्हता राजपुत्रेण तेन दीव्याम्यहं त्वाप्रियवत्प्रियेण १७ वैशम्पायन उवाच ॥ एतच्छ्रुत्वा व्यवसितो निकृतिं समुपाश्रितः । जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत १८ शकुनिरुवाच ॥ माद्रीपुत्रौ प्रियौ राजंस्तवेमौ विजितौ मया । गरीयांसौ तु ते मन्ये भीमसेनधनञ्जयौ १९ युधिष्ठिर उवाच ॥ अधर्मं चरसे नूनं यो नावेक्षसि वै नयम् । यो नः सुमनसां मूढ विभेदं कर्तुमिच्छसि २० शकुनिरुवाच ॥ गर्ते मत्तः प्रपतते प्रमत्तः स्थाणुमृच्छति । ज्येष्ठो राजन्वरिष्ठोसि नमस्ते भरतर्षभ २१ स्वप्ने तानि न दृश्यन्ते जाग्रतो वा युधिष्ठिर । कितवा यानि दीव्यन्तः प्रलपन्त्युत्कटा इव २२ युधिष्ठिर उवाच ॥ यो नः सङ्ख्ये नौरिव पारनेता जेता रिपूणां राजपुत्रस्तरस्वी । अनर्हता लोकवीरेण तेन दीव्याम्यहं शकुने फाल्गुनेन २३ वैशम्पायन उवाच ॥ एतच्छ्रुत्वा व्यवसितो निकृतिं

हा सहदेव धर्मोपदेश करीत असून ह्या भूलोकामध्यें पंडित ह्या पदवीला प्राप्त झालेला आहे. तेव्हां, मला प्रिय आणि ह्मणूनच पणाला लावण्यास अयोग्य असलेला तोही राजपुत्र मी प्रिय नसल्याप्रमाणें पणाला लावून त्याच्या योगानें तुझ्या बरोबर द्यूत करितों १७. वैशंपायन सांगतातः—दंभाचें अवलंबन केल्यामुळें जयाविषयीं दरद नसलेल्या शकुनीनें हें भाषण श्रवण करून जिंतं एवढेंच युधिष्ठिराला कथन केलें १८. शकुनि ह्मणतोः—हे राजा, तुला प्रिय असलेले हे उभयतां माद्रीपुत्र मीं जिंकिले. परंतु, भीमसेन आणि अर्जुन हे तुला (सहोदर ह्मणून ह्या नकुलसहदेवांपेक्षां) अधिक प्रिय आहेत असें मला वाटतें १९. युधिष्ठिर ह्मणतोः—हे मूढा, न्यायाकडे दृष्टि न देतां परस्पराविषयीं प्रशस्त मनानें युक्त असलेल्या आह्मांमध्यें भेद पाडण्याची इच्छा करणारा तूं खरोखर ह्याच्या योगानें अधर्माचें आचरण करीत आहेस २०. शकुनि ह्मणतोः—(द्यूतानें) मत्त झालेला पुरुष नरकांत पडतो आणि त्याला स्थाणुत्व प्राप्त होतें. तस्मात्, हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिर राजा, तूं ज्येष्ठ असून सर्वांत श्रेष्ठ आहेस. मी तुला (घडलेल्या अपराधाबद्दल) नमस्कार करितों २१. हे युधिष्ठिरा, द्यूत खेळत असतांना बेफाम होऊन द्यूतकार जे प्रलाप करितात तसे प्रलाप जाग्रदवस्थेंत तर नाहींच परंतु स्वप्नावस्थेंतही होत असल्याचें प्रत्ययाला येत नाहीं (तस्मात्, मला क्षमा कर) २२. युधिष्ठिर ह्मणतोः—हे शकुने, जो शत्रूना जिंकणारा वेगवान् राजपुत्र नौकेप्रमाणें आह्मांला युद्धसागरांतून पार नेत असतो आणि ह्मणूनच पणाला लावण्यास जो पात्र नाहीं त्या लोकवीर अर्जुनालाही पणाला लावून मी तुझ्याशीं द्यूत करण्यास सिद्ध आहें २३. वैशंपायन सांगतातः—कुमार्गाचा स्वीकार केल्यामुळें जयासंबंधानें बेमुर्वत असलेल्या

समुपाश्रितः । जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत २४ शकुनिरुवाच ॥ अयं मया पाण्डवानां धनुर्धरः पराजितः पाण्डवः सव्यसाची । भीमेन राजन्दयितेन दीव्य यत्कैतवं पाण्डव तेवशिष्टम् २५ युधिष्ठिर उवाच ॥ यो नो नेता यो युधि नः प्रणेता यथा वज्री दानवशत्रुरेकः । तिर्यक्प्रेक्षी संनतभ्रूर्महात्मा सिंहस्कन्धो यश्च सदात्यमर्षी २६ बलेन तुल्यो यस्य पुमान्न विद्यते गदाभृतामग्र्य इहारिमर्दनः । अनर्हता राजपुत्रेण तेन दीव्याम्यहं भीमसेनेन राजन् २७ वैशम्पायन उवाच ॥ एतच्छ्रुत्वा व्यवसितो निकृतिं समुपाश्रितः । जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत २८ शकुनिरुवाच ॥ बहु वित्तं पराजैषीर्भ्रातृंश्च सहयद्विपान् । आचक्ष्व वित्तं कौन्तेय यदि तेस्त्यपराजितम् २९ युधिष्ठिर उवाच ॥ अहं विशिष्टः सर्वेषां भ्रातॄणां दयितस्तथा । कुर्यामहं जितः कर्म स्वयमात्मन्युपप्लवे ३० वैशम्पायन उवाच ॥ एतच्छ्रुत्वा व्यवसितो निकृतिं समुपाश्रितः । जितमित्येव

शकुनीच्या तोंडांतून युधिष्ठिराला उद्देशून जितं एवढाच शब्द बाहेर पडला २४. शकुनि ह्मणतोः—पांडवांपैकीं धनुर्धर जो पांडुपुत्र अर्जुन तो तर हा मीं जिंकून घेतलाच. आतां तूं आपला प्रिय भीमसेन पणाला लावून द्यूत खेळ. कारण, हे पांडुपुत्रा, द्यूतकारांनीं हरण करावयाचें तें एक तुझें द्रव्य अद्यापि अवशिष्ट राहिलेलें आहे २५. युधिष्ठिर ह्मणतोः—जो आमचा पुढारी असून युद्धामध्येंही आमचा अग्रगण्य असतो, वज्रपाणि इंद्राप्रमाणें जो राक्षसांचा मुख्य शत्रु आहे, नत असलेल्या भ्रुकुटींनीं युक्त असून जो वक्रदृष्टीनें अवलोकन करीत असतो, सिंहासारिख्या पुष्ट स्कंधांनीं संपन्न असून जो सर्वदां अतिक्रुद्ध असतो २६, बलानें ज्याची बरोबरी करणारा कोणीही पुरुष नाहीं आणि ह्या पृथ्वींत गदा धारण करणाऱ्या सर्वांमध्यें श्रेष्ठ असून जो शत्रूंचा नाशच करीत असतो त्या वास्तविक पणाला लावण्याला पात्र नसलेल्याही राजपुत्र भीमसेनाला पणाला लावून, हे राजा, मी तुझ्याशीं द्यूत करण्यास सिद्ध आहें २७. वैशंपायन सांगतातः—कूटाचें अवलंबन केल्यामुळें जयाविषयीं संशयच नसलेल्या शकुनीच्या मुखांतून हें भाषण श्रवण केल्यावर युधिष्ठिराला उद्देशून जितं एवढींच अक्षरें निघालीं २८. शकुनि ह्मणतोः—हे कुंतीपुत्रा, विपुल द्रव्य आणि अश्वगजांसहवर्तमान भ्राते तूं हरलास. करितां, अद्यापि तुझें कांहीं जिंकिलें नसलेलें द्रव्य असल्यास सांग २९. युधिष्ठिर ह्मणतोः—मी सर्व भ्रात्यांना प्रिय असून सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहें. करितां, सर्वस्व नाश होऊन पराजित झालेला मी आतां आपल्या स्वतःचेच ठिकाणीं पण लावून घेऊन तुझ्याशीं द्यूत कर्म करितों ३०. वैशंपायन सांगतातः—कौटिल्याचा स्वीकार केल्यामुळें

शकुनिर्युधिष्ठिरमभाषत ३१ शकुनिरुवाच॥ एतत्पापिष्ठमकरोर्यदात्मानं पराजये।शिष्टे सति धने राजन्पाप आत्मपराजयः ३२ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वा मताक्षस्तान्ग्लहे सर्वानवस्थितान्।पराजयं लोकवीरानुक्त्वा राज्ञां पृथक्पृथक् ३३ शकुनिरुवाच॥ अस्ति ते वै प्रिया राजन्ग्लह एकोपराजितः। पणस्व कृष्णां पाञ्चालीं तयात्मानं पुनर्जय ३४ युधिष्ठिर उवाच॥ नैव ह्रस्वा न महती न कृशा नातिरोहिणी।नीलकुञ्चितकेशी च तया दीव्याम्यहं त्वया ३५ शारदोत्पलपत्राक्ष्या शारदोत्पलगन्धया। शारदोत्पलसेविन्या रूपेण श्री समानया ३६ तथैव स्यादानृशंस्यात्तथा स्याद्रूपसंपदा। तथा स्याच्छीलसंपत्त्या यामिच्छेत्पुरुषः स्त्रियम् ३७ सर्वैर्गुणैर्हि संपन्नामनुकूलां प्रियंवदाम्।यादृशीं धर्मकामार्थसिद्धिमिच्छेन्नरः स्त्रियम् ३८

जयाविषयीं मुळींच पंचाइतींत नसलेल्या शकुनीचीं,हें भाषण श्रवण केल्यावर, जितं एवढीच युधिष्ठिराशीं भाषा झाली ३१. शकुनि ह्मणतोः—अरे, इतक्यांत स्वतःला जिंकून घेतलेंस हें अत्यंत पापकर्म तूं केलेंस. कारण, हे राजा, इतर द्रव्य अवशिष्ट असतांना स्वतःला जिंकून घेणें हें पातकाला कारणीभूत होणारें आहे ३२. वैशंपायन सांगतातः— ह्याप्रमाणें पणासंबंधानें धर्मराजाशीं भाषण करून व पांडवभूपालांचा पराजय झाल्याचें तेथें बसलेल्या पृथ्वींतील सर्व वीरांना पृथक् पृथक् सांगून युधिष्ठिराला ३३ शकुनि ह्मणालाः—हे राजा, तुझी प्रिया हें एक पणाला लावण्यास योग्य असें द्रव्य अद्यापि जिंकण्याचें अवशिष्ट राहिलेलें आहे. तस्मात्, पांचालराजाची कन्या जी कृष्णा तिला प्रथम पणाला लाव आणि तूर्त तिच्या योगानें स्वतःला दास्यांतून मुक्त करून घे ३४. युधिष्ठिर ह्मणतोः—जी ठेंगणी नाहीं, उंच नाहीं, स्थूल नाहीं व कृशही नाहीं अशी जी कृष्णवर्ण व वक्र केंस ह्यांनीं युक्त असलेली द्रौपदी तिच्यासहवर्तमान मी तुझ्याशीं द्यूत करण्यास सिद्ध आहें ३५. शरदृतूंतील कमलपत्राप्रमाणें हिचें नेत्र असून हिच्या मुखाला सुगंधही शरदृतूंत प्रफुल्लित होणाऱ्या कमलांप्रमाणें येत असतो. त्याचप्रमाणें शरत्कालीन कमलांचें ही सेवन करणारी असून रूपानेंही ही लक्ष्मीची बरोबरी करणारी आहे ३६. " आपणांला ही स्त्री असावी " अशी जिच्याविषयीं पुरुषाला इच्छा उत्पन्न होईल अशाच प्रकारें हिचें रूप व शील असून ती ममताळूही तशीच आहे ३७. धर्म, अर्थ आणि काम ह्यांची सिद्धि होण्याला जशाप्रकारची स्त्री असणें पुरुषाला इष्ट आहे तशाप्रकारची ही पांचाली सर्वगुणसंपन्न आहे आणि त्याचप्रमाणें स्वामींना अनुकूल होईल असेंच वर्तन करणारी ही असून भाषणही प्रिय होईल असेंच करणारी आहे ३८.

---

१ श्रीति भिन्नं पदं छान्दसस्तृतीयाया लुक् ईसवर्णो वेति नीलकण्ठः॥

चरमं संविशति या प्रथमं प्रतिबुध्यते। आगोपालाविपालेभ्यः सर्वं वेद कृता-
कृतम् ३९ आभाति पद्मवद्वक्त्रं सस्वेदं मल्लिकेव च । वेदीमध्या दीर्घकेशी
ताम्रास्या नातिलोमशा ४० तयैवंविधया राजन्पाञ्चाल्याहं सुमध्यया । ग्लहं
दीव्यामि चार्वङ्ग्या द्रौपद्या हन्त सौबल ४१ वैशम्पायन उवाच ॥एवमुक्ते तु
वचने धर्मराजेन धीमता। धिग्धिगित्येव वृद्धानां सभ्यानां निःसृता गिरः ४२
चुक्षुभे सा सभा राजन्राज्ञां संजज्ञिरे शुचः । भीष्मद्रोणकृपादीनां स्वेदश्च
समजायत ४३ शिरो गृहीत्वा विदुरो गतसत्त्व इवाभवत् । आस्ते ध्याय-
न्नधोवक्त्रो निःश्वसन्निव पन्नगः ४४ धृतराष्ट्रस्तु संहृष्टः पर्यपृच्छत्पुनः
पुनः । किं जितं किं जितमिति ह्याकारं नाभ्यरक्षत ४५ जहर्ष कर्णो-
ऽतिभृशं सह दुःशासनादिभिः । इतरेषां तु सभ्यानां नेत्रेभ्यः प्रापतज्ज-

---

ही सर्वांच्या शेवटीं शयन करीत असून सर्वांच्या पूर्वी उठत असते आणि अगदीं गुराखीमेंढपाळांपर्यंत त्यांनीं केलें काय व करावयाचें उरलें काय हें सर्व ती समजून घेत असते ३९. मल्लिकेच्या (ह्मणजे मोगऱ्याच्या) पुष्पाप्रमाणें सुगंधी असलेलें हिचे मुख घर्मबिंदूंनीं युक्त झालें असतां जलतुषारांनीं युक्त झालेल्या कमलाप्रमाणें शोभत असतें. असो. (गार्हपत्य आणि आहवनीय ह्या दोन अग्नींच्या मध्यें असणाऱ्या) वेदीच्या मध्यभागाप्रमाणें हिचा कटिप्रदेश कृश असून हिचे केंस लांब लांब आहेत; हिचें मुख आरक्तवर्ण आहे आणि हिचें शरीर विशेषसें रोमयुक्त नाहीं ४०. तस्मात् , हे सुबलपुत्रा गांधारराजा, अशाप्रकारें उत्कृष्ट कटिप्रदेशानें युक्त असून मनोहर अवयवांनीं संपन्न असलेली जी पांचालराजाची कन्या द्रौपदी तिला पणाला लावून मी तुझ्याशीं द्यूत खेळण्यास सिद्ध आहें! ४१. वैशंपायन सांगतातः—विचारी धर्मराजानेंही असें भाषण केलें असतां सभेंत बसलेल्या वृद्धांच्या तोंडांतून " धिक्कार असो; धिक्कार असो " असेच शब्द निघाले ४२. सारांश, हे जनमेजयराजा, ती सभा अगदीं क्षुब्ध होऊन जाऊन तेथें बसलेले राजे खेद करूं लागले; भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य इत्यादिकांच्या शरीरांना तर (चाललेला प्रकार पाहून) घाम सुटला ४३; गुडघ्यांत मान घालून विदुर कांहीं वेळपर्यंत मृतवत् स्तब्ध झाला आणि ह्याप्रमाणें अधोमुख झालेला तो विदुर होत असलेला प्रकार मनांत आणून सर्पाप्रमाणें दीर्घ व उष्ण सुस्कारे टाकूं लागला ४४. तथपि धृतराष्ट्र मात्र पराकाष्ठेचा आनंदित होऊन " काय जिंकिलें ? काय जिंकिलें ? " असें वारंवार विचारूं लागला. कारण, (पांडवांचें सर्वस्व आपल्या पुत्रांनीं हरण केल्यामुळें आनंदसागरांत मग्न झालेल्या) त्या धृतराष्ट्राला भान राहिलें नसल्यामुळें आपला अभिप्राय त्याला लपवून ठेवितां आला नाहीं ४५ असो. (धृतराष्ट्राप्रमाणें) कर्णालाही

लम् ४६ सौबलस्त्वभिधायैवं जितकाशी मदोत्कटः । जितमित्येव तानक्षान्पुनरेवान्वपद्यत ॥ ४७ ॥ [२२२५] इति श्रीमहाभारते० संहितायां वैयासिक्यां सभापर्वणि द्यूतपर्वणि द्रौपदीपराजये पञ्चषष्टितमोध्यायः॥६५॥

दुर्योधन उवाच ॥ एहि क्षत्तर्द्रौपदीमानयस्व प्रियां भार्यां संमतां पाण्डवानाम् । संमार्जतां वेश्म परैतु शीघ्रं तत्रास्तु दासीभिरपुण्यशीला १ विदुर उवाच ॥ दुर्विभाषं भाषितं त्वादृशेन न मन्द संबुध्यसि पाशबद्धः । प्रपाते त्वं लम्बमानो न वेत्सि व्याघ्रान्मृगः कोपयसेतिवेलम् २ आशीविषास्ते शिरसि पूर्णकोपा महाविषाः । मा कोपिष्ठाः सुमन्दात्मन्मा गमस्त्वं यमक्षयम् ३ न हि दासीत्वमापन्ना कृष्णा भवितुमर्हति । अनीशेन हि राज्ञैषा पणे न्यस्तेति मे मतिः ४ अयं धत्ते वेणुरिवात्मघाती

दुःशासनप्रभृति धृतराष्ट्रपुत्रांसहवर्तमान अत्यंत हर्ष झाला. परंतु, ह्यांवांचून सभेमध्यें बसलेल्या इतर सर्वांच्या नेत्रांतून टपटप अश्रु गळूं लागले ४६. तथापि जयानें चढून जाऊन द्यूतमदानें बेफाम झालेल्या सुबलपुत्र शकुनीनें ("हे राजा, तुझी प्रिया पांचाली अद्यापि पणाला लावावयाची राहिली आहे. करितां, तिला पणाला लावून तूर्त तूं आपली दास्यांतून सुटका करून घे") ह्याप्रमाणें धर्मराजाला सांगितल्यानंतर जितं ह्मणून पुनरपि ते फांसे हातामध्यें घेतले ४७. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं द्रौपदीजिंकल्याविषयीं पासष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६५ ॥

दुर्योधन ह्मणतोः—हे दासीपुत्रा विदुरा, चल चल (गुणी ह्मणून तुला) संमत असलेली जी पांडवांची प्रिय भार्या द्रौपदी तिला इकडे घेऊन ये. हे दासीपुत्रा, इकडे घेऊन(आधी)तिला आमचें घर झाडायला लागूं दे आणि ती दुराचारिणी द्रौपदी आमच्या इतर दासींसहवर्तमान त्या ठिकाणीं राहूं दे १. विदुर ह्मणतोः— तुझ्या सारिख्याला हें निंद्य भाषण तेंव्हांच करितां आलें. परंतु, हे मूढा, (मृत्यूच्या,) पाशांनीं बद्ध झालेल्या तुला कसलेंही भान राहिलेलें नाहीं. अरे, तूं यःकश्चित् मृग असून व्याघ्रांना अत्यंत कोप आणीत आहेस. परंतु, (ह्यामुळें उंच कड्यावरून) तूं लोंबू लागून खालीं हापटण्याच्या बेतांत आला आहेस हें जाणीत नाहींस २. अरे, मोठ्या जलाल विषानें युक्त आणि पराकाष्ठेचे क्रोधी असे हे सर्प अगदीं तुझ्या मस्तकावर आहेत. करितां, हे अत्यंतमूढमते दुर्योधना, त्यांना तूं आणखी कोपवूं नको आणि यमसदनास जाऊं नको ३. अरे, (स्वतःला पणाला लावून घेतल्यामुळें) स्वतंत्र नसलेल्या धर्मराजानें ह्या द्रुपदकन्येला पणाला लाविलेली आहे. तस्मात्, ती (तुमच्या ह्मणण्याप्रमाणें) दासी होण्यास योग्य नाहीं असें मला वाटतें ४. अहो, ज्याप्रमाणें आपल्या

फलं राजा धृतराष्ट्रस्य पुत्रः । द्यूतं हि वैराय महाभयाय मत्तो न बुध्य-
त्ययमन्तकाले ५ नारुन्तुदः स्यान्न नृशंसवादी न हीनतः परमभ्याददीत।
ययास्य वाचा पर उद्विजेत न तां वदेदुषतीं पापलोक्याम् ६ समुच्चरन्त्य-
तिवादाश्च वक्त्राद्यैराहतः शोचति राज्यहानि। परस्य नामर्मसु ते पतन्ति
तान्पण्डितो नावसृजेत्परेषु ७ अजो हि शस्त्रमगिलत्किलैकः शस्त्रे विपन्ने
शिरसास्य भूमौ। निकृन्तनं स्वस्य कण्ठस्य घोरं तद्वद्वैरं मा कृथाः पाण्डु-
पुत्रैः ८ न किंचिदित्थं प्रवदन्ति पार्था वनेचरं वा गृहमेधिनं वा । तप-
स्विनं वा परिपूर्णविद्यं भषन्ति हैवं श्वनराः सदैव ९ द्वारं सुघोरं नरकस्य

नाशास कारणीभूत होत असलेलें बीज कळेक धारण करितो त्याचप्रमाणें हा आत्म-घाकी व मत्त धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनराजा महाभयंकर वैराला कारणीभूत होणाऱ्या द्यूताचा स्वीकार करीत आहे आणि (ह्याच्या योगानें समीप येत असलेला) अंतकाल हा जाणीत नाहीं ५. अहो, पुरुषानें मर्मभेदक आणि कठोर भाषण करूं नये; (द्यूता-सारख्या) नीच साधनानें शत्रूला हस्तगत करून घेऊं नये आणि जिच्या योगानें दुसऱ्याला उद्वेग होईल अशी संतापजनक व नरकप्रद वाणी उच्चारूं नये ६. दुसऱ्याला संताप उत्पन्न करणारे असे जे निंदाद्योतक शब्द मुखांतून बाहेर पडतात त्या शब्दांनीं सडकून गेलेला पुरुष रात्रंदिवस शोक करीत असतो. कारण, ते शब्द दुसऱ्याच्या मर्माला लागत नाहींत असें नाहीं. करितां, तशाप्रकारचे शब्द विचारी पुरुषानें आपल्या तोंडांतून काढून दुसऱ्यांचे ठिकाणीं झोंकून देऊं नये ७. एक बोकड शस्त्र गिळूं लागला. परंतु, तें त्याला गिळतां येईना. ह्मणून खालीं पडून त्यानें आपलें तोंड भूमीवर ठेविलें आणि पुढल्या दोन पायांनीं शस्त्र उचलून धरून तें खाण्यास आरंभ केला. तेव्हां वर उचलल्याबरोबर तें (तीक्ष्ण धारेचें) शस्त्र सरळ जाऊं लागलें व त्याच्या योगानें मस्तकासहवर्तमान कंठ तुटून जाऊन तो बोकड मरण पावला. तस्मात्, तूंही पांडुपुत्रांशीं घोर वैर (करून त्या वैररूप शस्त्राच्या योगानें) आपला घात करून घेऊं नकोस ८. अरे, वानप्रस्थ असो, गृहस्थाश्रमी असो, संन्यासी असो अथवा पूर्ण वेदाध्ययन झालेला ब्रह्मचारी असो; श्वानांसमान असलेले पुरुष मा[illegible] अंगावर ह्याप्रमाणें सर्वदा भोंकत सुटतात. परंतु, हे पांडव (धैर्यवान [illegible]

१ "वेणुर्वेनापरनामा राजा स ह्यैश्वर्यं प्राप्य मान्यानमानयन्सद्यो नष्ट[illegible]
लिहून नीलकंठपंडितांनीं ह्या श्लोकाचा आशय " वेणु ह्मणजे वेन [illegible]
असलेला राजा ज्याप्रमाणें ऐश्वर्य प्राप्त झाल्यावर मान्यांचा अपमा[illegible]
त्याचप्रमाणें दुर्योधनही नाश पावेल " असा काढिला आहे [illegible]
असा करूनही हा श्लोक लागत आहे. कारण, हीं भा[illegible]

जिह्मं न बुध्यते धृतराष्ट्रस्य पुत्रः । तमन्वेतारो बहवः कुरूणां द्यूतोदये
सह दुःशासनेन १० मज्जन्त्यलाबूनि शिलाः प्लवन्ते मुह्यन्ति नावोऽम्भसि
शश्वदेव । मूढो राजा धृतराष्ट्रस्य पुत्रो न मे वाचः पथ्यरूपाः शृणोति ११
अन्तो नूनं भवितायं कुरूणां सुदारुणः सर्वहरो विनाशः । वाचः काव्याः
सुहृदां पथ्यरूपा न श्रूयन्ते वर्धते लोभ एव १२[२२३७]इति श्रीमहाभारते०
वैयासिक्यां सभापर्वणि द्यूतपर्वणि विदुरवाक्ये षट्षष्टितमोध्यायः ॥ ६६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ धिगस्तु क्षत्तारमिति ब्रुवाणो दर्पेण मत्तो धृत-
राष्ट्रस्य पुत्रः । अवैक्षत प्रातिकामीं सभायामुवाच चैनं परमार्यमध्ये १
दुर्योधन उवाच ॥ त्वं प्रातिकामिन्द्रौपदीमानयस्व न ते भयं विद्यते पाण्ड-
वेभ्यः । क्षत्ता ह्ययं विवदत्येव भीतो न चास्माकं वृद्धिकामः सदैव २

तुझ्या भुंकण्याकडे मुळींच लक्ष्य देत नाहींत आणि ह्मणूनच) ह्याप्रमाणें तुला कांहींच प्रत्युत्तर करीत नाहींत ९. अहो, द्यूतानें उत्कर्ष झाल्यामुळें नरकाचें महाभयंकर व प्रकाशरहित द्वार खुलें झाल्याचें ह्या धृतराष्ट्रपुत्राच्या समजण्यांत येत नाहीं आणि त्याला अनुसरून वागणाऱ्या दुःशासनासहवर्तमान पुष्कळ कुरुवंशजांच्याही हें लक्ष्यांत येत नाहीं १०. अहो, उदकामध्यें कदाचित् भोपळे बुडतील, पाषाणही तरतील अथवा नौकाही कुंठित होऊन रहातील. परंतु, धृतराष्ट्राचा पुत्र हा मूढ दुर्योधन राजा माझे पथ्यकारक शब्द कधींही ऐकून घेणार नाहीं ११. अहो, चांगल्या अंतःकरणानें युक्त असलेल्या पुरुषांना पथ्यकारक असलेलीं शुक्राचार्यांचीं वचनें ह्या ठिकाणीं कोणी ऐकून घेत नसून लोभ मात्र वृद्धिंगत होत आहे. तस्मात्, अत्यंत भयंकर, सर्वस्वापहारास कारणीभूत होणारा आणि सर्व नाशाला हेतुभूत असलेला असा हा कुरुवंशजांचा अंतकाल खरोखर समीप आलेला आहे १२. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं विदुराच्या भाषणाविषयीं सहासष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६६ ॥

वैशंपायन सांगतात:—धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन गर्वानें मत्त होऊन "धिक्कार असो ह्या दासीपुत्र विदुराला" असें ह्मणूं लागला आणि सभेंत प्रातिकामी सारथ्याकडे पाहून त्याला ... मोठ्या सभ्यलोकांमध्यें ह्मणाला १. "हे प्रातिकामी, द्रौपदीला घेऊन ... तुला भय नाहीं. अरे हा दासीपुत्र विदुर पांडवांना भिऊन केवळ

... द्विलमप्याहितवद्दुरुपान्तां भार्गीलात्मक्षयम्" असा आशय नीलकंठ पंडितांनीं ... परंतु, "लभेत सिकतासु तैलमपि यत्नतः पीडयन्पिबेच्च मृगतृष्णिकासु ... पाणमाराद्येन्न तु प्रतिनिविष्टमूर्खजनचित्तमाराधयेत्" ... कांत मूर्खांच्या निंदेवर कटाक्ष देऊन असंभवनीय गोष्टींचीं ... चाललें असतांही हा श्लोक सरळ लागत आहे.

वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्तः प्रातिकामी स सूतः प्रायाच्छीघ्रं राजवचो निशम्य । प्रविश्य च श्वेव हि सिंहगोष्ठं समासदन्महिषीं पाण्डवानाम् ३ प्रातिकाम्युवाच ॥ युधिष्ठिरो द्यूतमदेन मत्तो दुर्योधनो द्रौपदि त्वामजैषीत् । सा त्वं प्रपद्यस्व धृतराष्ट्रस्य वेश्म नयामि त्वां कर्मणे याज्ञसेनि ४ द्रौपद्युवाच ॥ कथं त्वेवं वदसि प्रातिकामिन्को हि दीव्येद्भार्यया राजपुत्रः । मूढो राजा द्यूतमदेन मत्तो ह्यभून्नान्यत्कैतवमस्य किंचित् ५ प्रातिकाम्युवाच ॥ यदा नाभूत्कैतवमन्यदस्य तदादेवीत्पाण्डवोजातशत्रुः । न्यस्ताः पूर्वं भ्रातरस्तेन राज्ञा स्वयं चात्मा त्वमथो राजपुत्रि ६ द्रौपद्युवाच ॥ गच्छ त्वं कितवं गत्वा सभायां पृच्छ सूतज । किं नु पूर्वं पराजैषीरात्मानमथवापि माम् ७ एतज्ज्ञात्वा समागच्छ ततो मां नय सूतज । ज्ञात्वा चिकीर्षितमहं राज्ञो यास्यामि दुःखिता ८ वैशम्पायन उवाच ॥ सभां गत्वा स चोवाच द्रौपद्यास्तद्वचस्तदा । युधिष्ठिरं

(कांहीं तरी) बडबड करीत आहे. हा आमच्या उत्कर्षाची इच्छा कधींही करीत नाहीं २. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें दुर्योधनानें आज्ञा केली असतां तो सारथि प्रातिकामी राजाचें भाषण श्रवण केल्याबरोबर तेथून सत्वर निघाला व सिंहांच्या निवासस्थानात शिरणाऱ्या श्वानाप्रमाणें राजवाड्यामध्यें प्रविष्ट होऊन पांडवांच्या पत्नीसमीप गेला ३. प्रातिकामी ह्मणतोः—हे द्रौपदि, द्यूताच्या मदानें युधिष्ठिर बेफाम झाला आहे व दुर्योधनानें (द्यूतामध्यें) तुला जिंकिली आहे. तरी पराजित झालेली ती तूं आतां धृतराष्ट्राच्या घरीं चल. हे याज्ञसेनि, मी तुला दास्यकर्माकरितां तिकडे घेऊन जातों ४. द्रौपदी ह्मणतेः—हे प्रातिकामी, तूं हें असें भलतेंच काय बोलत आहेस? अरे, भार्या पणाला लावून कोण राजपुत्र द्यूत खेळण्यास प्रवृत्त होणार आहे? (जा) मोहग्रस्त झालेल्या युधिष्ठिर राजाला द्यूताच्या मदानें कसलेंच भान राहिलेलें नाहीं. अरे, भार्येवांचून दुसरें कांहींच त्याच्यापाशीं पणाला लावण्यास नव्हतें कीं काय? ५ प्रातिकामी ह्मणतोः—हे राजपुत्रि, जेव्हां दुसरें कांहींच त्याच्यापाशीं पणाला लावण्या[illegible] उरलें नाहीं तेव्हांच त्या अजातशत्रु पांडुपुत्रानें तुला पणाला लावून द्यूत केलें. [illegible] त्या राजानें प्रथम आपले भ्राते पणाला लाविले; नंतर आपणा स्वतःला [illegible] आणि नंतर त्यानें तुला पणास लाविली ६. द्रौपदी ह्मणतेः—हे सूतपुत्र [illegible] मध्यें त्या द्यूत खेळणाऱ्या (युधिष्ठिरा) कडे जाऊन "तूं पूर्वीं [illegible] किंवा प्रथम मला हरविलीस" असें त्याला (माझ्या वतीनें [illegible] पुनरपि इकडे ये आणि नंतर, हे सूतपुत्रा, मला घेऊन [illegible]

नरेन्द्राणां मध्ये स्थितमिदंवचः ९ कस्येशो नः पराजैषीरिति त्वामाह
द्रौपदी । किं नु पूर्वं पराजैषीरात्मानमथवापि माम् १० युधिष्ठिरस्तु निश्चेता
गतसत्त्व इवाभवत् । न तं सूतं प्रत्युवाच वचनं साध्वसाधु वा ११ दुर्योधन
उवाच ॥ इहैवागत्य पाञ्चाली प्रश्नमेनं प्रभाषताम् । इहैव सर्वे शृण्वन्तु
तस्याश्चैतस्य यद्वचः १२ वैशम्पायन उवाच ॥ स गत्वा राजभवनं दुर्यो-
धनवशानुगः । उवाच द्रौपदीं सूतः प्रातिकामी व्यथन्निव १३ प्रातिका-
म्युवाच ॥ सभ्यास्त्वमी राजपुत्र्याह्वयन्ति मन्ये प्राप्तः संशयः कौरवाणाम् ।
न वै समृद्धिं पालयते लघीयान्यस्त्वां सभां नेष्यति राजपुत्रि १४ द्रौप-
द्युवाच ॥ एवं नूनं व्यदधात्संविधाता स्पर्शावुभौ स्पृशतो वृद्धबालौ ।
धर्मं त्वेकं परमं प्राह लोके स नः शर्म धास्यति गोप्यमानः १५ सोयं

समजल्यानंतर मी दुःखाकुल असतांनाही तिकडे येईन ८. वैशंपायन सांगतातः—(ह्याप्रमाणें द्रौपदीचें भाषण श्रवण केल्यावर)तो प्रातिकामी सभेमध्यें गेला व राजांमध्यें बसलेल्या युधिष्ठिराला त्यानें द्रौपदीचें तें ह्मणणें असें कळविलें कीं ९ "(हे युधिष्ठिरा) तूं आह्मांला हरविलेस तेव्हां तूं कोणाचा अधिपति होतास. (मला पणाला लाविलीस तेव्हां तूं स्वतंत्र होतास कीं काय ? सारांश) प्रथम तूं आपणा स्वतःला जिंकून घेतलेस किंवा मला प्रथम हरविलीस (हें काय तें सांग)" असा द्रौपदीनें तुला प्रश्न केला आहे १०. (हें प्रातिकामीचें भाषण श्रवण केल्यावर) युधिष्ठिर मनामध्यें गोंधळून जाऊन गतप्राण झाल्या सारखा स्तब्ध बसला आणि त्यामुळें त्यानें त्या सारथ्याला बरें अथवा वाईट कांहींच उत्तर दिलें नाहीं ११. दुर्योधन ह्मणतोः—अरे, पांचालीलाच येथें येऊन हा प्रश्न करूं दे आणि तिचें व ह्या युधिष्ठिराचें काय भाषण होईल तें येथेंच सर्वांना श्रवण करूं दे १२. वैशंपायन सांगतातः—नंतर तो सारथि प्रातिकामी दुर्योधनाचा ताबेदार असल्यामुळें राजवाड्यामध्यें गेला आणि खेद करीत करीत द्रौपदीला ह्मणला १३ " हे राजपुत्रि, हे सभासद तुला बोलावीत आहेत. तेव्हां कौर-[illegible]वर अरिष्टच ओढवलें आहे असें मला वाटतें. कारण, हे राजपुत्रि, जो नीच तुला [illegible]ध्यें नेण्याची इच्छा करीत आहे तो आपलें वैभव आतां (फार दिवस) रक्षण [illegible]रें उघड आहे १४. द्रौपदी ह्मणतेः—(सभासदच जर मला सभेमध्यें [illegible] तर) ह्याप्रमाणें (सभेमध्यें जाण्याचें निंद्य कर्म) विधात्यानें [illegible] आहे. असो. अनुकूल आणि प्रतिकूल असें दोन्हीं प्रकारचें [illegible] लहान व थोर ह्यांना होतच असतात. परंतु, एक धर्म [illegible]लें आहे. करितां, त्याचें रक्षण केलें असतां तोच

धर्मो मात्यगात्कौरवान्वै सभ्यान्गत्वा पृच्छ धर्म्यं वचो मे । ते मां ब्रूयुर्निश्चितं तत्करिष्ये धर्मात्मानो नीतिमन्तो वरिष्ठाः १६ श्रुत्वा सूतस्तद्वचो याज्ञसेन्याः सभां गत्वा प्राह वाक्यं तदानीम् । अधोमुखास्ते न च किंचिदूचुर्निर्बन्धं तं धार्तराष्ट्रस्य बुद्ध्वा १७ वैशम्पायन उवाच ॥ युधिष्ठिरस्तु तच्छ्रुत्वा- दुर्योधनचिकीर्षितम् । द्रौपद्याः संमतं दूतं प्राहिणोद्भरतर्षभ १८ एकवस्त्रा त्वधोनीवी रोदमाना रजस्वला । सभामागम्य पाञ्चालि श्वशुरस्याग्रतो भव १९ अथ त्वामागतां दृष्ट्वा राजपुत्रीं सभां तदा । सभ्याः सर्वे विनिन्देरन्मनोभिर्धृतराष्ट्रजम् २० स गत्वा त्वरितं दूतः कृष्णाया भवनं नृप । न्यवेदयन्मतं धीमान्धर्मराजस्य निश्चितम् २१ पाण्डवाश्च महात्मानो दीना दुःखसमन्विताः । सत्येनातिपरीताङ्गा नोदीक्षन्ते स्म किंचन २२ ततस्त्वेषां मुखमालोक्य राजा दुर्योधनः सूतमुवाच हृष्टः । इहैवैतामानय प्रातिकामि-

---

आमचें कल्याण करील १५. तेव्हां सर्वजगतांत जो श्रेष्ठ त्या धर्माचें अतिक्रमण कुरुवंशजांकडून होऊं नये एतदर्थ तूं सभासदांकडे जा आणि धर्माला अनुसरून असलेला माझा प्रश्न त्यांना विचार. ह्मणजे धर्मात्मे, नीतिमान् आणि (इतर गुणांनींही) श्रेष्ठ असे ते (भीष्मादिक) सभासद जें मला निश्चित सांगतील तें मी करीन १६. द्रौपदीचें तें भाषण श्रवण केल्यानंतर प्रातिकामी सारथ्यानें तत्क्षणीं सभेमध्यें जाऊन तिचें ह्मणणें कळविलें. परंतु, धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाचा (तिला सभेमध्यें आणण्याविषयीं) आग्रह पाहिल्यावर खालीं माना घालून बसलेल्या त्या सभासदांनीं काहींच उत्तर केलें नाहीं १७. वैशंपायन सांगतातः—हे भरतवंशजोत्तमा जनमेजया, युधिष्ठिरानें मात्र दुर्योधनाची इच्छा काय आहे ती श्रवण करून ज्याच्याविषयीं द्रौपदीचे ठिकाणीं आदरबुद्धि होती असा एक दूत तिच्याकडे (असा निरोप सांगून) पाठविला कीं १८. " हे पांचालि, रजस्वला व ह्मणूनच एक वस्त्र परिधान केलेली तूं कटिबंधरहित असतांना तशीच रोदन करीत करीत सभेमध्यें येऊन तुझा श्वशुर जो धृतराष्ट्र त्याच्या पुढें हो १९. ह्मणजे तुज राजकन्येला सभेंत आलेली पाहून सर्व सभासद मनामध्यें धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाचीं निंदा करितील २०. हे जनमेजयराजा, (ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें सांगितलें असतां) तो दूत सत्वर द्रौपदीच्या वसतिगृहामध्यें गेला आणि त्या बुद्धिमान् दूतानें धर्मराजाचें निश्चित मत द्रौपदीला निवेदन केलें २१. असो. इकडे सत्यानें अ... जखडून टाकिलेले ते महात्मे पांडव दीन व दुःखित झाल्यामुळें कोणाकडेंच वर ... पाहीनासें झालें २२. तेव्हा त्यांच्या मुखाकडे पाहून आनंदित झालेल्या ... प्रातिकामी, अरे, ह्या द्रौपदीला येथेंच घेऊन ये आणि ...

न्प्रत्यक्षमस्याः कुरवो ब्रुवन्तु २३ ततः सूतस्तस्य वशानुगामी भीतश्च कोपा-
द्द्रुपदात्मजायाः । विहाय मानं पुनरेव सभ्यानुवाच कृष्णां किमहं ब्रवीमि २४
दुर्योधन उवाच ॥ दुःशासनैष मम सूतपुत्रो वृकोदरादुद्विजतेल्पचेताः ।
स्वयं प्रगृह्यानय याज्ञसेनीं किं ते करिष्यन्त्यवशाः सपत्नाः २५ ततः समु-
त्थाय स राजपुत्रः श्रुत्वा भ्रातुः शासनं रक्तदृष्टिः । प्रविश्य तद्वेश्म महा-
रथानामित्यब्रवीद्द्रौपदीं राजपुत्रीम् २६ एह्येहि पाञ्चालि जितासि कृष्णे
दुर्योधनं पश्य विमुक्तलज्जा । कुरून्भजस्वायतपत्रनेत्रे धर्मेण लब्धासि सभां
परैहि २७ ततः समुत्थाय सुदुर्मनाः सा विवर्णमामृज्य मुखं करेण ।
आर्ता प्रदुद्राव यतः स्त्रियस्ता वृद्धस्य राज्ञः कुरुपुङ्गवस्य २८ ततो जवे-
नाभिससार रोषाद्दुःशासनस्तामभिगर्जमानः । दीर्घेषु नीलेष्वथ चोर्मिमत्सु
जग्राह केशेषु नरेन्द्रपत्नीम् २९ ये राजसूयावभृथे जलेन महाक्रतौ मन्त्र-
पूतेन सिक्ताः । ते पाण्डवानां परिभूय वीर्यं बलात्प्रमृष्टा धृतराष्ट्रजेन ३०

काय तिला उत्तर द्यावयाचें आहे तें देऊं दे " असें त्या सारथ्याला सांगितलें २३. तेव्हां त्या दुर्योधनाचा ताबेदार परंतु, द्रौपदीच्या कोपाला भ्यायलेला तो सारथि (दुर्योधनाच्या आज्ञेला तत्परतेनें) मान देण्याचें सोडून 'द्रौपदीला मी काय सांगूं?' ह्मणून पुनरपि सभासदांनाच प्रश्न करूं लागला असतां २४ दुर्योधन ह्मणतोः—हे दुःशासना, हें सारथ्याचें पोर मूर्ख असल्यामुळें ह्या वृकोदराला भीत आहे. तस्मात्, तूं स्वतः द्रौपदीला धरून घेऊन ये. पराधीन झालेले ते शत्रु (आतां आपलें) काय करणार आहेत ? २५. ह्याप्रमाणें झालेली भ्रात्याची आज्ञा श्रवण करून आरक्तवर्ण नेत्रांनीं युक्त असलेला तो राजपुत्र दुःशासन त्या महारथी पांडवांच्या वसतिगृहांत जाऊन राजकन्या द्रौपदीला ह्मणाला२६ "चलचल, हे पांचालि, तुला (आह्मीं)जिंकिली आहे. हे कृष्णे, तूं आतां लाज अगदीं सोडून देऊन दुर्योधनाला अवलोकन कर. हे कमलपत्रसमान विशालनयने, तूं आतां आह्मा कौरवांना धरून रहा. कारण, तूं आह्मांला धर्मानेंच प्राप्त झाली आहेस. करितां, सभेचा मार्ग धर " २७. हे दुःशासनाचे शब्द ऐकिल्यावर मनामध्यें अत्यंत खिन्न झालेली ती द्रौपदी मलिनवर्ण झालेलें आपलें मुख हातानें पुसून कुरुकुलाधिपति वृद्ध धृतराष्ट्रराजाच्या स्त्रिया जिकडे होत्या तिकडे [illegible]ाकुल होऊन धांवली २८. द्रौपदी स्त्रियांकडे धांवल्यावर क्रोधानें गर्जना करूं [illegible]:शासन वेगानें तिच्या मागोमाग गेला आणि दीर्घ, अत्यंत कृष्णवर्ण व [illegible]रून त्यानें तिला ओढिली २९. (हरहर !) राजसूयसंज्ञक महाक्र- [illegible]पूत उदकाचें ज्यांवर सिंचन झालें होतें त्या केसांना

स तां पराकृष्य सभासमीपमानीय कृष्णामतिदीर्घकेशीम् । दुःशासनो
नाथवतीमनाथवच्चकर्ष वायुः कदलीमिवार्ताम् ३१ सा कृष्यमाणा नमि-
ताङ्गयष्टिः शनैरुवाचाथ रजस्वलास्मि । एकं च वासो मम मन्दबुद्धे सभां
नेतुं नार्हसि मामनार्य ३२ ततोऽब्रवीत्तां प्रसभं निगृह्य केशेषु कृष्णेषु तदा
स कृष्णाम् । कृष्णं च जिष्णुं च हरिं नरं च त्राणाय विक्रोशति याज्ञसेनी ३३
दुःशासन उवाच ॥ रजस्वला वा भव याज्ञसेनि एकाम्बरा वाप्यथवा
विवस्त्रा । द्यूते जिता चासि कृतासि दासी दासीषु वासश्च यथोपजोषम् ३४
वैशम्पायन उवाच ॥ प्रकीर्णकेशी पतितार्धवस्त्रा दुःशासनेन व्यवधूयमाना ।
ह्रीमत्यमर्षेण च दह्यमाना शनैरिदं वाक्यमुवाच कृष्णा ३५ द्रौपद्युवाच ॥
इमे सभायामुपनीतशास्त्राः क्रियावन्तः सर्व एवेन्द्रकल्पाः । गुरुस्थाना
गुरवश्चैव सर्वे तेषामग्रे नोत्सहे स्थातुमेवम् ३६ नृशंसकर्मंस्त्वमनार्यवृत्त
मा मा विवस्त्रां कुरु मा विकार्षीः । न मर्षयेयुस्तव राजपुत्राः सेन्द्रापि

पांडवांचें वीर्य कुंठित करून धृतराष्ट्रपुत्र दुःशासनानें बलात्कारानें स्पर्श केला ३०. अत्यंत दीर्घ केंसांनीं युक्त असलेल्या त्या कृष्णानामक द्रुपद कन्येला ओढून त्या दुःशासनानें सभेच्या समीप आणिली आणि केळीला ज्याप्रमाणें वायु लट लट कांपवितो त्याप्रमाणें दुःखाकुल झालेल्या व सनाथ असूनही अनाथासारख्या झालेल्या त्या द्रौपदीला त्यानें ओढिली ३१. सभा समीप आल्यामुळें नम्र झालेल्या त्या द्रौपदीला दुःशासन ओढूं लागला असतां ती त्याला हळूंच ह्मणाली " हे मूढा, मी रजस्वला असल्यामुळें माझ्या अंगावर वस्त्रही एकच आहे. करितां, हे नीचा, मला सभेंत नेणें तुला योग्य नाहीं"३२. तदनंतर " हे कृष्णा, हे अर्जुना, हे नरहरे, मला सोडवा " असा ती द्रौपदी आक्रोश करूं लागली असतां बलात्कारानें तिचे कृष्णवर्ण केंस धरून दुःशासन तिला ह्मणाला ३३:—" हे द्रौपदि, तूं रजस्वला हो, एकवस्त्रा आस किंवा नग्न रहा. तुला द्यूतामध्यें जिंकून दासी केलेली आहे आणि दासींच्या अंगावर वस्त्रही (यजमानाच्या) इच्छेप्रमाणें असणें योग्य आहे ३४. वैशंपायन सांगतातः—दुःशासनाच्या ओढण्यामुळें केंस अस्ताव्यस्त होऊन पदर गळून गेलेली आणि कोपित होत असलेली ती लज्जायुक्त द्रुपद-कन्या कृष्णा क्रोधानें अंगाचा भडका झाला असतांना त्या दुःशासनाला सूक्ष्म स्वरानें ह्मणाली ३५ " हे सभेमध्यें असलेले सर्वही सभासद शास्त्र पढलेले, कर्मेन्द्र-
तुल्य, गुरुसमान आणि वडील आहेत. तेव्हां त्यांचे समोर ह्याप्रमाणें उभें
नीट दिसत नाहीं ३६. हे दुष्ट कर्म करणाऱ्या दुःशासना, मला
आणि मला ओढूं नकोस. हे आर्यजनांना अनुचित असें वर्त

देवा यदि ते सहायाः ३७ धर्मे स्थितो धर्मसुतो महात्मा धर्मश्च सूक्ष्मो निपुणोपलक्ष्यः । वाचापि भर्तुः परमाणुमात्रमिच्छामि दोषं न गुणान्विसृज्य ३८ इदं त्वकार्यं कुरुवीरमध्ये रजस्वलां यत्परिकर्षसे माम् । न चापि कश्चित्कुरुतेत्र कुत्सां ध्रुवं तवेदं मतमभ्युपेतः ३९ धिगस्तु नष्टः खलु भारतानां धर्मस्तथा क्षत्रविदां च वृत्तम् । यत्र ह्यतीतां कुरुधर्मवेलां प्रेक्षन्ति सर्वे कुरवः सभायाम् ४० द्रोणस्य भीष्मस्य च नास्ति सत्त्वं क्षत्तुस्तथैवास्य महात्मनोपि । राज्ञस्तथा हीममधर्ममुग्रं न लक्षयन्ते कुरुवृद्धमुख्याः ४१ वैशम्पायन उवाच ॥ तथा ब्रुवन्ती करुणं सुमध्यमा भर्तृन्कटाक्षैः कुपितानपश्यत् । सा पाण्डवान्कोपपरीतदेहान्संदीपयामास कटाक्षपातैः ४२ हृतेन राज्येन तथा धनेन रत्नैश्च मुख्यैर्न तथा बभूव ।

इंद्रासहवर्तमान देव जरी तुला सहाय असले तरी, हे राजकुमार (पांडव) तुझें हें कृत्य सहन करणार नाहींत ३७. हा महात्मा धर्मपुत्र युधिष्ठिर धर्मानें सर्वदां वागणारा आहे आणि धर्म सूक्ष्म असून निपुण पुरुषालाच समजणारा आहे. करितां, गुण सोडून देऊन भर्त्या युधिष्ठिराला अणुरेणु इतका देखील दोष नुसत्या शब्दानेंही लावण्याचें माझ्या मनांत येत नाहीं ३८. अरे, कुरुवंशज वीरांमध्यें रजस्वला असतांना मला ओढून नेत आहेस हें निंद्य कृत्य आहे आणि ज्याअर्थी ह्या कृत्याबद्दल तुला कोणी दोष देत नाहीं त्याअर्थी प्रत्येकजण निःसंशय तुझ्याच मताचें अवलंबन करून राहिला आहे (असें मला वाटतें) ३९. अहो, ज्याअर्थी कुरुवंशजांकडूनच धर्ममर्यादेचें अतिक्रमण भर सभेमध्यें होत असतांना इतर सर्व कुरुवंशज अवलोकन करीत बसले आहेत त्याअर्थी ह्या क्षत्रियधर्मवेत्त्या भरतवंशजांच्या नष्ट झालेल्या धर्माला व वर्तनाला धिक्कार असो ४०. अरे, ह्या धृतराष्ट्रराजाकडून होत असलेला हा भयंकर अधर्म कुरुकुलांतील मुख्य व वृद्ध पुरुषांच्याही लक्ष्यांत येत नाहीं. तेव्हां द्रोणाचार्य आणि भीष्म ह्यांच्यांत कांहीं सत्व राहिलेंच नसून ह्या महात्म्या विदुराचीही तशीच स्थिति झाल्याचें दिसत आहे ४१. वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें करुणस्वरानें बोलत असलेल्या त्या सौंदर्यसंपन्न द्रौपदीनें क्रुद्ध झालेल्या आपल्या भर्त्यांना नेत्र कटाक्षांनीं अवलोकन केलें आणि कोपानें व्याप्त होऊन गेलेल्या त्या पांडवांना कटाक्षाच्या योगानें [illegible] अगदीं प्रदीप्त करून टाकिलें (सारांश, कुरुवंशजांना उद्देशून दीनवाणीनें बोलतां [illegible]दीची दृष्टि सहज भर्त्यांकडे गेली. तेव्हां आधींच क्रुद्ध झालेल्या त्या पांडवांच्या [illegible]हीं भडकाच झाला) ४२. तात्पर्य, लज्जा व कोप ह्यांनीं युक्त असलेल्या [illegible]जें (दुःसह) दुःख पांडवांना झालें तसें दुःख राज्य, धन व

यथा त्रपाकोपसमीरितेन कृष्णाकटाक्षेण बभूव दुःखम् ४३ दुःशासन-
श्चापि समीक्ष्य कृष्णामवेक्षमाणां कृपणान्पतींस्तान् । आधूय वेगेन विसं-
ज्ञकल्पामुवाच दासीति हसन्सशब्दम् ४४ कर्णस्तु तद्वाक्यमतीवहृष्टः
संपूजयामास हसन्सशब्दम् । गान्धारराजः सुबलस्य पुत्रस्तथैव दुःशा-
सनमभ्यनन्दत् ४५ सभ्यास्तु ये तत्र बभूवुरन्ये ताभ्यामृते धार्तराष्ट्रेण चैव ।
तेषामभूद्दुःखमतीव कृष्णां दृष्ट्वा सभायां परिकृष्यमाणाम् ४६ भीष्म
उवाच ॥ न धर्मसौक्ष्म्यात्सुभगे विवेक्तुं शक्नोमि ते प्रश्नमिमं यथावत् ।
अस्वाम्यशक्तः पणितुं परस्वं स्त्रियाश्च भर्तुर्वशतां समीक्ष्य ४७ त्यजेत
सर्वां पृथिवीं समृद्धां युधिष्ठिरो धर्ममथो न जह्यात् । उक्तं जितोस्मीति
च पाण्डवेन तस्मान्न शक्नोमि विवेक्तुमेतत् ४८ द्यूतेऽद्वितीयः शकुनिर्नरेषु

मुख्य मुख्य रत्नें ह्यांच्या अपहारानेंही झालें नाहीं ४३. असो. दीन होऊन बसलेल्या त्या पांडवांकडे द्रौपदी पहात असल्याचें अवलोकन केल्यावर दुःशासनानें केसांना हिसका देऊन तिला कंपित केली आणि त्यामुळें जवळ जवळ मूर्छित झालेल्या त्या द्रौपदीला "बटीक, बटीक" ह्मणून उच्चस्वरानें हंसत हंसत त्यानें हांकाही मारिल्या ४४. तेव्हां कर्ण तर अत्यंत आनंदित झाला आणि मोठमोठ्यानें हंसून दुःशासनाच्या त्या भाषणाची मोठी तारीफ करूं लागला व त्याचप्रमाणें सुबलपुत्र गांधारदेशाधिपति शकुनीनेंही दुःशासनाचें (उच्चहास्यपूर्वक) अभिनंदन केलें ४५. परंतु, कर्ण, शकुनि व धृतराष्ट्रपुत्र ह्यांवांचून इतर जे त्या सभेमध्यें सभासद होते त्यांना दुःशासन द्रौपदीला सभेमध्यें ओढून आणीत असल्याचें पाहून अतिशयच दुःख झालें ४६. भीष्म ह्मणताः—स्वामित्वरहित पुरुषाला परधन पणाला लावितां येत नाहीं हें पाहून आणि स्त्रीची भर्तृवशताही अवलोकन करून धर्माची गति सूक्ष्म असल्यामुळें, हे सुभगे, तुझ्या ह्या प्रश्नाचें यथायोग्य उत्तर देण्यास मी समर्थ नाहीं (सारांश, हे कल्याणि द्रौपदि, युधिष्ठिरानें प्रथम आपणाला पणाला लावून घेतलें; तेव्हां स्वतःचेंही स्वामित्व त्याचे ठिकाणीं राहिलें नसल्यामुळें इतर कोणतेंही द्रव्य पणाला लावण्यास त्याला अधिकार नाहीं हें खरें आहे. परंतु, कोणतीही अवस्था प्राप्त झाली तरी स्त्रीनें भर्त्याच्या अधीन असलेंच पाहिजे असेंही धर्मशास्त्र सांगतआहे. तेव्हां, धर्माची ही बाब फारच सूक्ष्म असल्यामुळें तुला जिंकिली किंवा नाहीं ह्या प्रश्नाचें यथायोग्य उत्तर देण्यास मी असमर्थ आहें) ४७. शिवाय, धनधान्यानें परिपूर्ण असलेल्या सर्व पृथ्वीचा युधिष्ठिर त्याग करील. तथापि, धर्माचा त्याग करणार नाहीं. परंतु, "हरलों" ह्मणून त्या पांडुपुत्र युधिष्ठिरानेंच सांगितलें आहे. तस्मात्, ह्याचा निर्णय करण्यास मी समर्थ नाहीं ४८. मानवांमध्यें

कुन्तीसुतस्तेन निसृष्टकामः। न मन्यते तां निकृतिं युधिष्ठिरस्तस्मान्न ते प्रश्नमिमं ब्रवीमि ४९ द्रौपद्युवाच ॥ आहूय राजा कुशलैरनार्यैर्दुष्टात्मभिर्नैकृतिकैः सभायाम्। द्यूतप्रियैर्नातिकृतप्रयत्नः कस्मादयं नाम निसृष्टकामः ५० अशुद्धभावैर्निकृतिप्रवृत्तैरबुध्यमानः कुरुपाण्डवाग्र्यः। संभूय सर्वैश्च जितोपि यस्मात्पश्चादयं कैतवमभ्युपेतः ५१ तिष्ठन्ति चेमे कुरवः सभायामीशाः सुतानां च तथा स्नुषाणाम्। समीक्ष्य सर्वे मम चापि वाक्यं विब्रूत मे प्रश्नमिमं यथावत् ५२ वैशम्पायन उवाच॥ तथा ब्रुवन्तीं करुणं रुदन्तीमवेक्षमाणां कृपणान्पतींस्तान्। दुःशासनः परुषाण्यप्रियाणि वाक्यान्युवाचामधुराणि चैव ५३ तां कृष्यमाणां च रजस्वलां च स्रस्तोत्तरीयामतदर्हमाणाम्। वृकोदरः प्रेक्ष्य युधिष्ठिरं च चकार कोपं परमार्तरूपः ५४ [२२९१] इति० सभापर्वणि द्यूतपर्वणि द्रौपदीप्रश्ने सप्तषष्टितमोऽध्यायः॥६७॥

भीम उवाच॥ भवन्ति गेहे बन्धक्यः कितवानां युधिष्ठिर। न ताभिरुत

शकुनीच्या तोडीचा द्यूत खेळणारा कोणीही नाहीं आणि कुंतीपुत्र युधिष्ठिरानें (द्यूत खेळण्याविषयीं) शकुनीचा मनोरथ पूर्ण केला. परंतु, शकुनीचें तें कपट असें युधिष्ठिर समजत नाहीं. तस्मात्, तुझ्या ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यास मी समर्थ नाहीं ४९. द्रौपदी ह्मणतेः—द्यूतप्रिय व तें करण्यांत निपुण असलेल्या कपटी नीच दुष्टांनीं सभेमध्यें आव्हान केलें असतां द्यूतामध्यें विशेष ज्याचा अभ्यास नाहीं अशा ह्या राजानें त्या शत्रूंचा मनोरथ कां पूर्ण होऊं दिला ? ५०. असो. कौरवपांडवांमध्यें श्रेष्ठ असलेल्या ह्या कपटानभिज्ञ धर्मराजाला दुष्ट इच्छेनें कपट करण्यास प्रवृत्त झालेल्या सर्वांनीं मिळून जिंकिला असतांही ह्यानें माझा पण लाविला आहे ५१ आणि पुत्र व स्नुषा ह्यांचे स्वामी असलेले हे (भीष्मप्रभृति) कुरुवंशजही सभेमध्यें बसले आहेत. तेव्हां माझ्याही ह्मणण्याकडे सर्वांनीं लक्ष्य देऊन माझ्या ह्या प्रश्नाचें यथायोग्य उत्तर द्यावें ५२. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें बोलत असून करुणस्वरानें रोदन करीत असलेली ती द्रौपदी त्या अनाथपतींकडे पाहूं लागली असतां दुःशासन तिला कर्कश स्वरानें कठोर व अप्रिय असे शब्द बोलला ५३. तेव्हां रजस्वला असलेल्या द्रौपदीचा पदर खालीं गळला आहे व सभेमध्यें ओढीत आणण्यास ती अयोग्य असतांही दुःशासन तिला ओढीत आहे असें अवलोकन केल्यावर युधिष्ठिराकडे पाहून दुःखित झालेला भीमसेन अत्यंत क्रुद्ध झाला ५४. ह्याप्रमाणें० लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं द्रौपदीच्या प्रश्नाविषयीं सदुसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६७॥

भीम ह्मणतोः—हे युधिष्ठिरा, जुवेबाजांच्या घरीं राखा असतात; परंतु, त्यांना

दीव्यन्ति दया चैवास्ति तास्वपि १ काश्यो यद्धनमाहार्षीद्द्रव्यं यच्चान्यदुत्तमम् । तथान्ये पृथिवीपाला यानि रत्नान्युपाहरन् २ वाहनानि धनं चैव कवचान्यायुधानि च । राज्यमात्मा वयं चैव कैतवेन हृतं परैः ३ न च मे तत्र कोपोभूत्सर्वस्येशो हि नो भवान् । इमं व्यतिक्रमं मन्ये द्रौपदी यत्र पण्यते ४ एषा ह्यनर्हती बाला पाण्डवान्प्राप्य कौरवैः । त्वत्कृते क्लिश्यते क्षुद्रैर्नृशंसैरकृतात्मभिः ५ अस्याः कृते मन्युरयं त्वयि राजन्निपात्यते । बाहू ते संप्रधक्ष्यामि सहदेवाग्निमानय ६ अर्जुन उवाच ॥ न पुरा भीमसेन त्वमीदृशीर्वदिता गिरः । परैस्ते नाशितं नूनं नृशंसैर्धर्मगौरवम् ७ न सकामाः परे कार्या धर्ममेवाचरोत्तमम् । भ्रातरं धार्मिकं ज्येष्ठं कोतिवर्तितुमर्हति ८ आहूतो हि परै राजा क्षात्रं व्रतमनुस्मरन् । दीव्यते परकामेन तन्नः कीर्तिकरं महत् ९ भीमसेन उवाच ॥ एवमस्मिन्कृतं विद्यां यदि नाहं धनञ्जय ।

देखील ते पणाला लावीत नाहींत. त्यांच्यावरही जुगार खेळणारे लोक दया करीत असतात (तथापि, तूं प्रिय भार्येलाही पणाला लावून मोकळा झालास) १. काशिराजानें आणिलेली संपत्ति, दुसरें उत्कृष्ट द्रव्य, इतर भूपालांनीं आणिलेलीं रत्नें २, वाहनें, धन, कवचें, आयुधें, राज्य, तूं स्वतः आणि आह्मी ह्या सर्वांचा शत्रूंनीं कपटानें अपहार केला ३. तथापि, मला क्रोध आला नाहीं. कारण, आमच्या सर्वस्वाचा अधिपति तूं आहेस. परंतु, तूं द्रौपदी पणाला लाविलीस हें मात्र आपल्या अधिकाराचें अतिक्रमण केलेंस असें मला वाटतें ४. पांडवांना प्राप्त झालेली ही बाला क्लेश भोगण्यास पात्र नसतांनाही तुझ्यामुळें हे क्षुद्र, दुष्ट व मूर्ख कौरव तिला क्लेश देत आहेत ५. तस्मात्, हे राजा, हिच्याकरितां मी हा क्रोध तुझे ठिकाणीं अदळून तुझे हातच जाळून टाकितों. जा सहदेवा, अग्नि घेऊन ये ६. अर्जुन ह्मणतोः—हे भीमसेना, अशाप्रकारचे शब्द पूर्वी तुझ्या तोंडांतून कधींही आलेले नाहींत. तेव्हां खरोखर शत्रूंनीं तुझे ठिकाणीं असलेलें धर्मौदार्य अगदीं नष्ट करून टाकिलें आहे (असें मला वाटतें) ७. अरे (शत्रु एवढ्याचीच वाट पहात बसले आहेत. करितां), शत्रूंचा मनोरथ सिद्धीस जाऊं देतां उपयोगीं नाहीं. ह्यास्तव, तूं उत्कृष्ट अशा धर्माचेंच अवलंबन कर. अरे, ज्येष्ठ आणि त्यांतूनही धर्मनिष्ठ अशा भ्रात्याचें अतिक्रमण करण्यास कोण समर्थ होणार आहे? ८. अरे, दुसऱ्यांनीं आव्हान केलें ह्मणून क्षात्रधर्माचें ब्रीद राखून परकीयांच्या इच्छेनें धर्मराजा द्यूत करीत आहे ही गोष्ट तर आपणांला मोठी कीर्तिकारक आहे ९. भीमसेन ह्मणतोः—हे धनंजया, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें ह्या धर्मराजानें क्षात्र धर्म स्मरूनच ही गोष्ट केली आहे असें जर मी जाणिलें नसतें तर बलात्कारानें

दीप्तेऽग्नौ सहितौ बाहू निर्दहेयं बलादिव १० वैशम्पायन उवाच॥ तथा तान्दुःखितान्दृष्ट्वा पाण्डवान्धृतराष्ट्रजः । क्लिश्यमानां च पाञ्चालीं विकर्ण इदमब्रवीत् ११ याज्ञसेन्या यदुक्तं तद्वाक्यं विब्रूत पार्थिवाः । अविवेकेन वाक्यस्य नरकः सद्य एव नः १२ भीष्मश्च धृतराष्ट्रश्च कुरुवृद्धतमावुभौ । समेत्य नाहतुः किंचिद्विदुरश्च महामतिः १३ भारद्वाजश्च सर्वेषामाचार्यः कृप एव च । कुत एतावपि प्रश्नं नाहतुर्द्विजसत्तमौ १४ ये त्वन्ये पृथिवीपालाः समेताः सर्वतो दिशम् । कामक्रोधौ समुत्सृज्य ते ब्रुवन्तु यथामति १५ यदिदं द्रौपदी वाक्यमुक्तवत्यसकृच्छुभा । विमृश्य कस्य कः पक्षः पार्थिवा वदतोत्तरम् १६ एवं स बहुशः सर्वानुक्तवांस्तान्सभासदः । न च ते पृथिवीपालास्तमूचुः साध्वसाधु वा १७ उक्त्वासकृत्तथा सर्वान्विकर्णः पृथिवीपतीन् । पाणौ पाणिं विनिष्पिष्य निःश्वसन्निदमब्रवीत् १८ विब्रूत पृथिवीपाला वाक्यं मा वा कथंचन । मन्ये न्याय्यं यदत्राहं तद्धि वक्ष्यामि

प्रज्वलित अग्नीमध्यें ह्याचे दोन्ही हात एकदम जाळून टाकिलेच असते (परंतु, हें समजत आहें ह्मणून नुस्ता बोलूनच स्वस्थ बसलों आहें) १०. वैशंपायन सांगतातः—त्याप्रमाणें दुःखित झालेल्या त्या पांडवांना अवलोकन करून आणि दुःशासन पांचालीला केंस धरून ओढीत असल्याचें पाहून धृतराष्ट्रपुत्र विकर्ण ह्मणाला ११ “ हे भूपालहो, द्रुपदकन्येनें जो प्रश्न केला आहे त्या प्रश्नाचें तुह्मी उत्तर द्या. कारण, तुह्मीं जर त्या प्रश्नाचा विचार केला नाहीं तर आपणांला निःसंशय नरकप्राप्ति होईल १२. भीष्म व धृतराष्ट्र हे उभयतां सर्व कुरुवंशजांमध्यें अत्यंत वृद्ध आहेत. परंतु, ह्या उभयतांनीं मिळून कांहींच भाषण केलें नाहीं आणि महाविचारी विदुरानेंही कांहीं उत्तर केलें नाहीं १३. भरद्वाजपुत्र द्रोणाचार्य व कृपाचार्य हे उभयतां सर्वांचें आचार्य आहेत. परंतु, ह्याही द्विजश्रेष्ठांनीं प्रश्नाचें उत्तर कां दिलें नाहीं (हें समजत नाहीं) १४. तस्मात्, सर्व प्रदेशांतून जे इतर भूपाल ह्या ठिकाणीं जुळले आहेत त्यांनीं तरी लोभ व क्रोध बाजूस ठेवून यथामति द्रौपदीच्या प्रश्नाचें उत्तर द्यावें १५. हे भूपालहो, ह्या पवित्र द्रौपदीनें जो अनेक वेळां प्रश्न केला त्याचा विचार करून कोणाचें काय मत आहे तें तुह्मी उत्तर देऊन कळवा ” १६. ह्याप्रमाणें अनेक प्रकारांनीं त्या सर्व सभासदांना उद्देशून त्या विकर्णानें भाषण केलें. परंतु, त्या भूपालांनीं बरें अथवा वाईट असें कांहींच उत्तर त्या विकर्णाला दिलें नाहीं १७. तेव्हां पुनरपि अनेक वेळां सर्व भूपतींना उद्देशून त्या विकर्णानें तसेंच भाषण केलें आणि हातावर हात चोळून दुःखाचे सुस्कारे टाकीत टाकीत तो ह्मणाला १८ “ हे भूपालहो,

कौरवाः १९ चत्वार्याहुर्नरश्रेष्ठा व्यसनानि महीक्षिताम् । मृगया पानमक्षाश्च ग्राम्ये चैवातिरक्तता २० एतेषु हि नरः सक्तो धर्ममुत्सृज्य वर्तते । तथायुक्तेन च कृतां क्रियां लोको न मन्यते २१ तदयं पाण्डुपुत्रेण व्यसने वर्तता भृशम् । समाहूतेन कितवैरास्थितो द्रौपदीपणः २२ साधारणी च सर्वेषां पाण्डवानामनिन्दिता । जितेन पूर्वं चानेन पाण्डवेन कृतः पणः २३ इयं च कीर्तिता कृष्णा सौबलेन पणार्थिना । एतत्सर्वं विचार्याहं मन्ये न विजितामिमाम् २४ एतच्छ्रुत्वा महान्नादः सभ्यानामुदतिष्ठत । विकर्णं शंसमानानां सौबलं चापि निन्दताम् २५ तस्मिन्नुपरते शब्दे राधेयः क्रोधमूर्च्छितः । प्रगृह्य रुचिरं बाहुमिदं वचनमब्रवीत् २६ कर्ण उवाच॥

तुह्मीं द्रौपदीच्या प्रश्नाचें उत्तर द्या किंवा कांहींच उत्तर न देतां स्वस्थ रहा ! ह्या प्रसंगीं मला जें न्याय्य वाटत आहे तें, हे कौरवहो, मी सांगतों १९. मृगया, मद्यपान, द्यूत आणि अति स्त्रीसंग हीं चार राजव्यसनें ह्मणून श्रेष्ठ पुरुषांनीं सांगितलीं आहेत २०. ह्या चार व्यसनांमध्यें पुरुष आसक्त झाला असतां तो धर्माला सोडून वागत असतो आणि ह्मणूनच अशा व्यसनाधीन अयोग्य पुरुषानें केलेलें कृत्य लोक खरें समजत नाहींत २१. तेव्हां, द्यूतकारांनीं आव्हान केल्यामुळें अत्यंत द्यूतव्यसनासक्त होऊन पांडुपुत्र युधिष्ठिरानें हा द्रौपदीचा पण लाविलेला आहे २२. जिला कोणत्याही प्रकारें नांव ठेवण्यास जागा नाहीं अशी ही द्रौपदी सर्व पांडवांना साधारण आहे आणि प्रथम स्वतःला हरवून घेतल्यानंतर ह्या पांडुपुत्र युधिष्ठिरानें हिला उद्देशून पण लाविलेला आहे २३. शिवाय, (युधिष्ठिराच्या इच्छेनें ही पणाला लाविलेली नसून) पणेच्छु सुबलपुत्र शकुनीच्या सांगण्यावरून ह्या कृष्णेला पणाला लाविलेली आहे (सारांश,१ पणाला लावणारा युधिष्ठिर राजा व्यसनाधीन होऊन बेफाम झाला असल्यामुळें तशा स्थितींत त्यानें केलेलें कृत्य योग्य ह्मणतां येणार नाहीं; २ द्रौपदी सर्व पांडवांची भार्या असल्यामुळें एकट्या युधिष्ठिराला तिला पणाला लावण्याचा अधिकार नाहीं; ३ युधिष्ठिर पूर्वी स्वतःच जिंकिला गेला असल्यामुळें तो आपल्या स्वतःचा सुद्धां जर मुकत्यार नाहीं तर द्रौपदीचा नाहींच नाहीं ४ आणि शिवाय द्रौपदी युधिष्ठिराच्या इच्छेनें पणाला लाविली नसून शकुनीच्याच इच्छेनें लाविली असल्यामुळें हा पण न्याय्य आहे असें ह्मणतां येत नाहीं. तेव्हां) ह्या सर्वांचा विचार करून ही द्रौपदी जिंकिली नाहीं असें मी समजतों "२४. हें भाषण श्रवण केल्याबरोबर (शाबास! शाबास! फार उत्तम ! फार उत्तम ह्मणून) त्या सभेंतील सभासद लोक मोठ्या मोठ्यानें ओरडून विकर्णाची प्रशंसा आणि सुबलपुत्र जो शकुनि त्याची निंदा करूं लागले २५.

दृश्यन्ते वै विकर्णेह वैकृतानि बहून्यपि । तज्जातस्तद्विनाशाय यथाग्निर-
रणीप्रजः २७ एते न किंचिदप्याहुश्चोदिता ह्यपि कृष्णया । धर्मेण विजि-
तामेतां मन्यन्ते द्रुपदात्मजाम् २८ त्वं तु केवलबाल्येन धार्तराष्ट्र विदीर्यसे।
यद्ब्रवीषि सभामध्ये बालः स्थविरभाषितम् २९ न च धर्मं यथातत्त्वं वेत्सि
दुर्योधनावर । यद्ब्रवीषि जितां कृष्णां न जितेति सुमन्दधीः ३० कथं ह्यवि-
जितां कृष्णां मन्यसे धृतराष्ट्रज । यदा सभायां सर्वस्वं न्यस्तवान्पाण्डवा-
ग्रजः ३१ अभ्यन्तरा च सर्वस्वे द्रौपदी भरतर्षभ । एवं धर्मजितां कृष्णां
मन्यसे न जितां कथम् ३२ कीर्तिता द्रौपदी वाचा अनुज्ञाता च पाण्डवैः।
भवत्यविजिता केन हेतुनैषा मता तव ३३ मन्यसे वा सभामेतामानीता-

नंतर (कांहीं वेळानें) ती गडबड शांत झाली असतां क्रोधानें व्याप्त झालेला राधा-पुत्र कर्ण आपला भव्य हात पुढें करून ह्मणाला २६ " हे विकर्णा, ह्या जगता-मध्यें विपरीत प्रकार पुष्कळच दृष्टोत्पत्तीस येत असतात. अरे, अग्नि ज्याप्रमाणें अर-णीपासून उत्पन्न होऊन तिच्याच नाशाला प्रवृत्त होत असतो त्याप्रमाणें तूं हीं त्या धृतराष्ट्र राजापासून उत्पन्न होऊन त्याच्या नाशाला प्रवृत्त झाला आहेस (तेव्हां ह्यांत कांहीं विशेष नाहीं. जगतांतील अनेक विपरीत प्रकारांपैकींच हा एक प्रकार आहे) २७. अरे, द्रुपदकन्या कृष्णेनें स्वतः ह्यांना सांगितलें असतांही हे (भीष्म-प्रभृति) तिला कांहींएक उत्तर करीत नाहींत. कारण, ही द्रुपदकन्या धर्मानें जिंकिली गेली असें ते समजत आहेत २८. हे धृतराष्ट्रपुत्रा, दुःखानें अगदी विदीर्ण होऊन सभेमध्यें जें तूं (मोठ्या दिमाखानें) वृद्धांचें बोलणें बोलत आहेस तें केवळ मूर्खपणामुळें बोलत आहेस २९. हे दुर्योधनाहून कनिष्ठ असलेल्या विकर्णा, (दुर्योध-नाला कांहीं तरी चातुर्यें तुझ्यापेक्षां जास्त आहेत ह्याचा तूं थोडासातरी आपल्या मनाशीं विचार करून पहा. अरे) अत्यंत मूढ असा तूं ज्याअर्थीं जित असलेली द्रौपदी जित नाहीं असें ह्मणत आहेस त्याअर्थीं तुला धर्माचें ज्ञान जसें असावें तसें नाहीं (हें उघड आहे) ३०. हे धृतराष्ट्रपुत्रा, पांडवांतील ज्येष्ठ असलेल्या युधिष्ठिरानें सभे-मध्यें जर सर्वस्व पणाला लाविलें आहे तर द्रुपदकन्या कृष्णा जिंकिली नाहीं ह्मणून तूं कसें मानीत आहेस ? ३१. हे भरतवंशजश्रेष्ठा (!) द्रौपदीचाही युधिष्ठिराच्या सर्वस्वामध्यें अंतर्भाव होतो. तेव्हां (सर्व भ्रात्यांमध्यें श्रेष्ठ आणि ह्मणूनच सर्वांचा अधिपति जो युधिष्ठिर त्यानें आपल्या सर्वस्वाबरोबरच पणाला लाविलेली) द्रौपदी न्यायानें जिंकिली असतां तूं जिंकिलेली नाहीं असें कशावरून मानितोस ? ३२. द्रौपदी जिंकिली ह्मणून सभेमध्यें धडधडीत सांगण्यांत आलें व त्याला पांडवांनीं

मेकवाससम् । अधर्मेणेति तत्रापि शृणु मे वाक्यमुत्तमम् ३४ एको भर्ता स्त्रिया देवैर्विहितः कुरुनन्दन । इयं त्वनेकवशगा बन्धकीति विनिश्चिता ३५ अस्याः सभामानयनं न चित्रमिति मे मतिः । एकाम्बरधरत्वं वाप्यथ-वापि विवस्त्रता ३६ यच्चैषां द्रविणं किंचिद्या चैषा ये च पाण्डवाः । सौबलेनेह तत्सर्वं धर्मेण विजितं वसु ३७ दुःशासन सुबालोयं विकर्णः प्राज्ञवादिकः । पाण्डवानां च वासांसि द्रौपद्याश्चाप्युपाहर ३८ तच्छ्रुत्वा पाण्डवाः सर्वे स्वानि वासांसि भारत । अवकीर्योत्तरीयाणि सभायां समुपाविशन् ३९ ततो दुःशासनो राजन्द्रौपद्या वसनं बलात् । सभामध्ये समाक्षिप्य व्यपाक्रष्टुं प्रचक्रमे ४० वैशम्पायन उवाच ॥ आकृष्यमाणे वसने द्रौपद्या चिन्तितो हरिः । गोविन्द द्वारकावासिन्कृष्ण गोपीजन-

---

अनुमोदनही दिलें. तेव्हां तुला ही जिंकिली नाहीं असें वाटतें ह्याचें कारण काय? ३३ आतां हिला एका वस्त्रानिशी सभेमध्यें आणिलें हा अन्याय आहे ह्मणून ह्मणत असशील तर त्याला हें माझें खरमरीत उत्तर ऐकून घे ३४. हे कुरुनंदना, स्त्रीला एकच भर्ता देवांनीं नेमिलेला आहे आणि ही तर अनेकांना वश होऊन राहिलेली आहे. तस्मात्, ही वेश्या असल्याचें निश्चित आहे ३५. तेव्हां, ही एकवस्त्रा असली काय ! अथवा नग्न असली काय ! हिला सभेमध्यें आणणें मुळीच विचित्र प्रकार नव्हे असें मला वाटतें ३६. ह्या पांडवांचें द्रव्य, ही द्रौपदी आणि हे स्वतः पांडव हें सर्व सुबलपुत्र शकुनीनें ह्या द्यूतामध्यें धर्मानें जिंकिलेलें धन आहे ३७. हे दुःशासना, स्वतःला शहाणा ह्मणविणारा हा विकर्ण अतिशय मूर्ख आहे (ह्याच्या नादीं लागणें आपणांला योग्य नाहीं) हूं ! तूं पांडवांचीं वस्त्रें व त्याचप्रमाणें द्रौपदीचेंही वस्त्र हरण कर ३८. हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, तें कर्णाचें भाषण श्रवण केल्याबरोबर सर्व पांडव आपआपल्या अंगावरील वस्त्रें टाकून देऊन सभेमध्यें बसले ३९. तदनंतर, हे जनमेजय राजा, द्रौपदीच्या नेसलेल्या वस्त्राला हिसका देऊन दुःशासन भरसभेमध्यें तें फेडूं लागला ४०. वैशंपायन सांगतातः—दुःशासन वस्त्र फेडूं लागला असतां द्रौपदीनें श्रीहरीचा धांवा केला कीं " हे गोविंदा (तूं सर्व इंद्रियांचा चालक असल्यामुळें नित्य समीप असतांना ह्या प्रसंगीं माझी कां रे उपेक्षा करीत आहेस !), हे द्वारकावासिन् (आपल्या भक्तांना संकटांतून सोडविण्याकरितां एका रात्रींत तूं समुद्रामध्यें नगरी बांधून द्वारकेंतील सर्व लोक एकदम त्या नगरींत नेऊन ठेविलेस. तेव्हां ह्या संकटांतून माझें रक्षण करणें तुला काय रे कठीण आहे !); हे कृष्णा (भक्तांना स्मरण होतांक्षणीं तूं त्यांचीं सर्व दुःखें दूर ओढून नेत असतांस. तेव्हां माझें दुःख परिहार करण्याला तूं कां रे थांबला आहेस !),

प्रिय ४१ कौरवैः परिभूतां मां किं न जानासि केशव । हे नाथ हे रमानाथ व्रजनाथार्तिनाशन ॥ कौरवार्णवमग्नां मामुद्धरस्व जनार्दन ४२ कृष्ण कृष्ण महायोगिन्विश्वात्मन्विश्वभावन । प्रपन्नां पाहि गोविन्द कुरुमध्येऽवसीदतीम् ४३ इत्यनुस्मृत्य कृष्णं सा हरिं त्रिभुवनेश्वरम् । प्रारुदद्दुःखिता राजन्मुखमाच्छाद्य भामिनी ४४ याज्ञसेन्या वचः श्रुत्वा कृष्णो गह्वरितोऽभवत् । त्यक्त्वा शय्यासनं पद्भ्यां कृपालुः कृपयाभ्यगात् ४५ कृष्णं च विष्णुं च हरिं नरं च त्राणाय विक्रोशति याज्ञसेनी । ततस्तु धर्मोऽन्तरितो

हे गोपीजनप्रिय (अरे, मनुष्यांमध्यें गुराख्यांची जात तर हलकी मानिलेली आहे; तेव्हां त्यांच्या स्त्रिया तर त्यांच्याहीपेक्षां कमी योग्यतेच्या असणार. परंतु, त्यांच्यावरही तूं कृपा करीत असल्याचें दिसतें. तेव्हां, कायावाचामनें करून मी तुला शरण आलें असतांना व राजसूय यज्ञामध्यें अभिषेक करून तूं मला आपली ह्मणविली असतांना ह्या प्रसंगीं कां रे तुला माझी दया येत नाहीं !)४१,हे केशवा (ब्रह्मा, विष्णु, आणि महेश्वर ह्यांचाही प्रवर्तक तूं असतांना) कौरवांनीं मला ग्रासून टाकिलें आहे हें तुला कसें समजत नाहीं !) हे नाथ (अनाथाप्रमाणें तूं माझी कां रे उपेक्षा करीत आहेस !), हे रमानाथ (तूं लक्ष्मीच्या विलासामध्यें दंग होऊन भक्तजनाला कसा रे ह्या प्रसंगीं विसरत आहेस !), हे व्रजनाथ(अरे, गाईंचे समुदाय तूं रक्षण करीत असतांना(ह्या प्रसंगीं एका गाईचें रक्षण तुझ्यानें कसें रे होत नाहीं), हे आर्तिनाशना, (गोवर्धनोद्धरण, कालियमर्दन, दावाग्निपान इत्यादिकांच्या योगानें तूं भक्तांना संकटांतून सोडविलेस; परंतु, ह्या प्रसंगीं तूं माझें कां रे सत्त्व पहात आहेस !), हे जनार्दना, (तूं सर्व भक्तजनांच्या दुःखाचा परिहार करणारा आहेस. कारितां,) कौरवसागरामध्यें बुडालेल्या मला ह्या प्रसंगीं तार ४२. हे कृष्णा, हे कृष्णा, हे महायोगिन् (तूं कोठें असलास तरी ह्या प्रसंगीं येथें येऊन माझें रक्षण करणें तुला मुळींच कठीण नाहीं), हे विश्वात्म्या (तूं सर्वांचा अंतर्यामी आहेस. तेव्हां शत्रूला तरी मनामध्यें प्रेरणा करून तूं ह्या निंद्य कृत्यापासून निवृत्त कर), हे विश्वभावना गोविंदा (तूं सर्व विश्वाचें परिपालन करणारा आहेस. ह्यास्तव) कुरुवंशजांमध्यें नाश पावत असलेल्या मज शरणागतेचें तूं रक्षण कर " ४३. ह्याप्रमाणें त्रैलोक्याधिपति श्रीहरि श्रीकृष्णाचा (मनामध्यें) धांवा केल्यावर दुःखानें गांजलेली ती तेजस्वी द्रौपदी हातानें मुख आच्छादित करून रोदन करूं लागली ४४. इकडे (द्वारकेमध्यें) असलेल्या (सर्वांतर्यामी) श्रीकृष्णांना द्रौपदीचें भाषण श्रवण करून गह्वर आला आणि शय्या व आसन पायांनीं लथडून देऊन तो दयाळु श्रीहरि द्रौपदीची करुणा येऊन तिच्या समीप (गुप्त रूपानें) धांवला ४५. सारांश " हे कृष्णा, हे सर्वव्यापी ईश्वरा,

महात्मा समावृणोद्वै विविधैः सुवस्त्रैः ४६ आकृष्यमाणे वसने द्रौपद्यास्तु विशांपते । तद्रूपमपरं वस्त्रं प्रादुरासीदनेकशः ४७ नानारागविरागाणि वसनान्यथ वै प्रभो । प्रादुर्भवन्ति शतशो धर्मस्य परिपालनात् ४८ ततो हलहलाशब्दस्तत्रासीद्घोरदर्शनः ४९ तदद्भुततमं लोके वीक्ष्य सर्वे महीभृतः । शशंसुर्द्रौपदीं तत्र कुत्सन्तो धृतराष्ट्रजम् ५० शशाप तत्र भीमस्तु राजमध्ये बृहत्स्वनः । क्रोधाद्विस्फुरमाणोष्ठो विनिष्पिष्य करे करम् ५१ भीमसेन उवाच ॥ इदं मे वाक्यमादध्वं क्षत्रिया लोकवासिनः । नोक्तपूर्वं नरैरन्यैर्न चान्यो यद्वदिष्यति ५२ यद्येतदेवमुक्त्वाहं न कुर्यां पृथिवीश्वराः । पितामहानां पूर्वेषां नाहं गतिमवाप्नुयाम् ५३ अस्य पापस्य दुर्बुद्धेर्भारतापसदस्य च । न पिबेयं बलाद्वक्षो भित्त्वा चेद्रुधिरं युधि ५४ वैशम्पायन उवाच ॥ तस्य ते तद्वचः श्रुत्वा रौद्रं लोमप्रहर्षणम् । प्रचक्रुर्बहुलां पूजां

हे नरहरे, माझें रक्षण कर" असा द्रौपदी आक्रोश करूं लागली असतां महात्मा धर्मच वस्त्ररूप बनला आणि त्यानें नानाप्रकारच्या उत्तम उत्तम वस्त्रांनीं त्या द्रौपदीला आच्छादून टाकिली ४६. तेव्हां, हे जनमेजयराजा, दुःशासन द्रौपदीचें वस्त्र फेडूं लागला असतां त्याच्याच सारिखें (परिधान केलेलें) दुसरें वस्त्र वारंवार त्या द्रौपदीचे ठिकाणीं उत्पन्न होऊं लागलें ४७. हे प्रभो जनमेजयराजा, धर्मपरिपालनामुळें नानाप्रकारचीं रंगीबेरंगीं व केवल साधीं वस्त्रें शेंकडों उत्पन्न होऊं लागलीं असतां ४८ त्या सभेमध्यें भयसूचक असा मोठा हाहाकार उडाला ४९. तो अत्यंत अद्भुत प्रकार अवलोकन करून त्या ठिकाणीं सर्व राजे द्रौपदीची प्रशंसा करूं लागले आणि धृतराष्ट्रपुत्र दुःशासनाची निंदा करूं लागले ५०. (दुःशासन द्रौपदीचें वस्त्र फेडूं लागला तेव्हां) क्रोधामुळें भीमसेनाचे ओष्ठ स्फुरण पावूं लागले आणि हातावर हात चोळून त्यानें राजांमध्यें उच्च स्वरानें शपथ(—पूर्वक प्रतिज्ञा) केली ५१. भीमसेन ह्मणतोः—हे भूलोकनिवासी क्षत्रिय हो, तुह्मी माझें भाषण श्रवण करा. असें भाषण आजपर्यंत दुसऱ्या पुरुषांनीं केलेलें नाहीं आणि इतउतरही तें करणारा मला दुसरा कोणी दिसत नाहीं ५२. हें भाषण करून मीं जर त्याप्रमाणें वागलों नाहीं तर, हे भूपालहो, पूर्वी होऊन गेलेल्या पूर्वजांची गति मला प्राप्त होणार नाहीं ५३. सारांश, ह्या भरतकुलकलंक पापी दुष्ट दुःशासनाचें वक्षःस्थल युद्धामध्यें स्वसामर्थ्यानें विदीर्ण करून जर मीं त्याचें रक्तप्राशन केलें नाहीं तर पूर्वजांप्रमाणें मला उत्तमलोकप्राप्ति होणार नाहीं ५४. वैशंपायन सांगतातः—अंगावर कांटा आणणारें तें त्या भीमसेनाचें भयंकर भाषण श्रवण करून धृतराष्ट्रपुत्र दुःशासनाची निंदा करूं लागलेल्या सभासदांनीं

कृत्मन्तो धृतराष्ट्रजम् ५५ यदा तु वाससां राशिः सभामध्ये समाचितः।
ततो दुःशासनः श्रान्तो व्रीडितः समुपाविशत् ५६ धिक्शब्दस्तु ततस्तत्र
समभूल्लोमहर्षणः। सभ्यानां नरदेवानां दृष्ट्वा कुन्तीसुतांस्तथा ५७ न
विब्रुवन्ति कौरव्याः प्रश्नमेतमिति स्म ह। सुजनः क्रोशति स्मात्र धृत-
राष्ट्रं विगर्हयन् ५८ ततो बाहू समुत्क्षिप्य निवार्य च सभासदः। विदुरः
सर्वधर्मज्ञ इदं वचनमब्रवीत् ५९ विदुर उवाच॥ द्रौपदी प्रश्नमुक्त्वैवं रोरवीति
त्वनाथवत्। न च विब्रूत तं प्रश्नं सभ्या धर्मोऽत्र पीड्यते ६० सभां प्रपद्यते
ह्यार्तः प्रज्वलन्निव हव्यवाट्। तं वै सत्येन धर्मेण सभ्याः प्रशमयन्त्युत ६१
धर्मप्रश्नमतो ब्रूयादार्यः सत्येन मानवः। विब्रूयुस्तत्र तं प्रश्नं कामक्रोध-
बलातिगाः ६२ विकर्णेन यथाप्रज्ञमुक्तः प्रश्नो नराधिपाः। भवन्तोऽपि हि
तं प्रश्नं विब्रुवन्तु यथामति ६३ यो हि प्रश्नं न विब्रूयाद्धर्मदर्शी सभांगतः।
अनृते या फलावाप्तिस्तस्याः सोऽर्धं समश्नुते ६४ यः पुनर्वितथं ब्रूयाद्ध-

---

भीमसेनाची फारच प्रशंसा केली ५५. (हे जनमेजयराजा, फेडतां फेडतां) वस्त्रांची एक रास सभेमध्यें पडल्यावर दुःशासन थकून गेला आणि लज्जित होऊन खालीं बसला ५६. कुंतीपुत्र पांडवांना त्याप्रमाणें (अंगावरचीं वस्त्रें काढून टाकून बसल्याचें) अवलोकन केल्यानंतर सभेंत बसलेल्या राजांनीं अंगावर रोमांच उभे राहतील इतक्या उच्च स्वरानें "धिक्कार असो, धिक्कार असो" असे (अत्यंत हृदयद्रावक) उद्गार काढिले ५७. "अरे, ह्या द्रौपदीच्या प्रश्नाचें कुरुवंशांतील पुरुषांनीं उत्तर दिलें नाहीं काय ?" असा जो तो सज्जन धृतराष्ट्राची निंदा करून आक्रोश करूं लागला ५८. तेव्हां ("थांबा, थांबा" ह्मणून) दोन्ही हात वर करून सर्व सभासदांना थांबविल्यानंतर सर्वधर्मज्ञ विदुर असें भाषण करूं लागला ५९. विदुर ह्मणतोः— हे सभ्यहो, द्रौपदी ह्याप्रमाणें प्रश्न करून अनाथासारखी रोदन करीत आहे आणि तुह्मी तर त्या प्रश्नाला उत्तर देत नाहीं. परंतु, (ह्या तुमच्या स्तब्ध बसण्यानें) ह्या ठिकाणीं धर्माला बाध येत आहे ६०. प्रज्वलित अग्नीप्रमाणें आर्त जन (संतप्त होऊन सभेंत जात असतो आणि सत्य धर्माच्या योगानें सभासद त्याला शांत करीत असतात ६१. ह्यास्तव, सभ्य पुरुषानें सत्याचें अवलंबन करून धर्मविषयक प्रश्नाचें उत्तर द्यावें. सारांश, जो प्रश्न आर्त जन करील त्याचें सभासदांनीं लोभ व क्रोध ह्यांच्या तावडींत न सांपडतां उत्तर द्यावें ६२. हे भूपालहो, विकर्णानें आपल्या बुद्धीप्रमाणें ह्या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे. करितां, तुह्मीही त्या प्रश्नाचें यथामति उत्तर द्या ६३. कारण, सभेमध्यें गेलेला जो धर्मज्ञ पुरुष प्रश्नाचें उत्तर देत नाहीं त्याला अनृतजन्य पापफळाचा अर्धा भाग प्राप्त

र्मदर्शी सभां गतः। अनृतस्य फलं कृत्स्नं संप्राप्नोतीति निश्चयः ६५अत्रा-
प्युदाहरन्तीममितिहासं पुरातनम्।प्रह्लादस्य च संवादं मुनेराङ्गिरसस्य च६६
प्रह्लादो नाम दैत्येन्द्रस्तस्य पुत्रो विरोचनः।कन्याहेतोराङ्गिरसं सुधन्वानमु-
पाद्रवत् ६७अहं ज्यायानहं ज्यायानिति कन्येप्सया तदा।तयोर्देवनमत्रासी-
त्प्राणयोरिति नः श्रुतम् ६८ तयोः प्रश्नविवादोभूत्प्रह्लादं तावपृच्छताम् ।
ज्यायान्क आवयोरेकः प्रश्नं प्रब्रूहि मा मृषा ६९ स वै विवदनाद्भीतः सुध-
न्वानं विलोकयन्।तं सुधन्वाब्रवीत्क्रुद्धो ब्रह्मदण्ड इव ज्वलन् ७० यदि वै
वक्ष्यसि मृषा प्रह्लादाथ न वक्ष्यसि । शतधा ते शिरो वज्री वज्रेण प्रह-
रिष्यति ७१ सुधन्वना तथोक्तः सन्व्यथितोश्वत्थपर्णवत् । जगाम कश्यपं
दैत्यः परिप्रष्टुं महौजसम् ७२ प्रह्लाद उवाच ॥ त्वं वै धर्मस्य विज्ञाता
दैवस्येहासुरस्य च । ब्राह्मणस्य महाभाग धर्मकृच्छ्रमिदं शृणु ७३ यो वै

होतो ६४ आणि त्याचप्रमाणें जो धर्मज्ञ पुरुष सभेमध्यें प्रश्नाचें उत्तर असत्य देतो त्याला अनृताचें संपूर्ण फल प्राप्त होतें; असा धर्मशास्त्राचा निश्चय आहे ६५. प्रल्हाद व आंगिरस मुनि ह्यांचा संवाद ह्मणून एक पुरातन इतिहास ह्याविषयीं सांगत असतात६६. प्रल्हाद ह्मणून एक श्रेष्ठ दैत्य असून त्याला विरोचन नांवाचा पुत्र होता. त्याचा कन्येक-रितां अंगिरा मुनींच्या एका सुधन्वानामक पुत्राशीं पण झाला ६७. (कारण," तुह्मांपैकीं जो श्रेष्ठ असेल त्याला मी वरीन"असें केशिनीनामक राजकन्येनें त्यांना सांगितलें होतें. तेव्हां " मी श्रेष्ठ मी श्रेष्ठ " ह्मणून कन्येकरितां परस्परांशीं मांडत असलेल्या उभयतांचा प्राणांविषयी पण झाला (ह्मणजे निकृष्ट ठरून जो पराजित होईल त्यानें दुस-ऱ्याचें आजन्म दास्य करावें असा पण ह्या उभयतांमध्यें ठरला) ६८. ह्याप्रमाणें श्रेष्ठ कोण ह्या प्रश्नाविषयीं त्या उभयतांमध्यें विवाद झाला असतां "—आह्मां दोघां-मध्यें कोण एक श्रेष्ठ आहे?—ह्या प्रश्नाचें उत्तर असत्य न देतां सत्य असेल तेंच दे" ह्मणून त्यांनीं प्रल्हादाला प्रश्न केला ६९. तेव्हां सुधन्व्याला अवलोकन करून तो प्रल्हाद असत्य भाषणाला भ्यायला. कारण, प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें निर्माण केलेला कालदं-डच की काय अशारीतीनें क्रुद्ध होऊन संतप्त झालेला सुधन्वा त्याला ह्मणाला ७०. " हे प्रल्हादा, जर असत्य भाषण करशील किंवा स्वस्थ राहशील तर तूं जिवंत राहणार नाहींस. वज्रपाणि इंद्र वज्राच्या योगानें तुझ्या मस्तकाचे शेंकडों तुकडे उडवील" ७१. ह्याप्रमाणें सुधन्व्याला ब्राह्मणानें सांगितलें असतां पिंपळाच्या पानाप्रमाणें तो दैत्य लटलट कांपूं लागला आणि ह्या प्रश्नाचें उत्तर विचारण्याकरितां महातेजस्वी कश्यप-मुनींकडे तो गेला ७२. प्रल्हाद ह्मणतो:—हे महासमर्थ कश्यपमुने, आपण देव

प्रश्नं न विब्रूयाद्वितथं चैव निर्दिशेत्। के वै तस्य परे लोकास्तन्ममाचक्ष्व पृच्छतः ७४ कश्यप उवाच॥ जानन्नविब्रुवन्प्रश्नान्कामात्क्रोधाद्भयात्तथा। सहस्रं वारुणान्पाशानात्मनि प्रतिमुञ्चति ७५ साक्षी वा विब्रुवन्साक्ष्यं गोकर्णशिथिलश्चरन्। सहस्रं वारुणान्पाशानात्मनि प्रतिमुञ्चति ७६ तस्य संवत्सरे पूर्णे पाश एकः प्रमुच्यते। तस्मात्सत्यं तु वक्तव्यं जानता सत्यमञ्जसा ७७ विद्धो धर्मो ह्यधर्मेण सभां यत्रोपपद्यते। न चास्य शल्यं कृन्तन्ति विद्धास्तत्र सभासदः ७८ अर्धं हरति वै श्रेष्ठः पादो भवति कर्तृषु। पादश्चैव सभासत्सु ये न निन्दन्ति निन्दितम् ७९ अनेना भवति श्रेष्ठो मुच्यन्ते च सभासदः। एनो गच्छति कर्तारं निन्दार्हो यत्र निन्द्यते ८० वितथं तु वदेयुर्ये धर्मं प्रह्लाद पृच्छते। इष्टापूर्तं च ते घ्नन्ति सप्त सप्त परावरान् ८१ हृतस्वस्य हि यद्दुःखं हतपुत्रस्य चैव यत्। ऋणिनः प्रति यच्चैव स्वार्थाद्भ्रष्टस्य चैव यत् ८२ स्त्रियाः

आणि असुर ह्या दोहोंच्या धर्मांचे ज्ञाते आहां. तेव्हां ब्राह्मणाचें हें धर्मसंकट आपण श्रवण करा ७३ आणि जो मुळींच प्रश्नाचें उत्तर देत नाहीं किंवा जो असत्य उत्तर देतो त्याला इहलोकानंतर दुसरे कोणते लोक प्राप्त होतात हें मी आपणांला विचारीत आहें तें आपण कथन करा ७४. कश्यप सांगतातः—जाणीत असूनही लोभामुळें, क्रोधामुळें अथवा भयामुळें जो प्रश्नाचें उत्तर स्पष्टपणें देत नाहीं तो आपल्या ठिकाणीं सहस्र वरुणपाश अडकावून घेतो ७५. त्याचप्रमाणें (खरें ज्ञान असूनही) जो साक्षीदार दोन्ही डगरीवर हात देऊन साक्ष स्पष्टपणें देत नाहीं तोही सहस्र वरुणपाश आपल्या गळ्यांत अडकावून घेतो ७६ आणि (अशा करण्यानें लगटलेल्या त्या पाशांपैकीं संवत्सर पूर्ण झाला ह्मणजे एकेक पाश मोकळा होतो. तस्मात्, तत्त्वतः सत्य जाणणाऱ्या पुरुषानें सत्यच भाषण करावें ७७. ज्या सभेमध्यें अधर्मानें धर्म हणून पडला असतां सभासद धर्माचें तें शल्य नाहींसें करींत नाहींत त्या सभेंतील सभासद अधर्मानें विद्ध होतात ७८. ह्मणजे सभेमध्यें जो मुख्य अध्यक्ष असेल तो अधर्मजन्य पातकाचा अर्धा भागीदार होतो, कर्त्याकडे चतुर्थांश राहतो आणि निंद्य गोष्टीची निंदा जे करीत नाहींत त्या सभासदांकडे चतुर्थांश जातो ७९. त्याचप्रमाणें निंदेला पात्र असलेल्याची ज्या सभेमध्यें निंदा होते त्या सभेंतील मुख्य सभाध्यक्ष पातकापासून अलिप्त राहून इतर सभासदही पातकापासून मुक्त होतात आणि सर्व पातक कर्त्याकडेच जातें ८०. हे प्रल्हादा, जे धर्मविषयक प्रश्नाचें पृच्छकाला असत्य उत्तर देतात ते इष्टापूर्त फलाला मुकून पुढल्यामागल्या सात पिढ्यांच्या सुगतीचा नाश करितात ८१. सर्वस्वापहार झालेला, पुत्र मरण पावलेला, ऋणी, स्वार्थाला मुकलेला ८२, पतिविहीन झालेली स्त्री,

पत्या विहीनाया राज्ञा ग्रस्तस्य चैव यत् । अपुत्रायाश्च यद्दुःखं व्याघ्राघ्रातस्य चैव यत् ८३ अध्यूढायाश्च यद्दुःखं साक्षिभिर्विहतस्य च । एतानि वै समान्याहुर्दुःखानि त्रिदिवेश्वराः ८४ तानि सर्वाणि दुःखानि प्राप्नोति वितथं ब्रुवन् । समक्षदर्शनात्साक्षी श्रवणाच्चेति धारणात् ८५ तस्मात्सत्यं ब्रुवन्साक्षी धर्मार्थाभ्यां न हीयते । कश्यपस्य वचः श्रुत्वा प्रह्लादः पुत्रमब्रवीत् ८६ श्रेयान्सुधन्वा त्वत्तो वै मत्तः श्रेयांस्तथाङ्गिराः । माता सुधन्वनश्चापि मातृतः श्रेयसी तव ॥ विरोचन सुधन्वायं प्राणानामीश्वरस्तव ८७ सुधन्वोवाच ॥ पुत्रस्नेहं परित्यज्य यस्त्वं धर्मे व्यवस्थितः । अनुजानामि ते पुत्रं जीवत्वेष शतं समाः ८८ विदुर उवाच ॥ एवं वै परमं धर्मं श्रुत्वा सर्वे सभासदः । यथाप्रश्नं तु कृष्णाया मन्यध्वं तत्र किं परम् ८९ वैशम्पायन उवाच ॥ विदुरस्य वचः श्रुत्वा नोचुः किंचन पार्थिवाः । कर्णो दुःशासनं त्वाह कृष्णां दासीं गृहं नय ९० तां वेपमानां सव्रीडां प्रलपन्तीं स्म पाण्डवान् । दुःशासनः सभामध्ये विचकर्ष तपस्विनीम् ९१ [२२१६]

राजानें ग्रासलेला पुरुष, पुत्रहीन स्त्री, व्याघ्रमुखीं पडलेलें मनुष्य. ८३, सवत केलेली स्त्री आणि असत्य भाषण करून साक्षीदारांनीं बुडविलेला पक्षकार ह्या सर्वांचीं दुःखें समान असतात ह्मणून देवांनीं ह्मटलें आहे ८४. परंतु, समक्ष अवलोकन, विश्वासु मनुष्यापासून केलेलें श्रवण अथवा मनाची खात्री ह्याच्या विरुद्ध जो साक्षीदार खोटें सांगतो त्याला हीं सर्व दुःखें प्राप्त होतात. तस्मात्, सत्य सांगणारा साक्षीदार धर्म आणि अर्थ ह्यांपासून भ्रष्ट होत नाहीं ८५. ह्याप्रमाणें कश्यप मुनींचें भाषण श्रवण केल्यावर प्रल्हाद आपल्या पुत्राला ह्मणाला " तुझ्यापेक्षां सुधन्वा श्रेष्ठ असून (ह्याचा पिता) अंगिरा मुनि माझ्यापेक्षां श्रेष्ठ आहे ८६ आणि ह्या सुधन्व्याची माताही तुझ्या मातेपेक्षां श्रेष्ठ आहे. सारांश, हे विरोचना, हा सुधन्वा तुझ्या प्राणांचा धनी आहे ८७. सुधन्वा ह्मणतोः—(हे प्रल्हादा,) पुत्रप्रेमाची परवा न करितां, ज्याअर्थी तूं धर्माचें अवलंबन करून राहिलास त्याअर्थी मी तुझ्या पुत्राला अनुज्ञा देतों. ह्याला शंभर वर्षें वाचूं दे. ८८. विदुर ह्मणतोः—ह्याप्रमाणें उत्कृष्ट धर्म श्रवण करून तुह्मी सर्व सभासद द्रौपदीच्या प्रश्नाप्रमाणें द्यूतामध्यें स्त्री जिंकिली किंवा नाहीं ह्याचा काय तो पक्का विचार करा ८९. वैशंपायन सांगतातः—विदुराचें भाषण श्रवण केल्यावरही भूपालांनीं कांहींच उत्तर केलें नाहीं. कर्णमात्र " ह्या दासी द्रौपदीला घरीं ने " ह्मणून दुःशासनाला ह्मणाला ९०. तेव्हां ती बिचारी लज्जित झालेली द्रौपदी कांपत कांपत पांडवांच्या नांवानें सभेमध्यें आक्रोश करूं लागली असतांना दुःशासनानें तिला ओढिली ९१. ह्याप्रमाणें० सभाप-

इति श्री०सभापर्वणि द्यूतपर्वणि द्रौपद्याकर्षणेऽष्टषष्टितमोऽध्यायः ॥ ६८ ॥

द्रौपद्युवाच ॥ तावत्प्रतीक्ष दुष्प्रज्ञ दुःशासन नराधम । पुरस्तात्करणीयं मे न कृतं कार्यमुत्तरम् १ विह्वलास्मि कृतानेन कर्षता बलिना बलात् २ अभिवादं करोम्येषां कुरूणां कुरुसंसदि । न मे स्यादपराधोऽयं यदिदं न कृतं मया ३ वैशम्पायन उवाच ॥ सा तेन च समाधूता दुःखेन च तपस्विनी । पतिता विललापेदं सभायामतथोचिता ४ द्रौपद्युवाच ॥ स्वयंवरे यास्मि नृपैर्दृष्टा रङ्गे समागतैः । न दृष्टपूर्वा चान्यत्र साहमद्य सभां गता ५ यां न वायुर्न चादित्यो दृष्टवन्तौ पुरा गृहे । साहमद्य सभामध्ये दृश्यामि जनसंसदि ६ यां न मृष्यन्ति वातेन स्पृश्यमानां गृहे पुरा । स्पृश्यमानां सहन्तेऽद्य पाण्डवास्तां दुरात्मना ७ मृष्यन्ति कुरवश्चेमे मन्ये कालस्य पर्ययम् । स्नुषां दुहितरं चैव क्लिश्यमानामनर्हतीम् ८ किं त्वतः कृपणं भूयो यदहं स्त्री सती शुभा । सभामध्यं विगाहेऽद्य क्व नु धर्मो महीक्षिताम् ९

र्वांतील द्यूतपर्वांपैकीं द्रौपदीच्या आकर्षणाविषयीं अडुसष्टावा अध्याय समाप्त झाला॥६८॥

द्रौपदी ह्मणतेः—हे नराधमा दुःशासना, जरा उभा रहा. पूर्वी जें करावयाला पाहिजे होतें तें मुख्य कर्तव्य मीं तेव्हां केलें नाहीं. कारण, त्या वेळेस बलात्कारानें ओढीत असलेल्या ह्या बलाढ्य दुःशासनानें मला अगदीं विव्हल करून टाकिली होती १,२. करितां, कुरुसभेमध्यें असलेल्या ह्या कुरुवंशजांना मी वंदन करितें. माझ्या हातून हें वंदनकर्म पूर्वी झालें नाहीं हा माझा अपराध नव्हे ३. वैशंपायन सांगततातः—नंतर दुःशासनानें तिला हिसकली असतां ती बिचारी भूमीवर पडली आणि तसें करण्यास योग्य नसलेली ती द्रौपदी दुःखानें असा विलाप करूं लागली ४. द्रौपदी ह्मणतेः—स्वयंवरसमयीं रंगसभेमध्यें जुळलेल्या नृपांवांचून मी जी आजपर्यंत दुसऱ्या ठिकाणीं कोणाच्याही दृष्टीं पडलेली नाहीं ती आज ह्या सभेमध्यें आलें आहें ५. आजपर्यंत घरामध्यें वायु व सूर्य ह्यांना देखील जिचें दर्शन झालें नाहीं ती मी आज सभेमध्यें लोकसमाजांत (सर्वांच्या) दृष्टीं पडत आहें ६. घरीं असतांना जिला वायूनेंही स्पर्श केलेला पांडवांना कधींही खपला नाहीं त्या मज द्रौपदीला ह्या दुरात्म्या दुःशासनाचा स्पर्श होत असतांना आज पांडव सहन करीत आहेत ७ आणि अशाप्रकारें क्लेश भोगण्यास अयोग्य असलेली मी ज्यांना स्नुषेप्रमाणें आणि दुहितेप्रमाणें आहें ते हे (भीष्मप्रभृति) कुरुवंशजही मी क्लेश भोगीत असतांना सहन करीत आहेत. तस्मात्, हीं काळाची गति आहे असें मला वाटतें ८. अहो, आचरणानें शुद्ध अशी मी पतिव्रता स्त्री (पुरुषांच्या) सभेमध्यें आज आलें आहे ह्यापेक्षां आणखी दुःखास्पद तें काय असणार?

धर्म्यां स्त्रियं सभां पूर्वे न नयन्तीति नः श्रुतम् । स नष्टः कौरवेयेषु पूर्वो धर्मः सनातनः १० कथं हि भार्या पाण्डूनां पार्षतस्य स्वसा सती । वासुदेवस्य च सखी पार्थिवानां सभामियाम् ११ तामिमां धर्मराजस्य भार्यां सदृशवर्णजाम् । ब्रूत दासीमदासीं वा तत्करिष्यामि कौरवाः १२ अयं मां सुदृढं क्षुद्रः कौरवाणां यशोहरः । क्लिश्नाति नाहं तत्सोढुं चिरं शक्ष्यामि कौरवाः १३ जितां वाप्यजितां वापि मन्यध्वं मां यथा नृपाः । तथा प्रत्युक्तमिच्छामि तत्करिष्यामि कौरवाः १४ भीष्म उवाच ॥ उक्तवानस्मि कल्याणि धर्मस्य परमा गतिः । लोके न शक्यते ज्ञातुमपि विज्ञैर्महात्मभिः १५ बलवांश्च यथा धर्मं लोके पश्यति पूरुषः । स धर्मो धर्मवेलायां भवत्यभिहतः परः १६ न विवेक्तुं च ते प्रश्नमिमं शक्नोमि निश्चयात् । सूक्ष्मत्वाद्गहनत्वाच्च कार्यस्यास्य च गौरवात् १७ नूनमन्तः कुलस्यास्य भविता न चिरादिव । तथा हि कुरवः सर्वे लोभमोहपरायणाः १८ कुलेषु

अहो, भूपालांचा धर्म तरी कोठें गेला आहे? ९. पूर्वींचेही लोक धर्माला अनुसरून वागत असलेल्या स्त्रीला सभेमध्यें नेत नसत असें आमच्या ऐकण्यांत आहे. परंतु, कुरुवंशजांमध्यें तो पूर्वींचा सनातन धर्म सांप्रत नष्ट झाला आहे १०. अहो (नाहीं तर) पांडवांची भार्या, धृष्टद्युम्नाची भगिनी व प्रत्यक्ष वासुदेवाची मैत्रीण राजसभेमध्यें येईल कशी? ११. तस्मात्, हे कौरवहो, अशा स्थितीला येऊन पोंचलेली मी धर्मराजाची समानवर्ण भार्या दासी आहे किंवा नाहीं हें काय तें सांगा; ह्मणजे मी त्याप्रमाणें करीन १२. कौरवांच्या कीर्तीला कलंक लावणारा हा नीच दुःशासन मला जे पराकाष्ठेचे क्लेश देत आहे ते, हे कौरवहो, माझ्यानें फारवेळ सहन करवणार नाहींत १३. हे नृपहो, मी जित किंवा अजित हें तुह्मी काय तें ठरवा आणि त्याचप्रमाणें, हे कौरवहो, तुह्मीही मला काय तें प्रत्युत्तर द्या; ह्मणजे मी त्याप्रमाणें वागेन १४. भीष्म ह्मणतातः— हे कल्याणि, जगतांतील महात्म्या ज्ञानवान् लोकांनाही समजण्यास अशक्य अशी धर्माची गति फारच सूक्ष्म असल्याचें मीं तुला पूर्वींच सांगितलें आहे १५. जगतामध्यें बलाढ्य पुरुषाचा ज्याप्रमाणें धर्मप्रसंगीं कल असतो तो (वस्तुतः अधर्म असूनही) धर्म ठरतो आणि दुर्बलानें सांगितलेला (जरी खरा धर्म असला तरी) हाणून पाडला जातो १६. तस्मात्, ही गोष्ट फारच गहन, महत्त्वाची व सूक्ष्म विचाराची असल्यामुळें तुझ्या ह्या प्रश्नाचा निःसंशय निर्णय करण्यास मी असमर्थ आहें १७. ज्याअर्थीं सर्व कुरुवंशज

---

१ ह्यावरून पुरुषांच्या समाजामध्यें गरती स्त्रियांनीं जाणें ही गोष्ट आतांच नव्हे परंतु, अनादिकालापासून निंद्य मानिली जात असल्याचें सिद्ध आहे.

जाताः कल्याणि व्यसनैराहता भृशम् । धर्म्यान्मार्गान्न च्यवन्ते येषां नस्त्वं वधूः स्थिता १९ उपपन्नं च पाञ्चालि तवेदं वृत्तमीदृशम् । यत्कृच्छ्रमपि संप्राप्ता धर्ममेवान्ववेक्षसे २० एते द्रोणादयश्चैव वृद्धा धर्मविदो जनाः । शून्यैः शरीरैस्तिष्ठन्ति गतासव इवानताः २१ युधिष्ठिरस्तु प्रश्नेऽस्मिन्प्रमाणमिति मे मतिः । अजितां वा जितां वेति स्वयं व्याहर्तुमर्हति २२ [२३३८]

इति० सभापर्वणि द्यूतपर्वणि भीष्मवाक्ये एकोनसप्ततितमोऽध्यायः ॥ ६९ ॥

वैशम्पायन उवाच ॥ तथा च दृष्ट्वा बहु तत्र देवीं रोरूयमाणां कुररीमिवार्ताम् । नोचुर्वचः साध्वथ वाप्यसाधु महीक्षितो धार्तराष्ट्रस्य भीताः १ दृष्ट्वा तथा पार्थिवपुत्रपौत्रांस्तूष्णींभूतान्धृतराष्ट्रस्य पुत्रः । स्मयन्निवेदं वचनं बभाषे पाञ्चालराजस्य सुतां तदानीम् २ दुर्योधन उवाच ॥ तिष्ठत्वयं प्रश्न उदारसत्त्वे भीमेऽर्जुने सहदेवे तथैव । पत्यौ च ते नकुले याज्ञसेनि वदन्त्वेते वचनं त्वत्प्रसूतम् ३ अनीश्वरं विब्रुवन्त्वार्यमध्ये युधिष्ठिरं तव पाञ्चालि

मुख्यतः लोभाचें व मोहाचें अवलंबन करून राहिले आहेत त्याअर्थी खरोखर ह्या कुरुकुलाचा लवकरच नाश होणार (असें दिसतें) १८. हे कल्याणि, ज्या आमच्या पांडवांची तूं पत्नी आहेस ते पांडव कुलीन आहेत आणि ह्मणूनच संकटांनीं अत्यंत त्रस्त झाले असतांही धर्माला अनुसरून असलेल्या मार्गापासून ते ढळत नाहींत १९. हे पांचालि, तूं संकटांत सांपडलेली असतांही तुझ्या बुद्धीचा कल धर्माकडेच आहे हें वर्तन तुला अगदीं योग्य आहे २०. हे द्रोणाचार्यप्रभृति धर्मवेत्ते वृद्ध लोक खालीं माना घालून गतप्राण झाल्यासारखे निश्चेष्ट बसले आहेत २१. तेव्हां ह्या प्रश्नाविषयीं युधिष्ठिरच प्रमाणभूत आहे (ह्मणजे तो सांगेल तेंच प्रमाण) असें मला वाटतें. कारितां, द्रौपदी जिंकिली नाहीं किंवा जिंकिली हें त्यानें स्वतःच काय तें सांगावें २२. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं भीष्मांच्या भाषणाविषयीं एकुणसत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥६९॥

वैशंपायन सांगतातः—तशास्थितीमध्यें असलेली राजपत्नी द्रौपदी कुररीपक्षिणीप्रमाणें दुःखित होऊन त्या सभेमध्यें एकसारखी रोदन करीत असल्याचें अवलोकन करूनही धृतराष्ट्रपुत्रदुर्योधनाच्या भीतीमुळें तेथें असलेले भूपाल बरें अथवा वाईट कांहींच उत्तर देईनात १. तेव्हां राजे व त्यांचे पुत्रपौत्र तशाप्रकारें स्वस्थ बसल्याचें अवलोकन करून धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन उपहासपूर्वक पांचालराजाची कन्या जी द्रौपदी तिला त्या प्रसंगीं असें ह्मणाला २. दुर्योधन ह्मणतोः— हे उदार द्रौपदी (अर्थात् उदार मनामुळें अनेक पुरुषांचा पति ह्मणून निःशंकपणें स्वीकार करणारे द्रौपदि) भीम, अर्जुन, सहदेव आणि त्याचप्रमाणें तुझा (चवथा) पति नकुल ह्यांच्यावर हा प्रश्न (अवलंबून)

हेतोः । कुर्वन्तु सर्वे चानृतं धर्मराजं पाञ्चालि त्वं मोक्ष्यसे दासभावात् ४ धर्मे स्थितो धर्मसुतो महात्मा स्वयं चेदं कथयत्विन्द्रकल्पः । ईशो वा ते ह्यनीशोथवैष वाक्यादस्य क्षिप्रमेकं भजस्व ५ सर्वे हीमे कौरवेयाः सभायां दुःखान्तरे वर्तमानास्तवैव । न विब्रुवन्त्यार्यसत्त्वा यथावत्पतींश्च ते समवेक्ष्याल्पभाग्यान् ६ वैशम्पायन उवाच ॥ ततः सभ्याः कुरुराजस्य तस्य वाक्यं सर्वे प्रशशंसुस्तथोच्चैः । चेलावेधांश्चापि चक्रुर्नदन्तो हाहेत्यासीदपि चैवार्तनादः ७ श्रुत्वा तु तद्वाक्यमनोहरं तद्धर्षश्चासीत्कौरवाणां सभायाम् । सर्वे चासन्पार्थिवाः प्रीतिमन्तः कुरुश्रेष्ठं धार्मिकं पूजयन्तः ८ युधिष्ठिरं च ते सर्वे समुदैक्षन्त पार्थिवाः । किं नु वक्ष्यति धर्मज्ञ इति साचीकृताननाः ९ किं नु वक्ष्यति बीभत्सुरजितो युधि पाण्डवः । भीमसेनो यमौ चोभौ भृशं कौतूहलान्विताः १० तस्मिन्नुपरते शब्दे भीमसेनो-

---

राहूं दे आणि हे, द्रौपदि, तुझ्या मुखांतून निघालेल्या प्रश्नाचें उत्तर काय तें ह्यांनाच देऊं दे ३. हे पांचालि, पराधीन असलेल्या युधिष्ठिराला ह्या आर्यसमुदायामध्यें तुझ्याकरितां तुझे हे चौघे पति मोडून काढूं देत. सारांश, हे पांचालि, ह्या सर्वांनीं धर्मराजाला असत्य ठरवूं दे; ह्मणजे तूं (आमच्या) दास्यापासून मुक्त होशील ४. त्याचप्रमाणें "मी तुझा स्वामी आहें किंवा नाहीं" हें ह्या महात्म्या इंद्रसमान असलेल्या धर्मनिष्ठ व धर्मपुत्र युधिष्ठिरालाच सांगूं दे; ह्मणजे ह्याच्या ह्मणण्याप्रमाणें तूं कोणत्या त्या एका निश्चयाचें सत्वर अवलंबन कर ५. हे सर्व कुरुवंशज सभेमध्यें तुझ्याच दुःखाचा विचार करीत आहेत. परंतु, तुझ्या मंदभाग्य पतींकडे पाहून ह्या सत्त्वशील कुरुवंशजांना (तूं जिंकिली गेलीस असें) खरेंखरें सांगवत नाहीं ६. वैशंपायन सांगतातः—तदनंतर त्या कुरुराज दुर्योधनाच्या भाषणाची सर्व सभासदांनीं उच्च स्वरानें प्रशंसा केली आणि गर्जना करीत करीत त्यांनीं आपआपलीं वस्त्रेंही फिरविली. परंतु, (यथान्याय असेल तेंच भाषण करणाऱ्या पांडवांनीं न्यायाला अनुसरून द्रौपदी जिंकिली नाहीं असें सांगितलें असतां ती दास्यांतून मुक्त होईल व त्याच्या योगानें आह्मांला दुःख होईल अशी कल्पना मनांत आल्यामुळें) कांहीं लोक हाय हाय ह्मणून आर्तस्वरही करूं लागले ७. सारांश, दुर्योधनाचें तें मनोहर भाषण श्रवण करून सभेंतील (भीष्मप्रभृति) कौरवांना आनंद झाला आणि कुरुश्रेष्ठ व धर्मनिष्ठ अशा युधिष्ठिराची सर्व भूपाल आनंदपूर्वक प्रशंसा करूं लागले ८. ते सर्व भूपाल "आतां हा धर्मवेत्ता काय उत्तर देतो" ह्मणून तोंडें फिरवून युधिष्ठिराच्या मुखाकडे पाहूं लागले ९ आणि त्याचप्रमाणें समरांगणामध्यें अजिंक्य असलेला पांडुपुत्र अर्जुन, भीमसेन आणि उभयतां नकुल सहदेव हेही आतां

अब्रवीदिदम् । प्रगृह्य रुचिरं दिव्यं भुजं चन्दनचर्चितम् ११ भीमसेन उवाच॥ यद्येष गुरुरस्माकं धर्मराजो महामनाः । न प्रभुः स्यात्कुलस्यास्य न वयं मर्षयेमहि १२ ईशो नः पुण्यतपसां प्राणानामपि चेश्वरः । मन्यते जितमात्मानं यद्येष विजिता वयम् १३ न हि मुच्येत मे जीवन्पदा भूमिमुपस्पृशन् । मर्त्यधर्मा परामृश्य पाञ्चाल्या मूर्धजानिमान् १४ पश्यध्वं ह्यायतौ वृत्तौ भुजौ मे परिघाविव । नैतयोरन्तरं प्राप्य मुच्येतापि शतक्रतुः १५ धर्मपाशसितस्त्वेवं नाधिगच्छामि सङ्कटम् । गौरवेण निरुद्धश्च निग्रहादर्जुनस्य च १६ धर्मराजनिसृष्टस्तु सिंहः क्षुद्रमृगानिव । धार्तराष्ट्रानिमान्पापान्निष्पिषेयं तलासिभिः १७ वैशम्पायन उवाच ॥ तमुवाच तदा भीष्मो द्रोणो विदुर एव च । क्षम्यतामिदमित्येवं सर्वं संभाव्यते त्वयि १८[२३५६] इति०

काय ह्मणतील ह्मणूनहीं त्या भूपालांना अत्यंत उत्कंठा उत्पन्न झाली १०. तदनंतर ती गडबड थांबल्यावर चंदनाची उटी लाविलेला आपला मनोहर हात पुढें करून भीमसेन ह्मणला ११ " आह्मांला गुरुस्थानीं असलेला हा धर्मराज जर ह्या कुळाचा अधिपति नसता तर आह्मीं हें सहन केलें नसतें (परंतु, हा ह्या कुळाचा स्वामी असल्यामुळें आह्मांला सहन करणें भाग आहे) १२. हा धर्मराज आमचें उत्कृष्ट तप व प्राण ह्यांचाही अधिपति आहे. तेव्हां हा जर (द्रौपदीला पणाला लावण्यापूर्वी) स्वतः जिंकिला गेला होता असें समजत असेल तर (द्रौपदीला पणाला लावितेवेळीं तो तिचा स्वामी नसल्यामुळें ती जिंकिली गेली नाहीं हें उघड होणार असून ह्या द्रौपदीसंबंधाच्या वादामध्यें) आमचाही जय झाल्याचें सिद्ध होणार आहे १३. अरे, (द्रौपदी जर जिंकिली नसेल तर) पायानें भूमीवर संचार करणारा कोणीही (भूचर) मर्त्य प्राणी पांचालीच्या ह्या केंसांना स्पर्श केल्यावर माझ्या हातून जिवंत सुटणार नाहीं १४. अहो परिघसंज्ञक आयुधाप्रमाणें (बळकट) असलेले माझे हे लांब व गरगरीत बाहु तुह्मीं पाहून तर ठेवा. इंद्रही ह्यांच्या मिठींत सांपडला असतां सुटणार नाहीं १५. (परंतु, करूं काय ?) धर्मपाशानें बद्ध झाल्यामुळें, (धर्म न सोडण्याविषयीं) अर्जुनाचा आग्रह असल्यामुळें आणि धर्माविषयीं श्रेष्ठ बुद्धि स्वतःच्याही मनामध्यें वास करीत असल्यामुळें मला ह्या संकटांतून पार पडतां येत नाहीं १६. धर्मराजा जर अनुज्ञा देईल तर क्षुद्र मृगांचा वध करणाऱ्या सिंहाप्रमाणें ह्या पापी धृतराष्ट्रपुत्रांचा तलहस्तरूप खड्गांनींच चुराडा करून टाकीन १७. वैशंपायन सांगतात:—(ह्याप्रमाणें भीमसेन बोलूं लागला असतां). भीष्म, द्रोण व विदुर हें त्याला ह्मणाले ? " तूं ह्याची क्षमा कर. हें सर्व कांहीं तुझ्या हातून होणारें आहे " १८. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील

श्रीमहाभारते सभापर्वणि द्यूतपर्वणि भीमवाक्ये सप्ततितमोऽध्यायः ॥ ७० ॥

कर्ण उवाच ॥ त्रयः किलेमे सधनाः सभायां भीष्मः क्षत्ता कौरवाणां गुरुश्च । ये स्वामिनं दुष्टतमं वदन्ति वाञ्छन्ति वृद्धिं न च विक्षिपन्ति १ त्रयः किलेमे ह्यधना भवन्ति दासः पुत्रश्चास्वतन्त्रा च नारी । दासस्य पत्नी त्वधनस्य भद्रे हीनेश्वरे दासधनं च सर्वम् २ प्रविश्य राज्ञः परिवारं भजस्व तत्ते कार्यं शिष्टमादिश्यतेत्र । ईशास्तु सर्वे तव राजपुत्रि भवन्ति वै धार्तराष्ट्रा न पार्थाः ३ अन्यं वृणीष्व पतिमाशु भाविनि यस्माद्दास्यं न लभसि देवनेन । अवाच्या वै पतिषु कामवृत्तिर्नित्यं दास्ये विदितं तत्तवास्तु ४ पराजितो नकुलो भीमसेनो युधिष्ठिरः सहदेवार्जुनौ च । दासीभूता त्वं हि वै याज्ञसेनि पराजितास्ते पतयो नैव

द्यूतपर्वापैकीं भीमसेनाच्या वाक्याविषयीं सत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७० ॥

कर्ण ह्मणतोः—ह्या सभेमध्यें भीष्म, दासीपुत्र विदुर आणि कौरवगुरु द्रोणाचार्य हे धर्माचें उल्लंघन करण्यास समर्थ आहेत. हे त्रिवर्ग आपल्या स्वामीलाच अत्यंत दुष्ट ह्मणून ह्मणत असतात; इतकेच नव्हे परंतु त्याचा समूल उच्छेद होण्याची इच्छा धरीत असून स्वामिद्रोहासारिखें महापातक करण्यास त्यांच्या मनांत शंकाही येत नाहीं १. (हे द्रौपदि) दास, स्त्री आणि पुत्र हे तीन (अनुक्रमें धनी पति व पिता असतांना) निर्धन व अस्वतंत्र होत. तेव्हां, दास झाल्यामुळें जो निर्धन बनला ह्मणजे ज्याचें स्वामित्व कशावरच राहिलें नाहीं त्याची (दासभाव प्राप्त होण्यापूर्वी स्वातंत्र्यावस्थेंतील) पत्नी व इतरही सर्वप्रकारचें धन हीं उभयतां स्वामिरहित होऊन दासाच्या पालकाकडे जावयाचीं असतात २. करितां, तूं आतां राजवाड्यांत जाऊन धृतराष्ट्रराजाच्या परिवाराला धरून रहा. हें आतां तुझें कर्तव्य उरलें आहे. कारण, हे राजकन्ये, आतां कुंतीपुत्र तुझे स्वामी नसून सर्व धृतराष्ट्रपुत्र तुझे प्रभु आहेत ३. हे स्वेच्छाचारिणि द्रौपदि, ज्याच्यापासून तुला द्यूताच्या योगानें पुनरपि दास्य प्राप्त होणार नाहीं असा दुसरा एकादा पति (रतिक्रीडेचा उपभोग घेण्याकरितां) तूं सत्वर वर. कारण, पति असल्यास स्त्रियांना स्वैर वर्तन अयोग्य असून दासत्व असल्यास त्यांना नित्य यथेष्ट वर्तन करण्यास प्रतिबंध नसतो हें तुला विदित असूं दे (सारांश, पत्नीत्व स्वीकारिल्यामुळें तुला परिमित पुरुषांचाच समागम होत होता. परंतु, आतां पूर्वीचे पति जिंकिले गेल्याकारणानें तुझ्या वरील त्यांचें स्वाम्य नष्ट झाल्यामुळें सुदैवानें तुला दासीपणा अर्थात् वेश्यात्व प्राप्त झालें आहे. करितां, अपरिमित पतींचा उपभोग प्राप्त करून देणारें दास्यच तुला बरें आहे असें तूं समज) ४. हे द्रौपदि, नकुल, भीमसेन, युधिष्ठिर, सहदेव आणि अर्जुन

सन्ति ५ प्रयोजनं जन्मनि किं न मन्यते पराक्रमं पौरुषं चैव पार्थः । पाञ्चालस्य द्रुपदस्यात्मजामिमां सभामध्ये यो व्यदेवीद्ग्लहेषु ६ वैशम्पायन उवाच ॥ तद्वै श्रुत्वा भीमसेनोत्यमर्षी भृशं निशश्वास तदार्तरूपः । राजानुगो धर्मपाशानुबद्धो दहन्निवैनं क्रोधसंरक्तदृष्टिः ७ भीमसेन उवाच ॥ नाहं कुप्ये सूतपुत्रस्य राजन्नेष सत्यं दासधर्मः प्रदिष्टः । किं विद्विषो वै मामेवं व्याहरेयुर्नादेवीस्त्वं यद्यनया नरेन्द्र ८ वैशम्पायन उवाच ॥ भीमसेनवचः श्रुत्वा राजा दुर्योधनस्तदा । युधिष्ठिरमुवाचेदं तूष्णींभूतमचेतनम् ९ भीमार्जुनौ यमौ चैव स्थितौ ते नृप शासने । प्रश्नं ब्रूहि च कृष्णां त्वमजितां यदि मन्यसे १० एवमुक्त्वा तु कौन्तेयमपोह्य वसनं स्वकम् । स्मयन्निवैक्ष्य पाञ्चालीमैश्वर्यमदमोहितः ११ कदलीदण्डसदृशं

ह्यांचा पराभव झाला असून (पांडवांचें स्वाम्य तुझ्यावर राहिलें नसल्यामुळें) तूं आतां दासी झाली आहेस. सारांश, ते नकुलप्रभृति पराजित झाल्यामुळें त्यांचें तुझ्याशीं पतीचें नातें आतां राहिलेलें नाहीं (कारण, ते आमचे दास असल्यामुळें आह्मीं "नाहीं" ह्मटलें तर त्यांना तुझा उपभोग घेतां येणार नाहीं ५. खरोखर पांचालदेशाधिपति द्रुपदराजाची ही कन्या सभेमध्यें ज्यानें द्यूतांत पणाला लाविली त्या कुंतीपुत्र युधिष्ठिराला जन्मास आल्याचें साफल्य होऊन आपल्या पराक्रमाचें व पुरुषत्वाचेंही सार्थक्य झालें असें वाटत नसेल काय ! ६. वैशंपायन सांगतातः—हें कर्णाचें(कर्णकटु) भाषण श्रवण केल्याबरोबर अत्यंत दुःखित झालेल्या भीमसेनाला अतिशयच क्रोध येऊन त्याचे नेत्रही तो कर्णाला जाळून टाकीत आहे कीं काय अशाप्रकारें अगदीं आरक्तवर्ण झाले आणि धर्मपाशांनीं बद्ध झाल्यामुळें धर्मराजा युधिष्ठिर सांगेल त्याप्रमाणें वागत असलेला तो भीमसेन (असहिष्णुतादर्शक) एकसारखे लांबलांब सुस्कारे टाकूं लागला ७. भीमसेन ह्मणतोः—हे धर्मराजा, सूतपुत्र कर्णाचा मला राग येत नाहीं. कारण, (अन्नदात्याची स्तुति करणें) हा खरोखर दासधर्म ह्मणून (शास्त्रांत) सांगितलें आहे (व त्याचप्रमाणें हा दुर्योधनादिकांना चांगलें वाटेल तें बोलत आहे). परंतु, धर्मराजा, तूं जर ह्या द्रौपदीला पणाला लाविली नसतीस तर मला उद्देशून शत्रूंनीं ह्याप्रमाणें भाषण केलें असतें काय ? ८. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें भीमसेनाचें भाषण श्रवण करून दुर्योधन राजा स्वस्थ निश्चेष्ट बसलेल्या युधिष्ठिराला ह्मणाला ९ "हे राजा, भीमार्जुन आणि उभयतां नकुलसहदेव हे तुझ्या आज्ञेंत आहेत. करितां, तुला द्रौपदी जिंकिली नाहीं असें वाटत असेल तर (त्याप्रमाणें) तूं प्रश्नाचें उत्तर ("नाहीं"ह्मणून) दे" १०. असें कुंतीपुत्र युधिष्ठिराला सांगून दुर्योधनानें आपल्या मांडीवरील वस्त्र वर केलें आणि

सर्वलक्षणसंयुतम् । राजहस्तप्रतीकाशं वज्रप्रतिमगौरवम् १२ अभ्युत्स्मयित्वा राधेयं भीममाधर्षयन्निव । द्रौपद्याः प्रेक्षमाणायाः सव्यमूरुमदर्शयत् १३ भीमसेनस्तमालोक्य नेत्रे उत्फाल्य लोहिते । प्रोवाच राजमध्ये तं सभां विश्रावयन्निव १४ पितृभिः सह सालोक्यं मा स्म गच्छेद्वृकोदरः । यद्येतमूरुं गदया न भिन्द्यां ते महाहवे १५ क्रुद्धस्य तस्य सर्वेभ्यः स्रोतोभ्यः पावकार्चिषः । वृक्षस्येव विनिश्चेरुः कोटरेभ्यः प्रदह्यतः १६ विदुर उवाच ॥ परं भयं पश्यत भीमसेनात्तद्बुध्यध्वं पार्थिवाः प्रातिपेयाः। दैवेरितो नूनमयं पुरस्तात्परोनयो भरतेषूदपादि १७ अतिद्यूतं कृतमिदं धार्तराष्ट्रा यस्मात्स्त्रियं विवदध्वं सभायाम् । योगक्षेमौ नश्यतो वः समग्रौ पापान्मन्त्रान्कुरवो मन्त्रयन्ति १८ इमं धर्मं कुरवो जानताशु ध्वस्ते धर्मे परिषत्संप्रदुष्येत्।इमां चेत्पूर्वं कितवोग्लहीष्यदीशोभविष्यदपराजितात्मा१९

ऐश्वर्यमदानें बेफाम झाल्यामुळें हंसत हंसत द्रौपदीकडे पाहून ११ व राधापुत्र कर्णाला प्रोत्साहन देऊन भीमसेनाला दुःख देण्याकरितांच कीं काय द्रौपदी पहात असतांना केळीच्या खुंटासारखी आणि गजशुंडेसारखी असलेली आपली सर्वलक्षणसंपन्न व वज्राप्रमाणें कठीण असलेली डावी मांडी तिला दाखविली १२,१३. तेव्हां (तसें करीत असलेल्या) दुर्योधनाला भीमसेनानें अवलोकन केलें आणि आपले लाल डोळे वटारून सभेला आनंदवीतच कीं काय राजांमध्यें त्या दुर्योधनाला तो ह्मणाला १४ " हे दुर्योधना, घनघोर युद्धामध्यें गदेनें जर तुझी मांडी मी न फोडीन तर ह्या वृकोदराला पूर्वजांना प्राप्त झालेला (उत्तम) लोक प्राप्त होणार नाहीं (हें तूं लक्ष्यांत ठेव) "१५. हे जनमेजय राजा) ह्याप्रमाणें क्रुद्ध होऊन भीमसेन भाषण करीत असतांना दग्ध होत असलेल्या वृक्षाच्या ढोल्यांतून जशा ज्वाला निघतात तशा त्याच्या सर्व इंद्रियांतून अग्नीच्या ज्वाला निघूं लागल्या१६. विदुर ह्मणतोः—हे प्रतीपकुलोत्पन्न भूपालहो, भीमसेनापासून उत्पन्न होत असलेला हा पराकाष्ठेचा भयंकर प्रकार अवलोकन करून अजून तरी शुद्धीवर या. खरोखर भरतवंशजांवर दुर्दैवानें हें लवकरच पराकाष्ठेचें संकट ओढवणार (असल्याचें दिसतें) १७. हे धृतराष्ट्रपुत्रा दुर्योधना, ज्याअर्थीं सभेमध्यें स्त्रीशीं तुह्मी विवाद करीत आहां त्याअर्थीं तुमचें हें द्यूत मर्यादा सोडून झालें आहे. अरे, हे कुरुवंशज दुष्ट मसलती करीत आहेत. तस्मात्, तुह्मांला आतां वैभव वगैरे मुळींच प्राप्त होणार नसून प्राप्त झालेलेंही तुमच्यानें यत्किंचित्‌ही रक्षण करवणार नाहीं १८.हे कौरवहो, तुह्मी सत्वर हा धर्म समजून घ्या. कारण, धर्मध्वंस झाला असतां ह्या सर्व परिषदेला मोठा दोष लागेल. अरे, द्यूत खेळण्याम[illegible]त्त झालेल्या युधिष्ठिरानें

स्वप्ने यथैतद्विजितं धनं स्यादेवं मन्ये यस्य दीव्यत्यनीशः । गान्धारराजस्य वचो निशम्य धर्मादस्मात्कुरवो मापयात २० दुर्योधन उवाच ॥ भीमस्य वाक्ये तद्वदेवार्जुनस्य स्थितोहं वै यमयोश्चैवमेव । युधिष्ठिरं ते प्रवदन्त्वनीशमतो दास्यान्मोक्ष्यसे याज्ञसेनि २१ अर्जुन उवाच ॥ ईशो राजा पूर्वमासीद्ग्लहे नः कुन्तीसुतो धर्मराजो महात्मा । ईशस्त्वयं कस्य पराजितात्मा तज्जानीध्वं कुरवः सर्व एव २२ वैशम्पायन उवाच ॥ ततो राज्ञो धृतराष्ट्रस्य गेहे गोमायुरुच्चैर्व्याहरदग्निहोत्रे । तं रासभाः प्रत्यभाषन्त राजन्समन्ततः पक्षिणश्चैव रौद्राः २३ तं वै शब्दं विदुरस्तत्त्ववेदी शुश्राव घोरं सुबलात्मजा च । भीष्मो द्रोणो गौतमश्चापि विद्वान्स्वस्ति स्वस्तीत्यपि चैवाहुरुच्चैः २४ ततो गान्धारी विदुरश्चापि विद्वांस्तमुत्पातं घोरमालक्ष्य राज्ञे । निवेदयामासतुरार्तवत्तदा ततो राजा वाक्यमिदं

हिला जर आपल्या पूर्वी पणाला लाविली असती तर तेव्हां हा स्वतः पराजित झालेला नसल्यामुळें तिला पणाला लावण्यास समर्थ होता १९. परंतु, ज्या धनावर स्वाम्य नाहीं तें धन द्यूतामध्यें एकाद्यानें पणाला लावून जर दुसऱ्यानें जिंकिलें तर हें स्वप्नांत जिंकिल्याप्रमाणेंच (व्यर्थ) आहे असें मी समजतों. करितां, गांधारराज शकुनीचें ह्मणणें ऐकून घेऊन, हे कौरवहो, तुह्मी ह्या धर्माचें अतिक्रमण करूं नका २०. दुर्योधन ह्मणतोः— हे द्रौपदि, भीम आणि त्याचप्रमाणें अर्जुन व नकुलसहदेव ह्यांच्या सांगण्यावर मी अवलंबून राहिलों आहें. करितां, तुला पणाला लावितेवेळीं युधिष्ठिर तुझा स्वामी नव्हता असें ह्यांना ह्मणूं दे ह्मणजे तूं दास्यापासून मुक्त होशील २१. अर्जुन ह्मणतोः—हा नृप कुंतीपुत्र महात्मा धर्मराज पूर्वी आह्मांला पणाला लावण्यास समर्थ होता. परंतु, स्वतःचा देहही हरून बसल्यावर मग हा कोणाचा प्रभु असणार? तर, हे कौरवहो, (द्रौपदीला पणाला लावण्यास ह्याला अधिकार नव्हता) हें तुह्मी जाणीतच आहां २२. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें अर्जुनानें भाषण केल्यानंतर धृतराष्ट्रराजाच्या गृहामध्यें गृह्याग्निसमीप उच्च स्वरानें कोल्हें ओरडलें व त्याबरोबर, हे जनमेजयराजा, गर्दभ व भयसूचक पक्षी ह्यांनींही प्रतिध्वनि केला २३. तेव्हां तत्त्वज्ञानी विदुर, सुबलकन्या गांधारी, भीष्म व द्रोणाचार्य ह्यांना तो घोर शब्द ऐकूं येऊन गौतमकुलोत्पन्न ज्ञानी कृपाचार्यांच्याही तो कानीं पडला आणि त्या सर्वांनीं "स्वस्ति", "स्वस्ति" असें उच्च स्वरानें ह्मटलें २४. तदनंतर तो कांहीं तरी घोर उत्पात आहे असें जाणून बिचारी विदुर व गांधारी ह्यांनीं गर्भगळित होऊन धृतराष्ट्रराजाला ती गोष्ट [illegible] केली असतां राजानें असें भाषण केलें २५. धृतराष्ट्र

बभाषे २५ धृतराष्ट्र उवाच ॥ हतोसि दुर्योधन मन्दबुद्धे यस्त्वं सभायां कुरुपुङ्गवानाम् । स्त्रियं समाभाषसि दुर्विनीत विशेषतो द्रौपदीं धर्मपत्नीम् २६ एवमुक्त्वा धृतराष्ट्रो मनीषी हितान्वेषी बान्धवानामपायात् । कृष्णां पाञ्चालीमब्रवीत्सान्त्वपूर्वं विमृश्यैतत्प्रज्ञया तत्त्वबुद्धिः २७ धृतराष्ट्र उवाच ॥ वरं वृणीष्व पाञ्चालि मत्तो यदभिवाञ्छसि । वधूनां हि विशिष्टा मे त्वं धर्मपरमा सती २८ द्रौपद्युवाच ॥ ददासि चेद्वरं मह्यं वृणोमि भरतर्षभ । सर्वधर्मानुगः श्रीमानदासोस्तु युधिष्ठिरः २९ मनस्विनमजानन्तो मैवं ब्रूयुः कुमारकाः । एष वै दासपुत्रो हि प्रतिविन्ध्यं ममात्मजम् ३० राजपुत्रः पुरा भूत्वा यथा नान्यः पुमान्क्वचित् । राजभिर्लालितस्यास्य न युक्ता दासपुत्रता ३१ धृतराष्ट्र उवाच ॥ एवं भवतु कल्याणि यथा त्वमभिभाषसे । द्वितीयं ते वरं भद्रे ददानि वरयस्व ह ॥ मनो हि मे वितरति नैकं त्वं वरमर्हसि ३२ द्रौपद्युवाच ॥ सरथौ सधनुष्कौ च भीमसेनधनञ्जयौ । यमौ च वरये राजन्नदासान्स्ववशानहम् ३३ धृतराष्ट्र उवाच ॥ तथास्तु ते महाभागे यथा त्वं नन्दिनीच्छसि । तृतीयं

भाषण करितोः—हे मूढा दुर्योधना, झाला तुझा सर्वस्वीं घात. मूर्खा उद्धटा, भर सभेमध्यें कुरुवंशजश्रेष्ठ पांडवांच्या स्त्रीशीं आणि त्यांतूनही धर्मपत्नी द्रौपदीशीं बाचाबाची करीत बसला आहेस काय "? २६. ह्याप्रमाणें दुर्योधनाला सांगून तत्त्वाकडे दृष्टि देणारा बुद्धिमान् धृतराष्ट्र पुत्रांच्या हिताकरितां तेथून पांचालराजकन्या जी द्रौपदी तिच्या समीप गेला आणि बुद्धिपूर्वक विचार करून सांत्वनपूर्वक तिला ह्मणाला २७. " हे पांचालि, इच्छेस येईल तो वर माझ्यापासून माग. कारण, धर्माविषयींच तत्पर व साध्वी अशी तूं मला सर्व स्नुषांमध्यें अधिक आहेस २८. द्रौपदी ह्मणतेः—हे भरतवंशजश्रेष्ठ, आपण मला वर देतच असाल तर " सर्व प्रकारें धर्मानें वागणारा वैभवशाली युधिष्ठिर दास नसो" हा वर मी मागतें २९. कारण, " हा दासपुत्र आहे " असें ह्या माझ्या विचारी (युधिष्ठिरनंदन) प्रतिविंध्यनामक पुत्राला अज्ञानी मुलांनीं ह्मणूं नये ३०. प्रथम अद्वितीय राजपुत्र असून राजांनीं लालन केलेल्या ह्या प्रतिविंध्याला दासपुत्रत्व येणें योग्य नाहीं ३१. धृतराष्ट्र ह्मणतोः—हे कल्याणि, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें असें होईल. हे भद्रे, मी तुला दुसरा वर देतों; मागून घे. कारण, तुला आणखी वर देण्यास माझें मन उत्कंठित झालें आहे. करितां, तुला एकच वर देणें योग्य नाहीं ३२. द्रौपदी ह्मणतेः—हे राजा, रथ व धनुष्य ह्यांसहवर्तमान भीमसेन व अर्जुन आणि नकुल सहदेव हे सर्व दास्यांतून मुक्त होऊन स्वतंत्र असावे हा मी वर मागतें ३३. धृतराष्ट्र ह्मणतोः—हे महा-

वरयास्मत्तो नासि द्वाभ्यां सुसत्कृता ३४ त्वं हि सर्वस्नुषाणां मे श्रेयसी धर्मचारिणी ३५ द्रौपद्युवाच ॥ लोभो धर्मस्य नाशाय भगवन्नाहमुत्सहे। अनर्हा वरमादातुं तृतीयं राजसत्तम ३६ एकमाहुर्वैश्यवरं द्वौ तु क्षत्रस्त्रियो वरौ। त्रयस्तु राज्ञो राजेन्द्र ब्राह्मणस्य शतं वराः ३७ पापीयांस इमे भूत्वा संतीर्णाः पतयो मम। वेत्स्यन्ति चैव भद्राणि राजन्पुण्येन कर्मणा ३८ [२३१४] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां सभापर्वणि द्यूतपर्वणि द्रौपदीवरलाभ एकसप्ततितमोऽध्यायः॥७१॥

कर्ण उवाच ॥ या नः श्रुता मनुष्येषु स्त्रियो रूपेण संमताः। तासामेतादृशं कर्म न कस्याश्चन शुश्रुम १ क्रोधाविष्टेषु पार्थेषु धार्तराष्ट्रेषु चाप्यति। द्रौपदी पाण्डुपुत्राणां कृष्णा शान्तिरिहाभवत् २ अप्लवेऽम्भसि मग्नानामप्रतिष्ठे निमज्जताम्। पाञ्चाली पाण्डुपुत्राणां नौरेषा पारगाभवत् ३ वैशम्पायन उवाच ॥ तद्वै श्रुत्वा भीमसेनः कुरुमध्येऽत्यमर्षणः। स्त्री गतिः पाण्डुपुत्राणामित्युवाच सुदुर्मनाः ४ भीम उवाच ॥ त्रीणि ज्योतींषि

भाग्यवति द्रौपदि, तुझ्या इच्छेप्रमाणें तसें असो. हे आनंददायक द्रौपदि, तुझा दोन वरांनीं चांगला सत्कार झाला नाहीं. करितां, तूं आह्मांपासून तिसरा वर मागून घे ३४. कारण, धर्मानें वागणारी तूं माझ्या सर्व स्नुषांमध्यें श्रेष्ठ आहेस ३५. द्रौपदी ह्मणतेः— हे भगवन्, लोभ धर्माच्या नाशाला कारणीभूत होतो. करितां, हे नृपश्रेष्ठ मी अपात्र असतांना तिसरा वर स्वीकारण्यास माझें मन घेत नाहीं ३६. कारण, हे श्रेष्ठ राजा, वैश्याला एक, क्षत्रियस्त्रीला दोन, राजाला तीन आणि ब्राह्मणाला शंभर वर सांगितले आहेत ३७. (तस्मात्, दासभावासारखी) निकृष्टावस्था प्राप्त झालेले हे माझे पति संकटांतून मुक्त झाले (येवढें पुरें). आतां, हे राजा, आपल्या पुण्य कर्मानें ते दैव काढितील ३८. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वांपैकीं द्रौपदीला वर प्राप्त झाल्याविषयीं एकाहत्तरावा अध्याय समाप्त झाला॥७१॥

कर्ण ह्मणतोः—रूपामुळें मानमान्यतेस पात्र झालेल्या ज्या स्त्रिया मनुष्यांमध्यें आमच्या ऐकण्यांत आहेत त्यांपैकीं एकीचेंही अशाप्रकारचें कर्म आह्मीं कधीं ऐकिलेलें नाहीं १. धृतराष्ट्रपुत्र आणि कुंतीपुत्र पांडव अत्यंत क्रोधाविष्ट झाले असतां द्रौपदी पांडवांची ह्या प्रसंगीं क्रोधशांति होण्यास कारणीभूत झाली २. अहो! नौकाहीन जलामध्यें मग्न झालेल्या अथवा विपत्तिरूप अगाध समुद्रामध्यें बुडालेल्या पांडुपुत्रांना तीराला तारून नेणारी ही पांचाली नौका झाली ३. वैशंपायन सांगतातः—तें कर्णाचें भाषण श्रवण करून भीमसेनाला यत्किंचितूही सहन झालें नाहीं तेव्हां मनांत अत्यंत

पुरुष इति वै देवलोऽब्रवीत् । अपत्यं कर्म विद्या च यतः सृष्टाः प्रजास्ततः ५ अमेध्ये वै गतप्राणे शून्ये ज्ञातिभिरुज्झिते । देहे त्रितयमेवैतत्पुरुषस्योपयुज्यते ६ तन्नो ज्योतिरभिहतं दाराणामभिमर्शनात् । धनंजय कथं स्वित्स्यादपत्यमभिमृष्टजम् ७ अर्जुन उवाच ॥ न चैवोक्ता न चानुक्ता हीनतः परुषा गिरः । भारत प्रतिजल्पन्ति सदा तूत्तमपूरुषाः ८ स्मरन्ति सुकृतान्येव न वैराणि कृतान्यपि । सन्तः प्रतिविजानन्तो लब्धसंभावनाः स्वयम् ९ भीम उवाच ॥ इहैवैतांस्तुरा सर्वान्हन्मि शत्रून्समागतान् । अथ निष्क्रम्य राजेन्द्र समूलान्हन्मि भारत १० किं नो विवदितेनेह किमुक्तेन च भारत । अद्यैवैतान्निहन्मीह प्रशाधि पृथिवीमिमाम् ११ इत्युक्त्वा भीमसेनस्तु कनिष्ठैर्भ्रातृभिः सह । मृगमध्ये यथा सिंहो मुहु-

---

खिन्न होऊन " स्त्री पांडुपुत्रांना तारणारी काय ? " असें तो कौरवांमध्यें ह्मणाला ४. भीमसेन ह्मणतोः—अपत्य, कर्म व उपासना हीं पुरुषाला उत्तम लोक प्राप्त होण्याचीं साधनें आहेत असें देवल मुनींनीं सांगितलें आहे. कारण, ह्यांपासूनच स्थावरजंगमात्मक प्रजा उत्पन्न झालेल्या आहेत ५. अशुचि असा हा देह गतप्राण व शून्य होऊन ज्ञातींनीं टाकून दिला असतां ह्या त्रिवर्गाचाच पुरुषाला उपयोग होतो ६. परंतु, हे धनंजया, परलोकप्राप्तीला साधन जें शुद्ध अपत्य त्याला हा धृतराष्ट्र मुकला असल्याचें (ह्याच्या पुत्रांनीं आमच्या स्त्रीला भरसभेमध्यें स्पर्श केल्यावरून) उघडच होत आहे. सारांश, हे अर्जुना, परकीयांचा समागम झालेल्या स्त्रीपासून उत्पन्न झालेली संतति आणखी ती कशी असणार ? (तात्पर्य, ह्या दुःशासनादिकांनीं परदारस्पर्श हें जें नीच कर्म तें करण्यास भरसभेमध्यें सुद्धां जर मागें पुढें पाहिलें नाहीं तर तें शुद्ध बीजापासून उत्पन्न झाल्याचा संभवच दिसत नाहीं. तेव्हां अर्थात् , शुद्ध संततीमुळें प्राप्त होणाऱ्या उत्तम लोकाची धृतराष्ट्राला आशा नको) ७. अर्जुन ह्मणतोः— हे भरतकुलोत्पन्ना भीमसेना, दुसरे बोलोत अगर न बोलोत उत्तम पुरुष नीच लोकांना कठोर शब्दांनीं कधींही प्रत्युत्तर देत नसतात ८. त्याचप्रमाणें इतरांनीं वैर केलें असतां त्याचा प्रतीकार कसा करावा हें जाणीत असूनही सज्जन लोक तें मनांतही न आणितां दुसऱ्याचा उपकार मात्र स्मरत असतात आणि स्वतःच्याच योगानें ते लोकांत पूज्य होतात ९. भीमसेन ह्मणतोः—हे भरतकुलोत्पन्ना नृपश्रेष्ठा धर्मराजा, जुळलेल्या सर्व शत्रूंना मी येथेंच सत्वर मारून टाकितों अथवा येथून बाहेर पडल्यावर ह्यांचा समूळच उच्छेद करितों १०. हे भारता धर्मराजा, वादविवाद करून अथवा बोलून येथें आपणांला काय उपयोग होणार आहे ? आजच मी ह्यांचा वध करितों आणि तूं ह्या पृथ्वीचें राज्य कर ११.

मुहुरुदैक्षत १२ सान्त्वमानो वीक्षमाणः पार्थेनाक्लिष्टकर्मणा। स्विद्यत्येव महाबाहुरन्तर्दाहेन वीर्यवान् १३ क्रुद्धस्य तस्य स्रोतोभ्यः कर्णादिभ्यो नराधिप। सधूमः सस्फुलिङ्गार्चिः पावकः समजायत १४ भ्रुकुटीकृतदुष्प्रेक्ष्यमभवत्तस्य तन्मुखम्। युगान्तकाले संप्राप्ते कृतान्तस्येव रूपिणः १५ युधिष्ठिरस्तमावार्य बाहुना बाहुशालिनम्। मैवमित्यब्रवीच्चैनं जोषमास्स्वेति भारत १६ निवार्य च महाबाहुं कोपसंरक्तलोचनम्। पितरं समुपातिष्ठद्धृतराष्ट्रं कृताञ्जलिः १७ [२४११] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां० सभापर्वणि द्यूतपर्वणि भीमक्रोधे द्विसप्ततितमोऽध्यायः॥ ७२॥

युधिष्ठिर उवाच॥ राजन्किं करवामस्ते प्रशाध्यस्मांस्त्वमीश्वरः। नित्यं हि स्थातुमिच्छामस्तव भारत शासने १ धृतराष्ट्र उवाच॥ अजातशत्रो भद्रं ते अरिष्टं स्वस्ति गच्छत। अनुज्ञाताः सहधनाः स्वराज्यमनुशासत २ इदं चैवावबोद्धव्यं वृद्धस्य मम शासनम्। मया निगदितं

ह्याप्रमाणें भाषण केल्यानंतर मृगांमध्यें बसलेल्या सिंहाप्रमाणें भीमसेन आपल्या कनिष्ठ भ्रात्यांसहवर्तमान वारंवार वर पाहूं लागला १२. तेव्हां तशाप्रकारें अवलोकन करीत असलेल्या भीमसेनाचें सत्कर्माचरणी कुंतीपुत्र अर्जुन सांत्वन करूं लागला असतांही तो महापराक्रमी वीर्यवान् भीमसेन अंतस्थ दाहानें जळफळतच राहिला १३. हे नराधिपते जनमेजय राजा, तो भीमसेन क्रुद्ध झाला असतां त्याच्या श्रवणादि इंद्रियद्वारांपासून धूम, ज्वाला व ठिणग्या ह्यांसहवर्तमान अग्नि निघूं लागला १४ आणि भ्रुकुटी चढविल्यामुळें त्याचें मुख प्रलयसमय प्राप्त झाला असतां प्रकट होणाऱ्या मूर्तिमान् कालाच्या मुखाप्रमाणें पहाण्यासही दुर्घट झालें १५. तेव्हां, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, त्या पराक्रमशाली भीमसेनाचें हातानें निवारण करून " ह्याप्रमाणें करूं नको! स्वस्थ रहा " असें युधिष्ठिरानें त्याला सांगितलें १६ आणि कोपामुळें आरक्तनेत्र झालेल्या महापराक्रमी भीमसेनाचें निवारण केल्यावर युधिष्ठिर हात जोडून पितृव्य धृतराष्ट्रापुढें उभा राहिला १७. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं भीमसेनाच्या क्रोधाविषयीं बाहात्तरावा अध्याय समाप्त झाला॥ ७२॥

युधिष्ठिर ह्मणतो:—हे भरतकुलोत्पन्ना नृपा, आह्मीं काय करावें ह्याची आपण आज्ञा करा. आपण आमचे प्रभु असल्यामुळें आपल्या आज्ञेंत सदैव राहण्याची आमची इच्छा आहे १. धृतराष्ट्र ह्मणतो:—हे अजातशत्रो युधिष्ठिरा, तुमचें कल्याण असो. माझी तुह्मांला (परत जाण्यास) अनुज्ञा आहे. कारितां, तुह्मी आतां आपल्या धनासहवर्तमान निर्विघ्नपणें खुशाल परत जा आणि आपलें राज्य करा २. शिवाय, मज वृद्धाचें

सर्वं पथ्यं निःश्रेयसं परम् ३ वेत्थ त्वं तात धर्माणां गतिं सूक्ष्मां युधिष्ठिर। विनीतोसि महाप्राज्ञ वृद्धानां पर्युपासिता ४ यतो बुद्धिस्ततः क्षान्तिः प्रशमं गच्छ भारत । नादारुणि पतेच्छस्त्रं दारुण्येतन्निपात्यते ५ न वैराण्यभिजानन्ति गुणान्पश्यन्ति नागुणान्। विरोधं नाधिगच्छन्ति ये त उत्तमपूरुषाः ६ स्मरन्ति सुकृतान्येव न वैराणि कृतान्यपि । सन्तः परार्थं कुर्वाणा नावेक्षन्ते प्रतिक्रियाम् ७ संवादे परुषाण्याहुर्युधिष्ठिर नराधमाः । प्रत्याहुर्मध्यमास्त्वेतेनुक्ताः परुषमुत्तरम् ८ न चोक्ता नैव चानुक्तास्त्वहिताः परुषा गिरः । प्रतिजल्पन्ति वै धीराः सदा तूत्तमपूरुषाः ९ स्मरन्ति सुकृतान्येव न वैराणि कृतान्यपि। सन्तः प्रतिविजानन्तो लब्ध्वा प्रत्ययमात्मनः १० असंभिन्नार्यमर्यादाः

हेंही एक सांगणें तुम्हीं लक्ष्यांत ठेवा. कारण, मीं जें जें म्हणून कांहीं मांगितलेलें असतें तें पराकाष्ठेचें कल्याणकारक असून पथ्यकारक असतें ३. बा महाज्ञानवान् युधिष्ठिरा , तूं शास्त्र पढलेला असून वृद्धांचाही समागम करणारा असल्यामुळें धर्माची गति सूक्ष्म असल्याचें तूं जाणीतच आहेस ४. हे भरतकुलोत्पन्ना, जेथें ज्ञान तेथें शांति ही आहेच आहे. कारितां, तूं शांत हो. अरे, काष्ठाचा जेथें अभाव आहे त्या (पाषाणादिकांचे) ठिकाणीं शस्त्राचा घाव बसत नाहीं. काष्ठा (सारख्या मृदु पदार्थां) वरच शस्त्राचा प्रहार होत असतो. (सारांश, दुर्योधनादिकांच्या दुर्भाषणानें तुझ्यासारख्या धैर्यवान् पुरुषाच्या मनांत कांहींच राहण्याचा संभव नाहीं) ५. दोषांकडे लक्ष्य न देतां गुणांकडेच दृष्टि देऊन वैरही जे मनामध्यें आणीत नाहींत आणि द्वेषभाव धरीत नाहींत तेच उत्तम पुरुष होत ६. दुसऱ्यांनीं जरी वैराच्या गोष्टी केलेल्या असल्या तरी त्यांचें कधींहीं स्मरण न होतां चांगल्या कृत्यांचेंच सज्जनांना स्मरण होत असतें आणि प्रत्युपकाराची अपेक्षा न धरितां ते परोपकारच करीत असतात ७. हे युधिष्ठिरा, वाद्विवादामध्यें अधम पुरुष विनाकारण कठोर शब्द उच्चारीत असतात; मध्यम पुरुष (दुसऱ्यानें लागून भाषण केलें तरच) उत्तर देत असतात; परंतु, हे उत्तम पुरुष तर त्यांना लागून कोणी भाषण करो अथवा न करो कठोर उत्तर देत नाहींत ८. सारांश, दुसऱ्यांनीं मर्मच्छेदक भाषणें केलेलीं असोत अथवा नसोत ज्ञानी असे जे उत्तम पुरुष आहेत ते कधींही अहितकारक आणि मर्मभेदक शब्दांनीं प्रत्युत्तर देत नाहींत ९. दुसऱ्यांनीं कठोर भाषण वगैरे केलें असतां कसें काय दुःख होतें ह्याचा स्वतःला अनुभव आलेला असल्यामुळें सज्जन दुसऱ्यानें केलेल्या अपकाराचा प्रतीकार कसा करावा हें (चांगल्याप्रकारें) जाणीत असूनही दुसऱ्यांच्या चांगल्या गोष्टींचेंच स्मरण करीत असतात. (जाणून बुजून) दुसऱ्यांनीं केलेले वैरमूलक प्रकारही त्यांना स्मरत नाहींत १०.

साधवः प्रियदर्शनाः । तथाचरितमार्येण त्वयास्मिन्सत्समागमे ॥ दुर्योधनस्य पारुष्यं तत्तात हृदि मा कृथाः ११ मातरं चैव गान्धारीं मां च त्वं गुणकाङ्क्षया । उपस्थितं वृद्धमन्धं पितरं पश्य भारत १२ प्रेक्षापूर्वं मया द्यूतमिदमासीदुपेक्षितम् । मित्राणि द्रष्टुकामेन पुत्राणां च बलाबलम् १३ अशोच्याः कुरवो राजन्येषां त्वमनुशासिता । मन्त्री च विदुरो धीमान्सर्वशास्त्रविशारदः १४ त्वयि धर्मोऽर्जुने धैर्यं भीमसेने पराक्रमः । शुद्धा च गुरुशुश्रूषा यमयोः पुरुषाग्र्ययोः १५ अजातशत्रो भद्रं ते खाण्डवप्रस्थमाविश । भ्रातृभिस्तेऽस्तु सौभ्रात्रं धर्मे ते धीयतां मनः १६ वैशम्पायन उवाच॥ इत्युक्तो भरतश्रेष्ठो धर्मराजो युधिष्ठिरः । कृत्वार्यसमयं सर्वं प्रतस्थे भ्रातृभिः सह १७ ते रथान्मेघसङ्काशानास्थाय सह कृष्णया । प्रययुर्हृष्टमनस इन्द्रप्रस्थं पुरोत्तमम् १८ [२४२९] इति० सभापर्वणि द्यूतपर्वणि धृतराष्ट्रवरप्रदानपूर्वक-

---

ज्यांचें दर्शन झालें असतां आनंद होतो असे साधु जन (कांहीं झालें तरी) शिष्टांच्या मर्यादेचें अतिक्रमण करीत नाहींत आणि ह्या सज्जनसमुदायामध्यें तूंही सज्जन असल्यामुळें तसेंच वर्तन केलें आहेस. सारांश, बा युधिष्ठिरा, दुर्योधनाचें कठोर भाषण तूं कांहीं मनामध्यें ठेवूं नकोस ११. सद्गुणांकडे लक्ष्य देऊन, हे भारता, मातृतुल्य गांधारी आणि वृद्ध व अंध होऊन बसलेला पितृतुल्य मी ह्यांच्याकडे तूं लक्ष्य दे १२. मित्रांची भेट घेण्याकरितां आणि पुत्रांचें बलाबल पाहण्याकरितां मीं बुद्धिपूर्वक ह्या द्यूताची उपेक्षा केली १३. असो. हे राजा, (कांहीं झालें तरी) ज्यांचा शास्ता तूं असून सर्वशास्त्रपारंगत विचारी विदुर ज्यांचा मंत्री आहे त्या आह्मा कुरुवंशजांना कसलीही काळजी नाहीं १४. तुझ्या ठिकाणीं धर्म वास करीत असून अर्जुनाचे ठिकाणीं धैर्य वसत आहे व त्याचप्रमाणें भीमसेनाचे ठिकाणीं पराक्रम असून पुरुषश्रेष्ठ नकुलसहदेवांचे ठिकाणीं निर्मल गुरुशुश्रूषा वसत आहे १५. करितां, हे अजातशत्रो, तुझें कल्याण असो. तूं आतां खांडवप्रस्थाला जा. (दुर्योधनप्रभृति) भ्रात्यांशीं तुझी बंधुप्रीति कायम राहो व धर्माकडे तुझ्या मनाचा कल असो १६. वैशंपायन सांगतातः—हे आर्या भरतवंशजा जनमेजया, ह्याप्रमाणें धृतराष्ट्र राजानें सांगितलें असतां धर्मराज युधिष्ठिर तें सर्व करण्याचें कबूल करून भ्रात्यांसहवर्तमान तेथून निघाला १७ व नंतर मेघासारखी गंभीर गर्जना करणाऱ्या रथांवर द्रौपदीसहवर्तमान आरूढ होऊन आनंदित अंतःकरणानें युक्त झालेले ते पांडव आपल्या इंद्रप्रस्थनामक श्रेष्ठ नगराला गेले १८. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील द्यूतपर्वापैकीं धृतराष्ट्रवरप्रदानपूर्वक युधिष्ठिराच्या इंद्रप्रस्थाला जाण्याविषयीं

मिन्द्रप्रस्थं प्रति युधिष्ठिरगमने त्रिसप्ततितमोऽध्यायः॥७३॥ समाप्तं च द्यूतपर्व॥

अथानुद्यूतपर्व ॥ जनमेजय उवाच ॥ अनुज्ञातांस्तान्विदित्वा सरत्नधनसंचयान् । पाण्डवान्धार्तराष्ट्राणां कथमासीन्मनस्तदा १ वैशम्पायन उवाच ॥ अनुज्ञातांस्तान्विदित्वा धृतराष्ट्रेण धीमता । राजन्दुःशासनः क्षिप्रं जगाम भ्रातरं प्रति २ दुर्योधनं समासाद्य सामात्यं भरतर्षभ । दुःखार्तो भरतश्रेष्ठ इदं वचनमब्रवीत् ३ दुःशासन उवाच ॥ दुःखेनैतत्समानीतं स्थविरो नाशयत्यसौ । शत्रुसाद्गमयद्द्रव्यं तद्बुध्यध्वं महारथाः ४ अथ दुर्योधनः कर्णः शकुनिश्चापि सौबलः । मिथः संगम्य सहिताः पाण्डवान्प्रतिमानिनः ५ वैचित्रवीर्यं राजानं धृतराष्ट्रं मनीषिणम् । अभिगम्य त्वरायुक्ताः श्लक्ष्णं वचनमब्रुवन् ६ दुर्योधन उवाच ॥ न त्वयेदं श्रुतं राजन्यज्जगाद बृहस्पतिः । शक्रस्य नीतिं प्रवदन्विद्वान्देवपुरोहितः ७ सर्वोपायैर्निहन्तव्याः शत्रवः शत्रुसूदन । पुरा युद्धाद्बलाद्वापि प्रकुर्वन्ति तवाहितम् ८ ते वयं पाण्डवधनैः सर्वान्संपूज्य पार्थिवान् । यदि तान्योधयिष्यामः

त्र्याहात्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७३ ॥ ह्या ठिकाणीं द्यूतपर्वही संपूर्ण झालें ॥

येथून पुढें अनुद्यूतपर्वाला आरंभ झाला. जनमेजय प्रश्न करितो:—रत्नें व धन ह्यांच्या संचयांसहवर्तमान त्या पांडवांना धृतराष्ट्रराजानें खांडवप्रस्थाला जाण्याची अनुज्ञा दिली असें समजल्यावर धृतराष्ट्रपुत्रांच्या मनाला कसें काय वाटलें ? १. वैशंपायन सांगतात:—हे जनमेजय राजा, बुद्धिमान् धृतराष्ट्रानें त्यांना जाण्याची अनुज्ञा दिल्याचें समजल्यावर दुःशासन आपल्या (श्रेष्ठ) भ्रात्याकडे सत्वर गेला २ आणि, हे भरतश्रेष्ठा, अमात्यांसहवर्तमान बसलेल्या दुर्योधनासमीप जाऊन दुःखाकुल झालेला तो भरतश्रेष्ठ दुःशासन असें ह्मणाला ३. दुःशासन ह्मणतो:—हे महारथी हो, मोठ्या संकटानें आह्मी हा घाट जुळवून आणिला असतांना हा थेरडा तो सर्व ढासळून टाकीत आहे. (अहो आहांत कोठें !) सर्व द्रव्य ह्या धृतराष्ट्रानें शत्रूंच्या स्वाधीन करून टाकिलें हें तुह्मांला समजलेलें तरी असूं द्या ४. ह्याप्रमाणें दुःशासनानें सांगितल्यानंतर दुर्योधन, कर्ण व सुबलपुत्र शकुनि हे पांडवद्वेषी एकमेकांच्या भेटी घेऊन सर्व एकदम ५ बुद्धिमान् विचित्रवीर्यनंदन धृतराष्ट्राकडे सत्वर गेले आणि त्याच्याशीं मोहक भाषण करूं लागले ६. दुर्योधन ह्मणतो:—हे राजा, इंद्राला नीति सांगत असतांना विद्वान् देवगुरु बृहस्पतींनीं काय ह्मटलें आहे हें तुझ्या ऐकण्यांत नाहीं कां ? ७. हे शत्रुनाशका, युद्धावांचून अथवा युद्ध करून जे तुझें अहित करीत असतात त्या शत्रूंचा सर्वप्रकारच्या उपायांनीं तूं घात कर (असें बृहस्पतींचें ह्मणणें आहे) ८. करितां, पांडवांच्या द्रव्यांनीं

किं वै नः परिहास्यति ९ अहीनाशीविषान्क्रुद्धान्नाशाय समुपस्थितान् । कृत्वा कण्ठे च पृष्ठे च कः समुत्स्रष्टुमर्हति १० आत्तशस्त्रा रथगताः कुपितास्तात पाण्डवाः । निःशेषं वः करिष्यन्ति क्रुद्धा ह्याशीविषा इव ११ संनद्धो ह्यर्जुनो याति विधृत्य परमेषुधी । गाण्डीवं मुहुरादत्ते निश्वसंश्च निरीक्षते १२ गदां गुर्वीं समुद्यम्य त्वरितश्च वृकोदरः । स्वरथं योजयित्वाशु निर्यात इति नः श्रुतम् १३ नकुलः खड्गमादाय चर्म चाप्यर्धचन्द्रवत् । सहदेवश्च राजा च चक्रुराकारमिङ्गितैः १४ ते त्वास्थाय रथान्सर्वे बहुशस्त्रपरिच्छदान् । अभिघ्नन्तो रथव्रातान्सेनायोगाय निर्ययुः १५ न क्षंस्यन्ते तथास्माभिर्जातु विप्रकृता हि ते । द्रौपद्याश्च परिक्लेशं कस्तेषां क्षन्तुमर्हति १६ पुनर्दीव्याम भद्रं ते वनवासाय पाण्डवैः । एवमेतान्वशे कर्तुं शक्ष्यामः पुरुषर्षभ १७ ते वा द्वादश वर्षाणि वयं वा द्यूतनिर्जिताः । प्रविशेम महारण्यमजिनैः प्रतिवासिताः १८ त्रयोदशं सजनेन अज्ञाताः

सर्व राजांचा सत्कार करून आम्हीं जर त्या पांडवांशीं युद्ध केलें तर त्यांत आमचा काय तोटा होणार आहे ? ९. अरे, ज्यांच्या दंष्ट्रांमध्यें विष आहे असे क्रुद्ध सर्प आपला नाश करण्यास तयार झाले असतांना त्यांना गळ्यांत बांधून अगर पाठीवर ठेवून कोणीतरी सोडून देण्याची इच्छा करणार आहे काय ? १०. हे तात, कोपयुक्त झालेले पांडव शस्त्रें घेऊन रथारूढ झाले असतां क्रुद्ध सर्पांप्रमाणेंच तुह्मांला निःशेष करून टाकितील ११. अर्जुन तर कवच घालून व अक्षय्य भाते घेऊन चालला आहे आणि वारंवार गांडीव धनुष्य तो हातांत घेऊन दीर्घ सुस्कारे टाकीत टाकीत (इकडे तिकडे) पहात आहे १२. स्वतःचा रथ जोडून व प्रचंड गदा उगारून भीमसेन सत्वर चालता झाल्याचें आह्मीं ऐकिलें १३. नकुल आपला खड्ग व अर्धचंद्रयुक्त ढाल घेऊन गेल्याचें समजत असून धर्मराजा व सहदेव ह्यांनींही हावभावांच्या योगानें आपले मनोरथ दर्शविल्याचें कळतें १४. सारांश, रथीलोकांच्या समुदायांचा वध करणारे ते सर्व पांडव विपुल शस्त्रें व इतर युद्धसामग्री ह्यांनीं युक्त असलेल्या रथांवर आरूढ होऊन सैन्य जुळविण्याकरितां गेले आहेत १५. कारण, तशाप्रकारें (भरसभेमध्यें) आह्मीं त्यांचा अपराध केला असतां ते कधींही क्षमा करणार नाहींत. विशेषेंकरून द्रौपदीचे जे पराकाष्ठेचे हाल झाले ते त्यांच्यापैकीं कोणाला बरें सहन होतील ? १६. ह्यास्तव, हे पुरुषश्रेष्ठा, तुझें कल्याण व्हावें एतदर्थ वनवासाचा पण करून आह्मी पांडवांशीं द्यूत करितों. कारण, ह्याप्रमाणें ह्यांना जिंकण्यास आह्मी समर्थ आहोंत १७. द्यूतामध्यें पराजय झाल्यास त्यांनीं अथवा आह्मीं अजिनें परिधान करून बारा वर्षें पर्यंत महावनामध्यें प्रविष्ट होऊन रहावें १८. बारा

प्रतिवत्सरम् । ज्ञाताश्च पुनरन्यानि वने वर्षाणि द्वादश १९ निवसेम वयं ते वा तथा द्यूतं प्रवर्तताम् । अक्षानुप्त्वा पुनर्द्यूतमिदं कुर्वन्तु पाण्डवाः २० एतत्कृत्यतमं राजन्नस्माकं भरतर्षभ । अयं हि शकुनिर्वेद सविद्यामक्षसंपदम् २१ दृढमूला वयं राज्ये मित्राणि परिगृह्य च । सारवद्विपुलं सैन्यं सत्कृत्य च दुरासदम् २२ ते च त्रयोदशं वर्षं पारयिष्यन्ति चेद्व्रतम् । जेष्यामस्तान्वयं राजन्रोचतां ते परन्तप २३ धृतराष्ट्र उवाच ॥ तूर्णं प्रत्यानयस्वैतान्कामं व्यध्वगतानपि । आगच्छन्तु पुनर्द्यूतमिदं कुर्वन्तु पाण्डवाः २४ वैशम्पायन उवाच ॥ ततो द्रोणः सोमदत्तो बाह्लीकश्चैव गौतमः । विदुरो द्रोणपुत्रश्च वैश्यापुत्रश्च वीर्यवान् २५ भूरिश्रवाः शान्तनवो विकर्णश्च महारथः । मा द्यूतमित्यभाषन्त शमोऽस्त्विति च सर्वशः २६ अकामानां च सर्वेषां सुहृदामर्थदर्शिनाम् । अकरोत्पाण्डवाह्वानं धृतराष्ट्रः सुतप्रियः २७ [२४५६] इति० सभापर्वण्यनुद्यूतपर्वणि पुनर्युधिष्ठिरप्रत्यानयने चतुःसप्ततितमोऽध्यायः ॥ ७४ ॥

वैशम्पायन उवाच ॥ अथाब्रवीन्महाराज धृतराष्ट्रं जनेश्वरम् । पुत्र-

---

वर्षे वनांत वास केल्यानंतर सजातीयांच्या समजण्यांत न येतां तेरावें वर्ष काढावें आणि तेराव्या वर्षी कोणाच्या समजण्यांत आल्यास पुनरपि दुसरीं बारा वर्षे त्यांनीं अथवा आह्मीं वनांत वास्तव्य करावें. करितां, तसा पण करून द्यूताला आरंभ होऊं दे आणि पुनरपि फांसे टाकून पांडवांना द्यूत करूं दे १९, २०. हे भरतवंशजश्रेष्ठा राजा, हें करणें आह्मांला अत्यंत अवश्य आहे. कारण, ह्या शकुनीला वशीकरणविद्येसहवर्तमान फांशांचें ज्ञान आहे २१. सारांश, (तेरा वर्षांच्या अवधींत) मित्र जुळवून आणि निवडक निवडक विपुल सैन्य सत्कारपूर्वक शत्रूंना अजिंक्य असें तयार करून आह्मीं राज्याविषयीं निर्धास्त होऊं २२ आणि त्यांनीं तसें व्रत धारण करून जर तेरावेंही वर्ष पार पाडिलें तर, हे शत्रुतापना राजा, आह्मी त्यांना जिंकू. करितां, ह्याला तुह्मी अनुमति असूं दे २३. धृतराष्ट्र ह्मणतो:—तर मग हे पांडव जरी दूर गेले असले तरी तूं ह्यांना खुशाल परत आण. त्यांना परत येऊं दे आणि पुनरपि असें हें द्यूत होऊं दे २४. वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें धृतराष्ट्रानें आज्ञा केली असतां द्रोणाचार्य, सोमदत्त, बाल्हीक, कृपाचार्य, विदुर, द्रोणपुत्र अश्वत्थामा, वीर्यवान् वैश्यापुत्र युयुत्सु २५, भूरिश्रवा, भीष्म आणि महारथी विकर्ण ह्या सर्वांनीं " द्यूत नको; शमाचें अवलंबन होऊं द्या " असें सांगितलें २६. परंतु, हिताकडे लक्ष्य देणाऱ्या सर्व सुहृदांची इच्छा नसतांनाही पुत्रप्रिय धृतराष्ट्रानें पांडवांना आव्हान केलें २७. ह्याप्रमाणें० सभापर्वांतील अनुद्यूतपर्वांपैकीं युधिष्ठिराला परत आणण्याविषयीं चौऱ्याहत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७४ ॥

हार्दाद्धर्मयुक्ता गान्धारी शोककर्शिता १ जाते दुर्योधने क्षत्ता महामति-रभाषत । नीयतां परलोकाय साध्वयं कुलपांसनः २ व्यनदज्जातमात्रो हि गोमायुरिव भारत । अन्तो नूनं कुलस्यास्य कुरवस्तन्निबोधत ३ मा निमज्जीः स्वदोषेण महाप्सु त्वं हि भारत । मा बालानामशिष्टानामभि-मंस्था मतिं प्रभो ४ मा कुलस्य क्षये घोरे कारणं त्वं भविष्यसि । बद्धं सेतुं को नु भिन्द्याद्धमेच्छान्तं च पावकम् ५ शमे स्थितान्को नु पार्थान्को-पयेद्भरतर्षभ । स्मरन्तं त्वामाजमीढं स्मारयिष्याम्यहं पुनः ६ शास्त्रं न शास्ति दुर्बुद्धिं श्रेयसे चेतराय च । न वै वृद्धो बालमतिर्भवेद्राजन्कथं-चन ७ त्वन्नेत्राः सन्तु ते पुत्रा मा त्वां दीर्णाः प्रहासिषुः । तस्मादयं मद्वचनात्त्यज्यतां कुलपांसनः ८ तथा ते न कृतं राजन्पुत्रस्नेहान्नराधिप।

वैशंपायन सांगतातः—हे महाराज जनमेजया, शोकानें कृश झालेली धर्माचरणी गांधारी पुत्रप्रेमामुळें प्रजाधिपति धृतराष्ट्राला ह्मणाली १ "दुर्योधन उत्पन्न झाल्यावर "ह्या कुलकलंकाला खुशाल परलोकीं न्या" ह्मणून महाविचारी विदुरानें सांगितलें होतें २. हे भरतकुलोत्पन्न, उत्पन्न होतांक्षणीं हा कोल्ह्याप्रमाणें ओरडला आहे. तस्मात्, हे कुरु-वंशजहो, हा खरोखर ह्या कुरुकुलाचा अंत करणारा आहे हें तुह्मी समजा ३. हे भर-तवंशज, स्वतःच्या दोषानें आपण अगाध जलांमध्यें बुडून जाऊं नका. हे प्रभो, मूर्ख व हलकट लोकांच्या मताचा अभिमान धरूं नका ४. सारांश, आपण कुलाचा भयंकर नाश होण्यास कारण होऊं नये. अहो, बांधिलेला बांध कोणी फोडावा ? आणि शांत झालेल्या अग्नीला तरी पुनरपि कोणी वारा घालून चेतवावा ? ५. हे भरतवंशजश्रेष्ठ, शमाचें अवलंबन करून राहिलेल्या कुंतीपुत्रांना कोणीं बरें कोपवावें ? आपणांला सर्व कांहीं स्मरतच आहे. तथापि अजमीढकुलांत उत्पन्न झालेल्या आपणांला मी पुनरपि एका गोष्टीचें स्मरण देतें ६. मुळांतच ज्याची मति दुष्ट आहे तो शास्त्राच्या योगानें कल्याणाच्या अथवा अकल्याणाच्या मार्गाला लागणें शक्य नाहीं (कारण, स्वभावतःच दुष्ट बुद्धीनें युक्त असलेल्या पुरुषावर शास्त्राचा परिणाम कांहीं एक होत नाहीं). सारांश, हे नृप, वृद्धानें कधींहीं बालांच्या मतीचें अवलंबन करूं नये ७. आपल्या आज्ञेमध्यें आपले पुत्र असावेत; आपणांपासून मर्यादेचें अतिक्रमण करावयाला शिकून परिणामीं गतप्राण होऊन त्यांनीं आपणांला सोडून जाऊं नये (अशी माझी मनीषा आहे). तस्मात्, माझ्या सांगण्या-वरून आपण ह्या कुलकलंक दुर्योधनाचा त्याग करावा ८. हे प्रजाधिपते, त्या वेळीं विदुराच्या सांगण्याप्रमाणें आपण केलें नाहींत. तस्मात्, हे नृप, त्या न करण्याचेंच आपल्याला आतां कुलाच्या नाशाला कारणीभूत होणारें फल प्राप्त झालेंच असें

तस्य प्राप्तं फलं विद्धि कुलान्तकरणाय यत् ९ शमेन धर्मेण नयेन युक्ता या ते बुद्धिः सास्तु ते मा प्रमादीः । प्रध्वंसिनी क्रूरसमाहिता श्रीर्मृदुप्रौढा गच्छति पुत्रपौत्रान् १० अथाब्रवीन्महाराजो गान्धारीं धर्मदर्शिनीम् । अन्तः कामं कुलस्यास्तु न शक्नोमि निवारितुम् ११ यथेच्छन्ति तथैवास्तु प्रत्यागच्छन्तु पाण्डवाः। पुनर्द्यूतं च कुर्वन्तु मामकाः पाण्डवैः सह १२ [२४६८]
इति० सभापर्वण्यनुद्यूतपर्वणि गान्धारीवाक्ये पञ्चसप्ततितमोऽध्यायः ॥ ७५ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततो व्यध्वगतं पार्थं प्रातिकामी युधिष्ठिरम् । उवाच वचनाद्राज्ञो धृतराष्ट्रस्य धीमतः १ उपास्तीर्णा सभा राजन्नक्षानुप्त्वा युधिष्ठिर । एहि पाण्डव दीव्येति पिता त्वाहेति भारत २ युधिष्ठिर उवाच ॥ धातुर्नियोगाद्भूतानि प्राप्नुवन्ति शुभाशुभम् । न निवृत्तिस्तयोरस्ति देवितव्यं पुनर्यदि ३ अक्षद्यूते समाह्वानं नियोगात्स्थविरस्य च । जानन्नपि क्षयकरं नातिक्रमितुमुत्सहे ४ वैशम्पायन उवाच ॥ असंभवे

आपण समजा ९. (हे महाराज) शांति, धर्म व न्याय ह्यांनीं युक्त अशी जी आपली बुद्धि तीच आपल्या ठिकाणीं, प्रमाद न होतां, कायम राहो. कारण, क्रूरकर्मी पुरुषाचे ठिकाणीं असलेली लक्ष्मी नष्ट होत असून मृदु पुरुषाचे ठिकाणीं असलेलें वैभव वृद्धिंगत होऊन पुत्रपौत्रादि परंपरेलाही प्राप्त होत असतें १०. ह्या(प्रमाणें गांधारीनें प्रार्थना केल्या) नंतर धर्माकडे दृष्टि देऊन वागणाऱ्या त्या गांधारीला महाराज धृतराष्ट्र ह्मणाला "कुलाचा नाश खुशाल होवो. मी त्याचें निवारण करण्यास समर्थ नाहीं ११. सारांश, माझे दुर्योधनप्रभृति पुत्र ज्याप्रमाणें इच्छा करीत आहेत त्याप्रमाणें होवो. तात्पर्य, पांडव परत येऊं दे आणि पुनरपि पांडवांसहवर्तमान माझ्या पुत्रांना द्यूत सुरू करूं दे १२. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील अनुद्यूतपर्वापैकीं गांधारीच्या भाषणाविषयीं पंचाहत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७५ ॥

वैशंपायन सांगतातः—तदनंतर हास्तिनपुराच्या मार्गापासून दूर गेलेल्या कुंतीपुत्र युधिष्ठिराकडे जाऊन—" हे राजा, सभेमध्यें पट आंथरला आहे. करितां, हे पांडुपुत्रा युधिष्ठिरा, परत ये व फांसे टाकून तूं पुनरपि द्यूत कर " असें, हे भरतकुलोत्पन्ना, तुला पित्यानें सांगितलें आहे – ह्मणून प्रातिकामीनें बुद्धिमान् धृतराष्ट्रराजाचा निरोप युधिष्ठिराला सांगितला असतां १, २ युधिष्ठिर ह्मणतोः—आतां पुनरपि द्यूत कर्तव्य असल्यास खरोखर दैवनियोगानेंच प्राण्यांना शुभ अथवा अशुभ प्राप्त होत असल्याचें सिद्ध आहे; दैवीं लिहिलेलेंच असल्यास प्राप्त होणाऱ्या शुभाशुभांची निवृत्ति होत नाहीं ३. अक्षद्यूत करण्याकरितां असलेलें हें वृद्धाचें आव्हान क्षयाला कारणीभूत होणारें आहे असें जरी

हेममयस्य जन्तोस्तथापि रामो लुलुभे मृगाय। प्रायः समासन्नपराभवाणां धियो विपर्यस्ततरा भवन्ति ५ इति ब्रुवन्निववृते भ्रातृभिः सह पाण्डवः। जानंश्च शकुनेर्मायां पार्थो द्यूतमियात्पुनः ६ विविशुस्ते सभां तां तु पुनरेव महारथाः। व्यथयन्ति स्म चेतांसि सुहृदां भरतर्षभाः ७ यथोपजोषमासीनाः पुनर्द्यूतप्रवृत्तये। सर्वलोकविनाशाय दैवेनोपनिपीडिताः ८ शकुनिरुवाच॥ अमुञ्चत्स्थविरो यद्वो धनं पूजितमेव तत्। महाधनं ग्लहं त्वेकं शृणु भो भरतर्षभ ९ वयं वा द्वादशाब्दानि युष्माभिर्द्यूतनिर्जिताः। प्रविशेम महारण्यं रौरवाजिनवाससः १० त्रयोदशं च सजने अज्ञाताः परिवत्सरम्। ज्ञाताश्च पुनरन्यानि वने वर्षाणि द्वादश ११ अस्माभिर्निर्जिता यूयं वने द्वादश वत्सरान्। वसध्वं कृष्णया सार्धमजिनैः प्रतिवासिताः १२ त्रयोदशं च सजने अज्ञाताः परिवत्सरम्। ज्ञाताश्च

मी जाणीत आहें तरी त्या आव्हानरूप वृद्धाज्ञेचें अतिक्रमण करण्यास माझा धीर होत नाहीं ४. वैशंपायन सांगतातः—" ज्याअर्थी सुवर्णमय प्राणी असण्याचा संभव नसतांही रामाला (सुवर्णमय) मृगाचा लोभ उत्पन्न झाला त्याअर्थी विनाशकाल जवळ आला असतां पुरुषांच्या बुद्धि अत्यंत विपरीत होत असतात (हें सिद्ध आहे. तेव्हां धृतराष्ट्रराजा द्यूताला पुनरपि आव्हान करीत आहे ह्यांत आश्चर्य नाहीं) " ५. असें बोलत बोलत पांडुपुत्र धर्मराज भ्रात्यांसहवर्तमान परत फिरला आणि शकुनीचें कपट जाणीत असूनही तो कुंतीपुत्र पुनरपि द्यूताकडे वळला ६. (परत फिरल्यानंतर) ते भरतवंशजश्रेष्ठ महारथि पांडव पुनरपि त्या सभेमध्यें प्रविष्ट झाले असतां सुहृदांच्या अंतःकरणाला फारच दुःख झालें ७. असो. सर्व लोकांचा नाश होण्याकरितां दैवाच्या कचाटयांत सांपडलेले ते पांडव (सभेंत प्रविष्ट झाल्यानंतर) द्यूतप्रवृत्तीकरितां स्वस्थ बसले ८. शकुनि ह्मणतो:—वृद्ध धृतराष्ट्रराजानें तुमचें द्रव्य परत दिलें हें आह्मांला अगदीं शिरसामान्य आहे. आतां, हे भरतवंशजश्रेष्ठा, एकच महाधनाचा पण लावावयाचा आहे तो श्रवण कर ९. तुह्मीं जर द्यूतामध्यें आमचा पराजय केला तर आह्मीं रुरुसंज्ञकमृगाजिनें परिधान करून बारा वर्षें पर्यंत महावनामध्यें प्रविष्ट होऊन रहावें १०; कोणाच्याही समजण्यांत न येतां तेरावे वर्षी सजातीयांमध्यें वास्तव्य करावें आणि ह्या तेराव्या वर्षी कोणाच्या समजण्यांत आल्यास पुनरपि आणखीं बारा वर्षें वनांत राहावें ११. ह्याचप्रमाणें आमच्या हातून जर तुमचा पराजय झाला तर तुह्मींही अजिनें परिधान करून द्रौपदीसहवर्तमान बारा वर्षें वनांत वास्तव्य करावें १२; कोणाच्या समजण्यांत न येतां तेरावें वर्ष सजातीयांमध्यें काढावें; तेराव्या वर्षी उमगल्यास पुनरपि दुसरीं

पुनरन्यानि वने वर्षाणि द्वादश १३ त्रयोदशे च निर्वृत्ते पुनरेव यथोचितम् । स्वराज्यं प्रतिपत्तव्यमितरैरथवेतरैः १४ अनेन व्यवसायेन सहास्माभिर्युधिष्ठिर । अक्षानुप्त्वा पुनर्द्यूतमेहि दीव्यस्व भारत १५ अथ सभ्याः सभामध्ये समुच्छ्रितकरास्तदा । ऊचुरुद्विग्नमनसः संवेगात्सर्व एव हि १६ सभ्या ऊचुः ॥ अहो धिग्बान्धवा नैनं बोधयन्ति महद्भयम् । बुद्ध्या बुध्येन्न वा बुध्येदयं वै भरतर्षभ १७ वैशम्पायन उवाच ॥ जनप्रवादान्सुबहूञ्छृण्वन्नपि नराधिपः । ह्रिया च धर्मसंयोगात्पार्थो द्यूतमियात्पुनः १८ जानन्नपि महाबुद्धिः पुनर्द्यूतमवर्तयत् । अप्यासन्नो विनाशः स्यात्कुरूणामिति चिन्तयन् १९ युधिष्ठिर उवाच॥ कथं वै मद्विधो राजा स्वधर्ममनुपालयन् । आहूतो विनिवर्तेत दीव्यामि शकुने त्वया २० शकुनिरुवाच ॥ गवाश्वं बहुधेनूकमपर्यन्तमजाविकम् । गजाः कोशो हिरण्यं च

बारा वर्षे वनांत काढावीं १३ आणि ह्याप्रमाणें कोणाच्या समजण्यांत न येतां तेरावें वर्ष पार पडलें ह्मणजे यथायोग्य रीतीनें तुह्मीं अथवा आह्मीं पुनरपि आपलें राज्य करावें १४. करितां, हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, चल आणि ह्या निश्चयानें आह्मांसहवर्तमान फांसे टाकून तूं पुनरपि द्यूत कर १५. (ह्याप्रमाणें शकुनीनें धर्मराजाला सांगितल्यानंतर सभेमध्यें सभासदांनीं आपआपले हात वर केले आणि मनामध्यें अत्यंत उद्विग्न होऊन ते सर्वही ह्मणाले १६ " अहो, ह्या द्यूताचा परिणाम मोठाच भयंकर होईल हें ह्या दुर्योधनाला कोणी सांगत नाहींत. तस्मात् , धिक्कार असो ह्या त्याच्या बांधवांना. हे भरतवंशजश्रेष्ठा धृतराष्ट्रा, (सांगितल्या नंतर) हा दुर्योधन आपल्या मतीनें ऐको अगर न ऐको. (ह्या द्यूतापासून परिणाम चांगला होणार नाहीं हें सांगणें तुझें कर्तव्य आहे) १७. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें नानाप्रकारचे लोकप्रवाद कानीं पडत असतां ("क्षात्र धर्म जाणीत असूनही युधिष्ठिर राजा आव्हान झाल्यानंतर द्यूतापासून परावृत्त झाला" ह्या लोकापवादाची) लाज बाळगून आणि (वनवास करीत हिंडलों असतां तीर्थाटनरूप) धर्म होण्याचा संभव आहे -असें मनांत आणून कुंतीपुत्र युधिष्ठिर पुनरपि द्यूताकडे गेला १८ आणि परिणाम जाणीत असूनही " कौरवांचा विनाशकाल समीप आला आहे कीं काय " असें मनामध्यें चिंतन करीत करीत तो महाबुद्धिमान् युधिष्ठिर पुनरपि द्यूत करण्यास प्रवृत्त झाला १९. युधिष्ठिर ह्मणतोः— हे शकुने, माझ्यासारिख्या स्वधर्मपरिपालन करणाऱ्या राजानें आव्हान झालें असतां निवृत्त कसें व्हावें ? ह्यास्तव, मी तुझ्यासहवर्तमान द्यूत करितों २०. शकुनि ह्मणतोः— बैल, अश्व, असंख्य गाई, अगणित शेळ्यामेंढ्या, गज, कोश, सुवर्ण, दासी, दास वगैरे

दासीदासाश्च सर्वशः २१ एष नो ग्लह एवैको वनवासाय पाण्डवाः । यूयं वयं वा विजिता वसेम वनमाश्रिताः २२ त्रयोदशं च वै वर्षमज्ञाताः सजने तथा । अनेन व्यवसायेन दीव्याम पुरुषर्षभाः २३ समुत्क्षेपेण चैकेन वनवासाय भारत २४ प्रतिजग्राह तं पार्थो ग्लहं जग्राह सौबलः । जितमित्येव शकुनिर्युधिष्ठिरमभाषत २५ [२४९३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां० सभापर्वण्यनुद्यूतपर्वणि पुनर्युधिष्ठिरपराभवे षट्सप्ततितमोऽध्यायः ॥ ७६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततः पराजिताः पार्था वनवासाय दीक्षिताः । अजिनान्युत्तरीयाणि जगृहुश्च यथाक्रमम् १ अजिनैः संवृतान्दृष्ट्वा हृतराज्यानरिन्दमान् । प्रस्थितान्वनवासाय ततो दुःशासनोऽब्रवीत् २ प्रवृत्तं धार्तराष्ट्रस्य चक्रं राज्ञो महात्मनः । पराजिताः पाण्डवेया विपत्तिं परमां गताः ३ अद्य देवाः संप्रयाताः समैर्वर्त्मभिरस्थलैः । गुणज्येष्ठास्तथा श्रेष्ठाः श्रेयांसो यद्वयं परैः ४ नरकं पातिताः पार्था दीर्घकालमनन्तकम् ।

सर्व कांहीं असेल नसेल तें लावून २१ वनवास करण्याचा एकच हा आमचा पण आहे. ह्मणजे, हे पांडवहो, तुह्मी किंवा आह्मीं पराजित झाल्यास बारा वर्षें वनवास करून २२ तेरावें वर्ष सजातीयांमध्यें अज्ञात राहून काढावें. तस्मात्, हे पुरुषश्रेष्ठहो, असा निश्चय करून आपण परस्परांबरोबर द्यूत करूं २३. ह्याप्रमाणें शकुनीनें एकदां सांगितल्याबरोबरच, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजय राजा २४, कुंतीपुत्र धर्मराजानें त्या पणाचा अंगीकार केला आणि सुबलपुत्र शकुनीनें फांसा टाकून " जितं " एवढेंच युधिष्ठिराला सांगितलें २५. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक० सभापर्वांतील अनुद्यूतपर्वापैकीं युधिष्ठिराचा पुनरपि पराभव झाल्याविषयीं शाहात्तरावा अध्याय समाप्त झाला ॥७६॥

वैशंपायन सांगतातः—तदनंतर पराजित झालेले कुंतीपुत्र वनवासाला जाण्यास उद्युक्त झाले असतां त्यांनीं अनुक्रमानें अजिनें परिधान केलीं १. तेव्हां राज्याचा अपहार झालेले शत्रुनाशक पांडव अजिनांनीं आच्छादित होऊन वनवासाला चालले आहेत असें पाहून दुःशासन ह्मणाला २ " आतां महात्म्या धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन राजाचें राज्य सुरू झालें. कारण, पांडव पराजित होऊन पराकाष्ठेच्या विपत्तींत सांपडले आहेत ३. शत्रूंपेक्षां आह्मी गुणांनीं अधिक असून वयानेंही श्रेष्ठ असल्यामुळें त्यांच्यापेक्षां आह्मी अधिक प्रशस्त आहोंत ह्मणून (पांडवांचा पराजय करून) आज सर्व देवांनींच स्थलहीन मार्गाच्या योगानें आमच्याकडे आगमन केलें आहे (सारांश, सर्वप्रकारें आह्मी पांडवांपेक्षां श्रेष्ठ असल्यामुळें मार्गामध्यें पाऊल ठेवण्यासही जागा नाहीं इतके सर्व देव आज आमच्यावर अनुग्रह करण्याकरितां आह्मांकडे आले आहेत) असें

सुखाच्च हीना राज्याच्च विनष्टाः शाश्वतीः समाः ५ धनेन मत्ता ये ते स्म धार्तराष्ट्रान्प्रहासिषुः । ते निर्जिता हृतधना वनमेष्यन्ति पाण्डवाः ६ चित्रान्सन्नाहानवमुञ्चन्तु चैषां वासांसि दिव्यानि च भानुमन्ति । विवास्यन्तां रुरुचर्माणि सर्वे यथा ग्लहं सौबलस्याभ्युपेताः ७ न सन्ति लोकेषु पुमांस ईदृशा इत्येव ये भावितबुद्धयः सदा । ज्ञास्यन्ति तेऽत्मानमिहाद्य पाण्डवा विपर्यये षण्ढतिला इवाफलाः ८ इदं हि वासो यदि वेदृशानां मनस्विनां रौरवमाहवेषु । अदीक्षितानामजिनानि यद्वद्बलीयसां पश्यत पाण्डवानाम् ९ महाप्राज्ञः सौमकिर्यज्ञसेनः कन्यां पाञ्चालीं पाण्डवेभ्यः प्रदाय । अकार्षीद्वै सुकृतं नेह किंचित्क्लीबाः पार्थाः पतयो याज्ञसेन्याः १० सूक्ष्मप्रावारानजिनोत्तरीयान्दृष्ट्वारण्ये निर्धनानप्रतिष्ठान् । का त्वं प्रीतिं लप्स्यसे याज्ञसेनि पतिं वृष्णीष्वेह यमन्यमिच्छसि ११ एते हि सर्वे कुरवः समेताः क्षान्ता दान्ताः सुद्रविणोपपन्नाः । एषां वृष्णीष्वैकतमं

आह्मांला वाटतें (कारण, ह्यांवाचून पांडवांचें सर्व राज्य एकाक्षणांत आह्मांला मिळणें असंभवनीय आहे) ४. असो. ज्याला अंत नाहीं अशा चिरकाल नरकांत आह्मीं आज कुंतीपुत्रांना ढकलले. तेव्हां सुख व राज्य ह्यांना अर्थातच ते कायमचे मुकले ५. अहो, धनानें मत्त होऊन जे पूर्वी आह्मा धृतराष्ट्रपुत्रांना हंसले ते पांडव पराजित झाल्यामुळें सर्वस्वापहार होऊन वनामध्यें जात आहेत ६. करितां, ह्यांचीं चमत्कारिक कवचें आणि उज्ज्वल दिव्य वस्त्रें काढून घ्या व सुबलपुत्र शकुनीचा पण मान्य केल्याप्रमाणें ह्या सर्वांना मृगाजिनें परिधान करावयास लावा ७. अहो "आमच्यासारिखे पुरुष त्रैलोक्यामध्यें नाहींत" अशीच ज्यांची सर्वदा समजूत असे त्या ह्या पांडवांना उलट "आह्मी षंढतिलाप्रमाणें निर्वीर्य आहोंत" अशा आपल्या खऱ्या स्वरूपाची आज ओळख पटेल ८. ह्या पांडवांप्रमाणें यज्ञसमयीं उदारबुद्धि यजमान रौरव वस्त्र परिधान करीत असतात. परंतु, ह्या बलाढ्य (ह्मणविणाऱ्या) पांडवांनीं यज्ञदीक्षा नसतांनाच (कोळ्यांप्रमाणें) अजिनें परिधान केलीं आहेत तीं अवलोकन करा ९. अहो, द्रौपदीचे पति हे कुंतीपुत्र क्लीब आहेत. तेव्हां आपल्याला मोठा शाहाणा समजत असलेल्या सोमककुलोत्पन्न द्रुपदराजानें आपल्या पांचाली कन्येला पांडवांना देऊन इहलोकसंबधीं सुद्धां आपलें कांहीं चांगलें करून घेतलें नाहीं १०. हे द्रौपदि, निर्धन, निराश्रय व अति तुच्छ वस्त्रें नेसून कृष्णाजिनें परिधान केलेले असे आपले पति वनांत अवलोकन करून तुला काय बरें आनंद होणार आहे ? करितां, तूं येथल्या येथेंच जो इच्छेस येईल तो दुसरा पति वर ११. हे येथें जुळलेले सर्व कौरव क्षमाशील, जितेंद्रिय आणि उत्कृष्ट

पतित्वे न त्वां नयेत्कालविपर्ययोयम् १२ यथाफलाः षण्ढतिला यथा चर्ममया मृगाः । तथैव पाण्डवाः सर्वे यथा काकयवा अपि १३ किं पाण्डवांस्ते पतितानुपास्य मोघः श्रमः षण्ढतिलानुपास्य । एवं नृशंसः परुषाणि पार्थानश्रावयद्धृतराष्ट्रस्य पुत्रः १४ तद्वै श्रुत्वा भीमसेनोत्यमर्षी निर्भर्त्स्योच्चैः संनिगृह्यैव रोषात् । उवाच चैनं सहसैवोपगम्य सिंहो यथा हैमवतः शृगालम् १५ भीमसेन उवाच ॥ क्रूरं पापजनैर्जुष्टमकृतार्थं प्रभाषसे । गान्धारविद्यया हि त्वं राजमध्ये विकत्थसे १६ यथा तुदसि मर्माणि वाक्छरैरिह नो भृशम् । तथा स्मारयिता तेहं कृन्तन्मर्माणि संयुगे १७ ये च त्वामनुवर्तन्ते क्रोधलोभवशानुगाः । गोप्तारः सानुबन्धांस्तान्नेतास्मि यमसादनम् १८ वैशम्पायन उवाच ॥ एवं ब्रुवाणमजिनैर्विवासितं दुःशासनस्तं परिनृत्यति स्म । मध्ये कुरूणां धर्मनिबद्धमार्गं गौर्गौरिति स्माह्वयन्मुक्तलज्जः १९

वैभवसंपन्न आहेत. करितां, ह्यांपैकीं कोणाला तरी तूं पति ह्या नात्यानें पसंत कर, ह्मणजे तूं ह्या कालाच्या फेऱ्यांत सांपडणार नाहींस १२. न उगवणारे तिल, चर्ममय पशु अथवा वांझे यव जसे निष्फल आहेत तसे सर्व पांडव निष्फळ आहेत १३. तस्मात्, ह्या पांडवांना धरून राहून तुला काय फलप्राप्ति होणार आहे ? खरोखर ह्या नपुंसकांचा समागम करून तुला श्रम मात्र व्यर्थ होणार आहेत." ह्याप्रमाणें धृतराष्ट्रपुत्र दुष्ट दुःशासन पांडवांना मर्मभेदक वाक्यें ऐकवूं लागला असतां १४ अत्यंत असहिष्णु भीमसेनानें तीं ऐकिल्यावर उच्च स्वरानें त्याची निर्भत्सना करून त्याला बोलतांना थांबविलें आणि हिमालयपर्वतावरील सिंहच कोल्ह्याच्या अंगावर धांवून जात आहे कीं काय अशा रीतीनें भीमसेन एकाएकीं त्याच्या अंगावर धांवून जाऊन रागारागानें त्याला ह्मणाला १५ " अरे, क्रूर व दुष्ट लोकांनाच योग्य असें व्यर्थ भाषण तूं करीत असून गांधारदेशाधिपति शकुनीच्या अक्षविद्येचे जोरावर तूं राजमंडलामध्यें फुशारक्या मारीत आहेस १६. परंतु, शब्दरूप बाणांनीं ज्याप्रमाणें सांप्रत तूं आमच्या मर्मांवर घाव घालीत आहेस त्याचप्रमाणें युद्धामध्यें तुझा खरोखरीच मर्मभेद करूं लागलों असतां मी तुला ह्या तुझ्या कृत्याचें स्मरण देईन १७ आणि त्याचप्रमाणें क्रोध व लोभ ह्यांच्या अधीन होऊन तुझ्याप्रमाणें वागत असलेले जे तुला पाठीशीं घालणारे आहेत त्यांनाही मी सपरिवार यमसदनीं पोंचवीन" १८. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें अजिनें परिधान केलेला भीमसेन बोलूं लागला असतां दुःशासनानें त्याच्याभोंवतीं हातवारे करून त्याचा उपहास केला आणि शत्रुवधाचा मार्ग धर्मामुळेंच ज्याचा कुंठित झाला आहे त्या भीमसेनाला कौरवांमध्येंच "पशु पशु" असें निर्लज्जपणानें आव्हान करूं लागला १९.

भीमसेन उवाच ॥ नृशंस परुषं वक्तुं शक्यं दुःशासन त्वया । निकृत्या हि धनं लब्ध्वा को विकत्थितुमर्हति २० मैव स्म सुकृताँल्लोकान्गच्छेत्पार्थो वृकोदरः । यदि वक्षो हि ते भित्त्वा न पिबेच्छोणितं रणे २१ धार्तराष्ट्रान्रणे हत्वा मिषतां सर्वधन्विनाम् । शमं गन्तास्मि न चिरात्सत्यमेतद्ब्रवीमि ते २२ वैशम्पायन उवाच ॥ तस्य राजा सिंहगतेः सखेलं दुर्योधनो भीमसेनस्य हर्षात् । गतिं स्वगत्यानुचकार मन्दो निर्गच्छतां पाण्डवानां सभायाः २३ नैतावता कृतमित्यब्रवीत्तं वृकोदरः संनिवृत्तार्धकायः । शीघ्रं हि त्वां निहतं सानुबन्धं संस्मार्याहं प्रतिवक्ष्यामि मूढ २४ एवं समीक्ष्यात्मनि चावमानं नियम्य मन्युं बलवान्स मानी । राजानुगः संसदि कौरवाणां विनिष्क्रामन्वाक्यमुवाच भीमः२५भीमसेन उवाच॥अहं दुर्योधनं हन्ता कर्णं हन्ता धनञ्जयः । शकुनिं चाक्षकितवं सहदेवो हनिष्यति २६ इदं च भूयो वक्ष्यामि सभामध्ये बृहद्वचः। सत्यं देवाः करिष्यन्ति यन्नो युद्धं भविष्यति २७ सुयोधनमिमं पापं हन्तास्मि गदया युधि । शिरः पादेन चास्याहमधिष्ठास्यामि भूतले २८ वाक्यशू-

---

भीमसेन ह्मणतोः—हे दुष्टा दुःशासना, मर्माला झोंबणारें भाषण करणें तुलाच योग्य आहे. बाकी कपटानें धन प्राप्त करून घेऊन दुसरा कोण बरें बढाया मारण्यास तयार होणार आहे ? २०. अरे, संग्रामामध्यें हा कुंतीपुत्र भीमसेन जर तुझें वक्षःस्थल विदीर्ण करून त्यांतील रक्त प्राशन करणार नाहीं तर त्याला पुण्यवान् लोकांचीं स्थानें प्राप्त होणार नाहींत २१. अरे, सर्व धनुर्धारी पहात असतांना धृतराष्ट्र पुत्रांचा संग्रामामध्यें वध करून मी लवकरच शांति पावेन हें मी तुला सत्य सांगून ठेवितों २२. वैशंपायन सांगतातः—सभेंतून पांडव जाऊं लागले तेव्हां सिंहगति भीमसेनाच्या गतीचें मंदमति दुर्योधन राजा आनंदाच्या भरांत थट्टेनें अनुकरण करूं लागला असतां २३ अर्धवट मागें वळून भीमसेन त्याला ह्मणाला " हे मूढा, एवढ्यानें काय झालें आहे ?" ह्याचें प्रत्युत्तर मी तुला लवकरच परिवारासहवर्तमान तुझा वध करून देईन २४. ह्याप्रमाणें धर्मराजाच्या मागोमाग चाललेल्या मानी व बलाढ्य भीमसेनानें आपला अवमान झालेला अवलोकन करून क्रोध आवरून धरिला. तथापि जातां जातां कौरवांच्या सभेमध्यें तो भीमसेन ह्मणाला २५ " मी दुर्योधनाचा वध करीन; कर्णाचा समाचार अर्जुन घेईल व कपट द्यूत खेळणाऱ्या शकुनीला हा सहदेव यमसदनीं पाठवील २६. परंतु, आमचें जर कौरवांशीं युद्ध होईल तर ही आमची प्रतिज्ञा देव शेवटास नेतील हेंही मी आणखी महत्त्वाचें भाषण सभेमध्यें करून ठेवितों २७. ह्या पापी दुर्योधनाचा वध युद्धामध्यें मी गदेनें करीन, ह्याचें मस्तक भूतलावर पायानें तुडवीन २८

रस्य चैवास्य परुषस्य दुरात्मनः । दुःशासनस्य रुधिरं पातास्मि मृगराडिव २९ अर्जुन उवाच ॥ नैवं वाचा व्यवसितं भीम विज्ञायते सताम् । इतश्चतुर्दशे वर्षे द्रष्टारो यद्भविष्यति ३० भीमसेन उवाच ॥ दुर्योधनस्य कर्णस्य शकुनेश्च दुरात्मनः । दुःशासनचतुर्थानां भूमिः पास्यति शोणितम् ३१ अर्जुन उवाच ॥ असूयितारं द्रष्टारं प्रवक्तारं विकत्थनम् । भीमसेन नियोगात्ते हन्ताहं कर्णमाहवे ३२ अर्जुनः प्रतिजानीते भीमस्य प्रियकाम्यया । कर्णं कर्णानुगांश्चैव रणे हन्तास्मि पत्रिभिः ३३ ये चान्ये प्रतियोत्स्यन्ति बुद्धिमोहेन मां नृपाः । तांश्च सर्वानहं बाणैर्नेतास्मि यमसादनम् ३४ चलेद्धि हिमवान्स्थानान्निष्प्रभः स्याद्दिवाकरः । शैत्यं सोमात्प्रणश्येत मत्सत्यं विचलेद्यदि ३५ न प्रदास्यति चेद्राज्यमितो वर्षे चतुर्दशे । दुर्योधनोभिसत्कृत्य सत्यमेतद्भविष्यति ३६ वैशम्पायन उवाच ॥ इत्युक्तवति पार्थे तु श्रीमान्माद्रवतीसुतः । प्रगृह्य विपुलं बाहुं सहदेवः प्रतापवान् ३७ सौबलस्य वधं प्रेप्सुरिदं वचनमब्रवीत् । क्रोधसंरक्तनयनो

आणि त्याचप्रमाणें बोलण्यामध्येंच शूर असलेल्या ह्या कठोरभाषणी दुरात्म्या दुःशासनाचें रक्त मृगराज सिंहाप्रमाणें मी प्राशन करीन " २९. अर्जुन ह्मणतोः—हे भीमसेना, सज्जनांचा मनोरथ ह्याप्रमाणें शब्दांनीं (पूर्वी कधीं) समजण्यांत येत नसतो. (करितां, आज बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं) आजपासून चवदाव्या वर्षी काय काय होईल तें पाहूं ३०. भीमसेन ह्मणतोः—दुर्योधन, कर्ण, दुरात्मा शकुनि व चवथा दुःशासन ह्या चौघांचें रक्त भूमि प्राशन करील (आणखी तें काय होणार आहे?) ३१. अर्जुन ह्मणतोः—हे भीमसेना, मत्सरानें भरलेला, (आमचें वाईट करण्याविषयीं) दुसऱ्यांना उत्तेजन देणारा आणि बढाया मारणारा जो कर्ण त्याचा वध तुझ्या आज्ञेवरून मी युद्धामध्यें करीन ३२. (हे सभासदहो) भीमसेनाचा मनोरथ सिद्धीस नेण्याकरितां (हा) अर्जुन प्रतिज्ञा करीत आहे (इकडे लक्ष्य द्या). कर्ण व कर्णाचे अनुयायी ह्यांचा मी बाणांच्या योगानें संग्रामामध्यें वध करीन ३३ व त्याचप्रमाणें बुद्धीला मोह पडून जे कोणी इतर भूपति माझ्याशीं युद्ध करितील त्याही सर्वांना मी बाणांच्या योगानें यमसदनीं पोंचवीन ३४. (अहो, खरोखर) जर हिमालय स्थानापासून चळेल, सूर्य निस्तेज होईल आणि चंद्रापासून शैत्यही नाहींसें होईल तर माझ्या सत्य प्रतिज्ञेचा भंग होईल ३५. (तस्मात्,) आजपासून चवदाव्या वर्षी सत्कारपूर्वक जर दुर्योधनानें आमचें राज्य परत दिलें नाहीं तर ह्या गोष्टी निःसंशय घडून येणार ३६. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें कुंतीपुत्र अर्जुनानें प्रतिज्ञा केली असतां सुबलपुत्र

निःश्वसन्निव पन्नगः ३८ सहदेव उवाच ॥ अक्षान्यान्मन्यसे मूढ गान्धा-
राणां यशोहर । नैतेक्षा निशिता बाणास्त्वयैते समरे वृताः ३९ यथा
चैवोक्तवान्भीमस्त्वामुद्दिश्य सबान्धवम् । कर्ताहं कर्मणस्तस्य कुरु कार्याणि
सर्वशः ४० हन्तास्मि तरसा युद्धे त्वामेवेह सबान्धवम् । यदि स्थास्यसि
सङ्ग्रामे क्षत्रधर्मेण सौबल ४१ सहदेववचः श्रुत्वा नकुलोपि विशांपते ।
दर्शनीयतमो नृणामिदं वचनमब्रवीत् ४२ नकुल उवाच ॥ सुतेयं यज्ञसे-
नस्य द्यूतेस्मिन्धृतराष्ट्रजैः । यैर्वाचः श्राविता रूक्षाः स्थितैर्दुर्योधनप्रिये४३
तान्धार्तराष्ट्रान्दुर्वृत्तान्मुमूर्षून्कालचोदितान् । गमयिष्यामि भूयिष्ठानहं वैव-
स्वतक्षयम्४४निदेशाद्धर्मराजस्य द्रौपद्याः पदवीं चरन्। निर्धार्तराष्ट्रां पृथिवीं
कर्तास्मि न चिरादिव ४५ वैशम्पायन उवाच ॥ एवं ते पुरुषव्याघ्राः सर्वे
व्यायतबाहवः । प्रतिज्ञा बहुलाः कृत्वा धृतराष्ट्रमुपागमन्४६[२५३९]इति०
सभापर्वण्यनुद्यूतपर्वणि पाण्डवप्रतिज्ञाकरणे सप्तसप्ततितमोध्यायः ॥ ७७ ॥

शकुनीचा वध करण्याची इच्छा करणारा प्रतापी व वैभवशाली माद्रीपुत्र सहदेव क्रोधा-
मुळें आरक्तवर्ण नेत्रांनीं युक्त होऊन सर्पाप्रमाणें सुस्कारे टाकीत ह्मणाला ३७,३८
" हे मूढा, जे तूं फांसे समजत आहेस ते हे फांसे नव्हेत. परंतु, हे गांधारकुलकलंका,
समरांगणामध्यें (स्वतःच्या प्राणांची वाट लागण्याकरितां) तूं हे तीक्ष्ण बाण वर
ह्मणून मागून घेतले आहेस (असें पक्कें समज) ३९. अरे, भीमसेनानें बांधवांसहवर्त-
मान तुला उद्देशून ज्याप्रमाणें सांगून ठेविलें आहे त्याप्रमाणें मी तें कर्म करणारा आहें.
करितां, तुझी जीं जीं ह्मणून कांहीं इहलोकसंबंधीं कृत्यें करावयाचीं शिलक असतील
तीं तीं सर्व तूं आपलीं उरकून घे ४०. कारण, हे सुबलपुत्रा, तूं जर क्षत्रधर्म स्मरून
संग्रामामध्यें उभा राहशील तर स्वसामर्थ्यानें मी तुझा बांधवांसहवर्तमान वध करीन" ४१.
हे प्रजाधिपते जनमेजया, सहदेवाचें भाषण श्रवण करून मनुष्यांमध्यें अतिशयच सुंदर
असलेल्या नकुलानेंही असें भाषण केलें ४२. नकुल ह्मणतोः—दुर्योधनाचें प्रिय कर-
ण्याकरितां उद्युक्त झालेल्या ज्या धृतराष्ट्रपुत्रांनीं ह्या द्यूतामध्यें ह्या द्रुपदकन्येला उद्देशून
मर्मभेदक भाषणें केलीं आहेत ४३ त्या कालप्रेरित आणि ह्मणूनच आसन्नमरण झालेल्या
बहुतेक सर्व धृतराष्ट्रपुत्रांना मी यमसदनीं पोंचवीन ४४. सारांश, धर्मराज जर अनुज्ञा
देईल तर द्रौपदीप्रमाणेंच तो सांगेल तसें वागणारा मी थोडक्याच काळांत ह्या पृथ्वीवर
धृतराष्ट्रपुत्र शिलक ठेवणार नाहीं ४५. वैशंपायन सांगतातः— ह्याप्रमाणें मोठमोठ्या
प्रतिज्ञा केल्यानंतर ते सर्व महापराक्रमी पुरुषश्रेष्ठ पांडव धृतराष्ट्रासमीप गेले ४६.
ह्याप्रमाणें महामुनिकृष्णद्वैपायनप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील

युधिष्ठिर उवाच ॥ आमन्त्रयामि भरतांस्तथा वृद्धं पितामहम् । राजानं सोमदत्तं च महाराजं च बाह्लिकम् १ द्रोणं कृपं नृपांश्चान्यानश्वत्थामानमेव च । विदुरं धृतराष्ट्रं च धार्तराष्ट्रांश्च सर्वशः २ युयुत्सुं संजयं चैव तथैवान्यान्सभासदः । सर्वानामन्त्र्य गच्छामि द्रष्टास्मि पुनरेत्य वः ३ वैशम्पायन उवाच ॥ न ते किंचिदथोचुस्ते ह्रिया सन्ना युधिष्ठिरम् । मनोभिरेव कल्याणं दध्युस्ते तस्य धीमतः ४ विदुर उवाच ॥ आर्या पृथा राजपुत्री नारण्यं गन्तुमर्हति । सुकुमारी च वृद्धा च नित्यं चैव सुखोचिता ५ इह वत्स्यति कल्याणी सत्कृता मम वेश्मनि । इति पार्था विजानीध्वमगदं वोस्तु सर्वशः ६ पाण्डवा ऊचुः ॥ तथेत्युक्त्वाब्रुवन्सर्वे यथा नो वदसेनघ । त्वं पितृव्यः पितृसमो वयं च त्वत्परायणाः ७ यथाज्ञापयसे विद्वंस्त्वं हि नः परमो गुरुः । यच्चान्यदपि कर्तव्यं तद्विधत्स्व महामते ८ विदुर उवाच ॥ युधिष्ठिर विजानीहि ममेदं भरतर्षभ । नाधर्मेण जितः कश्चिद्व्यथते वै पराजये ९ त्वं वै धर्मं विजानीषे युद्धे जेता धनं-

---

अनुद्यूतपर्वापैकीं पांडवांच्या प्रतिज्ञेविषयीं सत्तेहत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७७ ॥

युधिष्ठिर भाषण करितोः—सर्व भरत, वृद्ध पितामह भीष्म, राजा सोमदत्त, महाराज बाल्हीक १, द्रोणाचार्य, कृपाचार्य, इतर भूपति, अश्वत्थामा, विदुर, धृतराष्ट्र, सर्व धृतराष्ट्रपुत्र २, विशेषतः युयुत्सु, संजय व त्याचप्रमाणें इतरही सभासद ह्या सर्वांचा निरोप घेऊन मी वनामध्यें जातों. परत आल्यावर पुनरपि तुमची सर्वांची भेट होईलच ३. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें निरोप घेतला असतां लज्जेनें खालीं माना घातलेल्या भीष्मप्रभृतींनीं कांहीं एक उत्तर न देतां त्या विचारी धर्मराजाचें मनामध्येंच कल्याण चिंतिलें ४. विदुर ह्मणतोः—सुकुमार व सर्वदां सुखांत दिवस काढिलेली अशी ही साध्वी राजकन्या कुंती अरण्यांत जाणें नीट नाहीं ५. हे कुंतीपुत्रहो, ही बिचारी मानमान्यतापूर्वक येथेंच माझ्या घरीं पडून राहील असें तुह्मी समजा. तुमचें सर्व प्रकारें आरोग्य असो ६. ह्यानंतर "ठीक आहे" असें ह्मणून ते सर्वही पांडव त्याला ह्मणाले "हे निष्पाप, आपल्या सांगण्याप्रमाणें कुंतीला खुशाल येथें राहूं द्या. आपण आमचे पितृव्य असून आह्मांला पित्याप्रमाणें आहांत व आह्मांला मुख्यतः आपलाच आधार आहे ७. ह्यास्तव, हे विवेकसंपन्न, आपल्या आज्ञेप्रमाणें आह्मी वागण्यास सिद्ध आहोंत. मुख्यत्वेंकरून आपणच आह्मांला वडील आहांत. तस्मात्, हे महामते, आणखींही जें कांहीं कर्तव्य असेल त्याची आज्ञा करा ८. विदुर ह्मणतोः—हे भरतवंशजश्रेष्ठा युधिष्ठिरा, माझें हें ह्मणणें तूं लक्ष्यांत ठेव. अरे, अधर्मानें जिंकिला गेलेला पुरुष पराजयाविषयीं दुःख मानीत

जयः । हन्तारीणां भीमसेनो नकुलस्त्वर्थसंग्रही १० संयन्ता सहदेवस्तु धौम्यो ब्रह्मविदुत्तमः । धर्मार्थकुशला चैव द्रौपदी धर्मचारिणी ११ अन्योन्यस्य प्रियाः सर्वे तथैव प्रियदर्शनाः । परैरभेद्याः संतुष्टाः को वो न स्पृहयेदिह १२ एष वै सर्वकल्याणः समाधिस्तव भारत । नैनं शत्रुर्विषहते शक्रेणापि समाप्युत १३ हिमवत्यनुशिष्टोसि मेरुसावर्णिना पुरा । द्वैपायनेन कृष्णेन नगरे वारणावते १४ भृगुतुङ्गे च रामेण दृषद्वत्यां च शंभुना। अश्रौषीरसितस्यापि महर्षेरञ्जनं प्रति १५ कल्माषीतीरमंस्थस्य गतस्त्वं शिष्यतां भृगोः । द्रष्टा सदा नारदस्ते धौम्यस्तेयं पुरोहितः १६ मा हासीः साम्पराये त्वं बुद्धिं तामृषिपूजिताम् । पुरूरवसमैलं त्वं बुद्ध्या जयसि पाण्डव १७ शक्त्या जयसि राज्ञोन्यानृषीन्धर्मोपसेवया । ऐन्द्रे जये धृतमना याम्ये कोपविधारणे १८ तथा विसर्गे कौबेरे वारुणे चैव संयमे ।

नाहीं ९. तूं धर्मवेत्ता असून अर्जुन युद्धामध्यें विजयी होणारा आहे व भीमसेन शत्रूंचा वध करणारा असून नकुल अर्थसंग्रह करणारा आहे १०. त्याचप्रमाणें सहदेव (उन्मार्गानें वागणाऱ्याला) अवरून धरणारा असून धौम्य ब्रह्मवेत्त्यांमध्यें श्रेष्ठ आहे आणि धर्मानें वागणारी द्रौपदी तर धर्म व अर्थ ह्या दोहोंमध्यें कुशल आहे ११. शिवाय तुह्मी सर्व परस्परांना प्रिय असल्यामुळें परस्परांच्या दर्शनानें आनंदित होणारे आहां आणि एकमेकांमध्यें शत्रूंना भेदभाव उत्पन्न करितां येणार नाहीं असे तुह्मी असून संतोषानें राहणारे आहां. तेव्हां, ह्या भूलोकामध्यें कोणाचें बरें मन तुमच्याकडे ओढणार नाहीं ? १२. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, (मनाची शांति ढळूं न देणें) हा तुझा नियम सर्व प्रकारच्या कल्याणाला कारणीभूत होणारा आहे व ह्यामुळें इंद्रासारखा जरी शत्रु असला तरी त्याचें कांहीं चालणार नाहीं १३. पूर्वी हिमालय पर्वतावर मेरुसावर्णीनें तुला उपदेश केला असून कृष्णद्वैपायनांनीं वारणावत नगरामध्यें तुला कांहीं सांगून ठेविलें आहे १४. त्याचप्रमाणें भृगुतुंग पर्वतावर परशुरामांचा तुला उपदेश झाला असून दृषद्वती नदीचे तिरीं शंकरानीं तुला कांहीं कथन केलेलें आहे आणि अंजनपर्वतावर असित महर्षींपासूनही तूं कांहीं श्रवण केलें आहेस १५. त्याचप्रमाणें कल्माषी नदीचे तीरीं असलेल्या भृगु महर्षीचें तूं शिष्यत्व स्वीकारिलेलें असून नारदमुनि सर्वदां तुला भेट देत असतात आणि हे धौम्यमुनि तर प्रत्यक्ष तुझे पुरोहितच आहेत १६. तस्मात्, ऋषींना मान्य असलेल्या पारलौकिक बुद्धीचा तूं त्याग करूं नकोस. हे पांडुपुत्रा, पारलौकिक बुद्धीमध्यें इलापुत्र पुरूरव्याला तूं मागें सारणारा आहेस १७; सामर्थ्यानें इतर राजांना तूं जिंकणारा आहेस; धर्माचरणामध्यें तर ऋषींनाही तुझी बरोबरी होणें दुर्घट आहे.

आत्मप्रदानं सौम्यत्वमद्भ्यश्चैवोपजीवनम् १९ भूमेः क्षमां च तेजश्च समग्रं सूर्यमण्डलात् । वायोर्बलं प्राप्नुहि त्वं भूतेभ्यश्चात्मसंपदम् २० अगदं वोस्तु भद्रं वो द्रष्टास्मि पुनरागतान् । आपद्धर्मार्थकृच्छ्रेषु सर्वकार्येषु वा पुनः २१ यथावत्प्रतिपद्येथाः काले काले युधिष्ठिर । आपृष्टोसीह कौन्तेय स्वस्ति प्राप्नुहि भारत २२ कृतार्थं स्वस्तिमन्तं त्वां द्रक्ष्यामः पुनरागतम् । न हि वो वृजिनं किंचिद्वेद कश्चित्पुरा कृतम् २३ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्तस्तथेत्युक्त्वा पाण्डवः सत्यविक्रमः । भीष्मद्रोणौ नमस्कृत्य प्रातिष्ठत युधिष्ठिरः २४ [२५६३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां० सभापर्वण्यनुद्यूतपर्वणि युधिष्ठिरवनप्रस्थानेष्टसप्ततितमोध्यायः ॥ ७८ ॥

वैशम्पायन उवाच ॥ तस्मिन्संप्रस्थिते कृष्णा पृथां प्राप्य यशस्विनीम् । आपृच्छद्भृशदुःखार्ता याश्चान्यास्तत्र योषितः १ यथार्हं वन्दना-

---

इंद्रापासून जय, यमापासून क्रोधसंयमन १८, कुबेरापासून दातृत्व व वरुणापासून वशीकरण हे गुण प्राप्त करून घेण्याकडे तुझ्या मनाचा कल असूं दे; सर्वांच्या हिताकरितां शरीराची हालचाल, सौम्यपणा व जीवनसाधनत्व हे गुण तूं जलापासून प्राप्त करून घे १९ आणि त्याचप्रमाणें भूमीपासून सहिष्णुता, सूर्यमंडलापासून सर्वप्रकारचें तेज, वायूपासून बल आणि आकाशापासून मनाची उदारता तूं प्राप्त करून घे २०. असो. आतां तुह्मांला सर्वदा आरोग्य प्राप्त होवो व तुमचें कल्याण असो. पुनरपि तुह्मी परत आला ह्मणजे मी तुह्मांला भेटेन. हे युधिष्ठिरा, विपत्तीमुळें प्राप्त होणारीं जीं धर्म व अर्थ एतद्विषयक संकटें तीं प्राप्त झालीं असतां अथवा कोणतेंही कार्य कर्तव्य असतां त्या त्या कालाला अनुसरून तूं वागत जा. हे कुंतीपुत्रा, आतां जा. हे भरतकुलोत्पन्ना, तुझें कल्याण असो २१,२२. आतां आह्मी तुला कृतार्थ व कुशल असा पुनरपि आलेला अवलोकन करूं. अरे, पूर्वी तुह्मीं कोणाचें वाईट केल्याविषयीं कोणालाही स्मरत नाहीं (तस्मात्, परत आल्यावर प्रजाजनांचें अंतःकरण तुमच्याकडेच ओढणार ह्याबद्दल मला मुळींच शंका नाहीं)२३. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें विदुरानें सांगितलें असतां पांडुपुत्र युधिष्ठिरानें त्याला " ठीक आहे " ह्मणून सांगितलें आणि नंतर तो अमोघपराक्रमी युधिष्ठिर भीष्म व द्रोणाचार्य ह्यांना नमस्कार करून अरण्यांत जाण्याकरितां निघाला २४. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील अनुद्यूतपर्वापैकीं युधिष्ठिर वनांत निघाल्याविषयीं अठ्याहत्तरावा अध्याय समाप्त झाला॥७८॥

वैशंपायन सांगतातः— तो युधिष्ठिर वनांत निघाला असतां यशस्विनी कुंतीकडे द्रौपदी गेली आणि (अत्यंत दुःखाकुल होऊन तिचा व इतरही तेथें असलेल्या

श्लेषान्कृत्वा गन्तुमियेष सा । ततो निनादः सुमहान्पाण्डवान्तःपुरेभवत् २ कुन्ती च भृशसंतप्ता द्रौपदीं प्रेक्ष्य गच्छतीम् । शोकविह्वलया वाचा कृच्छ्राद्वचनमब्रवीत् ३ वत्से शोको न ते कार्यः प्राप्येदं व्यसनं महत् । स्त्रीधर्माणामभिज्ञासि शीलाचारवती तथा ४ न त्वां संदेष्टुमर्हामि भर्तॄन्प्रति शुचिस्मिते । साध्वी गुणसमापन्ना भूषितं ते कुलद्वयम् ५ सभाग्याः कुरवश्चेमे ये न दग्धास्त्वयानघे । अरिष्टं व्रज पन्थानं मदनुध्यानबृंहिता ६ भाविन्यर्थे हि सत्स्त्रीणां वैकृतं नोपजायते । गुरुधर्माभिगुप्ता च श्रेयः क्षिप्रमवाप्स्यसि ७ सहदेवश्च मे पुत्रः सदावेक्ष्यो वने वसन् । यथेदं व्यसनं प्राप्य नायं सीदेन्महामतिः ८ तथेत्युक्त्वा तु सा देवी स्रवन्नेत्रजलाविला । शोणिताक्तैकवसना मुक्तकेशी विनिर्ययौ ९ तां क्रोशन्तीं पृथा दुःखादनुवव्राज गच्छतीम् । अथापश्यत्सुतान्सर्वान्हृताभरणवाससः १० रुरुचर्मावृ-

---

स्त्रियांचा निरोप घेऊं लागली १. नंतर योग्यतेप्रमाणें कोणाला वंदन करून व कांहींना कवटाळून ती जाऊं लागली असतां पांडवांच्या अंतःपुरामध्यें फारच मोठी रडारड सुरू झाली २. द्रौपदी निघालेली अवलोकन करून कुंतीलातर पराकाष्ठेचें दुःख झालें व शोकामुळें बोबडी वळून गेली असतां मोठ्या कष्टानें (तोंडांतून शब्द काढून) ती द्रौपदीला ह्मणाली ३ " मुलि, हें महासंकट प्राप्त झालें आहे ह्मणून तूं उगीच शोक करूं नको. तूं स्त्रीधर्म जाणणारी असून सुशीलपणा व सदाचरण ह्यांनीं संपन्न असल्यामुळें ४, हे सुहास्यवदने, भर्त्यां(शीं स्वतःची वागणूक ठेवण्या) संबंधानें तुला उपदेश करण्याचें मला कारण उरलें नाहीं. तूं साध्वी व गुणसंपन्न असल्यामुळें आपलीं दोन्हीं कुळें भूषित केलीं आहेस ५. हे निष्कलंक द्रौपदि, तुझ्या (कोपा) मुळें हे कौरव दग्ध झाले नाहींत हें त्यांचें भाग्यच समजलें पाहिजे. आतां माझ्या अभीष्टचिंतनाचें तुला पाठबळ असल्यामुळें मार्गांतून तूं निर्विघ्नपणें जा ६. अवश्य होणाऱ्या गोष्टीबद्दल साध्वी स्त्रिया दुःख करीत बसत नाहींत आणि त्यांतूनही महान् धर्मानें तुझें संरक्षण केलेलें आहे. करितां, लवकरच तूं ह्या संकटांतून मुक्त होशील ७. वनामध्यें वास्तव्य करीत असतांना माझ्या सहदेव पुत्राकडे तूं सर्वदां लक्ष्य ठेवीत जा. ह्मणजे ह्या महाबुद्धिमान् पुत्राचा, हें संकट प्राप्त झाल्यामुळें, धीर खचणार नाहीं " ८. ह्याप्रमाणें कुंतीनें सांगितलें असतां " होय " ह्मणून ती राजपत्नी द्रौपदी चालती झाली. त्यावेळीं नेत्रांतून एकसारख्या अश्रुधारा चालू असल्यामुळें तिचे सर्वांग भिजून गेलेलें होतें; रजस्वला असल्यामुळें केंस मोकळे होते व वस्त्रही एकच असून तेंही रक्ताचे डागपडलेलें असें होतें ९. असो. ह्याप्रमाणें द्रौपदी रडत रडत जाऊं लागली असतां कुंतीही जों

ततनून्ह्रिया किंचिदवाङ्मुखान् । परैः परीतान्संहृष्टैः सुहृद्भिश्चानुशोचितान् ११ तदवस्थान्सुतान्सर्वानुपसृत्यातिवत्सला । स्वजमानावदच्छोकात्तत्तद्विलपती बहु १२ कुन्त्युवाच ॥ कथं सद्धर्मचारित्रान्वृत्तस्थितिविभूषितान् । अक्षुद्रान्दृढभक्तांश्च दैवतेज्यापरान्सदा १३ व्यसनं वः समभ्यागात्कोयं विधिविपर्ययः । कस्यापध्यानजं चेदमागः पश्यामि वो धिया १४ स्यात्तु मद्भाग्यदोषोयं याहं युष्मानजीजनम् । दुःखायासभुजोत्यर्थं युक्तानप्युत्तमैर्गुणैः १५ कथं वत्स्यथ दुर्गेषु वने ऋद्धिविनाकृताः । वीर्यसत्त्वबलोत्साहतेजोभिरकृशाः कृशाः १६ यद्येतदेवमज्ञास्यं वने वासो हि वो ध्रुवम् । शतशृङ्गान्मृते पाण्डौ नागमिष्यं गजाह्वयम् १७ धन्यं वः पितरं मन्ये तपोमेधान्वितं तथा । यः पुत्राधिमसंप्राप्य स्वर्गेच्छामकरोत्प्रियाम् १८ धन्यां चातीन्द्रियज्ञानामिमां प्राप्तां

दुःखानें तिच्या मागोमाग गेली तों—ज्यांचीं वस्त्रें व भूषणें हिरावून घेतलेलीं आहेत, ज्यांचीं शरीरें मृगाजिनांनीं आच्छादिलेलीं आहेत, लाजेमुळें ज्यांचीं तोंडें किंचित् खालीं झालेलीं आहेत, ज्यांच्या सभोंवतीं आनंदित झालेल्या शत्रूंनीं गराडा घातलेला आहे आणि ज्यांच्याकरितां सुहृद शोक करीत आहेत असे—सर्व पुत्र तिच्या दृष्टीं पडले १०,११. तेव्हां त्या अवस्थेमध्यें असलेल्या सर्व पुत्रांच्या समीप जाऊन ती अतिदयालु कुंती त्यांना कवटाळूं लागली आणि नानाप्रकारचे विलाप करीत करीत त्यांना ह्मणाली १२. कुंती विलाप करितेः—उदार, दृढ भक्त, देवपूजनाविषयीं सर्वदां तत्पर, निश्चल, सद्वर्तनानें विभूषित आणि सद्धर्म व उत्कृष्ट चालरीत ह्यांनीं संपन्न असलेल्या तुह्मांवर हें संकट कसें रे ओढवलें! अरे! कोणरे हा दैवाचा फेरा तरी! कोणीरे वाईट चिंतिल्यामुळें तुमचें हें पातक उभें राहिलें ह्मणून मी आतां आपल्या मनाची समजूत करूं! १३,१४. तुह्मांला जन्म देणाऱ्या माझ्याच नशिबाचा तर हा दोष नसेल नां रे ! ह्मणूनच उत्कृष्ट गुणांनीं संपन्न असलेल्या तुह्मांला अतिशय दुःख व क्लेश भोगावे लागत आहेत! १५. वैभवहीन करून टाकिलेले तुह्मी वीर्य, धैर्य, बल, उत्साह व तेज ह्यांनीं जरी कृश नसला तरी शरीरानें कृश असतांना वनामध्यें बिकट प्रदेशांत कसेरे रहाल ! १६. तुमचें वास्तव्य वनामध्येंच निःसंशय होणार हें जर मला पूर्वीं समजलें असतें तर पांडु मरण पावल्यानंतर शतशृंगपर्वतापासून मी हास्तिनपुरांत आलेंच नसतें रे! १७. पुत्रविषयक दुःख प्राप्त झाल्यावांचून ज्याला स्वर्गास जाण्याची उत्कृष्ट इच्छा झाली तो तपस्वी व बुद्धिमान् पिता धन्य आहे असें मला वाटतें १८. त्याचप्रमाणें ।जिनें रति, मति व गति ह्यांसंबंधानें मला (फसवून पुत्रांना पुढें अशाप्रकारची विपत्ति भोगावी लागणार

परां गतिम् । मन्ये तु माद्रीं धर्मज्ञां कल्याणीं सर्वथैव तु १९ रत्या मत्या च गत्या च ययाहमभिसन्धिता । जीवितप्रियतां मह्यं धिङ्मां संक्लेशभागिनीम् २० पुत्रका न विहास्ये वः कृच्छ्रलब्धान्प्रियान्सतः । साहं यास्यामि हि वनं हा कृष्णे किं जहासि माम् २१ अन्तवत्यसुधर्मेऽस्मिन्धात्रा किं नु प्रमादतः । ममान्तो नैव विहितस्तेनायुर्न जहाति माम् २२ हा कृष्ण द्वारकावासिन्क्वासि संकर्षणानुज । कस्मान्न त्रायसे दुःखान्मां चेमांश्च नरोत्तमान् २३ अनादिनिधनं ये त्वामनुध्यायन्ति वै नराः । तांस्त्वं पासीत्ययं वादः स गतो व्यर्थतां कथम् २४ इमे सद्धर्ममाहात्म्ययशोवीर्यानुवर्तिनः । नार्हन्ति व्यसनं भोक्तुं नन्वेषां क्रियतां दया २५ सेयं नीत्यर्थविज्ञेषु भीष्मद्रोणकृपादिषु । स्थितेषु कुलनाथेषु कथमापदुपागता २६ हा पाण्डो हा महाराज क्वासि किं समुपेक्षसे । पुत्रान्विवास्यतः साधूनरिभिर्द्यूतनिर्जितान् २७ सहदेव निवर्तस्व ननु त्वमसि मे प्रियः । शरी-

---

असें समजून) सर्वोत्कृष्ट सतीच्या मार्गाचें अवलंबन केलें त्या भाग्यवती व अतींद्रियज्ञानी धर्मवेत्त्या माद्रीची तर सर्वस्वींच धन्य आहे असें मला वाटतें. धिक्कार असो ह्या क्लेश भोगीत असलेल्या मला आणि ह्या माझ्या जीवितेच्छेला ! १९, २०. मुलांनों, मोठ्या सायासानें तुह्मी मला प्राप्त झाला असून सज्जन असल्यामुळें मला प्रिय आहांतरे ! करितां, मी नाहींरे तुह्मांला सोडून राहणार. ही मी (तुमच्याच बरोबर) वनांत येतें ! हे कृष्णे द्रौपदि, तूं तरी कां गे मला सोडून जात आहेस ! २१. हें प्राणधारण नश्वर असतांनाही विधात्याच्या नजरचुकीनें माझा अंतकाल ठरविण्याचा राहून गेला ह्मणूनच रे माझें आयुष्य संपत नाहीं ! २२. हे कृष्णा ! हे द्वारकावासिन् कृष्णा ! कोठें आहेस रे ! हे बलरामाच्या कनिष्ठ भ्रात्या ! अरे ! मला व ह्या पुरुषश्रेष्ठांना कां रे तूं दुःखांतून तारीत नाहींस ! २३. अनादि आणि अनंत असलेल्या तुझें जें सर्वदां स्मरण करीत असतात त्यांचें तूं परिपालन करितोस हें साधु जनांचें ह्मणणें (ह्या प्रसंगीं) कसेंरे व्यर्थ झालें ! २४. अरे ! सद्धर्म, मोठेपणा, कीर्ति व वीर्य ह्यांनीं संपन्न असलेले हे माझे बालक संकट भोगण्यास योग्य नाहींत. तेव्हां खरोखर ह्यांची तुला दया येऊं दे रे ! २५. नीति व अर्थशास्त्र ह्या दोहोंमध्यें प्रवीण असलेले हे भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य वगैरे कुरुकुलनायक विद्यमान असतांनाच माझ्या बालकांवर हें संकट कोठून रे ओढवलें ! २६. हे पांडो ! हे महाराजा ! कोठें रे आहेस ! अरे ! शत्रूंनीं द्यूतामध्यें जिंकून तुझ्या गरीब पुत्रांना वनांत घालवून दिलें असतांना अजून रे कां तूं त्यांच्याविषयीं डोळेझांक करीत आहेस ! २७. हे सहदेवा ! बाळा तूं तरी परत फीर रे !

रादपि माद्रेय मां मा त्याक्षीः कुपुत्रवत् २८ व्रजन्तु भ्रातरस्तेमी यदि सत्याभिसन्धिनः । मत्परित्राणजं धर्ममिहैव त्वमवाप्नुहि २९ वैशम्पायन उवाच ॥ एवं विलपतीं कुन्तीमभिवाद्य प्रणम्य च । पाण्डवा विगतानन्दा वनायैव प्रवव्रजुः ३० विदुरश्चापि तामार्तां कुन्तीमाश्वास्य हेतुभिः । प्रावेशयद्गृहं क्षत्ता स्वयमार्ततरः शनैः ३१ धार्तराष्ट्रस्त्रियस्ताश्च निखिलेनोपलभ्य तत् । गमनं परिकर्षं च कृष्णाया द्यूतमण्डले ३२ रुरुदुः सुस्वनं सर्वा विनिन्दन्त्यः कुरून्भृशम् । दध्युश्च सुचिरं कालं करासक्तमुखाम्बुजाः ३३ राजा च धृतराष्ट्रस्तु पुत्राणामनयं तदा । ध्यायन्नुद्विग्नहृदयो न शान्तिमधिजग्मिवान् ३४ स चिन्तयन्ननेकाग्रः शोकव्याकुलचेतनः । क्षत्तुः संप्रेषयामास शीघ्रमागम्यतामिति ३५ ततो जगाम विदुरो धृतराष्ट्रनिवेशनम् । तं पर्यपृच्छत्संविग्नो धृतराष्ट्रो जनाधिपः ३६[२५९९]इति श्रीमहाभारते० सभापर्वण्यनुद्यूतपर्वणि द्रौपदीकुंतीसंवाद एकोनाशीतितमोऽध्यायः ॥७९॥

अरे ! तूं मला देहापेक्षां देखील रे प्रिय आहेस ! हे माद्रीपुत्रा, (अरे सापत्नमाता म्हणून) नको रें मला एकाद्या कुपुत्राप्रमाणें टाकून जाऊस ! २८. अरे ! हे तुझे बंधु मोठे सत्यवचनी असले तर त्यांनाच जाऊं दे रे ! तूं येथेंच राहून खरोखर माझ्या रक्षणाचें पुण्य जोडशील ! २९. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें कुंती विलाप करीत असतांना आनंदशून्य झालेले पांडव सांत्वनपूर्वक तिला प्रणाम करून वनाकडेच चालते झाले ३०. तेव्हां स्वतः अतिशयच दुःखित झालेल्या क्षत्त्या विदुरानें दैवाचें वगैरे प्राबल्य प्रतिपादन करणाऱ्या चार गोष्टी सांगून कुंतीचें सांत्वन केलें आणि हळू हळू तो तिला आपल्या घरीं घेऊन गेला ३१. द्यूतमंडलामध्यें द्रौपदीचें आकर्षण व तिचें गमन वगैरे तो घडलेला सर्व प्रकार संपूर्णपणें अवलोकन करून धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनप्रभृतींच्या सर्वही स्त्रिया कौरवांना पराकाष्ठेचे दोष देत देत मोठमोठ्यानें रडूं लागल्या आणि तोंडांवर हात देऊन पुष्कळ वेळ पर्यंत चिंताक्रांत झाल्या३२,३३.पुत्रांच्या दुर्वर्तनाचा धृतराष्ट्र विचार करूं लागला असतां " पुढें ह्याचा परिणाम आपल्याला वाईट होणार " म्हणून त्याचें अंतःकरण उद्विग्न होऊन त्याला एकसारखी तळमळ लागली ३४ आणि (भावी दुःखाच्या) शोकानें अंतःकरण व्याकुल होऊन तळमळ लागलेल्या त्या धृतराष्ट्र राजानें चिंताक्रांत असतांना " सत्वर ये " म्हणून विदुराला निरोप पाठविला३५. तेव्हां विदुर धृतराष्ट्राच्या घरीं गेला असतां उद्विग्न झालेल्या धृतराष्ट्र राजानें त्याला प्रश्न केला ३६. ह्याप्रमाणें० श्रीमहाभारतांतर्गत सभापर्वांतील अनुद्यूतपर्वापैकीं द्रौपदी व कुंती ह्यांच्या संवादाविषयीं एकुणऐंशीवा अध्याय समाप्त झाला ॥ ७९ ॥

वैशम्पायन उवाच ॥ तमागतमथो राजा विदुरं दीर्घदर्शिनम् । साशङ्क इव पप्रच्छ धृतराष्ट्रोम्बिकासुतः १ धृतराष्ट्र उवाच ॥ कथं गच्छति कौन्तेयो धर्मपुत्रो युधिष्ठिरः। भीमसेनः सव्यसाची माद्रीपुत्रौ च पाण्डवौ २ धौम्यश्चैव कथं क्षत्तर्द्रौपदी च यशस्विनी । श्रोतुमिच्छाम्यहं सर्वं तेषां शंस विचेष्टितम् ३ विदुर उवाच ॥ वस्त्रेण संवृत्य मुखं कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः। बाहू विशालौ संपश्यन्भीमो गच्छति पाण्डवः ४ सिकता वपन्सव्यसाची राजानमनुगच्छति । माद्रीपुत्रः सहदेवो मुखमालिप्य गच्छति ५ पांसूपलिप्तसर्वाङ्गो नकुलश्चित्तविह्वलः । दर्शनीयतमो लोके राजानमनुगच्छति ६ कृष्णा तु केशैः प्रच्छाद्य मुखमायतलोचना । दर्शनीया प्ररुदती राजानमनुगच्छति ७ धौम्यो रौद्राणि सामानि याम्यानि च विशांपते । गायन्गच्छति मार्गेषु कुशानादाय पाणिना ८ धृतराष्ट्र उवाच ॥ विविधानीह रूपाणि कृत्वा गच्छन्ति पाण्डवाः। तन्ममाचक्ष्व विदुर कस्मादेवं व्रजन्ति ते ९ विदुर उवाच ॥ निकृतस्यापि ते पुत्रैर्हृते राज्ये धनेषु च । न धर्माच्चलते

वैशंपायन सांगतातः—(निरोपाप्रमाणें) आलेल्या दूरदृष्टि विदुराला अंबिकापुत्र धृतराष्ट्रानें (मन खाऊं लागल्यामुळें) जरा भीतभीतच प्रश्न केला १. धृतराष्ट्र प्रश्न करितोः—हे विदुरा, कुंतीनंदन धर्मपुत्र युधिष्ठिर, भीमसेन, सव्यसाची अर्जुन, माद्रीपुत्र पांडुनंदन नकुलसहदेव, धौम्य आणि यशस्विनी द्रौपदी हीं कशीं कशीं वनांत गेलीं तें सर्व श्रवण करण्याची माझी इच्छा आहे. करितां, मनोरथसूचक असा त्यांचा जाण्याचा प्रकार कसा काय होता तो तूं मला सांग २,३. विदुर ह्मणतोः—कुंतीपुत्र युधिष्ठिर तोंडावर बुरखा घेऊन जात आहे; आपले विशाल बाहु अवलोकन करीत करीत पांडुपुत्र भीमसेन चालला आहे ४; सव्यसाची अर्जुन वाळू टाकीत टाकीत धर्मराजाच्या मागून गमन करीत आहे; माद्रीपुत्र सहदेव तोंडाला कांहीं फासून मार्गाचें आक्रमण करीत आहे ५; जगतामध्यें अत्यंत सुंदर असलेला आणि मनामध्यें विव्हल झालेला नकुल धुळीनें सर्वांग भरवून धर्मराजाच्या मागोमाग मार्गाचें अवलंबन करीत आहे ६; विशाल नयनांनीं युक्त असलेली सौंदर्यसंपन्न द्रौपदी केसांनीं मुख झांकून घेऊन धर्मराजाच्या मागोमाग रोदन करीत करीत मार्ग आक्रमीत आहे ७ आणि, हे प्रजाधिपते धृतराष्ट्र, हातामध्यें कुश घेऊन धौम्य मुनि यमदेवतेला उद्देशून असलेलीं व इतरही घोर सामें ह्मणत ह्मणत प्रयाण करीत आहेत ८. धृतराष्ट्र प्रश्न करितोः—हे विदुरा, नानाप्रकारचीं चिन्हें करून पांडव जात आहेत. तस्मात्, ह्याप्रमाणें ते कां जात आहेत हें तूं मला कथन कर ९. विदुर ह्मणतोः—तुझ्या पुत्रांनीं धर्मराजाला कपटानें जिंकून जरी राज्याचा व

बुद्धिर्धर्मराजस्य धीमतः १० योसौ राजा घृणी नित्यं धार्तराष्ट्रेषु भारत। निकृत्या भ्रंशितः क्रोधान्नोन्मीलयति लोचने ११ नाहं जनं निर्दहेयं दृष्ट्वा घोरेण चक्षुषा । स पिधाय मुखं राजा तस्माद्गच्छति पाण्डवः ॥ यथा च भीमो व्रजति तन्मे निगदतः शृणु १२ बाह्वोर्बले नास्ति समो ममेति भरतर्षभ । बाहू विशालौ कृत्वासौ तेन भीमोपि गच्छति १३ बाहू विदर्शयन्राजन्बाहुद्रविणदर्पितः । चिकीर्षन्कर्म शत्रुभ्यो बाहुद्रव्यानुरूपतः १४ प्रदिशञ्शरसंपातान्कुन्तीपुत्रोर्जुनस्तदा । सिकता वपन्सव्यसाची राजानमनुगच्छति १५ असक्ताः सिकतास्तस्य यथा संप्रति भारत । असक्तं शरवर्षाणि तथा मोक्ष्यति शत्रुषु १६ न मे कश्चिद्विजानीयान्मुखमद्येति भारत । मुखमालिप्य तेनासौ सहदेवोपि गच्छति १७ नाहं मनांस्याददेयं मार्गे स्त्रीणामिति प्रभो । पांसूपलिप्तसर्वाङ्गो नकुलस्तेन गच्छति १८ एकवस्त्रा प्ररुदती मुक्तकेशी रजस्वला । शोणितेनाक्तवसना द्रौपदी वाक्य-

---

सर्वप्रकारच्या संपत्तींचा अपहार केला तरी त्या विचारी धर्मराजाची बुद्धि धर्मापासून चळली नाहीं १०. हे भरतकुलोत्पन्ना धृतराष्ट्रा, तुझ्या पुत्रांचे ठिकाणीं सर्वदां दया करणारा जो धर्मराज त्याला कपटाचें अवलंबन करून तुझ्याच पुत्रांनीं सर्वस्वीं नागविलें ह्मणून क्रोधामुळें तो डोळे उघडीत नाहीं ११. सारांश. क्रोधयुक्त दृष्टीनें लोक दग्ध होण्यास आपण कारण न व्हावें एतदर्थ मुख आच्छादित करून पांडुपुत्र धर्मराजा जात आहे १२. आतां, भीम वर सांगितल्याप्रमाणें कां चालला आहे ह्याचें कारण मी सांगतों तें श्रवण कर. हे भरतवंशजश्रेष्ठा धृतराष्ट्रराजा, " बाहुबलामध्यें माझी बरोबरी करणारा कोणी नाहीं" असें समजून बाहुबलरूपसंपत्तीचा अभिमान बाळगणारा भीमसेन आपल्या बाहुबलरूप संपत्तीला योग्य असें कांहीं शौर्यकर्म शत्रूंशीं करण्याच्या इच्छेनें आपले विशाल दंड बाहेर काढून त्यांच्याकडे पहात पहात चालला आहे १३, १४. सव्यसाची कुंतीपुत्र अर्जुन, बाणवृष्टि दर्शविण्याकरितां वाळू टाकीत धर्मराजाच्या मागें माग गमन करीत आहे १५. सारांश, हे भरतकुलोत्पन्ना धृतराष्ट्रा, त्याचे वाळूचे खडे ज्याप्रमाणें सांप्रत अप्रतिहत पडत आहेत त्याचप्रमाणें शत्रूंवर तो अप्रतिहत बाणाचा वर्षाव करणार आहे १६. हे भरतकुलोत्पन्ना धृतराष्ट्रा, माझें मुख (अशा निकृष्ट अवस्थेंत) आज कोणाच्या दृष्टीं पडूंनये अशा हेतूनें सहदेवही तोंडाला कांहीं फासून जात आहे १७. हे प्रभो धृतराष्ट्रा, मार्गामध्यें स्त्रियांचें मन आपल्यावर जाऊं नयें एतदर्थ नकुल आपल्या सर्वांगाला धूळ लावून मार्गाचें आक्रमण करीत आहे १८. रजस्वला असल्यामुळें जिच्या शरीरावर एकच वस्त्र असून तेंही रक्तानें भरलेलें असें आहे अशी केंस मोकळे सोडून रडत रडत

मब्रवीत् १९ यत्कृतेहमिदं प्राप्ता तेषां वर्षे चतुर्दशे । हतपत्यो हतसुता हत-
बन्धुजनप्रियाः २० बहुशोणितदिग्धाङ्ग्यो मुक्तकेश्यो रजस्वलाः । एवं
कृतोदका भार्याः प्रवेक्ष्यन्ति गजाह्वयम् २१ कृत्वा तु नैर्ऋतान्दर्भान्धीरो
धौम्यः पुरोहितः । सामानि गायन्याम्यानि पुरतो याति भारत २२ हतेषु
भरतेष्वाजौ कुरूणां गुरवस्तदा । एवं सामानि गास्यन्तीत्युक्त्वा धौम्योपि
गच्छति २३हा हा गच्छति नो नाथाः समवेक्षध्वमीदृशम् । अहो धिक्कु-
रुवृद्धानां बालानामिव चेष्टितम् २४ राष्ट्रेभ्यः पाण्डुदायादाल्लोँभान्निर्वा-
सयन्ति ये । अनाथाः स्म वयं सर्वे वियुक्ताः पाण्डुनन्दनैः २५ दुर्विनीतेषु
लुब्धेषु का प्रीतिः कौरवेषु नः । इति पौराः सुदुःखार्ताः क्रोशन्ति स्म पुनः
पुनः २६ एवमाकारलिङ्गैस्ते व्यवसायं मनोगतम् । कथयन्तश्च कौन्तेया वनं
जग्मुर्मनस्विनः २७ एवं तेषु नराग्र्येषु निर्यत्सु गजसाह्वयात् । अनभ्रे विद्यु-
तश्चासन्भूमिश्च समकम्पत २८ राहुरग्रसदादित्यमपर्वाणि विशांपते । उल्का

जाणारी जी द्रौपदी तिनें तर असें बोलूनच दाखवि(ल्यासारिखें के)लें १९ कीं " ज्यांच्यामुळें मला हें दुःख प्राप्त झालें आहे त्यांच्या भार्या आजपासून चवदाव्या वर्षी रजस्वला असतानांच त्यांचे पति, पुत्र, बंधु व सुहृद् ह्या सर्वांचा वध होईल व अंगाला पुष्कळच रक्त लागलेलें आहे अशा त्या स्त्रिया आपआपल्या नवऱ्याच्या वगैरे नांवानें आंगें धुऊन असेच केंस मोकळे असतांना हास्तिनपुरामध्यें प्रवेश करितील " २०,२१. हे भरतकुलोत्पन्ना धृतराष्ट्रा, धर्मराजाचें पुरोहित विद्वान् धौम्य मुनि निर्ऋति दिशेस दर्भ टाकून यमदेवतोद्देशक सामें ह्मणत ह्मणत पुढें चालले आहेत २२. सारांश, भरतकुलोत्पन्न कौरवांचा संग्रामामध्यें वध झाल्यावर कौरवांचे गुरु ह्याचप्रमाणें सामें ह्मणतील असें दर्शवून धौम्य मुनिही प्रयाण करीत आहेत २३. " अरेरे ! आमचे हे नाथ पांडव अशाप्रकारचें संकट प्राप्त होऊन अरण्यांत चालले आहेत ते पहा. अहो, राज्याच्या लोभानें जे पांडुपुत्रांना हाकून देत आहेत त्या ह्या बालांप्रमाणें असलेल्या कुरुवृद्धांच्या करण्याला धिक्कार असो. पांडुपुत्रांचा वियोग झाल्यामुळें आह्मी सर्व अनाथ झालों आहोंत २४,२५. अहो, दुर्वर्तनी आणि लुब्ध अशा ह्या कौरवांमध्यें राहण्यास आमचें मन कोठून प्रशस्त असणार ? " ह्याप्रमाणें नगरवासी लोक अत्यंत दुःखाकुल होऊन वारंवार आक्रोश करूं लागले २६. असो. ह्याप्रकारच्या चिन्हांच्या योगानें आपल्या मनांतील निश्चय दर्शवीत ते विचारी कुंतीपुत्र पांडव वनांत चालले २७. ह्याप्रमाणें ते पुरुषश्रेष्ठ हास्तिनपुरांतून निघून जाऊं लागले असतां मेघ नसतांनाच विजा चमकूं लागून धरणीकंप होऊं लागला २८. त्याचप्रमाणें, हे प्रजाधिपते धृतराष्ट्रराजा, पर्व

चाप्यपसव्येन पुरं कृत्वा व्यशीर्यत २९ प्रत्याहरन्ति क्रव्यादा गृध्रगोमायुवायसाः । देवायतनचैत्येषु प्राकाराट्टालकेषु च ३० एवमेते महोत्पाताः प्रादुरासन्दुरासदाः । भरतानामभावाय राजन्दुर्मन्त्रिते तव ३१ वैशम्पायन उवाच ॥ एवं प्रवदतोरेव तयोस्तत्र विशांपते । धृतराष्ट्रस्य राज्ञश्च विदुरस्य च धीमतः ३२ नारदश्च सभामध्ये कुरूणामग्रतः स्थितः । महर्षिभिः परिवृतो रौद्रं वाक्यमुवाच ह ३३ इतश्चतुर्दशे वर्षे विनङ्क्ष्यन्तीह कौरवाः । दुर्योधनापराधेन भीमार्जुनबलेन च ३४ इत्युक्त्वा दिवमाक्रम्य क्षिप्रमन्तरधीयत । ब्राह्मीं श्रियं सुविपुलां बिभ्रद्देवर्षिसत्तमः ३५ ततो दुर्योधनः कर्णः शकुनिश्चापि सौबलः । द्रोणं द्वीपममन्यन्त राज्यं चास्मै न्यवेदयन् ३६ अथाब्रवीत्ततो द्रोणो दुर्योधनममर्षणम् । दुःशासनं च कर्णं च सर्वानेव च भारतान् ३७ अवध्यान्पाण्डवान्प्राहुर्देवपुत्रान्द्विजातयः । अहं वै शरणं प्राप्तान्वर्तमानो यथाबलम् ३८ गन्ता सर्वात्मना भक्त्या धार्तराष्ट्रान्सराजकान् । नोत्सहेयं परित्यक्तुं दैवं हि बल-

---

नसतांनाच सूर्याला ग्रहण लागलें आणि (अरिष्टसूचक अशी एक) ज्वाला नगराभोंवती उलटी फिरून नाहींशी झाली २९. गृध्र, जंबूक, काक वगैरे मांसभक्षक पक्षी देवालयें, मार्गासमीप असलेले वृक्ष, प्राकार आणि गच्चा ह्यांवर बसून भयसूचक ध्वनि करीत आहेत ३०. असो. हे राजा, तूं वाईट सल्ला दिल्यामुळें भरतवंशजांचा क्षय सुचविणारे आणि टळण्यास दुर्घट असलेले असे हे मोठमोठे उत्पात पांडव वनांत जाऊं लागले असतां झाले ३१. वैशंपायन सांगतातः—हे प्रजाधिपते जनमेजया, ह्याप्रमाणें धृतराष्ट्राच्या घरीं राजा धृतराष्ट्र आणि विवेकी विदुर ह्या उभयतांचा संवाद चालला असतां ३२ कौरवांच्या सभेमध्यें महर्षींनीं परिवेष्टित आणि अत्यंत विपुल ब्रह्मतेज धारण करीत असून अग्रस्थानीं विराजमान असलेल्या देवर्षिश्रेष्ठ नारदमुनींनीं " दुर्योधनाच्या अपराधामुळें भीमार्जुनांच्या बलानें आजपासून चवदाव्या वर्षीं ह्या भूतलावर कौरवांचा क्षय होईल " असें भयंकर भाषण केलें व स्वर्गमार्गाचें अवलंबन करून ते सत्वर अंतर्धान पावले ३३,३४,३५. तदनंतर दुर्योधन, कर्ण व सुबलपुत्र शकुनि ह्यांनीं द्रोणाचार्य आपल्याला आश्रयभूत आहेत असें समजून त्यांना राज्य अर्पण केलें ३६. तेव्हां, परोत्कर्षासहिष्णु दुर्योधन, दुःशासन, कर्ण व इतरही सर्व भरतवंशीय कौरव ह्यांना द्रोणाचार्य ह्मणाले ३७ " अहो, देवपुत्र पांडव अवध्य ह्मणून द्विजांनीं सांगून ठेविलें आहे आणि मी तर शरण आलेल्यांना यथाशक्ति साहाय्य करणारा आहें ३८. तस्मात्, राजांसहवर्तमान भक्तीनें मला शरण आलेल्या धृतराष्ट्रपुत्रांच्या मनाप्रमाणें मी

वत्तरम् ३९ धर्मतः पाण्डुपुत्रा वै वनं गच्छन्ति निर्जिताः । ते च द्वादश वर्षाणि वने वत्स्यन्ति पाण्डवाः ४० चरितब्रह्मचर्याश्च क्रोधामर्षवशानुगाः। वैरं निर्यातयिष्यन्ति महद्दुःखाय पाण्डवाः ४१ मया च भ्रंशितो राजन्द्रुपदः सखिविग्रहे । पुत्रार्थमयजद्राजा वधाय मम भारत ४२ याजोपयाजतपसा पुत्रं लेभे स पावकात् । धृष्टद्युम्नं द्रौपदीं च वेदीमध्यात्सुमध्यमा ४३ धृष्टद्युम्नस्तु पार्थानां श्यालः संबन्धतो मतः । पाण्डवानां प्रियरतस्तस्मान्मां भयमाविशत् ४४ ज्वालावर्णो देवदत्तो धनुष्मान्कवची शरी । मर्त्यधर्मतया तस्माद्य मे साध्वसो महान् ४५ गतो हि पक्षतां तेषां पार्षतः परवीरहा । रथातिरथसङ्ख्यायां योग्रणीरर्जुनो युवा ४६ सृष्टप्राणो भृशतरं तेन चेत्संगमो मम । किमन्यद्दुःखमधिकं परमं भुवि कारवाः ४७ धृष्टद्युम्नो द्रोणमृत्युरिति विप्रथितं वचः। मद्वधाय श्रुतोप्येष लोके चाप्यतिविश्रुतः ४८

पूर्णपणें वागेन. ह्यांचा त्याग करण्याची माझी इच्छा नाहीं. कारण, दैव बलवत्तर आहे ३९. द्यूतामध्यें पराजित झालेले पांडुपुत्र धर्माकडे लक्ष्य देऊन वनामध्यें जात आहेत आणि ते पांडव (वचनाप्रमाणें) बारा वर्षें वनांत वास्तव्यही करणार आहेत ४०. परंतु, क्रोध व असह्यता ह्यांनीं व्याप्त झालेले ते पांडव ब्रह्मचर्यानें वनामध्यें राहून ह्या महावैराचा सूड उगवितील आणि त्यांपासून तुह्मांला दुःख होईल ४१. हे भरतकुलोत्पन्ना दुर्योधनराजा, मित्राशीं युद्ध करून त्या युद्धामध्यें द्रुपदराजाला मीं राज्यापासून पदच्युत केला असल्यामुळें त्यानें माझ्यावधार्थ पुत्र उत्पन्न होण्याकरितां याग केला ४२ आणि याज व उपयाज ह्या मुनींच्या तपानें अग्नीपासून त्याला धृष्टद्युम्न नांवाचा पुत्र व वेदीमधून सौंदर्यसंपन्न द्रौपदी अशीं दोन अपत्यें प्राप्त झालीं ४३. असो. धृष्टद्युम्न हा पांडवांचा श्याल असून संबंधी असल्यामुळें त्यांना अभिमतही आहे आणि शिवाय पांडवांचें प्रिय करण्याविषयीं तो तत्परही आहे. ह्यास्तव, त्याची मला भीति वाटत आहे ४४. सारांश, धनुर्बाण व कवच ह्यांसहवर्तमान देवांनीं दिलेला व अग्निज्वालेप्रमाणें तेजस्वी असलेला हा धृष्टद्युम्न मनुष्यरूपानें आज मला मोठें मूर्तिमंत भयच होऊन राहिला आहे ४५ व शत्रूकडील वीरांचा निष्पात करणारा तो धृष्टद्युम्न त्यांच्या पक्षालाही जाऊन मिळालेला आहे. रथी व अतिरथी ह्यांच्या समुदायामध्यें अग्रगण्य असलेला जो तरुण अर्जुन ४६ त्याच्याशीं जर माझा अत्यंत प्राणनिरपेक्ष असा संग्राम होणें असेल तर, हे कौरवहो, ह्यापेक्षां अधिक पराकाष्ठेचें तें काय दुःख ह्या जगतामध्यें आहे ? ४७. धृष्टद्युम्न द्रोणाचा मृत्यु ही ह्मण प्रसिद्ध आहे; माझ्या वधाकरितां उत्पन्न झाल्याचें त्याला स्वतःलाही श्रुत आहे आणि

सोयं नूनमनुप्राप्तस्त्वत्कृते काल उत्तमः । त्वरितं कुरुत श्रेयो नैतदेतावता कृतम् ४९ मुहूर्तं सुखमेवैतत्तालच्छायेव हैमनी । यजध्वं च महायज्ञैर्भोगानश्नीत दत्त च ५० इतश्चतुर्दशे वर्षे महत्प्राप्स्यथ वैशसम् । द्रोणस्य वचनं श्रुत्वा धृतराष्ट्रोब्रवीदिदम् ५१ सम्यगाह गुरुः क्षत्तरुपावर्तय पाण्डवान् ५२ यदि ते न निवर्तन्ते सत्कृता यान्तु पाण्डवाः । सशस्त्ररथपादाता भोगवन्तश्च पुत्रकाः ५३ [२६४४] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां० सभापर्वण्यनुद्यूतपर्वणि विदुरधृतराष्ट्रद्रोणवाक्य अशीतितमोध्यायः॥८०॥

वैशम्पायन उवाच॥ वनं गतेषु पार्थेषु निर्जितेषु दुरोदरे । धृतराष्ट्रं महाराज तदा चिन्ता समाविशत् १ तं चिन्तयानमासीनं धृतराष्ट्रं जनेश्वरम् । निःश्वसन्तमनेकाग्रमिति होवाच संजयः २ संजय उवाच ॥ अवाप्य वसुसंपूर्णां वसुधां वसुधाधिप । प्रव्राज्य पाण्डवान्राज्याद्राजन्किमनुशोचसि ३ धृतराष्ट्र उवाच ॥ अशोच्यत्वं कुतस्तेषां येषां वैरं भविष्यति । पाण्डवै-

---

जगतामध्येंही तो अतिशय विख्यात आहे ४८. तात्पर्य, तुझ्यामुळें हा मला परिणामकालच प्राप्त झालेला आहे. असो. तुह्मी आतां ज्याच्या योगानें कल्याण होईल असें काय तें सत्वर करा. पांडवांना वनांत पाठविण्यानें हें कल्याण झालें असें तुह्मी समजूं नका ४९. अरे, हेमंतऋतूंतील तालवृक्षाच्या छायेप्रमाणें हें करणें तुह्मांला क्षणमात्रच सुखकारक होणार आहे. ह्यास्तव, तुह्मांला जो कांहीं उपभोग घेणें असेल, जे कांहीं यज्ञ कर्तव्य असतील आणि जीं कांहीं दानें द्यावयाचीं असतील तें सर्व तुह्मी सत्वर उरकून घ्या ५०. कारण, आजपासून चवदाव्या वर्षी तुह्मांला मोठें भय प्राप्त होईल " ५१. ह्याप्रमाणें द्रोणाचार्यांचें भाषण श्रवण केल्यावर (पुनरपि पुत्रांच्या कल्याणाकारितां तळमळत असलेला) धृतराष्ट्र ह्मणाला " हे विदुरा, द्रोणाचार्यांनीं यथार्थ भाषण केलें आहे. तस्मात् , तूं आतां पांडवांना परत आण ५२. जर ते परत येत नसले तर त्या पुत्रासमान असलेल्या पांडवांना शस्त्रें, रथ, पायदळ व नानाप्रकारच्या भोग्य वस्तु बरोबर घेऊन सत्कारपूर्वक तरी अरण्यांत जाऊं द्या ५३. ह्याप्रमाणें ०सभापर्वांतील अनुद्यूतपर्वापैकीं विदुर, धृतराष्ट्र व द्रोणाचार्य ह्यांच्या संवादाविषयीं ऐंशीवा अध्याय समाप्त झाला ॥८०॥

वैशंपायन सांगतातः— हे महाराज जनमेजया, द्यूतामध्यें पांडव पराजित होऊन वनांत गेले असतां धृतराष्ट्र चिंताक्रांत झाला १. तेव्हां मन अस्वस्थ होऊन दीर्घ सुस्कारे टाकीत टाकीत चिंताग्रस्त होऊन बसलेल्या त्या धृतराष्ट्र राजाला संजय ह्मणाला २ " हे पृथ्वीपते धृतराष्ट्रराजा, पांडवांना राज्यापासून भ्रष्ट करून वनांत घालविले असतां आणि ह्या रीतीनें द्रव्यानें भरलेली पृथ्वी संपूर्ण तुला प्राप्त झाली असतां तूं आतां खेद

युद्धशौण्डैर्हि बलवद्भिर्महारथैः ४ संजय उवाच ॥ तवेदं सुकृतं राजन्महद्वैरमुपस्थितम् । विनाशो येन लोकस्य सानुबन्धो भविष्यति ५ वार्यमाणो हि भीष्मेण द्रोणेन विदुरेण च । पाण्डवानां प्रियां भार्यां द्रौपदीं धर्मचारिणीम् ६ प्राहिणोदानयेहेति पुत्रो दुर्योधनस्तव । सूतपुत्रं सुमन्दात्मा निर्लज्जः प्रातिकामिनम् ७ यस्मै देवाः प्रयच्छन्ति पुरुषाय पराभवम् । बुद्धिं तस्यापकर्षन्ति सोवाचीनानि पश्यन्ति ८ बुद्धौ कलुषभूतायां विनाशे समुपस्थिते । अनयो नयसङ्काशो हृदयान्नापसर्पति ९ अनर्थाश्चार्थरूपेण अर्थाश्चानर्थरूपिणः । उत्तिष्ठन्ति विनाशाय नूनं तच्चास्य रोचते १० न कालो दण्डमुद्यम्य शिरः कृन्तति कस्यचित् । कालस्य बलमेतावद्विपरीतार्थदर्शनम् ११ आसादितमिदं घोरं तुमुलं लोमहर्षणम् । पाञ्चालीमपकर्षद्भिः सभामध्ये तपस्विनीम् १२ अयोनिजां रूपवतीं कुले जातां विभावसोः । को नु तां सर्वधर्मज्ञां परिभूय यशस्विनीम् १३ पर्यानयेत्सभामध्ये विना दुर्द्यूतदेविनम् । स्त्रीध-

---

कां करीत आहेस ? ३. धृतराष्ट्र ह्मणतोः— युद्धामध्यें निपुण, बलाढ्य व महारथी अशा पांडवांशीं ज्यांचें वैर असेल त्यांना दुःखरहित अवस्था कोठून असणार ? ४. संजय ह्मणतोः— हे राजा, पांडवांशीं प्रचंड वैर उपस्थित झालें हा तुझ्या पुण्याचा प्रताप बरें ! आतां ह्याच्या योगानें परिवारासहवर्तमान पृथ्वींतील सर्व राजांचा क्षय होईल ५. अरे, भीष्म, द्रोणाचार्य व विदुर " नको नको " ह्मणत असतांना तुझ्या निर्लज्ज दुर्योधन पुत्रानें " सभेमध्यें आण " ह्मणून सूतपुत्र प्रातिकामीला पांडवांची प्रिय भार्या जी धर्मचारिणी द्रौपदी तिच्याकडे पाठविला ६, ७. ज्याचा नाश करण्याचें देवांच्या मनांत आलें असेल त्याच्या बुद्धीला ते भ्रंश पाडितात, देवांनीं बुद्धीला भ्रंश पाडिला असतां विपरीत प्रकार त्याच्या मनामध्यें येऊं लागतात ८ आणि विनाशकाल समीप आल्यामुळें बुद्धीला एकदां भ्रंश पडला ह्मणजे न्याय्य प्रकाराप्रमाणें भासमान होणारी अन्यायाची गोष्ट मनांतून जात नाहीं ९. सारांश, अनर्थ अर्थरूपानें भासूं लागून अर्थ अनर्थ वाटूं लागतात व हाच प्रकार पुरुषाला रुचूं लागून परिणामीं त्याच्या नाशाला कारणीभूत होतो १०. (अरे) काल कांहीं प्रत्यक्ष शस्त्र उगारून कोणाचा शिरश्छेद करीत नाहीं. विपरीत प्रकार खरा भासविणें हेंच कालाचें बल होय ११. तपोनिष्ठ पांचालीला सभेमध्यें ओढून आणणाऱ्यांनीं अंगावर कांटा आणणारें असें हें घन घोर संकट आपल्यावर ओढून आणिलें आहे १२. अरे मर्यादेचें अतिक्रमण करून जो द्यूत खेळणारा असेल त्यावांचून अयोनिसंभव, अग्निस्थानापासून उत्पन्न झालेली, सर्वधर्म जाणणारी आणि यशस्विनी अशी जी सौंदर्यसंपन्न द्रौपदी तिला सभेमध्यें कोण बरें आणणार आहे ? रजस्वला असल्यामुळें

र्मिणी वरारोहा शोणितेन परिप्लुता १४ एकवस्त्राथ पाञ्चाली पाण्डवान-
भ्यवैक्षत। हृतस्वान्हृतराज्यांश्च हृतवस्त्रान्हृतश्रियः १५ विहीनान्सर्वकामेभ्यो
दासभावमुपागतान् । धर्मपाशपरिक्षिप्तानशक्तानिव विक्रमे १६ क्रुद्धां
चानर्हतीं कृष्णां दुःखितां कुरुसंसदि। दुर्योधनश्च कर्णश्च कटुकान्यभ्यभाष-
ताम् १७ इति सर्वमिदं राजन्नाकुलं प्रतिभाति मे। धृतराष्ट्र उवाच॥ तस्याः
कृपणचक्षुर्भ्यां प्रदह्येतापि मेदिनी १८ अपि शेषं भवेदद्य पुत्राणां मम संजय।
भरतानां स्त्रियः सर्वा गान्धार्या सह सङ्गताः १९ प्राक्रोशन्भैरवं तत्र दृष्ट्वा
कृष्णां सभागताम्। धर्मिष्ठां धर्मपत्नीं च रूपयौवनशालिनीम् २० प्रजाभिः
सह संगम्य ह्यनुशोचन्ति नित्यशः। अग्निहोत्राणि सायाह्ने न चाहूयन्त
सर्वशः २१ ब्राह्मणाः कुपिताश्चासन्द्रौपद्याः परिकर्षणे। आसीन्निष्ठानको
घोरो निर्घातश्च महानभूत् २२ दिव उल्काश्चापतन्त राहुश्चार्कमुपाग्र-
सत्। अपर्वणि महाघोरं प्रजानां जनयन्भयम् २३ तथैव रथशालासु प्रादु-
रासीद्धुताशनः। ध्वजाश्चापि व्यशीर्यन्त भरतानामभूतये २४ दुर्योधनस्या-

---

शोणितानें परिप्लुत असून एकवस्त्रा असलेली ती सुंदरी पांचाली (सभेमध्यें ओढून आणि-
ल्यावर) पांडवांकडे पाहूं लागली असतां द्रव्य, राज्य, वैभव, वस्त्रें व सर्वप्रकारच्या भोग्य
वस्तु ह्यांचा अपहार होऊन दासत्व प्राप्त झालेले आणि धर्मपाशानें बद्ध असल्यामुळें परा-
क्रम करण्यास (समर्थ असूनही) असमर्थांसारखे झालेले पांडव तिच्या दृष्टीं पडले १३,
१४,१५,१६. तेव्हां क्रुद्ध व दुःखाकुल झालेल्या द्रौपदीला कटुभाषणें करणें योग्य नस-
तांनाही कौरवांच्या भरसभेमध्यें दुर्योधन व कर्ण ह्या उभयतांनीं तिला उद्देशून कर्णकटु
भाषणें केलीं १७. तात्पर्य, हे राजा, मला हा सर्व प्रकार कांहीं विपरीत दिसत आहे.
धृतराष्ट्र ह्मणतोः—त्या द्रौपदीच्या सक्रोध दृष्टीनें पृथ्वी सुद्धां दग्ध होऊन जाईल!१८.
हे संजया, आतां माझ्या पुत्रांपैकीं कोणी अवशिष्ट राहील कां रे? कारण, द्रुपदकन्या
कृष्णा सभेंत गेलेली अवलोकन केल्याबरोबर भरतवंशज कौरवांच्या सर्व स्त्रिया गांधारी-
सहवर्तमान एकत्र जुळून त्या ठिकाणीं भयंकरच आक्रोश करूं लागल्या आणि प्रजाज-
नांची गांठ पडली असतां रूप व यौवन ह्यांनीं संपन्न असलेली जी धर्मनिष्ठ धर्मपत्नी द्रौपदी
तिला उद्देशून त्या अद्यापिही नित्य शोक करीत असतात. सायंकालीं अग्नीमध्यें हवन
केलें असतां त्याचें सर्वस्वीं हुत होत नाहीं १९,२०,२१. द्रौपदीला जेव्हां सभेमध्यें
ओढून नेली तेव्हां ब्राह्मण क्रुद्ध झाले; प्रचंड वायु वाहूं लागला, एकाएकीं विद्युल्लतेचा
मोठा शब्द झाला २२; आकाशापासून उल्कापात झाला; पर्व नसूनही सूर्याला ग्रहण
लागलें व प्रजेला अति घोर भय उत्पन्न होणार असल्याचें त्यानें सुचविलें २३; त्याचप्रमाणें

ग्निहोत्रे प्राक्रोशन्भैरवं शिवाः । तास्तदा प्रत्यभाषन्त रासभाः सर्वतो दिशः २५
प्रातिष्ठत ततो भीष्मो द्रोणेन सह संजय । कृपश्च सोमदत्तश्च बाह्लीकश्च महा-
मनाः २६ ततोहमब्रुवं तत्र विदुरेण प्रचोदितः । वरं ददानि कृष्णायै काङ्क्षितं
यद्यदिच्छति २७ अवृणोत्तत्र पाञ्चाली पाण्डवानामदासताम् । सरथान्सध-
नुष्कांश्चाप्यनुज्ञासिषमप्यहम् २८ अथाब्रवीन्महाप्राज्ञो विदुरः सर्वधर्मवित् ।
एतदन्तास्तु भरता यद्वः कृष्णा सभां गता २९ यैषा पाञ्चालराजस्य सुता
सा श्रीरनुत्तमा । पाञ्चाली पाण्डवानेतान्दैवसृष्टोपसर्पति ३० तस्याः पार्थाः
परिक्लेशं न क्षंस्यन्ते ह्यमर्षणाः । वृष्णयो वा महेष्वासाः पञ्चाला वा महा-
रथाः ३१ तेन सत्याभिसन्धेन वासुदेवेन रक्षिताः । आगमिष्यति बीभत्सुः
पञ्चालैः परिवारितः ३२ तेषां मध्ये महेष्वासो भीमसेनो महाबलः । आग-
मिष्यति धुन्वानो गदां दण्डमिवान्तकः ३३ ततो गाण्डीवनिर्घोषं श्रुत्वा
पार्थस्य धीमतः । गदावेगं च भीमस्य नालं सोढुं नराधिपाः ३४ तत्र मे रोचते

रथशालांमध्यें एकाएकीं अग्नि उत्पन्न झाला (आणि त्या रथशाला दग्ध होऊं लागल्या); भरतवंशजांचा पराभव सुचविण्याकरितां ध्वज एकाएकीं मोडून पडले २४; दुर्योधनाच्या गृह्याग्निसमीप भालूंनीं भयंकर शब्द केला व त्याचवेळीं गर्दभांनीं सर्व दिशेस प्रतिध्वनि करून त्यांना उत्तर दिलें २५ आणि असे उत्पात अवलोकन करून, हे संजया, द्रोणाचार्यांसहवर्तमान भीष्म, कृपाचार्य, सोमदत्त व उदारबुद्धि बाल्हीक हे सभेंतून उठून गेले २६. तेव्हां " द्रौपदीच्या इच्छेस येईल तो वर मी पांचालीला देतों " असें विदुराच्या सांगण्यावरून मी त्या ठिकाणीं बोललों असतां २७ " पांडव दास्यांतून मुक्त होऊन रथ व धनुष्य ह्यांसहवर्तमान असावेत " ह्मणून तिनें वर मागितला आणि मींही त्याला अनुमोदन दिलें २८. नंतर सर्वधर्मवेत्ता महाज्ञानी विदुर ह्मणाला " तुमच्या सभेमध्यें द्रुपदकन्या कृष्णा आली हाच भरतवंशजांच्या विनाशकालाचा आरंभ (असें तुह्मी समजा) २९. अरे जी ही पांचालदेशाधिपति द्रुपदराजाची कन्या ती प्रत्यक्ष अनुपम लक्ष्मीच आहे आणि ती देवानें उत्पन्न केलेली पांचाली आज ह्या पांडवांबरोबर वनांत जात आहे ३०. अपमान सहन न करणारे पांडवच नव्हे परंतु, महाधनुर्धारी वृष्णि अथवा महारथी पांचाल ह्यांनाही तिचे क्लेश सहन होणार नाहींत ३१. शिवाय त्या सर्वांचे सत्यप्रतिज्ञ श्रीकृष्ण रक्षण करीत आहेत. अर्जुन पंचालांनीं परिवेष्टित होऊन येईल ३२. त्याच्याच बरोबर दंड घेऊन येणारा साक्षात् मृत्युच कीं काय असा त्या पांचालांमध्यें तो महाधनुर्धारी व महाबलाढ्य भीमसेन गदा फिरवीत फिरवीत येईल ३३. तेव्हां बुद्धिमान् अर्जुनाच्या गांडीवाचा टणत्कार व भीमसेनाच्या गदेचे वेगा-

नित्यं पार्थैः साम न विग्रहः। कुरुभ्यो हि सदा मन्ये पाण्डवान्बलवत्तरान् ३५
तथा हि बलवान्राजा जरासंधो महाद्युतिः। बाहुप्रहरणेनैव भीमेन निहतो युधि
३६ तस्य ते शम एवास्तु पाण्डवैर्भरतर्षभ। उभयोः पक्षयोर्युक्तं क्रियतामवि-
शङ्कया ३७ एवं कृते महाराज परं श्रेयस्त्वमाप्स्यसि ३८ एवं गावल्गणे क्षत्ता
धर्मार्थसहितं वचः। उक्तवान्न गृहीतं वै मया पुत्रहितैषिणा ३९ [*२७६३]
[*११४७२] *इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां
सभापर्वण्यनुद्यूतपर्वणि धृतराष्ट्रसंजयसंवाद एकाशीतितमोऽध्यायः ॥८१॥
समाप्तं चानुद्यूतपर्व ॥ इति सभापर्व समाप्तम् ॥ अस्यानन्तरमारण्यकं
पर्व भविष्यति ॥ तस्यायमाद्यः श्लोकः ॥ जनमेजयउवाच ॥ एवं द्यूतजिताः
पार्थाः कोपिताश्च दुरात्मभिः। धार्तराष्ट्रैः सहामात्यैर्निकृत्या द्विजसत्तम ॥

मध्यें गुंगणें कानावर पडलें असतां कौरवपक्षीय भूपाल तो नाद श्रवण करण्यासही समर्थ होणार नाहींत ३४. ह्मणून, पांडवांशीं कलह न करितां सामोपचारानेंच वागावें असें मला नित्य वाटत असतें. कारण, कौरवांपेक्षां पांडवांना मी सर्वदां अधिक बलाढ्य समजत आहें ३५. अरे, ज्याचा दरारा फारच मोठा होता अशा महाबलाढ्य जरासंध राजाला मल्लयुद्धामध्यें बाहूंच्या तडाख्यासरसाच भीमसेनानें ठार केला ३६. तस्मात्, हे भरत-वंशजश्रेष्ठा धृतराष्ट्रा, (सर्वप्रकारें दुर्बल असलेल्या) त्या तुला पांडवांशीं सामोपचारानेंच वागणें योग्य आहे. अरे, असें करणें उभयपक्षांनाही हितावह होणारें आहे. करितां, मनामध्यें कांहीं एक शंका न धरितां तुह्मी पांडवांशीं शम करा ३७. हे महाराजा धृत-राष्ट्रा, असें केल्यानें तुझें पराकाष्ठेचें कल्याण होणारें आहे " ३८. ह्याप्रमाणें, हे गवल्गणपुत्रा संजया, धर्म व अर्थ ह्यांना अनुसरून असलेला उपदेश मला विदुरानें केला. परंतु, पुत्रांच्या (मर्जीप्रमाणें त्यांच्या) हिताची इच्छा धरणाऱ्या माझ्याहातून त्याचा स्वीकार झाला नाहीं ३९. ह्याप्रमाणें महामुनिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत सभा-पर्वांतील अनुद्यूतपर्वापैकीं धृतराष्ट्र व संजय ह्यांच्या संवादाविषयीं एक्यांयशीवा अध्याय संपूर्ण झाला ॥८१॥ ह्या ठिकाणीं अनुद्यूतपर्व संपूर्ण होऊन मुख्य सभापर्वही समाप्त झालें ॥ ह्यानंतर वनपर्व असून त्याचा प्रथम श्लोक "जनमेजय उवाच एवं द्यूत० सत्तम" असा आहे.

---

*सभापर्वांतील २०,२४,४१ व ६८ ह्या अध्यायांचे शेवटीं आणि आदिपर्वांतील ४८,७८, १३७,१३९ व १४७ ह्या अध्यायांचे शेवटीं दिलेल्या बेरजेंत चूक आहे ती दुरुस्त केली असतां सभापर्वांतील श्लोकसंख्या २७६३ आणि आदिपर्वांतील श्लोकसंख्या ८७०९ होत असल्यामुळें दोन्ही पर्वांतील मिळून श्लोकसंख्या ११४७२ होते. प्रत्येक पृष्ठांत ९श्लोक सरासरीनें भाषांतरासह बसतात.

॥ श्री : ॥

मराठी भाषांतरासह महाभारत.

४ विराटपर्व.

संपादक काशीनाथ वामन लेले.

वांई येथें, मोदवृत्त छापखान्यांत छापून आर्यधर्मदर्पण

मासिकपुस्तकद्वारा प्रसिद्ध केलें

शके १८२१

॥ श्रीः ॥

श्रीमहर्षिव्यासप्रणीतं

श्री महाभारतम् ।

४ विराटपर्व ।

श्रीगणेशाय नमः ॥ नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् । देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् १ जनमेजय उवाच ॥ कथं विराटनगरे मम पूर्वपितामहाः । अज्ञातवासमुषिता दुर्योधनभयार्दिताः २ पतिव्रता महाभागा सततं ब्रह्मवादिनी । द्रौपदी च कथं ब्रह्मन्नज्ञाता दुःखितावसत् ३ वैशम्पायन उवाच ॥ यथा विराटनगरे तव पूर्वपितामहाः । अज्ञातवासमुषितास्तच्छृणुष्व नराधिप ४ तथा स तु वराँल्लब्ध्वा धर्मो धर्मभृतां वरः । गत्वाश्रमं ब्राह्मणेभ्य आचख्यौ सर्वमेव तत् ५ कथयित्वा तु तत्सर्वं ब्राह्मणेभ्यो युधिष्ठिरः । अरणीसहितं तस्मै ब्राह्मणाय न्यवेदयत् ६ ततो युधिष्ठिरो राजा धर्मपुत्रो महामनाः । संनिवर्त्यानुजान्सर्वानिति

श्रीगणेशायनमः ॥ नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥ देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ १ ॥ जनमेजय प्रश्न करितोः—(हे वैशंपायन मुने) विराटनगरामध्यें माझे प्रपितामह दुर्योधनाच्या भीतीनें व्याकुल होऊन अज्ञातवासानें कसे राहिले ? २ आणि त्याचप्रमाणें, हे ब्रह्मनिष्ठ, महाभाग्यवती, नेहमीं ईश्वराचें नामस्मरण करणारी व पतिव्रता अशी जी दुःखाकुल झालेली द्रौपदी ती कोणाला न समजतां तेथें कशी राहिली ? ३. वैशंपायन सांगतातः—हे जनमेजयराजा, विराटनगरामध्यें तुझ्या प्रपितामहांनीं अज्ञातवास कसा केला तें तूं श्रवण कर ४. त्याप्रमाणें धर्मापासून वर प्राप्त झाल्यानंतर तो धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ धर्मराजा आश्रमामध्यें गेला आणि तें सर्व वृत्त त्यानें ब्राह्मणांना कळविलें ५; व ब्राह्मणांना तें सर्व वृत्त कळविल्यानंतर त्या (अग्निहोत्री)

ह्योवाच भारत ७ द्वादशेमानि वर्षाणि राज्यविप्रोषिता वयम् । त्रयोदशोयं संप्राप्तः कृच्छ्रात्परमदुर्वसः ८ स साधु कौन्तेय इतो वासमर्जुन रोचय । संवत्सरमिमं यत्र वसेमाविदिताः परैः ९ अर्जुन उवाच ॥ तस्यैव वरदानेन धर्मस्य मनुजाधिप । अज्ञाता विचरिष्यामो नराणां नात्र संशयः १० तत्र वासाय राष्ट्राणि कीर्तयिष्यामि कानिचित् । रमणीयानि गुप्तानि तेषां किंचित्स्म रोचय ११ सन्ति रम्या जनपदा बह्वन्नाः परितः कुरून् । पञ्चालाश्चेदिमत्स्याश्च शूरसेनाः पटच्चराः १२ दशार्णा नवराष्ट्राश्च मल्लाः शाल्वा युगन्धराः । कुन्तिराष्ट्रं च विपुलं सुराष्ट्रावन्तयस्तथा १३ एतेषां कतमो राजन्निवासस्तव रोचते । यत्र वत्स्यामहे राजन्संवत्सरमिमं वयम् १४ युधिष्ठिर उवाच ॥ श्रुतमेतन्महाबाहो यथा स भगवान्प्रभुः । अब्रवीत्सर्वभूतेशस्तत्तथा न तदन्यथा १५ अवश्यं त्वेव वासार्थं रमणीयं शिवं सुखम् । संमन्त्र्य सहितैः सर्वैर्वस्तव्यमकुतोभयैः १६ मत्स्यो विराटो बलवानभिरक्षोथ पाण्डवान् । धर्मशीलो

ब्राह्मणाला त्या दोन्ही अरणी त्यानें अर्पण केल्या ६. नंतर, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, धर्मपुत्र महाशय युधिष्ठिरराजा सर्व कनिष्ठ भ्रात्यांना एकत्र जुळवून ह्मणाला ७ "आह्मांला राज्यापासून च्युत होऊन हीं बारा वर्षे झालीं आणि हें तेरावें वर्ष आलें आहे. हें अज्ञातवासाच्या संकटामुळें निभणें फार कठीण आहे ८. ह्यास्तव, हे कुंतीपुत्रा अर्जुना, ज्या ठिकाणीं आपणांला हें वर्षभर दुसऱ्यांच्या समजण्यांत न येतां वास्तव्य करितां येईल असें ह्या स्थानाहून दुसरें चांगलें वसतिस्थान तुला कोणतें रुचत आहे? " ९. अर्जुन ह्मणतोः— हे प्रजाधिपते, त्या धर्माच्या वरप्रदानामुळेंच आपण लोकांच्या समजण्यांत न येतां राहूं ह्यांत संशय नाहीं १०. आतां, (गुप्तपणें) वास्तव्य करण्याकरितां मी आपणांला कांहीं गुप्त रमणीय राष्ट्रें कथन करितों त्यांपैकीं आपण एकादें पसंत करा ११. कुरुदेशाच्या आजुबाजूंना विपुल अन्नानें युक्त असे पंचाल, चेदी, मत्स्य, शूरसेन, पटच्चर, दशार्ण, नवराष्ट्र, मल्ल, शाल्व, युगंधर, विपुल, कुंतिराष्ट्र, सुराष्ट्र आणि अवंती हे रम्य देश आहेत १२, १३. ह्यांपैकीं, हे राजा, वास्तव्य करण्यास योग्य असा कोणता देश आपणांला पसंत पडत आहे (तो कळूं द्या); ह्मणजे, हे राजा, त्या ठिकाणीं वास्तव्य करून आपण हें वर्ष काढूं १४. युधिष्ठिर ह्मणतोः— हे महापराक्रमी अर्जुना, त्या सर्वभूताधिपति भगवान् प्रभु धर्मानें सांगितलेलें मीं ऐकिलें आहे व त्याच्या सांगण्याप्रमाणेंच तें सिद्धीस जाणार आहे. त्याचें तें वरप्रदान अन्यथा होणार नाहीं १५. तथापि, सर्वांना मिळून निर्भयपणें राहतां येईल असें एकादें रमणीय,

वदान्यश्च वृद्धश्च सततं प्रियः १७ विराटनगरे तात संवत्सरमिमं वयम्।
कुर्वन्तस्तस्य कर्माणि विहरिष्याम भारत १८ यानि यानि च कर्माणि
तस्य वक्ष्यामहे वयम् । आसाद्य मत्स्यं तत्कर्म प्रब्रूत कुरुनन्दनाः १९
अर्जुन उवाच ॥ नरदेव कथं तस्य राष्ट्रे कर्म करिष्यसि । विराटनगरे
साधो रंस्यसे केन कर्मणा २० मृदुर्वदान्यो ह्रीमांश्च धार्मिकः सत्यवि-
क्रमः । राजंस्त्वमापदा क्लिष्टः किं करिष्यसि पाण्डव २१ न दुःखमुचितं
किंचिद्राजा वेद यथा जनः । स इमामापदं प्राप्य कथं घोरां तरि-
ष्यसि २२ युधिष्ठिर उवाच ॥ शृणुध्वं यत्करिष्यामि कर्म वै कुरुनन्दनाः।
विराटमनुसंप्राप्य राजानं पुरुषर्षभाः २३ सभास्तारो भविष्यामि तस्य
राज्ञो महात्मनः । कङ्को नाम द्विजो भूत्वा मताक्षः प्रियदेवनः २४ वैडू-
र्यान्काञ्चनान्दान्तान्फलैर्ज्योतीरसैः सह । कृष्णाक्षाँल्लोहिताक्षांश्च निर्व-
र्त्स्यामि मनोरमान् २५ विराटराजं रमयन्सामात्यं सहबान्धवम् । न च

कल्याणप्रद आणि सुखावह स्थान ठरवून तेथें आपण अवश्य वास्तव्य केलेंच पाहिजे १६.
मत्स्यदेशाधिपति विराटराजा बलाढ्य, धर्मशील, उदार, वृद्ध आणि प्रजेला सतत प्रिय
असून पांडवांविषयीं प्रेम करणारा आहे १७. ह्यास्तव, बा भरतकुलोत्पन्ना अर्जुना, विराटाच्या
राजधानीमध्यें त्याचीं कामें करून हें वर्षभर आपण वास्तव्य करूं १८. तस्मात्, हे कुरुनंद-
नहो, त्या मत्स्यदेशाधिपतीकडे गेल्यावर त्याचीं कोणतीं कोणतीं कामें आपणांला
करितां येतील तें तुह्मी सांगा १९. अर्जुन प्रश्न करितोः— हे राजा, त्याच्या राष्ट्रा-
मध्यें आपण काय काम कराल? हे साधो, आपण कोणतें काम करून त्याच्या नगरा-
मध्यें आनंदानें दिवस काढाल ? २०. हे पांडुनंदन, भूपते, आपण सौम्य, उदार,
विनयशील, धार्मिक आणि खऱ्या रीतीनें वागणारे असून विपत्तीनें ग्रस्त झालेले
आहांत. तेव्हां, अशा अवस्थेमध्यें आपणांला काय बरें काम करितां येईल ? २१.
आपण राजे असल्यामुळें सामान्य जनांप्रमाणें दुःख अनुभविलेलें आपणांला ठाऊक
नाहीं. तस्मात्, आलेल्या ह्या घोर संकटांतून आपण कसे पार पडाल ? २२. युधि-
ष्ठिर ह्मणतोः—हे पुरुषश्रेष्ठ कुरुनंदनहो, विराटाकडे गेल्यावर मी काय काम करीन
तें तुह्मी श्रवण करा २३. मी आतां अक्षद्यूतांमध्यें निपुण झालों असून द्यूत मला
प्रियही आहे. ह्यास्तव, कंकनामक द्विज बनून मी त्या महात्म्या राजाचा (विनोदीमं-
डळांपैकीं) एक सभासद होईन २४. काळे व तांबडे डोळे ज्यांच्यावर काढिले
आहेत असे वैडूर्यरत्नांचे, सुवर्णाचे व हस्तिदंती मनोहर फांसे टाकून उत्कृष्ट रंगानें युक्त
अशा सोंगट्यांनीं मी खेळत जाईन २५ आणि अशा रीतीनें अमात्य व बांधव

मां वेत्स्यते कश्चित्तोषयिष्ये च तं नृपम् २६ आसं युधिष्ठिरस्याहं पुरा प्राणसमः सखा । इति वक्ष्यामि राजानं यदि मां सोनुयोक्ष्यते २७ इत्येतद्वो मयाख्यातं विहरिष्याम्यहं यथा ।वृकोदरविराटे त्वं रंस्यसे केन हेतुना २८ इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि पाण्डवप्रवेशपर्वणि युधिष्ठिरादिमन्त्रणे प्रथमोध्यायः ॥ १ ॥

भीमसेन उवाच ॥ पौरोगवो ब्रुवाणोहं बल्लवो नाम भारत । उपस्थास्यामि राजानं विराटमिति मे मतिः १ सूपानस्य करिष्यामि कुशलोस्मि महानसे । कृतपूर्वाणि यान्यस्य व्यञ्जनानि सुशिक्षितैः २ तान्यप्यभिभविष्यामि प्रीतिं संजनयन्नहम्।आहरिष्यामि दारूणां निचयान्महतोपि च ३ यत्प्रेक्ष्य विपुलं कर्म राजा संयोक्ष्यते स माम् । अमानुषाणि कुर्वाणस्तानि कर्माणि भारत ४ राज्ञस्तस्य परे प्रेष्या मंस्यन्ते मां यथा नृपम् । भक्ष्यान्नरसपानानां भविष्यामि तथेश्वरः ५ द्विपा वा बलिनो राजन्वृषभा वा महाबलाः । विनिग्राह्या यदि मया निग्रहीष्यामि

ह्यांसहवर्तमान विराटराजाची करमणूक करीत करीत मी त्या राजाला संतुष्टही करीन व असें चाललें असतांना कोणीही मला ओळखण्यास समर्थ होणार नाहीं २६. पूर्वी मी युधिष्ठिराचा अगदीं प्राणाप्रमाणें प्रिय मित्र होतों असें मी राजाला, त्यानें प्रश्न केल्यास सांगेन २७. असो. मी आपले दिवस कसे काढणार हें ह्याप्रमाणें तुह्मांला कथन केलें. आतां, हे भीमसेना, विराटापाशीं तूं कोणत्या रीतीनें आपले दिवस सुखानें काढणार हें कथन कर २८. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील पांडवप्रवेशपर्वसंबंधीं युधिष्ठिरादिकांच्या विचाराविषयीं पहिला अध्याय समाप्त झाला ॥ १॥

भीमसेन ह्मणतोः—हे भरतकुलोत्पन्ना, मी पौरोगव बल्लव आहें असें सांगून विराटराजाकडे जावें असें मला वाटतें १. मी त्याचे पाक तयार करीत जाईन. कारण, पाकशालेसंबंधीं कर्मांमध्यें मी निपुण आहें. त्याच्या निपुण आचाऱ्यांनीं ज्या कांहीं भाज्या वगैरे केल्या असतील त्यांना मी मागें टाकीन आणि त्या राजाची प्रीति संपादन करण्याकरितां मोठे मोठेही काष्ठांचे भारे मी घेऊन येत जाईन २,३. हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, माझें तें मोठें कर्म पाहून राजा मला मुख्पाकावर नेमील; मी तीं अमानुष कर्मे करूं लागलों असतां ४ राजाचे दुसरे सेवक मला पाकशालेवरील राजा समजतील आणि भक्ष्य, अन्नरस व पेयपदार्थ ह्यासंबंधानें मी तेथें अधिपतिही होईन ५. हे राजा, बलाढ्य गज आणि महाबलाढ्य बैल आंवरून धरण्याचा जर

तानपि ६ ये च केचिन्नियोत्स्यन्ति समाजेषु नियोधकाः । तानहं हि नियोत्स्यामि रतिं तस्य विवर्धयन् ७ न त्वेतान्युध्यमानान्वै हनिष्यामि कथंचन । तथैतान्पातयिष्यामि यथा यास्यन्ति न क्षयम् ८ आरालिको गोविकर्ता सूपकर्ता नियोधकः । आसं युधिष्ठिरस्याहमिति वक्ष्यामि पृच्छतः ९ आत्मानमात्मना रक्षंश्चरिष्यामि विशाम्पते । इत्येतत्प्रतिजानामि विहरिष्याम्यहं यथा १० युधिष्ठिर उवाच ॥ यमग्निर्ब्राह्मणो भूत्वा समागच्छन्नृणां वरम् । दिधक्षुः खाण्डवं दावं दाशार्हसहितं पुरा ११ महाबलं महाबाहुमजितं कुरुनन्दनम् । सोयं किं कर्म कौन्तेयः करिष्यति धनञ्जयः १२ योयमासाद्य तं दावं तर्पयामास पावकम् । विजित्यैकरथेनेन्द्रं हत्वा पन्नगराक्षसान् १३ वासुकेः सर्पराजस्य स्वसारं हृतवांश्च यः । श्रेष्ठो यः प्रतियोधानां सोर्जुनः किं करिष्यति १४ सूर्यः प्रतपतां श्रेष्ठो द्विपदां ब्राह्मणो वरः । आशीविषश्च सर्पाणामग्निस्तेजस्विनां वरः १५ आयुधानां वरं वज्रं ककुद्मी च गवां वरः । ह्रदानामुदधिः श्रेष्ठः पर्जन्यो

प्रसंग आली तर त्यांनाही मी आंवरून धरीन ६. त्याचप्रमाणें समाजामध्यें लढणारे जे कांहीं असतील त्यांच्याशींही मी, आपणांवर राजाची प्रीति अधिक बसण्याकरितां युद्ध करीत जाईन ७. परंतु, ते मल्ल युद्ध करूं लागले असतां कांहीं झालें तरी मी त्यांचा वध करणार नाहीं. ते मरणार नाहींत अशा रीतीनेंच मी त्यांना पाडीत जाईन ८; व मला कोणी विचारूं लागल्यास मत्त गजांना वठणीस आणणारा, माजलेल्या बैलांना जेरीस आणणारा, पाकनिष्पत्ति करणारा आणि मल्लयुद्ध करणारा ह्या नात्यानें मी युधिष्ठिराजवळ होतों असें त्याला सांगेन ९. सारांश, हे प्रजाधिपते, मोठ्या दक्षतेनें स्वतःचें रूप उघडकीस न आणूं देतां मी राहीन. असो. मी कशा रीतीनें राहणार तें ह्याप्रमाणें विश्वासानें सांगत आहें १०. युधिष्ठिर ह्मणतोः—जो महाबलाढ्य, महापराक्रमी, अजिंक्य व पुरुषश्रेष्ठ कुरुनंदन कृष्णासहवर्तमान असतांना पूर्वी खांडववन दग्ध करण्याच्या इच्छेनें अग्नि ब्राह्मणाचें रूप घेऊन त्याच्याकडे आला तो हा कुंतीपुत्र धनंजय काय काम करणार ? ११,१२. त्या खांडववनामध्यें गेल्यावर अप्रतिम रथाच्या साहाय्यानें इंद्राचा पराजय करून आणि पन्नगांचा व राक्षसांचा वध करून ज्यानें अग्नीला तृप्त केलें १३; सर्पराज वासुकीच्या भगिनीचें चित्त ज्यानें हरण केलें आणि समोरासमोर युद्ध करणाऱ्यांमध्यें जो श्रेष्ठ आहे तो अर्जुन काय काय करणार ? १४. प्रकाश पाडणाऱ्यांमध्यें सूर्य श्रेष्ठ आहे; मनुष्यांमध्यें ब्राह्मण वरिष्ठ आहे; सर्पांमध्यें आशीविष मुख्य आहे; तेजस्व्यांमध्यें अग्नि अधिक आहे १५; आयुधांमध्यें वज्र जास्त

वर्षतां वरः १६ धृतराष्ट्रश्च नागानां हस्तिष्वैरावणो वरः । पुत्रः प्रियाणामधिको भार्या च सुहृदां वरा १७ यथैतानि विशिष्टानि जात्यां जात्यां वृकोदर । एवं युवा गुडाकेशः श्रेष्ठः सर्वधनुष्मताम् १८ सोयमिन्द्रादनवरो वासुदेवान्महाद्युतिः । गाण्डीवधन्वा बीभत्सुः श्वेताश्वः किं करिष्यति १९ उषित्वा पञ्च वर्षाणि सहस्राक्षस्य वेश्मनि । अस्त्रयोगं समासाद्य स्ववीर्यान्मानुषाद्भुतम् ॥ दिव्यान्यस्त्राणि चाप्तानि देवरूपेण भास्वता २० यं मन्ये द्वादशं रुद्रमादित्यानां त्रयोदशम् । वसूनां नवमं मन्ये ग्रहाणां दशमं तथा २१ यस्य बाहू समौ दीर्घौ ज्याघातकठिनत्वचौ । दक्षिणे चैव सव्ये च गवामिव वहः कृतः २२ हिमवानिव शैलानां समुद्रः सरितामिव । त्रिदशानां यथा शक्रो वसूनामिव हव्यवाट् २३ मृगाणामिव शार्दूलो गरुडः पततामिव । वरः सन्नह्यमानानां सोर्जुनः किं करिष्यति २४ अर्जुन उवाच ॥ प्रतिज्ञां षण्ढकोस्मीति करिष्यामि महीपते । ज्याघातौ हि महान्तौ मे संवर्तुं नृप दुष्करौ २५ वलयैश्छादयिष्यामि बाहू किणकृताविमौ । कर्णयोः प्रति-

---

आहे; बैलांमध्यें वशिंड असणारा बैल उत्तम आहे; जलाशयांमध्यें सागर वरचढ आहे; वृष्टि करणाऱ्यामध्यें पर्जन्य उत्कृष्ट आहे; नागांमध्यें धृतराष्ट्र अतुल आहे; गजांमध्यें ऐरावत अनुपम आहे; प्रियांमध्यें पुत्राला कोणी जोड नाहीं आणि सुहृदांमध्यें भार्येची बरोबरी करणारा कोणी नाहीं १६,१७. सारांश, हे भीमसेना, भिन्न भिन्न जातींमध्यें ज्याप्रमाणें हीं अधिक आहेत त्याप्रमाणें हा तरुण अर्जुन सर्व धनुर्धाऱ्यांमध्यें श्रेष्ठ आहे १८. तस्मात्, इंद्र आणि वासुदेव ह्यांपेक्षां जो कमी नाहीं असा तो हा महातेजस्वी व गांडीव धनुष्य धारण करणारा श्वेतवाहन अर्जुन काय करील ? १९. मनुष्यांमध्यें अद्भुत अशी अस्त्रविद्या स्वपराक्रमानें प्राप्त करून घेण्याच्या उद्देशानें पांच वर्षें इंद्रलोकीं राहून ज्या तेजस्वी दिव्यरूप अर्जुनानें दिव्य अस्त्रें प्राप्त करून घेतलीं २०; बारावा रुद्र, तेरावा आदित्य, नववा वसु आणि दहावा ग्रह हा असावा अशी ज्याच्याविषयीं माझी समजूत आहे २१; प्रत्यंचेच्या आघातानें घट्ट पडलेले ज्याचे दीर्घ बाहु एकसारिखे आहेत; उजव्या आणि डाव्या स्कंधप्रदेशावर ज्याला बैलाप्रमाणें घट्टे पडलेले आहेत २२; आणि पर्वतांचा जसा हिमालय, नद्यांचा जसा समुद्र, देवांचा जसा इंद्र, वसूंचा जसा हव्यवाट् २३, मृगांचा जसा व्याघ्र व पक्ष्यांचा जसा गरुड तसा योद्ध्यांचा जो राजा आहे तो अर्जुन काय करणार ? २४. अर्जुन ह्मणतोः—हे भूपते, मी (अंतःपुरांतील) षंढ आहें असें सांगेन. हे राजा, माझ्या शरीरावर प्रत्यंचेचे पडलेले

मुच्याहं कुण्डले ज्वलनप्रभे २६ पिनद्धकम्बुः पाणिभ्यां तृतीयां प्रकृतिं गतः । वेणीकृतशिरा राजन्नाम्ना चैव बृहन्नला २७ पठन्नाख्यायिकाश्चैव स्त्रीभावेन पुनः पुनः । रमयिष्ये महीपालमन्यांश्चान्तःपुरे जनान् २८ गीतं नृत्यं विचित्रं च वादित्रं विविधं तथा । शिक्षयिष्याम्यहं राजन्विराटस्य पुरस्त्रियः २९ प्रजानां समुदाचारं बहु कर्म कृतं वदन् । छादयिष्यामि कौन्तेय माययात्मानमात्मना ३० युधिष्ठिरस्य गेहे वै द्रौपद्याः परिचारिका । उषितास्मीति वक्ष्यामि पृष्टो राज्ञा च पाण्डव ३१ एतेन विधिना छन्नः कृतकेन यथानलः । विहरिष्यामि राजेन्द्र विराटभवने सुखम् ३२ [६०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि पाण्डवप्रवेशपर्वणि युधिष्ठिरादिमन्त्रणे द्वितीयोध्यायः ॥ २ ॥

वैशम्पायन उवाच ॥ इत्येवमुक्त्वा पुरुषप्रवीरस्तथार्जुनो धर्मभृतां वरिष्ठः । वाक्यं तथासौ विरराम भूयो नृपोपरं भ्रातरमाबभाषे १

मोठे घट्टे झांकतां येणें अशक्य आहे २५. घट्टे पडलेले हे बाहु मी बाहुभूषणांनीं झांकून टाकीन आणि (कांहीं अवशिष्ट राहिल्यास) अग्नीसारिखीं उज्ज्वल कुंडलें कानांत घालून मी तें दिसूं देणार नाहीं २६. त्याचप्रमाणें मी षंढ बनून हातांमध्यें शंखांचे चुडे भरीन आणि हे राजा, बृहन्नला हें नाम धारण करून मी आपल्या मस्तकावर वेणी राखीन २७. स्त्रीस्वभावाला अनुसरून अनेक आख्यायिका वारंवार कथन करीत करीत मी अंतःपुरामध्यें राजाचें व इतर लोकांचें मन रमवीन २८. हे राजा, विराटाच्या अंतःपुरांतील स्त्रियांना मी चित्रविचित्र नृत्य व गायन आणि त्याचप्रमाणें नानाप्रकारचें वाद्यवादन शिकवीन २९. तात्पर्य, लोकांचें सद्वर्तन आणि त्यांनीं केलेलें कर्म ह्यांची प्रशंसा करीत करीत, हे कुंतीपुत्रा, कपटवेषानें मी मोठ्या दक्षतेनें आपलें स्वरूप गुप्त ठेवीन ३०; आणि, हे पांडव, राजानें मला विचारिलें तर मी द्रौपदीची दासी ह्मणून युधिष्ठिराच्या घरीं राहिलें होतें असें त्याला सांगेन ३१; आणि, हे राजाधिराज, अग्नि ज्याप्रमाणें (भस्मानें) आच्छादित झालेला असतो त्याप्रमाणें ह्या कृत्रिम प्रकारानें मी विराटाच्या घरीं सुखानें राहीन ३२. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील पांडवप्रवेशपर्वापैकीं युधिष्ठिरादिकांच्या विचारांविषयीं दुसरा अध्याय समाप्त झाला ॥ २ ॥

वैशंपायन सांगतातः—धर्मनिष्ठांमध्यें वरिष्ठ असलेला हा पुरुषश्रेष्ठ अर्जुन ह्याप्रमाणें भाषण करून स्वस्थ बसला असतां धर्मराज आपल्या दुसऱ्या भ्रात्याला ह्मणाला १

युधिष्ठिर उवाच ॥ किं त्वं नकुल कुर्वाणस्तत्र तात चरिष्यसि । कर्म तत्त्वं समाचक्ष्व राज्ये तस्य महीपतेः २ सुकुमारश्च शूरश्च दर्शनीयः सुखोचितः ३ नकुल उवाच ॥ अश्वबन्धो भविष्यामि विराटनृपतेरहम् । सर्वथा ज्ञानसंपन्नः कुशलः परिरक्षणे ४ ग्रन्थिको नाम नाम्नाहं कर्मैतत्सुप्रियं मम । कुशलोस्म्यश्वशिक्षायां तथैवाश्वचिकित्सने ॥ प्रियाश्च सततं मेश्वाः कुरुराज यथा तव ५ ये मामामन्त्रयिष्यन्ति विराटनगरे जनाः । तेभ्य एवं प्रवक्ष्यामि विहरिष्याम्यहं यथा ६ पाण्डवेन पुरा तात अश्वेष्वधिकृतः पुरा । विराटनगरे छन्नश्चरिष्यामि महीपते ७ युधिष्ठिर उवाच ॥ सहदेव कथं तस्य समीपे विहरिष्यसि । किं वा त्वं कर्म कुर्वाणः प्रच्छन्नो विहरिष्यसि ८ सहदेव उवाच ॥ गोसङ्ख्याता भविष्यामि विराटस्य महीपतेः । प्रतिषेद्धा च दोग्धा च सङ्ख्याने कुशलो गवाम् ९ तन्तिपाल इति ख्यातो नाम्नाहं विदितस्त्वथ । निपुणं च चरिष्यामि व्येतु ते मानसो ज्वरः १० अहं हि सततं गोषु भवता प्रहितः पुरा । तत्र मे कौशलं सर्वमवबुद्धं विशाम्पते ११ लक्षणं चरितं चापि

" बा नकुला, कोणतें काम करून त्या विराटराजाच्या राज्यामध्यें तूं रहाणार तें मला सांग २. कारण, तूं सुकुमार, शूर व सुंदर असून तूं फक्त सुखच अनुभविलेलें आहेस ३. नकुल ह्मणतो:—मी विराटराजाचा मोतद्दार होईन. कारण, अश्वांचें संरक्षण करण्यामध्यें मी निपुण आहें आणि त्यासंबंधाची मला सर्व माहिती आहे ४. ग्रंथिक ह्या नांवानें मी प्रसिद्ध असून हें काम मला फारच प्रिय आहे. अश्वशिक्षेमध्यें आणि अश्ववैद्यकामध्यें मी निपुण आहें; आणि, हे कुरुराज, आपल्याप्रमाणेंच अश्व मला नेहमीं प्रिय आहेत ५. विराटाच्या नगरामध्यें जे लोक मला विचारितील त्यांना मी "पांडुपुत्र धर्मराजानें अश्वावर पूर्वीं माझी नेमणूक केली होती" असें सांगेन आणि ह्याप्रमाणें मी आपले दिवस काढीन. तात्पर्य, बा धर्मराजा, अशा रीतीनें मी विराटनगरामध्यें गुप्तपणानें राहीन ६,७. युधिष्ठिर ह्मणतो:—हे सहदेवा, तूं त्या राजाच्या जवळ कसा राहशील? ह्मणजे कोणतें काम करून तुला तेथें गुप्त राहतां येईल? ८ सहदेव ह्मणतो:—विराटराजाच्या घरीं मी गुरांची देखरेख करणारा होईन. गाई कशा वळाव्यात हें मला ठाऊक आहे; मला धारही काढितां येत आहे आणि गुरांच्या परीक्षेंतही मी कुशल आहें ९. तंतिपाल ह्या नांवानें मी प्रसिद्ध होईन आणि दक्षतेनें आपले दिवस पार पाडीन. माझ्याविषयीं आपणांला काळजी नको १०. हे प्रजाधिपते, गुरांकडे पूर्वीं आपण मला नेहमीं पाठवीत होता, त्यामुळें त्यासंबंधाचें सर्व कांहीं कौशल मला समजून चुकलें आहे ११.

गवां यच्चापि मङ्गलम् । तत्सर्वं मे सुविदितमन्यच्चापि महीपते १२ वृष-
भानपि जानामि राजन्पूजितलक्षणान् । येषां मूत्रमुपाघ्राय अपि वन्ध्या
प्रसूयते १३ सोहमेवं चरिष्यामि प्रीतिरत्र हि मे सदा । न च मां वेत्स्यते
कश्चित्तोषयिष्ये च पार्थिवम् १४ युधिष्ठिर उवाच । इयं हि नः प्रिया
भार्या प्राणेभ्योपि गरीयसी । मातेव परिपाल्या च पूज्या ज्येष्ठेव च
स्वसा १५ केन स्म द्रौपदी कृष्णा कर्मणा विचरिष्यति । न हि किंचि-
द्विजानाति कर्म कर्तुं यथा स्त्रियः १६ सुकुमारी च बाला च राजपुत्री
यशस्विनी । पतिव्रता महाभागा कथं नु विचरिष्यति १७ माल्यगन्धा-
नलङ्कारान्वस्त्राणि विविधानि च । एतान्येवाभिजानाति यतो जाता हि
भामिनी १८ द्रौपद्युवाच ॥ सैरन्ध्र्यो रक्षिता लोके भुजिष्याः सन्ति
भारत । नैवमन्याः स्त्रियो यान्ति इति लोकस्य निश्चयः १९ साहं ब्रुवाणा
सैरन्ध्री कुशला केशकर्मणि २० युधिष्ठिरस्य गेहे वै द्रौपद्याः परिचा-
रिका । उषितास्मीति वक्ष्यामि पृष्टा राज्ञा च भारत २१ आत्मगुप्ता

गाईचीं लक्षणें, स्वभाव आणि त्यांचे ठिकाणीं असलेलीं मंगलावह चिन्हें हें सर्व मला चांगलें विदित असून त्यांच्यासंबंधाची इतरही माहिती, हे राजा, मला आहे १२; आणि, हे राजा, ज्यांच्या मुताचा वास घेतला असतां वंध्याही प्रसूत होते असे सुल-क्षणी बैल मला ठाऊक आहेत १३. सारांश, ज्याअर्थी ह्या कामाची मला नेहमीं आवड आहे त्याअर्थी अशा रीतीनेंच मी आपले दिवस काढीन व राजाला संतुष्ट करीन. मला कोणीही ओळखणार नाहीं १४. युधिष्ठिर ह्मणतो:—ही आपली प्रिय भार्या आपणांला प्राणांपेक्षांही अधिक आहे आणि मातेप्रमाणें हिचें आपणांला परि-पालन करणें योग्य असून वडील बहिणीप्रमाणें आपणांला हिचा मान राखणें अवश्य आहे १५. तस्मात्, ही द्रुपदकन्या कृष्णा कोणतें काम करून दिवस काढील? इतर स्त्रियांप्रमाणें हिला कोणतेंही काम करण्याचें ठाऊक नाहीं १६. ह्यास्तव, अल्पवयी व सकुमार असलेली ही महाभाग्यवती, यशस्विनी व पतिव्रता राजकन्या आपले दिवस कसे बरें काढील? १७. जन्मापासून ह्या सुंदरीला पुष्पें, गंध, अलंकार आणि नानाप्रकारचीं वस्त्रें एवढेंच काय तें माहीत आहे १८. द्रौपदी ह्मणते:—स्वतःशिवाय ज्यांचें कोणीही रक्षण करीत नाहीं अशा, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, सैरंध्री ह्मणून दासी असतात; आणि अशा प्रकारच्या अरक्षित स्त्रिया दुसऱ्या नसतात, हें लोकाना पक्कें ठाऊक आहे १९. तस्मात्, वेणीफणी करण्यामध्यें कुशल असलेली मी सैरंध्री आहें हें सांग-णारी योजून मी तेथें जाईन २०; आणि, हे भरतकुलोत्पन्ना धर्मराजा, राजानें विचारिलें

चरिष्यामि यन्मां त्वं परिपृच्छसि २२ सुदेष्णां प्रत्युपस्थास्ये राजभार्यां यशस्विनीम् । सा रक्षिष्यति मां प्राप्तां मा भूत्ते दुःखमीदृशम् २३ युधिष्ठिर उवाच ॥ कल्याणं भाषसे कृष्णे कुले जातासि भामिनि । न पापमभिजानासि साध्वी साधुव्रते स्थिता २४ यथा न दुर्हृदः पापा भवन्ति सुखिनः पुनः । कुर्यास्तत्त्वं हि कल्याणि लक्षयेयुर्न ते तथा २५ [८५] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि पाण्डवप्रवेशपर्वणि युधिष्ठिरादिमन्त्रणे तृतीयोध्यायः ॥ ३ ॥

युधिष्ठिर उवाच ॥ कर्माण्युक्तानि युष्माभिर्यानि यानि करिष्यथ । मम चापि यथा बुद्धिरुचिता विधिनिश्चयात् १ पुरोहितोयमस्माकमग्निहोत्राणि रक्षतु । सूदपौरोगवैः सार्धं द्रुपदस्य निवेशने २ इन्द्रसेनमुखाश्चेमे रथानादाय केवलान् । यान्तु द्वारवतीं शीघ्रमिति मे वर्तते मतिः ३ इमाश्च नार्यो द्रौपद्याः सर्वाश्च परिचारिकाः । पञ्चालानेव गच्छन्तु

असतां युधिष्ठिराच्या घरीं मी द्रौपदीची दासी होतें असें सांगेन २१. तात्पर्य, ज्याअर्थीं आपण मला विचारीत आहां त्याअर्थीं अशा रीतीनें स्वतःची परिस्फुटता न होऊं देतां मी आपले दिवस काढीन २२. यशस्विनी राजपत्नी सुदेष्णेजवळ मी जाईन आणि मी गेलें असतां ती माझें रक्षण करील. आपणांला अशा प्रकारची काळजी करण्याचें कारण नाहीं २३. युधिष्ठिर ह्मणतो:— हे सुंदरी कृष्णे, तूं कल्याणाचें भाषण करीत आहेस; तूं कुलीन व साध्वी असून स्वीकारिलेलें व्रत उत्तम रीतीनें परिपालन करणारी आहेस आणि पाप तुला माहीतही नाहीं २४. तस्मात्, ज्यांचें अंतःकरण दुष्ट आहे असे ते पापी धृतराष्ट्रपुत्र पुन्हां आनंदित न होतील ह्मणजे तूं त्यांच्या दृष्टोत्पत्तीस येणार नाहींस अशारीतीनें, हे कल्याणि, तूं वाग २५. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील पांडवप्रवेशपर्वांपैकीं युधिष्ठिरादिकांच्या विचाराविषयीं तिसरा अध्याय समाप्त झाला ॥३॥

युधिष्ठिर ह्मणतो:— जीं जीं कामें तुह्मी करणार आहांत तीं तीं तुह्मीं मला कथन केलींत आणि मींही जें माझ्या बुद्धीला पूर्वसंचितप्रमाणें उचित दिसलें तें सांगितलें १. आपण द्रुपदाच्या घरीं गेल्यावर ह्या आमच्या पुरोहितांनीं अग्निहोत्राला अवश्य असणाऱ्या होमधेनूंचें रक्षण करावें आणि सामान्य आचारी व त्यांचे नायक पौरोगव ह्यांसहवर्तमान २ ह्या इंद्रसेनप्रभृतींनीं मोकळे रथ घेऊन सत्वर द्वारकेला जावें, असें मला वाटतें ३. त्याचप्रमाणें द्रौपदीच्या शुश्रूषेंत असलेल्या ह्या स्त्रिया आणि इतरही सर्व दासी कांहीं आचारी व कांहीं त्यांचे नायक बरोबर घेऊन

सूदपौरोगवैः सह ४ सर्वैरपि च वक्तव्यं न प्राज्ञायन्त पाण्डवाः । गता ह्यस्मानपाहाय सर्वे द्वैतवनादिति ५ वैशम्पायन उवाच ॥ एवं तेन्योन्यमामन्त्र्य कर्माण्युक्त्वा पृथक्पृथक् । धौम्यमामन्त्रयामासुः स च तान्मन्त्रमब्रवीत् ६ धौम्य उवाच ॥ विहितं पाण्डवाः सर्वं ब्राह्मणेषु सुहृत्सु च । याने प्रहरणे चैव तथैवाग्निषु भारत ७ त्वया रक्षा विधातव्या कृष्णायाः फाल्गुनेन च । विदितं वो यथा सर्वं लोकवृत्तमिदं तव ८ विदिते चापि वक्तव्यं सुहृद्भिरनुरागतः । एष धर्मश्च कामश्च अर्थश्चैव सनातनः ९ अतोहमपि वक्ष्यामि हेतुमत्र निबोधत । हन्तेमां राजवसतिं राजपुत्रा ब्रवीम्यहम् १० यथा राजकुलं प्राप्य सर्वान्दोषांस्तरिष्यथ । दुर्वसं चैव कौरव्य जानता राजवेश्मनि ११ अमानितैर्मानितैर्वा अज्ञातैः परिवत्सरम् । ततश्चतुर्दशे वर्षे चरिष्यथ यथासुखम् १२ दृष्टद्वारो लभेद्द्रष्टुं राजस्वेषु न विश्वसेत् । तदेवासनमन्विच्छेद्यत्र नाभिपतेत्परः १३

पंचाल देशालाच जाऊं या ४; परंतु, " पांडवांचा पत्ता नाहीं; आह्मांला सोडून ते सर्व द्वैतवनांतून चालते झाले " असेंच सर्वांनीं सांगावें ५. वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें एकमेकांचा विचार घेऊन आणि आपलीं कामें कोणतीं तें वेगवेगळें सांगून ते धौम्यमुनींना निरोप देऊं लागले असतां त्या धौम्यमुनींनीं त्यांना आपला विचार कळविला ६. धौम्य ह्मणतात:— हे भरतकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, ब्राह्मण, सुहृद्, अग्नि, शस्त्रास्त्रप्रयोग आणि प्रयाण ह्यांसंबंधानें शास्त्रामध्यें सांगितलेलें सर्व कांहीं पांडव जाणीतच आहेत (तथापि, तुला कांहीं सांगावें असें माझ्या मनांत आहे) ७. तूं आणि अर्जुन ह्या उभयतांनीं द्रौपदीचें रक्षण अवश्य केलें पाहिजे. सामान्य लोकांचें सर्व कांहीं शील तुह्मांला सर्व विदितच आहे ८. परंतु, जरी विदित असलें तरी सुहृदांनीं प्रेमानें (काय सांगावयाचें असेल तें) सांगावेंच; ह्मणजे, सनातन धर्म, अर्थ व काम एतद्विषयक सुहृदांचें कर्तव्य झालें असें होतें ९. ह्यास्तव, मींही कांहीं सांगण्याचें मनामध्यें आणिलें आहे व तें सांगण्यांत माझा हाच हेतु आहे असें तुह्मी समजा. हे राजपुत्रहो, राजाच्या घरीं वास्तव्य कसें करावें हें मी तुह्मांला सांगतों १०; ह्मणजे, तुमचें राजगृहीं जाणें झाल्यास तेथें येणाऱ्या सर्व अडचणींतून तुह्मी पार पडाल. हे कुरुकुलोत्पन्ना युधिष्ठिरा, राजगृहीं विचारी मनुष्याचेंच वास्तव्य व तेंही दुःखानेंच होणें शक्य आहे ११. तुह्मांला कोणी मान देवो अथवा तुमचा कोणी अपमान करो, उघडकीस न येतां तुह्मांला एक वर्षभर राहिलें पाहिजे; ह्मणजे चवदाव्या वर्षीं तुह्मी सुखानें राहूं लागाल १२. राजाची अनुज्ञा झाल्याशिवाय

यो न यानं न पर्यङ्कं न पीठं न गजं रथम् । आरोहेत्संमतोस्मीति स
राजवसतिं वसेत् १४ यत्र यत्रैनमासीनं शङ्केरन्दुष्टचारिणः । न तत्रो-
पविशेद्यो वै स राजवसतिं वसेत् १५ न चानुशिष्याद्राजानमपृच्छन्तं
कदाचन । तूष्णीं त्वेनमुपासीत काले समभिपूजयेत् १६ असूयन्ति हि
राजानो जनाननृतवादिनः । तथैव चावमन्यन्ते मन्त्रिणं वादिनं मृषा १७
नैषां दारेषु कुर्वीत मैत्रीं प्राज्ञः कदाचन । अन्तःपुरचरा ये च द्वेष्टि
यानहिताश्च ये १८ विदिते चास्य कुर्वीत कार्याणि सुलघून्यपि । एवं
विचरतो राज्ञि न क्षतिर्जायते क्वचित् १९ गच्छन्नपि परां भूमिमपृष्टो
ह्यनियोजितः । जात्यन्ध इव मन्येत मर्यादामनुचिन्तयन् २० न हि पुत्रं
न नप्तारं न भ्रातरमरिन्दमाः । समतिक्रान्तमर्यादं पूजयन्ति नराधिपाः २१
यत्नाच्चोपचरेदेनमग्निवद्देववच्चिह । अनृतेनोपचीर्णो हि हन्यादेव न

त्याच्या दर्शनाची इच्छा करूं नये; राजाच्या खाजगींतील माणसांवर विश्वास ठेवूं नये आणि जेथें दुसरा येऊन बसणार नाहीं त्याच जागेवर बसण्याचें आपण मनामध्यें आणावें १३. मी राजाला प्रिय आहें अशा समजुतीवर जो पालखींत, पलंगावर, चौरंगावर, गजावर अथवा रथांत बसत नाहीं त्याचेंच राजगृहीं वास्तव्य होतें १४. ज्या ज्या ठिकाणीं बसलें असतां दुष्ट हेरांना संशय येईल त्या त्या ठिकाणीं बसण्याचें जो टाळतो तोच राजगृहीं वास्तव्य करितो १५. राजानें विचारिल्याशिवाय आपण त्याला कधींही कांहीं सांगूं नये; त्याच्याजवळ स्वस्थ बसावें आणि समय पाहून त्याची स्तुति मात्र करावी १६. अनृत भाषण करणाऱ्या लोकांचा राजे तिटकारा करितात आणि त्याचप्रमाणें असत्य भाषण करणाऱ्यांचा अवमान करितात १७. राजांच्या स्त्रियांशीं विचारी पुरुषानें कधींही मैत्री करूं नये आणि त्याचप्रमाणें त्यांच्या अंतःपुरांत जे असतील त्यांच्याशीं, राजा ज्यांचा द्वेष करितो त्यांच्याशीं आणि जे राजाचा द्वेष करितात त्यांच्याशींही मैत्री करूं नये १८. अतिशय क्षुल्लक जरी कामें असलीं तरी तीं राजाला न कळत करूं नयेत. ह्याप्रमाणें राजगृहीं वागणाऱ्या पुरुषाची कधींही हानि होत नाहीं १९. आपणांला जरी चांगल्या ठिकाणीं बसण्याचा प्रसंग आला तरी राजानें आपल्याशीं संभाषण करून बसण्याची अनुज्ञा दिल्याशिवाय बसूं नये. मर्यादा लक्ष्यांत आणून जात्यंधाप्रमाणें वागावें २०. कारण, पुत्र असो, नातु असो अथवा भ्राता असो त्यानें जर मर्यादेचें उल्लंघन केलें तर शत्रुविजयी राजांना तो बरा वाटत नाहीं २१. अग्नीप्रमाणें अथवा देवाप्रमाणें राजाची सेवा जपून करावी; असत्याचें अवलंबन करून राजाची

संशयः २२ यद्यद्भर्तानुयुञ्जीत तत्तदेवानुवर्तयेत् । प्रमादमवलेपं च कोपं च परिवर्जयेत् २३ समर्थनासु सर्वासु हितं च प्रियमेव च । संवर्णयेत्तदेवास्य प्रियादपि हितं भवेत् २४ अनुकूलो भवेच्चास्य सर्वार्थेषु कथासु च । अप्रियं चाहितं यत्स्यात्तदस्मै नानुवर्णयेत् २५ नाहमस्य प्रियोऽस्मीति मत्वा सेवेत पण्डितः । अप्रमत्तश्च सततं हितं कुर्यात्प्रियं च यत् २६ नास्यानिष्टानि सेवेत नाहितैः सह संवदेत् । स्वस्थानान्न विकम्पेत स राजवसतिं वसेत् २७ दक्षिणं वाथ वामं वा पार्श्वमासीत पण्डितः । रक्षिणां ह्यात्तशस्त्राणां स्थानं पश्चाद्विधीयते २८ नित्यं हि प्रतिषिद्धं तु पुरस्तादासनं महत् । न च संदर्शने किंचित्प्रवृत्तमपिसंजयेत् २९ अपि ह्येतद्दरिद्राणां व्यलीकस्थानमुत्तमम् । न मृषाभिहितं राज्ञां मनुष्येषु प्रकाशयेत् ३० असूयन्ति हि राजानो

सेवा केली असतां (ती उघडकीस येतांक्षणीं) तो वधच करील ह्यांत संशय नाहीं २२. ज्याची ज्याची राजा आज्ञा करील तेवढें तेवढेंच काम आपण करावें आणि हलगरजीपणा, गर्व व क्रोध हीं वर्ज्य करावीं २३. कार्य कोणतें आणि अकार्य कोणतें ह्यांसंबंधानें प्रश्न निघाला असतां परिणामीं हितकारक आणि प्रिय असें जें असेल तेंच आपण बोलावें आणि प्रिय व हितावह अशीं दोन्हीं जुळण्याचा जर संभव नसेल तर प्रियापेक्षां जें हितावह असेल त्याचेंच आपण अवलंबन करावें २४. कोणतेंही कृत्य उपस्थित झालें असतां अथवा कसलीही गोष्ट निघाली असतां आपण राजाच्या मर्जीनें वागत असावें आणि अप्रियच व अहितकारक जें असेल तें त्याला सांगूं नये २५. मी ह्याच्या मर्जींतील आहें असें समजून शहाण्या पुरुषानें राजाची सेवा करूं नये; परंतु, नेहमीं दक्ष राहून प्रिय आणि परिणामीं हितावह असें जें असेल तेंच करीत जावें २६. राजाला अनिष्ट असलेल्या गोष्टी जो कधीं करणार नाहीं; त्याच्या शत्रूंशीं जो कधीं संभाषण देखील करणार नाहीं आणि राजानें आपणाला घालून दिलेल्या मर्यादेबाहेर जो जाणार नाहीं त्याच्याच हातून राजगृहीं वास्तव्य होईल २७. विचारी पुरुषानें राजाच्या उजव्या अथवा डाव्या बाजूला बसावें. मागली बाजू हें शस्त्रें घेऊन तयार असलेल्या रक्षकांचें स्थान होय २८. राजाचे समोर भव्य आसनावर बसणें कोणालाही नेहमींच निषिद्ध आहे. राजाचे समक्ष जरी कांहीं लूट वगैरे सुरू झाली असली तरी आपण त्यांतील कांहींएक घेऊं नये २९. कारण, असें करणें दरिद्री लोकांनाही अतिशय संतापप्रद होतें. राजांनीं केलेलें अनृत भाषण लोकांमध्यें प्रसिद्ध करूं नये ३०. अनृत

नराननृतवादिनः । तथैव चावमन्यन्ते नरान्पण्डितमानिनः ३१ शूरोऽस्मीति न दृप्तः स्याद्बुद्धिमानिति वा पुनः । प्रियमेवाचरन्राज्ञः प्रियो भवति भोगवान् ३२ ऐश्वर्यं प्राप्य दुष्प्रापं प्रियं प्राप्य च राजतः । अप्रमत्तो भवेद्राज्ञः प्रियेषु च हितेषु च ३३ यस्य कोपो महाबाधः प्रसादश्च महाफलः । कस्तस्य मनसापीच्छेदनर्थं प्राज्ञसंमतः ३४ न चोष्ठौ न भुजौ जानू न च वाक्यं समाक्षिपेत् । सदा वातं च वाचं च ष्ठीवनं चाचरेच्छनैः ३५ हास्यवस्तुषु चान्यस्य वर्तमानेषु केषुचित् । नातिगाढं प्रहृष्येत न चाप्युन्मत्तवद्धसेत् ३६ न चातिधैर्येण चरेद्गुरुतां हि व्रजेत्ततः । स्मितं तु मृदुपूर्वेण दर्शयेत प्रसादजम् ३७ लाभे न हर्षयेद्यस्तु न व्यथेद्योवमानितः । असंमूढश्च यो नित्यं स राजवसतिं वसेत् ३८ राजानं राजपुत्रं वा संवर्णयति यः सदा । अमात्यः पण्डितो भूत्वा स चिरं तिष्ठते प्रियः ३९ प्रगृहीतश्च योमात्यो निगृहीतस्त्वकारणैः ।

भाषण करणाऱ्या पुरुषांचा राजे तिटकारा करीत असतात आणि त्याचप्रमाणें पंडितंमन्य पुरुषांचा ते अवमान करीत असतात ३१. मी शूर अथवा बुद्धिमान् आहें असें समजून कधींही चढेलपणानें वागूं नये. कारण, राजाच्या मर्जीप्रमाणें वागणाराच मनुष्य राजाला प्रिय होतो आणि त्यालाच भोग्य वस्तूंचा उपभोग घेतां येतो ३२. राजांपासून दुर्लभ ऐश्वर्य आणि प्रिय वस्तु प्राप्त झाली असतां राजाला प्रिय आणि हितावह अशा गोष्टींविषयीं दक्ष असावें ३३. ज्याचा कोप मोठ्या दुःखाला आणि ज्याचा प्रसाद मोठ्या फलाला कारणीभूत होतो त्याचा अपराध करणें कोण बरें ज्ञानी जनांना अभिमत असलेला पुरुष मनांत तरी आणील ? ३४. राजाचे संनिध असतांना ओंठ, पाय आणि हात ह्यांचे चाळे करूं नयेत, आणि वायु सोडणें, संभाषण करणें व थुंकणें हींही मर्यादेनें हळूंहळूंच करावींत ३५. इतर राजसेवकासंबंधानें कांहीं हास्यास्पद प्रकार सुरू झाले असतां आपण अतिशय मनापासून हंसूं नये; बेताल होऊन खिदळूं नये ३६ आणि मोठ्या निग्रहानें स्वस्थही बसूं नये. कारण, स्वस्थ बसणारा मनुष्य राजाच्या दृष्टीनें मूढ ठरतो. ह्यास्तव, आनंदपूर्वक आपण, एकदम न हंसतां, बेताबातानें थोडेंसें हंसावें ३७. लाभाचा प्रसंग आला असतां ज्याला हर्ष होत नाहीं; अवमान झाला असतांही ज्याला वाईट वाटत नाहीं आणि जो कधींही हलगरजीपणानें वागत नाहीं त्याच्या हातून राजगृहीं वास्तव्य होतें ३८. अमात्य अथवा पंडित, कोणी कां होईना, राजाचें अथवा राजपुत्राचें जो नेहमीं वर्णन करितो तोच पुष्कळ वेळपर्यंत प्रिय राहतो. ३९. जो अमात्य

न निर्वदति राजानं लभते सम्पदं पुनः ४० प्रत्यक्षं च परोक्षं च गुणवादी विचक्षणः । उपजीवी भवेद्राज्ञो विषये योपि वा भवेत् ४१ अमात्यो हि बलाद्भोक्तुं राजानं प्रार्थयेत यः । न स तिष्ठेच्चिरं स्थानं गच्छेच्च प्राणसंशयम् ४२ श्रेयः सदात्मनो दृष्ट्वा परं राज्ञा न संवदेत् । विशेषयेच्च राजानं योग्यभूमिषु सर्वदा ४३ अम्लानो बलवाञ्शूरश्छायेवानुगतः सदा । सत्यवादी मृदुर्दान्तः स राजवसतिं वसेत् ४४ अन्यस्मिन्प्रेष्यमाणे तु पुरस्ताद्यः समुत्पतेत् । अहं किं करवाणीति स राजवसतिं वसेत् ४५ आन्तरे चैव बाह्ये च राज्ञा यश्चाथ सर्वदा । आदिष्टो नैव कम्पेत स राजवसतिं वसेत् ४६ यो वै गृहेभ्यः प्रवसन्प्रियाणां नानुसंस्मरेत् । दुःखेन सुखमन्विच्छेत्स राजवसतिं वसेत् ४७ समवेषं न कुर्वीत नोच्चैः संनिहितो वसेत् । न मन्त्रं बहुधा कुर्यादेवं राज्ञः प्रियो भवेत् ४८ न कर्मणि नियुक्तः सन्धनं किंचिदपि स्पृशेत् । प्राप्नोति हि हरन्द्रव्यं

निष्कारण पकडला जाऊन बंदींत टाकिला गेला असतांही राजाची निंदा करीत नाहीं त्याला पुनरपि संपत्ति प्राप्त होते ४०. ज्याची उपजीविका राजावर अवलंबून असले अथवा जो राजाच्या हद्दीमध्यें राहत असेल त्या समंजस पुरुषानें प्रत्यक्ष आणि परोक्ष राजाचे गुणच गात असावें ४१. जो अमात्य जुलमानें राज्य करण्यास राजाला सांगतो तो फार वेळ टिकत नाहीं आणि त्याला प्राणघातक संकटही प्राप्त होतें ४२. आपलें कल्याण राजापासून झालेलें आहे हें लक्ष्यांत आणून बोलण्यामध्यें राजाशीं कधीं अतिप्रसंग करूं नये; आणि (युद्ध, परराष्ट्रांतील लोकांचें संभाषण इत्यादि) योग्य स्थलीं आपण नेहमीं राजापेक्षां आपली हुशारी जास्त दाखवीत जावी ४३. कधींही म्लानवदन न होणारा, बलाढ्य, शूर, छायेप्रमाणें राजाला नेहमीं अनुसरून वागणारा, सत्यवचनी, सौम्य आणि जितेंद्रिय असा जो असेल तोच राजगृहीं वास्तव्य करील ४४. राजा दुसऱ्याला हांक मारीत असतांना " काय आज्ञा आहे " ह्मणून जो प्रथम पुढें धांवतो तोच राजगृहीं वास्तव्य करण्यास योग्य होतो ४५. खाजगी अथवा सार्वजनिक कामाविषयीं राजानें कसलीही आज्ञा केली तरी जो कधींही कचरत नाहीं त्याचेंच राजगृहीं वास्तव्य होतें ४६. घरांतून बाहेर पडल्यावर ज्याला प्रिय गोष्टींचें स्मरण होत नाहीं आणि दुःख भोगण्यानें जो सुखाची इच्छा करितो तोच राजाच्या घरीं राहण्यास योग्य होतो ४७ राजासारिखा पोषाख करूं नये; राजाचे संनिध उच्च स्थानावर बसूं नये आणि राजाची मसलत षट्कर्णी करूं नये. कारण, अशारीतीनें वागणारा पुरुष राजाला प्रिय

बन्धनं यदि वा वधम् ४९ यानं वस्त्रमलङ्कारं यच्चान्यत्संप्रयच्छति । तदेव धारयेन्नित्यमेवं प्रियतरो भवेत् ५० एवं संयम्य चित्तानि यत्नतः पाण्डुनन्दनाः । संवत्सरमिमं तात तथाशीला बुभूषत । अथ स्वविषयं प्राप्य यथाकामं करिष्यथ ५१ युधिष्ठिर उवाच ॥ अनुशिष्टाः स्म भद्रं ते नैतद्वक्तास्ति कश्चन । कुन्तीमृते मातरं नो विदुरं वा महामतिम् ५२ यदत्रा-नन्तरं कार्यं तद्भवान्कर्तुमर्हति । तारणायास्य दुःखस्य प्रस्थानाय जयाय च ५३ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्तस्ततो राज्ञा धौम्योथ द्विज-सत्तमः । अकरोद्विधिवत्सर्वं प्रस्थाने यद्विधीयते ५४ तेषां समिध्य तानग्नीन्मन्त्रवच्च जुहाव सः । समृद्धिवृद्धिलाभाय पृथिवीविजयाय च ५५ अग्नीन्प्रदक्षिणीकृत्य ब्राह्मणांश्च तपोधनान् । याज्ञसेनीं पुरस्कृत्य षडेवाथ प्रवव्रजुः ५६ गतेषु तेषु वीरेषु धौम्योथ जपतां वरः । अग्नि-होत्राण्युपादाय पञ्चालानभ्यगच्छत ५७ इन्द्रसेनादयश्चैव यथोक्ताः

होतो ४८. कांहीं कामावर आपली नेमणूक झालीं असतां कसल्याही प्रकारच्या द्रव्याला स्पर्श करूं नये. कारण, अधिकारावर असतांना लांच घेणाऱ्या पुरुषाला कारागृहवास अथवा वध प्राप्त होतो ४९. वाहन, वस्त्र, अलंकार अथवा इतरही जें कांहीं राजा देईल तेंच नेहमीं धारण करावें. ह्मणजे तो पुरुष राजाला अधिक प्रिय होतो ५०. सारांश, हे पांडुनंदनहो, प्रयत्नपूर्वक ह्याप्रमाणें मनःसंयमन करून हें वर्ष मीं सांगितल्याप्रमाणें वागून काढा आणि नंतर स्वदेशीं गेल्यावर, बाबांनों, आप-आपल्या मनाप्रमाणें वागा ५१. युधिष्ठिर ह्मणतोः—आपलें देव बरें करो, आह्मांला आपला उपदेश झाला आहे. माता कुंती आणि महा-मति विदुर ह्यांशिवाय आह्मांला असला उपदेश करणारा कोणी नाहीं ५२. आतां ह्या दुःखांतून पार पडण्याकरितां आणि आमचें प्रस्थान विजयावह होण्याक-रितां आपणांला जें काय करावयाचें असेल तें करावें ५३. वैशंपायन सांगतातः— ह्याप्रमाणें धर्मराजानें प्रार्थना केली असतां द्विजश्रेष्ठ धौम्यमुनींनीं प्रस्थानसंबंधानें विहित असलेलें सर्व कांहीं यथाविधि केलें ५४; आणि त्यांचे ते अग्नि प्रज्वलित करून त्यांनीं त्यांमध्यें समंत्रक हवन केलें. नंतर लोकांचें बल मिळून अभ्युदय व्हावा आणि आप-णांला पृथ्वी प्राप्त व्हावी ५५ एतदर्थ अग्नींना व तपोधन ब्राह्मणांना त्या सहा-जणांनीं प्रदक्षिणा केली आणि नंतर द्रौपदीला पुढें करून ते पांडव (दुसऱ्या कोणा-लाही बरोबर न घेतां द्रौपदीसहवर्तमान केवळ) सहाच तेथून चालते झाले ५६. ते वीर गेल्यानंतर तपस्व्यांमध्यें श्रेष्ठ धौम्यमुनि त्यांच्या होमधेनु घेऊन

प्राप्य यादवान् । रथानश्वांश्च रक्षन्तः सुखमूषुः सुसंवृताः ५८ [१४३]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि पाण्डवप्रवेशपर्वणि धौम्योपदेशे चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ते वीरा बद्धनिस्त्रिंशास्तथा बद्धकलापिनः । बद्धगोधाङ्गुलित्राणाः कालिन्दीमभितो ययुः १ ततस्ते दक्षिणं तीरमन्वगच्छन्पदातयः । निवृत्तवनवासा हि स्वराष्ट्रं प्रेप्सवस्तदा ॥ वसन्तो गिरिदुर्गेषु वनदुर्गेषु धन्विनः २ विध्यन्तो मृगजातानि महेष्वासा महाबलाः । उत्तरेण दशार्णांस्ते पञ्चालान्दक्षिणेन च ३ अन्तरेण यकृल्लोमाञ्शूरसेनांश्च पाण्डवाः । लुब्धा ब्रुवाणा मत्स्यस्य विषयं प्राविशन्वनात् ४ धन्विनो बद्धनिस्त्रिंशा विवर्णाः श्मश्रुधारिणः ५ ततो जनपदं प्राप्य कृष्णा राजानमब्रवीत् । पश्यैकपद्यो दृश्यन्ते क्षेत्राणि विविधानि च ६ व्यक्तं दूरे विराटस्य राजधानी भविष्यति । वसामेहापरां रात्रिं बलवान्मे परिश्रमः ७ युधिष्ठिर उवाच ॥ धनञ्जय समुद्यम्य पाञ्चालीं वह भारत ।

पंचाल देशाला चालते झाले ५७; आणि इंद्रसेन प्रभृतिही आज्ञेप्रमाणें यादवांकडे जाऊन रथांचें व अश्वांचें रक्षण करीत पांडवांची यत्किंचित्‌ही परिस्फुटता न होऊं देतां तेथें सुखानें राहिले ५८. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील पांडवप्रवेशपर्वांपैकीं धौम्यमुनींच्या उपदेशाविषयीं चवथा अध्याय समाप्त झाला ॥४॥

वैशंपायन सांगतातः—ते वीर पांडव तरवारी लटकावून, भाते बांधून आणि तलत्राण व अंगुलित्राण चढवून यमुनेच्या बाजूला गेले १. तदनंतर वनवासापासून निवृत्त झालेले आणि स्वराष्ट्राला जाण्याची इच्छा करणारे ते पादचारी पांडव यमुनेच्या दक्षिणतीरानें गेले; आणि पर्वतावरील व वनांतील दुर्गमप्रदेशामध्यें जातां जातां वास्तव्य करणारे ते महाबलाढ्य, महाधनुर्धारी व शूर पांडव मृगगणांना वेध करीत करीत दशार्णदेशाच्या उत्तरेकडून, पंचाल देशाच्या दक्षिणेकडून, आणि यकृल्लोम व शूरसेन ह्या देशांमधून "आम्ही व्याध आहोंत" असें सांगत वनांतून मत्स्यदेशामध्यें प्रविष्ट झाले २,३,४. त्यावेळीं त्यांचीं मुखें निस्तेज झालीं होतीं; सर्वांनीं दाढी वाढविली होती; हातांत धनुष्यें घेतलेलीं होतीं आणि तरवारी लटकाविलेल्या होत्या ५. तदनंतर त्या देशासमीप गेल्यावर द्रौपदी धर्मराजाला ह्मणाली " पहा, नानाप्रकारचीं शेतें व पाऊल वाटाच अजून दिसत आहेत ६; ह्यावरून विराटाची राजधानी येथून निःसंशय दूर आहे. ह्यास्तव, आणखी एक रात्र आपण येथें मार्गामध्यें वास्तव्य करूं. मी फारच थकून गेलें आहें " ७. युधिष्ठिर ह्मणतोः—हे भरतकुलोत्पन्ना धनंजया, तूं

राजधान्यां निवत्स्यामो विमुक्ताश्च वनादितः ८ वैशम्पायन उवाच ॥
तामादायार्जुनस्तूर्णं द्रौपदीं गजराडिव । संप्राप्य नगराभ्याशमवतारयदर्जुनः ९ स राजधानीं संप्राप्य कौन्तेयोर्जुनमब्रवीत् । क्वायुधानि समासज्य प्रवेक्ष्यामः पुरं वयम् १० सायुधाश्च प्रवेक्ष्यामो वयं तात पुरं यदि । समुद्वेगं जनस्यास्य करिष्यामो न संशयः ११ गाण्डीवं च महद्गाढं लोके च विदितं नृणाम् । तच्चेदायुधमादाय गच्छामो नगरं वयम् ॥ क्षिप्रमस्मान्विजानीयुर्मनुष्या नात्र संशयः १२ ततो द्वादश वर्षाणि प्रवेष्टव्यं वने पुनः । एकस्मिन्नपि विज्ञाते प्रतिज्ञातं हि नस्तथा १३ अर्जुन उवाच॥
इयं कूटे मनुष्येन्द्र गहना महती शमी । भीमशाखा दुरारोहा श्मशानस्य समीपतः १४ न चापि विद्यते कश्चिन्मनुष्य इति मे मतिः । योस्मान्निदधतो द्रष्टा भवेच्छस्त्राणि पाण्डवाः १५ उत्पथे हि वने जाता मृगव्यालनिषेविते । समीपे च श्मशानस्य गहनस्य विशेषतः १६ समाधायायुधं शम्यां गच्छामो नगरं प्रति । एवमत्र यथायोगं विहरिष्याम भारत १७

पांचालीला उचलून खांद्यावर घे. ह्या वनांतून पार पडून आपण राजधानीमध्येंच मुक्कामाला जाऊं ८. वैशंपायन सांगतातः— नंतर गजेंद्राप्रमाणें (बलाढ्य) असलेल्या अर्जुनानें द्रौपदीस सत्वर उचलून घेतलें आणि नगरासमीप गेल्यावर खाली उतरविलें ९. ह्याप्रमाणें राजधानीसमीप गेल्यावर कुंतीपुत्र युधिष्ठिर अर्जुनाला ह्मणाला " कोठें बरें आयुधें अडकवून ठेऊन आपण नगरामध्यें प्रवेश करावा ? १०. बा अर्जुना, आपण जर आयुधांसहवर्तमान नगरामध्यें प्रवेश केला, तर हे नगरवासी लोक उद्विग्न होऊन जातील यांत संशय नाहीं ११. शिवाय, हें अति प्रचंड गांडीव धनुष्य जगतांतील लोकांच्या ओळखीचें आहे. ह्यास्तव, आयुधें घेऊन जर आपण नगरामध्यें गेलों तर आपणाला तेव्हांच लोक ओळखतील यांत संशय नाहीं १२; आणि असें झालें असतां पुनरपि बारा वर्षें आपणांला वनामध्येंच प्रवेश करावा लागेल. कारण, एक जरी ओळखला गेला तरी तसें करण्याविषयीं आपण प्रतिज्ञा केलेली आहे " १३. अर्जुन ह्मणतोः—हे राजा, उच्च प्रदेशावर हा एक मोठा गहन शमीवृक्ष श्मशानाचे समीप दिसत आहे. याच्या फांद्या मोठ्यामोठ्या आहेत आणि ह्याच्यावर चढतां येणेंही कठीण आहे १४. शिवाय, हे पांडवहो, येथें आतां आपण शस्त्रें ठेऊं लागलों असतां आपणांला पाहणारा येथें कोणी मनुष्यही दिसत नाहीं असें मला वाटतें १५. कारण, मृग व श्वापदें ह्यांनीं भरलेल्या व मार्ग सोडून असलेल्या वनामध्यें हा वृक्ष उत्पन्न झाला आहे आणि विशेषतः हा गहन श्मशानाचे समीप आहे १६.

वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वा स राजानं धर्मराजं युधिष्ठिरम् । प्रचक्रमे निधानाय शस्त्राणां भरतर्षभ १८ येन देवान्मनुष्यांश्च सर्वांश्चैकरथोजयत् । स्फीताञ्जनपदांश्चान्यानजयत्कुरुपुङ्गवः १९ तदुदारं महाघोषं संपन्नबलसूदनम् । अपज्यमकरोत्पार्थो गाण्डीवं सुभयङ्करम् २० येन वीरः कुरुक्षेत्रमभ्यरक्षत्परन्तपः । अमुञ्चद्धनुषस्तस्य ज्यामक्षय्यां युधिष्ठिरः २१ पाञ्चालान्येन सङ्ग्रामे भीमसेनोजयत्प्रभुः । प्रत्यषेधद्बहूनेकः सपत्नांश्चैव दिग्जये २२ निशम्य यस्य विस्फारं व्यद्रवन्त रणात्परे । पर्वतस्येव दीर्णस्य विस्फोटमशनेरिव २३ सैन्धवं येन राजानं पर्यामृषितवानथ । ज्यापाशं धनुषस्तस्य भीमसेनोवतारयत् २४ अजयत्पश्चिमामाशां धनुषा येन पाण्डवः । माद्रीपुत्रो महाबाहुस्ताम्रास्यो मितभाषिता २५ तस्य मौर्वीमपाकर्षच्छूरः संक्रन्दनो युधि । कुले नास्ति समो रूपे यस्येति नकुलः स्मृतः २६ दक्षिणां दक्षिणाचारो दिशं येनाजयत्प्रभुः ।

ह्यास्तव, आपण आपलीं आयुधें शमी वृक्षावर ठेवून नगरामध्यें जाऊं आणि ज्याच्या त्याच्या मतानें ठरल्याप्रमाणें आपण येथें दिवस काढूं १७. वैशंपायन सांगतातः— हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, ह्याप्रमाणें भूपति धर्मराज युधिष्ठिराला सांगून तो अर्जुन शस्त्रें ठेवण्याकरितां तिकडे चालता झाला १८. ज्याच्या योगानें एका रथाचेंच सहाय्य असतांना कुरुवंशजश्रेष्ठ अर्जुनानें देव, सर्व मनुष्य आणि इतरही समृद्ध देश जिंकिले १९ त्या भव्य, मोठी गर्जना करणाऱ्या व महाबलाढ्य शत्रूंचाही नाश करणाऱ्या अत्यंत भयंकर गांडीव धनुष्याची प्रत्यंचा अर्जुनानें उतरली २०. ज्याच्या योगानें शत्रुतापन वीर युधिष्ठिरानें कुरुक्षेत्राचें रक्षण केलें त्या धनुष्याचीही दोरी त्या युधिष्ठिरानें सोडून ठेविली २१. ज्याच्या योगानें संग्रामामध्यें समर्थ भीमसेनानें पांचालांचा पराजय केला; ज्याच्या योगानें दिग्विजयप्रसंगीं एकट्या भीमसेनानें अनेक शत्रूंचें निवारण केलें २२; वज्रानें विदीर्ण झालेल्या पर्वताच्या ध्वनीप्रमाणें ज्याचा टणत्कार ऐकून संग्रामापासून शत्रूंनीं पलायन केलें २३ आणि ज्याच्यायोगानें सिंधुराज जयद्रथाची खोड मोडितां आली त्या धनुष्याच्या प्रत्यंचेचा पाश भीमसेनानें सोडिला २४. ताम्रवर्ण मुखानें युक्त व मित भाषण करणाऱ्या माद्रीपुत्र महापराक्रमी पांडुनंदन नकुलानें ज्याच्यायोगानें पश्चिम दिशा जिंकिली २५, त्या धनुष्याची प्रत्यंचा युद्धामध्यें शत्रूंना आक्रोश करूं लावणाऱ्या व कुलामध्यें रूपानें बरोबरी करणारा कोणी नसल्यामुळें नकुल ह्या नांवानें प्रसिद्ध झालेल्या त्या शूर माद्रीपुत्रानेंच उतरिली २६. आचरणानें सरळ असलेल्या समर्थ सहदेवानें ज्याच्या योगानें दक्षिण दिशा जिंकिली

अपज्यमकरोद्वीरः सहदेवस्तदायुधम् २७ खड्गांश्च दीप्तान्दीर्घांश्च कलापांश्च महाधनान् । विपाठान्क्षुरधारांश्च धनुर्भिर्निदधुः सह २८ वैशम्पायन उवाच ॥ अथान्वशासन्नकुलं कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः । आरुह्येमां शमीं वीर धनूंष्येतानि निक्षिप २९ तामुपारुह्य नकुलो धनूंषि निदधे स्वयम् । यानि तस्यावकाशानि दिव्यरूपाण्यमन्यत ३० यत्र चापश्यत स वै तिरोवर्षाणि वर्षति । तत्र तानि दृढः पाशैः सुगाढं पर्यबन्धत ३१ शरीरं च मृतस्यैकं समवध्नन्त पाण्डवाः । विवर्जयिष्यन्ति नरा दूरादेव शमीमिमाम् ३२ आबद्धं शवमत्रेति गन्धमाघ्राय पूतिकम् । अशीतिशतवर्षेयं माता न इति वादिनः ३३ कुलधर्मोयमस्माकं पूर्वैराचरितोपि वा । समासज्ज्याथ वृक्षस्मिन्निति वै व्याहरन्ति ते ३४ आगोपालाविपालेभ्य आचक्षाणाः परन्तपाः । आजग्मुर्नगराभ्याशं पार्थाः शत्रुनिबर्हणाः ३५ जयो जयन्तो विजयो जयत्सेनो जयद्बलः । इति गुह्यानि नामानि चक्रे तेषां युधिष्ठिरः ३६ ततो यथा प्रतिज्ञाभिः प्राविशन्नगरं महत् । अज्ञातचर्यां वत्स्यन्तो

तें धनुष्य त्या वीरानंच प्रत्यंचारहित केलें २७; आणि आपआपल्या धनुष्यांबरोबरच उज्ज्वल व लांब लांब तरवारी, मोठे मौल्यवान् भाते आणि विपाठ व क्षुरधार बाण पांडवांनीं ठेवून दिले २८. वैशंपायन सांगतातः—सर्वांनीं शस्त्रें खालीं ठेविल्यानंतर " हे वीरा, ह्या शमीवृक्षावर चढून हीं धनुष्यें ठेव " २९ असें कुंतीपुत्र युधिष्ठिरानें नकुलाला सांगितलें असतां त्या वृक्षावर चढून नकुलानें तीं धनुष्यें ठेविलीं. त्या शमीवृक्षावर असलेलीं जीं बिळें त्याला चांगलीं वाटलीं तींत आणि ज्या ठिकाणीं पर्जन्यवृष्टीचा तडाका बसत नाहीं असें त्याला आढळून आलें त्या ठिकाणीं त्यानें तीं धनुष्यें व शस्त्रें बळकट दोऱ्यांनीं घट्ट बांधून टाकिलीं ३०, ३१. तदनंतर ह्या ठिकाणीं शव बांधलें आहे असें दिसून आल्यावर अथवा दुर्गंधि येतांक्षणींच लोकांनीं इकडे येऊं नये असा उद्देश मनामध्यें धरून पांडवांनीं मृताचें एक शव त्या वृक्षाला बांधून टाकिलें आणि ह्याप्रमाणें वृक्षाला शव अडकविल्यानंतर " एकशें ऐशीं वर्षांची ही आमची माता आहे आणि पूर्वजांनीं आचरिलेला हा आमचा कुलधर्म आहे " असें ते ह्मणूं लागले ३२,३३,३४; आणि गुराखी, धनगर वगैरेंपर्यंत सर्वांना तसेंच सांगत सांगत ते शत्रुतापन व शत्रुनाशक कुंतीपुत्र पांडव नगरासमीप गेले ३५. तेव्हां जय, जयंत, विजय, जयत्सेन आणि जयद्बल अशीं आपल्यासुद्धां त्यांचीं गुह्य नांवें युधिष्ठिरानें ठेविलीं ३६. आणि तदनंतर तेरावें वर्ष अज्ञातवासांत काढण्याकरितां आपआपल्या प्रतिज्ञेप्रमाणें

राष्ट्रे वर्षं त्रयोदशम् ३७ [१८०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि पाण्डवप्रवेशपर्वणि पुरप्रवेशेऽस्त्रसंस्थापने पञ्चमोऽध्यायः ॥ ५ ॥

वैशम्पायन उवाच ॥ विराटनगरं रम्यं गच्छमानो युधिष्ठिरः । अस्तुवन्मनसा देवीं दुर्गां त्रिभुवनेश्वरीम् १ यशोदागर्भसंभूतां नारायणवरप्रियाम् । नन्दगोपकुले जातां मङ्गल्यां कुलवर्धिनीम् २ कंसविद्रावणकरीमसुराणां क्षयङ्करीम् । शिलातटविनिक्षिप्तामाकाशं प्रति गामिनीम् ३ वासुदेवस्य भगिनीं दिव्यमाल्यविभूषिताम् । दिव्याम्बरधरां देवीं खड्गखेटकधारिणीम् ४ भारावतरणे पुण्ये ये स्मरन्ति सदा शिवाम् । तान्वै तारयते पापात्पङ्के गामिव दुर्बलाम् ५ स्तोतुं प्रचक्रमे भूयो विविधैः स्तोत्रसंभवैः । आमन्त्र्यदर्शनाकाङ्क्षी राजा देवीं सहानुजः ६ नमोऽस्तु वरदे कृष्णे कुमारि ब्रह्मचारिणि । बालार्कसदृशाकारे पूर्णचन्द्रनिभानने ७ चतुर्भुजे चतुर्वक्त्रे पीनश्रोणिपयोधरे । मयूरपिच्छ-

---

ते त्या मोठ्या नगरामध्यें प्रविष्ट झाले ३७. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील पांडवप्रवेशपर्वांपैकीं नगरप्रवेश आणि अस्त्रस्थापन ह्यांविषयीं पांचवा अध्याय समाप्त झाला ॥ ५ ॥

वैशंपायन सांगतातः—विराटाच्या रम्य नगरांत जातांना युधिष्ठिरानें मनामध्यें त्रैलोक्याधिष्ठात्री दुर्गादेवीचें स्तवन केलें १. यशोदेच्या गर्भापासून उत्पन्न झालेली, नारायणापासून प्राप्त झालेले वर प्रिय असलेली, नंदगोपाच्या कुलामध्यें अवतीर्ण झालेली, मंगलदायक, (पूजकांचें) कुल वृद्धिंगत करणारी २, कंसाला पळविणारी, असुरांचा क्षय करणारी, शिळेच्या टोंकावर आपटतांक्षणीं आकाशामध्यें जाणारी ३, वासुदेवाची भगिनी, दिव्य पुष्पांनीं विभूषित, दिव्य वस्त्र परिधान केलेली आणि ढाल व तरवार हीं आयुधें धारण करणारी जी देवी तिचें युधिष्ठिरानें स्तवन केलें ४. भूभारहरण हें पवित्र कृत्य करण्याकरितां अवतीर्ण झालेल्या त्या कल्याणी दुर्गेचें जे नेहमीं स्मरण करितात त्यांचा ती चिखलांत रुतलेल्या दुर्बल गाईप्रमाणें उद्धार करिते ५. असो. प्रथमतः देवीला हांक मारून धर्मराजानें तिचें दर्शन व्हावें ह्या उद्देशानें नानाप्रकारच्या स्तोत्रांनीं आपल्या कनिष्ठ भ्रात्यांसहवर्तमान तिची स्तुति करण्याला आरंभ केला ६. (तो ह्मणाला) " हे वरदे, हे कृष्णे, हे कुमारि, हे ब्रह्मचारिणि, हे बालसूर्यासारिख्या आकार धारण करणारे, हे पूर्णचंद्रतुल्य मुखानें युक्त असलेले, तुला नमस्कार असो ७. हे चतुर्भुजे, हे चतुर्मुखि, विपुल कटिप्रदेश, पुष्ट स्तन, मयूरपिच्छासारिख्या

वलये केयूराङ्गदधारिणि ८ भासि देवि यथा पद्मा नारायणपरिग्रहः ९ स्वरूपं ब्रह्मचर्यं च विशदं तव खेचरि । कृष्णच्छविसमा कृष्णा संकर्षणसमानना १० बिभ्रती विपुलौ बाहू शक्रध्वजसमुच्छ्रयौ । पात्री च पङ्कजी घण्टी स्त्री विशुद्धा च या भुवि ११ पाशं धनुर्महाचक्रं विविधान्यायुधानि च । कुण्डलाभ्यां सुपूर्णाभ्यां कर्णाभ्यां च विभूषिता १२ चन्द्रविस्पर्द्धिना देवि मुखेन त्वं विराजसे । मुकुटेन विचित्रेण केशबन्धेन शोभिना १३ भुजङ्गाभोगवासेन श्रोणिसूत्रेण राजता । विभ्राजसे चाबद्धेन भोगेनेवेह मन्दरः १४ ध्वजेन शिखिपिच्छानामुच्छ्रितेन विराजसे । कौमारं व्रतमास्थाय त्रिदिवं पावितं त्वया १५ तेन त्वं स्तूयसे देवि त्रिदशैः पूज्यसेपि च । त्रैलोक्यरक्षणार्थाय महिषासुरनाशिनि ॥ प्रसन्ना मे सुरश्रेष्ठे दयां कुरु शिवा भव १६ जया त्वं विजया चैव सङ्ग्रामे च जयप्रदा । ममापि विजयं देहि वरदा त्वं च सांप्रतम् १७ विन्ध्ये चैव नगश्रेष्ठे तव स्थानं हि शाश्वतम् । कालि कालि महाकालि सीधुमांसपशुप्रिये १८

कांतीनें युक्त असलेली रत्नखचित हस्तभूषणें आणि केयूर व अंगद हीं बाहुभूषणें तूं धारण केलेलीं असल्यामुळें नारायणपत्नी लक्ष्मीप्रमाणें तूं भासत आहेस ८, ९. हे आकाशगामिनि, तुझें स्वरूप व ब्रह्मचर्य हीं निर्मल असून नील मेघासारिखी तूं कृष्णवर्ण आहेस आणि संकर्षणाप्रमाणें तुझें मुख आहे १०. इंद्रध्वजासारिखे उन्नत व विशाल असे दोन बाहु, पात्र धारण केलेला एक, कमलाचा स्वीकार केलेला एक, घंटेचा परिग्रह केलेला एक आणि पाश, धनुष्य व महाचक्र हीं नानाप्रकारचीं आयुधें घेतलेले तीन असे आठ हात तूं धारण करणारी असून पृथ्वींतील अत्यंत शुद्ध स्त्री अशी तूंच आहेस आणि कुंडलांनीं भरलेल्या कर्णांच्या योगानें तूं भूषित झालेली आहेस ११, १२. हे देवि, चंद्राशीं स्पर्धा करणारें मुख, अद्भुत मुकुट व शोभायमान वेणी, ह्यांनीं तूं झळकत आहेस १३ आणि भुजंगाकृति कमरपट्टा तुझे ठिकाणीं चमकत असल्यामुळें वासुकी सर्पानें बद्ध झालेल्या मंदरपर्वताप्रमाणें तूं दिसत आहेस १४. मयूरपिच्छांच्या उन्नत ध्वजानें तूं झळकत आहेस; ब्रह्मचर्यव्रताचें अवलंबन करून तूं स्वर्गस्थान पवित्र केलें आहेस १५; आणि ह्मणूनच, हे महिषासुरनाशिनि देवि, त्रैलोक्याच्या रक्षणाकरितां देव तुझें स्तवन व पूजनही करीत असतात. तस्मात्, हे सुरश्रेष्ठे, मजवर प्रसन्न होऊन दया कर आणि मला कल्याणकारक हो १६. जया आणि विजया तूंच असून संग्रामामध्यें जय देणारी तूंच आहेस. ह्यास्तव, तूं मलाही विजय दे. कारण, सांप्रत तूंच वर देणारी आहेस १७. हे कालि, हे कालि, हे महाकालि, हे मद्यमांसपशुप्रिये, विंध्यनामक

कृतानुयात्रा भूतैस्त्वं वरदा कामचारिणि । भारावतारे ये च त्वां संस्मरि-
ष्यन्ति मानवाः १९ प्रणमन्ति च ये त्वां हि प्रभाते तु नरा भुवि । न तेषां
दुर्लभं किंचित्पुत्रतो धनतोपि वा २० दुर्गात्तारयसे दुर्गे तत्त्वं दुर्गा स्मृता
जनैः । कान्तारेष्ववसन्नानां मग्नानां च महार्णवे २१ दस्युभिर्वा निरु-
द्धानां त्वं गतिः परमा नृणाम् २२ जलप्रतरणे चैव कान्तारेष्वटवीषु च ।
ये स्मरन्ति महादेवि न च सीदन्ति ते नराः २३ त्वं कीर्तिः श्रीर्धृतिः
सिद्धिर्ह्रीर्विद्या संततिर्मतिः । सन्ध्या रात्रिः प्रभा निद्रा ज्योत्स्ना
कान्तिः क्षमा दया २४ नृणां च बन्धनं मोहं पुत्रनाशं धनक्षयम् ।
व्याधिं मृत्युं भयं चैव पूजिता नाशयिष्यसि २५ सोहं राज्यात्परिभ्रष्टः
शरणं त्वां प्रपन्नवान् । प्रणतश्च यथा मूर्ध्ना तव देवि सुरेश्वरि २६
त्राहि मां पद्मपत्राक्षि सत्ये सत्या भवस्व नः । शरणं भव मे दुर्गे
शरण्ये भक्तवत्सले २७ एवं स्तुता हि सा देवी दर्शयामास पाण्डवम् ।
उपगम्य तु राजानमिदं वचनमब्रवीत् २८ देव्युवाच॥शृणु राजन्महाबाहो

श्रेष्ठ पर्वतावर तुझें अक्षय्य स्थान आहे १८. लोक नेहमीं तुझ्या दर्शनाला जात असतात आणि, हे यथेष्टगामिनि, तूं त्यांना वर देत असतेस. संकटांतून पार पडण्याकरितां जे मानव तुझें स्मरण करीत असतात १९ आणि प्रभातकालीं पृथ्वीवरील जे पुरुष तुला प्रणाम करीत असतात, त्यांना पुत्रांच्या अथवा धनांच्या बाजूनें कोणतीही गोष्ट दुर्लभ नाहीं २०. हे दुर्गे, दुर्गापासून (ह्मणजे संकटापासून) तूं रक्षण करीत असल्यामुळें लोक तुला दुर्गा असें ह्मणतात. अरण्यामध्यें संकटांत सांपडलेल्या, महासागरामध्यें मग्न झालेल्या २१ व चोरांनीं आडविलेल्या लोकांचा मुख्य आधार तूंच आहेस २२. अगाध जल तरून जाण्याचा प्रसंग आला असतां आणि दुर्गम मार्गांतून व महारण्यांतून जावयाचें असतां, हे महादेवि, जे मानव तुझें स्मरण करितात ते नाश पावत नाहींत २३. कीर्ति, श्री, धृति, सिद्धि, ऱ्ही, विद्या, संतति, मति, संध्या, रात्रि, प्रभा, निद्रा, ज्योत्स्ना, कांति, क्षमा आणि दया तूंच असून २४ मानवांनीं तुझें पूजन केलें असतां बंधन, मोह, पुत्र-नाश, धनक्षय, व्याधि, मृत्यु आणि भय हीं दुःखें तूं नाहींशीं करितेस २५. हे सुरेश्वरि, हे देवि, मी राज्यभ्रष्ट झालों असून तुला शरण आलों आहें आणि मस्तकानें तुला प्रणाम करीत आहें २६. तस्मात्, हे दुर्गे, हे शरण्ये, हे भक्तवत्सले, तूं माझा आश्रय हो आणि, हे कमलनयने सत्ये, तूं आह्मांला सत्य हो " २७. ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें स्तवन केलें असतां देवीनें त्या पांडुपुत्राला दर्शन दिलें आणि जवळ जाऊन ती त्या

मदीयं वचनं प्रभो । भविष्यत्यचिरादेव सङ्ग्रामे विजयस्तव २९ मम प्रसादान्निर्जित्य हत्वा कौरववाहिनीम् । राज्यं निष्कण्टकं कृत्वा भोक्ष्यसे मेदिनीं पुनः ३० भ्रातृभिः सहितो राजन्प्रीतिं प्राप्स्यसि पुष्कलाम् । मत्प्रसादाच्च ते सौख्यमारोग्यं च भविष्यति ३१ ये च संकीर्तयिष्यन्ति लोके विगतकल्मषाः । तेषां तुष्टा प्रदास्यामि राज्यमायुर्वपुः सुतम् ३२ प्रवासे नगरे चापि सङ्ग्रामे शत्रुसङ्कटे । अटव्यां दुर्गकान्तारे सागरे गहने गिरौ ३३ ये स्मरिष्यन्ति मां राजन्यथाहं भवता स्मृता । न तेषां दुर्लभं किंचिदस्मिँल्लोके भविष्यति ३४ इदं स्तोत्रवरं भक्त्या शृणुयाद्वा पठेत वा । तस्य सर्वाणि कार्याणि सिद्धिं यास्यन्ति पाण्डवाः ३५ मत्प्रसादाच्च वः सर्वान्विराटनगरे स्थितान् । न प्रज्ञास्यन्ति कुरवो नरा वा तन्निवासिनः ३६ इत्युक्त्वा वरदा देवी युधिष्ठिरमरिन्दमम् । रक्षां कृत्वा च पाण्डूनां तत्रैवान्तरधीयत ३७ [२१७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि पाण्डवप्रवेशपर्वणि दुर्गास्तवे षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

धर्मराजाला ह्मणाली २८ " हे प्रभो, हे महापराक्रमी राजा, माझें ह्मणणें ऐकून घे. संग्रामामध्यें लवकरच तुला विजय प्राप्त होईल २९. माझ्या प्रसादानें शत्रूंना जिंकून, कौरवसेनेचा वध करून आणि राज्यांतील सर्व कंटक नाहींसे करून तूं पुनरपि पृथ्वीचा उपभोग घेशील ३० व, हे राजा, भ्रात्यांसहवर्तमान तुला अतिशय आनंद प्राप्त होऊन माझ्या प्रसादामुळें सौख्य व आरोग्य हीं तुला प्राप्त होतील ३१. जे निष्पाप लोक माझें स्तवन करितील त्यांनाही मी संतुष्ट होऊन राज्य, आयुष्य, शरीरसामर्थ्य आणि पुत्र देईन ३२. प्रवास, नगर, संग्राम, शत्रुभय, अरण्य, जाण्यास अशक्य असा कठीण मार्ग, सागर, वन आणि पर्वत ३३ ह्यांसंबंधानें संकट प्राप्त झालें असतां, हे राजा, तुझ्याप्रमाणें जे माझें स्मरण करितील त्यांना इहलोकीं कोणतीही गोष्ट दुर्लभ होणार नाहीं ३४. हे पांडवहो, हें उत्कृष्ट स्तोत्र जो पुरुष भक्तीनें श्रवण करील अथवा पठण करील त्याचीं सर्व कार्यें सिद्धीस जातील ३५. विराटाच्या नगरामध्यें तुह्मी सर्व राहिला असतां माझ्या प्रसादामुळें कौरव अथवा तेथील लोक तुह्मांला ओळखणार नाहींत ३६. ह्याप्रमाणें शत्रुदमन करणाऱ्या युधिष्ठिराला सांगून व पांडवांचें रक्षण करण्याचें अभिवचन देऊन ती देवी तेथेंच गुप्त झाली ३७. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील पांडवप्रवेशपर्वापैकीं दुर्गास्तवनाविषयीं सहावा अध्याय समाप्त झाला ॥ ६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततो विराटं प्रथमं युधिष्ठिरो राजा सभाया-मुपविष्टमाव्रजत् । वैदूर्यरूपान्प्रतिमुच्य काञ्चनानक्षान्स कक्षे परिगृह्य वाससा १ नराधिपो राष्ट्रपतिं यशस्विनं महायशाः कौरववंशवर्धनः । महानुभावो नरराजसत्कृतो दुरासदस्तीक्ष्णविषो यथोरगः २ बलेन रूपेण नरर्षभो महानपूर्वरूपेण यथामरस्तथा । महाभ्रजालैरिव संवृतो रविर्यथा-नलो भस्मवृतश्च वीर्यवान् ३ तमापतन्तं प्रसमीक्ष्य पाण्डवं विराटराडि-न्दुमिवाभ्रसंवृतम् । समागतं पूर्णशशिप्रभाननं महानुभावं न चिरेण दृष्ट-वान् ४ मन्त्रिद्विजान्सूतमुखान्विशस्तथा ये चापि केचित्परितः समासते । पप्रच्छ कोऽयं प्रथमं समेयिवान्नृपोपमोऽयं समवेक्षते सभाम् ५ न तु द्विजोऽयं भविता नरोत्तमः पतिः पृथिव्या इति मे मनोगतम् । न चास्य दासो न रथो न कुञ्जरः समीपतो भ्राजति चायमिन्द्रवत् ६ शरीरलि-ङ्गैरुपसूचितो ह्ययं मूर्धाभिषिक्त इति मे मनोगतम् । समीपमायाति च मे गतव्यथो यथा गजस्तामरसीं मदोत्कटः ७ वितर्कयन्तं तु नरर्षभ-स्तथा युधिष्ठिरोऽभ्येत्य विराटमब्रवीत् । सम्राड्विजानात्विह जीवनार्थिनं

वैशंपायन सांगतात:—तदनंतर राष्ट्रपति यशस्वी विराट सभेमध्यें बसला असतांना वैदूर्य-रत्नखचित सुवर्णाचे फांसे वस्त्रामध्यें बांधून घेऊन प्रथम युधिष्ठिरराजा त्याचेकडे आला. तो महाकीर्तिमान् व महाप्रभावी धर्मराजा कौरववंशाची कीर्ति वृद्धिंगत करणारा असून राजांनीं त्याचा सत्कार केलेला होता आणि तीक्ष्ण विषानें युक्त असलेल्या भुजंगाप्रमाणें पूर्वी त्याच्याजवळ जाणेंही इतरांना दुर्घट होतें १,२. बल, रूप आणि अपूर्व कांति ह्यांच्या योगानें तो भव्य पुरुषश्रेष्ठ युधिष्ठिर देवाप्रमाणें असल्यामुळें प्रचंड मेघजालांनीं आच्छा-दिलेला सूर्यच कीं काय अथवा भस्मानें झांकलेला वीर्यवान् अग्निच कीं काय असा दिसत होता ३. पूर्ण चंद्राप्रमाणें ज्याचें मुख आहे असा तो महानुभावी पांडुपुत्र मेघाच्छादित चंद्रच कीं काय असा येत असलेला दृष्टीं पडतांक्षणीं विराटराजा त्याच्याकडे पाहूं लागला ४ आणि मंत्री, द्विज, राजे, पौराणिक वगैरे व इतरही जे त्याच्या भोंवतीं बसले होते त्यांना, विचारूं लागला कीं " हा कोण प्रथमच येथें आला आहे? हा नृपतुल्य असून सभेकडे पाहत आहे ५. परंतु, हा द्विज नव्हे. हा पुरुषश्रेष्ठ पृथ्वीचा अधिपति असावा असें मला वाटतें. परंतु, इंद्राप्रमाणें जरी हा झळकत आहे तरी दास, रथ आणि गज ह्याच्याजवळ कांहीं एक दिसत नाहीं ६. ह्याच्या शरीरावरील चिन्हांवरून पाहूं गेलें असतां हा मूर्धाभिषिक्त राजा असावा अशी माझ्या मनाची अटकळ होत आहे आणि मदमत्त गज ज्याप्रमाणें कमलिनीकडे जात असतो त्याप्रमाणें हा निःशंकपणें माझ्याजवळ येत आहे " ७. ह्याप्रमाणें विराट

विनष्टसर्वस्वमुपागतं द्विजम् ८ इहाहमिच्छामि तवानघान्तिके वस्तुं यथा कामचरस्तथा विभो । तमब्रवीत्स्वागतमित्यनन्तरं राजा प्रहृष्टः प्रतिसंगृहाण च ९ तं राजसिंहं प्रतिगृह्य राजा प्रीत्यात्मना चैवमिदं बभाषे । कामेन ताताभिवदाम्यहं त्वां कस्यासि राज्ञो विषयादिहागतः १० गोत्रं च नामापि च शंस तत्त्वतः किं चापि शिल्पं तव विद्यते कृतम् ११ युधिष्ठिर उवाच ॥ युधिष्ठिरस्यासमहं पुरा सखा वैयाघ्रपद्यः पुनरस्मि विप्रः । अक्षान्प्रयोक्तुं कुशलोस्मि देविनां कङ्केति नाम्नास्मि विराट विश्रुतः १२ विराट उवाच ॥ ददामि ते हन्त वरं यमिच्छसि प्रशाधि मत्स्यान्वशगो ह्यहं तव । प्रियाश्च धूर्ता मम देविनः सदा भवांश्च देवोपम राज्यमर्हति १३ युधिष्ठिर उवाच ॥ प्राप्तो विवादः प्रथमं विशाम्पते न विद्यते कं च न मत्स्य हीनतः । न मे जितः कश्चन धारयेद्धनं वरो ममैषोस्तु तव प्रसादजः १४ विराट उवाच ॥ हन्यामवश्यं यदि तेप्रियं चरेत्प्रव्राजयेयं विषयाद्द्विजांस्तथा । शृण्वन्तु मे जानपदाः

तर्क करीत आहे तोंच युधिष्ठिर जवळ येऊन त्याला ह्मणाला " सर्वस्व नष्ट झाल्यामुळें उपजीविकेकरितां मी द्विज येथें आलों आहें, हें महाराजांना विदित व्हावें ८. हे निष्पाप प्रभो, आपल्या मर्जीप्रमाणें वागून येथें आपल्याजवळ वास्तव्य करावें अशी माझी इच्छा आहे. " असें युधिष्ठिरानें सांगितल्यावर विराटराजानें 'आपलें येणें झालें हें फार उत्तम झालें' असें ह्मणून आनंदानें त्याचा स्वीकार केला ९. आणि त्या राजसिंहाचा स्वीकार केल्यानंतर आनंदानें व मनापासून तो त्याला ह्मणाला " बाबारे, मी तुला मनापासून विचारीत आहें. कोणत्या राजाच्या देशांतून तूं येथें आला आहेस ? १०. आपलें कुल व नाम तूं खरें खरें सांग आणि कोणती शिल्पविद्या तूं संपादन केली आहेस तें कथन कर " ११. युधिष्ठिर ह्मणतोः—मी वैयाघ्रपद्य विप्र असून पूर्वीं युधिष्ठिराचा सखा होतो. हे विराटा, द्यूत खेळणाऱ्यांपैकीं मी एक असून फांसे टाकण्यामध्यें मी निपुण आहें आणि कंक या नांवानें प्रसिद्ध आहे १२. विराट ह्मणतोः—तुला जो वर हवा असेल तो मी देतों; हवें असल्यास मत्स्य देशाचें राज्यही तूं कर; मी तुझ्या आज्ञेंत वागेन. हे देवतुल्य, द्यूत खेळणारे जुगार मला नेहमीं प्रिय आहेत आणि तूं तर राज्यालाही पात्र आहेस १३. युधिष्ठिर ह्मणतोः—हे प्रजाधिपते, कोणाचाही जय झाला असतां पराजिताकडून वाद उपस्थित होत नाहीं असें ह्या द्यूतामध्यें कधीं घडत नाहीं. ह्यास्तव, माझ्या हातून पराजय पावलेल्या कोणीही माझें द्रव्य ठेवूं नये, हा वर तुझ्या कृपेनें मला प्राप्त व्हावा १४. विराट ह्मणतोः—जो तुझ्या मर्जीविरुद्ध वागेल त्याच

समागताः कङ्को यथाहं विषये प्रभुस्तथा १५ समानयानो भवितासि मे सखा प्रभूतवस्त्रो बहुपानभोजनः । पश्येस्त्वमन्तश्च बहिश्च सर्वदा कृतं च ते द्वारमपावृतं मया १६ ये त्वानुवादेयुरवृत्तिकर्शिता ब्रूयाश्च तेषां वचनेन मां सदा । दास्यामि सर्वं तदहं न संशयो न ते भयं विद्यति संनिधौ मम १७ वैशम्पायन उवाच ॥ एवं स लब्ध्वा तु वरं समागमं विराटराजेन नरर्षभस्तदा । उवास धीरः परमार्चितः सुखी न चापि कश्चिच्चरितं बुबोध तत् १८ [२३५] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि पाण्डवप्रवेशपर्वणि युधिष्ठिरप्रवेशो नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

वैशम्पायन उवाच । अथापरो भीमबलः श्रिया ज्वलन्नुपाययौ सिंहविलासविक्रमः । खजां च दर्वीं च करेण धारयन्नसिं च कालाङ्गमकोशमव्रणम् १ स सूदरूपः परमेण वर्चसा रविर्यथा लोकमिमं प्रकाशयन् ।

मी अवश्य वधही करीन आणि मर्जीविरुद्ध वागणारे ब्राह्मण असल्यास त्यांना देशांतून हांकून लावीन. ह्या राज्यामध्यें माझ्याप्रमाणें कंकही प्रभु आहे हें माझें ह्मणणें येथें जुळलेल्या देशांतील लोकांनीं ऐकून ठेवावें १५. एका वाहनांत बसून जाणारा तूं माझा सखा आहेस आणि वस्त्रें व खाद्य पेय पदार्थ ह्यांची तुला समृद्धि आहे; इतकेंच नव्हे परंतु, आंत अथवा बाहेर हवें तेव्हां जाण्याची तुला मोकळीक आहे. मी तुला सर्व द्वारें खुलीं ठेविलेलीं आहेत १६. उपजीविकेचें साधन नसल्यामुळें दुर्गतीला पांचलेले असे जे लोक आपली स्थिति तुझ्यापाशीं येऊन सांगतील त्यांना तूं आपल्या आज्ञेनें नेहमीं माझ्याकडे पाठवीत जा. ह्मणजे तुझ्या आज्ञेप्रमाणें मी सर्व कांहीं त्यांना देत जाईन ह्यांत संशय नाहीं व माझ्याजवळ राहण्यानें तुला कसलेंही भय प्राप्त होणार नाहीं १७. वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें पुरुषश्रेष्ठ धर्मराजाची विराटराजाशीं उत्कृष्ट प्रीति जडून तो ज्ञानी धर्मराज उत्कृष्ट आदरसत्कार होत असतांना तेथें सुखानें राहिला; परंतु, त्याचे आचरणावरून तो धर्मराज आहे असें कोणाच्याही लक्ष्यांत आलें नाहीं १८. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील पांडवप्रवेशपर्वांपैकीं युधिष्ठिराच्या प्रवेशाविषयीं सातवा अध्याय समाप्त झाला ॥ ७ ॥

वैशंपायन सांगतात:—सिंहाच्या विलासयुक्त गतीप्रमाणें ज्याच्या चालण्याची ढब आहे व ज्याचें बल प्रचंड आहे असा कांतीनें झळकत. असलेला दुसरा पांडुपुत्र भीमसेन पळी, कलथा आणि कोठेंही खांड न पडलेली अशी पोलादी नागवी तरवार हातांत घेऊन जवळ आला १. सारांश, सूर्याप्रमाणें हें जगत् आपल्या उत्कृष्ट

स कृष्णवासा गिरिराजसारवांस्तं मत्स्यराजं समुपेत्य तस्थिवान् २ तं प्रेक्ष्य राजा रमयन्नुपागतं ततोब्रवीज्जानपदान्समागतान् । सिंहोन्नतांसोयमतीव रूपवान्प्रदृश्यते को नु वरर्षभो युवा ३ अदृष्टपूर्वः पुरुषो रविर्यथा वितर्कयन्नास्य लभामि निश्चयम् । तथास्य चित्तं ह्यपि संवितर्कयन्नरर्षभस्यास्य न यामि तत्त्वतः ४ दृष्ट्वैव चैनं तु विचारयाम्यहं गन्धर्वराजो यदि वा पुरन्दरः । जानीत कोयं मम दर्शने स्थितो यदीप्सितं तल्लभतां च मा चिरम् ५ विराटवाक्येन च तेन चोदिता नरा विराटस्य सुशीघ्रगामिनः । उपेत्य कौन्तेयमथाब्रुवंस्तदा यथा स राजावददाच्युतानुजम् ६ ततो विराटं समुपेत्य पाण्डवस्त्वदीनरूपं वचनं महामनाः । उवाच सूदोस्मि नरेन्द्र बल्लवो भजस्व मां व्यञ्जनकारमुत्तमम् ७ विराट उवाच ॥ न सूदतां बल्लव श्रद्दधामि ते सहस्रनेत्रप्रतिमो विराजसे । श्रिया च रूपेण च विक्रमेण च प्रभाससे त्वं नृवरो

तेजानें प्रकाशित करणारा तो आचाऱ्याचें रूप घेतलेला, मलिन वस्त्रं परिधान केलेला आणि पर्वतराज हिमालयाप्रमाणें बलाढ्य असलेला भीमसेन त्या मत्स्यराज विराटाजवळ येऊन उभा राहिला २. तो जवळ आलेला अवलोकन करून तेथें जुळलेल्या देशांतील लोकांना आल्हाद उत्पन्न करीत करीत राजा ह्मणाला " सिंहाप्रमाणें ज्याचे स्कंध उन्नत आहेत असा हा अति रूपवान् आणि उत्तमांतलाही उत्तम तरुण पुरुष कोण बरें दिसत आहे? ३. सूर्याप्रमाणें प्रकाशत असणारा असा पुरुष आजपर्यंत माझ्या कधीं दृष्टीं पडला नाहीं आणि मी जरी तर्क करीत आहें तरी हा कोण असावा अशाविषयीं माझ्या मनाचा निश्चय होत नाहीं व ह्या पुरुषश्रेष्ठाच्या मनांतील हेतु काय असावा ह्याचेंही मला खरोखर अनुमान होत नाहीं ४. ह्याला अवलोकन करितांक्षणीं त्याची चौकशी करण्याची मला इच्छा झाली आहे. ह्यास्तव, माझ्या दृष्टीसमोर उभा असलेला हा कोण आहे ? गंधर्वराज आहे किंवा इंद्र आहे ? त्याची तुह्मी चौकशी करा. आणि जें ह्याला हवें असेल तें विलंब न होतां प्राप्त होऊं द्या " ५. ह्याप्रमाणें विराटाची आज्ञा झाली असतां फारच शीघ्र गमन करणारे विराटाचे लोक त्या धर्मानुज कुंतीपुत्राजवळ गेले आणि त्या राजाच्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं त्याला विचारिलें ६. नंतर महाशय पांडुपुत्र भीमसेन प्रसन्न मुद्रेनें बसलेल्या विराटाजवळ येऊन ह्मणाला " हे राजा, मी, बल्लव आचारी आहें; ह्यास्तव, भाजीपाला वगैरे उत्कृष्ट तयार करणाऱ्या मला आपण आश्रय द्या " ७. विराट ह्मणतो:—हे बल्लवा, तूं आचारी असावास असा मला विश्वास पटत नाहीं. तेज, रूप

नरेष्विव ८ भीम उवाच ॥ नरेन्द्र सूदः परिचारकोस्मि ते जानामि सूपान्प्रथमं च केवलान् । आस्वादिता ये नृपते पुराभवन्युधिष्ठिरेणापि नृपेण सर्वशः ९ बलेन तुल्यश्च न विद्यते मया नियुद्धशीलश्च सदैव पार्थिव । गजैश्च सिंहैश्च समेयिवानहं सदा करिष्यामि तवानघ प्रियम् १० विराट उवाच ॥ ददामि ते हन्त वरान्महानसे तथा च कुर्याः कुशलं प्रभाषसे । न चैव मन्ये तव कर्म यत्समं समुद्रनेमिं पृथिवीं त्वमर्हसि ११ यथा हि कामो भवतस्तथा कृतं महानसे त्वं भव मे पुरस्कृतः । नराश्च ये तत्र समाहिताः पुरा भवांश्च तेषामधिपो मया कृतः १२ वैशम्पायन उवाच ॥ तथा स भीमो विहितो महानसे विराटराज्ञो दयितोऽभवद्दृढम् । उवास राज्ये न च तं पृथग्जनो बुबोध तत्रानुचराश्च केचन १३[२४८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि पाण्डवप्रवेशपर्वणि भीमप्रवेशेऽष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

आणि गति ह्यांच्या योगानें तूं इंद्रासारिखा भासत आहेस आणि खरोखर लोकांमध्यें तूं कोणी तरी उत्कृष्ट पुरुष आहेस ८. भीमसेन ह्मणतोः—हे राजा, चाकरी करून रहाणारा मी आचारी आहें. केवल वरणभाज्या उत्तम रीतीनें कशा तयार कराव्या हें मला ठाऊक आहे. हे राजा, माझा सर्व प्रकारचा भाजीपाला पूर्वी युधिष्ठिरराजानें सेवन केलेला आहे ९. हे भूपते, बलानें माझ्याशीं बरोबरी करणारा कोणी नाहीं. युद्ध करणें हा माझा नेहमींचा स्वभावच पडून गेलेला आहे आणि गजांशीं व सिंहांशींही मीं सामना केलेला आहे. ह्यास्तव, हे निष्पापा राजा, मी नेहमीं तुझें प्रिय करीत जाईन १०. विराट ह्मणतोः—होय. मुत्पाकासंबंधानें मी तुला सर्व कांहीं अधिकार देतों. तूं ज्याप्रमाणें चांगलें भाषण करीत आहेस त्याप्रमाणेंच आपलें काम करीत जा. परंतु, तूं जें हें आपलें कर्म सांगत आहेस तसें कर्म कोणाचेंही मला मुळींच माहित नाहीं. खरोखर समुद्रवलयांकित पृथ्वीच्याही अधिपति होण्यास तूं पात्र आहेस ११. तुझ्या इच्छेप्रमाणें मीं केलें आहे. मुत्पाकामध्यें तूं माझा पुरस्कर्ता हो. आजपर्यंत जे लोक तिकडे नेमिले आहेत त्या सर्वांचा अधिपति मीं तुला केलें आहे १२. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें मुत्पाकावर नेमणूक झाली असतां तो भीमसेन विराटराजाला अतिशय प्रिय झाला आणि त्याच्या राज्यांत राहिला. परंतु, सामान्य लोकांना तो उमगला नाहीं आणि अनुयायांनाही त्याची ओळख पटली नाहीं १३. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील पांडवप्रवेशपर्वापैकीं भीमसेनाच्या प्रवेशाविषयीं आठवा अध्याय समाप्त झाला ॥ ८ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततः केशान्समुत्क्षिप्य वेल्लिताग्राननिन्दितान् । कृष्णान्सूक्ष्मान्मृदून्दीर्घान्समुद्ग्रथ्य शुचिस्मिता १ जुगूहे दक्षिणे पार्श्वे मृदूनासितलोचना । वासश्च परिधायैकं कृष्णा सुमलिनं महत् ॥ कृत्वा वेषं च सैरन्ध्र्यास्ततो व्यचरदार्तवत् २ तां नराः परिधावन्तीं स्त्रियश्च समुपाद्रवन् । अपृच्छंश्चैव तां दृष्ट्वा का त्वं किं च चिकीर्षसि ३ सा तानुवाच राजेन्द्र सैरन्ध्र्यहमिहागता । कर्म चेच्छामि वै कर्तुं तस्य यो मां पुपूषति ४ तस्या रूपेण वेषेण श्लक्ष्णया च तथा गिरा । न श्रद्दधत तां दासीमन्नहेतोरुपस्थिताम् ५ विराटस्य तु कैकेयी भार्या परमसंमता । आलोकयन्ती ददृशे प्रासादाद्द्रुपदात्मजाम् ६ सा समीक्ष्य तथारूपामनाथामेकवाससम् । समाहूयाब्रवीद्भद्रे का त्वं किं च चिकीर्षसि ७ सा तामुवाच राजेन्द्र सैरन्ध्र्यहमुपागता । कर्म चेच्छाम्यहं कर्तुं तस्य यो मां युयुक्षति ८ सुदेष्णोवाच ॥ नैवंरूपा भवन्त्येव यथा वदसि

वैशंपायन सांगतात:—तदनंतर ज्यांचीं शेवटें वेलासारिखीं वळलेलीं आहेत असे आपले कृष्णवर्ण, सूक्ष्म, मृदु, दीर्घ व निर्दोष केंस सांवरून व त्यांना गांठ देऊन सुहास्यवदना द्रौपदीनें १ उजव्या बाजूला ते केंस केले आणि अत्यंत मलिन असें एक वस्त्र परिधान करून व सैरंध्रीचा वेष घेऊन ती कृष्णनयना द्रौपदी दुःखित स्त्रीप्रमाणें इकडे तिकडे हिंडूं लागली २ व ती धांवूं लागली असतां पुरुष व स्त्रिया तिच्याकडे धांवल्या. तिला अवलोकन करितांक्षणीं त्या स्त्रीपुरुषांनीं " तूं कोण? व तुझ्या मनांत काय आहे ? " असे प्रश्न केले असतां ती त्यांना ह्मणाली ३ " महाराज, मी सैरंध्री येथें आल्यें आहें आणि जो माझें पोषण करील त्याचें काम करण्याची माझी इच्छा आहे " ४. ह्याप्रमाणें जरी तिनें सांगितलें तरी अन्नाकरितां आलेली ती दासी आहे असें तिच्या रूपावरून, वेषावरून व मधुर वाणीवरून त्यांना वाटलें नाहीं ५. विराटाला अत्यंत संमत असलेली त्याची भार्या केकयराजकन्या वाड्यावर पहात उभी राहिली असतांना द्रुपदराजाच्या कन्येला तेथून तिनें अवलोकन केलें ६; आणि तशा प्रकारची रूपवती असतांनाहीं अनाथ व एक वस्त्र परिधान केलेल्या तिला अवलोकन करितांक्षणीं हांक मारून ती तिला ह्मणाली " हे कल्याणि, तूं कोण ? व तुझी काय इच्छा आहे ? " ७. ह्यावर तिला अनुलक्षून ती द्रौपदी ह्मणाली " महाराज, मी सैरंध्री आल्यें आहें आणि जो मला चाकरीस ठेवील त्याची सेवा करण्याची माझी इच्छा आहे " ८. सुदेष्णा ह्मणते:—हे सुंदरि, तूं सांगत आहेस; परंतु, अशा प्रकारच्या दासी नसतात.

भामिनि। प्रेषयन्तीव वै दासीर्दासांश्च विविधान्बहून् ९ नोच्चगुल्फा
संहतोरुस्त्रिगम्भीरा षडुन्नता। रक्ता पञ्चसु रक्तेषु हंसगद्गदभाषिणी १०
सुकेशी सुस्तनी श्यामा पीनश्रोणिपयोधरा। तेन तेनैव संपन्ना काश्मी-
रीव तुरङ्गमी ११ अरालपक्ष्मनयना बिम्बोष्ठी तनुमध्यमा। कम्बुग्रीवा
गूढशिरा पूर्णचन्द्रनिभानना १२ शारदोत्पलपत्राक्ष्या शारदोत्पलगन्धया।
शारदोत्पलसेविन्या रूपेण सदृशी श्रिया १३ का त्वं ब्रूहि यथा भद्रे
नासि दासी कथंचन। यक्षी वा यदि वा देवी गन्धर्वी यदि वाप्सराः १४
देवकन्या भुजङ्गी वा नगरस्याथ देवता। विद्याधरी किन्नरी वा यदि
वा रोहिणी स्वयम् १५ अलम्बुषा मिश्रकेशी पुण्डरीकाथ मालिनी।
इन्द्राणी वारुणी वा त्वं त्वष्टुर्धातुः प्रजापतेः १६ देव्यो देवेषु विख्याता-
स्तासां त्वं कतमा शुभे १७ द्रौपद्युवाच ॥ नास्मि देवी न गन्धर्वी
नासुरी न च राक्षसी। सैरन्ध्री तु भुजिष्यास्मि सत्यमेतद्ब्रवीमि ते १८

नानाप्रकारचे दास व दासी ह्यांना आज्ञा करणारी तूं कोणी तरी राजपत्नी आहेस ९. तुझे घोटे बाहेर दिसत नाहींत; तुझ्या मांड्या एकमेकींला चिकटल्या आहेत; तुझी वाणी, बुद्धि व नाभि हीं तीन गंभीर दिसत आहेत; नाकपुड्या, नेत्र, कान, नखें, स्तन व घांटी हीं सहा स्थलें तुझ्या शरीराच्या ठिकाणीं उन्नत आहेत; हातपायांचे तळवे, नेत्रप्रांत, ओंठ, जीभ व नखें ह्या पांच ठिकाणीं तुझा आरक्त वर्ण आहे आणि तूं हंसासारिखें मधुर भाषण करीत आहेस १०. तुझे केंस व स्तन उत्कृष्ट आहेत; वर्ण श्याम आहे; तुझे जघनप्रदेश व स्तन पुष्ट आहेत; काश्मीरदेशांतील वडवेप्रमाणें तूं सर्व लक्षणानीं संपन्न आहेस ११. तुझ्या डोळ्याच्या पापण्या वक्र आहेत; ओंठ पिकलेल्या तोंडल्याप्रमाणें लाल आहेत; पोट सडपातळ आहे; कंठ शंखाप्रमाणें तीन रेषांनीं युक्त आहे; तुझ्या शरीरावर शिरा दिसत नाहींत; पूर्णचंद्राप्रमाणें तुझें मुख आल्हादकारक आहे १२ आणि शरदृतूंतील कमलपत्रा-सारखे विशाल नेत्र, शरदृतूंतील कमलांचा सुगंध व शरदृतूंतील कमलें ह्यानीं युक्त असलेल्या लक्ष्मीची तूं रूपानें बरोबरी करीत आहेस १३. ह्यास्तव, हे कल्याणि, तूं कोण हें सांग; कांहीं असलें तरी तूं दासी नव्हेस. यक्षी, गंधर्वी, देवता, अप्सरा १४, देवकन्या, नागकन्या, नगरदेवता, विद्याधरी किन्नरी, प्रत्यक्ष रोहिणी १५, अलंबुषा, मिश्रकेशी, पुंडरीका, मालिनी, इंद्राणी, वरुणपत्नी, त्वष्ट्याची भार्या, अथवा विधात्या ब्रह्मदेवाची तूं पत्नी असावीस १६. सारांश, हे शुभे, देवांमध्यें ज्या देवता प्रख्यात आहेत त्यापैकीं तूं कोण ? १७.

केशाञ्जानाम्यहं कर्तुं पिंषे साधु विलेपनम् । मल्लिकोत्पलपद्मानां चम्पकानां तथा शुभे १९ ग्रथयिष्ये विचित्राश्च स्रजः परमशोभनाः । आराधयं सत्यभामां कृष्णस्य महिषीं प्रियाम् २० कृष्णां च भार्यां पाण्डूनां कुरूणामेकसुन्दरीम् । तत्र तत्र चराम्येवं लभमाना सुभोजनम् २१ वासांसि यावन्ति लभे तावत्तावद्रमे तथा । मालिनीत्येव मे नाम स्वयं देवी चकार सा ॥ साहमद्यागता देवी सुदेष्णे त्वन्निवेशनम् २२ सुदेष्णोवाच॥ मूर्ध्नि त्वां वासयेयं वै संशयो मे न विद्यते । न चेदिच्छति राजा त्वां गच्छेत्सर्वेण चेतसा २३ स्त्रियो राजकुले याश्च याश्चेमा मम वेश्मनि । प्रसक्तास्त्वां निरीक्षन्ते पुमांसं कं न मोहयेः २४ वृक्षांश्चावस्थितान्पश्य य इमे मम वेश्मनि । तेऽपि त्वां संनमन्तीव पुमांसं कं न मोहयेः २५ राजा विराटः सुश्रोणि दृष्ट्वा वपुरमानुषम् । विहाय मां वरारोहे गच्छेत्सर्वेण चेतसा २६ यं हि त्वमनवद्याङ्गि तरलायतलोचने । प्रसक्तमभि-

---

द्रौपदी ह्मणतेः—देवता, गंधर्वपत्नी, असुरस्त्री आणि राक्षसभार्या ह्यांपैकीं मीं कोणीएक नसून सैरंध्री दासी आहें हें मी आपणांला सत्य सांगतें १८. मला वेणी घालतां येते; आणि, हे शुभे, मालती, नानाप्रकारचीं कमलें व चंपक १९ ह्यांच्या फारच मनोहर अशा नानाप्रकारच्या माळाही मला गुंफिता येतात. कृष्णाची प्रिय राणी जी सत्यभामा तिची मीं कांहीं दिवस सेवा केली आहे २०; आणि कुरुवंशज पांडवांची जी त्रैलोक्यसुंदरी भार्या कृष्णा तिचीही मीं कांहीं दिवस शुश्रूषा केली आहे. सारांश, उत्कृष्ट भोजनाचा लाभ घेत घेत मी ठिकठिकाणीं संचार करीत असतें २१ व जितकीं जितकीं मला वस्त्रें मिळतात तितकें तितकें मला बरें वाटत असतें. मालिनी हेंच माझें नांव स्वतः राजपत्नी द्रौपदीनें ठेविलें आहे आणि, हे राजपत्नि सुदेष्णे, ती मी आज तुझ्या घरीं आलें आहें २२. सुदेष्णा ह्मणतेः—मी तुला आपल्या डोक्यावर बसवीन ह्यांत संशय नाहीं. परंतु, राजा तुझी इच्छा धरीत नसेल तर. कारण, राजा तुझा स्वीकार करीलच अशी माझ्या मनाला पूर्ण खात्री वाटत आहे. राजकुलामध्यें उत्पन्न झालेल्या स्त्रिया आणि या माझ्या घरांतील स्त्रिया जर तुझ्याकडे टक लावून पहात आहेत तर तूं (आपल्या रूपानें) कोणत्या पुरुषाला मोहित करून टाकणार नाहींस ? २३, २४. या उभ्या असलेल्या वृक्षाकडेसुद्धां पहा ! हे जे माझ्या घरीं वृक्ष आहेत हे सुद्धां तुला जसा कांहीं प्रणामच करीत आहेत. तेव्हां तूं कोणत्या बरें पुरुषाला मोह पाडणार नाहींस ? २५. हे सुंदरि, हे सुश्रोणि, अमानुषरूप अवलोकन केल्याबरोबर विराटराजा मला सोडून अगदीं मनापासून तुझाच

वीक्षेथाः स कामवशगो भवेत् २७ यश्च त्वां सततं पश्येत्पुरुषश्चारुहासिनि । एवं सर्वानवद्याङ्गि स चानङ्गवशो भवेत् २८ अध्यारोहेद्यथा वृक्षान्वधायैवात्मनो नरः । राजवेश्मनि ते सुभ्रु गृहे तु स्यात्तथा मम २९ यथा च कर्कटी गर्भमाधत्ते मृत्युमात्मनः । तथाविधमहं मन्ये वासं तव शुचिस्मिते ३० द्रौपद्युवाच । नास्मि लभ्या विराटेन न चान्येन कदाचन । गन्धर्वाः पतयो मह्यं युवानः पञ्च भामिनि ३१ पुत्रा गन्धर्वराजस्य महासत्त्वस्य कस्यचित् । रक्षन्ति ते च मां नित्यं दुःखाचारा तथा ह्यहम् ३२ यो मे न दद्यादुच्छिष्टं न च पादौ प्रधावयेत् । प्रीणेरंस्तेन वासेन गन्धर्वाः पतयो मम ३३ यो हि मां पुरुषो गृध्येद्यथान्याः प्राकृताः स्त्रियः । तामेव स निवसेद्रात्रिं प्रविश्य च परां तनुम् ३४ न चाप्यहं चालयितुं शक्या केनचिदङ्गने । दुःखशीला हि गन्धर्वास्ते च मे बलवत्प्रियाः ३५ प्रच्छन्नाश्चापि रक्षन्ति ते मां नित्यं शुचिस्मिते । सुदेष्णोवाच ॥ एवं त्वां

स्वीकार करील २६. सारांश, चंचल व विशाल नेत्रांनीं युक्त असलेली तूं, हे निर्दोष स्त्रिये, ज्याच्याकडे टक लावून पाहशील तो पुरुष कामाधीन होऊन जाईल २७; आणि, हे सुहास्यवदने, हे सर्वांगसुंदरि, जो पुरुष नेहमीं तुला अवलोकन करील तोही त्याचप्रमाणें मदनाच्या अधीन होऊन जाईल २८. हे सुंदरि, एखादा पुरुष ज्याप्रमाणें स्वतःच्या नाशाकरितांच वृक्षावर आरूढ होत असतो त्याचप्रमाणें राजगृहामध्यें तुला ठेवून माझी अवस्था होईल २९. तात्पर्य, ज्याप्रमाणें खेकडीनें गर्भ धारण केला असतां आपला मृत्यु ह्मणूनच तो तिला धारण करावा लागतो त्याचप्रमाणें, हे सुहास्यवदने, तुझें वास्तव्य मला वाटत आहे ३०. द्रौपदी ह्मणतेः—हे सुंदरि, मी विराटाला अथवा दुसऱ्या कोणाला कधींही प्राप्त व्हावयाची नाहीं. पांच तरुण गंधर्व माझे पति आहेत ३१. ते कोण्या महाशय गंधर्वराजाचे पुत्र आहेत; आणि ते माझें नित्य रक्षण करीत आहेत. तथापि, माझी वागणूक अशीच कष्ट सोसण्याची आहे ३२. मला उच्छिष्ट न देतां आणि माझ्याकडून आपले पाय धुववून न घेतां जो मला आपल्या घरीं ठेवितो, त्याच्यावर माझे गंधर्व पति, त्या माझ्या वास्तव्याच्या योगानें, प्रसन्न होत असतात ३३. परंतु, इतर प्राकृत स्त्रियांप्रमाणें जो पुरुष माझा अभिलाष धरील त्याला त्याच दिवशीं (मृत्यु येणारा असल्यामुळें) दुसऱ्या शरीरांत प्रवेश करून राहण्याची पाळी येईल ३४. हे स्त्रिये, माझें मन कोणाच्या हातूनहीं वळविलें जाणें शक्य नाहीं. कष्टानें दिवस काढणें हें माझ्या गंधर्व पतींचें शील असल्यामुळें (आणि माझाही स्वभाव तसाच असल्यामुळें) ते मला अत्यंत प्रिय आहेत ३५; व, हे सुहास्यवदने,

वासयिष्यामि यथा त्वं नन्दिनीच्छसि ३६ न च पादौ न चोच्छिष्टं स्प्रक्ष्यसि त्वं कथंचन। वैशम्पायन उवाच॥ एवं कृष्णा विराटस्य भार्यया परिसान्त्विता ३७ उवास नगरे तस्मिन्पतिधर्मवती सती। न चैनां वेद तत्रान्यस्तत्त्वेन जनमेजय ३८ [२८६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि पाण्डवप्रवेशपर्वणि द्रौपदीप्रवेशे नवमोऽध्यायः॥ ९॥

वैशम्पायन उवाच॥ सहदेवोऽपि गोपानां कृत्वा वेषमनुत्तमम्। भाषां चैषां समास्थाय विराटमुपयादथ १ गोष्ठमासाद्य तिष्ठन्तं भवनस्य समीपतः। राजाथ दृष्ट्वा पुरुषान्प्राहिणोज्जातविस्मयः २ तमायान्तमभिप्रेक्ष्य भ्राजमानं नरर्षभम्। समुपस्थाय वै राजा पप्रच्छ कुरुनन्दनम् ३ कस्य वा त्वं कुतो वा त्वं किं वा त्वं तु चिकीर्षसि। न हि मे दृष्टपूर्वस्त्वं तत्त्वं ब्रूहि नरर्षभ ४ संप्राप्य राजानममित्रतापनं ततोऽब्रवीन्मेघमहौघनिःस्वनः। वैश्योऽस्मि नाम्नाहमरिष्टनेमिर्गोसङ्ख्य आसं कुरुपुङ्गवानाम् ५ वस्तुं

ते गुप्त राहून नित्य माझें रक्षणही करीत आहेत. सुदेष्णा ह्मणते:—हे नंदिनि, तुझ्या इच्छेप्रमाणें मी तुला राहून घेईन ३६. कोणाच्या पायाला अथवा कोणाच्या उष्ट्याला कांहीं झालें तरी तुला कधींच स्पर्श करण्याची पाळी येणार नाहीं. वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें विराटाच्या भार्येनें सांत्वन केलें असतां ती पतिव्रताधर्मानें वागणारी साध्वी द्रौपदी त्या नगरामध्यें राहिली. परंतु, हे जनमेजया, तिचें खरें स्वरूप तेथें कोणाच्याही समजण्यांत आलें नाहीं ३७, ३८. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील पांडवप्रवेशपर्वापैकीं द्रौपदीच्या प्रवेशाविषयीं नववा अध्याय समाप्त झाला॥ ९॥

वैशंपायन सांगतात:—सहदेवही गोपांचा उत्कृष्ट वेष धारण करून व त्यांच्या भाषेचें अवलंबन करून विराटाकडे गेला १. तेव्हां राजवाड्यासमीपच असलेल्या गोठ्यापाशीं येऊन उभा रहात असलेल्या त्या सहदेवाला अवलोकन करितांक्षणीं राजानें आश्चर्यचकित होऊन त्याला घेऊन येण्याकरितां लोक पाठवून दिले २ आणि तेजानें झळकत असलेला तो पुरुषश्रेष्ठ येत आहे असें अवलोकन केल्यावर राजा जवळ जाऊन त्या कुरुनंदनाला ह्मणाला ३ "तूं कोणाचा? कोठून आलास? तुला काय हवें आहे? हे पुरुषश्रेष्ठा, तूं पूर्वीं कधीं माझ्या दृष्टीं पडलेला नाहींस. ह्यास्तव, तूं कोण हें सांग" ४. असो. शत्रूंना ताप देणाऱ्या त्या विराटराजाकडे गेल्यानंतर मेघासारिख्या मोठ्या गंभीर ध्वनीनें युक्त असलेला तो सहदेव

त्वयीच्छामि विशां वरिष्ठ तान्राजसिंहान्न हि वेद्मि पार्थान् । न शक्यते जीवितुमप्यकर्मणा न च त्वदन्यो मम रोचते नृपः ६ विराट उवाच ॥ त्वं ब्राह्मणो यदि वा क्षत्रियोसि समुद्रनेमीश्वररूपवानसि । आचक्ष्व मे तत्त्वममित्रकर्शन न वैश्यकर्म त्वयि विद्यते क्षमम् ७ कस्यासि राज्ञो विषयादिहागतः किं वापि शिल्पं तव विद्यते कृतम् । कथं त्वमस्मासु निवत्स्यसे सदा वदस्व किं चापि तवेह वेतनम् ८ सहदेव उवाच ॥ पञ्चानां पाण्डुपुत्राणां ज्येष्ठो भ्राता युधिष्ठिरः । तस्याष्टशतसाहस्रा गवां वर्गाः शतं शतम् ९ अपरे शतसाहस्रा द्विस्तावन्तस्तथापरे । तेषां गोसङ्ख्य आसं वै तन्तिपालेति मां विदुः १० भूतं भव्यं भविष्यं च यच्च सङ्ख्यागतं गवाम् । न मेस्त्यविदितं किंचित्समन्ताद्दशयोजनम् ११ गुणाः सुविदिता ह्यासन्मम तस्य महात्मनः । आसीच्च स मया दृष्टः कुरुराजो युधिष्ठिरः १२ क्षिप्रं च गावो बहुला भवन्ति न तासु रोगो भवतीह कश्चन । तैस्तैरुपायैर्विदितं ममैतदेतानि शिल्पानि मयि स्थितानि १३ ऋषभांश्चापि

त्याला ह्मणाला " मी अरिष्टनेमि ह्या नांवाचा वैश्य आहें. मी कुरुवंशजश्रेष्ठ पांडवांचा पशुपरीक्षक होतों ५. हे प्रजाधिपते, त्या नृपश्रेष्ठ कुंतिपुत्रांचा मला पत्ता नसल्यामुळें तुझ्या घरीं राहण्याची माझी इच्छा आहे. जें कर्म मला विहित नाहीं त्याच्या योगानें माझ्या हातून उपजीविका होणें शक्य नाहीं; आणि तुझ्याशिवाय दुसरा राजा मला बरा वाटत नाहीं " ६. विराट ह्मणतोः—हे शत्रुनाशका, वैश्यकर्म तुला योग्य दिसत नाहीं. तूं ब्राह्मण, क्षत्रिय, अथवा समुद्रवलयांकित पृथ्वीचा अधिपति यांपैकीं कोण आहेस हें मला खरें खरें सांग ७. त्याचप्रमाणें तूं कोणत्या राजाच्या देशांतून येथें आला आहेस ? कोणती शिल्पविद्या तूं संपादन केली आहेस ? कशा रीतीनें तूं आह्मांजवळ नेहमीं रहाणार आहेस ? व येथें तुला काय पगार द्यावा लागणार आहे ? तें सांग ८. सहदेव ह्मणतोः—पांच पांडुपुत्रांमध्यें जेष्ठ भ्राता जो युधिष्ठिर त्याचे शंभराचा एकेक एक असे आठ लक्ष गाईंचे कळप होते ९; त्यापेक्षां दुप्पट दुप्पट गाईंचे असे एक लक्ष कळप होते आणि त्याचप्रमाणें दुसरेही कळप होते. त्या सर्वांचा पशुपरीक्षक मी होतों व तंतिपाल असें मला ह्मणत असत १०. गाईंच्या परीक्षेसंबंधानें मागलें, सध्यांचें व पुढलें सर्व कांहीं वृत्त आसपास दहा योजनेंपर्यंत मला ठाऊक असतें ११. माझे गुण त्या महात्म्याला चांगले ठाऊक होते; परंतु, तो कुरुराज युधिष्ठिर माझ्या दृष्टीं पडून आज बराच काळ लोटला आहे १२. नानाप्रकारच्या उपायांनीं गाई सत्वर पुष्कळ कशा होतात आणि कोणताही रोग त्यांना

जानामि राजन्पूजितलक्षणान् । येषां मूत्रमुपाघ्राय अपि वन्ध्या प्रसूयते १४ विराट उवाच ॥ शतं सहस्राणि समाहितानि सवर्णवर्णस्यविमिश्रितान्गुणैः । पशून्सपालान्भवते ददाम्यहं त्वदाश्रया मे पशवो भवन्त्विह १५ वैशम्पायन उवाच ॥ तथा स राज्ञो विदितो विशाम्पतेरुवास तत्रैव सुखं नरोत्तमः । न चैनमन्येपि विदुः कथंचन प्रादाच्च तस्मै भरणं यथेप्सितम् १६ [३०२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि पाण्डवप्रवेशपर्वणि सहदेवप्रवेशे दशमोऽध्यायः॥१०॥

वैशम्पायन उवाच ॥ अथापरोऽदृश्यत रूपसम्पदा स्त्रीणामलङ्कारधरो बृहत्पुमान् । प्राकारवप्रे प्रतिमुच्य कुण्डले दीर्घे च कम्बूपरिहाटके शुभे १ बाहू च दीर्घान्प्रविकीर्य मूर्धजान्महाभुजो वारणतुल्यविक्रमः । गतेन भूमिं प्रतिकम्पयंस्तदा विराटमासाद्य सभासमीपतः २ तं प्रेक्ष्य राजोपगतं सभातले व्याजात्प्रतिच्छन्नमरिप्रमाथिनम् । विराजमानं परमेण वर्चसा सुतं महेन्द्रस्य गजेन्द्रविक्रमम् ३ सर्वानपृच्छच्च सभानुचारिणः

कसा होत नाहीं, हें मला ठाऊक आहे आणि या विद्या माझ्या ठिकाणीं आहेत १३. हे राजा ज्यांचें मूत हुंगल्यानें वंध्या स्त्रीलाही गर्भ राहतो असे सुलक्षणी बैल मला ठाऊक आहेत १४. विराट ह्मणतोः—एक लक्ष कळप माझ्यापाशीं आहेत व एकसारख्या रंगाचे व रंगीबेरंगी असे गोपालांसहवर्तमान सर्वही पशु मी तुझ्या स्वाधीन करितों आणि तुझ्याच देखरेखीखालीं माझे पशु राहोत १५. वैशंपायन सांगतातः— त्याप्रमाणें त्या प्रजापालक विराटराजाला तो पुरुषश्रेष्ठ सहदेव विदित झाल्यावर तेथेंच सुखानें राहिला व त्या राजानें त्याला हवा तो पगारही दिला. परंतु, त्याला राजानें व इतरांनींही मुळींच ओळखिलें नाहीं १६. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील पांडवप्रवेशपर्वापैकीं सहदेवाच्या प्रवेशाविषयीं दहावा अध्याय समाप्त झाला ॥ १० ॥

वैशंपायन सांगतातः—तदनंतर तटावर बसलेल्या लोकांनीं दुसरा एक रूपवान् भव्य पुरुष स्त्रियांचे अलंकार धारण करणारा अवलोकन केला. त्यानें दीर्घ कुंडलें कानांत घातलीं असून सुवर्णानें मढविलेले शंखांचे चुडेही हातांत भरिले होते १. त्याचप्रमाणें आपले हात व लांब लांब केंस पसरून तो गजतुल्यपराक्रमी आजानुबाहु अर्जुन गतीनें भूमि कंपित करीत होता व शेवटीं तो सभेंत विराटाजवळ येऊन उभा राहिला २. पराकाष्ठेच्या तेजानें झळकत असलेला आणि क्लीबाच्या वेषानें स्वतःचें रूप गुप्त केलेला तो गजेंद्रतुल्यपराक्रमी शत्रुघातक महेंद्रपुत्र सभेमध्यें आलेला पाहून राजा ३ तेथील सर्व

कुतोयमायाति पुरा न मे श्रुतः । न चैनमूचुर्विदितं तदा नराः सविस्मयं वाक्यमिदं नृपोब्रवीत् ४ सत्त्वोपपन्नः पुरुषोमरोपमः श्यामो युवा वारणयूथपोपमः । आमुच्य कम्बूपरिहाटके शुभे विमुच्य वेणीमपि नह्य कुण्डले ५ स्रग्वी सुकेशः परिधाय चान्यथा शुशोभ धन्वी कवची शरी यथा । आरुह्य यानं परिधावतां भवान्सुतैः समो मे भव वा मया समः ६ वृद्धो ह्यहं वै परिहारकामः सर्वान्मत्स्यांस्तरसा पालयस्व । नैवंविधाः क्लीबरूपा भवन्ति कथंचनेति प्रतिभाति मे मनः ७ अर्जुन उवाच ॥ गायामि नृत्याम्यथ वादयामि भद्रोस्मि नृत्ये कुशलोस्मि गीते । त्वमुत्तरायै प्रदिशस्व मां स्वयं भवामि देव्या नरदेव नर्तकः ८ इदं तु रूपं मम येन किं तव प्रकीर्तयित्वा भृशशोकवर्धनम् । बृहन्नलां मां नरदेव विद्धि सुतं सुतां वा पितृमातृवर्जिताम् ९ विराट उवाच ॥ ददामि ते हन्त वरं बृहन्नले सुतां च मे नर्तय याश्च तादृशीः ।

सभासदांना ह्मणाला " हा कोठून येत आहे ? हा पूर्वी माझ्या कधीं ऐकण्यांत आलेला नाहीं. " असें राजानें भाषण केल्यानंतरही जेव्हां सभेंतील लोक तो माहितींतला आहे असें ह्मणेनात, तेव्हां राजा विस्मयपूर्वक ह्मणाला ४ " हा सत्त्ववान् व श्यामवर्ण तरुण पुरुष कांतीनें देवासारिखा असून शक्तीनें कळपाचें रक्षण करणाऱ्या गजेंद्राप्रमाणें दिसत आहे आणि सोन्यानें मढविलेले शुभ चुडे ह्यानें हातांत भरिले असल्यामुळें, कुंडलें धारण करून वेणी मोकळी सोडिली असल्यामुळें ५, माला धारण केलेल्या असल्यामुळें आणि वस्त्रही भलत्याच रीतीनें परिधान केलें असल्यामुळें उत्कृष्ट केंसानें युक्त असलेला हा पुरुष धनुष्य, बाण व कवच धारण केलेल्या योद्ध्याप्रमाणें शोभत आहे. ह्यास्तव, रथामध्यें आरूढ होऊन, (हे महापुरुषा,) तूं जात जा, तूं माझ्या पुत्राप्रमाणें रहा अथवा माझ्याप्रमाणेंच रहा ६. मी आतां वृद्ध झालों असल्यामुळें हा राज्यभार कोणावर तरी सोंपविण्याची माझी इच्छा आहे. ह्यास्तव, सर्व मत्स्यदेशाचें तूं आपल्या सामर्थ्यानें परिपालन कर. अशा प्रकारचे षंढ असण्याचा मुळींच संभव नाहीं असें माझ्या मनाला वाटतें"७. अर्जुन ह्मणतोः—मी गात असतों; नाचत असतों आणि वाजवीत असतों. नाचामध्यें मी निपुण आहें व गायनकलेंतही मी प्रवीण आहें. ह्यास्तव, उत्तरेकडे आपण माझी नेमणूक करा. ह्मणजे, हे राजा, मी स्वतःच त्या राजकन्येला नृत्य शिकवीन ८. ज्यामुळें मला हें रूप प्राप्त झालें आहे तें सांगून तुला काय उपयोग ? तें सांगितलें असतां अत्यंत दुःख मात्र होणार आहे. हे राजा, मातापितररहित मुलगा ह्मण अथवा मुलगी ह्मण, मी बृहन्नला आहें असें तूं समज ९. विराट ह्मणतोः—हे बृहन्नले, मी तुझी इच्छा

इदं तु ते कर्म समं न मे मतं समुद्रनेमिं पृथिवीं त्वमर्हसि १० वैशम्पायन उवाच ॥ बृहन्नलां तामभिवीक्ष्य मत्स्यराट्कलासु नृत्येषु तथैव वादिते । संमन्त्र्य राजा विविधैः स्वमन्त्रिभिः परीक्ष्य चैनं प्रमदाभिराशु वै ११ अपुंस्त्वमप्यस्य निशम्य च स्थिरं ततः कुमारीपुरमुत्ससर्ज तम् । स शिक्षयामास च गीतवादितं सुतां विराटस्य धनञ्जयः प्रभुः १२ सखीश्च तस्याः परिचारिकास्तथा प्रियश्च तासां स बभूव पाण्डवः १३ तथा स सत्रेण धनञ्जयो वसन्प्रियाणि कुर्वन्सह ताभिरात्मवान् । तथा च तं तत्र न जज्ञिरे जना बहिश्चरा वाप्यथ चान्तरेचराः १४ [३१६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि पाण्डवप्रवेशपर्वण्यर्जुनप्रवेशो नामैकादशोध्यायः ॥ ११ ॥

वैशम्पायन उवाच ॥ अथापरोदृश्यत पाण्डवः प्रभुर्विराटराजं तरसा समेयिवान् । तमापतन्तं ददृशे पृथग्जनो विमुक्तमभ्रादिव सूर्यमण्डलम् १ स वै हयानैक्षत तांस्ततस्ततः समीक्षमाणं स ददर्श मत्स्यराट् । ततोब्र-

---

परिपूर्ण करीन. माझ्या कन्येला आणि तशा प्रकारच्या इतरही कुमारिकांना तूं नृत्य शिकीव. परंतु, हें काम तुझ्या योग्यतेचें आहे असें मला वाटत नाहीं. समुद्रवलयांकित पृथ्वीचा उपभोग घेण्यास तूं पात्र दिसत आहेस १० वैशंपायन सांगतातः—नृत्य, वादन व इतरही कला ह्यांमध्यें प्रवीण असलेल्या त्या बृहन्नलेला अवलोकन करून, नानाप्रकारच्या आपल्या मंत्र्यांशीं ह्यासंबंधानें विचार करून, तरुण स्त्रियांकडून त्याची परिक्षा करवून आणि त्याचें पूर्ण षंढत्व अवलोकन करून मत्स्यराज विराटानें कन्यागृहामध्यें त्याला सोडिलें व त्या प्रभु धनंजयानेंही विराटाच्या कन्येला गीत व वाद्य शिकविलें ११, १२. त्याचप्रमाणें उत्तरेच्या सख्यांना व दासींनाही त्यानें गायनवादन शिकविलें व तो पांडुपुत्र अर्जुन त्यांना प्रिय झाला १३. असो. ह्याप्रमाणें तेथें कपटानें वास्तव्य करूं लागलेला तो मनोनिग्रही धनंजय त्या स्त्रियांसहवर्तमान उत्तरेच्या मर्जीप्रमाणें वागूं लागला व तो तेथें राहिला असतांना अंतस्थ अथवा बाहेरील लोकांनाही त्याची ओळख पटली नाहीं १४. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील पांडवप्रवेशपर्वापैकीं अर्जुनाच्या प्रवेशाविषयीं अकरावा अध्याय समाप्त झाला ॥ ११ ॥

वैशंपायन सांगतातः—तदनंतर दुसरा समर्थ पांडुपुत्र दृष्टीं पडूं लागला व तो वेगावेगानें विराटाजवळ आला. तेव्हां तो येत असतांना मेघांपासून मुक्त झालेलें सूर्यमंडलच कीं काय असा तो सामान्य जनांना दिसला १. त्यानें अश्वांकडे दृष्टि

वीत्ताननुगान्नरेश्वरः कुतोयमायाति नरोमरोपमः २ अयं हयानीक्षति मामकान्दृढं ध्रुवं हयज्ञो भविता विचक्षणः । प्रवेश्यतामेष समीपमाशु मे विभाति वीरो हि यथामरस्तथा ३ अभ्येत्य राजानममित्रहाब्रवीज्जयोस्तु ते पार्थिव भद्रमस्तु वः । हयेषु युक्तो नृप संमतः सदा तवाश्वसूतो निपुणो भवाम्यहम् ४ विराट उवाच ॥ ददामि यानानि धनं निवेशनं ममाश्वसूतो भवितुं त्वमर्हसि । कुतोसि कस्यासि कथं त्वमागतः प्रब्रूहि शिल्पं तव विद्यते च यत् ५ नकुल उवाच ॥ पञ्चानां पाण्डुपुत्राणां ज्येष्ठो भ्राता युधिष्ठिरः । तेनाहमश्वेषु पुरा नियुक्तः शत्रुकर्शन ६ अश्वानां प्रकृतिं वेद्मि विनयं चापि सर्वशः । दुष्टानां प्रतिपत्तिं च कृत्स्नं चैव चिकित्सितम् ७ न कातरं स्यान्मम जातु वाहनं न मेस्ति दुष्टा वडवा कुतो हयाः । जनस्तु मामाह स चापि पाण्डवो युधिष्ठिरो ग्रन्थिकमेव नामतः ८ विराट उवाच ॥ यदस्ति किंचिन्मम वाजिवाहनं

फेंकिली आणि तो इकडे तिकडे पाहूं लागला असतां मत्स्यराज विराटाच्या अवलोकनांत आल्यावर तो राजा आपल्या सेवकांना ह्मणाला "हा देवतुल्य पुरुष कोठून येत आहे २. हा माझ्या अश्वांकडे टक लावून पहात आहे. ह्यावरून हा निःसंशय निपुण अश्ववेत्ता असला पाहिजे. ह्याला तुह्मी सत्वर माझ्याजवळ घेऊन या. हा वीर मला देवासारिखा दिसत आहे" ३. इतक्यांत शत्रुनाशक नकुल राजाजवळ आला आणि ह्मणाला "हे राजा, तुमचें कल्याण असो व तुझा जयजयकार असो. हे भूपते, पूर्वी अश्वांवर माझी नेमणूक झालेली होती आणि अश्ववेत्ता ह्मणून सर्वांना मी संमत आहें. ह्यास्तव, मी तुझा उत्कृष्ट अश्वसारथि होईन ४. विराट ह्मणतो:—मी रथ, द्रव्य आणि राहण्याला जागा तुला देतों. तूं माझा अश्वसारथि होण्यास योग्य आहेस. परंतु, तूं कोठून आलास ? तूं कोणाचा आहेस ? आणि येथें कसा आलास ? हें मला सांग आणि तुझ्या अंगांत काय शिल्पविद्या आहे हेंही मला कथन कर ५. नकुल ह्मणतोः— हे शत्रुनाशका, पांच पांडुपुत्रांपैकीं ज्येष्ठ भ्राता जो युधिष्ठिर त्यानें पूर्वी अश्वांवर माझी नेमणूक केली होती ६. अश्वांची जाति मी जाणितों; त्यांना कसें शिकवावें हेंही मला सर्वस्वीं माहीत आहे; त्यांचे ठिकाणीं कांहीं खोडी असल्यास तिचें निराकरणही मी जाणीत आहें आणि अश्वरोगसंबंधीं सर्व चिकित्साही मला विदित आहे ७. माझ्या ताब्यांत असलेलें वाहन कधींही भित्रें होणार नाहीं; व घोडी देखील माझ्यापाशीं दुर्गुणी रहात नाहीं; मग अश्व कोठून राहणार ? लोक आणि तो पांडुपुत्र युधिष्ठिरही ग्रंथिक ह्याच नांवानें मला

तदस्तु सर्वं त्वदधीनमद्य वै । ये चापि केचिन्मम वाजियोजकास्त्वदा-
श्रयाः सारथयश्च सन्तु मे ९ इदं तवेष्टं, यदि वै सुरोपम ब्रवीहि यत्ते
प्रसमीक्षितं वसु । न तेनुरूपं हयकर्म विद्यते प्रभासि राजेव हि संमतो
मम १० युधिष्ठिरस्येव हि दर्शनेन मे समं तवेदं प्रियमत्र दर्शनम् । कथं
तु भृत्यैः स विनाकृतो वने वसत्यनिन्द्यो रमते च पाण्डवः ११ वैशम्पा-
यन उवाच ॥ तथा स गन्धर्ववरोपमो युवा विराटराज्ञामुदितेन पूजितः ।
न चैनमन्येपि विदुः कथंचन प्रियाभिरामं विचरन्तमन्तरा १२ एवं हि
मत्स्ये न्यवसन्त पाण्डवा यथाप्रतिज्ञाभिरमोघदर्शनाः । अज्ञातचर्यां
व्यचरन्समाहिताः समुद्रनेमीपतयोतिदुःखिताः १३ [३२९] इति श्रीम-
हाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि पाण्डवप्रवेश-
पर्वणि नकुलप्रवेशे द्वादशोध्यायः ॥१२॥ समाप्तं चेदं पाण्डवप्रवेशपर्व ॥

अथ समयपालनपर्व ॥ जनमेजय उवाच ॥ एवं ते मत्स्यनगरे प्रच्छन्नाः
कुरुनन्दनाः । अत ऊर्ध्वं महावीर्याः किमकुर्वत वै द्विज १ वैशम्पायन

हांक मारीत असे ८. विराट ह्मणतोः– माझ्यापाशीं जें ह्मणून कांहीं अश्ववाहन आहे तें सर्व आज तुझ्या स्वाधीन होईल; आणि त्याचप्रमाणें जे कांहीं मोतद्दार व सारथि माझ्यापाशीं आहेत तेही सर्व तुझ्याच ह्याताखालीं राहतील ९. हे देवतुल्य, हें काम करणें जर तुला संमत आहे तर ह्याबद्दल द्रव्य काय मिळावें अशी तुझी इच्छा आहे? हे अश्वकर्म तुला योग्य नाहीं. तूं राजासारिखा दिसत आहेस आणि माझ्याही मतानें तसाच आहेस १०. हें तुझें दर्शन युधिष्ठिराच्या दर्शनाप्रमाणें आज मला आनंदकारक झालेलें आहे.परंतु, सेवकरहित झालेला व निंदेस यत्किंचितही पात्र नसलेला तो वनामध्यें कसा बरें राहत असेल ! आणि त्याचें चित्तरंजन तरी कसें बरें होत असेल ! ११. वैशंपायन सांगतातः–ह्याप्रमाणें आनंदित झालेल्या विराटराजानें त्या श्रेष्ठ गंधर्वतुल्य तरुण पुरुषाचा सत्कार केला आणि प्रिय व मनोहर असा तो नकुल तेथें राहूं लागला असतां राजाला व इतरांनाही त्याची मुळींच ओळख पटली नाहीं १२. सारांश, ते समुद्रवलयांकित पृथ्वीचे अधिपति सत्यप्रतिज्ञ पांडव आपापल्या प्रतिज्ञेप्रमाणें अशा रीतीनें मत्स्यराज विराटापाशीं राहिले आणि दक्षतेनें राहून त्यांनीं आपल्या अज्ञातवासाचे दिवस अति दुःखानें काढिले, १३. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील पांडवप्रवेशपर्वापैकीं नकुलाच्या प्रवेशाविषयीं बारावा अध्याय समाप्त झाला ॥ १२ ॥ ह्या ठिकाणीं पांडवप्रवेशपर्वही समाप्त झालें.

येथून पुढें समयपालनपर्वाला आरंभ झाला. जनमेजय प्रश्न करितोः–हे द्विज,

उवाच ॥ एवं मत्स्यस्य नगरे प्रच्छन्नाः कुरुनन्दनाः । आराधयन्तो राजानं यदकुर्वत तच्छृणु २ तृणबिन्दुप्रसादाच्च धर्मस्य च महात्मनः । अज्ञातवासमेवं तु विराटनगरं वसन् ३ युधिष्ठिरः सभास्तारो मत्स्यानामभवत्प्रियः । तथैव च विराटस्य सपुत्रस्य विशाम्पते ४ स ह्यक्षहृदयज्ञस्तान्क्रीडयामास पाण्डवः । अक्षवत्यां यथाकामं सूत्रबद्धानिव द्विजान् ५ अज्ञातं च विराटस्य विजित्य वसु धर्मराट् । भ्रातृभ्यः पुरुषव्याघ्रो यथार्हं संप्रयच्छति ६ भीमसेनोपि मांसानि भक्ष्याणि विविधानि च । अतिसृष्टानि मत्स्येन विक्रीणीते युधिष्ठिरे ७ वासांसि परिजीर्णानि लब्धान्यन्तःपुरेर्जुनः । विक्रीणानश्च सर्वेभ्यः पाण्डवेभ्यः प्रयच्छति ८ सहदेवोपि गोपानां वेषमास्थाय पाण्डवः । दधि क्षीरं घृतं चैव पाण्डवेभ्यः प्रयच्छति ९ नकुलोपि धनं लब्ध्वा कृते कर्मणि वाजिनाम् । तुष्टे तस्मिन्नरपतौ पाण्डवेभ्यः प्रयच्छति १० कृष्णा तु सर्वान्भर्तॄंस्तान्निरीक्षन्ती तपस्विनी । यथा पुनरविज्ञाता तथा चरति भामिनी ११ एवं संपादयन्तस्ते तदान्योन्यं महारथाः । विराटनगरे चेरुः पुनर्गर्भधृता

ह्याप्रमाणें मत्स्यराजाच्या नगरामध्यें गुप्तपणानें राहिल्यानंतर त्या महावीर्यवान् कुरुनंदनांनीं काय केलें ? १. वैशंपायन सांगतात:–ह्याप्रमाणें मत्स्यराजाच्या नगरामध्यें गुप्तपणें राहिलेल्या त्या कुरुनंदनांनीं राजाची सेवा करीत असतांना काय केलें तें श्रवण कर २. महात्म्या यमधर्माच्या आणि तृणबिंदूच्या प्रसादामुळें विराटाच्या नगरांत ते अशा रीतीनें अज्ञातवासानें राहिले ३. हे प्रजापालक जनमेजया, सभासद झालेला युधिष्ठिर मत्स्यदेशांतील लोकांना आणि पुत्रांसहवर्तमान विराटराजालाही प्रिय झाला ४. अक्षद्यूताचें तत्त्व जाणणाऱ्या त्या पांडुपुत्र युधिष्ठिरानें त्यांचें चित्तरंजन केलें आणि दोरीनें बांधिलेले पक्षी ज्याप्रमाणें आपल्या मनासारिखे फिरवितां येतात त्याप्रमाणें अक्षद्यूतामध्यें त्यानें आपल्या मनासारिखे फांसे पाडून दाखविले ५. तो पुरुषश्रेष्ठ धर्मराजा विराटाचें द्रव्य जिंकून योग्यतेप्रमाणें गुप्तपणें आपल्या भ्रात्यांना देऊं लागला ६; भीमसेनही मत्स्यराजानें दिलेलीं नानाप्रकारचीं मांसें आणि अनेक प्रकारचीं भक्ष्यें युधिष्ठिराला द्रव्य घेऊन मोबदला देऊं लागला ७; अंतःपुरामध्यें मिळालेलीं जुनीं पुराणीं वस्त्रें अर्जुनही मोबदला घेऊन सर्व पांडवांना देऊं लागला ८; गोपवेष धारण केलेला पांडुपुत्र सहदेवही दहीं, दूध व तूप पांडवांना देऊं लागला ९; नकुलही अश्वाचें काम केल्यावर तो विराटराजा संतुष्ट झाला असतां द्रव्य मिळवून पांडवांना देऊं लागला १० आणि विचारी सुंदरी द्रौपदीही पांडवांकडे दृष्टि देऊन, परंतु इतरांच्या समजण्यांत न येतां,

इव १२ साशङ्का धार्तराष्ट्रस्य भयात्पाण्डुसुतास्तदा । प्रेक्षमाणास्तदा कृष्णामूषुश्छन्ना नराधिप १३ अथ मासे चतुर्थे तु ब्रह्मणः सुमहोत्सवः। आसीत्समृद्धो मत्स्येषु पुरुषाणां सुसंमतः १४ तत्र मल्लाः समापेतुर्दिग्भ्यो राजन्सहस्रशः । समाजे ब्रह्मणो राजन्यथा पशुपतेरिव १५ महाकाया महावीर्याः कालखञ्जा इवासुराः । वीर्योन्मत्ता बलोदग्रा राज्ञा समभिपूजिताः १६ सिंहस्कन्धकटिग्रीवाः स्ववदाता मनस्विनः । असकृल्लब्धलक्षास्ते रङ्गे पार्थिवसंनिधौ १७ तेषामेको महानासीत्सर्वमल्लानथाह्वयत् । आवल्गमानं तं रङ्गे नोपतिष्ठति कश्चन १८ यदा सर्वे विमनसस्ते मल्ला हतचेतसः । अथ सूदेन तं मल्लं योधयामास मत्स्यराट् १९ नोद्यमानस्तदा भीमो दुःखेनैवाकरोन्मतिम् । न हि शक्नोति विवृते प्रत्याख्यातुं नराधिपम् २० ततः स पुरुषव्याघ्रः शार्दूलशिथिलश्चरन् । प्रविवेश महारङ्गं

तेथें राहूं लागलीं ११. ह्याप्रमाणें एकमेकांचें काम करणारे ते महारथी पांडव पुन्हां गर्भाशयामध्यें राहिल्याप्रमाणेंच कीं काय विराटाच्या नगरांत वास्तव्य करूं लागले १२. सारांश, हे जनमेजयराजा, धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाच्या भीतीमुळें मनामध्यें साशंक असलेले ते पांडुपुत्र द्रौपदीवर नजर ठेवून गुप्तपणानें तेथें राहिले १३. पुढें चवथ्या महिन्यामध्यें मत्स्यदेशांतील लोकांना अत्यंत प्रिय असा फारच मोठा ब्रह्मोत्सव झाला १४. हे राजा, ब्रह्मलोकाप्रमाणें अथवा कैलासाप्रमाणें असलेल्या त्या ब्रह्मोत्सवसंबंधीं समाजामध्यें देशोदेशाहून हजारों मल्ल आले १५. वीर्यानें उन्मत्त झालेले व बलानें रसरसलेले ते मल्ल कालखंज दैत्यांप्रमाणें धिप्पाड व महाबलाढ्य होते. राजानें त्यांचा चांगल्या रीतीनें सत्कार केला १६. आणि स्कंध, कटिप्रदेश व कंठ ह्यांमध्यें सिंहाची बरोबरी करणारे ते आनंदी व अत्यंत निर्मल मल्ल रंगसभेमध्यें राजाचे समीप आले असतां लोक वारंवार त्यांच्याकडे पाहूं लागले १७. त्यांमध्यें एक मोठा मल्ल होता; त्यानें सर्व मल्लांना आव्हान केलें. परंतु, ह्याप्रमाणें तो आव्हान करून रंगसभेमध्यें उड्या मारूं लागला असतांही त्याच्याशीं सामना करण्यास कोणीही तयार होईना १८. असो. जेव्हां ते सर्वही मल्ल हताश व खिन्न झाले तेव्हां मत्स्यराज विराटानें आपल्या त्या (नवीन नेमिलेल्या) आचाऱ्याकडून त्या मल्लाशीं युद्ध करविलें १९. परंतु, राजा युद्धाची आज्ञा करूं लागला असतां भीमसेनानें मोठ्या कष्टानें आपलें अनुमोदन दिलें. कारण, (मल्लयुद्ध चाललें असतांना आपणांला लोक ओळखतील अशी त्याला भीति पडली होती; परंतु,) उघडपणें त्याला राजाचें ह्मणणें अमान्य करितां

विराटमभिपूजयन् २१ बबन्ध कक्षां कौन्तेयस्ततः संहर्षयञ्जनम्। ततस्तु वृत्रसंकाशं भीमो मल्लं समाह्वयत् २२ जीमूतं नाम तं तत्र मल्लं प्रख्यातविक्रमम्। तावुभौ सुमहोत्साहावुभौ भीमपराक्रमौ २३ मत्ताविव महाकायौ वारणौ षष्टिहायनौ। ततस्तौ नरशार्दूलौ बाहुयुद्धं समीयतुः २४ वीरौ परमसंहृष्टावन्योन्यजयकाङ्क्षिणौ। आसीत्सुभीमः संपातो वज्रपर्वतयोरिव २५ उभौ परमसंहृष्टौ बलेनातिबलावुभौ। अन्योन्यस्यान्तरं प्रेप्सू परस्परजयैषिणौ। उभौ परमसंहृष्टौ मत्ताविव महागजौ २६ कृतप्रतिकृतैश्चित्रैर्बाहुभिश्च सुसङ्कटैः। संनिपातावधूतैश्च प्रमाथोन्मथनैस्तथा २७ क्षेपणैर्मुष्टिभिश्चैव वराहोद्धूतनिःस्वनैः। तलैर्वज्रनिपातैश्च प्रसृष्टाभिस्तथैव च २८ शलाकानखपातैश्च पादोद्धूतैश्च दारुणैः। जानुभिश्चाश्मनिर्घोषैः शिरोभिश्चावघट्टनैः २९ तद्युद्धमभवद्घोरमशस्त्रं बाहुतेजसा। बलप्राणेन शूराणां समाजोत्सवसंनिधौ ३० अरज्यत जनः सर्वः

येईना २०. तदनंतर, विराटाची प्रशंसा करीत करीत तो पुरुषश्रेष्ठ भीमसेन वाघाप्रमाणें निष्काळजीनें पावलें टाकीत टाकीत मोठ्या हौद्यामध्यें गेला २१. प्रथमतः लोकांना हर्ष उत्पन्न करीत करीतच त्यानें काचा भिडाविला आणि तदनंतर त्या वृत्रतुल्य मल्लाला भीमसेनानें आव्हान केलें २२. त्या मल्लाचें नांव जीमूत असें असून त्याच्या पराक्रमाची प्रख्याति झालेली होती. असो. उभयतांही युद्धाकरितां फार उत्सुक झाले होते; उभयतांही महापराक्रमी होते आणि साठ वर्षांच्या (अगदीं ज्वान) हत्तींप्रमाणें ते उभयतां धिप्पाड मल्ल मदमत्त झालेले होते. तदनंतर अत्यंत आनंदित झालेल्या त्या उभयतां पुरुषश्रेष्ठ वीरांनीं एकमेकाचा पराजय करण्याच्या इच्छेनें बाहुयुद्धाला आरंभ केला आणि वज्र व पर्वत ह्यांतील युद्धाप्रमाणें त्यांच्यामध्यें फारच भयंकर युद्ध झालें २३, २४, २५. उभयतांनाही अतिशय हर्ष झाला होता. बलानें उभयतांही फारच भारी होते; एकमेकाला जिंकण्याच्या इच्छेनें उभयतांही एकमेकांचें छिद्र पहात होते; आणि उभयतांही मत्त गजेंद्राप्रमाणें आनंदांत आले होते २६. नानाप्रकारचे पेंच व उलटपेंच, दंडी, गटणें, सोडविणें, स्वारी भरणें, उखाड २७, (माण, कस, ढुंगणी वगैरे) क्षेपणें, रगे, धोबीपछाड, पछाड, (लूद, लुकण, धक्का वगैरे) वज्रप्राय तलप्रहार, बोटें लांब करून मिठी मारणें, बोटें रेचणें २८, (खडी टांग, खडी स्वारी वगैरे) भयंकर पादोद्धूत, पाषाणावर होणाऱ्या पाषाणप्रहाराप्रमाणें ज्यांचा आवाज निघत आहे अशा टकरा व गुडघे मारणें २९ वगैरे प्रकारांनीं त्या उभयतांमध्यें उत्सवा-

सोत्कृष्टनिनदोत्थितैः। बलिनोः संयुगे राजन्वृत्रवासवयोरिव ३१ प्रकर्षणाकर्षणयोरभ्याकर्षविकर्षणैः। आकर्षतुरथान्योन्यं जानुभिश्चापि जघ्नतुः३२ ततः शब्देन महता भर्त्सयन्तौ परस्परम् ३३ व्यूढोरस्कौ दीर्घभुजौ नियुद्धकुशलावुभौ। बाहुभिः समसज्जेतामायसैः परिघैरिव ३४ चकर्ष दोर्भ्यामुत्पात्य भीमो मल्लममित्रहा। निनदन्तमभिक्रोशञ्शार्दूल इव वारणम् ३५ समुद्यम्य महाबाहुर्भ्रामयामास वीर्यवान्। ततो मल्लाश्च मत्स्याश्च विस्मयं चक्रिरे परम् ३६ भ्रामयित्वा शतगुणं गतसत्त्वमचेतनम्। प्रत्यपिंषन्महाबाहुर्मल्लं भुवि वृकोदरः ३७ तस्मिन्विनिहते वीरे जीमूते लोकविश्रुते। विराटः परमं हर्षमगच्छद्बान्धवैः सह ३८ प्रहर्षात्प्रददौ वित्तं बहु राजा महामनाः। बल्लवाय महारङ्गे यथा वैश्रवणस्तथा ३९ एवं स सुबहून्मल्लान्पुरुषांश्च महाबलान्। विनिघ्नन्मत्स्य-

---

करितां जमलेल्या शूर लोकांच्या समाजासन्निध बाहुबल, शारीरबल व बुद्धिचातुर्य ह्यांच्या योगानें घोर युद्ध झालें ३०. हे जनमेजयराजा, वृत्रासुर आणि इंद्र ह्याप्रमाणें त्या उभयतां बलाढ्य मल्लांचें युद्ध चाललें असतांना सर्व लोकांना करमणूक झाली आणि ज्याची सरशी होईल त्याला अनुलक्षून 'शाबास, शाबास' असे उत्तेजनपर शब्द त्यांच्या मुखांतून येऊं लागले ३१. ओढून आंवळणें, आपल्याकडे सहज ओढून घेणें, आणि ओढून व गरगर फिरवून मागें पाडणें इत्यादि प्रकार योजून ते एकमेकाला जेरीस आणूं लागले आणि गुडघ्यांनीं एकमेकाला प्रहार करूं लागले ३२. तदनंतर मोठ्यानें ओरडून ते एकमेकाची निंदा करूं लागले ३३ आणि कसलेलें वक्षस्थल व लांब लांब हात ह्यांनीं युक्त असलेले व मल्लयुद्धांमध्यें निपुण असलेले ते उभयतांही मल्ल लोहमय परिघच कीं काय अशा प्रकारच्या आपल्या बाहूंनीं परस्पराशीं कसून युद्ध करूं लागले ३४. गर्जना करणाऱ्या गजाला ओढून सिंहच पाडीत आहे कीं काय अशा रीतीनें शत्रुनाशक भीमसेनानें त्या मल्लाला हातांनीं ओढून खालीं पाडिलें; तो गर्जना करूं लागला असतां आपणही त्याच्या अंगावर ओरडूं लागला ३५ आणि एकदम वर उचलून त्या महापराक्रमी वीर्यवान् भीमसेनानें त्या मल्लाला गरगर फिरविलें. तव्हां, तेथें असलेल्या इतर मल्लांना व मत्स्यदेशांतील लोकांना पराकाष्ठेचा विस्मय झाला ३६; व महापराक्रमी भीमसेनानें शंभर वेळ त्या मल्लाला गरगर फिरवून तो मृत होऊन निश्चेष्ट झाल्यावर त्याला भूमीवरही आपटलें ३७. ह्याप्रमाणें जगत्प्रसिद्ध जीमूत वीराचा वध झाला असतां बांधवांसहवर्तमान विराटराजाला पराकाष्ठेचा हर्ष झाला ३८ आणि आनंदानें त्या महाशय विराटराजानें कुबेराप्रमाणें

राजस्य प्रीतिमाहरदुत्तमाम् ४० यदास्य तुल्यः पुरुषो न कश्चित्तत्र विद्यते। ततो व्याघ्रैश्च सिंहैश्च द्विरदैश्चाप्ययोधयत् ४१ पुनरन्तःपुरगतः स्त्रीणां मध्ये वृकोदरः। योध्यते स विराटेन सिंहैर्मत्तैर्महाबलैः ४२ बीभत्सुरपि गीतेन स्वनृत्येन च पाण्डवः। विराटं तोषयामास सर्वाश्चान्तःपुरस्त्रियः४३ अश्वैर्विनीतैर्जवनैस्तत्र तत्र समागतैः। तोषयामास राजानं नकुलो नृपसत्तमम्। तस्मै प्रदेयं प्रायच्छत्प्रीतो राजा धनं बहु ४४ विनीतान्वृषभान्दृष्ट्वा सहदेवस्य चाभितः। धनं ददौ बहुविधं विराटः पुरुषर्षभः ४५ द्रौपदी प्रेक्ष्य तान्सर्वान्क्लिश्यमानान्महारथान्। नातिप्रीतमना राजन्निःश्वासपरमाभवत् ४६ एवं ते न्यवसंस्तत्र प्रच्छन्नाः पुरुषर्षभाः। कर्माणि तस्य कुर्वाणा विराटनृपतेस्तदा ४७ [३७६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि समयपालनपर्वणिजीमूतवधे त्रयोदशोध्यायः ॥ १३ ॥ समाप्तं चेदं समयपालनपर्व ॥

अथ कीचकवधपर्व॥ वैशम्पायन उवाच॥ वसमानेषु पार्थेषु मत्स्यस्य

त्या बल्लवाला विपुल द्रव्य दिलें ३९ व ह्याप्रमाणें पुष्कळच मल्लांचा व महाबलाढ्यपुरुषांचा वध करून भीमसेनानें मत्स्यराज विराटाचें उत्कृष्ट प्रेम संपादिलें ४०. अशा प्रकारें जेव्हां त्याच्या जोडीचा पुरुष त्या देशांत कोणीही आढळण्यांत येईनासा झाला तेव्हां विराटराजा व्याघ्र, सिंह आणि गज ह्यांच्याशीं त्याला झुंजवूं लागला४१ आणि महाबलाढ्य मत्त सिंहाशीं तो विराटराजा भीमसेनाला स्त्रियांमध्यें अंतःपुरांत नेऊन लढवूं लागला ४२. पांडुपुत्र अर्जुनानेंही आपलें नृत्य व गायन ह्यांच्या योगानें विराटराजाला व अंतःपुरांतील सर्व स्त्रियांना संतुष्ट केलें ४३. शिकवून तयार केलेल्या व ठिकठिकाणीं जुळलेल्या वेगवान् अश्वांच्या योगानें नकुलानेंही नृपश्रेष्ठ विराटराजाची प्रीति संपादन केली असतां विराटराजानें प्रसन्न होऊन त्याला विपुल द्रव्य दिलें ४४ आणि सहदेवानें शिकवून तयार केलेले बैल अवलोकन करून पुरुषश्रेष्ठ विराटराजानें त्यालाही नानाप्रकारचें द्रव्य दिलें ४५. परंतु, हे राजा, ह्याप्रमाणें क्लेश भोगीत असलेल्या त्या सर्व महारथ्यांना अवलोकन करून द्रौपदीला विशेष आनंद न होतां ती एकसारखी दुःखाचे सुस्कारे टाकीतच राहिली ४६; आणि ह्याप्रमाणें स्वतःचीं रूपें गुप्त केलेले ते पुरुषश्रेष्ठ पांडव त्या विराटराजाचीं कामें करीत करीत तेथें राहिले ४७. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील समयपालनपर्वांपैकीं जीमूतमल्लाच्या वधाविषयीं तेरावा अध्याय समाप्त झाला ॥ १३ ॥ ह्या ठिकाणीं समयपालनपर्वही संपूर्ण झालें.

नगरे तदा । महारथेषु च्छन्नेषु मासा दश समाययुः १ याज्ञसेनी सुदेष्णां तु शुश्रूषन्ती विशाम्पते । आवसत्परिचारार्हा सुदुःखं जनमेजय २ तथा चरन्ती पाञ्चाली सुदेष्णाया निवेशने । तां देवीं तोषयामास तथा चान्तः-पुरस्त्रियः ३ तस्मिन्वर्षे गतप्राये कीचकस्तु महाबलः । सेनापतिर्विराटस्य ददर्श द्रुपदात्मजाम् ४ तां दृष्ट्वा देवगर्भाभां चरन्तीं देवतामिव । कीचकः कामयामास कामबाणप्रपीडितः ५ स तु कामाग्निसंतप्तः सुदेष्णामभिगम्य वै । प्रहसन्निव सेनानीरिदं वचनमब्रवीत् ६ नेयं मया जातु पुरेह दृष्टा राज्ञो विराटस्य निवेशने शुभा । रूपेण चोन्मादयतीव मां भृशं गन्धेन जाता मदिरेव भामिनी ७ का देवरूपा हृदयङ्गमा शुभे ह्याचक्ष्व मे कस्य कुतोऽत्र शोभने । चित्तं हि निर्मथ्य करोति मां वशे न चान्यदत्रौषधमस्ति मे मतम् ८ अहो तवेयं परिचारिका शुभा प्रत्यग्ररूपा

येथून पुढें कीचकवधपर्वाला आरंभ झाला. वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें मत्स्यराज विराटाच्या राजधानीमध्यें ते महारथी कुंतीपुत्र पांडव गुप्तपणें राहूं लागल्यावर दहा महिने होऊन गेले १. हे प्रजापालका जनमेजया, दुसऱ्याच्या हातून शुश्रूषा करून घेण्यासच पात्र असलेली द्रुपदकन्या याज्ञसेनी सुदेष्णेची शुश्रूषा करीत करीत अतिशय दुःखानें दिवस काढूं लागली २. ह्याप्रमाणें सुदेष्णेच्या घरीं वागत असलेल्या त्या पंचालराजकन्या द्रौपदीनें त्या राजपत्नीला व त्याचप्रमाणें इतरही अंतःपुरांतील स्त्रियांना संतुष्ट केलें ३. अशा रीतीनें तें अज्ञातवासाचें वर्ष जवळ जवळ समाप्त झाल्यावर विराटराजाचा सेनापति जो महाबलाढ्य कीचक त्यानें त्या द्रुपदराजकन्येला अवलोकन केलें ४; आणि देवगर्भाप्रमाणें जिची कांति आहे व देवतेप्रमाणें जिची हालचाल आहे अशा त्या द्रौपदीला अवलोकन करितांक्षणीं तो कीचक मदनबाणांनीं अगदीं व्याकुल झाला ५; इतकेंच नव्हे परंतु, कामाग्नीनें संतप्त झालेला तो सेनाधिपति कीचक सुदेष्णेकडे गेला आणि हंसत हंसत तिला ह्मणाला ६: " विराटराजाच्या घरामध्यें आजपर्यंत येथें कधींही ही कल्याणी माझ्या दृष्टीं पडली नाहीं. हिच्या शरीराचा गंध मदिरेप्रमाणें आहे आणि ही आपल्या सौंदर्यानें मला उन्माद उत्पन्न करीत आहे ७. ह्यास्तव, हे शुभे, हे कल्याणि, देवतेचें रूप धारण केलेली ही मनोहर स्त्री कोण ? कोणाची ? आणि येथें कशी आली ? हें तूं मला कथन कर. हिनें माझें चित्त क्षुब्ध केलें असून मला अगदीं मोहित करून टाकिलें आहे. ह्यास्तव, ह्या माझ्या अवस्थेला हिच्या प्राप्तीशिवाय दुसरें कोणतेंही औषध येथें मला दिसत नाहीं. ८. छे ! छे ! छे ! ही तुझी दासी आहे खरी; परंतु,

प्रतिभाति मामियम् । अयुक्तरूपं हि करोति कर्म ते प्रशास्तु मां यच्च ममास्ति किंचन ९ प्रभूतनागाश्वरथं महाजनं समृद्धियुक्तं बहुपानभोजनम्। मनोहरं काञ्चनचित्रभूषणं गृहं महच्छोभयतामियं मम १० ततः सुदेष्णामनुमन्त्र्य कीचकस्ततः समभ्येत्य नराधिपात्मजाम् । उवाच कृष्णामभिसान्त्वयंस्तदा मृगेन्द्रकन्यामिव जम्बुको वने ११ का त्वं कस्यासि कल्याणि कुतो वा त्वं वरानने । प्राप्ता विराटनगरं तत्त्वमाचक्ष्व शोभने १२ रूपमग्र्यं तथा कान्तिः सौकुमार्यमनुत्तमम् । कान्त्या विभाति वक्त्रं ते शशाङ्क इव निर्मलम् १३ नेत्रे सुविपुले सुभ्रु पद्मपत्रनिभे शुभे । वाक्यं ते चारुसर्वाङ्गि परपुष्टरुतोपमम् १४ एवंरूपा मया नारी काचिदन्या महीतले । न दृष्टपूर्वा सुश्रोणि यादृशी त्वमनिन्दिते १५ लक्ष्मीः पद्मालया का त्वमथ भूतिः सुमध्यमे । ह्रीः श्रीः कीर्तिरथो कान्तिरासां का त्वं वरानने १६ अतीव रूपिणी किं त्वमनङ्गाङ्गविहारिणी । अतीव भ्राजसे सुभ्रु प्रभेवेन्दोरनुत्तमा १७ अपि चेक्षणपक्ष्माणां स्मितज्योत्स्नोपमं शुभम्।

ही कल्याणी मला दिव्य देह धारण करणारी दिसत आहे; व खरोखरच, ही जें तुझें काम करीत आहे तें हिला अगदीं अयोग्य आहे. ह्यास्तव, माझ्यावर आणि माझ्याजवळ जें कांहीं आहे त्यावरही हिनें आपला अधिकार चालवावा ९. सारांश, विपुल गज, अश्व व रथ, विपुल भक्ष्य व पेय पदार्थ, असंख्य सेवक आणि सुवर्णाचीं अद्भुत भूषणें ह्यांनीं युक्त असलेलें माझें मोठें मनोहर गृह हिनें सुशोभित करावें " १०. ह्याप्रमाणें भाषण केल्यानंतर सुदेष्णेचा निरोप घेऊन कीचक राजकन्या द्रौपदीकडे गेला आणि वनामध्यें गजेंद्रकन्येशीं भाषण करणारा कोल्हाच कीं काय अशा रीतीनें तो कीचक चुचकारीत चुचकारीत तिला ह्मणाला ११ "हे कल्याणि, तूं कोण ? हे सुमुखि, तूं कोणाची आहेस ? आणि हे सुंदरि, विराटराजाच्या नगरामध्यें तूं कोठून आलीस ? हें मला खरें सांग १२. तुझें रूप व तशीच कांति उत्कृष्ट असून तुझी सुकुमारता तर अनुपमच आहे आणि तुझें मुख तेजानें निर्मल चंद्रासारिखें दिसत आहे १३. हे सुंदरि, तुझे नेत्र कमलपत्रांप्रमाणें चांगले विशाल व सुलक्षणी आहेत आणि, हे सर्वांगसुंदरि, तुझा स्वर तर कोकिलेप्रमाणें आहे १४. हे सुंदरि, हे अनिंदिते, अशा प्रकारचें रूप धारण करणारी तुझ्यासारिखी दुसरी कोणीही स्त्री आजपर्यंत ह्या भूतलावर माझ्या आढळण्यांत आलेली नाहीं १५. हे सुंदरि, हे कृशोदरि, कमलनिवासिनी लक्ष्मी, ऐश्वर्यदेवता, ऱ्ही, श्री, कीर्ति आणि कांति ह्यांपैकीं तूं कोण आहेस ? १६. अतिशयच रूपवती असलेली तूं मदनासहवर्तमान क्रीडा करणारी रतिच आहेस कीं काय ? हे सुलोचने, चंद्राच्या अनुपम प्रभेप्रमाणें

दिव्यांशुरश्मिभिर्वृत्तं दिव्यकान्तिमनोरमम् १८ निरीक्ष्य वक्त्रचन्द्रं ते लक्ष्म्यानुपमया युतम् । कृत्स्ने जगति को नेह कामस्य वशगो भवेत् १९ हारालङ्कारयोग्यौ तु स्तनौ चोभौ सुशोभनौ । सुजातौ सहितौ लक्ष्म्या पीनौ वृत्तौ निरन्तरौ २० कुड्मलाम्बुरुहाकारौ तव सुभ्रु पयोधरौ । कामप्रतोदाविव मां तुदतश्चारुहासिनि २१ वलीविभङ्गचतुरं स्तनभार-विनामितम् । कराग्रसंमितं मध्यं तवेदं तनुमध्यमे २२ दृष्ट्वैव चारु जघनं सरित्पुलिनसंनिभम् । कामव्याधिरसाध्यो मामप्याक्रामति भामिनि २३ जज्वाल चाग्निमदनो दावाग्निरिव निर्दयः । त्वत्सङ्गमाभि-संकल्पविवृद्धो मां दहत्ययम् २४ आत्मप्रदानवर्षेण सङ्गमाम्भोधरेण च । शमयस्व वरारोहे ज्वलन्तं मन्मथानलम् २५ मच्चित्तोन्मादन-करा मन्मथस्य शरोत्कराः । त्वत्सङ्गमाशानिशितास्तीव्राः शशिनिभा-नने २६ मह्यं विदार्य हृदयमिदं निर्दयवेगिताः । प्रविष्टा ह्यसितापाङ्गि

तूं अतिशयच झळकत आहेस १७. नेत्रांच्या पापण्या किंचित् उघडल्या असल्यामुळें जो आल्हादकारक झालेला आहे; दिव्य तेजाच्या किरणांनीं जो व्याप्त झालेला आहे; दिव्य कांतीनें युक्त असून जो मनोहर व शुभ आहे १८ आणि अनुपम सौंदर्यलक्ष्मीनें जो युक्त आहे असा तुझा मुखचंद्रमा अवलोकन केल्यावर ह्या जगतामध्यें कोणता बरें पुरुष कामाचे अधीन होऊन जाणार नाहीं ? १९. तुझे दोन्ही स्तन हाररूप अलंकाराला योग्य, मनोहर, उन्नत, कांतीनें युक्त, पुष्ट, वर्तुल आणि एकमेकाला चिकटलेले आहेत २०. हे सुभ्रु, हे चारुहासिनि, कमलकलिकेसारिखे असलेले तुझे स्तन कामाचे अंकुशच कीं काय अशा रीतीनें मला टोंचीत आहेत २१. हे कृशोदरि, स्तनभारानें नम्र व वळ-कट्या पडत असल्यामुळें मनोहर असलेला हा तुझा मध्यभाग अगदीं एक वीतभरच आहे २२; आणि, हे सुंदरि, नदीचें वाळवंटच कीं काय असें दिसत असलेलें तुझें मनोहर श्रोणिस्थान दृष्टीं पडतांक्षणीं असाध्य कामरोगानें मला ग्रस्त केलें आहे २३. दावाग्नीप्रमाणें निर्दय असलेला हा मदनाग्नि प्रज्वलित झाला आहे आणि तुझ्या समागमाच्या इच्छेनें वृद्धिंगत होऊन हा मला दग्ध करीत आहे २४. तस्मात्, हे सुंदरि, आत्मप्रदानरूप वृष्टीनें युक्त असलेल्या समागमरूप मेघांच्या योगानें तूं प्रज्व-लित होत असलेला हा मदनाग्नि विझवून टाक २५. हे चंद्रवदने, मन्मथाचे बाणस-मुदाय माझ्या चित्ताला उन्माद उत्पन्न करीत आहेत आणि तुझ्या समागमाच्या इच्छेनें ते घांसले गेल्याकारणानें तीक्ष्ण झालेले आहेत २६. हे कृष्णनयने, यत्किं-चितूही दया मनांत न आणितां प्रचंड, दारुण व भयंकर असे बाण हें माझें हृदय

प्रचण्डाश्चण्डदारुणाः २७ अत्युन्मादसमारम्भाः प्रीत्युन्मादकरा मम । आत्मप्रदानसंभोगैर्मामुद्धर्तुमिहार्हसि २८ चित्रमाल्याम्बरधरा सर्वाभरणभूषिता । कामं प्रकामं सेव त्वं मया सह विलासिनि २९ नार्हसीहासुखं वस्तुं सुखार्हा सुखवर्जिता । प्राप्नुह्यनुत्तमंसौख्यं मत्तस्त्वं मत्तगामिनि ३० स्वादून्यमृतकल्पानि पेयानि विविधानि च । पिबमाना मनोज्ञानि रममाणा यथासुखम् ३१ भोगोपचारान्विविधान्सौभाग्यं चाप्यनुत्तमम् । पानं पिब महाभागे भोगैश्चानुत्तमैः शुभैः ३२ इदं हि रूपं प्रथमं तवानघे निरर्थकं केवलमद्य भाविनि । अधार्यमाणा स्रगिवोत्तमा शुभा न शोभसे सुन्दरि शोभना सती ३३ त्यजामि दारान्मम ये पुरातना भवन्तु दास्यस्तव चारुहासिनि । अहं च ते सुन्दरि दासवत्स्थितः सदा भविष्ये वशगो वरानने ३४ द्रौपद्युवाच । अप्रार्थनीयामिह मां सूतपुत्राभिमन्यसे । निहीनवर्णां सैरन्ध्रीं बीभत्सां केशकारिणीम् ३५ परदारास्मि भद्रं ते न युक्तं

विदीर्ण करून आंत शिरले आहेत २७. अतिशय उन्माद उत्पन्न करणें हें ह्यांचें फल आहे आणि ह्मणूनच माझे ठिकाणीं ते कामवासनेमुळें उन्माद उत्पन्न करीत आहेत. ह्यास्तव, आत्मप्रदानरूप संभोगाच्या योगानें तूं अशा अवस्थेमध्यें मला जीवदान दे २८. हे विलासिनि, अद्भुत पुष्पमाला व वस्त्रें धारण करून तूं सर्व अलंकारांनीं भूषित हो आणि माझ्यासहवर्तमान तूं यथेष्ट विषयोपभोग घे २९. सांप्रत सुखरहित असलेली तूं वास्तविक सुखालाच पात्र असल्यामुळें येथें दुःखानें वास्तव्य करणें तुला योग्य नाहीं. ह्यास्तव, हे मत्तगजगामिनि, माझ्यापासून तूं अनुपम सौख्य प्राप्त करून घे ३०; नानाप्रकारचे अमृततुल्य, मधुर व मनोहर पेय पदार्थ सेवन करीत करीत तूं वाटेल तशी रममाण हो ३१; नानाप्रकारच्या भोग्य वस्तु आणि अनुपम वल्लभप्रेम ह्यांचा तूं उपभोग घे आणि, हे महाभाग्यवति, अत्युत्कृष्ट अशा शुभ भोगांसहवर्तमान तूं पेयाचें सेवन कर ३२. हे निष्पाप सुंदरि, हें तुझें उत्कृष्ट रूप आज केवळ व्यर्थ गेलेलें आहे आणि ह्मणूनच न वापरतां अलग ठेविलेली उत्कृष्ट व शुभ माला ज्याप्रमाणें शोभत नाहीं त्याप्रमाणें, हे सुंदरि, तूं चांगली असतांनाही शोभेनाशी झाली आहेस ३३. हे चारुहासिनि, माझ्या ज्या पुरातन स्त्रिया आहेत त्या सर्व मी सोडून देईन. हे सुंदरि, त्या तुझ्या दासी होतील आणि, हे वरानने, मीही नेहमीं दासाप्रमाणें तुझ्या अधीन होऊन राहीन " ३४. द्रौपदी ह्मणतेः—हे सूतपुत्रा, हीनवर्ण, सैरंध्री, अमंगळ, वेणीफणीचें काम करणारी, आणि (सभर्तृका असल्यामुळें) दुसऱ्यांनीं अभिलाष धरण्यास अयोग्य अशी मी असतांना तूं माझा येथें अभिलाष धरीत आहेस ३५.

तव सांप्रतम् । दयिताः प्राणिनां दारा धर्मं समनुचिन्तय ३६ परदारे न ते बुद्धिर्जातु कार्या कथंचन । विवर्जनं ह्यकार्याणामेतत्सुपुरुषव्रतम् ३७ मिथ्याभिगृध्नो हि नरः पापात्मा मोहमास्थितः । अयशः प्राप्नुयाद्धोरं महद्वा प्राप्नुयाद्भयम् ३८ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्तस्तु सैरन्ध्र्या कीचकः काममोहितः । जानन्नपि सुदुर्बुद्धिः परदाराभिमर्शने ३९ दोषान्बहून्प्राणहरान्सर्वलोकविगर्हितान् । प्रोवाचेदं सुदुर्बुद्धिर्द्रौपदीमजितेन्द्रियः ४० नार्हस्येवं वरारोहे प्रत्याख्यातुं वरानने । मां मन्मथसमाविष्टं त्वत्कृते चारुहासिनि ४१ प्रत्याख्याय च मां भीरु वशगं प्रियवादिनम् । नूनं त्वमसितापाङ्गि पश्चात्तापं करिष्यसि ४२ अहं हि सुभ्रु राज्यस्य कृत्स्नस्यास्य सुमध्यमे । प्रभुर्वासयिता चैव वीर्ये चाप्रतिमः क्षितौ ४३ पृथिव्यां मत्समो नास्ति कश्चिदन्यः पुमानिह । रूपयौवनसौभाग्यैर्भोगैश्चानुत्तमैः शुभैः ४४ सर्वकामसमृद्धेषु भोगेष्वनुपमेष्विह । भोक्तव्येषु च कल्याणि कस्माद्दास्ये रता ह्यसि ४५ मया दत्तमिदं राज्यं स्वामिन्यसि

परंतु, तुझें देव बरें करो; मी परदारा आहें आणि ह्मणूनच, सध्यांचें हें तुझें वर्तन योग्य नाहीं. प्राणिमात्राला स्त्री प्रिय असते; ह्यास्तव, तूं धर्म मनामध्यें आण ३६. परस्त्रीविषयीं तूं अभिलाषबुद्धि कधींही मनामध्यें आणूं नको. अरे, अकार्यें वर्ज्य करणें हें सत्पुरुषव्रत आहे ३७. (अप्राप्य वस्तूंविषयीं) व्यर्थ अभिलाष धरणाऱ्या दुरात्म्या मूढ पुरुषाची भयंकर अपकीर्ति होते अथवा (मृत्युरूप) महाभयही त्याला प्राप्त होतें ३८. वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें सैरंध्रीनें त्या काममोहित झालेल्या कीचकाला सांगितलें असतां आणि परस्त्रीचें सेवन केल्यानें सर्व लोकांनीं निषिद्ध केलेले अनेक प्राणनाशक अनर्थ प्राप्त होत असल्याचें तो जाणीत असतांही अजितेंद्रिय असल्यामुळें तो अति मंदमति कीचक त्या द्रौपदीला ह्मणाला ३९,४० "हे वरानने, हे चारुहासिनि, हे सुंदरि, तुझ्यामुळें मदनग्रस्त झालेल्या माझा ह्याप्रमाणें अव्हेर करणें तुला योग्य नाहीं ४१. हे भित्र्ये, हे कृष्णनयने, मर्जीप्रमाणें बोलणाऱ्या व अगदीं अधीन होऊन राहणाऱ्या माझा अव्हेर केल्यानें खरोखर तुला पश्चात्ताप करण्याची पाळी येईल ४२. हे सुभ्रु, हे कृशोदरि, मी ह्या संपूर्ण राज्याचा प्रभु व वसविणारा असून वीर्यानें सर्व पृथ्वीमध्यें अप्रतिम आहें ४३. रूप, यौवन, महाभाग्य आणि उत्कृष्ट शुभ भोग ह्यांमध्यें ह्या पृथ्वींत माझी बरोबरी करणारा दुसरा कोणीही मनुष्य नाहीं ४४. सर्व कामना परिपूर्ण करणारे भोग भोगावयाचे सोडून, हे कल्याणि, तूं दास्याचीच कां बरें आवड धरून राहिली आहेस? ४५. हे सुमुखि, तूं मालकीण

शुभानने । भजस्व मां वरारोहे भुङ्क्ष्व भोगाननुत्तमान् ४६ एवमुक्ता तु सा साध्वी कीचकेनाशुभं वचः । कीचकं प्रत्युवाचेदं गर्हयन्त्यस्य तद्वचः ४७ सैरन्ध्र्युवाच ॥ मा सूतपुत्र मुह्यस्व माद्य त्यक्ष्यस्व जीवितम् । जानीहि पञ्चभिर्घोरैर्नित्यं मामभिरक्षिताम् ४८ न चाप्यहं त्वया लभ्या गन्धर्वाः पतयो मम । ते त्वां निहन्युः कुपिताः साध्वलं मा व्यनीनशः ४९ अशक्यरूपं पुरुषैरध्वानं गन्तुमिच्छसि ५० यथा निश्चेतनो बालः कूलस्थः कूलमुत्तरम् । तर्तुमिच्छति मन्दात्मा तथा त्वं कर्तुमिच्छसि ५१ अन्तर्महीं वा यदि वोर्ध्वमुत्पतेः समुद्रपारं यदि वा प्रधावसि । तथापि तेषां न विमोक्षमर्हसि प्रमाथिनो देवसुता हि खेचराः ५२ त्वं कालरात्रीमिव कश्चिदातुरः किं मां दृढं प्रार्थयसेऽद्य कीचक । किं मातुरङ्के शयितो यथा शिशुश्चन्द्रं जिघृक्षुरिव मन्यसे हि माम् ५३ तेषां प्रियां प्रार्थयतो न ते भुवि गत्वा दिवं वा शरणं भविष्यति । न वर्तते

आहेस. हें सर्व 'राज्य मीं तुला अर्पण केलें आहे असें तूं समज. हे सुंदरि, तूं माझा स्वीकार करून अनुपम भोगांचा उपभोग घे " ४६. ह्याप्रमाणें कीचकानें अशुभ भाषण केलें असतां त्याच्या भाषणाची निंदा करीत करीत त्या साध्वीनें त्याला उत्तर दिलें ४७. सैरंध्री ह्मणतेः—हे सूतपुत्रा, तूं भांबावून जाऊं नको आणि आज प्राणाला मुकूं नको. पांच भयंकर पति माझें नित्य सर्व प्रकारें रक्षण करीत असतात हें तूं समजून ऐस ४८. मी तुला प्राप्त होणें शक्य नाहीं. गंधर्व माझे पति आहेत; ते क्रुद्ध झाले ह्मणजे तुझा वध करितील. ह्यास्तव, बऱ्या विचारानें तूं नाश पावूं नको ४९. मानवांना अशक्य अशा मार्गानें जाण्याची तूं आज इच्छा करीत आहेस ५०. अरे, (नदी तुडुंब भरून चालली असतांना) ज्याप्रमाणें अलीकडल्या तीरावर उभें असलेलें एकादें अविचारी पोर परतीराला पोहून जाण्याचें मनांत आणीत असतें त्याप्रमाणें तूं मंदमति असल्यामुळें आज भलतेंच करण्याची इच्छा करीत आहेस ५१. अरे, माझे पति देवपुत्र गंधर्व शत्रूला जर्जर करून टाकणारे आहेत. ह्यास्तव, तूं जरी भूमीमध्यें प्रवेश केलास किंवा आकाशामध्यें उडून गेलास अथवा समुद्राच्या पलीकडे पळून गेलास तरीसुद्धां त्यांच्या हातून तुझी सुटका होणार नाहीं ५२. हे कीचका, ज्याप्रमाणें एकादा मुमूर्षु पुरुष कालरात्रीची इच्छा करीत असतो त्याप्रमाणें आज तुला कां बरें माझ्याविषयीं उत्कट इच्छा उत्पन्न झाली आहे ? अरे, मातेच्या अंकावर पडलेल्या बालकाला ज्याप्रमाणें चंद्र धरावासा वाटतो त्याप्रमाणें तूं माझा अभिलाष

कीचक ते दृशा शुभं या ते न संजीवनमर्थयेत सा ५४ [४३०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि कीचकवधपर्वणि कीचककृष्णासंवादे चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

वैशम्पायन उवाच॥प्रत्याख्यातो राजपुत्र्या सुदेष्णां कीचकोऽब्रवीत् । अमर्यादेन कामेन घोरेणाभिपरिप्लुतः १ यथा कैकयि सैरन्ध्री समेयात्तद्विधीयताम् । येनोपायेन सैरन्ध्री भजेन्मां गजगामिनी । तं सुदेष्णे परीप्सस्व प्राणान्मोहात्प्रहासिषम् २ वैशम्पायन उवाच ॥ तस्य सा बहुशः श्रुत्वा वाचं विलपतस्तदा । विराटमहिषी देवी कृपां चक्रे मनस्विनी ३ स्वमन्त्रमभिसंधाय तस्यार्थमनुचिन्त्य च।उद्योगं चैव कृष्णायाः सुदेष्णा सूतमब्रवीत्४पर्वणि त्वं समुद्दिश्य सुरामन्नं च कारय। तत्रैनां प्रेषयिष्यामि सुराहारीं तवान्तिकम्५तत्र संप्रेषितामेनां विजने निरवग्रहे । सान्त्वयेथा यथाकामं सान्त्व्यमाना रमेद्यदि ६ वैशम्पायन उवाच ॥ इत्युक्तः स विनिष्क्रम्य

करीत आहेस हें काय ? ५३. ज्याअर्थी त्या गंधर्वांच्या प्रिय भार्येची तूं इच्छा करीत आहेस त्याअर्थी तूं जरी भूमीमध्यें प्रवेश केलास किंवा स्वर्गामध्यें निघून गेलास तरी तुला कोठें आश्रय मिळणार नाहीं. हे कीचका, तुला चांगलें जीवदान देईल अशी बुद्धिच तुझे ठिकाणीं दिसत नाहीं ५४. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील कीचकवध पर्वापैकीं कीचक व द्रौपदी ह्यांच्या संवादाविषयीं चवदावा अध्याय समाप्त झाला ॥ १४ ॥

वैशंपायन सांगतातः—राजकन्या द्रौपदीनें नाकारिलें असतां अमर्याद व घोर विषयवासनेनें व्याप्त झालेला कीचक सुदेष्णेला ह्मणाला "हे कैकेयि, सैरंध्री ज्यारीतीनें माझ्याकडे येईल अशी तूं व्यवस्था कर १. सारांश, हे सुदेष्णे, ज्या उपायानें गजगामिनी सैरंध्री माझा स्वीकार करील तो उपाय तूं योज; नाहींतर मूर्च्छा येऊन माझे प्राण जाण्याचा प्रसंग येईल" २. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें बरळत असलेल्या त्या कीचकाचें तसें भाषण वारंवार ऐकून घेतल्यावर त्या दयाळू राजपत्नी विराटभार्येला त्याची दया आली ३; आणि आपला विचार, त्याचा उद्देश व द्रौपदीच्या प्राप्तीकरितां योग्य उपाय इतक्यांचा विचार करून सुदेष्णा कीचकाला ह्मणाली ४ "एकादा उत्सवकाल पाहून तूं सुरा व अन्न तयार करीव; ह्मणजे सुरा आणविण्याकरितां मी तुझ्याजवळ हिला तिकडे पाठवून देईन ५; आणि ह्याप्रमाणें मीं पाठवून दिल्यावर ही तुझ्याकडे आली ह्मणजे निष्प्रतिबंध अशा एकांतस्थलामध्यें तूं हिची वाटेल तशी मनधरणी कर आणि मनधरणी करितां करितां जर ती तुझ्याशीं रममाण

भगिन्या वचनात्तदा । सुरामाहारयामास राजार्हां सुपरिष्कृताम् ७ भक्षांश्च विविधाकारान्बहूंश्चोच्चावचांस्तदा । कारयामास कुशलैरन्नं पानं सुशोभनम् ८ तस्मिन्कृते तदा देवी कीचकेनोपमन्त्रिता । सुदेष्णा प्रेषयामास सैरन्ध्रीं कीचकालयम् ९ सुदेष्णोवाच ॥ उत्तिष्ठ गच्छ सैरन्ध्रि कीचकस्य निवेशनम् । पानमानय कल्याणि पिपासा मां प्रबाधते १० सैरन्ध्र्युवाच ॥ न गच्छेयमहं तस्य राजपुत्रि निवेशनम् । त्वमेव राज्ञि जानासि यथा स निरपत्रपः ११ न चाहमनवद्याङ्गि तव वेश्मनि भामिनि । कामवृत्ता भविष्यामि पतीनां व्यभिचारिणी १२ त्वं चैव देवि जानासि यथा स समयः कृतः। प्रविशन्त्या मया पूर्वं तव वेश्मनि भामिनि १३ कीचकस्तु सुकेशान्ते मूढो मदनदर्पितः। सोवमंस्यति मां दृष्ट्वा न यास्ये तत्र शोभने १४ सन्ति बह्व्यस्तव प्रेष्या राजपुत्रि वशानुगाः । अन्यां प्रेषय भद्रं ते स हि मामवमंस्यते १५ सुदेष्णोवाच ॥ नैव त्वां जातु हिंस्यात्स इतः संप्रेषितां मया। इत्युक्त्वा प्रददौ पात्रं सपिधानं हिरण्मयम् १६ सा शङ्कमाना रुदती दैवं

झाली तर पहा " ६. वैशंपायन सांगतातः–ह्याप्रमाणें सुदेष्णेनें त्याला सांगितलें असतां तो निघून गेला आणि भगिनीच्या सांगण्याप्रमाणें राजे लोकांना योग्य अशी उत्तम रीतीनें तयार केलेली सुरा त्यानें आणविली ७ आणि चांगल्या कुशल आचाऱ्याकडून नानाप्रकारचीं लहान मोठीं पुष्कळ पक्वान्नें व इतरही उत्कृष्ट प्रकारचें अन्नपान त्यानें तयार करविलें ८. तदनंतर त्याकरितां कीचकानें राजपत्नी सुदष्णेला बोलाविलें असतां तिनें सैरंध्रीला कीचकाच्या घरीं पाठविलें ९. सुदेष्णा ह्मणते:—हे सैरंध्रि, ऊठ आणि कीचकाच्या घरीं जा. हे कल्याणि, तेथून पेय घेऊन ये. तृषेनें मी फारच व्याकुल झालें आहें १०. सैरंध्री ह्मणते:—हे राजकन्ये, मी त्याच्या घरीं जाणार नाहीं. कारण, हे राजपत्नि, तो कसा निर्लज्ज आहे हें तूं जाणीतच आहेस ११. शिवाय, हे भामिनि, हे सर्वांगसुंदरि, तुझ्या येथें असतांना यथेष्ट वर्तन करून मी कधींही पतींशीं व्यभिचार करण्यास प्रवृत्त होणार नाहीं १२. हे देवि, हे भामिनि, तुझ्या घरामध्यें शिरतांना पूर्वीं मीं केलेली अट तुला ठाऊकच आहे १३. हे सुकेशि, मी दृष्टीं पडल्याबरोबर मदनानें चढून गेलेला तो मूढ कीचक माझा अवमान करील. ह्यास्तव, हे कल्याणि, मी तिकडे जाणार नाहीं १४. हे राजकन्ये, तुझ्या अधीन होऊन राहिलेल्या अशा दुसऱ्या पुष्कळ दासी तुझ्यापाशीं आहेत. तस्मात्, तुझें देव बरें करो, तूं दुसरी एकादी पाठीव. तो माझा अवमान करील १५. सुदेष्णा ह्मणते:—मी येथून पाठविलेल्या तुला तो कधींही धक्का लावणार नाहीं.

शरणमीयुषी । प्रातिष्ठत सुराहारी कीचकस्य निवेशनम् १७ सैरन्ध्र्युवाच ॥यथाहमन्यं भर्तृभ्यो नाभिजानामि कंचन । तेन सत्येन मां प्राप्तां मा कुर्यात्कीचको वशे १८ वैशम्पायन उवाच ॥ उपातिष्ठत सा सूर्यं मुहूर्तमबला ततः । स तस्यास्तनुमध्यायाः सर्वं सूर्योऽवबुद्धवान् १९ अन्तर्हितं ततस्तस्या रक्षो रक्षार्थमादिशत् । तच्चैनां नाजहात्तत्र सर्वावस्थास्वनिन्दिताम् २० तां मृगीमिव संत्रस्तां दृष्ट्वा कृष्णां समीपगाम् । उदतिष्ठन्मुदा सूतो नावं लब्ध्वेव पारगः २१[४५१] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि कीचकवधपर्वणि द्रौपदीसुराहरणे पञ्चदशोऽध्यायः ॥ १५ ॥

कीचक उवाच ॥ स्वागतं ते सुकेशान्ते सुव्युष्टा रजनी मम । स्वामिनी त्वमनुप्राप्ता प्रकुरुष्व मम प्रियम् १ सुवर्णमालाः कम्बूश्च कुण्डले परिहाटके । नानापत्तनजे शुभ्रे मणिरत्नं च शोभनम् २

असें ह्मणून सुदेष्णेनें झांकणासहवर्तमान एक सुवर्णपात्र तिच्या हातीं दिलें १६. तेव्हां आपल्या दैवावरच हवाला देऊन ती भयभीत झालेली द्रौपदी रडत रडत मद्य आणण्याकरितां कीचकाच्या घरीं निघाली १७. सैरंध्री ह्मणतेः—ज्याअर्थी भर्त्यांशिवाय दुसरा कोणताही पुरुष मला माहीत नाहीं त्याअर्थी ह्या सत्याच्या प्रभावानें मी तेथें गेल्यावर कीचक मला स्वाधीन करून घेण्यास समर्थ न होवो १८. वैशंपायन सांगतातः—जाण्यापूर्वी त्या अबलेनें एक मुहूर्तभर सूर्याचें स्तवन केलें असतां त्या कृशोदरी द्रौपदीचें तें सर्व संकट जाणून सूर्यानें १९ तिच्या रक्षणाकरितां एक गुप्त राक्षस पाठवून दिला व तेव्हांपासून तो राक्षस कशीही अवस्था प्राप्त झाली तरी त्या अनिंदित द्रौपदीला सोडून जाईनासा झाला २०. असो. हरिणीप्रमाणें भयभीत झालेली ती द्रौपदी जवळ आलेली अवलोकन करितांक्षणीं परतीरास जाण्याकरितां उत्सुक असलेल्या पुरुषाला नाव मिळाली असतां ज्याप्रमाणें तो आनंदानें उठून उभा राहतो त्याप्रमाणें तो सूत कीचक आनंदानें उठला २१. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील कीचकवधपर्वांपैकीं द्रौपदीच्या सुराहरणाविषयीं पंधरावा अध्याय समाप्त झाला॥१५॥

कीचक ह्मणतोः—हे उत्कृष्ट केशाग्रांनीं युक्त असलेले सैरंध्रि, तुझें स्वागत असो. आज मला चांगलाच दिवस उजडला. तूं आतां घरधनीण आली आहेस. ह्यास्तव, माझ्या मनाप्रमाणें वाग १. सुवर्णाच्या माळा, शंखाचे चुडे, नानाप्रकारच्या देशांतून मिळालेलीं व सुवर्णाच्या कोंदणांत बसविलेलीं उज्ज्वल कुंडलें, उत्कृष्ट चूडामणि २

आहरन्तु च वस्त्राणि कौशिकान्यजिनानि च ३ अस्ति मे शयनं दिव्यं त्वदर्थमुपकल्पितम् । एहि तत्र मया सार्धं पिबस्व मधुमाधवीम् ४ द्रौपद्युवाच ॥ अप्रैषीद्राजपुत्री मां सुराहारीं तवान्तिकम् । पानमाहर मे क्षिप्रं पिपासा मेति चाब्रवीत् ५ कीचक उवाच ॥ अन्या भद्रे नयिष्यन्ति राजपुत्र्याः प्रतिश्रुतम् । इत्येनां दक्षिणे पाणौ सूतपुत्रः परामृशत् ६ द्रौपद्युवाच ॥ यथैवाहं नाभिचरे कदाचित्पतीन्मदाद्वै मनसापि जातु । तेनैव सत्येन वशीकृतं त्वां द्रष्टास्मि पापं परिकृष्यमाणम् ७ वैशम्पायन उवाच ॥ स तामभिप्रेक्ष्य विशालनेत्रां जिघृक्षमाणः परिभर्त्सयन्तीम् । जग्राह तामुत्तरवस्त्रदेशे स कीचकस्तां सहसाक्षिपन्तीम् ८ प्रगृह्यमाणा तु महाजवेन मुहुर्विनिश्वस्य च राजपुत्री । तया समाक्षिप्ततनुः स पापः पपात शाखीव निकृत्तमूलः ९ सा गृहीता विधुन्वाना भूमावाक्षिप्य कीचकम् । सभां शरणमागच्छद्यत्र राजा युधिष्ठिरः १० तां कीचक प्रधावन्तीं केशपाशे परामृशत् । अथैनां पश्यतो राज्ञः पातयित्वा

आणि रेशमी वस्त्रें व अजिनें आतां तुला सेवक आणून देतील ३. तुझ्याकरितां माझी दिव्य शय्या तयार करून ठेविलेली आहे. ह्यास्तव, तिकडे चल आणि माझ्यासहवर्तमान मधुपुष्पांची तयार केलेली सुरा तूं सेवन कर ४. द्रौपदी ह्मणते:—"मला तहान लागली आहे. ह्यास्तव, माझ्याकडे सत्वर पेय घेऊन ये" असें सांगून सुरा आणण्याकरितां राजपुत्री सुदेष्णेनें मला तुझ्याकडे पाठविलें आहे ५. कीचक ह्मणतो:—हे कल्याणि, राजकन्या सुदेष्णेला "घेऊन येतें" ह्मणून तूं कबूल केलेलें पेय दुसऱ्या दासी घेऊन जातील. असें ह्मणत ह्मणत त्या सूतपुत्र कीचकानें तिचा उजवा हात धरिला ६. द्रौपदी ह्मणते:—मत्त होऊन ज्याअर्थी मनानेंही मीं कधींही व कोठेंही पतींचें उल्लंघन केलेलें नाहीं त्याअर्थीं त्या सत्याच्या प्रभावानें तुज पाप्याला मृत्यु वश करून घेऊन ओढीत नेत आहे असें मी अवलोकन करीन ७. वैशंपायन सांगतात:—तिला धरण्याची इच्छा करणाऱ्या त्या कीचकानें निर्भर्त्सना करीत असलेल्या त्या विशालनयना द्रौपदीकडे पाहिलें आणि एकदम हात हिसडून जात असलेल्या त्या द्रौपदीचें उत्तरीय वस्त्र त्यानें धरिलें ८. परंतु, ह्याप्रमाणें तो तिला धरूं लागला असतांही वारंवार सुस्कारे टाकीत असलेल्या त्या राजकन्येनें मोठ्या जोरानें हिसडा दिला असतां मुळें तुटलेल्या वृक्षाप्रमाणें शरीराला हिसका बसून तो पापी कीचक खालीं पडला ९; आणि कीचकानें धरितांक्षणीं ह्याप्रमाणें त्याला भूमीवर आपटल्यावर ती सैरंध्री कांपत कांपत युधिष्ठिरराजा जेथें बसला होता त्या समेला शरण

पदावधीत् ११ तस्यां योऽसौ तदार्केण राक्षसः संनियोजितः । स कीचकमपोवाह वातवेगेन भारत १२ स पपात तदा भूमौ रक्षोबलसमाहतः । विघूर्णमानो निश्चेष्टश्छिन्नमूल इव द्रुमः १३ तां चासीनौ ददृशतुर्भीमसेनयुधिष्ठिरौ । अमृष्यमाणौ कृष्णायाः कीचकेन पराभवम् १४ तस्य भीमो वधं प्रेप्सुः कीचकस्य दुरात्मनः । दन्तैर्दन्तांस्तदा रोषान्निष्पिपेष महामनाः १५ धूमच्छाया ह्यभजतां नेत्रे चोच्छ्रितपक्ष्मणी । सस्वेदा भ्रुकुटी चोग्रा ललाटे समवर्तत १६ हस्तेन ममृदे चैव ललाटं परवीरहा । भूयश्च त्वरितः क्रुद्धः सहसोत्थातुमैच्छत १७ अथावमृद्नादङ्गुष्ठमङ्गुष्ठेन युधिष्ठिरः । प्रबोधनभयाद्राजा भीमं तं प्रत्यषेधयत् १८ तं मत्तमिव मातङ्गं वीक्षमाणं वनस्पतिम् । स तमावारयामास भीमसेनं युधिष्ठिरः १९ आलोकयसि किं वृक्षं सूद दारुकृतेन वै । यदि ते दारुभिः कृत्यं बहिर्वृक्षान्निगृह्यताम् २० सा सभाद्वारमासाद्य रुदती

गेली १०. तथापि, धांवत धांवत सभेकडे जाणाऱ्या त्या द्रौपदीला कीचकानें केशपाश धरून ओढिलें आणि विराटराजाचे समक्ष त्यानें तिला लत्ताप्रहारही केला ११; तों इतक्यांत सूर्यानें ज्या राक्षसाची त्या द्रौपदीकडे योजना केली होती त्या राक्षसानें, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, वायूच्या वेगानें त्या कीचकाला तेथून दूर उडवून दिलें असतां १२ राक्षसाच्या बलाचा तडाका बसल्याबरोबर तडफडूं लागलेला तो कीचक मुळें तुटलेल्या वृक्षाप्रमाणें भूमीवर निश्चेष्ट पडला १३. असो. इकडे कीचकानें द्रौपदीचा केलेला अवमान तेथें बसलेल्या उभयतां युधिष्ठिरभीमसेनांना सहन न होऊन ते तिच्याकडे पाहूं लागले १४. महाशय भीमसेन तर त्या दुरात्म्या कीचकाचा वध करण्याचा उद्देश मनांत धरून रागारागानें दांतांवर दांत घासूं लागला १५; नेत्रांच्या पापण्या उघडून ते धुरकट दिसूं लागले आणि ललाटावरील उग्र भिंवया स्वेदयुक्त झाल्या १६; त्यानें आपल्या ललाटावर हात मारिला आणि तो शत्रुपक्षीयवीरनाशक भीम क्रुद्ध झाल्यामुळें मोठ्या त्वरेनें एकाएकीं उठण्याच्या बेतांत आला १७. तेव्हां परिस्फुटतेच्या भीतीमुळें हाताच्या अंगठ्यानें पायाचा अंगठा युधिष्ठिरानें दाबिला आणि अशा रीतीनें त्यानें भीमसेनाला आवरून धरिलें १८. तथापि, मत्तगजाप्रमाणें तो भीमसेन वृक्षाकडे पाहूं लागला असतां त्याला आवरून धरण्याच्या उद्देशानें युधिष्ठिर त्याला ह्मणाला १९ "लांकडांकरितां, हे आचाऱ्या, तूं झाडाकडे कशाकरितां पहात आहेस ? तुला जर लांकडें पाहिजे असतील तर बाहेर जाऊन तूं वृक्षांचा फडशा पाड" २०. इतक्यांत ती रडत असलेली सुंदरी सैरंध्री सभेच्या द्वारासमीप आली. मनामध्यें खिन्न झालेल्या

मत्स्यमब्रवीत् । अवेक्षमाणा सुश्रोणी पतींस्तान्दीनचेतसः २१ आकार-
मभिरक्षन्ती प्रतिज्ञाधर्मसंहिता । दह्यमानेव रौद्रेण चक्षुषा द्रुपदात्मजा २२
द्रौपद्युवाच ॥ येषां वैरी न स्वपिति षष्ठेपि विषये वसन् । तेषां मां
मानिनीं भार्यां सूतपुत्रः पदावधीत् २३ ये दद्युर्न च याचेयुर्ब्रह्मण्याः
सत्यवादिनः । तेषां मां मानिनीं भार्यां सूतपुत्रः पदावधीत् २४ येषां
दुन्दुभिनिर्घोषो ज्याघोषः श्रूयतेनिशम् । तेषां मां मानिनीं भार्यां सूत-
पुत्रः पदावधीत् २५ ये च तेजस्विनो दान्ता बलवन्तोतिमानिनः । तेषां
मां मानिनीं भार्यां सूतपुत्रः पदावधीत् २६ सर्वलोकमिमं हन्युर्धर्मपाश-
सितास्तु ये । तेषां मां मानिनीं भार्यां सूतपुत्रः पदावधीत् २७ शरणं ये
प्रपन्नानां भवन्ति शरणार्थिनाम् । चरन्ति लोके प्रच्छन्नाः क्व नु तेद्य
महारथाः २८ कथं ते सूतपुत्रेण वध्यमानां प्रियां सतीम् । मर्षयन्ति
यथा क्लीबा बलवन्तोमितौजसः २९ क्व नु तेषाममर्षश्च वीर्यं तेजश्च वर्तते।
न परीप्सन्ति ये भार्यां वध्यमानां दुरात्मना ३० मयात्र शक्यं किं कर्तुं

त्या पतींकडे ती पाहूं लागली. आणि प्रतिज्ञाधर्मानें बद्ध झाल्यामुळें आपलें स्वरूप गुप्त ठेवण्याची काळजी घेत असलेली ती द्रुपदकन्या क्रूर दृष्टीनें दग्ध करीतच कीं काय मत्स्यराज विराटाला ह्मणाली २१,२२. द्रौपदी ह्मणते:– (पांच देश मध्ये सोडून) सहाव्या देशांतही वास्तव्य करणाऱ्या ज्यांच्या वैऱ्याला झोंप येत नाहीं त्यांच्या मज संमानास्पद भार्येला सूतपुत्रानें लत्ताप्रहार केला ! २३. जे याचना न करितां नेहमीं देतच असतात आणि जे सत्यवादी आहेत त्यांच्या मज संमानास योग्य असणाऱ्या भार्येला सूतपुत्रानें लाथ मारिली ! २४. ज्यांच्या दुंदुभीचा व प्रत्यंचेचा ध्वनि एकसारिखा कानावर येत असतो त्यांच्या मज मानिनी भार्येला सूतपुत्रानें लथडून दिलें ! २५. जे जितेंद्रिय, बलाढ्य, अत्यंत मानी, व तेजस्वी आहेत, त्यांच्या मज मानी भार्येला सूतपुत्रानें पादप्रहार केला ! २६. धर्मपाशानें बद्ध झालेले जे माझे पति सर्व जगताचाही वध करण्यास समर्थ आहेत त्यांच्या मज मानिनी भार्येला सूतपुत्रानें लाथ दिली ! २७. अरे, रक्षणाच्या आशेनें शरण आलेल्यांचा जे आश्रय होतात, ते जगतामध्यें गुप्त असलेले महारथी आज कोठें बरें संचार करीत आहेत ? २८. कारण, अतुल तेजस्वी आणि बलाढ्य असे ते असून सूतपुत्राच्या हातून आपल्या साध्वी प्रिय भार्येचा वध होत असतांना षंढांप्रमाणें ते सहन कसे करितील ? २९. दुरात्मा कीचक प्रत्यक्ष भार्येचा वध करीत असतांनाही तिचें रक्षण करण्याची ज्यांना इच्छा होत नाहीं,

विराटे धर्मदूषके । यः पश्यन्मां मर्षयति वध्यमानामनागसम् ३१ न राजा राजवत्किंचित्समाचरति कीचके । दस्यूनामिव धर्मस्ते न हि संसदि शोभते ३२ नाहमेतेन युक्तं वै हन्तुं मत्स्य तवान्तिके । सभासदोत्र पश्यन्तु कीचकस्य व्यतिक्रमम् ३३ कीचको न च धर्मज्ञो न च मत्स्यः कथंचन । सभासदोप्यधर्मज्ञा य एनं पर्युपासते ३४ वैशम्पायन उवाच॥ एवंविधैर्वचोभिः सा तदा कृष्णाश्रुलोचना । उपालभत राजानं मत्स्यानां वरवर्णिनी ३५ विराट उवाच ॥ परोक्षं नाभिजानामि विग्रहं युवयोरहम्। अर्थतत्त्वमविज्ञाय किं नु स्यात्कौशलं मम ३६ वैशम्पायन उवाच ॥ ततस्तु सभ्या विज्ञाय कृष्णां भूयोभ्यपूजयन् । साधु साध्विति चाप्याहुः कीचकं च व्यगर्हयन् ३७ सभ्या ऊचुः ॥ यस्येयं चारुसर्वाङ्गी भार्या स्यादायतेक्षणा । परो लाभस्तु तस्य स्यान्न च शोचेत्कथंचन ३८ न हीदृशी मनुष्येषु सुलभा वरवर्णिनी । नारी सर्वानवद्याङ्गी देवीं मन्यामहे वयम् ३९ वैशम्पायन उवाच ॥ एवं संपूजयन्तस्ते कृष्णां प्रेक्ष्य सभासदः ।

त्यांचें तें वीर्य, तो क्रोध आणि तें तेज कोठें बरें (गेलें) आहे ? ३०. मी निरपराधी असून माझा छळ डोळ्यांदेखत होत असतांना जो सहन करीत आहे तो धर्मदूषक विराटराजा राज्य करीत असतांना अशा प्रसंगीं मीं काय बरें करावें ? ३१. कीचकाचे ठिकाणीं हा राजा, राजाला शोभेल असें मुळींच वागत नाहीं. (हे विराटा,) चोरांच्याप्रमाणें असलेला हा तुझा धर्म सभेमध्यें शोभत नाहीं ३२. हे मत्स्यराजा, तुझ्यासमीप ह्या कीचकाच्या हातून माझा छळ होणें योग्य नाहीं. कीचकाच्या ह्या उन्मत्तपणाकडे सभासदांनीं तरी लक्ष्य द्यावें ३३. कीचक हा तर धर्मज्ञ नाहींच आणि हा मत्स्यराजाही मुळींच धर्मवेत्ता नाहीं ? इतकेंच नव्हे परंतु, ह्याच्या भोंवतालीं बसलेले हे सभासदही धर्माची पर्वा न बाळगणारेच आहेत ३४. वैशंपायन सांगतात:—जिच्या डोळ्यामध्यें अश्रु आलेले आहेत अशा त्या सुंदरी द्रौपदीनें अशा प्रकारच्या भाषणांनीं मत्स्यराजाची निंदा केली असतां ३५ विराट ह्मणाला:—माझ्या न कळत तुमचें काय भांडण झालें हें मला ठाऊक नाहीं. तेव्हां भांडणाचें कारण समजल्यावांचून तें मिटविण्याला माझें बुद्धिकौशल काय उपयोगीं पडणार ? ३६. वैशंपायन ह्मणतात:—तदनंतर सभ्यांनीं (झालेल्या गोष्टीचा) विचार करून द्रौपदीची प्रशंसा केली; " शाबास, शाबास " असेंही ते तिला अनुलक्षून ह्मणाले आणि कीचकाचीही त्यांनीं निर्भर्त्सना केली ३७. सभ्य ह्मणतात:– ही विशालनयना व सर्वांगसुंदरी सैरंध्री ज्याची भार्या असेल त्याला तो

युधिष्ठिरस्य कोपात्तु ललाटे स्वेद आगमत् ४० अथाब्रवीद्राजपुत्रीं कौरव्यो महिषीं प्रियाम् । गच्छ सैरन्ध्रि मात्र स्थाः सुदेष्णाया निवेशनम् ४१ भर्तारमनुरुन्धन्त्यः क्लिश्यन्ते वीरपत्नयः । शुश्रूषया क्लिश्यमानाः पतिलोकं जयन्त्युत ४२ मन्ये न कालं क्रोधस्य पश्यन्ति पतयस्तव । तेन त्वां नाभिधावन्ति गन्धर्वाः सूर्यवर्चसः ४३ अकालज्ञासि सैरन्ध्रि शैलूषीव विरोदिषि । विघ्नं करोषि मत्स्यानां दीव्यतां राजसंसदि ४४ गच्छ सैरन्ध्रि गन्धर्वाः करिष्यन्ति तव प्रियम् । व्यपनेष्यन्ति ते दुःखं येन ते विप्रियं कृतम् ४५ सैरन्ध्र्युवाच ॥ अतीव तेषां घृणिनामर्थेऽहं धर्मचारिणी । तस्य तस्यैव ते वध्या येषां ज्येष्ठोऽक्षदेविता ४६ वैशम्पायन उवाच ॥ इत्युक्त्वा प्राद्रवत्कृष्णा सुदेष्णाया निवेशनम् । केशान्मुक्त्वा च सुश्रोणी संरम्भाल्लोहितेक्षणा ४७ शुशुभे वदनं तस्या रुदत्याः

मोठाच लाभ असेल व त्याला कधींही दुःख करण्याची पाळी येत नसेल ३८. अशा प्रकारची सर्वांगसुंदरी उत्कृष्ट स्त्री मनुष्यांमध्यें आढळणें दुर्लभ आहे. ही कोणी देवताच आहे असें आह्मांला वाटतें ३९. वैशंपायन सांगतातः— ह्याप्रमाणें ते सभासद द्रौपदीकडे पाहून तिची प्रशंसा करूं लागले असतां युधिष्ठिराच्या ललाटावर क्रोधानें घाम आला ४० आणि तो कुरुवंशजश्रेष्ठ त्या प्रिय राजकन्येला ह्मणाला "हे सैरंध्रि, सुदेष्णेच्या घरीं जा; येथें उभी राहूं नको ४१. भर्त्याला अनुसरून वागणाऱ्या वीरस्त्रियांना क्लेश भोगण्याची पाळी येते आणि पतिशुश्रूषा करून त्या क्लेश भोगूं लागल्या असतां त्यांना पतिलोक प्राप्त होतो ४२. मला वाटतें, हा क्रोधाचा समय आहे असें तुझ्या पतींना वाटत नाहीं आणि ह्मणूनच ते सूर्यासारिखे तेजस्वी तुझे गंधर्वपति तुझ्या रक्षणाकरितां धांवून येत नाहींत ४३. हे सैरंध्रि, तुला काळवेळ समजत नाहीं. एकाद्या नटीप्रमाणें निर्लज्ज होऊन तूं रोदन करीत आहेस आणि राजसभेमध्यें द्यूत खेळणाऱ्या मत्स्यदेशांतील लोकांना विघ्न करीत आहेस ४४. हे सैरंध्रि, तूं येथून निघून जा. गंधर्व तुझ्या मनाप्रमाणें करितील. ज्यांनीं तुला दुःख दिलें त्या दुःख देणाऱ्यालाही ते दृष्टीआड करितील ४५. सैरंध्री ह्मणतेः—त्या दयाळु पतींकरितां मज धर्मचारिणी पत्नीला फारच क्लेश सोसावे लागत आहेत. ज्यांच्यांतील श्रेष्ठच जुगार बनलेला आहे त्यांचा जो तो अपमान करणारच ४६. वैशंपायन सांगतातः— क्रोधानें जिचे डोळे लाल झालेले आहेत अशी ती सुंदरी द्रौपदी इतकेंच बोलून व केश मोकळे सोडून सुदेष्णेच्या महालांत सत्वर चालती झाली ४७ व पुष्कळवेळपर्यंत रोदन करीत असलेल्या त्या द्रौपदीचें मुख आकाशांतील मेघनिर्मुक्त

सुचिरं तदा । मेघलेखाविनिर्मुक्तं दिवीव शशिमण्डलम् ४८ सुदेष्णोवाच ॥ कस्त्वावधीद्वरारोहे कस्माद्रोदिषि शोभने । कस्याद्य न सुखं भद्रे केन ते विप्रियं कृतम् ४९ द्रौपद्युवाच ॥ कीचको मावधीत्तत्र सुराहारीं गतां तव । सभायां पश्यतो राज्ञो यथैव विजने वने ५० सुदेष्णोवाच ॥ घातयामि सुकेशान्ते कीचकं यदि मन्यसे । योसौ त्वां कामसंमत्तो दुर्लभामवमन्यते ५१ सैरन्ध्र्युवाच ॥ अन्ये चैनं वधिष्यन्ति येषामागः करोति सः । मन्ये चैवाद्य सुव्यक्तं यमलोकं गमिष्यति ५२ [५०३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि कीचकवधपर्वणि द्रौपदीपरिभवे षोडशोध्यायः ॥ १६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ सा हता सूतपुत्रेण राजपत्नी यशस्विनी । वधं कृष्णा परीप्सन्ती सेनावाहस्य भामिनी १ जगामावासमेवाथ सा तदा द्रुपदात्मजा । कृत्वा शौचं यथान्यायं कृष्णा सा तनुमध्यमा २ गात्राणि वाससी चैव प्रक्षाल्य सलिलेन सा । चिन्तयामास रुदती तस्य दुःखस्य निर्णयम् ३ किं करोमि क्व गच्छामि कथं कार्यं भवेन्मम । इत्येवं चिन्तयित्वा

झालेल्या चंद्राप्रमाणें दिसूं लागली ४८. सुदेष्णा ह्मणते:—हे सुंदरि, तुला कोणीं गांजिलें? हे शोभने, तूं कां रोदन करीत आहेस? हे कल्याणि, आज कोणाला अवदशा आठवली आहे? तुला कोणीं दुःख दिलें आहे? ४९. द्रौपदी ह्मणते:—तुझें मद्य आणण्याकरितां मी गेलें असतां कीचकानें मला ताडन केलें आणि निर्जन वनामध्यें ज्याप्रमाणें त्यानें मला ताडन केलें त्याप्रमाणें राजाचे समक्ष सभेमध्येंही त्यानें मला लत्ता प्रहार केला ५०. सुदेष्णा ह्मणते:—हे उत्कृष्ट केशधारिणि सैरंध्रि, तुझी इच्छा असेल तर मदनानें मत्त होऊन जो, तूं दुर्लभ असतांही, तुझा अवमान करीत आहे त्या कीचकाचा मी वध करविते ५१. सैरंध्री ह्मणते:—ज्यांचा हा अपराध करीत आहे तेच ह्याचा वध करितील (तुला ह्याचा वध करविण्याचें कारण नाहीं). आजच ह्याला निःसंशय यमलोकीं जाण्याची पाळी येईल असें माझें अनुमान आहे ५२. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील कीचकवधपर्वांपैकी द्रौपदीच्या अवमानाविषयीं सोळावा अध्याय समाप्त झाला ॥ १६ ॥

वैशंपायन सांगतात:—सूतपुत्र कीचकानें लत्ताप्रहार केला असतां ती यशस्विनी व सुंदरी राजपत्नी द्रौपदी सेनापति कीचकाचा वध करविण्याचा उद्देश मनांत धरून १ घराकडे चालती झाली; गेल्यावर त्या द्रुपदकन्यासुंदरी कृष्णेनें यथायोग्य रीतीनें हातपाय धुतले २ आणि गात्रांचें व वस्त्रांचें उदकानें प्रक्षालन करून रडत रडत ती

सा भीमं वै मनसागमत् ४ नान्यः कर्ता ऋते भीमान्ममाद्य मनसः प्रियम्। तत उत्थाय रात्रौ सा विहाय शयनं स्वकम् ५ प्राद्रवन्नाथमिच्छन्ती कृष्णा नाथवती सती। भवनं भीमसेनस्य क्षिप्रमायतलोचना ॥ दुःखेन महता युक्ता मानसेन मनस्विनी ६ सैरन्ध्र्युवाच ॥ तस्मिञ्जीवति पापिष्ठे सेनावाहे मम द्विषि। तत्कर्म कृतवानद्य कथं निद्रां निषेवसे ७ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वाथ तां शालां प्रविवेश मनस्विनी। यस्यां भीमस्तथा शेते मृगराज इव श्वसन् ८ तस्या रूपेण सा शाला भीमस्य च महात्मनः। संमूर्छितेव कौरव्य प्रजज्वाल च तेजसा ९ सा वै महानसं प्राप्य भीमसेनं शुचिस्मिता। सर्वश्वेतेव माहेयी वने जाता त्रिहायणी १० उपातिष्ठत पाञ्चाली वासितेव वरर्षभम्। सा लतेव महाशालं फुल्लं गोमतितीरजम् ११ परिष्वजत पाञ्चाली मध्यमं पाण्डुनन्दनम्। बाहुभ्यां परिरभ्यैनं प्राबोधयदनिन्दिता १२ सिंहं सुप्तं वने दुर्गे मृगराजवधूरिव।

त्या दुःखाच्या अंताविषयीं चिंतन करूं लागली ३. "आतां मी करूं तरी काय ? जाऊं तरी कोठें ? माझा उद्देश तरी कसा सिद्धीस जाणार ?" असा विचार करितां करितां तिला भीमाचें स्मरण झालें ४ आणि "आज माझा हा मनोरथ परिपूर्ण करणारा भीमावांचून दुसरा कोणीही नाहीं" असा निश्चय करून ती सनाथ व साध्वी विशालनयना द्रौपदी नाथाची भेट घेण्याच्या उद्देशानें रात्रींच आपलें हांतरुण सोडून उठली आणि भीमसेनाच्या निवासस्थानामध्यें सत्वर चालती झाली. त्यावेळीं त्या विचारी द्रौपदीला अतिशय मानसिक दुःख झालेलें होतें ५, ६. सैरंध्री भीमसेनाला ह्मणते:—ज्यानें आज तें मला लत्ताप्रहार करण्याचें कर्म केलें तो माझा शत्रु अत्यंत पापी सेनाधिपति कीचक जिवंत असतांना आपण झोंप घेत कसे पडला आहां ? ७. वैशंपायन सांगतात:—असें बोलून ती विचारी द्रौपदी भीमसेन जेथें सिंहाप्रमाणें घोरत पडलेला होता त्या पाकशालेमध्यें गेली असतां ८ तिच्या व महात्म्या भीमसेनाच्या रूपानें ती पाकशाला व्याप्त झाल्यामुळें, हे कुरुवंशजश्रेष्ठा जनमेजया, तेजानें जशी कांहीं जळतच आहे कीं काय अशी दिसूं लागली ९. ती सुहास्यवदना पांचाली द्रौपदी पाकशालेमध्यें गेल्यावर जलप्रदेशाचे ठिकाणीं उत्पन्न झालेली बगळी अथवा तीन वर्षांची झालेली गाय ज्याप्रमाणें कामातुर होऊन उत्कृष्ट पतीकडे जाते त्याप्रमाणें क्रोधातुर होऊन श्रेष्ठ पति जो भीमसेन त्याच्याजवळ गेली १०. नंतर गोमती नदीच्या तीरावरील प्रफुल्लित झालेल्या प्रचंड शालवृक्षाप्रमाणें दिसत असलेल्या त्या मधल्या पांडुपुत्राला त्या लतेप्रमाणें शोभणाऱ्या पांचालीनें आलिंगन दिलें आणि गहन वनामध्यें घोरत

भीमसेनमुपाश्लिष्यद्धस्तिनीव महागजम् १३ वीणेव मधुरालापा गान्धारं
साधु मूर्छती । अभ्यभाषत पाञ्चाली भीमसेनमनिन्दिता १४ उत्तिष्ठो-
त्तिष्ठ किं शेषे भीमसेन यथा मृतः । नामृतस्य हि पापीयान्भार्यामालभ्य
जीवति १५ स संप्रहाय शयनं राजपुत्र्या प्रबोधितः । उपातिष्ठत मेघाभः
पर्यङ्के सोपसंग्रहे १६ अथाब्रवीद्राजपुत्रीं कौरव्यो महिषीं प्रियाम् ।
केनास्यर्थेन संप्राप्ता त्वरितेव ममान्तिकम् १७ न ते प्रकृतिमान्वर्णः
कृशा पाण्डुश्च लक्ष्यसे । आचक्ष्व परिशेषेण सर्वं विद्यामहं यथा १८
सुखं वा यदि वा दुःखं द्वेष्यं वा यदि वा प्रियम् । यथावत्सर्वमाचक्ष्व श्रुत्वा
ज्ञास्यामि यत्क्षमम् १९ अहमेव हि ते कृष्णे विश्वास्यः सर्वकर्मसु ।
अहमापत्सु चापि त्वां मोक्षयामि पुनः पुनः २० शीघ्रमुक्त्वा यथाकामं
यत्ते कार्यं विवक्षितम् । गच्छ वै शयनायैव पुरा नान्येन बुध्यते २१

पडलेल्या सिंहाला जागें करणारी सिंहीणच कीं काय अशा त्या अनिंदित द्रौपदीनें बाहूंनीं त्या भीमसेनाला आलिंगन देऊन जागें केलें. सारांश, हत्तीण ज्याप्रमाणें गजेंद्राला आलिंगन देते त्याप्रमाणें तिनें भीमसेनाला आलिंगन दिलें ११, १२,१३. तदनंतर जिचें भाषण विण्याप्रमाणें मधुर आहे व सप्तस्वरांतील गांधाराप्रमाणें जिचा उत्कृष्ट स्वर आहे अशी ती अनिंदित द्रौपदी भीमसेनाला ह्मणाली १४ " हे भीमसेन, उठा उठा; असे मेल्यासारिखे स्वस्थ कां पडलां आहां ? कारण, पुरुष जोंपर्यंत जिवंत आहे तोंपर्यंत त्याच्या भार्येवर हात टाकणारा पापी पुरुष जिवंत रहाण्याचा संभव नाहीं " १५. ह्याप्रमाणें राजकन्या द्रौपदीनें जागें केलें असतां झोंप सोडून देऊन तो मेघतुल्यकांतिमान् भीमसेन गाद्या आंथरलेल्या पलंगावर उठून बसला १६ व तदनंतर तो कुरुकुलोत्पन्न भीमसेन आपली प्रिय भार्या जी राजकन्या द्रौपदी तिला ह्मणाला " कोणत्या उद्देशानें तूं अगदीं घाबरी होऊन माझ्याकडे आली आहेस ? १७. तुझ्या मुखावरील कांति नेहमींप्रमाणें दिसत नाहीं. तूं कृश व फिकट दिसत आहेस. ह्यास्तव, माझी समजूत पटेल अशा रीतीनें जें असेल तें सर्व कांहीं पूर्णपणें मला सांग १८. सुख असो अथवा दुःख असो, प्रिय असो अथवा अप्रिय असो, जें काय तुला सांगावयाचें असेल तें सर्व कांहीं तूं मला सांग; ह्मणजे ऐकून घेतल्यावर कोणता उपाय योजणें योग्य आहे त्याचा मी विचार करीन १९. हे द्रौपदि, कोणत्याही कामाविषयीं तूं माझ्यावरच विश्वास टाकीत जा. मीच तुला वारंवार संकटांतून सोडवीन २०. ह्यास्तव, जें कार्य तूं मनामध्यें आणिलें असशील तें खुशाल माझ्यापाशीं सत्वर निवेदन कर आणि तूं

[५२४] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि कीचकवधपर्वणि द्रौपदीभीमसंवादे सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥

द्रौपद्युवाच ॥ अशोच्यत्वं कुतस्तस्या यस्या भर्ता युधिष्ठिरः । जानन्सर्वाणि दुःखानि किं मां त्वं परिपृच्छसि १ यन्मां दासीप्रवादेन प्रातिकामी तदानयत् । सभापरिषदो मध्ये तन्मां दहति भारत २ पार्थिवस्य सुता नाम का नु जीवति मादृशी । अनुभूयेदृशं दुःखमन्यत्र द्रौपदीं प्रभो ३ वनवासगतायाश्च सैन्धवेन दुरात्मना । परामर्शो द्वितीयो वै सोढुमुत्सहते तु का ४ मत्स्यराज्ञः समक्षं तु तस्य धूर्तस्य पश्यतः । कीचकेन परामृष्टा का नु जीवति मादृशी ५ एवं बहुविधैः क्लेशैः क्लिश्यमानां च भारत । न मां जानासि कौन्तेय किं फलं जीवितेन मे ६ योयं राज्ञो विराटस्य कीचको नाम भारत । सेनानीः पुरुषव्याघ्र श्यालः परमदुर्मतिः ७ स मां सैरन्ध्रिवेषेण वसन्तीं राजवेश्मनि ।

इकडे आल्याचें दुसऱ्या कोणाला समजलें नाहीं तोंच तूं आपल्या शय्येवर परत जा २१. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील कीचकवधपर्वांपैकीं द्रौपदी आणि भीम ह्यांच्या संवादाविषयीं सतरावा सर्ग समाप्त झाला ॥ १७ ॥

द्रौपदी ह्मणतेः—अहो, युधिष्ठिर जिचा भर्ता आहे तिला सुख कोठून असणार ? सर्व कांहीं दुःखें ठाऊक असतांनाच आपण मला असें कायबरें विचारीत आहांत ? १. हे भरतवंशज, दासी ह्मणून प्रातिकामीनें मला सभेंत जमलेल्या लोकसमाजामध्यें त्या द्यूतसमयीं ओढून आणिलें तें त्याचें कृत्य अद्यापि मला जसें कांहीं जाळीत आहे २. हे प्रभो, अशाप्रकारचें दुःख प्राप्त झालें असतांही एका द्रौपदीशिवाय कोणती बरें राजकन्या माझ्यासारिखी जिवंत रहाणार आहे ? ३. वनवासामध्यें गेल्यावरही दुरात्म्या सिंधुराजानें केलेला अपमान दुसऱ्या कोणत्या बरें स्त्रीला सहन होणार आहे ? ४. मत्स्यराज विराटाचे समक्ष आणि त्या जुगार युधिष्ठिराच्या डोळ्यादेखत कीचकानें अंगावर हात टाकिला असतांही माझ्यासारिखी कोण बरें जिवंत रहाणार आहे ? ५. हे भरतवंशज, (एक काय आणि दोन काय !) अशा नानाप्रकारच्या क्लेशांनीं एकसारिखी माझी गांजणूक चालली असतांना ज्याअर्थीं माझी अवस्था आपल्या गांवींही नाहीं त्याअर्थीं, हे कुंतीनंदन, आतां मी जिवंत रहाण्यांत तरी काय अर्थ आहे ? ६. हे भरतवंशज, हे पुरुषश्रेष्ठ, विराटराजाचा जो हा अत्यंत दुष्ट श्यालक सेनाधिपति कीचक आहे ७ तो सैरंध्रीचे वेषानें राजगृहीं वास्तव्य करणाऱ्या

नित्यमेवाह दुष्टात्मा भार्या मम भवेति वै ८ तेनोपमन्त्र्यमाणाया
वधार्हेण सपत्नहन् । कालेनेव फलं पक्वं हृदयं मे विदीर्यते ९ भ्रातरं च
विगर्हस्व ज्येष्ठं दुर्द्यूतदेविनम् । यस्यास्मि कर्मणा प्राप्ता दुःखमेतदनन्त-
कम् १० को हि राज्यं परित्यज्य सर्वस्वं चात्मना सह । प्रव्रज्यायैव
दीव्येत विना दुर्द्यूतदेविनम् ११ यदि निष्कसहस्रेण यच्चान्यत्सारवद्ध-
नम् । सायंप्रातरदेविष्यदपि संवत्सरान्बहून् १२ रुक्मं हिरण्यं वासांसि
यानं युग्यमजाविकम् । अश्वाश्वतरसङ्घाश्च न जातु क्षयमावहन् १३
सोयं द्यूतप्रवादेन श्रियः प्रत्यवरोपितः । तूष्णीमास्ते यथा मूढः स्वानि
कर्माणि चिन्तयन् १४ दशनागसहस्राणि हयानां हेममालिनाम् । यं
यान्तमनुयान्तीह सोयं द्यूतेन जीवति १५ रथाः शतसहस्राणि नृपाणा-
ममितौजसाम् । उपासन्त महाराजमिन्द्रप्रस्थे युधिष्ठिरम् १६ शतं दासी-
सहस्राणां यस्य नित्यं महानसे । पात्रीहस्तं दिवारात्रमतिथीन्भोजय-
न्त्युत १७ एष निष्कसहस्राणि प्रदाय ददतां वरः । द्यूतजेन ह्यनर्थेन

मला " माझी भार्या हो " असें दुष्ट बुद्धीनें नित्य म्हणत असतो ८. हे शत्रुनाशक, वधालाच योग्य असा तो कीचक ह्याप्रमाणें माझ्याशीं भाषण करूं लागला असतां कालानें परिपक्व झालेल्या फलाप्रमाणें माझें हृदय अगदीं विदीर्ण होऊन जातें ९. ज्याच्या कर्मामुळें हें अपार दुःख मला प्राप्त झालें आहे त्या दुष्ट द्यूत खेळणाऱ्या आपल्या ज्येष्ठ भ्रात्याचीच आपण निर्भर्त्सना करा १०. कारण, दुष्ट जुगारावांचून दुसरा कोण बरें राज्याचा आणि स्वतःसहवर्तमान सर्वस्वाचा त्याग करून अवधूत बनल्यावरही द्यूत खेळण्यास प्रवृत्त होणार आहे ? ११. सकाळसंध्याकाळ हजार हजार मोहरा लावून कित्येक वर्षेपर्यंत द्यूत चाललें असतांही पुरण्याइतकें सुवर्ण, रजत, वस्त्रें, वाहनें, रथ, शेळ्यामेंढ्या, अश्वांच्या व खेचरांच्या पागा वगैरे विपुल द्रव्य ज्याच्यापाशीं होतें त्याची अशी हानि होण्याची पाळी कधींही येऊं नये १२,१३. परंतु, द्यूताच्या निमित्तानें तो हा धर्मराजा वैभवापासून भ्रष्ट झाला आहे आणि एकाद्या मूढ पुरुषाप्रमाणें आपल्या कर्माबद्दल पश्चात्ताप करीत स्वस्थ बसला आहे १४. ज्याची स्वारी निघाली असतां सुवर्णाच्या अलंकारांनीं शृंगारिलेले दहा हजार अश्व व गज बरोबर जात असत तो हा धर्मराजा आज द्यूतावर आपली उपजीविका करीत आहे १५. महाराज युधिष्ठिर इंद्रप्रस्थामध्यें असतांना महाबलाढ्य राजाचे एक लक्ष रथ त्याच्या सेवेमध्यें तत्पर असत १६ आणि त्याच्या मत्पाकामध्यें रात्रंदिवस हातांमध्यें अन्नांचीं भांडीं घेऊन एक लक्ष दासी अतिथींना

महता समुपाश्रितः १८ एनं हि स्वरसंपन्ना बहवः सूतमागधाः । सायं-
प्रातरुपातिष्ठन्सुमृष्टमणिकुण्डलाः १९ सहस्रमृषयो यस्य नित्यमासन्स-
भासदः । तपःश्रुतोपसंपन्नाः सर्वकामैरुपस्थिताः २० अष्टाशीति सह-
स्राणि स्नातका गृहमेधिनः । त्रिंशद्दासीक एकैको यान्बिभर्ति युधिष्ठिरः २१
अप्रतिग्राहिणां चैव यतीनामूर्ध्वरेतसाम् । दश चापि सहस्राणि सोयमास्ते
नरेश्वरः २२ आनृशंस्यमनुक्रोशं संविभागस्तथैव च । यस्मिन्नेतानि
सर्वाणि सोयमास्ते नरेश्वरः २३ अन्धान्वृद्धांस्तथानाथान्बालान्राष्ट्रेषु दुर्ग-
तान् । बिभर्ति विविधान्राजा धृतिमान्सत्यविक्रमः २४ संविभागमना
नित्यमानृशंस्याद्युधिष्ठिरः २५ स एष निरयं प्राप्तो मत्स्यस्य परिचा-
रकः । सभायां देविता राज्ञः कङ्को ब्रूते युधिष्ठिरः २६ इन्द्रप्रस्थे निव-
सतः समये यस्य पार्थिवाः । आसन्बलिभृतः सर्वे सोद्यान्यैर्भृतिमि-
च्छति २७ पार्थिवाः पृथिवीपाला यस्यासन्वशवर्तिनः । स वशे विवशो

भोजन घालीत असते १७; व दात्यांमध्यें श्रेष्ठ असलेला हा युधिष्ठिर प्रत्यहीं हजारों मोहरा देऊन अतिथींचा सत्कार करीत असे. परंतु, द्यूतामुळें त्यालाच मोठा अनर्थ सांप्रत प्राप्त झाला आहे १८. रत्नांचीं उज्ज्वल कुंडलें धारण केलेले आणि तालसुरामध्यें गाणारे अनेक सूत व मागध सकाळसंध्याकाळ ह्याच्या सेवेमध्यें हजर असत १९. तप आणि अध्ययन ह्यांनीं संपन्न असे हजार ऋषि नेहमीं ह्याच्या सभेमध्यें बसलेले असत आणि त्यांच्या सर्व इच्छा परिपूर्ण होत असत २०. ऐंशी हजार गृहस्थाश्रमी विद्वान् ब्राह्मणांचा एकेकाला तीस तीस दासी ह्याप्रमाणें युधिष्ठिरराजा नित्य परामर्श घेत असे २१; आणि प्रतिग्रह न करणाऱ्या दहा हजार ऊर्ध्वरेत्या यतींचेंही हा नित्य पोषण करीत असे. परंतु, सांप्रत तोच हा राजा द्यूतावर उपजीविका करीत पडला आहे २२. सुजनता, दया आणि जें प्राप्त होईल तें सर्वांना विभागून देणें हे सर्वही गुण ज्याचे ठिकाणीं आहेत तो हा राजा येथें पडला आहे २३. राष्ट्रांतील अंध, वृद्ध, अनाथ व दुर्दशेला पोंचलेल्या अशा अनेक लोकांचें जो युधिष्ठिर पोषण करीत असे आणि जो धैर्यवान् व सत्यपराक्रमी असून जें मिळेल तें इतरांना विभागून देण्याची नित्य इच्छा धरीत असे २४, २५ तो हा युधिष्ठिर सांप्रत अतिशयच दुस्थितीला पोंचून मत्स्यराज विराटाचा दास बनला आहे आणि त्या राजाच्या सभेमध्यें " मी कंक आहें " असें सांगून द्यूत खेळण्यांत दिवस काढीत आहे २६. इंद्रप्रस्थामध्यें वास्तव्य करीत असतांना वेळच्यावेळीं पृथ्वींतील सर्व राजे ज्याला खंडणी आणून देत असत तो आज उदरपोषणाकरितां दुसऱ्यांच्या आश्रयाची इच्छा करीत

राजा परेषामद्य वर्तते २८ प्रताप्य पृथिवीं सर्वां रश्मिमानिव तेजसा । सोयं राज्ञो विराटस्य सभास्तारो युधिष्ठिरः २९ यमुपासन्त राजानः सभायामृषिभिः सह । तमुपासीनमद्यान्यं पश्य पाण्डव पाण्डवम् ३० सदस्यं समुपासीनं परस्य प्रियवादिनम् । दृष्ट्वा युधिष्ठिरं कोपो वर्धते माममसंशयम् ३१ अतदर्हं महाप्राज्ञं जीवितार्थेभिसंस्थितम् । दृष्ट्वा कस्य न दुःखं स्याद्धर्मात्मानं युधिष्ठिरम् ३२ उपास्ते स्म सभायां यं कृत्स्ना वीर वसुन्धरा । तमुपासीनमप्यन्यं पश्य भारत भारतम् ३३ एवं बहुविधैर्दुःखैः पीड्यमानामनाथवत् । शोकसागरमध्यस्थां किं मां भीम न पश्यसि ३४ [५५८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि कीचकवधपर्वणि द्रौपदीभीमसंवादेष्टादशोध्यायः ॥ १८ ॥

द्रौपद्युवाच ॥ इदं तु ते महद्दुःखं यत्प्रवक्ष्यामि भारत । न मेभ्यसूया कर्तव्या दुःखादेतद्ब्रवीम्यहम् १ सूदकर्मणि हीने त्वमसमे भरतर्षभ ।

आहे २७. पृथ्वीपति राजे ज्याच्या आज्ञेंत वागत होते तो हा युधिष्ठिरराजा निरुपाय झाल्यामुळें दुसऱ्यांच्या अधीन होऊन राहिला आहे २८. सूर्याप्रमाणें आपल्या तेजाच्या योगानें ज्यानें सर्व पृथ्वी तप्त केली तो हा युधिष्ठिर आज विराटराजाचा सभासद होऊन राहिला आहे २९. हे पांडव, ऋषींसहवर्तमान राजे करमणूक करण्याकरितां सभेमध्यें ज्याच्या भोंवताली बसत असत तो पांडुपुत्र धर्मराज आज दुसऱ्याचें चित्तरंजन करून दिवस काढीत आहे; हें पहा! ३०. दुसऱ्याच्या मर्जीप्रमाणें वागून हा युधिष्ठिर सभासद ह्या नात्यानें बसलेला अवलोकन करून मला खरोखर संताप होत असतो ३१. महाप्राज्ञ धर्मात्म युधिष्ठिर स्वतःला अयोग्य असें हलकें काम करीत असल्याचें पाहून कोणाला बरें दुःख होणार नाहीं? ३२. हे वीर भरतवंशज, सभेमध्यें संपूर्ण पृथ्वींतील लोक चित्तरंजन करण्याकरितां ज्याच्या भोंवताली बसलेले असत त्या दुसऱ्याची खुषमस्करी करीत बसलेल्या भरतकुलोत्पन्न युधिष्ठिराकडे आपण पहा! ३३. तात्पर्य, अशा प्रकारच्या अनेक दुःखांनीं मी एकसारिखी गांजून गेलें असून अनाथाप्रमाणें शोकसागरामध्यें मग्न झालें आहें हें, हे भीमसेन, आपणांला दिसतच नाहीं काय? ३४. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील कीचकवधपर्वांपैकीं द्रौपदी आणि भीमसेन ह्यांच्या संवादाविषयीं अठरावा अध्याय समाप्त झाला॥ १८ ॥

द्रौपदी ह्मणते:—हे भरतवंशज, मला अतिशय दुःख कशाचें वाटत आहे हें मी आतां सांगतें. केवल दुःखामुळें मी हें तोंडाबाहेर काढीत आहें. ह्यास्तव, आपण

ब्रुवन्बल्लवजातीयः कस्य शोकं न वर्धयेः २ सूपकारं विराटस्य बल्लवं त्वां विदुर्जनाः । प्रेष्यत्वं समनुप्राप्तं ततो दुःखतरं नु किम् ३ यदा महानसे सिद्धे विराटमुपतिष्ठसि । ब्रुवाणो बल्लवः सूदस्तदा सीदति मे मनः ४ यदा प्रहृष्टः सम्राट् त्वां संयोधयति कुञ्जरैः । हसन्त्यन्तःपुरे नार्यो मम तूद्विजते मनः ५ शार्दूलैर्महिषैः सिंहैरागारे योध्यसे यदा । कैकेय्याः प्रेक्षमाणायास्तदा मे कश्मलं भवेत् ६ तत उत्थाय कैकेयी सर्वास्ताः प्रत्यभाषत । प्रेष्याः समुत्थिताश्चापि कैकेयीं ताः स्त्रियोऽब्रुवन् ७ प्रेक्ष्य मामनवद्याङ्गीं कश्मलोपहतामिव । स्नेहात्संवासजाद्धर्मात्सूदमेषा शुचिस्मिता ८ योध्यमानं महावीर्यमियं समनुशोचति । कल्याणरूपा सैरन्ध्री बल्लवश्चापि सुन्दरः ९ स्त्रीणां चित्तं च दुर्ज्ञेयं युक्तरूपौ च मे मतौ । सैरन्ध्री प्रियसंवासान्नित्यं करुणवादिनी १० अस्मिन्राजकुले चेमौ

माझ्या ह्मणण्याचा रोष मानूं नका १. हे भरतवंशजश्रेष्ठ, आपल्या योग्यतेला अनुचित अशा आचाऱ्याच्या हलक्या कामामध्यें आपण पडलां आहांत आणि बल्लव ह्मणून सांगत आहांत; ह्याबद्दल कोणाला बरें वाईट वाटणार नाहीं ? २. दासपण नशीबीं आलेल्या आपणांला लोक विराटराजाचा बल्लव आचारी समजत आहेत; ह्याहूनही अधिक दुःखदायक ती गोष्ट कोणती ? ३. मुदपाकामध्यें पाकसिद्धि झाल्यावर बल्लव आचारी ह्मणून विराटराजाच्या शुश्रूषेला जेव्हां आपण तयार होतां तेव्हां माझ्या मनाला खेद वाटतो ४. जेव्हां विराटराजा आनंदामध्यें येऊन अंतःपुरामध्यें हत्तींशीं आपली झुंज लावितो आणि स्त्रिया हंसूं लागतात तेव्हां माझें मन उद्विग्न होतें ५. केकयराजकन्या सुदेष्णेचे समक्ष जेव्हां व्याघ्र, महिष व सिंह ह्यांच्यांशीं युद्धस्थलामध्यें आपलें युद्ध लावितात तेव्हां तर मला अगदीं मूर्च्छाच येते ६. तदनंतर कैकेयी सुदेष्णा उठून त्या सर्व स्त्रियांना सांगूं लागते आणि त्याही सर्व दासी उठून सुदेष्णेशीं बोलूं लागतात ७. जिच्या रूपाला कोठेंही नांव ठेवण्यास जागा नाहीं अशी मी मूर्छित झालेली अवलोकन करून सुदेष्णा " एकत्र वास्तव्य झाल्यानें उत्पन्न झालेल्या प्रेमधर्मामुळें ही सुहास्यवदना सैरंध्री ह्या महावीर्यवान् बल्लवाचें युद्ध लाविलें असतां कष्टी होत असते. सैरंध्रीचेंही रूप उत्कृष्ट असून बल्लवही सुंदर आहे ८, ९; आणि स्त्रियांच्या मनाचा थांग लागणें कठीण हें तर ठरलेलेंच आहे. तेव्हां मला हे उभयतां एकमेकांशीं स्त्रीपुरुष ह्या नात्यानें वागण्यास योग्य आहेत असें वाटतें. कारण, प्रिय बल्लवाशीं ह्या सैरंध्रीचा नित्य सहवास असल्यामुळेंच त्याचें युद्ध लाविलें असतां हिला वाईट वाटूं लागतें १०; आणि

तुल्यकालनिवासिनौ । इति ब्रुवाणा वाक्यानि सा मां नित्यमतर्जयत् ११
क्रुध्यन्तीं मां च संप्रेक्ष्य समशङ्कत मां त्वयि । तस्यां तथा ब्रुवत्यां तु दुःखं
मां महदाविशत् १२ त्वय्येवं निरयं प्राप्ते भीमे भीमपराक्रमे । शोके यौधि-
ष्ठिरे मग्ना नाहं जीवितुमुत्सहे १३ यः सदेवान्मनुष्यांश्च सर्वांश्चैकरथोजयत् ।
सोयं राज्ञो विराटस्य कन्यानां नर्तको युवा १४ योतर्पयदमेयात्मा खाण्डवे
जातवेदसम् । सोन्तःपुरगतः पार्थ कूपेग्निरिव संवृतः १५ यस्माद्भयममि-
त्राणां सदैव पुरुषर्षभात् । स लोकपरिभूतेन वेषेणास्ते धनञ्जयः १६
यस्य ज्याक्षेपकठिनौ बाहू परिघसंनिभौ । स शङ्खपरिपूर्णाभ्यां शोच-
न्नास्ते धनञ्जयः १७ यस्य ज्यातलनिर्घोषात्समकम्पन्त शत्रवः । स्त्रियो
गीतस्वनं तस्य मुदिताः पर्युपासते १८ किरीटं सूर्यसंकाशं यस्य मूर्ध-
न्यशोभत । वेणीविकृतकेशान्तः सोयमद्य धनञ्जयः १९ तं वेणीकृतके-
शान्तं भीमधन्वानमर्जुनम् । कन्यापरिवृतं दृष्ट्वा भीम सीदति मे मनः २०

ह्या राजकुलामध्यें हे उभयतांही बरोबर रहाण्याकरितां आलेले आहेत" अशीं भाषणें करीत करीत मला नेहमीं टांचीत असते ११; आणि मी रागावलेली पाहून नंतर आपल्यासंबंधानें माझ्याविषयीं तिच्या मनांत अधिक अधिकच शंका येऊं लागते. सारांश, तशाप्रकारें ती एकसारिखी बालूं लागली असल्यामुळें मला मोठें दुःख झालेलें आहे १२. परंतु, भयंकरपराक्रमी भीमसेन आपण असूनही आपलीच जर अशी अत्यंत शोचनीय अवस्था झालेली आहे तर युधिष्ठिरामुळें प्राप्त झालेल्या ह्या शोकामध्यें मग्न झालेल्या मला आतां जगण्यांत कांहीं अर्थ दिसत नाहीं १३. देवांसहवर्तमान सर्व मानवांना ज्या अप्रतिम रथ्यानें जिंकिलें तो हा तरुण अर्जुन विराटराजाच्या मुलींचा नृत्यशिक्षक झाला आहे १४. हे कुंतीनंदन, ज्या अतुलपराक्रमी अर्जुनानें खांडववनामध्यें अग्नीला तृप्त केलें तो हा अर्जुन कूपामध्यें दडून रहाणाऱ्या अग्नीप्रमाणेंच कीं काय आज अंतःपुरांत राहिलेला आहे १५. ज्या पुरुषश्रेष्ठाचें शत्रूंना नेहमीं भय वाटत असे तो हा धनंजय लोकनिंदेस पात्र असलेल्या क्लीबाच्या वेषानें दिवस काढीत आहे १६. प्रत्यंचेच्या आघातामुळें ज्याचे अडसरासारिखे बाहु कठिण झालेले आहेत तो हा धनंजय हातांमध्यें शंखांचे चुडे भरून दुःखानें दिवस काढीत आहे १७. ज्याच्या प्रत्यंचेचा टणत्कार झाल्याबरोबर शत्रु थरथर कांपत असत त्या अर्जुनाचें सुस्वर गायन सांप्रत स्त्रिया आनंदानें ऐकत असतात १८. सूर्यासारिखा तेजस्वी किरीट ज्याच्या मस्तकीं झळकत असे तो हा धनंजय वेणीनें आपल्या केंसांचीं अग्रें खराब करून सांप्रत दिवस काढीत आहे १९. हे भीमसेन, भयंकर गांडीव धनुष्य

यस्मिन्नस्त्राणि दिव्यानि समस्तानि महात्मनि । आधारः सर्वविद्यानां स धारयति कुण्डले २१ स्प्रष्टुं राजसहस्राणि तेजसा प्रतिमानि वै । समरे नाभ्यवर्तन्त वेलामिव महार्णवः २२ सोयं राज्ञो विराटस्य कन्यानां नर्तको युवा । आस्ते वेषप्रतिच्छन्नः कन्यानां परिचारकः २३ यस्य स्म रथघोषेण समकम्पत मेदिनी । सपर्वतवना भीम सहस्थावरजङ्गमा २४ यस्मिञ्जाते महाभागे कुन्त्याः शोको व्यनश्यत । स शोचयति मामद्य भीमसेन तवानुजः २५ भूषितं तमलङ्कारैः कुण्डलैः परिहाटकैः । कम्बुपाणिनमायान्तं दृष्ट्वा सीदति मे मनः २६ यस्य नास्ति समो वीर्ये कश्चिदुर्व्यां धनुर्धरः । सोद्य कन्यापरिवृतो गायन्नास्ते धनञ्जयः २७ धर्मे शौर्ये च सत्ये च जीवलोकस्य संमतम् । स्त्रीवेषविकृतं पार्थं दृष्ट्वा सीदति मे मनः २८ यदा ह्येनं परिवृतं कन्याभिर्देवरूपिणम् । प्रभिन्नमिव मातङ्गं परिकीर्णं करेणुभिः २९ मत्स्यमर्थपतिं पार्थं विराटं समुपस्थितम् ।

धारण करणारा तो अर्जुन केसांची वेणी घालून मुलींमध्यें बसलेला पहातांक्षणीं माझें मन खिन्न होऊन जातें २०. ज्या महात्म्याचे ठिकाणीं संपूर्ण दिव्य अस्त्रें वास्तव्य करीत आहेत आणि जो सर्व विद्यांचा आश्रय आहे त्या ह्या अर्जुनाला कानामध्यें बाळ्याबुगड्या घालून दिवस काढण्याचा आज प्रसंग आला आहे २१. मर्यादावेलीचें उल्लंघन करण्यास असमर्थ असलेल्या महासागराप्रमाणें तेजानें अप्रतिम असलेले हजारों राजे एकत्र जुळले असतांनाही संग्रामामध्यें ज्याला नुसता स्पर्श करण्यालाही धजत नसत २२ तो हा तरुण अर्जुन विराटराजाच्या मुलींचा नृत्यशिक्षक बनला आहे आणि क्लीबाच्या वेषानें आपलें स्वरूप गुप्त ठेवून मुलींची शुश्रूषा करीत पडला आहे २३. हे भीमसेन, ज्याच्या रथघोषानें पर्वत व वनें ह्यांसहवर्तमान स्थावरजंगमात्मक पृथ्वी कंपित होत असे २४ आणि जो महाभाग्यवान् जन्मास आल्यामुळें कुंतीच्या दुःखाचा परिहार झाला तो हा आपल्या पाठचा भाऊ अर्जुन, हे भीमसेन, आज दुःखानें दिवस काढीत आहे २५. सोन्याचीं कुंडलें आणि इतर अलंकार ह्यांनीं भूषित व हातांमध्यें शंखांचे चुडे भरलेला तो अर्जुन येतांना पाहिला ह्मणजे माझ्या मनाला फारच खेद होतो २६. पृथ्वीमध्यें वीर्यानें ज्याची बरोबरी करणारा कोणीही धनुर्धर नाहीं तो हा अर्जुन आज मुलींमध्यें गाऊन दिवस काढीत आहे २७. धर्म, शौर्य आणि सत्य ह्यांविषयीं जगतांतील सर्व लोकांना मान्य असलेला पार्थ स्त्रीवेष धारण केलेला पाहून माझ्या मनाला वाईट वाटतें २८. हत्तिणींनीं घेरून टाकिलेल्या मदमत्त गजाप्रमाणें ह्या देवरूपी अर्जुनाला

पश्यामि तूर्यमध्यस्तं दिशो नश्यन्ति मे तदा ३० नूनमार्या न जानाति कृच्छ्रं प्राप्तं धनञ्जयम् । अजातशत्रुं कौरव्यं मग्नं दुर्धूतदेविनम् ३१ तथा दृष्ट्वा यवीयांसं सहदेवं गवां पतिम् । गोषु गोवेषमायान्तं पाण्डुभूतास्मि भारत ३२ सहदेवस्य वृत्तानि चिन्तयन्ती पुनः पुनः । न निद्रामभिगच्छामि भीमसेन कुतो रतिम् ३३ न विन्दामि महाबाहो सहदेवस्य दुष्कृतम् । यस्मिन्नेवं विधं दुःखं प्राप्नुयात्सत्यविक्रमः ३४ दूयामि भरतश्रेष्ठ दृष्ट्वा ते भ्रातरं प्रियम् । गोषु गोवृषसंकाशं मत्स्येनाभिनिवेशितम् ३५ संरब्धं रक्तनेपथ्यं गोपालानां पुरोगमम् । विराटमभिनन्दन्तमथ मे भवति ज्वरः ३६ सहदेवं हि मे वीरं नित्यमार्या प्रशंसति । महाभिजनसंपन्नः शीलवान्वृत्तवानिति ३७ ह्रीनिषेवो मधुरवाग्धार्मिकश्च प्रियश्च मे । स तेरण्येषु वोढव्यो याज्ञसेनि क्षपास्वपि ३८ सुकुमारश्च शूरश्च राजानं चाप्यनुव्रतः । ज्येष्ठापचायिनं वीरं

जेव्हां मुली वेढून टाकितात २९ आणि वाद्यें वाजत असतांना हा जेव्हां श्रीमान् मत्स्यराज विराटाची सेवा करूं लागतो तेव्हां तर मला भानच रहात नाहीं ३०. धनंजय अशा प्रकारें संकटांत सांपडलेला असून घातक द्यूत खेळणारा अजातशत्रु कुरुकुलोत्पन्न युधिष्ठिरही दुःखसागरामध्यें मग्न झाला आहे हें खरोखर साध्वी कुंतीला माहीत नाहीं ३१. हे भरतवंशज, त्याचप्रमाणें बैलाप्रमाणें ज्याची गति आहे असा गाईवरील अधिपति बनलेला आपला कनिष्ठ भ्राता सहदेव गाईमध्यें संचार करितांना पाहिला ह्मणजे माझें मुख निस्तेज होऊन जातें ३२. हे भीमसेन, वारंवार त्या सहदेवाचीं कर्मे माझ्या मनामध्यें येऊं लागतात आणि ह्यामुळें मला मुळींच झोंप येईनाशी झाली आहे. तेव्हां सुख कोठून असणार ? ३३. हे महापराक्रमी भीमसेन, अशा प्रकारचें दुःख त्या सत्यपराक्रमी सहदेवाला प्राप्त व्हावें असें त्याच्या हातून कोणतेंही दुष्कृत्य घडलेलें मला ठाऊक नाहीं ३४. हे भरतवंशजश्रेष्ठ, मोठ्या बैलाप्रमाणें दिसत असलेला आपला प्रिय भ्राता मत्स्यराजानें गाईवर नेमिलेला पाहून माझ्या मनाला दुःख होतें ३५. गोपालांचा अधिपति बनलेला हा सहदेव रक्तवर्ण वेष धारण करून विराटाचें चित्तरंजन करण्यांत गढून गेलेला अवलोकन करितांक्षणीं माझें सर्वांग संतप्त होतें ३६. साध्वी कुंती वीर सहदेवाची नेहमीं माझ्यापाशीं प्रशंसा करीत असे आणि "तो मोठ्या कुलामध्यें उत्पन्न झालेला व सुशील असून सदाचरणसंपन्न आहे ३७; संकोच धरणारा आहे; मधुर भाषण करणारा असून धार्मिक आहे आणि ह्मणूनच मला प्रिय आहे.

स्वयं पाञ्चालि भोजयेः ३९ इत्युवाच हि मां कुन्ती रुदती पुत्रगृद्धिनी। प्रव्रजन्तं महारण्यं तं परिष्वज्य तिष्ठती ४० तं दृष्ट्वा व्यापृतं गोषु वत्सचर्मक्षपाशयम्। सहदेवं युधां श्रेष्ठं किं नु जीवामि पाण्डव ४१ यस्त्रिभिर्नित्यसंपन्नो रूपेणास्त्रेण मेधया । सोऽश्वबन्धो विराटस्य पश्य कालस्य पर्ययम् ४२ अभ्यकीर्यन्त वृन्दानि दामग्रन्थिमुदीक्ष्य तम् । विनयन्तं जवेनाश्वान्महाराजस्य पश्यतः ४३ अपश्यमेनं श्रीमन्तं मत्स्यं भ्राजिष्णुमुत्तमम् । विराटमुपतिष्ठन्तं दर्शयन्तं च वाजिनः ४४ किं नु मां मन्यसे पार्थ सुखिनीति परन्तप । एवं दुःखशताविष्टा युधिष्ठिरनिमित्ततः ४५ अतः प्रतिविशिष्टानि दुःखान्यन्यानि भारत । वर्तन्ते मयि कौन्तेय वक्ष्यामि शृणु तान्यपि ४६ युष्मासु ध्रियमाणेषु दुःखानि विविधान्युत । शोषयन्ति शरीरं मे किं नु दुःखमतः परम् ४७ [६०५] इति श्रीमहाभारते

ह्यास्तव, हे द्रौपदि, अरण्यामध्यें आणि विशेषतः रात्रींचे समयीं तूं ह्याला जपत जा ३८. हा सुकुमार व शूर सहदेव धर्मराजाला अनुसरून वागणारा आहे. ह्यास्तव, हे पांचालि, ज्येष्ठ भ्रात्याचा संमान करणाऱ्या ह्या वीराला तूं स्वतः भोजन घालीत जा" ३९ ह्याप्रमाणें ती पुत्रवत्सल कुंती महावनांत निघालेल्या त्या सहदेवाला कवटाळून उभी राहिली असतां रडत रडत मला ह्मणालीही आहे ४०. तस्मात्, योद्ध्यांमध्यें श्रेष्ठ असा तो सहदेव गाईंमध्येंच गढून जाऊन रात्रीं वत्सांच्याच कातड्यावर पडलेला असतो हें पाहून, हे पांडव, मी जीव ठेवावा काय ? ४१. रूप, अस्त्रविद्या आणि धारणाशक्ति ह्या तिहींनीं जो नित्य संपन्न आहे तो नकुल आज विराटाचा मोतद्दार बनला हा काळाचा फेरा आपण अवलोकन करा४२. सांप्रत ग्रंथिक हें नांव धारण केलेल्या त्या नकुलाला अवलोकन करितांक्षणीं शत्रूंचे संघ रानोमाळ होत असत; परंतु, सांप्रत महाराज युधिष्ठिराच्या समक्ष हा मोठ्या उत्कंठेनें अश्वांना शिकवीत असलेला आणि त्याचप्रमाणें हा विजयशील, अनुपम व वैभवशाली नकुल मत्स्यराज विराटाच्या शुश्रूषेमध्यें तत्पर असून त्याला घोडे दाखवीत असलेला मीं अवलोकन केला आहे ४३,४४. तस्मात्, हे शत्रुतापन कुंतीपुत्र, मी सुखी आहें असें कां आपणांला वाटत आहे? युधिष्ठिरामुळें प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या शेंकडों दुःखांनीं मी आधींच गांजून गेलें आहे ४५; आणि, हे भरतवंशज, ह्या दुःखांहूनही मोठीं मोठीं दुःखें सांप्रत मला सोसावीं लागत आहेत. तींही, हे कुंतीनंदन, मी आपणांला कथन करितें; आपण श्रवण करा ४६. तुह्मीं जिवंत असतांना नानाप्रकारचीं दुःखें माझें शरीर शुष्क करून टाकीत आहेत ह्यापेक्षां अधिक शोचनीय गोष्ट ती कोणती ? ४७. ह्याप्रमाणें महर्षि-

शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि कीचकवधपर्वणि द्रौपदीभीमसंवादे एकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥

द्रौपद्युवाच ॥ अहं सैरन्ध्रिवेषेण चरन्ती राजवेश्मनि । शौचदास्मि सुदेष्णाया अक्षधूर्तस्य कारणात् १ विक्रियां पश्य मे तीव्रां राजपुत्र्याः परन्तप । आत्मकालमुदीक्षन्ति सर्वे दुःखं किलान्तवत् २ अनित्या किल मर्त्यानामर्थसिद्धिर्जयाजयौ । इति कृत्वा प्रतीक्षामि भर्तॄणामुदयं पुनः ३ चक्रवत्परिवर्तन्ते ह्यर्थाश्च व्यसनानि च । इतिकृत्वा प्रतीक्षामि भर्तॄणामुदयं पुनः ४ य एव हेतुर्भवति पुरुषस्य जयावहः । पराजये च हेतुश्च स इति प्रतिपालये ॥ किं मां न प्रतिजानीषे भीमसेन मृतामिव ५ दत्त्वा याचन्ति पुरुषा हत्वा वध्यन्ति चापरे । पातयित्वा च पात्यन्ते परैरिति च मे श्रुतम् ६ न दैवस्यातिभारोऽस्ति न चैवास्या-

---

व्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील कीचकवधपर्वांपैकीं द्रौपदी आणि भीमसेन ह्यांच्या संवादाविषयीं एकोणिसावा अध्याय समाप्त झाला ॥ १९ ॥

द्रौपदी ह्मणते:—अक्षद्यूत करणाऱ्या युधिष्ठिराकरितां सैरंध्रीचा वेष धारण करून मला राजगृहीं दिवस काढावे लागत आहेत आणि सुदेष्णेला पाय वगैरे धुण्याकरितां उदक वगैरे द्यावें लागत आहे १. हे शत्रुतापन, मी राजकन्या असतांना मला ही कशी भयंकर विपरीत अवस्था प्राप्त झाली आहे ती आपण अवलोकन करा. सर्वही लोक दुःख नश्वर आहे असें समजून आपल्या अभ्युदयकालाची वाट पहात असतात २. मर्त्यलोकांतील प्राण्यांचा मनोरथ सिद्धीस जाणें आणि त्यांचा जय अथवा पराजय होणें ह्या गोष्टी अक्षय्य राहणाऱ्या नाहींत. हाच विचार खरोखर मनामध्यें आणून मी भर्त्यांचा पुनरपि अभ्युदय होण्याची वाट पहात आहे ३. संपत्ति आणि विपत्ति ह्यांच्या चक्राप्रमाणें फेऱ्या होत असतात असें मनांत आणून मी पुनरपि भर्त्यांच्या अभ्युदयाची वाट पहात आहें ४. पुरुषाला जय प्राप्त होण्याला जें कारण होत असतें तेंच त्याचा पराजय होण्यालाही कारण होत असतें असा विचार करून मी कालाची प्रतीक्षा करीत आहें. हे भीमसेन, मी सांप्रत मृतवत् झालें आहें हें आपणांला समजत नाहीं काय ? ५. ज्यांनीं लोकांना दान दिलेलें असतें त्यांनाच लोकापाशीं याचना करण्याचा प्रसंग येतो ; जे दुसऱ्यांचा वध करितात त्यांचाही दुसऱ्यांच्या हातून वध होण्याची पाळी येते आणि जे दुसऱ्यांचा निःपात करितात त्यांचाही निःपात दुसऱ्यांच्या हातून होत असतो असें मीं ऐकिलें आहे ६. सारांश, दैवाला कोणतीही गोष्ट दुर्घट नाहीं आणि दैवाचें उल्लंघनही होणें

तिवर्तनम् । इति चाप्यागमं भूयो दैवस्य प्रतिपालये ७ स्थित्वं पूर्वं जलं यत्र पुनस्तत्रैव गच्छति । इतिपर्यायमिच्छन्ती प्रतीक्षे उदयं पुनः ८ दैवेन किल यस्यार्थः सुनीतोपि विपद्यते । दैवस्य चागमे यत्नस्तेन कार्यो विजानता ९ यत्तु मे वचनस्यास्य कथितस्य प्रयोजनम् । पृच्छ मां दुःखितां तत्त्वं पृष्टा चात्र ब्रवीमि ते १० महिषी पाण्डुपुत्राणां दुहिता द्रुपदस्य च । इमामवस्थां संप्राप्ता मदन्या का जिजीविषेत् ११ कुरून्परिभवेत्सर्वान्पञ्चालानपि भारत । पाण्डवेयांश्च संप्राप्तो मम क्लेशो ह्यरिन्दम १२ भ्रातृभिः श्वशुरैः पुत्रैर्बहुभिः परिवारिता । एवं समुदिता नारी का त्वन्या दुःखिता भवेत् १३ नूनं हि बालया धातुर्मया वै विप्रियं कृतम् । यस्य प्रसादाद्दुर्नीतं प्राप्तास्मि भरतर्षभ १४ वर्णावकाशमपि मे पश्य पाण्डव यादृशम् । तादृशो मे न तत्रासीद्दुःखे परमके तदा १५ त्वमेव भीम जानीषे यन्मे पार्थ सुखं

नाहीं. ह्यास्तव, पुनरपि दैवाचे चांगले दिवस येण्याची मी वाट पहात आहें ७. तात्पर्य, ज्या ठिकाणीं पूर्वी उदक असतें त्या ठिकाणीं पुनरपिही तें जातें. तेव्हां कालगतीनें जेथली वस्तु तेथें जावयाचीच अशी आशा धरून मी पुनरपि आपल्या अभ्युदयाची वाट पहात आहें ८. चांगल्या रीतीनें आरंभिलेलेंही ज्याचें काम खरोखर दैवामुळें हाणून पडतें त्यानें विचारपूर्वक दैवाचीच अनुकूलता संपादन करण्याचा यत्न करावा ९. हें जें मीं आतां आपणाशीं भाषण केलें आहे ह्याचें कारण दुःखानें गांजलेल्या मला आपण विचारा; म्हणजे विचारिल्यावर मी आपणांला येथल्या येथेंच तें कथन करितें १०. मी पांडवांची पट्टराणी असून द्रुपदराजाची कन्या असतांनाही जर मला अशी अवस्था प्राप्त झाली आहे तर ह्या अवस्थेमध्यें माझ्याशिवाय दुसरी कोणती बरें स्त्री जिवाची आशा धरून रहाणार आहे ? ११. हे शत्रुदमन भरतवंशज, मला प्राप्त झालेल्या ह्या दुःखामुळें सर्व कौरवांची, पंचालांची आणि पांडवांचीही नाचक्की झाली आहे १२. भ्राते, श्वशुर, पुत्र वगैरे असंख्य नातेवाईक असतांना आणि अशा प्रकारें भाग्याला चढलेली असतांना दुसरी कोणती बरें स्त्री माझ्याप्रमाणें दुःखी होईल ? १३. हे भरतवंशजश्रेष्ठ, ज्याच्या प्रसादामुळें सांप्रत मला ही शोचनीय अवस्था प्राप्त झालेली आहे त्या विधात्याचा खरोखर बालपणीं माझ्या हातून कांहीं तरी अपराध झालेला असावा १४. हे पांडुपुत्र, माझी कांति तरी पहा बरें किती कमी झाली आहे ती ! ह्या पारतंत्र्यस्थितीमध्यें जशी माझी कांति कमी झालेली आहे तशी वनवासांतील त्या पराकाष्ठेच्या दुःखांतही झाली नव्हती १५. हे भीमसेन, हे कुंतीपुत्र,

पुरा । साहं दासीत्वमापन्ना न शान्तिमवशा लभे १६ नादैविकमहं मन्ये यत्र पार्थो धनञ्जयः । भीमधन्वा महाबाहुरास्ते च्छन्न इवानलः १७ अशक्या वेदितुं पार्थ प्राणिनां वै गतिर्नरैः । विनिपातमिमं मन्ये युष्माकं ह्यविचिन्तितम् १८ यस्या मम मुखप्रेक्षा यूयमिन्द्रसमाः सदा । सा प्रेक्षे मुखमन्यासामवराणां वरा सती १९ पश्य पाण्डव मेवस्थां यथा नार्हामि वै तथा । युष्मासु ध्रियमाणेषु पश्य कालस्य पर्ययम् २० यस्याः सागरपर्यन्ता पृथिवी वशवर्तिनी । आसीत्साद्य सुदेष्णाया भीताहं वशवर्तिनी २१ यस्याः पुरःसरा आसन्पृष्ठतश्चानुगामिनः । साहमद्य सुदेष्णायाः पुरःपश्चाच्च गामिनी २२ इदं तु दुःखं कौन्तेय ममासह्यं निबोध तत् २३ या न जातु स्वयं पिंषे गात्रोद्वर्तनमात्मनः । अन्यत्र कुन्त्या भद्रं ते सा पिनष्म्यद्य चन्दनम् २४ पश्य कौन्तेय पाणी मे नैवाभूतां हि यौ पुरा । इत्यस्य दर्शयामास किणवन्तौ करावुभौ २५ बिभेमि कुन्त्या या नाहं युष्माकं

पूर्वी मला कसें सुख होतें हें आपणच जाणीत आहां. तस्मात्; सांप्रत निरुपाय होऊन दासीपण नशीबीं आलेल्या मला मुळींच चैन पडत नाहीं १६. अहो, भयंकर धनुष्य धारण करणारा महापराक्रमी कुंतीपुत्र अर्जुनही ज्याअर्थी भस्मानें आच्छादित होऊन रहाणाऱ्या अग्नीप्रमाणें दिवस काढीत आहे त्याअर्थी दैवाशिवाय ह्या अवस्थेचें दुसरें कांहीं कारण असेल असें मला वाटत नाहीं १७. हे कुंतीनंदन, दैवानें प्राण्यांची गति काय होईल हें मानवांना समजणें अशक्य आहे आणि ह्मणूनच तुह्मांला प्राप्त झालेली ही निकृष्ट स्थिति मी अतर्क्य समजत आहें १८. तुह्मी इंद्रतुल्य पांडव पूर्वी सर्वदा माझ्या तोंडाकडे पहात होता. परंतु, सांप्रत मी श्रेष्ठ असतांनाही दुसऱ्या निकृष्ट स्त्रियांच्या तोंडाकडे पहात बसण्याची मला पाळी आलेली आहे १९. हे पांडव, आपण ह्या माझ्या स्थितीचा विचार करा. आपण ह्या कालाच्या फेऱ्याकडे लक्ष्य द्या. तुह्मी जिवंत असतांना मला ही अवस्था प्राप्त होणें योग्य नाहीं २०. अहो, समुद्रवलयांकित पृथ्वी जिच्या आज्ञेंत होती तीच मी द्रौपदी आज सुदेष्णेच्या मर्जीप्रमाणें वागून भीतीनें दिवस काढीत आहें २१. जिच्या पुढें व मागें सेवक चालत असत ती मी दासी बनून आज सुदेष्णेच्या पुढें व मागें चालत आहें २२. परंतु, हे कुंतीपुत्र, हें जें मला असह्य दुःख होत आहे तें आपण श्रवण करा २३. आपलें देव बरें करो, एका कुंतीची गोष्ट खेरीज करून स्वतःच्याही अंगाला उटी लावण्याकरितां मीं कधीं पूर्वी गंध उगाळिलेलें नाहीं. परंतु, तीच मी आज (सुदेष्णेला) गंध उगाळून देत आहें २४. हे कुंतीनंदन, आपण हे माझे हात तरी पहा; असे माझे हात पूर्वी कधीं झाले नव्हते"

वा कदाचन । साद्याग्रतो विराटस्य भीता तिष्ठामि किङ्करी २६ किं नु वक्ष्यति सम्राण्मां वर्णकः सुकृतो न वा ॥ नान्यपिष्टं हि मत्स्यस्य चन्दनं किल रोचते २७ वैशम्पायन उवाच ॥ सा कीर्तयन्ती दुःखानि भीमसेनस्य भामिनी । रुरोद शनकैः कृष्णा भीमसेनमुदीक्षती २८ सा बाष्पकलया वाचा निःश्वसन्ती पुनःपुनः । हृदयं भीमसेनस्य घट्टयन्तीदमब्रवीत् २९ नाल्पं कृतं मया भीम देवानां किल्बिषं पुरा । अभाग्या यत्र जीवामि कर्तव्ये सति पाण्डव ३० वैशम्पायन उवाच ॥ ततस्तस्याः करौ सूक्ष्मौ किणबद्धौ वृकोदरः । मुखमानीय वै पत्न्या रुरोद परवीरहा ३१ तौ गृहीत्वा च कौन्तेयो बाष्पमुत्सृज्य वीर्यवान् । ततः परमदुःखार्त इदं वचनमब्रवीत् ३२ [६३७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि कीचकवधपर्वणि द्रौपदीभीमसंवादे विंशोऽध्यायः ॥ २० ॥

असें ह्मणत ह्मणत द्रौपदीनें आपले घट्टे पडलेले दोन्ही हात भीमसेनाला दाखविले २५. (आणि पुनरपि ती त्याला ह्मणाली) मी कुंतीची अथवा तुमचीही कधींसुद्धां भीति बाळगिली नाहीं; परंतु, तीच मी आज दासी बनून " हा सार्वभौम राजा आज मला काय बरें ह्मणेल ? हें गंध चांगलें झालें आहे किंवा नाहीं ? दुसऱ्यानें उगाळिलेलें गंध मत्स्यराज विराटाला खरोखर आवडत नाहीं " असा विचार मनांत येत असल्यामुळें विराटाच्या पुढें भीत भीत उभी रहात आहें २६,२७. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें ती सुंदरी द्रौपदी आपलीं दुःखें भीमसेनाला निवेदन करीत असतांना भीमसेनाच्या मुखाकडे पाहून मुळूं मुळूं रडूं लागली २८. इतकेंच नव्हे परंतु, वारंवार दुःखाचे सुस्कारे टाकीत असलेली ती द्रौपदी अश्रूंनीं कंठ दाटून आल्यामुळें वारंवार अस्पष्ट वाणीनें भीमसेनाचें अंतःकरण विह्वल करीत करीत ह्मणाली २९. " हे पांडुनंदन भीमसेन, अशा प्रसंगीं मरणेंच योग्य असतांना ज्याअर्थीं मी भाग्यहीन स्त्री जिवंत राहिलें आहें त्याअर्थीं पूर्वी देवांचा मी कांहीं लहानसहान अपराध केलेला नाहीं " ३०. वैशंपायन सांगतातः—द्रौपदीनें असें भाषण केल्यानंतर स्वाभाविक मृदु परंतु, कामानें घट्टे पडलेले ते आपल्या पत्नीचे हात मुखाजवळ आणून तो शत्रुपक्षीयवीरघातक भीमसेन रडूं लागला ३१. सारांश, ते हात आपल्या मुखाशीं धरून आणि अश्रु ढाळून तो वीर्यवान् कुंतीपुत्र भीमसेन अत्यंत दुःखाकुल होऊन तिच्याशीं भाषण करूं लागला ३२. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील कीचकवधपर्वापैकीं द्रौपदी व भीमसेन ह्यांच्या संवादाविषयीं विसावा अध्याय समाप्त झाला ॥ २० ॥

भीमसेन उवाच ॥ धिगस्तु मे बाहुबलं गाण्डीवं फाल्गुनस्य च। यत्त रक्तौ पुरा भूत्वा पाणी कृतकिणाविभौ १ सभायां तु विराटस्य करोमि कदनं महत्। तत्र मे कारणं भाति कौन्तेयो यत्प्रतीक्षते २ अथवा कीचकस्याहं पोथयामि पदा शिरः। ऐश्वर्यमदमत्तस्य क्रीडन्निव महाद्विपः ३ अपश्यं त्वां यदा कृष्णे कीचकेन पदा हताम्। तदैवाहं चिकीर्षामि मत्स्यानां कदनं महत् ४ तत्र मां धर्मराजस्तु कटाक्षेण न्यवारयत्। तदहं तस्य विज्ञाय स्थित एवास्मि भामिनि ५ यच्च राष्ट्रात्प्रच्यवनं कुरूणामवधश्च यः। सुयोधनस्य कर्णस्य शकुनेः सौबलस्य च ६ दुःशासनस्य पापस्य यन्मया नाहृतं शिरः। तन्मे दहति गात्राणि हृदि शल्यमिवार्पितम् ॥ मा धर्मं जहि सुश्रोणि क्रोधं जहि महामते ७ इमं तु समुपालम्भं त्वत्तो राजा युधिष्ठिरः। शृणुयाद्यापि कल्याणि कृत्स्नं जह्यात्स जीवितम् ८ धनञ्जयो वा सुश्रोणि यमौ वा तनुमध्यमे। लोकान्तरगतेष्वेषु नाहं शक्ष्यामि

भीमसेन ह्मणतोः—पूर्वी आरक्तवर्ण असलेल्या ह्या तुझ्या कोमल हातांना सांप्रत कामानें घट्टे पडले आहेत. तस्मात्, ह्या माझ्या बाहुबलाला आणि त्याचप्रमाणें अर्जुनाच्या गांडीवधनुष्याला धिक्कार असो १. विराटाच्या सभेमध्येंच मीं भयंकर कत्तल उडवून दिली असती; परंतु, कुंतीपुत्र युधिष्ठिर आपलें कर्तव्य नेहमीं लांबणीवर टाकीत आहे हें त्या ठिकाणीं कत्तल न उडण्याचें कारण मला दिसत आहे २. नाहीं तर महागजाप्रमाणें सहज क्रीडा करितां करितांच मीं ह्या ऐश्वर्यमदानें मत्त झालेल्या कीचकाचें मस्तक पायानें चुरडून टाकिलें असतें ३. हे कृष्णे, कीचकानें तुला लत्ताप्रहार केलेला जेव्हां मीं पाहिला तेव्हांच ह्या मत्स्यदेशांतील लोकांची भयंकर कत्तल उडविण्याचा मीं विचार केला होता ४; परंतु, त्या प्रसंगीं धर्मराजानें नेत्रकटाक्षानें माझें निवारण केलें आणि, हे सुंदरि, त्यानें सुचविलेलें तें ऐकून मी निरुपायानें स्वस्थच राहिलों ५. आह्मीं राज्याचा त्याग केल्यामुळें सुयोधन, कर्ण व सुबलपुत्र शकुनि ह्या कौरवांचा त्याचवेळीं वध न केल्यामुळें ६ आणि पापी दुःशासनाचा त्याचवेळीं माझ्या हातून शिरश्छेद न झाल्यामुळें माझ्या हृदयाला जसें कांहीं शल्य खिळून राहिलेलें आहे आणि त्यामुळें माझ्या अंगाचा भडका झालेला आहे. परंतु, हे महाविचारी सुंदरि, धर्माला न सोडितां आपला क्रोध आंवरून धर ७. राजा युधिष्ठिरानें जर हें निंदाव्यंजक भाषण तुझ्या मुखांतून श्रवण केलें तर, हे कल्याणि, तो निःसंशय जीविताचाही त्याग करील ८; आणि, हे कृशोदरि सुंदरि, असें भाषण अर्जुनाच्या किंवा त्या नकुलसहदेवांच्याही जर कानावर पडलें तर त्यांचीही तीच

जीवितुम् ९ पुरा सुकन्या भार्या च भार्गवं च्यवनं वने । वल्मीकभूतं शाम्यन्तमन्वपद्यत भामिनी १० नारायणी चेन्द्रसेना रूपेण यदि ते श्रुता । पतिमन्वचरद्वृद्धं पुरा वर्षसहस्रिणम् ११ दुहिता जनकस्यापि वैदेही यदि ते श्रुता । पतिमन्वचरत्सीता महारण्यनिवासिनम् १२ रक्षसा निग्रहं प्राप्य रामस्य महिषी प्रिया । क्लिश्यमानापि सुश्रोणि राममेवान्वपद्यत १३ लोपामुद्रा तथा भीरु वयोरूपसमन्विता । अगस्तिमन्वयाद्धित्वा कामान्सर्वानमानुषान् १४ द्युमत्सेनसुतं वीरं सत्यवन्तमनिन्दिता । सावित्र्यनुचचारैका यमलोकं मनस्विनी १५ यथैताः कीर्तिता नार्यो रूपवत्यः पतिव्रताः । तथा त्वमपि कल्याणि सर्वैः समुदिता गुणैः १६ मादीर्घं क्षम कालं त्वं मासमर्धं च संमितम् । पूर्णे त्रयोदशे वर्षे राज्ञां राज्ञी भविष्यसि १७ द्रौपद्युवाच ॥ आर्तयैतन्मया भीम कृतं बाष्पप्रमोचनम् । अपार-

---

अवस्था होईल आणि ते परलोकीं गेले असतां मीही जिवंत रहाणें शक्य नाहीं ९. सुकन्यानामक सुंदरी भार्या शमाचें अवलंबन करून वारुळ बनलेल्या च्यवनभार्गव मुनींसहवर्तमान वनामध्यें राहिलेली आहे १०. रूपामुळें कदाचित् कधीं तुझ्या कानावर आलेली इंद्रसेना नारायणी पूर्वी हजारवर्षांच्या वृद्ध पतीची शुश्रूषा करून राहिलेली आहे ११. कधीं तुझ्या कानावर आली असेल तर जनकराजाची कन्या वैदेही सीताही महावनामध्यें वास्तव्य करणाऱ्या पतीबरोबर राहिलेली आहे १२. हे सुंदरि, रामाची प्रिय पट्टराणी जी सीता तिला राक्षसानें हरण करून नेल्यामुळें जरी क्लेश भोगावे लागत होते तरी त्यावेळींही ती रामालाच अनुसरून वागत होती १३. हे विनयशील द्रौपदि, तरुणवय आणि सौंदर्य ह्यांनीं युक्त असलेली राजकन्या लोपामुद्रा सर्व दिव्य भोग्य वस्तूंचा त्याग करून अगस्तिमुनींबरोबर चालती झाली १४ आणि त्याचप्रमाणें जिला यत्किंचितही नांव ठेवण्यास जागा नाहीं अशी विचारी सावित्रीही द्युमत्सेनपुत्र वीर सत्यवानाच्या मागोमाग एकटीच यमलोकींही चालती झाली १५. असो. ज्याप्रमाणें सर्वगुणसंपन्न असलेल्या ह्या रूपवती स्त्रिया पतिसेवा हेंच व्रत धरून चाललेल्या तुला मीं कथन केल्या त्याचप्रमाणें, हे कल्याणि, तूंही सर्व गुणसंपन्न असल्यामुळें त्यांच्याप्रमाणेंच पतिव्रताधर्मानें वाग १६. तुला आतां फार दिवस कंठण्याचें कारण नाहीं. काय तो दीड महिना आतां अवशिष्ट राहिलेला आहे. हा दीड महिना संपून एकदां तेरावें वर्ष पुरें झालें ह्मणजे सर्व राजांची तूं सार्वभौमिनी होशील १७. द्रौपदी ह्मणते:—हे भीमसेन, दुःख असह्य होऊन अगदीं व्याकुल झाल्यामुळें आपणापाशीं येऊन मीं अश्रु

यन्त्या दुःखानि न राजानमुपालभे १८ किमुक्तेन व्यतीतेन भीमसेन महाबल । प्रत्युपस्थितकालस्य कार्यस्यानन्तरो भव १९ ममेह भीम कैकेयी रूपाभिभवशङ्कया । नित्यमुद्विजते राजा कथं नेयादिमामिति २० तस्या विदित्वा तं भावं स्वयं चानृतदर्शनः । कीचकोयं सुदुष्टात्मा सदा प्रार्थयते हि माम् २१ तमहं कुपिता भीम पुनः कोपं नियम्य च । अब्रुवं कामसंमूढमात्मानं रक्ष कीचक २२ गन्धर्वाणामहं भार्या पञ्चानां महिषी प्रिया । ते त्वां निहन्युः कुपिताः शूराः साहसकारिणः २३ एवमुक्तः सुदुष्टात्मा कीचकः प्रत्युवाच ह । नाहं बिभेमि सैरन्ध्रि गन्धर्वाणां शुचिस्मिते २४ शतं शतसहस्राणि गन्धर्वाणामहं रणे । समागतं हनिष्यामि त्वं भीरु कुरु मे क्षणम् २५ इत्युक्ते चाब्रुवं मत्तं कामातुरमहं पुनः । न त्वं प्रतिबलश्चैषां गन्धर्वाणां यशस्विनाम् २६ धर्मे स्थितास्मि सततं कुलशीलसमन्विता । नेच्छामि कंचिद्वध्यन्तं तेन जीवसि

ढाळिले; वास्तविक मी राजाला दोष देत नाहीं १८. परंतु, हे महाबलाढ्य भीमसेन, जी गोष्ट होऊन गेली तिचा पुन्हां उच्चार करण्यांत काय अर्थ आहे ? आतां ह्यावेळेला जें कांहीं करणें योग्य असेल तें आपण करा १९. हे भीमसेन, ही केकयराजकन्या सुदेष्णा " ही द्रौपदी रूपानें माझ्यापेक्षां वरचढ आहे " अशी शंका नेहमीं बाळगीत असते आणि " कोणता उपाय योजिला असतां राजाचें मन हिच्यावर जाणार नाहीं " अशा प्रकारची ती नेहमीं काळजी करीत असते २०. तिच्या मनाची ती स्थिति जाणून स्वभावतःच नीच कर्माविषयीं प्रवृत्त असलेला हा अत्यंत दुरात्मा कीचक नेहमींच माझ्यावर डोळा ठेवीत आहे २१. हे भीमसेन, त्याच्या असभ्य वर्तनामुळें एकदां मी अतिशय क्रुद्ध झालें होतें; तथापि, कोप आवरून धरून विषयवासनेनें कांहीं एक सुचेनासें झालेल्या त्या कीचकाला मी ह्मणालें " हे कीचका, संभाळ २२; पांच गंधर्वांची मी प्रिय व मुख्य भार्या आहें. ते साहसी व शूर गंधर्व क्रुद्ध झाले असतां तुझा वध करितील " २३. ह्याप्रमाणें मीं त्याला सांगितलें असतांही तो अत्यंत दुष्ट कीचक मला उलटून ह्मणाला " हे सुहास्यवदने सैरंध्रि, मी गंधर्वांना भीत नाहीं २४. हे भित्र्ये, तूं आपली बऱ्या विचारानें माझें ह्मणणें मान्य कर. गंधर्व कोट्यावधि जरी संग्रामामध्यें आले तरी मी त्यांचा वध करीन " २५. ह्याप्रमाणें त्यानें उत्तर केल्यावर मी त्या कामातुर झालेल्या मत्त कीचकाला पुनरपि ह्मणालें " तूं ह्या यशस्वी गंधर्वांची बलामध्यें बरोबरी करणारा नाहींस २६. मी नेहमीं धर्मानें वागणारी असून कुलशीलसंपन्न असल्यामुळें कोणाचा वध होण्याची इच्छा धरीत नाहीं; ह्मणून, हे

कीचक २७ एवमुक्तः स दुष्टात्मा प्राहसत्स्वनवत्तदा। अथ मां तत्र कैकेयी प्रेषयत्प्रणयेन तु २८ तेनैव देशिता पूर्वं भ्रातृप्रियचिकीर्षया। सुरामानय कल्याणि कीचकस्य निवेशनात् २९ सूतपुत्रस्तु मां दृष्ट्वा महत्सान्त्वमवर्तयत्। सान्त्वे प्रतिहते क्रुद्धः परामर्शमनाभवत् ३० विदित्वा तस्य संकल्पं कीचकस्य दुरात्मनः। तथाहं राजशरणं जवेनैव प्रधाविता ३१ संदर्शने तु मां राज्ञः सूतपुत्रः परामृशत्। पातयित्वा तु दुष्टात्मा पदाहं तेन ताडिता ३२ प्रेक्षते स्म विराटस्तु कङ्कस्तु बहवो जनाः। रथिनः पीठमर्दाश्च हस्त्यारोहाश्च नैगमाः ३३ उपलब्धो मया राजा कङ्कश्चापि पुनःपुनः। ततो न वारितो राज्ञा न तस्याविनयः कृतः ३४ योयं राज्ञो विराटस्य कीचको नाम सारथिः। त्यक्तधर्मा नृशंसश्च नरस्त्रीसंमतः प्रियः ३५ शूरोभिमानी पापात्मा सर्वार्थेषु च मुग्धवान्। दारामर्शी महाभाग लभतेर्थान्बहूनपि ३६ आहरेदपि वित्तानि परेषां क्रोशतामपि। न तिष्ठते स्म सन्मार्गे न च धर्मं

कीचका, तूं जिवंत राहिला आहेस " २७. ह्याप्रमाणें मीं त्याला बजाविलें असतांही तो दुरात्मा मोठ्यानें हंसला. नंतर भ्रात्याचे ठिकाणीं प्रेम असल्यामुळें केकयराजकन्या सुदेष्णेनें, त्यानेंच पूर्वीं सांगितलें असल्यावरून त्याचें प्रिय करण्याकरितां, मला तिकडे पाठवून दिलें आणि पाठवितांना ह्मणाली " हे कल्याणि, कीचकाच्या घरून सुरा घेऊन ये " २८, २९. तदनंतर मला अवलोकन करितांक्षणीं कीचकानें माझें मन वळविण्याचा पुष्कळच यत्न केला आणि तो यत्न व्यर्थ झाल्यावर क्रुद्ध होऊन त्यानें माझ्यावर बलात्कार करण्याचें मनामध्यें आणिलें ३०. परंतु, त्या दुरात्म्या कीचकाचा तो आशय जाणून मी तशीच वेगानें राजवाड्याकडे धांवत आलें ३१. तथापि, राजाचे समक्ष सूतपुत्र दुरात्म्या कीचकानें माझ्यावर हात टाकिला आणि खालीं पाडून त्यानें मला लत्ताप्रहारही केला ३२. त्यावेळीं विराट, कंक आणि रथी, राजवल्लभ, गजावर आरोहण करणारे, व्यापारी वगैरे पुष्कळ लोकही पहात होते ३३. इतकेंच नव्हे परंतु, मी वारंवार त्यावेळीं विराटराजाची व कंकाचीही निर्भर्त्सना केली. तथापि, त्या कीचकाला कोणी आवरून धरिलें नाहीं आणि त्याचा असभ्यपणाही कोणीं बंद केला नाहीं ३४. सारांश, हा विराटराजाचा जो कीचकनामक सारथि आहे त्याला धर्माची मुळींच पर्वा नसून तो दुष्ट आहे. परंतु, येथील स्त्रीपुरुषांना तो संमत व प्रिय आहे ३५. त्या शूर व अभिमानी दुष्ट कीचकाला कसलेंच काम करण्याची अक्कल नाहीं इतकेंच नव्हे परंतु, तो परस्त्रीवरही डोळा ठेवणारा आहे. ३६ तथापि, हे महाराज, त्याला पुष्कळ संपत्ति

बुभूषति ३७ पापात्मा पापभावश्च कामबाणवशानुगः । अविनीतश्च दुष्टात्मा प्रत्याख्यातः पुनः पुनः ३८ दर्शने दर्शने हन्याद्यदि जह्यां च जीवितम् । तद्धर्मे यतमानानां महान्धर्मो न शिष्यति ३९ समयं रक्षमाणानां भार्या वो न भविष्यति । भार्यायां रक्ष्यमाणायां प्रजा भवति रक्षिता ४० प्रजायां रक्ष्यमाणायामात्मा भवति रक्षितः । आत्मा हि जायते तस्यां तेन जायां विदुर्बुधाः ४१ भर्ता तु भार्यया रक्ष्यः कथं जायान्ममोदरे । वदतां वर्णधर्मश्च ब्राह्मणानामिति श्रुतः ४२ क्षत्रियस्य सदा धर्मो नान्यः शत्रुनिबर्हणात् । पश्यतो धर्मराजस्य कीचको मां पदावधीत् ४३ तव चैव समक्षे वै भीमसेन महाबल । त्वया ह्यहं परित्राता तस्माद्घोराज्जटासुरात् ४४ जयद्रथं तथैव त्वमजैषीर्भ्रातृभिः सह । जहीममपि पापिष्ठं योयं मामवमन्यते ४५ कीचको राजवाल्लभ्याच्छोककृन्मम भारत । तमेवं कामसंमत्तं भिन्धि

मिळत आहे. आक्रोश करीत असलेल्या दुसऱ्यांच्याही द्रव्याचा अपहार करण्यास तो मागें पुढें पहात नाहीं; सन्मार्गानें वागत नाहीं व धर्माचीही पर्वा करीत नाहीं ३७. पापरूप व पापबुद्धि धारण करणाऱ्या ह्या उन्मत्त व दुष्ट कीचकाचा वारंवार अव्हेर केला असतांही ह्याला मदनाच्या बाणांनीं घेरून टाकिलें असल्यामुळें ३८ जेव्हां जेव्हां मी ह्याच्या दृष्टीं पडेन तेव्हां तेव्हां मला जर तो असेंच ताडन करूं लागला तर मी प्राणत्याग करीन. परंतु, असें झालें असतां धर्मानें वागण्याचा यत्न करणाऱ्या तुमचा मात्र उत्कृष्ट क्षात्रधर्म व्यर्थ होईल ३९. तात्पर्य, प्रतिज्ञेचें परिपालन करणाऱ्या तुमची भार्या रहाणार नाहीं. भार्येचें रक्षण केलें असतां प्रजेचें रक्षण होतें ४० आणि प्रजेचें रक्षण केलें असतां स्वतःचें रक्षण होतें. कारण, भार्येचे ठिकाणीं आपला आत्माच जन्मास येत असतो ह्मणून ज्ञानी पुरुष तिला जाया असें ह्मणतात ४१. (ज्याप्रमाणें भर्त्यानें भार्येचें रक्षण करणें अवश्य आहे) त्याप्रमाणें " हा माझ्या उदरीं कसा येईल " असा विचार मनांत धरून भार्येनेंही भर्त्याचें रक्षण केलें पाहिजे असा वर्णधर्म ब्राह्मणांच्या तोंडांतून मीं ऐकिला आहे ४२. शत्रुनाशावांचून क्षत्रियाचा दुसरा धर्म केव्हांही नाहीं. परंतु, धर्मराज पहात असतांना आणि, हे महाबलाढ्य भीमसेन, आपल्याही डोळ्यादेखत कीचकानें मला लत्ताप्रहार केला. घोर जटासुरापासून आपण माझें रक्षण केलें आहे ४३,४४ आणि भ्रात्यांसहवर्तमान आपणच (माझें रक्षण करण्याकरितां) जयद्रथाला जिंकिलें आहे. ह्यास्तव, माझा अवमान करणाऱ्या ह्या अत्यंत पापी कीचकाचाही आपण वध करा ४५. राजाची मर्जी असल्यामुळें,

कुम्भमिवाश्मनि ४६ यो निमित्तमनर्थानां बहूनां मम भारत । तं चेज्जी-
वन्तमादित्यः प्रातरभ्युदयिष्यति ४७ विषमालोड्य पास्यामि मा कीच-
कवशं गमम् । श्रेयो हि मरणं मह्यं भीमसेन तवाग्रतः ४८ वैशम्पायन
उवाच ॥ इत्युक्त्वा प्रारुदत्कृष्णा भीमस्योरःसमाश्रिता । भीमश्च त
परिष्वज्य महत्सान्त्वं प्रयुज्य च ४९ आश्वासयित्वा बहुशो भृशमार्तां
सुमध्यमाम् । हेतुतत्त्वार्थसंयुक्तैर्वचोभिर्द्रुपदात्मजाम् ५० प्रमृज्य वदनं
तस्याः पाणिनाश्रुसमाकुलम् । कीचकं मनसागच्छत्सृक्किणी परिसंलि-
हन् ५१ उवाच चैनां दुःखार्तां भीमः क्रोधसमन्वितः५२ [६८९] इति
श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि कीचक-
वधपर्वणि द्रौपदीसान्त्वन एकविंशोध्यायः ॥ २१ ॥

भीमसेन उवाच ॥ तथा भद्रे करिष्यामि यथा त्वं भीरु भाषसे ।
अद्य तं सूदयिष्यामि कीचकं सहबान्धवम् १ अस्याः प्रदोषे शर्वर्याः
कुरुष्वानेन संगतम् । दुःखं शोकं च निर्धूय याज्ञसेनि शुचिस्मिते २

हे भरतवंशज, कीचक मला दुःख देत आहे. तस्मात्, अशा प्रकारें मदनानें मत्त झालेल्या ह्या कीचकाचे घटाप्रमाणें पाषाणावर आपटून आपण तुकडे तुकडे करून टाका ४६. हे भरतकुलोत्पन्न, माझ्यावर असंख्य अनर्थ गुदरण्याचें कारण जो कीचक तो जिवंत असतांना जर सकाळीं सूर्योदय होईल तर ४७ कशांत तरी मी विष कालवून घेईन; परंतु, कीचकाच्या हातीं लागणार नाहीं. हे भीमसेन, (कीचकाच्या हातीं लागण्यापेक्षां) आपल्या समोर मरण येणें मला अधिक श्रेयस्कर आहे ४८. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें बोलून व भीमाच्या वक्षस्थलाला मिठी मारून द्रौपदी रडूं लागली असतां भीमसेनानेंही तिला कवटाळून धरून तिची पुष्कळ समजूत केली ४९ आणि अत्यंत दुःखाकुल झालेल्या त्या सुंदरी द्रुपदकन्येला खऱ्या खऱ्या अर्थानें युक्त अशा सहेतुक भाषणांनीं अनेक वेळा त्यानें धीरही दिला ५०. नंतर अश्रूंनीं भरलेलें तिचें मुख त्यानें आपल्या हातानें पुसलें आणि कीचकाची आठवण करून जिभल्या चाटीत चाटीत ५१ तो क्रुद्ध भीमसेन दुःखाकुल झालेल्या त्या द्रौपदीशीं बोलूं लागला ५२. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीतलक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील कीचकवधपर्वापैकीं द्रौपदीच्या सांत्वनाविषयीं एकविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २१ ॥

भीमसेन ह्मणतोः— हे विनयशील कल्याणि, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें मी करीन. आजच्यां आजच त्या कीचकाला बांधवांसहवर्तमान मी वध करीन १. हे सुहास्यवद

यैषा नर्तनशालेह मत्स्यराजेन कारिता । दिवात्र कन्या नृत्यन्ति रात्रौ यान्ति यथा गृहम् ३ तत्रास्ति शयनं दिव्यं दृढाङ्गं सुप्रतिष्ठितम् । तत्रास्य दर्शयिष्यामि पूर्वप्रेतान्पितामहान् ४ यथा च त्वां न पश्येयुः कुर्वाणां तेन संविदम् । कुर्यास्तथा त्वं कल्याणि यथा संनिहितो भवेत् ५ वैशम्पायन उवाच ॥ तथा तौ कथयित्वा तु बाष्पमुत्सृज्य दुःखितौ । रात्रिशेषं तमत्युग्रं धारयामासतुर्हृदि ६ तस्यां रात्र्यां व्यतीतायां प्रातरुत्थाय कीचकः । गत्वा राजकुलायैव द्रौपदीमिदमब्रवीत् ७ सभायां पश्यतो राज्ञः पातयित्वा पदाहनम् । न चैवालभसे त्राणमभिपन्ना बलीयसा ८ प्रवादेनेह मत्स्यानां राजा नाम्नायमुच्यते । अहमेव हि मत्स्यानां राजा वै वाहिनीपतिः ९ मां सुखं प्रतिपद्यस्व दासो भीरु भवामि ते । अह्नाय तव सुश्रोणि शतं निष्कान्ददाम्यहम् १० दासीशतं च ते दद्यां दासानामपि चापरम् । रथं चाश्वतरीयुक्तमस्तु नौ भीरु संगमः ११ द्रौपद्युवाच ॥

याज्ञसेनि, दुःख व शोक बाजूला ठेवून आज रात्रीं अवशींच तूं त्याची भेट घे २. मत्स्यराजानें येथें जी ही नृत्यशाला तयार करविली आहे त्या नृत्यशालेंत दिवसा मुली नृत्य करीत असतात आणि रात्रीं घरोघर जात असतात ३. तेथेंच पक्का बसविलेला व बळकट असा एक दिव्य पलंग आहे; त्या पलंगावर मी ह्याला पूर्वीं परलोकीं गेलेले ह्याचे पूर्वज दाखवीन ४; ह्मणजे त्याच्या पूर्वजांना पुनरपि हा तुझ्याशीं भाषण करीत असतांना पहाण्याची पाळी येणार नाहीं. ह्यास्तव, हे कल्याणि, तो तुझी गांठ घेण्याकरितां जवळ येईल अशी तूं व्यवस्था कर ५. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें दुःखित झालेल्या त्या उभयतांनीं एकमेकांशीं भाषण करून अश्रु ढाळिल्यानंतर अवशिष्ट राहिलेली रात्र त्यांच्या मनाला अतिच जड गेली ६. ती रात्र निघून गेल्यानंतर कीचक सकाळीं उठला आणि राजगृहीं जाऊन द्रौपदीला ह्मणाला ७ " सभेमध्यें राजासमक्ष मीं तुला लत्ताप्रहार केला असतां तुला कोणीही रक्षणकर्ता मिळाला नाहीं. कारण, बलवान् पुरुषाशीं तुझी गांठ पडली होती ८. ह्या ठिकाणीं असलेला हा विराटराजा केवल लोकप्रवादामुळें नांवाचा राजा आहे; वास्तविक मी सेनापतिच मत्स्यदेशांतील लोकांचा (खरा) राजा आहें ९. ह्यास्तव, हे भित्रे, तूं खुशाल माझा अंगीकार कर; मी तुझा दास होऊन राहीन आणि, हे सुंदरि, लगेचच्या लगेच मी तुला शंभर मोहरा देईन १०. इतकेंच नव्हे परंतु, हे विनयशील सैरंध्रि, शंभर दासी व शंभर दासही मी तुला देईन आणि खेचरी जोडिलेला रथही मी तुला अर्पण करीन. ह्यास्तव, आपला उभयतांचा समागम होऊं दे ११. द्रौपदी ह्मणतेः—हे कीचका,

एवं मे समयं त्वद्य प्रतिपद्यस्व कीचक । न त्वां सखा वा भ्राता वा जानीयात्संगतं मया १२ अनुप्रवादाद्भीतास्मि गन्धर्वाणां यशस्विनाम् । एवं मे प्रतिजानीहि ततोहं वशगा तव १३ कीचक उवाच ॥ एवमेतत्करिष्यामि यथा सुश्रोणि भाषसे । एको भद्रे गमिष्यामि शून्यमावसथं तव १४ समागमार्थं रम्भोरु त्वया मदनमोहितः । यथा त्वां नैव पश्येयुर्गन्धर्वाः सूर्यवर्चसः १५ द्रौपद्युवाच ॥ यदेतन्नर्तनागारं मत्स्यराजेन कारितम् । दिवात्र कन्या नृत्यन्ति रात्रौ यान्ति यथागृहम् १६ तमिस्रे तत्र गच्छेथा गन्धर्वास्तन्न जानते।तत्र दोषः परिहृतो भविष्यति न संशयः १७ वैशम्पायन उवाच॥तमर्थमपि जल्पन्त्याः कृष्णायाः कीचकेन ह। दिवसार्धं समभवन्मासेनैव समं नृप १८ कीचकोथ गृहं गत्वा भृशं हर्षपरिप्लुतः। सैरन्ध्रीरूपिणं मूढो मृत्युं तन्नावबुद्धवान् १९ गन्धाभरणमाल्येषु व्यासक्तः स विशेषतः । अलंचक्रे तदात्मानं सत्वरः काममोहितः २० तस्य तत्कुर्वतः कर्म कालो दीर्घ इवाभवत् । अनुचिन्तयतश्चापि तामेवायतलोचनाम् २१

माझी ही अट आज तूं कबूल कर. माझ्याशीं तुझा समागम झाल्याची गोष्ट तुझ्या मित्राला अथवा भ्रात्यालाही समजतां उपयोगीं नाहीं १२. कारण, यशस्वी गंधर्वांच्या कानांवर ही गोष्ट जाईल ह्मणून मी भीत आहें. ह्यास्तव, ह्याप्रमाणें तूं मला वचन दे; ह्मणजे मी तुला वश होईन १३. कीचक ह्मणतोः—हे सुंदरि, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें मी असेंच करीन. हे कल्याणि, तुझ्यावांचून दुसरें कोणीही तेथें नसतांना तुझ्या घरामध्यें काममोहित झालेला मी तुझ्याशीं समागम करण्याकरितां एकटाच येईन ह्मणजे, हे रंभोरु, ते सूर्यासारिखे तेजस्वी गंधर्व तुला मुळींच पाहणार नाहींत १४, १५. द्रौपदी ह्मणतेः—ही जी नृत्यशाला मत्स्यराज विराटानें नवीन तयार करविली आहे ह्याठिकाणीं दिवसां मुली नृत्य करीत असतात आणि रात्रीं घरीं जात असतात १६. ह्यास्तव, काळोख पडल्यावर तूं तेथें ये; ह्मणजे गंधर्वांनाही तें समजणार नाहीं आणि असें झालें असतां अनर्थही निःसंशय टळेल १७. वैशंपायन सांगतातः—हे जनमेजयराजा, कीचकासहवर्तमान ह्या गोष्टीची वाटाघाट चालली असतां अवशिष्ट राहिलेला अर्धा दिवस द्रौपदीला एका महिन्याप्रमाणें गेला १८. इकडे हर्षानें अतिशय उचंबळून गेलेला कीचक आपल्या घरीं गेला; परंतु, सैरंध्रीच्या रूपानें प्राप्त झालेला मृत्यु त्या मूढाला समजला नाहीं १९. चंदन, भूषणें व पुष्पें ह्यांचे ठिकाणीं विशेषतः आसक्त असलेल्या त्या काममोहित कीचकानें सत्वर आपलें शरीर शृंगारिलें २०; व विशाल नेत्रांनीं युक्त असलेल्या त्या सैरंध्रीचेंच तो एकसारिखें चिंतन करीत असल्यामुळें त्या शृंगार-

आसीदभ्यधिका चापि श्रीः श्रियं प्रमुमुक्षतः । निर्वाणकाले दीपस्य वर्तीमिव दिधक्षतः २२ कृतसंप्रत्ययस्तस्याः कीचकः काममोहितः । नाजानाद्दिवसं यान्तं चिन्तयानः समागमम् २३ ततस्तु द्रौपदी गत्वा तदा भीमं महानसे । उपातिष्ठत कल्याणी कौरव्यं पतिमन्तिकम् २४ तमुवाच सुकेशान्ता कीचकस्य मया कृतः । संगमो नर्तनागारे यथावोचः परन्तप २५ शून्यं स नर्तनागारमागमिष्यति कीचकः । एको निशि महाबाहो कीचकं तं निषूदय २६ तं सूतपुत्रं कौन्तेय कीचकं मददर्पितम् । गत्वा त्वं नर्तनागारं निर्जीवं कुरु पाण्डव २७ दर्पाच्च सूतपुत्रोसौ गन्धर्वानवमन्यते । तं त्वं प्रहरतां श्रेष्ठ ह्रदान्नागमिवोद्धर २८ अश्रु दुःखाभिभूताया मम मार्जस्व भारत । आत्मनश्चैव भद्रं ते कुरु मानं कुलस्य च २९ भीमसेन उवाच ॥ स्वागतं ते वरारोहे यन्मां वेदयसे प्रियम् । न ह्यन्यं कंचिदिच्छामि सहायं वरवर्णिनि ३० या मे प्रीति-

---

कर्णालाही त्याला फारच वेळ लागला असें वाटूं लागलें २१; आणि नाशकालीं जळत असलेल्या दिव्याची ज्योति ज्याप्रमाणें मोठी होते त्याप्रमाणें वैभवाचा त्याग करण्याची पाळी आलेल्या त्या कीचकाची मुखश्री अधिकच झळकूं लागली २२. काममोहित झालेल्या त्या कीचकाला तिचा विश्वास वाटल्यामुळें तिच्या समागमाचें चिंतन करण्यामध्येंच जात असलेला दिवस त्याच्या समजण्यांतही आला नाहीं २३. असो. कीचकाशीं बोलणें झाल्यानंतर द्रौपदी मुदपाकामध्यें भीमसेनाकडे गेली आणि कुरुवंशज पतीजवळ ती कल्याणी उभी राहिली २४. नंतर उत्कृष्ट केशाग्रांनीं युक्त असलेली ती द्रौपदी त्याला ह्मणाली " हे शत्रुतापन, आपल्या ह्मणण्याप्रमाणें नृत्यशालेमध्यें कीचकाशीं समागम करण्याचें मीं कबूल केलें आहे २५. त्या नृत्यशालेमध्यें दुसरें कोणीही नसतांना रात्रीं एकटा तो कीचक तेथें येईल. ह्यास्तव, हे महापराक्रमी भीमसेन, आपण त्या कीचकाचा वध करा २६. सारांश, हे पांडुनंदन, हे कुंतीपुत्र, मदानें चढून गेलेल्या त्या सूतपुत्र कीचकाला आपण नृत्यशालेमध्यें जाऊन निर्जीव करून टाका २७. हा सूतपुत्र गर्वामुळें गंधर्वांचा अवमान करीत असतो. तस्मात्, हे प्रहार करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ, यमुनेच्या डोहांतून ज्याप्रमाणें कृष्णानें कालिय सर्प बाहेर काढून टाकिला त्याप्रमाणें आपण ह्याला इहलोकांतून काढून टाका २८. तात्पर्य, हे भरतवंशज, दुःखानें गांजलेल्या माझ्या अश्रूंचें परिमार्जन आपण करा आणि आपलें दैव बरें करा, आपलें व आपल्या कुलाचें नांव राखा २९. भीमसेन ह्मणतोः—हे सुंदरि, ज्याअर्थी तूं मला प्रिय असलेलीच गोष्ट करण्यास सांगत आहेस त्या अर्थी तुझें स्वागत असो. हे सुंदरि, मला

स्त्वयाख्याता कीचकस्य समागमे । हत्वा हिडिम्बं सा प्रीतिर्ममासीद्वर-वर्णिनि ३१ सत्यं भ्रातृंश्च धर्मं च पुरस्कृत्य ब्रवीमि ते । कीचकं निहनिष्यामि वृत्रं देवपतिर्यथा ३२ तं गह्वरे प्रकाशे वा पोथयिष्यामि कीचकम् । अथ चेदपि योत्स्यन्ति हिंसे मत्स्यानपि ध्रुवम् ३३ ततो दुर्योधनं हत्वा प्रतिपत्स्ये वसुन्धराम् । कामं मत्स्यमुपास्तां हि कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः ३४ द्रौपद्युवाच ॥ यथा न संत्यजेथास्त्वं सत्यं वै मत्कृते विभो । निगूढस्त्वं तथा पार्थ कीचकं तं निषूदय ३५ भीमसेन उवाच ॥ एवमेतत्करिष्यामि यथा त्वं भीरु भाषसे । अद्य तं सूदयिष्यामि कीचकं सह बान्धवैः ३६ अदृश्यमानस्तस्याथ तमस्विन्यामनिन्दिते । नागो बिल्वमिवाक्रम्य पोथयिष्याम्यहं शिरः ॥ अलभ्यामिच्छतस्तस्य कीचकस्य दुरात्मनः ३७ वैशम्पायन उवाच ॥ भीमोथ प्रथमं गत्वा रात्रौ च्छन्न उपाविशत् । मृगं हरिरिवादृश्यः प्रत्याकाङ्क्षत कीचकम् ३८ कीचकश्चाप्यलंकृत्य यथाकाममुपागमत् । तां वेलां नर्तनागारं पाञ्चा-

---

दुसऱ्या कोणत्याही साहाय्यकर्त्याची अपेक्षा नाहीं ३०. कीचकाचा समागम होण्याचा जो तूं मला आनंदाचा प्रसंग आणून दिला आहेस तसा आनंद, हे सुंदरि, फक्त हिडिंबराक्षसाचा वध केल्यावर मला झालेला आहे ३१. ह्यास्तव, इंद्रानें ज्याप्रमाणें वृत्रासुराचा वध केला त्याप्रमाणें मी कीचकाचा वध करीन हें तुला, सत्य, भ्राते आणि धर्म ह्यांची शपथ वाहून सांगतों ३२. अंधेरामध्यें अथवा उजेडामध्यें मी त्या कीचकाला हपटून ठार करीन; माझ्याशीं जर मत्स्यदेशांतील लोक युद्धाला आले तर त्यांचाही मी निःसंशय वध करीन ३३; आणि नंतर दुर्योधनाचा वध करून पृथ्वी प्राप्त करून घेईन. मग कुंतीपुत्र युधिष्ठिर खुशाल मत्स्यदेशाचें राज्य करील ३४. द्रौपदी ह्मणतेः—हे प्रभो, हे कुंतीनंदन, माझ्याकरितां सत्याचा त्याग न होईल अशा रीतीनें आपण गुप्त राहूनच त्या कीचकाचा वध करा ३५. भीमसेन ह्मणतोः—हे विनयशील द्रौपदि, मी तुझ्या ह्मणण्याप्रमाणेंच वागेन आणि त्या कीचकाचा आजच्या आजच मी बांधवांसहवर्तमान वध करीन ३६. हे अनिंदिते, हत्ती ज्याप्रमाणें बेलफळ पायाखालीं चिरडून टाकितो त्याप्रमाणें अलभ्य स्त्रीची इच्छा करणाऱ्या त्या दुरात्म्या कीचकाचें मस्तक, त्याच्या दृष्टीं न पडतां मी त्या अंधकारयुक्त दैत्यशालेमध्यें चिरडून टाकीन ३७. वैशंपायन सांगतातः—इतकें झाल्यानंतर रात्र पडतांक्षणीं भीम अगोदर त्या नृत्यशालेमध्यें जाऊन दडून बसला आणि सिंह ज्याप्रमाणें अदृश्य राहून मृगाची वाट पहात बसतो त्याप्रमाणें

लीसंगमाशया ३९ मन्यमानः स सङ्केतमागारं प्राविशच्च तत् । प्रविश्य च स तद्वेश्म तमसा संवृतं महत् ४० पूर्वागतं ततस्तत्र भीममप्रतिमौजसम् । एकान्तावस्थितं चैनमाससाद स दुर्मतिः ४१ शयानं शयने तत्र सूतपुत्रः परामृशत् । जाज्वल्यमानं कोपेन कृष्णाधर्षणजेन ह ४२ उपासंगम्य चैवैनं कीचकः काममोहितः । हर्षोन्मथितचित्तात्मा स्वयमानोऽभ्यभाषत ४३ प्रापितं ते मया वित्तं बहुरूपमनन्तकम् ४४ यत्कृतं धनरत्नाढ्यं दासीशतपरिच्छदम् । रूपलावण्ययुक्ताभिर्युवतीभिरलंकृतम् ४५ गृहं चान्तःपुरं सुभ्रु क्रीडारतिविराजितम् । तत्सर्वं त्वां समुद्दिश्य सहसाहमुपागतः ४६ अकस्मान्मां प्रशंसन्ति सदा गृहगताः स्त्रियः । सुवासा दर्शनीयश्च नान्योऽस्ति त्वादृशः पुमान् ४७ भीमसेन उवाच ॥ दिष्ट्या त्वं दर्शनीयोऽथ दिष्ट्यात्मानं प्रशंससि । ईदृशस्तु त्वया स्पर्शः स्पृष्टपूर्वो न कर्हिचित् ४८ स्पर्शं वेत्सि विदग्धस्त्वं कामधर्मविचक्षणः । स्त्रीणां प्रीति-

---

तो कीचकाची वाट पहात राहिला ३८. इकडे कीचकही इच्छेप्रमाणें अलंकार धारण करून त्या ठरलेल्यावेळीं द्रौपदीच्या समागमाच्या उद्देशानें त्या नृत्यशालेजवळ गेला ३९ आणि आपला संकेत सिद्धीस जाणार असें मनामध्यें घोकीत घोकीत तो त्या स्थलामध्यें प्रविष्ट झाला. परंतु, अंधकारानें व्याप्त झालेल्या त्या महास्थानामध्यें प्रवेश केल्यावर ४० त्याच्याही पूर्वी अप्रतिमसामर्थ्यवान् भीमसेन एकांतामध्यें येऊन बसला होता त्याच्याजवळ तो दुर्बुद्धि कीचक जाऊन बसला ४१ व द्रौपदीवर हात टाकिल्यामुळें उत्पन्न झालेल्या क्रोधानें जळत असलेला तो भीमसेन तेथें शय्येवर पडला असतांना सूतपुत्र कीचकानें त्याला स्पर्श केला ४२; आणि हर्षानें ज्याचें चित्त क्षुब्ध झालें आहे असा तो विषयवासनेनें मोहित झालेला कीचक अगदीं जवळ जाऊन हंसत हंसत त्याला ह्मणाला ४३ " मीं जें कांहीं नानाप्रकारचें अपार द्रव्य संपादन केलें आहे तें तुला अर्पण केलें आहे ४४ आणि त्याचप्रमाणें धन व रत्नें ह्यांनीं संपन्न, शेंकडों दासींनीं भरलेलें आणि रूप व सौंदर्य ह्यांनीं युक्त असलेल्या तरुणी स्त्रियांनीं भूषित झालेलें गृह व रतिक्रीडेनें झळकत असलेलें अंतःपुर हें सर्व एकदम सोडून देऊन मी तुझ्याकरितां येथें आलों आहें ४५, ४६. घरांतील स्त्रिया " उत्कृष्ट वस्त्रें परिधान केलेला आणि दर्शनीय असा तुझ्यासारिखा दुसरा कोणीही पुरुष नाहीं " अशी विस्मयपूर्वक माझी प्रशंसा करीत असतात" ४७. भीमसेन ह्मणतात:—तूं सुंदर आहेस ही फारच सुदैवाची गोष्ट आहे आणि तूं आपली प्रशंसा करीत आहेस हेंही आनंद मानण्यासारिखेंच आहे. परंतु, अशा प्रकारचा तुला

करो नान्यस्त्वत्समः पुरुषस्त्विह ४९ वैशम्पायन उवाच ॥ इत्युक्त्वा तं महाबाहुर्भीमो भीमपराक्रमः । सहसोत्पत्य कौन्तेयः प्रहस्येदमुवाच ह ५० अद्य त्वां भगिनी पापं कृष्यमाणं मया भुवि । द्रक्ष्यतेद्रिप्रतीकाशं सिंहेनेव महागजम् ५१ निराबाधा त्वयि हते सैरन्ध्री विचरिष्यति । सुखमेव चरिष्यन्ति सैरन्ध्र्याः पतयः सदा ५२ ततो जग्राह केशेषु माल्यवत्सु महाबलः । स केशेषु परामृष्टो बलेन बलिनां वरः ५३ आक्षिप्य केशान्वेगेन बाह्वोर्जग्राह पाण्डवम् । बाहुयुद्धं तयोरासीत्क्रुद्धयोर्नरसिंहयोः ५४ वसन्ते वासिताहेतोर्बलवद्गजयोरिव । कीचकानां तु मुख्यस्य नराणामुत्तमस्य च ५५ वालिसुग्रीवयोर्भ्रात्रोः पुरेव कपिसिंहयोः । अन्योन्यमभिसंरब्धौ परस्परजयैषिणौ ५६ ततः समुद्यम्य भुजौ पञ्चशीर्षाविवोरगौ । नखदंष्ट्राभिरन्योन्यं घ्नतः क्रोधविषोद्धतौ ५७ वेगेनाभिहतो भीमः

स्पर्श आजपर्यंत कधीं झालेला नाहीं ४८. रतिक्रीडेविषयीं तूं मोठा मार्मिक व चतुर असल्यामुळें तुला स्पर्शज्ञान (फारच उत्तम) झालें आहे ! खरोखर स्त्रियांना आनंदाच्या गुदगुल्या उत्पन्न करणारा तुझ्यासारिखा दुसरा कोणताही पुरुष ह्या जगतामध्यें नाहीं ! ४९. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें त्याला सांगितल्यावर प्रचंड बाहु आणि भयंकर पराक्रम ह्यांनीं युक्त असलेला तो कुंतीपुत्र भीमसेन शय्येवरून एकदम उडी मारून हास्यपूर्वक त्याला ह्मणाला ५० " सिंह ज्याप्रमाणें महागजाला जमीनदोस्त करून टाकितो त्याप्रमाणें तुज पर्वतप्राय पापी भ्रात्याला मीं जमीनदोस्त केलेला आज तुझी भगिनी अवलोकन करील ५१; तुझा वध झाला ह्मणजे सैरंध्रीलाही दुःख रहाणार नाहीं आणि सैरंध्रीचे पतिही आपले दिवस नेहमीं सुखानें काढूं लागतील " ५२. असें ह्मणून महाबलाढ्य भीमसेनानें पुष्पांनीं युक्त असलेले त्याचे केश धरिले; परंतु, बलाढ्य भीमसेनानें शेंडी धरिली असतां बलवानांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या कीचकानें ५३ वेगानें केसांना हिसडा देऊन पांडुपुत्र भीमसेनाचे हात धरिले असतां वसंतऋतूमध्यें कामिनी हत्तिणीकरितां झुंजणाऱ्या बलाढ्य गजांप्रमाणें त्या क्रुद्ध झालेल्या पुरुषसिंहांमध्यें बाहुयुद्ध सुरू झालें. कीचकांमध्यें मुख्य आणि नरांमध्यें उत्कृष्ट अशा ५४, ५५ त्या उभयतांमध्यें पूर्वी वानरश्रेष्ठ वाली व सुग्रीव ह्या भ्रात्यांत झालेल्या युद्धाप्रमाणें मल्लयुद्ध झालें. एकमेकाला जिंकण्याची इच्छा धरून ते एकमेकांवर अतिशय क्रुद्ध झाल्यावर ५६ पांच पांच फडचांचे नागच कीं काय अशा प्रकारचे आपले हात उगारून क्रोधरूप विषानें व्याप्त झालेले ते उभयतां भीमकीचक नखें व दंष्ट्रा ह्यांच्या योगानें एकमेकाला प्रहार करूं लागले ५७.

कीचकेन बलीयसा । स्थिरप्रतिज्ञः स रणे पदान्न चलितः पदम् ५८
तावन्योन्यं समाश्लिष्य प्रकर्षन्तौ परस्परम् । उभावपि प्रकाशेते प्रवृद्धौ
वृषभाविव ५९ तयोर्ह्यासीत्सुतुमुलः संप्रहारः सुदारुणः । नखदन्तायुधव-
तोर्व्याघ्रयोरिव दृप्तयोः ६० अभिपत्याथ बाहुभ्यां प्रत्यगृह्णादमर्षितः ।
मातङ्ग इव मातङ्गं प्रभिन्नकरटामुखम् ६१ स चाप्येनं तदा भीमः प्रति-
जग्राह वीर्यवान् । तमाक्षिपत्कीचकोथ बलेन बलिनांवरः ६२ तयोर्भुज-
विनिष्पेषादुभयोर्बलिनोस्तदा । शब्दः समभवद्घोरो वेणुस्फोटसमो
युधि ६३ अथैनमाक्षिप्य बलाद्गृहमध्ये वृकोदरः । धूनयामास वेगेन
वायुश्चण्ड इव द्रुमम् ६४ भीमेन च परामृष्टो दुर्बलो बलिना रणे । प्रास्प-
न्दत यथाप्राणं विचकर्ष च पाण्डवम् ६५ ईषदाकलितं चापि क्रोधाद्द्रु-
तपदं स्थितम् । कीचको बलवान्भीमं जानुभ्यामाक्षिपद्भुवि ६६ पातितो
भुवि भीमस्तु कीचकेन बलीयसा । उत्पपाताथ वेगेन दण्डपाणिरि-

बलाढ्य कीचकानें भीमसेनाला वेगानें प्रहार केला; परंतु, आपली प्रतिज्ञा ढळूं न देणारा तो भीमसेन संग्रामामध्यें पाऊलभरही ढळला नाहीं ५८. एकमेकाला आवळून धरून ते एकमेकाला ओढूं लागले असतां उभयतांही मस्त झालेल्या बैलांप्रमाणें दिसूं लागले ५९. नखें व दांत ह्याच आयुधांनीं युक्त असलेले मत्त व्याघ्रच कीं काय अशा त्या उभयतांमध्यें फारच तुमुल व अतिभयंकर संग्राम सुरू झाला ६०. प्रथमतः ज्याच्या गंडस्थलांतून मदस्राव चाललेला आहे अशा गजावर ज्याप्रमाणें दुसरा गज चालून जातो त्याप्रमाणें भीमसेनावर चालून जाऊन त्या कीचकानें त्याचे हात धरिले असतां ६१ वीर्यवान् भीमसेनानेंही त्याला सलामी दिली. परंतु, बलवानांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या कीचकाला भीमसेनानें जोरानें खालीं हापटलें ६२. नंतर त्या उभयतां बलाढ्य योद्ध्यांच्या बाहूंचें संग्रामामध्यें घर्षण होऊं लागलें असतां विदीर्ण होणाऱ्या कळकाप्रमाणें भयंकर ध्वनि होऊं लागला ६३. तदनंतर त्या नृत्यशालेमध्यें भीमसेनानें त्याला धरून जोरानें खालीं हापटलें आणि प्रचंड वायु ज्याप्रमाणें वृक्ष हालवून सोडितो त्याप्रमाणें वेगानें त्या भीमसेनानें त्याला हलवून सोडिलें ६४. ह्याप्रमाणें संग्रामामध्यें बलाढ्य भीमसेनाच्या तावडींत तो कीचक सांपडला असतां त्यानें सर्वशक्ती खर्चकरून तडफड केली आणि पांडुपुत्र भीमसेनाला ओढिलें ६५. ह्याप्रमाणें कीचकानें भीमसेनाला स्थानापासून किंचित् चाळविलें असतां रागारागानें तो भीमसेन पुनरपि त्वरा करून आपल्या जाग्यावर उभा राहिला; तथापि, बलाढ्य कीचकानें गुडघे मारून

थान्तकः ६७ स्पर्धया च बलोन्मत्तौ तावुभौ सूतपाण्डवौ । निशीथे पर्यकर्षेतां बलिनौ निर्जने स्थले ६८ ततस्तद्भवनं श्रेष्ठं प्राकम्पत मुहुर्मुहुः। बलवच्चापि संक्रुद्धावन्योन्यं प्रतिगर्जतः ६९ तलाभ्यां स तु भीमेन वक्षस्यभिहतो बली । कीचको रोषसंतप्तः पदान्न चलितः पदम् ७० मुहूर्तं तु स तं वेगं सहित्वा भुवि दुःसहम् । बलादहीयत तदा सूतो भीमबलार्दितः ७१ तं हीयमानं विज्ञाय भीमसेनो महाबलः । वक्षस्यानीय वेगेन ममर्दैनं विचेतसम् ७२ क्रोधाविष्टो विनिःश्वस्य पुनश्चैनं वृकोदरः । जग्राह जयतां श्रेष्ठः केशेष्वेव तदा भृशम् ७३ गृहीत्वा कीचकं भीमो विरराज महाबलः । शार्दूलः पिशिताकाङ्क्षी गृहीत्वेव महामृगम् ७४ तत एनं परिश्रान्तमुपलभ्य वृकोदरः । योक्त्रयामास बाहुभ्यां पशुं रशनया यथा ७५ नदन्तं च महानादं भिन्नभेरीसमस्वनम् । भ्रामयामास सुचिरं विस्फुरन्तमचेतसम् ७६ प्रगृह्य तरसा

त्याला भूमीवर आपटलें ६६. परंतु, बलाढ्य कीचकानें ह्याप्रमाणें भीमसेनाला भूमीवर आपटलें असतां दंडपाणि यमाप्रमाणें तो भीमसेन वेगानें उसळून उठला ६७. बलानें उन्मत्त झालेले ते उभयतां बलाढ्य भीमकीचक मध्यरात्रीच्या समयास त्या निर्जनस्थलामध्यें स्पर्धेनें एकमेकाला ओढूं लागले असतां ६८ तें श्रेष्ठ नृत्यस्थान वरचेवर झोंके खाऊं लागलें. कारण, ते एकमेकांवर अतिशयच क्रुद्ध झालेले होते आणि एकमेकांवर ओरडत होते ६९. तदनंतर भीमसेनानें कीचकाच्या वक्षस्थलावर दोन्ही हातांनीं एकदम धक्का दिला असतांही क्रोधानें संतप्त झालेल्या त्या बलाढ्य कीचकाचें पाऊल इकडे तिकडे सरकलें सुद्धां नाहीं ७०. परंतु, तो दुःसह वेग भूमीवर उभा राहून जरी त्यानें क्षणभर सहन केला तरी भीमसेनाच्या सामर्थ्यानें व्याकुल झाल्यामुळें कीचकाचें सामर्थ्य कमी होऊं लागलें ७१. तेव्हां हा मलूल होत चालला आहे असें आढळून येतांक्षणीं महाबलाढ्य भीमसेनानें त्याचें मस्तक वेगानें मुरगळून त्याच्या वक्षस्थलाजवळ आणिलें आणि तो मूर्च्छित झाला असतां त्याचें मर्दन केलें ७२. इतकेंच नव्हे परंतु, क्रोधाविष्ट झालेल्या त्या विजयिश्रेष्ठ भीमसेनानें सुस्कारा टाकून पुनरपि त्याची शेंडी घट्ट धरिली ७३. तेव्हां कीचकाची शेंडी धरून उभा राहिलेला तो महाबलाढ्य भीमसेन मांसाच्या इच्छेनें मोठ्या मृगाला पकडून उभा असलेल्या व्याघ्राप्रमाणें दिसूं लागला ७४. तदनंतर कीचक श्रांत झाला आहे असें पाहून ज्याप्रमाणें दोरीनें पशु बांधीत असतात त्याप्रमाणें भीमसेनानें त्याला बाहूंनीं आवळून टाकिलें ७५ आणि फुटक्या दुंदुभीप्रमाणें जिचा स्वर आहे अशी गर्जना

दोर्भ्यां कण्ठं तस्य वृकोदरः । अपीडयत कृष्णायास्तदा कोपोपशान्तये ७७ अथ तं भग्नसर्वाङ्गं व्याविद्धनयनाम्बरम् । आक्रम्य च कटीदेशे जानुना कीचकाधमम् ७८ अपीडयत बाहुभ्यां पशुमारममारयत् ७९ तं विषीदन्तमाज्ञाय कीचकं पाण्डुनन्दनः । भूतले भ्रामयामास वाक्यं चेदमुवाच ह ८० अद्याहमनृणो भूत्वा भ्रातुर्भार्यापहारिणम् । शान्तिं लब्धास्मि परमां हत्वा सैरन्ध्रिकण्टकम् ८१ इत्येवमुक्त्वा पुरुषप्रवीरस्तं कीचकं क्रोधसरागनेत्रः । आस्रस्तवस्त्राभरणं स्फुरन्तमुद्भ्रान्तनेत्रं व्यसुमुत्ससर्ज ८२ निष्पिष्य पाणिना पाणिं संदष्टौष्ठपुटं बली । समाक्रम्य च संक्रुद्धो बलेन बलिनां वरः ८३ तस्य पादौ च पाणी च शिरो ग्रीवां च सर्वशः । काये प्रवेशयामास पशोरिव पिनाकधृक् ८४ तं संमथितसर्वाङ्गं मांसपिण्डोपमं कृतम् । कृष्णाया दर्शयामास भीमसेनो महाबलः ८५ उवाच च महातेजा द्रौपदीं योषितां वराम् ।

करीत असलेल्या आणि मूर्च्छित होऊन तडफडत असलेल्या त्या कीचकाला त्यानें पुष्कळ वेळपर्यंत घुसळून काढिलें ७६. जोराजोरानें आपल्या हातांनीं भीमसेनानें त्याचा कंठ धरिला आणि द्रौपदीचा कोप शांत होण्याकरितां तो आवळला ७७. तदनंतर ज्याचें सर्व अंग ठेंचून गेलें आहे व ज्याचीं बुबुळें व वस्त्रें निघून बाहेर पडलेलीं आहेत अशा त्या अधम कीचकाच्या कमरेवर गुडघा देऊन ७८ भीमसेनानें त्याला बाहूंनीं आवळून टाकिलें आणि पशूप्रमाणें त्याचा वध केला ७९. तो कीचक मूर्च्छित होत आहे असें समजतांक्षणीं पांडुनंदन भीमसेन भूतलावर त्याला फिरवून ह्मणाला ८० " आज मीं सैरंध्रीकंटक व भार्यापहारी कीचकाचा वध केला असल्यामुळें भ्रात्यांच्या ऋणांतून मुक्त झालों आहे आणि ह्मणूनच आतां मला पराकाष्ठेची शांति प्राप्त होईल " ८१. ह्याप्रमाणें बोलून क्रोधानें डोळे लाल झालेल्या त्या पुरुषश्रेष्ठ भीमसेनानें वस्त्रें व भूषणें विगलित होऊन व डोळ्यांचीं बुबुळें निघून तडफडत असलेल्या त्या कीचकाला गतप्राण करून फेंकून दिलें ८२. इतकेंच नव्हे परंतु, बलवानांमध्यें श्रेष्ठ असलेला तो बलाढ्य भीमसेन अतिशयच क्रुद्ध झाला असल्यामुळें त्यानें दांत ओठ खाऊन हातावर हात चोळिले ८३ आणि जोराजोरानें त्याच्याजवळ गेल्यावर पिनाकपाणि रुद्रच कीं काय अशा त्या भीमसेनानें पशूप्रमाणें त्याचे हात, पाय, मस्तक आणि मान हीं सर्वप्रकारें त्याच्या शरीरामध्येंच खुपसून ठेविलीं ८४ व ह्याप्रमाणें सर्वांगाचें मंथन करून मांसाच्या गोळ्याप्रमाणें करून ठेविलेला तो कीचक महाबलाढ्य भीमसेनानें द्रौपदीला दाखविला ८५ आणि स्त्रियांमध्यें श्रेष्ठ असलेल्या

पश्यैनमेहि पाञ्चालि कामुकोयं यथा कृतः ८६ एवमुक्त्वा महा-
राज भीमो भीमपराक्रमः । पादेन पीडयामास तस्य कायं दुरात्मनः ८७
ततोऽग्निं तत्र प्रज्वाल्य दर्शयित्वा तु कीचकम् । पाञ्चालीं स तदा वीर
इदं वचनमब्रवीत् ८८ प्रार्थयन्ति सुकेशान्ते ये त्वां शीलगुणान्विताम् ।
एवं ते भीरु वध्यन्ते कीचकः शोभते यथा ८९ तत्कृत्वा दुष्करं कर्म
कृष्णायाः प्रियमुत्तमम् । तथा स कीचकं हत्वा गत्वा रोषस्य वै शमम् ॥
आमन्त्र्य द्रौपदीं कृष्णां क्षिप्रमायान्महानसम् ९० कीचकं घातयित्वा
तु द्रौपदी योषितां वरा । प्रहृष्टा गतसंतापा सभापालानुवाच ह ९१
कीचकोयं हतः शेते गन्धर्वैः पतिभिर्मम । परस्त्रीकामसंमत्तस्तत्रागच्छत
पश्यत ९२ तच्छ्रुत्वा भाषितं तस्या नर्तनागाररक्षिणः । सहसैव समाज-
ग्मुरादायोल्काः सहस्रशः ९३ ततो गत्वाथ तद्वेश्म कीचकं विनिपाति-
तम् । गतासुं ददृशुर्भूमौ रुधिरेण समुक्षितम् ९४ पाणिपादविहीनं तु

असलेल्या त्या द्रौपदीला तो महातेजस्वी भीमसेन ह्मणाला " हे पांचालि, इकडे ये आणि ह्या कीचकाला पहा. ह्या कामुक कीचकाची मीं काय अवस्था करून टाकिली आहे हें एकदां अवलोकन तर कर " ८६. हे जनमेजय महाराजा, ह्याप्रमाणें द्रौपदीला सांगितल्यावर भयंकर पराक्रमी भीमसेनानें त्या दुरात्म्या कीचकाचें शरीर पायांखालीं चिरडिलें ८७. तदनंतर अग्नि प्रज्वलित करून कीचक दर्शविल्यावर तो वीर भीमसेन पांचालीला ह्मणाला ८८ " हे उत्कृष्ट केशांनीं युक्त असलेले विनय-शील द्रौपदि, शील व गुण ह्यांनीं युक्त असलेल्या तुझ्यावर जे दृष्टि ठेवितात त्यांचा ह्याप्रमाणें वध होऊन ते असेच कीचकासारिखे शोभूं लागतात " ८९. असो. ह्याप्रमाणें तें दुष्कर कर्म करून द्रौपदीचा उत्कृष्ट मनोरथ परिपूर्ण केल्यावर ह्मणजे कीचकाचा वध केल्यावर राग शांत करून व द्रुपदकन्या कृष्णेचा निरोप घेऊन तो भीमसेन सत्वर मुदपाकामध्यें गेला ९०. ह्याप्रमाणें कीचकाचा वध करविल्यावर स्त्रियांमध्यें श्रेष्ठ असलेल्या द्रौपदीचाही संताप नाहींसा झाला आणि आनंदित होऊन ती सभापालांना ह्मणाली ९१ " हा परस्त्रीविषयक कामवासनेनें मत्त झालेला कीचक माझ्या गंधर्व पतींच्या हातून मरून पडला आहे. ह्यास्तव, तुह्मी तिकडे चला आणि त्याला पहा " ९२. हें तिचें भाषण श्रवण केल्यावर नृत्यशालेचे रक्षक हजारों मशाली घेऊन एकदम एकत्र जुळले ९३ आणि त्या गृहामध्यें प्रवेश केल्यानंतर रक्तानें भरलेल्या त्या कीचकाला मारून भूमीवर पाडिल्याचें त्यांनीं अवलोकन केलें ९४. त्याला हातपाय नाहींत असें पाहून तर

दृष्ट्वा च व्यथिताभवन् । निरीक्षन्ति ततः सर्वे परं विस्मयमागताः ९५
अमानुषं कृतं कर्म तं दृष्ट्वा विनिपातितम् । क्वास्य ग्रीवा क्व चरणौ क्व
पाणी क्व शिरस्तथा ९६ इति स्म तं परीक्षन्ते गन्धर्वेण हतं तदा ९७
[७८६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि कीचकवधपर्वणि कीचकवधे द्वाविंशोऽध्यायः ॥ २२ ॥

वैशम्पायन उवाच ॥ तस्मिन्काले समागम्य सर्वे तत्रास्य बान्धवाः ।
रुरुदुः कीचकं दृष्ट्वा परिवार्य समन्ततः १ सर्वे संहृष्टरोमाणः संत्रस्ताः
प्रेक्ष्य कीचकम् । तथा संभिन्नसर्वाङ्गं कूर्मं स्थल इवोद्धृतम् २ पोथितं भीम-
सेनेन तमिन्द्रेणेव दानवम् । संस्कारयितुमिच्छन्तो बहिर्नेतुं प्रचक्रमुः ३
ददृशुस्ते ततः कृष्णां सूतपुत्राः समागताः । अदूराच्चानवद्याङ्गीं स्तम्भ-
मालिङ्ग्य तिष्ठतीम् ४ समवेतेषु सर्वेषु तामूचुरुपकीचकाः । हन्यतां शीघ्र-
मसती यत्कृते कीचको हतः ५ अथवा नैव हन्तव्या दह्यतां कामिना

त्यांना भयच वाटलें आणि अतिशय विस्मयचकित होऊन ते सर्वही त्याच्याकडे पाहूं लागले ९५. सारांश, तो कीचक मारून टाकिलेला पाहून "हें अगदीं अमानुष कर्म केलें आहे! अरे, ह्याची मान, पाय, हात व मस्तक हीं आहेत कोठें!" असें ते आपआपसांत ह्मणूं लागले ९६ आणि अशा रीतीनें गंधर्वांनीं मारून टाकिलेल्या त्या कीचकाला ते निरखून पाहूं लागले ९७. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील कीचकवधपर्वांपैकीं कीचकाच्या वधाविषयीं बाविसावा अध्याय समाप्त झाला ॥२२॥

वैशंपायन सांगतातः—त्यावेळीं कीचकाचे सर्व बांधवही तेथें जुळले आणि कीचकाला अवलोकन करितांक्षणीं त्याच्या सभोंवतीं गराडा देऊन ते रडूं लागले १. ज्याचे सर्व अवयव ठेंचून गेलेले आहेत आणि जलांतून स्थलावर काढिलेल्या कूर्माप्रमाणें ज्याचे सर्व अवयव आंत गेलेले आहेत अशा त्या कीचकाला पाहून त्रस्त झालेल्या त्या सर्वांच्या अंगावर कांटा आला २ आणि तदनंतर इंद्रानें मारून टाकिलेल्या वृत्रासुराप्रमाणें भीमसेनानें मारून टाकिलेल्या त्या कीचकाला और्ध्वदेहिक संस्कार करण्याकरितां बाहेर नेण्याच्या ते तयारीला लागले ३. तों इतक्यांत जवळ खांबाला धरून उभी असलेली सर्वांगसुंदरी द्रौपदी त्या जुळलेल्या सूतपुत्र कीचकांच्या दृष्टीं पडली ४. तेव्हां ह्याप्रमाणें तेथें सर्व जुळले असतां ते उपकीचक तिला अनुलक्षून ह्मणाले, "जिच्याकरितां कीचकाचा वध झाला त्या दुष्टेला सत्वर मारून टाका ५ अथवा हिला मारूं नये; ह्या कामीं कीचकासहवर्तमान हिला जाळावी हें बरें. कारण

सह। मृतस्यापि प्रियं कार्यं सूतपुत्रस्य सर्वथा ६ ततो विराटमूचुस्ते कीचकोस्याः कृते हतः । सहानेनाद्य दह्येम तदनुज्ञातुमर्हसि ७ पराक्रमं तु सूतानां मत्वा राजान्वमोदत । सैरन्ध्याः सूतपुत्रेण सह दाहं विशाम्पतिः ८ तां समासाद्य वित्रस्तां कृष्णां कमललोचनाम् । मोमुह्यमानां ते तत्र जगृहुः कीचका भृशम् ९ ततस्तु तां समारोप्य निबद्ध्य च सुमध्यमाम् । जग्मुरुद्यम्य ते सर्वे श्मशानाभिमुखास्तदा १० ह्रियमाणा तु सा राजन्सूतपुत्रैरनिन्दिता । प्राक्रोशन्नाथमिच्छन्ती कृष्णा नाथवती सती ११ द्रौपद्युवाच ॥ जयो जयन्तो विजयो जयत्सेनो जयद्बलः । ते मे वाचं विजानन्तु सूतपुत्रा नयन्ति माम् १२ येषां ज्यातलनिर्घोषो विस्फूर्जितमिवाशनेः । व्यश्रूयत महायुद्धे भीमघोषस्तरस्विनाम् १३ रथघोषश्च बलवान्गन्धर्वाणां तरस्विनाम् । ते मे वाचं विजानन्तु सूतपुत्रा नयन्ति माम् १४ वैशम्पायन उवाच । तस्यास्ताः कृपणा वाचः कृष्णायाः परिदेवितम् । श्रुत्वैवाभ्यापतद्भीमः शयनादवि-

---

सूतपुत्र कीचक जरी मेला आहे तरी आपल्या हातून होईल तितका आपण त्याचा मनोरथ सिद्धीस नेला पाहिजे" ६. तदनंतर ते विराटाला ह्मणाले "हिच्याकरितां कीचक वध पावला असल्यामुळें ह्याच्याबरोबर आज हिलाही दग्ध करण्याचें आमच्या मनांत आहे; ह्यास्तव, तसें करण्याची आपण अनुज्ञा द्यावी" ७. अशी त्यांनीं विनंति केली असतां त्या सूतांचें सामर्थ्य लक्ष्यांत आणून प्रजापालक विराटराजानें सूतपुत्र कीचकासहवर्तमान सैरंध्रीचें दहन करण्याला अनुमोदन दिलें ८. तेव्हां गर्भगळित होऊन मूर्च्छित झालेल्या त्या कमलनयना सैरंध्रीकडे ते कीचक गेले आणि तिला त्यांनीं घट्ट धरिलें ९. नंतर त्याच्याच तिरडीवर तिला घालून व तेथें त्या सुंदरीला बांधून त्यांनीं ती तिरडी उचलली आणि ते सर्वही श्मशानाकडे वळून चालते झाले.१०. परंतु, हे जनमेजयराजा, ह्याप्रमाणें त्या अनिंदित द्रौपदीला सूतपुत्र नेऊन चालले असतां ती साध्वी द्रौपदी सनाथ असूनही कोणीतरी आपल्याला सोडविणारा यावा या उद्देशानें आक्रोश करूं लागली ११. द्रौपदी ह्मणते:—जय, जयंत, विजय, जयत्सेन आणि जयद्बल हे माझ्याकडे लक्ष्य देवोत. सूतपुत्र मला नेत आहेत १२. ज्या बलाढ्य गंधर्वांच्या प्रत्यंचेचा टणत्कार महायुद्धामध्यें विजेच्या कडकडाटाप्रमाणें भयंकर स्वरानें युक्त असलेला कानीं पडत असतो आणि ज्या बलाढ्य गंधर्वांचा रथघोषही फार प्रचंड आहे ते माझ्या बोलण्याकडे लक्ष्य देवोत. सूतपुत्र मला घेऊन चालले आहेत १३, १४. वैशंपायन सांगतात:— ह्याप्रमाणें तिचे ते केविलवाणे शब्द व विलाप कानीं पडतांक्षणीं

चारयन् १५ भीमसेन उवाच ॥ अहं शृणोमि ते वाचं त्वया सैरन्ध्रि भाषिताम् । तस्मात्ते सूतपुत्रेभ्यो भयं भीरु न विद्यते १६ वैशम्पायन उवाच ॥ इत्युक्त्वा स महाबाहुर्विजजृम्भे जिघांसया । ततः स व्यायतं कृत्वा वेषं विपरिवर्त्य च ॥ अद्वारेणाभ्यवस्कन्द्य निर्जगाम बहिस्तदा १७ स भीमसेनः प्राकारादारुह्य तरसा द्रुमम् । श्मशानाभिमुखः प्रायाद्यत्र ते कीचका गताः १८ स लङ्घयित्वा प्राकारं निसृत्य च पुरोत्तमात् । जवेन पतितो भीमः सूतानामग्रतस्तदा १९ चितासमीपे गत्वा स तत्रापश्यद्वनस्पतिम् । तालमात्रं महास्कन्धं मूर्धशुष्कं विशाम्पते २० तं नागवदुपक्रम्य बाहुभ्यां परिरभ्य च । स्कन्धमारोपयामास दशव्यामं परन्तपः २१ स तं वृक्षं दशव्यामं सस्कन्धविटपं बली । प्रगृह्याभ्यद्रवत्सूतान्दण्डपाणिरिवान्तकः २२ ऊरुवेगेन तस्याथ न्यग्रोधाश्वत्थकिंशुकाः । भूमौ निपतिता वृक्षाः सङ्घशस्तत्र शेरते २३ तं सिंहमिव संक्रुद्धं दृष्ट्वा गन्धर्व-

---

भीमसेन कांहींएक विचार न करितां आपल्या शय्येवरून उठीला १५. भीमसेन ह्मणतो:— हे सैरंध्रि, तूं उच्चारिलेली वाणी माझ्या कानांवर पडली आहे. ह्यास्तव, हे भीरु, आतां तुला सूतपुत्रांपासून भय प्राप्त होणें नाहीं १६. वैशंपायन सांगतातः— इतकें बोलून त्या महापराक्रमी भीमसेनानें जांभई दिली आणि आळस देऊन व त्या सूतपुत्रांचा वध करण्याच्या उद्देशानें आपला वेष पालटून आडमार्गानें उडी टाकून तो बाहेर पडला. १७. प्रथमतः कोटावरून एका वृक्षावर चढून त्यानें ते सूतपुत्र द्रौपदीला कोणीकडे घेऊन चालले आहेत तें अवलोकन केलें आणि जिकडे ते कीचक गेले होते तिकडे ह्मणजे, श्मशानाकडे तोंड करून तो निघाला १८. प्रथमतः कोट ओलांडून तो त्या श्रेष्ठ नगराच्या बाहेर पडला आणि वेगानें उड्या टाकीत टाकीत त्या सूतपुत्रांपुढें येऊन थडकला १९. चितेच्या समीप गेल्यावर, हे प्रजापालक जनमेजया, अग्राशीं वठलेला, मोठ्या मोठ्या खांद्यांनीं युक्त व ताडाच्या झाडाइतका उंच असा एक वृक्ष त्याच्या दृष्टीं पडला २०. त्या वृक्षाला त्यानें नागाप्रमाणें प्रथम वेळखा घातला; तो दहा वांव लांब असलेला वृक्ष त्यानें हातांनीं उपटून खांद्यावर टाकिला २१; आणि नंतर हातामध्यें दंड धारण केलेला साक्षात् मृत्युच कीं काय असा तो बलाढ्य भीमसेन दहा वांव लांबीचा तो वृक्ष, खोड व फांद्या ह्यांसहवर्तमान खांद्यावर घेऊन सूतांच्या अंगावर धांवला २२. धांवतां धांवतां त्याच्या मांड्यांच्या वेगानें वड, पिंपळ, पळस ह्या वृक्षांच्या राशीच्या राशि भूतलावर मोडून पडल्या २३. असो. सिंहाप्रमाणें अतिशय क्रुद्ध झालेला तो गंधर्व

मागतम् । वित्रेसुः सर्वशः सूता विषादभयकम्पिताः २४ गन्धर्वो बलवानेति क्रुद्ध उद्यम्य पादपम् । सैरन्ध्री मुच्यतां शीघ्रं यतो नो भयमागतम् २५ ते तु दृष्ट्वा तदाविद्धं भीमसेनेन पादपम् । विमुच्य द्रौपदीं तत्र प्राद्रवन्नगरं प्रति २६ द्रवतस्तांस्तु संप्रेक्ष्य स वज्री दानवानिव । शतं पञ्चाधिकं भीमः प्राहिणोद्यमसादनम् २७ वृक्षेणैतेन राजेन्द्र प्रभञ्जनसुतो बली । तत आश्वासयत्कृष्णां स विमुच्य विशाम्पते २८ उवाच च महाबाहुः पाञ्चालीं तत्र द्रौपदीम् । अश्रुपूर्णमुखीं दीनां दुर्धर्षः स वृकोदरः २९ एवं ते भीरु वध्यन्ते ये त्वां क्लिश्यन्त्यनागसम् । प्रैहि त्वं नगरं कृष्णे न भयं विद्यते तव ३० अन्येनाहं गमिष्यामि विराटस्य महानसम् ३१ वैशम्पायन उवाच ॥ पञ्चाधिकं शतं तच्च निहतं तेन भारत । महावनमिव छिन्नं शिश्ये विगलितद्रुमम् ३२ एवं ते निहता राजञ्शतं पञ्च च कीचकाः । स च सेनापतिः पूर्वमित्येतत्सूतषट्शतम् ३३ तद्दृष्ट्वा महदाश्चर्यं नरा नार्यश्च सङ्गताः । विस्मयं परमं गत्वा नोचुः किंचन भारत ३४

पाहून सर्वेही सूत खिन्न व भयभीत होऊन थरथर कांपूं लागले आणि अगदीं गर्भगळित होऊन ह्मणाले २४ " अरे हा बलाढ्य क्रुद्ध गंधर्व वृक्ष घेऊन इकडे येत आहे. ह्यास्तव, सैरंध्रीला सत्वर सोडून द्या. कारण, हिच्यामुळें आपणाला हें भय उपस्थित झालें आहे" २५. हें भाषण ऐकिल्याबरोबर भीमसेनानें वृक्ष घेतला आहे असें पाहतांक्षणीं द्रौपदीला तेथेंच सोडून देऊन ते सूत नगराकडे धांवले २६. परंतु, ते पळत चाललेले पाहून वज्रपाणि इंद्र ज्याप्रमाणें दैत्यांना यमसदनीं पाठवून देतो त्याप्रमाणें त्या वायुपुत्र बलाढ्य भीमसेनानें त्या वृक्षाच्या योगानें एकशेंपांच कीचक, हे राजाधिराज जनमेजया, यमलोकीं पाठवून दिलें. तदनंतर, हे प्रजापालक जनमेजया, द्रौपदीला संकटांतून सोडिल्यावर तिचें त्यानें सांत्वन केलें २७, २८ आणि तो महापराक्रमी अजिंक्य भीमसेन अश्रूंनीं मुख व्याप्त होऊन गेलेल्या त्या दीन पांचाली द्रौपदीला ह्मणाला २९ " हे भीरु, अपराधावांचून जे तुला क्लेश देत असतात त्यांचा असाच वध होत असतो. आतां, हे द्रौपदि, तूं नगरामध्यें जा; तुला भय नाहीं ३०. मी दुसऱ्या मार्गानें विराटाच्या मुदपाकामध्यें जातों ३१. वैशंपायन सांगतातः— हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, भीमानें मारून टाकिलेले ते एकशेंपांच कीचक, पानें गळून गेलेल्या वृक्षांचें तुटलेलें महावनच कीं काय अशा रीतीनें भूमीवर पडले ३२. सारांश, हे जनमेजयराजा, ह्याप्रमाणें मारिलेले ते शंभर आणि पांच कीचक व पूर्वी मारिलेला तो सेनापति मिळून एकशें सहा कीचकांचा भीमसेनानें वध

[८२०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि कीचकवधपर्वणि त्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ते दृष्ट्वा निहतान्सूतान्राज्ञे गत्वा न्यवेदयन् । गन्धर्वैर्निहता राजन्सूतपुत्रा महाबलाः १ यथा वज्रेण वै दीर्णं पर्वतस्य महच्छिरः । व्यतिकीर्णाः प्रदृश्यन्ते तथा सूना महीतले २ सैरन्ध्री च विमुक्तासौ पुनरायाति ते गृहम् । सर्वं संशयितं राजन्नगरं ते भविष्यति ३ यथा रूपा च सैरन्ध्री गन्धर्वाश्च महाबलाः । पुंसामिष्टश्च विषयो मैथुनाय न संशयः ४ यथा सैरन्ध्रिदोषेण न ते राजन्निदं पुरम् । विनाशमेति वै क्षिप्रं तथा नीतिर्विधीयताम् ५ तेषां तद्वचनं श्रुत्वा विराटो वाहिनीपतिः । अब्रवीत्क्रियतामेषां सूतानां परमक्रिया ६ एकस्मिन्नेव ते सर्वे सुसमिद्धे हुताशने । दह्यन्तां कीचकाः शीघ्रं रत्नैर्गन्धैश्च सर्वशः ७ सुदेष्णामब्रवीद्राजा महिषीं जातसाध्वसः । सैरन्ध्रीमागतां ब्रूया ममैव वचनादिदम् ८ गच्छ सैरन्ध्रि भद्रं ते यथाकामं वरानने ।

केला २३; व, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, तें मोठें आश्चर्य अवलोकन करून तेथें जुळलेल्या पुरुष व स्त्रिया ह्यांना पराकाष्ठेचा विस्मय झाला आणि सैरंध्रीसंबंधानें ते कांहीं तोंडाबाहेर काढीनासे झाले २४. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील कीचकवधपर्वापैकीं तेविसावा अध्याय समाप्त झाला ॥२३॥

वैशंपायन सांगतातः—हे जनमेजयराजा, सूतांचा वध झाल्याचें पाहून ते नगरवासी स्त्रीपुरुष राजाकडे गेले आणि त्याला ह्मणाले " हे राजा, महाबलाढ्य सूतपुत्रांचा वध झाला १. अरे, वज्रानें विदीर्ण झालेलें पर्वताचें मोठें शिखर ज्याप्रमाणें दिसावें त्याप्रमाणें भूतलावर सूत अस्ताव्यस्त पडलेले दिसत आहेत २. ही सैरंध्री संकटांतून मुक्त होऊन पुनरपि आपल्या वाड्यांत आली आहे. आतां सर्वही नगरावर मोठा अनर्थ गुदरेल ३. कारण, सैरंध्री रूपवती असून गंधर्व महाबलाढ्य आहेत आणि मैथुनाकरितां पुरुषांना विषय निःसंशय प्रिय आहे ४. ह्यास्तव, हे राजा, सैरंध्रीच्या दोषामुळें हें तुझें नगर नाश न पावेल अशी कांहीं तरी नीति आपण सत्वर योजावी " ५. हें त्यांचें भाषण श्रवण करून सैन्यांचा आधिपति विराट त्यांना ह्मणाला " ह्या सूतांचा और्ध्वदेहिक संस्कार चांगला करा ६. चांगल्या प्रदीप्त झालेल्या अशा एकाच अग्नीमध्यें त्या सर्व कीचकांचें सर्व प्रकारचीं रत्नें आणि सुगंध यांसहवर्तमान सत्वर दहन करा " ७. इतकें त्यांना सांगितल्यानंतर मनामध्यें भीति उत्पन्न झालेला तो विराटराजा राणी सुदेष्णेला

विभेति राजा सुश्रोणि गन्धर्वेभ्यः पराभवात् ९ न हि त्वामुत्सहे वक्तुं स्वयं
गन्धर्वरक्षिताम् । स्त्रियास्त्वदोषस्त्वां वक्तुमतस्त्वां प्रब्रवीम्यहम् १०
वैशम्पायन उवाच ॥ अथ मुक्ता भयात्कृष्णा सूतपुत्रान्निरस्य च ।
मोक्षिता भीमसेनेन जगाम नगरं प्रति ११ त्रासितेव मृगी बाला शार्दू-
लेन मनस्विनी । गात्राणि वाससी चैव प्रक्षाल्य सलिलेन सा १२ तां
दृष्ट्वा पुरुषा राजन्प्राद्रवन्त दिशो दश । गन्धर्वाणां भयत्रस्ताः केचिद्दृष्ट्वा
न्यमीलयन् १३ ततो महानसद्वारि भीमसेनमवस्थितम् । ददर्श राजन्पा-
ञ्चाली यथा मत्तं महाद्विपम् १४ तं विस्मयन्ती शनकैः संज्ञाभिरिदम-
ब्रवीत् । गन्धर्वराजाय नमो येनास्मि परिमोचिता १५ भीमसेन उवाच॥
ये पुरा विचरन्तीह पुरुषा वशवर्तिनः । तस्यास्ते वचनं श्रुत्वा ह्यनृणा
विहरन्त्वतः १६ वैशम्पायन उवाच ॥ ततः सा नर्तनागारे धनञ्जयमप-
श्यत । राज्ञः कन्या विराटस्य नर्तयानं महाभुजम् १७ ततस्ता नर्तना-

---

ह्मणाला "सैरंध्री आली ह्मणजे माझ्या सांगण्यावरून तूं तिला—हे सैरंध्रि, हे सुमुखि, तुझें देव बरें करो; तूं हवी तिकडे निघून जा. हे सुंदरि, गंधर्वांच्या हातून नाश होण्याची राजाला भीति वाटत आहे. गंधर्व तुझें रक्षण करीत असल्यामुळें मला प्रत्यक्ष तुझ्याशीं बोलतां येत नाहीं; परंतु, स्त्रीनें तुझ्याशीं भाषण करण्याला चिंता नाहीं. ह्यास्तव, स्त्रीच्या द्वारानें मी हें तुला सांगत आहें—असें सांग" ८,९,१०. वैशंपायन सांगतात:—सूतपुत्रांचा वध करून भीमसेनानें सोडविल्यामुळें भीतीपासून मुक्त झालेली विचारी द्रौपदी व्याघ्रानें त्रस्त केलेल्या अल्पवयी हरिणीप्रमाणेंच कीं काय कांपत कांपत नगरामध्यें आली, आणि सचैल स्नान करून आपल्या उद्यानाला लागली ११,१२. हे राजा, ती दृष्टीं पडतांक्षणीं लोक वाट फुटेल तिकडे पळूं लागले आणि गंधर्वांची भीति असल्यामुळें कांहींनीं तर ती दृष्टीं पडतांक्षणीं आपले डोळेच मिटले १३. तदनंतर, हे जनमेजयराजा, जातां जातां मुदपाकाच्या द्वाराशीं मदमत्त झालेला मोठा गजच कीं काय असा तो भीमसेन बसलेला पांचालीनें अवलोकन केला १४; आणि "ज्यानें मुक्तता केली त्या गंधर्वराजाला नमस्कार असो" असें हंसत हंसत हळूं हळूं उभयतांनाच ठाऊक असलेल्या संज्ञा योजून ती ह्मणाली १५. भीमसेन ह्मणतो:— जे ह्या सैरंध्रीच्या आज्ञेप्रमाणें वागणारे पुरुष ह्या विराटनगरामध्यें संचार करीत आहेत ते हें भाषण श्रवण करून आतां "आपण हिच्या ऋणांतून मुक्त झालों आहोंत" असें समजून दिवस काढोत १६. वैशंपायन सांगतात:—तदनंतर विराटराजाच्या कन्येला नृत्यशालेमध्यें नृत्य शिकवीत असतांना आजानुबाहु अर्जुन तिनें

गाराद्विनिष्क्रम्य सहार्जुनाः । कन्या ददृशुरायान्तीं क्लिष्टां कृष्णामनागसम् १८ कन्या ऊचुः । दिष्ट्या सैरन्ध्रि मुक्तासि दिष्ट्यासि पुनरागता । दिष्ट्या विनिहताः सूता ये त्वां क्लिश्यन्त्यनागसम् १९ बृहन्नलोवाच ॥ कथं सैरन्ध्रि मुक्तासि कथं पापाश्च ते हताः । इच्छामि वै तव श्रोतुं सर्वमेव यथातथम् २० सैरन्ध्र्युवाच ॥ बृहन्नले किं नु तव सैरन्ध्र्या कार्यमद्य वै । या त्वं वससि कल्याणि सदा कन्यापुरे सुखम् २१ न हि दुःखं समाप्नोषि सैरन्ध्री यदुपाश्नुते । तेन मां दुःखितामेवं पृच्छसे प्रहसन्निव २२ बृहन्नलोवाच ॥ बृहन्नलापि कल्याणि दुःखमाप्नोत्यनुत्तमम् । तिर्यग्योनिगता बाले न चैनामवबुध्यसे २३ त्वया सहोषिता चास्मि त्वं च सर्वैः सहोषिता । क्लिश्यन्त्यां त्वयि सुश्रोणि को नु दुःखं न चिन्तयेत् २४ न तु केनचिदत्यन्तं कस्यचिद्धृदयं क्वचित् । वेदितुं शक्यते नूनं तेन मां नावबुद्ध्यसे २५ वैशम्पायन उवाच ॥ ततः सहैव कन्याभिर्द्रौपदी राजवेश्म तत् । प्रविवेश सुदेष्णायाः समीपमुपगामिनी २६

अवलोकन केला १७. तों इतक्यांत निरुपद्रवी असूनही क्लेश भोगिलेली सैरंध्री येत आहे असें समजून अर्जुनासहवर्तमान तेथील मुली नृत्यशाळेंतून बाहेर पडून सैरंध्रीकडे पाहूं लागल्या १८. नंतर त्या कन्या ह्मणाल्या " हे सैरंध्रि, कीचकांच्या हातून सुटून तूं पुनरपि परत आलीस हें आमचें सुदैवच होय; आणि तूं निरपराधी असतांना तुला क्लेश देणाऱ्या सूतांचा वध झाला हीही गोष्ट आनंदाचीच होय " १९. बृहन्नला ह्मणतेः—हे सैरंध्रि, तुझी सुटका कशी झाली आणि त्या दुष्टांचा वध कसा झाला हें सर्वच तुझ्यापासून इत्थंभूत श्रवण करण्याची माझी इच्छा आहे २०. सैरंध्री ह्मणतेः—हे कल्याणि बृहन्नले, मुलींच्या अंतःपुरामध्यें नेहमीं खुशाल पडून राहणाऱ्या तुला सैरंध्रीशीं काय करावयाचें आहे ? २१. सैरंध्रीला जें दुःख भोगावें लागत आहे त्याचा तुला कधीं अनुभव नाहीं; ह्यामुळें मी दुःखित झालें असतांनाही तूं मला ह्याप्रमाणें विचारीत आहेस २२. बृहन्नला ह्मणतेः— हे कल्याणि, हे बाले, भलत्याच योनीमध्यें जन्म झाल्यामुळें बृहन्नलेलाही अनिर्वचनीय दुःख होत आहे; परंतु, तिची तुला परीक्षा झाली नाहीं २३. हे सुंदरि, तुझ्याबरोबर मीं कांहीं दिवस काढिलेले आहेत आणि तूंही आह्मां सर्वांच्या बरोबर राहिलेली आहेस. तेव्हां तुला क्लेश होत असतांना कोणाच्या बरें मनाला दुःख वाटणार नाहीं ?२४. कोणीही जरी झाला तरी दुसऱ्याचें हृदय पूर्णपणें खरोखर त्याला कधींही समजून येत नाहीं; ह्यामुळें तूं मला ओळखिलें नाहींस (हें ठीकच आहे)२५. वैशंपायन सांगतातः—तदनंतर सुदेष्णेकडे जाण्याकरितां त्या

तामब्रवीद्राजपुत्री विराटवचनादिदम् । सैरन्ध्रि गम्यतां शीघ्रं यत्र काम-
यसे गतिम् २७ राजा बिभेति ते भद्रे गन्धर्वेभ्यः पराभवात् । त्वं चापि
तरुणी सुभ्रु रूपेणाप्रतिमा भुवि ॥ पुंसामिष्टश्च विषयो गन्धर्वाश्चातिको-
पनाः २८ सैरन्ध्र्युवाच ॥ त्रयोदशाहमात्रं मे राजा क्षम्यतु भामिनी ।
कृतकृत्या भविष्यन्ति गन्धर्वास्ते न संशयः २९ ततो मामुपनेष्यन्ति
करिष्यन्ति च ते प्रियम् । ध्रुवं च श्रेयसा राजा योक्ष्यते सह बान्धवैः ३०
[८५०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां
विराटपर्वणि कीचकवधपर्वणि कीचकदाहे चतुर्विंशोऽध्यायः ॥ २४ ॥

॥ समाप्तं चेदं कीचकवधपर्व ॥

अथ गोहरणपर्व ॥ वैशम्पायन उवाच ॥ कीचकस्य तु घातेन सानु-
जस्य विशाम्पते । अत्याहितं चिन्तयित्वा व्यस्मयन्त पृथग्जनाः १ तस्मि-
न्पुरे जनपदे संजल्पोभूच्च सङ्घशः । शौर्याद्धि वल्लभो राज्ञो महासत्त्वः
स कीचकः २ आसीत्प्रहर्ता सैन्यानां दारामर्शी च दुर्मतिः । स हतः

मुलींच्या बरोबरच द्रौपदी त्या राजमहालामध्यें गेली २६. तेव्हां विराटाच्या सांगण्या-
वरून ती राजकन्या सुदेष्णा तिला ह्मणाली " हे सैरंध्रि, तुला वाटेल तिकडे तूं सत्वर
चालती हो २७. हे कल्याणि, गंधर्वांपासून नाश होईल ह्मणून राजाला तुझ्यासंबंधानें
भीति वाटत आहे. कारण, हे सुंदरि, तूं तरुणी असून रूपानें पृथ्वीमध्यें अप्रतिम
आहेस आणि पुरुषांना विषय प्रिय आहे; परंतु, गंधर्व अतिशयच कोपी आहेत "२८.
सैरंध्री ह्मणते:—हे भामिनि, आणखी तेरा दिवस राजानें मला क्षमा करावी; ह्मणजे ते
गंधर्वही निःसंशय कृतकृत्य होतील २९. तदनंतर मलाही ते आपल्या जवळ
घेऊन जातील; तुझाही मनोरथ ते पूर्ण करितील आणि राजाचेंही बांधवांसहवर्तमान ते
निःसंशय कल्याण करितील ३०. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहा-
भारतांतर्गत विराटपर्वांतील कीचकवधपर्वापैकीं कीचकदहनाविषयीं चोविसावा अध्याय
समाप्त झाला ॥२४॥ ह्याठिकाणीं कीचकवधपर्वही संपूर्ण झालें.

येथून पुढें गोहरणपर्वाला आरंभ झाला. वैशंपायन सांगतात:—हे प्रजापालक जनमे-
जया, पाठच्या भावांसहवर्तमान कीचकाचा वध झाल्यामुळें अतिशय घात झाला
असें मनांत आणून तिन्हाईत लोक विस्मय करीत राहिले १ आणि त्या नगरामध्यें
व देशामध्यें लोक एकत्र जुळून त्याच्यासंबंधानेंच कांहीं दिवस गोष्टी बोलत
राहिले. " तो महाबलाढ्य कीचक शौर्यामुळें राजाला प्रिय होता २. शत्रुसैन्यांचा तो
घातकच होता; परंतु, तो दुर्मति, दुरात्मा व दुष्ट पुरुष परस्त्रियांवर नजर ठेवणारा

खलु पापात्मा गन्धर्वैर्दुष्टपूरुषः ३ इत्यजल्पन्महाराज परानीकविनाशनम् । देशे देशे मनुष्याश्च कीचकं दुष्प्रधर्षणम् ४ अथ वै धार्तराष्ट्रेण प्रयुक्ता ये बहिश्चराः । मृगयित्वा बहून्ग्रामान्राष्ट्राणि नगराणि च ५ संविधाय यथादृष्टं यथादेशप्रदर्शनम् । कृतकृत्या न्यवर्तन्त ते चरा नगरं प्रति ६ तत्र दृष्ट्वा तु राजानं कौरव्यं धृतराष्ट्रजम् । द्रोणकर्णकृपैः सार्धं भीष्मेण च महात्मना ७ संगतं भ्रातृभिश्चापि त्रिगर्तैश्च महारथैः । दुर्योधनं सभामध्ये आसीनमिदमब्रुवन् ८ चरा ऊचुः ॥ कृतोऽस्माभिः परो यत्नस्तेषामन्वेषणे सदा । पाण्डवानां मनुष्येन्द्र तस्मिन्महति कानने ९ निर्जने मृगसंकीर्णे नानाद्रुमलताकुले । लताप्रतानबहुले नानागुल्मसमावृते १० न च विद्मो गता येन पार्थाः सुदृढविक्रमाः । मार्गमाणाः पदन्यासं तेषु तेषु तथा तथा ११ गिरिकूटेषु तुङ्गेषु नानाजनपदेषु च । जनाकीर्णेषु देशेषु खर्वटेषु पुरेषु च १२ नरेन्द्र बहुशोऽन्विष्टा नैव विद्मश्च पाण्डवान् । अत्यन्तं वा विनष्टास्ते भद्रं तुभ्यं नरर्षभ १३ वर्त्मन्यन्वेष्यमाणा वै रथिनां

असल्यामुळेंच खरोखर गंधर्वांनीं त्याचा वध केला" ३. ह्याप्रमाणें, हे जनमेजय महाराजा, त्या शत्रुसेनानाशक कीचकासंबंधानें देशोदेशीं लोक बोलूं लागले ४. इकडे धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनानें बाहेर फिरणारे जे हेर पांडवांकरितां पाठविले होते ते पुष्कळ गांवें, राष्ट्रें व नगरें शोधून ५ आणि काय पाहिलें व कोणते कोणते देश आपण हुडकिले ह्या सर्वांची आठवण ठेवून आपली कामगिरी संपली असें समजून राजधानीप्रत परत आले ६. नंतर, धृतराष्ट्रपुत्र कुरुवंशज दुर्योधनराजा—द्रोण, कर्ण, कृप, महात्मा भीष्म, महारथी त्रिगर्त व भ्राते ह्यांसहवर्तमान—सभेमध्यें बसलेला अवलोकन करून ते त्याला ह्मणाले ७,८ "हे राजा, त्या महावनामध्यें त्या पांडवांचा शोध लावण्याविषयीं आह्मीं पराकाष्ठेचा यत्न करून पाहिला ९. परंतु, मृगांनीं व्याप्त, नानाप्रकारच्या वृक्षांनीं व लतांनीं गजबजलेल्या, लतांच्या वेलांनीं भरलेल्या आणि नानाप्रकारच्या झाकरांनीं आच्छादिलेल्या त्या निर्जन वनामध्यें १० ते महापराक्रमी पार्थ कोणीकडून गेले ह्याचा आह्मांला कांहीं पत्ता लागत नाहीं. उंच उंच पर्वतशिखरें, अनेक देश, लोकांनीं भरलेले प्रदेश, खेडीं, नगरें वगैरे ठिकठिकाणीं त्यांचीं पावलें तरी उमटलीं आहेत कीं काय हें पहात पहात ११,१२, हे राजा, आह्मीं अनेक प्रकारांनीं त्यांचा शोध केला; परंतु, पांडवांचा आह्मांला थांग लागत नाहीं. हे पुरुषश्रेष्ठा, तुझें कल्याण असो. ते आतां अगदीं कायमचेच नाहींसे झाले आहेत १३. हे रथिश्रेष्ठा, हे पुरुषोत्तमा, रथांत बसून जाणाऱ्यांच्याही मार्गानें आह्मीं त्यांचा शोध

रथिसत्तम । न हि विद्मो गतिं तेषां वासं हि नरसत्तम १४ किंचित्कालं मनुष्येन्द्र सूतानामनुगा वयम् । मृगयित्वा यथान्यायं वेदितार्थाः स्म तत्त्वतः १५ प्राप्ता द्वारवतीं सूता विना पार्थैः परन्तप । न तत्र कृष्णा राजेन्द्र पाण्डवाश्च महाव्रताः १६ सर्वथा विप्रनष्टास्ते नमस्ते भरतर्षभ । न हि विद्मो गतिं तेषां वासं वापि महात्मनाम् १७ पाण्डवानां प्रवृत्तिं च विद्मः कर्मापि वा कृतम् । स नः शाधि मनुष्येन्द्र अत ऊर्ध्वं विशाम्पते १८ अन्वेषणे पाण्डवानां भूयः किं करवामहे । इमां च नः प्रियां वीर वाचं भद्रवतीं शृणु १९ येन त्रिगर्ता निहता बलेन महता नृप । सूतेन राज्ञो मत्स्यस्य कीचकेन बलीयसा २० स हतः पतितः शेते गन्धर्वैर्निशि भारत । अदृश्यमानैर्दुष्टात्मा भ्रातृभिः सह सोदरैः २१ प्रियमेतदुपश्रुत्य शत्रूणां च पराभवम् । कृतकृत्यश्च कौरव्य विधत्स्व यदनन्तरम् २२ [८७२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां

केला; परंतु, ते कोणीकडे गेले आणि कोठें वास्तव्य करीत आहेत ह्याचा आह्मांला कांहींच पत्ता लागला नाहीं १४. हे राजा, कांहीं कालपर्यंत आह्मी त्या पांडवांचे सारथ्यांच्या पाळतीवर राहिलों आणि यथायोग्य चौकशी केल्यावर आह्मांला खरोखर त्यांचा शोधही लागला १५. परंतु, हे शत्रुतापना, कुंतीपुत्रांवांचून ते त्यांचे सारथि द्वारकेमध्यें निघून गेले. हे राजाधिराज, तेथें द्रौपदीही नाहीं आणि महाव्रतस्थ पांडवही नाहींत १६. हे भरतवंशजश्रेष्ठा, तुला नमस्कार असो. सर्वस्वीं त्यांचा नाशच झाला आहे. ते महात्मे कोणीकडे गेले हें आह्मांला ठाऊक नाहीं आणि त्यांचें वास्तव्य कोठें आहे ह्याचाही आह्मांला पत्ता लागत नाहीं. १७ इतकेंच नव्हे परंतु, त्यांची वार्ताही आह्मांला समजत नाहीं आणि त्यांच्या हातून अलीकडे झालेलीं कांहीं कृत्येंही आह्मांला माहीत नाहींत. ह्यास्तव, हे राजा, हे प्रजापालका, तूंच इतउत्तर आमचें परिपालन कर १८; आणि पांडवांचा शोध लावण्याविषयीं आह्मीं काय करावें त्याचीही आह्मांला आज्ञा कर. हे वीरा, कल्याणकारक अशी ही प्रिय वार्ता तूं आम्हांपासून श्रवण कर १९. हे राजा, मत्स्यराजाच्या ज्या बलाढ्य कीचकनामक सारथ्यानें आपल्या प्रचंड सामर्थ्यानें त्रिगर्तांचा वध केला २० त्या दुरात्म्या कीचकाला सहोदर भ्रात्यांसहवर्तमान अदृश्य गंधर्वांनीं, हे भरतकुलोत्पन्ना, रात्रीं मारून टाकिलें २१. तस्मात्, ही प्रिय वार्ता श्रवण करून आणि शत्रूंचा नायनाट झाला हेंही ऐकून घेऊन, हे कुरुकुलोत्पन्ना, कृतकृत्य झालेल्या तुला आतां काय करावयाचें असेल तें कर २२.

विराटपर्वणि गोहरणपर्वणि चारप्रत्यागमने पञ्चविंशोध्यायः ॥ २५ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततो दुर्योधनो राजा ज्ञात्वा तेषां वचस्तदा । चिरमन्तर्मना भूत्वा प्रत्युवाच सभासदः १ सुदुःखा खलु कार्याणां गतिर्विज्ञातुमन्ततः । तस्मात्सर्वे निरीक्षध्वं क नु ते पाण्डवा गताः २ अल्पावशिष्टं कालस्य गतभूयिष्ठमन्ततः । तेषामज्ञातचर्यायामस्मिन्वर्षे त्रयोदशे ३ अस्य वर्षस्य शेषं चेद्व्यतीयुरिह पाण्डवाः । निवृत्तसमयास्ते हि सत्यव्रतपरायणाः ४ क्षरन्त इव नागेन्द्राः सर्वे ह्याशीविषोपमाः । दुःखा भवेयुः संरब्धाः कौरवान्प्रति ते ध्रुवम् ५ सर्वे कालस्य वेत्तारः कृच्छ्ररूपधराः स्थिताः। प्रविशेयुर्जितक्रोधास्तावदेव पुनर्वनम् ६ तस्मात्क्षिप्रं बुभूषध्वं यथा तेऽत्यन्तमव्ययम् । राज्यं निर्द्वन्द्वमव्यग्रं निःसपत्नं चिरं भवेत् ७ अथाब्रवीत्ततः कर्णः क्षिप्रं गच्छन्तु भारत । अन्ये धूर्ता नरा दक्षा निभृताः साधुकारिणः ८ चरन्तु देशान्संवीताः

ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं हेरांच्या परत येण्याविषयीं पंचविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २५ ॥

वैशंपायन सांगतातः— त्यांचें बोलणें ऐकून घेतल्यानंतर दुर्योधनराजा मनांतल्या-मनांत पुष्कळ वेळ विचार करून सभासदांना ह्मणाला १ " कर्मांची गति निश्चय-पूर्वक समजणें खरोखर फार कठिण आहे. ह्यास्तव, तुह्मी सर्वजण ते पांडव कोठें गेले आहेत ह्याचा तपास करा २. ह्या तेराव्या वर्षी त्यांच्या अज्ञातवासापैकीं बहुतेक काल लोटलाच; आतां अगदीं थोडकाच अवशिष्ट राहिला आहे ३. ह्या वर्षाचे अव-शिष्ट राहिलेले दिवस जर त्यांनीं येथें काढिले तर ते सत्यरूप व्रताचें परिपालन कर-ण्याविषयीं तत्पर असलेले पांडव आपल्या प्रतिज्ञेंतून पार पडले (असें समजा) ४. प्रतिज्ञा शेवटास गेली ह्मणजे सर्पांप्रमाणें अथवा मदमत्त गजांप्रमाणें असलेले ते सर्वही पांडव क्षुब्ध झाले असतां कौरवांना निःसंशय जड जातील ५. सर्वही समय जाण-णारे असल्यामुळें क्रोध जिंकिलेले ते पांडव ओळखण्यास कठीण असें रूप धारण करून कोठें तरी राहिले असतील. ह्यास्तव, पुनरपि त्यांना वनांत जाण्याचा प्रसंग यावा ६ एतदर्थ तुह्मी सत्वर त्यांना हुडकून काढण्याचें मनामध्यें आणा. ह्मणजे त्यांचा एकदां कायमचाच नायनाट होईल व आपलें राज्य चिरकाल शांत व शत्रुरहित होऊन द्वंद्वापासूनही अलिप्त होईल " ७. ह्यावर कर्ण ह्मणाला " हे भरतकुलोत्पन्ना सुयोधना, काम फत्ते करून येणारे असे दुसरे विश्वासु, दक्ष व धूर्त लोक सत्वर जाऊं द्या ८ आणि वेषांतर करून त्यांना लोकांनीं भरलेल्या

स्फीताञ्जनपदाकुलान् । तत्र गोष्ठीषु रम्यासु सिद्धप्रव्रजितेषु च ९
परिचारेषु तीर्थेषु विविधेष्वाकरेषु च । विज्ञातव्या मनुष्यैस्तैस्तर्कया
सुविनीतया १० विविधैस्तत्परैः सम्यक्तज्ज्ञैर्निपुणसंवृतैः । अन्वेष्टव्याः
सुनिपुणैः पाण्डवाश्छन्नवासिनः ११ नदीकुञ्जेषु तीर्थेषु ग्रामेषु नगरेषु
च । आश्रमेषु च रम्येषु पर्वतेषु गुहासु च १२ अथाग्रजानन्तरजः पाप-
भावानुरागवान् । ज्येष्ठं दुःशासनस्तत्र भ्राता भ्रातरमब्रवीत् १३ येषु नः
प्रत्ययो राजंश्चारेषु मनुजाधिप । ते यान्तु दत्तदेया वै भूयस्तान्परिमा-
र्गितुम् १४ एतच्च कर्णो यत्प्राह सर्वमीहामहे तथा । यथोद्दिष्टं चराः
सर्वे मृगयन्तु यतस्ततः १५ एते चान्ये च भूयांसो देशाद्देशं यथाविधि ।
न तु तेषां गतिर्वासः प्रवृत्तिश्चोपलभ्यते १६ अत्यन्तं वा निगूढास्ते पारं
चोर्मिमतो गताः । व्यालैश्चापि महारण्ये भक्षिताः शूरमानिनः १७
अथवा विषमं प्राप्य विनष्टाः शाश्वतीः समाः । तस्मान्मानसमव्यग्रं

समृद्ध देशामध्यें संचार करूं द्या. त्या त्या देशामध्यें रम्य लोकसमाज, सिद्ध, संन्यासी ९, राजधान्या, तीर्थें आणि नानाप्रकारच्या खाणी ह्यांमध्यें उत्कृष्ट तर्कज्ञानाचा उपयोग करून त्या लोकांनीं त्यांचा शोध लाविला पाहिजे १०. सारांश, ह्याच कार्याविषयीं लक्ष्य देऊन राहिलेल्या, अतिशय बंदोबस्तानें आपलें स्वरूप गुप्त केलेल्या व चारकर्म जाणून त्याविषयीं निपुण असलेल्या अशा नानाप्रकारच्या लोकांनीं गुप्तपणानें वास्तव्य करणाऱ्या पांडवांचा शोध लाविला पाहिजे ११. नदीच्या तीरांवरील कुंजवनें, तीर्थें, गांवें, नगरें, रम्य आश्रम, पर्वत आणि गुहा ह्यांचे ठिकाणीं त्यांनीं पांडवांचा शोध लाविला पाहिजे" १२. ह्यानंतर दुष्ट हेतूची आवड धरणारा जो दुर्योधनाच्या पाठचा भ्राता दुःशासन तो आपल्या ज्येष्ठ भ्रात्याला ह्मणाला १३ "हे प्रजाधिपते राजा, ज्यांच्यावर आपला विश्वास आहे त्या लोकांचें वेतन आधीं चुकतें करून द्या आणि त्यांना त्या पांडवांचा शोध लावण्याकरितां पुनरपि जाऊं द्या १४. कर्णाच्या म्हणण्याप्रमाणेंच सर्व कांहीं करण्याची आमची इच्छा आहे. ह्यास्तव, सर्वही हेरांना आपल्या मनाप्रमाणें ठिकठिकाणीं पांडवांचा शोध करूं द्या १५. ह्या हेरांना आणि इतरही पुष्कळ हेरांना ह्या देशापासून त्या देशांत पांडवांचा शोध लावण्याकरितां योग्य रीतीनें हिंडलें पाहिजे. अथवा, त्यांचें वास्तव्य कोठें आहे आणि त्यांची हकीकत काय आहे ह्याचा अगदींच कांहीं पत्ता लागत नाहीं १६. ह्यामुळें, ते कोठें तरी अत्यंत गुप्तपणें राहिले असावेत; समुद्राच्या पलीकडे तरी निघून गेले असावेत; शूरत्वाच्या घमेंडीमध्येंच असलेल्या त्या पांडवांना महारण्यामध्यें श्वापदांनींही

कृत्वा त्वं कुरुनन्दन । कुरु कार्यं महोत्साहं मन्यसे यन्नराधिप १८
[८९०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वणि कर्णदुःशासनवाक्ये षड्विंशोध्यायः ॥ २६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ अथाब्रवीन्महावीर्यो द्रोणस्तत्त्वार्थदर्शिवान् । न तादृशा विनश्यन्ति न प्रयान्ति पराभवम् १ शूराश्च कृतविद्याश्च बुद्धिमन्तो जितेन्द्रियाः । धर्मज्ञाश्च कृतज्ञाश्च धर्मराजमनुव्रताः २ नीति-, धर्मार्थतत्त्वज्ञं पितृवच्च समाहितम् । धर्मे स्थितं सत्यधृतिं ज्येष्ठं ज्येष्ठानुयायिनः ३ अनुव्रता महात्मानं भ्रातरो भ्रातरं नृप । अजातशत्रुं श्रीमन्तं सर्वभ्रातॄननुव्रतम् ४ तेषां तथा विधेयानां निभृतानां महात्मनाम् । किमर्थं नीतिमान्पार्थः श्रेयो नैषां करिष्यति ५ तस्माद्यत्नात्प्रतीक्षन्ते कालस्योदयमागतम् । न हि ते नाशमृच्छेयुरिति पश्याम्यहं धिया ६ सांप्रतं चैव यत्कार्यं तच्च क्षिप्रमकालिकम् । क्रियतां साधु संचिन्त्य

भक्षण करून टाकिलें असलें पाहिजे १७ किंवा दुःसह दुःख प्राप्त झाल्यामुळें ते कायमचे तरी नाहींसे झाले असेल पाहिजेत. ह्यास्तव, हे कुरुनंदना राजा, तूं आपल्या मनांतील काळजी सोडून दे आणि जें काय तुला करावेंसें वाटत आहे तें मोठ्या उत्साहानें कर १८. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं कर्ण व दुःशासन ह्यांच्या भाषणाविषयीं सव्विसावा अध्याय समाप्त झाला ॥ २६ ॥

वैशंपायन सांगतातः—तदनंतर खरी खरी वस्तुस्थिति जाणणारे महावीर्यवान् द्रोणाचार्य ह्मणाले " तशा प्रकारचे पुरुष नाशही पावणार नाहींत आणि त्यांना कधीं अपयशही येणार नाहीं १. ते शूर, विद्वान्, बुद्धिमान्, जितेंद्रिय, धर्मवेत्ते व कृतज्ञ असून धर्मराजाला अनुसरून वागणारे आहेत २. सारांश, नीति, धर्म आणि अर्थ ह्यांचें तत्त्व जाणणाऱ्या, पित्याप्रमाणें मानल्या गेलेल्या आणि सत्याचें अवलंबन करून धर्माच्या आश्रयानें राहिलेल्या आपल्या ज्येष्ठ भ्रात्याला अनुसरून ते वागणारे आहेत ३. हे राजा, शत्रु ह्मणून ज्याना कोणी उत्पन्न झालेलाच नाहीं असा जो वैभवशाली व सर्व भ्रात्यांच्या कल्याणाविषयीं तत्पर असलेला महात्मा युधिष्ठिर भ्राता त्यालाच अनुसरून ते वागणारे आहेत ४. अशा प्रकारानें ते महात्मे पांडव जर धर्मराजावर विश्वास टाकून त्याच्या आज्ञेंत वागत आहेत तर तो नीतिमान् कुंतीपुत्र धर्मराजा त्यांचें कल्याण कां बरें करणार नाहीं ? ५. तस्मात्, अभ्युदय काल येण्याची ते सावधपणानें वाट पाहत असतील; ते नाश पावणार नाहींत असें माझ्या बुद्धीला वाटतें ६.

वासश्चैषां प्रचिन्त्यताम् ७ यथावत्पाण्डुपुत्राणां सर्वार्थेषु धृतात्मनाम् । दुर्ज्ञेयाः खलु शूरास्ते दुरापास्तपसा वृताः ८ शुद्धात्मा गुणवान्पार्थः सत्यवान्नीतिमाञ्शुचिः । तेजोराशिरसंख्येयो गृह्णीयादपि चक्षुषा ९ विज्ञाय क्रियतां तस्माद्भूयश्च मृगयामहे । ब्राह्मणैश्चारकैः सिद्धैर्ये चान्ये तद्विदो जनाः १० [९००] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वणि द्रोणवाक्ये चारप्रत्याचारे सप्तविंशोऽध्यायः ॥ २७ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततः शान्तनवो भीष्मो भरतानां पितामहः । श्रुतवान्देशकालज्ञस्तत्त्वज्ञः सर्वधर्मवित् १ आचार्यवाक्योपरमे तद्वाक्यमभिसंदधत् । हितार्थं समुवाचैनां भारतीं भारतान्प्रति २ युधिष्ठिरे समासक्तां धर्मज्ञे धर्मसंवृताम् । असत्सु दुर्लभां नित्यं सतां चाभिमतां सदा ३ भीष्मः समं वदत्तत्र गिरं साधुभिरर्चिताम् । यश्चैष ब्राह्मणः

ह्यास्तव, सांप्रत जें कांहीं कर्तव्य असेल तें यत्किंचितूही विलंब न करितां चांगला विचार करून सत्वर करा आणि कोणतीही गोष्ट प्राप्त झाली असतां ती सहन करण्यास तयार होणाऱ्या त्या पांडुपुत्रांचें वास्तव्य कोठें आहे ह्याचेंही अनुमान करा. त्या शूर पांडवांचें तपानें रक्षण झालें असल्यामुळें खरोखर त्यांचा शोध लागणें कठीण आहे ७,८. शुद्ध अंतःकरणानें युक्त, गुणी, सत्यवान्, नीतिमान्, शुचि, तेजोराशि आणि अतुल असा तो कुंतीपुत्र धर्मराज, कोणाच्या प्रत्यक्ष दृष्टीं पडला तरी सुद्धां त्याला मोह पाडील ९. तस्मात्, काय करावयाचें तें विचारानें करा. ब्राह्मण, सिद्ध आणि इतरही जे त्यांना ओळखणारे लोक असतील त्यांना हेर ह्या नात्यानें पाठवून आपणांला पुनरपि त्यांचा शोध केला पाहिजे १०. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं चारांना परत पाठविण्यासंबंधानें द्रोणांनीं केलेल्या संभाषणाविषयीं सत्ताविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २७ ॥

वैशंपायन सांगतातः—तदनंतर भरतकुलोत्पन्न कौरवपांडवांचा पितामह जो अध्ययनसंपन्न, देश व काल जाणणारा, सर्व धर्मवेत्ता व तत्त्वज्ञ शांतनव भीष्म तो १ द्रोणाचार्यांचें भाषण संपूर्ण झाल्यावर त्या भाषणालाच अनुसरून हिताकरितां त्या भरतकुलोत्पन्न कौरवांशीं भाषण करूं लागला २. धर्माला अनुसरून असलेलें त्याचें भाषण धर्मज्ञ युधिष्ठिराला अनुलक्षून होतें; सज्जनांना तें सर्वदां संमत होण्यासारिखें होतें; आणि दुर्जनांमध्यें तें कधींही प्राप्त होणारें नव्हतें ३. सारांश, सज्जनांना मान्य अशा वाणीचें अवलंबन करून कोणाचाही पक्षपात न धरितां भीष्म ह्मणाला " सर्व

प्राह द्रोणः सर्वार्थतत्त्ववित् ४ सर्वलक्षणसंपन्नाः साधुव्रतसमन्विताः । श्रुतव्रतोपपन्नाश्च नानाश्रुतिसमन्विताः ५ वृद्धानुशासने युक्ताः सत्यव्रतपरायणाः । समयं समयज्ञास्ते पालयन्तः शुचिव्रताः ६ क्षत्रधर्मरता नित्यं केशवानुगताः सदा । प्रवीरपुरुषास्ते वै महात्मानो महाबलाः ७ नावसीदितुमर्हन्ति उद्वहन्तः सतां धुरम् ८ धर्मतश्चैव गुप्तास्ते सुवीर्येण च पाण्डवाः । न नाशमधिगच्छेयुरिति मे धीयते मतिः ९ तत्र बुद्धिं प्रवक्ष्यामि पाण्डवान्प्रति भारत । न तु नीतिः सुनीतस्य शक्यतेऽन्वेषितुं परैः १० यत्तु शक्यमिहास्माभिस्तान्वै संचिन्त्य पाण्डवान् । बुद्ध्या प्रयुक्तं न द्रोहात्प्रवक्ष्यामि निबोध तत् ११ न त्वियं मादृशैर्नीतिस्तस्य वाच्या कथंचन । सा त्वियं साधु वक्तव्या न त्वनीतिः कथंचन १२ वृद्धानुशासने तात तिष्ठता सत्यशीलिना । अवश्यं त्विह धीरेण सतां मध्ये विवक्षता १३ यथार्हमिह वक्तव्यं सर्वथा धर्मलिप्सया । तत्र नाहं

गोष्टींचें तत्त्व जाणणाऱ्या ह्या ब्राह्मण द्रोणाच्या सांगण्याप्रमाणें ४ सर्व लक्षणांनीं युक्त, सदाचारसंपन्न, विद्वान्, तपस्वी, नानाप्रकारच्या श्रुतींनीं युक्त ५, वृद्धांच्या आज्ञेविषयीं तत्पर, सत्यरूप व्रताचेंच अवलंबन करणारे, समय जाणणारे, प्रतिज्ञेचें परिपालन करणारे, निर्मल व्रतानें वागणारे ६, नेहमीं क्षत्रियधर्माविषयीं तत्पर असलेले, सर्वदा केशवाच्या अनुमतानें वागणारे आणि सज्जनांचा धर्म चालविणारे असे ते पुरुषश्रेष्ठ महाबलाढ्य महात्मे पांडव असल्यामुळें त्यांचा नाश होण्यास पात्र नाहींत ७, ८. धर्मानें व वीर्यानें पांडवांचें रक्षण झालें असल्यामुळें त्यांचा नाश होणार नाहीं असें माझ्या बुद्धीला वाटतें ९. हे भरतकुलोत्पन्ना, पांडवांच्या संबंधानें मी तुला आपला विचार सांगतों. उत्कृष्ट नीतीनें वागणाऱ्या पुरुषाच्या नीतीचें अवलंबन इतर अनीतिमान् पुरुषांच्या हातून होणें शक्य नाहीं १०. त्या पांडवांसंबंधानें विचार करून पाहिलें असतां जें आमच्या हातून होणें शक्य आहे तें मी तुमच्याशीं द्रोहबुद्धि न धरितां तुह्मांला विचार करण्यास योग्य असें सांगतों तें श्रवण करा ११. ही नीति जो दुर्जन असेल त्याला माझ्यासारिख्यांनीं कधींही सांगतां उपयोगीं नाहीं; सज्जनांनाच ही सांगितली पाहिजे आणि अनीति तर माझ्यासारिख्यांनीं कोणालाही सांगतां उपयोगीं नाहीं १२. बा दुर्योधना, वृद्धांच्या सांगण्याप्रमाणें जो वागत असतो, सत्याचें अवलंबन करणें हें ज्याचें शील आहे आणि सज्जनांमध्यें भाषण करण्याची ज्याला इच्छा आहे त्या ज्ञानी पुरुषानें सर्वथा धर्मबुद्धि मनामध्यें आणून काय बोलावयाचें

तथा मन्ये यथायमितरो जनः । निवासं धर्मराजस्य वर्षेऽस्मिन्वै त्रयोदशे १४ तत्र तात न तेषां हि राज्ञां भाव्यमसांप्रतम् । पुरे जनपदे चापि यत्र राजा युधिष्ठिरः १५ दानशीलो वदान्यश्च निभृतो ह्रीनिषेवकः । जनो जनपदे भाव्यो यत्र राजा युधिष्ठिरः १६ प्रियवादी सदा दान्तो भव्यः सत्यपरो जनः । हृष्टः पुष्टः शुचिर्दक्षो यत्र राजा युधिष्ठिरः १७ नासूयको न चापीर्षुर्नाभिमानी न मत्सरी । भविष्यति जनस्तत्र स्वयं धर्ममनुव्रतः १८ ब्रह्मघोषाश्च भूयांसः पुर्णाहुत्यस्तथैव च । क्रतवश्च भविष्यन्ति भूयांसो भूरिदक्षिणाः १९ सदा च तत्र पर्जन्यः सम्यग्वर्षी न संशयः । संपन्नसस्या च मही निरातङ्का भविष्यति २० गुणवन्ति च धान्यानि रसवन्ति फलानि च । गन्धवन्ति च माल्यानि शुभशब्दा च भारती २१ वायुश्च सुखसंस्पर्शो निष्प्रतीपं च दर्शनम् । न भयं त्वाविशेत्तत्र यत्र राजा युधिष्ठिरः २२ गावश्च बहुलास्तत्र न कृशा न च दुर्बलाः । पयांसि दधिसर्पींषि रसवन्ति हितानि च २३ गुणवन्ति च पेयानि भोज्यानि

असेल तें यथायोग्यच बोलावें. ह्या तेराव्या वर्षामध्यें धर्मराजाच्या वास्तव्यासंबंधानें ह्या इतरलोकांना जसें वाटत आहे तसें मला वाटत नाहीं १३, १४. बा दुर्योधना, ज्या देशामध्यें अथवा नगरामध्यें युधिष्ठिरराजा रहात असेल तेथील राजांचें अकल्याण होणार नाहीं १५. ज्या देशामध्यें युधिष्ठिरराजा वास्तव्य करीत असेल त्या देशांतील लोक दानशील, उदार, विश्वासु आणि विनयी असतील १६. जेथें युधिष्ठिरराजाचें वास्तव्य असेल तेथें लोक नेहमीं प्रियवचनी, जितेंद्रिय, सत्याविषयीं तत्पर, तुष्ट, पुष्ट, शुचि, दक्ष आणि समृद्ध असतील १७. ज्या ठिकाणीं युधिष्ठिर असेल त्या ठिकाणीं लोक आपण होऊनच धर्माला अनुसरून वागूं लागतील; दुसऱ्यांच्या गुणावर दोषांचा आरोप करणारा, दुसऱ्यांचा उत्कर्ष सहन न होणारा, अभिमानी अथवा दुसऱ्याशीं द्रोह करणारा असाही कोणी पुरुष रहाणार नाहीं १८. पुष्कळ वेदघोष तेथें सुरू होतील; पूर्णाहुति चालू होतील; विपुल दक्षिणेनें युक्त असे क्रतुहीं पुष्कळ होऊं लागतील १९; तेथें पर्जन्य निःसंशय नेहमीं चांगलीच वृष्टि करूं लागेल; पृथ्वी रोगरहित व धान्यानें समृद्ध होईल २०; धान्यें गुणयुक्त होतील; फळें रसयुक्त होतील; पुष्पें सुगंधीं होतील; लोकांची भाषाही शुभ शब्दांनींच युक्त होईल २१; वायु सुखावह वाहूं लागेल; लोकांच्या ज्ञानाला कांहींएक आडकाठी रहाणार नाहीं आणि त्याचप्रमाणें जेथें युधिष्ठिरराजा असेल तेथें लोकांना कसलें भयही प्राप्त होणार नाहीं २२. तेथें गाईंची समृद्धि होईल; गाई कृश अथवा दुर्बल

रसवन्ति च । तत्र देशे भविष्यन्ति यत्र राजा युधिष्ठिरः २४ रसाः स्पर्शाश्च गन्धाश्च शब्दाश्चापि गुणान्विताः । दृश्यानि च प्रसन्नानि यत्र राजा युधिष्ठिरः २५ धर्माश्च तत्र सर्वैस्तु सेविताश्च द्विजातिभिः । स्वैः स्वैर्गुणैश्च संयुक्ता अस्मिन्वर्षे त्रयोदशे २६ देशे तस्मिन्भविष्यन्ति तात पाण्डवसंयुते । संप्रीतिमाञ्जनस्तत्र संतुष्टः शुचिरव्ययः २७ देवतातिथिपूजासु सर्वभावानुरागवान् । इष्टदानो महोत्साहः स्वस्वधर्मपरायणः २८ अशुभाद्धि शुभप्रेप्सुरिष्टयज्ञः शुभव्रतः । भविष्यति जनस्तत्र यत्र राजा युधिष्ठिरः २९ त्यक्तवाक्यानृतस्तात शुभकल्याणमङ्गलः । शुभार्थेप्सुः शुभमतिर्यत्र राजा युधिष्ठिरः ३० भविष्यति जनस्तत्र नित्यं चेष्टप्रियव्रतः ३१ धर्मात्मा शक्यते ज्ञातुं नापि तात द्विजातिभिः । किं पुनः प्राकृतैस्तात पार्थो विज्ञायते क्वचित् ३२ यस्मिन्सत्यं धृतिर्दानं परा शान्तिर्ध्रुवा क्षमा । ह्रीः श्रीः कीर्तिः परं तेज आनृशंस्यमथार्जवम् ३३ तस्मात्तत्र निवासं

राहणार नाहींत, दूध, दही व तूप हें रसयुक्त व हितकारक होईल २३; पेयद्रव्यें गुणयुक्त होतील आणि ज्या देशामध्यें युधिष्ठिरराजा असेल त्या देशांत भोज्यद्रव्येंही रसयुक्त होतील २४. जेथें युधिष्ठिरराजा असेल तेथें शब्द, स्पर्श, गंध व रस हे गुणयुक्त होऊन रूपेंही आल्हादकारक होतील २५; सर्व द्विज तेथें धर्माचें सेवन करितील आणि, बा दुर्योधना, पांडव ह्या तेराव्या वर्षी ज्या देशांत असतील त्या देशांत धर्मकृत्यांचें फलही येत असेल व लोक संतुष्ट, शुद्ध, हानिरहित आणि आनंदी असतील २६,२७. ज्या ठिकाणीं युधिष्ठिर राजा असेल त्या ठिकाणीं लोकांचें, देवता व अतिथि ह्यांच्या पूजनाविषयीं, अगदीं मनापासून प्रेम बसेल; दान देणें त्यांना प्रिय वाटूं लागेल; मोठा उत्साह त्यांना प्राप्त होईल; आपआपल्या धर्माविषयीं ते तत्पर होऊं लागतील; अशुभाचा त्याग करून ते शुभाची इच्छा धरूं लागतील; यज्ञयाग त्यांना प्रिय होतील आणि त्यांचें आचरणही शुद्ध होईल २८,२९. त्याचप्रमाणें जेथें युधिष्ठिर राजा असेल तेथें, बा दुर्योधना, लोक अनृत भाषण सोडून देतील; त्यांचें शुभ, कल्याण व मंगल होऊं लागेल; शुभ गोष्टींचीच त्यांना इच्छा होऊं लागेल आणि त्यांची मतिही शुभ होईल ३०. ज्या ठिकाणीं युधिष्ठिर राजा वास्तव्य करीत असेल त्या ठिकाणीं लोकांना यज्ञ, याग वगैरेच नेहमीं प्रिय होऊं लागतील ३१; परंतु, बा दुर्योधना, धर्मात्मा युधिष्ठिर अज्ञातवासामध्यें द्विजांनाही ओळखतां येणार नाहीं. मग, बा दुर्योधना, सामान्य जनांना तो कुंतीपुत्र कोठेंही असला तरी ओळखतां येण्याची गोष्ट पाहिजे कशाला ? ३२. सत्य, धैर्य, दान, पराकाष्ठेची शांति,

तु च्छन्नं यत्नेन धीमतः । गतिं च परमां तत्र नोत्सहे वक्तुमन्यथा ३४ एवमेतत्तु संचिन्त्य यत्कृते मन्यसे हितम् । तत्क्षिप्रं कुरु कौरव्य यद्येवं श्रद्दधासि मे ३५ [१३५] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वणि चारप्रत्याचारे भीष्मवाक्ये-ष्टाविंशोध्यायः ॥ २८ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततः शारद्वतो वाक्यमित्युवाच कृपस्तदा । युक्तं प्राप्तं च वृद्धेन पाण्डवान्प्रति भाषितम् १ धर्मार्थसहितं श्लक्ष्णं तत्त्वतश्च सहेतुकम् । तत्रानुरूपं भीष्मेण ममाप्यत्र गिरं शृणु २ तेषां चैव गतिस्तीर्थैर्वासश्चैषां प्रचिन्त्यताम् । नीतिर्विधीयतां चापि सांप्रतं या हिता भवेत् ३ नावज्ञेयो रिपुस्तात प्राकृतोपि बुभूषता । किं पुनः पाण्डवास्तात सर्वास्त्रकुशला रणे ४ तस्मात्सत्रं प्रविष्टेषु पाण्डवेषु महात्मसु । गूढभावेषु च्छन्नेषु काले चोदयमागते ५ स्वराष्ट्रे परराष्ट्रे च ज्ञातव्यं

अक्षय्य क्षमा, विनय, वैभव, कीर्ति, उत्कृष्ट तेज, सुजनता आणि सरलता ३३ हीं ज्या ठिकाणीं असतील त्या ठिकाणीं विचारी युधिष्ठिर गुप्तपणें वास्तव्य करीत आहे असें तूं समज; आणि मुख्यतः तूं तिकडेच गमन कर. अन्यथा भाषण करण्याची माझी इच्छा नाहीं ३४. ह्याप्रमाणें ह्याचा विचार करून मग जें तुला हितावह वाटेल तें तूं, हे कुरुकुलोत्पन्ना दुर्योधना, माझ्यावर विश्वास असेल तर, सत्वर कर ३५. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं हेरांना परत पाठविण्यासंबंधानें भीष्माच्या भाषणाविषयीं अठ्ठाविसावा अध्याय समाप्त झाला ॥ २८ ॥

वैशंपायन सांगतातः—तदनंतर शारद्वत कृप ह्मणाले " वृद्ध भीष्मानें पांडवांसंबंधानें केलेलें भाषण योग्य व कालाला अनुरूप असेंच आहे १. सारांश, भीष्मानें केलेलें भाषण खरोखर कळकळीचें, योग्य, स्पष्ट आणि धर्म व अर्थ ह्यांना अनुसरून आहे. आतां माझेंही भाषण तूं श्रवण कर २. ते कोणीकडे गेले आहेत आणि त्यांचें वास्तव्य कोठें आहे ह्याचा तुह्मी हेरांच्या द्वारानें शोध करा आणि सांप्रत जी नीति हितावह होईल तिचें तुह्मी अवलंबन करा ३. बाबारे, शत्रु यःकश्चित् जरी असला तरी अभ्युदयेच्छु पुरुषानें त्याची कधीं उपेक्षा करितां उपयोगीं नाहीं; मग, बा दुर्योधना, रणसंबंधीं सर्व अस्त्रांमध्यें कुशल असलेल्या पांडवांच्या उपेक्षेची गोष्ट पाहिजे कशाला ? ४. तस्मात्, मायेचें अवलंबन केलेले महात्मे पांडव आपले आशय गुप्त ठेवून उदयकाल येईपर्यंत गुप्तपणानें वास्तव्य करीत आहेत तोंच ५

बलमात्मनः । उदयः पाण्डवानां च प्राप्ते काले न संशयः ६ निवृत्तसमयाः पार्था महात्मानो महाबलाः । महोत्साहा भविष्यन्ति पाण्डवा ह्यमितौजसः ७ तस्माद्बलं च कोशश्च नीतिश्चापि विधीयताम् । यथाकालोदये प्राप्ते सम्यक्तैः संदधामहे ८ तात बुद्ध्यापि तत्सर्वं बुध्यस्व बलमात्मनः । नियतं सर्वमित्रेषु बलवत्स्वबलेषु च ९ उच्चावचं बलं ज्ञात्वा मध्यस्थं चापि भारत । प्रहृष्टमप्रहृष्टं च संदधाम तथा परैः १० साम्ना भेदेन दानेन दण्डेन बलिकर्मणा । न्यायेनाक्रम्य च परान्बलाच्चानम्य दुर्बलान् ११ सान्त्वयित्वा तु मित्राणि बलं चाभाष्यतां सुखम् । सुकोशबलसंवृद्धः सम्यक्सिद्धिमवाप्स्यसि १२ योत्स्यसे चापि बलिभिररिभिः प्रत्युपस्थितैः । अन्यैस्त्वं पाण्डवैर्वापि हीनैः स्वबलवाहनैः १३ एवं सर्वं विनिश्चित्य व्यवसायं स्वधर्मतः । यथाकालं मनुष्येन्द्र चिरं

परदेशामध्यें आणि स्वदेशामध्यें आपलें सैन्य किती आहे ह्याचा विचार तुला अवश्य केला पाहिजे. कारण, योग्य काल प्राप्त झाला असतां पांडव निःसंशय प्रकट होतील ६. महाबलाढ्य आणि अतुलतेजस्वी महात्मे कुंतीपुत्र पांडव प्रतिज्ञा पार पाडिल्यानंतर मोठ्या उत्साहानें प्रकट होतील ७. तस्मात्, सैन्य, कोश आणि नीति ह्यांची चांगली व्यवस्था ठेवा. कारण, कालगतीनें ते प्रकट झाले असतां आपणांला त्यांच्याशीं प्रसंग येईल ८. ह्यास्तव, बा दुर्योधना, सर्व बलाढ्य व दुर्बल मित्रांजवळ आणि स्वतःजवळ मिळून सर्व सैन्य किती आहे ह्याचा तूं नीट विचारपूर्वक शोध लाव ९. तात्पर्य, हे भरतकुलोत्पन्ना दुर्योधना, आपलें सैन्य उत्कृष्ट किती आहे, निकृष्ट किती आहे मध्यमप्रतीचें किती आहे आणि त्यांतही संतुष्ट किती आहे व असंतुष्ट किती आहे, हा विचार करून आपणांला शत्रूंशीं प्रसंग केला पाहिजे १०. साम, दान, भेद, दंड आणि खंडणी ह्या उपायांनीं यथायोग्य रीतीनें तुला शत्रूंना पादाक्रांत केले पाहिजेत; दुर्बल शत्रूंना बलात्कारानें वाकविलें पाहिजे ११; मित्रांचें सांत्वन केलें पाहिजे; सैन्याशीं सुखाचा शब्द बोलला पाहिजे आणि खजिना व सैन्य हीं चांगलीं वर्धनस्थितींत ठेविलीं पाहिजेत; ह्मणजे तुझा मनोरथ चांगल्या रीतीनें सिद्धीस जाईल १२. सारांश, अशारीतीनें तूं तजवीज ठेविलीस ह्मणजे उपस्थित झालेल्या इतर बलाढ्य शत्रूंशींही तूं युद्ध करिशील अथवा स्वकीय सैन्य आणि वाहनें ज्यांच्यापाशीं नाहींत अशा पांडवांशींही तूं युद्ध करिशील १३. तस्मात्, हें सर्व लक्ष्यांत आणून आणि आपल्या क्षात्रधर्माला अनुरूप असें आपलें कर्तव्य मनामध्यें आणून तूं कालाप्रमाणें वाग. ह्मणजे, हे दुर्योधनराजा, तुला चिरकाल सुख प्राप्त

सुखमवाप्स्यसि १४ [९४९] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वणि चारप्रत्याचारे कृपवाक्य एकोनत्रिंशोध्यायः ॥ २९ ॥

वैशम्पायन उवाच ॥ अथ राजा त्रिगर्तानां सुशर्मा रथयूथपः । प्राप्तकालमिदं वाक्यमुवाच त्वरितो बली १ असकृन्निकृताः पूर्वं मत्स्यशाल्वेयकैः प्रभो । सूतेनैव च मत्स्यस्य कीचकेन पुनःपुनः २ बाधितो बन्धुभिः सार्धं बलाद्बलवतां विभो । स कर्णमभ्युदीक्ष्याथ दुर्योधनमभाषत ३ असकृन्मत्स्यराज्ञा मे राष्ट्रं बाधितमोजसा । प्रणेता कीचकस्तस्य बलवानभवत्पुरा ४ क्रूरोमर्षी स दुष्टात्मा भुवि प्रख्यातविक्रमः । निहतः स तु गन्धर्वैः पापकर्मा नृशंसवान् ५ तस्मिन्विनिहते राजा हतदर्पो निराश्रयः । भविष्यति निरुत्साहो विराट इति मे मतिः ६ तत्र यात्रा मम मता यदि ते रोचतेनघ । कौरवाणां च सर्वेषां कर्णस्य च महात्मनः ७ एतत्प्राप्तमहं मन्ये कार्यमात्ययिकं हि नः । राष्ट्रं तस्या-

---

होईल १४. ह्यप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं हेरांना परत पाठविण्यासंबंधानें कृपाचार्यांच्या भाषणाविषयीं एकुणतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ २९ ॥

वैशंपायन सांगतातः—कृपाचार्यांचें भाषण झाल्यानंतर रथ्यांच्या समुदायाचें परिपालन करणारा त्रिगर्तदेशाचा राजा बलाढ्य सुशर्मा त्वरा करून ह्मणाला १ " हे प्रभो, मत्स्यांनीं व शाल्वांनीं पूर्वीं अनेकवेळां आमचें निराकरण केलेलें आहे आणि त्याचप्रमाणें मत्स्यराजाच्या कीचकनामक सारथ्यानें बलाढ्य कौरवांचा प्रभु भीष्म समीप असतांनाही बंधूंसहवर्तमान वारंवार बलात्कारानें मला पीडा दिलेली आहे ". इतकें झाल्यानंतर कर्णाच्या तोंडाकडे पाहून तो पुनरपि दुर्योधनाला ह्मणाला २,३ " मत्स्यराज विराटानें अनेकवेळां माझ्या राष्ट्राला स्वसामर्थ्यानें पीडा दिलेली आहे. कारण, बलाढ्य कीचक पूर्वीं त्याच्या सैन्याचा नायक होता ४. परंतु, पृथ्वीमध्यें पराक्रमाविषयीं प्रख्यात असलेल्या त्या पापकर्मी, दुष्ट, क्रूर, कोपिष्ठ व दुरात्म्या कीचकाचा गंधर्वांच्या हातून वध झाला आहे ५; आणि त्याचा वध झाल्याकारणानें विराटराजाचा आश्रय नाहींसा झाला असल्यामुळें आतां त्याचा गर्व नाहींसा होऊन तो निरुत्साही होईल असें मला वाटतें ६. तस्मात्, हे निष्पापा, तुला, सर्व कौरवांना आणि महात्म्या कर्णाला रुचत असेल तर त्या विराटावर स्वारी करावी असें माझें मत आहे ७. सारांश, सांप्रत हें आपलें अगदीं अवश्य कार्य

भियास्यामो बहुधान्यसमाकुलम् ८ आदद्मोस्य रत्नानि विविधानि वसूनि च । ग्रामान्राष्ट्राणि वा तस्य हरिष्यामो विभागशः ९ अथवा गोसहस्राणि शुभानि च बहूनि च। विविधानि हरिष्यामः प्रतिपीड्य पुरं बलात् १० कौरवैः सह संगत्य त्रिगर्तैश्च विशांपते । गास्तस्यापहरामोद्य सर्वैश्चैव सुसंहताः ११ संविभागेन कृत्वा तु निबध्नीमोस्य पौरुषम् । हत्वा चास्य चमूं कृत्स्नां वशमेवानयामहे १२ तं वशे न्यायतः कृत्वा सुखं वत्स्यामहे वयम् । भवतां बलवृद्धिश्च भविष्यति न संशयः १३ तच्छ्रुत्वा वचनं तस्य कर्णो राजानमब्रवीत् । सूक्तं सुशर्मणा वाक्यं प्राप्तकालं हितं च नः १४ तस्मात्क्षिप्रं विनिर्यामो योजयित्वा वरूथिनीम् । विभज्य चाप्यनीकानि यथा वा मन्यसेनघ १५ प्राज्ञो वा कुरुवृद्धोयं सर्वेषां नः पितामहः । आचार्यश्च यथा द्रोणः कृपः शारद्वतस्तथा १६ मन्यन्ते ते यथा सर्वे तथा यात्रा विधीयताम् । संमन्त्र्य चाशु गच्छामः साधनार्थं महीपतेः १७

आहे असें मला वाटतें. ह्यास्तव, विपुल धान्यानें भरलेल्या त्याच्या राष्ट्रावर आपण स्वारी करूं ८; त्याचीं रत्नें आणि नानाप्रकारच्या संपत्ति आपण हिसकावून घेऊं आणि त्याचे गांव व राष्ट्रें आपण हरण करून वाटून घेऊं ९. अथवा आपल्या सामर्थ्यानें त्याच्या नगराला पीडा देऊन त्याच्यापाशीं असलेल्या नानाप्रकारच्या अनेक सहस्र शुभ गाई आपण हरण करूं १०. हे प्रजापालक दुर्योधनराजा, कौरव व त्रिगर्त बरोबर घेऊन आणि इतरही सर्व आपल्या आप्तांसहवर्तमान आपण चांगली तयारी करून आज त्याच्या गाई हरण करूं ११. आपल्या सैन्याचे वेगवेगळे भाग करून आपण ह्याचा पराक्रम हाणून पाडूं आणि संपूर्ण सैन्याचा वध करून ह्याला अगदीं आपल्या स्वाधीनच करून घेऊं १२. ह्या न्यायानें त्याला आपल्या अधीन करून घेतल्यावर आपलें वास्तव्य सुखानें होईल आणि तुमच्याही सैन्यांत निःसंशय भर पडेल" १३. हें त्याचें भाषण श्रवण केल्यावर कर्ण दुर्योधनराजाला ह्मणाला "कालाला अनुरूप आणि आपणांला हितकारक असें चांगलें भाषण सुशर्म्यानें केलें आहे १४. ह्यास्तव, सैन्य सज्ज करून आपण सत्वर बाहेर पडूं कसे. हे निष्पापा, सैन्यांच्या टोळ्या टोळ्या करून अथवा तुझी इच्छा असेल त्याप्रमाणें आपण स्वारी करूं १५. अथवा आपणासर्वांचा पितामह असा हा कुरूंमध्यें वृद्ध असलेला भीष्म ज्ञाता आहे आणि आचार्य द्रोण व शारद्वत कृप हेही तसेच आहेत १६. तस्मात्, त्या सर्वांचें जसें मत असेल तशी तुह्मी स्वारीची व्यवस्था ठेवा; (त्रिगर्तराज सुशर्म्याच्या सांगण्याचा) विचार करून आपण सत्वर भूपति विराटाला आपल्या मुठींत आणण्याकरितां निघालें पाहिजे १७.

किं च नः पाण्डवैः कार्यं हीनार्थबलपौरुषैः । अत्यन्तं वा प्रनष्टास्ते प्राप्ता वापि यमक्षयम् १८ यामो राजन्निरुद्विग्ना विराटनगरं वयम् । आदास्यामो हि गास्तस्य विविधानि वसूनि च १९ वैशम्पायन उवाच ॥ ततो दुर्योधनो राजा वाक्यमादाय तस्य तत् । वैकर्तनस्य कर्णस्य क्षिप्रमाज्ञापयत्स्वयम् २० शासने नित्यसंयुक्तं दुःशासनमनन्तरम् । सह वृद्धैस्तु संमन्त्र्य क्षिप्रं योजय वाहिनीम् २१ यथोद्देशं च गच्छामः सहितास्तत्र कौरवैः । सुशर्मा च यथोद्दिष्टं देशं यातु महारथः ॥ त्रिगर्तैः सहितो राजा समग्रबलवाहनः २२ प्रागेव हि सुसंवीतो मत्स्यस्य विषयं प्रति । जघन्यतो वयं तत्र यास्यामो दिवसान्तरे । विषयं मत्स्यराजस्य सुसमृद्धं सुसंहताः २३ ते यान्तु सहितास्तत्र विराटनगरं प्रति । क्षिप्रं गोपान्समासाद्य गृह्णन्तु विपुलं धनम् २४ गवां शतसहस्राणि श्रीमन्ति गुणवन्ति च । वयमप्यनुगृह्णीमो द्विधा कृत्वा वरूथिनीम् २५ वैशम्पायन उवाच ॥ ते स्म गत्वा यथोद्दिष्टां दिशं वह्निर्महीपते । संनद्धा रथिनः सर्वे सपदाता

द्रव्य, सैन्य आणि पराक्रम ह्यांपैकीं ज्यांच्यापाशीं कांहींएक नाहीं त्या पांडवांच्या नादीं लागून आपणांला कर्तव्य काय आहे? त्यांनीं कोठें तरी कायमचेंच काळें केलें असेल किंवा ते यमलोकीं चालते झाले असतील १८. हे राजा आपण मनामध्यें यत्किंचित्‌ही भीति न ठेवितां विराटाच्या नगरावर स्वारी करूं आणि त्याच्या गाई व नानाप्रकारच्या संपत्ति हरण करून आणूं १९. वैशंपायन सांगतात:—तदनंतर सूर्यपुत्र कर्णाचें तें भाषण मान्य करून दुर्योधनराजानें आज्ञा पार पाडण्याविषयीं नेहमीं तत्पर असलेला जो आपल्या पाठचा भाऊ दुःशासन त्याला स्वारीविषयीं सत्वर आज्ञा केली. (तो ह्मणाला) " वृद्धांचा विचार घेऊन तूं सत्वर सैन्याची तयारी कर २०,२१; ह्मणजे आपण आपल्या उद्देशाप्रमाणें सर्व कौरवांना बरोबर घेऊन तिकडे जाऊं आणि महारथी भूपति सुशर्म्यालाही सर्व सैन्य व वाहनें बरोबर घेऊन त्रिगर्तांसहवर्तमान तिकडे वाटेल त्या प्रदेशांत जाऊं द्या २२. त्या त्रिगर्तराजाला चांगल्या बंदोबस्तानें आपल्या पूर्वींच मत्स्यदेशाला जाऊं द्या; आपण एका दिवसानें मागून चांगल्या तयारीनें मत्स्यराजाच्या त्या समृद्ध देशाला जाऊं २३. त्यांना तिकडे एकदम विराटनगरावर स्वारी करूं द्या आणि सत्वर गोपालांना गांठून विपुल धन घेऊं द्या २४. ह्मणजे आह्मीही सुंदर आणि गुणी अशा एक लक्ष गाई, सैन्याच्या दोन टोळ्या करून, हरण करूं" २५. वैशंपायन सांगतात:—हे भूपाला जनमेजया, ज्यांचें सामर्थ्य अंगामध्यें रसरसत आहे असे ते सर्वही रथी युद्धाकरितां सज्ज होऊन व

बलोत्कटाः २६ प्रति वैरं चिकीर्षन्तो गोषु गृद्धा महाबलाः । आदातुं गाः सुशर्माथ कृष्णपक्षस्य सप्तमीम् २७ अपरे दिवसे सर्वे राजन्संभूय कौरवाः । अष्टम्यां ते न्यगृह्णन्त गोकुलानि सहस्रशः २८ [९७७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वणि दक्षिणगोग्रहे सुशर्मादियाने त्रिंशोऽध्यायः ॥ ३० ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततस्तेषां महाराज तत्रैवामिततेजसाम् । छद्मलिङ्गप्रविष्टानां पाण्डवानां महात्मनाम् १ व्यतीतः समयः सम्यग्वसतां वै पुरोत्तमे । कुर्वतां तस्य कर्माणि विराटस्य महीपतेः २ कीचके तु हते राजा विराटः परवीरहा । परां संभावनां चक्रे कुन्तीपुत्रे युधिष्ठिरे ३ ततस्त्रयोदशस्यान्ते तस्य वर्षस्य भारत । सुशर्मणा गृहीतं तद्गोधनं तरसा बहु ४ ततो जवेन महता गोपः पुरमथाव्रजत् । स दृष्ट्वा मत्स्यराजं च रथात्प्रस्कन्द्य कुण्डली ५ शूरैः परिवृतं योधैः कुण्डलाङ्गदधारिभिः । संवृतं मन्त्रिभिः सार्धं पाण्डवैश्च महात्मभिः ६ तं सभायां महाराजमासीनं

पायदळ सैन्य बरोबर घेऊन ठरल्याप्रमाणें आग्नेयदिशेस गेले २६. सूड उगविण्याची त्यांची इच्छा होती व गाईंविषयीं त्यांच्या मनांत अभिलाष उत्पन्न झाला असल्यामुळें ते महाबलाढ्य योद्धे गाई हरण करण्याकरितां तिकडे गेले २७. सुशर्मा वद्य सप्तमीला तिकडे गेला आणि, हे राजा, सर्व कौरव एकत्र जुळून दुसऱ्या दिवशीं अष्टमीला तेथें गेले व हजारों गाई तेथें त्यांनीं पकडल्या २८. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं दक्षिणगोग्रहणसंबंधीं सुशर्म्यादिकांच्या गमनाविषयीं तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३० ॥

वैशंपायन सांगतातः—हे जनमेजय महाराजा, अतुल तेजानें युक्त असलेले महात्मे पांडव वेषांतर करून त्या विराटभूपतीच्या उत्कृष्ट नगरामध्यें त्याचीं कामें करीत वास्तव्य करीत असतांना त्यांचा तो संवत्सरपरिमित काल चांगल्या रीतीनें पार पडला १,२. कीचकाचा वध झाल्यानंतर शत्रुवीरनाशक विराटराजा (सेनाधिपतीचें काम करण्यासंबंधानें) कुंतीपुत्र युधिष्ठिराविषयीं मोठी आशा बाळगून राहिला ३. तदनंतर, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, त्या तेराव्या वर्षाचे शेवटीं सुशर्म्यानें तें विपुल गोधन बलात्कारानें हरण केलें ४. तेव्हां मोठ्या वेगानें गोप नगरामध्यें आला आणि कुंडलें धारण करणाऱ्या त्या गोपानें मत्स्यराज विराटाला अवलोकन करितांक्षणीं रथाखालीं उडी घातली ५. त्यावेळीं कुंडलें व बाहुभूषणें धारण केलेले शूर, योद्धे, मंत्री आणि महात्मे पांडव ह्यांनीं परिवेष्टित असलेला ६ तो

राष्ट्रवर्धनम् । सोऽब्रवीदुपसंगम्य विराटं प्रणतस्तदा ७ अस्मान्युधि विनिर्जित्य परिभूय सबान्धवान् । गवां शतसहस्राणि त्रिगर्ताः कालयन्ति तं ८ तान्परीप्सस्व राजेन्द्र मा नेशुः पशवस्तव । तच्छ्रुत्वा नृपतिः सेनां मत्स्यानां समयोजयत् ९ रथनागाश्वकलिलां पत्तिध्वजसमाकुलाम् १० राजानो राजपुत्राश्च तनुत्राण्यथ भेजिरे । भानुमन्ति विचित्राणि शूरसेव्यानि भागशः ११ सवज्रायसगर्भं तु कवचं तत्र काञ्चनम् । विराटस्य प्रियो भ्राता शतानीकोऽभ्यहारयत् १२ सर्वपारसवं वर्म कल्याणपटलं दृढम् । शतानीकादवरजो मदिराक्षोऽभ्यहारयत् १३ शतसूर्यं शतावर्तं शतबिन्दु शताक्षिमत् । अभेद्यकल्पं मत्स्यानां राजा कवचमाहरत् १४ उत्सेधे यस्य पद्मानि शतं सौगन्धिकानि च । सुवर्णपृष्ठं सूर्याभं सूर्यदत्तोऽभ्यहारयत् १५ दृढमायसगर्भं च श्वेतं वर्म शताक्षिमत् । विराटस्य सुतो ज्येष्ठो वीरः शङ्खोऽभ्यहारयत् १६ शतशश्च तनुत्राणि यथास्वं ते महारथाः । योत्स्यमाना अनह्यन्त देवरूपाः प्रहारिणः १७ सूपस्करेषु शुभ्रेषु महत्सु च

राष्ट्रकल्याणकर्ता महाराज विराट सभेमध्यें बसला होता. त्याच्याजवळ जाऊन आणि नम्र होऊन तो गोप ह्मणाला ७ " बांधवांसहवर्तमान आह्मांला युद्धामध्यें जिंकून व अगदीं जेरीस आणून ते त्रिगर्त एक लक्ष गाई हांकून नेत आहेत ८. तस्मात्, तुझे पशु नाहींसे होऊं नयेत एतदर्थ, हे राजाधिराज, त्या गाई परत आणण्याची तजवीज कर ". हें ऐकिल्यावर मत्स्यराजानें सेनेची तयारी केली ९. ती सेना रथ, गज व अश्व ह्यांनीं भरलेली असून पदाति आणि ध्वज ह्यांनींही गजबजलेली होती १०. प्रथमतः शूरांना योग्य, अद्भुत आणि देदीप्यमान अशीं वेगळीं वेगळीं चिलखतें राजांनीं व राजपुत्रांनीं चढविलीं ११. विराटाचा प्रिय भ्राता जो शतानीक त्यानें आंतल्या अंगून पोलादी असलेलें सुवर्णकवच धारण केलें १२. शतानीकाच्या पाठचा जो मदिराक्ष त्यानें सर्वप्रकारचीं शस्त्रें सहन करणारें असें सुवर्णानें मढविलेलें कवच धारण केलें १३. शेंकडों सूर्य, शेंकडों चंद्र, शेंकडों बिंदु आणि शेंकडों नेत्राकृति ह्यांनीं युक्त व जवळ जवळ अभेद्य असलेलें कवच मत्स्यराज विराटानें धारण केलें १४. शंभर सौगंधिक कमलें ज्याच्यावर ओळीनें मांडतां येतील असें सुवर्णानें मढविलेलें आणि सूर्याप्रमाणें उज्ज्वल असलेलें कवच सूर्यदत्तानें धारण केलें १५. शेंकडों नेत्राकृतींनीं युक्त, श्वेतवर्ण, दृढ आणि आंतून पोलादी असें कवच विराटाचा ज्येष्ठ पुत्र जो वीर शंख त्यानें धारण केलें १६. सारांश, शत्रूवर प्रहार करणाऱ्या त्या देवरूप महारथ्यांनीं युद्ध करण्याकरितां ज्यानें त्यानें आप-

महारथाः । पृथक्काञ्चनसन्नाहान्रथेष्वश्वानयोजयन् १८ सूर्यचन्द्रप्रतीकाशे रथे दिव्ये हिरण्मये । महानुभावो मत्स्यस्य ध्वज उच्छिश्रिये तदा १९ अथान्यान्विविधाकारान्ध्वजान्हेमपरिष्कृतान् । यथास्वं क्षत्रियाः शूरा रथेषु समयोजयन् २० अथ मत्स्योऽब्रवीद्राजा शतानीकं जघन्यजम् । कङ्कबल्लवगोपाला दामग्रन्थिश्च वीर्यवान् २१ युध्येयुरिति मे बुद्धिर्वर्तते नात्र संशयः । एतेषामपि दीयन्तां रथा ध्वजपताकिनः २२ कवचानि च चित्राणि दृढानि च मृदूनि च । प्रतिमुञ्चन्तु गात्रेषु दीयन्तामायुधानि च २३ वीराङ्गरूपाः पुरुषा नागराजकरोपमाः । नेमे जातु न युध्येरन्निति मे धीयते मतिः २४ एतच्छ्रुत्वा तु नृपतेर्वाक्यं त्वरितमानसः । शतानीकस्तु पार्थेभ्यो रथान्राजन्समादिशत् २५ सहदेवाय राज्ञे च भीमाय नकुलाय च । तान्प्रहृष्टांस्ततः सूता राजभक्तिपुरस्कृताः २६ निर्दिष्टा नरदेवेन रथाञ्शीघ्रमयोजयन् । कवचानि विचित्राणि मृदूनि च दृढानि च २७ विराटः प्रादिशद्यानि तेषामक्लिष्टकर्मणाम् । तान्यामुच्य

आपलें, अशीं शेंकडो चिलखतें चढविलीं १७. तदनंतर ज्यांवरील सामान उत्कृष्ट आहे अशा मोठ्या मोठ्या शुभ्रवर्ण रथांना सुवर्णाचें सामान घातलेले अश्व त्या महारथ्यांनीं जोडिले १८. नंतर विराटराजाच्या सूर्यचंद्रांसारिख्या उज्ज्वल व दिव्य अशा सुवर्णमय रथावर महाविजयी ध्वज उभारिला गेला १९ व नंतर सुवर्णानें शृंगारिलेले असे नानाप्रकारचे इतरही ध्वज शूर क्षत्रियांनीं आपआपल्या रथावर उभारिले २०. तदनंतर मत्स्यराज विराट आपल्या शतानीकनामक कनिष्ठ भ्रात्याला ह्मणाला " कंक, बल्लव, गोपाल आणि वीर्यवान् दामग्रंथि २१ हे निःसंशय युद्ध करितील असें मला वाटतें. ह्यास्तव, ध्वज व पताका ह्यांनीं युक्त असलेले रथ ह्यांनाही द्या २२. दृढ व मृदु अशीं अद्भुत कवचें ह्यांनाही अंगामध्यें घालूं द्या आणि आयुधेंही तुह्मी ह्यांना द्या २३. ह्या पुरुषांच्या शरीरांची ठेवण वीरांसारिखी दिसत असून ह्यांचे बाहुही गजेंद्राच्या शुंडेप्रमाणें दिसत आहेत. ह्यावरून हे युद्ध केल्यावांचून रहाणारच नाहींत असें मला वाटतें " २४. हे जनमेजयराजा, हें विराटराजाचें भाषण श्रवण करून अंतःकरणामध्यें गडबड उडून गेलेल्या शतानीकानें सहदेव, धर्मराज, भीम व नकुल ह्या कुंतीपुत्रांना रथ दिले. तदनंतर राजावर ज्यांचें प्रेम आहे असे सारथी त्या आनंदित झालेल्या पांडवांना २५,२६ मत्स्यराज विराटानें दिल्यावर त्यांनीं सत्वर रथ तयार केले. तदनंतर मृदु, दृढ आणि विचित्र अशीं जीं कवचें २७ त्या पापपराङ्मुख पांडवांना

शरीरेषु दंशितास्ते परन्तपाः २८ रथान्हयैः सुसंपन्नानास्थाय च नरोत्तमाः । निर्ययुर्मुदिताः पार्थाः शत्रुसङ्घावमर्दिनः २९ तरस्विनश्छन्नरूपाः सर्वे युद्धविशारदाः । रथान्हेमपरिच्छन्नानास्थाय च महारथाः ३० विराटमन्वयुः पार्थाः सहिताः कुरुपुङ्गवाः । चत्वारो भ्रातरः शूराः पाण्डवाः सत्यविक्रमाः ३१ भीमाश्च मत्तमातङ्गाः प्रभिन्नकरटामुखाः । क्षरन्तश्चैव नागेन्द्राः सुदन्ताः षष्टिहायनाः ३२ स्वारूढा युद्धकुशलैः शिक्षिता हस्तिसादिभिः । राजानमन्वयुः पश्चाच्चलन्त इव पर्वताः ३३ विशारदानां मुख्यानां हृष्टानां चारुजीविनाम् । अष्टौ रथसहस्राणि दशनागशतानि च ॥ षष्टिश्चाश्वसहस्राणि मत्स्यानामभिनिर्ययुः ३४ तदनीकं विराटस्य शुशुभे भरतर्षभ । संप्रयातं तदा राजन्निरीक्षन्तं गवां पदम् ३५ तद्बलाग्र्यं विराटस्य संप्रस्थितमशोभत । दृढायुधजनाकीर्णं गजाश्वरथसंकुलम् ३६ [१०१३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वणि दक्षिणगोग्रहे मत्स्यराजरणोद्योगे एकत्रिंशोऽध्यायः ॥ ३१ ॥

विराटानें दिलीं होतीं तीं अंगामध्यें घालून ते शत्रुतापन पांडव युद्धाकरितां तयार झाले २८. आणि अश्वांनीं उत्कृष्ट रीतीनें संपन्न असलेल्या रथांवर आरूढ होऊन ते शत्रुसमुदायाचें मर्दन करणारे पुरुषश्रेष्ठ कुंतीपुत्र आनंदानें बाहेर पडले २९. आपलें स्वरूप ज्यांनीं गुप्त ठेविलें आहे असे ते सर्वही महारथी, युद्धनिपुण, वेगवान् , कुरुवंशजश्रेष्ठ, शूर आणि अमोघपराक्रमी चारी भ्राते कुंतीपुत्र पांडव सुवर्णानें मढविलेल्या रथांवर आरूढ होऊन बरोबर विराटाच्या मागोमाग गेले ३०. ३१. तदनंतर ज्यांचीं गंडस्थलें उकललेलीं आहेत असे भयंकर मत्त गज, गंडस्थलांतून मदस्राव चाललेले व उत्कृष्ट दंतांनीं युक्त असलेले साठ वर्षांचे तरुण गजेंद्र ३२ चालणारे पर्वतच कीं काय अशा रीतीनें विराटराजाच्या मागोमाग चालले. ते गजेंद्र माहुतांनीं शिकविलेले होते आणि युद्धामध्यें निपुण असलेले योद्धे त्यांच्यावर आरूढ झालेले होते ३३. तदनंतर उत्कृष्ट रीतीनें उपजीविका करणारे, युद्धनिपुण व आनंदित असे जे मत्स्यदेशांतील मुख्य मुख्य योद्धे. त्यांचे आठ हजार रथ, एक हजार गज आणि साठ हजार अश्व बाहेर पडले ३४. हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजयराजा, गाईंचा माग काढण्याकरितां निघालेलें तें विराटाचें सैन्य झळकूं लागलें ३५. सारांश, प्रचंड आयुधें धारण करणाऱ्या योद्ध्यांनीं भरलेलें आणि गज, अश्व व रथ ह्यांनीं गजबजून गेलेलें तें विराटाचें श्रेष्ठ सैन्य युद्धाला निघालें असतां झळकूं लागलें ३६. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक

वैशम्पायन उवाच ॥ निर्याय नगराच्छूरा व्यूढानीकाः प्रहारिणः ।
त्रिगर्तानस्पृशन्मत्स्याः सूर्ये परिणते सति १ ते त्रिगर्ताश्च मत्स्याश्च संरब्धा युद्धदुर्मदाः । अन्योन्यमभिगर्जन्तो गोषु गृद्धा महाबलाः २ भीमाश्च मत्तमातङ्गास्तोमराङ्कुशनोदिताः । ग्रामणीयैः समारूढाः कुशलैर्हस्तिसादिभिः ३ तेषां समागमो घोरस्तुमुलो लोमहर्षणः । घ्नतां परस्परं राजन्यमराष्ट्रविवर्धनः ४ देवासुरसमो राजन्नासीत्सूर्ये विलम्बति । पदातिरथनागेन्द्रहयारोहबलौघवान् ५ अन्योन्यमभ्यापततां निघ्नतां चेतरेतरम् । उदतिष्ठद्रजो भौमं न प्राज्ञायत किंचन ६ पक्षिणश्चापतन्भूमौ सैन्येन रजसावृताः । इषुभिर्व्यतिसर्पद्भिरादित्योऽन्तरधीयत ७ खद्योतैरिव संयुक्तमन्तरिक्षं व्यराजत । रुक्मपृष्ठानि चापानि व्यतिषिक्तानि धन्विनाम् ८ पततां लोकवीराणां सव्यदक्षिणमस्यताम् । रथा रथैः समाजग्मुः पादातैश्च

श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं दक्षिणगोग्रहणसंबंधीं मत्स्यराज विराटाच्या युद्धाचे तयारीविषयीं एकतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३१ ॥

वैशंपायन सांगतातः—सेना सज्ज करून नगराबाहेर ते मत्स्यदेशांतील शूर योद्धे निघाले असतां सूर्य कलल्यावर त्यांची त्रिगर्तांशीं गांठ पडली १. त्रिगर्त व मत्स्य हे उभयतांही महाबलाढ्य होते; युद्धासंबंधानें उभयतांनाही मद चढलेला होता; उभयतांही क्षुब्ध झाले होते आणि उभयतांही गाईविषयीं उत्सुक असून एकमेकांवर गर्जना करीत होते २. भाले व अंकुश ज्यांना टोंचले जात आहेत असे भयंकर मत्त गज उभयतांच्याही सैन्यामध्यें होते आणि त्या त्या राजाचे कुशल महात त्यांच्यावर बसलेले होते ३. हे जनमेजयराजा, ते त्रिगर्त व मत्स्य एकमेकांवर प्रहार करूं लागले असतां त्या उभयतांमध्यें यमराष्ट्राची भर करणारा असा तुमुल, घोर व अंगावर कांटा आणणारा संग्राम झाला ४. हे राजा, सूर्य कलूं लागला असतां पदाति, रथ, गजेंद्र व स्वार ह्यांच्या झुंडीच्या झुंडी लढूं लागल्या आणि हा त्यांचा संग्राम देवदैत्यांतील संग्रामाप्रमाणें भासूं लागला ५. ते एकमेकांवर धांवून जाऊन एकमेकांवर प्रहार करूं लागले असतां भूमीवरील धूळ जिकडे तिकडे उडाल्यामुळें कांहीं एक समजेनासें झालें ६. सैन्यामुळें उडालेल्या धुळीनें व्याप्त झालेले पक्षी भूतलावर पडूं लागले आणि आकाशामध्यें एकसारखे बाण संचार करूं लागल्यामुळें सूर्यही दिसेनासा झाला ७. आकाश काजव्यांनीं भरून गेल्यासारिखें दिसूं लागलें; सुवर्णाच्या पृष्ठभागांनीं युक्त असलेलीं धनुर्धर योद्ध्यांचीं धनुष्यें बदलूं लागलीं ८; डाव्या व उजव्या अशा दोन्हीं हातांनीं बाण सोडीत असलेले ते जगतांतील वीर एकमेकांवर

पदातयः ९ सादिनः सादिभिश्चैव गजैश्चापि महागजाः १० असिभिः पट्टिशैः प्रासैः शक्तिभिस्तोमरैरपि । संरब्धाः समरे राजन्निजघ्नुरितरेतरम् ११ निघ्नन्तः समरेऽन्योन्यं शूराः परिघबाहवः । न शेकुरभिसंरब्धाः शूरान्कर्तुं पराङ्मुखान् १२ कृत्तोत्तरोष्ठं सुनसं कृत्तकेशमलंकृतम् । अदृश्यत शिरश्छिन्नं रजोध्वस्तं सकुण्डलम् १३ अदृश्यंस्तत्र गात्राणि शरैश्छिन्नानि भागशः । शालस्कन्धनिकाशानि क्षत्रियाणां महामृधे १४ नागभोगनिकाशैश्च बाहुभिश्चन्दनोक्षितैः । आस्तीर्णा वसुधा भाति शिरोभिश्च सकुण्डलैः १५ रथिनां रथिभिश्चात्र संप्रहारोऽभ्यवर्तत । सादिभिः सादिनां चापि पदातीनां पदातिभिः १६ उपाशाम्यद्रजो भौमं रुधिरेण प्रसर्पता । कश्मलं चाविशद्घोरं निर्मर्यादमवर्तत १७ उपाविशन्गरुत्मन्तः शरैर्गाढं प्रवेजिताः । अन्तरिक्षे गतिर्येषां दर्शनं चाप्यरुध्यत १८ ते घ्नन्तः समरेऽन्योन्यं शूराः परिघबाहवः । न शेकुरभिसंरब्धाः

हल्ला करूं लागले असतां त्यांचे रथ दुसऱ्यांच्या रथांशीं भिडले; पायदळ सैन्याशीं पायदळ सैन्याचाच संग्राम सुरू झाला ९; गजारूढांशीं गजारूढ युद्ध करूं लागले; गजांशीं महागज लढूं लागले १० आणि, हे राजा, तरवारी, पट्टे, प्रास, शक्ति व तोमर ह्यांच्या योगानें, क्षुब्ध झालेले योद्धे समरांगणामध्यें, एकमेकांचा वध करूं लागले ११. अडसराप्रमाणें ज्यांचे बाहु आहेत असे उभयपक्षाकडील क्षुब्ध झालेले शूर योद्धे एकमेकांवर प्रहार करूं लागले असतां कोणीच प्रतिपक्षाकडे असलेल्या शूरांचा पराभव करण्यास समर्थ होईनात १२. वरचा ओठ तुटलेलीं, उत्कृष्ट नाकानें युक्त असलेलीं, केंस तुटलेलीं, अलंकार घातलेलीं, कुंडलें धारण केलेलीं धुळीनें भरलेलीं अशीं छिन्नभिन्न मस्तकें दिसूं लागलीं १३. क्षत्रियांच्या त्या महायुद्धामध्यें शालवृक्षांच्या खोडांसारिखीं मोठीं मोठीं धडें बाणांच्या योगानें ठिकठिकाणीं विदीर्ण झालेलीं दृष्टीस पडूं लागलीं १४. चंदनाची उटी लाविलेल्या आणि नागाच्या शरीराप्रमाणें असलेल्या बाहूंच्या योगानें आणि कुंडलें धारण केलेल्या मस्तकांच्या योगानें पृथ्वी व्याप्त झालेली दिसूं लागली १५. ह्या रणामध्यें रथ्यांचें रथ्यांशीं गजारूढांचें गजारूढांशीं आणि पदातींचें पदातींशीं युद्ध झालें १६. रक्ताचे पाट वाहूं लागल्यामुळें धूळ वर उडण्याची बंद झाली; सर्व सैन्याला भयंकर मूर्च्छा उत्पन्न झाली; युद्धाची मर्यादा नाहींशी झाली १७ व बाणांनीं अतिशय उद्विग्न करून टाकिलेले गरुडपक्षी ध्वजांच्या अग्रांवर बसूं लागले. कारण, बाणांमुळें आकाशामध्यें त्या पक्ष्यांना कांहीं दिसेनासें झालें १८. असो. अडसरांप्रमाणें ज्यांचे बाहु आहेत असे उभय पक्षांकडील

शूरान्कर्तुं पराङ्मुखान् १९ शतानीकः शतं हत्वा विशालाक्षश्चतुःशतम् ।
प्रविष्टौ महतीं सेनां त्रिगर्तानां महारथौ २० तौ प्रविष्टौ महा-
सेनां बलवन्तौ मनस्विनौ । आर्च्छेतां बाहुसंरब्धौ केशाकेशि रथारथि २१
लक्षयित्वा त्रिगर्तानां तौ प्रविष्टौ रथव्रजम् । अग्रतः सूर्यदत्तश्च मदिरा-
क्षश्च पृष्ठतः २२ विराटस्तत्र सङ्ग्रामे हत्वा पञ्चशतान्रथान् । हयानां
च शतान्यष्टौ हत्वा पञ्च महारथान् २३ चरन्स विविधान्मार्गान्रथेन रथ-
सत्तमः । त्रिगर्तानां सुशर्माणमार्च्छद्रुक्मरथं रणे २४ तौ व्यवाहरतां
तत्र महात्मानौ महाबलौ । अन्योन्यमभिगर्जन्तौ गोष्ठेषु वृषभाविव २५
ततो राजा त्रिगर्तानां सुशर्मा युद्धदुर्मदः । मत्स्यं समीयाद्राजानं द्वैरथेन
नरर्षभः २६ ततो रथाभ्यां रथिनौ व्यतीयतुरमर्षणौ । शरान्व्यसृजतां
शीघ्रं तोयधारा घना इव २७ अन्योन्यं चापि संरब्धौ विचेरतुरमर्षणौ ।

क्षुब्ध झालेले शूर योद्धे एकमेकांवर प्रहार करूं लागले असतां कोणीहि प्रतिपक्षाकडे असलेल्या शूरांचा पराभव करण्यास समर्थ होईनात १९. शतानीकानें शंभर व विशालाक्षानें चारशें योद्ध्यांचा वध केल्यावर ते उभयतां महारथी त्रिगर्तांच्या प्रचंड सेनेमध्यें शिरले २०; आणि बाहुबलामुळें क्षुब्ध झालेले ते उभयतां विचारी व बलाढ्य योद्धे प्रचंड सेनेमध्यें प्रविष्ट झाल्यावर एकमेकांचे केस धरणें व रथावर रथ फेंकणें अशारीतीनें युद्ध सुरू झालें असतां ते उभयतांही मूर्छित झाले २१. त्रिगर्तांच्या सैन्यामध्यें रथ्यांच्या झुंडींत ते उभयतां प्रविष्ट झाल्याचें पाहून सूर्यदत्त पुढें व मदिराक्ष मागें असे दोन विराटाचे भ्राते तिकडे गेले २२. त्या संग्रामामध्यें पांचशें रथी, आठशें अश्व आणि पांच महारथी [illegible] त्यानंतर विराट २३ नानाप्रकारच्या चालींनीं रथाच्या योगानें संचार क[illegible] आणि शेवटीं त्या श्रेष्ठरथी विराटानें सुवर्णरथावर आरूढ झालेल्या [illegible] सुशर्म्याची संग्रामामध्यें गांठ घतली २४. गोठ्यांमध्यें डुरक्या फोडणारे बैलच कीं काय अशा रीतीनें एकमेकांवर गर्जना करीत करीत ते उभयतां महात्मे व महाबलाढ्य एकमेकांशीं युद्ध करूं लागले २५. युद्धामध्यें जेरीस येण्याला कठीण असलेला त्रिगर्ताधिपति पुरुषश्रेष्ठ सुशर्मा द्वंद्वयुद्ध करण्याकरितां मत्स्यराजावर चाल करून आला २६. सारांश, ते उभयतांही क्रुद्ध झालेले रथी रथांच्या योगानें एकमेकांवर चाल करून गेले आणि जलधारांची वृष्टि करणाऱ्या मेघांप्रमाणें ते एकमेकांवर सत्वर बाणांची वृष्टि करूं लागले २७. कोणाचेंच कोणी सहन न करणारे ते उभयतांही अस्त्रनिपुण आणि खड्ग, शक्ति व गदा धारण केलेले राजे क्षुब्ध झाले आणि तीक्ष्ण बाणांच्या

कृतास्त्रौ निशितैर्बाणैरसिशक्तिगदाभृतौ २८ ततो राजा सुशर्माणं विव्याध दशभिः शरैः । पञ्चभिः पञ्चभिश्चास्य विव्याध चतुरो हयान् २९ तथैव मत्स्यराजानं सुशर्मा युद्धदुर्मदः । पञ्चाशद्भिः शितैर्बाणैर्विव्याध परमास्त्रवित् ३० ततः सैन्यं महाराज मत्स्यराजसुशर्मणोः । नाभ्यजानत्तदान्योन्यं सैन्येन रजसावृतम् ३१[१०४४]इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वणि दक्षिणगोग्रहे विराटसुशर्मयुद्धे द्वात्रिंशोध्यायः ॥ ३२ ॥

वैशम्पायन उवाच ॥ तमसाभिप्लुते लोके रजसा चैव भारत । अतिष्ठन्वै मुहूर्तं तु व्यूढानीकाः प्रहारिणः १ ततोन्धकारं प्रणुदन्नुदतिष्ठत चन्द्रमाः । कुर्वाणो विमलां रात्रिं नन्दयन्क्षत्रियान्युधि २ ततः प्रकाशमासाद्य पुनर्युद्धमवर्तत । घोररूपं ततस्ते स्म नावैक्षन्त परस्परम् ३ ततः सुशर्मा त्रैगर्तः सह भ्रात्रा यवीयसा । अभ्यद्रवन्मत्स्यराजं रथव्रातेन सर्वशः ४ ततो रथाभ्यां प्रस्कन्द्य भ्रातरौ क्षत्रियर्षभौ । गदापाणीं

योगानें एकमेकांशीं युद्ध करीत करीत संग्रामामध्यें संचार करूं लागले २८. तदनंतर विराटराजानें दहा बाणांनीं सुशर्म्याला वेध केला आणि त्याच्या चारी अश्वांवरही त्यानें पांच पांच बाण टाकिले २९. नंतर त्याचप्रमाणें युद्धामध्यें हार न जाणाऱ्या महास्त्रवेत्त्या सुशर्म्यानेंही मत्स्यराजाला पन्नास तीक्ष्ण बाणांनीं वेध केला असतां ३०, हे महाराजा जनमेजया, मत्स्यराज विराट व सुशर्मा ह्यांच्या सैन्यांमध्यें जिकडे तिकडे धूळ व्यापून राहिल्यामुळें आपल्या पक्षाचा कोण व शत्रुपक्षाचा कोण ह्याचा मुळींच उमज पडेनासा झाला ३१. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वांपैकीं दक्षिणगोग्रहणसंबंधीं विराट व सुशर्मा ह्यांच्या युद्धाविषयीं बत्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३२ ॥

वैशंपायन सांगतातः—हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, सर्व भूतल अंधकारानें व धुळीनें व्याप्त झालें असतां सैन्य सज्ज ठेविलेले योद्धे एक मुहूर्तभर स्वस्थ बसले १. तदनंतर अंधकाराचा नाश करणारा आणि रात्रि निर्मल करणारा चंद्रमा युद्धामध्यें क्षत्रियांना आनंद देत देत उदय पावला असतां २ प्रकाश पडल्यावर पुनरपि भयंकर युद्ध सुरू झालें आणि ते योद्धे मुळींच एकमेकांची उपेक्षा करीनासे झाले ३. तदनंतर त्रिगर्ताधिपति सुशर्मा सर्व रथसमुदाय बरोबर घेऊन आपल्या कनिष्ठ भ्रात्यासहवर्तमान मत्स्यराज विराटाकडे धांवून गेला ४. नंतर ते उभयतांही हातामध्यें गदा घेऊन क्षुब्ध झालेले क्षत्रियश्रेष्ठ त्रिगर्ताधिपति भ्राते

सुसंरब्धौ समभ्यद्रवतां रथान् ५ तथैव तेषां तु बलानि तानि क्रुद्धान्यथाऽन्योन्यमभिद्रवन्ति । गदासिखड्गैश्च परश्वधैश्च प्रासैश्च तीक्ष्णाग्रसुपीतधारैः ६ बलं तु मत्स्यस्य बलेन राजा सर्वं त्रिगर्ताधिपतिः सुशर्मा । प्रमथ्य जित्वा च प्रसह्य मत्स्यं विराटमोजस्विनमभ्यधावत् ७ तौ निहत्य पृथग्धुर्यावुभौ तौ पार्ष्णिसारथी । विरथं मत्स्यराजानं जीवग्राहमगृह्णताम् ८ तमुन्मथ्य सुशर्माथ युवतीमिव कामुकः । स्यन्दनं स्वं समारोप्य प्रययौ शीघ्रवाहनः ९ तस्मिन्गृहीते विरथे विराटे बलवत्तरे । प्राद्रवन्त भयान्मत्स्यास्त्रिगर्तैरर्दिता भृशम् १० तेषु संत्रस्यमानेषु कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः । प्रत्यभाषन्महाबाहुं भीमसेनमरिन्दमम् ११ मत्स्यराजः परामृष्टस्त्रिगर्तेन सुशर्मणा । तं मोचय महाबाहो न गच्छेद्द्विषतां वशम् १२ उषिताः स्म सुखं सर्वे सर्वकामैः सुपूजिताः । भीमसेन त्वया कार्या तस्य वासस्य निष्कृतिः १३ भीमसेन उवाच ॥ अहमेनं परित्रास्ये शासनात्तव

आपआपल्या रथांतून खालीं उतरले आणि शत्रुपक्षाच्या रथांकडे धांवले ५. त्याचप्रमाणें त्यांचीं तीं सैन्येंही क्रुद्ध होऊन गदा, पट्टे, तरवारी, कुऱ्हाडी आणि तीक्ष्ण अग्रें व उत्कृष्ट पाणी ज्यांना दिलें आहे असे भाले हातांत घेऊन परस्परांवर धांवूं लागलीं ६. त्रिगर्ताधिपति राजा सुशर्म्यानें मत्स्यराज विराटाचें सैन्य जिंकून जेरीस आणिलें आणि नंतर बलाढ्य मत्स्यराज विराटावर तो एकाएकीं धांवून गेला ७. जातांक्षणीं वेगवेगळ्या ठिकाणीं बसलेले सारथि व पृष्ठरक्षक ह्या उभयतांचा प्रथम वध करून विरथ केलेल्या मत्स्यराजाला त्यानें जिवंत धरिलें ८. इतकेंच नव्हे परंतु, एखादा कामुक पुरुष ज्याप्रमाणें तरुणी स्त्रीला घेऊन चालता होतो त्याप्रमाणें शीघ्र अश्वांनीं युक्त असलेला तो सुशर्मा त्या विराटाला जिंकून व आपल्या रथावर घालून चालता झाला ९; व त्या बलाढ्य विराटाला विरथ करून सुशर्म्यानें धरून नेलें असतां त्रिगर्तांनीं अतिशय जेरीस आणिलेले मत्स्यदेशांतील योद्धे भीतीनें पळूं लागले १०. ह्याप्रमाणें ते मत्स्य देशांतील योद्धे त्रस्त होऊं लागले असतां कुंतीपुत्र युधिष्ठिर शत्रूंचें दमन करणाऱ्या महापराक्रमी भीमसेनाला ह्मणाला ११ "त्रिगर्ताधिपति सुशर्म्यानें मत्स्यराजाला धरिलें आहे. ह्यास्तव, हे महापराक्रमी, तूं त्याला सोडीव. तो शत्रूंच्या अधीन होणें योग्य नाहीं १२. इच्छेस वाटेल ती भोग्य वस्तु आपणांला देऊन त्यानें आपला आदर केला आहे आणि आपण सर्वही येथें सुखानें राहिलों आहों. ह्यास्तव, हे भीमसेना, सुखानें झालेल्या ह्या वास्तव्याबद्दल तूं ह्याचे उपकार फेड १३. भीमसेन ह्मणतोः—हे राजा, आपल्या आज्ञेनें मी ह्याचें रक्षण करितों. शत्रूंसहवर्तमान युद्ध करणाऱ्या माझें आपण

पार्थिव । पश्य मे सुमहत्कर्म युध्यतः सह शत्रुभिः १४ स्वबाहुबलमा-
श्रित्य तिष्ठ त्वं भ्रातृभिः सह । एकान्तमाश्रितो राजन्पश्य मेद्य पराक्रमम् १५
सुस्कन्धोयं महावृक्षो गदारूप इव स्थितः । अहमेनमपारुज्य द्रावयिष्यामि
शात्रवान् १६ वैशम्पायन उवाच ॥ तं मत्तमिव मातङ्गं वीक्षमाणं
वनस्पतिम् । अब्रवीद्भ्रातरं वीरं धर्मराजो युधिष्ठिरः १७ मा भीम
साहसं कार्षीस्तिष्ठत्वेष वनस्पतिः । मा त्वां वृक्षेण कर्माणि कुर्वाणमति-
मानुषम् ॥ जनाः समवबुध्येरन्भीमोयमिति भारत १८ अन्यदेवायुधं
किंचित्प्रतिपद्यस्व मानुषम् । चापं वा यदि वा शक्तिं निस्त्रिंशं वा पर-
श्वधम् १९ यदेव मानुषं भीम भवेदन्यैरलक्षितम् । तदेवायुधमादाय
मोक्षयाशु महीपतिम् २० यमौ च चक्ररक्षौ ते भवितारौ महाबलौ ।
सहिताः समरे तत्र मत्स्यराजं परीप्सत २१ वैशम्पायन उवाच ॥ एव-
मुक्तस्तु वेगेन भीमसेनो महाबलः । गृहीत्वा तु धनुःश्रेष्ठं जवेन सुमहा-
जवः २२ व्यमुञ्चच्छरवर्षाणि सतोय इव तोयदः । तं भीमो भीमक-
र्माणं सुशर्माणमथाद्रवत् २३ विराटं समवीक्ष्यैनं तिष्ठ तिष्ठेति चावदत् ।

फारच मोठें कर्म अवलोकन करा १४. हे राजा, आपल्या बाहुबलाचेंच अवलंबन करून आज मी जो पराक्रम करीत आहें तो आपण भ्रात्यांसहवर्तमान एका ठिकाणीं स्वस्थ उभे राहून अवलोकन करा १५. उत्तम स्कंधानें युक्त असलेला हा प्रचंड वृक्ष जसा कांहीं गदेप्रमाणेंच येथें उभा राहिलेला आहे. ह्यास्तव, हा वृक्ष उपटून मी शत्रूंना पळवून लावितों १६. वैशंपायन सांगतातः—ह्यानंतर मत्त गजाप्रमाणें वृक्षाकडे पाहूं लागलेल्या त्या वीर भ्रात्याला धर्मराज युधिष्ठिर ह्मणाला १७ " हे भीमा, साहस करूं नको. हा वृक्ष राहूं दे. हे भरतकुलोत्पन्ना, वृक्षाच्या योगानें अमानुष कर्मं करणाऱ्या तुला हा भीमसेन आहे असें लोकांनीं ओळखितां कामा नये १८. ह्यास्तव, धनुष्य, शक्ति, तरवार अथवा कुऱ्हाड असें मनुष्याला शोभणारेंच कोणतें तरी आयुध तूं घे १९. सारांश, हे भीमसेना, दुसऱ्यांच्या विशेष लक्ष्यांत न येणारें असें जें एकादें मनुष्याचें आयुध असेल तेंच घेऊन तूं ह्या भूपतीला सत्वर सोडीव २०. हे महाबलाढ्य नकुलसहदेव तुझे चक्ररक्षक होतील आणि तुह्मी तिघे मिळून समरांगणामध्यें मत्स्यराजाला सोडवून आणण्याचें मनांत आणा " २१. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें त्वरा करून महाबलाढ्य भीमसेनाला सांगितलें असतां त्या अत्यंतमहावेगवान् भीमसेनानें श्रेष्ठ धनुष्य हातीं घेतलें आणि सजल मेघाप्रमाणें सत्वर बाणवृष्टि करण्यास त्यानें आरंभ केला.

सुशर्मा चिन्तयामास कालान्तकयमोपमम् २४ तिष्ठ तिष्ठेति भाषन्तं पृष्ठतो रथपुङ्गवः । पश्यतां मसुहत्कर्म महद्युद्धमुपस्थितम् २५ परावृत्तो धनुर्गृह्य सुशर्मा भ्रातृभिः सह । निमेषान्तरमात्रेण भीमसेनेन ते रथाः२६ रथानां च गजानां च वाजिनां च ससादिनाम्। सहस्रशतसङ्घाताः शूराणामुग्रधन्विनाम् २७ पातिता भीमसेनेन विराटस्य समीपतः । पत्तयो निहतास्तेषां गदां गृह्य महात्मना २८ तद्दृष्ट्वा तादृशं युद्धं सुशर्मा युद्धदुर्मदः । चिन्तयामास मनसा किं शेषं हि बलस्य मे २९ अपरो दृश्यते सैन्ये पुरा मग्नो महाबले । आकर्णपूर्णेन तदा धनुषा प्रत्यदृश्यत ३० सुशर्मा सायकांस्तीक्ष्णान्क्षिपते च पुनःपुनः ३१ ततः समस्तास्ते सर्वे तुरगानभ्यचोदयन् । दिव्यमस्त्रं विकुर्वाणास्त्रिगर्तान्प्रत्यमर्षणाः ३२ तान्निवृत्तरथान्दृष्ट्वा पाण्डवान्सा महाचमूः । वैराटिः परमक्रुद्धो युयुधे परमाद्भुतम् ३३ सहस्रम-

---

प्रथमतः भयंकर कर्म करणाऱ्या त्या सुशर्म्याकडे भीमसेन धांवला २२,२३ आणि विराटाकडे पाहून त्या सुशर्म्याला " उभा रहा, उभा रहा " असें ह्मणाला. तेव्हां " थांब, थांब " असें ह्मणत ह्मणत आपल्या मागून साक्षात् काल, मृत्यु अथवा यमच येत आहे कीं काय असें त्या श्रेष्ठ रथी सुशर्म्याला वाटलें; आणि सर्व लोक पहात असतांना फारच मोठा पराक्रम ज्यांत आहे असें प्रचंड युद्ध त्या उभयतांमध्यें सुरू झालें २४, २५. धनुष्य घेऊन भ्रात्यांसहवर्तमान सुशर्मा परत फिरला आणि त्याच्या बरोबर असलेले ते रथीही एका निमेषामध्यें भीमसेनाशीं येऊन भिडले २६. परंतु, भयंकर धनुष्य धारण करणारे शूर, रथ, गज आणि स्वारांसहवर्तमान अश्व ह्यांच्या शेंकडों, हजारों झुंडीच्या झुंडी विराटाच्या समीप भीमसेनानें ठार केल्या आणि त्या त्रिगर्तांचे पदातिही गदा घेऊन त्या महात्म्या भीमसेनानें मारिले २७, २८. तशाप्रकारचें तें युद्ध अवलोकन करून युद्धामध्यें अजिंक्य असलेला सुशर्मा आपलें सैन्य किती अवशिष्ट राहिलें आहे ह्याचा मनामध्यें विचार करूं लागला २९. इतक्यांत कानापर्यंत खेंचलेलें धनुष्य घेऊन महाबलाढ्य सैन्यामध्यें पूर्वींच मग्न झालेला सुशर्म्याचा दुसरा भ्राता दृष्टीं पडूं लागला ३० व सुशर्माही वारंवार तीक्ष्ण बाण सोडूं लागला ३१. तदनंतर त्या सर्व मत्स्यदेशांतील योद्ध्यांनींही आपले अश्व संग्रामभूमीकडे वळविले आणि क्रुद्ध झालेले ते योद्धे त्रिगर्तांवर दिव्य अस्त्रें सोडूं लागले ३२. त्या पांडवांनीं आपले रथ संग्रामाकडे परत फिरविलेले पाहून विराटराजाची ती प्रचंड सेनाही रणाकडे परत फिरली आणि विराटपुत्रही अतिशय

वधीत्तत्र कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः । भीमः सप्त सहस्राणि यमलोकमदर्शयत् ३४
नकुलश्चापि सप्तैव शतानि प्राहिणोच्छरैः । शतानि त्रीणि शूराणां सहदेवः
प्रतापवान् ३५ युधिष्ठिरसमादिष्टो निजघ्ने पुरुषर्षभः । ततोऽभ्यपतदत्युग्रः
सुशर्माणमुदायुधः ३६ हत्वा तां महतीं सेनां त्रिगर्तानां महारथः । ततो
युधिष्ठिरो राजा त्वरमाणो महारथः ३७ अभिपत्य सुशर्माणं शरैरभ्या-
हनद्भृशम् । सुशर्मापि सुसंरब्धस्त्वरमाणो युधिष्ठिरम् ३८ अविध्यन्नव-
भिर्बाणैश्चतुर्भिश्चतुरो हयान् । ततो राजन्नाशुकारी कुन्तीपुत्रो वृकोदरः ३९
समासाद्य सुशर्माणमश्वानस्य व्यपोथयत् । पृष्ठगोपांश्च तस्याथ हत्वा
परमसायकैः ४० अथास्य सारथिं क्रुद्धो रथोपस्थादपातयत् । चक्रर-
क्षश्च शूरो वै मदिराक्षोतिविश्रुतः ४१ समायाद्विरथं दृष्ट्वा त्रिगर्तं प्राहर-
त्तदा । ततो विराटः प्रस्कन्द्य रथादथ सुशर्मणः ४२ गदां तस्य परा-
मृश्य तमेवाभ्यद्रवद्बली । स चचार गदापाणिर्वृद्धोपि तरुणो यथा ४३
पलायमानं त्रैगर्तं दृष्ट्वा भीमोऽभ्यभाषत । राजपुत्र निवर्तस्व न ते युक्तं

क्रुद्ध होऊन अत्यंत अद्भुत युद्ध करूं लागला ३३. कुंतीपुत्र युधिष्ठिरानें एकहजार योध्यांचा वध केला; भीमसेनानें सात हजार योध्यांना यमलोक दर्शविला ३४; नकुलानें बाणांच्या योगानें सातशें योद्धे परलोकीं पाठवून दिले आणि प्रतापी पुरुषश्रेष्ठ सहदेवानेंही युधिष्ठिराची आज्ञा झाल्यामुळें तीनशें शूर योद्ध्यांचा वध केला. नंतर अतिशय उग्र रूप धारण केलेला महारथी युधिष्ठिर त्रिगर्तांची ती मोठी सेना मारिल्यावर शस्त्र उपसून सुशर्म्यावर धांवला आणि त्वरा करीत करीत त्या महारथी युधिष्ठिर राजानें ३५,३६,३७ सुशर्म्याला गांठून बाणांनीं त्याला अतिशयच ताडण केलें. नंतर सुशर्माही अत्यंत क्षुब्ध झाला; त्वरा करून त्यानें युधिष्ठिराला ३८ नऊ बाणांनीं वेध केला व त्याच्या चार अश्वांवरही त्यानें चार बाण टाकिले. तदनंतर, हे जनमेजयराजा, झटपट काम करणाऱ्या कुंतीपुत्र भीमसेनानें ३९ सुशर्म्याला गांठून त्याच्या अश्वांचा वध केला; मोठ्या मोठ्या बाणांनीं त्याचे पृष्ठरक्षकही त्यानें मारिले ४० आणि क्रुद्ध होऊन त्याचा सारथिही त्यानें रथावरून खालीं पाडिला. नंतर मदिराक्ष ह्मणून अति प्रसिद्ध असलेला जो विराटाचा शूर चक्ररक्षक ४१ तो विरथ झालेल्या त्रिगर्ताधिपति सुशर्म्यावर चालून गेला आणि त्यानें त्याला प्रहारही केला. तदनंतर सुशर्म्याच्या रथावरून विराटानें खालीं उडी घातली ४२; त्याची गदा घेऊन तो बलाढ्य विराट त्याच्याच अंगावर धांवला आणि तो गदापाणि विराट वृद्ध असतांनाही तरुणाप्रमाणें चालू

पलायनम् ४४ अनेन वीर्येण कथं गास्त्वं प्रार्थयसे बलात् । कथं चानुचरांस्त्यक्त्वा शत्रुमध्ये विषीदसि ४५ इत्युक्तः स तु पार्थेन सुशर्मा रथयूथपः । तिष्ठ तिष्ठेति भीमं स सहसाभ्यद्रवद्बली ४६ भीमस्तु भीमसंकाशो रथात्प्रस्कन्द्य पाण्डवः । प्राद्रवत्तूर्णमव्यग्रो जीवितेप्सुः सुशर्मणः ४७ तं भीमसेनो धावन्तमभ्यधावत वीर्यवान् । त्रिगर्तराजमादातुं सिंहः क्षुद्रमृगं यथा ४८ अभिद्रुत्य सुशर्माणं केशपक्षे परामृशत् । समुद्यम्य तु रोषात्तं निष्पिपेष महीतले ४९ पदा मूर्ध्नि महाबाहुः प्राहरद्विलपिष्यतः । तस्य जानुं ददौ भीमो जघ्ने चैनमरत्निना । स मोहमगमद्राजा प्रहारवरपीडितः ५० तस्मिन्गृहीते विरथे त्रिगर्तानां महारथे । अभज्यत बलं सर्वं त्रैगर्तं तद्भयातुरम् ५१ निवर्त्य गास्ततः सर्वाः पाण्डुपुत्रा महारथाः । अवजित्य सुशर्माणं धनं चादाय सर्वशः ५२ स्वबाहुबलसंपन्ना ह्रीनिषेवा यतव्रताः । विराटस्य महात्मानः परिक्लेशविनाशनाः ५३

लागला ४३. त्रिगर्ताधिपति सुशर्मा पळत आहे असें पाहून भीमसेन त्याला ह्मणाला " हे राजपुत्रा, परत फीर; पळून जाणें तुला योग्य नाहीं ४४. असल्या वीर्याच्या जोरावर तूं बलात्कारानें गाई हरण करून नेण्याची कशी इच्छा करीत आहेस ? आणि अनुयायांना सोडून देऊन शत्रूंमध्यें असा हताश कां होत आहेस ? " ४५. ह्याप्रमाणें कुंतीपुत्र भीमसेन त्याला बोलला असतां " थांब, थांब " असें ह्मणून तो रथसमुदायांचा अधिपति बलाढ्य सुशर्मा एकाएकीं भीमसेनाच्या अंगावर धांवला ४६. तेव्हां भीमसेनाचीच ज्याला उपमा आहे असा तो पांडुपुत्र भीमसेन सुशर्म्याचा प्राण घेण्याकरितां अगदीं तत्परतेनें सत्वर रथावरून खालीं उडी टाकून धांवूं लागला. तेव्हां क्षुद्र मृगाला धरण्याकरितां त्याच्या मागोमाग जाणारा सिंहच कीं काय असा तो वीर्यवान् भीमसेन पुढें पळत सुटलेल्या त्रिगर्तराजाला धरण्याकरितां त्याच्या मागोमाग धांवत असतांना दृष्टीं पडला ४७,४८. असो. सुशर्म्याकडे चाल करून जातांक्षणीं भीमसेनानें त्याला केंस धरून ओढिलें आणि रोषानें वर उचलून भूतलावर हपटलें ४९. नंतर तो विलाप करूं लागला असतां महापराक्रमी भीमसेनानें त्याच्या मस्तकीं लत्तेचा प्रहार केला; एक गुडघाही त्यानें त्याला मारिला आणि एक चपराकही दिली. तेव्हां प्रचंड प्रहारानें पीडित झाल्यामुळें तो त्रिगर्तराजा मूर्च्छित झाला ५०. त्या महारथी त्रिगर्तराजाला विरथ करून धरून नेल्यानंतर त्रिगर्ताधिपतीच्या त्या, भयानें व्याकुल झालेल्या, सर्वही सैन्याची फांकाफांक झाली ५१. तदनंतर सर्व गाई परत फिरवून, सुशर्म्याला जिंकून आणून आणि त्याचें सर्व धन घेऊन स्वपराक्रमावरच अवलंबून असलेले

स्थिताः समक्षं ते सर्वे त्वथ भीमोऽभ्यभाषत ५४ नायं पापसमाचारो मत्तो जीवितुमर्हति । किं तु शक्यं मया कर्तुं यद्राजा सततं घृणी ५५ गले गृहीत्वा राजानमानीय विवशं वशम् । तत एनं विचेष्टन्तं बद्ध्वा पार्थो वृकोदरः ५६ रथमारोपयामास विसंज्ञं पांसुगुण्ठितम् । अभ्येत्य रणमध्यस्थमभ्यगच्छद्युधिष्ठिरम् ५७ दर्शयामास भीमस्तु सुशर्माणं नराधिपम् । प्रोवाच पुरुषव्याघ्रो भीममाहवशोभिनम् ५८ तं राजा प्राहसद्दृष्ट्वा मुच्यतां वै नराधमः । एवमुक्तोऽब्रवीद्भीमः सुशर्माणं महाबलम् ५९ भीम उवाच ॥ जीवितुं चेच्छसे मूढ हेतुं मे गदतः शृणु । दासोस्मीति त्वया वाच्यं संसत्सु च सभासु च ६० एवं त जीवितं दद्यामेष युद्धजितो विधिः । तमुवाच ततो ज्येष्ठो भ्राता सप्रणयं वचः ६१ युधिष्ठिर उवाच ॥ मुञ्च मुञ्चाधमाचारं प्रमाणं यदि ते वयम् । दासभावं गतो ह्येष विराटस्य महीपतेः ॥ अदासो

विराटराजाचे क्लेश नाहींसे करणारे विनयशील, व्रतस्थ, महारथी आणि महात्मे असे ते पांडुपुत्र ५२, ५३ सर्वही एकमेकांसमोर येऊन उभे राहिले असतां भीमसेन ह्मणाला ५४ " पापकर्म करणारा हा त्रिगर्तराजा माझ्या हातून जिवंत सुटण्यास योग्य नाहीं; परंतु, राजा नेहमींच दयाशील असल्यामुळें माझा काय बरें उपाय आहे ? " ५५. असें ह्मणत ह्मणत त्रिगर्तराजाचें मानगुटें धरून आणि निरुपाय झालेल्या त्या राजाला सर्वस्वीं आपल्या हातांत आणून तो तडफड करूं लागला असतां कुंतीपुत्र भीमसेनानें त्याला बांधूनही टाकिलें ५६; धुळीनें भरलेल्या व मूर्च्छित झालेल्या त्या राजाला त्यानें रथावर घातलें आणि तसेंच पुढें सरून रणामध्यें असलेल्या युधिष्ठिराजवळही तो त्याला घेऊन गेला ५७. तदनंतर त्रिगर्तराज सुशर्म्याला भीमसेनानें त्याला दर्शविलें असतां संग्रामामध्यें शोभणाऱ्या भीमसेनाशीं त्या पुरुषश्रेष्ठ युधिष्ठिरानें भाषण केलें ५८. सारांश, त्या सुशर्म्याला पाहून धर्मराजा हंसला आणि " ह्या नराधमाला सोडा " असें त्यानें भीमसेनाला सांगितलें. तेव्हां त्या महाबलाढ्य सुशर्म्याला भीमसेन ह्मणाला ५९ " हे मूढा, तुला जर जीवाची इच्छा असेल तर मी तुझ्या जीविताचा उपाय कथन करीत आहें तो तूं श्रवण कर. " मी तुमचा दास आहें " असें तूं सभांतून आणि लोकसमाजांतून ह्मटलें पाहिजेस ६०; ह्मणजे मी तुला जीवदान देईन. कारण, युद्धामध्यें एकाद्या शत्रूला जिंकिल्यानंतर त्याला जीवदान द्यावयाचें असल्यास हा विधिच आहे ". ह्यानंतर ज्येष्ठ भ्राता सांत्वनपूर्वक त्याला ह्मणाला ६१ " आमचें जर तुला ऐकावयाचें असेल तर ह्या नीच कर्म करणाऱ्या सुशर्म्याला सोड; विराटराजाचा-

गच्छ मुक्तोसि मैवं कार्षीः कदाचन ६२ [११०६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वणि सुशर्मनिग्रहे त्रयस्त्रिंशोध्यायः ॥ ३३ ॥

वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्ते तु सव्रीडः सुशर्मासीदधोमुखः । स मुक्तोभ्येत्य राजानमभिवाद्य प्रतस्थिवान् १ विसृज्य तु सुशर्माणं पाण्डवास्ते हतद्विषः २ स्वबाहुबलसंपन्ना ह्रीनिषेवा यतव्रताः । संग्रामशिरसो मध्ये तां रात्रिं सुखिनोवसन् ३ ततो विराटः कौन्तेयानतिमानुषविक्रमान् । अर्चयामास वित्तेन मानेन च महारथान् ४ विराट उवाच ॥ यथैव मम रत्नानि युष्माकं तानि वै तथा । कार्यं कुरुत वै सर्वे यथाकामं यथासुखम् ५ ददाम्यलंकृताः कन्या वसूनि विविधानि च । मनसश्चाप्यभिप्रेतं युद्धे शत्रुनिबर्हणाः ६ युष्माकं विक्रमादद्य मुक्तोहं स्वस्तिमानिह । तस्माद्भवन्तो मत्स्यानामीश्वराः सर्व एव हि ७ वैशम्पायन उवाच ॥ तथेतिवादिनं मत्स्यं कौरवेयाः पृथक्पृथक् । ऊचुः प्राञ्जलयः सर्वे युधिष्ठिर-

हा दास झालाच आहे ". इतकें भीमसेनाला सांगितल्यानंतर युधिष्ठिर त्याला ह्मणाला " तूं दास नाहींस; तुला सोडून दिलें आहे. आतां तूं चालता हो आणि फिरून कधीं असें करूं नको ६२. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं दक्षिणगोग्रहणसंबंधीं सुशर्म्याच्या निग्रहाविषयीं तेहेतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३३ ॥

वैशंपायन सांगतात:— ह्याप्रमाणें युधिष्ठिरानें सांगितल्यावर सुशर्म्यानें लज्जित होऊन आपली मान खालीं घातली आणि अशा रीतीनें सुटका झाल्यावर विराटराजाला अभिवंदन करून तो चालता झाला १. ज्यांनीं शत्रूंचा वध केला आहे असे ते स्वतःच्या पराक्रमावरच अवलंबून असलेले विनयशील व व्रतस्थ पांडव सुशर्म्याला सोडून देऊन संग्रामभूमीच्या मुख्य भागांत ती रात्र सुखानें राहिले २, ३. तदनंतर अमानुष पराक्रम करणाऱ्या महारथि कुंतीपुत्रांची विराटराजानें संमानपूर्वक द्रव्य देऊन प्रशंसा केली ४. विराट ह्मणतो:— हीं रत्नें जशीं माझीं आहेत तशीं तुमचींही आहेत. ह्या रत्नांचे तुह्मी सर्वही आपआपल्या इच्छेप्रमाणें खुशाल हवें तें करा ५. युद्धामध्यें तुह्मी शत्रूंचा विध्वंस करणारे आहांत. ह्यास्तव, मी तुह्मांला अलंकार घातलेल्या कन्या, नानाप्रकारच्या संपत्ति व आज जें तुमच्या मनाला प्रिय असेल तें अर्पण करितों ६. आज मी तुमच्या पराक्रमामुळें जिवंत सुटून येथें स्वस्तिक्षेम राहिलों आहें. तस्मात्, तुह्मीच सर्वही मत्स्यदेशाचे अधिपति आहांत ७. वैशंपायन

पुरोगमाः ८ प्रतिनन्दाम ते वाक्यं सर्वं चैव विशांपते । एतेनैव प्रतीताः स्म यत्त्वं मुक्तोद्य शत्रुभिः ९ ततोऽब्रवीत्प्रीतमना मत्स्यराजो युधिष्ठिरम् । पुनरेव महाबाहुर्विराटो राजसत्तमः ॥ एहि त्वामभिषेक्ष्यामि मत्स्यराजस्तु नो भवान् १० मनसश्चाप्यभिप्रेतं यथेष्टं भुवि दुर्लभम् । तत्तेहं संप्रदास्यामि सर्वमर्हति नो भवान् ११ रत्नानि गाः सुवर्णं च मणिमुक्तमथापि च । वैयाघ्रपद्यं विप्रेन्द्र सर्वथैव नमोऽस्तु ते १२ त्वत्कृते ह्यद्य पश्यामि राज्यं संतानमेव च । यतश्च जातसंरम्भो न च शत्रुवशं गतः १३ ततो युधिष्ठिरो मत्स्यं पुनरेवाभ्यभाषत । प्रतिनन्दामि ते वाक्यं मनोज्ञं मत्स्य भाषसे १४ आनृशंस्यपरो नित्यं सुसुखी सततं भव १५ गच्छन्तु दूतास्त्वरितं नगरं तव पार्थिव । सुहृदां प्रियमाख्यातुं घोषयन्तु च ते जयम् १६ ततस्तद्वचनान्मत्स्यो दूतान्राजा समादिशत् । आचक्षध्वं पुरं गत्वा सङ्ग्रामे विजयं मम, १७ कुमार्यः समलंकृत्य पर्यागच्छन्तु मे पुरात् । वादित्राणि

सांगतात:—ह्याप्रमाणें मत्स्यराज विराट बोलूं लागला असतां युधिष्ठिरप्रभृति सर्वही पांडव हात जोडून त्यांला ह्मणाले ८ "हे प्रजापालका विराटा, आह्मी तुझ्या सर्व भाषणाचें अभिनंदन करितों. आज तूं शत्रूंच्या तावडींतून सुटलास एवढ्यानेंच आह्मी आनंदित झालों आहों" ९. तदनंतर अंतःकरणामध्यें प्रसन्न झालेला मत्स्यराज नृपश्रेष्ठ महापराक्रमी विराट पुनरपि युधिष्ठिराला ह्मणाला "इकडे ये, मी तुला अभिषेक करितों. तूंच आमचा मत्स्यराज आहेस १०. तुझ्या मनाला इष्ट असेल ती वस्तु पृथ्वीमध्यें दुर्लभ जरी असली तरी मी ती तुला अर्पण करीन. कारण, सर्व कांहीं प्राप्त करून घेण्यास आपण पात्र आहां ११. हे विप्रेंद्रा, तुला नमस्कार असो. रत्नें, गाई, सुवर्ण, हिरे, मोत्यें, सिंहासन वगैरे सर्वकांहीं प्राप्त होण्यास तूं सर्वस्वीं पात्र आहेस १२; राज्य आणि संतान हीं मी आज तुझ्यामुळेंच अवलोकन करीत आहें. कारण, शत्रूंनीं धरिल्यामुळें जरी मी भयभीत झालों होतों तरी शेवटीं तुझ्याच पराक्रमामुळें मी शत्रूंच्या स्वाधीन झालों नाहीं" १३. तदनंतर मत्स्यराज विराटाला तो पुनरपि ह्मणाला "हे मत्स्यराजा, तूं चित्तवेधक भाषण करीत आहेस ह्याचें मी अभिनंदन करितों १४. तूं नेहमीं दयाशील राहून सर्वदा सुखी रहा १५. आतां, हे राजा, सुहृदांना प्रिय वार्ता कथन करण्याकरितां तुझे दूत नगरामध्यें जाऊं दे आणि तुझ्या विजयाची त्यांनां प्रसिद्धि करूं दे" १६. तदनंतर युधिष्ठिराच्या सांगण्यावरून मत्स्यराज विराट दूतांना ह्मणाला "नगरामध्यें जाऊन संग्रामांत माझा विजय झाल्याचें कथन करा १७. कुमारिका अलंकार घालून नगरांतून मला सामोऱ्या येऊं द्या आणि सर्व प्रकारचीं वाद्यें व चांगल्या रीतीनें शृंगारिलेल्या

च सर्वाणि गणिकाश्च स्वलंकृताः १८ एतां चाज्ञां ततः श्रुत्वा राज्ञा मत्स्येन नोदिताः । तामाज्ञां शिरसा कृत्वा प्रस्थिता हृष्टमानसाः १९ ते गत्वा तत्र तां रात्रिमथ सूर्योदयं प्रति । विराटस्य पुराभ्याशे दूता जयमघोषयन् २० [११२६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वणि दक्षिणगोग्रहे विराटजयघोषे चतुस्त्रिंशोऽध्यायः ॥ ३४ ॥

वैशम्पायन उवाच ॥ याते त्रिगर्तान्मत्स्ये तु पशूंस्तान्वै परीप्सति । दुर्योधनः सहामात्यो विराटमुपयादथ १ भीष्मो द्रोणश्च कर्णश्च कृपश्च परमास्त्रवित् । द्रौणिश्च सौबलश्चैव तथा दुःशासनः प्रभो २ विविंशतिर्विकर्णश्च चित्रसेनश्च वीर्यवान् । दुर्मुखो दुःशलश्चैव ये चैवान्ये महारथाः ३ एते मत्स्यानुपागम्य विराटस्य महीपतेः । घोषान्विद्राव्य तरसा गोधनं जह्रुरोजसा ४ षष्टिं गवां सहस्राणि कुरवः कालयन्ति च । महता रथवंशेन परिवार्य समन्ततः ५ गोपालानां तु घोषस्य हन्यतां तैर्महारथैः । आरावः सुमहानासीत्संप्रहारे भयंकरे ६ गोपाध्यक्षो भयत्रस्तो

गणिकाही बरोबर असूं द्या " १८. ही आज्ञा श्रवण केल्यावर मत्स्यराजानें आज्ञा केलेले ते दूत ती आज्ञा शिरसा मान्य करून सानंद मनानें तेथून निघाले १९. त्या रात्रींच ते तिकडे गेले आणि सूर्योदयाचे सुमारास विराटाच्या नगराचे आसपास त्यांनीं त्याचा जयघोष केला २०. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं दक्षिणगोग्रहणसंबंधीं विराटाच्या जयघोषाविषयीं चवतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३४ ॥

वैशंपायन सांगतातः—सुशर्मा त्रिगर्तदेशाला गेल्यावर मत्स्यराज विराट ते पशु परत आले असें समजत आहे तोंच दुर्योधन अमात्यांसहवर्तमान विराटाच्या देशाजवळ आला १. भीष्म, द्रोण, कर्ण, महास्त्रवेत्ता कृप, द्रोणपुत्र अश्वत्थामा, सुबलपुत्र शकुनि, त्याचप्रमाणें हे प्रभो जनमेजया, दुःशासन २, विविंशति, विकर्ण, वीर्यवान् चित्रसेन, दुर्मुख, दुःशल आणि इतरही महारथी ३ हे सर्व विराटराजाच्या मत्स्यदेशांत गेले आणि बलात्कारानें तेथील गोपालांना हांकून लावून त्यांनीं स्वपराक्रमानें गोधन हरण केलें ४. प्रचंड रथसमुदायाच्या योगानें सभोंवतीं गराडा देऊन ते कौरव साठ हजार गाई घेऊन चालले ५; आणि ते महारथी कौरव मोठ्यावरील गोपालांना मारूं लागले असतां भयंकर मारामारी सुरू होऊन गोपाल फारच मोठ्यानें रडूं लागले ६. शेवटीं गोपालांवरील अध्यक्ष भयभीत झाला आणि त्वरित रथामध्यें

रथमास्थाय सत्वरः । जगाम नगरायैव परिक्रोशंस्तदार्तवत् ७ स प्रविश्य पुरं राज्ञो नृपवेश्माभ्ययात्ततः । अवतीर्य रथात्तूर्णमाख्यातुं प्रविवेश ह ८ दृष्ट्वा भूमिञ्जयं नाम पुत्रं मत्स्यस्य मानिनम् । तस्मै तत्सर्वमाचष्ट राष्ट्रस्य पशुकर्षणम् ९ षष्टिं गवां सहस्राणि कुरवः कालयन्ति ते । तद्विजेतुं समुत्तिष्ठ गोधनं राष्ट्रवर्धन १० राजपुत्र हितप्रेप्सुः क्षिप्रं निर्याहि च स्वयम् । त्वां हि मत्स्यो महीपालः शून्यपालमिहाकरोत् ११ त्वया परिषदो मध्ये श्लाघते स नराधिपः । पुत्रो ममानुरूपश्च शूरश्चेति कुलोद्वहः १२ इष्वस्त्रे निपुणो योधः सदा वीरश्च मे सुतः । तस्य तत्सत्यमेवास्तु मनुष्येन्द्रस्य भाषितम् १३ आवर्तय कुरूञ्जित्वा पशून्पशुमतां वर । निर्दहैषामनीकानि भीमेन शरतेजसा १४ धनुश्च्युतै रुक्मपुङ्खैः शरैः सन्नतपर्वभिः । द्विषतां भिन्ध्यनीकानि गजानामिव यूथपः १५ पाशोपधानां ज्यातन्त्रीं चापदण्डां महास्वनाम् । शरवर्णां

आरूढ होऊन आर्ताप्रमाणें आक्रोश करीत करीत नगराकडेच चालता झाला ७. राजाच्या नगरांत शिरल्यावर तो लगेच राजवाड्यासमीप गेला आणि रथांतून सत्वर उतरून तो वार्ता कथन करण्याकरितां आंत प्रविष्ट झाला ८. नंतर मत्स्याचा भूमिंजयनामक मानी पुत्र दृष्टीं पडतांक्षणीं राष्ट्रांतील पशु हांकून नेल्याचें तें सर्व वृत्त त्यानें त्याला निवेदन केलें ९. (तो ह्मणाला) "हे राष्ट्रवर्धना, ते कौरव साठ हजार गाई घेऊन जात आहेत. तस्मात्, तें गोधन जिंकून परत आणण्याकरितां तूं ऊठ १०. हे राजपुत्रा, आपलें हित मनामध्यें आणून तूं स्वतः सत्वर बाहेर पड. कारण, मत्स्यराज विराटानें स्वतः संनिध नसतांना तुलाच पालक केलें आहे ११. शिवाय, माझा पुत्र मला अनुरूप असाच शूर व कुलाचें नांव चालविणारा आहे. शरसंधान करण्यामध्यें तो प्रवीण योद्धा आहे व माझा पुत्र केव्हांही प्रसंग पडला असतां शौर्य गाजविणारा आहे" असें सभेमध्यें तो भूपति तुझी प्रशंसाही करीत असतो. तस्मात्, तें त्या राजाचें भाषण सत्यच होवो १२, १३. हे पशुमानांमध्यें श्रेष्ठ, कौरवांना जिंकून तूं आपले पशु परत आण आणि बाणांच्या भयंकर तेजानें तूं त्यांचीं सैन्यें दग्ध करून टाक १४. मदमत्त झालेला हत्ती ज्याप्रमाणें गजांचे कळप उडवून देतो त्याप्रमाणें सुवर्णपिच्छांनीं आणि अंकुचिदार टोंकांनीं युक्त असलेल्या व धनुष्यापासून सुटलेल्या बाणांच्या योगानें तूं शत्रुसेनांचा विध्वंस कर १५. प्रत्यंचेच्या दोन्ही बाजूंना असलेले पाश ह्याच ज्याच्या तारा अडकविण्याच्या खुंट्या आहेत, प्रत्यंचा हीच ज्याची तार आहे, धनुष्य हीच ज्याची भोपळ्यासहवर्तमान दांडी आहे व धनुष्यापासून सुटणारे बाण

धनुर्वीणां शत्रुमध्ये प्रवादय १६ श्वेता रजतसंकाशा रथे युज्यन्तु ते हयाः। ध्वजं च सिंहं सौवर्णमुच्छ्रयन्तु तव प्रभो १७ रुक्मपुङ्खाः प्रसन्नाग्रा मुक्ता हस्तवता त्वया । छादयन्तु शराः सूर्यं राज्ञां मार्गनिरोधकाः १८ रणे जित्वा कुरून्सर्वान्वज्रपाणिरिवासुरान् । यशो महदवाप्य त्वं प्रविशेदं पुरं पुनः १९ त्वं हि राष्ट्रस्य परमा गतिर्मत्स्यपतेः सुतः । यथा हि पाण्डुपुत्राणामर्जुनो जयतां वरः २० एवमेव गतिर्नूनं भवान्विषयवासिनाम् । गतिमन्तो वयं त्वद्य सर्वे विषयवासिनः २१ वैशम्पायन उवाच॥ स्त्रीमध्य उक्तस्तेनासौ तद्वाक्यमभयङ्करम् । अन्तःपुरे श्लाघमान इदं वचनमब्रवीत् २२ [११४८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे गोपवाक्ये पञ्चत्रिंशोऽध्यायः ॥ ३५ ॥

उत्तर उवाच ॥ अद्याहमनुगच्छेयं दृढधन्वा गवां पदम् । यदि मे सारथिः कश्चिद्भवेदश्वेषु कोविदः १ तं त्वहं नावगच्छामि यो मे यन्ता

हें च ज्याच्यांतील निघणारे ध्वनि आहेत असें उच्च स्वरानें वाजणारें धनुष्यरूप वीणावाद्य तूं आज शत्रूंमध्यें वाजीव १६. हे प्रभो, रुप्यासारिखे श्वेतवर्ण अश्व तुझ्या रथाला युक्त होवोत; सुवर्णाचा सिंहध्वज तुझ्या रथावर उभारोत १७ आणि सुवर्ण पिच्छें आणि लकलकित अग्रें ह्यांनीं युक्त आणि राजांचा मार्ग अडवून टाकणारे असे बाण हस्तकौशलानें युक्त असलेल्या तुझ्या हातून सुटून सूर्य आच्छादित करोत १८. सारांश, दैत्यांना जिंकणाऱ्या वज्रपाणी इंद्राप्रमाणें संग्रामामध्यें सर्व कौरवांना जिंकून मोठी कीर्ति संपादन केल्यावर तूं पुनरपि ह्या नगरामध्यें प्रवेश कर १९. मत्स्यराज विराटाचा तूं पुत्र असल्यामुळें राष्ट्राचा मुख्य आधार तूंच आहेस; आणि ज्याप्रमाणें विजयीश्रेष्ठ अर्जुन पांडुपुत्रांचा आधार आहे २० त्याचप्रमाणें मत्स्यदेशांमध्यें वास्तव्य करणाऱ्यांचा तूं खरोखर मुख्य आधार आहेस. आणि तुझ्यामुळेंच मत्स्यदेशांत रहाणारे आजें आह्मी कोणीही निराधार नाहीं" २१. वैशंपायन सांगतातः—भूमिंजय स्त्रियांमध्यें असतांना गोपालांच्या अध्यक्षानें त्याला अनुलक्षून तसें निर्भयपणें भाषण केलें असतां अंतःपुरामध्यें बढाया मारणारा तो (उत्तर ह्यानांवानें प्रसिद्ध असलेला) भूमिंजय बोलूं लागला २२. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं गोपालाच्या भाषणाविषयीं पस्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३५ ॥

उत्तर ह्मणतो:—अश्वसंबंधीं ज्ञाता जर कोणी सारथि मला मिळेल तर मी दृढ

भवेन्नरः । पश्यध्वं सारथिं क्षिप्रं मम युक्तं प्रयास्यतः २ अष्टाविंशति-
रात्रं वा मासं वा नूनमन्ततः । यत्तदासीन्महद्युद्धं तत्र मे सारथिर्हतः ३
स लभेयं यदा त्वन्यं हययानविदं नरम् । त्वरावानद्य यात्वाहं समुच्छ्रि-
तमहाध्वजम् ४ विगाह्य तत्परानीकं गजवाजिरथाकुलम् । शस्त्रप्रताप-
निर्वीर्यान्कुरूञ्जित्वानये पशून् ५ दुर्योधनं शान्तनवं कर्णं वैकर्तनं कृपम् ।
द्रोणं च सह पुत्रेण महेष्वासान्समागतान् ६ वित्रासयित्वा सङ्ग्रामे दान-
वानिव वज्रभृत् । अनेनैव मुहूर्तेन पुनः प्रत्यानये पशून् ७ शून्यमासाद्य
कुरवः प्रयान्त्यादाय गोधनम् । किं नु शक्यं मया कर्तुं यदहं तत्र
नाभवम् ८ पश्येयुरद्य मे वीर्यं कुरवस्ते समागताः । किं नु पार्थोऽर्जुनः
साक्षादयमस्मान्प्रबाधते ९ वैशम्पायन उवाच ॥ श्रुत्वा तदर्जुनो वाक्यं
राज्ञः पुत्रस्य भाषतः । अतीतसमये काले प्रियां भार्यामनिन्दिताम् १०
द्रुपदस्य सुतां तन्वीं पाञ्चालीं पावकात्मजाम् । सत्यार्जवगुणोपेतां भर्तुः

मनुष्य धारण करून आज गाईंच्या मागोमाग जाईन १; परंतु, माझें सारथ्य करण्यास योग्य असा पुरुष कोणी मला दिसत नाहीं. ह्यास्तव, संग्रामामध्यें जाण्यास तयार असलेल्या मला तुह्मी एक योग्य सारथि सत्वर पाहून द्या २. पूर्वीं अठ्ठावीस दिवसपर्यंत अथवा खरोखर एक महिनाभर जें मोठें युद्ध झालें त्या युद्धामध्यें माझ्या सारथ्याचा वध झाला ३. तेव्हां अश्वयानवेत्ता असा दुसरा पुरुष जर मला मिळेल तर आज मी सत्वर संग्रामामध्यें जाईन आणि मोठे मोठे ध्वज ज्यामध्यें उभारिले आहेत, आणि गज, अश्व व रथ ह्यांनीं जें गजबजलेलें आहे अशा शत्रूंच्या सैन्यामध्यें प्रविष्ट होऊन आणि शस्त्रप्रतापानें निर्वीर्य करून टाकिलेल्या कौरवांना जिंकून मी आपले पशु परत आणीन ४, ५. वज्र धारण करणारा इंद्र ज्याप्रमाणें असुरांना त्रस्त करून सोडितो त्या प्रमाणें दुर्योधन, शांतनव भीष्म, सूर्यपुत्र कर्ण, कृप आणि पुत्रासहवर्तमान द्रोण हे जे महाधनुर्धारी योद्धे आले आहेत त्यांना संग्रामामध्यें त्रस्त करून मी ह्या घटकेलाच पशु परत आणीन ६,७. आज तिकडे कोणी नाहीं असें पाहून कौरव गोधन घेऊन जात आहेत. परंतु, मी तेथें नाहीं ह्यामुळें माझा काय उपाय आहे ? ८. मी जर तेथें असतों तर त्या एकत्र जुळलेल्या कौरवांना आज माझा पराक्रम दृष्टीं पडला असता आणि साक्षात् कुंतीपुत्र अर्जुनच आमच्याशीं युद्ध करीत आहे कीं काय असें त्यांना वाटलें असतें ९. वैशंपायन सांगतातः—राजपुत्र बोलूं लागला असतां त्याचें तें भाषण श्रवण केल्यावर आपल्या प्रतिज्ञेच्या परिसमाप्तीचा काल प्राप्त झाला आहे असा विचार करून सर्व

प्रियहिते रताम् ११ उवाच रहसि प्रीतः कृष्णां सर्वार्थकोविदः । उत्तरं ब्रूहि कल्याणि क्षिप्रं मद्वचनादिदम् १२ अयं वै पाण्डवस्यासीत्सारथिः संमतो दृढः । महायुद्धेषु संसिद्धः स ते यन्ता भविष्यति १३ वैशम्पायन उवाच ॥ तस्य तद्वचनं स्त्रीषु भाषतश्च पुनःपुनः । न सामर्षत पाञ्चाली बीभत्सोः परिकीर्तनम् १४ अथैनमुपसंगम्य स्त्रीमध्यात्सा तपस्विनी । व्रीडमानेव शनकैरिदं वचनमब्रवीत् १५ योसौ बृहद्वारणाभो युवा सुप्रियदर्शनः । बृहन्नलेति विख्यातः पार्थस्यासीत्स सारथिः १६ धनुष्यनवरश्चासीत्तस्य शिष्यो महात्मनः । दृष्टपूर्वो मया वीर चरन्त्या पाण्डवान्प्रति १७ यदा तत्पावको दावमदहत्खाण्डवं महत् । अर्जुनस्य तदानेन संगृहीता हयोत्तमाः १८ तेन सारथिना पार्थः सर्वभूतानि सर्वशः । अजयत्खाण्डवप्रस्थे न हि यन्तास्ति तादृशः १९ उत्तर उवाच ॥ सैरन्ध्रि जानासि तथा युवानं नपुंसको नैव भवेद्यथासौ । अहं न शक्नोमि

कर्मांत निष्णात असलेला अर्जुन प्रसन्न मनानें एकांतामध्यें अग्नीपासून उत्पन्न झालेली, सत्य व आर्जव ह्या गुणांनीं युक्त असलेली, भर्त्याचें प्रिय व हित करण्याविषयीं तत्पर असलेली आणि आनंदित व सौंदर्यसंपन्न अशी जी आपली प्रिय भार्या द्रुपदकन्या पांचाली कृष्णा तिला ह्मणाला "हे कल्याणि, माझ्या सांगण्यावरून तूं उत्तराला—हा पांडुपुत्र अर्जुनाचा मान्य व प्रबल सारथि होता आणि मोठमोठ्या युद्धांचे अनुभव ह्याला आलेले आहेत; ह्मास्तव, तो तुझा सारथि होईल—असें सत्वर सांग" १०,११,१२,१३. वैशंपायन सांगतातः—अर्जुनाच्या नांवाचा उल्लेख करून तो उत्तर स्त्रियांमध्यें वारंवार बोलूं लागला असतां त्या पांचाली द्रौपदीला तें ऐकून स्वस्थ बसवेना १४. तेव्हां स्त्रियांमधून उठून ती विचारी द्रौपदी लाजत लाजत उत्तराला हळू हळू ह्मणाली १५ "ज्याची मुद्रा अत्यंत आल्हादकारक आहे असा जो हा गजेंद्रासारिखा दिसत असलेला व बृहन्नला ह्मणून प्रख्यात असलेला तरुण पुरुष आहे तो कुंतीपुत्र अर्जुनाचा सारथि होता १६. हे वीरा, पांडवांबरोबर मी वास्तव्य करीत असतांना हा त्या महात्म्या अर्जुनाचा शिष्य धनुर्विद्येंत त्याच्याबरोबरीचा असल्यानें पूर्वीं माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें आहे १७. ज्यावेळीं अग्नीनें तें प्रचंड खांडववन दग्ध केलें त्यावेळीं अर्जुनाचा सारथि हाच होता १८ आणि ह्याच सारथ्यामुळें कुंतीपुत्र अर्जुनानें खांडवप्रस्थामध्यें सर्व प्राण्यांचा सर्वस्वीं पराभव केला. तात्पर्य, ह्याच्यासारिखा दुसरा सारथि नाहीं" १९. उत्तर ह्मणतो :— हे सैरंध्रि, तुला जर तो तरुण तसा असल्याचें ठाऊक आहे तर

बृहन्नलां शुभे वक्तुं स्वयं यच्छ हयान्ममेति वै २० द्रौपद्युवाच ॥ येयं कुमारी सुश्रोणी भगिनी ते यवीयसी । अस्याः स वीर वचनं करिष्यति न संशयः २१ यदि वै सारथिः स स्यात्कुरून्सर्वान्न संशयः । जित्वा गाश्च समादाय ध्रुवमागमनं भवेत् २२ एवमुक्तः स सैरन्ध्र्या भगिनीं प्रत्यभाषत । गच्छ त्वमनवद्याङ्गि तामानय बृहन्नलाम् २३ सा भ्रात्रा प्रेषिता शीघ्रमगच्छन्नर्तनागृहम् । यत्रास्ते स महाबाहुश्छन्नः सत्रेण पाण्डवः २४ [११७२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे बृहन्नलासारथ्यकथने षट्त्रिंशोऽध्यायः ॥ ३६ ॥

वैशम्पायन उवाच॥ सा प्राद्रवत्काञ्चनमाल्यधारिणी ज्येष्ठेन भ्रात्रा प्रहिता यशस्विनी । सुदक्षिणा वेदिविलग्नमध्या सा पद्मपत्राभनिभा शिखण्डिनी १ तन्वी शुभाङ्गी मणिचित्रमेखला मत्स्यस्य राज्ञो दुहिता श्रिया वृता । तन्नर्तनागारमरालपक्ष्मा शतह्रदा मेघमिवान्वपद्यत २ सा हस्तिहस्तो-

---

हा ज्याप्रमाणें दिसत आहे त्याप्रमाणें नपुंसक नसलाच पाहिजे. तथापि, हे कल्याणि, माझे अश्व तूं आवरून धर, असें स्वतः बृहन्नलेला सांगण्याचें माझें धैर्य होत नाहीं २०. द्रौपदी ह्मणते:—हे वीरा, ही जी सुंदरी कन्या तुझी कनिष्ठ भगिनी आहे हिनें सांगितलें असतां ती बृहन्नला निःसंशय ऐकेल २१; आणि तो जर तुला सारथि होईल तर सर्व कौरवांना निःसंशय जिंकून आणि गाईंना परत घेऊन तुझें येथें निश्चयपूर्वक आगमन होईल २२. ह्याप्रमाणें सैरंध्रीनें सांगितलें असतां तो उत्तर भगिनीला ह्मणाला "हे सुंदरि, तूं जा आणि त्या बृहन्नलेला घेऊन ये" २३. ह्याप्रमाणें भ्रात्यानें पाठविल्यावर जेथें तो महापराक्रमी पांडुपुत्र अर्जुन वेषांतर करून गुप्त राहिला होता त्या नृत्यशालेमध्यें ती सत्वर गेली २४. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं बृहन्नलेचें सारथ्य कथनकरण्याविषयीं छत्तिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३६ ॥

वैशंपायन सांगतात:—मेघाकडे जाणारी विद्युल्लताच कीं काय अशी ती श्रेष्ठ भ्रात्यानें पाठविलेली मत्स्यराजाची यशस्विनी कन्या त्या नृत्यगृहामध्यें गेली. तिनें सुवर्णपुष्पांच्या माला धारण केलेल्या होत्या, आपल्या भ्रात्याला अनुसरून ती वागणारी होती, वेदीप्रमाणें तिचा मध्यभाग कृश होता, कमलपत्राप्रमाणें तिची कांति होती, मयूरपिच्छयुक्त अलंकार तिनें धारण केलेले होते, अंगानें ती सडपातळ असून तिचे अवयवही शुभ होते, रत्नजडित आश्चर्यकारक कमरपट्टा तिनें घातलेला होता आणि तिच्या

पमसंहितोरूः स्वनिन्दिता चारुदती सुमध्यमा । आसाद्य तं वै वरमाल्यधारिणी पार्थं शुभा नागवधूरिव द्विपम् ३ सा रत्नभूता मनसः प्रियार्चिता सुता विराटस्य यथेन्द्रलक्ष्मीः । सुदर्शनीया प्रमुखे यशस्विनी प्रीत्याब्रवीदर्जुनमायतेक्षणा ४ सुसंहतोरुं कनकोज्ज्वलत्वचं पार्थः कुमारीं स तदाभ्यभाषत । किमागमः काञ्चनमाल्यधारिणि मृगाक्षि किं त्वं त्वरितेव भामिनि ॥ किं ते मुखं सुन्दरि न प्रसन्नमाचक्ष्व तत्त्वं मम शीघ्रमङ्गने ५ वैशम्पायन उवाच ॥ स तां दृष्ट्वा विशालाक्षीं राजपुत्रीं सखीं सखा । प्रहसन्नब्रवीद्राजन्किमागमनमित्युत ६ तमब्रवीद्राजपुत्री समुपेत्य नरर्षभम् । प्रणयं भावयन्ती सा सखीमध्य इदं वचः ७ गावो राष्ट्रस्य कुरुभिः काल्यन्ते नो बृहन्नले । ता विजेतुं मम भ्राता प्रयास्यति धनुर्धरः ८ नाचिरं निहतस्तस्य सङ्ग्रामे रथसारथिः । तेन नास्ति समः सूतो

पापण्या वक्र होत्या १, २. गजशुंडेचीच ज्यांना उपमा योग्य आहे अशा तिच्या मांड्या एकमेकीला लागलेल्या होत्या, तिच्या रूपाला नांव ठेवण्यास कोठेंही जागा नव्हती, तिचे दंत मनोहर होते, मध्यभाग सुंदर होता आणि उत्कृष्ट पुष्पें तिनें धारण केलेलीं होतीं. अशी ती कल्याणी उत्तरा गजाकडे जाणाऱ्या हत्तिणी प्रमाणेंच कीं काय त्या कुंतीपुत्र अर्जुनासमीप गेली ३. कोणाच्याहीमनाला प्रिय व मान्य, विशाल नेत्रांनीं युक्त, राजकुलांतील एक रत्न होऊन राहिलेली आणि इंद्राच्या लक्ष्मीप्रमाणें प्रथमतः दर्शन घेण्यास योग्य असलेली ती यशस्विनी विराटकन्या उत्तरा प्रेमानें अर्जुनाशीं बोलूं लागली ४. तेव्हां जिच्या मांड्या अगदीं एकीमेकीला लागलेल्या आहेत आणि जिची कांति सुवर्णासारिखी उज्ज्वल आहे अशा त्या कन्येला कुंतीपुत्र अर्जुन ह्मणाला " हे सुवर्णपुष्पधारिणी मृगनयने, तूं कशाकरितां इकडे आलीस ? हे भामिनि, तूं अशी घाईत घाईत कां आहेस आणि, हे सुंदरस्त्रिये, आज तुझें मुख प्रसन्न कां नाहीं हें तूं मला सत्वर यथार्थ सांग " ५. वैशंपायन सांगतातः—हे जनमेजयराजा, आपली सखी जी विशालनयना राजकन्या उत्तरा तिला अवलोकन करून " येण्याचें कारण काय " ह्मणून हंसत हंसत अर्जुनानें विचारिलें ६. तेव्हां प्रेम दर्शविण्याकरितां त्या पुरुषश्रेष्ठाच्या अगदीं जवळ जाऊन ती राजकन्या सख्या सभोंवतीं असतांना त्याला ह्मणाली ७ " हे बृहन्नले, राष्ट्रांतील गाई कौरव घेऊन चालले आहेत आणि त्या जिंकून परत आणण्याकरितां माझा धनुर्धर भ्राता जाणार आहे ८. परंतु, नुकताच संग्रामामध्यें त्याचा रथ चालविणाऱ्या सारथ्याचा वध झाला आहे आणि उपांपत ह्याचें सारथ्य करण्याला योग्य असा त्या सारथ्याची बरोबरी करणारा कोणीही

योस्य सारथ्यमाचरेत् ९ तस्मै प्रयतमानाय सारथ्यर्थं बृहन्नले। आचचक्षे हयज्ञाने सैरन्ध्री कौशलं तव १० अर्जुनस्य किलासीस्त्वं सारथिर्दयितः पुरा। त्वयाजयत्सहायेन पृथिवीं पाण्डवर्षभः ११ सा सारथ्यं मम भ्रातुः कुरु साधु बृहन्नले। पुरा दूरतरं गावो ह्रियन्ते कुरुभिर्हि नः १२ अथैतद्वचनं मेद्य नियुक्ता न करिष्यसि। प्रणयादुच्यमाना त्वं परित्यक्ष्यामि जीवितम् १३ एवमुक्तस्तु सुश्रोण्या तया सख्या परन्तपः। जगाम राजपुत्रस्य सकाशममितौजसः १४ तमाव्रजन्तं त्वरितं प्रभिन्नमिव कुञ्जरम्। अन्वगच्छद्विशालाक्षी शिशुं गजवधूरिव १५ दूरादेव तु तां प्रेक्ष्य राजपुत्रोऽभ्यभाषत। त्वया सारथिना पार्थः खाण्डवेऽग्निमतर्पयत् १६ पृथिवीमजयत्कृत्स्नां कुन्तीपुत्रो धनञ्जयः। सैरन्ध्री त्वां समाचष्टे सा हि जानाति पाण्डवान् १७ संयच्छ मामकानश्वांस्तथैव त्वं बृहन्नले। कुरुभिर्योत्स्यमानस्य गोधनानि परीप्सतः १८ अर्जुनस्य किलासीस्त्वं सारथिर्दयितः पुरा। त्वयाजयत्सहायेन पृथिवीं पाण्डवर्षभः १९ एवमुक्ता

सारथि नाहीं ९. हे बृहन्नले, सारथ्याकरितां तो काळजी करीत असतांना अश्वविद्येमध्यें तूं निपुण असल्याचें सैरंध्रीनें त्याला सांगितलें आहे १०. खरोखर तूं पूर्वी अर्जुनाचा प्रिय सारथि होतास आणि तुझ्याच साहाय्यानें पांडवश्रेष्ठ अर्जुनानें पृथ्वी जिंकिली ११. ह्यास्तव, हे बृहन्नले, कौरवांनीं आमच्या गाई दूर नेल्या नाहींत तोंच माझ्या भ्रात्याचें तूं उत्कृष्ट रीतीनें सारथ्य कर १२. मी हें तुला प्रेमानें सांगत आहें. ह्यास्तव, आज्ञा झाल्याप्रमाणें तूं जर माझें ह्मणणें मान्य न करिशील तर मी प्राणत्याग करीन १३. ह्याप्रमाणें त्या सुंदरी सखीनें सांगितलें असतां शत्रूंना ताप देणारा तो अर्जुन महातेजस्वी राजपुत्रासमीप गेला १४; आणि हत्तीण ज्याप्रमाणें आपल्या छाव्याच्या मागोमाग जाते त्याप्रमाणें मत्त गजाप्रमाणें सत्वर चालूं लागलेल्या त्या अर्जुनाच्या मागोमाग ती विशालनयना उत्तराही गेली १५. तेव्हां दुरूनच त्या बृहन्नलेला पाहून राजपुत्र उत्तर ह्मणाला " तूं सारथि असल्यामुळें खांडववनामध्यें अर्जुनानें अग्नीला तृप्त केलें १६; आणि कुंतीपुत्र धनंजयानें संपूर्ण पृथ्वीही तूंच सारथि असल्यामुळें जिंकिली. असें सैरंध्रीनें तुझ्याविषयीं सांगितलें आहे. कारण, ती पांडवांना ओळखीत आहे १७. ह्यास्तव, हे बृहन्नले, गोधनें परत आणण्याकरितां कौरवांशीं युद्ध करण्यास तयार झालेल्या माझ्या अश्वांना तूं आपल्या स्वाधीन ठेव १८. खरोखर अर्जुनाचा तूं पूर्वी प्रिय सारथि होतीस आणि तुझ्याच साहाय्यानें पांडवश्रेष्ठ अर्जुनानें पृथ्वी जिंकिली " १९. ह्याप्रमाणें उत्तरानें सांगितलें

प्रत्युवाच राजपुत्रं बृहन्नला । का शक्तिर्मम सारथ्यं कर्तुं सङ्ग्राममूर्धनि २०
गीतं वा यदि वा नृत्यं वादित्रं वा पृथग्विधम् । तत्करिष्यामि भद्रं ते
सारथ्यं तु कुतो मम २१ उत्तर उवाच ॥ बृहन्नले गायनो वा नर्तनो
वा पुनर्भव । क्षिप्रं मे रथमास्थाय निगृह्णीष्व हयोत्तमान् २२ वैशम्पा-
यन उवाच ॥ स तत्र नर्मसंयुक्तमकरोत्पाण्डवो बहु । उत्तरायाः प्रमुखतः
सर्वं जानन्नरिन्दमः २३ उर्ध्वमुत्क्षिप्य कवचं शरीरे प्रत्यमुञ्चत । कुमा-
र्यस्तत्र तं दृष्ट्वा प्राहसन्पृथुलोचनाः २४ स तु दृष्ट्वा विमुह्यन्तं स्वयमेवो-
त्तरस्ततः । कवचेन महार्हेण समनह्यद्बृहन्नलाम् २५ स बिभ्रत्कवचं
चाग्र्यं स्वयमप्यंशुमत्प्रभम् । ध्वजं च सिंहमुच्छ्रित्य सारथ्ये समकल्प-
यत् २६ धनूंषि च महार्हाणि बाणांश्च रुचिरान्बहून् । आदाय प्रययौ
वीरः स बृहन्नलसारथिः २७ अथोत्तरा च कन्याश्च सख्यस्तामब्रुवं-
स्तदा । बृहन्नले आनयेथा वासांसि रुचिराणि च २८ पाञ्चालिकार्थं
चित्राणि सूक्ष्माणि च मृदूनि च । विजित्य सङ्ग्रामगताल्भीष्मद्रोणमुखा-
न्कुरून् २९ एवं ता ब्रुवतीः कन्याः सहिताः पाण्डुनन्दनः । प्रत्युवाच

असतां बृहन्नला त्या राजपुत्राला ह्मणाली " संग्रामामध्यें सारथ्य करण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं कोठून असणार ? २०. तुझें देव बरें करो. हे राजपुत्रा, गायन, वेगळ्या वेगळ्या प्रकारचें वाद्य अथवा नृत्य मी करून दाखवीन; परंतु सारथ्य मला कोठून येणार ? " २१. उत्तर ह्मणतोः—हे बृहन्नले, तूं गायक आस अथवा नर्तक आस; सत्वर माझ्या रथावर आरूढ होऊन माझे उत्कृष्ट अश्व संभाळ ह्मणजे झालें २२. वैशंपायन सांगतातः—शत्रूंचें दमन करणारा पांडुपुत्र अर्जुन सर्व कांहीं जाणीत असतांनाही उत्तरेसमक्ष त्यानें पुष्कळच थट्टेचे प्रकार केले २३. कवच उंच करून त्यानें तें उलटेंच आपल्या अंगांत घातलें व त्याला तसें करितांना पाहून तेथें असलेल्या विशालनयना कुमारिका हंसल्या २४. परंतु, त्याची धांदल उडालेली पाहून स्वतः उत्तरानेंच तें मूल्यवान् कवच बृहन्नलेच्या अंगामध्यें घातलें २५. नंतर सूर्यासारिखें उज्ज्वल असें श्रेष्ठ कवच स्वतः घालून आणि सिंहाकृति ध्वज उभारून उत्तरानें सारथ्याचे ठिकाणीं बृहन्नलेची योजना केली २६ आणि बृहन्नला ज्याचा सारथि आहे असा तो वीर उत्तर मोठीं मोठीं मूल्यवान् धनुष्यें आणि पुष्कळ उत्कृष्ट बाण बरोबर घेऊन निघाला २७. तेव्हां उत्तरा आणि इतरही मुली बृहन्नलेच्या सख्या तिला ह्मणाल्या " हे बृहन्नले, तूं संग्रामामध्यें आलेल्या भीष्मद्रोणादि कौरवांना जिंकून आमच्या बाहुल्यांकरितां

हसन्पार्थो मेघदुन्दुभिनिःस्वनः ३० बृहन्नलोवाच ॥ यद्युत्तरोयं सङ्ग्रामे विजेष्यति महारथान् । अथाहरिष्ये वासांसि दिव्यानि रुचिराणि च ३१ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वा तु बीभत्सुस्ततः प्राचोदयद्धयान् । कुरूनभिमुखः शूरो नानाध्वजपताकिनः ३२ तमुत्तरं वीक्ष्य रथोत्तमे स्थितं बृहन्नलायाः सहितं महाभुजम् । स्त्रियश्च कन्याश्च द्विजाश्च सुव्रताः प्रदक्षिणं चक्रुरथोचुरङ्गनाः ३३ यदर्जुनस्यर्षभतुल्यगामिनः पुराभवत्खाण्डवदाहमङ्गलम् । कुरून्समेत्याद्य रणे बृहन्नले सहोत्तरेणाद्य तदस्तु मङ्गलम् ३४ [१२०६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे उत्तरनिर्याणं नाम सप्तत्रिंशोऽध्यायः ॥ ३७ ॥

वैशम्पायन उवाच ॥ स राजधान्या निर्याय वैराटिरकुतोभयः । प्रयाहीत्यब्रवीत्सूतं यत्र ते कुरवो गताः १ समवेतान्कुरून्सर्वाञ्जिगीषून्-

---

चित्रविचित्र, सूक्ष्म, मृदु आणि मनोहर वस्त्रें घेऊन ये " २८, २९. ह्याप्रमाणें एकदम त्या मुली ह्मणूं लागल्या असतां मेघाप्रमाणें अथवा दुंदुभीप्रमाणें गंभीर स्वरानें युक्त असलेला कुंतीपुत्र पांडुनंदन अर्जुन हंसत हंसत त्यांना ह्मणाला ३० " हा उत्तर जर संग्रामामध्यें महारथ्यांना जिंकील तर मी त्यांचीं दिव्य व मनोहर वस्त्रें हरण करून आणीन " ३१. वैशंपायन सांगतातः—असें बोलून अर्जुनानें अश्वांना इशारा केला आणि नानाप्रकारचे ध्वज व पताका घेऊन आलेल्या कौरवांकडे वळून तो शूर चालला ३२. ह्याप्रमाणें बृहन्नलेसहवर्तमान तो महापराक्रमी उत्तर श्रेष्ठरथावर आरूढ झालेला अवलोकन करून स्त्रिया, कन्या, सदाचरणसंपन्न द्विज आणि स्त्रिया हे सर्वही प्रदक्षिणा करून त्याला ह्मणाले ३३ " हे बृहन्नले, ज्याची चालण्याची ढब बैलासारिखी आहे अशा अर्जुनाला पूर्वीं खांडवदाहसमयीं जसें तूं सारथ्यकर्म करीत असतांना विजयरूप मंगल प्राप्त झालें तसें विजयरूप मंगल संग्रामामध्यें कौरवांशीं गांठ पडल्यावर उत्तरासहवर्तमान आज तुला प्राप्त होवो " ३४. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं उत्तराच्या गमनाविषयीं सदतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३७ ॥

वैशंपायन सांगतातः—मनामध्यें यत्किंचित्‌ही भय बाळगीत नसलेला तो विराटपुत्र उत्तर राजधानींतून बाहेर गेल्यावर सारथ्याला ह्मणाला " जिकडे ते कौरव गेले आहेत तिकडे चल १. जयाची आशा धरून एकत्र जुळलेल्या सर्व कौरवांना जिंकून

वाजित्य वै । गास्तेषां क्षिप्रमादाय पुनरेष्याम्यहं पुरम् २ ततस्तांश्चोद्-
यामास सदश्वान्पाण्डुनन्दनः ३ ते हया नरसिंहेन नोदिता वातरंहसः ।
आलिखन्त इवाकाशमूहुः काञ्चनमालिनः ४ नातिदूरमथो गत्वा मत्स्यपु-
त्रधनञ्जयौ । अवेक्षताममित्रघ्नौ कुरूणां बलिनां बलम् ५ श्मशानमभितो
गत्वा आससाद कुरूनथ । तां शमीमन्ववीक्षेतां व्यूढानीकांश्च सर्वशः ६ तद्-
नीकं महत्तेषां विबभौ सागरोपमम् । सर्पमाणमिवाकाशे वनं बहुलपादपम् ७
ददृशे पार्थिवो रेणुर्जनितस्तेन सर्पता । दृष्टिप्रणाशो भूतानां दिवस्पृक्कुरुस-
त्तम ८ तदनीकं महद्दृष्ट्वा गजाश्वरथसंकुलम् । कर्णदुर्योधनकृपैर्गुप्तं शान्तन-
वेन च ९ द्रोणेन च सपुत्रेण महेष्वासेन धीमता । हृष्टरोमा भयोद्विग्नः पार्थं
वैराटिरब्रवीत् १० उत्तर उवाच ॥ नोत्सहे कुरुभिर्योद्धुं रोमहर्षं हि पश्य
मे । बहुप्रवीरमत्युग्रं देवैरपि दुरासदम् ११ प्रतियोद्धुं न शक्ष्यामि

व त्यांच्यापासून सत्वर गाई आणून मला पुनरपि नगराला आलें पाहिजे ." २. असें उत्तरानें सांगितल्यानंतर पांडुपुत्र अर्जुनानें त्या उत्कृष्ट अश्वांना इशारा केला ३; आणि पुरुषश्रेष्ठ अर्जुनाचा इशारा झाल्याबरोबर सुवर्णाच्या माळा घातलेले ते वायूसारिखे वेगवान् अश्व आकाश विदीर्ण करीतच कीं काय सत्वर रथ ओढूं लागले ४. नंतर फार लांब जाण्यापूर्वीच शत्रुघातक उत्तर व धनंजय ह्यांनीं बलाढ्य कौरवांचें सैन्य अवलोकन केलें ५. प्रथमतः श्मशानाकडे गेल्यावर अर्जुन कौरवांकडे गेला आणि सैन्य सर्वप्रकारें सज्ज करून तयार असलेले कौरव अवलोकन केल्यानंतर त्या (हत्यारें ठेविलेल्या)शमीवृक्षाकडे ते पाहूं लागले ६. त्या कौरवांचें तें समुद्रासारिखें प्रचंड सैन्य असंख्य वृक्षांनीं युक्त असलेलें वनच (अतिवेगानें)आकाशामध्यें चाललें आहे कीं काय असें दिसूं लागलें ७. हे कुरुवंशजश्रेष्ठा जनमेजया, चालूं लागलेल्या त्या सैन्याच्या योगानें उत्पन्न झालेली धूळ चोहोंकडे दिसूं लागली आणि आकाश व्याप्त करून टाकणारी ती धूळ प्राण्यांना आंध्य आणूं लागली ८. पुत्रासहवर्तमान महाधनुर्धारी विचारी द्रोण, शांतनव भीष्म, कर्ण, दुर्योधन व कृप ह्यांनीं संरक्षण केलेलें आणि गज, अश्व व रथ ह्यांनीं गजबजून गेलेलें तें प्रचंड सैन्य अवलोकन करितांक्षणीं विराटपुत्र उत्तराच्या अंगावर कांटा आला आणि भयभीत होऊन तो कुंतीपुत्र अर्जुनाला ह्मणाला ९,१० " हे माझ्या अंगावर रोमांच उठलेले तूं अवलोकन कर. कौरवांशीं युद्ध करण्यास माझें धैर्य होत नाहीं. असंख्य वीरांनीं युक्त, अतिशय उग्र आणि देवानांही हार जाण्यास कठीण ११ अशा अपार कुरुसैन्याशीं युद्ध करण्यास मी समर्थ नाहीं. रथ, गज, अश्व, पदाति आणि ध्वज

कुरुसैन्यमनन्तकम् । नाशंसे भारतीं सेनां प्रवेष्टुं भीमकार्मुकाम् १२ रथनागाश्वकलिलां पत्तिध्वजसमाकुलाम् । दृष्ट्वैव हि परानाजौ मनः प्रव्यथतीव मे १३ यत्र द्रोणश्च भीष्मश्च कृपः कर्णो विविंशतिः । अश्वत्थामा विकर्णश्च सोमदत्तश्च बाह्लिकः १४ दुर्योधनस्तथा वीरो राजा च रथिनां वरः । द्युतिमन्तो महेष्वासाः सर्वे युद्धविशारदाः १५ दृष्ट्वैव हि कुरूनेतान्व्यूढानीकान्प्रहारिणः । हृषितानि च रोमाणि कश्मलं चागतं मम १६ वैशम्पायन उवाच ॥ अविजातो विजातस्य मौर्ख्याद्धूर्तस्य पश्यतः । परिदेवयते मन्दः सकाशे सव्यसाचिनः १७ त्रिगर्तान्मे पिता यातः शून्ये संप्रणिधाय माम् । सर्वां सेनामुपादाय न मे सन्तीह सैनिकाः १८ सोहमेको बहून्बालः कृतास्त्रानकृतश्रमः । प्रतियोद्धुं न शक्ष्यामि निवर्तस्व बृहन्नले १९ बृहन्नलोवाच ॥ भयेन दीनरूपोसि द्विषतां हर्षवर्धनः । न च तावत्कृतं कर्म परैः किंचिद्रणाजिरे २० स्वयमेव च मामात्थ वह मां कौरवान्प्रति । सोहं त्वां तत्र नेष्यामि यत्रैते बहुला ध्वजाः २१

ह्यांनीं व्याप्त व प्रचंड धनुष्यांनीं युक्त असलेल्या भारतीसेनेमध्यें प्रवेश करण्याचें मला धैर्य नाहीं. संग्रामामध्यें शत्रूंना अवलोकन 'करितांक्षणीं माझ्या मनाला जशी कांहीं धास्ती बसून गेली आहे १२, १३. कारण, त्यांमध्यें द्रोण, भीष्म, कृप, कर्ण, विविंशति, अश्वत्थामा, विकर्ण, सोमदत्त, बाल्हिक १४ आणि रथ्यांमध्यें श्रेष्ठ असलेला वीर दुर्योधनराजा हे सर्वेही तेजस्वी व महाधनुर्धारी असून युद्धांत निपुण आहेत १५. सैन्य सज्ज करून स्थित असलेल्या ह्या कौरव योद्ध्यांना अवलोकन करितांक्षणींच अंगावर कांटा येऊन मला मूर्च्छा आलेली आहे " १६. वैशंपायन सांगतात:—ज्याला युद्धाचा अनुभव नाहीं असा तो मंदमति उत्तर मूर्खपणामुळें गुप्त वेष धारण केलेल्या आणि युद्धामध्यें कसलेल्या सव्यसाचीं अर्जुनासमक्ष आणखीही विलाप करूं लागला १७. (तो ह्मणाला) " येथें कोणी योद्धा नसतांना शून्य नगरामध्यें पालक ह्या नात्यानें माझी योजना करून माझा पिता सर्व सेना घेऊन त्रिगर्तांकडे गेला आहे. माझे सैनिक येथें कोणीही नाहींत १८; आणि ह्मणूनच अस्त्रांमध्यें ज्याचा अभ्यास नाहीं असा मी एकटा बालक अनेक अस्त्रनिपुण कौरवांशीं युद्ध करण्यास समर्थ होणार नाहीं. ह्यास्तव, हे बृहन्नले, तूं परत फीर १९. बृहन्नला ह्मणते:—अरे, समरांगणामध्यें शत्रूंनीं अजून आपला कांहीं पराक्रम गाजविला नाहीं तोंच तूं भयानें गयावया होऊन शत्रूंचा हर्ष वृद्धिंगत करूं लागला आहेस ! २०; आणि प्रथमत: " कौरवांकडे मला घेऊन जा " ह्मणून तूंच मला

मध्यमामिषगृध्राणां कुरूणामाततायिनाम् । नेष्यामि त्वां महाबाहो पृथिव्यामपि युध्यताम् २२ तथा स्त्रीषु प्रतिश्रुत्य पौरुषं पुरुषेषु च । कत्थमानोभिनिर्याय किमर्थं न युयुत्ससे २३ न चेद्विजित्य गास्तास्त्वं गृहान्वै प्रतियास्यसि । प्रहसिष्यन्ति वीरास्त्वां नरा नार्यश्च संगताः २४ अहमप्यत्र सैरन्ध्र्या ख्याता सारथ्यकर्मणि । न च शक्ष्याम्यनिर्जित्य गाः प्रयातुं पुरं प्रति २५ स्तोत्रेण चैव सैरन्ध्र्यास्तव वाक्येन तेन च । कथं न युध्येयमहं कुरून्सर्वान्स्थिरो भव २६ उत्तर उवाच ।। कामं हरन्तु मत्स्यानां भूयांसः कुरवो धनम् । प्रहसन्तु च मां नार्यो नरा वापि बृहन्नले २७ सङ्ग्रामे न च कार्यं मे गावो गच्छन्तु चापि मे । शून्यं मे नगरं चापि पितुश्चैव बिभेम्यहम् २८ वैशम्पायन उवाच ॥ इत्युक्त्वा प्राद्रवद्भीतो रथात्प्रस्कन्द्य कुण्डली । त्यक्त्वा मानं च दर्पं च विसृज्य सशरं धनुः २९ बृहन्नलोवाच ॥ नैष शूरैः स्मृतो धर्मः क्षत्रियस्य पलायनम् । श्रेयस्तु

सांगितलें आहेस. ह्यास्तव, मी आतां तुला जिकडे हे अनेक ध्वज फडकत आहेत तिकडे घेऊन जाईन २१. हे महापराक्रमी उत्तरा, पृथ्वीकरितां युद्ध करणाऱ्या आणि आमिषावर झडप घालणाऱ्या गिधाडांप्रमाणें जिवावर उदार होऊन गोधन हरण करण्याविषयीं उत्सुक झालेल्या ह्या कौरवांमध्यें मी तुला घेऊन जाईन २२. स्त्रियांमध्यें आणि त्याचप्रमाणें पुरुषांमध्यें पराक्रमाविषयीं प्रतिज्ञा करून आत्मप्रशंसा करितां करितां तूं बाहेरही पडलास; मग आतां कां बरें युद्ध करीत नाहींस ? २३. आज जर तूं त्या गाई परत जिंकून घरीं गेला नाहींस तर वीर पुरुष आणि स्त्रिया एकत्र जुळून तुझा उपहास करितील २४. अरे, सैरंध्रीनें सारथ्यकर्मासंबंधानें प्रशंसा केलेल्या माझ्यानें देखील गाई जिंकून आणिल्याशिवाय नगरामध्यें परत जाववणार नाहीं २५. कारण, सैरंध्रीनें जर माझी प्रशंसा केली आहे आणि तूंही माझ्यासंबंधानें जर तसें भाषण केलें आहेस तर मीही सर्व कौरवांशीं युद्ध केल्यावांचून राहीन कशी ? तूं स्वस्थ ऐस २६. उत्तर ह्मणतोः—हे असंख्य कौरव आपल्या इच्छेप्रमाणें मत्स्यदेशांतील धन हरण करोत आणि, हे बृहन्नले, स्त्रिया अथवा पुरुषही मला खुशाल हंसोत २७. संग्रामाशीं मला कांहींएक कर्तव्य नाहीं. माझ्या गाईही खुशाल जाऊं दे. माझ्या नगरांत सध्यां कोणी नाहीं. ह्यास्तव, मला पित्याचीच भीति वाटत आहे २८. वैशंपायन सांगतातः—कुंडलें धारण केलेल्या व भयभीत झालेल्या त्या उत्तरानें असें बोलून रथाखालीं उडी टाकिली आणि बाणासहवर्तमान धनुष्य आणि त्याच्याच बरोबर मान व गर्व हीं सोडून देऊन तो धांवूं लागला २९. बृहन्नला ह्मणतेः—पलायन करणें हा

मरणं युद्धे न भीतस्य पलायनम् ३० वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वा तु कौन्तेयः सोवप्लुत्य रथोत्तमात् । तमन्वधावद्धावन्तं राजपुत्रं धनञ्जयः ३१ दीर्घां वेणीं विधुन्वानः साधु रक्ते च वाससी ३२ विधूय वेणीं धावन्तमजानन्तोर्जुनं तदा । सैनिकाः प्राहसन्केचित्तथारूपमवेक्ष्य तम् ३३ तं शीघ्रमभिधावन्तं संप्रेक्ष्य कुरवोब्रुवन् । क एष वेषसंच्छन्नो भस्मन्येव हुताशनः ३४ किंचिदस्य यथा पुंसः किंचिदस्य यथा स्त्रियः । सारूप्यमर्जुनस्येव क्लीबरूपं बिभर्ति च ३५ तदेवैतच्छिरोग्रीवं तौ बाहू परिघोपमौ । तद्वदेवास्य विक्रान्तं नायमन्यो धनञ्जयात् ३६ अमरेष्विव देवेन्द्रो मानुषेषु धनञ्जयः । एकः कोस्मानुपायायादन्यो लोके धनञ्जयात् ३७ एकः पुत्रो विराटस्य शून्ये सन्निहितः पुरे । स एष किल निर्यातो बालभावान्न पौरुषात् ३८ सत्रेण नूनं छन्नं हि चरन्तं पार्थमर्जुनम् । उत्तरः सारथिं कृत्वा निर्यातो नगराद्बहिः ३९ स नो

क्षत्रियाचा धर्म शूरांनीं सांगितलेला नाहीं. भयभीत होऊन पळून जाण्यापेक्षां युद्धामध्यें मरून जाणें श्रेयस्कर आहे ३०. वैशंपायन सांगतातः— कुंतीपुत्र धनंजयानेंही रथाखालीं उडी घातली आणि पुढें धांवूं लागलेल्या राजपुत्राच्या मागोमाग तो अर्जुन आपली लांब वेणी व रंगीत वस्त्रें फारच हालवीत हालवीत धांवूं लागला ३१, ३२. ह्याप्रमाणें वेणी कंपित करून धांवूं लागलेला अर्जुन समजण्यांत न आल्यामुळें प्रतिपक्षाकडील कांहीं सैनिक तशा रूपानें युक्त असलेल्या त्या सैनिकाला अवलोकन करून हंसूं लागले ३३; परंतु, उत्तराच्या मागोमाग सत्वर धांवत धांवत चाललेल्या त्या सारथ्याला अवलोकन करून कौरव ह्मणाले " अरे, भस्मामध्यें असलेल्या अग्नीप्रमाणें वेषांतरानें स्वतःचें रूप आच्छादित केलेला हा कोण ? ३४. अरे, ह्याचें कांहीं लक्षण स्त्रीसारिखें दिसत आहे व कांहीं पुरुषासारिखें दिसत आहे; आणि सादृश्य पहावें तर अगदीं अर्जुनाचें आहे. परंतु, नपुंसकाचा वेष ह्यानें धारण केलेला आहे ३५. छेः ! छेः ! तेंच हें मस्तक, तोच हा कंठ, तेच हे अडसरासारिखे बाहु आणि ही चालण्याची ढबही अगदीं तशीच आहे. ह्यावरून हा धनंजयाशिवाय दुसरा कोणी नव्हे ३६. अहो, देवांमध्यें ज्याप्रमाणें देवराज इंद्र त्याचप्रमाणें मनुष्यांमध्यें धनंजय पराक्रमी आहे. अहो, धनंजयाशिवाय संग्रामामध्यें दुसरा कोण ह्या पृथ्वीमध्यें आमच्याशीं एकटा युद्ध करण्याला येईल ? ३७. विराटाचें नगर सांप्रत वीररहित असून संनिध असलेला हा विराटाचा पुत्र खरोखर मूर्खपणामुळेंच बाहेर पडला आहे; हा कांहीं शौर्यामुळें बाहेर पडलेला नाहीं ३८. खरोखर कपट-

मन्यामहे दृष्ट्वा भीत एष पलायते । तं नूनमेष धावन्तं जिघृक्षति धनञ्जयः ४० वैशम्पायन उवाच ॥ इति स्म कुरवः सर्वे विमृशन्तः पृथक्पृथक् । न च व्यवसितुं किंचिदुत्तरं शक्नुवन्ति ते ॥ छन्नं तथा तं सत्रेण पाण्डवं प्रेक्ष्य भारत ४१ उत्तरं तु प्रधावन्तमभिद्रुत्य धनञ्जयः । गत्वा पदशतं तूर्णं केशपक्षे परामृशत् ४२ सोर्जुनेन परामृष्टः पर्यदेवयदार्तवत् । बहुलं कृपणं चैव विराटस्य सुतस्तदा ४३ उत्तर उवाच ॥ शृणुयास्त्वं हि कल्याणि बृहन्नले सुमध्यमे । निवर्तय रथं क्षिप्रं जीवन्भद्राणि पश्यति ४४ शातकुम्भस्य शुद्धस्य शतं निष्कान्ददामि ते । मणीनष्टौ च वैदूर्यान्हेमबद्धान्महाप्रभान् ४५ हेमदण्डप्रतिच्छन्नं रथं युक्तं च सुव्रतैः । मत्तांश्च दश मातङ्गान्मुञ्च मां त्वं बृहन्नले ४६ वैशम्पायन उवाच॥ एवमादीनि वाक्यानि विलपन्तमचेतसम् । प्रहस्य पुरुषव्याघ्रो रथस्यान्तिकमानयत् ४७ अथैनमब्रवीत्पार्थो भयार्तं नष्टचेतसम् ४८ यदि

वेषानें आपलें रूप गुप्त करून दिवस काढीत असलेल्या कुंतीपुत्र अर्जुनालाच सारथि करून हा उत्तर नगराबाहेर पडला आहे ३९. परंतु, आह्मांला वाटतें हा उत्तर आह्मांला भिऊन पळत आहे आणि पळत असलेल्या त्या उत्तराला धरण्याचें खरोखर अर्जुनाच्या मनांत आहे ४०. वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें ते सर्वही कौरव वेगळे वेगळे तर्क करूं लागले. परंतु, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, कपटवेषानें आपलें रूप गुप्त केलेल्या त्या अर्जुनाला अवलोकन केल्यावर त्या सर्वही कौरवांना पुढें काय करावयाचें तें कांहींच सुचेनासें झालें ४१. असो. उत्तर धांवूं लागला असतां त्याच्या मागोमाग (सुमारें) शंभर पावलें पळत जाऊन अर्जुनानें त्याला, केंस धरून, ओढिलें ४२. परंतु, अर्जुनानें केंसाला हिसडा देतांक्षणीं तो विराटाचा पुत्र अगदीं गयावया होऊन फारच दीनपणानें विलाप करूं लागला ४३. उत्तर ह्मणतो:—हे सुंदरि बृहन्नले, हे कल्याणि, माझें ऐक. आपला रथ सत्वर परत फिरीव. अगे, पुरुष जिवंत राहिला तर त्याला चांगले दिवस पहावयास सांपडतात ४४. मी तुला शुद्ध सुवर्णाच्या शंभर मोहोरा देईन. सोन्यानें गुंफिलेलीं आणि फारच सतेज असलेलीं आठ वैडूर्यरत्नें देईन ४५; उत्कृष्ट अश्व जोडिलेला आणि सोन्याच्या दांड्या लाविलेला रथ देईन व दहा मत्त गजही देईन. परंतु, हे बृहन्नले, तूं मला सोड ४६. वैशंपायन सांगतात:—हीं व अशाप्रकारचीं भाषणें रडत रडत करणाऱ्या आणि घाबरून गेलेल्या त्या उत्तराला पुरुषश्रेष्ठ अर्जुनानें हास्यपूर्वक रथाजवळ ओढून आणिलें ४७आणि भयभीत होऊन कांहींएक सुचेनासें झालेल्या त्या उत्तराला अर्जुन ह्मणाला ४८ "हे

नोत्सहसे योद्धुं शत्रुभिः शत्रुकर्षण । एहि मे त्वं हयाग्यच्छ युध्यमानस्य शत्रुभिः ४९ प्रयाह्येतद्रथानीकं मद्बाहुबलरक्षितः । अप्रधृष्यतमं घोरं गुप्तं वीरैर्महारथैः ५० मा भैस्त्वं राजपुत्राग्र्य क्षत्रियोसि परन्तप । कथं पुरुषशार्दूल शत्रुमध्ये विषीदसि ५१ अहं वै कुरुभिर्योत्स्ये विजेष्यामि च ते पशून् । प्रविश्यैतद्रथानीकमप्रधृष्यं दुरासदम् ॥ यन्ता भव नरश्रेष्ठ योत्स्येहं कुरुभिः सह ५२ एवं ब्रुवाणो बीभत्सुर्वैराटिमपराजितः। समाश्वास्य मुहूर्तं तमुत्तरं भरतर्षभ ५३ तत एनं विचेष्टन्तमकामं भयपीडितम् । रथमारोपयामास पार्थः प्रहरतां वरः ५४ [१२६०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रह उत्तराश्वासनेऽष्टत्रिंशोऽध्यायः ॥ ३८ ॥

वैशम्पायन उवाच ॥ तं दृष्ट्वा क्लीबवेषेण रथस्थं नरपुङ्गवम् । शमीमभिमुखं यान्तं रथमारोप्य चोत्तरम् १ भीष्मद्रोणमुखास्तत्र कुरवो

शत्रुनाशका, शत्रूंशीं स्वतः युद्ध करण्याचें जर तुझें धैर्य होत नसेल तर इकडे ये आणि माझें सारथ्य कर. मी शत्रूंशीं युद्ध करितों ४९. मीं आपल्या बाहुबलानें तुझें रक्षण केलें आहे असें समजून तूं ह्या महारथी वीरांनीं संरक्षण केलेल्या आणि ह्मणूनच अत्यंत अजिंक्य असलेल्या रथ्यांच्या घोर सेनेकडे चल ५०. हे श्रेष्ठ राजपुत्रा, हे शत्रूंना ताप देणाऱ्या उत्तरा, तूं भिऊं नकोस. हे पुरुषश्रेष्ठा, शत्रूंचे मध्यभागीं तूं असा हताश कां झाला आहेस? ५१ अजिंक्य आणि इतरांना हल्ला करितां येण्यासही अशक्य अशा ह्या रथसेनेमध्यें प्रवेश करून मी कौरवांशीं युद्ध करीन आणि तुझे पशुही जिंकून आणीन. हे पुरुषश्रेष्ठा, तूं माझा सारथि हो. मी कौरवांशीं युद्ध करीन " ५२. हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, कधींही पराजय न पावलेल्या अर्जुनानें असें बोलत बोलत एक मुहूर्तपर्यंत विराटपुत्राची समजूत केली ५३ आणि भयानें व्याकुल होऊन परत जाण्याकरितां धडपडत असलेल्या त्या उत्तराला तो नको नको ह्मणत असतांनाच वीरश्रेष्ठ अर्जुनानें रथावर ठेविलें ५४. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वांपैकीं उत्तरगोग्रहणपर्वसंबंधीं उत्तराला धीर देण्याविषयीं अडतिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ३८ ॥

वैशंपायन सांगतात:—क्लीबवेष धारण करून रथावर आरूढ झालेल्या आणि उत्तराला रथावर घालून शमीवृक्षाकडे जात असलेल्या त्या पुरुषश्रेष्ठाला अवलोकन करून १ भीष्मद्रोणप्रभृति सर्वही रथिश्रेष्ठ कौरव अर्जुनसंबंधी भीतीमुळें मनामध्यें उद्विग्न

रथिसत्तमाः । वित्रस्तमनसः सर्वे धनञ्जयकृताद्भयात् २ तानवेक्ष्य हतो-
त्साहानुत्पातानपि चाद्भुतान् । गुरुः शस्त्रभृतां श्रेष्ठो भारद्वाजोऽभ्यभा-
षत ३ चण्डाश्च वाताः संवान्ति रूक्षाः शर्करवर्षिणः । भस्मवर्णप्रका-
शेन तमसा संवृतं नभः ४ रूक्षवर्णाश्च जलदा दृश्यन्तेऽद्भुतदर्शनाः । निःस-
रन्ति च कोशेभ्यः शस्त्राणि विविधानि च ५ शिवाश्च विनदन्त्येता
दीप्तायां दिशि दारुणाः । हयाश्चाश्रूणि मुञ्चन्ति ध्वजाः कम्पन्त्यक-
म्पिताः ६ यादृशान्यत्र रूपाणि संदृश्यन्ते बहूनि च । यत्ता भवन्तस्ति-
ष्ठन्तु साध्वसं समुपस्थितम् ७ रक्षध्वमपि चात्मानं व्यूहध्वं वाहिनीमपि।
वैशसं च प्रतीक्षध्वं रक्षध्वं चापि गोधनम् ८ एष वीरो महेष्वासः सर्व-
शस्त्रभृतां वरः । आगतः क्लीबवेषेण पार्थो नास्त्यत्र संशयः ९ नदीज
लङ्केशवनारिकेतुर्नगाह्वयो नाम नगारिसूनुः । एषोऽङ्गनावेषधरः किरीटी
जित्वा वयं नेष्यति चाद्य गा वः १० स एष पार्थो विक्रान्तः सव्य-
साची परन्तपः । नायुद्धेन निवर्तेत सर्वैरपि सुरासुरैः ११ क्लेशितश्च वने

झाले २. तेव्हां उत्साहरहित झालेल्या त्या कौरवांना अवलोकन करून आणि अद्भुत उत्पात पाहून शस्त्रधरांमध्यें श्रेष्ठ भरद्वाजपुत्र गुरु द्रोण ह्मणाले ३ " क्षुद्र पाषाणांचा वर्षाव करणारे असे रूक्ष व प्रचंड वायु वहात आहेत; भस्मवर्ण कांतीनें युक्त असलेल्या अंधकारानें आकाश व्याप्त झालें आहे ४; मेघांची आकृति अद्भुत दिसत असून त्यांची कांतिही रूक्ष दिसत आहे; नानाप्रकारचीं शस्त्रें आपोआपच कोशांतून बाहेर निघत आहेत ५; प्रदीप्त झालेल्या दिशेस ह्या भयंकर शिवा ओरडत आहेत; अश्व अश्रु ढाळीत आहेत आणि ध्वज कांहीं हालचाल झाल्यावांचूनच कंपित होत आहेत ६. सारांश, ह्रीं जीं अनेक चिन्हें दृष्टीं पडूं लागलीं आहेत तीं लक्ष्यांत घेतलीं असतां तुह्मी सज्ज होऊन उभे रहा. कांहीं तरी संकट उपस्थित झालें आहे ७; तुह्मी आपआपलें रक्षण करून असा. सैन्य व्यवस्थित उभें करा. युद्धामध्यें होणाऱ्या वीरांच्या प्राणनाशाबद्दल खबरदारी घ्या आणि गोधनाचेंही रक्षण करा ८. क्लीबवेषानें हा महाधनुर्धारी व सर्व शस्त्रधारण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ असा वीर कुंतीपुत्र अर्जुनच आला आहे ह्यांत संशय नाहीं ९. हे गंगानंदन, लंकाधिपति रावणाच्या वनाचा शत्रु हनुमान् ज्याच्या ध्वजस्थानीं आहे; वृक्षाचें नांव ज्याला आहे आणि पर्वतशत्रु इंद्राचा जो पुत्र आहे असा हा स्त्रीवेष धारण केलेला अर्जुन ज्याला जिंकून आज तुमच्या गाई हरण करून नेण्याच्या बेतांत आहे त्या दुर्योधनाचें आपण रक्षण करा १०. शत्रूंना जर्जर करून सोडणारा

शूरो वासवेनापि शिक्षितः । अमर्षवशमापन्नो वासवप्रतिमो युधि १२
नेहास्य प्रतियोद्धारमहं पश्यामि कौरवाः १३ महादेवोपि पार्थेन श्रूयते
युधि तोषितः । किरातवेषप्रच्छन्नो गिरौ हिमवति प्रभुः १४ कर्ण उवाच॥
सदा भवान्फाल्गुनस्य गुणैरस्मान्विकत्थसे । न चार्जुनः कलापूर्णो मम
दुर्योधनस्य च १५ दुर्योधन उवाच॥ यद्येष पार्थो राधेय कृतंकार्यं भवेन्मम ।
ज्ञाताः पुनश्चरिष्यन्ति द्वादशाब्दान्विशाम्पते १६ अथैष कश्चिदेवान्यः
क्लीबवेषेण मानवः । शरैरेनं सुनिशितैः पातयिष्यामि भूतले १७ वैश-
म्पायन उवाच ॥ तस्मिन्ब्रुवति तद्वाक्यं धार्तराष्ट्रे परन्तप । भीष्मो द्रोणः
कृपो द्रौणिः पौरुषं तदपूजयन् १८ [१२७८] इति श्रीमहाभारते शत-
साहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे-
र्जुनप्रशंसायामेकोनचत्वारिंशोऽध्यायः ॥ ३९ ॥
वैशम्पायन उवाच ॥ तां शमीमुपसंगम्य पार्थो वैराटिमब्रवीत् ।

तो हा पराक्रमी सव्यसाची कुंतीपुत्र अर्जुन सर्व देवदैत्यांशीं जरी प्रसंग पडला तरी युद्ध केल्यावांचून परत फिरणार नाहीं ११. स्वतः इंद्रानें ह्याला अस्त्रविद्या शिकविली असल्यामुळें युद्धामध्यें हा इंद्रतुल्यच झालेला आहे आणि वनामध्यें क्लेश पडल्यामुळें सांप्रत हा शूर अगदीं क्रोधाच्या अधीन झालेला आहे. १२. ह्यास्तव, हे कौरवहो, ह्याच्याशीं युद्ध करणारा मला कोणीही दिसत नाहीं १३. अहो, किरातवेष धारण केलेल्या प्रभु महादेवालाही अर्जुनानें हिमालयपर्वतावर युद्धामध्यें तृप्त केल्याचें आमच्या ऐकण्यांत आहे १४. कर्ण ह्मणतो:—आपण नेहमीं अर्जुनाच्या गुणांची आमच्यापाशीं प्रशंसा करीत असतां; परंतु, अर्जुन माझी अथवा दुर्योधनाची पुरत्या षोडशांशानेंही बरोबरी करणारा नाहीं १५. दुर्योधन ह्मणतो:—हे प्रजापालक राधानंदना, हा जर अर्जुन असेल तर माझें कार्यच झालें.आतां अज्ञातवासांत उघडकीस आल्यामुळें ह्यांना पुनरपि बारा वर्षें वनवास करावा लागेल १६. बरें, हा अर्जुन नसून क्लीबवेषानें दुसराच जर कोणी यःकश्चित् पुरुष आलेला असेल तर चांगल्या धार लाविलेल्या बाणांच्या योगानें मी ह्याला भूतलावर पाडीन १७. वैशंपायन सांगतातः— हे शत्रुतापना जनमेजयराजा, ह्याप्रमाणें तो धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन बोलूं लागला असतां भीष्म, द्रोण, कृप आणि द्रोणपुत्र अश्वत्थामा ह्यांनीं त्याच्या पराक्रमाची प्रशंसा केली १८. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वांपैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं अर्जुनाच्या प्रशंसेविषयीं एकुणचाळिसावा अध्याय समाप्त झाला॥३९॥

वैशंपायन सांगतातः— विराटपुत्र उत्तर सुकुमार असून संग्रामसंबंधीं चांगला

सुकुमारं समाज्ञाय सङ्ग्रामे नातिकोविदम् १ समादिष्टो मया क्षिप्रं धनूंष्यवहरोत्तर । नेमानि हि त्वदीयानि सोढुं शक्ष्यन्ति मे बलम् ॥ भारं चापि गुरुं वोढुं कुञ्जरं वा प्रमर्दितुम् २ मम वा बाहुविक्षेपं शत्रूनिह विजेष्यतः । तस्माद्भूमिंजयारोह शमीमेतां पलाशिनीम् ३ अस्यां हि पाण्डुपुत्राणां धनूंषि निहितान्युत । युधिष्ठिरस्य भीमस्य बीभत्सोर्यमयोस्तथा ४ ध्वजाः शराश्च शूराणां दिव्यानि कवचानि च । अत्र चैतन्महावीर्यं धनुः पार्थस्य गाण्डिवम् ५ एकं शतसहस्रेण संमितं राष्ट्रवर्धनम् । व्यायामसहमत्यर्थं तृणराजसमं महत् ६ सर्वायुधमहामात्रं शत्रुसंबाधकारकम् । सुवर्णविकृतं दिव्यं श्लक्ष्णमायतमव्रणम् ७ अलं भारं गुरुं वोढुं दारुणं चारुदर्शनम् ८ तादृशान्येव सर्वाणि बलवन्ति दृढानि च । युधिष्ठिरस्य भीमस्य बीभत्सोर्यमयोस्तथा ९ [१२८७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहेऽर्जुनास्त्रकथने चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४० ॥

निपुण नाहीं असें समजून त्या शमीवृक्षासमीप गेल्यावर अर्जुन त्याला ह्मणाला १ “ माझ्या सांगण्यावरून, हे उत्तरा, तूं धनुष्यें खालीं काढ. हीं तुझीं धनुष्यें माझें बल सहन करण्यास समर्थ नाहींत. ह्यांना मोठा भारही सहन होणार नाहीं; गजाचेंही मर्दन ह्यांच्यानें होणार नाहीं २ आणि शत्रूंना जिंकीत असतांना, माझ्या हातांचे हिसकेही ह्यांना सहन होणार नाहींत. तस्मात्, हे भूमिंजया, पानांनीं भरलेल्या ह्या शमीवृक्षावर तूं आरोहण कर ३. ह्या वृक्षावर युधिष्ठिर, भीमसेन, अर्जुन व नकुलसहदेव ह्या पांडुपुत्रांचीं धनुष्यें ठेविलेलीं आहेत ४ आणि त्या शूरांचे ध्वज, बाण व दिव्य कवचें हीं ही ह्याच वृक्षावर आहेत. हें अर्जुनाचें महावीर्यवान् गांडीवधनुष्यही येथें आहे ५. हें एकच धनुष्य लक्ष धनुष्यांची बरोबरी करणारें असून राष्ट्राचा अभ्युदय करणारें आहे; अतिशय ताण बसला तरी सहन करणारें आहे आणि ताडाप्रमाणें मोठें आहे ६. सर्व धनुष्यांपेक्षां ह्याचें प्रमाण फार मोठें आहे; शत्रूंचा हें नाश करणारें आहे; ह्या दीर्घ, व्रणरहित व गुळगुळीत दिव्य धनुष्यावर सोन्याचें काम केलेलें आहे ७; दिसण्यांत मनोहर परंतु शत्रूंना अतिच भयंकर असें हें धनुष्य मोठा भारही सहन करण्यास समर्थ आहे ८ आणि युधिष्ठिर, भीम, अर्जुन व नकुलसहदेव ह्यांचींही धनुष्यें तशींच सर्व बळकट आणि भार सहन करणारीं आहेत ९. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वांपैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं अर्जुनानें उत्तराला अस्त्रें कथन केल्याविषयीं चाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४० ॥

उत्तर उवाच ॥ अस्मिन्वृक्षे किलोद्बद्धं शरीरमिति नः श्रुतम् । तदहं राजपुत्रः सन्स्पृशेयं पाणिना कथम् १ नैवंविधं मया युक्तमालब्धुं क्षत्रयोनिना । महता राजपुत्रेण मन्त्रयज्ञविदा सता २ स्पृष्टवन्तं शरीरं मां शववाहमिवाशुचिम् । कथं वा व्यवहार्यं वै कुर्वीथास्त्वं बृहन्नले ३ बृहन्नलोवाच ॥ व्यवहार्यश्च राजेन्द्र शुचिश्चैव भविष्यसि । धनूंष्येतानि मा भैस्त्वं शरीरं नात्र विद्यते ४ दायादं मत्स्यराजस्य कुले जातं मनस्विनाम् । त्वां कथं निन्दितं कर्म कारयेयं नृपात्मज ५ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्तः स पार्थेन रथात्प्रस्कन्द्य कुण्डली । आरुरोह शमीवृक्षं वैराटिरवशस्तदा ६ तमन्वशासच्छत्रुघ्नो रथे तिष्ठन्धनञ्जयः । अवरोपय वृक्षाग्राद्धनूंष्येतानि मा चिरम् । परिवेष्टनमेतेषां क्षिप्रं चैव व्यपानुद ७ सोपहृत्य महार्हाणि धनूंषि पृथुवक्षसाम् । परिवेष्टनपत्राणि विमुच्य समुपानयत् ८ तथा संनहनान्येषां परिमुच्य समन्ततः । अपश्यद्गाण्डिवं तत्र चतुर्भिरपरैः सह ९ तेषां विमुच्यमानानां धनुषामर्कवर्चसाम् । विनिश्चेरुः प्रभा दिव्या

उत्तर, ह्मणतोः—ह्या वृक्षावर एक शव बांधिलें आहे असें आमच्या ऐकण्यांत आहे. त्या शवाला मी राजपुत्र असतांना हातानें स्पर्श कसा करूं ? १. क्षत्रियकुलामध्यें उत्पन्न झालेला असा मी मोठा राजपुत्र व मंत्रयज्ञवेत्ता असल्यामुळें अशा प्रकारच्या वस्तूला स्पर्श करणें मला योग्य नाहीं २. हे बृहन्नले, मी त्या मृत शरीराला स्पर्श करून शववाहकाप्रमाणें अशुचि झालों असतां तुला माझ्याशीं संसर्ग कसा करितां येईल ? ३. बृहन्नला ह्मणतेः—हे राजाधिराज, तूं इतरांशीं संसर्ग करण्यास योग्य व शुचिच रहाशील. तूं भिऊं नको. हीं धनुष्यें आहेत. येथें मृत शरीर नाहीं ४. हे राजकुमारा, विचारी पुरुषांच्या कुलामध्यें उत्पन्न झालेल्या तुज मत्स्यराजपुत्राचे हातून मी असें निंद्य कर्म कसें करवीन ? ५. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें अर्जुनानें सांगितल्यावर कुंडलें धारण केलेल्या त्या उत्तरानें रथाखालीं उडी टाकिली आणि अर्जुनाच्याच हातांत सांपडल्यामुळें तो विराटपुत्र निरुपाय होऊन शमीवृक्षावर चढला ६. तेव्हां रथावर उभा राहून शत्रुनाशक धनंजय त्याला ह्मणाला "हीं धनुष्यें वृक्षाग्रापासून खालीं काढ; विलंब लावूं नको. ह्यांचें परिवेष्टनही तूं सत्वर दूर काढून टाक" ७. ह्यानंतर विशाल वक्षस्थलानें युक्त असलेल्या त्या पांडवांचीं मोठीं मूल्यवान् धनुष्यें त्यानें तेथून काढिलीं आणि सभोंवतीं गुंडाळलेलीं पानें सोडून तीं त्यानें जवळ आणिलीं ८. तदनंतर त्यांचीं बंधनें सर्व बाजूंनीं सोडिल्यावर दुसऱ्या चार धनुष्यांसहवर्तमान गांडीव धनुष्य त्याच्या दृष्टीं पडलें ९;

ग्रहाणामुदयेष्विव १० स तेषां रूपमालोक्य भोगिनामिव जृम्भताम् । हृष्टरोमा भयोद्विग्नः क्षणेन समपद्यत ११ संस्पृश्य तानि चापानि भानुमन्ति बृहन्ति च । वैराटिरर्जुनं राजन्निदं वचनमब्रवीत् १२ [१२९९] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोग्रहणपर्वण्युत्तरगोग्रहेऽस्त्रारोपण एकचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४१ ॥

उत्तर उवाच ॥ बिन्दवो जातरूपस्य शतं यस्मिन्निपातिताः । सहस्रकोटि सौवर्णाः कस्यैतद्धनुरुत्तमम् १ वारणा यत्र सौवर्णाः पृष्ठे भासन्ति दंशिताः । सुपार्श्वं सुग्रहं चैव कस्यैतद्धनुरुत्तमम् २ तपनीयस्य शुद्धस्य पृष्ठे यस्येन्द्रगोपकाः । पृष्ठे विभक्ताः शोभन्ते कस्यैतद्धनुरुत्तमम् ३ सूर्या यत्र च सौवर्णास्त्रयो भासन्ति दंशिताः । तेजसा प्रज्वलन्तो हि कस्यैतद्धनुरुत्तमम् ४ शलभा यत्र सौवर्णास्तपनीयविभूषिताः । सुवर्णमणिचित्रं च कस्यैतद्धनुरुत्तमम् ५ इमे च कस्य नाराचाः साहस्रा लोमवाहिनः । समन्तात्कलधौताग्रा उपासङ्गे हिरण्मये ६ विपाठाः पृथवः कस्य गार्ध्रपत्राः

व तीं सूर्यासारखीं धनुष्यें तो सोडूं लागला असतां उदयकालीं फांकणाऱ्या ग्रहांच्या प्रभप्रमाणें त्यांची दिव्य प्रभा फांकूं लागली १०. जांभया देणाऱ्या सर्पांप्रमाणें त्यांचें रूप अवलोकन केल्यावर उत्तराच्या अंगावर कांटा आला; तत्क्षणींच तो भीतीनें अगदीं उद्विग्न झाला ११ आणि त्या मोठ्या मोठ्या देदीप्यमान धनुष्यांना स्पर्श करून, हे जनमेजयराजा, विराटपुत्र उत्तर अर्जुनाशीं असें बोलूं लागला १२. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वांपैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं वृक्षावरून अस्त्रें काढण्याविषयीं एकेचाळिसावा अध्याय समाप्त झाला॥४१॥

उत्तर ह्मणतो:—ज्याच्यावर सुवर्णाचीं शंभर सूक्ष्म चक्रें काढिलेलीं आहेत व ज्याचीं अग्रें देदीप्यमान आहेत असें हें कोणत्या प्रख्यात पुरुषाचें उत्कृष्ट धनुष्य आहे ? १. सुवर्णाचे हत्ती ज्याच्या पृष्ठभागावर काढिलेले दिसत आहेत असें हें, उत्कृष्ट मध्यभागानें व उत्तम पार्श्वभागांनीं युक्त असलेलें, उत्तम धनुष्य कोणाचें ? २. ज्याच्या पृष्ठभागावर शुद्ध सुवर्णाचे इंद्रगोप कीटक वेगळे वेगळे काढिलेले शोभत आहेत असें हें उत्कृष्ट धनुष्य कोणाचें ? ३. सुवर्णाचे तीन सूर्य रेखून काढिलेले आणि तेजानें झळकत असलेले ज्याच्यावर भासत आहेत असें हें अनुपम धनुष्य कोणाचें ? ४. तपनीयसंज्ञक सुवर्णभूषणें घातलेले नीलवर्ण पतंग ज्यावर काढिलेले आहेत आणि उत्कृष्ट पाणीदार रत्नें ज्याला जडलेलीं आहेत असें हें उत्तम धनुष्य कोणाचें ? ५. सुवर्णाच्या भात्यामध्यें असलेले हे असंख्य नाराच बाण कोणाचे ?

शिलाशिताः । हारिद्रवर्णाः सुमुखाः पीताः सर्वायसाः शराः ७ कस्यायम-
सितश्चापः पञ्चशार्दूललक्षणः । वराहकर्णव्यामिश्राञ्शरान्धारयते दश ८
कस्येमे पृथवो दीर्घाश्चन्द्रबिम्बार्धदर्शनाः । शतानि सप्त तिष्ठन्ति नाराचा
रुधिराशनाः ९ कस्येमे शुकपत्राभैः पूर्वैरर्धैः सुवाससः । उत्तरैरायसैः
पीतैर्हेमपुङ्खैः शिलाशितैः १० गुरुभारसहो दिव्यः शात्रवाणां भयङ्करः ।
कस्यायं सायको दीर्घः शिलीपृष्ठः शिलीमुखः ११ वैयाघ्रकोशे निहितो
हेमचित्रत्सरुर्महान् । सुफलश्चित्रकोशश्च किङ्किणीसायको महान् १२
कस्य हेमत्सरुर्दिव्यः खड्गः परमनिर्मलः । कस्यायं विमलः खड्गो गव्ये
कोशे समर्पितः १३ हेमत्सरुरनाधृष्यो नैषध्यो भारसाधनः । कस्य
पाञ्चनखे कोशे सायको हेमविग्रहः १४ प्रमाणरूपसंपन्नः पीत आका-
शसंनिभः । कस्य हेममये कोशे सुतप्ते पावकप्रभे १५ निस्त्रिंशोयं गुरुः

सर्व बाजूंनीं ह्यांचीं अग्रें स्वच्छ घांसलेलीं असून हे अवयवावर फिरवितांक्षणीं केंस काढून टाकीत आहेत ६. गृध्रपक्ष्याचे पंख लाविलेले, शिळेवर घांसलेले, हारिद्रवर्ण, उत्कृष्ट अग्रांनीं युक्त, पाणी दिलेले आणि सर्वच लोहमय असलेले हे विपाठसंज्ञक विशाल बाण कोणाचे ? ७. पांच व्याघ्रचिन्हांनीं युक्त असलेलें हें कृष्णवर्ण धनुष्य कोणाचें ? वराहकर्णाच्या चिन्हांनीं युक्त असलेले दहा बाण हें धारण करीत आहे ८. दीर्घ, विशाल आणि अर्धचंद्राकृति असे हे रक्त प्राशन करणारे सातशें नाराच बाण कोणाचे ? ९. राघूच्या पिसांप्रमाणें पूर्वभागांनीं असलेले, आणि लोहमय शिळेवर घांसलेल्या, सुवर्ण रेषांनीं युक्त व पाणी दिलेल्या अग्रभागांनीं संयुक्त असलेले आणि उत्कृष्ट पिसांनीं शृंगारिलेले हे बाण कोणाचे ? १० ज्याचें मुख व पृष्ठभागही बेडकीप्रमाणें आहेत असा हा अतिशय भार सहन करणारा व शत्रूंना भय उत्पन्न करणारा लांबलचक दिव्य बाण कोणाचा ? ११. व्याघ्रचर्माच्या कोशामध्यें हा ठेविलेला आहे; सोन्याचें काम केलेली चित्रविचित्र मूठ ह्याला लाविलेली आहे; ह्या मोठ्या बाणाचें फळ चांगलें आहे; ह्याचा कोश शृंगारिलेला आहे आणि ह्या प्रचंड बाणाला लहान लहान घंटा लाविलेल्या आहेत १२. सुवर्णमुष्टीनें युक्त असलेला हा अतिनिर्मल दिव्य खड्ग कोणाचा आहे ? आणि गोचर्ममय कोशामध्यें ठेविलेला हा तरी निर्मल खड्ग कोणाचा आहे ? १३. सुवर्णानें ज्याचें रूप भूषित केलेलें आहे; जो भार सहन करणारा आहे आणि सुवर्णाची मुष्टि ज्याला लाविलेली आहे असा हा निषधदेशांत तयार झालेला व अप्रतिहत गर्तानें युक्त असलेला अजचर्ममय कोशामध्यें ठेविलेला खड्ग कोणाचा ? १४. योग्य प्रमाण आणि योग्य आकृति ह्यांनीं युक्त, आकाशा-

पीतः सायकः परनिर्व्रणः । कस्यायमसितः खड्गो हेमबिन्दुभिरावृतः १६ आशीविषसमस्पर्शः परकायप्रभेदनः । गुरुभारसहो दिव्यः सपत्नानां भयप्रदः १७ निर्दिशस्व यथातत्त्वं मया पृष्टा बृहन्नले । विस्मयो मे परो जातो दृष्ट्वा सर्वमिदं महत् १८ [१३१७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरवाक्यं नाम द्विचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४२ ॥

बृहन्नलोवाच ॥ यन्मां पूर्वमिहापृच्छः शत्रुसेनापहारिणम् । गाण्डीवमेतत्पार्थस्य लोकेषु विदितं धनुः १ सर्वायुधमहामात्रं शातकुम्भपरिष्कृतम् । एतत्तदर्जुनस्यासीद्गाण्डीवं परमायुधम् २ यत्तच्छतसहस्रेण संमितं राष्ट्रवर्धनम् । येन देवान्मनुष्यांश्च पार्थो विजयते मृधे ३ चित्रमुच्चावचैर्वर्णैः श्लक्ष्णमायतमव्रणम् । देवदानवगन्धर्वैः पूजितं शाश्वतीः समाः ४ एतद्वर्षसहस्रं तु ब्रह्मा पूर्वमधारयत् ५ ततोनन्तरमेवाथ प्रजापतिर-

---

प्रमाणें उज्ज्वल व पाणी दिलेला असा हा अग्नीसारिखा देदीप्यमान असलेल्या सुवर्णमय उज्ज्वल कोशामध्यें ठेविलेला खड्ग कोणाचा ? १५. शत्रूंच्या शस्त्रांचे आघात झाले असतांही हा खांडी पडण्यासारिखा नाहीं; तीस अंगुलांपेक्षांही हा अधिक लांब आहे आणि जड असून ह्याला पाणीही चांगलें दिलेलें आहे. असो. सुवर्णबिंदूंनीं व्याप्त झालेला हा कृष्णवर्ण खड्ग कोणाचा ? १६. ह्याचा स्पर्शही सर्पाच्या स्पर्शाप्रमाणें भयंकर आहे; हा दिव्य खड्ग शत्रूचें शरीर भेदून जाणारा आहे; हा मोठा भार सहन करण्याजोगा आहे व शत्रूंना भीति उत्पन्न करणारा आहे १७. हे बृहन्नले, मीं जें तुला विचारिलें आहे तें तूं खरें खरें मला सांग. हें सर्व प्रचंड प्रकरण पाहून मला पराकाष्ठेचा विस्मय झालेला आहे १८. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं उत्तराच्या प्रश्नाविषयीं बेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४२ ॥

बृहन्नला ह्मणते:—शत्रुसैन्याचा नाश करणाऱ्या तूं मला प्रथम ज्याविषयीं प्रश्न केलास तें हें त्रैलोक्यामध्यें प्रख्यात असलेलें अर्जुनाचें गांडीव धनुष्य होय १. सर्व धनुष्यांपेक्षां प्रमाणानें मोठें आणि सुवर्णानें शृंगारिलेलें असें हें अर्जुनाचें गांडीवसंज्ञक उत्कृष्ट धनुष्य होय २. एक लक्ष धनुष्यांची बरोबरी करणारें आणि स्वराष्ट्राचा अभ्युदय करणारें तें हेंच; आणि ह्याच्याच योगानें संग्रामामध्यें अर्जुन मनुष्यांना व देवांनाही जिंकीत असतो ३. नानाप्रकारच्या वर्णांनीं हें शृंगारिलेलें आहे, गुळगुळीत आहे, लांब आहे, व्रणरहित आहे आणि देव, दैत्य व गंधर्व ह्यांची

धारयत् । त्रीणि पञ्चशतं चैव शक्रोशीतिं च पञ्च च ६ सोमः पञ्चशतं राजा तथैव वरुणः शतम् । पार्थः पञ्च च षष्टिं च वर्षाणि श्वेतवाहनः ७ महावीर्यं महाद्दिव्यमेतत्तद्धनुरुत्तमम् । एतत्पार्थमनुप्राप्तं वरुणाच्चारुदर्शनम् ८ पूजितं सुरमर्त्येषु बिभर्ति परमं वपुः । सुपार्श्वं भीमसेनस्य जातरूपग्रहं धनुः ॥ येन पार्थोजयत्कृत्स्नां दिशं प्राचीं परन्तपः ९ इन्द्रगोपकचित्रं च यदेतच्चारुदर्शनम् । राज्ञो युधिष्ठिरस्यैतद्वैराटे धनुरुत्तमम् १० सूर्या यस्मिंस्तु सौवर्णाः प्रकाशन्ते प्रकाशिनः । तेजसा प्रज्वलन्तो वै नकुलस्यैतदायुधम् ११ शलभा यत्र सौवर्णास्तपनीयविचित्रिताः । एतन्माद्रीसुतस्यापि सहदेवस्य कार्मुकम् १२ ये त्विमे क्षुरसंकाशाः सहस्रा लोमवाहिनः । एतेर्जुनस्य वैराट शराः सर्पविषोपमाः १३ एते ज्वलन्तः सङ्ग्रामे तेजसा शीघ्रगामिनः । भवन्ति वीरस्याक्षय्या व्यूहतः समरे रिपून् १४ ये चेमे पृथवो दीर्घाश्चन्द्रबिम्बार्धदर्शनाः ।

अनादिकालापासून प्रशंसा करीत आले आहेत ४. हें धनुष्य प्रथमतः एक हजार वर्षें ब्रह्मदेवानें धारण केलें ५. नंतर लगेंच पांचशें तीन वर्षेंपर्यंत त्याचा प्रजापतीनें स्वीकार केला; इंद्रानें पंचायशी वर्षेंपर्यंत आपणापाशीं ठेविलें ६; सोमराजानें पांचशें वर्षेंपर्यंत आपणापाशीं वागविलें; वरुणराजानें शंभर वर्षेंपर्यंत त्याचा उपयोग केला आणि श्वेतवाहन अर्जुनानें पासष्ट अयनें हें धनुष्य धारण केलें आहे ७. हें उत्कृष्ट धनुष्य महातेजस्वी व महावीर्यवान् आहे आणि मनोहर आकृतीनें युक्त असलेलें हें धनुष्य वरुणापासून अर्जुनाला प्राप्त झालें आहे ८. देवांमध्यें आणि मनुष्यांमध्यें अतिशय मान्य, उत्कृष्ट आकृति व उत्तम पार्श्वभाग ह्यांनीं युक्त आणि सुवर्णाच्या कोशांत ठेविलेलें हें भीमसेनाचें धनुष्य आहे; आणि ह्याच धनुष्याच्या योगानें त्या शत्रुतापन कुंतीपुत्र भीमसेनानें संपूर्ण पूर्वदिशा जिंकिली आहे ९. हे विराटपुत्रा, इंद्रगोप संज्ञक कीटकांनीं शृंगारिलेलें आणि मनोहर आकृतीनें युक्त असलेलें हें युधिष्ठिरराजाचें उत्कृष्ट धनुष्य होय १०. प्रकाशयुक्त आणि तेजानें झळकत असलेले सुवर्णमय सूर्य ज्याच्यावर प्रकाशत आहेत तें हें नकुलाचें धनुष्य होय ११. तपनीयसंज्ञक सुवर्णानें शृंगारिलेले नीलवर्ण शलभ ज्याच्यावर आहेत तें हें माद्रीपुत्र सहदेवाचें धनुष्य होय १२. वस्तऱ्यासारिखे केंस काढणारे आणि भार सहन करणारे असे जे हे बाण तूं विचारिलेस ते हे सर्पविषासारिखे तीक्ष्ण असलेले बाण, हे विराटपुत्रा, अर्जुनाचे होत १३. संग्रामामध्यें वीर शत्रूंशीं युद्ध करूं लागला असतां तेजानें झळकत असलेले हे शीघ्रगामी बाण भात्यांतून कधीं संपत नाहींत १४. हे जे अर्धचंद्राकृति, रुंद व तीक्ष्ण

एते भीमस्य निशिता रिपुक्षयकराः शराः १५ हारिद्रवर्णा ये त्वेते हेमपुङ्खाः शिलाशिताः । नकुलस्य कलापोयं पञ्चशार्दूललक्षणः १६ येनासौ व्यजयत्कृत्स्नां प्रतीचीं दिशमाहवे । कलापो ह्येष तस्यासीन्माद्रीपुत्रस्य धीमतः १७ ये त्विमे भास्कराकाराः सर्वपारसवाः शराः । एते चित्रक्रियोपेताः सहदेवस्य धीमतः १८ ये त्विमे निशिताः पीताः पृथवो दीर्घवाससः । हेमपुङ्खास्त्रिपर्वाणो राज्ञ एते महाशराः १९ यस्त्वयं सायको दीर्घः शिलीपृष्ठः शिलीमुखः । अर्जुनस्यैष सङ्ग्रामे गुरुभारसहो दृढः २० वैयाघ्रकोशः सुमहान्भीमसेनस्य सायकः । गुरुभारसहो दिव्यः शात्रवाणां भयङ्करः २१ सुफलश्चित्रकोशश्च हेमत्सरुरनुत्तमः । निस्त्रिंशः कौरवस्यैष धर्मराजस्य धीमतः २२ यस्तु पाञ्चनखे कोशे निहितश्चित्रयोधने । नकुलस्यैष निस्त्रिंशो गुरुभारसहो दृढः २३ यस्त्वयं विपुलः खड्गो गव्ये कोशे समर्पितः । सहदेवस्य विद्ध्येनं सर्वभारसहं दृढम् २४ [१३४१] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां

बाण आहेत ते भीमाचे शत्रुनाशक बाण होत १५. हारिद्रवर्ण, सुवर्णपुंखांनीं युक्त आणि शिळेवर घांसलेले जे हे बाण तो नकुलाचा पंचव्याघ्राकृति बाणसमूह होय १६. ज्याच्या योगानें माद्रीपुत्र विचारी नकुलानें संग्रामामध्यें संपूर्ण पश्चिम दिशा जिंकिली तो हाच बाणसमुदाय होय १७. जे हे सूर्याकृति व चित्रक्रियेनें युक्त असलेले दिसत आहेत ते सर्व शत्रुसमूहाचा नाश करणारे विचारी सहदेवाचे बाण होत १८. तीन पर्वें, सुवर्णपुंख आणि दीर्घ पिसें ह्यांनीं युक्त असलेले जे हे विशाल, तीक्ष्ण व पाणी दिलेले दिसत आहेत ते हे धर्मराजाचे श्रेष्ठ बाण होत १९. ज्याचें मुख व पृष्ठभाग हीं बेडकीप्रमाणें आहेत असा जो हा लांबलचक दिसत आहे तो अर्जुनाचा, संग्रामामध्यें महत्वाचें काम करणारा दृढ बाण होय २०. व्याघ्रचर्ममय कोशानें युक्त असलेला हा अत्यंत मोठा बाण भीमसेनाचा होय. हा दिव्य बाण मोठेंच कर्म करणारा असून शत्रूंना भय उत्पन्न करणारा आहे. २१. उत्कृष्ट फळ, चित्रविचित्र कोश आणि सुवर्णाची मूठ ह्यांनीं युक्त असलेला हा खड्ग विचारी कुरुवंशजश्रेष्ठ धर्मराजाचा होय २२. अजचर्ममय कोशामध्यें ठेविलेला आणि अद्भुत युद्धामध्यें उपयोगीं पडणारा हा नकुलाचा खड्ग होय. हा बळकट असून मोठा भार सहन करणारा आहे २३; आणि गोचर्ममय कोशामध्यें जो हा विशाल खड्ग ठेविला आहे तो नकुलाचा होय. हाही खड्ग दृढ असून सर्वप्रकारचे आघात सहन करणारा आहे २४. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं

गोहरणपर्वण्युत्तरगोग्रह आयुधवर्णनं नाम त्रिचत्वारिंशोऽध्यायः ॥४३॥

उत्तर उवाच ॥ सुवर्णविकृतानीमान्यायुधानि महात्मनः । रुचिराणि प्रकाशन्ते पार्थानामाशुकारिणाम् १ क्व नु स्विदर्जुनः पार्थः कौरव्यो वा युधिष्ठिरः । नकुलः सहदेवश्च भीमसेनश्च पाण्डवः २ सर्व एव महात्मानः सर्वामित्रविनाशनाः । राज्यमक्षैः पराकीर्य न श्रूयन्ते कथंचन ३ द्रौपदी क्व च पाञ्चाली स्त्रीरत्नमिति विश्रुता । जितानक्षैस्तदा कृष्णा तानेवान्वगमद्वनम् ४ अर्जुन उवाच ॥ अहमस्म्यर्जुनः पार्थः सभास्तारो युधिष्ठिरः । बल्लवो भीमसेनस्तु पितुस्ते रसपाचकः ५ अश्वबन्धोऽथ नकुलः सहदेवस्तु गोकुले । सैरन्ध्रीं द्रौपदीं विद्धि यत्कृते कीचका हताः ६ उत्तर उवाच ॥ दश पार्थस्य नामानि यानि पूर्वं श्रुतानि मे । प्रब्रूयास्तानि यदि मे श्रद्दध्यां सर्वमेव ते ७ अर्जुन उवाच ॥ हन्त तेऽहं समाचक्षे दश नामानि यानि मे । वैराटे शृणु तानि त्वं यानि पूर्वं श्रुतानि ते ८ एकाग्रमानसो भूत्वा शृणु सर्वं समाहितः । अर्जुनः फाल्गुनो जिष्णुः किरीटी श्वेतवाहनः ॥ बीभत्सुर्विजयः कृष्णः

उत्तरगोग्रहणसंबंधीं आयुधवर्णनाविषयीं त्रेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥४३॥

उत्तर म्हणतोः—प्रचंड पराक्रम करणाऱ्या महात्म्या कुंतीपुत्र पांडवांचीं हीं वर सोन्याचें काम केलेलीं मनोहर आयुधें झळकत आहेत १. परंतु, तो कुंतीपुत्र अर्जुन, कुरुवंशजश्रेष्ठ युधिष्ठिर, नकुलसहदेव आणि पांडुपुत्र भीमसेन हे कोठें आहेत ? २. सर्व शत्रूंचा नाश करणारे ते सर्वही महात्मे अक्षद्यूताच्या योगानें राज्याला मुकल्यापासून मुळींच ऐकूं येईनासे झाले आहेत ३. स्त्रीरत्न म्हणून प्रसिद्ध असलेली पांचाली द्रौपदी कोठें आहे ? अक्षद्यूतामध्यें पराजित झालेल्या त्या पांडवांच्याच मागोमाग ती त्याचवेळीं वनामध्यें गेली होती ४. अर्जुन म्हणतोः— मीच तो कुंतीपुत्र अर्जुन होय; विराटराजाचा (नवीन) सभासद हाच युधिष्ठिर होय; तुझ्या पित्याकरितां पाकनिष्पत्ति करणारा बल्लव हाच भीमसेन होय ५; तुझ्या पित्याचा जो मोतद्दार तोच नकुल होय आणि गोकुलावर जो आहे तो सहदेव होय. त्याचप्रमाणें जिच्याकरितां कीचकांचा वध झाला ती सैरंध्रीच द्रौपदी असें तूं समज ६. उत्तर म्हणतोः— अर्जुनाचीं दहा नांवें जीं मीं पूर्वीं ऐकिलीं आहेत तीं जर तूं मला सांगशील तर मी तुझें हें सर्व म्हणणें खरें मानीन ७. अर्जुन म्हणतोः— हे विराटपुत्रा, माझीं जीं दहा नांवें आहेत तीं मी आतां तुला सांगतों. तूं जीं पूर्वीं ऐकिलीं होतींस तींच आतां श्रवण कर ८. हीं माझीं सर्व नांवें तूं एकाग्र अंतःकरण करून श्रद्धापूर्वक श्रवण कर.

सव्यसाची धनञ्जयः ९ उत्तर उवाच ॥ केनासि विजयो नाम केनासि श्वेतवाहनः । किरीटी नाम केनासि सव्यसाची कथं भवान् १० अर्जुनः फाल्गुनो जिष्णुः कृष्णो बीभत्सुरेव च । धनञ्जयश्च केनासि ब्रूहि तन्मम तत्त्वतः ११ श्रुता मे तस्य वीरस्य केवला नामहेतवः । तत्सर्वं यदि मे ब्रूयाः श्रद्दध्यां सर्वमेव ते १२ अर्जुन उवाच ॥ सर्वाञ्जनपदाञ्जित्वा वित्तमादाय केवलम् । मध्ये धनस्य तिष्ठामि तेनाहुर्मां धनञ्जयम् १३ अभिप्रयामि सङ्ग्रामे यदहं युद्धदुर्मदान् । नाजित्वा विनिवर्तामि तेन मां विजयं विदुः १४ श्वेताः काञ्चनसन्नाहा रथे युज्यन्ति मे हयाः । सङ्ग्रामे युध्यमानस्य तेनाहं श्वेतवाहनः १५ उत्तराभ्यां फल्गुनीभ्यां नक्षत्राभ्यामहं दिवा । जातो हिमवतःपृष्ठे तेन मां फाल्गुनं विदुः १६ पुरा शक्रेण मे दत्तं युध्यतो दानवर्षभैः । किरीटं मूर्ध्नि सूर्याभं तेनाहुर्मां किरीटिनम् १७ न कुर्यां कर्म बीभत्सं युध्यमानः कथंचन । तेन देवमनुष्येषु बीभत्सुरिति विश्रुतः १८ उभौ

अर्जुन, फाल्गुन, जिष्णु, किरीटी, श्वेतवाहन, बीभत्सु, विजय, कृष्ण, सव्यसाची आणि धनंजय (हीं माझीं दहा नांवें होत) ९. उत्तर ह्मणतो:— विजय हें नांव तुला कशामुळें प्राप्त झालें ? श्वेतवाहन हें नांव तुला प्राप्त होण्याचें कारण काय? किरीटी तुला कां ह्मणून ह्मणतात ? आणि सव्यसाची हें नांव तरी तुला कशावरून पडलें आहे ? १०. त्याचप्रमाणें अर्जुन, फाल्गुन, जिष्णु, कृष्ण, बीभत्सु आणि धनंजय हीं तरी नांवें तुला मिळण्याचें कारण काय? हे तूं मला खरें खरें सांग ११. त्या वीराला हीं नांवें पडण्याचीं निश्चित कारणें मीं ऐकिलीं आहेत. ह्यास्तव, तें सर्व जर तूं मला कथन केलेंस तर मीही तुझें सर्व खरें मानीन १२. अर्जुन ह्मणतो:—सर्व देश जिंकून केवळ द्रव्य आणिल्यावर त्यामध्यें मी बसलों ह्मणून मला धनंजय असें ह्मणतात १३. युद्धामध्यें जेरीस येण्यास दुर्घट असलेल्या शत्रूंची मी संग्रामामध्यें गांठ घेत असतों आणि त्यांना जिंकिल्यावांचून परत फिरत नाहीं ह्मणून मला विजय असें ह्मणतात १४. मी संग्रामामध्यें युद्ध करीत असतांना सुवर्णाचें सामान घातलेले श्वेतवर्ण अश्व माझ्या रथाला जोडिलेले असतात ह्मणून मला श्वेतवाहन असें ह्मणतात १५. उत्तराफल्गुनी नक्षत्र असतांना हिमालयावर दिवसा माझा जन्म झाला आहे ह्मणून मला फाल्गुन असें ह्मणतात १६. पूर्वी श्रेष्ठ दैत्यांशीं माझें युद्ध चाललें असतांना इंद्रानें माझ्या मस्तकीं सूर्यासारिखा तेजस्वी किरीट चढविल्यामुळें मला किरीटी असें ह्मणतात १७. युद्ध करीत असतांना मी कधींही बीभत्स कर्म करीत नाहीं ह्मणून

मे दक्षिणौ पाणी गाण्डीवस्य विकर्षणे। तेन देवमनुष्येषु सव्यसाचीति मां विदुः १९ पृथिव्यां चतुरन्तायां वर्णो मे दुर्लभः समः । करोमि कर्म शुक्लं च तस्मान्मामर्जुनं विदुः २० अहं दुरापो दुर्धर्षो दमनः पाकशासनिः । तेन देवमनुष्येषु जिष्णुर्नामास्मि विश्रुतः २१ कृष्ण इत्येव दशमं नाम चक्रे पिता मम । कृष्णावदातस्य सतः प्रियत्वाद्बालकस्य वै २२ वैशम्पायन उवाच ॥ ततः स पार्थं वैराटिरभ्यवादयदन्तिकात् । अहं भूमिञ्जयो नाम नाम्नाहमपि चोत्तरः २३ दिष्ट्या त्वां पार्थ पश्यामि स्वागतं ते धनञ्जय । लोहिताक्ष महाबाहो नागराजकरोपम २४ यदज्ञानादवोचं त्वां क्षन्तुमर्हसि तन्मम २५ यतस्त्वया कृतं पूर्वं चित्रं कर्म सुदुष्करम् । अतो भयं व्यतीतं मे प्रीतिश्च परमा त्वयि २६ [१३६७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहेऽर्जुनपरिचये चतुश्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४४ ॥

देवांमध्यें आणि मनुष्यांमध्यें मी बीभत्सु ह्मणून विख्यात झालों आहें १८. गांडीव धनुष्याचें आकर्षण करण्यांत माझे दोन्ही हात एकसारखे चालतात ह्मणून देवांमध्यें आणि मनुष्यांमध्यें मला सव्यसाची ह्मणतात १९. चार समुद्रांनीं मर्यादित असलेल्या पृथ्वीमध्यें माझ्यासारिखा वर्ण दुर्लभ असून मी कर्महि स्वच्छच करीत असतों; ह्मणून मला अर्जुन असें ह्मणतात २०. मी अलभ्य, अजिंक्य आणि शत्रूंचें दमन करणारा इंद्रपुत्र आहें; ह्मणून देवांमध्यें व मनुष्यांमध्यें जिष्णु ह्या नांवानें मी प्रसिद्ध आहें २१. माझा वर्ण उज्ज्वल व कृष्ण असल्यामुळें आणि बाळपणीं कृष्ण वर्ण मला प्रिय असल्यामुळें कृष्ण हें माझें दहावें नांव पित्यानें ठेविलें आहे २२. वैशंपायन सांगतात:— तदनंतर समीप असलेल्या त्या विराटपुत्रानें अर्जुनाला अभिवंदन केलें आणि तो ह्मणाला " मी भूमिंजय आहें व उत्तर ह्या नांवानेंही मी प्रसिद्ध आहें २३. हे लोहिताक्ष, हे महाबाहो, हे गजेंद्रशुंडातुल्य बाहूंनीं युक्त, हे धनंजय, हे पार्थ, तुझें मला दर्शन झालें ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. तुझें स्वागत असो २४. अज्ञानानें मीं जें तुझ्याशीं भाषण केलें त्याबद्दल तूं मला क्षमा कर २५. ज्याअर्थीं पूर्वीं तूं अत्यंत दुष्कर असें अद्भुत कर्म केलें आहेस त्याअर्थीं माझें भय नाहींसें झालें आहे आणि तुझ्याविषयीं माझे ठिकाणीं पराकाष्ठेचें प्रेम उत्पन्न झालें आहे २६. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं अर्जुनाच्या परिचयाविषयीं चव्वेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४४ ॥

उत्तर उवाच ॥ आस्थाय रुचिरं वीर रथं सारथिना मया । कतमं यास्यसेनीकमुक्तो यास्याम्यहं त्वया १ अर्जुन उवाच ॥ प्रीतोस्मि पुरुषव्याघ्र न भयं विद्यते तव । सर्वान्नुदामि ते शत्रूनरणे रणविशारद २ स्वस्थो भव महाबाहो पश्य मां शत्रुभिः सह । युध्यमानं विमर्देस्मिन्कुर्वाणं भैरवं महत् ३ एतान्सर्वानुपासङ्गान्क्षिप्रं बध्नीहि मे रथे । एकं चाहर निस्त्रिंशं जातरूपपरिष्कृतम् ४ वैशम्पायन उवाच ॥ अर्जुनस्य वचः श्रुत्वा त्वरावानुत्तरस्तदा । अर्जुनस्यायुधान्गृह्य शीघ्रेणावातरत्ततः ५ अर्जुन उवाच ॥ अहं वै कुरुभिर्योत्स्याम्यवजेष्यामि ते पशून् । संकल्पपक्षविक्षेपं बाहुप्राकारतोरणम् ॥ त्रिदण्डतूणसंबाधमनेकध्वजसंकुलम् ॥ ज्याक्षेपणं क्रोधकृतं नेमीनिनददुन्दुभि। नगरं ते मया गुप्तं रथोपस्थं भविष्यति ७ अधिष्ठितो मया संख्ये रथो गाण्डीवधन्वना । अजेयः शत्रुसैन्यानां वैराटे व्येतु ते भयम् ८ उत्तर उवाच ॥ बिभेमि नाहमेतेषां जानामि

उत्तर ह्मणतोः—हे वीरा, मज सारथ्यासहवर्तमान मनोहर रथावर आरूढ होऊन कोणत्या सैन्यावर जाण्याचा तुझा उद्देश आहे हें मला सांग ह्मणजे मी तुला घेऊन तिकडे चलतों १ अर्जुन ह्मणतोः—हे पुरुषश्रेष्ठा, मी तुझ्यावर संतुष्ट झालों आहें. आतां तुला भय नाहीं. हे संग्रामनिपुणा, संग्रामामध्यें मी तुझ्या सर्व शत्रूंचा पराजय करितों २. हे महापराक्रमी उत्तरा, तूं स्वस्थ रहा आणि ह्या संग्रामामध्यें मोठें भयंकर कर्म करीत शत्रूंसहवर्तमान युद्ध करीत असतांना तूं मला अवलोकन कर ३. हे माझे सर्व भाते रथावर सत्वर लटकाव आणि सुवर्णानें शृंगारिलेला एक खड्गही बरोबर घे ४. वैशंपायन सांगतातः—अर्जुनाचें भाषण श्रवण केल्यावर उत्तरानें त्वरा केली आणि अर्जुनाचीं आयुधें घेऊन तो वेगानें त्या शमीवृक्षावरून खालीं उतरला ५. अर्जुन ह्मणतोः—मी कौरवांशीं युद्ध करून तुझे पशु जिंकून आणीन आणि रथावरील सारथ्याचें उपवेशनस्थान मीं रक्षण केलें असतां तें नगराप्रमाणें तुझें रक्षण करील. रथाची उत्तम रचना (ह्मणजे चाकें, कणा, ध्वज वगैरे रथाच्या अवयवांची रचना) हे नगरांतील रस्त्यांच्या दोहोंबाजूंचे विस्तृत प्रदेश होत. बाहु हेच नगरासभोंवतीं असलेल्या कोटाचें द्वार होय; दांड्या आणि भाते ह्यांच्या योगानें हें नगर प्रवेशकरण्यास अशक्य झालें आहे; असाधारण वानरचिन्हरूप ध्वजानें हें युक्त आहे; प्रत्यंचा ह्याच ह्या नगराच्या कोटावरील गोळे मारण्याच्या तोफा आहेत. क्रोधानें हें शृंगारिलेलें आहे आणि रथचक्रांचा घोष हाच ह्या नगरांतील दुंदुभींचा ध्वनि आहे ६, ७. हे विराटपुत्रा, तूं भय सोडून दे. मी गांडीव धनुष्य धारण करून संग्रामामध्यें रथारूढ झालों आहें.

त्वां स्थिरं युधि । केशवेनापि सङ्ग्रामे साक्षादिन्द्रेण वा समम् ९ इदं तु चिन्तयन्नेवं परिमुह्यामि केवलम् । निश्चयं चापि दुर्मेधा न गच्छामि कथंचन १० एवंयुक्ताङ्गरूपस्य लक्षणैः सूचितस्य च । केन कर्मविपाकेन क्लीबत्वमिदमागतम् ११ मन्ये त्वां क्लीबवेषेण चरन्तं शूलपाणिनम् । गन्धर्वराजप्रतिमं देवं वापि शतक्रतुम् १२ अर्जुन उवाच ॥ भ्रातुर्नियोगाज्ज्येष्ठस्य संवत्सरमिदं व्रतम् । चरामि व्रतचर्यं च सत्यमेतद्ब्रवीमि ते १३ नास्मि क्लीबो महाबाहो परवान्धर्मसंयुतः । समाप्तव्रतमुत्तीर्णं विद्धि मां त्वं नृपात्मज १४ उत्तर उवाच ॥ परमोनुग्रहो मेद्य यतस्तर्को न मे वृथा । न हीदृशाः क्लीबरूपा भवन्ति तु नरोत्तम १५ सहायवानस्मि रणे युध्येयममरैरपि । साध्वसं हि प्रनष्टं मे किं करोमि ब्रवीहि मे १६ अहं ते संग्रहीष्यामि हयाञ्शत्रुरथारुजान् । शिक्षितो ह्यस्मि सारथ्ये तीर्थतः पुरुषर्षभ १७ दारुको वासुदेवस्य यथा शक्रस्य

ह्यास्तव, शत्रुसैन्यांच्या हातून माझा पराभव होणें शक्य नाहीं ८. उत्तर ह्मणतो:— मी ह्यांना भीत नाहीं. तूं युद्धामध्यें निश्चल असल्याचें मी जाणीत आहें. संग्रामामध्यें तूं केशवाची अथवा प्रत्यक्ष इंद्राची बरोबरी करणारा आहेस, हेंही मी जाणून आहें ९. परंतु, पुढला विचार जेव्हां माझ्या मनांत येऊं लागतो तेव्हां मज मंदमतीला त्याचा उलगडा पडत नसून माझें मन अगदीं गोंधळून जातें १०. अशा प्रकारें युद्धाचीं अंगें जर तुझ्यापाशीं आहेत आणि लक्षणांवरून युद्धाला अवश्य असणारीं सर्व साधनें जर तुझ्यापाशीं असल्याचें सिद्ध होत आहे तर कोणत्या कर्माच्या फलामुळें हें तुला षंढत्व प्राप्त झालें ? ११. क्लीबवेषानें दिवस काढीत असलेला तूं गंधर्वराजासारिखा दिसत असून शूलपाणि शंकर अथवा देव इंद्रच असावास असें मला वाटतें १२. अर्जुन ह्मणतो:— ज्येष्ठ भ्रात्याच्या आज्ञेमुळें एक संवत्सरपर्यंत मी ह्या व्रताचें आचरण करीत आहें. ही माझी व्रतचर्या आहे हें मीं तुला सत्य सांगतों १३. हे पराक्रमी राजपुत्रा, मी षंढ नाहीं. मी धर्माला अनुसरून वागणारा असल्यामुळें परतंत्र आहें. सांप्रत व्रत समाप्त झालें असल्यामुळें मी ह्या अवस्थेंतून सुटलों आहें असें तूं समज १४ उत्तर ह्मणतो:— हे पुरुषश्रेष्ठा, माझा तर्क व्यर्थ झाला नाहीं हा एक माझ्यावर मोठा अनुग्रहच झाला असें समजलें पाहिजे. क्लीब पुरुष अशाप्रकारचे नसतात असा माझा तर्क होता १५. तुझें जर मला साहाय्य आहे तर संग्रामामध्यें मी देवांशींही युद्ध करीन. आतां माझें भय नाहींसें झालें आहे. ह्यास्तव, मी काय करूं तें सांग १६. हे पुरुषश्रेष्ठा, शत्रुरथांचा विध्वंस करणारे तुझे अश्व मी आंवरून धरीन. कारण, सारथ्यकर्माविषयीं गुरूपासून

मातलिः । तथा मां विद्धि सारथ्ये शिक्षितं नरपुङ्गव १८ यस्य याते न पश्यन्ति भूमौ क्षिप्तं पदं पदम् । दक्षिणां यो धुरं युक्तः सुग्रीवसदृशो हयः १९ योयं धुरं धुर्यवरो वामां वहति शोभनः । तं मन्ये मेघपुष्पस्य जवेन सदृशं हयम् २० योयं काञ्चनसंनाहः पार्ष्णिं वहति शोभनः । समं शैब्यस्य तं मन्ये जवेन बलवत्तरम् २१ योयं वहति मे पार्ष्णिं दक्षिणामभितः स्थितः । बलाहकादपि मतः स जवे वीर्यवत्तरः २२ त्वामेवायं रथो वोढुं सङ्ग्रामेर्हति धन्विनम् । त्वं चेमं रथमास्थाय योद्धुमर्हो मतो मम २३ वैशम्पायन उवाच ॥ ततो विमुच्य बाहुभ्यां वलयानि स वीर्यवान् । चित्रे काञ्चनसन्नाहे प्रत्यमुञ्चत्तदा तले २४ कृष्णान्भङ्गिमतः केशाञ्श्वेतेनोद्ग्रथ्य वाससा २५ अथासौ प्राङ्मुखो भूत्वा शुचिः प्रयतमानसः । अभिदध्यौ महाबाहुः सर्वास्त्राणि रथोत्तमे २६ ऊचुश्च पार्थं

मला शिक्षण मिळालेलें आहे १७. हे पुरुषश्रेष्ठा, कृष्णाचा ज्याप्रमाणें दारुक अथवा इंद्राचा ज्याप्रमाणें मातलि त्याचप्रमाणें सारथ्यकर्माविषयीं मी सुशिक्षित झालों आहें १८. जो चालूं लागला असतां भूमीवर पडत असलेलीं पावलें लोकांना दिसत नाहींत आणि जो उजव्या बाजूच्या धुरीला लाविलेला आहे, तो अश्व भगवानाच्या सुग्रीव-अश्वासारिखा आहे १९. धुरीच्या अश्वांमध्यें श्रेष्ठ असा जो हा उत्कृष्ट अश्व डाव्या बाजूचें जूं ओढीत आहे तो भगवानाच्या मेघपुष्पनामक अश्वाची बरोबरी करणारा आहे असें मला वाटतें २०. सुवर्णाचें सामान घातलेला जो हा उत्तम अश्व मागल्या बाजूस डाव्या अंगचें जूं ओढीत आहे तो वेगासंबंधानें पाहूं गेलें असतां भगवानाच्या शैब्यअश्वापेक्षांही बलाढ्य आहे असें मला वाटतें २१; आणि त्याचप्रमाणें मागें जोडिलेला जो हा अश्व उजव्या बाजूचें जूं ओढीत आहे तो वेगामध्यें भगवानाच्या बलाहक अश्वापेक्षांही अधिक आहे असें मला वाटतें २२. संग्रामामध्यें धनुष्य धारण केलेल्या तुलाच ओढण्यास हा रथ योग्य आहे आणि ह्या रथावर आरूढ होऊन युद्ध करण्याला तूं योग्य आहेस असा माझा समज आहे २३. वैशंपायन सांगतातः— तदनंतर त्या वीर्यवान् अर्जुनानें हातांतील चुडे काढून सुवर्णानें गुंफिलेलीं अद्भुत कुंडलेंही खालीं काढून ठेविलीं २४. नंतर शृंगारिलेले आपले कृष्ण केश श्वेत वस्त्रानें गुंडाळून २५ त्यानें आपलें अंतःकरण एकाग्र केलें आणि पूर्वेकडे तोंड करून व शुचिर्भूत होऊन त्या महापराक्रमी अर्जुनानें त्या श्रेष्ठ रथावर सर्व अस्त्रांचें ध्यान केलें २६. तेव्हां राजकुमार कुंतीपुत्राला सर्व अस्त्रदेवता हात जोडून ह्मणाल्या " हे पांडुनंदना, हे आह्मी तुझे परम उदार दास आहोंत " २७.

सर्वाणि प्राञ्जलीनि नृपात्मजम् । इमे स्म परमोदाराः किङ्कराः पाण्डुनन्दन २७ प्रणिपत्य ततः पार्थः समालभ्य च पाणिना । सर्वाणि मानसानीह भवतेत्यभ्यभाषत २८ प्रतिगृह्य ततोस्त्राणि प्रहृष्टवदनोभवत् । अधिज्यं तरसा कृत्वा गाण्डीवं व्याक्षिपद्धनुः २९ तस्य विक्षिप्यमाणस्य धनुषोभून्महाध्वनिः । यथा शैलस्य महतः शैलेनेवावजघ्नतः ३० स निर्घातो भवद्भूमिर्दिक्षु वायुर्ववौ भृशम् । पपात महती चोल्का दिशो न प्रचकाशिरे ॥ भ्रान्तध्वजं खं तदासीत्प्रकम्पितमहाद्रुमम् ३१ तं शब्दं कुरवोजानन्विस्फोटमशनेरिव । यदर्जुनो धनुःश्रेष्ठं बाहुभ्यामाक्षिपद्रथे ३२ उत्तर उवाच ॥ एकस्त्वं पाण्डवश्रेष्ठ बहूनेतान्महारथान् । कथं जेष्यसि सङ्ग्रामे सर्वशस्त्रास्त्रपारगान् ३३ असहायोसि कौन्तेय ससहायाश्च कौरवाः । अत एव महाबाहो भीतास्तिष्ठामि तेग्रतः ३४ उवाच पार्थो मा भैषीः प्रहस्य स्वनवत्तदा ३५ युध्यमानस्य मे वीर गन्धर्वैः सुमहाबलैः । सहायो घोषयात्रायां कस्तदासी-

---

ह्यानंतर अर्जुनानें त्यांना प्रणिपात करून हातानें स्पर्श केला आणि " वेळ पडेल तेव्हां तुमची मला स्मृति रहावी " असें तो त्यांना ह्मणाला २८. असो. ह्याप्रमाणें अस्त्रांचा स्वीकार केल्यावर अर्जुनाची मुद्रा आनंदित झाली आणि वेगानें आपल्या गांडीव धनुष्याला प्रत्यंचा चढवून तो त्याचा टणत्कार करूं लागला २९ व तो टणत्कार करूं लागला असतां एका महापर्वतावर दुसऱ्या एका पर्वताच्याच योगानें कोणी तडाके मारीत आहे कीं काय अशारीतीनें त्या धनुष्याचा प्रचंड ध्वनि होऊं लागला ३०. त्या आघातामुळें भूमि विदीर्ण होऊं लागली; वारें चोहोंकडे अतिशय वेगानें वाहूं लागलें; मोठा उल्कापात झाला; दिशा धुंद झाल्या आणि आकाश, हदरून गेलेल्या मोठ्या मोठ्या वृक्षांनीं व उडूं लागलेल्या ध्वजांनीं, व्याप्त झालें ३१. अर्जुनानें आपल्या हातांनीं रथावर धनुष्याचा जो टणत्कार केला तो शब्द कौरवांना विजेच्या गडगडाटाप्रमाणें भासला ३२. उत्तर ह्मणतो:—हे पांडवश्रेष्ठा अर्जुना, सर्व शस्त्रास्त्रांमध्यें पारंगत असलेल्या ह्या असंख्य महारथ्यांचा संग्रामामध्यें तूं एकटा कसा पराभव करशील ? ३३. हे कुंतीनंदना, तूं साहाय्यरहित असून कौरव साहाय्ययुक्त आहेत. ह्यामुळें, हे महापराक्रमी अर्जुना, मी तुझ्यापुढें भीत भीतच रथावर बसलों आहें ३४. ह्यावर कुंतीपुत्र अर्जुन उच्च स्वरानें हास्य करून त्याला ह्मणाला तूं भिऊं नको ३५. हे वीरा, घोषयात्रेमध्यें अतिबलाढ्य गंधर्वांसहवर्तमान युद्ध करीत असतांना कोण बरें मला साहाय्य करणारा सखा

त्सखा मम ३६ तथा प्रतिभये तस्मिन्देवदानवसंकुले । खाण्डवे युध्यमानस्य कस्तदासीत्सखा मम ३७ निवातकवचैः सार्धं पौलोमैश्च महाबलैः । युध्यतो देवराजार्थे कः सहायस्तदाभवत् ३८ स्वयंवरे तु पाञ्चाल्या राजभिः सह संयुगे । युध्यतो बहुभिस्तात कः सहायस्तदाभवत् ३९ उपजीव्य गुरुं द्रोणं शक्रं वैश्रवणं यमम् । वरुणं पावकं चैव कृपं कृष्णं च माधवम् ४० पिनाकपाणिनं चैव कथमेतान्न योधये । रथं वाहय मे शीघ्रं व्येतु ते मानसो ज्वरः ४१ [१४०८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रह उत्तरार्जुनयोर्वाक्यं नाम पञ्चचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४५ ॥

वैशम्पायन उवाच ॥ उत्तरं सारथिं कृत्वा शमीं कृत्वा प्रदक्षिणम् । आयुधं सर्वमादाय प्रययौ पाण्डवर्षभः १ ध्वजं सिंहं रथात्तस्मादपनीय महारथः । प्रणिधाय शमीमूले प्रायादुत्तरसारथिः २ दैवीं मायां रथे युक्तां विहितां विश्वकर्मणा । काञ्चनं सिंहलाङ्गूलं ध्वजं वानरलक्षणम् ३ मनसा चिन्तयामास प्रसादं पावकस्य च ॥ स च तच्चिन्तितं ज्ञात्वा

त्यावेळीं होता ? ३६. त्याचप्रमाणें देवदैत्यांनीं भरून गेलेल्या त्या भीतिमय खांडववनामध्यें युद्ध करीत असतांनाही माझा सखा कोण होता ? ३७. महाबलाढ्य पौलोम व निवातकवच ह्यांसहवर्तमान देवराज इंद्राकरितां माझें युद्ध चाललें असतांना मला साहाय्य करणारा कोण होता ? ३८. पांचालीच्या स्वयंवराचे वेळीं पुष्कळ राजांसहवर्तमान युद्ध करण्याचा प्रसंग पडला असतां मला साहाय्य करणारा कोण होता ? ३९. गुरु द्रोण, इंद्र, कुबेर, यम, वरुण, अग्नि, कृप, लक्ष्मीपति कृष्ण ४० आणि पिनाकपाणि-शंकर ह्यांची जर मीं सेवा केलेली आहे तर ह्या कौरवांशीं युद्ध करण्यास मी कसा समर्थ होणार नाहीं ? तूं आपल्या मनांतील काळजी सोडून देऊन माझा रथ सत्वर हांक ४१. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वांपैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं उत्तर व अर्जुन ह्यांच्या संभाषणाविषयीं पंचेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४५ ॥

वैशंपायन सांगतात:— उत्तराला सारथि करून, शमीला प्रदक्षिणा करून आणि सर्व आयुधें घेऊन पांडवश्रेष्ठ अर्जुन तेथून निघाला १. परंतु, सिंहाकार ध्वज त्या रथावरून काढून टाकून आणि शमीवृक्षाजवळ ठेवून उत्तरसारथ्यानें युक्त असलेला तो महारथि अर्जुन चालता झाला २. नंतर जगत्स्रष्ट्या ब्रह्मदेवानें रथसंबंधीं निर्माण केलेली दैवी मायाच कीं काय अशा वानरचिन्हित पीतवर्ण ध्वजाचें त्यानें मनामध्यें

ध्वजे भूतान्यदेशयत् ४ सपताकं विचित्राङ्गं सोपासङ्गं महाबलम् । खात्प-
पात रथे तूर्णं दिव्यरूपं मनोरमम् ५ रथं तमागतं दृष्ट्वा दक्षिणं प्राक-
रोत्तदा । रथमास्थाय बीभत्सुः कौन्तेयः श्वेतवाहनः ६ बद्धगोधाङ्गुलि-
त्राणः प्रगृहीतशरासनः । ततः प्रायादुदीचीं च कपिप्रवरकेतनः ७ स्वन-
वन्तं महाशङ्खं बलवानरिमर्दनः । प्राधमद्बलमास्थाय द्विषतां लोमहर्ष-
णम् ८ ततस्ते जवना धुर्या जानुभ्यामगमन्महीम् । उत्तरश्चापि संत्रस्तो
रथोपस्थ उपाविशत् ९ संस्थाप्य चाश्वान्कौन्तेयः समुद्यम्य च रश्मिभिः।
उत्तरं च परिष्वज्य समाश्वासयदर्जुनः १० अर्जुन उवाच ॥ मा भैस्त्वं
राजपुत्राग्र्य क्षत्रियोसि परन्तप । कथं तु पुरुषव्याघ्र शत्रुमध्ये विषी-
दसि ११ श्रुतास्ते शङ्खशब्दाश्च भेरीशब्दाश्च पुष्कलाः । कुञ्जराणां च
नदतां व्यूढानीकेषु तिष्ठताम् १२ स त्वं कथमिहानेन शङ्खशब्देन
भीषितः । विवर्णरूपो वित्रस्तः पुरुषः प्राकृतो यथा १३ उत्तर उवाच॥

चिंतन केलें. त्या ध्वजावर जें वानरचिन्ह होतें त्याचें पुच्छही हिंस्रक होतें. असो.
ध्वजाचें स्मरण केल्यानंतर अर्जुनानें अग्नीच्या प्रसादानें प्राप्त झालेल्या रथाचेंही स्मरण
केलें. तेव्हां त्याचा मनोरथ जाणून त्या अग्नीनें ध्वजाविषयीं आणि रथाविषयीं भूतांना
आज्ञा केली ३,४. तों इतक्यांत ध्वज, अद्भुत चक्रें, अक्षय्य भातें, प्रचंड शक्ति आणि
दिव्य रूप ह्यांनीं युक्त असलेला मनोहर रथ सत्वरच अर्जुनाच्या समीप आकाशांतून
खालीं आला ५. तो रथ आलेला पाहून अर्जुनानें त्याला प्रदक्षिणा केली आणि तो
श्वेतवाहन कुंतीपुत्र अर्जुन रथावर आरूढ होऊन ६ व हातांत धनुष्य घेऊन उत्तरेकडे निघाला
त्यावेळीं त्याचा ध्वज श्रेष्ठ वानरानें युक्त होता आणि त्यानें अंगुलित्राण व तलत्राण चढ-
विलें होतें ७. प्रथमतः मोठ्या नादानें युक्त असल्यामुळें शत्रूंच्या अंगावर कांटा आण-
णारा आपला देवदत्तनामक प्रचंड शंख शत्रूंचें मर्दन करणाऱ्या बलाढ्य अर्जुनानें
जोरानें फुंकिल्याबरोबर ८ त्या वेगवान् अश्वांनीं भूमीवर गुडघे टेंकिले आणि उत्तरही
अतिशय त्रस्त होऊन सारथ्याच्या स्थानावर उभा होता तो खालींच बसला ९. तेव्हां
रश्मींच्या योगानें अश्व सांवरून धरून, त्यांना उभे करून आणि उत्तराला पोटाशीं
धरून अर्जुनानें त्याला धीर दिला १०. अर्जुन ह्मणतोः—हे श्रेष्ठ राजकुमारा, तूं भिऊ
नकोस. हे शत्रुतापना, तूं क्षत्रिय आहेस. असें असून, हे पुरुषश्रेष्ठा, शत्रूंच्या मध्यभागीं
तूं असा घाबरून कां जात आहेस? ११. अरे, आजपर्यंत तूं सज्ज झालेल्या सैन्यामध्यें
उभे राहून गर्जना करणाऱ्या गजांचे, शंखांचे व दुंदुभींचे पुष्कळच शब्द ऐकिले
आहेस १२. तेव्हां ह्या शंखाच्या शब्दानेंच तूं एखाद्या यःकश्चित् दुर्बल पुरुषाप्रमाणें

श्रुता मे शङ्खशब्दाश्च भेरीशब्दाश्च पुष्कलाः । कुञ्जराणां निनदतां व्यूढानीकेषु तिष्ठताम् १४ नैवंविधः शङ्खशब्दः पुरा जातु मया श्रुतः। ध्वजस्य चापि रूपं मे दृष्टपूर्वं न हीदृशम् १५ धनुषश्चैव निर्घोषः श्रुतपूर्वो न मे क्वचित् । अस्य शङ्खस्य शब्देन धनुषो निःस्वनेन च १६ अमानुषाणां शब्देन भूतानां ध्वजवासिनाम् । रथस्य च निनादेन मनो मुह्यति मे भृशम् १७ व्याकुलाश्च दिशः सर्वा हृदयं व्यथतीव मे । ध्वजेन पिहिताः सर्वा दिशो न प्रतिभान्ति मे १८ गाण्डीवस्य च शब्देन कर्णौ मे बधिरीकृतौ । स मुहूर्तं प्रयातं तु पार्थो वैराटिमब्रवीत् १९ अर्जुन उवाच ॥ एकान्तं रथमास्थाय पद्भ्यां त्वमवपीडयन् । दृढं च रश्मीन्संयच्छ शङ्खं ध्माप्याम्यहं पुनः २० वैशम्पायन उवाच ॥ ततः शङ्खमुपाध्मासीद्दारयन्निव पर्वतान् । गुहा गिरीणां च तदा दिशः शैलांस्तथैव च॥ उत्तरश्चापि संलीनो रथोपस्थ उपाविशत् २१ तस्य शङ्खस्य शब्देन रथनेमिस्वनेन च । गाण्डीवस्य च घोषेण पृथिवी समकम्पत २२ तं

कशाकरितां भयभीत होऊन घाबरून गेला आहेस ? आणि तुझी मुद्रा तरी अशी निस्तेज कां झाली आहे ? १३. उत्तर ह्मणतोः—सज्ज झालेल्या सैन्यामध्यें उभे राहून गर्जना करणाऱ्या गजांचे; शंखांचे अथवा दुंदुभींचे पुष्कळ शब्द मीं श्रवण केले आहेत १४; परंतु, शंखाचा अशाप्रकारचा शब्द आजपर्यंत मीं कधींही ऐकिला नाहीं; अशा प्रकारचें ध्वजाचें स्वरूपही माझ्या कधीं पाहण्यांत आलें नाहीं १५ आणि धनुष्याचा असा टणत्कारही आजपर्यंत माझ्या कधीं ऐकण्यांत आला नाहीं. ह्या शंखाच्या शब्दानें, धनुष्याच्या टणत्कारानें १६, ध्वजावर वास्तव्य करणाऱ्या अमानुष प्राण्यांच्या गर्जनेनें आणि रथाच्या घोषानें माझें मन अगदीं गोंधळून गेलें आहे १७; कोणतीच दिशा मला समजेनाशी झाली आहे; माझ्या हृदयामध्यें तर अगदीं धसकीच भरून गेली आहे; ध्वजानें व्याकुळ झाल्यामुळें मला कोणत्याच दिशेचें भान नाहीं. १८ आणि गांडीवाच्या टणत्कारानें माझ्या कानठळ्याही बसून गेल्या आहेत. असो. अशा स्थितीमध्यें असतांना क्षणभर चालून गेल्यावर कुंतीपुत्र अर्जुन पुनरपि विराटपुत्र उत्तराला ह्मणाला १९ " रथावर अतिशय सावधपणानें बसून आणि पाय अगदीं निश्चल ठेवून तूं अश्वांच्या रश्मी बळकट ओढून धर. ह्मणजे मी पुनरपि शंख फुंकितों "२०. वैशंपायन सांगतातः—असें उत्तराला सांगितल्यानंतर अर्जुनानें पर्वत विदीर्ण करीतच कीं काय शंख फुंकिला असतां पर्वतांच्या गुहा, पर्वत आणि दिशा दणाणून गेल्या आणि उत्तरानेंही रथावरच मुरकुंडी मारिली २१. इतकेंच नव्हे परतु, शंखाच्या शब्दानें, रथाच्या धावांच्या घोषानें आणि गांडीव

समाश्वासयामास पुनरेव धनञ्जयः २३ द्रोण उवाच ॥ यथा रथस्य निर्घोषो यथा मेघ उदीर्यते । कम्पते च यथा भूमिर्नैषोन्यः सव्यसाचिनः २४ शस्त्राणि न प्रकाशन्ते न प्रहृष्यन्ति वाजिनः । अग्नयश्च न भासन्ते समिद्धास्तन्न शोभनम् . २५ प्रत्यादित्यं च नः सर्वे मृगा घोरप्रवादिनः । ध्वजेषु च निलीयन्ते वायसास्तन्न शोभनम् २६ शकुनाश्चापसव्या नो वेदयन्ति महद्भयम् । गोमायुरेष सेनायां रुदन्मध्येन धावति २७ अनाहतश्च निष्क्रान्तो महद्वेदयते भयम् । भवतां रोमकूपाणि प्रहृष्टान्युपलक्षये २८ ध्रुवं विनाशो युद्धेन क्षत्रियाणां प्रदृश्यते । ज्योतींषि न प्रकाशन्ते दारुणा मृगपक्षिणः २९ उत्पाता विविधा घोरा दृश्यन्ते क्षत्रनाशनाः । विशेषत इहास्माकं निमित्तानि विनाशने ३० उल्काभिश्च प्रदीप्ताभिर्बाध्यते पृतना तव । वाहनान्यप्रहृष्टानि रुदन्तीव विशाम्पते ३१ उपासते च सैन्यानि गृध्रास्तव समन्ततः ३२ तप्स्यसे वाहिनीं दृष्ट्वा पार्थबाणप्रपीडिताम् । पराभूता च वः

धनुष्याच्या टणत्कारानें पृथ्वीही कंपित झाली २२ व पुनरपि अर्जुनानें त्या उत्तराला सावध केलें २३. द्रोण ह्मणतातः–ज्याअर्थीं अशाप्रकारचा रथाचा घोष होत आहे, आकाशामध्यें मेघ येत आहेत आणि भूमि कंपित होत आहे त्याअर्थीं अर्जुनावांचून हा दुसरा कोणीही नाहीं २४. अहो, आपलीं शस्त्रें चकाकेनाशीं झालीं आहेत, अश्व आनंदानें खेंखाळत नाहींत आणि इंधनें घातलीं असतांही अग्नि प्रकाशयुक्त होत नाहींत हें चिन्ह चांगलें नव्हे २५. अहो, सर्वही मृग सूर्याकडे तोंड करून घोर शब्द करीत आहेत आणि कावळे ध्वजावर येऊन बसत आहेत हें चिन्ह चांगलें नव्हे २६. डावी घालून जात असलेले हे पक्षीही आह्मांला मोठें भय प्राप्त होण्याचें सुचवीत आहेत. हें कोल्हें आमच्या सैन्यांतूनच रडत जात आहे २७, आणि कोणीं प्रहार केल्यावांचून हें बाहेर पडलें असल्यामुळें मोठें भय प्राप्त होणार असल्याचें सुचवीत आहे व तुमचीं रोमरंध्रेंही थरारल्यासारखीं दिसत आहेत २८. ह्यावरून युद्धाच्या योगानें क्षत्रियांचा निःसंशय नाश होणार असें दिसतें. ज्योतिर्गण प्रकाशरहित झाले आहेत, मृग व पक्षी भयंकर शब्द करीत आहेत २९ आणि इतरही नानाप्रकारचे क्षत्रियनाशक घोर उत्पात दिसूं लागले आहेत. विशेषतः हे अपशकुन ह्या ठिकाणीं आमच्याच नाशाचे दिसत आहेत ३०. हे प्रजापालका दुर्योधनराजा, प्रदीप्त उल्का तुझ्या सैन्यावर येऊन पडत आहेत; तुझीं वाहनें आनंदरहित आहेत इतकेंच नव्हे; परंतु, रडत असल्यासारिखीं दिसत आहेत ३१ आणि

सेना न कश्चिद्योद्धुमिच्छति ३३ विवर्णमुखभूयिष्ठाः सर्वे योधा विचे-
तसः । गाः संप्रस्थाप्य तिष्ठामो व्यूढानीकाः प्रहारिणः ३४ [१४४२]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि
गोहरणपर्वण्युत्तरगोग्रह औत्पातिको नाम षट्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ४६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ अथ दुर्योधनो राजा समरे भीष्ममब्रवीत् ।
द्रोणं च रथशार्दूलं कृपं च सुमहारथम् १ उक्तोयमर्थ आचार्यौ मया कर्णेन
चासकृत् । पुनरेव प्रवक्ष्यामि न हि तृप्यामि तं ब्रुवन् २ पराभूतैर्हि
वस्तव्यं तैश्च द्वादशवत्सरान् । वने जनपदे ज्ञातैरेष एव पणो हि नः ३
तेषां न तावन्निर्वृत्तं वर्तते तु त्रयोदशम् । अज्ञातवासो बीभत्सुरथास्माभिः
समागतः ४ अनिवृत्ते तु निर्वासे यदि बीभत्सुरागतः । पुनर्द्वादश वर्षाणि
वने वत्स्यन्ति पाण्डवाः ५ लोभाद्वा ते न जानीयुरस्मान्वा मोह

सर्व बाजूंनीं गिधाडें तुझ्या सैन्यावर येऊन बसत आहेत ३२. ह्यांवरून, अर्जुनाच्या बाणानें आपली सेना व्याकुल झाल्याचें पाहून तुला पश्चाताप करण्याचा प्रसंग येईल. तुझी सेना तर आधींच पराजित झाली आहे. युद्धाविषयीं कोणीही उत्सुक नाहीं ३३. इतकेंच नव्हे, परंतु, सर्वही योद्धे घाबरून गेले असून सर्वांच्याही मुखावरील बहुतेक तेज नाहींसेंच झालें आहे. ह्यास्तव, गाई पाठवून देऊन आणि सैन्य सज्ज करून आह्मीं सर्वही योद्ध्यांनीं तयार असावें हें मला बरें दिसतें ३४. ह्याप्रमाणें महर्षि-व्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तर-गोग्रहणसंबंधीं उत्पातदर्शनाविषयीं शेहेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥ ४६ ॥

वैशंपायन सांगतातः—तदनंतर दुर्योधन राजा संग्रामामध्यें भीष्म, श्रेष्ठरथी द्रोण, आणि महारथी कृप ह्यांना अनुलक्षून ह्मणाला १ " द्रोणाचार्य आणि कृपाचार्य ह्यांना मीं व कर्णानें ही गोष्ट अनेक वेळां सांगितली आहे आणि तीच गोष्ट मी पुनरपिही सांगतों. कारण, ती आतां सांगण्याचें कारण नाहीं असें मला वाटत नाहीं २. द्यूतामध्यें पराजित झालेल्या ह्या पांडवांनीं बारा वर्षेंपर्यंत उघडपणें वनामध्यें आणि कोणत्या तरी एकाद्या देशामध्यें एक वर्ष गुप्तपणें वास्तव्य करावयाचें ह्या आमच्याशीं त्यांचा पण ठरलेला आहे ३. परंतु, हा त्यांचा पण अद्यापपर्यंत शेवटास गेलेला नाहीं. हें तेरावेंच वर्ष चाललें आहे आणि अर्जुन अज्ञातवासामध्यें असतांनाच आम-च्याशीं येऊन भिडला आहे ४. तस्मात्, ज्याअर्थी अज्ञातवास संपूर्ण झाला नसूनही अर्जुन येथें आला आहे त्याअर्थी पुनरपि बारा वर्षेंपर्यंत पांडवांनीं वनामध्यें वास्तव्य केलें पाहिजे ५. आतां लोभामुळें हें त्यांच्या लक्ष्यांत आलें नसेल किंवा आह्मांलाच

आविशत् । हीनातिरिक्तमेतेषां भीष्मो वेदितुमर्हति ६ अर्थानां च पुनर्द्वैधे नित्यं भवति संशयः । अन्यथा चिन्तितो ह्यर्थः पुनर्भवति सोऽन्यथा ७ उत्तरं मार्गमाणानां मत्स्यानां च युयुत्सताम् । यदि बीभत्सुरायातस्तदा कस्यापराध्नुमः ८ त्रिगर्तानां वयं हेतोर्मत्स्यान्योद्धुमिहागताः । मत्स्यानां विप्रकारांस्ते बहूनस्मानकीर्तयन् ९ तेषां भयाभिभूतानां तदस्माभिः प्रतिश्रुतम् । प्रथमं तैर्ग्रहीतव्यं मत्स्यानां गोधनं महत् ॥ सप्तम्यामपराह्णे वै तथा तैस्तु समाहितम् १० अष्टम्यां पुनरस्माभिरादित्यस्योदयं प्रति । इमा गावो ग्रहीतव्या गते मत्स्ये गवां पदम् ११ ते वा गाश्चानयिष्यन्ति यदि वा स्युः पराजिताः । अस्मान्वा ह्युपसंधाय कुर्युर्मत्स्येन संगतम् १२ अथवा तानपाहाय मत्स्यो जनपदैः सह । सर्वया सेनया सार्धं संवृतो भीमरूपया १३ आयातः केवलं रात्रिमस्मान्योद्धुमि-

---

कालगणनेविषयीं मोह पडला असेल. ह्यास्तव, ह्यांच्यासंबंधीं जें कांहीं न्यूनाधिक्य असेल तें जाणण्यास, भीष्म योग्य आहेत ६. गोष्टींमध्यें दोन प्रकार झाले म्हणजे कोणती करावी ह्याबद्दल नेहमीं संशय येतो आणि आपण एका प्रकारानें मनांत आणिलेली गोष्ट दुसऱ्याच प्रकारानें होत असते ७. उत्तरगोग्रहणाची इच्छा धरणारे आह्मी आणि मत्स्यकुलांतील राजपुरुष ह्या उभयतांचें युद्ध चाललें असतां अर्जुन जर मध्यें आला आहे तर हा अपराध कोणाचा ? मत्स्यदेशांतील राजाशीं युद्ध करणाऱ्या आमच्या हातून पांडवांपैकीं कोणाचा अपराध झाला आहे ? ८. त्रिगर्तांकरितां आह्मी मत्स्यांशीं युद्ध करण्यास येथें आलों आहों. कारण, मत्स्यांचे अनेक अपराध त्या त्रिगर्तांनीं आह्मांला कथन केले आहेत ९. त्रिगर्त भयभीत झाले असतांना त्यांच्याशीं आह्मीं प्रतिज्ञा केली आहे. प्रथमतः मत्स्यांचें प्रचंड गोधन सप्तमीचे दिवशीं अपराह्णकालीं हरण करावयाचें असें त्या त्रिगर्तांनीं ठरविलें होतें १०; आणि त्रिगर्तांनीं हरण केलेल्या गाईंच्या मागोमाग मत्स्यराज विराट गेला ह्मणजे अष्टमीचे दिवशीं सूर्योदय झाल्यावर ह्या गाई आह्मीं हरण करावयाच्या अशी आह्मीं प्रतिज्ञाच केलेली आहे ११. ते त्रिगर्त गाई घेऊन येतील, कदाचित् पराजित होतील किंवा आह्मांला फसवून मत्स्यराजाशीं तह करतील (ह्यापैकीं कांहीं जरी प्रकार असला तरी पूर्वीं प्रतिज्ञा केल्याप्रमाणें आह्मांला तर सांप्रत युद्ध कर्तव्यच आहे) १२. असो. दिसण्यांत भयंकर असलेल्या सेनेनें परिवेष्टित झालेला मत्स्यराज त्या सर्व सेनेसहवर्तमान आणि देशांतील लोकांसहवर्तमान त्या त्रिगर्तांचा नाद सोडून देऊन १३ कदाचित् रात्रीं घरीं आला असेल आणि आमच्याशीं युद्ध

ह्यागतः १४ तेषामेव महावीर्यः कश्चिदेष पुरःसरः । अस्माञ्जेतुमिहायातो मत्स्यो वापि स्वयं भवेत् १५ यद्येष राजा मत्स्यानां यदि बीभत्सुरागतः । सर्वैर्योद्धव्यमस्माभिरिति नः समयः कृतः १६ अथ कस्मात्स्थिता ह्येते रथेषु रथसत्तमाः । भीष्मो द्रोणः कृपश्चैव विकर्णो द्रौणिरेव च १७ संभ्रान्तमनसः सर्वे काले ह्यस्मिन्महारथाः । नान्यत्र युद्धाच्छ्रेयोस्ति तथात्मा प्रणिधीयताम् १८ आच्छिन्ने गोधनेस्माकमपि देवेन वज्रिणा । यमेन वापि सङ्ग्रामे को हास्तिनपुरं व्रजेत् १८ शरैरेभिः प्रणुन्नानां भग्नानां गहने वने । को हि जीवेत्पदातीनां भवेदश्वेषु संशयः २० दुर्योधनवचः श्रुत्वा राधेयस्त्वब्रवीद्वचः । आचार्यं पृष्ठतः कृत्वा तथा नीतिर्विधीयताम् २१ जनाति हि मतं तेषामतस्त्रासयतीह नः । अर्जुने चास्य संप्रीतिमधिकामुपलक्षये २२ तथा हि दृष्ट्वा बीभत्सुमुपायान्तं प्रशंसति ।

करण्याकरितां येथें आला असेल. १४; अथवा त्यांच्यापैकींच कोणीतरी हा मोठा वीर्यवान् पुढारी आह्मांला जिंकण्याच्या उद्देशानें येथें आला असेल किंवा स्वतः मत्स्यराज विराटच हा असेल १५. तात्पर्य, हा येथें आलेला जरी मत्स्यराज विराट असला किंवा अर्जुन असला तरी आह्मां सर्वांना सांप्रत युद्ध केलेंच पाहिजे. कारण, तशी आमची प्रतिज्ञाच झालेली आहे १६. तेव्हां असें असतांना भीष्म, द्रोण, कृप, विकर्ण आणि द्रोणपुत्र अश्वत्थामा हे श्रेष्ठ श्रेष्ठ रथी आपआपल्या रथांवर कशाकरितां नुसते स्वस्थ उभे राहिले आहेत ? १७. अरे, अशा प्रसंगीं सर्वही महारथी मनामध्यें गोंधळून गेले आहेत हें काय ? युद्धावांचून दुसरी कोणतीही गोष्ट आपणांला हितावह होणार नाहीं. ह्यास्तव, तशारीतीनें आपण आपलें चित्त स्वस्थ केलें पाहिजे १८. आह्मी जिंकिलेलें गोधन प्रत्यक्ष वज्रपाणि इंद्रानें अथवा यमानें जरी आह्मांपासून हरण करून नेलें आणि त्याच्याशीं संग्राम करण्याचा प्रसंग पडला तरी (गाई बरोबर घेतल्याशिवाय आणि त्याला जिंकिल्याशिवाय) हास्तिनपुराला कोण परत जाणार ? (कोणीही जाणार नाहीं) १९. अरे, ह्या बाणांनीं विद्ध होऊन गहन वनामध्यें हे प्रतिपक्षाकडील पदाति पराभव पावले असतां त्यांच्यापैकीं कोण बरें जिवंत रहाणार आहे ? स्वारांमध्यें मात्र कांहीं जिवंत राहण्याचा कदाचित् संभव आहे " २०. हें दुर्योधनाचें भाषण श्रवण करून राधापुत्र कर्ण त्याला ह्मणाला " द्रोणाचार्यांच्या नादीं न लागतां ठरल्याप्रमाणें आपण व्यवस्था करावी २१. आमचा तेजोभंग करणें ही जी पांडवांना संमत असलेली गोष्ट ती मात्र ह्याला करितां येत आहे आणि ह्मणूनच तो ह्या ठिकाणीं आह्मांला भीति घालीत आहे.

यथा सेना न भज्येत तथा नीतिर्विधीयताम् २३ हेषितं ह्युपशृण्वाने द्रोणे सर्वं विघट्टितम् । अदेशिका महारण्ये ग्रीष्मे शत्रुवशं गताः ॥ यथा न विभ्रमेत्सेना तथा नीतिर्विधीयताम् २४ इष्टा हि पाण्डवा नित्यमाचार्यस्य विशेषतः । आसयन्नपरार्थाश्च कथ्यते स्म स्वयं तथा २५ अश्वानां हेषितं श्रुत्वा कः प्रशंसापरो भवेत् । स्थाने वापि व्रजन्तो वा सदा हेषन्ति वाजिनः २६ सदा च वायवो वान्ति नित्यं वर्षति वासवः । स्तनयित्नोश्च निर्घोषः श्रूयते बहुशस्तथा २७ किमत्र कार्यं पार्थस्य कथं वा स प्रशस्यते । अन्यत्र कामाद्द्वेषाद्वा रोषादस्मासु केवलात् २८ आचार्या वै कारुणिकाः प्राज्ञाश्चापापदर्शिनः । नैते महाभये प्राप्ते संप्रष्टव्याः कथंचन २९ प्रासादेषु विचित्रेषु गोष्ठीषूपवनेषु च । कथा विचित्राः कुर्वाणाः पण्डितास्तत्र शोभनाः ३० बहून्याश्चर्यरूपाणि कुर्वाणा जनसंसदि ।

अर्जुनाचे ठिकाणीं ह्याचें प्रेम अधिक आहे असें मला वाटतें २२. कारण, अर्जुन येत आहे असें पाहतांक्षणीं हा त्याची प्रशंसाच करीत सुटला आहे. तस्मात्, आपल्या सेनेची फांकाफांक न होईल अशी व्यवस्था करणें अवश्य आहे २३. अरे, एकाद्या अश्वाचें खिंखाळणें द्रोणाच्या कानीं पडलें कीं त्याचें सर्व सामर्थ्य संपलेंच ह्मणून समजावें. उष्णकालामध्यें महारण्यांत सांपडलेले आपल्या सैन्यांतील लोक कोणी नायक नसल्यामुळें कदाचित् शत्रूच्या तावडींत सांपडतील; ह्यास्तव, सेना भयभीत न होईल असा कांहीं तरी उपाय योजिला पाहिजे २४. विशेषतः आचार्याला पांडव नेहमींच प्रिय आहेत. त्या स्वार्थसाधु पांडवांनीं ह्याला आपणांपाशीं ठेविलें आहे आणि त्यांच्या आज्ञेप्रमाणें हा स्वतः त्यांची प्रशंसा करीत आहे २५. नाहीं तर अश्वांचें खिंखाळणें ऐकून दुसरा कोण बरें एकसारिखी प्रशंसा करीत सुटेल? अरे, अश्व ठाणावर असतांना अथवा चालूं लागले असतांना नेहमीं खिंखाळत असतात २६; वारेही नेहमींच वाहत असतात; इंद्र पर्जन्यही कोणत्याही ऋतूमध्यें पाडीत असतो आणि मेघगर्जनाही अनेक वेळां हवी तेव्हां ऐकूं येत असते २७. ह्यांत अर्जुनानें तें काय केलें आणि ह्याबद्दल त्याची प्रशंसा तरी कां चालली आहे? पांडवांविषयीं प्रेम व आमच्याविषयीं द्वेष असल्यामुळें अथवा कदाचित् पांडवांविषयीं असलेल्या प्रेमामुळें नव्हे परंतु, आह्मांवरच केवळ रोष असल्यामुळें हा आचार्य असें करीत आहे २८. (छे! छे! पण असें नव्हे!) आचार्य ह्मटलें ह्मणजे ते दयाळू, ज्ञानी आणि हिंसा वगैरे पाप कधीं मनामध्येंही न आणणारे असे असावयाचे! ह्यास्तव, महाभय प्राप्त झालें असतां ह्यांना कधींही विचारणें योग्य नाहीं. २९ चित्रविचित्र देवालयामध्यें, गप्पांच्या अखाड्यामध्यें किंवा उपवनामध्येंच

इङ्गास्त्रे चोपसंधाने पण्डितास्तत्र शोभनाः ३१ परेषां विवरज्ञाने मनुष्यचरितेषु च । हस्त्यश्वरथचर्यासु खरोष्ट्राजाविकर्मणि ३२ गोधनेषु प्रतोलीषु वरद्वारमुखेषु च । अन्नसंस्कारदोषेषु पण्डितास्तत्र शोभनाः ३३ पण्डितान्पृष्ठतः कृत्वा परेषां गुणवादिनः । विधीयतां तथा नीतिर्यथा वध्यो भवेत्परः ३४ गावश्च संप्रतिष्ठन्तां सेनां व्यूह्य समन्ततः । आरक्षाश्च विधीयन्तां यत्र योत्स्यामहे परान् ३५ [१४७७] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे दुर्योधनवाक्ये सप्तचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४७ ॥

कर्ण उवाच ॥ सर्वानायुष्मतो भीतान्संत्रस्तानिव लक्षये । अयुद्धमनसश्चैव सर्वांश्चैवानवस्थितान् १ यद्येष राजा मत्स्यानां यदि बीभत्सुरागतः । अहमावारयिष्यामि वेलेव मकरालयम् २ मम चापप्रयुक्तानां शराणां नतपर्वणाम् । नावृत्तिर्गच्छतां तेषां सर्पाणामिव सर्पताम् ३ रुक्मपुङ्खाः

अद्भुत गोष्टी सांगणारे हें पंडित चांगले शोभतात ३०. विनोद वगैरे करून लोकसमाजामध्यें हशा पिकविणारे हे पंडित (दर्वी, आज्यस्थाली वगैरे) यज्ञसंबंधी अस्त्रांचें काम पडलें असतां अथवा त्या अस्त्रांचा प्रयोग करण्याचा प्रसंग आला असतां पटाईत असतात ३१. दुसऱ्या याज्ञिकांचें छिद्र काढणें; त्याचप्रमाणें (स्नान, आचमन, भोजन, शयन इत्यादि) मनुष्यांचे नित्य व्यवहार; गज, अश्व व रथ इत्यादि वाहनांच्या योगानें फेरफटका करणें; गर्दभ, उंट, शेळ्या, मेंढ्या ह्यांची चिकित्सा वगैरे करणें ३२; गोधन, रस्ते, नगरांत वगैरे जाण्याचीं मोठीं मोठीं द्वारें व मुखें, अन्नसंस्कार आणि अन्नदोष; ह्यांविषयीं हे पंडित चांगले पटाईत असतात ३३. ह्यास्तव, शत्रूंची प्रशंसा करणाऱ्या ह्या पंडितांच्या नादीं न लागतां शत्रु वध्य होईल अशीच तजवीज आतां आपणांला केली पाहिजे ३४. गाई चालत्या होऊं द्या व बरोबर रक्षक नेमा. आतां आपणांला सर्वप्रकारें सेना व्यवस्थित उभी करून शत्रूशीं युद्ध केलें पाहिजे ३५. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वांपैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं दुर्योधनाच्या भाषणाविषयीं सत्तेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥४७॥

कर्ण ह्मणतो:— भीष्मप्रभृति सर्व दीर्घायुषी भयभीत व त्रस्त झाले असून मला सर्वच चंचल झालेले दिसत आहेत आणि युद्ध करण्याचा उद्देश कोणाचाच दिसत नाहीं १. ह्यास्तव, हा आलेला मत्स्यराज विराट असो अथवा अर्जुन असो, ज्याप्रमाणें मर्यादा समुद्राचें निवारण करीत असते त्याप्रमाणें मी त्याचें निवारण करीन २. सर्पाप्रमाणें सरसर जाणारे माझे अणकुचिदार बाण धनुष्यापासून

सुतीक्ष्णाग्रा मुक्ता हस्तवता मया । छादयन्तु शराः पार्थं शलभा इव पादपम् ४ शराणां पुङ्खसक्तानां मौर्व्याभिहतया दृढम् । श्रूयतां तलयोः शब्दो भेर्योराहतयोरिव ५ समाहितो हि बीभत्सुर्वर्षाण्यष्टौ च पञ्च च । जातस्नेहश्च युद्धेऽस्मिन्मयि संप्रहरिष्यति ६ पात्रीभूतश्च कौन्तेयो ब्राह्मणो गुणवानिव । शरौघान्प्रतिगृह्णातु मया मुक्तान्सहस्रशः ७ एष चैव महेष्वासस्त्रिषु लोकेषु विश्रुतः । अहं चापि नरश्रेष्ठादर्जुनान्नावरः क्वचित् ८ इतश्चेतश्च निर्मुक्तैः काञ्चनैर्गार्ध्रवाजितैः । दृश्यतामद्य वै व्योम खद्योतैरिव संवृतम् ९ अद्याहमृणमक्षय्यं पुरा वाचा प्रतिश्रुतम् । धार्तराष्ट्राय दास्यामि निहत्य समरेऽर्जुनम् १० अन्तरा छिद्यमानानां पुङ्खानां व्यतिशीर्यताम् । शलभानामिवाकाशे प्रचारः संप्रदृश्यताम् ११ इन्द्राशनिसमस्पर्शं महेन्द्रसमतेजसम् । अर्दयिष्याम्यहं पार्थमुल्काभिरिव कुञ्जरम् १२ रथादतिरथं शूरं सर्वशस्त्रभृतां वरम् । विवशं पार्थमादास्ये गरुत्मानिव

सुटून जाऊं लागले असतां व्यर्थ जाणार नाहींत ३. सुवर्णपुंख आणि अत्यंत तीक्ष्ण अग्रें ह्यांनीं युक्त असलेले बाण हस्तलाघवानें युक्त असलेल्या माझ्या हातून सुटून वृक्षाला व्यापून टाकणाऱ्या टोळांप्रमाणें अर्जुनाला व्यापून टाकितील ४. ज्यांचे पुंख निश्चल बसलेले आहेत अशा शरांचा आणि आकर्षण केलेल्या प्रत्यंचेचे तडाके बसल्यामुळें वाजविलेल्या दुंदुभींप्रमाणें माझ्या हस्ततलाचा शब्द आज अर्जुनाच्या कानावर पडूं दे ५. आठ आणि पांच तेरा वर्षेंपर्यंत स्वस्थ बसल्यामुळें ह्या युद्धाविषयीं उत्सुक झालेला कुंतीपुत्र माझ्यावर प्रहार करील ६. गुणवान् ब्राह्मणाप्रमाणें सत्पात्र असलेला हा कुंतीपुत्र अर्जुन माझ्या हातांतून सुटलेल्या हजारों बाणसमुदायांचा आज प्रतिग्रह करील ७. हा महाधनुर्धारी अर्जुन त्रैलोक्यामध्यें प्रख्यात आहे आणि मीही पुरुषश्रेष्ठ अर्जुनापेक्षां मुळींच कमी नाहीं ८. गृध्रपक्ष्याचे पंख आणि सुवर्णवर्ण ह्यांनीं युक्त अशा चोहोंकडून सुटलेल्या बाणांनीं आज आकाश काजव्यांनीं व्याप्त झाल्याप्रमाणें दिसूं लागेल ९. समरांगणामध्यें अर्जुनाचा वध करून, पूर्वीं देईन ह्मणून कबूल केलेल्या, अक्षय्य ऋणाची मी आज फेड करीन १०. मध्येंच तुटून जाऊं लागल्यामुळें गळून पडणाऱ्या पिच्छयुक्त बाणप्रदेशांचा संचार टोळांच्या संचाराप्रमाणें आज आकाशामध्यें दृष्टीं पडेल ११. उल्कांच्या योगानें ज्याप्रमाणें गजाला त्रस्त करून सोडीत असतात त्याप्रमाणें इंद्राच्या वज्रासारिखा ज्याचा स्पर्श कठीण आहे आणि ज्याचें तेज महेंद्रासारिखें आहे त्या अर्जुनाला मी त्रस्त करून सोडीन १२. गरुडपक्षी ज्याप्रमाणें सर्पाला घेऊन जातो त्याप्रमाणें सर्व शस्त्रधारण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ

पन्नगम् १३ तमग्निमिव दुर्धर्षमसिशक्तिशरेन्धनम् । पाण्डवाग्निमहं दीप्तं प्रदहन्तमिवाहितम् १४ अश्ववेगपुरोवातो रथौघस्तनयित्नुमान् । शरधारो महामेघः शमयिष्यामि पाण्डवम् १५ मत्कार्मुकविनिर्मुक्ताः पार्थमाशीविषोपमाः । शराः समभिसर्पन्तु वल्मीकमिव पन्नगाः १६ सुतेजनै रुक्मपुङ्खैः सुधौतैर्नतपर्वभिः । आचितं पश्य कौन्तेयं कर्णिकारैरिवाचलम् १७ जामदग्न्यान्मया ह्यस्त्रं यत्प्राप्तमृषिसत्तमात् । तदुपाश्रित्य वीर्यं च युध्येयमपि वासवम् १८ ध्वजाग्रे वानरस्तिष्ठन्भल्लेन निहतो मया । अद्यैव पततां भूमौ विनदन्भैरवान्रवान् १९ शत्रोर्मया विपन्नानां भूतानां ध्वजवासिनाम् । दिशः प्रतिष्ठमानानामस्तु शब्दो दिवङ्गमः २० अद्य दुर्योधनस्याहं शल्यं हृदि चिरस्थितम् । समूलमुद्धरिष्यामि बीभत्सुं पातयन्रथात् २१ हताश्वं विरथं पार्थं पौरुषे पर्यवस्थितम् । निःश्वसन्तं यथा नागमद्य पश्यन्तु कौरवाः २२ कामं गच्छन्तु कुरवो धनमादाय केवलम् । रथेषु वापि तिष्ठन्तो युद्धं पश्यन्तु मामकम् २३ [१५००] इति श्रीमहाभारते

असलेल्या अतिरथी शूर अर्जुनाला जर्जर करून मी रथावरून खालीं ओढीन १३. खड्ग, शक्ति आणि बाण ह्या इंधनांनीं युक्त, शत्रुदाहक, दुःसह व प्रदीप्त अशा पांडुपुत्ररूप अग्नीला, अश्ववेगरूप पूर्ववायु रथघोषरूप गर्जना आणि बाणरूप धारा ह्यांनीं युक्त असलेला मी महामेघ शांत करून टाकीन १४, १५. वारुळाकडे ज्याप्रमाणें सर्प जात असतात त्याप्रमाणें माझ्या धनुष्यापासून सुटलेले सर्पतुल्य बाण अर्जुनाकडे जातील १६. कर्णिकार वृक्षांनीं व्याप्त झालेल्या पर्वताप्रमाणें उत्कृष्ट पातीं, सौवर्णपिच्छयुक्त प्रदेश आणि अणकुचिदार टोंकें ह्यांनीं युक्त असलेल्या व उत्तम पाणी दिलेल्या बाणांनीं व्याप्त झालेला कुंतीपुत्र अर्जुन आज पहा १७. जमदग्निपुत्र ऋषिश्रेष्ठ परशुरामापासून जें अस्त्र मला प्राप्त झालें आहे त्याचा व स्वसामर्थ्याचा आश्रय करून मी इंद्राशींही युद्ध करीन १८. अर्जुनाच्या ध्वजाचे अग्रभागीं उभा रहात असलेला वानर मीं सोडिलेल्या भल्ल बाणाचा तडाका बसून आजच भयंकर शब्द करीत करीत भूमीवर पडेल १९. शत्रूच्या ध्वजावर असलेलीं भूतें माझ्या हातून स्थानभ्रष्ट होऊन वाट फुटेल तिकडे धांवूं लागलीं असतां त्यांचा आर्त ध्वनि आज स्वर्गापर्यंत ऐकूं जाईल २०. रथापासून अर्जुनाला खालीं पाडतां पाडतां मी दुर्योधनाच्या हृदयामध्यें पुष्कळ दिवसपर्यंत खिळून राहिलेलें शल्य मुळासकट आज उपटून टाकीन २१. पराक्रमाच्या घमेंडींत असलेला हा कुंतीपुत्र अर्जुन अश्वांचा वध होऊन विरथ झाला आहे आणि भुजंगाप्रमाणें सुस्कारे टाकीत पडला आहे असें आज कौरवांच्या दृष्टीं पडेल २२. कौरवांनीं गोधन घेऊन खुशाल निघून जावें

शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तर-
गोग्रहे कर्णविकत्थनेऽष्टचत्वारिंशोऽध्यायः ॥ ४८ ॥

कृप उवाच ॥ सदैव तव राधेय युद्धे क्रूरतरा मतिः । नार्थानां प्रकृतिं वेत्सि नानुबन्धमवेक्षसे १ नया हि बहवः सन्ति शास्त्रमाश्रित्य चिन्तिताः । तेषां युद्धं तु पापिष्ठं वेदयन्ति पुराविदः २ देशकालेन संयुक्तं युद्धं विजयदं भवेत् । हीनकालं तदेवेह फलं न लभते पुनः ३ देशे काले च विक्रान्तं कल्याणाय विधीयते ४ आनुकूल्येन कार्याणामन्तरं संविधीयते । भारं हि रथकारस्य न व्यवस्यन्ति पण्डिताः ५ परिचिन्त्य तु पार्थेन संनिपातो न नः क्षमः । एकः कुरूनभ्यगच्छदेकश्चाग्निमतर्पयत् ६

अथवा रथावर केवळ उभें राहून माझें युद्ध अवलोकन करावें २३. ह्याप्रमाणें महर्षि-व्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वांपैकीं उत्तरगो-ग्रहणसंबंधीं कर्णाच्या आत्मप्रशंसाविषयीं अठ्ठेचाळिसावा अध्याय समाप्त झाला ॥४८॥

कृपाचार्य ह्मणतातः— हे राधापुत्रा, युद्धासंबंधानें नेहमींच तुझी मति अतिशय क्रूर असते. कार्याचें स्वरूप तूं लक्ष्यांत घेत नाहींस आणि परिणामाकडेही दृष्टि देत नाहींस १. शास्त्राला अनुसरून अनेक उपायांचा विचार केलेला आहे; परंतु, त्या सर्वां-मध्यें युद्ध अतिशयच वाईट आहे असें पुराणवेत्ते समजत असतात २. योग्य ठिकाण आणि योग्य समय असेल तरच युद्ध विजयप्रद होतें आणि कालाची अनुकूलता नसेल तर तेंच युद्ध निष्फळ होऊन जातें ३. योग्य ठिकाणीं आणि योग्य वेळीं केलेला पराक्रम आपल्या कल्याणाला कारणीभूत होतो ४. देश व काल ह्यांची अनु-कूलता असेल तरच कार्यें सफळ होत असतात. सुतारावर विश्वास ठेवून कोणीही समंजस पुरुष दिग्विजय करण्यास उद्युक्त होत नाहींत. (सारांश, आपल्याला कांहीं फायदा होण्या-करितां सुतार रथ तयार करून आणीत असतो आणि " हा मोठा बळकट दिव्य रथ मीं तयार केला आहे. ह्या रथामध्यें आरूढ होऊन संग्रामामध्यें जाणारा पुरुष देवांनाही सर्वस्वीं जिंकील " अशा प्रकारची कांहींतरी प्रशंसा करून तो रथ कोणाच्या तरी गळ्यांत बांधण्याचें तो पहात असतो. परंतु, सुताराच्या ह्या बोलण्यावर विश्वास ठेवून ज्याप्रमाणें समंजस पुरुष त्या रथाच्या जोरावर दिग्विजय करण्यास उद्युक्त होत नाहींत त्याचप्रमाणें तुझ्या ह्या वल्गनांवर विश्वास ठेवून कोणीही समंजस योद्धे अशा ठिकाणीं आणि ह्या उन्हाळ्याच्या दिवसांत तुझ्या नादीं लागून अर्जुनाशीं युद्ध कर-ण्यास तयार होणार नाहींत) ५. तात्पर्य, विचार करून पाहिलें असतां सांप्रत अर्जुनाशीं आह्मांला युद्धप्रसंग करणें योग्य होणार नाहीं. अहो, हा एकटा कौरवांवर

एकश्च पञ्च वर्षाणि ब्रह्मचर्यमधारयत् । एकः सुभद्रामारोप्य
द्वैरथे कृष्णमाह्वयत् ७ एकः किरातरूपेण स्थितं रुद्रमयोधयत् ।
अस्मिन्नेव वने पार्थो हृतां कृष्णामवाजयत् ८ एकश्च पञ्च वर्षाणि
शक्रादस्त्राण्यशिक्षत । एकः सोयमरिं जित्वा कुरूणामकरोद्यशः ९ एको
गन्धर्वराजानं चित्रसेनमरिन्दमः । विजिग्ये तरसा सङ्ख्ये सेनां प्राप्य
सुदुर्जयाम् १० तथा निवातकवचाः कालखञ्जाश्च दानवाः । दैवतैरप्य-
वध्यास्ते एकेन युधि पातिताः ११ एकेन हि त्वया कर्ण किं नामेह
कृतं पुरा । एकैकेन यथा तेषां भूमिपाला वशे कृताः १२ इन्द्रोपि हि
न पार्थेन संयुगे योद्धुमर्हति । यस्तेनाशंसते योद्धुं कर्तव्यं तस्य भेषजम् १३
आशीविषस्य क्रुद्धस्य पाणिमुद्यम्य दक्षिणम् । अवमुच्य प्रदेशिन्या दंष्ट्रा-
मादातुमिच्छसि १४ अथवा कुञ्जरं मत्तमेक एव चरन्वने । अनङ्कुशं
समारुह्य नगरं गन्तुमिच्छसि १५ समिद्धं पावकं चैव घृतमेदोवसाहुतम् ।

चाल करून आलेला आहे; एकट्यानेंच खांडव वनामध्यें अग्नीला तृप्त केलें आहे ६; एकट्यानेंच पांच वर्षेंपर्यंत ब्रह्मचर्य धारण केलें आहे; सुभद्रेला रथावर घालून कोणी साहाय्यकर्ता नसतांना ह्यानें कृष्णालाही द्वैरथयुद्धाकरितां आह्वान केलेलें आहे ७; किरातवेष धारण करून आलेल्या रुद्राशीं ह्यानें एकट्यानेंच युद्ध केलें आहे; ह्याच वनामध्यें जयद्रथानें हरण करून नेलेल्या द्रौपदीला ह्यानें परत जिंकिलें ८; पांच वर्षें एकटा राहून ह्यानेंच इंद्रापासून अस्त्रें प्राप्त करून घेतलीं आहेत; शत्रूला जिंकून कौरवांचें नांव एकटा असतांनाच ह्यानें गाजविलें आहे ९; संग्रामामध्यें जिंक-ण्यास अत्यंत दुर्घट अशी सेना प्राप्त झाली असतांही गंधर्वराज चित्रसेनाला ह्यानें एकट्यानेंच स्वपराक्रमानें पराजित केलें आहे १०; आणि देवांनाहीं अवध्य असे जे निवातकवच व कालखंज दानव त्यांचाही ह्यानें युद्धामध्यें एकट्यानेंच वध केला आहे ११. परंतु, हे कर्णा, त्या पांडवांपैकीं ज्याप्रमाणें एकेकट्यानें राजे जिंकिले आहेत त्याप्रमाणें एकट्यानें असें आजपर्यंत तरी तूं काय बरें केलें आहेस ? १२. अरे, संग्रामामध्यें अर्जुनाशीं युद्ध करण्याची इंद्राचीही योग्यता नाहीं. तेव्हां असें असतांना त्याच्याशीं युद्ध करण्याची जो हांव धरितो त्या(चें मस्तक ताळ्यावर आण-ण्याकरितां त्या)ला कांहीं तरी औषधोपचारच करणें अवश्य आहे १३. अरे, उजवा हात वर करून अर्जुनाकडे युद्धाविषयीं बोट दाखविणारा तूं क्रुद्ध झालेल्या सर्पाच्या मुखांत बोट घालून त्याची दाढ बाहेर काढण्याचें मनांत आणीत आहेस १४; अथवा वनामध्यें एकटाच संचार करणारा तूं अंकुशाशिवाय मत्त

घृताक्तश्चीरवासास्त्वं मध्येनोत्सर्तुमिच्छसि १६ आत्मानं कः समुद्बध्य
कण्ठे बध्वा महाशिलाम् । समुद्रं तरते दोर्भ्यां तत्र किं नाम पौरुषम् १७
अकृतास्त्रः कृतास्त्रं वै बलवन्तं सुदुर्बलः । तादृशं कर्ण यः पार्थं योद्धुमि-
च्छेत्स दुर्मतिः १८ अस्माभिर्ह्येष निकृतो वर्षाणीह त्रयोदश । सिंहः पाशवि-
निर्मुक्तो न नः शेषं करिष्यति १९ एकान्ते पार्थमासीनं कूपेऽग्निमिव संवृतम् ।
अज्ञानादभ्यवस्कन्द्य प्राप्ताः स्मो भयमुत्तमम् २० सह युध्यामहे पार्थमागतं
युद्धदुर्मदम् । सैन्यास्तिष्ठन्तु संनद्धा व्यूढानीकाः प्रहारिणः २१ द्रोणो
दुर्योधनो भीष्मो भवान्द्रौणिस्तथा वयम् । सर्वे युध्यामहे पार्थं कर्ण मा
साहसं कृथाः २२ वयं व्यवसितं पार्थं वज्रपाणिमिवोद्धतम् । षड्रथाः
प्रतियुध्येम तिष्ठेम यदि संहताः २३ व्यूढानीकानि सैन्यानि यत्ताः परम-
धन्विनः । युध्यामहेऽर्जुनं सङ्ख्ये दानवा इव वासवम् २४ [१५२४] इति

गजावर आरूढ होऊन नगराला जाण्याची इच्छा धरीत आहेस ! १५. अरे, शरीराला वस्त्रें गुंडाळून वर तूप ओतलेला असा तूं घृत, मेद व वसा घालून प्रदीप्त केलेल्या अग्नीच्या मधून जाण्याचें मनांत आणीत आहेस १६. अरे, स्वतःला बांधून घेऊन आणि गळ्यांत एक मोठा धोंडा बांधून समुद्रांतून पोहून जाण्याचें कोण बरें मनामध्यें आणणार आहे ! आणि तसें करण्यांत पराक्रम तो काय आहे ? १७. हे कर्णा, अर्जुनाशीं युद्ध करण्याची जो इच्छा करीत असेल तो बलाढ्य व अस्त्रनिपुण पुरुषाशीं युद्ध करण्याची इच्छा करणाऱ्या अस्त्रविद्यारहित व अत्यंत दुर्बल अशा पुरुषाप्रमाणें अविचारी होय १८. तेरा वर्षेंपर्यंत आह्मीं घालवून दिलेला हा सिंह पाशांतून सुटून आतां येथें आला आहे; हा आतां आह्मांपैकीं कोणालाही शिलक ठेवणार नाहीं १९. कूपामध्यें झांकून राहिलेल्या अग्नीप्रमाणें गुप्त ठिकाणीं राहिलेल्या अर्जुनाशीं न समजतां प्रसंग पडल्यामुळें आह्मांला पराकाष्ठेचें भय प्राप्त झालें आहे २०. जो युद्धामध्यें जेरीस येणें शक्य नाहीं अशा ह्या आलेल्या अर्जुनाशीं आह्मी सर्व मिळून युद्ध करूं. ह्यास्तव, सर्व सैन्यें तयार असूं द्या आणि योद्धेही आपआपले सैनिक व्यवस्थित उभे करून सज्ज असूं द्या २१. द्रोण, दुर्योधन, भीष्म, तूं , द्रोणपुत्र अश्वत्थामा आणि आह्मी असे सर्व मिळून अर्जुनाशीं युद्ध करूं. हे कर्णा, तूं साहस करूं नको २२. वज्रपाणि इंद्राप्रमाणें युद्धार्थ उद्युक्त होऊन निश्चयानें आलेल्या अर्जुनाशीं आह्मी सहा रथी एकत्र जुळून राहिलों तरच युद्ध करण्यास समर्थ होऊं २३. ह्यास्तव, सैन्यें व्यवस्थित उभीं करा आणि मोठे मोठे धनुर्धारी सज्ज असूं द्या; ह्मणजे इंद्राशीं युद्ध करणाऱ्या

श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे कृपवाक्यं नामैकोनपञ्चाशत्तमोऽध्यायः ॥ ४९ ॥

अश्वत्थामोवाच ॥ न च तावज्जिता गावो न च सीमान्तरं गताः । न हास्तिनपुरं प्राप्तास्त्वं च कर्ण विकत्थसे १ सङ्ग्रामांश्च बहूञ्जित्वा लब्ध्वा च विपुलं धनम् । विजित्य च परां सेनां नाहुः किंचन पौरुषम् २ दहत्यग्निरवाक्यस्तु तूष्णीं भाति दिवाकरः । तूष्णीं धारयते लोकान्वसुधा सचराचरान् ३ चातुर्वर्ण्यस्य कर्माणि विहितानि स्वयंभुवा । धनं यैरधिगन्तव्यं यच्च कुर्वन्न दुष्यति ४ अधीत्य ब्राह्मणो वेदान्याजयेत यजेत वा । क्षत्रियो धनुराश्रित्य यजेच्चैव न याजयेत् ५ वैश्योऽधिगम्य वित्तानि ब्रह्मकर्माणि कारयेत् । शूद्रः शुश्रूषणं कुर्यात्त्रिषु वर्णेषु नित्यशः ॥ वन्दनायोगविधिभिर्वैतसीं वृत्तिमास्थितः ६ वर्तमाना यथाशास्त्रं प्राप्य चापि

दानवांप्रमाणें आह्मी संग्रामामध्यें (सर्व मिळून) अर्जुनाशीं युद्ध करूं २४. ह्याप्रमाणें महर्षि व्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वांपैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं कृपाचार्यांच्या भाषणाविषयीं एकुणपन्नासावा अध्याय समाप्त झाला॥ ४९॥

अश्वत्थामा ह्मणतोः—अरे, गाई अजून पुरत्या जिंकिल्याही नाहींत व त्या हास्तिनपुराला जाऊन पोंचल्याही नाहींत. इतकेंच नव्हे; परंतु, अद्यापि त्या सीमा उल्लंघूनही गेल्या नाहींत. परंतु, हे कर्णा, तूं इतक्यांतच आत्मप्रशंसा करीत सुटला आहेस १. अनेक संग्राम जिंकून विपुल धन मिळविलें असतां आणि प्रचंड सेनेचा पराजय केला असतांही शूर पुरुष स्वपराक्रमाविषयीं मुळींच वाच्यता करीत नाहींत २. अग्नि कांहींएक न बोलतांच दग्ध करीत असतो; सूर्य स्वस्थ राहूनच प्रकाशत असतो आणि पृथ्वीही कांहींएक न बोलतांनाच चराचर लोक धारण करीत असते ३. (परंतु, तुझ्याकडे हा दोष नाहीं; भलत्यानेंच काम भलत्यानें केलें ह्मणजे असा प्रकार व्हावयाचाच. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ह्या) चारी वर्णांचीं कर्मै कोणतीं हें ब्रह्मदेवानें ठरविलें आहे. अरे, द्रव्य संपादन करणें हेंच ज्या वैश्यांचें विहित कर्म आहे त्यांनीं तेंच केलें पाहिजे आणि तेंच कर्म जर (तुझ्यासारिखा) वैश्य करील तर त्याला दोष लागणार नाहीं ४. ब्राह्मणानें वेदाध्ययन करून यजन करावें अथवा याजनहीं करावें; परंतु, क्षत्रियानें धनुर्वेदाचा आश्रय करून नुसतें यजनच करावें; याजन करूं नये ५. वैश्यानें संपत्ति मिळवून ब्रह्मकर्मै करवावीं आणि शूद्रानें नम्रवृत्ति धारण करून वंदन व आज्ञापरिपालन ह्यांच्या योगानें वरील तीन वर्णांची नेहमीं शुश्रूषा करावी ६. शास्त्राला अनुसरून

महीमिमाम् । सत्कुर्वन्ति महाभागा गुरून्सुविगुणानपि ७ प्राप्य द्यूतेन को राज्यं क्षत्रियस्तोष्टुमर्हति । तथा नृशंसरूपायं धार्तराष्ट्रश्च निर्घृणः ८ तथाधिगम्य वित्तानि को विकत्थेद्विचक्षणः । निकृत्या वञ्चनायोगैश्चरन्वैतंसिको यथा ९ कतमं द्वैरथं युद्धं यत्राजैषीर्धनञ्जयम् । नकुलं सहदेवं वा धनं येषां त्वया हृतम् १० युधिष्ठिरो जितः कस्मिन्भीमश्च बलिनां वरः । इन्द्रप्रस्थं त्वया कस्मिन्सङ्ग्रामे निर्जितं पुरा ११ तथैव कतमद्युद्धं यस्मिन्कृष्णा जिता त्वया । एकवस्त्रा सभां नीता दुष्टकर्मन्रजस्वला १२ मूलमेषां महत्कृत्तं सारार्थी चन्दनं यथा । कर्मकारयिथाः सूत तत्र किं विदुरोऽब्रवीत् १३ यथाशक्ति मनुष्याणां शममालक्षयामहे । अन्येषामपि सत्त्वानामपि कीटपिपीलिकैः १४ द्रौपद्याः संपरिक्लेशं न क्षन्तुं पाण्डवोऽर्हति । क्षयाय धार्तराष्ट्राणां प्रादुर्भूतो धनञ्जयः १५ त्वं पुनः पण्डितो

मागणाऱ्या महाभाग्यवान् पुरुषांना ही पृथ्वी जरी प्राप्त झाली तरी आपल्या गुणरहित असलेल्याही गुरुजनांचा ते सत्कार करीत असतात. (परंतु, तूं अन्यायानें पांडवांना जिंकून सज्जन असलेल्याही आपल्या गुरूंची निंदा करीत आहेस ह्याला काय ह्मणावें !) ७. अहो, द्यूतानें राज्य मिळवून कोण बरें क्षत्रिय स्तुतीला पात्र होणार आहे ? परंतु, हा धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन तशाप्रकारचा दुष्ट असूनही निर्लज्ज आहे ८. अहो, व्याधाप्रमाणें कपटयुक्त उपायांनीं आणि शठपणानें संपत्ति मिळवून कोण बरें विचारी पुरुष आत्मप्रशंसा करील ? ९. ज्यामध्यें तूं अर्जुनाला, नकुलाला आणि सहदेवाला जिंकून त्यांचें धन हरण केलेंस असें द्वैरथ युद्ध तरी कोणतें ? १०. अरे, पूर्वी तूं युधिष्ठिर आणि बलवानांमध्यें श्रेष्ठ भीमसेन ह्यांचा कोणत्या संग्रामामध्यें पराजय केलास आणि कोणत्या युद्धामध्यें तूं त्यांचें इंद्रप्रस्थ पूर्वी जिंकून आणिलेंस ? ११. त्याचप्रमाणें, हे पापकर्म करणाऱ्या कर्णा, रजस्वला आणि ह्मणूनच एकवस्त्रा असलेली द्रौपदी ज्या युद्धामध्यें तूं जिंकून सभेमध्यें आणिलीस तें युद्ध तरी कोणतें ? १२. हे सूता कर्णा, चंदन तोडून टाकणाऱ्या धनलोभी पुरुषाप्रमाणें ह्यांच्या मुख्य आधारावरच कुऱ्हाड घालून जेव्हां तूं त्यांना दासाप्रमाणें केलेंस तेव्हां विदुर काय ह्मणाला आहे ह्याची आठवण असूं दे. (द्यूत नाशाचें मूळ आहे हें त्यानें तेव्हांच सांगून ठेविलें आहे) १३. मनुष्यांचीच गोष्ट नव्हे परंतु, अगदीं किडे, मुंग्या सुद्धां इतर प्राणी देखील कांहीं विवक्षित मर्यादे बाहेर दुःख सहन करीत नाहींत असें आह्मी पहातों १४. तस्मात् , द्रौपदीला झालेले पराकाष्ठेचे क्लेश कोणत्याही पांडुपुत्राला सहन होणार नाहींत. अरे, धृतराष्ट्रपुत्रांचा नाश करण्याकरितां अर्जुन प्रगट झाला आहे १५

भूत्वा वाचं वक्तुमिहेच्छसि । वैरान्तकरणो जिष्णुर्न नः शेषं करिष्यति १६
नैष देवान्न गन्धर्वान्नासुरान्न च राक्षसान् । भयादिह न युध्येत कुन्ती-
पुत्रो धनञ्जयः १७ यं यमेषोतिसंक्रुद्धः सङ्ग्रामे निपतिष्यति । वृक्षं
गरुत्मान्वेगेन विनिहत्य तमेष्यति १८ त्वत्तो विशिष्टं वीर्येण धनुष्य-
मरराट्समम् । वासुदेवसमं युद्धे तं पार्थं को न पूजयेत १९ दैवं दैवेन
युध्येत मानुषेण च मानुषम् । अस्त्रं ह्यस्त्रेण यो हन्यात्कोर्जुनेन
समः पुमान् २० पुत्रादनन्तरं शिष्य इति धर्मविदो विदुः । एतेनापि
निमित्तेन प्रियो द्रोणस्य पाण्डवः २१ यथा त्वमकरोर्द्यूतमिन्द्रप्रस्थं यथा-
हरः । यथानैषीः सभां कृष्णां तथा युध्यस्व पाण्डवम् २२ अयं ते
मातुलः प्राज्ञः क्षत्रधर्मस्य कोविदः । दुर्द्यूतदेवी गान्धारः शकुनिर्युध्य-
तामिह २३ नाक्षान्क्षिपति गाण्डिवं न कृतं द्वापरं न च । ज्वलतो निशि-
तान्बाणांस्तांस्तान्क्षिपति गाण्डिवम् २४ न हि गाण्डीवनिर्मुक्ता गार्ध्रपक्षाः

आणि तूं आपला पंडित बनून अशा प्रसंगीं सुद्धां वक्तृत्व झोडण्याची इच्छा करीत आहेस. वैराचा अंत करणारा अर्जुन आह्मांपैकीं कोणालाही शिलक ठेवणार नाहीं १६. हा कुंतीपुत्र धनंजय देव, गंधर्व, असुर आणि राक्षस ह्यांपैकीं कोणाशींही भीतीनें युद्ध करण्यास कचरणार नाहीं १७. गरुड ज्याप्रमाणें वेगानें वृक्ष उलथून चालता होतो त्याप्रमाणें संग्रामामध्यें ज्याची ज्याची गांठ पडेल त्याचा त्याचा, हा अतिक्रुद्ध झालेला अर्जुन वध करून चालता होईल १८. तुझ्यापेक्षां जो वीर्यानें अधिक आहे आणि धनुर्विद्येमध्यें इंद्राची बरोबरी करणारा असून युद्धांत ज्याचें वासु-देवाशीं साम्य आहे त्या कुंतीपुत्र अर्जुनाची कोण बरें प्रशंसा करणार नाहीं ? १९. देवांशीं दैवयुद्धानें आणि मनुष्यांशीं मनुष्ययुद्धानेंच संग्राम करणारा व प्रतिपक्षाकडून अस्त्रप्रयोग झाला तरच अस्त्रप्रयोग करणारा जो अर्जुन त्याच्याशीं बरोबरी करणारा पुरुष कोण बरें आहे ? २०. पुत्राच्या खालोखाल शिष्यच आहे असें धर्मवेत्ते ह्मण-तात. ह्मणून ह्याही कारणानें पांडुपुत्र अर्जुन द्रोणाचार्यांना प्रिय आहे २१. अरे, ज्याप्रमाणें तूं द्यूत केलेंस, ज्याप्रमाणें इंद्रप्रस्थ हरण केलेंस आणि ज्याप्रमाणें द्रौपदीला सभेमध्यें आणिलीस त्याचप्रमाणें आतां (मागें न घेतां) पांडुपुत्र अर्जुनाशीं युद्ध कर २२. हा तुझा शहाणा सुरता मामा क्षात्रधर्मामध्यें पंडित आहे. तस्मात्, दुष्ट द्यूत करणाऱ्या ह्या गंधारराज शकुनीचें येथें अर्जुनाशीं युद्ध होऊं दे २३. अर्जुनाचें गांडीव धनुष्य फांसे टाकीत नाहीं. फांशांत ज्याप्रमाणें दोन अथवा चार पडतात त्याप्रमाणें गांडीवापासून चार अथवा दोन पडत नाहींत. अर्जुनाचें गांडीव धनुष्य नानाप्रकारचे

सुतेजनाः । नान्तरेष्ववतिष्ठन्ते गिरीणामपि दारणाः २५ अन्तकः पवनो मृत्युस्तथाग्निर्वडवामुखः । कुर्युरेते क्वचिच्छेषं न तु क्रुद्धो धनंजयः २६ यथा सभायां द्यूतं त्वं मातुलेन सहाकरोः । तथा युध्यस्व सङ्ग्रामे सौबलेन सुरक्षितः २७ युध्यन्तां कामतो योधा नाहं योत्स्ये धनंजयम् । मत्स्यो ह्यस्माभिरायोध्यो यद्यागच्छेद्गवां पदम् २८[१५५२]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे द्रौणिवाक्यं नाम पञ्चाशत्तमोऽध्यायः ॥ ५० ॥

भीष्म उवाच ॥ साधु पश्यति वै द्रौणिः कृपः साध्वनुपश्यति । कर्णस्तु क्षत्रधर्मेण केवलं योद्धुमिच्छति १ आचार्यो नाभिवक्तव्यः पुरुषेण विजानता । देशकालौ तु संप्रेक्ष्य योद्धव्यमिति मे मतिः २ यस्य सूर्यसमाः पञ्च सपत्नाः स्युः प्रहारिणः । कथमभ्युदये तेषां न प्रमुह्येत पण्डितः ३ स्वार्थे सर्वे विमुह्यन्ति येऽपि धर्मविदो जनाः । तस्माद्राजन्ब्रवीम्येष वाक्यं

तीक्ष्ण व उज्ज्वल बाणच फेंकीत असतें २४. गृध्रपक्ष्याच्या पंखांनीं युक्त असलेले आणि उत्कृष्टरीतीनें घांसलेले असे जे गांडीव धनुष्यापासून सुटलेले बाण ते पर्वतांनाही विदीर्ण करणारे आहेत ; मग युद्धांत ते बाण मध्यें अडकून रहाण्याची गोष्ट पाहिजे कशाला २५. यम, वायु, मृत्यु आणि वडवानल अग्नि ह्यांच्या हातून सुद्धां कदाचित् एकादा सुटेल; परंतु, क्रुद्ध झालेल्या धनंजयाच्या हातून कोणीही शिलक रहणार नाहीं २६. अरे मातुलाचें साहाय्य घेऊन ज्याप्रमाणें तूं सभेमध्यें द्यूत केलेंस त्याप्रमाणें, आतांही शकुनीच तुझें रक्षण करीत असतांना तूं संग्रामामध्यें युद्ध कर २७. इतर योध्यांची इच्छा असेल तर त्यांनीं युद्ध करावें; मी धनंजयाशीं युद्ध करणार नाहीं. गाईंच्या मागोमाग जर मत्स्यराज विराट आला तर त्याच्याशीं आह्मांला युद्ध केलें पाहिजे २८. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं द्रोणपुत्र अश्वत्थाम्याच्या भाषणाविषयीं पन्नासावा अध्याय समाप्त झाला ॥ ५० ॥

भीष्म ह्मणतातः—द्रोणपुत्र अश्वत्थाम्याचा विचार योग्य आहे आणि कृपाचार्यांचीही दृष्टि बरोबर आहे; परंतु, कर्ण क्षत्रधर्मानें केवल युद्ध करण्याचीच इच्छा धरीत आहे १. समंजस पुरुषानें आचार्यांना दोष लावणें योग्य नव्हे. देश व काल लक्ष्यांत घेऊनच युद्ध करावें असें मला वाटतें २. सूर्यासारिखे पांच योद्धे ज्याचे द्वेष्टे आहेत तो जर विचारी असेल तर त्या शत्रूंचा अभ्युदय झाला असतां तो कसा बरें गोंधळल्यावांचून राहील ? ३. धर्मवेत्ते लोक जरी असले तरी स्वार्थाविषयीं सर्वही

ते यदि रोचते ४ कर्णो हि यद्वोचत्त्वां तेजःसंजननाय तत् । आचार्यपुत्रः क्षमतां महत्कार्यमुपस्थितम् ५ नायं कालो विरोधस्य कौन्तेये समुपस्थिते । क्षन्तव्यं भवता सर्वमाचार्येण कृपेण च ६ भवतां हि कृतास्त्रत्वं यथादित्ये प्रभा तथा ७ यथा चन्द्रमसो लक्ष्मीः सर्वथा नापकृष्यते । एवं भवत्सु ब्राह्मण्यं ब्रह्मास्त्रं च प्रतिष्ठितम् ८ चत्वार एकतो वेदाः क्षात्रमेकत्र दृश्यते । नैतत्समस्तमुभयं कस्मिंश्चिदनुशुश्रुम ९ अन्यत्र भारताचार्यात्सपुत्रादिति मे मतिः। वेदान्ताश्च पुराणानि इतिहासं पुरातनम् १० जामदग्न्यमृते राजन्को द्रोणादधिको भवेत् । ब्रह्मास्त्रं चैव वेदाश्च नैतदन्यत्र दृश्यते ११ आचार्यपुत्रः क्षमतां नायं कालो विभेदने । सर्वे संहत्य युध्यामः पाकशासनिमागतम् १२ बलस्य व्यसनानीह यान्युक्तानि मनीषिभिः । मुख्यो भेदो हि तेषां तु पापिष्ठो विदुषां मतः १३ अश्वत्थामोवाच ॥ नैव न्याय्यमिदं वाच्यमस्माकं पुरुषर्षभ । किं तु रोषपरीतेन गुरुणा भाषिता

गोंधळून जातात. तस्मात्, हे राजा, माझें ह्मणणें तुला रुचत असेल तर माझें तुला असें सांगणें आहे कीं ४, कर्णानें जें तुझ्याशीं भाषण केलें तें तुला धीर येण्याकरितां आहे. आचार्यपुत्रानें ह्यावेळीं क्षमाच केली पाहिजे. कारण, सांप्रत मोठेंच कार्य उपस्थित झालें आहे ५. कुंतीपुत्र अर्जुन ज्याअर्थीं प्राप्त झाला आहे त्याअर्थीं आपआपसांत कलह करण्याची ही वेळ नव्हे. ह्यास्तव, आचार्य, कृप आणि तूं ह्यांनीं सर्व भाषणांची क्षमा केली पाहिजे ६. ज्याप्रमाणें सूर्याचे ठिकाणीं प्रभा असते त्याप्रमाणें तुमचे ठिकाणीं अस्त्रपारंगतता आहे ७. कधींही क्षय न पावणारी कांति ज्याप्रमाणें चंद्राचे ठिकाणीं असते त्याप्रमाणें ब्राह्मण्य आणि ब्रह्मास्त्र हीं दोन्हींही तुमचे ठिकाणीं आहेत ८. चार वेद एके ठिकाणीं व क्षात्रतेज दुसऱ्या ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येत असतें हीं दोन्हीं पुत्रासहवर्तमान भारताचार्य द्रोण खेरीज करून पूर्णपणें कोणत्याही एका पुरुषाचे ठिकाणीं असल्याचें आमच्या ऐकण्यांत नाहीं, असें मी सांगतों वेदान्त, पुरातन इतिहास आणि पुराणें ज्यांचे ठिकाणीं आहेत ९, १० त्या द्रोणाचार्यापेक्षां, हे राजा, एक जमदग्निपुत्र परशुराम खेरीज करून कोण बरें अधिक आहे ? ब्रह्मास्त्र आणि वेद हीं दोन्हीं ह्यांच्याशिवाय कोठेंही दुसरीकडे एकत्र दृष्टीं पडत नाहींत ११. सारांश, आचार्य पुत्रानें क्षमा करावी; आपआपसांत फूट पाडण्याचा हा समय नव्हे; ह्या आलेल्या इंद्रपुत्रासहवर्तमान आपण सर्व एक होऊन युद्ध करूं १२. विचारी लोकांनीं सैन्याचे जे ह्मणून कांहीं दोष सांगितले आहेत त्यांमध्यें आपआपसांत फूट हा सर्वांतही अत्यंत निंद्य दोष असें विद्वानांचें मत आहे १३. अश्वत्थामा ह्मणतोः— हे

गुणाः १४ शत्रोरपि गुणा ग्राह्या दोषा वाच्या गुरोरपि। सर्वथा सर्वयत्नेन पुत्रे शिष्ये हितं वदेत् १५ दुर्योधन उवाच ॥ आचार्य एष क्षमतां शान्तिरत्र विधीयताम् । अभिद्यमाने तु गुरौ तद्वृत्तं शेषकारितम् १६ वैशम्पायन उवाच ॥ ततो दुर्योधनो द्रोणं क्षमयामास भारत । सह कर्णेन भीष्मेण कृपेण च महात्मना १७ द्रोण उवाच ॥ यदेतत्प्रथमं वाक्यं भीष्मः शान्तनवोब्रवीत् । तेनैवाहं प्रसन्नो वै नीतिरत्र विधीयताम् १८ यथा दुर्योधनं पार्थो नोपसर्पति सङ्गरे । साहसाद्यदि वा मोहात्तथा नीतिर्विधीयताम् १९ वनवासे ह्यनिर्वृत्ते दर्शयेन्न धनञ्जयः । धनं चालभमानोत्र नाद्य तत्क्षन्तुमर्हति २० यथा नायं समायुञ्ज्याद्धार्तराष्ट्रान्कथंचन । न च सेना पराजय्यात्तथा नीतिर्विधीयताम् २१ उक्तं दुर्योधनेनापि पुरस्ताद्वाक्यमीदृशम् । तदनुस्मृत्य गाङ्गेय यथावद्वक्तुमर्हसि २२ [१५७४] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराट-

पुरुषश्रेष्ठ, ह्या आमच्या न्याय्य भाषणाला आपण मुळींच दोष देऊं नका. रागाच्या आवेशामध्यें गुरूनीं शिष्याचे गुण सांगितले आहेत १४. शिवाय, गुण असतील ते शत्रूचेही घ्यावे, दोष गुरूचेही सांगावेत आणि हरप्रयत्नानें पुत्राला व शिष्याला सर्व प्रकारें हितकारक असेल तेंच सांगावें १५. दुर्योधन ह्मणतो:— ह्या आचार्यांनीं क्षमा केली पाहिजे आणि ह्या प्रसंगीं शांतीचेंच अवलंबन केलें पाहिजे. गुरु जर आपल्यापासून फुटून जाणारे नाहींत तर त्यांच्यासंबंधानें जें वर्तन कर्णाच्या हातून झालें आहे तें अर्थातच व्यर्थ आहे १६. वैशंपायन सांगतात:—हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, तदनंतर कर्ण, भीष्म आणि महात्मा कृप ह्यांसहवर्तमान दुर्योधनानें द्रोणाचार्यांची क्षमा मागितली १७. द्रोण ह्मणतात:— शांतनव भीष्मानें प्रथमतः जें भाषण केलें त्यानेंच मी प्रसन्न झालों आहें. आतां ह्या प्रसंगीं कांहींतरी उपाय योजिला पाहिजे १८. कुंतीपुत्र अर्जुन साहसानें ह्मणा अथवा मोहानें ह्मणा संग्रामामध्यें दुर्योधनाला गांठणार नाहीं अशी कांहींतरी युक्ति योजिली पाहिजे १९. (अज्ञातवासासहवर्तमान) वनवास पूर्ण झाल्याशिवाय धनंजय प्रकट होणार नाहीं आणि आज त्याला गोधन न मिळेल तर ह्या ठिकाणीं तो आपली उपेक्षा करणार नाहीं २०. ह्यास्तव, हा धृतराष्ट्रपुत्रांना कांहीं केलें तरी गांठणार नाहीं आणि आपल्या सेनेचा पराजय होणार नाहीं असा कांहींतरी उपाय योजा २१. सारांश, हे गंगानंदन, दुर्योधनानें जो पूर्वीं (पांडवांचा अज्ञातवास पूर्ण झाला किंवा नाहीं) अशाप्रकारचा प्रश्न विचारिला आहे तो लक्ष्यांत घेऊन आपण त्याचें

पर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे द्रोणवाक्य एकपञ्चाशत्तमोऽध्यायः ॥ ५१ ॥

भीष्म उवाच ॥ कलाः काष्ठाश्च युज्यन्ते मुहूर्ताश्च दिनानि च । अर्धमासाश्च मासाश्च नक्षत्राणि ग्रहास्तथा १ ऋतवश्चापि युज्यन्ते तथा संवत्सरा अपि । एवं कालविभागेन कालचक्रं प्रवर्तते २ तेषां कालातिरेकेण ज्योतिषां च व्यतिक्रमात् । पञ्चमे पञ्चमे वर्षे द्वौ मासावुपजायतः ३ एषामभ्यधिका मासाः पञ्च च द्वादश क्षपाः । त्रयोदशानां वर्षाणामिति मे वर्तते मतिः ४ सर्वं यथावच्चरितं यद्यदेभिः प्रतिश्रुतम् । एवमेतद्ध्रुवं ज्ञात्वा ततो बीभत्सुरागतः ५ सर्वे चैव महात्मानः सर्वे धर्मार्थकोविदाः । येषां युधिष्ठिरो राजा कस्माद्धर्मे पराङ्मुखः ६ अलुब्धाश्चैव कौन्तेयाः कृतवन्तश्च दुष्करम् । न चापि केवलं राज्यमिच्छेयुस्तेऽनुपायतः ७ तदैव ते हि विक्रान्तुमीषुः कौरवनन्दनाः । धर्मपाशनिबद्धास्तु न चेलुः क्षत्रियव्रतात् ८ यच्चानृत इति ख्यायाद्यः स गच्छेत्पराभवम् । वृणुयुर्मरणं

यथायोग्य उत्तर द्या २२. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं द्रोणाचार्यविषयक भाषणाविषयीं एकावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५१ ॥

भीष्म ह्मणतात:— कला, काष्ठा, मुहूर्त, दिवस, पक्ष, मास, नक्षत्रें, ग्रह १, ऋतु आणि संवत्सर इतक्यांची योजना कालगणनेमध्यें होत असते आणि ह्याप्रमाणें असलेल्या कालविभागानें कालचक्र चालत असतें २. कालगतीनें नक्षत्रांमध्यें अंतर पडत असल्यामुळें पांचव्या पांचव्या वर्षी दोन महिने अधिक होत असतात ३. तव्हां ह्या पांडवांचीं तेरा वर्षें संपूर्ण होऊन पांच महिने व बारा दिवस जास्तच झालेले आहेत असें मला वाटतें ४. ह्यांनीं जी जी प्रतिज्ञा केली ती ती सर्व अगदीं योग्य रीतीनें शेवटास नेली आहे आणि असाच विचार निःसंशय करून अर्जुन प्रकट झाला आहे ५. अरे, जे सर्वही महात्मे आहेत, धर्मनिर्णयाविषयीं जे सर्वही निपुण आहेत आणि युधिष्ठिर ज्यांचा राजा आहे त्यांच्या हातून धर्मसंबंधीं अपराध कोठून होणार ? ६. लोभरहित असलेल्या कुंतीपुत्रांनीं दुर्घट कृत्य केलें आहे आणि प्रथमतः सामादिउपाय योजिल्याशिवाय ते एकाएकीं केवल राज्य परत घेण्याची इच्छा कधींही करणार नाहींत ७. (अविचारानें राज्य परत मिळविण्याचा जर त्यांचा उद्देश असता) तर, हे कौरवनंदनहो, त्यावेळेंसच त्यांनीं पराक्रम करण्याचें मनामध्यें आणिलें असतें; परंतु, धर्मपाशानें बद्ध झालेले ते पांडव क्षात्रव्रतापासून ढळले नाहींत ८. पांडुपुत्र अर्जुन असत्य वागणारा

पार्था नानृतत्वं कथंचन ९ प्राप्तकाले तु प्राप्तव्यं नोत्सृजेयुर्नरर्षभाः । अपि वज्रभृता गुप्तं तथावीर्या हि पाण्डवाः १० प्रतियुध्येम समरे सर्वशस्त्रभृतां वरम् । तस्माद्यदत्र कल्याणं लोके सद्भिरनुष्ठितम् ॥ तत्संविधीयतां शीघ्रं मा वो ह्यर्थोऽभ्यगात्परम् ११ न हि पश्यामि सङ्ग्रामे कदाचिदपि कौरव । एकान्तसिद्धिं राजेन्द्र संप्राप्तश्च धनञ्जयः १२ संप्रवृत्ते तु सङ्ग्रामे भावाभावौ जयाजयौ । अवश्यमेकं स्पृशतो दृष्टमेतदसंशयम् १३ तस्माद्युद्धोचितं कर्म कर्म वा धर्मसंहितम् । क्रियतामाशु राजेन्द्र संप्राप्तश्च धनञ्जयः १४ दुर्योधन उवाच ॥ नाहं राज्यं प्रदास्यामि पाण्डवानां पितामह । युद्धोपचारिकं यत्तु तच्छीघ्रं प्रविधीयताम् १५ भीष्म उवाच ॥ अत्र या मामिका बुद्धिः श्रूयतां यदि रोचते । सर्वथा हि मया श्रेयो वक्तव्यं कुरुनन्दन १६ क्षिप्रं बलचतुर्भागं गृह्य गच्छ पुरं प्रति । ततोऽपरश्चतुर्भागो गाः समादाय गच्छतु १७ वयं

आहे असें जो ह्मणेल त्याचा नाश होईल. अरे कुंतीपुत्र पांडव मरणही मान्य करतील; असत्यपणा त्यांना संमत होणार नाहीं ९. परंतु, त्यांना जर कांहीं प्राप्त होण्याचें ठरलें असेल आणि तें प्राप्त होण्याचा समय जर आला असेल तर वज्र धारण करणाऱ्या प्रत्यक्ष इंद्रानेंही जरी तें रक्षण करून ठेविलें असलें तरी पांडव तें कधींही सोडणार नाहींत. कारण, ते तसे पराक्रमीच आहेत १०. असो. सर्व शस्त्रधारण करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ जो अर्जुन त्याच्याशीं संग्रामामध्यें आपणांला युद्ध केलें पाहिजे. तस्मात्, ह्या प्रसंगीं जें कांहीं हितावह असेल आणि जें आजपर्यंत जगतामध्यें सज्जनांनीं केलें असेल तें आतां सत्वर करा आणि आपली जी कांहीं गोष्ट असेल ती बाहेर फुटूं देऊं नका ११. हे कुरुवंशज राजाधिराज दुर्योधना, संग्रामामध्यें निश्चित जय प्राप्त होईलच असें मला कधींही वाटत नाहीं आणि धनंजय तर आला आहे १२. संग्राम उपस्थित झाला ह्मणजे अभ्युदय आणि नाश अथवा जय आणि अपजय हे एकाला निःसंशय प्राप्त होणारच १३. तस्मात्, हे राजाधिराज, युद्धाला अथवा धर्माला अनुरूप जें कांहीं कर्तव्य असेल तें सत्वर होऊं दे; धनंजय प्राप्त झाला आहे १४. दुर्योधन ह्मणतोः—हे पितामह, पांडवांना मी राज्य देणार नाहीं. आतां युद्धाला अनुसरून जें कांहीं कर्तव्य असेल तें सत्वर करा १५. भीष्म ह्मणतोः—हे कुरुनंदना, ह्यासंबंधानें माझें काय मत आहे हें रुचत असेल तर श्रवण कर. कांहीं झालें तरी मला कल्याणाचीच गोष्ट सांगितली पाहिजे १६. एक चतुर्थांश सैन्य घेऊन तूं सत्वर नगराकडे चालता हो आणि गाई

चार्धेन सैन्यस्य प्रतियोत्स्याम पाण्डवम् १८ अहं द्रोणश्च कर्णश्च अश्वत्थामा कृपस्तथा । प्रतियोत्स्याम बीभत्सुमागतं कृतनिश्चयम् १९ मत्स्यं वा पुनरायातमागतं वा शतक्रतुम् । अहमावारयिष्यामि वेलेव मकरालयम् २० वैशम्पायन उवाच ॥ तद्वाक्यं रुरुचे तेषां भीष्मेणोक्तं महात्मना । तथा हि कृतवान्राजा कौरवाणामनन्तरम् २१ भीष्मः प्रस्थाप्य राजानं गोधनं तदनन्तरम् । सेनामुख्यान्व्यवस्थाप्य व्यूहितुं संप्रचक्रमे २२ भीष्म उवाच ॥ आचार्य मध्ये तिष्ठ त्वमश्वत्थामा तु सव्यतः । कृपः शारद्वतो धीमान्पार्श्वं रक्षतु दक्षिणम् २३ अग्रतः सूतपुत्रस्तु कर्णस्तिष्ठतु दंशितः । अहं सर्वस्य सैन्यस्य पश्चात्स्थास्यामि पालयन् २४ [१५९८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे भीष्मसैन्यव्यूहे द्विपञ्चाशत्तमोऽध्यायः ॥५२॥

वैशम्पायन उवाच । तथा व्यूढेष्वनीकेषु कौरवेयेषु भारत । उपायादर्जुनस्तूर्णं रथघोषेण नादयन् १ ददृशुस्ते ध्वजाग्रं वै शुश्रुवुश्च

घेऊन दुसरें चतुर्थांश सैन्य जाऊं दे १७. आह्मी अर्धे सैन्य घेऊन पांडुपुत्र अर्जुनाशीं युद्ध करूं १८. निश्चयानें आलेल्या अर्जुनाशीं मी, द्रोण, कर्ण, अश्वत्थामा आणि कृप असे मिळून युद्ध करूं १९. वेला ज्याप्रमाणें समुद्राचें निवारण करिते त्याप्रमाणें मी मत्स्यराज विराट जरी पुन्हा आला किंवा इंद्र जरी आला तरी त्याचें निवारण करीन २०. वैशंपायन सांगतात:—महात्म्या भीष्मानें केलेलें तें भाषण त्यांना रुचलें आणि त्याप्रमाणें कौरवराज दुर्योधनानें केलें २१. सारांश, भीष्मानें प्रथम राजाला व गोधन पाठवून दिल्यावर सैन्यांतील मुख्य मुख्य योध्यांना व्यवस्थित करून सैन्य व्यवस्थित उभें करण्यास सुरवात केली २२. भीष्म ह्मणतात:— हे आचार्य, आपण मध्यें उभे रहा; अश्वत्थाम्यानें आपल्या डाव्या बाजूला असावें; बुद्धिमान् शारद्वत कृपाचार्यांनीं आपल्या दक्षिणभागाचें रक्षण करावें २३; सूतपुत्र कर्णानें कवच घालून पुढें उभें रहावें आणि मी रक्षण करण्याकरितां सर्व सैन्याच्या मागें उभा राहीन २४. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं भीष्मांनीं सैन्य व्यवस्थित केल्याविषयीं बावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५२ ॥

वैशंपायन सांगतात:—हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, त्याप्रमाणें कौरवांच्या सेना व्यवस्थित उभ्या राहिल्यावर रथाच्या घोषानें रणप्रदेश नादित करीत करीत अर्जुन त्वरित जवळ आला असतां १ ध्वजाचें अग्र त्या कौरवांच्या दृष्टीं पडलें; रथाचा प्रचंड

महास्वनम् । दोधूयमानस्य भृशं गाण्डीवस्य च निःस्वनम् २ ततस्तु सर्वमालोक्य द्रोणो वचनमब्रवीत् ।महारथमनुप्राप्तं दृष्ट्वा गाण्डीवधन्विनम् ३ द्रोण उवाच ॥ एतद्ध्वजाग्रं पार्थस्य दूरतः संप्रकाशते । एष घोषः स रथजो रोरवीति च वानरः ४ एष तिष्ठन्रथश्रेष्ठे रथे च रथिनां वरः । उत्कर्षति धनुःश्रेष्ठं गाण्डीवमशनिस्वनम् ५ इमौ च बाणौ सहितौ पादयोर्मे व्यवस्थितौ । अपरौ चाप्यतिक्रान्तौ कर्णौ संस्पृश्य मे शरौ ६ निरुष्य हि वने वासं कृत्वा कर्मातिमानुषम् । अभिवादयते पार्थः श्रोत्रे च परिपृच्छति ७ चिरदृष्टोयमस्माभिः प्रज्ञावान्बान्धवप्रियः । अतीव ज्वलितो लक्ष्म्या पाण्डुपुत्रो धनञ्जयः ८ रथी शरी चारुतली निषङ्गी शङ्खी पताकी कवची किरीटी । खड्गी च धन्वी च विभाति पार्थः शिखी वृतः स्रुग्भिरिवाज्यसिक्तः ९ अर्जुन उवाच ॥ इषुपाते च सेनाया हयान्संयच्छ सारथे । यावत्समीक्षे सैन्येऽस्मिन्क्वासौ कुरुकुलाधमः १० सर्वानेताननादृत्य दृष्ट्वा तमतिमानिनम् । तस्य मूर्ध्नि पतिष्यामि तत एते

घोषही त्यांच्या कानीं आला आणि इकडे तिकडे हालत असलेल्या गांडीव धनुष्याचाही स्वर त्यांनीं ऐकिला २. तदनंतर गांडीवधनुर्धारी महारथी अर्जुन आलेला अवलोकन करितांक्षणीं द्रोणाचार्यांनीं त्याचें सर्व चेष्टित लक्ष्यांत घेतलें ३ आणि ते ह्मणाले "अर्जुनाच्या ध्वजाचें हें अग्र लांबून झळकूं लागलें आहे; हा तो रथाचा घोषही ऐकूं येऊं लागला आहे आणि तो वानरही गर्जना करूं लागला आहे ४. रथ्यांमध्यें श्रेष्ठ आणि श्रेष्ठ रथावर आरूढ झालेला हा अर्जुन वज्रासारिख्या ध्वनीनें युक्त असलेलें श्रेष्ठ गांडीव धनुष्य वर उचलून धरीत आहे ५. हे दोन बाण एकदम माझ्या पायापाशीं येऊन पडले आणि दुसरे दोन कानांना स्पर्श करून निघूनही गेले ६. वनामध्यें वास्तव्य करून आणि अमानुष कर्म करून आलेला हा अर्जुन मला अभिवंदन करीत आहे आणि कानांशीं लागून युद्धाला अनुज्ञा मागत आहे ७. बंधुजनप्रिय असलेला आणि कांतीनें अतिशय उज्ज्वल असलेला हा बुद्धिमान् पांडुपुत्र धनंजय पुष्कळ दिवसांनीं आमच्या दृष्टीं पडला ८. रथ, बाण, मनोहर तलत्राण, भाते, शंख, ध्वज, कवच, किरीट, खड्ग आणि धनुष्य ह्यांनीं युक्त असलेला हा कुंतीपुत्र अर्जुन आज्यसिंचन केलेला अग्निच स्रुचांनीं परिवेष्टित आहे कीं काय असा दिसत आहे ९. अर्जुन ह्मणतोः— आतां ही कौरवसेना बाणाच्या टप्प्यांत आली आहे. हे सारथे, तूं अश्व आंवरून धर; ह्या सैन्यामध्यें हा कुरुकुलाधम दुर्योधन कोठें आहे तो आधीं मला पाहूं दे १०. ह्या सर्वांची उपेक्षा करून तो अतिमानी दृष्टीं पडतांक्षणीं मी त्याच्याच मस्तकावर

पराजिताः ११ एष व्यवस्थितो द्रोणो द्रौणिश्च तदनन्तरम् । भीष्मः कृपश्च कर्णश्च महेष्वासाः समागताः १२ राजानं नात्र पश्यामि गाः समादाय गच्छति । दक्षिणं मार्गमास्थाय शङ्के जीवपरायणः १३ उत्सृजैतद्रथानीकं गच्छ यत्र सुयोधनः । तत्रैव योत्स्ये वैराटे नास्ति युद्धं निरामिषम् ॥ तं जित्वा विनिवर्तिष्ये गाः समादाय वै पुनः १४ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्तः स वैराटिर्हयान्संयम्य यत्नतः । नियम्य च ततो रश्मीन्यत्र ते कुरुपुङ्गवाः १५ अचोदयत्ततो वाहान्यत्र दुर्योधनो गतः । उत्सृज्य रथवंशं तु प्रयाते श्वेतवाहने १६ अभिप्रायं विदित्वा च कृपो वचनमब्रवीत् । नैषोन्तरेण राजानं बीभत्सुः स्थातुमिच्छति १७ तस्य पार्ष्णिं ग्रहीष्यामो जवेनाभिप्रयास्यतः । न ह्येनमतिसंक्रुद्धमेको युध्येत संयुगे १८ अन्यो देवात्सहस्राक्षात्कृष्णाद्वा देवकीसुतात् । आचार्याच्च सपुत्राद्वा भारद्वाजान्महारथात् १९ किं नो गावः करिष्यन्ति धनं वा विपुलं तथा । दुर्योधनः पार्थजले पुरा नौरिव मज्जति २० तथैव गत्वा

जाऊन पडतो म्हणजे ह्यांचा आपोआपच पराजय होईल ११. हे द्रोणाचार्य सज्ज होऊन राहिले आहेत; द्रोणपुत्र अश्वत्थामा त्यांच्या जवळच आहे आणि भीष्म, कृप व कर्ण हेही महाधनुर्धारी येथें आले आहेत १२. परंतु, ह्या सैन्यामध्यें राजा मला दिसत नाहीं. जीवरक्षणाविषयींच तत्पर होऊन हा दक्षिणमार्गानें गाई घेऊन जात असावा अशी मला शंका येत आहे १३. ह्यास्तव, हा रथसमुदाय सोडून देऊन जिकडे दुर्योधन आहे तिकडेच चल. कारण, हे विराटपुत्रा, मी तेथेंच युद्ध करीन; आमिषावांचून युद्ध नाहीं. तस्मात्, मी त्याला जिंकीन आणि गाई घेऊन परत फिरेन १४. वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें विराटपुत्र उत्तराला अर्जुनानें सांगितलें असतां त्यानें यत्न करून अश्व आंवरून धरिले आणि जिकडे ते कुरुश्रेष्ठ भीष्मप्रभृति होते तिकडून अश्वांच्या रश्मी वळवून १५ जिकडे दुर्योधन गेला होता तिकडे त्यानें अश्वांना प्रेरणा केली. रथसमुदाय सोडून देऊन श्वेतवाहन अर्जुन निघाला असतां १६ त्याचा अभिप्राय जाणून कृपाचार्य म्हणाले "राजाशिवाय ह्या अर्जुनाचा येथें ठरण्याचा बेत दिसत नाहीं १७. तस्मात्, वेगानें जात असलेल्या त्या अर्जुनाच्या पाठोपाठ आपण जाऊं. कारण, अतिशय क्रुद्ध झालेल्या ह्या अर्जुनाशीं संग्रामामध्यें सहस्रनयन देव इंद्र, देवकीपुत्र कृष्ण आणि पुत्रासहवर्तमान भरद्वाजपुत्र महारथी द्रोणाचार्य ह्यांवांचून कोणीही एकटा युद्ध करण्यास समर्थ नाहीं १८, १९. पार्थरूप समुद्रामध्यें आपली दुर्योधनरूप नौका जर बुडूं लागली आहे तर गाईंचा अथवा विपुल द्रव्याचा आपणांला

बीभत्सुर्नाम विश्राव्य चात्मनः । शलभैरिव तां सेनां शरैः शीघ्रमवा-
किरत् २१ कीर्यमाणाः शरौघैस्तु योधास्ते पार्थचोदितैः । नापश्यन्ना-
वृतां भूमिं नान्तरिक्षं च पत्रिभिः २२ तेषामापततां युद्धे नापयानेभव-
न्मतिः । शीघ्रत्वमेव पार्थस्य पूजयन्ति स्म चेतसा २३ ततः शङ्खं प्रदध्मौ
स द्विषतां लोमहर्षणम् । विस्फार्य च धनुःश्रेष्ठं ध्वजे भूतान्यचोदयत् २४
तस्य शङ्खस्य शब्देन रथनेमिस्वनेन च । गाण्डीवस्य च घोषेण पृथिवी
समकम्पत २५ अमानुषाणां भूतानां तेषां च ध्वजवासिनाम् २६ ऊर्ध्वं
पुच्छान्विधुन्वाना रेभमाणाः समन्ततः । गावः प्रतिन्यवर्तन्त दिशमा-
स्थाय दक्षिणाम् २७ [१६२५] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहि-
तायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे गोनिवर्तने
त्रिपञ्चाशत्तमोऽध्यायः ॥ ५३ ॥

वैशम्पायन उवाच ॥ स शत्रुसेनां तरसा प्रणुद्य गास्ता विजित्याथ
धनुर्धराग्र्यः । दुर्योधनायाभिमुखं प्रयातो भूयो रणं सोऽभिचिकीर्षमाणः १

उपयोग करा" ! २०. असो. अर्जुन तसाच थेट पुढें गेला आणि आपलें नांव
प्रसिद्ध करून टोळाप्रमाणें सोडिलेल्या आपल्या बाणांच्या योगानें ती सर्व सेना त्यानें
सत्वर आच्छादित करून टाकिली २१. ह्याप्रमाणें अर्जुनानें सोडिलेल्या बाणसमुदा-
यांची योद्ध्यांच्या शरीरावर वृष्टि होऊं लागली असतां भूमि आणि अंतरिक्ष ह्यांपैकीं
यत्किंचित्‌ही प्रदेश बाणांनीं व्याप्त न झालेला त्यांच्या दृष्टीं पडेनासा झाला २२.
संग्रामामध्यें भिडून जाणारे ते योद्धे, हा प्रकार पाहून पलायन करण्याचें मनामध्यें
न आणितां, अर्जुनाच्या हस्तकौशल्याचीच प्रशंसा करूं लागले २३. इत-
क्यांत शत्रूंच्या अंगावर कांटा आणणारा शंख अर्जुनानें फुंकिला आणि श्रेष्ठ धनु-
ष्याचा टणत्कार करून त्यानें ध्वजावरील प्राण्यांनाही प्रेरणा केली २४.
तेव्हां त्या शंखाचा ध्वनि रथाच्या धांवांचा घोष, गांडीव धनु-
ष्याचा टणत्कार आणि ध्वजावर वास्तव्य करणाऱ्या त्या अमानुष प्राण्यांची गर्जना
ह्यांच्या योगानें पृथ्वी कंपित झाली २५,२६; त्यांच्या योगानें गाई आपलीं पुच्छें वर
करून एकसारिखा हंबरडा फोडूं लागल्या आणि दक्षिणदिशेचें अवलंबन करून त्या
परत फिरल्या २७. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत
विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं गाई परत फिरविल्याविषयीं
त्रेपन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५३ ॥

वैशंपायन सांगतात:— स्वसामर्थ्यानें शत्रुसेना उधळून देऊन गाई जिंकिल्यावर

गोषु प्रयातासु जवेन मत्स्यान्किरीटिनं कृतकार्यं च मत्वा । दुर्योधनाया भिमुखं प्रयातं कुरुप्रवीराः सहसाभिपेतुः २ तेषामनीकानि बहूनि गाढं व्यूढानि दृष्ट्वा बहुलध्वजानि । मत्स्यस्य पुत्रं द्विषतां निहन्ता वैराटिमामन्त्र्य ततोऽभ्युवाच ३ एतेन तूर्णं प्रतिपादयेमाञ्श्वेतान्हयान्काञ्चनरश्मियोक्त्रान् । जवेन सर्वेण कुरु प्रयत्नमासादयंहं कुरुसिंहवृन्दम् ४ गजो गजेनेव मया दुरात्मा योद्धुं समाकाङ्क्षति सूतपुत्रः । तमेव मां प्रापय राजपुत्र दुर्योधनापाश्रयजातदर्पम् ५ स तैर्हयैर्वातजवैर्बृहद्भिः पुत्रो विराटस्य सुवर्णकक्षैः । व्यध्वंसयत्तद्रथिनामनीकं ततोवहत्पाण्डवमाजिमध्ये ६ तं चित्रसेनो विशिखैर्विपाठैः सङ्ग्रामजिच्छत्रुसहो जयश्च । प्रत्युद्ययुर्भारतमापतन्तं महारथाः कर्णमभीप्समानाः ७ ततः स तेषां पुरुषप्रवीरः शरासनार्चिः शरवेगतापः । व्रातं रथानामदहत्समन्युर्वनं यथाग्निः कुरुपुङ्गवानाम् ८ तस्मिंस्तु युद्धे तुमुले प्रवृत्ते पार्थं

पुनरपि संग्रामाची इच्छा धरणारा तो श्रेष्ठ धनुर्धारी अर्जुन दुर्योधनाकडे निघाला १. गाई वेगानें मत्स्य देशाला गेल्यावर कृतकृत्य झालेला अर्जुन दुर्योधनाकडे निघाला आहे असें समजून कौरवांकडील वीरांनीं एकदम त्याच्यावर चाल केली २. तेव्हां उत्तमरीतीनें सज्ज झालेलीं आणि अनेक ध्वजांनीं युक्त असलेलीं त्यांचीं सैन्यें अवलोकन केल्यावर तो शत्रुघातक अर्जुन मत्स्यराजविराटपुत्राला हाक मारून ह्मणाला ३ "सुवर्णरज्जुरूप बंधनांनीं युक्त असलेल्या ह्या श्वेतवर्ण अश्वांना तूं सत्वर ह्या मार्गाला वळीव आणि सर्व शक्ति खर्च करून तूं प्रयत्न कर; मी कौरवरूप सिंहांच्या कळपाकडे जातों ४. हे राजपुत्रा, मज ज्याप्रमाणें गजाशीं युद्ध करण्याची इच्छा धरीत असतो त्याप्रमाणें हा सूतपुत्र कर्ण माझ्याशीं युद्ध करण्याची इच्छा धरीत आहे. ह्यास्तव, दुर्योधनाच्या आधारावर चढून गेलेल्या ह्या कर्णाकडेच आधीं मला घेऊन जा ५. ज्यांच्या खोगिरांवर सोन्याचें काम केलेलें आहे आणि ज्यांचा वेग वायूप्रमाणें आहे अशा त्या मोठ्या मोठ्या अश्वांच्या योगानें त्यानें रथ्यांची सेना प्रथम उधळून दिली आणि नंतर तो उत्तर पांडुपुत्र अर्जुनाला रणामध्यें घेऊन गेला ६. तेव्हां चित्रसेन, संग्रामजित्, शत्रुसह आणि जय हे महारथी कर्णाचें रक्षण करण्याचें मनांत आणून विशिख आणि विपाठ ह्या बाणांसहवर्तमान, आपणांवर चालून येत असलेल्या अर्जुनाला सामोरे गेले ७. तदनंतर अग्नि ज्याप्रमाणें वन दग्ध करून टाकितो त्याप्रमाणें क्रुद्ध झालेल्या त्या पुरुषश्रेष्ठ अग्नितुल्य अर्जुनानें त्या कौरवश्रेष्ठांच्या रथांचा समुदाय दग्ध करून टाकिला. त्यावेळीं धनुष्य हीच त्याची ज्वाला होती

विकर्णोतिरथं रथेन । विपाठवर्षेण कुरुप्रवीरो भीमेन भीमानुजमाससाद ९
ततो विकर्णस्य धनुर्विकृष्य जाम्बूनदाग्र्योपचितं दृढज्यम् । आपातयत्तं
ध्वजमस्य मथ्य च्छिन्नध्वजः सोप्यपयाज्जवेन १० तं शात्रवाणां गण-
बाधितारं कर्माणि कुर्वन्तममानुषाणि । शत्रुन्तपः पार्थममृष्यमाणः समा-
र्दयच्छरवर्षेण पार्थम् ११ स तेन राज्ञातिरथेन विद्धो विगाहमानो
ध्वजिनीं कुरूणाम् । शत्रुन्तपं पञ्चभिराशु विद्ध्वा ततोस्य सूतं दशभि-
र्जघान १२ ततः स विद्धो भरतर्षभेण बाणेन गात्रावरणातिगेन । गता-
सुराजौ निपपात भूमौ नगो नगाग्रादिव वातरुग्णः १३ नरर्षभास्तेन
नरर्षभेण वीरा रणे वीरतरेण भग्नाः । चकम्पिरे वातवशेन काले प्रक-
म्पितानीव महावनानि १४ हतास्तु पार्थेन नरप्रवीरा गतासवोर्व्यां सुषुपुः
सुवेषाः । वसुप्रदा वासवतुल्यवीर्याः पराजिता वासवजेन सङ्ख्ये ॥ सुवर्ण-

---

आणि बाणांचा वेग हीच त्याची दाहकशक्ति होती ८. ह्याप्रमाणें तें तुमुल युद्ध सुरू झालें असतां भीमानुज कुंतीपुत्र अतिरथी अर्जुनावर, कुरुवंशजश्रेष्ठ विकर्ण विपाठ बाणांचा वर्षाव करीत करीत रथाच्या योगानें, चालून आला ९; तेव्हां उत्कृष्ट सुवर्णानें मढविलेलें आणि दृढ प्रत्यंचा लाविलेलें तें विकर्णाचें धनुष्य तोडून अर्जुनानें त्याचा ध्वजही खिळखिळा करून खालीं पाडिला व अशारीतीनें ध्वज तुटून पडला असतां तो विकर्ण वेगावेगानें संग्रामां-तून पळून गेला १०. हें कृत्य शत्रुंतपनामक योध्याला सहन न झाल्यामुळें अमानुष कर्मे करून शत्रुगणांना पीडा करणाऱ्या कुंतीपुत्र अर्जुनाला त्यानें बाणवृष्टीनें पीडित केलें ११; परंतु, त्या अतिरथी शत्रुंतप राजानें वेध केला असतां कौरवांच्या सेनेमध्यें संचार करीत असलेल्या त्या अर्जुनानें शत्रुंतपाला पांच बाणांनीं वेध करून दहा बाणांनीं त्याच्या सारथ्याचा वध केला, १२. तेव्हां भरतवंशजश्रेष्ठ अर्जुनाच्या हातून कवच फोडून जाणाऱ्या बाणानें वेध झाल्याबरोबर वायूनें हदरळून गेलेला वृक्ष ज्याप्रमाणें पर्वतशिखरापासून भूमीवर पडतो त्याप्रमाणें तो शत्रुंतप राजा गतप्राण होऊन रणामध्यें पडला १३. वर्षाकालाचे आरंभीं वायूनें ज्याप्रमाणें मोठीं मोठीं वनें कंपित होत असतात त्याप्रमाणें वीर्यानें अधिक असलेल्या त्या पुरुषश्रेष्ठ अर्जुनाच्या हातून संग्रामामध्यें पराजय पावलेले पुरुषश्रेष्ठ वीर थरथर कांपूं लागले १४. उत्कृष्ट वेष धारण करणारे नरवीर कुंतीपुत्र अर्जुनाचे प्रहार झाले असतां गतप्राण होऊन भूमीवर शयन करूं लागले आणि वीर्यानें इंद्राची बरोबरी करणारे व सुवर्णमय आणि

कार्ष्णायसवर्मनद्धा नागा यथा हैमवताः प्रवृद्धाः १५ तथा स शत्रून्स-
मरे विनिघ्नन्गाण्डीवधन्वा पुरुषप्रवीरः । चचार सङ्ख्ये विदिशो दिशश्च
दहन्निवाग्निर्वनमातपान्ते १६ प्रकीर्णपर्णानि यथा वसन्ते विशातयित्वा
पवनोम्बुदांश्च । तथा सपत्नान्विकिरन्किरीटी चचार सङ्ख्येतिरथो रथेन १७
शोणाश्ववाहस्य हयान्निहत्य वैकर्तनभ्रातुरदीनसत्त्वः । एकेन सङ्ग्रामजितः
शरेण शिरो जहाराथ किरीटमाली १८ तस्मिन्हते भ्रातरि सूतपुत्रो वैकर्तनो
वीर्यमथाददानः । प्रगृह्य दन्ताविव नागराजो महर्षभं व्याघ्र इवाभ्यधावत् १९
स पाण्डवं द्वादशभिः पृषत्कैर्वैकर्तनः शीघ्रमथो जघान । विव्याध गात्रेषु हयांश्च
सर्वान्विराटपुत्रं च करे निजघ्ने २० तमापतन्तं सहसा किरीटी वैक-
र्तनं वै तरसाभिपत्य । प्रगृह्य वेगं न्यपतज्जवेन नागं गरुत्मानिव चित्र-
पक्षः २१ तावुत्तमौ सर्वधनुर्धराणां महाबलौ सर्वसपत्नसाहौ । कर्णस्य

लोहमय कवचें अंगांत चढविल्यामुळें हिमालयपर्वतावरील प्रचंड नागाप्रमाणें दिसत
असलेले इतरही दानशूर योद्धे संग्रामामध्यें इंद्रपुत्र अर्जुनाच्या हातून पराजय
पावले १५. असो. ज्याप्रमाणें एन उन्हाळ्यामध्यें अग्नि अरण्य दग्ध करीत सुटतो
त्याप्रमाणें गांडीवधनुर्धारी नरवीर अर्जुन संग्रामांत शत्रूंचा वध करीत करीत रण-
भूमीवर सर्व दिशा व विदिशा हिंडूं लागला १६. वसंतऋतूमध्यें ज्याप्रमाणें गळून
पडलेलीं पानें आणि मेघ इकडे तिकडे उडवून वायू संचार करूं लागतो त्याप्रमाणें
अतिरथी अर्जुन शत्रूंना फेंकीत फेंकीत रथाच्या योगानें रणभूमीमध्यें संचार करूं
लागला १७. असें होतां होतां आरक्तवर्ण अश्व ज्याच्या रथाला जोडिले आहेत
असा जो सूर्यपुत्र कर्णाचा भ्राता त्याचे अश्व महाधैर्यवान् अर्जुनानें मारिले आणि
किरीट व माला ह्यांनीं युक्त असलेल्या त्या संग्रामविजयी अर्जुनानें एकाच बाणानें त्याचें
मस्तक उडविलें १८. ह्याप्रमाणें भ्रात्याचा वध झाला असतां सूतपुत्र वैकर्तन कर्ण,
दांतांच्या जोरावर चाल करून जाणारा गजेंद्रच कीं काय अथवा मोठ्या बैलावर चाल
करून जाणारा व्याघ्रच कीं काय अशारीतीनें आपल्या सामर्थ्याच्या जोरावर अर्जु-
नाकडे धांवून गेला १९. प्रथमतः बारा पृषत्क बाणांनीं सूर्यपुत्र कर्णानें पांडुपुत्र अर्जु-
नाला सत्वर वेध केला आणि त्याचप्रमाणें सर्व अश्वांना वेध करून विराटपुत्र उत्त-
रालाही त्यानें हातावर वेध केला २०. तेव्हां अद्भुत पक्षांनीं युक्त असलेला गरुड
ज्याप्रमाणें वेगानें नागावर तुटून पडतो त्याप्रमाणें अंगावर चाल करून येत असलेल्या
सूर्यपुत्र कर्णाच्या समीप जोरानें जाऊन अर्जुन वेगानें त्याच्यावर तुटून पडला २१. कर्ण
व अर्जुन ह्यांचे युद्ध सुरू झालें हें एकतांक्षणीं त उभयतांही कोणत्याही शत्रूला दाद

पार्थस्य निशम्य युद्धं दिदृक्षमाणाः कुरवोऽभितस्थुः २२ स पाण्डवस्तूर्णमुदीर्णकोपः कृतागसं कर्णमुदीक्ष्य हर्षात् । क्षणेन साश्वं सरथं ससारथिमन्तर्दधे घोरशरौघवृष्ट्या २३ ततः सुविद्धाः सरथाः सनागा योधा विनेदुर्भरतर्षभाणाम् । अन्तर्हिता भीष्ममुखाः सहाश्वाः किरीटिना कीर्णरथाः पृषत्कैः २४ स चापि तानर्जुनबाहुमुक्ताञ्छराञ्शरौघैः प्रतिहत्य वीरः । तस्थौ महात्मा सधनुः सबाणः सविस्फुलिङ्गोऽग्निरिवाशु कर्णः २५ ततस्त्वभूद्वै तलतालशब्दः सशङ्खभेरीपणवप्रणादः । प्रक्ष्वेडितज्यातलनिःस्वनं तं वैकर्तनं पूजयतां कुरूणाम् २६ उद्धूतलाङ्गूलमहापताकध्वजोत्तमांसाकुलभीषणान्तम् । गाण्डीवनिर्ह्रादकृतप्रणादं किरीटिनं प्रेक्ष्य ननाद कर्णः २७ स चापि वैकर्तनमर्दयित्वा साश्वंससूतं सरथं पृषत्कैः । तमाववर्ष प्रसभं किरीटी पितामहं द्रोणकृपौ च दृष्ट्वा २८ स चापि पार्थं बहुभिः पृषत्कैर्वैकर्तनो मेघ इवाभ्यवर्षत् ।

न देणार, महाबलाढ्य व सर्व धनुर्धरांमध्यें श्रेष्ठ आहेत असें समजून सर्व कौरव त्यांचें युद्ध पहाण्याकरितां स्वस्थ उभे राहिले २२. असो. आपले अपराध केलेला कर्ण पुढें आला आहे असें पाहून अर्जुनानें उल्लासपूर्वक सत्वर त्याच्या मुखाकडे पाहिलें आणि एका क्षणांत अश्व, रथ आणि सारथि ह्यांसहवर्तमान बाणसमुदायांच्या घोर वृष्टीनें त्याला त्यानें अदृश्य करून टाकिलें २३. तदनंतर अर्जुनानें पृषत्क बाणांच्या योगानें ज्यांचे रथ भरून काढिले आहेत आणि अश्व, रथ व गज ह्यांसहवर्तमान जे त्याच्या बाणांनीं झांकून गेलेले आहेत असे भरतश्रेष्ठ कौरवांकडील भीष्मप्रभृति योद्धे बाणांनीं अतिशय विद्ध झाले असतां गर्जना करूं लागले २४. इकडे धनुष्य व बाण ह्यांनीं युक्त असल्यामुळें ठिणग्यांनीं युक्त असलेल्या अग्नीप्रमाणें दिसत असलेला महात्मा कर्णही अर्जुनाच्या हातांतून सुटलेल्या बाणांना आपल्या बाणसमुदायांनीं हाणून पाडून उभा राहिला २५. तेव्हां हस्ततलासहवर्तमान प्रत्यंचेचा टणत्कार करीत असलेल्या त्या कर्णाची प्रशंसा करूं लागलेल्या कौरवांमध्यें जिकडे तिकडे टाळ्या वाजूं लागल्या आणि शंख, दुंदुभि व पणव ह्यांहीं वाद्यांचा ध्वनि सुरू झाला २६. नंतर ऊर्ध्व व पुच्छरूप पताकानें युक्त अशा ध्वजाचे उर्ध्वभागीं असलेल्या फळीच्या दोन्हीं टोंकांवर दाटीदाटीनें बसलेलीं भयंकर भूतें ज्याचे समीप आहेत आणि गांडीवाच्या टणत्काराबरोबरच जो गर्जना करीत आहे अशा अर्जुनाला अवलोकन करून कर्णानेंही गर्जना केली २७. सूर्यपुत्र कर्णाला अश्व, सारथि आणि रथ ह्यांसहवर्तमान पृषत्क बाणांनीं अगदीं त्रस्त

तथैव कर्णं च किरीटमाली संछादयामास शितैः पृषत्कैः २९
तयोः सुतीक्ष्णान्सृजतोः शरौघान्महाशरौघास्त्रविवर्धने रणे । रथे विलग्नाविव चन्द्रसूर्यौ घनान्तरेणानुददर्श लोकः ३० अथाशुकारी चतुरो हयांश्च विव्याध कर्णो निशितैः किरीटिनः । त्रिभिश्च यन्तारममृष्यमाणो विव्याध तूर्णं त्रिभिरस्य केतुम् ३१ ततोऽभिविद्धः समरावमर्दी प्रबोधितः सिंह इव प्रसुप्तः । गाण्डीवधन्वा ऋषभः कुरूणामजिह्मगैः कर्णमियाय जिष्णुः ३२ शरास्त्रवृष्ट्या निहतो महात्मा प्रादुश्चकारातिमनुष्यकर्म । प्राच्छादयत्कर्णरथं पृषत्कैर्लोकानिमान्सूर्य इवांशुजालैः ३३ स हस्तिनेवाभिहतो गजेन्द्रः प्रगृह्य भल्लान्निशितान्निषङ्गात् । आकर्णपूर्णं च धनुर्विकृष्य विव्याध गात्रेष्वथ सूतपुत्रम् ३४ अथास्य बाहूरुशिरोललाटं ग्रीवां वराङ्गानि परावमर्दी । शितैश्च बाणैर्युधि निर्बिभेद गाण्डीवमुक्तैरशनिप्रकाशैः ३५

करून अर्जुनानें द्रोण, कृप व भीष्म दृष्टीं पडल्याबरोबर त्यांच्यावरही बाणवृष्टि केली २८. नंतर जलधारांची वृष्टि करणाऱ्या मेघाप्रमाणें त्या सूर्यपुत्र कर्णानेंही अनेक पृषत्क बाणांनीं अर्जुनावर वृष्टि केली आणि त्या किरीट धारण केलेल्या अर्जुनानेंही घांसलेल्या पृषत्क बाणांनीं कर्णाला आच्छादित केलें २९. प्रचंड बाणसमुदायांच्या योगानें जेथें कापाकापी चालली आहे अशा संग्रामामध्यें ते उभयतां कर्णार्जुन बाणसमूहांचा वर्षाव करूं लागले असतां मेघांतून दृष्टीं पडणाऱ्या चंद्रसूर्याप्रमाणें ते उभयतां योद्धे रथावर संलग्न झालेले लोकांच्या दृष्टीं पडले ३०. नंतर त्वरा करणाऱ्या कर्णानें तीक्ष्ण बाणांच्या योगानें अर्जुनाच्या चार अश्वांना वेध केला; रागारागानें तीन बाणांनीं त्याच्या सारथ्यालाही त्यानें वेध केला आणि तीन बाण त्वरेत्वरेनें अर्जुनाच्या ध्वजावरही त्यानें टाकिले ३१. तदनंतर सिंह ज्याप्रमाणें झोंपेतून जागा केला जातो त्याप्रमाणें कर्णाच्या बाणांचा प्रहार होतांक्षणीं क्षुब्ध झालेला व संग्रामामध्यें शत्रूंचें मर्दन करणारा तो गांडीवधनुर्धारी कुरुवंशजश्रेष्ठ अर्जुन सरळ जाणाऱ्या बाणांचा वर्षाव करीत करीत कर्णावर चालून गेला ३२. सारांश, बाण आणि अस्त्रें ह्यांच्या वृष्टीनें तो महात्मा अर्जुन ताडित झाला असतां त्यानें अमानुष कर्म प्रकट केलें आणि सूर्य ज्याप्रमाणें किरणसमुदायांनीं हे लोक व्याप्त करून टाकितो त्याप्रमाणें पृषत्क बाणांनीं कर्णाचा रथ त्यानें व्यापून टाकिला ३३. गजानें प्रहार केलेला गजेंद्रच कीं काय अशा त्या अर्जुनानें भात्यांतून तीक्ष्ण भल्ल बाण घेऊन व कानापर्यंत धनुष्य ओढून सूतपुत्र कर्णाच्या शरीरावर वेध केला ३४ आणि शत्रूंचें मर्दन करणाऱ्या त्या अर्जुनानें विद्युल्लतेसारिख्या उज्ज्वल आणि गांडीवापासून सोडिलेल्या तीक्ष्ण बाणांनीं कर्णाचे हातपाय, मस्तक, कंठ व उत्कृष्ट अवयव युद्धांत फोडून टाकिले ३५.

स पार्थमुक्तैरिषुभिः प्रणुन्नो गजो गजेनेव जितस्तरस्वी । विहाय सङ्ग्रामशिरः प्रयातो वैकर्तनः पाण्डवबाणतप्तः ३६ [१६६१] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे कर्णापयाने चतुःपञ्चाशत्तमोऽध्यायः ॥ ५४ ॥

वैशम्पायन उवाच ॥ अपयाते तु राधेये दुर्योधनपुरोगमाः । अनीकेन यथा स्वेन शनैरार्च्छन्त पाण्डवम् १ बहुधा तस्य सैन्यस्य व्यूढस्यापततः शरैः । अधारयत वेगं स वेलेव तु महोदधेः २ ततः प्रहस्य बीभत्सुः कौन्तेयः श्वेतवाहनः । दिव्यमस्त्रं प्रकुर्वाणः प्रत्यायाद्रथसत्तमः ३ यथा रश्मिभिरादित्यः प्रच्छादयति मेदिनीम् । तथा गाण्डीवनिर्मुक्तैः शरैः पार्थो दिशो दश ४ न रथानां न चाश्वानां न गजानां न वर्मणाम् । अनिविद्धं शितैर्बाणैरासीद्द्व्यङ्गुलमन्तरम् ५ दिव्ययोगाच्च पार्थस्य हयानामुत्तरस्य च । शिक्षाशिल्पोपपन्नत्वादस्त्राणां च परिक्रमात् ६ वीर्यवत्त्वं द्रुतं चाग्र्यं दृष्ट्वा जिष्णोरपूजयन् ७ कालाग्निमिव बीभत्सुं निर्दहन्तमिव प्रजाः ।

तेव्हां अर्जुनानें सोडिलेल्या बाणांनीं विद्ध झालेला तो वेगवान् कर्ण गजानें पराभव केलेल्या गजाप्रमाणें दिसूं लागला आणि अर्जुनाच्या बाणानें संतप्त झालेला तो सूर्यपुत्र कर्ण रणभूमीची अघाडी सोडून देऊन चालता झाला ३६. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं कर्णाच्या पलायनाविषयीं चोपन्नावा अध्याय समाप्त झाला ॥५४॥

वैशंपायन सांगतातः—कर्णानें पलायन केल्यावर दुर्योधनप्रभृति कौरव आपआपली सेना घेऊन बेताबेतानें पांडुपुत्र अर्जुनावर बाण टाकूं लागले १. तेव्हां नानाप्रकारांनीं ज्यांत रचना केलेली आहे असें तें सैन्य आपल्यावर येऊं लागलें असतां वेला ज्याप्रमाणें महासागराचा वेग धारण करिते त्याप्रमाणें अर्जुनानें बाणांच्या योगानें त्या सैन्याचा वेग आंवरून धरिला २. तदनंतर श्वेतवाहन कुंतीपुत्र रथिश्रेष्ठ अर्जुन हास्य करून दिव्य अस्त्र प्रकट करीत करीत पुढें सरसावला ३. ज्याप्रमाणें किरणांच्या योगानें सूर्य पृथ्वी आच्छादित करून टाकितो त्याप्रमाणें कुंतीपुत्र अर्जुनानें गांडीवापासून सुटलेल्या बाणांनीं दशदिशा आच्छादित केल्या ४. रथ, अश्व, गज व कवचें ह्यांमध्यें कोठेंही तीक्ष्ण बाणांनीं विद्ध न झालेली अशी दोन अंगुलेंही जागा उरली नाहीं ५. अर्जुनाच्या दिव्य अस्त्राच्या प्रयोगामुळें अर्जुनाचा सारथि उत्तर आणि अश्व ह्यांचे अंगीं शिक्षणानें मर्म चांगलें बिंबलें असल्यामुळें आणि अस्त्रांच्या सामर्थ्यामुळें प्रकट होऊं लागलेलें अर्जुनाचें श्रेष्ठ वीर्य अवलोकन करून शत्रुही त्याची

न्नारयः प्रेक्षितुं शेकुर्ज्वलन्तमिव पावकम् ८ तानि ग्रस्तान्यनीकानि रेजुरर्जुनमार्गणैः । शैलं प्रति बलाभ्राणि व्याप्तानीवार्करश्मिभिः ९ अशोकानां वनानीव च्छन्नानि बहुशः शुभैः । रेजुः पार्थशरैस्तत्र तदा सैन्यानि भारत १० स्रजोर्जुनशरैः शीर्णं शुष्यत्पुष्पं हिरण्मयम् । छत्राणि च पताकाश्च खे दधार सदागतिः ११ स्वबलत्रासनात्त्रस्ताः परिपेतुर्दिशो दश । रथाङ्गदेशानादाय पार्थच्छिन्नयुगा हयाः १२ कर्णकक्षविषाणेषु अन्तरोष्ठेषु चैव ह । मर्मस्वङ्गेषु चाहत्य पातयत्समरे गजान् १३ कौरवाग्रगजानां तु शरीरैर्गतचेतसाम् । क्षणेन संवृता भूमिर्मेघैरिव नभस्तलम् १४ युगान्तसमये सर्वं यथा स्थावरजङ्गमम् । कालक्षयमशेषेण दहत्यग्रशिखः शिखी १५ तद्वत्पार्थो महाराज ददाह समरे रिपून् । ततः सर्वास्त्रतेजोभिर्धनुषो निःस्वनेन च १६ शब्दैनामानुषाणां च भूतानां

प्रशंसा करूं लागले ६,७. प्रज्वलित झालेल्या अग्नीकडे ज्याप्रमाणें पहावत नाहीं त्याप्रमाणें प्रलयकालच्या अग्नीप्रमाणें प्रजा दग्ध करण्यास प्रवृत्त झालेल्याच कीं काय अशा त्या अर्जुनाकडे पहाण्यासही शत्रु समर्थ होईनात ८. सूर्याच्या किरणांनीं व्याप्त झालेले प्रचंड मेघ ज्याप्रमाणें पर्वताचे समीप शोभूं लागतात त्याप्रमाणें अर्जुनबाणांच्या योगानें ग्रस्त झालेल्या त्या सेना शोभूं लागल्या ९. हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, अर्जुनाच्या शुभ बाणांनीं, नानाप्रकारांनीं छिन्नभिन्न झालेल्या त्या सेना तोडिलेल्या अशोकवनाप्रमाणेंच झळकूं लागल्या १०. पिंवळ्या चाफ्याचीं गळलेलीं व कोमेजलेलीं फुलें ज्याप्रमाणें हवेमध्यें उडत रहातात त्याप्रमाणें अर्जुनाच्या बाणांनीं तुटून गेलेलीं छत्रें व पताका हीं आकाशामध्यें उडूं लागलीं ११. आपल्याच सैन्याच्या भीतीमुळें त्रस्त झालेले आणि अर्जुनानें जूं तोडून टाकिलेले अश्व रथाचे जे जे भाग त्यांच्याशीं जखडून राहिले ते ते घेऊन वाट फुटेल तिकडे उधळूं लागले १२. अर्जुनानें कर्ण, कक्षा, दंत, अधरोष्ठ आणि शरीराचे नाजुक भाग ह्यांच ठिकाणीं वेध करून संग्रामामध्यें गजांचा वध केला १३; आणि मेघांनीं ज्याप्रमाणें आकाश व्याप्त होऊन जातें त्याप्रमाणें कुरुवंशजश्रेष्ठांच्या गतप्राण झालेल्या गजांच्या शरीरांनीं एका क्षणांत ती भूमि व्याप्त होऊन गेली १४. युगांतसमयीं ज्याप्रमाणें कालगतीनें क्षय पावणारें सर्व स्थावरजंगमात्मक जगत् तीक्ष्ण ज्वालांनीं युक्त असलेला अग्नि पूर्णपणें दग्ध करून टाकितो १५. त्याप्रमाणें, हे महाराज जनमेजया, अर्जुन संग्रामामध्यें शत्रूंना दग्ध करूं लागला. तदनंतर सर्व अस्त्रांचें तेज, धनुष्याचा टणत्कार १६, ध्वजावर वास्तव्य करणाऱ्या अमानुष प्राण्यांचा

ध्वजवासिनाम् । भैरवं शब्दमत्यर्थं वानरस्य च कुर्वतः १७ देवारिपाञ्च
बीभत्सुस्तस्मिन्दौर्योधने बले । भयमुत्पादयामास बलवानरिमर्दनः १८
रथशक्तिममित्राणां प्रागेव निपतत्क्षुवि । सोपयात्सहसा पश्चात्साहसा-
च्चाभ्युपेयिवान् १९ शरव्रातैः सुतीक्ष्णाग्रैः समादिष्टैः खगैरिव ।
अर्जुनस्तु खमावव्रे लोहितप्राशनैः खगैः २० अत्र मध्ये यथार्कस्य
रश्मयस्तिग्मतेजसः । दिशासु च तथा राजन्नसंख्याताः शरास्तदा २१
सकृद्वानतं शेकू रथमभ्यसितुं परे । अलभ्यः पुनरश्वैस्तु रथात्सोतिप्र-
पादयेत् २२ ते शरा द्विट्शरीरेषु यथैव न ससज्जिरे । द्विडनीकेषु बीभ-
त्सोर्न ससज्जे रथस्तदा २३ स तद्विक्षोभयामास द्यरातिबलमञ्जसा ।
अनन्तभोगो भुजगः क्रीडन्निव महार्णवे २४ अस्यतो नित्यमत्यर्थं सर्व-
मेवातिगस्तथा । अश्रुतः श्रूयते भूतैर्धनुर्घोषः किरीटिनः २५ संततास्तत्र
मातङ्गा बाणैरल्पान्तरान्तरे । संवृतास्तेन दृश्यन्ते मेघा इव गभ-

शब्द, अति भयंकर शब्द करणाऱ्या वानराची गर्जना १७ आणि देवदत्त शंखाचा ध्वनि ह्यांच्या योगानें त्या दुर्योधनाच्या सैन्यामध्यें शत्रूंचें मर्दन करणाऱ्या बलाढ्य अर्जुनानें भय उत्पन्न केलें १८. शत्रूंचें शरीरसामर्थ्य अर्जुनानें दृष्टादृष्ट होतांक्षणींच नाहींसें करून टाकिलें होतें आणि तो अर्जुन एकाएकीं मार्गे सरून एकदम शत्रूंवर चालून गेला १९. नंतर आकाशामध्यें गमन करणारे पक्षीच कीं काय असे जे आपले अत्यंत तीक्ष्ण अग्रांनीं युक्त, गांडीव धनुष्यापासून मुक्त आणि रक्त प्राशन करणारे बाणसमुदाय, त्यांच्या योगानें अर्जुनानें आकाश व्याप्त करून टाकिलें २०. हे राजा, तीक्ष्ण तेजानें युक्त असलेल्या सूर्याचीं किरणें ज्याप्रमाणें दशदिशेस पसरलेलीं असतात त्याप्रमाणें अर्जुनाचे असंख्य बाण चोहोंकडे पसरलेले दृष्टीं पडूं लागले २१. शत्रूंची व समीप आलेल्या अर्जुनाच्या रथाची एकवेळच गांठ पडणें शक्य होऊं लागलें. कारण, एकदां गांठ पडल्यावर दुसऱ्यानें गांठ पडण्यास शक्य नसलेला तो अर्जुन शत्रूंना रथावरून खालीं पाडून अश्वांसहवर्तमान लगेंच परलोकीं पाठवीत असे २२. असो. अर्जुनाचे बाण ज्याप्रमाणें शत्रूंच्या शरीरांमध्यें न अडकतां निघून गेले तसा त्याचा रथही शत्रुसैन्यामध्यें कोठेंही कुंठित न होतां जाऊं लागला २३. अनंत फणांनीं युक्त असलेला भुजंगच महासागरामध्यें क्रीडा करीत आहे कीं काय असा तो अर्जुन शत्रुसैन्य अनायासें क्षुब्ध करूं लागला २४. अर्जुन एकसारिखे बाण सोडूं लागला असतां सर्व शब्दांना मागें टाकणारा असा अर्जुनाच्या धनुष्याचा पूर्वीं कधीं न ऐकिलेला टणत्कार प्राण्यांच्या कानांवर पडूं लागला २५. एकमेकांमध्यें अगदींच थोडें

स्तिभिः २६ दिशोनुभ्रमतः सर्वाः सव्यदक्षिणमस्यतः । सततं दृश्यते युद्धे सायकासनमण्डलम् २७ पतन्त्यरूपेषु यथा चक्षूंषि न कदाचन । नालक्ष्येषु शराः पेतुस्तथा गाण्डीवधन्वनः २८ मार्गो गजसहस्रस्य युगपद्गच्छतो वने । यथा भवेत्तथा जज्ञे रथमार्गः किरीटिनः २९ नूनं पार्थजयैषित्वाच्छक्रः सर्वामरैः सह । हन्त्यस्मानित्यमन्यन्त पार्थेन निहताः परे ३० घ्नन्तमत्यर्थमहितान्विजयं तत्र मेनिरे । कालमर्जुनरूपेण संहरन्तमिव प्रजाः ३१ कुरुसेनाशरीराणि पार्थेनैवाहतान्यपि । सेदुः पार्थहतानीव पार्थकर्मानुशासनात् ३२ ओषधीनां शिरांसीव द्विषच्छीर्षाणि सोन्वयात् । अवनेशुः कुरूणां हि वीर्याण्यर्जुनजाद्भयात् ३३ अर्जुनानिलभिन्नानि वनान्यर्जुनविद्विषाम् । चक्रुर्लोहितधाराभिर्धरणीं लोहितान्तराम् ३४ लोहितेन समायुक्तैः पांसुभिः पवनोद्धतैः । बभूवुर्लोहितास्तत्र भृशमादित्यरश्मयः ३५ सार्कं खं तत्क्षणेनासीत्सन्ध्यायामिव

अंतर ठेवून संग्रामामध्यें एकसारिखे उभे राहिलेले गज सूर्याच्या किरणांनीं व्याप्त झालेल्या मेघाप्रमाणें त्या अर्जुनानें सोडिलेल्या बाणांच्या योगानें व्याप्त दिसूं लागले २६. डाव्या आणि उजव्या अशा दोन्ही बाजूंनीं बाण सोडीत सोडीत सर्व दिशेस भ्रमण करणाऱ्या अर्जुनाचें धनुष्य एकसारिखें फिरत राहिल्यामुळें अलातचक्राप्रमाणें दिसूं लागले २७. रूपरहित पदार्थांकडे ज्याप्रमाणें दृष्टि कधींही जात नाहीं त्याप्रमाणें गांडीवधनुर्धारी अर्जुनाचे बाण लक्ष्य सोडून दुसऱ्या ठिकाणीं जात नव्हते २८. वनांत एकदम जात असलेल्या एक हजार हत्तींच्या मार्गाप्रमाणें अर्जुनाच्या रथाचा मार्ग मोठा झाला होता २९. अर्जुनाच्या हातून ताडित झालेल्या शत्रूंना "खरोखर इंद्रच अर्जुनाला जय प्राप्त व्हावा ह्या इच्छेनें सर्व देवांसहवर्तमान आमच्याशीं युद्ध करीत आहे" असें वाटूं लागलें ३०. अर्जुन शत्रूंचा एकसारिखा वध करूं लागला असतां अर्जुनाच्या रूपानें प्रत्यक्ष कालच प्रजेचा संहार करीत आहे कीं काय असें कित्येकांना वाटूं लागलें ३१. अर्जुनानें प्रहार केलेलीं कौरवसैन्यांतील शरीरें अर्जुनानेंच प्रहार केलेल्या शरीरांप्रमाणें खालीं पडूं लागलीं. कारण, अर्जुनाच्या त्या पराक्रमाला अर्जुनाचीच उपमा योग्य होती ३२. ओषधींच्या कणसांप्रमाणें शत्रूंचीं मस्तकें तोडून टाकण्याचा अर्जुनानें क्रम चालविला असतां त्याच्या भीतीनें कौरवांचें सामर्थ्य जागच्या जागींच नाहींसें झालें ३३. अर्जुनरूप वायूनें छिन्नभिन्न झालेल्या अर्जुनशत्रूंच्या शरीरांनीं रक्तधारांच्या योगानें त्या रणभूमीवरील सर्व प्रदेश रक्तमय करून सोडिला ३४. वाऱ्यानें उडालेले रजःकण रक्तमिश्र झाल्या-

लोहितम् । अप्यस्तं प्राप्य सूर्योपि निवर्तेत न पाण्डवः ३६ तान्सर्वान्स-
मरे शूरः पौरुषे समवस्थितान् । दिव्यैरस्त्रैरचिन्त्यात्मा सर्वानार्च्छद्धनुर्ध-
रान् ३७ स तु द्रोणं त्रिसप्तत्या क्षुरप्राणां समार्पयत् । दुःसहं दशभिर्बा-
णैर्द्रौणिमष्टाभिरेव च ३८ दुःशासनं द्वादशभिः कृपं शारद्वतं त्रिभिः ।
भीष्मं शान्तनवं षष्ट्या राजानं च शतेन ह ॥ कर्णं च कर्णिना कर्णे
विव्याध परवीरहा ३९ तस्मिन्विद्धे महेष्वासे कर्णे सर्वास्त्रकोविदे ।
हताश्वसूते विरथे ततोनीकमभज्यत ४० तत्प्रभग्नं बलं दृष्ट्वा पार्थमाजि-
स्थितं पुनः । अभिप्रायं समाज्ञाय वैराटिरिदमब्रवीत् ४१ आस्थाय रुचिरं
जिष्णो रथं सारथिना मया । कतमं यास्यसेनीकमुक्तो यास्याम्यहं
त्वया ४२ अर्जुन उवाच ॥ लोहिताश्वमरिष्टं यं वैयाघ्रमनुपश्यसि । नीलां
पताकामाश्रित्य रथे तिष्ठन्तमुत्तर ४३ कृपस्यैतदनीकाग्र्यं प्रापयस्वैतदेव

मुळें सूर्याचीं किरणेंही तेथें अत्यंत आरक्तवर्ण दिसूं लागलीं ३५. संधिसमयीं ज्याप्रमाणें आकाश आरक्तवर्ण होत असतें त्याप्रमाणें तत्क्षणीं सूर्यासहवर्तमान आकाश आरक्तवर्ण झालें आणि अस्ताचलाला गेल्यावर सूर्य रणभूमीवरून परावृत्त होईल; परंतु, पांडुपुत्र अर्जुन परावृत्त होणार नाहीं असा शत्रूंना अदमास दिसूं लागला ३६. ज्याचें स्वरूप अचिंत्य आहे अशा त्या शूर अर्जुनानें स्वपराक्रमाचें अवलंबन करून असलेल्या त्या सर्वही धनुर्धरांना दिव्य अस्त्रांच्या योगानें संग्रामामध्यें ताडित केलें ३७. त्याहत्तर क्षुरप्र बाणानीं त्यानें द्रोणाला वेध केला; दहा बाणांनीं दुःसहाला प्रहार केला; आठच बाणांनीं अश्वत्थाम्याला वेध केला ३८ आणि बारा बाणांनीं दुःशासनाला, तीन बाणांनीं शारद्वत कृपाला, साठ बाणांनीं शांतनव भीष्माला व शंभर बाणांनीं दुर्योधन राजाला वेध करून त्या शत्रुवीरनाशक अर्जुनानें कर्णिसंज्ञक बाणानें कर्णप्रदेशाचे ठिकाणीं कर्णाला वेध केला ३९. ह्याप्रमाणें सर्वास्त्रवेत्त्या महाधनुर्धारी कर्णाला वेध करून आणि त्याचे अश्व व सारथि मारून अर्जुनानें त्याला विरथ केलें असतां सैन्याची फांकफांक झाली ४०. तेव्हां पळत सुटलेलें तें सैन्य आणि समरांगणामध्यें उभा असलेला अर्जुन अवलोकन करून व त्याचा अभिप्राय जाणून विराटपुत्र उत्तर त्याला ह्मणाला ४१ " हे जिष्णो, मज सारथ्यासहवर्तमान सुंदर रथावर आरूढ होऊन आतां कोणत्या सैन्यावर जाण्याची तुझी इच्छा आहे ? तूं मला सांगितलेंस ह्मणजे मी तिकडे जाईन ४२. अर्जुन ह्मणतोः—हे उत्तरा, रक्तवर्ण अश्व जोडिलेला आणि व्याघ्रचर्मानें मढविलेला जो रथ तुझ्या दृष्टीं पडत आहे आणि त्या रथावर नीलवर्ण ध्वजासमीप जो उभा राहिला आहे तिकडे चल ४३.

माम् । एतस्य दर्शयिष्यामि शीघ्रास्त्रं दृढधन्विनः ४४ ध्वजे कमण्डलुर्यस्य शातकौम्भमयः शुभः । आचार्य एष हि द्रोणः सर्वशस्त्रभृतां वरः ४५ सदा ममैष मान्यस्तु सर्वशस्त्रभृतामपि । सुप्रसन्नं महावीरं कुरुष्वैनं प्रदक्षिणम् ४६ अत्रैवावावरोहैनमेष धर्मः सनातनः ४७ यदि मे प्रथमं द्रोणः शरीरे प्रहरिष्यति । ततोऽस्य प्रहरिष्यामि नास्य कोपो भवेदिति ४८ अस्याविदूरे हि धनुर्ध्वजाग्रे यस्य दृश्यते । आचार्यस्यैष पुत्रो वै अश्वत्थामा महारथः ४९ सदा ममैष मान्यस्तु सर्वशस्त्रभृतामपि । एतस्य त्वं रथं प्राप्य विवर्तेथाः पुनःपुनः ५० य एष तु रथानीके सुवर्णकवचावृतः । सेनाग्र्येण तृतीयेन व्यावहार्येण तिष्ठति ५१ यस्य नागो ध्वजाग्रेऽसौ हेमकेतनसंवृतः । धृतराष्ट्रात्मजः श्रीमानेष राजा सुयोधनः ५२ एतस्याभिमुखं वीर रथं पररथारुजम् । प्रापयस्वैष राजा हि प्रमाथी युद्धदुर्मदः ५३ एष द्रोणस्य शिष्याणां शीघ्रास्त्रे प्रथमो मतः । एतस्य दर्शयिष्यामि शीघ्रास्त्रं विपुलं रणे ५४ नागकक्षा तु रुचिरा ध्वजाग्रे यस्य

अथवा हें कृपाचार्यांचें श्रेष्ठ सैन्य दिसत आहे इकडेच मला घेऊन जा. ह्या महाधनुर्धारी कृपाचार्यांला मी आपलें अस्त्रकौशल दाखवितों ४४. ज्याच्या ध्वजावर सुवर्णमय शुभ कमंडलु दिसत आहे तो हा सर्व शस्त्रधरांमध्यें श्रेष्ठ असलेला द्रोणाचार्य होय ४५. हा मला आणि त्याचप्रमाणें इतरही सर्व शस्त्रधरांना सर्वदां मान्य आहे. ह्यास्तव, ह्या सुप्रसन्न महावीराला प्रदक्षिणा कर ४६. येथेंच रथाखालीं उतरून ह्याला मान दे आणि पुनरपि रथावर आरूढ हो. कारण, हा सनातन धर्म आहे ४७. द्रोण जर प्रथम माझ्या शरीरावर प्रहार करतील तरच मी त्यांच्यावर प्रहार करीन; ह्मणजे ह्यांचा कोप होणार नाहीं ४८. ह्यांच्या जवळच जो आहे आणि ज्याच्या ध्वजाचे अग्रभागीं धनुष्य दिसत आहे तो हा आचार्यांचा पुत्र महारथी अश्वत्थामा होय ४९. हाही सर्वदां मला आणि त्याचप्रमाणें सर्व शस्त्रधरांना मान्य आहे. ह्याच्या रथासमीप गेल्यावर तुला पुनरपि परत यावें लागेल ५०. रथ्यांच्या सेनेमध्यें सुवर्णकवच घालून आणि तिसरें श्रेष्ठ व अश्रांत सैन्य घेऊन जो हा उभा आहे ५१ आणि ज्याच्या ध्वजाचे अग्रभागीं सोन्याच्या निशाणानें युक्त असलेला गज आहे तो हा धृतराष्ट्रपुत्र श्रीमान् सुयोधन राजा होय ५२. ह्यास्तव, हे वीरा, शत्रूच्या रथाचा विध्वंस करणारा हा रथ त्याच्या संमुख घेऊन जा. कारण, युद्धामध्यें जेरीस न येणारा हा राजा मोठा बलाढ्य आहे ५३ व द्रोणाचार्यांच्या शिष्यांत अस्त्रकौशलामध्यें हा श्रेष्ठ ह्मणून गणला गेलेला आहे. तेव्हां ह्यालाही संग्रामामध्यें मी आपलें चांगलेंच अस्त्रकौशल दाखवीन ५४.

तिष्ठति । एष वैकर्तनः कर्णो विदितः पूर्वमेव ते ५५ एतस्य रथमास्थाय राधेयस्य दुरात्मनः । यत्तो भवेथाः सङ्ग्रामे स्पर्धते हि सदा मया ५६ यस्तु नीलानुसारेण पञ्चतारेण केतुना । हस्तावापी बृहद्धन्वा रथे तिष्ठति वीर्यवान् ५७ यस्य तारार्कचित्रोऽसौ ध्वजो रथवरे स्थितः । यस्यैतत्पाण्डुरं छत्रं विमलं मूर्ध्नि तिष्ठति ५८ महतो रथवंशस्य नानाध्वजपताकिनः । बलाहकाग्रे सूर्यो वा य एष प्रमुखे स्थितः ५९ हैमं चन्द्रार्कसंकाशं कवचं यस्य दृश्यते । जातरूपशिरस्त्राणं मनस्तापयतीव मे ६० एष शान्तनवो भीष्मः सर्वेषां नः पितामहः । राजश्रियाभिवृद्धश्च सुयोधनवशानुगः ६१ पश्चादेष प्रयातव्यो न मे विघ्नकरो भवेत् । एतेन युध्यमानस्य यत्तः संयच्छ मे हयान् ६२ ततोऽभ्यवहदव्यग्रो वैराटिः सव्यसाचिनम् । यत्रातिष्ठत्कृपो राजन्योत्स्यमानो धनञ्जयम् ६३ [१७२४] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहेऽर्जुनकृपसङ्ग्रामे पञ्चपञ्चाशत्तमोऽध्यायः ॥५५॥

ज्याच्या ध्वजाचे अग्रभागीं मनोहर गजबंधन आहे तो हा वैकर्तन कर्ण तुला प्रथम विदित झालेला आहे ५५. ह्या दुरात्म्या राधापुत्राच्या रथासमीप गेल्यावर तूं तयारीनें रहा. कारण, संग्रामामध्यें हा नेहमीं माझ्याशीं स्पर्धा करीत असतो ५६. नीलवर्ण पताका आणि पांच सुवर्णमय तारे ह्यांनीं युक्त असलेला ध्वज ज्याच्यावर आहे अशा रथावर जो हा वीर्यवान् हस्तकवच घालून व मोठें धनुष्य धारण करून उभा राहिला आहे ५७, तारा व सूर्य ह्यांनीं शृंगारिलेला हा ध्वज ज्याच्या श्रेष्ठ रथावर फडकत आहे, हें श्वेतवर्ण निर्मल छत्र ज्याच्या मस्तकावर झळकत आहे ५८, मेघांचे अग्रभागीं असलेला सूर्यच कीं काय असा जो हा नानाप्रकारच्या ध्वजसमुदायांनीं युक्त असलेल्या प्रचंड रथसमुदायाचे अग्रभागीं उभा आहे ५९, सूर्यचंद्रासारिखें ज्याचें सुवर्णकवच उज्ज्वल दिसत आहे आणि ज्याचें सुवर्णमय शिरस्त्राण माझ्या मनाला क्षुब्ध करीत आहे ६० तो हा राजतेजानें झळकत असलेला आणि सुयोधनाच्या मताप्रमाणें वागणारा आह्मां सर्वांचा पितामह शांतनव भीष्म होय ६१. ह्याच्याकडे मागून जावयाचें आहे. कारण, हा मला विघ्न करणार नाहीं. परंतु, ह्याच्याशीं युद्ध सुरू झाल्यावर माझे अश्व मात्र तूं अगदीं दक्ष राहून आंवरून धर ६२. असें अर्जुनानें सांगितल्यानंतर, हे जनमेजयराजा, जेथें कृपाचार्य अर्जुनाशीं युद्ध करीत उभा होता तिकडे तो सारथ्यकर्माविषयीं दक्ष असलेला विराटपुत्र उत्तर अर्जुनाला घेऊन गेला ६३. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वा-

वैशम्पायन उवाच ॥ तान्यनीकान्यदृश्यन्त कुरूणामग्र्यधन्विनाम् । संसर्पन्ते यथा मेघा घर्मान्ते मन्दमारुताः १ अभ्याशे वाजिनस्तस्थुः समारूढाः प्रहारिणः । भीमरूपाश्च मातङ्गास्तोमराङ्कुशनोदिताः ॥ महामात्रैः समारूढा विचित्रकवचोज्ज्वलाः २ ततः शक्रः सुरगणैः समारुह्य सुदर्शनम् । सहोपायात्तदा राजन्विश्वाश्विमरुतां गणैः ३ तद्देवयक्षगन्धर्वमहोरगसमाकुलम् । शुशुभेऽभ्रविनिर्मुक्तं ग्रहाणामिव मण्डलम् ४ अस्त्राणां च बलं तेषां मानुषेषु प्रयुञ्जताम् । तच्च भीमं महद्युद्धं कृपार्जुनसमागमे ५ द्रष्टुमभ्यागता देवाः स्वविमानैः पृथक्पृथक् ६ शतं शतसहस्राणां यत्र स्थूणा हिरण्मयी । मणिरत्नमयी चान्या प्रासादं तदधारयत् ७ ततः कामगमं दिव्यं सर्वरत्नविभूषितम् । विमानं देवराजस्य शुशुभे खेचरं तदा ८ तत्र देवास्त्रयस्त्रिंशत्तिष्ठन्ति सहवासवाः । गन्धर्वा राक्षसाः सर्पाः पितरश्च महर्षिभिः ९ तथा राजा वसुमना बलाक्षः सुप्रतर्दनः १०

तील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं अर्जुन आणि कृप ह्यांच्या संग्रामाविषयीं पंचावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥५५॥

वैशंपायन सांगतातः— उन्हाळा संपल्यावर मंद वायूनें युक्त असलेले मेघ ज्याप्रमाणें हळूं हळूं पुढें जात असतात त्याप्रमाणें श्रेष्ठ धनुर्धारी कौरवांचीं तीं सैन्यें बेताबेतानें पुढें सरत असलेलीं दृष्टीं पडूं लागलीं १. ज्यावर योद्धे आरूढ झालेले आहेत असे शूर अश्व व अद्भुत कवचें धारण केल्यामुळें उज्ज्वल तोमर व अंकुश ह्यांनीं प्रेरित आणि आरूढ झालेल्या माहुतांनीं युक्त असे भयंकर गज जवळ येऊन उभे राहिले २. तदनंतर, हे जनमेजयराजा, विश्वेदेव, अश्विनीकुमार आणि मरुद्गण ह्या देवसमुदायांसहवर्तमान विमानामध्यें आरूढ होऊन इंद्र, जेथें तो शत्रूंचा समागम झाला होता, तेथें आला ३. देव, यक्ष, गंधर्व आणि महोरग ह्यांनीं गजबजून गेलेलें तें मेघनिर्मुक्त आकाशमंडल ग्रहमंडलाप्रमाणें शोभूं लागलें ४. मनुष्यांवर सोडीत असलेल्या त्या योध्यांच्या अस्त्रांचें बल आणि कृप व अर्जुन ह्यांची गांठ पडून होणारें तें भयंकर युद्ध ५ अवलोकन करण्याकरितां वेगळे वेगळे देव आपआपल्या विमानामध्यें बसून तेथें आले ६. एक कोट सामान्य स्तंभ, एक सुवर्णमय स्तंभ आणि दुसरा एक हिरे व रत्नें ह्यांनीं भरून गेलेला स्तंभ एवढ्यांनीं मिळून जें विमान धारण केलेलें होतें ७ तें यथेष्ट गमन करणारें, सर्व रत्नांनीं भूषित असलेलें व आकाशमार्गानें संचार करणारें देवराजाचें दिव्य विमान झळकूं लागलें ८. त्या विमानामध्यें इंद्रासहवर्तमान तेहेतीस देव, गंधर्व, राक्षस, सर्प आणि महर्षींसहवर्तमान

अष्टकश्च शिबिश्चैव ययातिर्नहुषो गयः १० मनुः पूरू रघुर्भानुः कृशाश्वः सगरो नलः । विमाने देवराजस्य समदृश्यन्त सुप्रभाः ११ अग्नेरीशस्य सोमस्य वरुणस्य प्रजापतेः । तथा धातुर्विधातुश्च कुबेरस्य यमस्य च १२ अलम्बुषोग्रसेनानां गन्धर्वस्य च तुम्बुरोः । यथामानं यथोद्देशं विमानानि चकाशिरे १३ सर्वदेवनिकायाश्च सिद्धाश्च परमर्षयः । अर्जुनस्य कुरूणां च द्रष्टुं युद्धमुपागताः १४ दिव्यानां सर्वमाल्यानां गन्धः पुण्योथ सर्वशः । प्रससार वसन्ताग्रे वनानामिव भारत १५ तत्र रत्नानि देवानां समदृश्यन्त तिष्ठताम् । आतपत्राणि वासांसि स्रजश्च व्यजनानि च १६ उपाशाम्यद्रजो भौमं सर्वं व्याप्तं मरीचिभिः । दिव्यगन्धानुपादाय वायुर्योधानसेवत १७ प्रभासितमिवाकाशं चित्ररूपमलंकृतम् । संपतद्भिः स्थितैश्चापि नानारत्नावभासितैः १८ विमानैर्विविधैश्चित्रैरुपानीतैः सुरोत्तमैः । वज्रभृच्छुशुभे तत्र विमानस्थैः सुरैर्वृतः १९ बिभ्रन्मालां महातेजाः पद्मोत्पलसमायुताम् । विप्रेक्ष्यमाणो बहुभिर्ना-

---

पितर बसले होते ९. त्याचप्रमाणें राजा वसुमनस्, बलाक्ष, सुप्रतर्दन, अष्टक, शिबि, ययाति, नहुष, गय १०, मनु, पूरु, रघु, भानु, कृशाश्व, सगर, आणि नल हे महातेजस्वी पुरुषही देवराजाच्या विमानामध्यें दिसत होते ११. अग्नि, शंकर, सोम, वरुण, ब्रह्मदेव, धाता, विधाता, कुबेर व यम १२, अलंबुष, उग्रसेन वगैरे गंधर्व आणि तुंबुरु, ह्यांचींही विमानें आपआपल्या योग्यतेप्रमाणें व स्थानाप्रमाणें झळकूं लागलीं १३. सर्व देवगण, सिद्ध आणि महर्षि,—अर्जुन व कौरव ह्यांचें-युद्ध पहाण्याकरितां तेथें आले १४. तेव्हां, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, वसंतऋतूचे आरंभीं वनांतील पुष्पांचा ज्याप्रमाणें सुगंध सुटतो त्याप्रमाणें सर्वप्रकारच्या दिव्य पुष्पांचा शुभ गंध सर्व बाजूंनीं येऊं लागला १५. तेथें येऊन विमानामध्यें बसलेल्या देवांचीं रत्नें, छत्रें, वस्त्रें, माळा व चामरें दिसूं लागलीं १६. भूमीवरील धूळ वर उडालेली होती ती दिसेनाशी होऊन सर्वच आकाशमंडल किरणांनीं व्याप्त होऊन गेलें आणि वायुही दिव्य गंध बरोबर आणून योद्ध्यांची शुश्रूषा करूं लागला १७. नानाप्रकारच्या रत्नांच्या योगानें झळकत असलेल्या व सुरश्रेष्ठांनीं तेथें आणिलेल्या आणि आलेल्या अनेकप्रकारच्या अद्भुत विमानांनीं आकाश चित्रित, अलंकृत व प्रकाशयुक्त दिसूं लागलें आणि विमानांतील देवांनीं परिवेष्टित असलेला वज्रपाणि इंद्र तेथें शोभूं लागला १८, १९. त्या महातेजस्वी इंद्रानें नानाप्रकारच्या कमलांनीं गुंफिलेली माला धारण केली होती आणि अनेक देवांसहवर्तमान तो तें मोठें प्रचंड युद्ध पहात होता;

तृप्यत्सुमहाहवम् २० [१७४४] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे देवागमने षट्पञ्चाशत्तमोऽध्यायः ॥ ५६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ दृष्ट्वा व्यूढान्यनीकानि कुरूणां कुरुनन्दनः । तत्र वैराटिमामन्त्र्य पार्थो वचनमब्रवीत् १ जाम्बूनदमयी वेदी ध्वजे यस्य प्रदृश्यते । तस्य दक्षिणतो याहि कृपः शारद्वतो यतः २ वैशम्पायन उवाच॥ धनञ्जयवचः श्रुत्वा वैराटिस्त्वरितस्ततः । हयान्रजतसंकाशान्हेमभाण्डानचोदयत् ३ आनुपूर्व्यात्तु तत्सर्वमास्थाय जवमुत्तमम् । प्राहिणोच्चन्द्रसंकाशान्कुपितानिव तान्हयान् ४ स गत्वा कुरुसेनायाः समीपं हयकोविदः । पुनरावर्तयामास तान्हयान्वातरंहसः ५ प्रदक्षिणमुपावृत्य मण्डलं सव्यमेव च । कुरून्संमोहयामास मत्स्यो यानेन तत्त्ववित् ६ कृपस्य रथमास्थाय वैराटिरकुतोभयः । प्रदक्षिणमुपावृत्य तस्थौ तस्याग्रतो बली ७ ततोऽर्जुनः शङ्खवरं देवदत्तं महारवम् । प्रदध्मौ बलमास्थाय नाम विश्राव्य चात्मनः ८ तस्य शब्दो महानासीद्धम्यमानस्य जिष्णुना । तथा वीर्यवता

परंतु, पहातांना त्याची तृप्ति झाली नाहीं २०. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं देवांच्या आगमनाविषयीं छप्पन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५६ ॥

वैशंपायन सांगतात:— कौरवांचीं सैन्यें युद्धपद्धतीनें व्यवस्थित केल्याचें अवलोकन केल्यावर कुरुनंदन कुंतीपुत्र अर्जुन विराटपुत्र उत्तराला ह्मणाला १ " ज्याच्या ध्वजावर सुवर्णमय वेदी दिसत आहे त्याच्या उजव्या बाजूनें ह्मणजे शारद्वत कृप जिकडे आहे तिकडे चल २. वैशंपायन सांगतात:—अर्जुनाचें भाषण श्रवण केल्यावर विराटपुत्र उत्तरानें सुवर्णालंकार घातलेल्या रौप्यवर्ण अश्वांना सत्वर तिकडे प्रेरणा केली ३. सारांश, अर्जुनानें सांगितलेलें तें सर्व ओळीनें लक्ष्यांत आणून व उत्तम वेगाचें अवलंबन करून क्रुद्ध झाल्यासारिखेच दिसत असलेल्या त्या चंद्रतुल्य अश्वांना त्यानें इशारा केला ४. अश्वविद्येमध्यें निपुण असलेला तो उत्तर कौरवसेनेच्या समीप गेला आणि पुनरपि त्यानें ते वायूप्रमाणें वेगवान् अश्व वळविले ५. सारांश, अश्वतत्त्ववेत्त्या मत्स्यराज उत्तरानें उजवीं व डावीं मंडलें घेऊन रथाच्या योगानें कौरवांना अगदीं गुंग करून सोडिलें ६. नंतर कृपाचार्यांच्या रथाला अनुलक्षून तो बलाढ्य व निर्भय विराटपुत्र उत्तर प्रदक्षिणक वळला आणि त्यांच्या समोर उभा राहिला ७. तदनंतर आपलें नांव सांगून अर्जुनानें मोठ्या ध्वनीनें युक्त असलेला आपला

सङ्ख पर्वतस्येव दीर्यतः ९ पूजयाञ्चक्रिरे शङ्खं कुरवः सहसैनिकाः ।
अर्जुनेन तथा ध्मातः शतधा यन्न दीर्यते १० दिवमावृत्य शब्दस्तु निवृत्तः
शुश्रुवे पुनः । सृष्टो मघवता वज्रः प्रपतन्निव पर्वते ११ एतस्मिन्नन्तरे
वीरो बलवीर्यसमन्वितः । अर्जुनं प्रतिसंरब्धः कृपः परमदुर्जयः ॥ अमृष्य-
माणस्तं शब्दं कृपः शारद्वतस्तदा १२ अर्जुनं प्रति संरब्धो युद्धार्थी स
महारथः । महोदधिजमादाय दध्मौ वेगेन वीर्यवान् १३ स तु शब्देन
लोकांस्त्रीनावृत्य रथिनां वरः । धनुरादाय सुमहज्ज्याशब्दमकरोत्तदा १४
तौ रथौ सूर्यसंकाशौ योत्स्यमानौ महाबलौ । शारदाविव जीमूतौ व्यरो-
चेतां व्यवस्थितौ १५ ततः शारद्वतस्तूर्णं पार्थं दशभिराशुगैः । विव्याध
परवीरघ्नं निशितैर्मर्मभेदिभिः १६ पार्थोपि विश्रुतं लोके गाण्डीवं पर-
मायुधम् । विकृष्य चिक्षेप बहून्नाराचान्मर्मभेदिनः १७ तानप्राप्ताञ्शि-
तैर्बाणैर्नाराचान्रक्तभोजनान् । कृपश्चिच्छेद पार्थस्य शतशोथ सहस्रशः १८

देवदत्तनामक श्रेष्ठ शंख जोरानें फुंकिला ८. तेव्हां वीर्यवान् अर्जुन त्याप्रमाणें तो शंख संग्रामामध्यें फुंकूं लागला असतां विदीर्ण होणाऱ्या पर्वताप्रमाणें त्याचा ध्वनि मोठा होऊं लागला ९. सैनिकांसहवर्तमान कौरवांनीं त्या शंखाची प्रशंसा केली. अर्जुनानें शेंकडों वेळां जरी तो शंख फुंकिला तरी तो विदीर्ण होऊन जाणारा नव्हता १०. असो. इंद्रानें सोडिलेल्या व पर्वतावर पडणाऱ्या वज्राप्रमाणें त्या शंखाचा नाद आकाश व्याप्त करून पुनरपि भूमीवर ऐकूं येऊं लागला ११. इतक्यांत बल आणि वीर्य ह्यांनीं युक्त असल्यामुळें अत्यंत दुर्जय वीर कृपाचार्य अर्जुनावर क्रुद्ध झाले आणि ह्मणूनच त्या शारद्वत कृपाचार्यांना तो शब्द सहन होईनासा झाला १२. अर्जुनावर क्षुब्ध होऊन युद्धाची इच्छा धरणाऱ्या त्या वीर्यवान् महारथी कृपाचार्यांनींही आपला शंख घेऊन तो वेगानें वाजविला १३ आणि ह्याप्रमाणें रथ्यांमध्यें श्रेष्ठ असलेल्या त्या कृपाचार्यांनीं शंखाच्या शब्दानें सर्व त्रैलोक्य व्याप्त केल्यावर प्रचंड धनुष्य घेऊन प्रत्यंचेचा टणत्कारही केला १४. ते उभयतां महाबलाढ्य व सूर्यतुल्य रथि व्यवस्थित उभे राहून एकमेकांशीं युद्ध करूं लागले असतां शरद्दतूंतील मेघांप्रमाणें दिसूं लागले १५. तदनंतर शारद्वत कृपाचार्यांनीं तीक्ष्ण व मर्मभेदक अशा दहा बाणांनीं शत्रुवीरनाशक अर्जुनाला सत्वर वेध केला असतां १६ अर्जुनानेंही जगतामध्यें विख्यात असलेलें आपलें उत्कृष्ट गांडीव आकर्षण करून पुष्कळश मर्मभेदक नाराचबाण कृपाचार्यांवर सोडिले १७. परंतु, पार्थाचे ते रक्तप्राशन करणारे नाराचबाण आपल्यापर्यंत येऊन पोंचण्यापूर्वींच तीक्ष्ण बाणांच्या योगानें

ततः पार्थस्तु संक्रुद्धश्चित्रान्मार्गान्प्रदर्शयन् । दिशः संछादयन्बाणैः प्रदिशश्च महारथः १९ एकच्छायमिवाकाशमकरोत्सर्वतः प्रभुः । प्राच्छादयदमेयात्मा पार्थः शरशतैः कृपम् २० स शरैरर्दितः क्रुद्धः शितैरग्निशिखोपमैः । तूर्णं दशसहस्रेण पार्थमप्रतिमौजसम् २१ अर्दयित्वा महात्मानं ननर्द समरे कृपः । ततः कनकपर्वाग्रैर्वीरः संनतपर्वभिः २२ त्वरन्गाण्डीवनिर्मुक्तैरर्जुनस्तस्य वाजिनः । चतुर्भिश्चतुरस्तीक्ष्णैरविध्यत्परमेषुभिः २३ ते हया निशितैर्बाणैर्ज्वलद्भिरिव पन्नगैः । उत्पेतुः सहसा सर्वे कृपः स्थानादथाच्यवत् २४ च्युतं तु गौतमं स्थानात्समीक्ष्य कुरुनन्दनः । नाविध्यत्परवीरघ्नो रक्षमाणोऽस्य गौरवम् २५ स तु लब्ध्वा पुनः स्थानं गौतमः सव्यसाचिनम् । विव्याध दशभिर्बाणैस्त्वरितः कङ्कपत्रिभिः २६ ततः पार्थो धनुस्तस्य भल्लेन निशितेन ह । चिच्छेदैकेन भूयश्च हस्तावापमथाहरत् २७ अथास्य

कृपाचार्यांनीं त्यांचे मध्यंतरीं शेंकडों हजारों तुकडे तुकडे करून टाकिले १८. तदनंतर अर्जुन क्रुद्ध होऊन बाण सोडण्याचे अद्भुत मार्ग दर्शवूं लागला आणि बाणांच्या योगानें दिशा व उपदिशा आच्छादित करून टाकणाऱ्या त्या महारथी १९ समर्थ अर्जुनानें सर्व बाजूंनीं आकाश एकसारिख्या बाणांच्या छायेनेंच व्याप्त करून टाकिलें व त्या अतर्क्यस्वरूप अर्जुनानें शेंकडों बाणांनीं कृपाचार्यांनाही आच्छादित केलें २०. तेव्हां अग्निज्वालेप्रमाणें तीक्ष्ण असलेल्या त्या बाणांनीं व्यथित झाल्यामुळें ते कृपाचार्य क्रुद्ध झाले आणि अप्रतिम सामर्थ्यानें युक्त असलेल्या त्या महात्म्या अर्जुनाला दहा हजार बाणांनीं सत्वर वेध करून समरांगणामध्यें ते गर्जना करूं लागले. तदनंतर सुवर्णमय परंतु नमलेल्या पर्वांनीं आणि अग्रांनीं युक्त व गांडीवापासून सोडिलेल्या अशा चार तीक्ष्ण व उत्कृष्ट बाणांनीं वीर अर्जुनानें त्या कृपाचार्यांच्या चारी अश्वांना वेध केला २१,२२,२३. प्रज्वलित भुजंगच कीं काय अशा तीक्ष्ण बाणांच्या योगानें पीडित झालेल्या त्या सर्वही अश्वांनीं एकदम उड्डाण करून कृपाचार्यांना स्थानभ्रष्ट केलें २४; परंतु, स्थानापासून च्युत झालेल्या कृपाचार्यांना अवलोकन करूनही शत्रुवीरनाशक कुरुनंदन अर्जुनानें त्यांचें महत्त्व कायम राखण्याकरितां त्यांच्यावर बाण टाकिला नाहीं २५. परंतु, पुनरपि आपल्या स्थानावर येऊन कृपाचार्यांनीं त्वरेत्वरेनें दहा कंकपत्रबाणांनीं सव्यसाची अर्जुनाला वेध केला २६. तदनंतर भल्लसंज्ञक तीक्ष्ण बाणांच्या योगानें अर्जुनानें त्यांचें धनुष्य तोडिलें आणि दुसऱ्या एका बाणानें त्यांचें हस्तकवच त्यानें

कवचं बाणैर्निशितैर्मर्मभेदिभिः । व्यधमन्न च पार्थस्य शरीरमवपीडयत् २८ तस्य निर्मुच्यमानस्य कवचात्काय आबभौ । समये मुच्यमानस्य सर्पस्येव तनुर्यथा २९ छिन्ने धनुषि पार्थेन सोन्यदादाय कार्मुकम् । चकार गौतमः सज्यं तदद्भुतमिवाभवत् ३० स तदप्यस्य कौन्तेयश्चिच्छेद नतपर्वणा । एवमन्यानि चापानि बहूनि कृतहस्तवत् ३१ शारद्वतस्य चिच्छेद पाण्डवः परवीरहा । स छिन्नधनुरादाय रथशक्तिं प्रतापवान् ३२ प्राहिणोत्पाण्डुपुत्राय प्रदीप्तामशनीमिव । तामर्जुनस्तदा यान्तीं शक्तिं हेमविभूषिताम् ३३ वियद्गतां महोल्काभां चिच्छेद दशभिः शरैः । सापतद्दशधा छिन्ना भूमौ पार्थेन धीमता ३४ युगपच्चैव भल्लैस्तु ततः सज्यधनुः कृपः । तमाशु निशितैः पार्थं बिभेद दशभिः शरैः ३५ ततः पार्थो महातेजा विशिखानग्नितेजसः । चिक्षेप समरे क्रुद्धस्त्रयोदश शिलाशितान् ३६ अथास्य युगमेकेन चतुर्भिश्चतुरो हयान् । षष्ठेन च शिरः

हरण केलें २७. तदनंतर मर्मभेदक तीक्ष्ण बाणांच्या योगानें कृपाचार्यांनीं कवच अर्जुनानें उडवून दिलें; परंतु, त्यांच्या शरीराला त्यानें पीडा केली नाहीं २८. अर्जुनानें ज्यावेळीं त्यांचें कवच उडवून दिलें त्यावेळीं कवचांतून बाहेर पडणारें त्यांचें शरीर योग्यकालीं कांतींतून बाहेर पडणाऱ्या सर्पाच्या शरीराप्रमाणें भासूं लागलें २९. अर्जुनानें धनुष्य मोडून टाकिल्यावर त्या कृपाचार्यांनीं दुसरें धनुष्य घेऊन त्याला प्रत्यंचा चढविली असतां लोकांना त्याचें आश्चर्यच वाटलें ३०. परंतु, कुंतीपुत्र अर्जुनानें संनतपर्वांनीं युक्त असलेल्या बाणानें त्यांचें तेंही धनुष्य तोडिलें आणि अशारीतीनें हस्तलाघवानें युक्त असलेल्या त्या शत्रुवीरनाशक पांडुपुत्र अर्जुनानें शारद्वत कृपाचार्यांची दुसरींही पुष्कळ धनुष्यें तोडिलीं. ह्याप्रमाणें धनुष्यें मोडून गेलीं असतां प्रतापी कृपाचार्यांनीं रथशक्ति घेतली ३१, ३२ आणि प्रदीप्त विद्युल्लताच कीं काय अशी ती शक्ति त्यांनीं पांडुपुत्र अर्जुनावर फेंकिली. सुवर्णानें शृंगारिलेली आणि मोठ्या उल्केप्रमाणें दिसत असलेली ती शक्ति येतां येतां आकाशामध्यें असतांनाच अर्जुनानें दहा बाणांनीं तोडून टाकिली आणि बुद्धिमान् अर्जुनानें दहा तुकडे करून टाकिलेली ती शक्ति भूमीवर पडली ३३, ३४. इतक्यांत शक्ति सोडितांक्षणीं एकदम धनुष्य सज्ज करून कृपाचार्यांनीं भल्लसंज्ञक दहा तीक्ष्ण बाणांच्या योगानें अर्जुनाला वेध केला ३५. तदनंतर क्रुद्ध झालेल्या महातेजस्वी अर्जुनानें शिळेवर घांसलेले आणि अग्नीसारिखे तेजस्वी असे तेरा बाण समरांगणामध्यें कृपाचार्यांवर टाकिले ३६. आणि लगेच एका बाणानें रथाचें जूं तोडून दुसऱ्या चार बाणांनीं त्यांच्या चार

कायाच्छरेण रथसारथेः ३७ त्रिभिस्त्रिवेणुं समरे द्वाभ्यामक्षं महारथः ।
द्वादशेन तु भल्लेन चकर्तास्य ध्वजं तदा ३८ ततो वज्रनिकाशेन
फाल्गुनः प्रहसन्निव । त्रयोदशेनेन्द्रसमः कृपं वक्षस्यविध्यत ३९ स
छिन्नधन्वा विरथो हताश्वो हतसारथिः । गदापाणिरवप्लुत्य तूर्णं चिक्षेप
तां गदाम् ४० सा च मुक्ता गदा गुर्वी कृपेण सुपरिष्कृता । अर्जुनेन
शरैर्नुन्ना प्रतिमार्गमथागमत् ४१ तं तु योधाः परीप्सन्तः शारद्वतममर्ष-
णम् । सर्वतः समरे पार्थं शरवर्षैरवाकिरन् ४२ ततो विराटस्य सुतो-
सव्यमावृत्य वाजिनः । यमकं मण्डलं कृत्वा तान्योधान्प्रत्यवारयत् ४३ ततः
कृपमुपादाय विरथं ते नरर्षभाः । अपजह्रुर्महावेगाः कुन्तीपुत्राद्धनंज-
यात् ४४ [१७८८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैया-
सिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे कृपापयाने सप्तपञ्चाशत्त-
मोऽध्यायः ॥ ५७ ॥

वैशम्पायन उवाच ॥ कृपेऽपनीते द्रोणस्तु प्रगृह्य सशरं धनुः ।

अश्वांचाही त्यानें वध केला; सहाव्या बाणानें रथाच्या सारथ्याचें मस्तक त्यानें धडापासून वेगळें केलें ३७; तीन बाणांनीं रथाच्या दांड्या त्यानें फोडून टाकिल्या; महारथि अर्जुनानें दोन बाणांनीं संग्रामामध्यें रथाचा कणाही मोडिला आणि बाराव्या भल्ल बाणानें कृपाचार्यांचा ध्वजही त्यानें तोडून टाकिला ३८. तदनंतर इंद्रतुल्य अर्जुनानें हंसत हंसत आपल्या वज्रप्राय तेराव्या बाणानें कृपाचार्यांच्या वक्षस्थलीं वेध केला असतां ३९ धनुष्य छिन्न झालेले आणि सारथि व अश्व ह्यांचा वध झाल्यामुळें विरथ झालेले जे कृपाचार्य त्यांनीं हातामध्यें गदा घेऊन ती सत्वर त्याच्यावर फेंकिली ४०. कृपाचार्यांनीं सोडिलेली व उत्कृष्टरीतीनें शृंगारिलेली ती प्रचंड गदा अर्जुनानें बाणांनीं ताडित केल्यामुळें परत गेली ४१. तेव्हां क्रुद्ध झालेल्या त्या शारद्वत कृपाचार्यांचें प्राणरक्षण व्हावें एतदर्थ संग्रामामध्यें योद्ध्यांनीं सर्व बाजूंनीं अर्जुनाला बाणवृष्टींनीं आच्छादित केलें ४२. परंतु अश्वांच्याकडून उलटी प्रदक्षिणा करवून व यमकमंडल करून विराटाच्या पुत्रानें त्या योद्ध्यांचें निवारण केलें ४३. तदनंतर विरथ झालेल्या कृपाचार्यांना घेऊन ते कौरवपक्षाकडील पुरुषश्रेष्ठ योद्धे कुंतीपुत्र अर्जुनापासून मोठ्या वेगानें पळून गेले ४४. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वांपैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं कृपाचार्यांना रणांतून दूर नेल्याविषयीं सत्तावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५७ ॥

वैशंपायन सांगतात:— कृपाचार्यांना रणभूमींतून नेल्यावर रक्तवर्ण अश्वांनीं युक्त

अभ्यद्रवदनाधृष्यः शोणाश्वः श्वेतवाहनम् १ स तु रुक्मरथं दृष्ट्वा गुरुमायान्तमन्तिकात् । अर्जुनो जयतां श्रेष्ठ उत्तरं वाक्यमब्रवीत् २ अर्जुन उवाच ॥ यत्रैषा काञ्चनी वेदी ध्वजे यस्य प्रकाशते । उच्छ्रिता प्रवरे दण्ड पताकाभिरलंकृता ३ अत्र मां वह भद्रं ते द्रोणानीकाय सारथे । अश्वाः शोणाः प्रकाशन्ते बृहन्तश्चारुवाहिनः ४ स्निग्धविद्रुमसंकाशास्ताम्रास्याः प्रियदर्शनाः । युक्ता रथवरे यस्य सर्वशिक्षाविशारदाः ५ दीर्घबाहुर्महातेजा बलरूपसमन्वितः । सर्वलोकेषु विक्रान्तो भारद्वाजः प्रतापवान् ६ बुद्ध्या तुल्यो ह्युशनसा बृहस्पतिसमो नये । वेदास्तथैव चत्वारो ब्रह्मचर्यं तथैव च ७ ससंहाराणि सर्वाणि दिव्यान्यस्त्राणि मारिष । धनुर्वेदश्च कात्स्न्र्येन यस्मिन्नित्यं प्रतिष्ठितः ८ क्षमा दमश्च सत्यं च आनृशंस्यमथार्जवम् । एते चान्ये च बहवो यस्मिन्नित्यं द्विजे गुणाः ९ तेनाहं योद्धुमिच्छामि महाभागेन संयुगे । तस्मात्त्वं प्रापयाचार्यं क्षिप्रमुत्तर वाहय १० वैशम्पायन उवाच ॥ अर्जुनेनैवमुक्तस्तु वैराटिर्हेमभूषणान् । चोदयामास तानश्वा-

---

आणि अजिंक्य असे द्रोणाचार्य धनुर्बाण घेऊन श्वेतवाहन अर्जुनावर धांवले १. परंतु, विजयिश्रेष्ठ अर्जुन सुवर्णरथावर आरूढ होऊन जवळ आलेल्या गुरुजींना अवलोकन करितांक्षणीं उत्तराला ह्मणाला २ " पताकांनीं भूषित आणि श्रेष्ठ दंडावर उभारिलेली ही सुवर्णवेदी ज्याच्या ध्वजावर झळकत आहे ३ तिकडे, तुझें देव बरें करो, हे सारथे, द्रोणाचार्यांच्या सैन्यावर मला घेऊन जा. त्यांच्या श्रेष्ठ रथाला जोडिलेले आरक्तवर्ण अश्व सर्वशिक्षेंत तरबेज झालेले आहेत, तुळतुळीत पोंवळ्यांप्रमाणें त्यांची कांति आहे, त्यांचें मुखही आरक्तवर्ण आहे, मुद्रा आल्हादकारक आहे आणि झळकत असलेले हे मोठे धिप्पाड अश्व ओढण्यांतही उत्तम आहेत ४, ५. हा प्रतापी भरद्वाजपुत्र आजानुबाहु द्रोणाचार्य महातेजस्वी व त्रैलोक्यांतील पराक्रमी असून बलाढ्य व रूपवान् आहे ६. बुद्धीनें हा शुक्राचार्यांची बरोबरी करणारा आहे, विद्येनें हा बृहस्पतीसारिखा आहे, त्याचप्रमाणें चारी वेद, ब्रह्मचर्य ७, उपसंहारासहवर्तमान सर्व दिव्य अस्त्रें आणि पूर्णपणें धनुर्वेद हीं, हे मान्य उत्तरा, त्यांचे ठिकाणीं नित्य वास्तव्य करित आहेत ८. क्षमा, इंद्रियदमन, सत्य, सुजनता आणि सरलता हे व दुसरेही पुष्कळ गुण ह्या द्विजाचे ठिकाणीं नित्य वास्तव्य करीत आहेत ९ व ह्या महाभाग्यवान् द्विजाशीं संग्रामामध्यें युद्ध करण्याची माझी इच्छा आहे. तस्मात् , हे उत्तरा, अश्वांना त्वरा प्रेरणा कर आणि मला त्या आचार्याकडे घेऊन जा १०. वैशंपायन सांगतात:—

भारद्वाजरथं प्रति ११ तमापतन्तं वेगेन पाण्डवं रथिनां वरम् । द्रोणः प्रत्युद्ययौ पार्थं मत्तो मत्तमिव द्विपम् १२ ततः प्राध्मापयच्छङ्खं भेरीशतनिनादिनम् । प्रचुक्षुभे बलं सर्वमुद्धूत इव सागरः १३ अथ शोणान्सदश्वांस्तान्हंसवर्णैर्मनोजवैः । मिश्रितान्समरे दृष्ट्वा व्यस्मयन्त रणे नराः १४ तौ रथौ वीरसंपन्नौ दृष्ट्वा सङ्ग्राममूर्धनि । आचार्यशिष्यावजितौ कृतविद्यौ मनस्विनौ १५ समाश्लिष्टौ तदान्योन्यं द्रोणपार्थौ महाबलौ । दृष्ट्वा प्राकम्पत मुहुर्भरतानां महद्बलम् १६ हर्षयुक्तस्ततः पार्थः प्रहसन्निव वीर्यवान् । रथं रथेन द्रोणस्य समासाद्य महारथः १७ अभिवाद्य महाबाहुः सामपूर्वमिदं वचः । उवाच श्लक्ष्णया वाचा कौन्तेयः परवीरहा १८ उषिताः स्मो वने वासं प्रतिकर्म चिकीर्षवः । कोपं नार्हसि नः कर्तुं सदा समरदुर्जय १९ अहं तु प्रहृते पूर्वं प्रहरिष्यामि तेऽनघ । इति मे वर्तते बुद्धिस्तद्भवान्कर्तुमर्हति २० ततोऽस्मै प्राहिणोद्द्रोणः शरानधिकविंशतिम् ।

ह्याप्रमाणें अर्जुनानें सांगितलें असतां विराटपुत्र उत्तरानें सुवर्णानें शृंगारिलेल्या त्या अश्वांना भरद्वाजपुत्र द्रोणाचार्यांच्या रथाकडे प्रेरणा केली ११ व ह्याप्रमाणें तो रथिश्रेष्ठ पांडुपुत्र वेगानें आपणांकडे येऊं लागला असतां मत्त गज ज्याप्रमाणें मत्त गजावर चालून जातो त्याप्रमाणें द्रोणाचार्यही अर्जुनावर चालून गेले १२. तदनंतर शंभर दुंदुभींच्या स्वराप्रमाणें ज्याचा नाद मोठा आहे असा शंख द्रोणाचार्यांनीं फुंकिला असतां सर्वही सैन्य भरती आलेल्या सागराप्रमाणें क्षुब्ध झालें १३. तदनंतर आरक्तवर्ण आणि उत्कृष्ट असे द्रोणाचार्यांचे अश्व अर्जुनाच्या मनाप्रमाणें वेगवान् असलेल्या हंसवर्ण अश्वांशीं संग्रामामध्यें मिश्र झाल्याचें पाहून लोक विस्मयचकित झाले १४. रथी, वीर, क्षात्रगुणसंपन्न, धनुर्विद्येमध्यें निपुण, महाबलाढ्य व विचारी असे ते अजिंक्य गुरुशिष्य द्रोणार्जुन संग्रामाचे अग्रभागीं एकमेकांशीं भिडलेले पाहून भरतवंशज कौरवांचें तें मोठें सैन्य थरथर कांपूं लागलें १५,१६. महारथी कुंतीपुत्र वीर्यवान् अर्जुन आनंदित होऊन हंसत हंसत रथानें द्रोणाचार्यांच्या रथापाशीं गेला असतां १७, त्यानें त्यांना अभिवंदन केलें आणि तो शत्रुवीरनाशक महापराक्रमी कुंतीपुत्र अर्जुन सौम्य शब्दांनीं व मधुर वाणीनें त्यांना असें ह्मणाला १८ " वनामध्यें आह्मीं वास्तव्य केलें आहे आणि आतां प्रतिपक्षी ह्या नात्यानें आपलें कर्तव्य करण्याची आमची इच्छा आहे. ह्यास्तव, हे संग्रामामध्यें अजिंक्य आचार्य, आपण आमच्यावर क्रोध करूं नये १९. हे निष्पाप, आपण प्रहार केल्यानंतर मीं आपणाला प्रहार करावा अशी माझी इच्छा आहे ती आपण शेवटास न्यावी " २०. तदनंतर द्रोणाचार्यांनीं विसांपेक्षां अधिक

अप्राप्तांश्चैव तान्पार्थश्चिच्छेद कृतहस्तवत् २१ ततः शरसहस्रेण रथं पार्थस्य वीर्यवान् । अवाकिरत्ततो द्रोणः शीघ्रमस्त्रं विदर्शयन् २२ हयांश्च रजतप्रख्यान्कङ्कपत्रैः शिलाशितैः । अवाकिरदमेयात्मा पार्थं संकोपयन्निव २३ एवं प्रववृते युद्धं भारद्वाजकिरीटिनोः । समं विमुञ्चतोः सङ्ख्ये विशिखान्दीप्ततेजसः २४ तावुभौ ख्यातकर्माणावुभौ वायुसमौ जवे । उभौ दिव्यास्त्रविदुषावुभावुत्तमतेजसौ २५ क्षिपन्तौ शरजालानि मोहयामासतुर्नृपान् । व्यस्मयन्त ततो योधा ये तत्रासन्समागताः २६ शरान्विसृजतोस्तूर्णं साधु साध्वित्यपूजयन् । द्रोणं हि समरे कोऽन्यो योद्धुमर्हति फाल्गुनात् २७ रौद्रः क्षत्रियधर्मोऽयं गुरुणा यदयुध्यत । इत्यब्रुवञ्जनास्तत्र सङ्ग्रामशिरसि स्थिताः २८ वीरौ तावभिसंरब्धौ संनिकृष्टौ महाभुजौ । छादयेतां शरव्रातैरन्योन्यमपराजितौ २९ विस्फार्य सुमहच्चापं हेमपृष्ठं दुरासदम् । भारद्वाजोऽथ संक्रुद्धः फाल्गुनं प्रत्यविध्यत ३० स सायकमयै-

---

बाण प्रथमतः अर्जुनावर टाकिले व ते येऊन पोंचण्यापूर्वीच हस्तलाघवानें युक्त असलेल्या अर्जुनानें तोडून टाकिले २१. तदनंतर आपलें अस्त्रकौशल दाखविण्याकरितां वीर्यवान् द्रोणाचार्यांनीं हजार बाणांच्या योगानें अर्जुनाचा रथ भरून टाकिला २२ आणि शिळेवर घांसलेल्या कंकपत्रबाणांच्या योगानें त्या अतर्क्यस्वरूप द्रोणाचार्यांनीं अर्जुनाला कोप आणण्याकरितांच कीं काय त्याच्या रौप्यवर्ण अश्वांनाही व्यापून टाकिलें २३. ह्याप्रमाणें उज्ज्वल तेजानें युक्त असलेले बाण संग्रामामध्यें सोडीत असलेल्या द्रोणार्जुनांचें युद्ध सुरू झालें २४. उभयतांही पराक्रमाविषयीं प्रख्यात, उभयतांही वेगामध्यें वायुतुल्य, उभयतांही दिव्यास्त्रज्ञ, उभयतांही उत्तम तेजस्वी २५ आणि उभयतांही बाणसमुदाय सोडीत असलेले ते द्रोणार्जुन इतर राजांना मोह पाडूं लागले. त्या ठिकाणीं जुळलेले योद्धे विस्मयचकित झाले २६; आणि ते द्रोणार्जुन सत्वर बाण सोडूं लागले असतां "शाबास शाबास" ह्मणून त्या उभयतांची प्रशंसाही त्यांनीं केली. "अहो, अर्जुनावांचून दुसरा कोण बरें द्रोणाचार्यांशीं संग्रामामध्यें युद्ध करणारा आहे ? २७. अहो, गुरूंशींही ज्याअर्थीं अर्जुनानें युद्ध केलें त्याअर्थीं हा क्षात्रधर्म भयंकर आहे." असें संग्रामामध्यें असलेले लोक बोलूं लागले २८. क्षुब्ध होऊन एकमेकांशीं भिडून गेलेल्या त्या उभयतां आजानुबाहु व अजिंक्य वीरांनीं बाणसमूहांच्या योगानें एकमेकांला आच्छादित करून टाकिलें २९. सौवर्णपृष्ठभागानें युक्त असलेलें आपलें फारच मोठें व हातांत घेण्यासही अति कठीण असलेलें धनुष्य आकर्षण करून क्रुद्ध झालेल्या भरद्वाजपुत्र द्रोणाचार्यांनीं अर्जुनाला वेध

जालैरर्जुनस्य रथं प्रति । भानुमद्भिः शिलाधौतैर्भानोराच्छादयत्प्रभाम् ३१
पार्थं च सुमहाबाहुर्महावेगैर्महारथः । विव्याध निशितैर्बाणैर्मेघो वृष्ट्येव
पर्वतम् ३२ तथैव दिव्यं गाण्डीवं धनुरादाय पाण्डवः । शत्रुघ्नं वेगवा-
न्हृष्टो भारसाधनमुत्तमम् ३३ विससर्ज शरांश्चित्रान्सुवर्णविकृतान्बहून् ।
नाशयञ्शरवर्षाणि भारद्वाजस्य वीर्यवान् ३४ तूर्णं चापविनिर्मुक्तैस्तदद्भुत-
मिवाभवत् । स रथेन चरन्पार्थः प्रेक्षणीयो धनञ्जयः ३५ युगपद्दिक्षु
सर्वासु सर्वतोऽस्त्राण्यदर्शयत् । एकच्छायमिवाकाशं बाणैश्चक्रे समन्ततः ३६
नादृश्यत तदा द्रोणो नीहारेणेव संवृतः । तस्याभवत्तदा रूपं संवृतस्य
शरोत्तमैः ३७ जाज्वल्यमानस्य तदा पर्वतस्येव सर्वतः । दृष्ट्वा तु पार्थस्य
रणे शरैः स्वरथमावृतम् ३८ स विस्फार्य धनुःश्रेष्ठं मेघस्तनित-
निःस्वनम् । अग्निचक्रोपमं घोरं व्यकर्षत्परमायुधम् ३९ व्यशा-
तयच्छरांस्तांस्तु द्रोणः समितिशोभनः । महानभूत्ततः शब्दो वंशानामिव

केला ३०; शिळेवर घांसलेले व उज्ज्वल असलेले बाणमय समुदाय अर्जुनाच्या रथा-
वर सोडून त्या द्रोणाचार्यांनीं सूर्याची प्रभाही आच्छादित करून टाकिली ३१
आणि मेघ ज्याप्रमाणें वृष्टीनें पर्वताला वेध करितो त्याप्रमाणें त्या महारथी व आजानु-
बाहु द्रोणाचार्यांनीं अतिवेगवान् व तीक्ष्ण बाणांच्या योगानें अर्जुनाला वेध केला ३२.
तदनंतर शत्रुघातक व शक्ति सहन करणारें असें आपलें उत्कृष्ट व दिव्य
गांडीव धनुष्य आनंदित झालेल्या अर्जुनानें हातीं घेतलें ३३ आणि
सोनें लाविलेले असंख्य अद्भुत बाण त्यानें सोडिले; व ह्याप्रमाणें धनुष्यापासून सोडि-
लेल्या बाणांनीं तो वीर्यवान् अर्जुन भरद्वाजपुत्र द्रोणाचार्यांच्या बाणवृष्टींचा सत्वर
नाश करूं लागला असतां लोकांना मोठें आश्चर्यच वाटूं लागलें. रथाच्या योगानें
संचार करणाऱ्या त्या प्रेक्षणीय कुंतीपुत्र अर्जुनानें ३४,३५ एकदम सर्व दिशेस सर्व
बाजूंनीं अस्त्रकौशल दाखवून बाणांच्या योगानें आकाशामध्यें सर्वस्वीं त्यानें एकसारिखें
छतच घालून टाकिलें ३६. त्यावेळीं धुक्यानें व्याप्त झाल्याप्रमाणें ज्यांची अवस्था
झाली आहे असे द्रोणाचार्य दिसेनासे झाले आणि उत्कृष्ट बाणांनीं व्याप्त झालेल्या
त्या द्रोणाचार्यांचें रूप ३७ त्यावेळीं सर्व बाजूंनीं प्रज्वलित झालेल्या पर्वताच्या रूपा-
प्रमाणें दिसूं लागलें. संग्रामामध्यें अर्जुनाच्या बाणांनीं आपला रथ व्याप्त झाल्याचें
पाहून ३८ द्रोणाचार्यांनीं मेघगर्जनेप्रमाणें ज्याचा ध्वनि आहे असें आपलें अग्निच-
क्रतुल्य सर्वोत्कृष्ट उत्तम घोर धनुष्य प्रत्यंचेचा टणत्कार करून आकर्षण केलें ३९.
आणि संग्रामामध्यें शोभणाऱ्या द्रोणाचार्यांनीं अर्जुनाचे ते बाण तोडून टाकिले; त्यावेळीं

दह्यताम् ४० जाम्बूनदमयैः पुङ्खैश्चित्रचापविनिर्गतैः । प्राच्छादयदमेयात्मा दिशः सूर्यस्य च प्रभाम् ४१ ततः कनकपुङ्खानां शराणां नतपर्वणाम् । वियच्चराणां वियति दृश्यन्ते बहवो व्रजाः ४२ द्रोणस्य पुङ्खसक्ताश्च प्रभवन्तः शरासनात् । एको दीर्घ इवादृश्यदाकाशे संहतः शरः ४३ एवं तौ स्वर्णविकृतान्विमुञ्चन्तौ महाशरान् । आकाशं संवृतं वीरावुल्काभिरिव चक्रतुः ४४ शरास्तयोस्तु विबभुः कङ्कबर्हिणवाससः । पङ्क्त्यः शरदि स्वस्थानां हंसानां चरतामिव ४५ युद्धं समभवत्तत्र सुसंरब्धं महात्मनोः । द्रोणपाण्डवयोर्घोरं वृत्रवासवयोरिव ४६ तौ गजाविव चासाद्य विषाणाग्रैः परस्परम् । शरैः पूर्णायतोत्सृष्टैरन्योन्यमभिजघ्नतुः ४७ तौ व्यवाहरतां युद्धे संरब्धौ रणशोभिनौ । उदीरयन्तौ समरे दिव्यान्यस्त्राणि भागशः ४८ अथ त्वाचार्यमुख्येन शरान्सृष्टाञ्छिलाशितान् । न्यवारयच्छितैर्बाणैरर्जुनो जयतां वरः ४९ दर्शयन्वी-

---

जळूं लागलेल्या काळकाप्रमाणें मोठा शब्द होऊं लागला ४०. आणि सुवर्णमय पुच्छभागांनीं, युक्त व अद्भुत धनुष्यापासून सुटलेल्या बाणांच्या योगानें त्या अतर्क्यरूप द्रोणाचार्यांनीं दिशा व सूर्याची प्रभा ह्यांना आच्छादित केलें ४१. तदनंतर सौवर्णपुंख आणि नमलेली पर्वें ह्यांनीं युक्त असलेल्या गगनसंचारी बाणांचे पुष्कळच समुदाय आकाशामध्यें दृष्टीं पडूं लागले ४२. पुढल्या बाणाच्या पिच्छयुक्त भागाचे ठिकाणीं मागला घुसून बसलेला अशारीतीनें धनुष्यापासून निघून एकमेकांशीं चिकटून राहिलेले द्रोणाचार्यांचे बाण ह्मणजे आकाशामध्यें एकच दीर्घ बाण आहे कीं काय असें दिसूं लागलें ४३. ह्याप्रमाणें सुवर्णयुक्त मोठे मोठे बाण सोडूं लागलेल्या त्या उभयतां वीरांनीं आकाश जसें कांहीं उल्कांच्याच योगानें व्याप्त करून टाकिलें ४४. कंक आणि मयूर ह्या पक्ष्यांचीं पिसें ज्यांना लाविलेलीं आहेत अशा त्या उभयतांचे बाण शरदृतूंत आकाशामध्यें स्वस्थ संचार करणाऱ्या हंसपंक्तींप्रमाणें भासूं लागले ४५. वृत्र आणि इंद्र ह्यांत झालेल्या युद्धाप्रमाणें त्या महात्म्या द्रोणार्जुनामध्यें अत्यंत तुमुल व घोर युद्ध झालें ४६. ज्याप्रमाणें गज दंतांच्या अग्रांनीं एकमेकाला प्रहार करीत असतात त्याप्रमाणें प्रत्यंचेचें पूर्ण आकर्षण करून सोडिलेल्या बाणांच्या योगानें ते एकमेकांवर प्रहार करूं लागले ४७. रणामध्यें शोभणारे ते उभयतां द्रोणार्जुन संग्रामामध्यें अतिशय क्षुब्ध होऊन जरी पाळीपाळीनें दिव्य अस्त्रांचे प्रयोग करीत होते तरी त्यांनीं धर्मयुद्धच चालविलें होतें ४८. असो. आचार्यश्रेष्ठ द्रोणांनीं शिळेवर घांसलेले जे बाण सोडिले होते त्यांचें विजयिश्रेष्ठ

क्षमाणानामस्त्रमुग्रपराक्रमः । इषुभिस्तूर्णमाकाशं बहुभिश्च समावृणोत् ५० जिघांसन्तं नरव्याघ्रमर्जुनं तिग्मतेजसम् । आचार्यमुख्यः समरे द्रोणः शस्त्रभृतां वरः ॥ अर्जुनेन सहाक्रीडच्छरैः सन्नतपर्वभिः ५१ दिव्यान्यस्त्राणि वर्षन्तं तस्मिन्वै तुमुले रणे । अस्त्रैरस्त्राणि संवार्य फाल्गुनं समयोधयत् ५२ तयोरासीत्संप्रहारः क्रुद्धयोर्नरसिंहयोः । अमर्षिणोस्तदान्योन्यं देवदानवयोरिव ५३ ऐन्द्रं वायव्यमाग्नेयमस्त्रमस्त्रेण पाण्डवः । द्रोणेन मुक्तमात्रं तु ग्रसति स्म पुनः पुनः ५४ एवं शूरौ महेष्वासौ विसृजन्तौ शिताञ्शरान् । एकच्छायं चक्रतुस्तावाकाशं शरवृष्टिभिः ५५ तत्रार्जुनेन मुक्तानां पततां वै शरीरिषु । पर्वतेष्विव वज्राणां शराणां श्रूयते स्वनः ५६ ततो नागा रथाश्चैव वाजिनश्च विशाम्पते । शोणिताक्ता व्यदृश्यन्त पुष्पिता इव किंशुकाः ५७ बाहुभिश्च सकेयूरैर्विचित्रैश्च महारथैः । सुवर्णचित्रैः कवचैर्ध्वजैश्च विनिपातितैः ५८ योधैश्च निहतैस्तत्र पार्थबाणप्रपीडितैः । बलमासीत्समुद्भ्रान्तं द्रोणार्जुनसमागमे ५९

अर्जुनानें तीक्ष्ण बाणांनीं निवारण केलें ४९. नंतर प्रेक्षकांना आपलें अस्त्रकौशल दाखविणाऱ्या त्या भयंकरपराक्रमी अर्जुनानें असंख्य बाणांनीं सत्वर आकाश व्याप्त करून टाकिलें ५०. तदनंतर शस्त्रधरांमध्यें श्रेष्ठ आणि आचार्यांमध्यें मुख्य असलेल्या द्रोणाचार्यांनीं पुरुषश्रेष्ठ व उग्रतेजस्वी अर्जुन जरी निकरानें युद्ध करीत होता तरी नमलेल्या पर्वांनीं युक्त असलेल्या बाणांच्या योगानें ह्याच्यासहवर्तमान जशी कांहीं क्रीडा करीत करीतच युद्ध चालविलें होतें ५१. त्या तुमुल संग्रामामध्यें अर्जुन दिव्य अस्त्रांचा वर्षाव करूं लागला असतां आपल्या अस्त्रांनीं त्या अस्त्रांचें निवारण करून द्रोणाचार्यांनीं त्याशें निवारण केलें ५२; व क्रुद्ध झालेले देवदैत्यच एकमेकांशीं युद्ध करीत आहेत कीं काय अशा त्या उभयतां क्रुद्ध झालेल्या पुरुषश्रेष्ठांमध्यें युद्ध सुरू झालें ५३. ऐंद्र, वायव्य, आग्नेय वगैरेपैकीं कोणतेंही अस्त्र द्रोणांनीं सोडिलें असतां पांडुपुत्र अर्जुन आपल्या अस्त्राच्या योगानें तें वारंवार ग्रस्त करून टाकूं लागला ५४. ह्याप्रमाणें तीक्ष्ण बाण सोडणाऱ्या त्या महाधनुर्धारी शूरांनीं बाणवृष्टींच्या योगानें आकाश सर्व व्यापून टाकिलें ५५. अर्जुनानें सोडिलेले बाण त्या रणभूमीमध्यें योद्ध्यांच्या शरीरांवर पडूं लागले असतां पर्वतांवर पडणाऱ्या वज्रांप्रमाणें त्यांचा शब्द कानीं येऊं लागला ५६. तदनंतर, हे प्रजापालका, रक्तानें भरलेले गज, रथ व अश्व त्या ठिकाणीं प्रफुल्लित पलाशवृक्षांप्रमाणें दिसूं लागले ५७. त्या द्रोणार्जुनांचा संग्राम सुरू झाला असतां बाहुभूषणांसहवर्तमान हात, मोठे मोठे विचित्र रथ, सुवर्णानें भूषित केलेलीं कवचें, तोडून पाडिलेले

विधुन्वानौ तु तौ तत्र धनुषी भारसाधने । आच्छादयेतामन्योन्यं ततक्षतुरथेषुभिः ६० तयोः समभवद्युद्धं तुमुलं भरतर्षभ । द्रोणकौन्तेययोस्तत्र बलिवासवयोरिव ६१ अथ पूर्णायतोत्सृष्टैः शरैः सन्नतपर्वभिः । व्यदारयेतामन्योन्यं प्राणद्यूते प्रवर्तिते ६२ अथान्तरिक्षे नादोभूद्द्रोणं तत्र प्रशंसताम् । दुष्करं कृतवान्द्रोणो यदर्जुनमयोधयत् ६३ प्रमाथिनं महावीर्यं दृढमुष्टिं दुरासदम् । जेतारं देवदैत्यानां सर्वेषां च महारथम् ६४ अविभ्रमं च शिक्षां च लाघवं दूरपातिताम् । पार्थस्य समरे दृष्ट्वा द्रोणस्याभूच्च विस्मयः ६५ अथ गाण्डीवमुद्यम्य दिव्यं धनुरमर्षणः । विचकर्ष रणे पार्थो बाहुभ्यां भरतर्षभ ६६ तस्य बाणमयं वर्षं शलभानामिवायतिम् । दृष्ट्वा ते विस्मिताः सर्वे साधु साध्वित्यपूजयन् ६७ न च बाणान्तरे वायुरस्य शक्नोति सर्पितुम् ६८ अनिशं संदधानस्य शरानुत्सृजतस्तथा । ददर्श नान्तरं कश्चित्पार्थस्याददतोपि च ६९ तथा शीघ्रास्त्रयुद्धे तु वर्तमाने सुदारुणे । शीघ्रं शीघ्रतरं पार्थः शरान-

---

ध्वज ५८ आणि अर्जुनाच्या बाणांचा प्रहार झाल्यामुळें वध पावून पडलेले योद्धे ह्यांच्या योगानें सैन्य घाबरून गेलें ५९. तदनंतर जोर सहन करणारीं धनुष्यें हालवीत हालवीत बाणांच्या योगानें त्या उभयतांनीं एकमेकाला आच्छादित करून जेरीस आणिलें ६० व हे भरतवंशजश्रेष्ठा, बलि व इंद्र ह्यांतील युद्धाप्रमाणें त्या द्रोणार्जुनामध्यें तुमुल युद्ध झालें ६१. नंतर एकमेकांचें प्राण हरण करण्याचा पण करूनच कीं काय अति निकरानें युद्ध सुरू झालें असतां संनतपर्वांनीं युक्त व धनुष्य पूर्ण ताणून सोडिलेल्या बाणांच्या योगानें ते उभयतां एकमेकांचीं शरीरें विदीर्ण करूं लागले ६२. तदनंतर देवादिक द्रोणाचार्यांची प्रशंसा करूं लागले असतां "अर्जुनाशीं द्रोणानें संग्राम केला हें त्यानें फार दुर्घट कृत्य केलें. कारण, शत्रूंचा नाश करणारा महारथी अर्जुन दृढमुष्टि, महावीर्यवान् व अजिंक्य असून सर्व देवदैत्यांना जिंकणारा आहे" असा आकाशामध्यें शब्द होऊं लागला ६३,६४; व समरांगणामध्यें अर्जुनाचें भ्रमराहित्य, शिक्षा, हस्तलाघव आणि दूरपातित्व अवलोकन करून द्रोणाचार्यांनाही विस्मय झाला ६५. तदनंतर, हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, क्रुद्ध अर्जुनानें आपलें दिव्य गांडीव धनुष्य सांवरून घेऊन संग्रामामध्यें हातांनीं खेंचून धरिलें असतां ६६ टोळांच्या थव्याप्रमाणें त्याची बाणमय वृष्टि अवलोकन करून ते सर्वही कौरवपक्षीय योद्धे विस्मित झाले आणि "शाबास, शाबास" ह्मणून त्याची प्रशंसा करूं लागले ६७. अर्जुनाच्या बाणांमध्यें वायूलाही प्रवेश करणें अशक्य होऊं लागलें ६८. बाण काढणें, लावणें व सोडणें ह्यांमध्यें कालाचें अंतर

स्यानुदीरयत् ७० ततः शतसहस्राणि शराणां नतपर्वणाम् । युगपत्प्राप-तंस्तत्र द्रोणस्य रथमन्तिकात् ७१ कीर्यमाणे तदा द्रोणे शरैर्गाण्डीवध-न्वना । हाहाकारो महानासीत्सैन्यानां भरतर्षभ ७२ पाण्डवस्य तु शीघ्रास्त्रं मघवा प्रत्यपूजयत् । गन्धर्वाप्सरसश्चैव ये च तत्र समागताः ७३ ततो वृन्देन महता रथानां रथयूथपः । आचार्यपुत्रः सहसा पाण्डवं पर्य-वारयत् ७४ अश्वत्थामा तु तत्कर्म हृदयेन महात्मनः । पूजयामास पार्थस्य कोपं चास्याकरोद्भृशम् ७५ स मन्युवशमापन्नः पार्थमभ्यद्रव-द्रणे । किरञ्छरसहस्राणि पर्जन्य इव वृष्टिमान् ७६ आवृत्य तु महा-बाहुर्यतो द्रौणिस्ततो हयान् । अन्तरं प्रददौ पार्थो द्रोणस्य व्यपसर्पि-तुम् ७७ स तु लब्ध्वान्तरं तूर्णमपायाज्जवनैर्हयैः । छिन्नवर्मध्वजः शूरो निकृत्तः परमेषुभिः ७८ [१८६६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहि-तायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे द्रोणापयानेऽष्टप-ञ्चाशत्तमोऽध्यायः ॥ ५८ ॥

मुळींच दिसेनासे झालें ६९. असो. ह्याप्रमाणें चलाखीनें अस्त्रयुद्ध सुरू झालें असतां जितकी ह्मणून त्वरा होणें शक्य आहे तिच्याहीपेक्षां जास्त त्वरेनें अर्जुन अधिक अधिकच बाण सोडूं लागला ७०. तदनंतर ज्यांचीं पेरें नमलेलीं आहेत असे लाखों बाण द्रोणाचार्यांच्या रथाजवळ एकदम पडूं लागले ७१ व गांडीवधनुर्धारी अर्जुन अशारीतीनें बाणांच्या योगानें द्रोणाचार्यांना ग्रासूं लागला असतां, हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, सैन्यामध्यें मोठा हाहाकार उडून राहिला ७२. पांडुपुत्र अर्जुनाच्या अस्त्र-लाघवाची इंद्र प्रशंसा करूं लागला आणि तेथें जुळलेले गंधर्व व अप्सरा ह्यांनींही त्याची प्रशंसा केली ७३. तदनंतर रथसमूहाचें परिपालन करणारा आचार्यपुत्र अश्वत्थामा रथांचा प्रचंड समुदाय बरोबर घेऊन एकाएकीं पांडुपुत्र अर्जुनाचें निवारण करूं लागला ७४. महात्म्या अर्जुनाच्या त्या पराक्रमाबद्दल अश्वत्थामा मनामध्यें त्याची प्रशंसा करीत होता; परंतु, बाहेरून तो अर्जुनावर अतिशयच रागावला होता ७५. असो. क्रोधाधीन झालेला तो अश्वत्थामा जलवृष्टि करणाऱ्या मेघाप्रमाणें हजारों बाणांचा वर्षाव करीत करीत संग्रामामध्यें अर्जुनावर चालून गेला असतां ७६ महापराक्रमी अर्जुनानें जिकडे द्रोणपुत्र अश्वत्थामा होता तिकडे आपले अश्व वळविले आणि द्रोणाचार्यांना निघून जाण्यालाही त्यानें मार्ग दिला ७७; व तो मार्ग प्राप्त झाल्यावर अर्जुनाच्या प्रचंड बाणांनीं ज्यांचें कवच व ध्वज तुटून जाऊन शरीरही विदीर्ण होऊन गेलेलें आहे, ते शूर द्रोणाचार्य वेगवान् अश्वांच्या योगानें रणांतून सत्वर

वैशम्पायन उवाच ॥ ततो द्रौणिर्महाराज प्रययावर्जुनं रणे । तं पार्थः
प्रतिजग्राह वायुवेगमिवोद्धतम् ॥ शरजालेन महता वर्षमाणमिवाम्बुदम् १
तयोर्देवासुरसमः सन्निपातो महानभूत् । किरतोः शरजालानि वृत्रवा-
सवयोरिव २ न स्म सूर्यस्तदा भाति न च वाति समीरणः । शरजाला-
वृते व्योम्नि च्छायाभूते समन्ततः ३ महांश्चटचटाशब्दो योधयोर्हन्यमा-
नयोः । दह्यतामिव वेणूनामासीत्परपुरंजय ४ हयानस्यार्जुनः सर्वान्कृ-
तवानल्पजीवितान् । ते राजन्न प्रजानन्त दिशं काञ्चन मोहिताः ५
ततो द्रौणिर्महावीर्यः पार्थस्य विचरिष्यतः । विवरं सूक्ष्ममालोक्य ज्यां
चिच्छेद क्षुरेण ह ६ तदस्यापूजयन्देवाः कर्म दृष्ट्वातिमानुषम् ७ द्रोणो
भीष्मश्च कर्णश्च कृपश्चैव महारथाः । साधु साध्विति भाषन्तोपूजय-
न्कर्म तस्य तत् ८ ततो द्रौणिर्धनुःश्रेष्ठमपकृष्य रथर्षभम् । पुनरेवाहन-
त्पार्थं हृदये कङ्कपत्रिभिः ९ ततः पार्थो महाबाहुः प्रहस्य स्वनवत्तदा ।

निघून गेले ७८. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं द्रोणाचार्य रणांतून निघून गेल्याविषयीं अठ्ठावन्नावा अध्याय समाप्त झाला ॥ ५८ ॥

वैशंपायन सांगतातः—हे महाराज जनमेजया, तदनंतर रणभूमीमध्यें द्रोणपुत्र अश्वत्थामा अर्जुनावर चालून आला असतां वायूप्रमाणें वेगवान् असलेल्या आणि बेफाम होऊन मेघाप्रमाणें वृष्टि करीत असलेल्या त्या अश्वत्थाम्याचा अर्जुनानेंही आदर केला १. इंद्र व वृत्र ह्यांप्रमाणें बाणसमुदायांचा वर्षाव करणाऱ्या त्या उभयतांमध्यें देवदैत्यांच्या युद्धाप्रमाणें मोठें युद्ध झालें २. आकाश सर्व बाजूंनीं बाणसमूहांनीं आच्छादित होऊन छायारूप बनून गेल्यामुळें त्या संग्रामांत सूर्यही भासेनासा झाला आणि वारा वहाणेंही बंद होऊन गेलें ३. हे शत्रुसमूहविजयी जनमेजया, ते उभयतां एकमेकांवर प्रहार करूं लागले असतां दग्ध होणाऱ्या कळकांप्रमाणें खाड खाड असा मोठा शब्द होऊं लागला ४. हे जनमेजयराजा, अर्जुनानें अश्वत्थाम्याचे सर्वही अश्व अगदीं जेरीस आणिल्यामुळें ते गोंधळून गेले आणि त्यांना कोणतीच दिशा उमगेनाशी झाली ५. तदनंतर संग्रामामध्यें संचार करणाऱ्या अर्जुनाचें सूक्ष्म छिद्र पाहून महावीर्यवान् द्रोणपुत्र अश्वत्थाम्यानें त्याच्या धनुष्याची दोरी क्षुरप्र बाणानें तोडून टाकिली असतां ६ तें अमानुष कर्म पाहून देवांनींही त्याची प्रशंसा केली ७; आणि द्रोण, भीष्म, कर्ण व कृप हेही महारथी "शाबास, शाबास" असें ह्मणून त्याच्या त्या कृत्याची प्रशंसा करूं लागले ८. तदनंतर द्रोणपुत्र अश्वत्थाम्यानें

योजयामास नवया मौर्व्या गाण्डीवमोजसा १० ततोऽर्धचन्द्रमावृत्य तेन
पार्थः समागमत् । वारणेनेव मत्तेन मत्तो वारणयूथपः ११ ततः प्रव-
वृते युद्धं पृथिव्यामेकवीरयोः । रणमध्ये द्वयोरेवं सुमहल्लोमहर्षणम् १२
तौ वीरौ ददृशुः सर्वे कुरवो विस्मयान्विताः । युध्यमानौ महावीर्यौ
यूथपाविव संगतौ १३ तौ समाजघ्नतुर्वीरावन्योन्यं पुरुषर्षभौ । शरैराशी-
विषाकारैर्ज्वलद्भिरिव पन्नगैः १४ अक्षय्याविषुधी दिव्यौ पाण्डवस्य
महात्मनः । तेन पार्थो रणे शूरस्तस्थौ गिरिरिवाचलः १५ अश्वत्थाम्नः
पुनर्बाणाः क्षिप्रमभ्यस्यतो रणे । जग्मुः परिक्षयं तूर्णमभूत्तेनाधिकोऽर्जुनः १६
ततः कर्णो महाचापं विकृष्याभ्यधिकं तथा । अवाक्षिपत्ततः शब्दो हाहा-
कारो महानभूत् १७ ततश्चक्षुर्दधे पार्थो यत्र विस्फार्यते धनुः । ददर्श
तत्र राधेयं तस्य कोपो व्यवर्धत १८ स रोषवशमापन्नः कर्णमेव जिघां-
सया । तमैक्षत विवृत्ताभ्यां नेत्राभ्यां कुरुपुङ्गवः १९ तथा तु विमुखे पार्थे

आपलें श्रेष्ठ धनुष्य आकर्षण केलें आणि पुनरपि श्रेष्ठरथी अर्जुनाच्या हृदयावर कंकपत्र-बाणांनीं वेध केला ९. तदनंतर महापराक्रमी अर्जुन उच्च स्वरानें हंसला आणि वेगावेगानें त्यानें गांडीवधनुष्याला नवी प्रत्यंचा लाविली १०. नंतर मत्त गजाशीं ज्याप्रमाणें मत्त गजसमूहाधिपति भिडतो त्याप्रमाणें अर्धचंद्राकृति वळण घेऊन अर्जुन त्या अश्वत्थाम्याशीं भिडला असतां ११ पृथ्वींतील वीर असलेल्या त्या उभयतांत संग्रामामध्यें अंगावर कांटा आणणारें असें फारच मोठें युद्ध सुरू झालें १२; व मत्त गजांप्रमाणें एकमेकांशीं भिडून गेलेले ते महावीर्यवान् वीर युद्ध करूं लागले असतां सर्वही कौरव विस्मयचकित होऊन त्यांच्याकडे पाहूं लागले १३. त्या पुरुषश्रेष्ठ वीरांनीं उज्ज्वल भुजंगच कीं काय अशा सर्पाकृति बाणांनीं एकमेकांना प्रहार करण्यास आरंभ केला १४. महात्म्या पांडुपुत्र अर्जुनाचे भाते अक्षय्य होते; त्यामुळें तो कुंतीपुत्र शूर अर्जुन संग्रामामध्यें पर्वताप्रमाणें निश्चल राहिला १५. परंतु, रणामध्यें सत्वर बाणप्रयोग करणाऱ्या अश्वत्थाम्याचे बाण तेव्हांच संपून जाऊं लागले आणि त्यामुळें अर्जुनाचें वर्चस्व दिसूं लागलें १६. तदनंतर कर्णानें आपलें प्रचंड धनुष्य अतिशयच ओढून त्याचा टणत्कार केला असतां मोठा हाहाकार उडून राहिला १७. तेव्हां, जिकडे धनुष्याचा टणत्कार चालला होता तिकडे अर्जुनानें दृष्टि दिली असतां, राधापुत्र कर्ण त्याच्या दृष्टीं पडला; आणि तो दृष्टीं पडतांक्षणीं त्याचा कोप अधिकच वाढला १८. असो. क्रोधाच्या अधीन होऊन गेलेला तो कुरुवंशजश्रेष्ठ अर्जुन कर्णाचा वध करण्याच्या इच्छेनें

द्रोणपुत्रस्य सायकात्। त्वरिताः पुरुषा राजन्नुपाजह्रुः सहस्रशः२० उत्सृज्य च महाबाहुर्द्रोणपुत्रं धनञ्जयः। अभिदुद्राव सहसा कर्णमेव सपत्नजित् २१ तमभिद्रुत्य कौन्तेयः क्रोधसंरक्तलोचनः। कामयन्द्वैरथं तेन युद्धं वचनमब्रवीत् २२ [१८८८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहेऽर्जुनाश्वत्थामयुद्ध एकोनषष्टितमोऽध्यायः ॥ ५९ ॥

अर्जुन उवाच ॥ कर्ण यत्ते सभामध्ये बहु वाचा विकत्थितम्। न मे युधि समोऽस्तीति तदिदं समुपस्थितम् १ सोऽद्य कर्ण मया सार्धं व्यवहृत्य महामृधे। ज्ञास्यस्यबलमात्मानं न चान्यानवमन्यसे २ अवोचः परुषा वाचो धर्ममुत्सृज्य केवलम्। इदं तु दुष्करं मन्ये यदिदं ते चिकीर्षितम् ३ यत्त्वया कथितं पूर्वं मामनासाद्य किंचन। तदद्य कुरु राधेय कुरुमध्ये मया सह ४ यत्सभायां स पाञ्चालीं क्लिश्यमानां दुरात्मभिः।

डोळे वटारून त्याच्याकडे पाहूं लागला १९. असो. ह्याप्रमाणें द्रोणपुत्राच्या बाणापासून अर्जुन कर्णाकडे फिरला असतां, हे जनमेजयराजा, हजारों वीर अर्जुनावर धांवून गेले २०; तथापि, शत्रूंचा पराभव करणारा महापराक्रमी अर्जुन द्रोणपुत्र अश्वत्थाम्याला सोडून देऊन एकाएकीं कर्णाकडेच धांवला २१ आणि क्रोधानें ज्याचे नेत्र आरक्तवर्ण झाले आहेत असा तो कुंतीपुत्र अर्जुन त्याच्यावर चाल करून गेल्यानंतर त्याच्याशीं द्वैरथयुद्ध करण्याच्या उद्देशानें त्याला ह्मणाला २२. ह्याप्रमाणें, महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वांपैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं अर्जुन व अश्वत्थामा ह्यांच्या युद्धाविषयीं एकुणसाठावा अध्याय समाप्त झाला ॥ ५९ ॥

अर्जुन ह्मणतोः— हे कर्णा, सभेमध्यें जी तूं स्वतःच्या वाणीनें " अर्जुन युद्धामध्यें माझी बरोबरी करणारा नाहीं " अशाप्रकारची पुष्कळ आत्मप्रशंसा केलीस ती खरी करून दाखविण्याची ही वेळ आली आहे १. हे कर्णा, आज ह्या महासंग्रामामध्यें माझ्याशीं युद्धप्रसंग केल्यातर तुला आपलें दुर्बलत्व कळून येईल आणि पुनरपि तूं दुसऱ्यांचा अवमान करणार नाहींस २. धर्म सोडून देऊन तूं केवळ कठोर शब्द उच्चारिलेस; परंतु, तूं मनांत आणिलेलें हें युद्धकर्म तुला दुर्घट आहे असें मला वाटतें ३. हे राधानंदना, माझी गांठ पडली नसतांना कौरवांमध्यें आजपर्यंत ज्या कांहीं तूं वल्गना केल्या आहेस त्या आज खऱ्या करून दाखीव ४. अरे दुरात्मे कौरव पांचालीला सभेमध्यें क्लेश देत असतांना जें तूं स्वस्थपणें अवलोकन केलेंस त्याचें

दृष्टवानसि तस्याद्य फलमाप्नुहि केवलम् ५ धर्मपाशनिबद्धेन यन्मया मर्षितं पुरा । तस्य राधेय कोपस्य विजयं पश्य मे मृधे ६ वने द्वादश वर्षाणि यानि सोढानि दुर्मते । तस्याद्य प्रतिकोपस्य फलं प्राप्नुहि संप्रति ७ एहि कर्ण मया सार्धं प्रतियुध्यस्व सङ्गरे । प्रेक्षकाः कुरवः सर्वे भवन्तु तव सैनिकाः ८ कर्ण उवाच ॥ ब्रवीषि वाचा यत्पार्थ कर्मणा तत्समाचर । अतिशेते हि ते वाक्यं कर्मैतत्प्रथितं भुवि ९ यत्त्वया मर्षितं पूर्वं तदशक्तेन मर्षितम् । इतो गृह्णीमहे पार्थ तव दृष्ट्वा पराक्रमम् १० धर्मपाशनिबद्धेन यत्त्वया मर्षितं पुरा । तथैव बद्धमात्मानमबद्धमिव मन्यसे ११ यदि तावद्वने वासो यथोक्तश्चरितस्त्वया । तत्त्वं धर्मार्थविक्लिष्टः स मया योद्धुमिच्छसि १२ यदि शक्रः स्वयं पार्थ युध्यते तव कारणात् । तथापि न व्यथा काचिन्मम स्याद्विक्रमिष्यतः १३ अयं कौन्तेय कामस्ते न चिरात्समुपस्थितः । योत्स्यसे हि मया सार्धमद्य द्रक्ष्यसि मे बलम् १४ अर्जुन उवाच । इदानीमिव ताव-

---

आज चांगलेंच प्रायश्चित्त तुला मिळेल ५. हे राधासुता, धर्मपाशानें बद्ध झाल्यामुळें जो क्रोध मीं पूर्वी आंवरून धरिला त्या माझ्या कोपाचा विजय आज तूं संग्रामामध्यें अवलोकन कर ६. हे दुर्मते, वनामध्यें जीं आम्हीं बारा वर्षें सहन केलीं त्याबद्दल उत्पन्न झालेल्या कोपाचें फळ सांप्रत आजच्या आजच तुला प्राप्त होईल ७. हे कर्णा, ये आणि माझ्यासहवर्तमान संग्राममध्यें युद्ध कर. तुझ्या बाजूला असलेले सर्व हे कौरवसैनिक प्रेक्षक होऊन राहोत ८. कर्ण ह्मणतो:—हे अर्जुना, वाणीनें जें तूं बोलून दाखवीत आहेस तें हातानें करून दाखीव. करणें थोडें आणि बोलणें पुष्कळ अशी जी ह्मण पृथ्वीमध्यें प्रसिद्ध आहे तशासारिखाच तुझा हा प्रकार दिसत आहे ९. तूं जें पूर्वी सहन केलेंस तें तूं अशक्त होतास ह्मणून सहन केलेंस. हे अर्जुना, आज तुझा पराक्रम आमच्या दृष्टीं पडला ह्मणजे आह्मीं इतउत्तर हें तुझें ह्मणणें मान्य करूं १०. धर्मपाशानें बद्ध झाल्यामुळें पूर्वी सहन केलें असें तूं ह्मणत आहेस; परंतु तूं अजूनही स्वतः बद्धच असून मुक्त झाल्याचें समजत आहेस ११. वनामध्यें आमच्या सांगण्याप्रमाणें जर तूं वास्तव्य केलें आहेस तर क्लेश भोगिलेला तूं धर्मार्थवेत्ता सांप्रत माझ्याशीं युद्ध करण्याची इच्छा करीत आहेस काय ? १२. हे पार्था, तुझ्याकरितां प्रत्यक्ष इंद्रानें जरी युद्ध केलें तरी पराक्रमावर भिस्त ठेवणाऱ्या माझ्या मनाला मुळींच भीति वाटणार नाहीं १३. हे कुंतीपुत्रा, ही तुला इच्छा नुकतीच झाली आहे असें दिसतें. तथापि, माझ्यासहवर्तमान तूं युद्ध करिशील आणि आज माझें बलही तुझ्या

त्वमपयातो रणान्मम । तेन जीवसि राधेय निहतस्त्वनुजस्तव १५ भ्रातरं घातयित्वा कस्त्यक्त्वा रणशिरश्च कः । त्वदन्यः कः पुमान्सत्सु ब्रूयादेवं व्यवस्थितः १६ वैशम्पायन उवाच ॥ इति कर्णं ब्रुवन्नेव बीभत्सुरपराजितः । अभ्ययाद्विसृजन्बाणान्कायावरणभेदिनः १७ प्रतिजग्राह तं कर्णः प्रीयमाणो महारथः । महता शरवर्षेण वर्षमाणमिवाम्बुदम् १८ उत्पेतुः शरजालानि घोररूपाणि सर्वशः । अविध्यदश्वान्बाह्वोश्च हस्तावापं पृथक्पृथक् १९ सोमृष्यमाणः कर्णस्य निषङ्गस्यावलम्बनम् । चिच्छेद निशिताग्रेण शरेण नतपर्वणा २० उपासङ्गादुपादाय कर्णो बाणानथापरान् । विव्याध पाण्डवं हस्ते तस्य मुष्टिरशीर्यत २१ ततः पार्थो महाबाहुः कर्णस्य धनुरच्छिनत् । स शक्तिं प्राहिणोत्तस्मै तां पार्थो व्यधमच्छरैः २२ ततोनुपेतुर्बहवो राधेयस्य पदानुगाः । तांश्च गाण्डीवनिर्मुक्तैः प्राहिणोद्यमसादनम् २३ ततोस्याश्वाञ्शरैस्तीक्ष्णैर्बीभत्सुर्भारसाधनैः । आकर्णमुक्तैरभ्यघ्नंस्ते हताः प्रापतन्भुवि २४

दृष्टीं पडेल १४. अर्जुन ह्मणतोः—तूं आतांच रणांतून पळून गेला होतास आणि ह्मणूनच जिवंत राहिला आहेस. परंतु, हे राधापुत्रा, तुझा कनिष्ठ भ्राता तर वधच पावला आहे १५. अरे, तुझ्यावांचून दुसरा कोण बरें पुरुष भ्रात्याचा वध करवून आणि रण सोडून देऊन ह्याप्रमाणें स्वस्थपणें सज्जनांमध्यें भाषण करील ? १६. वैशंपायन सांगतातः— ह्याप्रमाणें बोलत बोलतच तो अपराजित अर्जुन कवचभेदक बाण सोडीत सोडीत कर्णासमीप आला असतां १७ वृष्टि करणारा मेघच कीं काय अशा त्या अर्जुनाचा महारथि कर्णानें आनंदपूर्वक मोठ्या बाणवृष्टीनें आदर केला १८. नंतर ज्यांचें रूपही भयंकर आहे असे बाणसमुदाय चोहोंकडे उसळूं लागले व कर्णानें अर्जुनाच्या अश्वांवर, हातांवर आणि हस्तकवचावरही वेगळे वेगळे बाण टाकिले १९. अर्जुनाला तें सहन झालें नाहीं व त्यामुळें त्यानें तीक्ष्ण अग्र आणि नमलेलीं पर्वें ह्यांनीं युक्त असलेल्या बाणानें कर्णाचा भाता अडकविण्याची दोरी तोडून टाकिली २०. तेव्हां कर्णानें दुसऱ्या भात्यांतून दुसरे बाण घेऊन पांडुपुत्र अर्जुनाच्या हातावर वेध केला असतां त्याची मूठ फुटली २१. तदनंतर महापराक्रमी अर्जुनानें कर्णाचें धनुष्य तोडिलें आणि त्या कर्णानें त्याच्यावर शक्ति टाकिली असतांही बाणांच्या योगानें ती अर्जुनानें उडविली २२. तेव्हां राधापुत्र कर्णाचे पुष्कळच अनुयायी अर्जुनावर चाल करून आले; परंतु, त्यांनाही गांडीवापासून सोडिलेल्या बाणांनीं अर्जुनानें यमसदनास पाठविलें २३. तदनंतर भार सहन

अथापरेण बाणेन ज्वलितेन महौजसा । विव्याध कर्णं कौन्तेयस्तीक्ष्णेनोरसि वीर्यवान् २५ तस्य भित्त्वा तनुत्राणं कायमभ्यगमच्छरः । ततः स तमसाविष्टो न स्म किंचित्प्रजज्ञिवान् २६ स गाढवेदनो हित्वा रणं प्रायादुदङ्मुखः । ततोऽर्जुन उदक्रोशदुत्तरश्च महारथः २७ [१९१५]

इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वणि कर्णापयाने षष्टितमोऽध्यायः ॥ ६० ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततो वैकर्तनं जित्वा पार्थो वैराटिमब्रवीत् । एतन्मां प्रापयानीकं यत्र तालो हिरण्मयः १ अत्र शान्तनवो भीष्मो रथेऽस्माकं पितामहः । काङ्क्षमाणो मया युद्धं तिष्ठत्यमरदर्शनः २ अथ सैन्यं महद्दृष्ट्वा रथनागहयाकुलम् । अब्रवीदुत्तरः पार्थमपविद्धः शरैर्भृशम् ३ नाहं शक्ष्यामि वीरेह नियन्तुं ते हयोत्तमान् । विषीदन्ति मम प्राणा मनो विह्वलतीव मे ४ अस्त्राणामिह दिव्यानां प्रभावः संप्रयुज्यताम् । त्वया च कुरुभिश्चैव द्रवन्तीव दिशो दश ५ गन्धेन मूर्छितश्चाहं

करणाऱ्या आणि कानापर्यंत धनुष्य ओढून सोडिलेल्या तीक्ष्ण बाणांनीं अर्जुनानें त्याच्या अश्वांना वेध केला व ते अश्वही वध पावून भूमीवर पडले २४. नंतर दुसऱ्या एका अतितेजस्वी उज्ज्वल व तीक्ष्ण बाणानें वीर्यवान् कुंतीपुत्र अर्जुनानें कर्णाचे वक्षःस्थलावर वेध केला असतां २५ तो बाण कर्णाचें कवच भेदून शरीरामध्यें शिरला. तेव्हां कर्णाला मूर्च्छा येऊन कांहींएक भान नाहींसें झालें २६; शेवटीं दुःसह वेदना होऊं लागल्यामुळें तो कर्ण रण सोडून व उत्तरेकडे तोंड करून चालता झाला आणि तेव्हां अर्जुन व महारथी उत्तर हे दोघेही गर्जना करूं लागले २७. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं कर्णाच्या पलायनाविषयीं साठावा अध्याय समाप्त झाला ॥ ६० ॥

वैशंपायन सांगतातः—तदनंतर वैकर्तन कर्णाला जिंकिल्यावर अर्जुन विराटपुत्र उत्तराला ह्मणाला " जिकडे सुवर्णमय ताल दिसत आहे त्या ह्या सेनेकडे मला घेऊन जा १. ह्या ठिकाणीं मुद्रेनें देवासारिखा असलेला आमचा पितामह शांतनव भीष्म माझ्याशीं युद्ध करण्याच्या इच्छेनें रथावर उभा राहिला आहे २. तदनंतर रथ, गज आणि अश्व ह्यांनीं व्याप्त झालेलें सैन्य अवलोकन करून बाणांनीं अतिशय विद्ध झालेला उत्तर अर्जुनाला ह्मणाला ३ " हे वीरा, तुझे उत्कृष्ट अश्व सावरण्यास आतां मला सामर्थ्य नाहीं; माझे प्राण अगदीं व्याकुल झाले आहेत आणि अंतःकरणही अगदीं विव्हल होऊन गेलें आहे ४. तुझ्या हातून आणि कौरवांच्या हातून सुटणाऱ्या

वसारुधिरमेद्माम् । द्वैधीभूतं मनो मह्य तव चैव प्रपश्यतः ६ अदृष्टपूर्वः
शूराणां मया सङ्ख्ये समागमः । गदापातेन महता शङ्खानां निःस्वनेन
च ७ सिंहनादैश्च शूराणां गजानां बृंहितैस्तथा । गाण्डीवशब्देन भृश-
मशनिप्रतिमेन च ८ श्रुतिः स्मृतिश्च मे वीर प्रनष्टा मूढचेतसः ।
अलातचक्रप्रतिमं मण्डलं सततं त्वया ९ व्याक्षिप्यमाणं समरे गाण्डीवं
च प्रकर्षता । दृष्टिः प्रचलिता वीर हृदयं दीर्यतीव मे १० वपुश्चोग्रं तव रणे
क्रुद्धस्येव पिनाकिनः । व्यायच्छतस्तव भुजं दृष्ट्वा भीर्मे भवत्यपि ११
नाददानं न संधानं न मुञ्चन्तं शरोत्तमान् । त्वामहं संप्रपश्यामि पश्य-
न्नपि न चेतनः १२ अवसीदन्ति मे प्राणा भूरियं चलतीव च । न
च प्रतोदं रश्मींश्च संयन्तुं शक्तिरस्ति मे १३ अर्जुन उवाच ॥
मा भैषीः स्तम्भयात्मानं त्वयापि नरपुङ्गव । अत्यद्भुतानि कर्माणि
कृतानि रणमूर्धनि १४ राजपुत्रोसि भद्रं ते कुले मत्स्यस्य विश्रुते ।

दिव्य अस्त्रांचा प्रभाव ह्या रणभूमीमध्यें माझ्या दृष्टीं पडला आहे आणि तीं जशीं कांहीं दशदिशेस धांवतच असल्यासारिखीं दिसत आहेत ५. वसा, रक्त आणि मेद ह्यांच्या घाणीनें मी तर अगदीं मूर्च्छित झालों आहें आणि तुझा पराक्रम पाहून तर आज माझें मन विदीर्णच झालें आहे ६. समरांगणामध्यें शूरांचा असा समागम मीं आजपर्यंत कधीं पाहिला नाहीं. प्रचंड गदापात, शंखांचा शब्द ७, शूरांचा सिंहनाद, गजांची गर्जना आणि विजेच्या कडकडाटाप्रमाणें गांडीव धनुष्याचा एकसारिखा चाललेला टणत्कार ८ ह्यांच्या योगानें, हे वीरा, मन गोंधळून गेलेल्या माझे कान बधिर झाले असून माझी स्मृतिही नष्ट झाली आहे. अलातचक्राप्रमाणें एकसारिखें मंडल घेऊन तूं ९ गांडीवधनुष्य समरांगणामध्यें इकडे तिकडे चाळवीत असल्यामुळें, हे वीरा, माझी दृष्टि अस्थिर झाली असून हृदय तर जसें कांहीं विदीर्णच होत आहे १०. क्रुद्ध झालेल्या पिनाकपाणि शंकराप्रमाणें समरांगणामध्यें तुझें उग्र शरीर आणि तूं युद्ध करीत असतांना तुझा बाहु अवलोकन करून मला भयच वाटतें ११. मला दृष्टि असूनही भान नाहींसें झालें असल्यामुळें तूं उत्कृष्ट बाण काढितोस केव्हां, त्यांना प्रत्यंचेला लावितोस केव्हां आणि सोडितोस केव्हां हें कांहींच मला समजत नाहीं १२. माझे प्राण व्याकुळ झाले आहेत, (घेरी आल्यामुळें) भूमि चंचल होत असल्यासारिखी दिसत आहे आणि चाबूक व लगाम धरण्याचीही आतां मला शक्ति नाहीं १३. अर्जुन ह्मणतो:—हे पुरुषश्रेष्ठा, तूं भिऊं नको; धीर धर; तूंही संग्रामामध्यें अति अद्भुत कर्में केलीं आहेस १४. तुझें देव बरें करो, शत्रूंना जेरीस आणणाऱ्या

जातस्त्वं शत्रुदमने नावसीदितुमर्हसि १५ धृतिं कृत्वा सुविपुलां राजपुत्र रथे मम । युध्यमानस्य समरे हयान्संयच्छ शत्रुहन् १६ वैशम्पायन उवाच ॥ एवमुक्त्वा महाबाहुर्वैराटिं नरसत्तमः । अर्जुनो रथिनां श्रेष्ठ उत्तरं वाक्यमब्रवीत् १७ सेनाग्रमाशु भीष्मस्य प्रापयस्वैतदेव माम् । आच्छेत्स्याम्यहमेतस्य धनुर्ज्यामपि चाहवे ॥ अस्यन्तं दिव्यमस्त्रं मां चित्रमद्य निशामय १८ शतह्रदामिवायान्तीं स्तनयित्नोरिवाम्बरे । सुवर्णपृष्ठं गाण्डीवं द्रक्ष्यन्ति कुरवो मम १९ दक्षिणेनाथ वामेन कतरेण स्विदस्यति । इति मां संगताः सर्वे तर्कयिष्यन्ति शत्रवः २० शोणितोदां रथावर्तां नागनक्रां दुरत्ययाम् । नदीं प्रस्कन्दयिष्यामि परलोकप्रवाहिनीम् २१ पाणिपादशिरःपृष्ठबाहुशाखानिरन्तरम् । वनं कुरूणां छेत्स्यामि शरैः संनतपर्वभिः २२ जयतः कौरवीं सेनामेकस्य मम धन्विनः । शतं मार्गा भविष्यन्ति पावकस्येव कानने २३ मया चक्रमिवाविद्धं सैन्यं द्रक्ष्यसि केवलम् । इष्वस्त्रे शिक्षितं चित्रमहं दर्शयितास्मि ते २४ असंभ्रान्तो रथे

प्रख्यात मत्स्यकुलामध्यें उत्पन्न झालेला तूं राजपुत्र आहेस. ह्यास्तव, धैर्य सोडणें तुला उचित नाहीं १५. हे शत्रुघातका राजपुत्रा, समरांगणामध्यें मी युद्ध करीत असतांना तूं फारच मोठें धैर्य धर आणि माझ्या रथावर राहून अश्व आंवरून धर १६. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें रथिश्रेष्ठ व महापराक्रमी पुरुषोत्तम अर्जुन विराटपुत्र उत्तराशीं बोलून पुढें आणखी ह्मणाला १७ " ह्या भीष्मसेनेच्या अग्रभागींच मला घेऊन चल. संग्रामामध्यें ह्याचें धनुष्य व प्रत्यंचाही तोडून अद्भुत दिव्य अस्त्रांचा प्रयोग करीत असतांना आज तूं मला अवलोकन कर १८. सौवर्णपृष्ठभागानें युक्त असलेलें माझें गांडीवधनुष्य आकाशामध्यें मेघांतून खालीं येत असलेल्या विद्युल्लतेप्रमाणें आज कौरव अवलोकन करितील १९. " उजव्या आणि डाव्या ह्यांपैकीं हा अर्जुन शरसंधान करीत आहे तरी कोणत्या हातानें ? " असे एकत्र जुळलेले सर्व शत्रु माझ्याविषयीं तर्क करूं लागतील २०. रक्तरूप उदक, रथरूप भोंवरे आणि गजरूप नक्र ह्यांनीं युक्त अशी परलोकीं जाणारी दुस्तर नदी मी आज उत्पन्न करीन २१. हात, पाय, मस्तक, पृष्ठभाग आणि दंड ह्या शाखांनीं अगदीं दाट झालेलें कौरवांचें वन मी सन्नतपर्व बाणांनीं छेदून टाकीन २२. अरण्यामध्यें ज्याप्रमाणें अग्नि शेंकडों मार्गांनीं प्रज्वलित होऊं लागतो त्याप्रमाणें कौरवांच्या सेनेचा पराभव करणारा मी एकटा धनुर्धारी शेंकडों मार्गांनीं बाण सोडून त्या सेनेचा विध्वंस करीन २३. माझ्यामुळें हें सैन्य चक्राप्रमाणें केवळ भ्रमण करीत असलेलें

तिष्ठ समेषु विषमेषु च । दिवमावृत्य तिष्ठन्तं गिरिं भिन्द्यां स्वपत्रिभिः २५
अहमिन्द्रस्य वचनात्सङ्ग्रामेऽभ्यहनं पुरा । पौलोमान्कालखञ्जांश्च सहस्राणि
शतानि च २६ अहमिन्द्राद्दृढां मुष्टिं ब्रह्मणः कृतहस्तताम् । प्रगाढं
तुमुलं चित्रमिति विद्धि प्रजापतेः २७ अहं पारे समुद्रस्य हिरण्यपुरवा-
सिनाम् । जित्वा षष्टिं सहस्राणि रथिनामुग्रधन्विनाम् २८ शीर्यमाणानि
कूलानि प्रवृद्धेनेव वारिणा । मया कुरूणां वृन्दानि पात्यमानानि पश्य
वै २९ ध्वजवृक्षं पत्तितृणं रथसिंहगणायुतम् । वनमादीपयिष्यामि कुरू-
णामस्त्रतेजसा ३० तानहं रथनीडेभ्यः शरैः संनतपर्वभिः । यत्तान्सर्वा-
नतिबलान्योत्स्यमानानवस्थितान् ३१ एकः संकालयिष्यामि वज्रपाणि-
रिवासुरान् । रौद्रं रुद्रादहं ह्यस्त्रं वारुणं वरुणादपि ३२ अस्त्रमाग्नेयम-
ग्नेश्च वायव्यं मातरिश्वनः । वज्रादीनि तथास्त्राणि शक्रादहमवाप्तवान् ३३
धार्तराष्ट्रवनं घोरं नरसिंहाभिरक्षितम् । अहमुत्पाटयिष्यामि वैराटे व्येतु
ते भयम् ३४ वैशम्पायन उवाच ॥ एवमाश्वासितस्तेन वैराटिः

तूं अवलोकन करिशील आणि बाणांचा प्रयोग करण्याविषयीं स्वतःचे ठिकाणीं असलेलें अद्भुत कौशलही मी तुला दाखवीन २४. सम प्रदेशांवर आणि त्याचप्रमाणें विषम प्रदेशांवर तूं न घाबरतां रथावर रहा ह्मणजे स्वर्ग व्याप्त करून एकादा पर्वत जरी समोर उभा राहिला तरी मी आपल्या बाणांनीं तो फोडून टाकीन २५. इंद्राच्या आज्ञेवरून मीं संग्रामामध्यें पूर्वी शेंकडों हजारों पौलोमांचा व कालखंजांचा वध केला आहे २६. इंद्रापासून दृढ मुष्टि, ब्रह्मदेवापासून हस्तलाघव आणि त्याच प्रजाधिपतीपासून संकटकालीं कर्तव्य असलेलें अद्भुत तुमुल युद्ध हीं मला अवगत आहेत. असें तूं समज २७. समुद्राच्या पलीकडे हिरण्यपुरामध्यें वास्तव्य करणाऱ्या साठ हजार महाधनुर्धारी व रथी राक्षसांचा मीं पराजय केला आहे २८. सारांश, पाणी वाढलें असतां ज्याप्रमाणें भोंवतालचीं तीरें पडूं लागतात त्याप्रमाणें कौरवांचे समुदाय माझ्यामुळें पडूं लागलेले तूं आज अवलोकन कर २९. ध्वज हेच ज्यांतील वृक्ष आहेत, पायदळ सैन्य हेंच ज्यांतील तृण आहे, आणि रथी योद्धे हे ज्यांतील सिंहांचे कळप आहेत असें हें कौरवांचें वन अस्त्ररूप अग्नीनें मी आज पेटवून देईन ३०. वज्रपाणि इंद्र ज्याप्रमाणें दैत्यांना धुडकावून लावितो त्याप्रमाणें सज्ज होऊन धैर्यानें युद्ध करीत राहिलेल्या त्या सर्व अतिबलाढ्य कौरवांना संनतपर्व बाणांनीं मी एकटा रथांपासून धुडकावून देईन. रुद्रापासून रौद्रास्त्र, वरुणापासून वारुणास्त्र ३१, ३२, अग्नीपासून आग्नेयास्त्र, वायूपासून वायव्यास्त्र आणि त्याचप्रमाणें इंद्रापासून वज्रप्रभृति अस्त्रें मीं प्राप्त करून घेतलीं आहेत ३३. हे विराटपुत्रा, तूं भिऊं नको. पुरुषश्रेष्ठांनीं रक्षण

सव्यसाचिना । व्यगाहद्रथानीकं भीमं भीष्माभिरक्षितम् ३५ तमायान्तं महाबाहुं जिगीषन्तं रणे कुरून् । अभ्यवारयदव्यग्रः क्रूरकर्मापगासुतः ३६ तस्य जिष्णुरुपावृत्य ध्वजं मूलादपातयत् । विकृष्य कलधौताग्रैः स विद्धः प्रापतद्भुवि ३७ तं चित्रमाल्याभरणाः कृतविद्या मनस्विनः । आगच्छन्भीमधन्वानं चत्वारश्च महाबलाः ३८ दुःशासनो विकर्णश्च दुःसहोथ विविंशतिः।आगत्य भीमधन्वानं बीभत्सुं पर्यवारयन्३९ दुःशासनस्तु भल्लेन विद्ध्वा वैराटिमुत्तरम् । द्वितीयेनार्जुनं वीरः प्रत्यविध्यस्तनान्तरे ४० तस्य जिष्णुरुपावृत्य पृथुधारेण कार्मुकम् । चकर्त गार्ध्रपत्रेण जातरूपपरिष्कृतम् ४१ अथैनं पञ्चभिः पश्चात्प्रत्यविध्यत्स्तनान्तरे । सोपयातो रणं हित्वा पार्थबाणप्रपीडितः ४२ तं विकर्णः शरैस्तीक्ष्णैर्गृध्रपत्रैरजिह्मगैः । विव्याध परवीरघ्नमर्जुनं धृतराष्ट्रजः ४३ ततस्तमपि कौन्तेयः शरेणानतपर्वणा । ललाटेऽभ्यहनत्तूर्णं स विद्धः

करून ठेविलेलें हें धृतराष्ट्रपुत्ररूप घोर वन मी उपटून टाकीन ३४. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें त्या अर्जुनानें विराटपुत्राला धीर दिला असतां भीष्मरक्षित रथांच्या प्रचंड सैन्यामध्यें तो शिरला ३५. तेव्हां संग्रामामध्यें कौरवांना जिंकण्याच्या उद्देशानें येत असलेल्या त्या महापराक्रमी अर्जुनाचें,स्वकर्तव्यदक्ष क्रूरकर्मी गंगानंदन भीष्मानें निवारण केलें ३६. परंतु, समीप जाऊन व धनुष्य आकर्षण करून अर्जुनानें त्याचा ध्वज मुळापासून खालीं पाडिला. सारांश, सोनेरी रंग दिलेलीं फळें ज्यांना लाविलेलीं आहेत अशा अर्जुनाच्या बाणांनीं विद्ध झालेला तो ध्वज भूमीवर पडला ३७. नंतर चित्रविचित्र पुष्पें व भूषणें धारण केलेले आणि धनुर्विद्येमध्यें निपुण असलेले असे महाबलाढ्य व विचारी चार योद्धे त्या भयंकर धनुष्य धारण करणाऱ्या अर्जुनासमीप आले ३८ आणि दुःशासन, विकर्ण, दुःसह व विविंशति ह्या चौघांनीं भयंकर धनुष्य धारण करणाऱ्या अर्जुनासमीप येऊन त्याचें निवारणही केलें ३९. वीर दुःशासनानें विराटपुत्र उत्तराला भल्लबाणानें वेध करून दुसऱ्या एका भल्लबाणानें स्तनांमध्यें अर्जुनालाही वेध केला ४०. तेव्हां त्याच्याकडे वळून विशाल धारा आणि गृध्रपक्ष्याचे पंख ह्यांनीं युक्त असलेल्या एका बाणानें अर्जुनानें त्याचें धनुष्य तोडिलें ४१ व पांच बाणांनीं स्तनांमध्यें त्याला वेध केला असतां अर्जुनाच्या बाणांनीं पीडित झालेला तो दुःशासन रण सोडून पळून गेला ४२. नंतर गृध्रपक्ष्याच्या पिच्छांनीं युक्त, तीक्ष्ण व सरळ जाणाऱ्या बाणानें धृतराष्ट्रपुत्र विकर्णानें शत्रुवीरनाशक अर्जुनाला वेध केला असतां ४३ ज्याचीं पेरें किंचित् नमलेलीं

प्रापतद्रथात् ४४ ततः पार्थमभिद्रुत्य दुःसहः सविविंशतिः । अवाकिरच्छरैस्तीक्ष्णैः परीप्सुर्भ्रातरं रणे ४५ तावुभौ गार्ध्रपत्राभ्यां निशिताभ्यां धनञ्जयः । विद्ध्वा युगपदव्यग्रस्तयोर्वाहानसूदयत् ४६ तौ हताश्वौ विभिन्नाङ्गौ धृतराष्ट्रात्मजावुभौ । अभिपत्य रथैरन्यैरपनीतौ पदानुगैः ४७ सर्वा दिशश्चाभ्यपतद्बीभत्सुरपराजितः । किरीटमाली कौन्तेयो लब्धलक्ष्यो महाबलः ४८ [१९६३] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहेऽर्जुनदुःशासनादियुद्धे एकषष्टितमोऽध्यायः ॥ ६१ ॥

वैशम्पायन उवाच॥अथ संगम्य सर्वे ते कौरवाणां महारथाः। अर्जुनं सहिता यत्ताः प्रत्ययुध्यन्त भारत १ स सायकमयैर्जालैः सर्वतस्तान्महारथान् । प्राच्छादयदमेयात्मा नीहारेणेव पर्वतान् २ नदद्भिश्च महानागैर्हेषमाणैश्च वाजिभिः । भेरीशङ्खनिनादैश्च स शब्दस्तुमुलोभवत् ३ नराश्वकाया-

---

आहेत अशा एका बाणानें त्याच्या ललाटावर कुंतीपुत्र अर्जुनानें सत्वर वेध केला असतां तो वेध झाल्याबरोबर विकर्ण रथांतून खालीं पडला ४४. तदनंतर भ्रात्या विकर्णाचें रक्षण करण्याची इच्छा धरून विविंशतीसहवर्तमान दुःसहानें अर्जुनावर चालून जाऊन तीक्ष्ण बाणांनीं त्याला आच्छादित करून टाकिलें ४५; परंतु, गृध्रपिच्छांनीं युक्त असलेल्या दोन तीक्ष्ण बाणांनीं त्या उभयतांना एकदम वेध करून अर्जुनानें त्यांच्या अश्वांचाही वध केला ४६. तेव्हां ज्यांच्या अश्वांचा वध झाला आहे व ज्यांचीं शरीरेंही फुटून गेलेलीं आहेत अशा त्या उभयतां धृतराष्ट्रपुत्रांकडे इतर रथ्यांसहवर्तमान पदाति लोक धांवून गेले आणि त्यांनीं त्यांना रथांतून दूर नेलें ४७. तेव्हां ज्याचा नेम कधींही चुकावयाचा नाहीं असा तो मस्तकीं किरीट धारण केलेला महाबलाढ्य व अपराजित कुंतीपुत्र अर्जुन सर्व बाजूंनीं कौरवसेनेवर तुटून पडला ४८. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं अर्जुन व दुःशासनप्रभृति कौरव ह्यांच्या युद्धाविषयीं एकसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६१ ॥

वैशंपायन सांगतातः—हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, कौरवांकडील ते सर्वही महारथी कौरव एकत्र व सज्ज होऊन अर्जुनाशीं युद्ध करूं लागले १. परंतु, अतर्क्य स्वरूपानें युक्त असलेल्या त्या अर्जुनानें पर्वत ज्याप्रमाणें धुक्यानें व्याप्त करून टाकावे त्याप्रमाणें बाणमय जालांनीं त्या महारथ्यांना सर्व बाजूंनीं व्याप्त करून टाकिलें २. तेव्हां मोठे मोठे गज गर्जना करूं लागले असतां, अश्व खेंकाळूं लागले

निर्भिद्य लौहानि कवचानि च । पार्थस्य शरजालानि विनिष्पेतुः सहस्रशः ४ त्वरमाणः शरानस्यन्पाण्डवः प्रबभौ रणे । मध्यन्दिनगतोर्चिष्मान्शरदीव दिवाकरः ५ उपप्लवन्ति वित्रस्ता रथेभ्यो रथिनस्तथा । सादिनश्चाश्वपृष्ठेभ्यो भूमौ चैव पदातयः ६ शरैः संछिद्यमानानां कवचानां महात्मनाम् । ताम्रराजतलौहानां प्रादुरासीन्महास्वनः ७ छन्नमायोधनं सर्वं शरीरैर्गतचेतसाम् । गजाश्वसादिनां तत्र शितबाणात्तजीवितैः ८ रथोपस्थाभिपतितैरास्तृता मानवैर्मही । प्रनृत्यतीव सङ्ग्रामे चापहस्तो धनञ्जयः ९ श्रुत्वा गाण्डीवनिर्घोषं विस्फूर्जितमिवाशनेः । त्रस्तानि सर्वसैन्यानि व्यपागच्छन्महाहवात् १० कुण्डलोष्णीषधारीणि जातरूपस्रजस्तथा । पतितानि स्म दृश्यन्ते शिरांसि रणमूर्धनि ११ विशिखोन्मथितैर्गात्रैर्बाहुभिश्च सकार्मुकैः । सहस्ताभरणैश्चान्यैः प्रच्छन्ना भाति मेदिनी १२ शिरसां पात्यमानानामन्तरा निशितैः शरैः ।

असतां आणि दुंदुभि व शंख ह्यांचे नाद सुरू झाले असतां तुमुल शब्द होऊं लागला ३. अर्जुनाचे हजारों बाणसमूह पुरुषांचीं व अश्वांचीं शरीरें आणि लोखंडी चिलखतें फाडून बाहेर पडूं लागले ४ आणि त्वरेत्वरेनें तो पांडुपुत्र अर्जुन संग्रामामध्यें बाण सोडूं लागला असतां शरदृतूमध्यें निर्मल किरणांनीं युक्त झालेला सूर्य ज्याप्रमाणें मध्यान्हसमयीं शोभूं लागतो त्याप्रमाणें शोभूं लागला ५. त्रस्त होऊन गेल्यामुळें रथी रथांवरून उतरून, स्वार घोड्यांवरून उतरून आणि पदाति भूमीवरच इकडे तिकडे धांवा धांव करूं लागले ६. महात्म्या योद्ध्यांचीं ताम्रमय, रौप्यमय व लोहमय कवचें बाणांनीं फुटूं लागल्यामुळें मोठाच ध्वनि होऊं लागला ७. तीक्ष्ण बाणांनीं ज्यांतील जीवित हरण केलें आहे अशा मत्त झालेल्या गजारूढ व अश्वारूढ योध्यांच्या शरीरांनीं सर्व रणभूमि आच्छादित झाली ८. रथांवरून चोहोंकडे पडलेल्या मनुष्यांनीं पृथ्वी व्याप्त होऊन गेली आणि हातांत धनुष्य घेतलेला अर्जुन संग्रामामध्यें जसें कांहीं नृत्यच करूं लागला ९. विद्युल्लतेच्या कडकडाटाप्रमाणें गांडीव धनुष्याचा शब्द ऐकून सर्व सैन्यें त्रस्त झालीं आणि त्या महासंग्रामांतून पळून जाऊं लागलीं १०. कुंडलें व शिरस्त्राण धारण केलेलीं मस्तकें आणि सुवर्णाच्या माला रणभूमीवर (जिकडे तिकडे) पडलेल्या दृष्टीं पडूं लागल्या ११. बाणांनीं फाडून टाकिलेले अवयव, धनुष्यांसहवर्तमान बाहु आणि हस्तभूषणांसहवर्तमान असलेले इतरही हात ह्यांच्या योगानें पृथ्वी आच्छादित दिसूं लागली १२. हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, तीक्ष्ण बाणांनीं मस्तकें तुटून मध्यें पडूं लागलीं असत

अश्मवृष्टिरिवाकाशादभवद्भरतर्षभ १३ दर्शयित्वा तथात्मानं रौद्रं रुद्रपराक्रमः। अवरुद्धोचरत्पार्थो वर्षाणि त्रिदशानि च॥ क्रोधाग्निमुत्सृजन्वीरो धार्तराष्ट्रेषु पाण्डवः १४ तस्य तद्दहतः सैन्यं दृष्ट्वा चैव पराक्रमम्। सर्वे शान्तिपरा योधा धार्तराष्ट्रस्य पश्यतः १५ वित्रासयित्वा तत्सैन्यं द्रावयित्वा महारथान्। अर्जुनो जयतां श्रेष्ठः पर्यवर्तत भारत १६ प्रावर्तयन्नदीं घोरां शोणितोदां तरङ्गिणीम् । अस्थिशैवालसंबाधां युगान्ते कालनिर्मिताम् १७ शरचापप्लवां घोरां केशशैवलशाद्वलाम्। तनुत्रोष्णीषसंबाधां नागकूर्ममहाद्विपाम् १८ मेदोवसासृक्प्रवहां महाभयविवर्धिनीम्। रौद्ररूपां महाभीमां श्वापदैरभिनादिताम् १९ तीक्ष्णशस्त्रमहाग्राहां क्रव्यादगणसेविताम् । मुक्ताहारोर्मिकलिलां चित्रालङ्कारबुद्बुदाम् २० शरसङ्घमहावर्तां नागनक्रां दुरत्ययाम्। महारथमहाद्वीपां शङ्खदुन्दुभिनिःस्वनाम् २१ चकार च तदा पार्थो नदीं दुस्तरशोणिताम् २२

आकाशांतून पाषाणांचीच वृष्टि होत आहे कीं काय असें दिसूं लागलें १३. तेरा वर्षेंपर्यंत जखडून राहिलेला रुद्रतुल्य पराक्रमी पांडुपुत्र वीर अर्जुन आपलें उग्र स्वरूप प्रकट करून धृतराष्ट्राच्या पुत्रांचे ठिकाणीं आपला क्रोधाग्नि सोडून देण्याकरितां संचार करूं लागला १४. सैन्य दग्ध करीत सुटलेल्या त्या अर्जुनाचा पराक्रम अवलोकन करून धृतराष्ट्रपुत्र दुर्योधनाज्ञा न जुमानितां सर्वही योद्धे स्वस्थ उभे राहिले १५; तें सैन्य त्रस्त करून आणि महारथ्यांना पळवून लावून हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, विजयीश्रेष्ठ अर्जुन सर्व बाजूंनीं हिंडूं लागला १६ व एक घोर नदी त्यानें उत्पन्न केली. सारांश, युगांतसमयीं कालानेंच निर्माण केलेली कीं काय अशी ती नदी अस्थिरूप शेवाळ्यानें भरलेली असून रक्तरूप उदकानें युक्त होती १७; बाण व धनुष्य हींच त्या घोर नदींतील होडकीं होतीं; योद्ध्यांच्या मस्तकांवरील केंस हेंच तिच्या तीरावरील हिरवें गवत व शेवाळें होतें; कवचें आणि शिरस्त्राणें ह्यांची त्या नदीमध्यें खेंचाखेंच झालेली होती; गज हेच त्यांतील कासवें व मोठीं मोठीं बेटें होतीं १८; मेद, वसा आणि रक्त ह्यांच्या प्रवाहानें ती युक्त होती; पहाणाऱ्याला ती मोठें भय उत्पन्न करणारी होती; त्या महाभयंकर नदीचें रूपही उग्र होतें; श्वापदांनीं सर्व बाजूंनीं तिला नादित करून टाकिलें होतें १९; तीक्ष्ण शस्त्रें हेच त्यांतील मोठे मोठे मगर होते; मांसभक्षक श्वापदांचे कळप तिच्या आश्रयानें राहिलेले होते; मौक्तिकहाररूप लाटांनीं ती उचंबळत होती; अद्भुत भूषणरूप बुडबुड्यांनीं ती युक्त होती २०; शरसमुदायरूप मोठे मोठे भोंवरे तिच्यामध्यें होते; त्या दुस्तर नदीमध्यें गज हेच नक्र

आददानस्य हि शरान्संधाय च विमुञ्चतः ॥ विकर्षतश्च गाण्डीवं न कश्चिद्ददृशे जनः २३ [१९८६] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वाणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहेऽर्जुनसंकुलयुद्धे द्विषष्टितमोऽध्यायः ॥ ६२ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततो दुर्योधनः कर्णो दुःशासनविविंशती । द्रोणश्च सह पुत्रेण कृपश्चापि महारथः १ पुनर्ययुश्च संरब्धा धनञ्जयजिघांसवः । विस्फारयन्तश्चापानि बलवन्ति दृढानि च २ तान्विकीर्णपताकेन रथेनादित्यवर्चसा । प्रत्युद्ययौ महाराज समन्ताद्वानरध्वजः ३ ततः कृपश्च कर्णश्च द्रोणश्च रथिनां वरः । तं महास्त्रैर्महावीर्यं परिवार्य धनञ्जयम् ४ शरौघान्सम्यगस्यन्तो जीमूता इव वार्षिकाः । ववर्षुः शरवर्षाणि पातयन्तो धनञ्जयम् ५ इषुभिर्बहुभिस्तूर्णं समरे लोमवाहिभिः । अदूरात्पर्यवस्थाप्य पूरयामासुरादृताः ६ तथा तैरवकीर्णस्य दिव्यैरस्त्रैः समन्ततः । न तस्य ह्यङ्गुलमपि विवृतं संप्रदृश्यते ७ ततः प्रहस्य

होते; मोठे मोठे रथ हींच तिच्यांतील मोठीं मोठीं द्वीपें होतीं; आणि दुस्तर रक्ताळें युक्त असलेली जी ही नदी अर्जुनानें उत्पन्न केली ती शंख व दुंदुभि ह्यांच्या ध्वनींनीं गजबजलेली होती २१, २२. असो. युद्ध चाललें असतां अर्जुन बाण घेतो केव्हां, धनुष्याला लावून सोडितो केव्हां आणि गांडीव धनुष्य खेंचतो केव्हां हे कोणाच्याही लक्ष्यांत येईनासें झालें २३. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वांपैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं अर्जुनाच्या तुमुल युद्धाविषयीं बासष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६२ ॥

वैशंपायन सांगतातः——तदनंतर दुर्योधन, कर्ण, दुःशासन, विविंशति, पुत्रासहवर्तमान द्रोण आणि महारथि कृप १ क्षुब्ध होऊन अर्जुनाचा वध करण्याच्या उद्देशानें प्रबल व दृढ अशा आपल्या धनुष्यांचा टणत्कार करीत करीत पुनरपि युद्धाला आले असतां २, "हे जनमेजयमहाराजा, वानरध्वज अर्जुन, ज्याच्यावरील पताका फडकत आहेत अशा आपल्या सूर्यतुल्य तेजस्वी रथानें, त्यांना सामोरा गेला ३. तदनंतर कृप, कर्ण आणि रथिश्रेष्ठ द्रोण ह्यांनीं त्या महावीर्यवान् अर्जुनाचें मोठ्या मोठ्या अस्त्रांनीं निवारण केलें ४. उत्तमप्रकारें बाणसमुदाय सोडणाऱ्या आणि धनंजयाचा पाडाव करण्याची इच्छा करणाऱ्या त्या योद्ध्यांनीं वर्षाऋतूंतील मेघाप्रमाणें अर्जुनावर बाणांचे वर्षाव केले ५; आणि युद्धाविषयीं दक्ष असलेल्या त्या योद्ध्यांनीं जवळच उभें राहून सरळ जाणाऱ्या असंख्य बाणांनीं संग्रामामध्यें अर्जुनाला सत्वर भरूनच काढिलें ६ व

बीभत्सुर्दिव्यमैन्द्रं महारथः । अस्त्रमादित्यसंकाशं गाण्डीवे समयोजयत् ८ शररश्मिरिवादित्यः प्रतस्थे समरे बली । किरीटमाली कौन्तेयः सर्वान्प्राच्छादयत्कुरून् ९ यथा बलाहके विद्युत्पावको वा शिलोच्चये । तथा गाण्डीवमभवदिन्द्रायुधमिवानतम् १० यथा वर्षति पर्जन्ये विद्युद्विभ्राजते दिवि । द्योतयन्ती दिशः सर्वाः पृथिवीं च समन्ततः ११ तथा दश दिशः सर्वाः पतद्गाण्डीवमावृणोत् । नागाश्च रथिनः सर्वे मुमुहुस्तत्र भारत १२ सर्वे शान्तिपरा योधाः स्वचित्तानि न लेभिरे । सङ्ग्रामे विमुखाः सर्वे योधास्ते हतचेतसः १३ एवं सर्वाणि सैन्यानि भग्नानि भरतर्षभ । व्यद्रवन्त दिशः सर्वा निराशानि स्वजीविते १४[२०००] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहेऽर्जुनसंकुलयुद्धे त्रिषष्टितमोऽध्यायः ॥ ६३ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततः शान्तनवो भीष्मो भारतानां पितामहः ।

ह्याप्रमाणें दिव्य अस्त्रांनीं ते योद्धे सर्व बाजूंनीं त्याला भरून काढूं लागले असतां त्याच्या शरीरावरील दोन बोटेंही जागा मोकळी दिसेनाशी झाली ७. तदनंतर महारथी अर्जुनानें हास्य केलें आणि सूर्यासारिखें उज्ज्वल असलेलें ऐंद्रसंज्ञक दिव्य अस्त्र त्यानें गांडीवाशीं योजिलें ८. सारांश, बाणरूप किरणांनीं युक्त असलेला सूर्यच कीं काय असा तो मस्तकीं किरीट धारण केलेला कुंतीपुत्र बलाढ्य अर्जुन समरांगणामध्यें पुढें सरसावला आणि सर्व कौरव त्यानें आच्छादित केले ९. त्यावेळीं प्रत्यंचा चढविलेलें इंद्रधनुष्यच कीं काय असें तें गांडीव धनुष्य मेघांतील विद्युल्लतेप्रमाणें अथवा पर्वतावरील वणव्याप्रमाणें दिसूं लागलें १०. पर्जन्य पडत असतांना ज्याप्रमाणें आकाशामध्यें सर्व दिशा व पृथ्वी प्रकाशित करीत करीत वीज चमकूं लागते ११ त्याप्रमाणें सर्व दाही दिशा त्या चमकत असलेल्या गांडीवधनुष्यानें व्यापून टाकिल्या; आणि, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, त्यावेळीं सर्व रथी व गज मूर्छित झाले १२. स्वस्थ झालेल्या योद्ध्यांना कांहींएक सुचेनासें झालें आणि ते सर्वही योद्धे मनांत गोंधळून जाऊन संग्रामामध्यें युद्धापासून पराङ्मुख झाले १३; व, हे भरतवंशजश्रेष्ठा जनमेजया, अशारीतीनें पराजित झालेलीं कौरवांचीं सर्व सैन्यें जीविताविषयीं निराश होऊन वाट फुटेल तिकडे धांवूं लागलीं १४. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं अर्जुनाच्या तुमुल युद्धाविषयीं त्रेसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६३ ॥

वैशंपायन सांगतातः— तदनंतर भरतवंशज कौरवांचा पितामह शांतनव भीष्म

वध्यमानेषु योधेषु धनञ्जयमुपाद्रवत् १ प्रगृह्य कार्मुकश्रेष्ठं जातरूपपरिष्कृतम् । शरानादाय तीक्ष्णाग्रान्मर्मभेदान्प्रमाथिनः २ पाण्डुरेणातपत्रेण ध्रियमाणेन मूर्धनि । शुशुभे स नरव्याघ्रो गिरिः सूर्योदये यथा ३ प्रध्माय शङ्खं गाङ्गेयो धार्तराष्ट्रान्प्रहर्षयन् । प्रदक्षिणमुपावृत्य बीभत्सुं समवारयत् ४ तमुदीक्ष्य समायान्तं कौन्तेयः परवीरहा । प्रत्यगृह्णात्प्रहृष्टात्मा धाराधरमिवाचलः ५ ततो भीष्मः शरानष्टौ ध्वजे पार्थस्य वीर्यवान् । समार्पयन्महावेगाञ्श्वसमानानिवोरगान् ६ ते ध्वजं पाण्डुपुत्रस्य समासाद्य पतत्रिणः । ज्वलन्तं कपिमाजघ्नुर्ध्वजाग्रनिलयांश्च तान् ७ ततो भल्लेन महता पृथुधारेण पाण्डवः । छत्रं चिच्छेद भीष्मस्य तूर्णं तदपतद्भुवि ८ ध्वजं चैवास्य कौन्तेयः शरैरभ्यहनद्भृशम् । शीघ्रकृद्रथवाहांश्च तथोभौ पार्ष्णिसारथी ९ अमृष्यमाणस्तद्भीष्मो जानन्नपि स पाण्डवम् । दिव्येनास्त्रेण महता धनञ्जयमवाकिरत् १० तथैव पाण्डवो भीष्म

योद्ध्यांचा वध होऊं लागला असतां अर्जुनावर चालून गेला १. जातां जातां सुवर्णानें शृंगारिलेलें श्रेष्ठ धनुष्य आणि तीक्ष्ण अग्रांनीं युक्त असलेले मर्मभेदक प्रचंड बाण त्यानें बरोबर घेतले होते २ व मस्तकावर असलेल्या श्वेतवर्ण छत्रामुळें तो पुरुषश्रेष्ठ भीष्म सूर्योदयसमयीं शोभणाऱ्या पर्वताप्रमाणें शोभूं लागला ३. धृतराष्ट्रपुत्रांना हर्ष उत्पन्न करीत करीत शंख फुंकून आणि प्रदक्षिणिक वळून गंगानंदन भीष्म अर्जुनाचें निवारण करूं लागला ४ व तो येत आहे असें पाहून कुंतीपुत्र अर्जुनाचें मन प्रसन्न झालें आणि पर्वत ज्याप्रमाणें पर्जन्याचा स्वीकार करितो त्याप्रमाणें त्या शत्रुवीरनाशक अर्जुनानें त्या भीष्माचा स्वीकार केला ५. तदनंतर फुस्कारीत असलेले भुजंगच कीं काय असे महावेगवान् आठ बाण वीर्यवान् भीष्मानें अर्जुनाच्या ध्वजावर टाकिले ६; व पांडुपुत्र अर्जुनाच्या ध्वजासमीप गेल्यावर त्या बाणांनीं तेथें असलेल्या देदीप्यमान् कपीला आणि ध्वजाग्रावर वास्तव्य करणाऱ्या त्या इतर भूतांना ताडण केलें ७. तदनंतर विशाल धारेनें युक्त असलेला मोठा भल्लबाण घेऊन पांडुपुत्र अर्जुनानें भीष्माचें छत्र तोडून टाकिलें व तें लगेच भूमीवर पडलें ८. इतकेंच नव्हे परंतु, त्वरा करणाऱ्या त्या कुंतीपुत्र अर्जुनानें भीष्माच्या ध्वजाला, अश्वांना आणि पृष्ठरक्षक व सारथि ह्याही उभयतांना बाणांनीं अतिशय ताडन केलें ९. हें भीष्माला सहन न झाल्यामुळें आपण पांडुपुत्र अर्जुनाशीं युद्ध करीत आहोंत असें जरी तो जाणीत होता तरी मोठ्या दिव्य अस्त्रानें त्यानें त्या अर्जुनाला ग्रासून टाकिलें १०; परंतु, त्याचप्रमाणें भीष्मावर दिव्य अस्त्र सोडणाऱ्या अतर्क्यस्वरूप

दिव्यमस्त्रमुदीरयन् । प्रत्यगृह्णाद्मेयात्मा महामेघमिवाचलः ११ तयोस्त-
दभवद्युद्धं तुमुलं लोमहर्षणम् । भीष्मेण सह पार्थेन बलिवासवयोरिव ॥
ऐक्षन्त कुरवः सर्वे योधाश्च सहसैनिकाः १२ भल्लैर्भल्लाः समागम्य भीष्म-
पाण्डवयोर्युधि । अन्तरिक्षे व्यराजन्त खद्योताः प्रावृषीव हि १३ अग्नि-
चक्रमिवाविद्धं सव्यदक्षिणमस्यतः । गाण्डीवमभवद्राजन्पार्थस्य सृजतः
शरान् १४ ततः संछादयामास भीष्मं शरशतैः शितैः । पर्वतं वारि-
धाराभिश्छादयन्निव तोयदः १५ तां स वेलामिवोद्धूतां शरवृष्टिं
समुत्थिताम् । व्यधमत्सायकैर्भीष्मः पाण्डवं समवारयत् १६ ततस्तानि
निकृत्तानि शरजालानि भागशः । समरे च व्यशीर्यन्त फाल्गुनस्य रथं
प्रति १७ ततः कनकपुङ्खानां शरवृष्टिं समुत्थिताम् । पाण्डवस्य रथात्तूर्णं
शलभानामिवायतिम् १८ व्यधमत्तां पुनस्तस्य भीष्मः शरशतैः शितैः १९
ततस्ते कुरवः सर्वे साधुसाध्विति चाब्रुवन् । दुष्करं कृतवान्भीष्मो यदर्जुन-
मयोधयत् २० बलवांस्तरुणो दक्षः क्षिप्रकारी धनञ्जयः । कोऽन्यः समर्थः

अर्जुनानें महामेघाचा स्वीकार करणाऱ्या पर्वताप्रमाणें भीष्मानें सोडिलेल्या अस्त्राचा स्वीकार केला ११. तेव्हां त्या उभयतांमध्यें अंगावर कांटा आणणारें असें तुमुल युद्ध झालें आणि बलि व इंद्र ह्यांमध्यें झालेल्या संग्रामाप्रमाणें अर्जुन व भीष्म ह्या उभयतांत सुरू झालेला तो संग्राम सैनिकांसहवर्तमान सर्वही कौरवयोद्धे पाहूं लागले १२. वर्षाऋतूमध्यें ज्याप्रमाणें काजवे अंतरिक्षांत चमकूं लागतात त्याप्रमाणें भीष्म आणि पांडुपुत्र अर्जुन ह्यांत युद्ध सुरू झालें असतां भल्लबाणांना भिडलेले भल्ल-बाण आकाशामध्यें चमकूं लागले १३. हे जनमेजयराजा, उजव्या व डाव्या अशा दोन्ही हातांनीं अर्जुन बाण सोडूं लागला असतां त्याचें तें गांडीव धनुष्य भ्रमण करीत असलेल्या अलातचक्राप्रमाणें दिसूं लागलें १४. तदनंतर मेघ ज्याप्रमाणें जलधारांनीं पर्वताला आच्छादित करून टाकितो त्याप्रमाणें शेंकडों तीक्ष्ण बाणांनीं अर्जुनानें भीष्माला आच्छादित केलें १५; परंतु, जलानें उचंबळून गेलेल्या तीराप्र-माणें एकाएकीं उत्पन्न झालेली ती बाणवृष्टि बाणांनीं उडवून देऊन भीष्मानें पांडु-पुत्र अर्जुनाचें निवारण केलें १६. तेव्हां भीष्मानें बाणांनीं तोडिलेले ते अर्जुनाचे बाणसमुदाय समरांगणामध्यें अर्जुनाच्याच रथावर पडले १७. तदनंतर टोळांच्या समु-दायाप्रमाणें सौवर्ण पिच्छभागांनीं युक्त अशी अर्जुनाच्या रथावरून सत्वर उद्भवलेली बाणवृष्टि १८ शेंकडों तीक्ष्ण बाणांच्या योगानें भीष्मानें पुनरपि उडवून दिली १९. तेव्हां ते सर्वही कौरव भीष्माला उद्देशून ह्मणाले " शाबास, शाबास ! अर्जुनाशीं

पार्थस्य वेगं धारयितुं रणे २१ ऋते शान्तनवाद्भीष्मात्कृष्णाद्वा देवकी-
सुतात् । आचार्यप्रवराद्वापि भारद्वाजान्महाबलात् २२ अस्त्रैरस्त्राणि
संवार्य क्रीडन्तौ भरतर्षभौ । चक्षूंषि सर्वभूतानां मोहयन्तौ महाबलौ २३
प्राजापत्यं तथैवेन्द्रमाग्नेयं रौद्रदारुणम् । कौबेरं वारुणं चैव याम्यं वाय-
व्यमेव च ॥ प्रयुञ्जानौ महात्मानौ समरे तौ विचेरतुः २४ विस्मितान्यथ
भूतानि तौ दृष्ट्वा संयुगे तदा । साधु पार्थ महाबाहो साधु भीष्मेति
चाब्रुवन् २५ नायं युक्तो मनुष्येषु योयं संदृश्यते महान् । महास्त्राणां
संप्रयोगः समरे भीष्मपार्थयोः २६ वैशम्पायन उवाच ॥ एवं सर्वास्त्रवि-
दुषोरस्त्रयुद्धमवर्तत । अस्त्रयुद्धे तु निर्वृत्ते शरयुद्धमवर्तत २७ अथ
जिष्णुरुपावृत्य क्षुरधारेण कार्मुकम् । चकर्त भीष्मस्य तदा जातरूपप-
रिष्कृतम् २८ निमेषान्तरमात्रेण भीष्मोन्यत्कार्मुकं रणे । समादाय महा-
बाहुः सज्यं चक्रे महारथः २९ शरांश्च सुबहून्क्रुद्धो मुमोचाशु धनं-
जये ३० अर्जुनोपि शरांस्तीक्ष्णान्भीष्माय निशितान्बहून् । चिक्षेप

भीष्मांनीं युद्ध केलें हें खरोखर दुर्घट कृत्य त्यांनीं केलें २०. अर्जुन हा बलाढ्य, तरुण व दक्ष असून अतिशय चलाख आहे. शांतनव भीष्म, देवकीपुत्र कृष्ण आणि महाबलाढ्य भरद्वाजपुत्र श्रेष्ठ आचार्य द्रोण ह्यांवांचून संग्रामामध्यें अर्जुनाचा वेग सहन करण्यास दुसरा कोण बरें समर्थ आहे " ? २१, २२. असो. अस्त्रांनीं अस्त्रांचें निवारण करून ते उभयतां महाबलाढ्य भरतवंशजश्रेष्ठ युद्ध-क्रीडा करूं लागले असतां सर्व प्राण्यांच्या दृष्टीला ते मोह पाडूं लागले २३; आणि प्राजापत्य, ऐंद्र, आग्नेय, भयंकर रौद्र, कौबेर, वारुण, याम्य आणि वायव्य ह्या अस्त्रांचा प्रयोग करीत करीत ते महात्मे समरांगणामध्यें संचार करूं लागले २४. तेव्हां त्यांना पाहून विस्मयचकित झालेले प्राणी समरांगणामध्यें ह्मणाले " हे महापराक्रमी अर्जुना, शाबास ! हे भीष्मा, शाबास २५. हा जो प्रचंड अस्त्रांचा महाप्रयोग भीष्म आणि अर्जुन ह्यांच्या संग्रामामध्यें दृष्टीं पडत आहे तो मनुष्यांमध्यें योग्य नाहीं " २६. वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें त्या उभयतां सर्वास्त्रज्ञांमध्यें अस्त्रयुद्ध सुरू झालें आणि अस्त्रयुद्ध संपूर्ण झाल्यावर पुन-रपि बाणांनीं युद्ध सुरू झालें २७. नंतर अर्जुन भीष्माच्या समीप गेला आणि सुव-र्णानें शृंगारिलेलें भीष्माचें धनुष्य त्यानें क्षुरप्रबाणानें तोडून टाकिलें २८. तथापि, एका निमेषांत महारथी व महापराक्रमी भीष्मानें संग्रामामध्यें दुसरें धनुष्य घेतलें आणि क्रुद्ध झालेल्या त्या भीष्मानें तें सज्ज करून पुष्कळच बाण अर्जुनावर सोडिले २९. ह्यावर अर्जुनानेंही घांसलेले व तीक्ष्ण असे पुष्कळ बाण भीष्मावरही सोडिले आणि

सुमहातेजास्तथा भीष्मश्च पाण्डवे ३१ तयोर्दिव्यास्त्रविदुषोरस्यतोर्निशिता-
ञ्शरान् । न विशेषस्तदा राजल्लँक्ष्यते स्म महात्मनोः ३२ अथावृणोद्दश
दिशः शरैरतिरथस्तदा । किरीटमाली कौन्तेयः शूरः शान्तनवस्तथा ३३
अतीव पाण्डवो भीष्मं भीष्मश्चातीव पाण्डवम् । बभूव तस्मिन्सङ्ग्रामे
राजल्लोँके तदद्भुतम् ३४ पाण्डवेन हताः शूरा भीष्मस्य रथरक्षिणः ।
शेरते स्म तदा राजन्कौन्तेयस्याभितो रथम् ३५ ततो गाण्डीवनिर्मुक्ता
निरमित्रं चिकीर्षवः । आगच्छन्पुङ्खसंश्लिष्टाः श्वेतवाहनपत्रिणः ३६
निष्पतन्तो रथात्तस्य धौता हैरण्यवाससः । आकाशे समदृश्यन्त हंसाना-
मिव पङ्क्तयः ३७ तस्य तद्दिव्यमस्त्रं हि विगाढं चित्रमस्यतः । प्रेक्षन्ते स्मान्तरि-
क्षस्थाः सर्वे देवाः सवासवाः ३८ तं दृष्ट्वा परमप्रीतो गन्धर्वश्चित्र-
मद्भुतम् । शशंस देवराजाय चित्रसेनः प्रतापवान् ३९ पश्येमान्पार्थनि-
र्मुक्तान्संसक्तानिव गच्छतः । चित्ररूपमिदं जिष्णोर्दिव्यमस्त्रमुदीर्यतः ४०
नेदं मनुष्याः संदध्युर्न हीदं तेषु विद्यते । पौराणानां महास्त्राणां विचित्रोऽयं

त्या अतितेजस्वी भीष्मानेंही अर्जुनावर पुनरपि बाण सोडिले ३१. ह्याप्रमाणें ते उभ-
यतां दिव्यास्त्रवेत्ते महात्मे तीक्ष्ण बाण सोडूं लागले असतां, हे जनमेजयराजा,
त्यांच्यामध्यें मुळींच भेद दिसेनासा झाला ३२. नंतर किरीट धारण केलेल्या अति-
रथी कुंतीपुत्र अर्जुनानें आणि त्याचप्रमाणें शूर शांतनव भीष्मानेंही बाणांच्या योगानें
दश दिशा व्यापून टाकिल्या ३३. हे जनमेजयराजा, पृथ्वीवर सुरू झालेल्या त्या
संग्रामामध्यें अर्जुनानें भीष्मावर सरशी करून भीष्मानेंही अर्जुनावर सरशी केली व
तें एक आश्चर्यच होऊन बसलें ३४. हे जनमेजयराजा, भीष्माच्या रथाचें रक्षण करणारे
जे शूर, पांडुपुत्र अर्जुनानें मारिले ते त्या अर्जुनाच्याच रथाभोंवतीं पडले ३५. तदनंतर
श्वेतवाहन अर्जुनाचे गांडीवापासून सुटलेले, पिच्छयुक्त असलेले व रणभूमि शत्रुर-
हित करून टाकण्याची इच्छा धरणारे बाण येऊं लागले ३६ आणि सौवर्ण पिच्छभा-
गानें युक्त असलेले व त्याच्या रथांतून बाहेर पडणारे ते उज्ज्वल बाण हंसांच्या पंक्तीं-
प्रमाणें आकाशामध्यें दिसूं लागले ३७. तेव्हां अतिशय अद्भुतरीतीनें बाणप्रभृतींचा
प्रयोग करणाऱ्या त्या अर्जुनाचें तें दिव्य अस्त्र, अंतरिक्षांत असलेले इंद्रासहवर्तमान
सर्वही देव पाहूं लागले ३८. तें अद्भुत चित्रास्त्र सोडणाऱ्या त्या अर्जुनाकडे पाहून
प्रतापी चित्रसेन गंधर्व अतिशय संतुष्ट झाला आणि देवराज इंद्राला ह्मणाला ३९
" एकमेकाला जसे कांहीं चिकटूनच जात असलेले हे अर्जुनानें सोडिलेले बाण आपण
अवलोकन करा. दिव्य अस्त्र सोडणाऱ्या अर्जुनाचें हें चित्ररूप अस्त्र होय ४०. ह्या

समागमः ४१ आददानस्य हि शरान्संधाय च विमुञ्चतः । विकर्षतश्च गाण्डीवं नान्तरं समदृश्यत ४२ मध्यन्दिनगतं सूर्यं प्रतपन्तमिवाम्बरे । नाशक्नुवन्त सैन्यानि पाण्डवं प्रति वीक्षितुम् ॥ तथैव भीष्मं गाङ्गेयं द्रष्टुं नोत्सहते जनः ४३ उभौ विश्रुतकर्माणावुभौ तीव्रपराक्रमौ । उभौ सदृशकर्माणावुभौ युधि सुदुर्जयौ ४४ इत्युक्तो देवराजस्तु पार्थभीष्मसमागमम् । पूजयामास दिव्येन पुष्पवर्षेण भारत ४५ ततः शान्तनवो भीष्मो वामं पार्श्वमताडयत् । पश्यतः प्रतिसंधाय विध्यतः सव्यसाचिनः ४६ ततः प्रहस्य बीभत्सुः पृथुधारेण कार्मुकम् । चिच्छेद गार्ध्रपत्रेण भीष्मस्यादित्यतेजसः ४७ अथैनं दशभिर्बाणैः प्रत्यविध्यत्स्तनान्तरे । यतमानं पराक्रान्तं कुन्तीपुत्रो धनञ्जयः ४८ स पीडितो महाबाहुर्गृहीत्वा रथकूबरम् । गाङ्गेयो युद्धदुर्धर्षस्तस्थौ दीर्घमिवान्तरम् ४९ तं विसंज्ञमपोवाह

अस्त्राचा प्रयोग मानव करीत नाहींत. कारण, हें त्यांचे ठिकाणीं नाहीं. पुराणप्रसिद्ध महास्त्रांचा हा विचित्र समागम येथें झालेला आहे ४१. अर्जुन भात्यांतून बाण घेत असतांना, ते धनुष्याला लावून सोडीत असतांना आणि गांडीव धनुष्य आकर्षण करीत असतांना कांहींएक अंतर दिसेनासें झालें आहे (सारांश, ह्या सर्व क्रिया एककालींच चालल्या आहेत असें दिसत आहे) ४२. आकाशामध्यें प्रकाशत असलेल्या मध्यान्हकालच्या सूर्याप्रमाणें पांडुपुत्र अर्जुनाकडे पाहण्यास सैन्यें समर्थ होत नाहींत आणि त्याचप्रमाणें गंगानंदन भीष्माकडेही पहाण्यास कोणी उद्युक्त होत नाहींत ४३. हे उभयतांही प्रचंड पराक्रम करणारे आहेत; उभयतांचींही कर्में प्रसिद्ध आहेत; उभयतांही पराक्रमामध्यें एकमेकांची बरोबरी करणारे आहेत आणि उभयतांही संग्रामामध्यें अतिशय अजिंक्य आहेत " ४४. ह्याप्रमाणें देवराज इंद्राला चित्रसेन गंधर्वानें सांगितलें असतां, हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, दिव्य पुष्पवृष्टि करून इंद्रानें त्या भीष्मार्जुनांच्या युद्धाची प्रशंसा केली ४५. तदनंतर अर्जुन वेध करीत असतांना त्याला न जुमानितां शांतनव भीष्मानें शरसंधान करून त्याच्या डाव्या बाजूला वेध केला ४६. तेव्हां अर्जुनानें हास्य केलें आणि गृध्रपक्ष्याच्या पिच्छानें युक्त अशा एका विशाल धारेच्या बाणानें सूर्यतुल्यतेजस्वी भीष्माचें धनुष्य तोडिलें ४७ आणि जयाविषयीं प्रयत्न करीत असलेल्या त्या पराक्रमी भीष्माच्या स्तनांमध्यें कुंतीपुत्र धनंजयानें दहा बाणांनीं वेध केला ४८. तेव्हां बाणांनीं पीडित झालेला तो महापराक्रमी व युद्धामध्यें हार जाण्यास दुर्घट असलेला गंगानंदन भीष्म रथाची दांडी धरून बराच वेळपर्यंत स्वस्थ उभा राहिला ४९. परंतु, रथ व अश्व आवरून

संयन्ता रथवाजिनाम् । उपदेशमनुस्मृत्य रक्षमाणो महारथम् ५०
[२०५०] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वणि भीष्मापयाने चतुःषष्टितमोऽध्यायः ॥ ६४ ॥

वैशम्पायन उवाच ॥ भीष्मे तु सङ्ग्रामशिरो विहाय पलायमाने धृतराष्ट्रपुत्रः । उत्सृज्य केतुं विनदन्महात्मा धनुर्विगृह्यार्जुनमाससाद १ स भीमधन्वानमुदग्रवीर्यं धनञ्जयं शत्रुगणे चरन्तम् । आकर्णपूर्णायतचोदितेन विव्याध भल्लेन ललाटमध्ये २ स तेन बाणेन समर्पितेन जाम्बूनदाग्रेण सुसंहितेन । रराज राजन्महनीयकर्मा यथैकपर्वा रुचिरैकशृङ्गः ३ अथास्य बाणेन विदारितस्य प्रादुर्बभूवासृगजस्रमुष्णम् । स तस्य जाम्बूनदपुङ्खचित्रो भित्त्वा ललाटं सुविराजते स्म ४ दुर्योधनश्चापि तमुग्रतेजाः पार्थश्च दुर्योधनमेकवीरः । अन्योन्यमाजौ पुरुषप्रवीरौ समौ समाजग्मतुराजमीढौ ५ ततः प्रभिन्नेन महागजेन महीधराभेन पुनर्विकर्णः ।

धरणारा त्याचा *सारथि (रथी मूर्च्छित झाला असतां रथ पलीकडे न्यावा हा) उपदेश स्मरून त्या महारथ्याचें रक्षण व्हावें एतदर्थ मूर्च्छित झालेल्या त्या भीष्माला एकीकडे घेऊन गेला ५०. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं भीष्म रणांतून दूर गेल्याविषयीं चौसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६४ ॥

वैशंपायन सांगतातः—संग्रामाचा अग्रभाग सोडून भीष्म पलायन करूं लागला असतां धृतराष्ट्रपुत्र महात्मा दुर्योधन ध्वज फडकावून व धनुष्य घेऊन गर्जना करीत करीत अर्जुनाकडे आला १ आणि भयंकर धनुष्य धारण करून शत्रुसमुदायामध्यें संचार करीत असलेल्या त्या महावीर्यवान् अर्जुनाला ललाटाचे मध्यभागीं कानापर्यंत धनुष्य ओढून सोडिलेल्या भल्लबाणांच्या योगानें त्यानें वेध केला २. तेव्हां हे जनमेजयराजा, अत्यंत दृढ व सुवर्णखचित अग्रानें युक्त असा तो बाण ललाटामध्यें रुपून बसला असतां ज्याचीं कर्में प्रशंसेस पात्र आहेत असा तो अर्जुन एका मनोहर शिखरानें अथवा एका दीर्घ कळकानें युक्त असलेल्या पर्वताप्रमाणें शोभूं लागला ३. नंतर बाणानें विदीर्ण झालेल्या त्या अर्जुनाच्या ललाटांतून एकसारिखें उष्ण रक्त वाहूं लागलें आणि सुवर्णयुक्त पिच्छानें शृंगारिलेला भल्ल बाणही अर्जुनाचें ललाट भेदून फारच शोभूं लागला ४. उग्रतेजस्वी दुर्योधन त्या अर्जुनावर आणि पृथ्वींतील एक वीर अर्जुन दुर्योधनावर अशारीतीनें ते उभयतांही सारखे असलेले अजमीढवंशज पुरुषश्रेष्ठ संग्रामामध्यें परस्परांवर चालून गेले ५. नंतर पर्वतप्राय

रथैश्चतुर्भिर्गजपादरक्षैः कुन्तीसुतं जिष्णुमथाभ्यधावत् ६ तमापतन्तं त्वरितं गजेन्द्रं धनञ्जयः कुम्भविभागमध्ये । आकर्णपूर्णेन महायसेन बाणेन विव्याध महाजवेन ७ पार्थेन सृष्टः स तु गार्ध्रपत्र आपुङ्खदेशात्प्रविवेश नागम् । विदार्य शैलप्रवरं प्रकाशं यथाशनिः पर्वतमिन्द्रसृष्टः ८ शरप्रतप्तः स तु नागराजः प्रवेपिताङ्गो व्यथितान्तरात्मा । संसीदमानो निपपात मह्यां वज्राहतं शृङ्गमिवाचलस्य ९ निपातिते दन्तिवरे पृथिव्यां त्रासाद्विकर्णः सहसावतीर्य । तूर्णं पदान्यष्टशतानि गत्वा विविंशतेः स्यन्दनमारुरोह १० निहत्य नागं तु शरेण तेन वज्रोपमेनाद्रिवराम्बुदाभम् । तथाविधेनैव शरेण पार्थो दुर्योधनं वक्षसि निर्बिभेद ११ ततो गजे राजनि चैव भिन्ने भग्ने विकर्णे च सपादरक्षे । गाण्डीवमुक्तैर्विशिखैः प्रणुन्नास्ते योधमुख्याः सहसापजग्मुः १२ दृष्ट्वैव पार्थेन हतं च नागं योधांश्च सर्वान्द्रवतो निशम्य । रथं समावृत्य कुरुप्रवीरो रणात्प्रदुद्राव

मदमत्त गजावर आरूढ झालेला विकर्णही गजपादरक्षक चार रथ्यांसहवर्तमान कुंतीपुत्र अर्जुनावर धांवला ६. तेव्हां त्वरेत्वरेनें चालून येत असलेल्या त्या गजेंद्राला दोन्ही गंडस्थलांमध्यें अर्जुनानें कानापर्यंत धनुष्य ओढून लोखंडाचें मोठें पातें लाविलेल्या महावेगवान् बाणानें वेध केला असतां ७ महापर्वताला विदीर्ण करून जाणारें इंद्रानें सोडिलेलें वज्रच कीं काय असा तो अर्जुनानें सोडिलेला व गृध्रपक्ष्याच्या पिच्छांनीं युक्त असलेला बाण त्या गजाला विदीर्ण करून पिच्छयुक्त प्रदेशासहवर्तमान त्याच्या गंडस्थलामध्यें शिरला ८. ह्याप्रमाणें तो गजेंद्र बाणानें पीडित झाला असतां अंतःकरणामध्यें अतिशय कळवळला; त्याच्या शरीराला कंप सुटला आणि वज्राचा तडाका बसलेल्या पर्वताच्या शिखराप्रमाणें तो शेवटीं धैर्य खचतां खचतां भूमीवर पडला ९. अशारीतीनें अर्जुनानें त्या श्रेष्ठ गजाला पृथ्वीवर पाडिलें असतां विकर्ण भीतीनें एकाएकीं खालीं उतरला आणि आठशें पाउलें सत्वर चालून जाऊन विविंशतीच्या रथावर आरूढ झाला १०. ह्याप्रमाणें त्या वज्रतुल्य बाणानें त्या पर्वतप्राय आणि मेघतुल्य गजाचा वध करून तशाचप्रकारच्या एका बाणानें दुर्योधनाचें वक्षस्थलही अर्जुनानें फोडिलें ११. असो. अशाप्रकारें गजाचें गंडस्थल आणि राजाचें वक्षस्थल विदीर्ण होऊन पादरक्षकांसहवर्तमान विकर्णाचा पराजय झाला असतां गांडीवापासून सुटलेल्या बाणांनीं ताडित झालेले ते मुख्य मुख्य योद्धेही संग्रामांतून एकाएकीं पळत सुटले १२. नंतर अर्जुनानें गज मारिलेला पाहून व सर्वही योद्धे पळत असल्याचें अवलोकन करून कुरुवीर दुर्योधनानें आपला रथ सांवरून धरिला

यतो न पार्थः १३ तं भीमरूपं त्वरितं द्रवन्तं दुर्योधनं शत्रुसहोभिषङ्गात्। प्रास्फोटयद्योद्धुमनाः किरीटी बाणेन विद्धं रुधिरं वमन्तम् १४ अर्जुन उवाच ॥ विहाय कीर्तिं विपुलं यशश्च युद्धात्परावृत्य पलायसे किम्। न तेद्य तूर्याणि समाहतानि तथैव राज्यादवरोपितस्य १५ युधिष्ठिरस्यास्मि निदेशकारी पार्थस्तृतीयो युधि संस्थितोस्मि। तदर्थमावृत्य मुखं प्रयच्छ नरेन्द्र वृत्तं स्मर धार्तराष्ट्र १६ मोघं तवेदं भुवि नामधेयं दुर्योधनेतीह कृतं पुरस्तात्। न हीह दुर्योधनता तवास्ति पलायमानस्य रणं विहाय १७ न ते पुरस्तादथ पृष्ठतो वा पश्यामि दुर्योधन रक्षितारम्। अपेहि युद्धात्पुरुषप्रवीर प्राणान्प्रियान्पाण्डवतोद्य रक्ष १८ [२०६८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे दुर्योधनापयाने पञ्चषष्टितमोध्यायः ॥ ६५ ॥

वैशम्पायन उवाच ॥ आहूयमानश्च स तेन सङ्ख्ये महात्मना वै धृतराष्ट्रपुत्रः। निवर्तितस्तस्य गिराङ्कुशेन महागजो मत्त इवाङ्कुशेन १

आणि ज्रिकडे अर्जुन नव्हता तिकडे तो पळून गेला १३. तेव्हां उग्र मुद्रेनें युक्त असलेला तो दुर्योधन बाणांनीं विद्ध झाल्यामुळें रक्ताच्या गुळण्या टाकीत आहे आणि पराभव झाल्यामुळें त्वरेत्वरेनें पलायन करीत आहे असें अवलोकन करून अर्जुनानें युद्धाच्या इच्छेनें दंड ठोकिले १४. अर्जुन ह्मणतो:— अरे, कीर्ति आणि विपुल यश ह्यांची पर्वा न करितां युद्धापासून पराङ्मुख होऊन तूं असा पलायन कां करीत आहेस ? अरे, तुझीं कोठें जयसूचक वाद्यें वाजत नाहींत हें काय ? राज्यापासून पदच्युत केलेल्या १५ युधिष्ठिराच्या आज्ञेप्रमाणें वागणारा मी तिसरा कुंतीपुत्र संग्रामामध्यें उभा आहें. ह्यास्तव, हे राजा, हे धृतराष्ट्रपुत्रा, एकदां इकडे वळून आपलें मुख मला दाखीव आणि आपल्या पूर्वींच्या वर्तनाची एकदां आठवण कर १६. पूर्वीं दुर्योधन ह्मणून जें तुला नांव ठेविलें आहे तें हें पृथ्वीवर व्यर्थ झालें आहे. कारण, रण सोडून पळत सुटणाऱ्या तुझे ठिकाणीं दुर्योधनता येथें कोठें दिसत नाहीं १७. हे दुर्योधना, अरे, तुझ्या पुढें अथवा मागें तुझें रक्षण करणारा मला कोणी दिसत नाहीं. ह्यास्तव, हे महावीर पुरुषा, तूं आपला संग्रामापासून पलायन कर आणि पांडुपुत्र अर्जुनापासून आपल्या प्रिय प्राणांचें रक्षण कर १८. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वांपैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं दुर्योधनाच्या पलायनाविषयीं पासष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६५ ॥

वैशंपायन सांगतात:—तो महात्मा अर्जुन त्या धृतराष्ट्रपुत्राला संग्रामामध्यें आह्वान

सोमृष्यमाणो वचसाभिमृष्टो महारथेनातिरथस्तरस्वी । पर्याववर्ताथ रथेन वीरो भोगी यथा पादतलाभिमृष्टः २ तं प्रेक्ष्य कर्णः परिवर्तमानं निवर्त्य संस्तभ्य च विद्धगात्रम् । दुर्योधनस्योत्तरतोभ्यगच्छत्पार्थं नृवीरो युधि हेममाली ३ भीष्मस्ततः शान्तनवो विवृत्य हिरण्यकक्षस्त्वरयाभिषङ्गी । दुर्योधनं पश्चिमतोभ्यरक्षत्पार्थान्महाबाहुरधिज्यधन्वा ४ द्रोणः कृपश्चैव विविंशतिश्च दुःशासनश्चैव विवृत्य शीघ्रम् । सर्वे पुरस्ताद्वितताेरुचापा दुर्योधनार्थं त्वरिताभ्युपेयुः ५ स तान्यनीकानि निवर्तमानान्यालोक्य पूर्णौघनिभानि पार्थः । हंसो यथा मेघमिवापतन्तं धनञ्जयः प्रत्यतपत्तरस्वी ६ ते सर्वतः संपरिवार्य पार्थमस्त्राणि दिव्यानि समाददानाः । ववर्षुरभ्येत्य शरैः समन्तान्मेघा यथा भूधरमम्बुवर्गैः ७ ततोस्त्रमस्त्रेण निवार्य तेषां गाण्डीवधन्वा कुरुपुङ्गवानाम् । संमोहनं

करूं लागला असतां अंकुशाच्या योगानें ज्याप्रमाणें मत्त झालेला महागजही परत फिरतो त्याप्रमाणें त्याच्या वाणीरूप अंकुशानें तो दुर्योधनरूप महागज परत फिरला १. महारथी अर्जुनानें भाषणानें विद्ध केल्यामुळें त्या वेगवान् अतिरथी दुर्योधनाला तें भाषण सहन होईना आणि पुच्छावर पाय पडला असतां ज्याप्रमाणें सर्प परत फिरतो त्याप्रमाणें तो वीर दुर्योधन रथासहवर्तमान परत फिरला २. ह्याप्रमाणें शरीराला वेध झालेला दुर्योधन परत फिरत आहे असें अवलोकन करून अर्जुनही परत फिरला आणि जरा स्वस्थ उभा राहून दुर्योधनाच्या उत्तरेकडून संग्रामामध्यें गेला व त्याचप्रमाणें सुवर्णमाला धारण केलेला वीरपुरुष दुर्योधनही संग्रामामध्यें अर्जुनावर चाल करून गेला ३. नंतर सुवर्णाचीं खोगिरें ज्याच्या अश्वांवर घातलेलीं आहेत असा शत्रुविजयी व महापराक्रमी शांतनव भीष्म परत फिरला आणि धनुष्याला प्रत्यंचा चढवून व दुर्योधनाच्या पृष्ठभागीं उभा राहून अर्जुनापासून त्याचें रक्षण करूं लागला ४. नंतर द्रोण, कृप, विविंशति व दुःशासन हेही सर्व सत्वर परत फिरले आणि आपलीं मोठीं मोठीं धनुष्यें आकर्षण करून त्वरेत्वरेनें ते दुर्योधनाचे अग्रभागीं गेले ५. तेव्हां तुडुंब भरून चाललेल्या प्रवाहाप्रमाणें परत फिरत असलेलीं तीं सैन्यें अवलोकन केल्यावर सूर्य ज्याप्रमाणें येत असलेल्या मेघाला तप्त करितो त्याप्रमाणें वेगवान् अर्जुन त्यांना ताप देऊं लागला ६. दिव्य अस्त्रें धारण करणाऱ्या त्या योद्ध्यांनीं सर्व बाजूंनीं अर्जुनाला घेरून टाकिलें आणि मेघ ज्याप्रमाणें जलधारांनीं पर्वतावर वृष्टि करूं लागतात त्याप्रमाणें ते समीप येऊन बाणांच्या योगानें सर्व बाजूंनीं अर्जुनावर वृष्टि करूं लागले ७. तदनंतर आपल्या अस्त्रानें त्या कुरुवंशजश्रेष्ठांच्या अस्त्रांचें निवारण करून शत्रूचा

शत्रुसहोन्यदस्त्रं प्रादुश्चकारैन्द्रिरपारणीयम् ८ ततो दिशश्चानुदिशो विवृत्य शरैः सुधारैर्निशितैः सुपत्रैः । गाण्डीवघोषेण मनांसि तेषां महाबलः प्रव्यथयाश्चकार ९ ततः पुनर्भीमरवं प्रगृह्य दोर्भ्यां महाशङ्खमुदारघोषम्। व्यनादयत्स प्रदिशो दिशः खं भुवं च पार्थो द्विषतां निहन्ता १० ते शङ्खनादेन कुरुप्रवीराः संमोहिताः पार्थसमीरितेन । उत्सृज्य चापानि दुरासदानि सर्वे तदा शान्तिपरा बभूवुः ११ तथा विसंज्ञेषु च तेषु पार्थः स्मृत्वा च वाक्यानि तथोत्तरायाः । निर्याहि मध्यादिति मत्स्यपुत्रमुवाच यावत्कुरवो विसंज्ञाः १२ आचार्यशारद्वतयोः सुशुक्के कर्णस्य पीतं रुचिरं च वस्त्रम् । द्रौणेश्च राज्ञश्च तथैव नीले वस्त्रे समादत्स्व नरप्रवीर १३ भीष्मस्य संज्ञां तु तथैव मन्ये जानाति सोस्त्रप्रतिघातमेषः । एतस्य वाहान्कुरु सव्यतस्त्वमेवं हि यातव्यममूढसंज्ञैः १४ रश्मीन्समुत्सृज्य ततो महात्मा रथादवप्लुत्य विराटपुत्रः । वस्त्राण्युपादाय

पराक्रम सहन करणाऱ्या त्या गांडीवधनुर्धारी इंद्रपुत्र अर्जुनानें अनिवार्य अशा संमोहजनामक दुसऱ्या अस्त्राचा प्रयोग केला ८. नंतर उत्कृष्ट धारा आणि मनोहर पिसें ह्यांनीं युक्त असलेल्या तीक्ष्ण बाणांच्या योगानें दिशा व विदिशा व्याप्त करून महाबलाढ्य अर्जुनानें त्यांचीं मनें गांडीवधनुष्याच्या टणत्कारानें व्यथित केलीं ९. तदनंतर भयंकर ध्वनि करणारा आपला मोठा शंख त्या शत्रुनाशक अर्जुनानें हातांमध्यें घेतला आणि उच्चस्वरानें तो शंख फुंकून दिशा व विदिशा ह्यांसहवर्तमान सर्व आकाश व भूतल हीं त्यानें नादित केलीं १०. तेव्हां अर्जुनानें केलेल्या शंखाच्या नादानें ते कुरुवीर मोहित झाले आणि आपलीं प्रचंड धनुष्यें टाकून देऊन ते सर्वही कांहींएक हालचाल न करितां स्वस्थ झाले ११. ह्याप्रमाणें ते मूर्च्छित झाले असतां अर्जुनाला उत्तरेच्या त्या भाषणाचें स्मरण झालें आणि तो मत्स्यपुत्र उत्तराला ह्मणाला " कौरव मूर्छित झाले आहेत तोंच मधून जा १२ आणि, हे वीरपुरुषा, द्रोणाचार्य आणि शारद्वत कृपाचार्य ह्यांचीं उत्तम शुभ्र वस्त्रें, कर्णाचें मनोहर व पीतवर्ण वस्त्र आणि त्याचप्रमाणें अश्वत्थामा व राजा दुर्योधन ह्यांचीं नीलवर्ण वस्त्रें तूं घेऊन ये १३. भीष्म पूर्वीप्रमाणेंच शुद्धीवर आहेत असें मला वाटतें. कारण, ह्या अस्त्राचें निवारण ह्यांना विदित आहे. ह्यास्तव, ह्यांचे अश्व तूं डावे टाकून जा. सारांश, बेशुद्ध न झालेले भीष्म डावी घालून जात असलेल्या तुझ्याकडे पहात असतांना तूं जा " १४. तदनंतर अश्वांच्या रश्मि सोडून देऊन महात्मा विराटपुत्र उत्तर रथावरून खालीं उतरला आणि त्या महारथी

महारथानां तूर्णं पुनः स्वं रथमारुरोह १५ ततोऽन्वशासच्चतुरः सदश्वान्पुत्रो विराटस्य हिरण्यकक्षान् । ते तद्व्यतीयुर्ध्वजिनामनीकं श्वेता वहन्तोऽर्जुनमाजिमध्यात् १६ तथानुयान्तं पुरुषप्रवीरं भीष्मः शरैरभ्यहनत्तरस्वी। स चापि भीष्मस्य हयान्निहत्य विव्याध पार्थो दशभिः पृषत्कैः १७ ततोऽर्जुनो भीष्ममपास्य युद्धे विद्ध्वास्य यन्तारमरिष्टधन्वा । तस्थौ विमुक्तो रथवृन्दमध्यान्मेघं विदार्येव सहस्ररश्मिः १८ लब्ध्वा हि संज्ञां तु कुरुप्रवीराः पार्थं निरीक्ष्याथ सुरेन्द्रकल्पम् । रणे विमुक्तं स्थितमेकमाजौ स धार्तराष्ट्रस्त्वरितं बभाषे १९ अयं कथं वै भवतो विमुक्तस्तथा प्रमथ्नीत यथा न मुच्येत् २० तमब्रवीच्छान्तनवः प्रहस्य क्व ते गता बुद्धिरभूत्क्व वीर्यम्। शान्तिं परां प्राप्य तदा स्थितोऽभूरुत्सृज्य बाणांश्च धनुर्विचित्रम् २१ न त्वेष बीभत्सुरलं नृशंसं कर्तुं न पापेऽस्य मनो विशिष्टम् । त्रैलोक्यहेतोर्न जहेत्स्वधर्मं सर्वे न तस्मान्निहता

कौरवांचीं वस्त्रें घेऊन पुनरपि तो सत्वर अपल्या रथावर आरूढ झाला १५. नंतर सुवर्णाचीं खोगिरें घातलेल्या त्या चारी उत्कृष्ट अश्वांना विराटपुत्र उत्तरानें इशारा केला आणि संग्रामांतून अर्जुनाला बाहेर नेत नेत ते श्वेतवर्ण अश्व त्या ध्वजयुक्त योद्ध्यांच्या सेनेला मागें टाकून चालते झाले १६. ह्याप्रमाणें तो वीरपुरुष अर्जुन निघून जाऊं लागला असतां वेगवान् भीष्मानें बाणांनीं त्याला वेध केला व त्या अर्जुनानेंही भीष्माच्या अश्वांचा वध करून दहा पृषत्कबाणांनीं त्यालाही वेध केला १७. सारांश, अशारीतीनें संग्रामामध्यें पुढें आलेल्या भीष्माचा पराभव करून आपलें कल्याण करणारें गांडीव धनुष्य हातीं घेतलेल्या अर्जुनानें त्याच्या सारथ्यालाही वेध केला आणि मेघाचें विदारण करून प्रकाशत राहणाऱ्या सूर्याप्रमाणें रथसमुदायामधून पार पडलेला तो अर्जुन संग्रामामध्यें उभा राहिला १८. पुढें शुद्धीवर आल्यानंतर शत्रूपासून मुक्त झालेला इंद्रतुल्य अर्जुन एकटा संग्रामामध्यें उभा आहे असें अवलोकन करून तो धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन त्वरेनें ह्मणाला " हे कुरुवीरहो १९, हा तुमच्या हातून सुटला कसा ? ह्याची सुटका न होऊं देतां तुह्मी ह्याचा वध करा " २०. हें ऐकिल्यावर शांतनव भीष्म हास्य करून त्या दुर्योधनाला ह्मणाला " विचित्र धनुष्य आणि बाण टाकून देऊन व पराकाष्ठेच्या शांतीचें अवलंबन करून जेव्हां तू बसला होतास तेव्हां तुझी बुद्धि कोणीकडे गेली होती ? आणि त्याचप्रमाणें तुझें वीर्य तरी तेव्हां कोठें होतें ? २१. ह्या अर्जुनाच्या हातून निंद्य कर्म होणार नाहीं. कारण, ह्याचें मन श्रेष्ठ आहे. ह्यास्तव, पापकर्माचे ठिकाणीं तें आसक्त नाहीं. फार कशाला, त्रैलोक्याच्या प्राप्तीकरितांही हा स्वधर्माचा त्याग करणार नाहीं आणि ह्मणूनच ह्या संग्रामामध्यें

रणेऽस्मिन् २२ क्षिप्रं कुरून्याहि कुरुप्रवीर विजित्य गाश्च प्रतियातु पार्थः। मा ते स्वकार्थो निपतेत मोहात्तत्संविधातव्यमरिष्टबन्धम् २३ वैशम्पायन उवाच ॥ दुर्योधनस्तस्य तु तन्निशम्य पितामहस्यात्महितं वचोऽथ । अतीतकामो युधि सोऽत्यमर्षी राजा विनिःश्वस्य बभूव तूष्णीम् २४ तद्भीष्मवाक्यं हितमीक्ष्य सर्वे धनञ्जयाग्निं च विवर्धमानम् । निवर्तनायैव मनो निदध्युर्दुर्योधनं ते परिरक्षमाणाः २५ तान्प्रस्थितान्प्रीतमनाः स पार्थो धनञ्जयः प्रेक्ष्य कुरुप्रवीरान् । अभाषमाणोऽनुनयं मुहूर्तं वचोऽब्रवीत्संपरिहृत्य भूयः २६ पितामहं शान्तनवं च वृद्धं द्रोणं गुरुं च प्रणिपत्य मूर्ध्ना । द्रौणिं कृपं चैव कुरूंश्च मान्याञ्छरैर्विचित्रैरभिवाद्य चैव २७ दुर्योधनस्योत्तमरत्नचित्रं चिच्छेद पार्थो मुकुटं शरेण । आमन्त्र्य वीरांश्च तथैव मान्यान्गाण्डीवघोषेण विनाद्य लोकान् २८ स देवदत्तं सहसा विनाद्य विदार्य वीरो द्विषतां मनांसि । ध्वजेन सर्वानभिभूय शत्रून्सहेममालेन

त्यानें सर्वांचा वध केला नाहीं २२. हे कुरुवीरा, आतां तूं सत्वर कुरुदेशाकडे जा आणि अर्जुनाला गाई जिंकून परत जाऊं दे. मोहामुळें, तुझी जी स्वकीय संपत्ति आहे ती तरी नाहींशी होऊं नये. ह्यास्तव, परिणामीं सुखावह असलेल्याच कर्माचें आतां अवलंबन केलें पाहिजे २३. वैशंपायन सांगतातः— त्या पितामह भीष्मानें केलेलें तें आपल्या हिताचें भाषण श्रवण केल्यावर संग्रामामध्यें शत्रूवर अतिशय क्रुद्ध होणारा तो दुर्योधन अर्जुनाला जिंकण्याविषयीं निराश झाला आणि सुस्कारा टाकून स्वस्थ बसला २४. नंतर भीष्माचें सांगणें हितावह आहे असा विचार करून व अर्जुनरूप अग्नि एकसारिखा वृद्धिंगत होत आहे असें पाहून दुर्योधनाच्या रक्षणाची इच्छा धरणाऱ्या त्या सर्वेही योद्ध्यांनीं निवृत्त होण्याचेंच मनामध्यें आणिलें २५. ह्याप्रमाणें परत निघालेल्या त्या कुरुवीरांना अवलोकन करून मनामध्यें प्रसन्न झालेला कुंतीपुत्र अर्जुन क्षणभर कांहींएक न बोलतां स्वस्थ उभा राहिला; आणि नंतर त्यांच्याकडे वळून सांत्वनपूर्वक त्यानें त्यांच्याशीं भाषणही केलें २६. नंतर वृद्ध पितामह शांतनव भीष्म आणि गुरु द्रोण ह्यांना मस्तकानें प्रणाम करून द्रोणपुत्र अश्वत्थामा, कृपाचार्य व इतरही कौरवपक्षाकडील मान्य योद्धे ह्यांना त्या अर्जुनानें विचित्र बाणांच्या योगानें वंदन केलें २७; व उत्कृष्ट रत्नांनीं शृंगारिलेला दुर्योधनाचा मुकुट बाणाच्या योगानें त्यानें फोडून टाकिला. तदनंतर त्याचप्रमाणें मान्य वीरांची अनुज्ञा घेऊन, गांडीवाच्या टणत्कारानें त्रैलोक्य दणाणून देऊन २८, एकाएकीं देवदत्त शंख फुंकिल्यानें शत्रूचीं मनें विदीर्ण करून आणि सर्वांचा पराभव करून सुवर्णमालेनें युक्त

विराजमानः २९ दृष्ट्वा प्रयातांस्तु कुरून्किरीटी हृष्टोऽब्रवीत्तत्र स मत्स्यपुत्रम् । आवर्तयाश्वान्पशवो जितास्ते याताः परे याहि पुरं प्रहृष्टः ३० देवास्तु दृष्ट्वा महदद्भुतं तद्युद्धं कुरूणां सह फाल्गुनेन । जग्मुर्यथास्वं भवनं प्रतीताः पार्थस्य कर्माणि विचिन्तयन्तः ३१ [२०९९] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे समस्तकौरवपलायने षट्षष्टितमोऽध्यायः ॥ ६६ ॥

वैशम्पायन उवाच ॥ ततो विजित्य सङ्ग्रामे कुरून्स वृषभेक्षणः । समानयामास तदा विराटस्य धनं महत् १ गतेषु च प्रभग्नेषु धार्तराष्ट्रेषु सर्वतः । वनान्निष्क्रम्य गहनाद्बहवः कुरुसैनिकाः २ भयात्संत्रस्तमनसः समाजग्मुस्ततस्ततः । मुक्तकेशास्त्वदृश्यन्त स्थिताः प्राञ्जलयस्तदा ३ क्षुत्पिपासापरिश्रान्ता विदेशस्था विचेतसः । ऊचुः प्रणम्य संभ्रान्ताः पार्थ किं करवाम ते ४ अर्जुन उवाच॥ स्वस्ति व्रजत वो भद्रं न भेतव्यं

असलेल्या ध्वजाच्या योगानें तो अर्जुन शोभूं लागला २९. असो. परत निघालेल्या कौरवांना अवलोकन केल्यावर तो अर्जुन आनंदित झाला आणि मत्स्यपुत्र उत्तराला ह्मणाला " आतां अश्व परत फिरीव. तुझे पशु जिंकून आणिले व तुझे शत्रुही निघून गेले. आतां तूं आनंदानें आपल्या नगराला चल "३०. असो. अर्जुनासहवर्तमान झालेलें तें कौरवांचें अद्भुत युद्ध अवलोकन करून देवही आनंदित झाले आणि अर्जुनाच्या कृत्यांचा विचार करीत करीत ते आपआपल्या स्थानीं निघून गेले ३१. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं सर्वकौरवांच्या पलायनाविषयीं सहासष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६६ ॥

वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें संग्रामामध्यें कौरवांना जिंकून त्या महाविचारी अर्जुनानें विराटाकडे विपुल धन आणिलें १. धृतराष्ट्रपुत्र पराजित होऊन सर्व बाजूंनीं निघून गेल्यानंतर त्या गहन वनांतून बाहेर गेलेले अनेक कुरुसैनिक २ भीतीमुळें मनामध्यें त्रस्त झाले आणि केंस मोकळे सोडिलेले ते कुरुसैनिक चोहोंकडून येऊन हात जोडून उभे राहिले ३. नंतर क्षुधेनें व तृषेनें व्याकुल झालेले आणि विदेशांत असल्यामुळें कांहींएक सुचेनासें झालेले ते सैनिक भयभीत होऊन व प्रणाम करून " हे पार्थ, आह्मांला आपली काय आज्ञा आहे ? " असें विचारूं लागले असतां ४ अर्जुन त्यांना ह्मणाला " तुमचें कल्याण असो; तुह्मीं खुशाल जा. तुह्मीं मुळींच माझें भय बाळगूं नका. दुःखितांचा वध करण्याचें मी कधीं मनामध्येंही

कथंचन । नाहमार्तांजिघांसामि भृशमाश्वासयामि वः ५ वैशम्पायन उवाच ॥ तस्य तामभयां वाचं श्रुत्वा योधाः समागताः । आयुः-कीर्तियशोदाभिस्तमाशीर्भिरनन्दयन् ६ ततोर्जुनं नागमिव प्रभिन्नमुत्सृज्य शत्रून्विनिवर्तमानम् । विराटराष्ट्राभिमुखं प्रयान्तं नाशक्नुवंस्तं कुरवोभियातुम् ७ ततः स तन्मेघमिवापतन्तं विद्राव्य पार्थः कुरुमेघसैन्यम् । मत्स्यस्य पुत्रं द्विषतां निहन्ता वचोब्रवीत्संपरिरभ्य भूयः ८ पितुः सकाशे तव तात सर्वे वसन्ति पार्था विदितं तवैव । तान्मा प्रशंसेर्नगरं प्रविश्य भीतः प्रणश्येद्धि स मत्स्यराजः ९ मया जिता सा ध्वजिनी कुरूणां मया च गावो विजिता द्विषद्भ्यः । पितुः सकाशं नगरं प्रविश्य त्वमात्मनः कर्म कृतं ब्रवीहि १० उत्तर उवाच ॥ यत्ते कृतं कर्म न पारणीयं तत्कर्म कर्तुं मम नास्ति शक्तिः । न त्वां प्रवक्ष्यामि पितुः सकाशे यावन्न मां वक्ष्यसि सव्यसाचिन् ११ वैशम्पायन उवाच ॥ स शत्रुसेनामवजित्य जिष्णुराच्छिद्य सर्वं च धनं कुरुभ्यः । श्मशानमागत्य पुनः शमीं तामभ्येत्य तस्थौ

आणीत नाहीं; मी तुह्मांला उलट होईल तितकें धैर्यच देईन " ५. वैशंपायन सांगतातः—त्याचें तें अभयवचन श्रवण केल्यावर सर्वही योद्धे एकत्र जुळले आणि त्यांनीं आयुष्य, कीर्ति व यश वृद्धिंगत करणारे आशीर्वाद त्याला दिले ६. तदनंतर शत्रूंना सोडून परत फिरलेल्या आणि मत्त गजाप्रमाणें निर्धास्तपणें विराटाच्या राष्ट्राकडे तोंड करून जात असलेल्या त्या अर्जुनाचे समीप जाण्यासही कौरव समर्थ झाले नाहींत ७. असो. मेघाप्रमाणें चालून येत असलेल्या त्या मेघतुल्य कुरुसैन्याला पळवून लाविल्यानंतर शत्रुघातक अर्जुन मत्स्यपुत्र उत्तराला कवटाळून ह्मणाला ८ " बा उत्तरा, तुझ्या पित्याजवळ सर्व पांडव वास्तव्य करीत आहेत हें काय तें तुलाच विदित झालें आहे. ह्यास्तव, नगरामध्यें गेल्यावर तूं त्यांबद्दल वाच्यता करूं नको. कारण, तो मत्स्यराज विराट भयभीत होऊनच नाश पावेल ९. नगरामध्यें प्रविष्ट झाल्यावर आणि पित्याचे समीप गेल्यावर " मीं ती कौरवसेना जिंकिली आणि शत्रूंपासून गाई मीं जिंकून आणिल्या " अशारीतीनें तूं हें सर्व स्वपराक्रमानेंच झाल्याचें कथन कर " १०. उत्तर ह्मणतोः—तूं जें कर्म केलेंस तें कोणाच्याही हातून होणें अशक्य आहे आणि तें करण्यास माझें तर सामर्थ्यच नाहीं. तथापि, हे अर्जुना, तूं मला जोपर्यंत तसें सांगितलें नाहींस तोंपर्यंत मीही पित्याचे समीप तुझी परिस्फुटता करणार नाहीं ११. वैशंपायन सांगतातः—शत्रुसेना जिंकून आणि कौरवांपासून सर्व धन

शरविक्षताङ्गः १२ ततः स वह्निप्रतिमो महाकपिः सहैव भूतैर्दिवमुत्पपात । तथैव माया विहिता बभूव ध्वजं च सैंहं युयुजे रथे पुनः १३ विधाय तच्चायुधमाजिवर्धनं कुरूत्तमानामिषुधीः शरांस्तथा । प्रायात्स मत्स्यो नगरं प्रहृष्टः किरीटिना सारथिना महात्मना १४ पार्थस्तु कृत्वा परमार्यकर्म निहत्य शत्रून्द्विषतां निहन्ता । चकार वेणीं च तथैव भूयो जग्राह रश्मीन्पुनरुत्तरस्य ॥ विवेश हृष्टो नगरं महामना बृहन्नलारूपमुपेत्य सारथिः १५ वैशम्पायन उवाच ॥ ततो निवृत्ताः कुरवः प्रभग्ना वशमास्थिताः । हस्तिनापुरमुद्दिश्य सर्वे दीना ययुस्तदा १६ पन्थानमुपसंगम्य फाल्गुनो वाक्यमब्रवीत् । १७ राजपुत्र प्रत्यवेक्ष समानीतानि सर्वशः । गोकुलानि महाबाहो वीर गोपालकैः सह १८ ततोऽपराह्णे यास्यामो विराटनगरं प्रति । आश्वास्य पाययित्वा च परिप्लाव्य च वाजिनः १९ गच्छन्तु त्वरिताश्चैव गोपालाः प्रेषितास्त्वया । नगरे प्रियमाख्यातुं घोषयन्तु च ते जयम् २० वैशम्पायन उवाच ॥ अथोत्तरस्त्वर-

---

हिसकावून घेऊन बाणानें शरीराला क्षतें पडलेला तो अर्जुन श्मशानासमीप आल्यावर पुनरपि त्या शमीवृक्षाजवळ जाऊन उभा राहिला १२. तदनंतर त्या अग्नितुल्य महाकपीनें इतर भूतांसहवर्तमानच आकाशामध्यें उड्डाण केलें; त्याचप्रमाणें इतर मायेचीही स्थिति झाली आणि पुनरपि उत्तराच्या रथावर सिंहाकृति ध्वज फडकूं लागला १३. असो. शमीवृक्षासमीप आल्यावर संग्रामामध्यें जय देणारें तें गांडीव धनुष्य आणि कुरुवंशजश्रेष्ठ पांडवांचे ते भाते व बाण त्या मत्स्यराजपुत्र उत्तरानें तेथल्यातेथेंच ठेविले आणि महात्म्या अर्जुनसारथ्यासहवर्तमान तो आनंदानें नगरामध्यें गेला १४. शत्रुघातक अर्जुनानें सज्जनाला अनुरूप अशाच कर्माचें अवलंबन करून शत्रूंचा पराभव केल्यानंतर पुनरपि पूर्वीप्रमाणेंच आपल्या केंसांची वेणी घातली आणि उत्तराच्या अश्वांच्या रश्मि धरिल्या व अशारीतीनें बृहन्नलेचें रूप धारण करून व सारथि बनून तो महात्मा अर्जुन आनंदानें नगरामध्यें प्रविष्ट झाला १५. वैशंपायन सांगतातः—पराजित होऊन शत्रूच्या अधीन झाल्यानंतर परावृत्त झालेले ते सर्व दीन कौरवही हस्तिनपुराला अनुलक्षून चालते झाले १६. इकडे तो अर्जुन मार्गाला लागल्यावर उत्तराला ह्मणाला १७ " हे महापराक्रमी वीरा राजपुत्रा, गोपालांसहवर्तमान आणिलेले हे गाईंचे सर्व कळप तूं अवलोकन कर १८. आपण अश्वांना विश्रांति देऊन, पाणी पाजवून आणि धुऊन अपराह्णकालीं विराटनगराला जाऊं १९. तुझी अनुज्ञा घेऊन हे गोपाळ नगरामध्यें प्रिय वार्ता कथन करण्याकरितां सत्वर पुढें जाऊं दे

माणः स दूतानाज्ञापयद्वचनात्फाल्गुनस्य । आचक्षध्वं विजयं पार्थिवस्य भग्नाः परे विजिताश्चापि गावः २१ इत्येवं तौ भारतमत्स्यवीरौ संमन्त्र्य संगम्य ततः शमीं ताम् । अभ्येत्य भूयो विजये न तृप्तावुत्सृष्टमारोपयतां स्वभाण्डम् २२ स शत्रुसेनामभिभूय सर्वामाच्छिद्य सर्वं च धनं कुरुभ्यः । वैराटिरायान्नगरं प्रतीतो बृहन्नलासारथिना प्रवीरः २३ [२१२२] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रह उत्तरागमने सप्तषष्टितमोऽध्यायः ॥ ६७ ॥

वैशम्पायन उवाच ॥ धनं चापि विजित्याशु विराटो वाहिनीपतिः । विवेश नगरं हृष्टश्चतुर्भिः पाण्डवैः सह १ जित्वा त्रिगर्तान्सङ्ग्रामे गाश्चैवादाय सर्वशः । अशोभत महाराज सहपार्थैः श्रिया वृतः २ तमासनगतं वीरं सुहृदां हर्षवर्धनम् । उपासांचक्रिरे सर्वे सह पार्थैः परन्तपाः ३ उपतस्थुः प्रकृतयः समस्ता ब्राह्मणैः सह । सभाजितः ससैन्यस्तु प्रतिनन्द्याथ मत्स्यराट् ४ विसर्जयामास तदा द्विजांश्च प्रकृतीस्तथा । तथा

आणि तुझा जयघोष करूं दे " २०. वैशंपायन सांगतातः— नंतर अर्जुनाच्या आज्ञेवरून तो उत्तर सत्वर दूतांना ह्मणाला "राजाचा विजय झाल्याचें तुह्मी जिकडे तिकडे सांगा. शत्रूंचा पराजय झाला आहे आणि गाई जिंकून आणिल्या आहेत " २१. ह्याप्रमाणें विचार ठरवून ते उभयतां भारतवीर व मत्स्यवीर एक मतानें त्या शमीवृक्षासमीप आले आणि विजयामुळें अतिशयच आनंदित झालेल्या त्या उभयतांनीं पूर्वी तेथें टाकिलेलें आपले अलंकार वगैरे रथावर ठेविले २२. असो. बृहन्नलासारथ्याच्या योगानें सर्व शत्रुसैन्याचा पराभव करून व कौरवांपासून सर्व धन परत हिसकावून घेऊन आनंदित झालेला तो वीर विराटपुत्र उत्तर राजधानीमध्यें आला २३. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं उत्तराच्या आगमनाविषयीं सदुसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ६७ ॥

वैशंपायन सांगतातः—इकडे सेनाधिपति विराट गोधन सत्वर जिंकून चारी पांडवांसहवर्तमान नगरामध्यें प्रविष्ट झाला १; आणि, हे जनमेजयमहाराजा, संग्रामामध्यें त्रिगर्तांना जिंकून सर्व गाई आणिल्यानंतर राज्यलक्ष्मीनें युक्त असलेला तो विराट पांडवांसहवर्तमान शोभूं लागला २. सुहृदांचा हर्ष वृद्धिंगत करणारा तो वीर विराट सिंहासनावर बसला असतां, शत्रूंना ताप देणारे सर्वही योद्धे पांडवांसहवर्तमान त्याच्या समीप बसले ३. ब्राह्मणांसहवर्तमान सर्वही अमात्य जवळ उभे राहिले आणि अशारीतीनें सैन्यासहवर्तमान आपली मानमान्यता झाल्यावर आनंद प्रदर्शित करून

स राजा मत्स्यानां विराटो वाहिनीपतिः ५ उत्तरं परिपप्रच्छ क यात इति चाब्रवीत् । आचख्युस्तस्य तत्सर्वं स्त्रियः कन्याश्च वेश्मनि ६ अन्तः- पुरचराश्चैव कुरुभिर्गोधनं हृतम् । विजेतुमभिसंरब्ध एक एवातिसाह- सात् ॥ बृहन्नलासहायश्च निर्गतः पृथिवीञ्जयः ७ उपयातानतिरथान्भीष्मं शान्तनवं कृपम् । कर्णं दुर्योधनं द्रोणं द्रोणपुत्रं च षड्रथान् ८ वैशम्पा- यन उवाच ॥ राजा विराटोथ भृशाभितप्तः श्रुत्वा सुतं त्वेकरथेन यातम् । बृहन्नलासारथिमाजिवर्धनं प्रोवाच सर्वानथ मन्त्रिमुख्यान् ९ सर्वथा कुरवस्ते हि ये चान्ये वसुधाधिपाः । त्रिगर्तान्निःसृताञ्श्रुत्वा न स्थास्यन्ति कदाचन १० तस्माद्गच्छन्तु मे योधा बलेन महता वृताः । उत्तरस्य परीप्सार्थं ये त्रिगर्तैरविक्षताः ११ हयांश्च नागांश्च रथांश्च शीघ्रं पदातिसङ्घांश्च ततः प्रवीरान् । प्रस्थापयामास सुतस्य हेतोर्वि- चित्रशस्त्राभरणोपपन्नान् १२ एवं स राजा मत्स्यानां विराटो वाहिनीपतिः। व्यादिदेशाथ तां क्षिप्रं वाहिनीं चतुरङ्गिणीम् १३ कुमारमाशु जानीत यदि

मत्स्यराज विराटानें ४ द्विजांना व अमात्यांना अनुज्ञा दिली. नंतर तो सेनाधिपति मत्स्य- राज विराट ५ उत्तराची चौकशी करूं लागला आणि "तो कोठें आहे" असेंही विचारूं लागला. तेव्हां घरांतील स्त्रिया, अंतःपुरांतील लोक आणि मुली ह्यांनीं त्याला तें सर्व वृत्त निवेदन केलें. (त्या ह्मणाल्या) "कौरवांनीं गोधन हरण केलें. हें ऐकून शांतनव भीष्म, कृप, कर्ण, दुर्योधन, द्रोण आणि द्रोणपुत्र ह्या रथावर आरूढ होऊन समीप आलेल्या सहा अतिरथांना जिंकण्याकरितां आपला पुत्र भूमिंजय बृहन्नलेला बरोबर घेऊन एकटाच क्षुब्ध होऊन अतिसाहसानें बाहेर पडला आहे ६, ७, ८. वैशं- पायन सांगतातः—फक्त एक रथ बरोबर घेऊन व बृहन्नलेला सारथि करून आपला भूमिंजयपुत्र गेल्याचें श्रवण केल्यावर विराटराजा अतिशयच काळजींत पडला आणि आपल्या सर्वेही मुख्य मंत्र्यांना ह्मणाला ९ "त्रिगर्तांना पराजित केल्याचें ऐकून बहुधा ते कौरव आणि त्यांच्या बरोबर जे कांहीं इतर भूपति आले असतील ते मुळींच स्वस्थ बसणार नाहींत १०. तस्मात्, त्रिगर्तांच्या हातून ज्यांना जखम झालेली नाहीं अशा माझ्या योद्ध्यांनीं मोठें सैन्य बरोबर घेऊन उत्तराच्या रक्षणार्थ तिकडे जावें" ११. तदनंतर आपल्या पुत्राकरितां विचित्र शस्त्रें व भूषणें ह्यांनीं संपन्न असलेले वीर, पदा- तिगण, अश्व, गज आणि रथ विराटराजानें सत्वर पाठवून दिले १२; आणि तो सेना- धिपति मत्स्यराज विराट त्या चतुरंग सेनेला त्वरेत्वरेनें ह्मणाला १३ "राजपुत्र जिवंत आहे किंवा नाहीं हें सत्वर पहा. कारण, षंढ ज्याचा सारथि होऊन

जीवति वा न वा । यस्य यन्ता गतः षण्ढो मन्येहं स न जीवति १४ वैशम्पायन उवाच ॥ तमब्रवीद्धर्मराजो विहस्य विराटराजं तु भृशाभितप्तम् । बृहन्नला सारथिश्चेन्नरेन्द्र परे न नेष्यन्ति तवाद्य गास्ताः १५ सर्वान्महीपान्सहितान्कुरूंश्च तथैव देवासुरसिद्धयक्षान् । अतीव जेतुं समरे सुतस्ते स्वनुष्ठितः सारथिना हि तेन १६ वैशम्पायन उवाच ॥ अथोत्तरेण प्रहिता दूतास्ते शीघ्रगामिनः । विराटनगरं प्राप्य विजयं समवेदयन् १७ राज्ञस्तत्सर्वमाचख्यौ मन्त्री विजयमुत्तमम् । पराजयं कुरूणां चाप्युपायान्तं तथोत्तरम् १८ सर्वा विनिर्जिता गावः कुरवश्च पराजिताः । उत्तरः सह सूतेन कुशली च परन्तपः १९ युधिष्ठिर उवाच ॥ दिष्ट्या विनिर्जिता गावः कुरवश्च पलायिताः । नाद्भुतं त्वेव मन्येहं यत्ते पुत्रोजयत्कुरून् २० ध्रुव एव जयस्तस्य यस्य यन्ता बृहन्नला । वैशम्पायन उवाच ॥ ततो विराटो नृपतिः संप्रहृष्टतनूरुहः २१ श्रुत्वा स विजयं तस्य कुमारस्यामितौजसः । आच्छादयित्वा दूतांस्तान्मन्त्रिणं सोभ्यचोदयत् २२

गेलेला आहे, तो जिवंत राहिला नसेल असें मला वाटतें १४. वैशंपायन सांगतातः—तदनंतर अत्यंत संतप्त झालेल्या त्या विराटराजाला हास्यपूर्वक धर्मराज ह्मणाला " हे राजा, बृहन्नला जर सारथि असेल तर आज त्या तुझ्या गाई शत्रु नेणार नाहींत १५. त्या सारथ्याचें चांगलें साहाय्य असल्यामुळें तुझा पुत्र एकत्र जुळलेल्या सर्व भूपालांना, कौरवांना आणि त्याचप्रमाणें देव, दैत्य, सिद्ध व यक्ष ह्यांनाही संग्रामामध्यें जिंकण्यास अतिशय समर्थ आहे " १६. वैशंपायन सांगतातः—इतक्यांत उत्तरानें पाठविलेले ते शीघ्रगामी दूत विराटाच्या नगरामध्यें आले आणि त्यांनीं उत्तराच्या विजयाची वार्ता कथन केली १७. तेव्हां उत्तराला प्राप्त झालेला उत्कृष्ट विजय, कौरवांचा पराजय व जवळ येत असलेला उत्तर वगैरे तें सर्व वृत्त मंत्र्यानें राजाला कथन केलें; (आणि तो ह्मणाला) १८ " सर्व गाई जिंकून परत आणिल्या; कौरव पराजित झाले आणि शत्रूंना जेरीस आणणारा उत्तर सारथ्यासहवर्तमान कुशल आहे " १९. युधिष्ठिर ह्मणतोः—गाई जिंकून आणून कौरवांना पळवून लाविलें ही आनंदाची गोष्ट आहे खरी; परंतु, तुझ्या पुत्रानें कौरवांना जिंकिलें ह्याचें मला मुळींच आश्चर्य वाटत नाहीं २०. कारण, ज्याचा सारथि बृहन्नला त्याचा विजय हा ठरलेलाच आहे. वैशंपायन सांगतातः—तदनंतर विराटराजाच्या शरीरावर आनंदानें रोमांच उठले २१; आणि त्या अतुलपराक्रमी पुत्राचा विजय श्रवण केल्यावर वार्ता सांगणाऱ्या त्या दूतांना वस्त्रें देऊन तो मंत्र्याला ह्मणाला २२ " माझ्या

राजमार्गाः क्रियन्तां मे पताकाभिरलंकृताः । पुष्पोपहारैरर्च्यन्तां देवताश्चापि सर्वशः २३ कुमारा योधमुख्याश्च गणिकाश्च स्वलंकृताः । वादित्राणि च सर्वाणि प्रत्युद्यान्तु सुतं मम २४ घण्टावान्मानवः शीघ्रं मत्तमारुह्य वारणम् । शृङ्गाटकेषु सर्वेषु आख्यातु विजयं मम २५ उत्तरा च कुमारीभिर्बह्वीभिः परिवारिता । शृङ्गारवेषाभरणा प्रत्युयातु सुतं मम २६ वैशम्पायन उवाच ॥ श्रुत्वा चेदं वचनं पार्थिवस्य सर्वं पुरं स्वस्तिकपाणिभूतम् । भेर्यश्च तूर्याणि च वारिजाश्च वेषैः पराध्यैंः प्रमदाः शुभाश्च २७ तथैव सूतैः सह मागधैश्च नान्दीवाद्याः पणवास्तुर्यवाद्याः । पुराद्विराटस्य महाबलस्य प्रत्युद्ययुः पुत्रमनन्तवीर्यम् २८ वैशम्पायन उवाच ॥ प्रस्थाप्य सेनां कन्याश्च गणिकाश्च स्वलंकृताः । मत्स्यराजो महाप्राज्ञः प्रहृष्ट इदमब्रवीत् २९ अक्षानाहर सैरन्ध्रि कङ्क द्यूतं प्रवर्तताम् । तं तथावादिनं दृष्ट्वा पाण्डवः प्रत्यभाषत ३० न देवितव्यं हृष्टेन कितवेनेति नः श्रुतम् ३१ तं त्वामद्य मुदा युक्तं नाहं देवितुमुत्सहे । प्रियं तु ते

नगरांतील राजमार्ग पताकांनीं भूषित करा आणि सर्वही देवतांचें पुष्पांनीं पूजन करा २३. कुमार, उत्कृष्ट अलंकार धारण केलेल्या वारांगना आणि मुख्य मुख्य योद्धे सर्व वाद्यांबरोबर घेऊन माझ्या पुत्राला सामोरे जाऊं द्या २४. घंटा घेतलेल्या एका पुरुषानें सत्वर मत्त गजावर आरूढ होऊन सर्व चवाठ्यांवर माझा विजय कथन करूं द्या २५; आणि इतर अनेक कुमारींनीं परिवेष्टित व मनोहर वेषानें व अलंकारांनीं युक्त अशी उत्तरा माझ्या पुत्राला सामोरी जाऊं द्या " २६. वैशंपायन सांगतातः— हें राजाचें भाषण ऐकून नगरांतील सर्व लोकांनीं आपआपल्या हातांमध्यें मांगलिक पदार्थ घेतले आणि नौबदी, तुताऱ्या, शंख, उत्कृष्ट वेष धारण केलेल्या शुभ स्त्रिया २७, त्याचप्रमाणें सूत व मागध ह्यांसहवर्तमान मंगल वाद्यें, पणवसंज्ञक वाद्यें आणि जयसूचक तूर्य वाद्यें हीं सर्व नगरांतून निघून महाबलाढ्य विराटाच्या अपरिमितसामर्थ्यवान् पुत्राला सामोरीं गेलीं २८. वैशंपायन सांगतातः—सेना, कन्या आणि उत्कृष्ट अलंकार धारण केलेल्या वारांगना पाठवून दिल्यावर महाबुद्धिमान् मत्स्यराज आनंदित होऊन ह्मणाला २९ " हे सैरंध्रि, फांसे घेऊन ये आणि, हे कंक, द्यूत सुरू होऊं दे ". ह्याप्रमाणें तो बोलत असल्याचें पाहून पांडुपुत्र युधिष्ठिर त्याला ह्मणाला ३० " हर्षयुक्त झालेल्या जुगाराबरोबर द्यूत खेळूं नये असें आह्मीं ऐकिलें आहे ३१. ह्यास्तव, आनंदयुक्त झालेल्या तुझ्यासहवर्तमान आज द्यूत खेळण्याची माझी इच्छा नाहीं. आतां तुझ्या मर्जीप्रमाणें

चिकीर्षामि वर्ततां यदि मन्यसे ३२ विराट उवाच ॥ स्त्रियो गावो हिरण्यं च यच्चान्यद्वसु किंचन । न मे किंचित्तु रक्ष्यं ते अन्तरेणापि देवितुम् ३३ कङ्क उवाच ॥ किं ते द्यूतेन राजेन्द्र बहुदोषेण मानद । देवने बहवो दोषास्तस्मात्तत्परिवर्जयेत् ३४ श्रुतस्ते यदि वा दृष्टः पाण्डवेयो युधिष्ठिरः । स राष्ट्रं सुमहत्स्फीतं भ्रातॄंश्च त्रिदशोपमान् ३५ राज्यं हारितवान्सर्वं तस्माद्द्यूतं न रोचये । अथवा मन्यसे राजन्दीव्याम यदि रोचते ३६ वैशम्पायन उवाच ॥ प्रवर्तमाने द्यूते तु मत्स्यः पाण्डवमब्रवीत् । पश्य पुत्रेण मे युद्धे तादृशाः कुरवो जिताः ३७ ततोऽब्रवीन्महात्मा स एनं राजा युधिष्ठिरः । बृहन्नला यस्य यन्ता कथं स न जयेद्युधि ३८ इत्युक्तः कुपितो राजा मत्स्यः पाण्डवमब्रवीत् । समं पुत्रेण मे षण्ढं ब्रह्मबन्धो प्रशंससि ३९ वाच्यावाच्यं न जानीषे नूनं मामवमन्यसे । भीष्मद्रोणमुखान्सर्वान्कस्मान्न स विजेष्यति ४० वयस्यत्वात्तु ते ब्रह्मन्नपराधमिमं क्षमे । नेदृशं तु पुनर्वाच्यं यदि

खेळण्याची माझी इच्छा असते; ह्यास्तव, तुझ्या मनांत असेल तर द्यूतही सुरू होऊं दे " ३२. विराट ह्मणतो:—द्यूतक्रीडा जरी बाजूला ठेविली तरी (ह्या प्रसंगीं) स्त्रिया, गाई, सुवर्ण आणि दुसरेंही जें कांहीं द्रव्य आहे तें ह्यापैकीं तुला न देण्यासारिखें असें मला सांप्रत कांहींएक नाहीं ३३. कंक ह्मणतो:—हे मान्य राजाधिराज, अनेक दोषांनीं युक्त असलेलें हें द्यूत तुला काय करावयाचें आहे ? अरे, द्यूतामध्यें अनेक दोष आहेत; तस्मात्, तें वर्ज्य करावें ३४. अरे, पांडुपुत्र युधिष्ठिर तुझ्या कधीं ऐकण्यांत अथवा पहाण्यांत आला असेल. त्यानें आपलें मोठें समृद्ध राष्ट्र, देवतुल्य भ्राते ३५ आणि सर्व राज्य गमाविलें. तस्मात्, मला द्यूत रुचत नाहीं. तथापि, हे राजा, तुला रुचत असेल तर आपण खेळूं ३६. वैशंपायन सांगतात:—ह्यानंतर द्यूत सुरू झालें असतां मत्स्यराज पांडुपुत्र युधिष्ठिराला ह्मणाला "पहा तशाप्रकारच्या कौरवांचा माझ्या पुत्रानें युद्धामध्यें पराजय केला " ३७. तदनंतर तो महात्मा युधिष्ठिरराजा त्याला ह्मणाला " अरे, ज्याचा सारथि बृहन्नला आहे त्याला युद्धामध्यें जय कसा प्राप्त होणार नाहीं ? " ३८. युधिष्ठिरानें असें सांगितल्यावर मत्स्यराज विराट क्रुद्ध झाला आणि पांडुपुत्र युधिष्ठिराला ह्मणाला " हे अधम ब्राह्मणा, माझ्या पुत्राबरोबर षंढाची प्रशंसा करीत आहेस काय ? ३९. बोलावें कोणतें आणि न बोलावें कोणतें हें तुला कांहींच समजत नाहीं काय ? तूं खरोखर माझा अवमान करीत आहेस ! भीष्मद्रोणप्रभृति सर्व योद्ध्यांना जिंकण्यास त्या माझ्या पुत्राला

जीवितुमिच्छसि ४१ युधिष्ठिर उवाच ॥ यत्र द्रोणस्तथा भीष्मो द्रौणिर्वैकर्तनः कृपः । दुर्योधनश्च राजेन्द्रस्तथान्ये च महारथाः ४२ मरुद्गणैः परिवृतः साक्षादपि मरुत्पतिः । कोऽन्यो बृहन्नलायास्तान्प्रतियुध्येत संगतान् ४३ यस्य बाहुबले तुल्यो न भूतो न भविष्यति । अतीव समरं दृष्ट्वा हर्षो यस्योपजायते ४४ योऽजयत्संगतान्सर्वान्ससुरासुरमानवान् । तादृशेन सहायेन कस्मात्स न विजेष्यते ४५ विराट उवाच ॥ बहुशः प्रतिषिद्धोऽसि न च वाचं नियच्छसि । नियन्ता चेन्न विद्येत न कश्चिद्धर्ममाचरेत् ४६ वैशम्पायन उवाच ॥ ततः प्रकुपितो राजा तमक्षेणाहनद्भृशम् । मुखे युधिष्ठिरं कोपान्नैवमित्येव भर्त्सयन् ४७ बलवत्प्रतिविद्धस्य नस्तः शोणितमावहत् । तदप्राप्तं महीं पार्थः पाणिभ्यां प्रत्यगृह्णत ४८ अवैक्षत स धर्मात्मा द्रौपदीं पार्श्वतः स्थिताम् । सा ज्ञात्वा तमभिप्रायं भर्तुश्चित्तवशानुगा ४९ पात्रं गृहीत्वा सौवर्णं जलपूर्णम-

---

काय बरें कठिण आहे ? ४०. हे ब्राह्मणा, मित्रत्वानें मी तुझ्या ह्या अपराधाची क्षमा करीत आहें; परंतु, तुला जर जीवाची आशा असेल तर तूं पुन्हां असें भाषण कधीं करूं नको " ४१. युधिष्ठिर ह्मणतोः—द्रोण, भीष्म, अश्वत्थामा, कर्ण, कृप, राजाधिराज दुर्योधन आणि इतरही महारथी हे सर्व सारिखेच आहेत ४२. तेव्हां मरुद्गणांनीं परिवेष्टित असलेला साक्षात् देवराज इंद्र जरी झाला तरी एकत्र जुळलेल्या त्या द्रोणप्रभृतींशीं प्रतिपक्षी ह्या नात्यानें युद्ध करण्यास बृहन्नलेवांचून दुसरा कोण बरें समर्थ आहे ? ४३. अरे, बाहुबलामध्यें ज्याची बरोबरी करणारा आजपर्यंत कोणी झाला नाहीं व पुढेंही होणार नाहीं, समरांगण दृष्टीं पडतांक्षणीं ज्याला अतिशय हर्ष होत असतो ४४ आणि देव, दैत्य व मानव हे सर्व एकत्र जुळले असतांनाही ज्यानें जिंकिले आहेत, त्याच्या साहाय्यानें तो तुझा पुत्र त्यांना कसें बरें जिंकणार नाहीं ? ४५. विराट ह्मणतोः—पुष्कळ वेळां असें बोलूं नको ह्मणून सांगितलें असतांनाही तूं अजून आपलें बोलणें बंद करीत नाहींत; परंतु, नियंता जर नसेल तर कोणीही धर्मानें वागणार नाहीं ४६. वैशंपायन सांगतातः—तदनंतर " असें बोलूं नको " असें ह्मणून युधिष्ठिराची निर्भर्त्सना करीत करीत क्रुद्ध झालेल्या त्या विराटराजानें त्या युधिष्ठिराच्या मुखावर अतिशय वेगानें फांसा मारिला ४७. तेव्हां फारच जोरानें वेध झाल्यामुळें युधिष्ठिराच्या नाकांतून रक्त येऊं लागलें; परंतु, तें भूमीवर पडण्याचे पूर्वींच युधिष्ठिरानें ओंझळींत घेतलें ४८; आणि जवळच उभ्या असलेल्या द्रौपदीकडे त्या धर्मात्म्या युधिष्ठिरानें पाहिलें. तेव्हां त्याचा तो अभिप्राय

निन्दिता । तच्छोणितं प्रत्यगृह्णाद्यत्प्रसुस्राव नस्ततः ५० अथोत्तरः शुभैर्गन्धैर्माल्यैश्च विविधैस्तथा । अवकीर्यमाणः संहृष्टो नगरं स्वैरमागतः ५१ सभाज्यमानः पौरैश्च स्त्रीभिर्जानपदैस्तथा । आसाद्य भवनद्वारं पित्रे संप्रत्यवेदयत् ५२ ततो द्वास्थः प्रविश्यैव विराटमिदमब्रवीत् । बृहन्नलासहायश्च पुत्रो द्वार्युत्तरः स्थितः ५३ ततो हृष्टो मत्स्यराजः क्षत्तारमिदमब्रवीत् । प्रवेश्यतामुभौ तूर्णं दर्शनेप्सुरहं तयोः ५४ क्षत्तारं कुरुराजस्तु शनैः कर्णमुपाजपत् । उत्तरः प्रविशत्वेको न प्रवेश्या बृहन्नला ५५ एतस्य हि महाबाहो व्रतमेतत्समाहितम् । यो ममाङ्गे व्रणं कुर्याच्छोणितं वापि दर्शयेत् ॥ अन्यत्र सङ्ग्रामगतान्न स जीवेत्कथचन ५६ न मृष्याद्भृशसंक्रुद्धो मां दृष्ट्वा तु सशोणितम् । विराटमिह सामात्यं हन्यात्सबलवाहनम् ५७ वैशम्पायन उवाच ॥ ततो राज्ञः सुतो ज्येष्ठः प्राविशत्पृथिवींजयः । सोभिवाद्य पितुः पादौ कङ्कं चाप्युपतिष्ठत ५८ ततो रुधिरसंयुक्तमनेकाग्रमनागसम् । भूमावासीनमेकान्ते सैरन्ध्र्या

जाणून भर्त्याच्या मनाप्रमाणें वागणाऱ्या ४९ त्या अनिंदित द्रौपदीनें उदकानें भरलेलें सुवर्ण पात्र हातीं घेतलें आणि त्याच्या नासिकेंतून जें रक्त गळत होतें तें त्यांत धरिलें ५०. इतक्यांत नानाप्रकारचीं शुभ द्रव्यें व सुगंधी पुष्पें ज्याच्यावर लोक उधळीत आहेत असा उत्तर आनंदित होऊन स्वेच्छेनें नगरामध्यें आला असतां ५१, नागरिक लोक, स्त्रिया आणि देशांतील लोक त्याचा आदर करूं लागले आणि गृहासमीप आल्यावर त्यानें लगेंच पित्याला सांगून पाठविलें ५२. तदनंतर द्वारपाल तत्क्षणींच आंत जाऊन विराटाला ह्मणाला "आपला पुत्र उत्तर बृहन्नलेसहवर्तमान दाराशीं उभा आहे" ५३. हें ऐकून आनंदित झालेला मत्स्यराज विराट आपल्या सारथ्याला ह्मणाला " त्या उभयतांनाही सत्वर आंत प्रविष्ट होऊं दे. मी त्यांच्या दर्शनाचीच इच्छा करीत आहें " ५४; परंतु, कुरुराज युधिष्ठिर त्या सारथ्याच्या कानाशीं लागून त्याला हलकेंच ह्मणाला " एकटा उत्तरच प्रविष्ट होऊं दे; बृहन्नलेला इकडे येऊं देऊं नको ५५. कारण, हे महाबाहो, संग्रामाशिवाय जो माझ्या शरीरावर व्रण करील किंवा रक्त काढून दाखवील तो कांहीं केलें तरी जिवंत रहाणार नाहीं असें हें व्रत त्यानें स्वीकारिलेलें आहे ५६. ह्यास्तव, मला रक्तयुक्त अवलोकन केल्यावर तो अतिशय क्रुद्ध होईल आणि त्याला क्रोध सहनही होणार नाहीं. ह्यामुळें अमात्य, सैन्य आणि वाहनें ह्यांसहवर्तमान येथल्या येथेंच तो विराटाचा वध करील ५७. वैशंपायन सांगतातः—तदनंतर राजाचा ज्येष्ठ पुत्र भूमिंजय आंत प्रविष्ट झाला आणि पित्याच्या चरणांना वंदन

प्रत्युपस्थितम् ५९ ततः पप्रच्छ पितरं त्वरमाण इवोत्तरः । केनायं ताडितो राजन्केन पापमिदं कृतम् ६० विराट उवाच ॥ मयायं ताडितो जिह्मो न चाप्येतावदर्हति । प्रशस्यमाने यच्छूरे त्वयि षण्ढं प्रशंसति ६१ उत्तर उवाच ॥ अकार्यं ते कृतं राजन्क्षिप्रमेव प्रसाद्यताम् । मा त्वां ब्रह्मविषं घोरं समूलमिह निर्दहेत् ६२ वैशम्पायन उवाच ॥ स पुत्रस्य वचः श्रुत्वा विराटो राष्ट्रवर्धनः । क्षमयामास कौन्तेयं भस्मच्छन्नमिवानलम् ६३ क्षमयन्तं तु राजानं पाण्डवः प्रत्यभाषत । चिरं क्षान्तमिदं राजन्न मन्युर्विद्यते मम ६४ यदि ह्येतत्पतेद्भूमौ रुधिरं मम नस्ततः । सराष्ट्रस्त्वं महाराज विनश्येथा न संशयः ६५ न दूषयामि ते राजन्यद्वै हन्याददूषकम् । बलवन्तं प्रभुं राजन्क्षिप्रं दारुणमाप्नुयात् ६६ वैशम्पायन उवाच ॥ शोणिते तु व्यतिक्रान्ते प्रविवेश बृहन्नला । अभिवाद्य विराटं तु कङ्कं चाप्युपतिष्ठत ६७

करून कंकालाही त्यानें नमस्कार केला ५८. त्यावेळीं तो निरपराधी कंक मनामध्यें अस्वस्थ असून भूमीवर एका बाजूला बसलेला होता; त्याच्या नाकांतून रक्त चाललें होतें आणि सैरंध्री त्याची शुश्रूषा करीत होती ५९. असें पाहिल्यानंतर उत्तर सत्वर पित्याला ह्मणाला " हे भूपाल, ह्याला कोणीं ताडण केलें ? हें पाप कोणीं केलें ? " ६०. विराट ह्मणतो:—वेडेंवांकडें भाषण करणाऱ्या ह्या कंकाला मीं ताडण केलें; परंतु, येवढेंच ह्याला उपयोगीं नाहीं (ह्याचा अपराध ह्यापेक्षांही मोठा आहे). कारण, तुज शूराची प्रशंसा चालली असतांना ह्या त्या षंढाची प्रशंसा करीत आहे ६१. उत्तर ह्मणतो:—हे भूपाल, आपल्या हातून ही अयोग्य गोष्ट घडली. आपण सत्वर ह्याला प्रसन्न करून घ्या; नाहींतर भयंकर ब्रह्मविष आपणांला मुळासहवर्तमान दग्ध करून टाकील ६२. वैशंपायन सांगतात:—पुत्राचें हें भाषण श्रवण केल्यावर राष्ट्राची अभिवृद्धि करणाऱ्या त्या विराटानें भस्माच्छादित अग्नीप्रमाणें गुप्त राहिलेल्या कुंतीपुत्र युधिष्ठिराची क्षमा मागितली ६३; व तो विराटराजा क्षमा मागूं लागला असतां पांडुपुत्र युधिष्ठिर त्याला ह्मणाला " ह्या तुझ्या वर्तनाबद्दल क्षमा करून मला पुष्कळ वेळ झाला. हे राजा, मला राग नाहीं ६४. हे महाराजा, माझ्या नासिकेंतून हें रक्त जर भूमीवर पडलें असतें तर राष्ट्रासहवर्तमान तुझा नाश झाला असता ह्यांत संशय नाहीं ६५. हे राजा, मी तुला दोष देत नाहीं. प्रभुत्व आणि बल ह्यांनीं युक्त असलेल्या पुरुषाला भयंकर कर्म करण्याची इच्छा व्हावयाचीच आणि, हे राजा, त्यामुळें निरपराध्यालाही ताडण करण्याकडे त्याची प्रवृत्ति व्हावयाचीच " ६६. वैशंपायन सांगतात:—रक्त बंद झाल्यावर बृहन्नला आंत आली आणि विराटाला अभिवंदन केल्यावर कंकालाही

क्षामयित्वा तु कौरव्यं रणादुत्तरमागतम्। प्रशशंस ततो मत्स्यः शृण्वतः सव्य-
साचिनः ६८ त्वया दायादवानस्मि कैकेयीनन्दिवर्धन । त्वया मे सदृशः
पुत्रो न भूतो न भविष्यति ६९ पदं पदसहस्रेण यश्चरन्नापराध्नुयात् ।
तेन कर्णेन ते तात कथमासीत्समागमः ७० मनुष्यलोके सकले यस्य
तुल्यो न विद्यते । तेन भीष्मेण ते तात कथमासीत्समागमः ७१ आचार्यो
वृष्णिवीराणां कौरवाणां च यो द्विजः । सर्वक्षत्रस्य चाचार्यः सर्वशस्त्र-
भृतां वरः ७२ तेन द्रोणेन ते तात कथमासीत्समागमः । आचार्यपुत्रो
यः शूरः सर्वशस्त्रभृतामपि ७३ अश्वत्थामेति विख्यातस्तेनासीत्सङ्गरः
कथम् । रणे यं प्रेक्ष्य सीदन्ति हृतस्वा वणिजो यथा ७४ कृपेण तेन ते
तात कथमासीत्समागमः । पर्वतं योभिविध्येत राजपुत्रो महेषुभिः ७५
दुर्योधनेन ते तात कथमासीत्समागमः । अवगाढा द्विषन्तो मे सुखो
वातोभिवाति माम् ७६ यस्त्वं धनमथाजैषीः कुरुभिर्ग्रस्तमाहवे । तेषां

तिनें नमस्कार केला ६७. असो. कुरुकुलोत्पन्न युधिष्ठिराची क्षमा मागितल्यावर मत्स्यराज विराट अर्जुन ऐकत असतांना संग्रामांतून आलेल्या उत्तराची प्रशंसा करूं लागला ६८. (तो ह्मणाला) " हे कैकेयीचा आनंद वृद्धिंगत करणाऱ्या पुत्रा, (इतर पुत्रांची गोष्ट राहूं दे. परंतु, खरा खरा) पुत्रवान् मी तुझ्या योमानें झालों आहें. मला तुझ्यासारिखा पुत्र आजपर्यंत प्राप्त झाला नाहीं व पुढें होणार नाहीं ६९. हजार ठिकाणीं नेम धरून बाणांचा प्रयोग करीत असतांना ज्याचा एकही नेम चुकत नाहीं त्या कर्णाशीं, बा उत्तरा, तुझा समागम कसा झाला ? ७०. बाबारे, संपूर्ण मनुष्यलोकामध्यें ज्याची बरोबरी करणारा कोणीही नाहीं, त्या भीष्माशीं तुझा संग्राम कसा झाला ? ७१. वृष्णिवीर, कौरव आणि सर्वही क्षत्रिय ह्यांचा जो आचार्य आहे व शस्त्र धारण करणाऱ्या सर्वांमध्यें जो श्रेष्ठ आहे ७२ त्या द्रोणाशीं, बा उत्तरा, तुझें युद्ध कसें झालें ? शस्त्रधारण करणाऱ्या सर्वांमध्येंही जो शूर आहे आणि अश्वत्थामा ह्मणून जो प्रख्यात आहे त्या आचार्यपुत्राशीं तुझा युद्धप्रसंग कसा झाला ? ज्याला समरांगणामध्यें अवलोकन करितांक्षणीं द्रव्यापहार झालेल्या व्यापाऱ्यांप्रमाणें शत्रु निराश होतात ७३, ७४ त्या कृपाचार्याशीं, बा उत्तरा, तुझा सामना कसा झाला ? जो राजपुत्र मोठ्या मोठ्या बाणांनीं पर्वतालाही वेध करितो ७५ त्या दुर्योधनाशीं, बा उत्तरा, तुझा युद्धप्रसंग कसा झाला ? कौरवांनीं ग्रस्त केलेलें माझें गोधन संग्रामामध्यें जिंकून तूं आणिलें आहेस; ह्यावरून माझ्या शत्रूंचा पराजय झाला आहे आणि माझ्यासमीप हा वायुही सुखावह वहात (असल्यावरून तसें सुचवीत) आहे. खरोखर, हे पुरुषश्रेष्ठा, त्या सर्वांना

भयाभिपन्नानां सर्वेषां बलशालिनाम् ७७ नूनं प्रकाल्य तान्सर्वांस्त्वया युधि नरर्षभ । आच्छिन्नं गोधनं सर्वं शार्दूलेनामिषं यथा ७८ [२२१०]
इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोग्रहपर्वणण्युत्तरगोग्रहे विराटोत्तरसंवादेऽष्टषष्टितमोऽध्यायः ॥ ६८ ॥

उत्तर उवाच ॥ न मया निर्जिता गावो न मया निर्जिताः परे । कृतं तत्सकलं तेन देवपुत्रेण केनचित् १ स हि भीतं द्रवन्तं मां देवपुत्रो न्यवर्तयत् । स चातिष्ठद्रथोपस्थे वज्रसंहननो युवा २ तेन ता निर्जिता गावः कुरवश्च पराजिताः । तस्य तत्कर्म वीरस्य न मया तात तत्कृतम् ३ स हि शारद्वतं द्रोणं द्रोणपुत्रं च षड्रथान् । सूतपुत्रं च भीष्मं च चकार विमुखाञ्शरैः ४ दुर्योधनं विकर्णं च सनागमिव यूथपम् । प्रभग्नमब्रवीद्भीतं राजपुत्रं महाबलः ५ न हास्तिनपुरे त्राणं तव पश्यामि किंचन । व्यायामेन परीप्सस्व जीवितं कौरवात्मज ६ न मोक्ष्यसे पलायंस्त्वं राजन्युद्धे मनः कुरु । पृथिवीं भोक्ष्यसे जित्वा हतो

युद्धामध्यें जिंकिल्यावर ते सर्वही बलाढ्य कौरव भयभीत झाले असतांना आमिष हरण करून आणणाऱ्या व्याघ्राप्रमाणें सर्वही गोधन तूं त्यांच्यापासून हरण करून आणिलेंस ७६, ७७, ७८. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वापैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं विराट आणि उत्तर ह्यांच्या संवादाविषयीं अडुसष्टावा अध्याय समाप्त झाला ॥ ३८ ॥

उत्तर ह्मणतो:—मीं गाई जिंकून आणिल्या नाहींत व शत्रूंचाही मीं पराभव केला नाहीं; तें सर्व त्या कोणीं देवपुत्रानें केलें १. मी भयभीत होऊन पळूं लागलों असतां त्या देवपुत्रानें मला परत फिरविलें आणि वज्रासारिख्या दृढ शरीरानें युक्त असलेला तोच तरुण देवपुत्र रथांतील वीरस्थानावर उभा राहिला २. त्या गाई त्यानें जिंकिल्या व कौरवांचाही त्यानेंच पराजय केला. हे तात, तें त्या वीराचें कर्म होय; तें मीं केलें नाहीं ३. शारद्वत कृप, द्रोण, द्रोणपुत्र, कर्ण, भीष्म वगैरे सहा रथ्यांना बाणांच्या योगानें त्यानेंच पराङ्मुख केलें ४. त्याचप्रमाणें गजावर आरूढ होऊन आलेल्या सेनापति विकर्णाला पराङ्मुख केल्यावर पराजित होऊन भयभीत झालेल्या राजपुत्र दुर्योधनाला तो महाबलाढ्य देवपुत्र ह्मणाला ५ "हे कौरवनंदना, हास्तिनपुरामध्यें मला आतां तुझी धडगत दिसत नाहीं. ह्यास्तव, तूं हिंडत हिंडतच आपला जीव वांचीव ६. हे राजा, पलायन करून तुझी मुक्तता होणार नाहीं. तूं युद्ध करण्याचें मनामध्यें आण. अरे, तूं विजयी झालास तर पृथ्वीचा उपभोग घेशील आणि वध पावलास तर तुला

वा स्वर्गमाप्स्यसि ७ स निवृत्तो नरव्याघ्रो मुञ्चन्वज्रनिभाञ्शरान् । सचिवैः संवृतो राजा रथे नाग इव श्वसन् ८ तं दृष्ट्वा रोमहर्षोऽभूदूरुकम्पश्च मारिष । स तत्र सिंहसंकाशमनीकं व्यधमच्छरैः ९ तत्प्रणुद्य रथानीकं सिंहसंहननो युवा । कुरूंस्तान्प्रहसन्राजन्संस्थितान्हृतवाससः १० एकेन तेन वीरेण षड्रथाः परिनिर्जिताः । शार्दूलेनेव मत्तेन यथा वनचरा मृगाः ११ विराट उवाच ॥ क स वीरो महाबाहुर्देवपुत्रो महायशाः । यो मे धनमथाजैषीत्कुरुभिर्ग्रस्तमाहवे १२ इच्छामि तमहं द्रष्टुमर्चितुं च महाबलम् । येन मे त्वं च गावश्च रक्षिता देवसूनुना १३ उत्तर उवाच ॥ अन्तर्धानं गतस्तत्र देवपुत्रो महाबलः । स तु श्वो वा परश्वो वा मन्ये प्रादुर्भविष्यति १४ वैशम्पायन उवाच ॥ एवमाख्यायमानं तु छन्नं सत्रेण पाण्डवम् । वसन्तं तत्र नाज्ञासीद्विराटो वाहिनीपतिः १५ ततः पार्थोऽभ्यनुज्ञातो विराटेन महात्मना । प्रददौ तानि वासांसि विराटदुहितुः स्वयम् १६ उत्तरा तु महार्हाणि विविधानि नवानि

स्वर्गाची प्राप्ति होईल " ७. असें त्या देवपुत्रानें भाषण कल्यावर सचिवांनीं परिवेष्टित झालेला तो पुरुषश्रेष्ठ दुर्योधनराजा वज्रप्राय बाण सोडीत सोडीत परत फिरला आणि भुजंगाप्रमाणें सुस्कारे टाकीत टाकीत रथावर उभा राहिला ८. तेव्हां, हे आर्य, त्याला अवलोकन करितांक्षणीं अंगावर कांटा येऊन माझे पाय लटलट कांपूं लागले; परंतु, त्याठिकाणीं त्या देवपुत्रानें तें सिंहासारिखें भयंकर सैन्य बाणांनीं उडवून दिलें ९; आणि, हे राजा, सिंहाप्रमाणें ज्याचा बांधा दृढ आहे असा तो तरुण देवपुत्र ती रथ्यांची सेना उडवून दिल्यावर वस्त्रहरण होऊन निश्चेष्ट पडलेल्या त्या कौरवांना हंसत हंसत उभा राहिला १०. मत्त व्याघ्र ज्याप्रमाणें वनचर मृगांचा पराजय करितो त्याप्रमाणें त्या एकट्या वीरानें सहाही रथ्यांचा सर्वस्वीं पराजय केला ११. विराट ह्मणतो:—कौरवांनीं ग्रस्त केलेलें माझें गोधन संग्रामामध्यें ज्यानें जिंकिलें तो महापराक्रमी व महायशस्वी वीर देवपुत्र कोणीकडे आहे ? १२. ज्या देवपुत्रानें माझ्या गाईंचें व तुझें रक्षण केलें त्या महाबलाढ्य पुरुषाचें दर्शन घेण्याची व पूजन करण्याची माझी इच्छा आहे १३. उत्तर ह्मणतो:— तो महाबलाढ्य देवपुत्र तेथेंच अंतर्धान पावला. तो उद्यां अथवा परवां प्रकट होईल असें मला वाटतें १४. वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें व्याजानें गुप्त राहिलेल्या पांडुपुत्र अर्जुनाबद्दल जरी उत्तर सांगत होता आणि तो स्वतः जरी तेथेंच वास्तव्य करीत होता तरी त्या सेनाधिपति विराटाला त्याची ओळख पटली नाहीं १५. नंतर महात्म्या विराटानें

च । प्रतिगृह्याभवत्प्रीता तानि वासांसि भामिनी १७ मन्त्रयित्वा तु कौन्तेय उत्तरेण महात्मना । इति कर्तव्यतां सर्वां राजन्पार्थे युधिष्ठिरे १८ ततस्तथा तद्व्यदधाद्यथावत्पुरुषर्षभ । सह पुत्रेण मत्स्यस्य प्रहृष्टा भरतर्षभाः १९ [२२१९] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि गोहरणपर्वण्युत्तरगोग्रहे विराटोत्तरसंवादे एकोनसप्ततितमोऽध्यायः ॥ ६९ ॥ समाप्तं गोहरणपर्व ॥

अथ वैवाहिकपर्व॥वैशम्पायन उवाच॥ततस्तृतीये दिवसे भ्रातरः पञ्च पाण्डवाः । स्नाताः शुक्लाम्बरधराः समये चरितव्रताः १ युधिष्ठिरं पुरस्कृत्य सर्वाभरणभूषिताः । द्वारि मत्ता यथा नागा भ्राजमाना महारथाः २ विराटस्य सभां गत्वा भूमिपालासनेष्वथ । निषेदुः पावकप्रख्याः सर्वे धिष्ण्येष्विवाग्नयः ३ तेषु तत्रोपविष्टेषु विराटः पृथिवीपतिः । आजगाम सभां कर्तुं राजकार्याणि सर्वशः ४ श्रीमतः पाण्डवान्दृष्ट्वा ज्वलतः पावकानिव । मुहूर्तमिव च ध्यात्वा सरोषः पृथिवीपतिः ५ अथ मत्स्योऽब्रवी-

---

अनुज्ञा दिल्यावर कुंतीपुत्र अर्जुनानें तीं हरण करून आणिलेलीं वस्त्रें स्वतः विराटकन्येला अर्पण केलीं १६. तेव्हां नानाप्रकारचीं व मोठ्या मोठ्या किमतीचीं तीं नवीं वस्त्रें घेऊन सुंदरी उत्तरा आनंदित झाली १७. नंतर, हे जनमेजयराजा, कुंतीपुत्र युधिष्ठिरासंबंधानें सर्व कांहीं इतिकर्तव्यतेविषयीं महात्म्या उत्तराशीं कुंतीपुत्र अर्जुनानें विचार ठरविला १८; आणि, हे पुरुषश्रेष्ठा, त्यानें तें त्याप्रमाणें पूर्णपणें मत्स्यराजाच्या पुत्रासहवर्तमान शेवटास नेलें असतां, भरतवंशजश्रेष्ठ पांडवाना आनंद झाला १९. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील गोहरणपर्वांपैकीं उत्तरगोग्रहणसंबंधीं विराट आणि उत्तर ह्यांच्या संवादाविषयीं एकुणसत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ६९ ॥ ह्या ठिकाणीं गोहरणपर्वही संपूर्ण झालें.

येथून पुढें वैवाहिकपर्वाला आरंभ झाला. वैशंपायन सांगतात:— तदनंतर अज्ञातवासाचें व्रत ज्यांनीं वेळेवर समाप्त केलें आहे, अशा त्या भ्रात्या पांच पांडवांनीं तिसऱ्या दिवशीं स्नान करून शुक्ल वस्त्रें परिधान केलीं १. नंतर सर्व अलंकारांनीं भूषित झालेले ते महारथी पांडव युधिष्ठिराला पुढें करून मत्तगजाप्रमाणें सभेच्या द्वाराशीं झळकूं लागले २; आणि स्थंडिलावर बसणारे अग्निच कीं काय असे ते सर्वही अग्नीसारिखे तेजस्वी पांडव विराटाच्या सभेमध्यें जाऊन तेथें राजांच्या आसनावर बसले ३. ह्याप्रमाणें ते त्या सभेमध्यें राजासनावर बसले असतां सर्व राजकार्यें करण्याकरितां भूपति विराट सभेंत आला ४. तेव्हां देदीप्यमान अग्निच कीं काय

स्कङ्कं देवरूपमिव स्थितम् । मरुद्गणैरुपासीनं त्रिदशानामिवेश्वरम् ६ स
किलाक्षातिवापस्त्वं सभास्तारो मया वृतः । अथ राजासने कस्मादुपविष्ट-
स्त्वलंकृतः७ वैशम्पायन उवाच ॥ परिहासेप्सया वाक्यं विराटस्य निशम्य
तत् । स्मयमानोऽर्जुनो राजन्निदं वचनमब्रवीत्८ अर्जुन उवाच॥ इन्द्रस्यार्धा-
सनं राजन्नयमारोढुमर्हति । ब्रह्मण्यः श्रुतवांस्त्यागी यज्ञशीलो दृढव्रतः ९
एष विग्रहवान्धर्म एष वीर्यवतां वरः । एष बुद्ध्याधिको लोके तपसां
च परायणम् १० एषोऽस्त्रं विविधं वेत्ति त्रैलोक्ये सचराचरे । न चैवान्यः
पुमान्वेत्ति न वेत्स्यति कदाचन ११ न देवा नासुराः केचिन्न मनुष्या न
राक्षसाः । गन्धर्वयक्षप्रवराः सकिंनरमहोरगाः १२ दीर्घदर्शी महातेजाः
पौरजानपदप्रियः । पाण्डवानामतिरथो यज्ञधर्मपरो वशी १३ महर्षि-
कल्पो राजर्षिः सर्वलोकेषु विश्रुतः १४ बलवान्धृतिमान्दक्षः सत्यवादी
जितेन्द्रियः । धनैश्च संचयैश्चैव शक्रवैश्रवणोपमः १५ यथा मनुर्महातेजा

अशा त्या वैभवशाली पांडवांना अवलोकन करून क्षणभर विचार केल्यावर तो भूपति विराट क्रुद्ध झाला ५; आणि मरुद्गण ज्याची शुश्रूषा करीत आहेत अशा देवराज इंद्राप्रमाणें दिसत असलेल्या आणि देवरूपानेंच कीं काय स्थित असलेल्या कंकाला तो मत्स्यराज ह्मणाला ६ " अरे, अक्षद्यूतामध्यें अतिप्रवीण असलेल्या तुला मी सभासद ह्मणून पत्करिलें आहे. ह्यास्तव, तूं अलंकार घालून राजाच्या आसनावर कसा बसला आहेस ? " ७. वैशंपायन सांगतातः—हे जनमेजयराजा, निंदा करण्याच्या हेतूनें विराटानें केलेलें तें भाषण श्रवण केल्यावर अर्जुन हंसत हंसत त्याला ह्मणाला ८ " हे राजा, इंद्राच्या अर्ध्या आसनावर बसण्याची ह्याची योग्यता आहे. ब्राह्मण-प्रिय, बहुश्रुत, दानशूर, यज्ञशील आणि महाव्रतस्थ ९ असा हा मूर्तिमान् धर्म आहे; वीर्यवानांमध्यें हा श्रेष्ठ आहे; बुद्धीनें हा जगतामध्यें अधिक आहे; तपांचें तर हा मुख्य निधानच आहे १०; आणि ह्याला नानाप्रकारचीं अस्त्रें विदित आहेत. चरा-चर प्राण्यांसहवर्तमान ह्या त्रैलोक्यामध्यें ह्यांच्या सारिखा ज्ञानवान् सांप्रत कोणीही नाहीं आणि पुढेंही कोणी होण्याचा संभव नाहीं ११. देव, असुर, मनुष्य, राक्षस, श्रेष्ठ श्रेष्ठ गंधर्व आणि यक्ष व त्याचप्रमाणें किंनर व महोरग ह्यांमध्यें ज्ञानानें ह्याची बरोबरी करणारा कोणी नाहीं १२. हा महातेजस्वी व दूरदर्शी असून नगरांतील व देशांतील लोकांना प्रिय आहे; हा जितेंद्रिय आहे; यज्ञ व धर्म ह्यांविषयीं हा तत्पर आहे आणि पांडवांमध्यें हा अतिरथी आहे १३. सर्व लोकांमध्यें विख्यात असलेला हा राजर्षि महर्षींची बरोबरी करणारा आहे १४. हा बलवान्, धैर्यवान्, दक्ष,

लोकानां परिरक्षिता । एवमेष महातेजाः प्रजानुग्रहकारकः १६
अयं कुरूणामृषभो धर्मराजो युधिष्ठिरः । अस्य कीर्तिः स्थिता लोके
सूर्यस्येवोद्यतः प्रभा १७ संसरन्ति दिशः सर्वा यशसोस्य इवांशवः ।
उदितस्येव सूर्यस्य तेजसोनु गभस्तयः १८ एनं दशसहस्राणि कुञ्जराणां
तरस्विनाम् । अन्वयुः पृष्ठतो राजन्यावदध्यावसत्कुरून् १९ त्रिंशदेवं
सहस्राणि रथाः काञ्चनमालिनः । सदश्वैरुपसंपन्नाः पृष्ठतोनुययुस्तदा २०
एनमष्टशताः सूताः सुमृष्टमणिकुण्डलाः । अब्रुवन्मागधैः सार्धं पुरा
शक्रमिवर्षयः २१ एनं नित्यमुपासन्त कुरवः किङ्करा यथा । सर्वे च
राजन्राजानो धनेश्वरमिवामराः २२ एष सर्वान्महीपालान्करदान्सम-
कारयत् । वैश्यानिव महाभागो विवशान्स्ववशानपि २३ अष्टाशीति-
सहस्राणि स्नातकानां महात्मनाम् । उपजीवन्ति राजानमेनं सुचरितव्र-
तम् २४ एष वृद्धाननाथांश्च पङ्गूनन्धांश्च मानवान् । पुत्रवत्पालयामास
प्रजा धर्मेण वै विभुः २५ एष धर्मे दमे चैव क्रोधे चापि ज्ञितव्रतः ।

सत्यवादी आणि जितेंद्रिय असून धन व संचय ह्यांच्या योगानें इंद्राची आणि कुबेराची बरोबरी करणारा आहे १५. महातेजस्वी मनुष्याप्रमाणें लोकांचें रक्षण करणारा आहे. त्याचप्रमाणें हा महातेजस्वी प्रजेवर अनुग्रह करणारा आहे १६. हा कौरवश्रेष्ठ धर्मराज युधिष्ठिर होय. उदय पावणाऱ्या सूर्याच्या प्रभेप्रमाणें ह्याची कीर्ति जगत् व्याप्त करून राहिलेली आहे १७. उदय पावलेल्या सूर्याच्या तेजाचीं किरणें ज्याप्रमाणें सर्व दिशेस पसरत असतात त्याप्रमाणें ह्याच्या यशाचीं किरणें सर्व दिशेस पसरत आहेत १८. हे राजा, जोंपर्यंत हा कुरुदेशामध्यें वास्तव्य करीत होता तोंपर्यंत दहा हजार बलाढ्य गज ह्याच्या स्वारीबरोबर मागून चालत असत १९. त्याचप्रमाणें सुवर्णभूषणांनीं युक्त आणि उत्कृष्ट अश्व जोडिलेले तीस हजार रथ ह्याच्या स्वारीच्या मागोमाग जात असत २०. ऋषींनीं ज्याप्रमाणें पूर्वी इंद्राची स्तुति केली त्याप्रमाणें रत्नांचीं उज्ज्वल कुंडलें धारण केलेले आठशें सूत मागधांसहवर्तमान ह्याची स्तुति करीत असत २१. हे राजा, देव ज्याप्रमाणें धनाध्यक्ष कुबेराची शुश्रूषा करीत असतात त्याप्रमाणें सर्वही राजे आणि कौरव दासांसारिखे ह्याच्या शुश्रूषेंत नेहमीं तत्पर असत २२. स्वतंत्र आणि परतंत्र असे सर्व भूपाल ह्या महाभाग्यवान् धर्मराजानें व्यापाऱ्यांप्रमाणें आपणाला कर देणारे करून सोडिले आहेत २३. अठ्यांयशीं हजार महात्मे स्नातक ह्या सदाचरणसंपन्न धर्मराजाच्या आश्रयाला असत २४. वृद्ध, अनाथ, पंगु आणि अंध अशा मनुष्यांचें ह्या प्रभूनें पुत्राप्रमाणें परिपालन केलें असून प्रजेचेंही ह्यानें धर्मानें

महाप्रसादो ब्रह्मण्यः सत्यवादी च पार्थिवः २६ शीघ्रं तापेन चैतस्य तप्यते स सुयोधनः । सगणः सह कर्णेन सौबलेनापि वा विभुः २७ न शक्यन्ते ह्यस्य गुणाः प्रसंख्यातुं नरेश्वर । एष धर्मपरो नित्यमानृशंस्यश्च पाण्डवः २८ एवं युक्तो महाराजः पाण्डवः पार्थिवर्षभः । कथं नार्हति राजार्हमासनं पृथिवीपते २९ [२२४८] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि वैवाहिकपर्वणि पाण्डवप्रकाशे सप्ततितमोध्यायः ॥ ७० ॥

विराट उवाच ॥ यद्येष राजा कौरव्यः कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः । कतमोस्यार्जुनो भ्राता भीमश्च कतमो बली १ नकुलः सहदेवो वा द्रौपदी वा यशस्विनी । यदा द्यूतजिताः पार्था न प्राज्ञायन्त ते क्वचित् २ अर्जुन उवाच ॥ य एष बल्लवो ब्रूते सूदस्तव नराधिप । एष भीमो महाराज भीमवेगपराक्रमः ३ एष क्रोधवशान्हत्वा पर्वते गन्धमादने । सौगन्धिकानि दिव्यानि कृष्णार्थे समुपाहरत् ४ गन्धर्व एष वै हन्ता

प्रतिपालन केलें आहे २५. क्रोध जिंकिलेला हा राजा सत्यवादी, ब्राह्मणभक्त आणि परम दयालु असून धर्म व इंद्रियदमन ह्यांविषयीं तत्पर आहे २६. ह्याच्या तेजानें तो प्रभु दुर्योधन, कर्ण, शकुनि आणि इतरही अनुयायी वर्ग ह्यांसहवर्तमान अतिशय तप्त होत असतो २७. हे राजा, ह्याच्या गुणांची गणना करितां येणें शक्य नाहीं. हा पांडुपुत्र नेहमीं धर्मनिष्ठ व दयाशील आहे २८. सारांश, हे राजा, हा नृपश्रेष्ठ महाराज पांडव जर ह्याप्रमाणें सर्व गुणांनीं संपन्न आहे तर राजाला योग्य अशा आसनावर आरूढ होण्याची योग्यता ह्याला कशी बरें नाहीं ? २९. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील वैवाहिकपर्वांपैकीं पांडवांच्या प्रकटतेविषयीं सत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥७०॥

विराट ह्मणतो:—हा जर कुरुकुलोत्पन्न कुंतीपुत्र युधिष्ठिरराजा आहे तर ह्यांपैकीं ह्याचा भ्राता अर्जुन कोणता ? आणि महाबलाढ्य भीमसेन कोणता ? १. त्याचप्रमाणें नकुल कोणता ? सहदेव कोणता ? आणि यशस्विनी द्रौपदी तरी कोणती ? द्यूतामध्यें पराजित झाल्यापासून पांडवांसंबंधानें मला कांहींएक कळलें नाहीं २. अर्जुन ह्मणतो:—हे राजा, हा जो बल्लव ह्मणविणारा तुझा आचारी आहे तोच, हे महाराजा, भयंकर वेग व पराक्रम ह्यांनीं युक्त असलेला भीमसेन होय ३. ह्यानेंच गंधमादन पर्वतावर क्रोधवश कुबेरसेवकांचा वध करून द्रौपदीकरितां दिव्य कमलें आणिलीं ४. दुरात्म्या कीचकांचा वध करणारा गंधर्व तो हाच आणि ह्यानेंच तुझ्या

कीचकानां दुरात्मनाम् । व्याघ्रानृक्षान्वराहांश्च हर्तवान्स्त्रीपुरे तव ५ यश्चा-
सीदश्वबन्धस्ते नकुलोयं परन्तपः । गोसङ्ख्यः सहदेवश्च माद्रीपुत्रौ महा-
रथौ ६ शृङ्गारवेषाभरणौ रूपवन्तौ यशस्विनौ । महारथसहस्राणां समर्थौ
भरतर्षभौ ७ एषा पद्मपलाशाक्षी सुमध्या चारुहासिनी । सैरन्ध्री द्रौपदी
राजन्यस्यार्थे कीचका हताः ८ अर्जुनोहं महाराज व्यक्तं ते श्रोत्रमा-
गतः । भीमादवरजः पार्थो यमाभ्यां चापि पूर्वजः ९ उषिताः स्मो महा-
राज सुखं तव निवेशने । अज्ञातवासमुषिता गर्भवास इव प्रजाः १०
वैशम्पायन उवाच ॥ यदार्जुनेन ते वीराः कथिताः पञ्च पाण्डवाः । तदा-
र्जुनस्य वैराटिः कथयामास विक्रमम् ॥ पुनरेव च तान्पार्थान्दर्शया-
मास चोत्तरः ११ उत्तर उवाच ॥ य एष जाम्बूनदशुद्धगौरतनुर्महा-
न्सिंह इव प्रवृद्धः । प्रचण्डघोणः पृथुदीर्घनेत्रस्ताम्रायताक्षः कुरुराज
एषः १२ अयं पुनर्मत्तगजेन्द्रगामी प्रतप्तचामीकरशुद्धगौरः । पृथ्वाय-
तांसो गुरुदीर्घबाहुर्वृकोदरः पश्यत पश्यतैनम् १३ यस्त्वेव पार्श्वेऽस्य

अंतःपुरामध्यें व्याघ्र, ऋक्ष व वराह ह्यांचा वध केला आहे ५. तुझा जो मोतद्दार
झाला होता तो हा शत्रूंना जेरीस आणणारा नकुल होय आणि तुझा मुख्य गोपाल
हा सहदेव होय. हे उभयतां माद्रीपुत्र महारथी आहेत ६. मोहक वेष व अलंकार हे
ह्यांनीं धारण केले आहेत; हे रूपवान् आहेत; यशस्वी आहेत आणि हे भरतवंशजश्रेष्ठ
हजारों महारथ्यांचा पराभव करण्यास समर्थ आहेत ७. कमलपत्राप्रमाणें विशाल नेत्र,
उत्कृष्ट मध्यभाग आणि मनोहर हास्य ह्यांनीं युक्त असलेली जी सैरंध्री हीच, हे राजा,
द्रौपदी असून तिच्याच करितां कीचक वध पावले ८. हे महाराजा, मी अर्जुन निःसंशय
तुझ्या कानावर आलों असेनच. मी कुंतीपुत्र, भीमाहून कनिष्ठ असून नकुलसहदेवांपेक्षां
ज्येष्ठ आहें ९. हे महाराजा, तुझ्या गृहामध्यें आजपर्यंत आह्मीं सुखानें दिवस काढिले.
अरे, गर्भवासामध्यें रहाणाऱ्या प्रजेप्रमाणें आह्मी आजपर्यंत अज्ञातवासामध्यें राहिलों
होतों १०. वैशंपायन सांगतातः—अर्जुनानें जेव्हां ते वीर पांच पांडव त्याला कथन
केले तेव्हां विराटपुत्र उत्तर अर्जुनाचा त्याला पराक्रम सांगूं लागला आणि पुनरपि ते
पांडव त्यानें त्याला दर्शविले ११. उत्तर ह्मणतोः—सुवर्णाप्रमाणें ज्याचा शुद्ध गौरवर्ण
आहे; सिंहाप्रमाणें ज्याचा आंगलोट झालेला आहे; ज्याची नासिका विशाल आहे;
ज्याचे नेत्र विशाल व दीर्घ असून नेत्रप्रांतही आरक्तवर्ण व दीर्घ आहेत; तो हा कुरु-
राज युधिष्ठिर होय १२. मत्त गजेंद्रासारिखी गति, तप्त सुवर्णासारिखी शुद्ध गौरवर्ण
कांति, विशाल व दीर्घ स्कंध आणि स्थूल व दीर्घ बाहु ह्यांनीं युक्त असलेला हा

महाधनुष्मान्श्यामो युवा वारणयूथपोपमः । सिंहोन्नतांसो गजराजगामी
पद्मायताक्षोर्जुन एष वीरः १४ राज्ञः समीपे पुरुषोत्तमौ तु यमाविमौ
विष्णुमहेन्द्रकल्पौ । मनुष्यलोके सकले समोस्ति ययोर्न रूपे न बले
न शीले १५ आभ्यां तु पार्श्वे कनकोत्तमाङ्गी यैषा प्रभा मूर्ति-
मतीव गौरी । नीलोत्पलाभा सुरदेवतेव कृष्णा स्थिता मूर्तिम-
तीव लक्ष्मीः १६ वैशम्पायन उवाच ॥ एवं निवेद्य तान्पार्था-
न्पाण्डवान्पञ्च भूपतेः । ततोर्जुनस्य वैराटिः कथयामास विक्रमम् १७
उत्तर उवाच ॥ अयं स द्विषतां हन्ता मृगाणामिव केसरी । अचरद्रथ-
वृन्देषु निघ्नंस्तांस्तान्वरान्रथान् १८ अनेन विद्धो मातङ्गो महानेकेषुणा
हतः । सुवर्णकक्षः सङ्ग्रामे दन्ताभ्यामगमन्महीम् १९ अनेन विजिता
गावो जिताश्च कुरवो युधि । अस्य शङ्खप्रणादेन कर्णौ मे बधिरीकृतौ २०
वैशम्पायन उवाच ॥ तस्य तद्वचनं श्रुत्वा मत्स्यराजः प्रतापवान् । उत्तरं

वृकोदर होय. पाहून घ्या, ह्याला आपण पाहून घ्या १३. गजेंद्राचीच उपमा ज्याला योग्य आहे; ज्याची चालण्याची ढबही गजेंद्रासारिखी आहे; ज्याचे नेत्र कमल-पत्राप्रमाणें विशाल आहेत; ज्यानें प्रचंड धनुष्य धारण केलें आहे आणि जो श्यामवर्ण व तरुण आहे तो हा वीर अर्जुन होय १४. राजाच्या समीप असलेले हे पुरुषश्रेष्ठ नकुलसहदेव असून हे इंद्राविष्णूंची बरोबरी करणारे आहेत आणि संपूर्ण मनुष्यलोकामध्यें रूप, बल व शील ह्यांत ह्यांची बरोबरी करणारा कोणीही नाहीं १५. उत्कृष्ट सुवर्णासारिखें शरीर आणि नीलकमलाप्रमाणें मनोहर कांति ह्यांनीं युक्त व मूर्तिमंत गौरवर्ण प्रभाच कीं काय अशी दिसत असलेली आणि सुरांची अधिदेवता अथवा प्रत्यक्ष लक्ष्मीच कीं काय अशी भासत असलेली जी ही ह्या नकुलसहदेवांच्या बाजूला उभी आहे ती द्रौपदी होय. १६ वैशंपायन सांगतातः—ह्याप्रमाणें ते पांचही कुंतीपुत्र पांडव राजाला विदित केल्यावर विराटपुत्र उत्तरानें अर्जुनाचा पराक्रम त्याला कथन केला १७. उत्तर ह्मणतोः—पशुघातक सिंहाप्रमाणें असलेल्या ह्या शत्रुघातक अर्जुनानें रथ्यांच्या समुदायांमध्यें त्या त्या श्रेष्ठ रथ्यांचा वध करीत करीत संचार केला १८. सुवर्णाची झूल घातलेल्या एका प्रचंड गजाला ह्यानें एकाच बाणानें वेध करून संग्रामामध्यें ठार केला व वेध होतांक्षणीं तो प्रचंड गज तोंडघशी पडला १९. ह्यानेंच गाई जिंकून आणिल्या, युद्धामध्यें कौरवांचा पराजयही ह्यानेंच केला आणि ह्याच्याच शंखाच्या नादानें माझे कान बधिर झाले २०. वैशंपायन सांगतातः—तें त्याचें भाषण श्रवण

प्रत्युवाचेदमभिपन्नो युधिष्ठिरं २१ प्रसादनं पाण्डवस्य प्राप्तकालं हि रोचये। उत्तरां च प्रयच्छामि पार्थाय यदि मन्यसे २२ उत्तर उवाच ॥ आर्याः पूज्याश्च मान्याश्च प्राप्तकालं च मे मतम्। पूज्यन्तां पूजनार्हाश्च महाभागाश्च पाण्डवाः २३ विराट उवाच ॥ अहं खल्वपि सङ्ग्रामे शत्रूणां वशमागतः। मोक्षितो भीमसेनेन गावश्चापि जितास्तथा २४ एतेषां बाहुवीर्येण अस्माकं विजयो मृधे २५ एवं सर्वे सहामात्याः कुन्तीपुत्रं युधिष्ठिरम्। प्रसादयामो भद्रं ते सानुजं पाण्डवर्षभम् २६ यदस्माभिरजानद्भिः किंचिदुक्तो नराधिपः। क्षन्तुमर्हति तत्सर्वं धर्मात्मा ह्येष पाण्डवः २७ वैशम्पायन उवाच ॥ ततो विराटः परमाभितुष्टः समेत्य राजा समयं चकार। राज्यं च सर्वं विससर्ज तस्मै सदण्डकोशं सपुरं महात्मा २८ पाण्डवांश्च ततः सर्वान्मत्स्यराजः प्रतापवान्। धनञ्जयं पुरस्कृत्य दिष्ट्या दिष्ट्येति चाब्रवीत् २९ समुपाघ्राय मूर्धानं संश्लिष्य च

केल्यावर युधिष्ठिराचा अपराध ज्याच्या हातून घडला आहे, तो प्रतापी मत्स्यराज विराट उत्तराला ह्मणाला २१ " ह्या प्रसंगीं पांडुपुत्र धर्मराजाची कृपा संपादन करणेंच मला योग्य दिसत आहे. ह्यास्तव, तुझ्या मनांत असेल तर अर्जुनाला मी उत्तरा अर्पण करितों "२२. उत्तर ह्मणतोः— हे महाभाग्यवान् पांडव सभ्य, पूज्य व मान्य आहेत; व सांप्रत ह्यांचें पूजनच करणें मला अभिमत आहे. ह्यास्तव, पूजेला पात्र असलेल्या ह्या पांडवांचें पूजन होऊं द्या २३. विराट ह्मणतोः— मीही खरोखर संग्रामामध्यें शत्रूंच्या तावडींत सांपडलों असतां भीमसेनानें माझी मुक्तता करून गाईही जिंकून आणिल्या २४. ह्यांच्याच बाहुसामर्थ्यामुळें संग्रामामध्यें आह्मांला विजय प्राप्त झाला आहे २५. ह्यास्तव, तुझें देव बरें करो, आपण सर्वही अमात्यांना बरोबर घेऊन कनिष्ठ भ्रात्यांसहवर्तमान पांडवश्रेष्ठ कुंतीपुत्र युधिष्ठिराची कृपा संपादन करूं २६. आह्मीं न जाणतां राजाला उद्देशून जें कांहीं अयोग्य भाषण केलें आहे त्या सर्वांची ह्या धर्मात्म्या पांडवानें क्षमा करावी २७. वैशंपायन सांगतातः—तदनंतर अतिशय संतुष्ट झालेल्या विराटराजानें पुत्राचा विचार घेऊन काय करावयाचें ह्याविषयीं निश्चय केला व त्या युधिष्ठिराला त्या महात्म्यानें नगरें, कोश आणि निग्रहाधिकार ह्यांसहवर्तमान सर्व राज्य अर्पण केलें २८. तदनंतर विशेषतः अर्जुनाला अनुलक्षून त्या सर्वही पांडवांना तो प्रतापी मत्स्यराज " मोठी सुदैवाची गोष्ट आहे, आज माझें भाग्यच उदयास आलें आहे " असें ह्मणाला २९. नंतर युधिष्ठिर, भीमसेन आणि माद्रीनंदन पांडुपुत्र नकुलसहदेव

पुनः पुनः । युधिष्ठिरं च भीमं च माद्रीपुत्रौ च पाण्डवौ ३० नातृप्यद्दर्शने तेषां विराटो वाहिनीपतिः । स प्रीयमाणो राजानं युधिष्ठिरमथाब्रवीत् ३१ दिष्ट्या भवन्तः संप्राप्ताः सर्वे कुशलिनो वनात् । दिष्ट्या संपालितं कृच्छ्रमज्ञातं वै दुरात्मभिः ३२ इदं च राज्यं पार्थाय यच्चान्यदपि किंचन । प्रतिगृह्णन्तु तत्सर्वं पाण्डवा अविशङ्कया ३३ उत्तरां प्रतिगृह्णातु सव्यसाची धनञ्जयः । अयं ह्यौपयिको भर्ता तस्याः पुरुषसत्तमः ३४ एवमुक्तो धर्मराजः पार्थमैक्षद्धनञ्जयम् । ईक्षितश्चार्जुनो भ्रात्रा मत्स्यं वचनमब्रवीत् ३५ प्रतिगृह्णाम्यहं राजन्स्नुषां दुहितरं तव । युक्तश्चावां हि संबन्धो मत्स्यभारतयोरपि ३६ [२२८४] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि वैवाहिकपर्वण्युत्तराविवाहप्रस्ताव एकसप्ततितमोऽध्यायः ॥ ७१ ॥

विराट उवाच ॥ किमर्थं पाण्डवश्रेष्ठ भार्यां दुहितरं मम । प्रतिग्रहीतुं नेमां त्वं मया दत्तामिहेच्छसि १ अर्जुन उवाच ॥ अन्तःपुरेहमुषितः

ह्यांचें मस्तक अवघ्राण करून त्यांना फिरून फिरून तो कवटाळूं लागला ३०. तथापि, त्यांच्या दर्शनाविषयीं तो सेनाधिपति विराट तृप्त झाला नाहीं. तेव्हां आनंदानें उचंबळूं लागलेला तो विराट युधिष्ठिरराजाला ह्मणला ३१ " तुह्मी सर्वही वनांतून सुखरूप आलां ही मोठ्या भाग्याचीच गोष्ट समजली पाहिजे आणि दुरात्म्या कौरवांना न समजतां तुह्मीं ह्या दुर्घट व्रताचें परिपालन केलें हीही मोठ्या सुदैवाचीच गोष्ट आहे ३२. हें राज्य आणि दुसरेंही जें कांहीं आहे तें मीं तुज कुंतीपुत्राला अर्पण केलें आहे. ह्यास्तव, पांडवांनीं मनामध्यें कांहींएक शंका न आणितां त्या सर्वांचा स्वीकार करावा ३३; आणि सव्यसाची अर्जुनानें उत्तरेचा स्वीकार करावा. कारण, हा पुरुषश्रेष्ठ तिला पति योग्य आहे ३४. ह्याप्रमाणें विराटानें धर्मराजाची प्रार्थना केली असतां त्या धर्मराजानें कुंतीपुत्र अर्जुनाकडे पाहिलें. तेव्हां भ्रात्यानें अवलोकन केल्यावर मत्स्यराज विराटाला अर्जुन ह्मणाला ३५ " हे राजा, तुझ्या कन्येचा मी स्नुषा ह्मणून स्वीकार करितों. मत्स्यवंशज आणि भरतवंशज अशा आपणां उभयतांमध्यें संबंध होणें योग्य आहे ३६. ह्याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षग्रंथात्मक श्रीमहाभारतांतर्गत विराटपर्वांतील वैवाहिकपर्वापैकीं उत्तरेच्या विवाहाचे उपक्रमाविषयीं एकाहत्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७१ ॥

विराट ह्मणतो:— हे पांडवश्रेष्ठा, मीं दिलेल्या ह्या कन्येचा भार्या ह्या नात्यानें स्वीकार करण्याची तुझी कां बरें इच्छा नाहीं ? १. अर्जुन ह्मणतो:— नेहेमीं तुझी

सदा पश्यन्सुता तव। रहस्यं च प्रकाशं च विश्वस्ता पितृवन्मयि २ प्रियो बहुतमश्चासं नर्तको गीतकोविदः। आचार्यवच्च मां नित्यं मन्यते दुहिता तव ३ वयस्थया तया राजन्सह संवत्सरोषितः। अतिशङ्का भवेत्स्थाने तव लोकस्य वा विभो॥ तस्मान्निमन्त्रयेऽहं ते दुहितां मनुजाधिप ४शुद्धो जितेन्द्रियो दान्तस्तस्याः शुद्धिः कृता मया ५ स्नुषायां दुहितुर्वापि पुत्रे चात्मनि वा पुनः। अत्र शङ्कां न पश्यामि तेन शुद्धिर्भविष्यति ६ अभिशापादहं भीतो मिथ्यावादात्परन्तप। स्नुषार्थमुत्तरां राजन्प्रतिगृह्णामि ते सुताम् ७ स्वस्रीयो वासुदेवस्य साक्षाद्देवशिशुर्यथा। दयितश्चक्रहस्तस्य सर्वास्त्रेषु च कोविदः ८ अभिमन्युर्महाबाहुः पुत्रो मम विशाम्पते। जामाता तव युक्तो वै भर्ता च दुहितुस्तव ९ विराट उवाच॥ उपपन्नं कुरुश्रेष्ठ कुन्तीपुत्रे धनञ्जये। य एवं धर्मनित्यश्च जातज्ञानश्च पाण्डवः १० यत्कृत्यं मन्यसे

कन्या माझ्या दृष्टीसमोर असतांना मीं तुझ्या अंतःपुरामध्यें वास्तव्य केलें आहे आणि गुप्तपणें व उघडपणें आजपर्यंत पित्याप्रमाणें माझ्यावर विश्वास ठेवून ती माझ्याशीं वागली आहे २. गायनामध्यें निपुण असलेला मी नृत्यशिक्षक असल्यामुळें तिला अतिशय प्रिय होतों आणि तुझी कन्या नेहमीं गुरुप्रमाणें मला मानीत असे ३. सारांश, हे राजा, वयांत आलेल्या त्या उत्तरेसहवर्तमान मी एक वर्षपर्यंत राहिलों आहें. ह्यास्तव, हे प्रभो, तुला अथवा लोकांना जरी कांहीं भलती शंका आली तरी सुद्धां ती योग्यच ठरणार आहे. तस्मात्, हे राजा, स्नुषा ह्या नात्यानें मी तुझ्या कन्येची मागणी करितों ४. असें झालें असतां इंद्रियनिग्रह व मनोनिग्रह करून मी शुद्ध राहिल्याचेंही सार्थक होईल आणि मीं तिलाही लोकापवादापासून मुक्त केल्यासारिखें होईल ५. तुझ्या कन्येचा स्नुषा ह्या नात्यानें स्वीकार केला असतां पुत्रासंबंधानें अथवा स्वतःसंबंधानें मला कांहीं एक हरकत दिसत नाहीं. ह्यास्तव, मी स्नुषा ह्या नात्यानें तिचा स्वीकार करितों; ह्मणजे उत्पन्न होणाऱ्या लोकापवादापासून उभयतांचीही मुक्तता होईल ६. हे शत्रुतापना, (ह्यांचा पूर्वींच संबंध झालेला होता अशा प्रकारच्या) असत्य लोकापवादाची मला भीति वाटत आहे आणि ह्मणूनच, हे राजा, मी तुझी कन्या उत्तरा स्नुषा ह्या नात्यानें स्वीकारीत आहें ७. साक्षात् देवकुमाराप्रमाणें असलेला माझा पुत्र चक्रपाणि श्रीकृष्णाचा भाचा असून सर्व अस्त्रांमध्यें निपुण आहे ८. सारांश, हे प्रजापालका विराटा, माझा पुत्र महापराक्रमी अभिमन्यु तुला जामात आणि तुझ्या कन्येला भर्ता योग्य आहे ९. विराट ह्मणतोः—जो ह्याप्रमाणें नेहेमीं धर्मनिष्ठ आहे

पार्थ क्रियतां तदनन्तरम् । सर्वे कामाः समृद्धा मे संबन्धी यस्य मेर्जुनः ११ वैशम्पायन उवाच । एवं ब्रुवति राजेन्द्रे कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः । अन्वजानात्स संयोगं समये मत्स्यपार्थयोः १२ ततो मित्रेषु सर्वेषु वासुदेवे च भारत । प्रेषयामास कौन्तेयो विराटश्च महीपतिः १३ ततस्त्रयोदशे वर्षे निवृत्ते पञ्च पाण्डवाः । उपप्लव्ये विराटस्य समपद्यन्त सर्वशः १४ अभिमन्युं च बीभत्सुरानिनाय जनार्दनम् । आनर्तेभ्योपि दाशार्हानानयामास पाण्डवः १५ काशिराजश्च शैब्यश्च प्रीयमाणौ युधिष्ठिरे । अक्षौहिणीभ्यां सहितावागतौ पृथिवीपती १६ अक्षौहिण्या च सहितो यज्ञसेनो महाबलः । द्रौपद्याश्च सुता वीराः शिखण्डी चापराजितः १७ धृष्टद्युम्नश्च दुर्धर्षः सर्वशस्त्रभृतां वरः १८ समस्ताक्षौहिणीपाला यज्वानो भूरिदक्षिणाः । वेदावभृथसंपन्नाः सर्वे शूरास्तनुत्यजः १९ तानागतानभिप्रेक्ष्य मत्स्यो धर्मभृतां वरः । पूजयामास विधिवत्स-

---

आणि ज्याला असें ज्ञान झालेलें आहे त्या कुरुवंशजश्रेष्ठ कुंतीपुत्र अर्जुनाला हें भाषण योग्यच आहे १०. ह्यास्तव, हे पार्थ, आपणाला जें करणें प्रशंस्त दिसत असेल तें आतां आपण करावें. अर्जुन ज्याचा संबंधीं त्या माझे सर्व मनोरथ परिपूर्णच आहेत ११. वैशंपायन सांगतात:—ह्याप्रमाणें राजाधिराज विराट बोलत असतांना मत्स्यराज आणि पांडव ह्यांमध्यें योग्य कालीं तो शरीरसंबंध होण्याविषयीं कुंतीपुत्र युधिष्ठिरानें अनुज्ञा दिली १२. हे भरतकुलोत्पन्ना जनमेजया, तदनंतर कुंतीपुत्र युधिष्ठिर आणि विराटराजा ह्यांनीं सर्व मित्र व श्रीकृष्ण ह्यांच्याकडे दूत रवाना केले १३. नंतर तेरावें वर्ष संपल्यावर सर्व पांचही पांडव विराटाच्या उपप्लव्य नगरामध्यें आले १४; व पांडुपुत्र अर्जुनानें आनर्त देशापासून अभिमन्यु, कृष्ण आणि यादव ह्यांना आणविलें १५. काशिराज आणि शैब्य हे उभयतां युधिष्ठिरावर प्रेम करणारे भूपति, दोन अक्षौहिणी सैन्यासहवर्तमान, बरोबर आले १६. एक अक्षौहिणी सैन्य घेऊन महाबलाढ्य यज्ञसेन आला आणि अपराजित शिखंडी व द्रौपदीचे वीरपुत्र हेही त्याच्या बरोबर येऊन १७, शस्त्र धारण करणाऱ्या सर्वांमध्यें श्रेष्ठ असलेला अजिंक्य धृष्टद्युम्नही आला १८. तेथें आलेले सर्वही राजे शूर होते; सर्वही संग्रामामध्यें शरीराचा त्याग करण्यास तयार होते; सर्वांनींही यथाविधि यज्ञयाग केले होते; सर्वही ब्राह्मणांना विपुल दक्षिणा देणारे होते; सर्वही अक्षौहिणीप्रमाणानें युक्त असलेल्या सेनेचे अधिपति होते आणि सर्वांनाही वेदमंत्रांनीं अवभृथ स्नान घडलें होतें १९. ते आलेले पाहून

भृत्यबलवाहनात्र २० प्रीतोऽभवद्दुहितरं दत्त्वा तामभिमन्यवे । ततः प्रत्युपयातेषु पार्थिवेषु ततस्ततः २१ तत्रागमद्वासुदेवो वनमाली हलायुधः । कृतवर्मा च हार्दिक्यो युयुधानश्च सात्यकिः २२ अनाधृष्टिस्तथाक्रूरः साम्बो निशठ एव च । अभिमन्युमुपादाय सह मात्रा परन्तपाः २३ इन्द्रसेनादयश्चैव रथैस्तैः सुसमाहितैः । आययुः सहिताः सर्वे परिसंवत्सरोषिताः २४ दश नागसहस्राणि हयानां च दशायुतम् । रथानामर्बुदं पूर्णं निखर्वं च पदातिनाम् २५ वृष्ण्यन्धकाश्च बहवो भोजाश्च परमौजसः । अन्वयुर्वृष्णिशार्दूलं वासुदेवं महाद्युतिम् २६ पारिबर्हं ददौ कृष्णः पाण्डवानां महात्मनाम् । स्त्रियो रत्नानि वासांसि पृथक्पृथगनेकशः । ततो विवाहो विधिवद्ववृधे मत्स्यपार्थयोः २७ ततः शङ्खाश्च भेर्यश्च गोमुखाडम्बरास्तथा । पार्थैः संयुज्यमानस्य नेदुर्मत्स्यस्य वेश्मनि २८ उच्चावचान्मृगाञ्जघ्नुर्मेध्यांश्च शतशः पशून् । सुरामैरेयपानानि प्रभूतान्यभ्यहारयन् २९ गायनाख्यानशीलाश्च नटवैतालिकास्तथा ।

धर्मनिष्ठांमध्यें श्रेष्ठ असलेल्या मत्स्यराज विराटानें सेवक, सैन्य आणि वाहनें ह्यांसह-वर्तमान त्यांचा यथाविधि सत्कार केला २०; आणि अभिमन्यूला ती कन्या देण्याचें ठरवून तो आनंदित झाला. तदनंतर ठिकठिकाणाहून राजे आले असतां २१ त्यांमध्यें वनमाला धारण केलेला वासुदेव, हलायुध बलराम, कृतवर्मा, हार्दिक्य, युयुधान, सात्यकि २२, अनाधृष्टि, अक्रूर, सांब आणि निशठ हेही शत्रूंना ताप देणारे वीर, माता सुभद्रेसहवर्तमान अभिमन्यूला घेऊन, तेथें आले २३. एक संवत्सरपर्यंत पांडवांना सोडून राहिलेले इंद्रसेनप्रभृति ते सर्व सेवक सुव्यवस्थित ठेविलेल्या त्या रथांसहवर्तमान एकदम तेथें आले २४. त्यावेळीं दहा हजार गज, एक लक्ष अश्व, एक कोटि रथ आणि एक निखर्व पायदळ इतकें सैन्य त्यांच्या बरोबर आलें २५. वृष्णि, अंधक आणि भोज ह्या देशांतील पुष्कळच महाबलाढ्य पुरुष वृष्णिवंशजश्रेष्ठ महातेजस्वी वासुदेवाच्या मागोमाग आले २६. स्त्रिया, रत्नें आणि वस्त्रें हीं एकेकाला अनेक देऊन महात्म्या पांडवांना श्रीकृष्णानें अहेर केला आणि नंतर मत्स्यराज विराट आणि पांडव ह्यांमध्यें यथाविधि विवाहसमारंभ सुरू झाला २७. तदनंतर पांडवांच्या पुत्राशीं मत्स्यराज विराटाच्या कन्येचा विवाहसंबंध होऊं लागला असतां, विराटाच्या गृहामध्यें शंख, दुंदुभि, संबळ व आडंबर हीं वाद्यें वाजूं लागलीं २८. लहानमोठे मृग आणि शेंकडों पवित्र पशु ह्यांचा वध करून सुरा व मैरेय हीं पेयेंही सेवकांनीं तेथें विपुल आणिलीं २९. गायक, कथेकरी, नट, भाट आणि मागधांसहवर्तमान

स्तुवन्तस्तानुपातिष्ठन्सूताश्च सह मागधैः ३० सुदेष्णां च पुरस्कृत्य मत्स्यानां च वरस्त्रियः । आजग्मुश्चारुसर्वाङ्ग्यः सुमृष्टमणिकुण्डलाः ३१ वर्णोपपन्नास्ता नार्यो रूपवत्यः स्वलंकृताः । सर्वाश्चाभ्यभवत्कृष्णा रूपेण यशसा श्रिया ३२ परिवार्योत्तरां तास्तु राजपुत्रीमलंकृताम् । सुतामिव महेन्द्रस्य पुरस्कृत्योपतस्थिरे ३३ तां प्रत्यगृह्णात्कौन्तेयः सुतस्यार्थे धनञ्जयः । सौभद्रस्यानवद्याङ्गीं विराटतनयां तदा ३४ तत्रातिष्ठन्महाराजो रूपमिन्द्रस्य धारयन् । स्नुषां तां प्रतिजग्राह कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः ३५ प्रतिगृह्य च तां पार्थः पुरस्कृत्य जनार्दनम् । विवाहं कारयामास सौभद्रस्य महात्मनः ३६ तस्मै सप्त सहस्राणि हयानां वातरंहसाम् । द्वे च नागशते मुख्ये प्रादाद्बहुधनं तदा ३७ हुत्वा सम्यक्समिद्धाग्निमर्चयित्वा द्विजन्मनः । राज्यं बलं च कोशं च सर्वमात्मानमेव च ३८ कृते विवाहे तु तदा धर्मपुत्रो युधिष्ठिरः । ब्राह्मणेभ्यो ददौ वित्तं यदुपाहरदच्युतः ३९ गोसहस्राणि रत्नानि वस्त्राणि

पौराणिक त्यांची स्तुति करूं लागले ३०. सर्व मनोहर अवयवांनीं युक्त असलेल्या आणि उज्ज्वल रत्नकुंडलें धारण केलेल्या मत्स्यकुलांतील मुख्य मुख्य स्त्रिया सुदेष्णेला पुढें करून तेथें आल्या ३१; परंतु, कांति, रूप आणि उत्कृष्ट अलंकार ह्यांनीं जरी त्या स्त्रिया युक्त होत्या तरी द्रौपदीच्या रूपानें, यशानें आणि वैभवानें त्या सर्वांनाच मागें टाकिलें ३२. अलंकार घातलेल्या राजकन्या उत्तरेच्या भोंवतालीं गराडा देऊन आणि इंद्राचीच कन्या कीं काय अशा त्या उत्तरेला पुढें करून त्या स्त्रिया उभ्या राहिल्या असतां ३३ कुंतीपुत्र अर्जुनानें सुभद्रेपासून झालेला जो आपला पुत्र अभिमन्यु त्याच्याकरितां त्या सर्वांगसुंदरी विराटकन्येचा स्वीकार केला ३४. त्याठिकाणीं इंद्रासारिखें रूप धारण करणारा महाराज कुंतीपुत्र युधिष्ठिर उभा होता आणि त्यांनींही स्नुषेचा स्वीकार केला ३५. असो. तिचा स्वीकार केल्यानंतर कुंतीपुत्र युधिष्ठिरानें कृष्णाला पुढाकार देऊन महात्म्या सुभद्रापुत्र अभिमन्यूचा विवाह करविला ३६. तेव्हां विराटानें त्या अभिमन्यूला वायूप्रमाणें वेगवान् असलेले सात हजार अश्व, दोनशें मुख्य गज आणि विपुल धन दिलें ३७. नंतर प्रज्वलित अग्नीमध्यें यथाविधि हवन करून आणि ब्राह्मणाचें पूजन करून राज्य, सैन्य आणि सर्व कोश विराटानें पांडवांना अर्पण करून स्वतःलाही अर्पण केलें ३८. श्रीकृष्णानें जें द्रव्य आणिलें होतें तें धर्मपुत्र युधिष्ठिरानें विवाह झाल्यानंतर ब्राह्मणांना दिलें ३९. सारांश, हजारों गाई, नानाप्रकारचीं रत्नें व वस्त्रें, श्रेष्ठश्रेष्ठ

विविधानि च । भूषणानि च मुख्यानि यानानि शयनानि च ४० भोजनानि च हृद्यानि पानानि विविधानि च ४१ तन्महोत्सवसंकाशं हृष्टपुष्टजनायुतम् । नगरं मत्स्यराजस्य शुशुभे भरतर्षभ ४२ [२३२६]
[२५८००] इति श्रीमहाभारते शतसाहस्र्यां संहितायां वैयासिक्यां विराटपर्वणि वैवाहिकपर्वण्युत्तराविवाहे द्विसप्ततितमोऽध्यायः ॥ ७२ ॥

॥ समाप्तं चेदं विराटपर्व ॥

अतः परमुद्योगपर्व ॥ तस्यायमाद्यः श्लोकः ॥ वैशम्पायन उवाच ॥ कृत्वा विवाहं तु कुरुप्रवीरास्तदाभिमन्योर्मुदिताः स्वपक्षाः । विश्रम्य रात्रावुषसि प्रतीताः सभां विराटस्य ततोभिजग्मुः १ श्रुत्वा वैराटकं पर्व वासांसि विविधानि च । हिरण्यं धान्यं गावश्च दद्याद्वित्तानुसारतः १ प्रीतये देवतानां वै दद्याद्द्विजमुख्यके । वाचके तु सुसंतुष्टे तुष्टाः स्युः सर्वदेवताः २ ब्राह्मणान्भोजयेच्छक्त्या पायसैः सर्पिषा सितैः । एवं श्रुते च वैराटे सम्यकफलमवाप्नुयात् ॥ ३ ॥

भूषणें, वाहनें व शय्या ४०, आणि नानाप्रकारचे उत्कृष्ट भोज्य व पेय पदार्थ त्यानें ब्राह्मणांना अर्पण केले ४१; व, हे भरतवंशश्रेष्ठा जनमेजया, हृष्ट व पुष्ट लोकांनीं व्याप्त असलेलें तें मत्स्यराज विराटाचें नगर महोत्सवमय झाल्यामुळें शोभूं लागलें ४२.
याप्रमाणें महर्षिव्यासप्रणीत लक्षश्लोकात्मक श्रीमहाभारतांतील विराटपर्वांतील वैवाहिकपर्वापैकीं उत्तरेच्या विवाहाविषयीं बाहात्तरावा अध्याय समाप्त झाला ॥ ७२ ॥

येथें विराटपर्वही संपूर्ण झालें ॥ ४ ॥

ह्याच्या पुढें उद्योगपर्व असून त्याचा पहिला श्लोक " कृत्वा विवाहं० ततोभिजग्मुः " असा आहे. विराटपर्व समाप्त श्रवण केल्यावर देवताप्रीत्यर्थ द्विजश्रेष्ठाला नानाप्रकारचीं वस्त्रें, सुवर्ण, धान्य आणि गाई हीं द्रव्यानुकूलतेप्रमाणें द्यावीं. कारण, वाचक चांगल्या रीतीनें संतुष्ट झाला असतां सर्व देवता तुष्ट होतात १, २. नंतर घृत व क्षिप्रा काढून यथाशक्ति ब्राह्मणभोजन करावें. अशारीतीनें विराटपर्व श्रवण केलें असतां चांगलें फल प्राप्त होतें ३.

Digitized with financial assistance from
Ms.Swati Thakar
on 13 March, 2020